१०९३
भाषा
५५

# मराठी वाङ्मयाचा इतिहास

— खंड पहिला —

## ज्ञानेश्वर-नामदेवांचा काल

ल. रा. पांगारकर.

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न ॥

# मराठी वाङ्मयाचा इतिहास

## —खंड पहिला—

# ज्ञानेश्वरनामदेवांचा काल.

येथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणकुळवती । आणि पतिव्रता ॥ २१८ ॥
मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां ।
येथ मोक्ष असे आयिता । श्रवणाचिमाजी ॥ २२४ ॥

( ज्ञाने० अ० ४ ).

संपादक व प्रकाशक—

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**, बी. ए.

संपादक ' मुमुक्षु ', नाशीक क्षेत्र.

अक्षय्यतृतीया शके १८५४–मे १९३२.

**किंमत रुपये चार.**

मुद्रकः—एस्. व्ही. परुळेकर, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँडहर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई नं. ४

प्रकाशकः—**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,** नाशीक.

# समर्पण.



अनादि निर्मळ वेदाचें जें मूळ । परब्रह्म सोज्वळ विटेवरी ॥
आनंदाचा कंद पाउलें साजिरीं । चोखा ह्मणे हरी पंढरीये ॥

॥ श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां —

# उपोद्धात

श्रीनारायणाच्या कृपेनें चिरसंकल्पित ग्रंथमालेचा हा पहिला खंड वाचकांच्या हातां देण्याचा आज सुयोग आला आहे. मराठी वाङ्मयाचा संपूर्ण इतिहास आपण लिहावा हा संकल्प चांगला तीन तपांपूर्वीचा आहे. इ. स. १८९८ सालीं बी. ए. च्या परीक्षेला बसण्याच्या धांदलींत असतांना कोल्हापूरच्या ग्रंथमालेंत ' मराठीभाषेचें स्वरूप ' या मथळ्याखालीं एक छोटासा निबंध मी लिहून प्रसिद्ध केला होता व त्यांत मराठी भाषेच्या इतिहासाचे १ ज्ञानेश्वरकाल २ एकनाथकाल ३ तुकारामरामदासांचा काल ४ मोरोपंतांचा काल व ५ मराठीगद्याचा उदयकाल असे पांच विभाग पाडले असून त्याचे शेवटीं ८० निवडक मराठी ग्रंथांची यादी दिली होती. तो निबंध म्हणजे प्रस्तुत ग्रंथमालेचें बीजच होय. त्यानंतरच्या काळांत अनेकांकडून अनेक मराठी ग्रंथांचें संशोधन झालें आहे, बरेचसे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, वाङ्मयाचें क्षेत्र व अभ्यास विस्तृत झाले आहेत, अनेक ग्रंथ व संशोधनात्मक आणि टीकात्मक लेख प्रसिद्धी पावले आहेत, व एकंदरींत मराठी वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टिही व्यापक झाली आहे. विठ्ठरायाची नगरी, भागवतधर्माचें आदिपीठ व मराठी वाङ्मयाचें विश्वविद्यालय असें जें पंढरपूर तेथें बी. ए. झाल्यावर माझें पांच वर्षे वास्तव्य झाल्यामुळें वाङ्मयाच्या अंतरंगांत प्रवेश होऊन दृष्टि अधिक सोज्ज्वल झाली व ज्या भूमिकेवरून संतवाङ्मय निर्माण झालें त्या भूमिकेशीं पुष्कळसें तादात्म्य झालें. 'भक्तिमार्गप्रदीप' तेथून उजळला गेला व मोरोपंती वाङ्मयाचा संशोधनात्मक अभ्यास होऊन ' मोरोपंतांचें चरित्र ' व ' मोरोपंती वेंचे ' हीं त्या अभ्यासास दोन फळें आलीं. अध्यात्म आणि भक्ति अथवा ज्ञानभक्ति हें मराठी वाङ्मयाचें हृदय असल्यामुळें त्याच्याशीं समरसता होऊन त्याचा छंद लागला व ह्या पवित्र वाङ्मयाच्या सेवेस आयुष्य वाहण्याची श्रीहरीनें प्रेरणा केली. वाङ्मयसेवा ही मी उपासनाबुद्धीनें अंगिकारली. गेल्या २५ वर्षांत मोरोपंत, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांचीं चरित्रें लिहिलीं व मोरोपंती वेंचे, समर्थसंजीवनी, ज्ञानेश्वरांची प्रभावळ इ० अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. त्या ग्रंथांची यादी प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटीं दिली आहे. हे सारे ग्रंथ लोकांपुढें आहेत. माझी वाङ्मयसेवा जनीजनार्दनाला निःसंशय मान्य झाली आहे. उपासनाबुद्धीनें ग्रंथरचना करण्याचें काम नारायणानें मला दिलें आहे व त्यामुळें माझें जीवित सुखमय झालें आहे. व्यास,

वाल्मीकि आणि शुक, ज्ञानेश्वर आणि नामदेव, मुक्ताबाई आणि जनाबाई, मुकुंदराज आणि रामदास, एकनाथ आणि तुकाराम, वामन आणि मोरोपंत, सोहिरोबा आणि अमृतराय इत्यादि संतकवींच्या संगतींत सारा काळ आनंदांत जात आहे. संत आपल्या अमृतवाणीनें कायावाचामनाला हरिप्रेमांत भिजवून देव, भक्त आणि नाम ह्यांच्या एकात्मतेचें अनिर्वचनीय सुख देतात. देह प्रारब्धानें प्रपंचांत वावरत असतांना दिवसां आणि रात्रीं, एकांतांत आणि लोकांतांत, मौनांत आणि बोलांत हे संत मला सोडीत नाहींत, व आपल्या अंतरंगसंगतीचा परमानंद देत असतात. यांनीं दयेनें दिलेल्या ज्ञानभक्तिसुखाचा आनंद भोगीत असतांना 'काय या संतांचे मानूं उपकार। मज निरंतर जागवीती' हें वारंवार मनांत येऊन त्यांचे उपकार आठवतात व नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून येतात. त्यांची धीराची व सुखाची वाणी नेहमीं हृदयांत ऐकूं येते व सभोंवारच्या माणसांपेक्षांही मला ते अधिक निकट वाटतात, ते जणुं जिव्हारीं जडलेले आहेत ! संतसंगतींत अद्वयानंद भोगायला मिळणें यापरतें जन्माचें सार्थकच नाहीं ! अस्तु. ही सुखाची ऊर्मी जिरवून तूर्त प्रकृत कार्याकडे वळतों.

२. प्रस्तुत ग्रंथांत कोणते विषय आले आहेत याची कल्पना पुढें दिलेल्या विषयानुक्रमाणिकेवरून थोडीशी होणार आहेच, तथापि ग्रंथाच्या सामान्यस्वरूपाची ओळख येथें करून देणें अवश्य वाटतें. ग्रंथाच्या पूर्वार्धांत ज्ञानेश्वरपूर्वकालीन भारतीय वाङ्मयाचा—कीं ज्यांतील विचारपरंपरेंतूनच प्राकृत वाङ्मय निर्माण झालें—त्या 'आद्यओघाचा' संक्षिप्त इतिहास दिला आहे. आपलें प्राचीन मराठी वाङ्मय वेदशास्त्रपुराणांच्या ओघांतूनच आलेलें असल्यामुळें त्यांचा पूर्वार्धांत प्रपंच केला आहे. वेदविद्या, उपनिषदांतील ब्रह्मविद्या, गीता आणि भागवत ह्या पहिल्या चार प्रकरणांतून ही पूर्वपीठिका स्पष्ट पण सविस्तर दिली आहे. वेदांतील, मुख्यतः ऋग्वेदांतील, वैदिकदेवतांच्या प्रार्थना व अध्यात्मविद्या यांतूनच भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग निघाले असून पुढें उपनिषदांनीं ज्ञानमार्ग उर्फ ब्रह्मविद्या अधिक स्पष्टपणें सांगितली व तिलाच भक्तीची जोड देऊन गीताभागवतांनीं ज्ञानभक्तिप्रधान असा धर्मविचारांचा राजमार्ग जगास दाखवून दिला, हें पहिल्या चार प्रकरणांत दाखविलें आहे. चार वेद, वेदाचीं अंगेंउपांगें, व सांख्यशास्त्र आणि पातंजलयोग याविषयींचा विचार—आपल्या वेदविद्येची माहिती सर्वसामान्य लोकांस असावी म्हणून—पहिल्या प्रकरणांत केला आहे. दुसऱ्या प्रकरणांत दशोपनिषदांचें स्वरूप दाखविलें असून 'आत्मविद्या व आत्मविद्' यांची ओळख उपनिषदांतील महापुरुष जे शांडिल्य, आरुणि, दध्यङ् आथर्वण व

याज्ञवल्क्य यांनीं विशेषतः कशी करून दिली आहे हें उपनिषद्वचनाधारें दाखविलें आहे व सर्वप्रिय आणि सुलभ असें जें कठोपनिषद् त्याचा थोडा विस्तार केला आहे. उपनिषदें व गीता आणि गीता व भागवत यांचें ऐकात्म्य दाखवीत गीताभागवतांचें स्वरूपदर्शन केलें आहे. गीतेनें स्वधर्मकर्माचा उपदेश केला असला तरी मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु व ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य आहे असें गीताप्रकरणांत स्पष्ट केलें आहे. अर्वाचीनांची भागवताविषयींची समजूत कशीही असली तरी प्राकृत वाङ्मयाला भागवताचा मुख्य आधार असल्यामुळें भागवतावरील चौथें प्रकरण जरा विस्तृत लिहिलें आहे. त्यांत भागवतांतील मुख्यमुख्य विषय स्कंधवार सांगितले असून भागवताची बैठक वेदोपनिषदांप्रमाणेंच अद्वैतज्ञानाची आहे, तरी भक्तिस्वरूप, उत्तम भक्त, गुणानुवाद व नामसंकीर्तन, संत व सत्संग याविषयींचे भागवताचे अमृत-मधुर विचार–जे पुढील भक्तिमार्गाच्या वाढीस कारण झाले–ते दिले आहेत. अखेर ‘ गोपींच्या भक्तिप्रेमाची ’ मीमांसा करून भागवतप्रकरण संपविलें आहे. पांचव्या प्रकरणांत भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णूंची एकरूपता यांचें विवेचन केलें आहे. हीं पांच प्रकरणें म्हणजे आपल्या धर्माच्या वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहासच आहे म्हटलें तरी चालेल. सहावें प्रकरण संपूर्ण ऐतिहासिक आहे. त्यांत वेदविरोधी बौद्ध व जैन पंथ भरतखंडांत निघाले; अशोकामुळें बौद्धपंथ फैलावला; पुष्पमित्र, विक्रमादित्य, चंद्रगुप्त व समुद्रगुप्त, हर्षवर्धन, ललितादित्य, भोज इ० सम्राटांच्या राजवटींत हे दोन्ही पंथ मागें पडून वैदिकधर्मानें आपलें साम्राज्य पुन्हा स्थापिलें; परधर्मीय व परदेशीय लोकांच्या टोळधाडी भरतखंडावर कोसळल्या असतांही हिंदुराजांनीं त्यांचा प्रतीकार केला तथापि अखेर यवनांचे पाय येथें रोंवून भरतखंडाचा नकाशा बदलला हा सुमारें दीडहजार वर्षांचा इतिहास ह्या प्रकरणांत दिला आहे. बौद्ध व जैन पंथांशीं दक्षिणच्या द्रविड राजांनीं, विशेषतः तामीळ राजांनीं व तामीळ संत आणि आचार्य यांनीं, निकरानें झगडून वैदिकधर्माच्या पुनरुज्जीवनास कसें साह्य केलें हें सातव्या प्रकरणांत सांगितलें आहे. तामीळांचें साम्राज्य व त्यांचीं अजस्र शिल्पकामें हीं कौतुकावह आहेतच, पण तामीळ संतांनीं व तामीळ आचार्यांनीं जी धर्माची व संस्कृतप्राकृत वाङ्मयाची कामगिरी केली आहे ती साऱ्या भरतभूमीला भूषणभूत झालेली आहे. सर्व प्राकृतभाषांपेक्षां तामीळ भाषा प्राचीनतर आहे व तिच्यांतलें वाङ्मय साऱ्या देशीवाङ्मयाच्या पूर्वींचें आहे. ज्ञानेश्वरनामदेवांच्यापूर्वी पांचसातशें वर्षें त्यांच्याच

तोलाचे संतकवि तामीळ वाङ्मयांत झाले आहेत, त्यांचा व त्यांच्या वाङ्मयाचा परिचय मराठी वाचकांस ह्या सातव्या प्रकरणांत करून दिला आहे. नम्माळवार ज्ञानसंबंदर, अप्पर, माणिक्कवासहर, प्रेममूर्ति नंद यांच्या उत्कट भक्तिप्रेमोद्गारांची ओळख येथें करून दिली आहे, कोठें कोठें त्यांच्या उद्गारांस मी मराठी कवितेचा वेषही दिला आहे ! ह्या संतांच्या पाठोपाठ द्रविडांत कुमारीलभट्ट ( तैलंग ), शंकराचार्य व रामानुजाचार्य ( तामीळ ), व मध्वाचार्य ( तैलंग ) ह्या थोर पुरुषांनीं धर्मकार्य व वाङ्मयकार्य मोठेंच केलें आहे त्याचेंही वर्णन प्रस्तुत प्रकरणांत सांपडेल. शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं चरित्रें, त्यांची ग्रंथसंपत्ति व कामगिरी यांचा ऊहापोह करून हें प्रकरण संपविलें आहे, येथें ग्रंथाचा पूर्वार्ध झाला. हा पूर्वार्ध म्हणजे पुढील देशी वाङ्मयाची पूर्वपीठिकाच होय.

उत्तरार्धांतील पहिलें म्ह० एकंदरीनें आठवें प्रकरण 'महाराष्ट्र देश व मराठे लोक' व नववें 'महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा' हीं दोन प्रकरणें महाराष्ट्रदेशाची व्याप्ती दाखवून महाराष्ट्राचा राजकारण, धर्म व वाङ्मय या बाबतींतला प्राचीन इतिहास देणारीं आहेत. ह्यांत राष्ट्रकूट, शालिवाहन, चालुक्य, जाधव, व शेलारादि छोट्यामोठ्या मराठी राज्यांचा व त्यांच्या काळीं महाराष्ट्रांत झालेल्या राजकीय व वाङ्मयात्मक चळवळींचा इतिहास दिला आहे. ह्यांत हेमाद्री व बोपदेव, पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय, देशीभाषांचा उगम, हालाची सप्तशती, तसेंच मराठी भाषा हजार वर्षें कशी बनत चालली होती इ० विषय सांगत सांगत मुकुंदराज, महानुभाव कवि व विशेषतः ज्ञानेश्वरमहाराज यांनीं मराठी भाषेविषयीं जे जे उद्गार आपल्या ग्रंथांतून काढले आहेत त्या सर्वांचा सविस्तर विचार केला आहे. त्यांत मराठी ग्रंथरचनेंचें धोरण, व मराठीची योग्यता, वर्णिली असून काव्याच्या जुन्याप्रतींचा चिकित्सकदृष्टीनें विचार केला आहे. मराठी भाषेचे आदिकवि मुकुंदराज यांना १० वें प्रकरण दिलें असून ११ वे प्रकरणांत महानुभावपंथाच्या मराठी वाङ्मयाचा समग्र इतिहास सांगितला आहे. ह्या पंथाचे संस्थापक व प्रचारक व पंथीयांचे आचारविचार याविषयींची माहिती त्यांच्याच ग्रंथाधारें दिली असून व हा पंथ महाराष्ट्रीयांत अप्रिय कां झाला याची मीमांसा प्रथम केली असून प्रकरणाचे शेवटीं महानुभावपंथ व वारकरीपंथ यांच्यांत मिळतें कोठें आहे हेंही सांगितलें आहे. हा पंथ भागवतधर्मीय व कृष्णोपासकांचा असल्यामुळें या लोकांना समाजानें आपल्यांत मिळवून घ्यावें व यांनींही लोकांना बोंचणारे आचार-विचार सोडून द्यावे अशी सहानुभूतीची सूचना केली आहे व प्रकरणाच्या मध्यें या

पंथाच्या मराठी वाङ्मयाचें सविस्तर परीक्षण केलें आहे. या पंथाचे सात ग्रंथ मुख्य आहेत. कवीश्वर भास्कराचा ' शिशुपालवध ' व एकादशादि इतर ग्रंथ, महदंबेचे धवळे, दामोदरपंडिताचे 'वत्सहरण' ' ऋद्धिपुरवर्णन ' इ० सुंदर काव्यग्रंथांतील भरपूर वेंचे दिले असून ' चक्रधराची दिनचर्या ' इ० ग्रंथांतील मराठी गद्याचेही नमुने दिले आहेत; त्यावरून या पंथानें मराठी वाङ्मयाची किती बहुमोल सेवा केली आहे याची कल्पना येईल. मुकुंदराजांच्यानंतर व ज्ञानेश्वरनामदेवांच्या जरा अगोदर या पंथानें गद्यपद्य वाङ्मय मराठीभाषेस दिलें आहे. मुकुंदराज व ज्ञानेश्वर हे दोघेही नाथपंथीय असल्यामुळें व गोरक्षनाथांचा व त्यांच्या मराठी वाणीचा ज्ञानेश्वरांच्या आचारविचारावर चांगला संस्कार झाला असल्यामुळें या पंथाचा महाराष्ट्राशीं निकट संबंध येतो व म्हणून १२ वें प्रकरण ' नाथसंप्रदायाला ' दिलें आहे. तेरावें प्रकरण ' श्रीज्ञानेश्वरदर्शन ' हें एका दृष्टीनें प्रस्तुतग्रंथाचें हृदय आहे. ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें—एक नामदेवांनीं अभंगांत वर्णिलेलें व दुसरें सत्यामलनाथांनीं ओवीवृत्तांत आपल्या ' ललितप्रबंध ' ग्रंथांत लिहिलेलें ( हा ग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहे )—हींच प्रमाणभूत आहेत. त्यांची ओळख करून दिल्यावर पुढें ज्ञानेश्वरांचें ' आत्मचरित्र ' त्यांच्याच ग्रंथांतून दिलें असून ' पूर्वील ग्रंथांचे ' ज्ञानेश्वरीवर कसे संस्कार झाले आहेत हें दाखविलें आहे व श्रीगुरुनिवृत्तिनाथ यांच्या कवितेची व विचारांची ओळख करून दिली आहे आणि कृष्णार्जुनप्रेमप्रसंगानें ज्ञानेश्वरांच्या भक्तीच्या जिव्हाळ्याचें व प्रेमळतेचें चित्र उभें केलें आहे व त्यामुळें तत्कालीन संतांच्या अलौकिक प्रेमादरास ते पात्र कसे झाले हें वर्णिलें आहे. या प्रकरणानें ज्ञानेश्वरांच्या अंतरंगाचें वाचकांस खरें दर्शन होईल असा भरंवसा वाटतो चौदाव्या प्रकरणांत नामदेवांच्या चारित्राचा, त्याच्या प्रेमळवाणीचा, त्यांच्या उत्कट विठ्ठलभक्तीचा व उपदेशाचा परिचय वाचकांस करून दिला असून अठराव्या प्रकरणांत त्यांच्या पंजाबांतील कामगिरीचें वर्णन ' ग्रंथसाहेब ' ग्रंथांतील त्यांची हिंदी पद्यें सार्थ देऊन सविस्तर केलें आहे. १४ व्या प्रकरणांत नामदेवांचे शिष्य परिसा-भागवत, गुरु विसोबाखेचर व गोरोबा कुंभार यांची ओळख ओघानेंच झाली आहे. पंधराव्या प्रकरणांत ज्ञानेश्वरांच्या अभंगांची गोडी भोगावयास मिळत असून मुक्ताबाई व चांगदेव, मुक्ताबाई व जनाबाई, सेनान्हावी, नरहरि सोनार, सावतामाळी, जगमित्र नागा, जोगा परमानंद, चोखामेळा इ. भक्तांच्या अमृतमधुरवाणीचेंही श्रवण होणार असून ह्या वैष्णवांच्या मेळ्याचा सुखसमागम वाचकांस अनायासें होणार आहे. सोळाव्या प्रकरणांत प्रथम उपमारूपकादि अलंकारांची गर्दी, गीताज्ञानेश्वरींतील

मुख्य विषय, गीतेंत पातंजलयोग मुख्य नसून अध्यात्मयोग मुख्य आहे, हें सांगित-ल्यावर कर्मयोग, ज्ञानयोग, ज्ञानाज्ञानाचीं लक्षणें, भक्तियोग, अद्वैतभक्तीचें स्वरूप, पुरुषोत्तमाची भक्ति, ज्ञानीभक्ताच्या कर्मांची हातवटी, ज्ञानभक्तीची पराकाष्ठा, खरी शरणागति, गीतेचें परम रहस्य, व अमृतानुभव अशा चढत्या क्रमानें ज्ञानेश्वरांचें व ज्ञाने-श्वरीचें अंतरंग व्यक्त केलें आहे. सतराव्या प्रकरणांत ज्ञानेश्वरींत दृष्टांतादिअलं-कारांच्या द्वारें तत्कालीन समाजाचें, बाह्यसृष्टीचें, पशुपक्षीकृमिकीटकांचे बिंबप्रतिबिंब-न्यायानें स्वरूप कसें दिसतें हें दाखविलें आहे. राजकीय परिस्थिति, व्यापार व उद्योगधंदे, शेती व बागाईत, रोग व रोगनिवारण, नानाविध लोक, लौकिक समजुती, शास्त्रीय शोध, प्रपंचाची ब्रह्मरूपता, पतिपत्नींची एकरूपता, अपत्यप्रेम, त्यावेळचे खेळ, नानाप्रकारच्या वृक्षलता, पशुपक्षी, कृमिकीटक इ० इ०. हें सर्वच प्रकरण समग्र वाचल्यानंतरच त्याचें स्वरूप खरें खरें समजणार आहे. ह्या पहिल्या खंडाचा गोषवारा दुसऱ्या खंडाच्या पहिल्या प्रकरणांत व्यवस्थित रीतीनें सांगितला जाईल.

हा उपोद्घात संपविण्यापूर्वी आभारप्रदर्शनाचें गोड काम करावयाचें आहे. श्रीनारा-यणाच्या व नारायणस्वरूप भक्तांच्या कृपाप्रसादानें संकल्पित मनोरथ ह्या खंडापुरते निर्विघ्नपणें सिद्धीस गेले म्हणून त्यांचें नम्रभावानें आधीं स्मरण करितों. ज्या ज्या ग्रंथांचा, ग्रंथकारांचा, संशोधकांचा, टीकाकारांचा व लेखकांचा, कोशांचा, व मासि-कांचा, प्रस्तुत ग्रंथ उभारण्याचे कामीं उपयोग झाला त्या सर्वांचा मी आभारी आहे.

संसाराचा भार शिरीं असूनही चरितार्थाचें कोणतेंही साधन हातीं न घेतां आजन्म विद्याव्यासंग कायम ठेवून ग्रंथरचनेचीं प्रचंड कामें या काळांत उभारणें किती कठिण आहे हें अनुभवाशिवाय कळायचें नाहीं. वयाचीं ५० वर्षें सावकारांच्या मदतीशिवाय मला एकही ग्रंथ छापतां आला नाहीं! सावकारी कर्जाच्या ओझ्याखालीं मान वांकली असतांही विद्यानंदाच्या बळावर ५० वर्षें विद्याव्यासंग व ग्रंथरचना यांत काळ बराच समाधानांत गेला. गेलीं १० वर्षें मात्र सावकारी ऋण नाहीं! ही स्थिति **इंदोरचे माजी महाराज श्रीतुकोजीराव होळकर** यांच्या औदार्यामुळें आली. धार्मिक व्याख्यानें व प्रवचनें ऐकण्यासाठीं महाराजांनीं प्रथम मसूरीस व नंतर इंदोरास बोला-वले, दीड वर्षें माझें इंदोरास राहणें झालें, व स्वतः महाराज व त्यांच्या राजघराण्यांतील मंडळी मजशीं फार सौजन्यानें व प्रेमादरानें वागली. त्यानंतर ४ वर्षें पुण्यास-काढल्यावर महाराजांनीं पुन्हां व्याख्यानश्रवणासाठीं आपला एक ऑफीसर पाठवून बोलावून नेले व २२ दिवसांत ११ व्याख्यानें राजमंडळासमवेत ऐकून प्रसन्नमनानें एक मोठी देणगी दिली. या त्यांच्या उदार देणगीमुळें गेलीं १० वर्षें चांगल्या प्रकारें

निभावलीं ! आतां ६० व्या वर्षी ६ वर्षांच्या परिश्रमानंतर प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. याच्या पुढील खंडांची योजना सिद्ध आहे. ' एकनाथतुकारामांचा काल ' हा दुसरा खंड होणार आहे. नामदेवांचें प्रयाण शके १२७२ मध्यें झालें. तेथपासून तों तुकोबारायांच्या प्रयाणापर्यंतच्या ह्म. १५७२ पर्यंतच्या ३०० वर्षांच्या कालाचा मराठी वाङ्मयाचा इतिहास ह्या दुसऱ्या खंडांत यावयाचा आहे. पंधराव्या सोळाव्या शतकांत वैष्णवधर्माची जी प्रचंड लाट भरतखंडभर उठली व पसरली तिचा इतिहास ह्या भागांत यावयाचा आहे. कबीर, रामानंद, तुळशीदास, सूरदास, मिराबाई, नरसीमेहता, कृष्णचैतन्य इ० वैष्णवभक्तांच्या कामगिरीचें व वाङ्मयाचें स्वरूप ह्या दुसऱ्या खंडांत व्यक्त होणार असून पुढें महाराष्ट्र संतकवींचें ह्म० मुख्यतः एकनाथ व तुकाराम यांच्या वाङ्मयाचें विवरण विशेषेंकरून येईल. ' रामदास व रामदासीसंप्रदायाचें वाङ्मय ' या विषयास तिसरा खंड दिला जाईल. पांच खंडांत मराठी वाङ्मयाचा संपूर्ण इतिहास द्यावयाचा हेतु आहे. तूर्त हा पहिला खंड जनीजनार्दनास अर्पण करून दुसऱ्या खंडाकडे वळतों. ' पुढील विचार देव जाणे ' हेंच खरें आहे, तथापि ' भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळों आलें ' हा भक्तांचाच काय पण माझ्यासारख्या भक्तदासांचाही अनुभव आहे.

प्रस्तुत खंडाच्या प्रकाशनाचें श्रेय **अंमळनेरचे दानशूर व विद्याप्रेमी सद्गृहस्थ श्रीमंत प्रतापशेट** यांना आहे. दोन वर्षांपूर्वी प्रतापशेट यांनीं व्याख्यान-श्रवणासाठीं मला अंमळनेरास बोलावून नेलें, व तेथें त्यांनीं माझीं सात व्याख्यानें करविलीं. श्रोत्यांत आमचे सन्मित्र सुप्रसिद्ध 'गोविंदसुत' उपस्थित होते. 'ज्ञानेश्वरी सृष्टि' व ' संतमेळ्याचें अभंग वाङ्मय ' ह्या दोन प्रकरणांवर हीं व्याख्यानें झालीं. आठवे दिवशीं प्रतापशेट यांनीं प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईचा सर्व खर्च देण्याचें स्वसंतोषानें कबूल केलें व एक महिन्यांत सर्व रक्कम नाशकास पाठवूनही दिली ! त्यांनीं अंमळनेरास १६ वर्षांपूर्वी ' तत्वज्ञानमंदिर ' ही २ लाख रुपये खर्चून उत्कृष्ट संस्था स्थापन केल्याचें मशहूर आहे. संस्थेंत निवडक अशा पांच हजार ग्रंथांचा संग्रह आहे. श्रीमंत प्रतापशेट यांनीं विद्याभिवृद्धिप्रेमानें प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाचा खर्च स्वयंप्रेरणनें दिला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून दुसऱ्या खंडाच्या योजनेकडे आतां चित्त वळवितों. इति शम्.

श्रीरामनवमी–शके १८५४ }<br>श्रीक्षेत्र नाशीक. }

साधुसंतांचा दासानुदास<br>**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

# मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड पहिला.

## ज्ञानेश्वरनामदेवांचा काल.

## विषयानुक्रमणिका.

### पूर्वार्ध.

**प्रास्ताविकः**—वेदधर्मीयांची एकरूपता पृ० १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

**१ वेदविद्याः**—विषयप्रवेश ९ ऋग्वेद ११ वैदिक देवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

**२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः**—दशोपनिषदें ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ्आथर्वण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपनिषद्—नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्ट्युत्पत्तीची काहणी ७४ नीतींचा व साधनमार्गाचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

**३ भगवद्गीताः**—स्वधर्मकर्म ८७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधा भक्ति १०८

**४ श्रीमद्भागवतः**—गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्य विषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माचीं मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

...वाचनालय, सातारा.



**५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः**—भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७.

**६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः**—ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस प्रारंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिकधर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २२० बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३

**७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः**—तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्र शिल्पकामें २३८ तामीळ वाङ्मय २३९ बारा अळवार उर्फ वैष्णव २४२ नम्माळवार २४६ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुल्लर २६४ प्रेममूर्तिनंद २६५ कुमारील भट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध.

**८ महाराष्ट्र देश व मराठे लोकः**—दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०६ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हां राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठी संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व

वोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेलें रामदेवरावांचें गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

**९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः**—देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी–साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

**१० आदिकवि मुकुंदराजः**—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथरचना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणोपासना ४१०.

**११ महानुभावपंथाचे मराठी वाङ्मयः**—पंथाचे संस्थापक व प्रचारक ४१३ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां? ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा ‘शिशुपालवध’ ४२७ भास्कराचा एकादशस्कंद ४४० भास्कर कवींचें श्रीकृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचें धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर पंडिताचें ‘वत्सहरण’ ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४६५ ज्ञानप्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

**१२ नाथपरंपराः**—नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनीनाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओंव्या ४९४

**१३ श्रीज्ञानेश्वरदर्शनः**— कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वरचरित्र ५०६

ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ ज्ञानेश्वरीवर पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभाक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग ५३६ समकालीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ ज्ञानेश्वरांचा भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

**१४ भक्त नामदेव ( पूर्वार्ध ):—**नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेमसुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५९२

**१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय:—**प्रास्तविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत ५९७ ' बाप रखुमादेवीवर ' ६०१ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ६०१ ' गोपाळेविण नुद्धरिजे ' ६०८ ' आवडे तें करिसी देवा ' ६१२ आंधळा, घोंगडी, व काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६२० ताटीचे अभंग ६२२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईंची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद बाबा ६३८ कान्हू पाठक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दहीकाल्याचा प्रसाद ६५८

**१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग:—**साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अंलकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ६७२ अठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे. ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाचीं किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञानाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनिष्ठांचे आचारविचार ६९७ भक्तियोग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची भक्ति ७१० कर्मांची हातवटी ७१० ज्ञानभक्तीची पराकाष्ठा ७१४ खरी शरणागति ७१७ ज्ञानेश्वरीचें परमरहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

**१७ ज्ञानेश्वरी सृष्टि**:--आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे–मोती चौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे-बाजार पेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ७५९ प्रपंच ब्रह्मरूप आहे ७६१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७४ वृक्षवेली ७७५ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८२ शिकार, पारधी व पोपट ७८५ चकोर आणि चातक ७८७ भ्रमर, चक्रवाक्, कासवी, राजहंस व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

**१८ भक्त नामदेव ( उत्तरार्ध )**:--१ कीर्तनाचा सुखसोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें ८०० मेलेली गाय उठवली याबद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

# पूर्वार्ध

# ज्ञानेश्वरनामदेवांचा काल

## प्रास्ताविक

हें धर्मजात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें ।
ऐसा ओघ हा स्वभावें । आद्य असे ॥ ( ज्ञानेश्वरी ४-४९ )

### १ वेदधर्मीयांची एकरूपता.

१ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा महाराष्ट्राला भागवतधर्माची शिकवण देणारा अलौकिक ग्रंथ शके १२१२ मध्यें अवतरण्यापूर्वी वेदकालापासून भरतखंडाची धर्म, राजकारण व वाङ्मय या बाबतींत कशी स्थिति होत आली होती याचा विहंगमदृष्टीनें या पूर्वार्धांत मी विचार करण्याचें योजिलें आहे. वेद आणि वैदिक धर्म अनादि, शाश्वत व सत्य आहे. त्याची एकरूपता कधींही ढळलेली नाहीं. सूर्यावर अनेक ढग येतात आणि जातात तरीही सूर्य आपल्या अमित तेजानें आकाशांत अखंड तळपत असतो, त्याप्रमाणें सनातन वैदिकधर्मावर अनेक बालंटें आलीं, देशांत अनेक क्रान्त्या झाल्या, कधींकधीं वैदिक धर्माचा लोप झाल्याचेंही भासलें, तथापि त्याचें प्रखर तेज लुप्त झालें नाहीं. विपरीत काळाच्या आघातांलाही तें पुरून उरलें आहे, इतकेंच नव्हे तर यापुढें साऱ्या भूमंडळावर त्याचा प्रकाश पसरल्याशिवाय राहणार नाहीं. वैदिक धर्म परम शुद्ध व सनातन आहे, व त्याचे सिद्धांत त्रिकालाबाधित आहेत. हिंदुस्थानचे भौगोलिक किंवा राजकीय दृष्ट्या भिन्नभिन्नकाळीं वेगवेगळे विभाग पडले, प्रांतवार देशीभाषा भिन्नभिन्न झाल्या, नाना मतमतांतरांचे वेळोवेळीं झगडे झाले, तरी वैदिक धर्म स्वरूपतः अविकृत व एकरस आहे. प्रतिकूल काळां-

तूनही हिंदुस्थानचें एकराष्ट्रीयत्व त्याच्या धर्मानें अभंग ठेवलें आहे. एका वेदाचे चार वेद झाले; त्याच्या अनेक शाखा झाल्या; शास्त्रें, उपशास्त्रें किंवा दर्शनें झालीं; उपनिषदें व पुराणें झालीं; तसेच रामायण आणि महाभारत, गीता आणि भागवत, कपिलांचें सांख्य व पतंजलीचा योग, शैव आणि वैष्णव पंथ व ह्या व इतर पंथोपपंथांचें अवाढव्य वाङ्मय, द्वैताद्वैतमतप्रवर्तक आचार्य व त्यांचीं भाष्यें, नाना देशीभाषांतून प्रगट झालेली विविध उपासनांचीं नानाविध गीतें—हीं सर्व सुवर्णाच्या सूत्रांत ओविलेल्या मणिगणांप्रमाणें एकरसात्मक आहेत. गाडीचीं चाकें व अरे फिरत राहिले तरी आंतला कणा कांहीं फिरत नाहीं—तो स्थिर असतो, किंवा आकाशांतले अनेक गोल फिरत राहिले तरी ध्रुवमंडळ अढळ राहतें; त्याप्रमाणें नाना स्थित्यंतरांतून किंवा मतांतरांतून वैदिक धर्म अचळ राहिला आहे. शाखा, पानें व अनेक फुलें असूनही वृक्ष एक असतो. सरस्वतीतीरावर वेदसूक्तें गाणाऱ्या ऋषिमुनींपासून तों अर्वाचीनकाळच्या रामकृष्णपरमहंसापर्यंत सर्व संतांनीं एकच गीत गाइलें आहे व तोच सनातन धर्म होय. हें सारें वाङ्मय आत्मतत्वप्रकाशक आहे. आदिपुरुषाला सर्वांनीं आत्मप्रेमानें वर्णिलें आहे. सर्वांचें मूळ वेद आहेत, शास्त्रें व पुराणें वेदाला अनुसरलीं आहेत, संत व भक्त एकाच अनुभवाला पावले आहेत, म्हणून आपला धर्म वेदशास्त्रपुराणोक्त आहे असें आपण म्हणतों. आपलें पवित्र वाङ्मय हा सारा वैदिक धर्माचा पसारा आहे. वेदाविषयीं सर्वांची प्रामाण्यबुद्धि आहे. उपासनापंथांच्या विविधत्वानें वेदधर्माच्या एकरूपतेस बाध येत नाहीं. वेदोपनिषदंतर्गत ब्रह्मविद्या ही आपल्या धर्माचा आत्मा आहे. गीताभागवतांनीं व गेल्या दोन हजार वर्षांतल्या शैववैष्णवपंथांनीं व सर्वदेशीय साधुसंतांनीं दिक्कालाद्यनवच्छिन्न अशा वैदिक परब्रह्मालाच परोपरीनें गायिलें आहे. वेदशास्त्रपुराणें व त्यांना अनुसरणारे प्राकृत ग्रंथ हे हिंदूंच्या राष्ट्रीय वाङ्मयांत प्राधान्येंकरून येतात व त्यांत विविधत्व भासलें तरी हें

सर्व वाङ्मय वैदिकधर्मानुयायी असल्यामुळें त्यांतील एकपणाच्या दोऱ्यानें भरतखंडांतील अनेक भाषा, प्रांत व पंथ एकत्रित केले आहेत, म्हणून वैदिक धर्म व वैदिक वाङ्मय यांत आर्यांच्या एकराष्ट्रीयत्वाचें बीज आहे.

## २ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता.

२ प्राचीन मराठी वाङ्मयाच्या हृदयाला स्पर्श करण्यापूर्वीं त्याच्या-पूर्वींचा 'आद्य ओघ' पाहिला पाहिजे. या वाङ्मयाची पूर्वपरंपरा फार पुरातन आहे, वेदापासून आहे. वेदापासून आरंभ करून आपण ज्ञानेश्वरीपर्यंत मधले मुख्य मुख्य टप्पे पाहत येऊं. चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें किंवा चौदा विद्या व चौसष्ट कला ही भाषा सर्वांच्या परिचयाची आहे, पण यांच्या आंतील विचाराची सांखळी एक कशी आहे याची आपणांस फार करून माहिती नसते. मराठी वाङ्मयांत कांहीं सांकेतिक शब्द वारंवार येतात, पण त्यांचा अर्थ ह्या मागील सांखळीकडे पाहत गेल्याशिवाय नीट लक्षांत येत नाहीं. हें म्हणणें थोडींशीं उदाहरणें देऊन स्पष्ट करूं. आधारचक्र, दशमद्वार, इडापिंगला, अनुहतध्वनि, सतरावी जीवनकळा, लयलक्ष, मनपवन, नाद व ज्योति, त्रिकूट हाट गोल्हाट, बारा सोळा इ० शब्द मराठी उच्च वाङ्मयांत इतका वेळ येतात कीं त्यांना दूर सारून आपल्याला ते ते प्रसंग चांगलेसे समजणार नाहींत. हे सारे शब्द योगशास्त्रांतील आहेत व त्यांचें यथार्थ मर्म साध्या वाचकाला कळणें कठिण आहे, नव्हे अशक्य आहे. कोणी विचारील कीं मग हें उच्च प्रतीचें वाङ्मय चांगलें समजण्यापूर्वीं आम्हीं काय योगाभ्यास करावा? केल्यास उत्तम! ज्ञानेश्वरादि अनेक सत्कवि योगेश्वर होते, मुक्ताबाईजनाबाईसारख्या स्त्रियाही योगिनी होत्या, असें त्यांच्या वाङ्मयावरून उघड दिसतें. ज्ञानेश्वरी ही वारकऱ्यांची 'आई'ना, पण पुष्कळ वारकरी वक्त्यांना ज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय ओलांडून पुढें जावें लागतें किंवा तेवढी वेळ कशीतरी मारून न्यावी लागते! हा योगाचा विषय क्षणभर बाजूला ठेवूं. दुसरीं उदाहरणें पहा. ज्ञानेश्वरींतलीच एक ओवी: 'छत्तीसां

सततीसावें । चोवीसां पंचवीसावें । तिन्हीं नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें ( अ० १४-२२५ ) ही मराठी ओवी संस्कृत भगवद्गीतेच्या अभ्यासाशिवाय कळावयाची नाहीं. गीतेच्या १३ व्या अध्यायांत श्लोक ५-६ मध्यें ' महाभूतान्यहंकारो ' इ. ३६ तत्वांचें क्षेत्र बनलें आहे म्हणून म्हटलें आहे. ह्या सविकार ३६ तत्वांहून निर्विकार ब्रह्म वेगळें व पलीकडचें आहे. म्हणून त्याला सततिसावें म्हटलें आहे. तसेंच सांख्यशास्त्रांत २४ तत्वें प्रधान मानलीं आहेत, त्याहून ब्रह्म पलीकडचें आहे, म्हणून त्याला 'पंचविसावें' म्हटलें आहे. ' तूं परम दैवत तिहीं देवां । तूं पुरुषजी पंचविसावा । दिव्य तूं प्रकृतिभावां-। पैलीकडील॥ ( अ. १०-१५० ) सत्वरजतम ह्या तीन गुणांना नाहींसें करून सहजपणानें विलसणारे तें ब्रह्म आहे. ही एक साधी ओवी, पण गीतेच्या १३ व्या व १६ व्या अध्यायांला व सांख्यांच्या प्रकृतिपुरुषविवेकाला सांगातें घेतल्याशिवाय उलगडणारी नाहीं. हरिपाठाच्या अभंगांतल्या २३ व्या अभंगाचा पहिला चरण ' सात पांच तीन दशकांचा मेळा । एक तत्वीं कळा दावी हरि' असा आहे. भागवताच्या ११ व्या स्कंधांतला २२ वा तत्वनिर्णयाचा अध्याय साह्याला घेतल्याशिवाय हा चरण लागायचा नाहीं. जनाबाईचें 'बाई मी लिहिणें शिकलें सद्गुरुरायासी ' यावर एक पद आहे. त्यांत ' चार खोल्या चार घरीं । चार पुरुष चार नारी । करूनि चौघांचा अव्हेर । बसले पांचव्यापाशीं ॥ बाई०॥ पांच शाहणे पांच मूर्ख । पांच चालक असती देख...' अशीं कडवीं आहेत. चार घरें ह्म० जारजादि चार प्राणिकोटी, चार खोल्या ह्म० ब्राह्मणादि चार वर्ण, चार पुरुष ह्म० स्थूलादि चार देहांचे प्राज्ञ, तैजस, विश्व व प्रत्यगात्मा हे चार अभिमानी पुरुष—चार नारी ह्म० जागृत्यादि चार अवस्था, पांच शाहणे ह्म० ज्ञानेंद्रियें, पांच मूर्ख ह्म० कर्मेंद्रियें अशा प्रकारचा ह्या कडव्यांचा अर्थ वेदांतशास्त्राध्ययनावांचून कळायचा नाहीं. एकनाथांनीं आत्म्यावर मोत्याचें रूपक करून एक सुंदर पद केलें आहे. 'धुतांच मोती जळीं हरपलें । सखोल मोठं पाणी ।

चला पाहुं चार सहा आठरां जणीं.' असा त्याचा आरंभ आहे. आतां येथें जळ ह्म० मायेचा प्रवाह, त्यांत हरपलेलें मोतीं ह्म० आत्मा, 'चार सहा अठरा' ह्म० चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें हा अर्थ समजल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वेदशास्त्रपुराणांच्या साह्यानें आपलें मायेंत हरपलेलें आत्मतत्व आपण शोधून काढूं असा याचा अर्थ आहे, ह्मणजे वेदशास्त्रपुराणें आत्मतत्वशोधक आहेत असा नाथांचा भाव उघड आहे, व ह्या आत्म्याला किंवा परब्रह्मालाच संतांनीं विठ्ठल म्हणून चारसहाअठरांचा वारंवार उल्लेख केला आहे. तुकोबांचा 'सांवळें रूप ल्यावें डोळां। साचौअठरांचा गोळा' हा अभंग पहा. वेदशास्त्रपुराणांचें सारभूत असें परमात्म्याचें सावळें रूप डोळ्यांत भरून घ्या असें तुकोबा सांगतात. उपनिषदांचें परब्रह्म तोच संतांचा विठ्ठल आहे. विश्वीं विश्वंभर' ह्या अभंगांत तुकोबांनीं सांगितलें आहे कीं 'विश्वीं विश्वंभर' भरला आहे हें वेदवेदांतांचें सार आहे, 'जगीं जगदीश' हें शास्त्रांनीं 'सावकाश' ह्म० विचार करकरून ठरविलें आहे, 'व्यापिलें हें नारायणें' असें पुराणांनीं (आबालवृद्धांच्या व चारी वर्णांच्या कानीं पडावें ह्मणून) 'गर्जून सांगितलें' आहे व 'जनीं जनार्दन' भरला आहे असा संतांचा प्रत्यय आहे; तात्पर्य वेद, शास्त्रें, पुराणें व संत या सर्वांनीं मिळून सर्वत्र एकीएक परमात्मा भरला आहे हेंच एक तत्व सांगितलें आहे. ह्याच्याचबरोबर 'वेद अनंत बोलिला' हा तुकोबांचा दुसरा अभंग घ्या. वेद अनेकमुखांनीं काय बोलिला ? 'विठोबासी शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें.' वेदाप्रमाणें सकळशास्त्रांचा विचार व अठरा पुराणांचाही सिद्धांत हाच आहे. निर्गुण तोच सगुण व सगुण तोच निर्गुण, अमूर्त तोच मूर्त व मूर्त तोच अमूर्त असा परमात्मा एकीएक आहे. देव सगुण कीं निर्गुण, मूर्त कीं अमूर्त, हा संदेह आहे तोंवर देव कळलाच नाहीं ! 'देव आहे जैसा तैसा नेणवे सहसा। भांबावला कैसा विश्वजन' याचेंच ज्ञानोबांस नवल

वाटलें आहे. ' उपनिषदांचा गाभा ' तोच ' देहुडा पाउलीं ' ( दीड पायावर मुरलीधरवेषानें ) उभा आहे. ' ब्रह्मविद्येचा पुतळा । गाई राखितो गोवळा । श्रुति नेणवे ते लीळा । वेदां सनकादिकां. ' असो. येथें सांगावयाचें एवढेंच आहे कीं वेदशास्त्रपुराणादिकांच्या ओघानें आलेला विचारप्रवाहच प्राकृत वाङ्मयाच्या पात्रांतून वाहत आहे, यासाठीं आपणास प्रथम त्या ओघाच्या उगमापासून आरंभ करूनच क्रमानें त्या ओघाबरोबरच मराठी वाङ्मयसागरांत प्रवेश केला पाहिजे. यासाठीं अतिसंक्षेपरूपानें आपण वेदापासूनच मागील ओघ पाहत येऊं.

३ ज्ञानेश्वर व त्यांचें मंडळ यांनीं भागवतधर्माची जी एक प्रचंड लाट महाराष्ट्रभर उसळविली, महाराष्ट्रावर १३ व्या शतकांत जी एक धार्मिक चळवळीची जगड्व्याळ लाट ज्ञानेश्वरांच्या पुरस्कर्तृत्वानें उठली, ती लाट एकाकी होती कां तिच्या पाठीमागें आणखी दुसऱ्या मोठ्या लाटा होत्या ? समुद्रकिनाऱ्यावर आपण भरतीच्या वेळीं क्षणभर भरतीची मौज पाहत उभें राहिलों तर आपणांस काय दिसतें ? जी एक प्रचंड लाट आपल्यासमोर दिसते तिच्या पाठीमागें अनेक लहानमोठ्या लाटा उसळत असतात व त्या सर्व एकमेकींस पुढें रेटीत असतात. पाठीमागच्या लाटांचा जोर असल्याशिवाय पुढची लाट मोठी होत नाहीं, किंबहुना पाठीमागच्या अनेक लाटांचें एकीकरण होऊन पुढची मोठी लाट बनत असते ! फार दूरवर नजर पोंचविल्यास लाटांमागें लाटा, लाटामागें लाटा, असा भरतीचा एकसारखा रमणीय देखावा आपल्या नजरेस येऊन सागराचें गांभीर्य व सौंदर्य यांच्या दर्शनानें आपलें मन अगदीं मोहून जातें व अखेर समुद्रापलीकडचा भाग आकाशास लागल्यासारखा दिसतो, व त्या पलीकडे आपली नजर चालत नाहीं. कोणत्याही चळवळीचा इतिहास पाहिल्यास हाच प्रकार आढळून येतो. जेथें नजर पोंचत नाहीं, बुद्धी चालत नाहीं, अशा एका ठिकाणीं विचारांची धांव थांबवून आपण त्यास अनादि, अतर्क्य म्हणतों व मोठ्या

... वाचनालय, सातारा.



पूज्यबुद्धीनें त्याकडे पाहत असतों. हिंदुस्थानच्या धार्मिक चळवळींच्या इतिहासाकडे पाहतां सर्वांच्या पलीकडे वेद दिसतात. वेदापासून आपण आपली परंपरा लावीत असतों. वेद अनादि व सर्वाद्य आहेत, वेदापलीकडे व अलीकडे एक परमात्माच व्यापून राहिला आहे ज्ञानेश्वरांनींही पूर्वकालीन सर्व ज्ञानीभक्तांप्रमाणें वेदापर्यंत नजर भिडविली आहे. ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या। जयजय स्वसंवेद्या। आत्मरूपा'–आत्मतत्वाचें प्रतिपादन प्रथम वेदांनींच केलें आहे म्हणून सर्व वाङ्मयाचें मूळ वेद आहेत. वेद आपले आईबाप आहेत. 'पै अहितापासूनि काढिती। हित देऊनि वाढविती। नाहीं श्रुतीपरौती। माउली जगा ॥ ( ज्ञाने० १७ ) अशा वेदैकनिष्ठावर कसलींही अनिष्टें आलीं तरी तीं सूर्यावरील ढगांप्रमाणें वितळून जातात. अनिष्टें कोणापासून येतात? 'जो जगीं समान सकृप। हिताहित दाविता दीप। तो अमान्य केला बाप। वेद जेणें'–त्यांपासून! 'श्रुतिस्मृतींची भीड' सोडून, 'विधीचें वस्त्र' टाकून, जे 'स्वैराचाराच्या रानांत शिरतात' त्यापासून! ज्ञानेश्वरांच्या पूर्वी दोन आडीच हजार वर्षांपासून हिंदुस्थानांत कांहीं वेदविरुद्ध बंडें माजलीं होतीं व त्या बंडांचा मोड वेदांनींच भागवतधर्माचें सुमंगल, रमणीय व सर्वसेव्य असें रूप घेऊन केला. ह्याचें विवेचन करण्यापूर्वी आपण ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्रधर्माला त्याच्या पूर्वीच्या कोणकोणत्या चळवळींपासून कसकसें साह्य झालें हें पाहून येऊं. नाथपरंपरेनें ज्ञानेश्वरांना स्फूर्ति झाली असली तरी ही नाथपरंपराही ह्या भरतखंड व्यापणाऱ्या ज्या मोठ्या चळवळीचें केवळ एक अंग होती त्या मोठ्या चळवळीकडे पाहिल्याशिवाय महाराष्ट्रीय चळवळीचें यथार्थ स्वरूप आपल्या नीट ध्यानांत येणार नाहीं म्हणून ज्ञानेश्वरांच्या मागें आपणास अगदीं थेट वेदापासून आरंभ केला पाहिजे.

---

# ज्ञानेश्वरनामदेवांचा काल

## १ वेदविद्या.

अशेषांही पुरुषार्थां । जो गोसावी हो ह्मणे पार्था ।
तेणें श्रुतिस्मृति माथां । बैसणें घापे ॥ ४५९ ॥
शास्त्र ह्मणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें ।
जें घेववी तें न ह्मणावें । विषही विरु ॥ ४६० ॥
ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा ।
तरी कें आहे अनिष्टा । भेटणें गा ॥ ४६१ ॥
पै अहितापासूनि काढिती । हित देऊनि वाढविती ।
नाहीं श्रुतीपरौती । माउली जगा ॥४६२॥ (ज्ञाने० अ. १६).

### १ विषयप्रवेश.

१ भरतखंडांतील वाङ्मयाचा, तत्वज्ञानाचा किंवा भक्तिज्ञानाचा विचार कर्तव्य असतां प्रत्येकास प्रथम वेदापुढें मान लवविणें अवश्य आहे. वेद सर्व जगाच्या इतिहासांत प्राचीनतम आहे, व वेदाचा विचार पाहिल्याशिवाय पुढें पाऊल सरकणें अशक्य आहे, याविषयीं स्वदेशी विदेशी पंडितांचें मतैक्य आहे. वेद हा ज्ञानाचा मूळ झरा आहे, तो सर्व वाङ्मयाचा उगम आहे. आर्यसंस्कृतीचें मूलस्वरूप वेदांत पाहण्यास सांपडतें. वेद सर्वश्रेष्ठ आहेत, वेद अनादि, अपौरुषेय व नित्य आहेत, वेद ही ईश्वराची पवित्र वाणी आहे, वेद हे आदिपुरुषाचें निश्वसित आहे, अशी वेदकालापासून आजतागाईत आम्हां हिंदूंची श्रद्धा आहे. आमच्या धर्माचे, तत्वज्ञानाचे, काव्याचे, इतिहासाचे,

समाजव्यवस्थेचे मूलभूत सिद्धांत वेदांत आहेत. वेदाला ‘ श्रुति ’ असें नांव आहे. श्रुत म्ह० ऐकलेलें. देवांनीं सांगितलें व ऋषींनीं ऐकलें तें वेदांत आहे. ‘अतींद्रियार्थद्रष्टारोहि ऋषय:’ म्ह० ऋषींना अतींद्रिय ज्ञान होतें. त्यांना मंत्रद्रष्टे म्हणतात म्ह० तीव्रतपामुळें मंत्र त्यांना प्रत्यक्ष होत.

२ वेद एकच आहे. प्रयोगभेदासाठीं किंवा यज्ञादिकांच्या निर्वाहा-साठीं वेदाचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे विभाग केले आहेत. सायणाचार्यांनीं ‘ एष वेद: ऋक्सामयजुरात्मक: ’ असें म्हटलें आहे. वेद म्ह. पवित्र ज्ञान. ऋग्वेद म्ह. ऋचांचा ( स्तोत्रमय सूक्तांचा ) संग्रह. यजुर्वेद म्ह० यज्ञप्रयोगादि कर्मकांडाचा संग्रह व सामवेद म्ह० सामांचा (गाण्यांचा किंवा पद्यांचा ) संग्रह. वेदाचे मंत्र व ब्राम्हण असे दोन किंवा संहिता, ब्राम्हण व आरण्यकें ह्म० उपनिषदें असे तीन भाग आहेत. देवता, त्यांचे गुण, क्रिया व स्तुति यांचें वर्णन मंत्रांत केलेलें असतें. ऋक् , यजु व साम असे मंत्रांचे तीन प्रकार आहेत. ज्यांचा उपयोग देवतेच्या प्रार्थनेकडे केला जातो असे गायत्रीवगैरे छंदांत जे मंत्र सांगितले असतात त्यांला ऋक् म्हणतात; ऋचांचा गायनाचे कामीं उपयोग केला कीं त्यांस साम म्हणतात; यज्ञीय कर्माची व्यवस्था लावणारे जे मंत्र त्यांस यजु: म्हणतात. मंत्र, तंत्र, सामग्री, त्यांची तयारी, त्यांच्या गोष्टी, वेदान्त विचार इ.० विषय ब्राम्हणांत सांगितले असतात. तीन वेद सांगितले. आतां उपवेद, वेदांगें व वेदोपांगें कोणतीं आहेत तें सांगतों. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व अर्थशास्त्र यांना **उपवेद** म्हणतात. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदस् व ज्योतिष हीं वेदाचीं षडंगें म्हणजे **वेदांगें** होत. पुराणें, न्याय, मीमांसा व धर्मशास्त्रें हीं वेदाचीं चार **उपांगें** होत. चार वेद, सहा वेदांगें व चार उपांगें यांना चौदा विद्या

---

१ अज्ञानभ्रांतिछेदक व बोधरूप अशा गणाधीशाच्या स्तवनांत समर्थांनीं गणेशाला ‘ चौदा विद्यांचा गोसावी ’ म्हटलें आहे. ( दासबोध द. १-२-१३).

म्हणतात. वेदाचीं चार उपांगें जीं सांगितलीं त्यापैकीं पुराणांत १८ पुराणें येतात; न्यायांत वैशेषिकदर्शनाचा व मीमांसेंत वेदान्तदर्शनाचा अंतर्भाव होतो. स्मृति, धर्मशास्त्रें, सांख्य, पातंजलयोग, पाशुपत आणि वैष्णव हीं सहा दर्शनें आणि रामायण व महाभारत हे इतिहास व पुराणें ह्या सर्वांची गणना धर्मशास्त्रांत होते. चार वेद, चार उपवेद, सहा वेदांगें व वेदोपांगें मिळून १८ विद्या होतात व या अठराही विद्यांचें अध्ययन झालें म्हणजे सांग वेदाध्ययन झालें असें म्हणण्याचा संप्रदाय आहे. ह्या सर्व विद्या आस्तिक मताच्या असून सनातन धर्मांतर्गत आहेत व त्यांतही वेद सर्वांचें मूळ आहेत. ह्याशिवाय चार्वाकमत, बौद्धमत व जैनमत अशीं तीन मतें मागाहून निघालीं आहेत, पण तीं नास्तिक किंवा पाखांडी गणलीं जातात. तीं वेदाला प्रमाण मानीत नाहींत म्हणून वेदबाह्य आहेत.

## २ ऋग्वेद

चारही वेदांत अतिप्राचीन व विस्तृत असा ऋग्वेद होय. याचीं आठ अष्टकें किंवा दहा मंडलें आहेत. प्रत्येक अष्टकांत ८ अध्याय असे एकंदर ६४ अध्याय आहेत. अष्टकें, अध्याय, वर्ग व ऋचा असा वर्गीकरणाचा हा एक प्रकार आहे. असे वर्ग सुमारें २ हजार आहेत. दुसरा प्रकार मंडलांचा आहे. प्रत्येक मंडलांत अनुवाक्, अनुवाकाचे पोटांत सूक्तें व सूक्तांत ऋचा आहेत. १० मंडलांत मिळून ८५ अनुवाक्, सूक्तें १०१७ व ऋचा १०५८० आहेत. ह्या सूक्तांत इंद्र, अग्नि, सोम, आदित्य, वायु, अश्विन्, वरुण, मरुत्, उषा, विष्णु, रुद्र, पर्जन्य, यम, प्रजापति इ० ३३ देवतांच्या पराक्रमाचीं व माहात्म्याचीं वर्णनें असून ऋषींनीं आपल्या कल्याणासाठीं त्यांच्या प्रार्थना केल्या आहेत. २ ते ७ मंडलांचे ऋषि गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, आणि वसिष्ठ हे असून इतर मंडळांत कण्वादि ऋषि आहेत. सूक्तांत इंद्र व अग्नि यांचीं सूक्तें अधिक आहेत. १०२८ सूक्तांपैकीं २५० इंद्राचीं,

२०० अग्नीचीं, १०० सोमाचीं व बाकीचीं इतर देवतांचीं आहेत. मित्र, अर्यमा, पूषा, सविता व विष्णु या पांच रूपांनीं सूर्य स्तविला आहे. ऋग्वेद हा जगांतला अतिप्राचीन व अतिश्रेष्ठ असा स्तोत्रसंग्रह आहे. त्यांत अत्युदात्त काव्य आहे. ऋजुस्वभाव अशा ऋषींना जे जे शुद्ध विचार स्फुरले ते ते त्यांनीं सरळ भावानें आपापल्या प्रार्थनांतून व्यक्त केले आहेत. अकृत्रिम आणि पवित्र भावना यांमुळें ऋग्वेद विश्ववंद्य झाला आहे. वैदिक ब्राह्मणांनीं हजारों वर्षें झालीं तरी वेदमंत्र तोंडांत ठेवले आहेत, त्यांच्यामुळें वेद जिवंत राहिले आहेत.

सर्व देवतांत इंद्र हा प्रमुख आहे; 'इंद्रो वै देवानामोजिष्ठो बलिष्ठः'— इंद्र सर्व देवांत बलिष्ठ व तेजस्वी आहे, इंद्र हा शरीरानें बळकट, वज्र-बाहु व वज्रहस्त आहे:—

'यः सोमपा निचितो वज्रबाहुर्वज्रहस्तः सजनास इंद्रः' (२–१२–१३) सोमपान करून मरुतांच्या साह्यानें वृत्रासुराशीं घनघोर युद्ध करून त्यानें त्यास ठार केलें, व मेघांतून पाणी बाहेर जाण्यास वाट करून दिली. विद्युत् हें त्याचें वज्र आहे, तें फेंकून तो पर्वतांचा भेद करितो. इंद्र शूर वीर आहे, शत्रूंचा नाश करण्याच्या कामीं तो आपल्या भजकांना साह्य करितो, त्यांना संपत्ति मिळवून देतो. इंद्र हा बाहेरच्या शत्रूंशीं झगडतांना साह्य करणारा आहे तर **अग्नि** हा गृहकर्मांचा देव आहे. अग्नि हा यज्ञांचा देव आहे व इंद्र रणांगणाची देवता आहे. अग्नि देवांचा पुढारी आहे. 'अग्निमीळे पुरोहितम् यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातमम्' हें ऋग्वेदाचें पहिलें सूक्त आहे. 'अग्निर्देवाना–मभवत् पुरोगाः—अग्नि हा तेजस्वी असून यज्ञाचा पुरोहित व देवांचा पुढारी आहे, अग्नि हा देवांचें मुख आहे, अग्नि हा देवांचे भाग त्यांना पोंचवितो, हा गृहपति आहे, हा याजकांना संपत्ति देऊन त्यांचें कल्याण करितो, हा राक्षसांचा नाश करितो. इंद्र हा राजा आहे, अग्नि ब्राह्मण आहे. **वरुण**देवाचा अधिकार भौतिक व नैतिक सृष्टीवर फार चालतो.

हा अपांपति आहे, पाऊस पाडणारा आहे. **मित्र** ह्म० **सूर्य** व वरुण (मित्रावरुणौ) हे जोडीनें सृष्टीचें पालन करितात. सूर्य हा अग्नीचा डोळा आहे. प्राण्यांच्या कर्मावर त्याचें लक्ष असतें. सवितारूपानें तो प्राण्यांच्या कर्तृत्वास व बुद्धीस प्रेरणा देतो. प्रसिद्ध गायत्रीमंत्रांत मन–बुद्धि शुद्ध व्हावी व सवित्यानें बुद्धीस शुभ प्रेरणा द्यावी अशी प्रार्थना आहे. तो प्राण्यांचें व वनस्पतींचें पोषण करितो म्हणून त्याला पूषा म्हणतात. तोच विष्णु. सूर्याचा उदय, मध्यान्ह व अस्त ही विष्णूची तीन पावलें असून तो धर्माचा शास्ता आहे. त्याला त्रिविक्रम म्हणतात. विष्णु हा इंद्राचा सखा आहे. **उषा** ही रात्रीची बहीण व सूर्याची भार्या असून तिच्या सौंदर्याचें काव्यरसपूर्ण अत्यंत मनोहर असें वर्णन २० सूक्तांत आहे. आतां ह्या सूक्तांतून कशा प्रार्थना केल्या आहेत तें पाहूं:—

## ३ वैदिक देवतांच्या प्रार्थना

प्रथम **इंद्र** घेऊं " वज्रबाहु इंद्र हा स्थावरजंगमाचा, दीनांचा व सशृंग प्राण्यांचा, तसाच मानवांचाही राजा आहे. गाडीची धांव आंसाला वेष्टून असते त्याप्रमाणें इंद्र सर्वांना वेष्टून त्यांचें संरक्षण करितो" ( मं. १-३२-१५ ) हें सारें सूक्त इंद्राचे पराक्रम उत्कृष्ट वर्णन करितें.

संसारांत ज्या ज्या गोष्टी हव्याशा वाटतात त्या त्या वेदसूक्तांत देवतांपाशीं मोकळ्या निष्कपट मनानें मागितल्या आहेत. ३ ऱ्या मंडळाचें २० वें सूक्त पहाः—

" हे **इंद्रा** ! तुझे सोमयाजी मित्र तुझी इच्छा करीत आहेत. तुझ्या-सारखा दुसरा कोण विख्यात आहे बरें ?

" हे इंद्रा ! दोन घोड्यांना जुंपलेला तुझा रथ सत्वर येतो. तुझें वज्र शत्रूंना ठार करो. आपल्यावर हल्ला करणाऱ्या शत्रूंचा तूं संहार कर. साऱ्या जगभर तूं सत्यधर्माचा प्रसार कर. सत्यधर्माचा सर्वत्र प्रवेश असो.

" हे इंद्रा ! तूं स्वतः ऐश्वर्यसंपन्न असून ज्यांना तूं आश्रय देतोस त्यांना पूर्वी कधीं न भोगलेलें ऐश्वर्य देणारा तूंच आहेस.' तुझी कृपा

कल्याणप्रद असते. तूं मोठा उदार आहेस. तुझ्या देणग्या हजारांनीं ह्म० विपुल असतात.

" नद्यांत त्वां विपुल जल उत्पन्न केलें आहेस. गाय तें पिऊन उत्तम दूध देते. गाईमध्यें सर्व माधुर्य एकवटलें आहे.

" हे इंद्रा ! तूं आपलें सर्व बल एकवटून ये. हे पहा ! राक्षस मार्ग अडवीत आहेत. तूं यजमानाला, स्तोत्याला व इतर मित्रांना धन दे. कपटी, दुष्ट व भाले घेतलेले शत्रु ठारच केले पाहिजेत.

" हे प्रणेत्या ! तूं आह्मांला चांगले घोडे दे व आमचें कल्याण कर. तूं आमच्या निकट आला आहेस त्याअर्थी विपुल अन्न व विस्तृत संपत्ति यांचा उपभोग आह्मांला होणारच आहे. आमचें ऐश्वर्य मुलाबाळांनीं युक्त असो.

" हे इंद्रा ! तूं आमच्याकडे उज्ज्वल संपत्ति घेऊन ये. तुझ्या उदार देणग्यांना आम्ही पात्र असावें. आमची इच्छा वडवानळाप्रमाणें मोठी आहे हे धनपते ! ती तूं पूर्ण कर.

वेदांतील ऋषींनीं शत्रूंचा संहार करण्यासाठीं इंद्राला वारंवार आव्हान केलें असून त्याजपाशीं वीरपुत्र व धनधान्यसमृद्धि मागितली आहे. इंद्रही देवांचा राजा आहे. इंद्र ही एक प्रकारें राष्ट्रीय देवता आहे.

ऋग्वेदाचें पहिलेंच सूक्त **अग्नीचें** असून त्याच्या पहिल्या ' अग्नि-मीडे ' ह्या दोन पदावरून त्याला ' अग्निमीडे ' स्तोत्र म्हणतात. ' स देवाँ एह वक्षति '–अग्नि देवांना येथें घेऊन येवो. सदर सूक्तांतील ३ री ऋचा:–

" अग्नीच्या द्वारें यजमानास यशोयुक्त, वीर( पुत्र )युक्त व दिवसें-दिवस वाढत जाणारें धन प्राप्त होतें–' अग्निना रयिमश्नवत्पोषमेव दिवेदिवे ! यशसं वीरवत्तमम् '

**वरुणाचें** ५ व्या मंडलांतलें ८५ वें सूक्त उत्तम आहे:–

" हे वरुणा ! गुरु, मित्र, आप्त, भ्राता, शेजारी व अगदीं परकी लोक यांच्यासंबंधीं आमच्या हातून जे अपराध घडले असतील त्यांपासून आमचें रक्षण कर.

" कितवांनीं जें पाप आमच्या माथीं मारलें असेल तें व कळून न कळून जें आमच्याकडून घडलें असेल तें आमच्यापासून दूर कर व तुला आम्ही प्रिय होऊं असें कर–' देवाधा ते स्याम वरुण प्रियासः '

त्याचप्रमाणें पुढील पश्चात्तापनिदर्शक प्रार्थना ( ७–८९–५ ) पहाः–

" देवजनांविषयीं आम्हां मनुष्यांच्या हातून कांहीं द्रोह घडला आहे, व अचित्तामुळें ( असावधानतेमुळें ) तुझ्या सेवाकर्मांत आम्ही चुकलों आहों–ह्या पापामुळें आम्हांवर अरिष्ट येऊं देऊं नकोस.

५ व्या मंडलांतील **मित्रावरुणाचीं सूक्तें** ( ६२ते ७२ ) प्रेमळ व भावपूर्ण आहेत. थोडासा मासला पहाः-

" आम्ही ऐश्वर्यवान् आणि जेते असावे. ( ६२–९ )

" तुमच्यापाशीं आम्ही पाऊस, समृद्धि आणि अमरपणा मागत आहोंत. ( ६३–२ )

" मित्र अत्यंत पातक्याच्याही संरक्षणाचा मार्ग सांगतो. दुष्ट असलेल्या भक्ताविषयींही मित्राची सद्‌बुद्धि असते. ( ६५–४ )

" लोकांचा आधार असणारे आणिं दुष्टांचा संहार करणारे तुम्ही आम्हांला सुखी करा. ( ६७–२ )

" मित्र आणि वरुण हे सत्यस्वरूप आणि सनातन नियमांना अनुसरणारे आहेत. जगांत सद्धर्मनिष्ठ तेच आहेत. ते सद्धर्मानें नेणारे, उदार, आणि पाप्यांसही समृद्ध करणारे आहेत. ( ६७–४ )

" तुम्ही आम्हांस ऐहिक आणि स्वर्गीय ऐश्वर्य देण्यास समर्थ आहांत. ( ६८–३ )

" आम्ही दुसऱ्या कोणाच्या अन्नावर जगूं नये, आमच्या मुलांबाळांनीं, वंशजांनीं व आप्तइष्टांनींही दुसऱ्याच्या अन्नावर जगूं नये. ( ७०–४ )

ह्याच मंडलांत ७३–७८ हीं सूक्तें '**अश्विनौ**' देवाचीं आहेतः—

" तुम्ही कोठें आहांत ? हे देवांनो ! तुम्ही कोणा भक्ताकरितां प्रयत्न करीत आहांत ? कोणाकडे जात आहां ? कोणाकरितां रथ

जोडीत आहांत ? ७९।८० सूक्तें उषेचीं व ८१।८२ **सवितृदेवाचीं** ( सूर्याचीं ) आहेत:—

" तेजस्वी रथांत असलेलीं, थोर, अमृतमय, रक्तवर्ण, प्रकाशमय आणि सूर्याला आणणारी उषा–तिचें सर्व भक्त स्तवन करितात.

" आपलें निर्मळ शरीर दाखवावें म्हणूनच कीं काय न्हाऊन उठलेल्या स्त्रीप्रमाणें उषा आमच्या समोर उभी राहत आहे! (८०–५)

" ज्ञाता असा हा सविता सर्व जग निर्माण करणारा आहे. द्विपाद् व चतुष्पाद् यांचें कल्याण सविताच करतो. श्रेष्ठ सविताच स्वर्ग प्रकाशित करितो. ( ८१–२ )

सूर्याच्या रोगप्रतिबंधक शक्तीचें वर्णन मं. १ सूक्त ५० मध्यें आलें असून तो क्षयरोगही बरा करितो असें म्हटलें आहे.

अशा प्रकारें अनेक ऋषींनीं वैदिक देवतांचीं स्तोत्रें मोठ्या भक्तिभावानें केलीं असून देवतांचें साह्य व संरक्षण सर्वकामांत मागितलें आहे. परमार्थांत श्रद्धा मुख्य आहे, ती सर्व सूक्तांतून भरपूर आढळते. ऋग्वेदांत एक स्वतंत्र सूक्त **श्रद्धादेवतेचें** आहे. १० व्या मंडलांतलें १५१ वें सूक्त श्रद्धेचें आहे:—

" देवाच्या डोक्यावर असलेल्या ह्म० श्रेष्ठवर अशा श्रद्धेचें आम्ही स्तवन करितों.

" हे श्रद्धे! दान देणारांचें व देऊं इच्छिणारांचें प्रिय कर.

" आकाशांत राहणारे देव आणि पृथ्वीवरचे धार्मिक लोक श्रद्धेची उपासना करितात.

" आम्ही प्रातःकाळीं, आणि माध्यान्हकाळीं आणि सूर्याच्या अस्तमानकाळींही श्रद्धेचें आवाहन करितों. हे श्रद्धे देवि ! आम्हांला तूं श्रद्धासंपन्न कर, आमच्या प्रत्येककार्यांत आमच्या मनांत श्रद्धा उत्पन्न कर.

**उषासूक्तें** तर अत्यंत रमणीय व काव्यमय आहेत. ऋग्वेदांतलें अत्युदात्त काव्य म्हणजे हीं सूक्तें होत. मं. ६ सूक्त ६४ हें एकच सूक्त पाहिलें तरी खात्री होईल:—

'उषेचे दिव्य प्रभाकिरण पाण्याच्या लाटांप्रमाणें उसळत आहेत! ही सारे सुमार्ग ( सुपथाः ) सुगम करिते. ही सर्वांशीं दाक्षिण्यानें वागते. ही धनसंमृद्धि देणारी आहे.

'हिचे दिव्यकिरण अंतरिक्षांत पसरतात. सूर्याचे रक्तकिरण हिला विस्तीर्ण प्रदेशावर वाहून नेतात. सवेग धांवणाऱ्या सारथ्याप्रमाणें ही शत्रूचा ( अंधकाराचा ) धुव्वा उडविते.

'हे उषे! तुझा प्रकाश होतांच पक्षी वगैरे आपापल्या वसतिस्थानांतून अन्नशोधनार्थ बाहेर पडतात. तूं सर्वांपूर्वीं, हे आकाशकन्ये! आहवनीय व पूजनीय आहेस.

'सुंदर वस्त्र परिधान केलेली भार्या पतीपुढें आपलें सौंदर्य प्रकट करिते, तशी ही स्मितमुखी उषा आपलें रमणीय स्वरूप व्यक्त करिते.

मरुत्‌गणांचा नायक **वायुदेव** हा 'विश्वस्य भुवनस्य राजा' आहे. 'आत्मा देवानां भुवनस्य गर्भो यथावशं चरति देव एकः'—देवांचा आत्मा, भुवनांचा प्राण असा हा वायुदेव स्वेच्छसंचार करितो. याचे घोष मात्र ऐकूं येतात, पण याचें रूप दिसत नाहीं! ( मं. १०–१६८ ).

ऋग्वेदांत कांहीं आख्यानसूक्तें आहेतः उर्वशी व पुरूरवा यांची कथा, यमयमीसंवाद, सरमेचें आख्यान, वागांभृणीसूक्त, आप्रीसूक्तें व यज्ञियसूक्तें, संस्कारसूक्तें ( दहनाच्या वेळीं वगैरे म्हणण्याची ), विवाहसूक्त ( मं. १०–८५ ), दानसूक्त ( १०–११७ ), जुगाऱ्याच्या पश्चात्तापाची प्रार्थना ( मं. १०–३४ ), गोसूक्त ( मं. ६–२८ ) इ० सूक्तें फार सुंदर आहेत; विशेषतः **विवाहसूक्त, गोसूक्त, व दानसूक्त** हीं तीन सूक्तें प्रत्येकानें अवश्य पहावींत म्हणजे आपली विवाहपद्धति, आपली गोभक्ति व आपला दानप्रकार हे वेदकालापासून कसे अविच्छिन्न चालत आले आहेत हें समजून येईल. **विवाहसूक्तांतील** 'हे वधू! तुला संतति होऊन तुझें प्रिय होवो. पतीच्या गृहांत

---

१ सालंकृत कन्यादानाचा स्पष्ट उल्लेख ( म. ३–३१ ) मध्यें आहे.

सावधपणानें गृहस्थधर्माचें पालन कर–‘ अस्मिन् गृहे गार्हस्पत्याय जागृहि. ’ पतीशीं तूं शरीरानें ( व मनानेंही ) एकरस हो. ह्या सुमंगल वधूला पहा व हिला सौभाग्याशीर्वाद देऊन घरोघरीं जा–‘ सुमंगलीरियं वधूरिमां समेत पश्यत । सौभाग्यमस्यै दत्वा याथास्तं विपरेतन.’ ( पाणिग्रहणसमयीं पति पत्नीस म्हणतो ):– ‘ देवांनीं गार्हस्पत्यासाठीं म्ह० गृहधर्माचरणासाठीं तुला माझ्या स्वाधीन केली आहे तर मी सौभाग्यासाठीं तुझें पाणिग्रहण करितों, मजबरोबर तूं वृद्ध होईपर्यंत ( यावज्जन्म ) रहा–‘ गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः.’ यानंतर सर्वजण वधूवरांस आशीर्वाद देतात कीं वियोग न होतां तुम्ही दीर्घायु व्हा व पुत्रपौत्रांसह आनंदानें स्वगृहीं नांदा–‘ क्रीळन्तौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानो स्वगृहे.’ **गोसूक्तांत** म्हटलें आहे:—‘ गाई आमच्या घरीं येवोत, रमून आनंदांत राहोत. गाई आम्हांपासून नष्ट न होवोत. शत्रूंचें हत्यार गाईंवर न पडो. गाई गायरानांत निर्भय संचार करोत. गाई मला धन देवोत. गाईनो ! तुम्ही कृश माणसालाही पुष्ट करितां, कांतिरहित माणसाला कांति देतां, तुमचा ध्वनि मंगल आहे. तुम्ही आमच्या घराचें कल्याण करा. तुम्ही सवत्स असा. पाणोथ्यावर पाणी पिऊन सुखी व्हा.’ आठव्या मंडळाच्या १०१ व्या सूक्तांत ‘ शाहण्या लोकांना मी सांगतों कीं ह्या निरपराध गाईचा वध करूं नका ’ अशी एक ऋचा आहे. गोमातेविषयींची पूज्यता ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं व्यक्त झाली आहे. **दानसूक्तांत** म्हटलें आहे कीं ‘ अन्नदानानें जो प्राण्यांची क्षुधा शांत करितो तो खरा दाता होय, त्याचें धन कधीं कमी होत नाहीं. जो देवांना, क्षुधितांना व पोष्यजनांना अन्न न देतां एकटांच खातो तो पापरूप होय. संपत्ति हातोहातीं जात असते, म्हणून असलेल्या संपत्तींतून दान करावें, कृपणपणा ठेवूं नये. ’

---

१ माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसाऽऽदित्यानां अमृतस्य नाभिः ।
प्रणुवोचं चिकुतुषे जनाय मा गामनागां अदितिं वधिष्ट ॥ ८–१०१–१५ ॥

## ४ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या.

ऋग्वेदांत अनेक देवतांचीं वर्णनें व स्तोत्रें असलीं तरी सर्व देवता एकरूप आहेत, एका परब्रह्माचीं स्वरूपें आहेत, हा अद्वैतबोध जागोजाग स्पष्ट दृग्गोचर होतो. ‘ एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ’ असें स्पष्ट म्हटलेंच आहे. ‘ एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति ’ ब्रह्म एक असून सत् म्ह० शाश्वत आहे व त्याला विद्वान् लोक अनेक प्रकारचा कल्पून अनेक सूक्तांनीं स्तवितात. ‘अनेजदेकं मनसो जवीयो। नैतद्देवाआप्नुवन्पूर्वमर्षत्’ ह्मणजे देव एक आहे, आद्य म्ह० सनातन आहे, अर्षत् म्ह. अविनाशी आहे व त्याला इंद्रियें आकळूं शकत नाहींत—असें यजुर्वेदांतही ( यजु० ४०–४०४) म्हटलें आहे. शतपथ ब्राह्मणांत ‘त्रयस्त्रिंशद्वै देवाः ’ ह्म० देव अथवा इंद्रियादिदेवता ३३सांगितल्या आहेत तथापि मुख्य देव एकच आहे असें म्हटलें आहे. एकाची ओळख असल्यावर तो एकच निरनिराळ्या नांवारूपांनीं व्यक्त झाला किंवा त्यालाच भिन्नभिन्न नांवानीं आळविलें म्हणून त्याच्या एकपणांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं.हिंदु लोक एका देवाला भजणारे आहेत कां अनेक देवांना मानणारे आहेत हें पाश्चात्त्य विद्वानांना मोठें कोडें पडतें; फार काय पण परंपरा विसरलेले आमच्यांतलेही कित्येक पंडित नाना देव, नाना मंदिरें, नाना उपासनापंथ व नाना पंथांचे नाना ग्रंथ यामुळें पुष्कळदां बुचकळ्यांत पडलेले आढळतात. गणपति, शिव, नारायण ( विष्णु ), सूर्य व देवी या देवतांचीं पांच अथर्वशीर्षें आहेत, तीं पाहिलीं असतां प्रत्येक देवाचें पूर्णत्वानें वर्णन केलेलें आढळतें, अर्थात् पांचही देवता एकाच परब्रह्माचीं रूपें आहेत हा बोध तीं अथर्वशीर्षें करणाऱ्या ऋषींना होता हें उघड आहे. गणपति अथर्वशीर्षांत गणेशाला ‘ त्वं ब्रह्मा त्वं रुद्रस्त्वं विष्णुस्त्वमिंद्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ’. ( पुढें भगवद्गीतेंत अर्जुनानें भगवान् श्रीकृष्णाचें स्तवन करितांना ‘ वायुर्यमोग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ’ ( गीता ११–३९ ) असेंच म्हटलें आहे.

**विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात् ।**
**संबाहुभ्याधमति संपतत्रै र्द्यावाभूमी जनयन् देव एकः॥ ऋ.१०-८१-३)**

विश्वांतले सारे डोळे, मुखें, बाहु, पाद अनंत आहेत पण ते एकाचेच आहेत. आपल्या बाहूंनीं स्वर्ग व पायांनीं पृथ्वी उत्पन्न करणारा देव एकच आहे. हा मंत्र श्वेताश्वतर उपनिषदांतही असाच आढळतो ( ३-३-३ ).

ऋग्वेदांत इंद्रादि अनेक देवतांचीं वर्णनें व स्तोत्रें आलीं असलीं तरी सर्व देवता एकाचीच रूपें आहेत ही अद्वैतवेदांताची कल्पनाही त्यांत चमकत आहे. सहाव्या मंडळाच्या ४७ व्या सूक्तांतील १८ वी ऋचा पहावी. ती म्हणते:–" हा इंद्रच प्रत्येकरूपानें वेगवेगळा भरला आहे म्ह० प्रत्येक शरीर व्यापून राहिला आहे. भिन्न भिन्न नांवें व रूपें त्या एकाचींच आहेत. तो आपल्या इच्छेनें ( मायाशक्तीनें ) अनेक नामरूपें घेऊन वावरत असतो. " येथें अद्वैताची कल्पना स्पष्ट आहे. ह्या संबंधानें ऋग्वेदांत तीन सूक्तें विशेष पाहण्यासारखीं आहेत. एक १ ल्या मंडळांतील १६४ वें सूक्त, दुसरें १० व्या मंडळांतलें ९० वें सूक्त व तिसरें त्याच मंडळांतलें १२९ वें सूक्त. प्राचीन परंपरेंत १ लें सूक्त ' वामन-सूक्त ' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे, व दुसरें पुरुषसूक्त व तिसरें ' नासदीय सूक्त ' या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ह्या तीन सूक्तांत उपनिषदांचें बीज आहे. पुढें वेदांतशास्त्र जें सर्वप्रसिद्ध झालें त्याचा येथें उगम आहे.

( १ ) प्रथम **वामनसूक्ता**कडे पाहूं:—

" जो स्वतः अस्थिरहित आहे पण ज्याच्यापासून अस्थिवान् जीव उत्पन्न होतात त्या देहातीताला ( अजाला ) जन्मतांना कोणी पाहिलें आहे ? पृथ्वींतील प्राण, रक्त व मन हीं तेव्हां कोठें होतीं ?

" मी अजाणता आहें म्हणून मला ज्ञान व्हावें यासाठीं मी कवीला ( जाणत्याला ) विचारीत आहें कीं ज्या जन्मरहित देवानें हे सहा लोक

---

१ ' सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ' ( गीता १३–१३ )

उत्पन्न केले आहेत त्याच्या नानाविध ( अनंत ) रूपांत एकात्मता आहे हें खरें आहे कीं नाहीं ?

" एकमेकांचे जिवलग मित्र असे दोघे पक्षी एकाच वृक्षाचा आश्रय करितात, त्यांतून एक त्या गोड वृक्षाचीं फळें खातो व दुसरा तीं न खातां त्याकडे नुस्ताच बघत बसतो !—' द्वा सुपर्णा सयुजा सखाया ' ही प्रसिद्ध ऋचा.

दोन पक्षी ह्म० जीव व शिव. वृक्ष ह्म० देह–पिंड व ब्रह्मांड. फळ खातो ह्म० कर्माच्या फळाचा स्वाद किंवा भोग घेतो.

" ज्याचे ठायीं पक्षी अमृताचा भाग ज्ञानपुरस्सर नित्य पोंचवीत असतात आणि जो सर्व जगाचा प्रभु आणि रक्षक आहे तो ज्ञानमय परमेश्वर माझ्या अंतःकरणांत प्रवेश करून राहिला आहे (१६४–२१).

" वाणीचीं चार रूपें गणिलीं आहेत. जे ब्राह्मण ज्ञानी आहेत त्यांना तीं अवगत असतात. त्यांतलीं तीन गुप्त आहेत, तीं समजण्यांत येत नाहींत. वाणीचें जें चवथें रूप ( वैखरी ) तें लोक बोलतात.

" कोणी इंद्र, मित्र, वरुण व अग्नि असें म्हणतात. हाच तो सुपक्ष ( चांगला उडणारा ) दिव्य पक्षी होय. हा एकच असून शाहणे लोक याला अनेक नांवांनीं संबोधितात किंवा गातात. ते याला अग्नि, यम, गरुत्मान्, मातरिश्वन्, असें म्हणतात. ( ऋ. १–१६४–४६ ):—

**इंद्रं मित्रं वरुणमाग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।**
**एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति अग्निं यमं मातरिश्वानमाहुः**

( २ ) दुसरें **पुरुषसूक्त** ( मं. १०–९० ) जुनी परंपरा संभाळणाऱ्या ब्राह्मण घराण्यांतून उपनयन झाल्यापासून हें नित्य पाठांत ठेवतात. स्नानाच्या वेळीं हें ह्मणण्याचा परिपाठ आहे. पुरुषसूक्त थोड्याफार फ़रकानें चारी वेदांत आहे, यावरून याचें महत्व उघड होतें:—

**सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।**
**स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशांगुलम् ॥ १ ॥**

" अनंत मस्तकें, अनंत नेत्र व अनंत पाद यांनीं युक्त असा हा आदिपुरुष ( परमात्मा ) सर्व सृष्टि व्यापून त्याच्या पलीकडे दहा अंगुलें भरून उरला आहे.

" जें कांहीं आहे, जें झालें व जें होणार तें सर्व कांहीं हा पुरुष आहे—' पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् '.

" सारें दृश्य जग हा त्याचा महिमा आहे, एवढेंच नव्हे तर हा त्याच्या महिम्याचा केवळ एक भाग असून तीन भाग आपल्या कल्पनेच्या पलीकडे आहेत. ' त्यापासून विराट् व विराटापासून आदिपुरुष झाला. ह्या पुरुषापासून सारी सृष्टि उत्पन्न झाली. देव, ऋषि, मनुष्य, पशु अशी विविध सृष्टि झाली. ऋषींनीं यज्ञ केले व यज्ञापासून ऋक्, साम, व यजु हे तीन वेद झाले. ब्राह्मण हे विराट् पुरुषाचें मुख, क्षत्रिय बाहू, वैश्य मांड्या व शूद्र हे त्याच्या पायापासून उत्पन्न झाले. त्याच्या मनापासून चंद्र, डोळ्यांपासून सूर्य, तोंडापासून इंद्र, व अग्नि व प्राणापासून वायु झाला, अर्थात् तो सर्व देवांचा देव आहे. ' ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् ' हा मंत्र चारही वेदांत आहे.

( ३ ) तिसरें **नासदीय सूक्तः**—हें सूक्त आध्यात्मिक सूक्तांचें अगदीं शिखर आहे. सृष्टि होण्याच्या पूर्वींच्या एकजिनसी परब्रह्माच्या स्वरूपाचें यांत नुस्तें दिग्दर्शन आहे. पुढें परिणतावस्थेस पोंचलेलें अध्यात्मविद्येचें परमरहस्य यांत संकलित केलेलें असून श्रुतिमाउली सर्वशास्त्रांना व महात्म्यांना वंदनीय कां झाली हें या एका सूक्तावरून ही समजणारें आहे. ह्या सूक्ताचा ऋषि परमेष्ठी व देवता परमात्मा आहे. ह्या नामरूपात्मक दृश्यसृष्टीच्या मूळाशीं एक परमात्मा आहे आणि तो सत् व असत्, दिवस व रात्र, अमृत व मृत्यु, आकाश व पाणी, सुख देणारा व भोगणारा इ. सर्व कल्पनांच्या पलीकडे असून स्वयंस्फुरद्रूप आहे हें ह्या सूक्तांत फारच उत्कृष्ट रीतीनें सांगितलें आहे. ह्या सूक्ताच्या पहिल्या दोन ऋचा पहा. इंद्रवज्रावृत्ताप्रमाणें म्हणाव्यातः—

वाचनालय,



**नासदासीन्नो सदासीत्तदानीं । नासीद्रजो नो व्योमापरो यत् ।
किमावरीवः कुहकस्य शर्मन् । अंभः किमासीद्गहनं गभीरम् ॥ १ ॥
न मृत्युरासीदमृतं न तर्हि । न रात्र्या अह्न आसीत्प्रकेतः ।
आनीदवातं स्वधया तदेकं । तस्माद्धान्यन्न परः किंच नास ॥ २ ॥**

तदानीं ह्म० तेव्हां न असत् आसीत् न सत् आसीत्–अगदीं आरंभीं म्ह० सृष्टिरचनेच्या पूर्वी असत् नव्हतें व तत्सापेक्ष सत्‌ही नव्हतें. तेथें आकाशच ( व्योम ) नव्हतें मग सृष्टि ( रजः ) कोठून असणार ? अशा स्थितींत कोणी कोणाला आवरण घातलें म्हणावें ? ( मायेनें ब्रह्माला आवरण घातलें इ. भाषा फार मागूनची आहे ) व तें आवरण कोणाच्या सुखासाठीं (शर्मन्) घातलें ? अगाध व गहन असें जल तरी तेव्हां होतें काय ? तेव्हां मृत्यु नव्हता व अमरपणही नव्हतें, बंधमोक्षची वार्ताही नव्हती, मृत्युग्रस्त असा नाशवंत दृश्यभासात्मक पसरा नव्हता ( व तत्साक्षेप अविनाशी शाश्वताची गोष्टही नव्हती ). ही रात्र हा दिवस असा भेद कळण्यास कांहीं साधन किंवा चिन्ह ( प्रकेत ) नव्हतें. जें कांहीं होतें तें एकलें एक आपल्या अंगभूत शक्तीनें ( स्वधया ) वायुशिवाय ( निर्वात, अवात ) श्वासोच्छ्वास करीत-स्फुरत होतें व त्याशिवाय त्याच्या अलीकडेपलीकडे कांहीं एक नव्हतें.

---

१ ' अनादिमत् परं ब्रह्म न सत् तन्नासत् उच्यते ' ( गीता १३–१२ )–परब्रह्माला सत् म्हणवत नाहीं व असत्‌ही म्हणवत नाहीं असें गीताही ह्या अर्थाला अनुसरून म्हणते. याचा भावार्थ ज्ञानेश्वर सांगतात; " जें नाहीं म्हणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे । आणि विश्वचि ऐसें म्हणिजे । तरी हे माया ॥ रूप वर्ण व्यक्ती । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती । तरी कोण कैसे आथी । म्हणावें पा ॥ म्हणोनि आथी ( सत् ) नाथी ( असत् ) हे बोली । जें देखोनि मुकी जाहली । विचाराची मोडली । वाट जेथें " ( ज्ञाने० १३ ओवी ८६९–८७२ ).

२. अगदीं याच अर्थानें ज्ञानेश्वर ह्मणतातः—

**' तो अहोरात्रांचा पैलकड । कवणें देखावा ज्ञानमार्तंड । जो प्रकाश्येवीण सुरवाड । प्रकाशा ' ( ज्ञाने० १६–१६ )**

**तम आसीत्तमसा गूढमग्रे०ऽ– । प्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ।**
**तुच्छेनाभ्वपिहितं यदासीत् । तपसस्तन्महिनाऽजायतैकम् ॥ ३ ॥**

आरंभीं तमानें सारें तम गिळिलें–ग्रासलें होतें म्हणजे परमात्मा स्वयंप्रकाश होता–( सर्व अपरोक्षच होतें. ) त्या एकावर्णाच्या ठिकाणीं दुसरें असें म्हणायला कांहींच नव्हतें. आभु ह्म० सर्वव्यापी ब्रह्म आरंभीं तुच्छ म्ह० मिथ्या मायेनें आच्छादिलें होतें असें जें भासलें तें त्याच्या तपाच्या महिम्यामुळें होय–तत्वत: तें स्वयंप्रकाशमानच होतें.

चवथ्या ऋचेंत सांगितलें आहे कीं याच्या मनाचें जें रेत, ( बीज, काम, आवड ) म्ह० आदिसंकल्प तो दृश्यसृष्टि उत्पन्न करण्यास मूळ कारण झाला. सत् व असत् यांचा संबंध जोडण्यास ही त्याची आवडच मूळ कारण झाली असें ज्ञात्यांनीं हृदयांत विचार करून ठरविलें आहे.

पांचव्या ऋचेंत सांगतात कीं वस्त्राच्या तंतूप्रमाणें किंवा सूर्याच्या किरणाप्रमाणें त्याच्या शाखा खालींवर व चहूंकडे लहानमोठ्या होऊन पसरल्या म्ह० मूळ काम किंवा आवड किंवा प्रेम जें परब्रह्मांत उत्पन्न झालें तेंच खालच्या वरच्या समोरच्या म्ह० देवासुरमानवादि सर्व योनींत तसेंच पसरत गेले. ). रेतोधा किंवा स्वधा म्ह० पुरुष व

---

१. ' दुजयाचेनि नांवें जया । देहही नुरेचि पै धनंजया । जेणें तूं आपणपया । केलासि दुजा ॥ तूतें सिद्धचि जा नेणे । तो नांदे सर्वज्ञपणें । वेदाही एवढें बोलणें । नेघसी कानीं . अ० १७–११ व १४ )

२. नामदेवांचें एक ' खेळिया ' नांवाचें पद्य आहे.–खेळिया ह्म० डावांत न सांपडतां खेळ खेळणारा, खेळ खेळून त्यांतून निराळा राहणारा. ह्या पद्यांत ते प्रथमच म्हणतात:—

**नव्हतंच कैसं झालंरे खेळिया ! नाहीं तेंच दिसूं लागलं रे ।**
**अरूप होतं तें रूपासि आलं, जीव शिव नांव पावलं रे ।**
**आपुलीच आवडी धरुनी पोटीं आपआपणातं व्यालं रे ।**
**अंगअंगीं द्विविधा होउनि सर्वही भूतभौतिक दाविलं रे ॥ १ ॥**

८१०६३



महिमान किंवा प्रयति म्ह० प्रकृति, महत्तत्व ( किंवा शिवशिवा, गणेश-शारदा, पतिपत्नी, गुरुशिष्य, देवभक्त इ० ) सारांश मूळांतला काम किंवा गोडी साऱ्या सृष्टींत तशीच पसरत केली.

**को अद्धा वेद क इह प्रवोचत । कुत आजाता कुत इयं विसृष्टिः ।**
**अर्वाग् देवा अस्य विसर्जनेना-। थ को वेद यत आबभूव ॥ ६ ॥**
**इयं विसृष्टिर्यत आबभूव । यदि वा दधे यदि वा न दधे ।**
**यो अस्याध्यक्षः परमे व्योमन् । सो अंग वेद यदि वा न वेद ॥ ७ ॥**

हा सृष्टीचा पसारा ( विसर्ग, विसृष्टि ) कशापासून कसी झाली हें आम्हांला कोण बरें विस्तारानें समजावून सांगेल ( प्रवोचत ). हें कोण बरें जाणत असेल ? देवांना विचारावें तर ते सृष्ट्युत्पत्तीच्यानंतर झाले. तेव्हां ते काय सांगणार ? ही सृष्टि जेथून झाली तें कोण जाणत असेल ? ( ६ ) ही सृष्टि झाली किंवा न झाली व झाली असेल तर ज्यापासून झाली तें ह्या परम आकाशांत असणारा सृष्टीचा अध्यक्ष ( म्ह० सूक्ष्म हिरण्यगर्भ ) त्याला तरी ठाऊक आहे कीं नाहीं कोण जाणे ! तो जाणत असेल किंवा नसेलही कदाचित् ! ( ७ )

नासदीय सूक्ताचा संक्षिप्तार्थ वर दिला आहे. त्याचा विस्तार करूं गेल्यास स्वतंत्र ग्रंथ होईल ! येथें इतकें सांगणें अवश्य आहे कीं

---

१. बृहदारण्यक उपनिषदांत ( अ० १ ब्रा० ४ ) कंडिका १ ते ४ पहाव्यात. तेथें हेंच स्पष्ट करून सांगितलें आहेः " आत्मा वा इदमग्र आसीत् पुरुषविधः सोऽनुवीक्ष्य नान्यदात्मनोऽपश्यत् सोऽहमस्मीत्यग्रे व्याहरत् '-दुसरें कोणतेंही शरीर उत्पन्न होण्यापूर्वी आत्मा हा एकीएक होता. तो पुरुषासारखा होता. आपल्याहून दुसरें कोणीच नाहीं हें पाहून ' मी आहें ' अशी वाणी त्यानें उच्चारली. ' स वै नैव रेमे तस्मात् एकाकी न रमते सद्वितीयमैच्छत् '-त्याला एकट्याला करमेना म्हणून आतांही एकट्याला करमत नाहीं. दुसरें कोणी जोडीला असावें असी त्याला इच्छा झाली. मग आपल्या देहालाच दोन प्रकार देऊन पतिपत्नीरूपानें तो झाला, तेच प्रकृतिपुरुष किंवा शिवशक्ति. तेथून सृष्टि झाली. याचें विशेष मनोहर स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवग्रंथांत पहिलेंच जें ' शिवशक्तिसमावेशन ' नांवाचें प्रकरण आहे तेथें पहावें.

नगर वाचनालय सातारा
ग्रंथालय

पुढें उपनिषदांत व इतर श्रेष्ठ संस्कृत ग्रंथांत किंवा प्राकृत भाषांतील उच्चप्रतीच्या वाङ्मयांत अध्यात्म म्हणून जें विस्तारलें आहे तें सूक्ष्म रहस्यरूपानें ऋग्वेदांतील ह्या नासदीय सूक्तांत सांठविलें आहे. ह्या अध्यात्मविद्येलाच मुण्डकोपनिषदांत ‘ पराविद्या ’ म्हटलें आहे. ही केवळ स्वसंवेद्य म्ह० अनुभवगम्य आहे. बाकी वेदवेदांगें ही अपरा विद्या होय. अक्षर परब्रह्माचा साक्षात्कार जेणें होतो ती परा विद्या होय.

## ५ यजुर्वेद.

यज्ञकर्मासंबंधीं सर्व मंत्र व ब्राह्मण यजुर्वेदांत संकलित केले आहेत. यजमान व त्याची कर्में तसेच यज्ञकर्ते अध्वर्यु आदिकरून ऋत्विजांची सकलकर्में, यज्ञाची सामुग्री, व्यवस्था यज्ञाचे प्रकार वगैरे यज्ञविषयक सर्व प्रकारची संपूर्ण माहिती ह्या वेदांत सांगितली आहे. यजुर्वेदांत दोन पक्ष झाले आहेत. एक कृष्णयजुर्वेद व दुसरा शुक्लयजुर्वेद. कृष्णयजुर्वेदाच्या ५-६ संहिता आज उपलब्ध आहेत: कठसंहिता पंजाब काश्मीर-प्रांतांत, मैत्रायणिसंहिता गुजराथ व मध्यहिंदुस्थानांत व तैत्तिरीयसंहिता दक्षिणेंत पठण करितात. तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण व आरण्यकें आहेत व आरण्यकांत प्रसिद्ध तैत्तिरीय उपनिषद् आहे. ह्या उपनिषदाचा व त्यांतील शिक्षा, ब्रह्मवल्ली व भृगुवल्ली ह्यांचा विचार पुढें होणार आहे. ह्या वल्ली उत्कृष्ट असून सर्वमान्य आहेत. तसेच कठ व मैत्रायणि या उत्तरेकडील शाखांचीं काठक, श्वेताश्वतर व मैत्रायणि हीं तीन उपनिषदें प्रसिद्ध आहेत. म्हणजे कृष्णयजुर्वेदाच्या कर्मकांडात्मक संहिता व ब्राह्मण ह्या भागांचा विचार क्षणभर बाजूला सोडला, तरी त्याचीं तैत्तिरीय, काठक, मैत्रायणि व श्वेताश्वतर हीं चार उपनिषदें ज्ञानकांडात्मक असल्यामुळें सर्वमान्य झालीं आहेत. शुक्ल यजुर्वेदाची वाजसनेय संहिता व शतपथ ब्राह्मण दोन्ही महत्वाचे आहेतच, शिवाय वाजसनेय संहितेच्या ४० व्या अध्यायांत ईशावास्योपनिषद् व शतपथ ब्राह्मणाच्या १४ व्या कांडाचे शेवटचे ६ अध्याय म्हणजे बृहदारण्यकोपनिषद् होय.

...र वाचनालय, सातारा.


थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे शुक्ल व कृष्ण या यजुर्वेदाच्या दोन्ही शाखानीं मिळून जगाच्या ज्ञानांत ६ उत्कृष्ट उपनिषदें देऊन मोठी भर घातली आहे. आजच्या यजुर्वेदाचें माहात्म्य त्याच्या वरील सहा उपनिषदांनीं राखलें आहे

श्रुतिग्रंथांतील ब्राह्मणें हा एक भाग असल्यामुळें त्यांत सांगितलेल्या यज्ञांना श्रौतकर्म म्हणतात. ह्यांत मुख्य पुरोहित चार असतात. होता, अध्वर्यु, उद्गाता व ब्रह्मा. होता ऋग्वेदी, अध्वर्यु यजुर्वेदी, उद्गाता सामवेदी व ब्रह्मा अथर्ववेदीय असावा असा यज्ञाचा नियम आहे. याशिवाय यज्ञ लहान मोठा असेल त्या मानानें इतर ब्राह्मण लागतात. होता ऋग्वेदांतले मंत्र म्हणतो, अध्वर्यु मंत्र म्हणतो ते यजुर्वेदांतले व उद्गाता म्हणतो ते सामवेदांतले असतात. याप्रमाणें यज्ञांत तीनही वेदांचा आदर ठेवला जातो. अथर्ववेदाचा यज्ञाशीं कांहीं संबंध नाहीं. अथर्ववेदी ब्रह्मा सर्व यज्ञकर्माचें निरीक्षण करतो. अग्निहोत्र, दर्शपूर्ण-मास, चातुर्मास्य हौत्र, काम्येष्टि, अग्निष्टोम, प्रवर्ग्य, वाजपेय, राजसूय, अश्वमेध, पुरुषमेध इ० विषय विस्तृतपणें तैत्तिरीय संहितेंत वर्णिले आहेत. वाजसनेयि संहितेंत अश्वमेधयज्ञाचें विवरण करितांना २२ व्या अध्यायांत एक राष्ट्रहिताची उत्कृष्ट प्रार्थना केलेली आहे. ती अशीः—

**" आब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम्**
**आराष्ट्रे राजन्यः शूर इषव्यो**
**ऽतिव्याधी महारथो जायताम्**
**दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिःपुरंधिर्योषा**
**जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य**
**यजमानस्य वीरो जायताम् । निकामे निकामे**
**नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न औषधयःपच्यन्ताम्**
**योगक्षेमो नः कल्पताम् ॥ वा. २२–२२**

" हे ब्रह्मन् ! ब्रह्मतेजानें संपन्न असे ब्राह्मण या राष्ट्रांत निर्माण होवोत. आमच्या राष्ट्रांत शूर, निशाणबाजींत प्रवीण, मृगयेंत निष्णात,

व महारथी असे क्षत्रिय निर्माण होवोत. येथें विपुल दूध देणाऱ्या गायी, गाडी वेगानें ओढणारे समर्थ बैल, वेगवान् घोडे, व दक्ष गृहिणी निर्माण होवोत. यजमानाला विजयशाली, उत्तम रथी, सभापंडित असा वीरपुत्र होवो, आमच्या इच्छेप्रमाणें योग्यकाळीं येथें पाऊस पडो. आमचीं फळझाडें फळभारांनीं लवोत. आमच्या राष्ट्राचा योगक्षेम उत्तम चालो. ”

वैदिक वाङ्मयांत ठिकठिकाणीं राष्ट्र संपन्न राहण्याबद्दल प्रार्थना आहेत तशाच मातृभूमीबद्दलही अत्यादरयुक्त प्रार्थना व पूज्यभाव वर्णिलेला पाहून कोणास आनंद झाल्यावांचून राहील ?

**“ उपहूता पृथिवी माता उपमां पृथिवी माता व्हयताम्**

( य. २।१० )

“मातृभूमीची भक्ति केली आहे म्हणून ती मातृभूमी आज मला उत्साहित करो.

**‘ नमो मात्रे पृथिव्यै माहं मातरं पृथिवीं**
**हिंसिषं मा मां माता पृथिवी हिंसीत् ’**

( तैत्तिरी. सं. १।८।१५ ).

“ मातृभूमीला नमस्कार असो, मजकडून मातृभूमीला कोणताही त्रास न पोंचो. मातृभूमि रुष्ट होऊन माझें कोणतेंही अहित न करो.

**‘ सनेमि राजा परियाति विद्वान् प्रजां पुष्टिं वर्धयमानो अस्मे ’**

( वा. सं. ९–२५ )

चांगला राजा विद्वान् असून सर्वदा प्रजाजनांची वृद्धि करितो व प्रजेच्या उन्नत्यर्थ सर्वत्र संचार करीत असतो. कां कीं ‘ विशि राजा प्रतिष्ठितः ’–प्रजा हा राजाचा आधार आहे.

## ५ सामवेद.

सामवेदाच्या उपलब्ध संहितेंत १५४९ ऋचा म्ह० मंत्र आहेत, त्यापैकीं ७५ ऋचांखेरीज बाकीच्या सर्व ऋचा ऋग्वेदांतल्या ८ व्या

व ९ व्या मंडळांतील आहेत. सामवेदाचे आठ ब्राह्मण आहेत, त्यापैकीं जैमिनीय ब्राह्मणांत प्रसिद्ध केनोपनिषद् आहे. तांड्यब्राह्मणांचे २५ अध्याय असून त्यांत इष्टीपासून तों सोमयागापर्यंतच्या लहान मोठ्या यागांचें वर्णन आहे. त्यांतल्या १७ अध्यायांत व्रात्यस्तोम आहे. ह्या यज्ञानें पूर्वीं हीन व पतित लोक पावन करून घेत. संगीतशास्त्राचें अध्ययन करणारानें सामवेद पाहिला तर त्या शास्त्राचीं बरींच मूलभूत तत्वें त्यांत सांपडतील. केनोपनिषदाप्रमाणें छांदोग्य उपनिषद् हेंही सामवेदाच्या ब्राह्मणग्रंथांत आहे.

## ६ अथर्ववेद

अथर्ववेदांत मुख्यतः अभिचार म्ह० जारणमारणउच्चाटण व गृह्य-संस्कार या संबधीचे मंत्र आहेत. भूतापसरण म्ह० अंगांतील भूत-पिशाच्चें काढणें, रोगरूपानें पीडा करणाऱ्या राक्षसांचा उच्छेद करणें, इष्टापूर्ती व शत्रुपीडा, इत्यादि विषयांवरील मंत्र ह्या वेदांत आहेत. शत्रूंचा संहार करण्यासंबंधांचे कांहीं अघोर मंत्रही आहेत. ह्या वेदाचा फारसा प्रचार हिंदुस्थानांत राहिला नाहीं, तरी मंत्रतंत्र, जडीबुट्टी, जारण मारण इ० कर्मे करणारे मांत्रिक अगदींच नाहींत असें नाहीं. तथापि ह्यावरून ह्यांत कांहीं चांगला भाग नाहीं असें नाहीं. ह्यांतील भैषज्यसूक्तांचा वैद्यकदृष्ट्या चांगला उपयोग होणार आहे. बऱ्याच ठिकाणीं अतिशय बारकाव्याची माहिती, सुंदर वर्णनें, कांहीं गमतीचे प्रकार, सुंदर उपमादि विशेष यांचाही यांत समावेश केलेला आढळतो. ह्या वेदाच्या शौनकी व पिप्पलाद अशा दोन शाखा आहेत, पण त्या दोहींत फारसा फरक नाहीं. शौनकी संहितेचीं २० कांडें आहेत, त्यांत सुमारें ६ हजार मंत्र आहेत. १६ व्या कांडांत एक चांगलें स्वप्नसूक्त असून १७ व्यांत ‘ आमच्या विद्वेष्ट्यांचा नाश व आमचा उत्कर्ष होऊं द्या’ अशा प्रार्थना आहेत. भैषज्यसूक्तांत ताप, खोकला ( कास ), गंडमाळा इ० रोगांवरचे मंत्र आहेत. हे मंत्र व तत्संबंधी प्रयोग ( तंत्र ) हा आयुर्वेदाचा आरंभ आहे. कोठें कोठें रोगाचीं लक्षणें चांगलीं दिलीं आहेत.

" हे तक्मन् ( तापा )! तुझा भाऊ बलास, बहिण कासिका ( कास, खोकला ) व पुतण्या पुरळ ( पाप्मन् ) ह्यासह तूं विदेशी लोकांकडे जा ' ( कांड ५–२२–१२ ). विदेशी लोकांचीं नांवें याच सूक्तांत मूजवंत व बल्हीक अशीं दिलीं आहेत.

" रक्तवस्त्र नेसून जाणाऱ्या योषिता–' लोहितवाससः योषितः '– म्हणजे रक्तवाहिन्या (!) ह्या भाऊ नसलेल्या बहिणीप्रमाणें हतबल होवोत! ( १–१७–१ ).

बरेचसे रोग जंतूपासून होतात ही कल्पना ह्या वेदांत आहे. आंतड्यांत, डोक्यांत, वनांत, वनस्पतींत, पशूंत, पाण्यांत, डोळ्यांत, नाकांत, दांतांत कृमी होऊन रोग होतात. त्या रोगाच्या निवारणाचे मंत्र मोठी शोधक बुद्धि दर्शवितात यांत शंका नाहीं; तसेंच त्या कृमींत राजा, प्रधान व इतर अधिकारी आहेत; त्यांच्यांत लिंगभेद आहे; त्यांत कांहीं काळे. तांबडे, पिंगट वर्णाचे आहेत अशा प्रकारची माहिती ( कांड २–३१ ) या अथर्ववेदांत आहे. यांत अग्निपीडा व पिशाच यांचे निवारक मंत्र, प्रायश्चित्तमंत्र, प्रणयमंत्र, ( प्रेम जुळवून देणारे मंत्र ) प्रेमांत–सवतीच्या वगैरे–बिघाड पाडणारे मंत्र, स्त्रीला वांझ किंवा पुरुषाला नपुंसक करणारे मंत्र वगैरे आहेत. युद्धगीतें, संग्राममंत्र, विजयश्री मिळवून देणारे मंत्र ( ५–२० ) वगैरे कांहीं मंत्र फार चांगले आहेत. ही मंत्रविद्या आहे, हिच्यांत कांहीं चांगले व कांहीं वाईट असायचेंच शांतिसूक्तांत ( कांड ३–३० ) पुढील मंत्र किती बहारीचे आहेत पहाः—

" मी तुम्हांला समान हृदयाचे, समान चित्ताचे व अविद्वेषी करितों. गाय जशी वत्सावर प्रेम करिते तसे तुम्ही एकमेकांवर प्रेम करा.

**सहृदयं सांमनस्यं अविद्वेषं कृणोमि वः ।**
**अन्योअन्यमभि हर्यत वत्सं जातमिवाघ्न्या ॥ १ ॥**

" पित्याला अनुव्रत म्ह० अनुकूल व मातेशीं समानमनस्क ह्म० एकचित्त असा पुत्र असूं दे. भार्या पतीशीं मधुर व सुखमय वाणीनें बोलूं

दे. ( २ ) “ भावानें भावाचा द्वेष करूं नये, बहिणीनें बहिणीशीं भांडूं नये सर्वांनीं परस्परांशीं संमत व समानव्रत होऊन भद्रं म्ह० कल्याणप्रद बोलावे. ( ३ ):—

**अनुव्रतः पितुः पुत्रो मात्रा भवतु संमनाः ।**
**जाया पत्ये मधुमतीं वाचं वदतु शांतिवाम् ॥ २ ॥**
**मा भ्राता भ्रातरं द्विक्षन् मा स्वसारमुत स्वसा ।**
**सम्यञ्चः सव्रता भूत्वा वाचं वदत भद्रया ॥ ३ ॥**

हीं सुभाषितें किती सुंदर आहेत ! प्रत्येक गृहस्थानें आपल्या घरांत हे मंत्र मोठ्या अक्षरांनीं कोरून ठेवावे व सर्वांनीं त्याप्रमाण वागावें म्हणजे घरांत शांतीचें साम्राज्य नांदेल यांत शंका नाहीं.

अथर्ववेदांत **गाईची महती** कांड १० सूक्त १० मध्यें उत्तम गायिली असून **पृथ्वीसूक्त**ही ( कां. १२–१ ) सुंदर आहे. गाईच्या ठिकाणीं देवतांची वस्ती आहे– ‘ देवास्तस्यां प्राणन्ति ’; वशा म्ह० गाय हीच अमृतमय आहे–‘ वशामेवामृतमाहुः ’ गाईच्या ठिकाणीं ऋत, ब्रह्म व तप हीं वास करितात म्हणून गाईचें ब्राह्मणांस दान करावें:—

**ब्राम्हणेभ्यो वशां दत्त्वा सर्वाल्लोकान्समश्नुते ।**
**ऋतं ह्यस्यामार्पितमपि ब्रह्माथो तपः ॥ १०–१०–३३ ॥**

ऋग्वेदांत तसेंच अथर्ववेदांत गायींविषयींची पूज्यबुद्धि कशी व्यक्त झाली हें पाहिलें व पुढें कृष्णावतारांत व अलीकडे शिवाजीपर्यंतच्या राजवर्गांत ‘ गोब्राह्मणप्रतिपालक ’ ही पदवी धारण करण्याची ईर्षा पाहिली म्हणजे हिंदुराष्ट्राला गाय इतकी पूज्यतम कां वाटते याचा उलगडा होतो. वर उल्लेखिलेलें पृथ्वीसूक्तही असेंच महत्वाचें आहे.

“ पृथ्वी ही प्रथम समुद्रांत जलरूपानें होती, मनस्वी म्ह० शाहणे लोक हिला विविध प्रकारच्या मायेनें अनुसरतात, हिचें हृदय उंच आकाशांत असून सत्यानें आवृत व अमर आहे, अशी ही भूमि आमच्या उत्तम राष्ट्राच्या ठिकाणीं तेज व उत्तम बल देवो.

**यार्णवेधि सलिलमग्र आसीद् यां मायाभिरन्वचरन्मनीषिणः ।**
**यस्यां हृदयं परमे व्योमिन् सत्येनावृतममृतं पृथिव्याः ।**
**सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ॥ १२-१-८**

' आमच्या उत्तम राष्ट्राच्या ठिकाणीं ही भूमि त्विषिं म्ह० तेज व बल ठेवो ' अशी ही वैदिक प्रार्थना किती योग्य आहे बरें ? ही भूमाता, गायवत्साला भरपूर दूध देते तशी आम्हांला देवोः—

**सानोभूमिर्विसृजतां माता पुत्राय मे पयः ॥ १० ॥**

हे पृथिवी ! तुझे गिरि, हिमवन्त पर्वत, अरण्यें यांचें मंगल असो, इन्द्रगुप्त अशा पृथ्वीवर मी अजित, अहत ( मारला न गेलेलों ) व अक्षत असा उभा राहिलों आहे, पृथ्वीपासून उत्पन्न झालेले लोक, द्विपाद्, चतुष्पाद् या सर्वांचें ती पोषण करिते, पृथ्वीवर आपापल्या पद्धतीनें मनुष्यें अन्नग्रहण करितात अशी ही पृथ्वी आम्हांला प्राण व आयुष्य देवो व आमचीं शरीरें जर्जरित न करितां बळकट करोः—

**सा नो भूमिः प्राणमायुर्दधातु ।**
**जरदष्टिं मा पृथिवी कृणोतु ॥ २२ ॥**

जिच्यावर माणसें मोठा आरडाओरडा करून गातात, नाचतात, आरोळ्या ठोकींत युद्धें करितात व नगारे वाजवितात ती आमची प्रिय भूमाता आमच्या शत्रूंना हाकून लावो व आह्मांला निर्वैर करोः—

**सा नो भूमिः प्रणुदतां सपत्नान-**
**सपत्नं मा पृथिवी कृणोतु ॥ ४१ ॥**
**भूमे मातर्निधेहि माभद्रया सुप्रतिष्ठितम् ।**
**संविदाना दिवा कवे श्रियां माधेहि भूत्याम् ॥ ६३ ॥**

प्राचीन काळच्या वैदिक ऋषींची ही राष्ट्रकल्याणाची कळकळीचीं प्रार्थना आजही किती ओजस्वी व यथार्थ वाटते ! बंकीम चंद्राच्या 'वंदे मातरम' चें बीज ह्या अथर्ववेदांतल्या प्रार्थनेच्या सूक्तांत ( कांड १२ सूक्त १ ) असेल काय ? अथर्ववेदांत राष्ट्रीयत्वाच्या भावना अनेकस्थळीं व्यक्त आहेत.

नगर वाचनालय, सातारा.


**उर्जेत्वा बलाय त्वौजसे सहसे त्वा अभिभूयाय**

**त्वा राष्ट्रभृत्याय पर्यूहामि शतशारदाय ॥ अथर्व १।९।३७**

अन्न, बल, ओज, उत्साह, विजय, राष्ट्रसेवा इ० साठीं दीर्घायुष्य मिळण्याबद्दल ही प्रार्थना आहे. ( यानें मनुष्य पूर्ण झाला म्हणजे तो पुरुषार्थी होतो, त्यावर ईश्वर कृपा होते). राजाबद्दल अथर्ववेदांतील मंत्रः—

**एषामहमायुधा संस्यामेषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि ।**

**एषांक्षत्रमजरमस्तु जिष्ण्वेषां चित्तं विश्वेवंतु देवाः॥** अ. ३।१९।५

मी या प्रजाजनांचीं शस्त्रास्त्रें चांगली रक्षण करीन. ( त्यांना निःशस्त्र करणार नाहीं. ) या राष्ट्राची शूर पुरुषांच्या साह्यानें मी उन्नति करीन. या राष्ट्राचें क्षात्रतेज क्षीण न होईल आणि प्रजेच्या विजयशाली चित्ताचें व उत्साहाचें संरक्षण होईल अशी दक्षता घेईन.

ज्या राष्ट्रांतील राजा या प्रतिज्ञेप्रमाणें वागत असेल तो राजा व तें राष्ट्र धन्य म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

अथर्ववेदांत मुण्ड, माण्डुक्य व प्रश्न हीं तीन उपनिषदें आहेत.

## ७ सहा वेदांगें.

१ **शिक्षाः**—शिक्षा म्ह० शिकणें, संथा घेणें, यथोचित उच्चारांसह संहिता म्हणणें. मंत्राच्या स्वरांत चूक होऊं नये व वर्णोच्चार स्पष्ट व्हावेत हें शिकविण्यासाठीं यांत कांहीं नियम व माहिती दिली आहे. स्वर आणि व्यंजनें मिळून वर्ण होतात. स्वर उदात्त, अनुदात्त व स्वरित असतात स्वर उच्चारण्यास जो काळ लागतो त्यावरून हे ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत होतात. ऱ्हस्वांत एक मात्रा, दीर्घांत दोन व प्लुतांत तीन असतात. उदात्तादि स्वर सप्तसुरांत बसवितां येतात. ' इंद्रशत्रु ' याच्या स्वरांत चूक झाल्यामुळें कशी हानि झाली याची एक गोष्ट प्रसिद्ध आहे.

१ औंधच्या ' पुरुषार्थ ' व ' वैदिक धर्म ' ह्या मासिकांचे संपादक रा. श्री. दा. सातवळेकर यांनीं वेदांतिल राष्ट्रीय भावनांची ओळख मराठी वाचकांस चांगली करून दिली आहे.

**२ कल्पः**—यज्ञांत होता, अध्वयु व उद्गाता हे मुख्य ऋत्विज असतात. कोणत्या यज्ञांत कोणते मंत्र व ब्राह्मण म्हणावे, कोणतें अनुष्ठान केव्हां कसें करावें इ० गोष्टी ज्यांत दिल्या जातात त्या ग्रंथास कल्पसूत्रें म्हणतात. कल्पसूत्रांत श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें व धर्मसूत्रें असे तीन प्रकार असून त्यांत धार्मिक विधि व संस्कार यांची माहिती गद्यांत दिली आहे. हौत्र प्रयोगाचें प्रतिपादन आश्वलायन गृह्यसूत्रांत केलें आहे. बौधायन, आपस्तंब, हिरण्यकेशी यांनीं अध्वर्यूच्या कर्मांविषयीं विवेचन केलें आहे. श्रौतस्मार्त कर्मानुष्ठानाचें प्रतिपादन या सूत्रांत आहे.

**३ व्याकरणः**—शिक्षेंत शब्दांच्या किंवा पदांच्या योग्य उच्चाराकडे लक्ष असतें; पण शब्दांत प्रकृति कोणती, प्रत्यय कोणता, शब्दांचें स्वरूप म्हणजे काय, त्यांचा अर्थ काय, शब्दांचा वाक्यांत परस्परांशीं काय व कसा संबंध असतो हें शिकविणारें तें व्याकरणशास्त्र होय. व्याकरणाचे ज्ञानाशिवाय वाक्यार्थ नीट समजत नाहीं म्हणून सर्व वेदांगांत व्याकरणाचें महत्व अतिशय आहे. शिवाच्या डमरूंतून चौदा सूत्रें प्रकट झालीं व त्यावर पाणिनीनें आपली प्रसिद्ध अष्टाध्यायी लिहिली. अष्टाध्यायींत सुमारें ४ हजार सूत्रें आहेत ! ह्या सूत्रांत वैदिक व लौकिक व्याकरणाचे सर्व नियम सांगितले आहेत, ह्या सूत्रांवर कात्यायनानें वार्तिक लिहिलें व वार्तिकावर पतंजलीनें महाभाष्य केलें आहे. पाणिनीचा काल शालिवाहन शकापूर्वी सुमारे १००० वर्षें धरितात व पतंजलीचा त्यानंतर ६।७ शतकानंतरचा धरितात.

**४ निरुक्तः**—निरुक्त म्ह० शब्दकोश. निघंटुही शब्दकोश. दोन्ही कोशांचा कर्ता यास्क हा होय. वेदांतील शब्दांच्या विशेष अर्थांचें निर्वचन यांत केलें आहे. अमरकोशहलायुधादि लौकिक शब्दांचे कोश मागाहूनचे असलेमुळें निरुक्तांत गणले जात नाहींत.

**५ छन्दःशास्त्रः**—वेदांतील बहुतेक मंत्र छंदोबद्ध आहेत. गायत्री, उष्णीक, अनुष्टुप्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुप् आणि जगती अशीं सात वृत्तें वेदांत येतात. विशिष्ट कर्माला विशिष्ट वृत्ताचे मंत्र असावेत असा

निर्बंध असे. प्रत्येक मंत्राचा ऋषि, देवता व छंद माहित पाहिजेत असा नियम निघाला, तेव्हां छंदःशास्त्राची गरज भासली. वृत्तांवर अतिप्राचीन ग्रंथ म्हणजे पिंगलाची छंदोविवृत्ति हा होय. इतिहास-पुराणें व इतर लौकिक काव्यें यांतील वृत्तांचा विचार पिंगलानें पहिल्या पांच अध्यायांत केला असून शेवटच्या तीन अध्यायांत वैदिक वृत्तांचें त्यांच्या भेदांसह विवेचन केलें आहे.

६ **ज्योतिषः**—अमुक कर्में, अमुक कालीं, अमुककालपर्यंत करायचीं अशी वैदिक ऋषींना शिस्त ठेवावीशी वाटली तेव्हां ज्योतिष-शास्त्र जन्मास आलें. कांहीं कर्में नित्य, कांहीं चातुर्मास करायचीं असत. दर्श ( अमावास्या ) व पौर्णिमा निश्चित कराव्या लागत. चंद्रसूर्यांचे उदयास्त, नक्षत्रतारांच्या गति, ग्रहांचे अस्तोदय, ग्रहणें, धूमकेतु, ऋतु, महिने, शुक्लकृष्ण पक्ष, दिवसरात्र यांचें कालमापन यज्ञयागादि-कांकरितां होऊं लागलें व ज्योतिषशास्त्र उदय पावलें. ' वसन्ते ब्राह्मणो अग्निमादधीत । ग्रीष्मे राजन्य आदधीत। शरदि वैश्य आदधीत। कृतिका-स्वग्निमादधीत ' ' फाल्गुनींपूर्णमासे दीक्षेरन् ' इ० मंत्र तैत्तिरीयसंहितेंत-ब्राह्मणांत आहेत. ज्योतिषांत सिद्धांत किंवा गणितज्योतिष व फल-ज्योतिष म्ह० कुंडली, होरा, प्रश्न असे दोन भाग झाले. फलज्योतिषामुळें ग्रह विशिष्टस्थानीं असल्यामुळें मनुष्याच्या आयुष्यक्रमावर त्यांचा काय परिणाम होतो इकडे लक्ष गेलें. हें सर्व हळुहळु वाढत गेलें.

छंदस् हें वेदाचे पाय, कल्प हे हात, ज्योतिष हे नेत्र, निरुक्त हे कान, शिक्षा हें घ्राण व व्याकरण हें मुख असें वेदांगांवर एक सुंदर रूपक केलेलें असून वेदाचे सांग अध्ययन झालें म्हणजे ब्रह्मलोकाची प्राप्ति होते अशी फलश्रुति सांगितली आहे.

## ७ वेदाचीं उपांगें

अठरा **पुराणें**, **न्याय** म्ह० न्याय व वैशेषिक, **मीमांसा** म्ह० पूर्व-मीमांसा व उत्तरमीमांसा किंवा कर्मकांड व ज्ञानकांड, आणि **धर्म-शास्त्रें** म्ह० सांख्य व योग हीं शास्त्रें व मन्वादि स्मृति अशी हीं वेदाचीं

चार उपांगें होत. ह्याचेंच पुढें न्याय व वैशेषिक, सांख्य व योग, मीमांसा व वेदांत हीं षट्शास्त्रें, पुराणें व स्मृति असें वर्गीकरण झालें.

१ **पुराणें**:—महापुराणें अठरा आहेत व तीं सर्व मिळून चार लक्ष ग्रंथ आहे! देवाभक्तांच्या गोष्टी सांगून सामान्य जनांना भक्तिमार्गाकडे लावणें हा पुराणांचा प्रधान हेतु आहे. लोकांना प्रायः गूढ तत्वज्ञान कळणें व त्याहून तें पचणें अतिशय जड जातें. ऐतिहासिक किंवा रूपकात्मक कथांच्या द्वारें बोध व मनोरंजन यांचा एकदम लाभ करून देणारें वाङ्मय सर्व राष्ट्रांत विपुल असतें. कथापर वाङ्मय सुलभ व चटकदार असतें. पुराणें हीं वेदानुसारी आहेत व त्यांची प्रौढी व गोडी अद्भुत आहे. दुष्टांचा नाश करून भक्तांचें रक्षणतारण करणें व त्यांचा योगक्षेम वाहणें हें देवाचें ब्रीद आहे हें लोकांच्या मनावर बिंबविणें हें पुराणांचें ध्येय आहे. चतुर्विध पुरुषार्थ साधण्यासाठीं आचार, भक्ति व ज्ञान यांचा उपदेश पुराणांतून होतो. पुराणांविषयीं व विशेषतः परमश्रेष्ठ जें भागवत त्याविषयीं पुढें विवेचन होणार असल्यामुळें येथें इतकेंच पुरें.

२ **न्यायशास्त्र**:—न्यायशास्त्राचे मूळ प्रणेते गौतम हे होत. नैय्यायिकांच्या मतें एकंदर सोळा पदार्थ आहेत व त्यांच्या ज्ञानानें दुःखध्वंस होऊन मोक्ष मिळतो ते १६ पदार्थ हेः—१ प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टांत, सिद्धांत, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंडा, हेत्वाभास, छल, जाति व निग्रहस्थान. न्यायदर्शनाचे पांच अध्याय असून हा ग्रंथ सूत्रात्मक आहे. न्यायशास्त्राच्या अध्ययनानें बुद्धि कुशाग्र होते. सयुक्तिक व न्याय्य मार्ग कोणता व तो कसा ठरवावा हें न्यायशास्त्र शिकवितें. 'दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदन्तरापायादपवर्गः' असें याचें मुख्य सूत्र आहे. मिथ्याज्ञान म्ह० अनात्मवस्तूच्या ठिकाणीं आत्मबुद्धि असणें, त्या वस्तूविषयीं रागद्वेषादि दोष ह्म० विकार उत्पन्न होणें, त्या दोषांमुळें बरीं वाईट कर्में करण्याची प्रवृत्ति होणें, त्या प्रवृत्तीमुळें जन्म प्राप्त

होणें, व जनापासून दुःख होणें असें हें संसाराचें राहाटगाडगें सतत चालू असतें व तत्त्वज्ञानानें दुःखांचा अत्यंत उच्छेद होऊन निवृत्तिरूप मोक्ष होतो असा वरील सूत्राचा अर्थ आहे. नैय्यायिक आत्मे अनंत मानतात. सृष्टींतील पदार्थांचे मूलभूत वर्ग कोणते, त्यांचे गुणधर्म काय आहेत, त्यापासून पुढें इतर पदार्थ कसे उत्पन्न झाले इ. प्रश्नांचा विचार न्यायशास्त्रांत केलेला असतो.

३ **वैशेषिक मतः**—याचे प्रणेते कणाद होत. वैशेषिक दर्शनाचें १० अध्याय असून त्यांत ३७० सूत्रें आहेत. विश्वांतील सर्व पदार्थ द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय यांत येतात असें हें मत आहे, व यांत विशेष हा पदार्थ अगदीं नवीनच असल्यामुळें यांना वैशेषिक हें नांव पडलें. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, काल, दिक्, आत्मा व मन हीं यांचीं नऊ द्रव्यें होत. द्रव्याचे २४ गुण व कर्मांचे पांच प्रकार हे मानतात. वैशेषिकांचें विशिष्टत्व त्यांच्या परमाणुवादांत आहे. कोणत्याही द्रव्याचे सूक्ष्म भाग परमाणुपर्यंत होतात, त्यापुढें होत नाहींत. हे परमाणु मात्र नित्य आहेत. दोन अणूंच्या संयोगानें द्व्यणुक, तीन परिमाणूंचे त्र्यणुक असे होतात; हे मात्र अनित्य आहेत व सृष्टि यांपासून झाली आहे, व परमाणु हेच सृष्टीचें उपादान कारण होय असें वैशेषिकांचें मत आहे.

**४ सांख्य व ५ योगः**—ह्याविषयीं थोडासा विचार पुढें होणार आहे. सांख्यशास्त्राचे प्रवर्तक कपिल असून योगशास्त्राचे प्रवर्तक पतंजलि हे आहेत. सांख्य २४ तत्त्वें किंवा पदार्थ मानतात. दुःखापासून अत्यंत निवृत्ति होणें हा पुरुषार्थ, व ही निवृत्ति प्रकृतिपुरुषविवेकानें होते असें सांख्यमत आहे. प्रकृति ही सर्वांचें उपादान कारण आहे, पुरुष तिच्याहून अगदीं भिन्न आहे, अर्थात् प्रकृति व पुरुष हे त्यांच्या मतानें दोनच पदार्थ नित्य आहेत, बाकी सर्व द्रव्यें अनित्य आहेत पुरुष कूटस्थ, नित्य व अपरिणामी आहे. यमनियमादि साधनांनीं चित्तवृत्ति-निरोध करणें हें योगाचें मुख्य फळ आहे.

६ **पूर्वमीमांसाः**—पूर्वमीमांसा ह्या सूत्रात्मक ग्रंथाचे कर्ते जैमिनी होत. ह्या ग्रंथाचे १२ अध्याय असून सूत्रें २७४५ आहेत. 'अथातो धर्मजिज्ञासा' हें याचें पहिलेंच सूत्र आहे. हा ग्रंथ खंडणमंडणात्मक असून विचाराला प्रवृत्त करणारा आहे. 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' वेदाचें अध्ययन केलें पाहिजे, वेद अपौरुषेय आहेत इ० सिद्धांत यांत चांगल्या रीतीनें मांडले आहेत. नैय्यायिक वेद पौरुषेय मानतात, म्हणून मीमांसाकारांनीं त्यांचा पूर्वपक्ष मांडून त्याचें खंडण केलें आहे.

**उत्तरमीमांसा ऊर्फ वेदांतः**—पूर्वमीमांसेंत कर्मसंबंधी विचार केला आहे, तर उत्तरमीमांसेंत ज्ञानमार्गाचें प्रतिपादन आहे. याचे कर्ते बादरायण होत. ह्या सूत्रांना ब्रह्मसूत्रें म्हणतात. ब्रह्मसूत्रांचे चार अध्याय आहेत व प्रत्येक अध्यायांत चार पाद आहेत. प्रत्येक पादांत सूत्रें व अधिकरणें असतात. ह्या ग्रंथांत एकंदर ५५५ सूत्रें व १९२ अधिकरणें आहेत. एका विषयाच्या पूर्ण प्रतिपादनास अधिकरण म्हणतात. विषय, शंका, खंडण, सिद्धांतस्थापन व संगति ह्या पांच भागांचें एक अधिकरण होतें. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ति, शब्द ( वेद ) व अभाव हीं सहा प्रमाणें जैमिनीप्रमाणें बादरायणासही मान्य आहेत. वेद अनादि, नित्य व अपौरुषेय असें दोघांचेंही मत आहे. वेदांताचा मुख्य आधार उपनिषदें आहेत व तो केवलाद्वैतप्रतिपादक आहे. अद्वैतसिद्धांताला सांख्यन्यायादि शास्त्रांचा जेथें जेथें विरोध आला तेथें तेथें त्यानें त्यांचें खंडण केलें आहे. ह्या उत्तरमीमांसेचें पहिलें सूत्र 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' हें असून पुढील तीन सूत्रें अत्यंत महत्वाचीं आहेत. 'जन्माद्यस्य यतः' 'शास्त्रयोनित्वात्' 'तत्तु समन्वयात्' हीं तीं सूत्रें होत. ब्रह्म हें जगताचें आदिकारण आहे, ब्रह्मज्ञानाचें साधन वेद आहेत व वेदवचनांचा योग्य समन्वय होऊन तीं ब्रह्मप्रतिपादक आहेत असेंच सिद्ध होतें हा वेदांताचा सिद्धांत आहे.

## ८ उपवेद.

१ **आयुर्वेदः**—कायचिकित्सा, बालचिकित्सा, ग्रहचिकित्सा किंवा भूतविद्या, ऊर्ध्वांगचिकित्सा ह्म० मुख, कंठ, नेत्र, नासिका, कर्ण व मस्तक

इत्यादिकांच्या रोगांची चिकित्सा, शल्यचिकित्सा म्ह. बाहेरून आलेले किंवा शरीरांतील विकृत पदार्थांपासून झालेल्या रोगांची चिकित्सा, दंष्ट्राचिकित्सा व वृषचिकित्सा अशीं आयुर्वेदाचीं आठ अंगें आहेत. चरकग्रंथांत आठ स्थानें दिलीं आहेत, वाग्भट व सुश्रूत पांच स्थानें देतात. सूत्र, शारीर, निदान, चिकित्सा व कल्प अशीं तीं पांच स्थानें आहेत. रोगचिकित्सा सर्वांत महत्वाची आहे. रोग, रोगाचीं कारणें, रोगनिवृत्तीचे उपाय व आरोग्याचीं साधनें यांचा विचार चिकित्सेंत होतो

२ **धनुर्वेदः**—हें शास्त्र विश्वामित्रप्रणीत आहे असें म्हणतात. युद्धांत उपयोगांत येणाऱ्या सर्व शस्त्रास्त्रांचा समावेश धनुर्विद्येंत होतो. सर्व शस्त्रास्त्रें समंत्रक व सायुध शिकण्याचा अधिकार फक्त क्षत्रियांस व त्यांच्या अनुयायांस आहे. दुष्टदंडण, प्रजांचें चोरादिकांपासून रक्षण व परशत्रूशीं युद्ध हीं कर्में करण्याचा अधिकार क्षत्रियांस आहे. दीक्षा, संग्रह, सिद्धि व प्रयोग असे धनुर्वेदाचे चार पाद आहेत.

३ **गांधर्ववेदः**—या शास्त्राचा प्रणेता भरत हा होय.. गीतवाद्यनृत्यांचा यांत अंतर्भाव होतो. त्यांच्या योगानें मनाची तल्लीनता होते. ईश्वराराधनेच्या कामीं या शास्त्राचा मुख्यतः उपयोग केला जातो. हें जनमनरंजनाचेंही अपूर्व साधन आहे.

४ **अर्थशास्त्रः**—नीतिशास्त्र, अश्वशास्त्र, शिल्पशास्त्र, सूपशास्त्र व गीत, वाद्य, नृत्य, नाट्य, आलेख्य ( चित्रकला ) इ० चौसष्ट कला ह्या सर्वांचा ह्या शास्त्रांत समावेश होतो.

वेदाच्या उपांगांपैकीं सांख्य व योग ह्या दोन उपांगांचा प्राकृत वाङ्मयाशीं निकटचा संबंध असल्यामुळें त्यांची थोडक्यांत ओळख करून देऊन हें वेदविद्येचें प्रकरण संपवितों.

## ९ सांख्यशास्त्र.

कपिलमुनींनीं सांख्यशास्त्र प्रवर्तविलें अशी प्रसिद्धि आहे. ‘ सांख्यसूत्रें ’ म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध असून त्याचीं सूत्रें ५२७ आहेत व अध्याय ४ आहेत. ईश्वरकृष्णांचा ‘ सांख्यकारिका ’ नांवाचा ग्रंथ

विशेष प्रसिद्ध असून त्याच्या कारिका ७० आहेत. या ग्रंथाचें चिनी भाषेंत शालिवाहनाच्या ३ ऱ्या शतकांत भाषांतर झालें असून ईश्वर-कृष्णांचा काळ इ. स. २४० च्या सुमारचा होय असें विद्वानांचें मत आहे. सांख्यशास्त्रांत प्रकृतिपुरुषविवेक हा मुख्य सांगितला असून मूलप्रकृति किंवा प्रधान व त्या प्रकृतीच्या विकृति म्ह० प्रकृतीपासून झालेलीं २४ तत्वें याहून पुरुष ( जीवात्मा ) भिन्न आहे हें ओळखणें यालाच सांख्यज्ञान म्हणतात व 'ज्ञानादेव मोक्षः' असा सांख्यांचा सिद्धांत आहे.सर्व सृष्टपदार्थांच्या मूलभूत द्रव्याला सांख्य प्रकृति (मूळची) म्हणतात व प्रकृतिपासून झालेल्या तत्वांना विकृति किंवा विकार म्हणतात. जें स्थूलांत येतें तें सूक्ष्मांत बीजरूपानें असतेंच. सर्व सृष्टपदार्थांत कार्यकारणभाव आहे असाही सांख्यांचा एक सिद्धांत आहे. मूल-प्रकृति त्रिगुणात्मिका आहे किंबहुना सत्व रज व तम हे सूक्ष्मांतले तीन गुण म्हणजेच प्रकृति. त्रिगुणांची साम्यावस्था आहे तोंवर प्रकृति अव्यक्त असते व त्यावेळीं जग हें कांहींच नसतें. गुणांत विकार होऊन सृष्टि निर्माण होते आणि प्रकृति पुन्हां साम्यावस्थेंत येते तेव्हां जगाचा लय होतो. प्रकृति सूक्ष्म, अव्यक्त व निरवयव आहे. ह्या अव्यक्त प्रकृतीला अक्षर व तिच्यापासून होणाऱ्या सर्व पदार्थांना क्षर अशीं नांवें सांख्यशास्त्रानें दिलीं आहेत. ह्या प्रकृतीहून पुरुष किंवा आत्मा भिन्न आहे, अर्थात् तो गुणांच्या पलीकडचा असून अविकार आहे, सृष्टीच्या होण्याजाण्याहून वेगळा आहे, तथापि भोक्ता व साक्षी आहे. प्रकृति अचेतन, सर्वकर्ती व त्रिगुणात्मिका आणि पुरुष सचेतन, अकर्ता, उदासीन व निर्गुण. दोन्ही अनादि आहेत. प्रकृति देह व इंद्रियें ( करणें ) यांचे व्यापार करिते व सुखदुःखांचा भोग पुरुष घेतो, असा सांख्यमताचा अनुवाद गीतेनेंही १३ व्या अध्यायांत केला आहे. प्रकृति व पुरुष हीं दोनच तत्वें सांख्य मानतात मध्यें जें व्यक्तीस येतें ह्म० होतें व जातें तें तत्वतः ते सत्यत्वानें मानीत नाहींत. सांख्यांच्या प्रक्रियेंत ईश्वराला स्थान नाहीं म्हणून त्यांना निरीश्वरवादी

म्हणतात, तथापि कांहीं सांख्य सेश्वरवादी आहेत. कपिल हे सेश्वर सांख्य व ईश्वरकृष्ण निरीश्वर सांख्य असा समज आहे. पुरुष निर्गुण व अकर्ता असला तरी त्याच्या संयोगानें—लोहचुंबकसान्निध्यानें लोहांत जशी आकर्षणशक्ति येते तशी—प्रकृति ही त्रिगुणरूपानें सृष्टीचा पसारा निर्माण करिते असें सांख्यकारिकांत म्हटलें आहे. 'आंधळ्याच्या खांद्यावर लंगडा बसला कीं दोघेही वाट चालतात' त्यांतलाच हा प्रकार आहे! पुरुष प्रकृतीहून भिन्न असल्यामुळें मुक्त आहे, फक्त हें ओळखणें एवढेंच सांख्यमतें महत्वाचें आहे. प्रकृति एक व पुरुष अनंत हें सांख्यांचें मत आहे. एकाच प्रकृतीला पाहणारे पुरुष भिन्नभिन्न व असंख्य आहेत असें ते म्हणतात. वेदांत्यांचें मत याहून भिन्न आहे. प्रकृति एक तर पुरुषही एकच आहे, पण प्रकृतिपुरुषांच्या पलीकडचा परमात्मा मात्र सत्य असून प्रकृतिपुरुष दोन्ही मिथ्या आहेत असें वेदांती समजतो. हा सांख्य व वेदांत यांत मुख्य भेद आहे. सांख्यांच्या प्रकृतीला वेदांती माया म्हणतात. प्रकृति हें सांख्यांचें मूलभूत तत्व असून विकार विनाशी पण प्रकृति मात्र पुरुषाप्रमाणें अनादि, स्वयंभू व अविनाशी आहे असें त्यांचें मत आहे. विकार नाशवंत असल्यामुळें प्रकृति व पुरुष हीं दोनच तत्वें ते अनादि मानतात, अर्थात् या दृष्टीनें सांख्य हे द्वैतवादी आहेत. पंचक्लेशांचें ध्यानानें निवारण करून प्रकृतिपासून पुरुषाला वेगळेपणानें जाणलें असतां प्रकृति पुरुषाला सोडते व मग पुरुष स्वप्रकाशमय होतो. हीच मुक्ति. पुरुष मूळचाच असंग आहे. प्रकृतीनें त्याला धरलें असतें, म्हणून तिनें त्याला सोडलें कीं तो स्वतंत्र व मुक्तच आहे.

---

१ प्रकृतीला पहिली विकृति होते तिला महत्तत्व म्हणतात. हें जड व चित् यांच्या मिश्रणापासून होतें. महत्तत्वाला बुद्धि असेंही म्हणतात. महत्तत्वापासून अहंकार होतो. अहंकारापासून पुढें पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, मन, पंचतन्मात्रा ( शब्दस्पर्शादि ) व पंचमहाभूतें उत्पन्न झालीं. सात्विक अहंकारापासून मन व पंचज्ञानेंद्रियें, राजस अहंकारापासून पंचकर्मेंद्रियें व तामस अहंकारापासून पंचतन्मात्रा व त्यांपासून स्थूल पंचमहाभूतें—अशी सांख्यांची प्रक्रिया आहे.

प्रकृतिपुरुषविवेक ज्ञानेश्वरांच्या मुखानें ऐकूं:—

तरी पुरुष अनादि आथी। आणि तैंचिलागोनि प्रकृति।
सवें सरिसी दिवोराती। जयापरी ॥ ९६० ॥
कां रूप नोहे वायां। परी रूपा लागली छाया।
निकण वाढे धनंजया। कणेंसीं कोंडा ॥ ९६१ ॥
तरी केवळ जे सत्ता। तो पुरुष गा पांडुसुता।
प्रकृती तें समस्तां। क्रिया नाम॥ ९६६ ॥
बुद्धि इंद्रियें अंतःकरण। इत्यादि विकारभरण।
आणि ते तीन्ही गुण। सत्त्वादिक ॥ ९६७ ॥
हा अवघाची मेळावा। प्रकृती जाहला जाणावा।
हेचि हेतु संभवा। कर्मांचिया ॥ ९६८ ॥
प्रकृतिपुरुषांची कुळवाडी। सांगतां असंगडी।
जे आंबुली जोडी। आंबुला खाय ! ॥ ९७९ ॥
आंबुलिया आंबुलिये। संगती ना सोये।
कीं आंबुली जग विये। चोज ऐका ॥ ९८० ॥
जे अनंग तो पेंधा। निकवडा नुसधा।
जीर्ण अतिवृद्धा-। पासूनि वृद्ध ॥ ९८१ ॥
तो अचक्षु अश्रवण। अहस्त अचरण।
रूप ना वर्ण। नाम आथी ॥ ९८३ ॥
तो तरी अकर्ता। उदास अभोक्ता।
परि इया पतिव्रता भोगविजे ॥ ९८५ ॥
इये प्रकृति तंव। गुणमयी हेंचि नांव।
किंवहुना सावेव। गुण तेचि हे ॥ ९८७॥
हे प्रतिक्षणीं नित्यनवी। रूपागुणाचीच आघवी।
जडातेंही माजवी। इयेचा माज ॥ ९८८ ॥
ऐसेनि इया प्रकृती। आपुलिया सर्वव्याप्ती।
तया अविकारातें विकृती-। माजी कीजे ॥ १००७ ॥

तैसें अजा नित्य होये । आंगीं जन्ममृत्यूचे घाये ।
वाजती तंव लाहे । गुणसंगातें ॥ १०१५ ॥
तैसा गुणसंगमें । अजन्मा हा जन्मे ।
पावत ऐसा गमे । येऱ्हवीं नाहीं ॥ १०१९ ॥
प्रकृति होय जाये । हा तो असताचि आहे ।
म्हणोनि आब्रह्माचें होये । शासन हा ॥ १०२४ ॥ (अ०१३)

अव्यक्तप्रकृतीपासून विकार कसें उत्पन्न झाले तें पाहूं:—प्रकृतिपुरुषापासून प्रथम बुद्धितत्व झालें: 'उभयसंगें पहिलें । बुद्धितत्व प्रसवलें' बुद्धि किंवा महान्-बुद्धिपासून अहंकार. सात्विक अहंकारापासून पंच ज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें व मन हीं अकरा व तामस अहंकारापासून शब्दस्पर्शादि सूक्ष्म पंचतन्मात्रा व त्यापासून पंचमहाभूतें ( स्थूल ). पुरुष प्रकृति दोन, बुद्धि व अहंकार मिळून दोन, दशेंद्रियें व मन मिळून अकरा, पंचतन्मात्रा व पंचमहाभूतें मिळून २५ तत्वें झालीं. यांत मूळप्रकृति, अव्यक्त व पुढील विकार तेवीस.

महद्ब्रह्मउदरीं । प्रकृति आठै विकारीं ।
गर्भाची करी । पेलोवेली ॥ ९१ ॥
उभयसंगें पहिलें । बुद्धितत्व प्रसवलें ।
बुद्धितत्वें उभारलें । होय मन ॥ ९२ ॥
तरुणी ममता मनाची । अहंकार तत्व रची ।
तेणें महाभूतांची । अभिव्यक्ति होय ॥ ९३ ॥
आणि विषयेंद्रियां गौसी । स्वभावें तंव भूतांसी ।
म्हणोनि येती सरिसीं । तियेंही रूपा ॥ ९४ ॥
जालेनि विकार क्षोभें । पाठीं त्रिगुणाचें उभें ।
तेव्हां ये वासना गर्भें । ठायेंठाव ॥ ९५ ॥
तरि सत्वरजतम । तिघांसि हें नाम ।
आणि प्रकृति जन्म-। भूमिका यया ॥ १३९ ॥

**हें एकेंचि वृत्तीच्या ठायीं । त्रिगुणत्व आवडे पाहीं ।**
**वयसात्रय देहीं । येकीं जेवीं ॥ १४१ ॥** ( अ० १४ )

पुरुष ‘ प्रकृति ना विकृति, ’ मूलप्रकृति ही ‘ प्रकृति, ’ व बाकीचीं २३ तत्वें सांख्यमताप्रमाणें विकृति किंवा विकार आहेत. वेदांतमतानें एका परब्रह्मापासून प्रकृतिपुरुष झाले असल्यामुळें तेही विकारच आहेत, व ते दोन्ही मिळून एकच धरल्यानें एकंदर तत्वें २४ होतात. वेदांतांत प्रकृति दोन प्रकारचीच मानली आहे. पृथिव्यादि पंचभूतें, मन, बुद्धि व अहंकार मिळून तीन ही अष्टधा ह्म० अपरा प्रकृति व जीव ही परा प्रकृति ( गीता अ० ७ श्लोक ४ व ५ ). अष्टधा प्रकृति म्हणजे जगत्. जगत्, जीव व परमेश्वर यांचाच विचार वेदांतशास्त्रांत करितात.

## १० पातंजलयोग.

सांख्यशास्त्राप्रमाणें योगशास्त्रही फार प्राचीन आहे व सांख्य आणि योग ह्या दोन्ही शास्त्रांचा भगवद्गीतेनें आदर केला आहे. योग-दर्शनाचे प्रणेते भगवान् पतंजल मुनि आहेत. पातंजल योगदर्शनाचे चार पाद असून त्यांत एकंदर १९५ सूत्रें आहेत. हा ग्रंथ सूत्रात्मक आहे. पहिल्या पादांत योग म्हणजे ‘ चित्तवृत्तिनिरोध ’ असें योगाचें लक्षण केलें असून समाधीचें वर्णन केलें आहे. चित्तवृत्तींचा निरोध हा अभ्यास आणि वैराग्य यांच्यायोगानें होतो असें १२ व्या सूत्रांत म्हटलें असून तो ‘ ईश्वरप्रणिधानाद्वा ’ असें २३ वें सूत्र आहे. ईश्वराचा वाचक (म्ह० नाम) प्रणव हा असून ‘ तज्जपस्तदर्थभावनम् (सूत्र २८) प्रणवाचा जप व प्रणवाथ जें ब्रह्म त्याचें ध्यानधारणरूप प्रणिधान म्ह० कर्मफळाची वांछा न धरितां कर्म ईश्वरार्पण बुद्धीनें करणें याच्या योगानें अर्थात् भक्तियोगानेंही चित्तवृत्तिनिरोध होतो असें येथें म्हटलें आहे. भक्तियोगानें समाधिसिद्धि व समाधिसिद्धीचें फळ तत्काळ प्राप्त होतें. ‘ चिन्तनरूपप्रेमलक्षणाभक्ती ’ च्या योगानें ईश्वरसाक्षात्कार होतो व त्यानें चित्तविक्षेपादिअंतरायानिवृत्तिपूर्वक आत्मप्रसाद होतो असें

पुढील सूत्रांतून म्हटलें आहे. प्रणवाचा जप जसा येथें सांगितला आहे तसा 'यथाभिमतध्यानाद्वा' म्ह० आपल्या प्रिय उपास्यमूर्तीच्या ध्यानानेंही चित्तवृत्तिनिरोध होतो असें ३९ व्या सूत्रांत म्हटलें आहे. चित्तवृत्तींचा निरोध करून मन एका विषयावर स्थिर करणें हें पातंजल योगाचें ध्येय आहे. ह्या योगदर्शनाच्या दुसऱ्या पादांत तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान ह्या क्रियायोगानें योगाचीं यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, हीं योगाचीं पांच बहिरंग साधनें साधण्यास सांगितलीं असून तिसऱ्या पादांत धारणा, ध्यान व समाधि हीं तीन अंतरंग साधनें सांगितलीं आहेत. चौथ्या पादांत जन्म, औषधि, मंत्र, तप व समाधि यापासून होणाऱ्या पांच सिद्धींचें वर्णन केलें असून योगाचें महाफळ कैवल्यप्राप्ति असें प्रतिपादिलें आहे. दुसऱ्या पादांत 'समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्' 'स्थिरसुखमासनम्' 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' अशीं कांहीं महत्वाचीं सूत्रें आहेत. तिसऱ्या पादांत 'प्रत्ययैकतानता ध्यानम्' म्ह. ध्येयाकार वृत्ति-प्रवाह म्ह. ध्यान असें ध्यानाचें लक्षण केलें आहे; तसेंच रूप, लावण्य, बल व वज्रवत् दृढावयवत्व याला 'कायसंपत्' ह्म० शरीरसंपत्ति असें म्हटलें आहे. असो. त्रिविध तापानें तापलेल्या जीवाच्या सुटकेचें मुख्य साधन योग आहे व योगबलानें कैवल्यपद गांठावें हें साध्य आहे हेंच ह्या योगदर्शनाचें तात्पर्य आहे. योगाचीं यमनियमादि आठ अंगें सांगितलीं आहेत ( यालाच अष्टांगयोग म्हणतात ).

अष्टांगयोगानें जीवपरमात्म्याचें ऐक्य अनुभवणें याला मोक्ष म्हणतात.

१ **यमः**—अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे पांच यम होत. अहिंसा म्हणजे कोणाही भूताचा मत्सर किंवा द्रोह न करणें; सत्य म्हणजे वाचेनें यथार्थ बोलणें व मनानें यथार्थ वस्तूचें ग्रहण करणें; अस्तेय म्हणजे परधनाचा अपहार न करणें; ब्रह्मचर्य म्हणजे शृंगारविषयांच्या श्रवणापासून क्रियेपर्यंतच्या अष्टविध मैथुनापासून निवृत्त असणें; अपरिग्रह म्हणजे पदार्थांच्या स्वीकारामुळें हिंसादि दोष प्रायः घडतात म्हणून त्यांचा स्वीकारच न करणें.

२ **नियमः**—शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान हे पांच नियम. शौच किंवा शुचित्व म्हणजे बाहेर देहाची व आंत मनाची शुद्धि; संतोष म्हणजे वतमान स्थितींत समाधान; तप; स्वाध्याय म्हणजे मोक्षशास्त्राचें अध्ययन किंवा प्रणवाचा जप; ईश्वरप्रणिधान म्हणजे ईश्वराला सर्वकर्मे अर्पण करणें.

३ **आसनः**—'स्थिरसुखमासनम्' ज्यानें दीर्घकाळ स्थिर व सुखदायक अशी शरीराची स्थिति राहते तें. पद्मासनसिद्धासनादि ८४ आसनें आहेत.

४ **प्राणायामः**—रेचक, पूरक व कुंभक यांच्या योगानें प्राणवायूचें नियमन करणें. प्राणाच्या स्थैर्यानें मनाचें स्थैर्य होतें.

५ **प्रत्याहारः**—इंद्रियांना आपापल्या विषयांकडे जाऊं न देतां त्यांना चित्तानुकारी करणें. चित्तनिरोध झाला कीं इंद्रियानिरोध अनायासें होतो. विषयांपासून इंद्रियांना आवरणें हा प्रत्याहार.

६ **धारणाः**—अवांतर विषयांवरून चित्त काढून त्याला एका वस्तूच्या ठिकाणीं एकाग्र करणें. एकदेशावर चित्ताचा बंध याचें नांव धारणा.

७ **ध्यानः**—प्रत्ययाची एकतानता याचें नांव ध्यान. वृत्तींचा एकाकार प्रवाह म्हणजे ध्यान.

८ **समाधिः**—ध्येयावांचून कांहींही ग्रहण न होणें; आत्म्यावांचून कांहींही अनुभवाला न येणें; ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटीही लीन होणें याला समाधि म्हणतात. समाधीचें संप्रज्ञातसमाधि उर्फ सबीज समाधि व असंप्रज्ञातसमाधि उर्फ निर्बीज समाधि असे दोन भेद आहेत. पहिलींत वृत्तीचें भान असतें, दुसरींत तें नसतें.

अभ्यास आणि वैराग्य यांच्या साह्यानें ह्या अष्टांगयोगाचें अनुष्ठान केलें असतां पूर्ण समाधि प्राप्त होते. समाधीच्या योगानें सकल संसारतापांची अत्यंतनिवृत्ति होते. हाच मोक्ष.

---

नगर वाचनालय, सातारा.


# २ उपनिषदांतील ब्रह्मविद्या.

## १ दशोपनिषदें.

मागें 'वेदविद्या' ह्या प्रकरणांत उपनिषदें कांहीं संहितेंतून, कांहीं ब्राम्हणांतून व कांहीं आरण्यकांतून मूळ प्रगट झालीं आहेत असें मीं म्हटलें आहे. उपनिषदें हा वेदाचा अंतिम भाग आहे, म्हणून त्यास वेदांत म्हणतात. उपनिषदांना वेदाचें ज्ञानकांड म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ब्रम्हविद्याप्रतिपादन हा त्यांचा मुख्य विषय आहे.

शुक्ल यजुर्वेदास 'वाजसनेय संहिता' म्हणतात. ह्या संहितेचे ४० अध्याय असून ४० वा अध्याय म्हणजेच 'ईशावास्योपनिषद्' होय. याच वेदाच्या ब्राम्हणास 'शतपथब्राम्हण' म्हणतात, व त्याच्या १४ व्या अध्यायांत 'बृहदारण्यकोपनिषद्' आलें आहे. तात्पर्य ईशावास्य व बृहदारण्य हीं दोन उपनिषदें शुक्लयजुर्वेदाचीं आहेत. काठक, श्वेताश्वतर व मैत्रायणीय हीं तीन कृष्णयजुर्वेदाचीं उपनिषदें आहेत; म्हणजे ईश, कठ, बृहदारण्य, श्वेताश्वतर व मैत्रायणीय हीं पांच उपनिषदें एका यजुर्वेदाचीं आहेत. ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणाच्या आरण्यकांत (अ. ४ ते ७) ऐतरेयोपनिषद् आलें आहे, अर्थात् हें ऋग्वेदाचें उपनिषद् आहे. केन व छांदोग्य हीं उपनिषदें सामवेदाच्या ब्राम्हणांत आलेलीं असून मुण्डक, माण्डुक्य व प्रश्न हीं तीन उपनिषदें अथर्ववेदांतील आहेत. तात्पर्य ऋग्वेदाचें १, यजुर्वेदाचीं ५, सामवेदाचीं २ व अथर्ववेदाचीं ३ अशीं ११ उपनिषदें आहेत, बाकीचीं स्वतंत्र आहेत. उपनिषदांचीं संख्या पुढें वाढत वाढत पुष्कळच वाढली आहे. उपनिषदांची संख्या १०८ वर गेली आहे. मुक्तिकोपनिषदांत 'माण्डूक्यमेकमेवालं मुमूक्षूणां विमुक्तये' तथापि तेवढ्यानें कार्य साधलें नाहीं तर दशोपनिषदांचा अभ्यास कर असें म्हटलें आहे, "ईशकेनकठप्रश्नमुण्डमाण्डूक्यतित्तिरिः । ऐतरेयंच छांदोग्यं

बृहदारण्यकं तथा." तेरा उपनिषदांतलें शेवटचें जे मैत्रायणीय ते ४ हजार वर्षांपलीकडील आहे असें टिळकवैद्यादि विद्वानांचें मत आहे. त्यांनीं ४।५ हजारवर्षांमागील उपनिषदें आहेत असें ठरविलें आहे. श्रीशंकराचार्यांनीं प्राचीनतम व उत्कृष्ट अशीं दहा उपनिषदेंच श्रेष्ठ ठरविलीं असून त्यांवरच त्यांनीं भाष्यें लिहिलीं आहेत. तीं उपनिषदें अशीं:–ईश केन, कठ, ऐतरेय, तैत्तिरीय, प्रश्न, मुण्ड, माण्डुक्य, छांदोग्य व बृहदारण्य. आचार्यांनीं ह्या दशोपनिषदांवर भाष्यें केलीं असून कौषीतकी उपनिषदावरही भाष्य केलें आहे. ह्याशिवाय नृसिंहतापनीय व श्वेताश्वतर हीं उपनिषदेंही त्यांना मान्य आहेत. छांदोग्य, बृहदारण्य, ऐतरेय, ईश, केन, कठ, तैत्तिरीय, कौषीतकी, कठ, मुण्डक, श्वेताश्वतर, प्रश्न, मैत्रायणीय व माण्डुक्य असा तेरा उपनिषदांचा कालानुक्रम कोणी कोणी ठरवितात. उपनिषदांत मुख्यतः आत्मविद्या सांगितली आहे. ऋग्वेदांत इद्राग्निवरुणादिदेवांच्या प्रार्थना आहेत, यजुर्वेदांत यज्ञकर्माची मीमांसा व पद्धत आहे पण उपनिषदांत देवतांच्या प्रार्थना नाहींत, देवतांच्या प्रसादाची याचना नाहीं, सर्व देवता ज्या एका आत्म्याचीं प्रतिबिंबें आहेत त्या आत्म्याची व आत्मानंदाची ओळख करून दिली आहे. आत्मानंदांत सकल परिपूर्णता आहे.

## २ आत्मविद्या व आत्मविद्.

ऋग्वेदांतील वामनसूक्त, पुरुषसूक्त, नासदीयसूक्त, वागांभृणीसूक्त इत्यादींत अद्वतैवेदांताचा स्पष्ट तात्पर्यार्थ आहे, व त्याच आधारावर उपनिषदांची इमारत उभारली आहे. यज्ञप्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा होत असे, त्यांत प्राधान्य औपनिषदिक ज्ञानास देत असत. यज्ञकर्म आटोपल्यावर तत्वज्ञानाची चर्चा चाले. प्रमुख उपनिषदांत प्रश्नोत्तररूपांत किंवा संवादरूपांत मुख्य मुख्य तत्वें प्रगट झालीं आहेत. उदाहरणार्थ, कठोपनिषदांतील यमनाचिकेत संवाद पहा. उपनिषदांच्या आरंभीं शांतीचे मंत्र असतात ते मंत्र सर्वांनीं म्हटल्यावर चर्चेस सुरवात होई.

नगर वाचनालय, सातारा.


पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

त ( ब्रह्म ) पूर्ण आहे व इदं हें ब्रह्म ( जगद्रूपानें दिसणारें ) पूर्णच आहे, पूर्णापासूनच पूर्णाचा उदय होतो. पूर्णांत पूर्ण मिळविल्यास पूर्णच राहतें व पूर्णांत पूर्ण वजा केल्यास बाकी पूर्णच ! हा शांतिपाठमंत्र ईशांत व बृहदारण्यकोपनिषदांत आहे.

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभि र्व्यशेम देवहितं यदायुः ॥
( ऋ. १–६–१६ ).

'आम्हीं कानांनीं मंगल गोष्टी ऐकूं व डोळ्यांनीं मंगलच पाहूं. सुदृढ अंगांनीं आयुष्याच्या शंभर वर्षांचा आनंदानें उपभोग घेऊं.' हा गोड मंत्र फार लोकप्रिय आहे. ह्यांत उत्साह व समाधान आहे, रडवेपणा नाहीं. ह्या कल्याणपर मंत्राचें चिंतन प्रश्नोपनिषदांत केल आहे.

आप्यायन्तु ममांगानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बल-
मिंद्रियाणिच सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माऽहं ब्रह्म
निराकुर्यां मा मा ब्रह्मनिराकरोदनिराकरणमत्स्व
निराकरणं मेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु
धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः

'वाङ् मे मनसि प्रतिष्ठिता' हा शांतिमंत्र ऐतरेय व कौषीतकी ह्या दोन ऋग्वेदी उपनिषदांचा आहे.

सहनाववतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्वीनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥ ( कठोपनिषद् )
ॐ शांति शांतिः शांतिः

हे शांतिमंत्र आरंभीं व शेवटास गुरुशिष्यांनीं म्हणावयाचे असतात. शांतिमंत्ररूपी मंगल करून नंतर मुख्य विषय सांगण्याची उपनिषदांची

पद्धति आहे. हे मंत्र पाहिले असतां यांतही अद्वैताचा धागा परिपूर्ण आहे असा निश्चय होतो.

‘ नमः परमऋषिभ्यः नमः परमऋषिभ्यः ’ असें मुण्डकांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मविद्या परंपरेनें प्राप्त करून देणाऱ्या ऋषींना परमादरपूर्वक प्रथम नमन करितों. ‘ विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता ’ असा जो ब्रह्मदेव त्यानें ‘ सर्वविद्याप्रतिष्ठा ’ म्हणजे सर्व विद्यांना मूलाधार असलेली ब्रह्मविद्या आपला पुत्र अथर्वा ह्यास दिली. तेथून ती अंगि, भारद्वाज, अंगिरस, शौनक अशा क्रमानें आली. त्यांना व ह्या विद्येचे द्रष्टे ऋषिवर्य शांडिल्य, दध्यङ् आथर्वण, आरुणि, सनत्कुमार, याज्ञवल्क्य इ० ऋषींना नमन असो.

एक ब्रह्मच पूर्ण आहे. पूर्णापासून जगताची उत्पत्ति झाली अशी कल्पना केली तरी अपूर्ण जगत् पूर्णापासून निष्पन्न होणें शक्य नाहीं व अपूर्णापासून होणें तर मुळींच संभवत नाहीं, म्हणून पूर्णापासून जें प्रकट झालें तें पूर्णच आहे हा सिद्धांत श्रीमच्छंकराचार्य व त्यांचे परमगुरु गौडपादाचार्य यांनीं माण्डुक्योपनिषदांवरील कारिकेंत स्पष्ट केला आहे. आचार्यांचा प्रख्यात श्लोक ‘ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ’ हेंच दाखवितो. जगत् जगत्रूपानें सत्य नाहीं, ब्रह्मरूपानें जगत् ब्रह्मच आहे, जीवही बह्मापासून वेगळे नाहींत—‘ जीवो ब्रह्मैव नापरः ’ याप्रमाणेंच अद्वैताचें प्रतिपादन उपनिषदांतून केलें आहे. उषनिषदांत आत्मविद्येचा सांगोपांग विचार केलेला आहे; जीव जगत् व ईश्वर यांविषयीं अत्यंत सूक्ष्मतत्त्वें कथन केलीं आहेत. ब्रह्म हें एकच आहे कां ब्रह्म व जगत् अशीं दोन रूपें आहेत ? जीव एक आहे कां अनंत आहेत व ते ब्रह्माहून वेगळे आहेत कां ब्रह्माशीं अभिन्न आहेत ? तसेंच स्थूल जगताचे व्यापार स्थूलाकडूनच होतात किंवा स्थूलासही प्रेरक शक्ति वेगळी आहे ? जीवास ब्रह्मप्राप्ति होण्यास साधनें कोणतीं आहेत ? तसेंच एकीएक ब्रह्मच अनंतत्वाला कसें प्राप्त झालें ? वगैरेबद्दल सुंदर विचार उपनिषदांतून केले आहेत. जीवास अखंड आनंद उत्पन्न करून

देण्याचें सामर्थ्य उपनिषदांत आहे म्हणूनच आह्मीं आर्यलोक वेदा-इतकाच मान उपनिषदांस देत आलों आहोंत उपनिषदांबद्दल पौर्वात्य व पाश्चिमात्य पंडितांचाही आदर आहे.

जगत्, पंचमहाभूतें व त्रिवृत्-त्रिगुण-याप्रमाणें आब्रह्मस्थावरापर्यंत एकच सत्तामात्र ब्रह्म आहे, त्याच्या अधिष्ठानावांचून कोणतेंही भूत कार्यक्षम होऊं शकत नाहीं, त्या सर्वांचीं कार्यें परब्रह्माच्या सत्तेवर चालत असतात हें उपनिषदांत दाखविलें आहे.

**भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः**
**भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥** ( कठ २-३-३ )

त्याच्या भयानें अग्नि व सूर्य हे उष्णतेसह प्रकाश देतात आणि तिसरा इंद्र, चवथा वायु व पांचवा मृत्यु, हे लोकपाल त्याच्या भीतीनं आपापलीं कामें करितात. या मंत्राचे अर्थाप्रमाणेंच तैत्तिरीयोपनिषदांत एक मंत्र आहे त्यावरून या मंत्राचें स्पष्टीकरण होईल.

**भीषास्माद्वातः पवते । भीषोदेति सूर्यः ।**[1]
**भीषास्मादग्निश्चेंद्रश्च । मृत्युर्धावति पंचमः ।** ( तै० २-८ )

---

१ आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगें नसावें ।
पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥२८१॥
पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी ।
पृथ्वीया-भूतें वाहावी । हे आज्ञा माझी ॥ २८२ ॥
म्यां बोलविल्या वेद बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले ।
म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळिता ॥ २८३ ॥
मियांचि नियमिला सांता । काळ ग्रासितसे भूतां ।
इयें म्हणियागतें पांडुसुता । सकळें जयाचीं ॥ २८४ ॥
मीचि एक अनेकपणें । वेगळालेनि प्रकृतिगुणें ।
जीत जगाचेनि प्राणें । वर्तत असे ॥ २८९ ॥
ऐसें जगाचें बीजसंकल्प । अव्यक्त वासनारूप ।
तया कल्पांतीं जेथ निक्षेप । होय तें मी ॥ २९३ ॥—ज्ञा. अ. ९

हेच विचार नामदेव व तुकाराम यांच्या अभंगांत व्यक्त झाले आहेत.

पंचमहाभूतें जड आहेत तीं कार्यकारी होऊं शकत नाहींत. त्यांच्यांत सत्तामात्र चैतन्य ( आत्मा ) प्रवेशित होतें त्यावेळीं तीं कार्यक्षम होतात. वायु हा जेव्हां त्यांत आत्मा प्रवेश करील तेव्हांच वहावयास लागतो, सूर्यातही आत्मतत्व असल्याशिवाय प्रकाश देण्याचें सामर्थ्य नाहीं, त्याचप्रमाणें अग्नींतही आत्मसत्ता नसेल तर अग्नीचें कांहीं एक चालत नाहीं, तसेंच इंद्र व मृत्युही चैतन्याश्रयावांचून व्यर्थच आहेत. एवढी सत्ता परमात्म्याची आहे ह्मणूनच पंचमहाभूतें त्याच्या सत्तेस भिऊन आपापल्या कार्यांत तत्पर असतात ! या भूतांना स्वतंत्र अस्तित्व असतें तर एकेकानें प्रळय केला असता ! एकट्या वायूनें सर्व विश्व उडविलें असतें, अग्नीनें ब्रह्मांडाची राख केली असती, पाण्यानें अखंड जलमय स्थिति ठेविली असती व पृथ्वीनें सर्वांची माती उरविली असती ! या तत्वावर प्रकाश पाडणारी कथा केनोपनिषदांत (खंड३व४) आहे ती सारांश रूपानेंसांगतों:—

ब्रह्माच्या सत्तामात्रेंकरून एकदां देवांना मोठा जय मिळाला. त्या जयामुळें देवांस गर्व झाला ! त्यांना असें वाटलें कीं हा जय आम्हीच मिळविला आहे—'अस्माकमेवायं महिमा ' हा त्यांचा अभिमान नाहींसा व्हावा व त्यांना अकर्तात्मबोध व्हावा ह्मणून ब्रह्म प्रगट झालें ! ही मूर्ति ब्रह्माच्या योगमाहात्म्यामुळें अद्भुत अशी यज्ञस्वरूपाची होती. पण ही अद्भुत मूर्ति कोणाची आहे याचा उमज देवांस पडेना. बरीच भवति न भवति झाल्यावर अग्नि देवांजवळ ' मी हें काय आहे तें पाहून येतों ' म्हणून यक्षाजवळ गेला. तेथें जातांच यक्ष त्यास म्हणाला कीं "तूं कोण व तुझें 'वीर्य' (सामर्थ्य) काय" अग्नीनें मोठ्या अभिमानानें सांगितलें कीं मी 'अग्नि असून ब्रह्मांडाचा दाह करण्यास समर्थ आहे ' तोंच यक्षानें एक गवताची काडी उत्पन्न केली, व ' या काडीस जाळून टाक ' असें यक्ष बोलला. काडी जाळण्यासाठीं अग्नीनें आपलें सर्व बळ खर्च केलें पण ती काडी जळून गेली नाहीं. यामुळें हिरमुसल्या तोंडानें अग्नि परत आला. नंतर वायु तेथें गेला पण तोही अग्नीप्रमाणेंच फजीत पावून परत आला. नंतर

इंद्र जाण्यास निघाला. इंद्र तेथें जातांच यक्ष गुप्त झाला व तेथें 'बहुशोभमाना हेमवती उमा' नांवाची स्त्री उत्पन्न झाली व ती इंद्रास म्हणाली 'तुम्हां सर्वांस देहाभिमानामुळें कर्ते आपण आहों असा भ्रम झाला आहे, पण हा तुमचा अभिमान व्यर्थ आहे, वास्तविक हा महिमा ब्रह्मस्वरूपाचाच आहे. त्या ईश्वरानेंच असुरांचा पराभव केला, तुम्हीं निमित्तमात्र आहांत, म्हणून तुम्ही ब्रह्माचा जयजयकार करा व त्यासच धन्यवाद द्या, सर्वांच्या अंतर्बाह्य आत्मतत्व सत्तामात्रेंकरून आहे हें ध्यानांत ठेवून त्या ब्रह्मरूपाशीं अनन्य रहा.' असें बोलून देवी गुप्त झाली व देवही अकर्तेपणाचा बोध श्रीगुरुरूप देवीपासून शिकले. या आख्यायिकेवरून उपनिषदांत अकर्तात्म-भावाचा बोध कसा आहे हें समजून येईल. प्रत्येक कर्म ईश्वरस्मरण-पूर्वक निरभिमानतेनें झालें पाहिजे अशी उपनिषदांची शिकवणूक आहे.

**अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथारसं नित्यमगंधवच्च ।**
**अनाद्यनंन्तं महतः परं ध्रुवं निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते (क० ३)**

जें शब्दातीत स्पर्शातीत व रूपातींत असून अव्यय आहे तसेंच जें रसशून्य व गंधशून्य असून नित्य आहे व जें अनादि व अनंत असून ध्रुव ( कूटस्थ ) हिरण्यगर्भाच्या पलीकडचें आहे, त्या आत्मस्वरू-पाचा निर्णय करून जो तन्निष्ठ होतो त्याची मुक्तता होते. असें जर तें आहे तर त्याची उपासना कशी करावी व त्याची प्राप्ती कशी व्हावी ?

**ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः ।**
**केनेषितां वाचमिमां वदन्ति चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति (के. १)**

'कोणा वस्तूच्या प्रेरणेनें मन स्वविषयाकडे म्हणजे संकल्पविक-ल्पाकडे धांव घेतें ? प्राण हे कोणाच्या प्रेरणेनें आपले व्यापार करि-तात ? वाणी कोणाच्या प्रेरणेनें बोलण्याचें कार्य करिते ? तसेंच डोळे, कान इ० इंद्रियांकडून जीं कार्यें होत आहेत त्यास कोणी प्रेरक आहे

किंवा तीं स्वतःच कार्यक्षम आहेत' असा प्रश्न केनोपनिषदानें केला आहे त्याचें उत्तर खालील मंत्रांत आहे.:—

**'न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनो न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि'**

तेथें म्ह० आत्म्यापर्यंत नेत्र, वाणी, मन अगर कोणतेंही इंद्रिय जाऊं शकत नाहीं तर ('यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसासह') मनासुद्धां सर्व इंद्रियें तेथून माघारी फिरतात. आतां हें ब्रह्म बुद्धिग्राह्य कसें व्हावें? ब्रह्म सर्वांहून पर आहे, तें मनाचें सूत्र व प्राणाचा प्राण असें सांगतां तर त्याची प्राप्ति कशी व्हावी या शंकेचें समाधान असें आहे:—

**'यद्वाचा नभ्युदितं येन वागभ्युद्यते ।**
**तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते'** ॥

वाणीकडून तें उच्चारलें जात नाहीं पण ज्याच्या योगानें वाणीच प्रकाशित होते तें ब्रह्म होय. 'यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षुंषि पश्यन्ति तदेव०'—डोळे त्याला केव्हांही पाहूं शकत नाहींत, डोळ्यांस मात्र पाहण्यासाठीं जें प्रकाशित करितें तें ब्रह्म होय. 'यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् । तदेव०'—मन केव्हांही त्याचेपर्यंत पोंचूं शकत नाहीं पण मनास संकल्पविकल्प करण्यास जें प्रवृत्त करितें तें ब्रह्म होय. याप्रमाणें तें सर्वेंद्रियांना सामर्थ्य देणारें आहे. इंद्रियें जड असून त्यांच्याकडून स्वतंत्रपणें कांहींही कार्य होत नाहीं तर जें इंद्रियांमध्यें राहून त्यांना सतत स्फूर्ति देतें व कार्यक्षम करितें तेंच ब्रह्म होय. हा सिद्धांत केन उपनिषदांत केला आहे.

ब्रह्म समजलें असा अभिमान असेल तर तें बिलकूल समजलेलें नसतें, कारण 'ब्रह्म' ही समजण्याची वस्तु नाहीं. समजणें व न समजणें याच्या पलीकडील ही वस्तु आहे. ज्ञानी पुरुष स्वयंमेव ब्रह्मरूप असल्यामुळें त्यांना ब्रह्म समजण्याचें कारण नाहीं, अज्ञानी पुरुष तें ज्ञेय आहे असें ह्मणून समजण्याची इच्छा करतात पण 'यत्र हि द्वैत-

श्री. मा. सामानी, वाशी,



मिव भवति' पाहतां व पाहण्याची वस्तु हें द्वैत आहे तोंपर्यंत तें समजलें जात नाहीं. अद्वैतब्रह्माशीं एकरूपता झाली ह्मणजे ब्रह्म समजलें या ह्मणण्यांत कांहींच अर्थ उरत नाहीं !

**यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।**
**अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥**

'ज्याला कळलें नाहीं असें वाटतें त्याला कळलें आहे व ज्याला कळलें आहे असें वाटतें त्याला कांहीं समजलें नाहीं.' ( केनोपनिषद् ).

**यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय ।**
**तथा विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ।**(मुं. ३।२।८

ज्याप्रमाणें वाहणाऱ्या नद्या आपलें नांव व रूप टाकून देऊन समुद्रांत लय पावतात, त्याप्रमाणें विद्वान् नांव व रूप यापासून मुक्त होऊन श्रेष्ठाहून श्रेष्ठ अशा दिव्य परमपुरुषाप्रत जातो. गांवांतील घाणीचें असो अगर तीर्थाचें असो तें पाणी वाहून नेणारी गटारें, ओढे, नाले, इ. नदींत प्रवेश करितात, नदी या सर्वांस बरोबर घेऊन निःशंकपणें समुद्रांत प्रवेश करते. गांवांतील पाण्यापासून नदीचें सर्व पाणी समुद्राशीं एकरूप झालें म्हणजे नदी अगर ओढे यांचें अमुक पाणी हा जसा भेद राहत नाहीं त्याप्रमाणें ( गुरूपदेशाच्या आधारानें ) नामरूपें मिथ्या समजून देहाच्या, जीवाच्या, जगताच्या, व ब्रह्मांडाच्या अंतर्बाह्य एकच ब्रह्म आहे, त्यावांचून दुसरा पदार्थच नाहीं, अनंत नामरूपांनीं त्यानेंच अनंत विश्व व्यापलें आहे, विश्व हा त्या शुद्धब्रह्माचा चिद्विलास आहे, अशी शुद्ध प्रचीति ज्याचे ठिकाणीं बाणली तो पुरुष ब्रह्मरूपच होतो. त्यास शोकमोहाची बाधा होत नाहीं. जगांतील कोणतीही शक्ति त्याचें अनिष्ट करूं शकत नाहीं. पहातेपणाच्या अभिमानाविरहित तो सर्वत्र पाहत असल्यामुळें त्याचे अंतःकरणांतच

१ 'जो मी जाहलों ह्मणे । तो कांहींच नेणे' असा याचा अनुवाद ज्ञानेश्वर करितात.
२ तुका ह्मणे गंगासागरसंगमीं । अवघ्या झाल्या उर्मी एकमय ॥ १ ॥

आपपरभाव उरत नाहीं व शरीर, वाणी, मन हे ईश्वरस्वरूपावरील तरंग आहेत, ते ईश्वररूप आहेत, त्यांपासून निष्पन्न होणारीं कर्में व त्याचीं फलें ब्रह्ममय आहेत, अशा निर्हेतुकपणानें निरभिमानपूर्वक त्याचीं कर्में होतात. असा ब्रह्मवेत्ता पुरुष शोकमोहातीत असतोः—

' यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ( ई० ७ )

' नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूँस्वाम्॥क.२-२३

पुष्कळ श्रवणपठण केलें, बुद्धि चांगली असली, म्हणजेच आत्मा साध्य होतो असें नाहीं. आत्मज्ञान होण्याला आत्मानुग्रहच झाला पाहिजे. तो झाला म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो. जो वेदवेत्ता व कुशाग्रबुद्धीचा साधक सर्वदा ' मी ब्रह्म आहें, ' असें अनुसंधान ठेवितो व परमेश्वराचा अनुग्रह संपादन करितो त्याला स्वरूपसाक्षात्कार सहज होतो. सारांश ज्याची वृत्ति निष्काम झाली आणि ज्याचें आत्मचिंतन व आत्मज्ञान शास्त्रशुद्ध मार्गानें अखंड होत राहिलें त्याला त्याचा आत्मा हाच परमात्मा आहे असा स्वानुभव येतो.

तात्पर्य गुरूपदेश, वेदान्तश्रवण, आत्मानुसंधान आणि परमेश्वरानुग्रह हे सर्व उपाय सिद्ध झाले म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो.

## ३ शांडिल्य.

परब्रह्म ' अद्रेश्य ' ह्म० ज्ञानेंद्रियांना पाहतां न येणारें, ' अग्राह्य ' ह्म० कर्मेंद्रियांना ग्रहण करितां न येणारें, अशरीर, अचक्षु, अश्रोत्र, अपाणिपाद, आणखी ' नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मम् ' असें आहे. त्याच्या प्राप्तीचा उपाय यज्ञ व इष्टापूर्तादि कर्में आहेत असें म्हणणारे ' मूढ आहेत, ' ज्ञानानेंच मोक्ष मिळणारा असून तें ज्ञान गुरुसेवेनें प्राप्त होतें. ब्रह्म वस्तुतः ' निहितं गुहायाम् ' ह्म० आपल्या हृदयांतच स्थित आहे असें जो जाणतो तो अविद्याग्रंथि तोडून टाकून मुक्त होतो. तें

ब्रह्म आपणच आहोंत असें जाणा, इतर वृथा भाषणें सोडून द्या; आत्मज्ञान हाच मोक्षप्राप्तीचा सेतु आहे:—

**तमेवैकं जानथ आत्मानम्। अन्यावाचा विमुंचथ। अमृतस्यैषसेतुः।**

ॐकाररूपानें ध्यान करा म्हणजे ' तमसः परस्तात् '–अज्ञानाच्या पार जाल.

**भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः।**

**क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥२-८॥** ( मुंडक )

' सर्व खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शांत उपासीत '–हें सर्व कांहीं ब्रह्म आहे, त्यापासून जग उत्पन्न होतें, त्याचे ठायीं जगाचा लय होतो व त्याचेच ठायीं त्याला स्थिति आहे, असा मनोमय संकल्प दृढ करून शांतचित्तानें ब्रह्माची उपासना करावी. मनुष्य हा संकल्परूप–'क्रतुमय' आहे. या लोकीं तो जसा संकल्प करितो तशी त्याला मेल्यावर (प्रेत्य) गति मिळते, म्हणून मनोमय, प्राणःशरीर, तेजोरूप, सत्यसंकल्प, सर्वकर्मा, सर्वकाम, सर्वगंध व सर्वरस असा व मोहरीपेक्षां सूक्ष्म असून पृथ्वी स्वर्ग व अंतरिक्ष यापेक्षा विशाळ असा सर्वव्यापी व इंद्रियरहित माझा आत्मा हाच ब्रम्ह आहे–' एष स आत्मा अंतर्हृदयः एतद्ब्रह्म. ' मी ब्रम्ह आहेच आणि मेल्यावरही ब्रह्मच राहणार–त्याशिवाय अन्यत्र कोठेंही जाणार नाहीं–अशी ज्याची दृढ श्रद्धा आहे व आपल्या ब्रह्मस्वरूपत्वाविषयीं जो निःसंदेह आहे तो ब्रह्मच होतो, हा बोध शांडिल्यांनीं अवघ्या चार सुंदर मंत्रांत केला आहे. **शांडिल्यांचें** सर्व उत्साहवर्धक तत्वज्ञान ह्यांत सांठविलें आहे. ( छांदोग्य. ३–१४ )

## ४ आरुणि

छांदोग्याच्या ६ व्या अध्यायांत आरुणीनें आपला पुत्र श्वेतकेतु यास आत्मोपदेश केलेला दिला आहे. आरुणिनें चित्र गार्ग्यायणि ( कौ० १–१ ) व जैवलि ( बृ० ६–२ ) यांजवळ ब्रह्मविद्या संपादन केली होती. **आरुणि** आपल्या पुत्रास म्हणाला, ' बाळा ! गुरुगृहीं बारा

वर्षे राहून ब्रह्मचर्यानें रहा. आमच्या कुळीं जन्मून अध्ययन न केल्यामुळें 'ब्रह्मबंधु' (नांवाचा ब्राह्मण) होऊन राहणें तुला योग्य नाहीं.' श्वेतकेतु १२ वर्षें आचार्यांच्या घरीं राहून २४ वे वर्षी परत बापाकडे आला. वेदाध्ययन संपूर्ण झाल्यामुळें त्याला गर्व झाला! आरुणीनें त्यास विचारलें "ज्याच्या योगानें परब्रह्म दाखविलें जातें तो आदेश तुला गुरूनें दिला आहे काय ? एका मृत्पिंडाच्या योगानें सर्व मृत्तिका-विकार समजतात, कारण विकार हें नुस्तें वाणीचें अवलंबन आहे, मृत्तिकाच केवळ सत्य आहे–'वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम्.' एका सुवर्णवस्तूच्या योगानें कटककेयूरादि सोन्याच्या सर्व वस्तु जाणतां येतात, किंवा एखाद्या नराणीवरून सर्व लोहविकार जाणतां येतात, त्याप्रमाणें ज्या एकाला जाणल्यानें सर्व जाणतां येतें तो आदेश (तत्व, ज्ञान) गुरूनें तुला सांगितला काय ?" यावर श्वेत-केतु म्हणाला, 'माझ्या गुरूला हा आदेश माहीत नसावा, माहीत असता तर त्यानें मला सांगितला असता ! बरें आतां तुम्हीच सांगा !' यानंतर आरुणिनें आपल्या पुत्रास जो आदेश दिला तो या छांदो-ग्याच्या ६ अध्यायांत सविस्तर दिला आहे. ह्या उपदेशांत स्वप्न, निद्रा व मृत्यु यांचें स्वरूपही दाखविलें आहे, पण आपण फक्त आत्मविद्येबद्दल काय सांगितलें तेवढेंच पाहूं. वरील सुवर्णलोहाच्या दृष्टांतांवरूनच उघड होतें कीं ब्रह्म हें जगताचें उपादनकारण आहे असें आरुणीचें मत आहे. ब्रह्म हें जगाचें निमित्त कारण आहे हें सर्वांसच कबूल आहे पण तें जगाचें उपादानकारणही आहे हें आरुणीचें मतच पुढें श्रीशंकराचार्यांनीं आपल्या वेदांतसूत्रभाष्यांत स्वीकारलें आहे. आरुणीच्या उदाहरणावरून आपल्या मुलाला तारक ब्रह्मविद्या देणें हें बापाचें कर्तव्य आहे हाही एक बोध घेण्यासारखा आहे ! ब्राह्मण तरुणांनीं तरी ब्रह्मविद्यालाभ करून न घेतां नुस्तें ब्रह्मबंधु (किंवा ब्राह्मणब्रुव) राहणें हें त्यांच्या कुलपरंपरेला उचित नाहीं हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे ! असो आरुणीनें मुलास सांगितलें कीं असत्पासून सत् होणें शक्य नाहीं म्हणून 'सदेव सोम्य इदमग्र

आसीत् । एकमेवाद्वितीयम् ' 'तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति ' त्यानें पाहिलें कीं मी बहु व्हावें, मग त्यानें तेज आप, अन्न असें क्रमानें उत्पन्न केलें. मृत्तिकाच सत्य आहे, बाकी सर्व नाममात्र–मिथ्या–भासरूप आहे हें ह्मटल्यानें येथें मायावाद सूचित केला आहे! आरुणीनें त्रिवृत्करण म्हणजे तीन गुणांनीं सृष्टिरचना झाली असेंही सांगितलें आहे. सत् ह्म० ब्रह्म हें मात्र सत्य आहे व तें तूं आहेस ' तत् त्वमसि ' हें श्वेतकेतूच्या मनावर ठसावें म्हणून आरुणीनें वारंवार सांगितलें आहे. ' येथें अमूल काहीं नाहीं. 'सन्मूलाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः'–सत् हेंच ह्या सृष्ट पदार्थांचें मूल आहे, आयतन ह्म० आश्रय आहे व प्रतिष्ठा ह्म० लय आहे. सत् अणुप्रमाण आहे, तें या सर्वांचा आत्मा आहे व तें तूं आहेस–'सर्व तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो'–तत्वमसि यालाच महावाक्य म्हणतात, पण पुढें हा आत्मलाभ श्रद्धा व गुरुसेवा यानेंच होणार असेंहि आरुणीनें सांगितलें आहे. आत्मबोधासाठीं वटबीज व वृक्षनदी व समुद्र इ० दृष्टांतही दिले आहेत. शरीर मरतें पण 'न जीवो म्रियते' कां कीं जीव हा सद्रूप आहे. सृष्टींतलीं नामरूपें गेलीं, सृष्टीचा संहार झाला, तरी ब्रह्म सत्य आहे व तें तूं आहेस–याप्रमाणें आरुणीनें ब्रह्मविद्येचा येथें उत्कृष्ट उपदेश केला आहे. ( छांदोग्य अ. ६ )

## ५ दध्यङ् आथर्वण.

**दध्यङ् आथर्वण**–ह्या ऋषींचें नांव ' मधुविद्या[1] ' जाणणारा ह्मणून ऋग्वेदांत चारदोन वेळ आलेलें आहे, पण तेथें उल्लेखलेली मधुविद्या

१ त्रिसुपर्णांत ' ॐ ब्रह्ममेतु माम् । मधुमेतु माम् । ब्रह्ममेव मधुमेतु माम्' असीं वचनें आहेत, त्यांचा अर्थ ' मला ब्रह्म म्ह० ब्रह्मज्ञान मिळो ( एतु ), मला ब्रह्माचा आनंद मिळो, ब्रह्म हाच परमानंद तो मला मिळो ' असा आहे. येथें मधु या पदाचा अर्थ ब्रह्मानंद असा स्पष्ट आहे. मधुविद्या म्ह० ब्रह्मानंद देणारी विद्या. ही मधु पिणाऱ्याला सर्वच सृष्टि सुखदायक आहे. ' मधुवाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः । माध्वीर्नः संत्वोषधीः ' इ० त्याला वारे सुखाचे वाहतात, नद्या अमृतमय उदक देतात, ओषधी गुणकर होतात, दिवसरात्र शांतिसुख देतात.

बृहदारण्यकांत स्पष्ट केली आहे. ही पृथिवी सर्व भूतांची मधु आहे व भूतें पृथिवीची मधु आहे, ह्या पृथिवींत जो तेजोमय आणि अमृतमय पुरुष आहे तो आणि ह्या शरीरांत जो अमृतमय आणि तेजोमय पुरुष आहे तो आत्मा होय'—'योऽयमात्मा इदममृतमयं इदं ब्रह्म इदं सर्वम्'–हाच अमृत, हाच ब्रह्म व हाच सर्व होय. उदक, अग्नि, वायु, दिशा, चंद्र, विद्युत्, मेघ, आकाश, धर्म, सत्य, मनुष्य, ह्या संबंधानें वरील एकच तत्व उघड आहे. तात्पर्य असें आहे कीं सव पदार्थ व भावना परस्पर संबद्ध असून एका अमृतमय व तेजोमय पदार्थानें ह्मणजे आत्म्यानें व्यापलेल्या आहेत: 'अयमात्मा सर्वेषां भूतानां मधु अस्य आत्मनः सर्वाणि भूतानि मधु'

**"स वा अयमात्मा सर्वेषां भूतानामधिपतिः सर्वेषां भूतानां राजा।तद्यथा रथनाभौ च रथनेमौच आराः सर्वे समर्पिता एवमेवास्मिन्नात्मनि सर्वाणि भूतानि सर्वे देवाः सर्वे लोकाः सर्वे प्राणाः सर्व एव आत्मानः समर्पिताः"**

तो हा आत्मा सर्व भूताधिपति आहे, सर्वांचा राजा आहे. ज्या प्रमाणें रथाच्या नाभींचे व नेमीचे ठिकाणीं सर्व आरा बसविलेल्या असतात, त्याप्रमाणें या आत्म्याचे ठिकाणीं सर्व भूतें, सर्व देव, सर्व लोक, सर्व प्राण आणि हे प्रत्येक शरीरांत प्रतिबिंबित असे आत्मे स्थित आहेत. दध्यङ्आथर्वणानें हें मधुब्राह्मण अश्विनीकुमारांना सांगितलें व तो म्हणाला, 'ईश्वरानें द्विपाद, चतुष्पाद, पक्षी इ० केलें व तो स्वतःच सूक्ष्मशरीर घेऊन त्यांत प्रविष्ट झाला. तोच हा पुरुष सर्व शरीरांत असतो म्हणून त्याला पुरिशय (पुरुष) म्हणतात. त्यानें आच्छादिलें नाहीं किंवा ज्यांत प्रवेश केला नाहीं असें कांहीं नाहीं. 'रूपं रूपं प्रतिरूपो बभूव हतस्य रूपं प्रतिचक्षणाय'–आपलें निजरूप पाहण्यासाठीं प्रत्येक रूपाचे ठिकाणीं त्यानें तें तें रूप धारण केलें. हा एकरूप असून 'मायाभिः'–आपल्या मायेच्या योगानें अनेक रूपें घेतो–हा आत्मा

अपूर्व, अनपर ( अद्वितीय ), अनंत व अबाह्य होय. हाच सर्वांचा भोग घेतो. हें अनुशासन होय म्ह० वेदांताचा निष्कर्ष होय. ( बृहदारण्य. २-५ )

ही मधुविद्या म्ह० ब्रह्मविद्या खरोखरच मधु आहे. पंचमहाभूतें, सर्व देव, सर्व शरीर, सर्व लोक हे एकाच मधुर आत्मतत्त्वानें भरलेले आहेत, त्यांत सुसंगति आहे-विसंगति नाहीं- ही भावना नेहमीं चित्तांत जागृत ठेवल्यानें केवढें सुखसमाधान लाभणारें आहे ! चराचर आपलेंच निज-रूप आहे ह्या अनुभवाचा आनंद भोगणारे धन्य आहेत. तेथें कसल्याही द्वैताला जागा नाहीं.

## ६ याज्ञवल्क्य.

**याज्ञवल्क्यांचें** महत्व बृहदारण्यकावरून चांगलें कळून येणारें आहे. सदर उपनिषद् फार मोठें आहे. त्याचे सहा अध्याय आहेत, तथापि ब्रह्मविद्येच्या दृष्टीनें अध्याय २।३।४ हे तीनच विशेष महत्वाचे आहेत. २ ऱ्या अध्यायांत त्यांची विदुषी स्त्री मैत्रेयी हिच्याशीं त्यांचा संवाद झाला आहे, तिसऱ्यांत जनकसभेंत अनेक ब्रह्मवेत्या पुरुषांशीं त्यांचे वाद झाले असून त्यांत याज्ञवल्क्यांनीं सर्वांस पराभूत केल्याचें वर्णिलें आहे व चौथ्यांत जनकाच्या प्रश्नांस त्यांनीं उत्तरें दिलीं आहेत. यांत भौतिक व आधिदैविक भाग पुष्कळ आहे तरी आध्यात्मिक विष-यांवरही याज्ञवल्क्यांचे स्पष्ट व खणखणित उद्गार आहेत. तीनही अध्यायांत ब्रह्मविद्येचा धागा ‘ ओतं च प्रोतं ’ च विणलेला आहे. याज्ञवल्क्यांच्या दोन स्त्रिया-एक कात्यायनी, व दुसरी मैत्रेयी. पहिली चार लौकिक स्त्रियांपैकींच होती, दुसरी मैत्रेयी मात्र अंतर्मुखदृष्टीची होती व तिला ब्रह्मविद्येची तीव्र लालसा असून ती पतीची पारमार्थिक योग्यता जाणणारी होती. ह्या उपनिषदांतील तिसरी स्त्री म्हणजे गार्गी वाचक्नवी. दरबारांत याज्ञवल्क्यांशीं ही दोन हात खेळली व तिच्या प्रश्नांस समर्पक उत्तरें मिळाल्यावर तिनें त्यांचें श्रेष्ठत्व कबूल केलें व इतरांसही तें कबूल करावयास लावलें ! ही धीट पण जाणती व

मोकळ्या मनाची स्त्री सर्व उपनिषदांत अद्वितीय आहे. अश्वल, आर्तभाग, भृज्यु, उषस्त, कहोल, उद्दालक, विदग्ध इ० ब्रह्मवेत्त्यांवर गार्गीच्या तेजस्वी प्रश्नांची छाप पडली व शेवटीं, 'याज्ञवल्क्यांनीं सभा जिंकली' असें तिनें जाहीर केलें ! याज्ञवल्क्य जसे ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ होते तसे ते श्रीमंतही होते. त्यांजजवळ गोधन व सुवर्णसंपत्ति अमूप होती. त्यांनीं आपल्या दोघी स्त्रियांत संपत्तीची वांटणी केली तेव्हां मैत्रीयीनें त्यांस विचारलें कीं सर्व पृथ्वीची संपत्ति मिळाली तरी मला अमृतत्त्व मिळेल काय? त्यांनीं उत्तर केलें कीं वित्ताच्या योगानें अमृतत्त्व मिळण्याची आशा नाहीं–'अमृतत्त्वस्य तु नाशास्ति वित्तेन !' ती म्हणाली 'तर मग मला ही संपत्ति नको, अमृतत्त्व देणारें जें ज्ञान आपणांपाशीं आहे तें मला द्या !' याज्ञवल्क्य म्हणाले 'ये मंजजवळ बैस. तूं मला आधींच प्रिय आहेस व या प्रश्नानें मीं तुजवर अधिक प्रसन्न झालों आहे.' मग त्यांनीं तिला आत्मज्ञान दिलें:—

**'न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति ।**
**आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति'**

याप्रमाणेंच जाया, पुत्र, वित्त, ब्राह्मण, क्षत्रिय, लोक, देव, भूतें, सर्व कांहीं त्यांच्या त्यांच्यासाठीं प्रिय नसतात तर आपल्यासाठीं प्रिय असतात. असा तो आत्मा ओळखून घे.

**'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः ।**
**आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन विज्ञानेन इदं सर्वं विदितम् ।**

'आपण ह्म० आत्मा पाहिला पाहिजे. त्याचेंच श्रवणमनननिदिध्यासन झालें पाहिजे. त्याचें दर्शन, श्रवण, मनन, ज्ञान हें झालें असतां या सर्वांचें ज्ञान होतें.' आपणाहून ब्राह्मण, क्षत्रिय, भूतमात्रें, वेगळीं आहेत असें ज्याला वाटतें तो हीं सारीं दूर करितो, पण 'इदं ब्रह्म इदं क्षत्रमिमे लोका इमे देवा इमानि भूतानि इदं सर्वं यदयमात्मा'–हे ब्राह्मण, हे क्षत्रिय, हे लोक, हे देव, हीं भूतें, हीं सारीं आत्मरूप आहेत, आप-

... वाचनालय, सातारा.



णच हीं आहोंत असें जाणून मुक्त हो. आत्म्याचीं संगति केली कीं सर्व जवळ होतें, आपल्याबाहेर हें कांहींच नाहीं. सर्वरूपांचें एकायतन चक्षु, सर्व शब्दांचें कान, सर्व विद्यांचें हृदय, याप्रमाण सर्वांचें एकायतन आत्मा आहे व त्यांशीं तद्रूप झाल्यानें सर्व भेदांचा लय होतो. मिठाचा खडा पाण्यांत पडला कीं त्यांत लय पावतो, वेगळा उरत नाहीं, त्याप्रमाणें ' इदं महद्भूतं अनंतं अपारं '–त्याशीं एकरूप होऊन जा. तुला एवढेंच ज्ञान पुरें आहे. भेदभाव असेल तर दुसऱ्याचा वास घेईल–' यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं जिघ्रति' त्याप्रमाणेंच ' पश्यति ' ' शृणोति ' ' विजानाति ' इ०; पण ' यत्र वा अस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं जिघ्रेत ' इ० इ० म्हणून सर्वात्मभाव हाच मोक्ष हें समजून वाग.

कहोलानें याज्ञवल्क्यास विचारिलें कीं 'साक्षात् व प्रत्यक्ष सर्वव्यापी आत्मा कोणता तो मला सांगा ' यावर याज्ञवल्क्यानें ' हा पहा तुझाच आत्मा सर्वव्यापी आहे ' असें तात्काळ उत्तर केलें व प्राणापानादि रूपानें खेळणारा वायु ही आत्म्याची खूण दाखविली. कहोल म्हणाला, ' हा बैल, हा घोडा, तसा मला प्रत्यक्ष आत्मा दाखवा !' याज्ञवल्क्य म्हणाले: 'तुझ्या लौकिक दृष्टीच्या द्रष्ट्याला तूं असा तुझ्या दृष्टीनें पाहूं नकोस, हा तुझ्या दृष्टीचा द्रष्टा आहे, तो तुझ्या मनाचें मन व बुद्धीची बुद्धि आहे. या आत्म्याहून इतर ( शरीर ) विनाशी आहे. आत्मा तहानभूक, शोकमोह, जरामृत्यु यांच्या पलीकडचा आहे. मीच आत्मा ( परब्रम्ह ) आहे असें ज्ञान झालेले ब्राह्मण म्ह० ब्रह्मज्ञ पुरुष पुत्रैषणा–लोकैषणा, वित्तैषणा यापासून सुटून ' भिक्षाचर्यंचरन्ति ' म्हणून ' ब्राम्हणः पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् '–आचार्यापासून शिकलेलें शब्दज्ञान सर्व विसरून बाल्यानें म्ह० केवळ आत्मबळानें रहावें,

१ अस्थींच्या देहीं मांसाचा गोळा । पाहेन म्हणे ब्रह्मीचा सोहळा ।
तो ज्ञाता नव्हे, आंधळा । केवळ मूर्ख ॥ ( दासबोध )

दोन्ही टाकून देऊन मुनि ( मननशील ) व्हावें, व पुढें मान व अमौन दोन्ही टाकून दिल्यावर मग तो पुरुष खरा ब्रह्मज्ञ होतो. एष आत्मा अंतर्याम्यमृतः '–हा मृत्युरहित ह्म० सकलसंसारधर्मशून्य आत्मा अंतर्यामी आहे.

जनकाच्या कांहीं प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावर जनकानें संतुष्ट होऊन याज्ञवल्क्याला हजार गाई देऊं केल्या तेव्हां त्यानें सांगितलें कीं शिष्याला पूर्ण ज्ञान देण्यापूर्वी त्याजपासून कांहीं घेऊं नये अशी माझ्या पित्याची आज्ञा आहे. आणखी कांहीं संवाद झाल्यावर याज्ञवल्क्यांनीं संतोषानें ' अभयं वै प्राप्तोऽसिजनक ' असें म्हटलें तेव्हां जनक ह्मणाला, 'तुम्हांला नमस्कार असो. हा विदेह देश आणि मी तुमचे ' दास आहोंत 'अस्त्विमे विदेहा अयमिहमस्मि. ' यानंतर याज्ञवल्क्यांनीं स्वप्नमीमांसा केली आहे. अद्वैताचें ज्ञान हाच ब्रह्मलोक होय–' अद्वैतो भवत्येष ब्रह्मलाकः ' ( बृहदारण्य ).

## ७ कठोपनिषत्–नचिकेत व यम यांचा संवाद.

सर्व उपनिषदांवर सविस्तर विवेचन करावयास येथें स्थल नाहीं व तो प्रसंगही नाहीं. तथापि उपनिषद्विद्येची ओळखण झाली म्हणजे आपणांस पुढें भगवद्गीतेच्या आवारांत पाऊल घालणें सुलभ होणार आहे, यास्तव एका उपनिषदाची तरी चांगली ओळख व्हावी व सर्व उपनिषदांचा मुख्य विषय एकच असल्यामुळें तो आपणांस सविस्तर कळावा यासाठीं कठ उर्फ काठक ह्या उपनिषदाचा विषय जरा विस्तृत रीतीनें येथें सांगण्याचें योजलें आहे. हेंच उपनिषद् घेण्याचीं दोन तीन कारणें आहेत. एक तर हें उपनिषद समजण्यास सुलभ आहे, दुसरें त्यांत आत्मविद्येशिवाय दुसरे अवांतर विषय नाहींत, तिसरें पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांनाही हें उपनिषद् फार आवडलेलें आहे. पण मुख्य कारण हें आहे कीं ह्या उपनिषदाचा भगवद्गीतेशीं निकट संबंध आहे. कठ, मुण्डक व श्वेताश्वतर ह्या तीन उपनिषदांतील विचारप्रवाहाशीं

... वाचनालय, ...



व विशेषतः कठाशीं भगद्गीतेचा संबंध अगदीं जवळचा आहे. कठांत यम आणि नचिकेत यांचा संवाद हा मुख्य भाग आहे व त्यांत आत्मविद्येचें सुलभ व मनोहर रूप विशदरीतीनें सांगितलें असून आत्मविद्येचा अधिकारी कोण व ह्या विद्येची फलश्रुति काय हेंही उत्कृष्ट प्रकारें सांगितलें आहे; तात्पर्य, साधनमार्ग दाखवून साध्याचें स्वरूप दाखविलें आहे ह्या उपनिषदांतील कित्येक श्लोक व श्लोकपाद गीतेनें जसेचे तसेच घेतले आहेत, यावरून गीतेलाही हें उपनिषद् विशेष प्रिय आहे असें उघड दिसतें. आत्म्याच्या अमरत्वाचें विवरण येथें फार चांगलें केलें आहे. ह्या उपनिषदाचे दोन अध्याय असून प्रत्येकांत तीन वल्ली आहेत. पुष्कळशा लोकप्रसिद्ध व लोकप्रिय श्रुति नेहमीं याच उपनिषदांतून घेतल्या जात असतात.

वाजश्रवा नांवाच्या ऋषीनें स्वर्ग मिळायची इच्छा मनीं धरून 'विश्वजित्' नांवाचा यज्ञ केला व जवळचें सर्व धन व गाई ऋत्विजांस दान करून टाकल्या. त्याला नचिकेत नामक एक लहान मुलगा होता. 'तं कुमारं श्रद्धा आविवेश'—त्या बालाच्या मनांत आस्तिक्यबुद्धीनें प्रवेश केला व त्यानें पित्यास विचारिलें: "ज्या गाईंना गवत खाऊं घातलें, पाणी पाजलें व ज्यांचें दूध काढून घेतलें, अशा ह्या निरिंद्रिय म्ह० गलितगात्र झालेल्या गाई दान देण्यापासून कोणतें पुण्य मिळणार ! 'कस्मै मां दास्यसि'—तुम्ही माझें दान कोणत्या ऋत्विजाला करणार ?" बापानें उत्तर केलें नाहीं. हाच प्रश्न त्यानें तीनवेळ बापास केला तेव्हां 'मृत्यवे त्वां ददामीति होवाच'—तुझें दान मी मृत्यूला करितों, तुला यमाच्या स्वाधीन करितों, असें बाप ( रागानेंच) बोलला ! 'यम मला घेऊन काय करणार' असें मनाशीं म्हणत नचिकेता बापास म्हणाला 'आपल्या पूर्वजांचें शील व सत्पुरुषांचें शील मनांत आणा व तृणाप्रमाणेंच मनुष्य जन्ममरणाला वश असतो हें न विसरतां आपलें वचन खरें करा म्ह० बोलल्याप्रमाणें मला यमाला देऊन टाका.' बापानें मुलाला यमाकडे जाण्याची अनुज्ञा दिली व मुलगा

यमधर्माकडे गेला. यमधर्म तेव्हां घरीं नव्हता म्हणून त्याला तीन उपास काढावे लागले. घरीं आल्यावर 'नमस्तेऽस्तु ब्रह्मन् स्वस्ति मेऽस्तु ' असें यम म्हणाला व त्यानें तीन वर मागून घेण्यास नचिकेत्यास सांगितलें. ' माझा बाप शांतसंकल्प, प्रसन्न व वीतकोप व्हावा ' असा पहिला वर त्यानें मागितला, यमानें तो दिला. स्वर्ग देणाऱ्या अग्नीची विद्या नचिकेत्यानें दुसऱ्या वरानें मागितली. स्वर्ग कोणता ?--

कसलेंच भय नाहीं, मृत्यु व जरा यांची भीति नाहीं, क्षुधातृषा नाहीं, सर्वकाळ आनंद–तो स्वर्ग.

' महात्मा ' म्ह० उदारमति यम यानें दुसरा वर दिला व मग नचिकेता यानें तिसऱ्या वरानें आत्मविद्या मागितली:–'मरणानंतर जीवाला अस्तित्व आहे कीं नाहीं, जीव नित्य का अनित्य ' तें सांग. **यम** झणाला:–आत्मविद्या फार कठिण आहे झणून तिचा नाद सोडून तूं दुसरें कांहीं माग.

**शतायुषः पुत्रपौत्रान्वृणीष्व बहून्पशून्हस्तिहिरण्यमश्वान् ।**
**भूमेर्महदायतनं वृणीष्व स्वयं च जीव शरदो यावदिच्छसि॥१–२३॥**

शतायु पुत्रपौत्र, गाई, हत्ती, घोडीं, सुवर्ण, पृथ्वीचें राज्य किंवा दीर्घायुष्य हें सर्व माग, तुला मी देतों; त्रैलोक्याची संपत्ति व अखंड आयुष्य देतों, तुझे सर्व मनोरथ पूर्ण करितों; ह्या स्वर्गीय अप्सरा, हे दिव्य रथ, गायनवादनाचीं सर्व उत्तमोत्तम साधनें देतों. यमधर्मानें नचिकेत्याला मोह पाडण्यासाठीं हें सर्व देऊं केलें पण ' मला हें कांहीं एक नको, मृत्यूला मरण आणणारी एक आत्मविद्या मला दे ' हें मागणें त्यानें शेवटपर्यंत सोडलें नाहीं.

**नचिकेता:**—" हे मर्त्यस्य अन्तक !–जीवांचा अंत करणाऱ्या यमा ! इंद्रियांचें तेज हरण करणाऱ्या या गोष्टी मला नकोत. हे सर्व भोग क्षणभंगुर आहेत व जीवित अल्प आहे. ' तवैव वाहास्तव-नृत्यगीते'–हत्ती घोडे व नृत्यगीतें तुझी तुलाच लखलाभ असोत ! मला

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

यांतलें कांहीं एक नको. 'मनुष्यः वित्तेन न तर्पणीयः'–मनुष्याला केवढीही संपत्ति मिळाली तरी त्याची कधीं तृप्ति व्हायची नाहीं! तुझें दर्शन झालें आहे. आतां आह्मांला तुझ्या कृपेनें मिळायची असेल ती संपत्ति मिळेल, तुझ्या सत्तेंत आहे तेवढें दीर्घ आयुष्यही मिळेल, पण मी हें कांहीं मागत नाहीं. 'वरस्तु मे वरणीयः स एव'–मी वर मागितला आहे तो( आत्मविद्येचा )च मला पाहिजे आहे. अक्षय्य सुख देणारें अमृतत्व जवळ असतांना विषयविलास, गीतनृत्य इ० विनाशी विषयभोगांचें ध्यान करीत दीर्घकाल जिवंत राहण्याची इच्छा कोणता विवेकी मनुष्य करील बरें? नचिकेत्याचा हा निर्धार पाहून यमधर्म सुखावला.

**यमः**—मार्ग दोन आहेत. ज्यांत परमकल्याण आहे असा एक श्रेयोमार्ग, व विषयसुखाच्या लालचीनें जन्ममरणाच्या चक्रांत सतत फिरवणारा दुसरा प्रेयोमार्ग. श्रेयोमार्गानें जाणाराचें कल्याण होतें. **श्रेयः** व **प्रेयः** ह्म० मोक्षसुख व विषयसुख ( निःश्रेयस व अभ्युदय, निवृत्ति व प्रवृत्ति, परमार्थ व प्रपंच). शाहणा मनुष्य (धीरः) दोहोंचें तारतम्य पाहतो व श्रेयोमार्गाला लागतो व 'मन्दः योगक्षेमात् प्रेयः वृणीते'–योगक्षेम चालावा, चार पैसे मिळावेत,विषयानंद भोगावा, यासाठीं मंद पुरुष प्रेयोमार्गाला लागतो. अविद्येच्या अंतरंगांत राहणारे व स्वतःस शाहणे समजणारे–'धीराः पण्डितंमन्यमानाः'-आंधळयाच्या माळकेप्रमाणें 'अन्धेनैव नीयमाना यथांधाः'–विषयांच्या मागें हिंडत असतात, धनादिलोभानें उन्मत्त झाल्यामुळें त्यांना ह्या लोकाच्या पलीकडे कांहीं दिसतच नाहीं, भविष्यकालाचें भान न राहून ते मृत्यूच्या स्वाधीन होत असतात. यमानें हे दोन मार्ग नचिकेतास सांगितले व 'तूं भोगविषयांचा त्याग करणारा पुरुष धन्य आहेस व आत्मविद्या ग्रहण करण्यास अधिकारी आहेस' असें म्हणून त्यानें त्यास आत्मविद्या दिली.

**यमः**—'ही आत्मविद्या लक्षावधि लोकांना ऐकायलाही मिळत नाहीं, व ज्यांना ऐकायला मिळते त्यांनाही ती प्राप्त होणें मोठें

दुर्घट आहे. ह्या विद्येचा वक्ता दुर्मिळ, सूक्ष्मबुद्धीचा श्रोता दुर्मिळ व कुशल गुरूच्या उपदेशानें आत्मज्ञान झालेला पुरुष म्हणजे एक महदाश्चर्यच होय–'आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः' हा विषय सूक्ष्म व अतर्क्य आहे. 'नैषा तर्केण मतिरापनेया'–आत्मबुद्धि ही तर्कानें प्राप्त होत नाहीं, पण वेदरहस्य जाणणाऱ्या आचार्यांच्या मुखानें श्रवण झालें तर मात्र उत्पन्न होते. 'न हि अध्रुवैः प्राप्यते ध्रुवम्'–अनित्य साधनांनीं नित्याची प्राप्ति होत नसते. आत्मा नित्य आहे:–

**तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गव्हरेष्ठं पुराणम् ।**
**अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति॥२–१२**

आत्मा हा सूक्ष्म असल्यामुळें गूढ, नामरूपादि विकारांनीं आवृत (अनुप्रविष्ट), गुहा म्ह. बुद्धि तिच्या ठिकाणीं स्थित, गव्हर म्ह० जेथें जाण्यास संकटें फार अशा दुर्घट ठिकाणीं वसलेला, असा असल्यामुळें पाहण्यास अति कठिण असा आहे, तात्पर्य आत्मदर्शन सुलभ नाहीं; तथापि अध्यात्मयोगानें आत्मदेवाला जाणून विवेकी पुरुष हर्षशोकापासून मुक्त होतात. आत्मस्वरूप हें नामरूपांनीं व इंद्रियज्ञानानें झांकलें आहे म्हणून विषयांपासून इंद्रियें व मन आवरून त्यांना आत्मस्वरूपीं स्थिर करणें याला अध्यात्मयोग म्हणतात. आत्मतत्व आनंदरूप असल्यामुळें हा आनंदमय होतो–'स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा!' सर्व वेद ज्याचे प्रतिपादन करितात, सर्व तपें ज्याच्या प्राप्तीचीं साधनें आहेत व ज्यासाठीं ब्रह्मजिज्ञासु ब्रह्मचर्यव्रत धारण करितात–'यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति–' त्या पदाचें संक्षिप्त वर्णन ॐ हें आहे. हें एकाक्षर ब्रह्म आहे. ही ॐची (प्रणवाची) उपासना अत्यंत श्रेष्ठ व सर्वोत्तम आहे. ॐ हें ज्या निर्गुणब्रह्माचें वाचक, प्रतीक व सगुणरूप आहे तें निर्गुण ब्रह्म कसें आहे? ऐकः–तें 'न जायते म्रियते वा विपश्चित्'–जन्ममरणादि सर्व विकारांपासून तें अलिप्त आहे, स्वयंभु आहे, कार्यकारणसंबंधातीत आहे, आणखीः—

**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२–१८॥**

हा आत्मा कोणाला मारीत नाहीं व मरत नाहीं. तो 'अणोरणीयान् महतो महीयान्'–सूक्ष्माहून अत्यंत सूक्ष्म व मोठ्याहून फार मोठा आहे. अंतर्मुख होणाऱ्या विरागी पुरुषासच त्याचा प्रत्यय येतो व ज्याला प्रत्यय होतो तो हर्षशोकादि द्वंद्वांपासून मुक्त होतो ह्म० निर्द्वंद्व होतो. आत्मा शरीरांत असून अशरीरी व अनित्य उपाधींत असून नित्य, विभु, व महान् आहे:—

**अशरीरꣳ शरीरेषु अनवस्थेष्ववस्थितम् ।**
**महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥ २-२२ ॥**

हें आत्मज्ञान होणें कठिण असलें तरी अशक्य मात्र नाहीं.

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।**

हें आत्मरूप अनेक वेदांचें श्रवण केलें, मेधा ह्म० धारणशक्ति चांगली असली किंवा वेदाचें अध्ययन पुष्कळसें केलें म्हणजे प्राप्त होतें असें नाहीं, तर आत्म्याचाच अनुग्रह झाला पाहिजे. आत्मराजाची प्रसन्नता पाहिजे, परमात्मा वोळला पाहिजे, तरच त्याचा साक्षात्कार होतो. आत्मप्राप्तीची इच्छा, गुरूचा अनुग्रह, आत्मानुसंधान, परमेश्वराचा प्रसाद या मार्गानेंच आत्मज्ञान होतें, केवळ शास्त्राध्ययनानें व बुद्धीनें भागत नाहीं. दुश्चरितापासून परतला नाहीं, इंद्रियाचा उपशम व चित्ताची एकाग्रता झाली नाहीं, तोंवर ब्रह्मप्राप्ती व्हावयाची नाहीं.

'परं ब्रह्म' ह्म० परब्रह्म हें 'पारं तितीर्षतां' ह्य० संसारसागर तरून जाणाऱ्यांना 'अभय' देणारें आहे. अर्थात् ब्रह्मप्राप्तीनें मनुष्य संसारांतून तरून जाऊन निर्भयपद पावतो.

**आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।**
**बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥ ३–३ ॥**
**इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।**
**आत्मेंद्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥ ३–४ ॥**

शरीर हा एक रथ आहे व कर्मफलभोक्ता आत्मा ( जीव ) त्या रथाचा स्वामी आहे. नेत्रादि इंद्रियें हे त्या रथाला जोडलेले ह्म० रथाला शब्दादिविषयांच्या मार्गांतून ओढून नेणारे घोडे आहेत. निश्चयरूप बुद्धि हा सारथि आहे, संकल्पविकल्प करणारें मन ही सारथ्याच्या हातांतली दोरी आहे. शरीर इंद्रिय व मन यांनीं युक्त असणारा आत्मा ( जीव ) भोक्ता ( संसारी ) आहे. तात्पर्य, आत्मा हा बुद्ध्यादि उपाधींनीं संयुक्त असला म्हणजे त्याला भोक्ता म्हणतात. शुद्ध आत्म्याला भोक्तृत्व नाहीं, अर्थात् कर्तृत्वही नाहीं, हें केवल उपाधींनीं निर्माण केलें आहे. मन अयुक्त ह्म० चंचल असलें तर इंद्रियें खोडकरपणानें उधळतात, पण तेंच मन युक्त( स्थिर ) व स्वाधीन असलें तर तींच इंद्रियरूप घोडीं वश असतात. सारथी कुशल व मनाचा लगाम हातांत चार्तुयानें वागविणारा पाहिजे म्हणजे इंद्रियें स्वैर उधळत नाहींत ! जो जीव अविवेकी व अत्यंत चंचल असतो ( मनबुद्धि ज्याच्या स्वाधीन नाहींत ) व ह्मणून जो अशुचि ( मलिन ) आचारविचारांचा असतो तो संसाराच्या चक्रांत फिरत राहतो, पण ज्याचा सारथि विवेक आहे ह्म० ज्याची बुद्धि विवेकसंपन्न असून जो मनाला वश ठेवतो तो ( विवेकी पुरुष ) संसार तरून जातो—

**सोऽध्वनः पार–माप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ॥ ३–९ ॥**

तो भवमार्गाच्या ( भवसागराच्या ) पार उतरून जातो व हेंच विष्णूचें परमस्थान ह्म० ( वैकुंठ ) होय, मोक्ष हाच ! विषय निवृत्त होऊन जो आत्मनिष्ठ झाला त्यालाच विष्णुपदाचा लाभ होतो इंद्रियें, पदार्थ, मन, बुद्धि, महत्, अव्यक्त व त्याच्या पलीकडचा पुरुष हे सूक्ष्मत्वाच्या, श्रेष्ठत्वाच्या व नियामकत्वाच्या दृष्टीनें अधिकाधिक श्रेष्ठ होत व

**पुरुषान्नपरं किंचित् सा काष्ठा सा परा गतिः ॥ ३–११ ॥**

महत् म्ह० हिरण्यगर्भ. सर्व ज्ञानाज्ञानांचा व कर्मांचा उगम या हिरण्यगर्भापासून आहे. महत्च्या पलीकडे अव्यक्त आहे. अव्यक्तालाच

अव्याकृत, आकाश, मूळमाया, इ० नांवें आहेत. अव्यक्त हें विश्वाचें बीज आहे. त्याच्याही पलीकडे पुरुष आहे. हा पुरुष ज्ञानैकरूप, एकरस व घनदाट भरलेला आहे. त्याच्यापलीकडे कांहीं नाहीं. तो शेवट, तेथें येणें जाणें नाहीं, सर्व स्थितिगतींची परिसमाप्ति तीः—

**एष सर्वेषु भूतेषु गूढोऽऽत्मा न प्रकाशते ।**
**दृश्यते त्वग्रया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ॥ ३–१२ ॥**

हें सर्व जाणून कार्याचा लय कारणांत करीत जाणें हा आत्मप्राप्तीचा उपाय आहे; म्हणून वाणीचा लय मनांत, मनाचा लय प्रकाशरूप बुद्धींत, बुद्धीचा लय महतांत व महताचा लय शांतिस्वरूप परमात्म्यांत करावा. तात्पर्य

**उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ।...॥ १४ ॥**

उठा, जागे व्हा, गुरूला शरण जाऊन त्यापासून ज्ञान संपादन करा. हा आत्मा 'अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं'–शब्दादि पंचविषयांच्या पलीकडे आहे. हा अव्यय आहे, नित्य आहे, अनाद्यनन्त आहे, 'महतः परं' ह्म० हिरण्यगर्भाच्या पलीकडे आहे व ध्रुव आहे. त्या आत्मस्वरूपाचा निश्चय करून जो तन्निष्ठ होतो तो 'मृत्युमुखात् प्रमुच्यते' –जन्ममरणाख्य संसारापासून मुक्त होतो.

'पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः'–परमेश्वरानें नेत्रादि इंद्रियें बाहेर जाणारीं ह्म० बहिर्मुख केलीं आहेत, म्हणून तीं आंत मुरडून 'अन्तरात्मन् न पश्यति'–अंतरात्म्याला पाहत नाहींत तथापि अमृतत्वाची ( मोक्षाची ) इच्छा करणारा पुरुष इंद्रियें स्तब्ध करून प्रत्यगात्म्याचें दर्शन घेऊन मुक्त होतो. प्रत्यगात्मा ह्म० मागें फिरलेला, आंत असणारा अंतरात्मा, सर्वांतर्यामि. इंद्रियांचा बहिर्मुख प्रवाह स्तब्ध करून आंत पाहणें–उलट उगमाकडे पोहत जाणें हें विवेकी पुरुषच करूं जाणतात. '**बालाः**' प्राकृत लोक विषयवासनांच्या मागें लागून मृत्युमुखांत पडतात, '**धीराः**-सुज्ञ लोक मात्र अनित्यांतील नित्यवस्तूचा

अंगीकार करून अमृतत्वाचा आनंद भोगतात. स्वप्नजागृति या अवस्थांचा शेवट ज्यानें समजतो, पंचविषयांचें सुख ज्याच्या साह्यानें भोगतां येतें, कर्मफलाचा भोक्ता जीव हाच वस्तुतः ब्रह्मरूप आहे हें ज्याच्या दर्शनानें कळतें, तो महान् आत्मा—परमात्मा मीच आहे असें जाणून शाहणा मनुष्य तरून जातो. 'मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति,' ह्मणून 'नेह नानास्ति किंचन'—एका ब्रह्मावांचून अणुभरही दुसरें कांहीं नाहीं, हें जाणून सुखी हो. हें पुर ह्म० शरीर एकादशद्वार आहे, याला अकरा दरवाजे आहेत, पण पुरस्वामीचें ध्यान केलें असतां नर शोकमुक्त होतो-'अनुष्ठाय न शोचति!' प्राणापानादि वायूंच्यायोगें आपण जगतों असें अज्ञ समजतात, पण प्राणापानादि ज्याच्या आश्रयानें असतात त्याला जाणलें पाहिजे. 'गुह्यं ब्रह्म सनातनम्—एतद्वै तत्'—जीवच सनातनब्रह्म आहे पण हें समजून घेतलें पाहिजे. अज्ञ जीव 'यथाकर्म यथाश्रुत' (त्यांचें कर्म व ज्ञान असेल त्याप्रमाणें) नाना योनि फिरत राहतात, पण सर्व कांहीं एक परमात्मा आहे व मी ह्म० जीव त्याहून अभिन्न आहे हें ओळखून ज्ञाता मुक्त होतो.

एखादें घर अग्निसात् झालें म्हणजे एकच अग्नि नाना दग्धपदार्थी-प्रमाणें भासतो पण एकच असतो, तसीं नानारूपें घेणारा अंतरात्मा एकच आहे. पदार्थ व जीव भिन्न भासले तरी भिन्न नाहींत, एका आत्म्याचींच सर्व रूपें आहेत. पहा ( २-१२ व १३ ):—

**एको वशी सर्वभूतांतरात्मा एकं रूपं बहुधा यः करोति ।**
**तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां सुखं 'शाश्वतं' नेतरेषाम्**
**नित्योऽनित्यानां चेतनश्चेतनानां एको बहूनां यो विदधाति कामान् ।**
**तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां शांतिः शाश्वती नेतरेषाम् ॥**

परमेश्वर एकमेवाद्वितीय आहे, तो वशी आहे ह्म० सर्व जगत् त्याच्या तंत्रानें चालतें अर्थात् तो विश्वनियंता आहे, तो सर्वांच्या अंतर्यामी आहे. तो एक व एकरस असून आपणच आपल्या अतर्क्य

शक्तीनें अनंतरूपें घेऊन नटला आहे. त्याला जे आपल्या हृदयांत पाहतात ( अनुपश्यन्ति ह्म० गुरूपदिष्टमार्गानें स्वतःच्या ठिकाणीं साक्षात् अनुभवतात. ) त्या तद्रूप झालेल्या विवेकी पुरुषांनाच नित्य-सुख मिळतें. हा ब्रह्मदेवापासून जीवजंतुपर्यंतच्या सर्व प्राण्यांचें चैतन्य आहे, यापासून त्यांना चैतन्य प्राप्त होतें, हा एक असून सर्वज्ञ व सर्वेश्वर असल्यामुळें सर्व संसारी जीवांना त्यांच्या कर्मानुरूप फल देणारा आहे, त्याला जे आपल्या ठिकाणीं अनुभवितात त्यांना अखंड शांति मिळते. अशा आत्मनिष्ठ पुरुषांना मिळणारें सुख अनिर्देश्य—न सांगतां येण्या-सारखें आहे. प्राकृत लोकांच्या वाणीला व मनाला तें गोचर होणारें नाहीं. हा परमात्मा स्वयं आनंदघन व प्रकाशमय आहे. 'न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं'—सूर्यचंद्रादिक त्याच्या प्रकाशानें प्रकाशित होणारे असून त्याला प्रकाशित करूं शकत नाहींत. 'तस्य भासा सर्वमिदं विभाति'—त्याच्या भयानें अग्नि, सूर्य, इंद्र, वायु, मृत्यु, आपा-पलीं कामें करीत असतात. 'यं ज्ञात्वा मुच्यते जन्तुरमृतत्वं च गच्छति.' मनुष्य डोळयांनीं ह्या परम पुरुषाचें रूप पाहूं शकत नाहीं तथापि 'हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तः'—मनावर स्वामित्व चालविणाऱ्या शुद्धबुद्धीनें त्याचें चिंतन केलें असतां स्वयंप्रकाश आत्मा प्रगट होतो. येथें 'मनसा' म्ह. 'मननरूपेन सम्यग्दर्शनेन' व 'अभिक्लृप्तः' म्ह. 'प्रकाशितः' असा अर्थ आहे. चंचल मनालाही बुद्धि अंतर्मुख करून आत्मरूपाचें मनन करावयास लावते. बुद्धि आत्मरूपीं स्थित झाली कीं हीच 'परमागति' होय—'तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिंद्रियधारणाम्.' बाह्य विषय व तद्विषयक वासना निवृत्त झाल्या म्हणजे ब्रह्मपदप्राप्ति होणें सुघट होतें.

**यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि स्थिताः।**
**अथ मर्त्योऽमृतो भवति अत्र ब्रह्म समश्नुते ॥ ३–१४ ॥**

अत्र-इहैव, येथल्या येथें, 'याचि जन्मीं येणेंचि काळें.'

## ८ सृष्टयुत्पत्तीची काहणी !

सकल ब्रह्मरूप आहे व सृष्टि झालीच नाहीं, एकीं एक परब्रह्म विश्वरूपानें नटलें आहे, हा उपनिषदांचा मुख्य सिद्धांत आहे. पण हा ज्या भूमिकेवरून केला आहे त्या भूमिकेवर आरूढ झाल्याशिवाय म्हणजे त्याचा अनुभव आल्याशिवाय हा पटणें कठिण आहे; म्हणून श्रुतीनें ह्या सिद्धांताला बाध न येईल अशा तऱ्हेनें सृष्ट्युत्पत्तीची काहाणी सांगितली आहे ! प्रजापतीला सृष्टि व्हावी, आपण बहु व्हावें, अशी इच्छा झाली व हें कर्म नीट व्हावें म्हणून त्यानें तप करून सामर्थ्य संपादन केलें. 'प्रजाकामो वै प्रजापतिः । स तपो तप्यत ' (प्र.१–३–१३). 'यथोर्णनाभिः सृजते गृण्हतेच ' ( मुं० )–कोळी जसा स्वतःच्या देहांतून तंतु काढते व शेवटीं त्याला ग्रासून एकटीच राहते त्याप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तीला निमित्तकारण व उपादानकारण ब्रह्मच आहे. सृष्टी कशापासून केव्हां झाली या विषयींचीं भिन्नभिन्न मतें श्रुतीनें सांगितलीं आहेत. ' आप एव इदमग्र आसुः'–आधी केवळ पाणीच होतें; आपापासून सत्य झालें, सत्यापासून ब्रह्म, ब्रह्मापासून प्रजापति, व प्रजापतीपासून देव झाले व ते देव सत्याची उपासना करूं लागले ( बृ. ५–५–१). आधीं सत् होतें कां आधीं असत् होतें म्हणजे सत्पासून सृष्टि झाली कां असत्पासून झाली ह्या दोन्ही मतांचा श्रुतींत उल्लेख आहे. ' असत् वा इदमग्र आसीत् । ततो वै सदजायत ' (तै. २–७); ' सदेव सौम्येदमग्र आसीत् ' सत् हेंच प्रथम होतें, असतापासून सत् होणें शक्य नाहीं–कथमसतः सज्जायेत-भूतांचा पति हिरण्यगर्भ, त्यापासून ह्म० आत्म्यापासून सृष्टि झाली ' हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ' ( ऋ १०–१२१–१ ) हें वेदवचन सृष्ट्युत्पत्तिसंबंधी सर्वसंमत आहे. सत् ' एकमेवाद्वितीयम् ' असें आहे. ' तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति'–त्यानें मग प्रथम तेज उत्पन्न केलें, तेजापासून आप, आपापासून पृथ्वी, तेथून अन्नापर्यंत ( छां ६-२-१ ते ४ ) प्रधानदेवता कोणत्या आहेत व त्यांत वडील कोणती ह्या प्रश्नास 'आकाशो ह वा एष देवो वायुरग्निरापः

पृथिवी वाङ् मनश्चक्षुः श्रोत्रं'च हें उत्तर मिळालें आहे (प्र-११ १ते ४). उपनिषदांचा सृष्ट्युत्पत्तिविषयक एक निश्चित सिद्धांत कोणता कीं जो पुढील तत्ववेत्त्यांनीं व साधुसंतांनीं ग्रहण केला आहे ? 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ' नेह नानास्ति किंचन ' कांहीं झालेंच नाहीं, आहे हें सकल ब्रह्मरूप आहे, हा श्रुतीचा मुख्य सिद्धांत आहे; तथापि हा सिद्धांत पचला नाहीं तोंवर बरें तर जगत् झालें आहे व तें या क्रमानें झालें आहे असें सांगून श्रुतीनें सर्वांचें पर्यवसान आपल्या मुख्य सिद्धांतावर म्ह० अद्वैतावरच केलें आहे. ' आत्मैवेदमग्र आसीत् पुरुषविधः । सोहमस्मीति अग्रे व्याहरत् । ततो अहं नामाभवत् '–पुरुषविध आत्मा हाच प्रथम होता. ' अहमास्मि' असें तो म्हणाला. त्याबरोबर 'अहम्' झाला. दोनपणाचा भास होतांच भय आलें 'तस्मादेकाकी बिभेति। स वै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत्' तो आपणच दोन झाला– 'पतिश्च पत्नी चाभवताम्'– याप्रमाणें मुंगीपर्यंत सर्वच मिथुनीभूत झालें ( बृ० १-४-१ ते ४ ). हेंच ऐतरेयोपनिषदांत जरा सविस्तर सांगितलें आहे. तेथें ही 'नान्यत्किंचन' असें म्हटलें आहे. 'स ईक्षत लोकान्नु सृजा इति. ' आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्' लोकांना उत्पन्न करावे असें त्यानें आलोचन केलें मग त्यानें कश्यपादि सप्तर्षि व चार मनु उत्पन्न केले व तेथून प्राणिजात जाले ( ऐत. १–१ ते ३ ).

**' दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यंतरो ह्यजः '** ( मुं० )
असा हा आदिपुरुष अप्राण, अमन, शुभ्र, अक्षरापलीकडचा आहे.

**' एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेंद्रियाणिच ।**
**खंवायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्यधारिणी ।**
**तस्माच्च देवा बहुधा संप्रसूताः साध्यामनुष्याः पशवो वयांसि।**
**अतःसमुद्राः गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यन्दन्ते सिंधवः सर्वरूपाः ।**
**अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैषभूतैस्तिष्ठते ह्यंतरात्मा '**
( मुं. २–१–२ ते ९. )

१ गीतेंतील अ० १० श्लोक ६ व त्यावरील ज्ञानेश्वरी टीका पहा.

ह्या श्रुतीचा भावार्थ जशाचा तसाच भागवतानें ( स्कं. ११–२–४१) पुढील सुंदर व लोकप्रसिद्ध श्लोकानें सांगितला आहेः—

खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वादि दिशो द्रुमादीन् ।
सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ॥

वरील श्रुतीचा व भागवतीश्लोकाचा भावार्थ एकनाथांच्या मुखानें आपण ऐकूः—

पृथ्वीआप तेज वायु नभ । देखे हरिरूप स्वयंभ ।
भूतें महाभूतांचें डिंभ ( प्रतिभास, लेंकरूं ) ।
न देखे भिन्नकोंभ अभिन्नत्वें ॥ ५८१ ॥
जेवीं कांतोनियां रंध्रसळें । स्फटिकदीपगृह अंगमेळें ।
चितारिलीं अश्वगजदळें । तीं भासती सोज्ज्वळें आंतुलेनि दीपें ५८३
तेवीं सोमसूर्यादि तेजशक्ति । कां वन्हिनक्षत्रें जे लखलखिती ।
जननयनादि निजदीप्ती । देखे आत्मज्योती सतेज ॥ ५८४ ॥
पूर्वपश्चिमादि योग । दशदिशांचे दिग्विभाग ।
तेही देवाचेचि अंग । तद्रूप श्रीरंग स्वयें भासे ॥ ५८९ ॥
तृण दूर्वा दर्भ द्रुम । देखोनि म्हणे हे हरीचे रोम ।
अनोळखां हें अतिविषम । निजांगीं सर्व सम हरिरूप पाहतां ॥५९०॥
जेवीं वटाच्या पारंबिया । लोंबोनि पडती वेगळालिया ।
त्याही वटरूपें संचलिया । वटत्वा मुकलिया म्हणों नये ॥ ५९४ ॥
तेवीं चैतन्यापासोनि वोघ । निघाले सरितारूप अनेग ।
तेही चैतन्यघन चांग । चिद्रूपें सांग सदा वाहती ॥ ५९५ ॥
ऐसे वेगवेगळे भाग । पाहतां उल्हासे जंवजंव चांग ।
तंव तंव अवघें उघडें जग । देवोचि सांग स्वयें जाला ॥ ५९८ ॥
गो खर चांडाळ श्वान । अतिनिंद्य जे हीन जन ।
ते भगवद्रूप देखोनि पूर्ण । घाली लोटांगण अनन्यभावें ॥ ६०० ॥
हरिरूपें देखे पाषाण । भगवद्रूपें वंदी तृण ।
जंगमस्थावरादिकां शरण। घाली लोटांगण चिदैक्यभावें॥ (एक.भा.२)

येथें वेदमंत्र, भागवत व मराठी संत यांची एकवाक्यता पाहण्यासारखी आहे. तैत्तिरीयोपनिषदांत 'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः' ( तै० २-१ ) असा क्रम दिला असला तरी आकाशापासून पुढें सर्व भूतें संभूत आहेत म्ह० उत्पन्न झालीं आहेत, अर्थात् त्यांना लय आहे किंवा तीं भासमात्र आहेत, आत्मा मात्र संभूत नाहीं, तो या सर्वांना उत्पन्न करणारा, व्यापणारा आहे तस्मात् तोच एक सत्य आहे.

## ९ नीतीचा व साधनमार्गाचा उपदेश.

आमच्या धर्माच्या अंगभूत नीति असल्यामुळें नीतिशास्त्र पृथक्त्वानें सांगितलें जात नाहीं. धर्मोपदेशाच्या अनुषंगानें नीतिबोध केला जातो. सदाचार हा धर्माचा पाया आहे, सदाचारावांचून धर्माचरण होत नाहीं. सदाचार हें शरीर व धर्म प्राण आहे म्हणून प्रसंगानें धर्मव्याख्यान करीत असतांना नीतिबोध केला जातो. उपनिषदांत सत्य, अहिंसा, गुरुसेवा, तप, ब्रह्मचर्य, परोपकार, याविषयीं जागोजाग उपदेश आलेला आहे. उपनीत शिष्याला वेदाध्ययनानंतर गुरु जें अनुशासन करितात तें असें आहे:—

( १ ) "**सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्यस्य प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् ॥**

"**मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि । नो इतराणि ॥**

"**अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् तथा तत्र वर्तेथाः ॥**"(तैत्तिरीय अ० १)

सत्य बोल; धर्मानें वाग; स्वाध्याय विसरूं नकोस; आचार्याला प्रिय असें धन, गाय, सुवर्ण वगैरे देऊन त्याचा संतोष जोड व नंतर विवाह कर; पुत्रपौत्रादि प्रजेच्या विस्ताराचा उच्छेद करूं नकोस; सत्य व धर्म यापासून च्युत होऊं नकोस; कुशल म्ह० वैदिक व लौकिक अशा द्विविध कल्याणप्रद आचरणापासून ढळूं नकोस; ऐश्वर्य संपादनाकडे दुर्लक्ष करूं नकोस ( कारण ऐश्वर्याच्या प्राप्तीनेंच मुक्तीला कारण होणाऱ्या कर्माचें यथाविधि आचरण करितां येतें ); देवकार्य व श्राद्धादि पितृकार्य यापासून ढळूं नकोस; माता, पिता, आचार्य, व अतिथि यांना देवरूप मानून त्यांचा पूजासत्कारादिकांनीं संतोष ठेव; अनिंद्य कर्माचें सेवन कर व निंद्य कर्माचा त्याग कर; कर्माविषयीं किंवा आचरणाविषयीं कांहीं संशय आला तर तूं ज्या देशांत, ज्या कुळांत व ज्या काळांत असशील तेथील श्रेष्ठ पुरुष वागतात तसेंच वागत जा. संमर्शी म्ह० विवेकी, रागद्वेषौत्सुक्यादि दोषरहित होऊन शास्त्रार्थाचा योग्य निर्णय करणारे; युक्त म्ह० नित्यनैमित्तिक धर्मकर्मे करणारे; आयुक्त म्ह० त्यांतच गढून गेलेले; अलूक्ष म्ह० क्रोध, आग्रह इ० विकारांपासून सुटलेले; सत्कारलाभांची इच्छा न करितां केवल धर्माचीच इच्छा करणारे धर्मकाम.

( २ ) गुरुशिवाय गति नाहीं हा उपनिषदांचा सिद्धांत आहे. ब्रम्हविद्या ही आचार्यापासूनच प्राप्त होते ( बृ. ४–९–३ ), 'तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेत् भूतिकामः' ( मुंडक ), 'आचार्यवान् पुरुषो वेद ( छांदोग्य ) इ. श्रुति प्रसिद्ध आहेत. आत्मलाभ होण्यासाठीं गुरूला शरण गेलें पाहिजे. 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' ( मुं. १–२–२२ ). कर्मचित लोक नाशिवंत आहेत हें जाणून सत्यलोकादिकांची इच्छा न करितां वैराग्यसंपन्न होऊन साधकानें आत्मज्ञानासाठीं हातीं समिधा घेऊन श्रुतिसंपन्न व ब्रह्मनिष्ठ अशा गुरूला शरण जावें म्हणजे त्या प्रशांतचित्त व शमान्वित पुरुषाला गुरु ब्रह्मविद्येचा उपदेश करितात. गुरुविषयीं देवबुद्धि ठेवावी म्हणजे विद्या सफल होते:—

ज्ञान वाचनालय, सातारा.



यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ[१] ।
तस्यैते कथिता ह्यर्था प्रकाशन्ते महात्मनः ॥ ( श्वे० ६–२३ )

गुरूपदेशाच्या अनुष्ठानानें शिष्याला ब्रह्मबोध होतो. गुरु वेदवेत्ता व आत्मज्ञानांत मुरलेला आणि शिष्य विरक्त, शांतचित्त व गुरुभक्त असा योग घडून येतो तेव्हांच शिष्याला गुरूपासून ब्रह्मविद्येचा लाभ होतो.

( ३ ) ब्रह्मविद्येचा लाभ ज्याला पाहिजे त्यानें आपलें आचरण अत्यंत शुद्ध ठेवलें पाहिजे. तपावांचून लाभ नाहीं. ' सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ' सत्य, तप, सम्यग्ज्ञान, ब्रह्मचर्य या योगानेंच ' अंतःशरीरे ज्योतिर्मय ' अशा आत्म्याला ' यं पश्यान्ति यतयः क्षीणदोषाः ' निष्पाप झालेले पुरुष पाहूं शकतात ( मुं. ३–१–५ ). गुरूला जी दक्षिणा पाहिजे असते ती मुख्यतः कोणती हें छांदोग्यांत फार चांगलें सांगितलें आहे. शिष्याच्या अंगचे गुण व त्याचा सदाचार पाहूनच गुरु प्रसन्न होऊन त्याला कृतार्थ करितातः ' अथ यत्तपो दानमार्जव-महिंसासत्यवचनमिति ता अस्य दक्षिणा ' ( छां. ३–१७–४ )

**' तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा वेदाः सर्वांगाणि सत्यमायतनम् '**
( के. ४–८ )

ह्म० तप, दम, कर्म, वेद व वेदांगें हीं ह्या ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा असून सत्य हें तिचें निवासस्थान आहे. श्वेताश्वतरानें ' तपःप्रभावात् देवप्रभावात् च ' तपाच्या आणि देवाच्या प्रभावानें मला ब्रह्मज्ञान प्राप्त झालें ( श्वे. ६–२१ ) असें ह्मटलें आहे.

---

१ जीवपरमात्मैक्यदर्शक श्रुतिवचनांवरून आत्मा नित्य प्रकाशमान असला तरी गुरुदयाविहीन जीवांना त्याचा अपरोक्षसाक्षात्कार अशक्य आहे असें श्रीशंकराचार्य ह्मणतातः ' ऐक्यपरैः श्रुतिवाक्यैरात्मा शश्वत्प्रकाशमानोऽपि । दैशिकदयाविहीनैरपरोक्षयितुं न शक्यते पुरुषैः' ॥

( ४ ) आत्मप्राप्तीची तळमळ ही मुख्यतः पाहिजे आहे. ती ज्याला आहे त्यालाच ब्रह्मविद्या प्राप्त होते.

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुधाश्रुतेन ।**

केवल प्रवचन, धारणा, वेदाध्ययन इ० साधनानीं आत्मप्राप्ति होत नसून आत्मप्राप्तीची तीव्र इच्छा किंवा तळमळ ज्याला लागली आहे त्याचा देव आपण होऊन अंगीकार करितो. जे 'वेदांतविज्ञानसुनिश्चितार्थ' आहेत ह्म० वेदांताच्या ज्ञानानें अनुभवीं ज्यांची बैठक स्थिर झाली आहे त्यांनाच आत्मलाभ होतो ( क. १-२ )

## १० ब्रह्मविद्येचा आनंद

ज्ञानाचें सर्वस्व, वेदाचें अंतिम, उपनिषदांचें सार, अशी ही ब्रह्मविद्या जगाला देऊन उपनिषदांनीं मनुष्यजातीवर अपरिमित उपकार केले आहेत. यालाच वेदांत असें म्हणतात. वेदांतानें लोक रडके, बावळे व पराक्रमशून्य केले आहेत अशी या शास्त्रावर अलीकडे कोणी कोणी टीका करितात, ती अज्ञानास्तव होय; कदाचित् वेदांत न पचविलेले व तोंडांनीं वेदांत बोलणारे बरेच लोक सांपडतात म्हणूनही कोणाची अशी समजूत झाली असेल! उपनिषद्विद्या सर्वविद्यांना भारी आहे. ती अत्यंत तेजस्वी आणि आनंददायक आहे. तेथें 'सर्वसुखाचें आगर' भेटतें, किंबहुना सुखाशिवाय तेथें कांहींच नाहीं. छांदोग्योपनिषदांत नारद आणि सनत्कुमार यांच्या संवादांत हेंच सांगितलें आहे. मनुष्याची ज्यावर श्रद्धा असते तें कर्म तो करितो. श्रद्धेनें विचार होतो, विचारानें ज्ञान होतें, ज्ञान झाल्यानें मनुष्य सत्यनिष्ठ होतो. ज्याला ज्ञान होतें तो सत्य बोलतो, सत्य वागतो, त्याच्या सर्व क्रियांत सत्य असतें, व सत्यापासून सुखलब्धि होते. सुख, क्रिया, निष्ठा, विश्वास, सत्य हें सारें आत्मसुखाचेच पर्याय आहेत. परब्रह्माला येथें 'भूमन्' म्हटलें आहे. सर्वत्र परमात्मभाव उदित झाला कीं ह्या व्यापक व शाश्वत सुखाचा लाभ होतो. अल्पांत सुख नाहीं, निरतिशयत्व हेंच सुख आहे.

... वाचनालय, सातारा,



**‘ यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति ।**

**भूमैव सुखम् । भूमात्वेव विजिज्ञासितव्यः ॥ ’**

निरतिशय सुख तेंच कीं जेथें त्याशिवाय दुसरें कांहींच नसतें.

**यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा ।**

याच्या उलट—‘ यत्रान्यत्पश्यति अन्यत् शृणोति अन्यद्विजानाति तदल्पम् ’ ! ‘ यो वै भूमा तदमृतम् ’—भूमन् मृत्युरहित म्हणजे अमृत आहे, अल्पत्व म्हणजेच मरण ! हेंच तुकोबारायांनीं ‘ संकोचोनी काय झालासी लहान । घेई आपोशन ब्रह्मांडाचें ’ ह्या अभंगपादांत सांगितलें आहे. गाई, अश्व, हत्ती, संपत्ति, सेवकगण, भार्या, पुत्र, राज्य इत्यादिकांपासून मिळणारा मोठेपणा ह्या ‘ भूमन् ’ म्ह० ब्रह्मसुखापुढें काय आहे ! हा भूमा कोठें आहे म्हणशील तर ‘ स एव अधस्तात्स उपरिष्टात्स पश्चात्स पुरस्तात् स दक्षिणतः स उत्तरतः स एव इदं सर्वम् ’—तो चहूंकडे आहे, तोच सर्व कांहीं आहे आणि तोच मी आहें हें जाणणारा व अनुभवणारा अत्यंत सुखस्वरूप असतो.

**एष एवं पश्यन्नेवं मन्वान एव विजानन्नात्मक्रीड आत्ममिथुन आत्मानंदः स स्वराट् भवति तस्य सर्वेषु लोकेषु कामचारो भवति।**

त्याला मरण नाहीं, रोग नाहीं, दुःख नाहीं, बाकी सर्व कांहीं आहे ! त्याला कमी कांहीं नाहींच. तो अखंड आनंदाकार असतो.

हें भूमाचें ज्ञान सनत्कुमार ( स्कंद ) यांनीं नारदाला दिलें व तो अधिकारी असल्यामुळें तमाच्या पार गेला. आहारशुद्धि प्रथम हवी, आहारशुद्धीनें सत्वशुद्धि म्ह० अंतःकरणाची शुद्धि होते. चित्त शुद्ध असलें म्ह० निश्चय बाणतो. नारद असा होता.

**आहारशुद्धौ सत्वशुद्धिः सत्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिःस्मृतिलंभे सर्वग्रंथीनां ( अविद्यादि ) विप्रमोक्षः । तस्मै मृदितकषायाय**

( ज्याचा रागद्वेषादि मल ज्ञानवैराग्यरूपी क्षारानें गेलेला आहे )

**तमसस्पारं दर्शयति भगवान्सनत्कुमारः** ( छांदोग्य अध्याय ७ )

आत्मानंदाचें सुख अपार आहे, अखंड आहे, निरुपाधिक आहे. तें मिळाल्यावर दुःखशोकभयचिंता इत्यादिकांचा वाराही अंगाला लागत नाहीं. ईशावास्यांत म्हटलें आहेः—

**यस्मिन्सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः ।**

**तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥** ईशा० ७ ॥

ज्ञान्याला यच्चावत्पदार्थमात्र आत्मस्वरूपानें दिसूं लागले कीं त्या सर्वत्र एकपणा पाहणाऱ्याच्या ठिकाणीं शोकमोह कोठून राहतील ? 'ततो न विजुगुप्सते'–तो शोकमोहांनीं डंडळत नाहीं, चलित होत नाहीं.

**महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति** ( कठ १–२–२१ )

**तमात्मस्थं ये नु पश्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् ॥**

( श्वेताश्वतर ६–१२ )

**एतावदरे खलु अमृतत्वमस्ति** ( बृह० ४–५–१५ )

**तरति शोकमात्मविद्** ( छां० ७–१ )

अशी उपनिषदांतून आणखीही वचनें आहेत. तैत्तिरीयोपनिषदांत ब्रम्हानंदाची मीमांसा केली आहे ती येणेप्रमाणेंः—

**" युवा स्यात्साधुयुवाऽध्यायकः । आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः । तस्येयं पृथ्वी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् । स एको मानुष आनंदः ॥"**

मनुष्याला इहलोकीचा आनंद कोणत्या अवस्थेंत भोगतां येतो ? मनुष्य तरुण असावा, सुंदर व सशक्त असावा, विद्यावान् असावा, रुचीनें भोग भोगणारा असावा, धैर्यवान् व बलवान् असावा ( ही भोक्त्याची संपत्ति सांगितली, आतां भोग्यसंपत्ति ऐका ), ही सर्व

धनधान्यांनीं समृद्ध अशी पृथ्वी त्याच्या सत्तेंत असावी म्ह० तो सार्वभौम राजा असावा. अशा भोक्त्याचा हा भोग हा मनुष्यलोकीचा श्रेष्ठ आनंद आहे ! असे शंभर मानुषानंद हा मनुष्यगंधर्वांचा एक आनंद आहे. असेच शंभरपटींचे आनंद उत्तरोत्तर देवगंधर्व, पितर, कर्मदेव, देव, इंद्र, बृहस्पति, प्रजापति, ब्रह्मा, यांचे आनंद आहेत. ब्रह्मा म्ह० सूत्रात्मा हिरण्यगर्भ. हे सर्व आनंद 'श्रोत्रियस्य चाकामहतस्य' म्ह० वेदवेत्त्या निरिच्छ ब्रह्मनिष्ठाला सहजच प्राप्त होतात, व ते सर्व तो एकाच वेळीं भोगतो व निर्भय असतो:—

**" यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।**
**आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन ॥**

तात्पर्य आत्मज्ञान निरतिशय आनंद व सुख देणारें आहे. आत्मज्ञानी पुरुष आनंदरूप असतो, शाश्वत अखंडसुखाचा तो भोग भोगून पुन्हा जगालाही देतो. त्याच्या ठिकाणीं दुःखशोकभयादि विकार लेशमात्र नसतात. हा सारा ब्रम्हविद्येचा प्रभाव आहे. दुःखध्वंस व सुखलाभ तिच्यापासून प्राप्त होतात. ब्रम्हविद्या जगाला देणाऱ्या उपनिषदांचे द्रष्टे शांडिल्य, आरुणी, याज्ञवल्क्य इ० महर्षींचे हे जगावर थोर उपकार झाले आहेत. उपनिषदांतील ब्रह्मविद्याच गीता—भागवतांत उतरली आहे. हजारों वर्षांत या भरतभूमींत थोरथोर साधुसंत झाले व त्यांनीं जगदुपकारासाठीं प्राकृत भाषांतून आपले अनुभव प्रगट केले तो सारा ब्रह्मविद्यामृताच्या अखंड पानाचाच प्रताप होय. भरतभूमीचें निरंतरचें वैभव तिची ब्रम्हविद्या होय. राज्यें झालीं, आहेत, होतील, जातील, ब्रम्हविद्येची अमूल्य देणगी परमेश्वरानें आधी भरतखंडाला व त्याच्या द्वारें मनुष्यमात्राला दिली आहे. औपनिषदिक वाङ्मयाच्या अभ्यासानें मॅक्समुलर, शोपेनहार, प्रो० ड्यूसेन, इत्यादि पाश्चात्त्य पंडितांनाही समाधान मिळालें आहे. ह्या अनुपम

ब्रम्हविद्येमुळें भारतास जगाच्या गुरुत्वाचा मान मागें पुढें मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. जगाच्या वाङ्मयांत उपनिषदांसारखें उदात्त, पवित्र, श्रेष्ठतम व मानवी जीविताचें साफल्य करणारें दुसरें कांहींच नाहीं. जर्मन पंडित शोपेनहार म्हणतो "साऱ्या जगांत उपनिषदांच्या अभ्यासाइतका कल्याणप्रद व उन्नतिकर असा दुसरा कोणताच अभ्यास नाहीं. या अभ्यासानें मला जन्मभर समाधान दिलें आहे व मरतांनाही तो मला समाधान देईल." तो आणखी म्हणतो. "उपनिषदें हीं मनुष्याच्या पूर्णज्ञानाचा गड्डा आहे. त्यांतील आत्मज्ञानविषयक विचार इतके उदात्त आहेत कीं ते ज्यांना स्फुरले त्या व्यक्ति अतिमानुषकोटींतील आहेत असें मानावेंच लागतें." दिल्लीपति शहाजहान बादशहाचा मुलगा दारा यांनें उपनिषद्विचारांना फारशीभाषेचा वेष दिल्याचें प्रसिद्ध आहे. गेल्या शेंपन्नास वर्षांत जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, इटालियन, रशियन इ० पाश्चात्य भाषांत उपनिषदांची सर्वशः किंवा अंशतः भाषांतरें होऊन त्यावर चर्चात्मक अनेक ग्रंथ झाले आहेत. चीन व जपान देशांवर उपनिषदांनीं आक्रमण केलें आहेच.

## ११ उपनिषदांतील कांहीं सूत्रें.

यापुढें कांहीं सूत्ररूप उपनिषद्वाक्यें दिलीं आहेत. हीं सुभाषितरूप आहेत. उपनिषद्रूप हिऱ्याच्या खाणींतून सांपडलेले हे अनमोल हिरे आहेतः—

(१) सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म (तै० २-१)
(२) सर्वं खल्विदं ब्रह्म (छां. ३-१४-१)
(३) तत्त्वमसि (छां. ६-८-७)

---

१ 'सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण' हा ज्ञानेश्वरांचा व 'सत्य तूं सत्य तूं सत्य तूं गा विठ्ठला' हा तुकोबांचा अभंग पहा.

( ४ ) अयमात्मा ब्रह्म ( बृ० २–५–१९ )
( ५ ) अहं ब्रम्हास्मि ( बृ० १–४–१० )
( ६ ) एको हि रुद्रो न द्वितीयाय तस्थुः ( श्वे० ३–२ )
( ७ ) सदेव सौम्येदमग्र आसीत् एकमेवाद्वितीयं ब्रह्म। छां. ६-२-१
( ८ ) नेह नानास्ति किंचन. ( क० २–४–११ )
( ९ ) विज्ञानमानन्दं ब्रह्म ( बृ० ३–९–२८ )
( १० ) ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति.
( ११ ) स भूमिं विश्वतो वृत्त्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ( श्वे० ३–१४ )
( १२ ) तस्य भासा सर्वमिदं विभाति ( क० ११–५–१५ )
( १३ ) सत्यमेव जयते नानृतम् ( मुं० ३–१–६ )
( १४ ) नैषा तर्केण मतिरापनेया ( क. १–२–९ ).
( १५ ) परोक्षप्रिया हि वै देवाः ( ऐ. १–१–३ )
( १६ ) नानुध्यायात् बहून् शब्दान् वाचो विग्लापनं हि तत्
( बृ. ४–४–२१ )
( १७ ) वाचारंभणं विकारो नामधेयम्। मृत्तिकेत्येव सत्यम्
( छां. ६–१–४ )
( १८ ) यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ( तै. २–४ )
( १९ ) नेति नेति ( बृ २–३–६ ).
( २० ) तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पंथा विद्यते ऽयनाय
( श्वे. ३–८ )

---

१ ‘ भूजलतेजसमीरख...तो परमात्मा दशांगुळें उरला ’ ही मोरोपंताची आर्या पहा.

( २१ ) आहारशुद्धौ सत्वशुद्धिः ( छां० ७–२६ )
( २२ ) अंधेनैव नीयमाना यथांधाः ( मुं० १–२–९ )
( २३ ) यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ( श्वे. ६–५–२ )
( २४ ) ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपापैः ( श्वे० ५–१३ )
( २५ ) उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ( क. १–३–१४ )
( २६ ) य एतदेवं वेद अभिहैनं सर्वाणि भूतानि संवांच्छन्ति ( के. ४–६ )

---

१ 'ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी' ( जनाबाई ).

…र वाचनालय, सातारा.



# ३ भगवद्गीता.

## १ स्वधर्मकर्म.

**उपनिषद्विद्या** व **भगवद्गीता** यांचा संबंध मायलेकींसारखा आहे. उपनिषदांतील आत्मानंदावर गीता पोसली खरी, पण तिनें आईच्या संसारांत विशेषेंकरून न दिसणाऱ्या चार नवीन जिनसाही आपल्या परिस्थितीप्रमाणें आपला संसार थाटतांना त्यांत मांडल्या आहेत ! तिचें माहेरचें वळण बिलकुल सुटलें नाहीं, किंबहुना तेंच अधिक खुलावून दिसेल असें तिनें विश्वजनमोहकरूप घेतलें आहे. तिनें आपल्या संसाराचा मांड असा रमणीय थाटला आहे कीं तो पाहून ज्ञानी, कर्मी, योगी व भक्त या सर्वांनीं डोलत राहावें व प्रत्येकानें गीतेचें सर्वांपेक्षां आपल्यावरच अधिक प्रेम आहे असें जगाला सांगावें ! गीतामाउलीची अर्थज्ञ, पाठक व श्रोते या सर्वांवर जशी समप्रेमाची दृष्टि आहे तशीच ती ज्ञानी, कर्मी, योगी व भक्त या चौघांवर आहे ! ह्या चौघांना गीतेनें आपल्या पोटांत घेतलें आहे, गीतेचें अधिक प्रेम कोणावर आहे हाच मतभेदाचा व वादाचा प्रश्न होऊन राहिला आहे. हा जाणत्यांमधला वाद येथेंच सोडून देऊन गीता कोणत्या गुणांमुळें सर्वलोकप्रिय झाली आहे व भागवतधर्माचा ती एक मुख्य आधार कां मानली जात आहे एवढ्याच मुद्द्याचा आपण येथें विचार करूं. गीतेची लोकप्रियता तिनें सर्व लोकांना मोक्षाचें द्वार खुलें केलें व सर्वलोकसुलभ अशा भक्तिमार्गाचा धोपट मार्ग दाखवून दिला यांत आहे. समाजाची बसलेली घडी तिनें मोडली नाहीं. ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' ( ४–१३ ) असें सांगून चार वर्णांचीं लक्षणें व कर्में ( १८–४१ ते ४४ ) स्पष्ट सांगितलीं आहेत व ' स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ' असें ह्मणून ज्यापासून भूतांची उत्पत्ति झाली आहे व

ज्याच्या सामर्थ्यानें हें विश्व चाललें आहे ' स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ' ( १८–४६ ) असा त्या संसिद्धीचा मार्ग दाखविला आहे. प्रजापतीनें सर्व मनुष्य प्राणी ' सहयज्ञ ' ( स्वधर्मरूप यज्ञासह ) निर्माण केले असून ( ३–१० ) स्वधर्म सोडून वागणाऱ्याला कर्म बंधकारक होतें यास्तव मनुष्यानें **संग व फलाशा सोडून परमेश्वरार्पणबुद्धीनें स्वधर्मकर्माचें आचरण करावें** यांतच त्याचें कल्याण आहे असें भगवान् सांगतातः—

**मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युद्ध्यस्व विगतज्वरः ॥ ३–३० ॥**

परधर्म स्वनुष्ठित असला व स्वधर्म विगुण असला तरी ' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ' ( ३–३५ ). गीतेचें कर्मयोगाचें रहस्य[1] एवढेंच आहे. आतां गीता ज्या अर्जुनाला सांगितली तो अर्जुन क्षत्रिय असल्यामुळें त्यानें स्वधर्मानें म्ह० क्षात्रधर्मानें वागावें यांत त्याचें इहपरलोकीं कल्याण आहे व यांत लोकसंग्रहही आहे असें जाणून भगवंतांनीं त्याला ' तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ' ( २–३७ ), ' मामनुस्मर युद्ध्यच ' ( ८–७ ) असा वारंवार बोध करून युद्धास प्रवृत्त केलें आहे.

## २ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु.

गीतेनें अर्जुनाचा मोह दूर करून त्याला स्वकर्तव्यपर केलें हें स्पष्टच आहे. पण तो युद्धपराङ्मुख कां झाला ? आपलें नित्याचें क्षात्रकर्म सोडून देण्यास तो याच वेळीं प्रवृत्त कां झाला ? त्याचें चित्त **शोकमोहानें** व्यापलें होतें म्हणून ! मग तो अज्ञानानें झालेला शोकमोह दूर करणें भगवंताला प्राप्तच झालें. म्हणून ' धर्मसंमूढचेत ' झाल्यामुळें

१ गीताशास्त्रावरचा आमचा स्वतंत्र ग्रंथ याच्या पाठोपाठ ५।६ महिन्यांत प्रसिद्ध होणार आहे ह्मणून येथें विस्तार करीत नाहीं.

'विषीदंतं'–विषाद पावलेल्या–अर्जुनाला भगवंतांनीं 'प्रहसन्निव' आत्म्याच्या अमरत्वाचा प्रथम बोध केला. तो ग्रहण करण्यास अर्जुन त्यावेळीं असमर्थ दिसला तेव्हां त्याला त्याच्या क्षात्रधर्माची आठवण दिली व कीर्तिनाशाची जाणीव करून दिली. अर्जुन शोकमोहानें व्याप्त झाला होता व त्याचा **शोकमोह दूर करण्याकडे अर्थात् त्याला आत्मज्ञानसंपन्न करण्याकडे** भगवंताचें प्रथमपासून अखेरपर्यंत पूर्ण लक्ष होतें हें गीतेच्या उपक्रम–उपसंहारावरून सिद्ध होतें. 'मी धर्मसंमूढचेत झालों आहे व इंद्रियांना शोषून टाकणारा शोक दूर करण्याचा उपाय मला दिसत नाहीं म्हणून माझें श्रेय ह्म० कल्याण ज्यांत आहे असा मला बोध कर; मी तुझा शिष्य आहे व तुला शरण आलों आहे' असें अर्जुन म्हणाला ( १–७।८ ) म्हणजे अर्जुनानें शोकमोहनिराकरणाचा उपाय देवास विचारला हा आहे गीतेचा उपक्रम व 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' म्ह० माझा मोह पार गेला व माझ्या आत्मत्वाची आतां पूर्ण ओळख झाली, आतां मी आत्मस्वरूपाविषयीं निःसंदेह झालों आहे, तूं सांगशील तें करीन' अशी अर्जुनानें शेवटीं पावती दिली ( १८–७३ ) तो आहे गीतेचा उपसंहार! तात्पर्य मोहनिरास हेंच गीतेचें तात्पर्य आहे. दुसऱ्या अध्यायांत आत्मा अमर आहे हा बोध ठसवितांना 'नानुशोचितुमर्हसि' 'नैनं शोचितुमर्हसि' 'नत्वं शोचितुमर्हसि' ( २-२५ ते २७ ) असें देव वरचेवर सांगतात याचें कारण तरी 'तरति शोकमात्मवित्' ( छां ७–१ )–आत्मज्ञानी पुरुषच शोकापासून मुक्त होतो हें होय. 'तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः' ( ईशा० ८ ), 'महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति' ( १–२–२१ ) ह्या सूत्रांतला एकत्व पाहणारा, आपण व्यापक आत्मरूप आहोंत हें जाणणारा, शोकमोहापासून मुक्त होतो हा उपनिषदांचाच सिद्धांत गीतेनें सांगितला आहे. तात्पर्य, शोकमोहनिरसनाचा उपाय आत्मज्ञान हाच एक आहे असें उपनिषदें व गीता एक-

मतानें सांगत आहेत, दोघांची आत्मज्ञानाविषयीं एकवाक्यता आहे. परम गुह्य असें जें अध्यात्मज्ञान तें तुम्हीं दयेनें दिल्यामुळें माझा मोह गेला:—

**‘ मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।**

**यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ’**

असें अर्जुनानें ११ व्या अध्यायाच्या प्रारंभींच कबूल केलें आहे. हें अध्यात्मज्ञान सांगतांना देवांनीं सृष्टीचा व आत्म्याचा काय संबंध आहे तो परोपरीनें सांगितला आहे; व त्यासाठीं परा व अपरा प्रकृति ( अ० ७ ), प्रकृति व अव्यक्त ( अ० ९ ), क्षेत्र व क्षेत्रज्ञ, प्रकृति व पुरुष ( अ० १३ ), क्षर, अक्षर व पुरुषोत्तम ( अ० १५ ) इ० विषय सांख्यशास्त्राधारें व उपनिषद्सिद्धांताधारें सविस्तर, सुलभ व मनोरम रीतीनें स्पष्ट करून दाखविले आहेत.

सनातन ब्रह्माचें ज्ञान झाल्यावर मोह उरत नाहीं—‘ यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ’ ( ४–३५ ). ज्ञानासारखें पवित्र दुसरें कांहीं नाहीं, सर्व कर्मांची परिसमाप्ति ज्ञानांत आहे, ज्ञानानें सर्व भूतें आत्मस्वरूपीं भेटतात, ज्ञानानें पापसमुद्र तरून जातात, ज्ञानाग्नि सर्व कर्मांना भस्मसात् करितो, तें ज्ञान श्रद्धावानालाच मिळतें, ज्ञानानें पराशांति मिळते—या प्रकारें ज्ञानाची महती गायिली असून हें आत्मज्ञान संतांपाशींच मिळतें हा विषय ४ थ्या अध्यायांत सांगितला आहे. ज्ञान्याचीं लक्षणें ‘ अमानित्वादि ’ १३ व्या अध्यायांत सांगितलीं असून त्यापुढें ‘ ज्ञेय ’ असें जें परब्रह्म तें ‘ सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखं ’ सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितं ’ ‘ बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव, ’ ‘ अविभक्तंच भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ’ ‘ ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ’ याप्रमाणें वर्णिलें आहे व तें ‘ हृदि सर्वस्याधिष्ठितम् ’—प्राणिमात्राच्या हृदयांतच सांपडणारें आहे ( १३–१२ ते १७ ). हा दृश्य भूतग्राम ‘ भूत्वा भूत्वा

प्रलीयते ' पुन: पुन्हा उत्पन्न होतो व लयाला जातो, पण ' परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः । यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ' याला ' परमागति ' म्हणतात–' यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ' ( ८–१९ ते २१ ) तोच पुरुषोत्तम, त्यालाच परमात्मा म्हणतात–'परमात्मेत्युदाहृत:'–अशा मला–भगवान सांगतातः–

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।**
**स सर्वविद् भजति मां सर्वभावेन भारत'** (१५–१७ ते १९).

हें ज्ञान होण्याचा उपाय विषयाकार असलेलें चंचल मन आवरावें, सर्वत्र समदर्शन होऊन तें ' आत्मन्येव वशं नयेत् '–आत्मस्वरूपीं स्थिर करावें हें अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगानें साध्य होतें ( ६–२६ ते ३५ ). हेंही साध्य होण्याला हें ज्ञान ज्यापाशीं उपतिष्ठत आहे अशा ज्ञान्याचा संग करावाः ' तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ' ( ४–३४ ) ज्ञान्यापाशीं ज्ञान मिळतें, पेटलेल्या दिव्यालाच दिवा लागतो. हें खरें, पण ज्ञानी ओळखावा कसा ? यासाठीं ज्ञान्याचीं लक्षणें गीतेंत जागोजाग सांगितलीं आहेत. 'दुसऱ्या अध्यायांतील स्थितप्रज्ञाचीं लक्षणें, १२ व्यांतील धर्म्यामृत या नांवाखालीं सांगितलेलीं 'अद्वेष्टा सर्वभूतानां ' येथपासून ८ श्लोकांत सांगितलेलीं संतांचीं लक्षणें, १३ व्यांतील 'अमानित्वादि' ज्ञान्याचीं २६ लक्षणें ह्या सर्व ज्ञान्याच्या खुणा आहेत. अशा ज्ञान्याला अर्जुन श्रीकृष्णास 'शिष्यस्तेऽहं' शाधि मां त्वां प्रपन्नम्' याप्रमाणें शरण गेला तसें जावें म्हणजे ' नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा ' मोहनिराश होऊन आत्मस्वरूपाचा बोध होतो असा हा वेदोपनिषदांत सांगितलेला ज्ञानयोगच गीतेनें संकलित करून सर्वांस समजेल अशा सुलभ रीतीनें सांगितला आहे.

## ३ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य होय.

भगवद्गीतेनें कर्मयोग वर्णाश्रमधर्मानुसार सांगितला व सांख्यशास्त्राशीं त्याची सांगड घालून वेदोपनिषत्प्रणीत ज्ञानयोगही सांगितला. पण

गीतेनें एवढेंच कार्य केलें असतें तर गीता हा वेदांतशास्त्राचा एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे एवढीच गीतेची महती राहिली असती व गीता केवळ ज्ञानी लोकांत मान्यता पावली असती; पण गीता सर्वसामान्य लोकांत जी लोकप्रिय झाली ती तिनें भक्तिमार्गाचा पुरस्कार केला यामुळें होय. गीता ही भक्तियोगाचें भांडार आहे. भक्तियोगामुळेंच कोट्यवधि लोकांच्या जीवात्म्यांस तिनें समाधान व धीर दिला आहे, गीता ही संसारतप्त जीवांची साउली आहे. परमेश्वर निर्गुणनिराकार आहे व तो ध्यानानें वश होतो हें खरें आहे, तथापि हा अधिकार फार थोड्या जीवांचा आहे. लोकांना आपल्याचसारखा सगुणदेहधारी देव पाहिजे असतो, त्यावांचून त्यांचें समाधान होत नाहीं; आणि लोकांचें भाग्य हें आहे कीं त्यांना भक्तियोगाचें रहस्य साक्षात् भगवंताच्या मुखानें ऐकावयास मिळालें. ' न मे भक्तः प्रणश्यति ' हें प्रभूवांचून कोण बोलूं शकेल ! ' जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते, व अधर्माचें प्राबल्य होतें तेव्हां तेव्हां साधूंच्या संरक्षणासाठीं व दुष्टांच्या संहारासाठीं मी अवतार घेऊन धर्माची संस्थापना करितों व हें युगायुगाच्या ठायीं मी करीत आलों आहे' ( ४–७ते ८ ) हें केवढें धीराचें वचन आहे ! या भगवद्वचनाच्या आधारावर अनेक एकांतभक्तांनीं प्रभूला सगुणसाकार रूप घ्यायला लावलें आहे. धर्मग्लानीच्या प्रसंगीं प्रभु हें आपलें ब्रीद पाळतील असा केवढा आधार यामुळें लोकांना मिळत असतो ! देवानें अवतार घेणें हें भक्ताच्या उत्कटतेवरच अवलंबून असतें हें ' ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ' ( ४–११ )– जे मला जितक्या भावानें शरण येतात तितक्याच भावानें मी त्यांना भजतों–या भगवद्वचनावरून उघड आहे. यामुळें भगवत्प्रसाद होईपर्यंत त्याचें भजन करण्याचें भाविकाच्या अंगीं बळ येतें व उचलत्या पावलीं तो देवाची भक्ति करीत असतो. गीतेंत ब्रह्मज्ञान व भक्ति ही तृतीयपुरुषी सांगितलेली नसून प्रथमपुरुषी आहे– येथें असें केलें म्हणजे तसें होईल असलें कोरडें शास्त्रीय बोलणें नसून

'मला शरण ये म्हणजे मीच तुझा उद्धार करितों' असें भगवान् आपल्या मुखानें आश्वासन देत आहेत, यामुळें गीतेला अत्यद्भुत माधुर्य आलें आहे. भगवत्प्राप्त्यर्थ मुमुक्षूला यज्ञदानतपादि स्वधर्मकर्मे केलींच पाहिजेत, कारण तीं चित्तशुद्धिकर आहेत– 'यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्,' मात्र तीं संग व फलाशा सोडून केलीं पाहिजेत (१८-५।६) आतां संग व फलाशा सोडून कर्में करण्याचें रहस्य शोधण्याच्या खटाटोपांत पडतां आलें नाहीं तर भगवान् सांगतातः—

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥**

नुस्तीं यज्ञदानतपादि वैदिक कर्मेंच नव्हत तर तूं आपलीं सर्व लौकिक कर्मेंही माझें स्मरण करून मला अर्पण करीत जा, सर्वकर्में कृष्णार्पण करीत जा; 'मामनुस्मर युद्ध्यच' माझें स्मरण करून भागा आलेलीं लोकव्यवहाराचींही सर्व उचित कर्में करीत जा म्हणजे कर्मबंधापासून सहजच मुक्त होऊन मला पावशील. पहा बरें:—

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ ५-२९ ।**

सर्व लोकांचा स्वामी मी असल्यामुळें प्राण्यांच्या यज्ञदानतपादि सर्वकर्मांचा भोक्ता मीच आहें. मी सर्वभूतांचा सखा आहें हें एवढें जाणल्यानें चित्ताला परमसमाधान वाटेल. पातंजलयोगाचा जो अभ्यास ६ व्या अध्यायांत सांगितला आहे त्यानें तरी 'सर्वत्र समदर्शन' व्हायचें असतें, बुद्धीला साम्य यायचें असतें, तें सर्वभूतस्थित जो परमात्मा त्याच्याशीं अभेदभावानें राहण्यानें प्राप्त होतें–'सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः' (६–३१)–देवावेगळें कोणी नाहीं अशा एकत्वभावनेनें देवाशीं एकरस होणें व 'यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति' याप्रमाणें भगवंताला सर्वांभूतीं पाहणें व

सर्वभूतें भगवंतीं पाहणें ( ६–२९ ) हाच योग भक्तांना भक्तिबळानें साधतो ह्मणून सर्व योग्यांत माझ्या ठायीं अंतःकरण ठेवून श्रद्धेनें मला भजणारा हाच श्रेष्ठ योगी होय असें देव सांगतातः—

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।**
**श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ( ६-४७ )**

जगाचा प्रभव मीं व प्रलय मीं ह्म० उत्पत्तिकर्ता व संहारकर्ता मीं असल्यामुळें सुवर्णाच्या सूत्रांत मणिगण ओवावेत त्याप्रमाणें हीं अनंत ब्रह्मांडें माझ्यांतच ओवलीं आहेत, अर्थात् मजहून श्रेष्ठ व दुसरें असें जगांत कांहींच नाहीं–‘ मत्तः परतरं किंचिन्नान्यदस्ति धनंजय ’ ( ७–७ ). हें विश्व सारें त्रिगुणात्मक आहे, ही गुणमयी माया दुस्तर आहे, पण ही इतरांना, माझ्या भक्तांना नव्हे–‘ मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ’ ( ७–१४ ). माझ्या भक्तांत आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकार आहेत. पहिले तीन सकाम आहेत व चौथा निष्काम आहे–‘ तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ’ ( ७–१४ ). ज्ञानी भक्ताचें चित्त सर्वकाळ मजकडे लागलेलें असतें, तो माझा एकांतिक म्हणजे एकनिष्ठ भक्त असतो, तो माझें स्वरूप जाणून मला भजतो मी त्याला अत्यंत प्रिय असतों व तो मलाहि तसाच प्रिय असतो. मला अभेदभावानें भजणारा ज्ञानीभक्त मी आपला आत्माच मानतों. ज्ञानीभक्त व परमात्मा यांत भेदच नाहीं. ‘ वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ’–हें सकल वासुदेवस्वरूप आहे अशी त्याची प्रतीति असते ( ७–१६ ते १९ ). अन्य देवतांना भजणारे आपापल्या उपासनेचें फळ पावतात व तें फळही त्यांना मीच देतों, पण ज्ञानीभक्ताची सर कोणाला यायची नाहीं. देहत्यागावसरीं सुद्धा माझें स्मरण करीत असल्यामुळें तो माझ्या स्वरूपींच मिळून जातो. जिवंतपणींच माझ्या भजनांत अखंड रंगलेला माझा भक्त देहत्याग करितांनाही माझ्या स्वरूपावेगळा कोठें जाईल ? म्हणून मनबुद्धि मला अर्पण करून जे

माझेच होऊन जातात त्या माझ्या भक्तांना परम गति मिळते. ( ८–५ ते ७. ) तात्पर्यः—

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ ८–१४ ॥**

भक्तियोगाच्या दृष्टीनें नववा अध्याय हा सर्व गीताग्रंथांत अत्यंत महत्वाचा आहे, कां कीं ह्यांत ज्ञान व भक्ति दोन्ही एकरूप झाल्या असून भाक्तिविषयक कांहीं अमोल सिद्धांत देवाच्या तोंडून प्रगट झाले आहेत. विद्यांतली श्रेष्ठ विद्या व गुह्यांतलें परम गुह्य–' राजविद्या राजगुह्य ' असें भगवंतानीं ह्या अध्यायांतील ज्ञानयुक्त भक्तीला किंवा भक्तियुक्त ज्ञानाला नांव दिलें असून ११ व्याच्या पहिल्याच श्लोकांत यालाच ' अध्यात्म ' असें म्हटलें आहे. हें गुह्यतम असें अध्यात्म पवित्र आहे, उत्तम आहे, प्रत्यक्ष आहे, धर्म्य आहे, सुखानें आचरण्याजोगें असून शाश्वत आहे ( ९–१ ). आकाशांत जसा वायु तशीं माझ्यांत–भगवान् सांगतात–हीं भूतें आहेत. मी भूतभृत् आहे पण भूतस्थ नाहीं. भूतांना आधार मी आहे पण मला आधार हीं भूतें नाहींत, म्ह० भूतांचा मी आलंब आहे पण मला कोणी आलंब नाहीं, मी स्वतंत्र आहे. माझ्या प्रेरणेनें प्रकृति चराचर मांडते व मोडते पण मी प्रकृतिपर असून प्रकृतीच्या कार्यांत आसक्त नाहीं ( ९–६ते१० ). मनुष्यदेहधारी अशा माझा परभाव मूढजन ओळखीत नाहींत पण महात्मे पुरुष मी सर्व भूतांचा आदि आहे व अविनाशी आहे हें जाणून मला अनन्यभावानें भजतात. ( ९–११ ते १३ ).

**सततं कीर्तयन्तो मां यतंतश्च दृढव्रताः ।**
**नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ ९–१४ ॥**

भगवद्भक्तीचें दृढव्रत घेतलेले, व भगवत्प्रीत्यर्थ कीर्तनभक्तीचा सायास करणारे व भगवंताला सर्वभूतीं पाहून नमनभक्तीनें त्याची उपासना करणारे पुरुष उत्तम भक्त होत. श्रौतस्मार्तकर्मानुष्ठान मी, जगताचा पिता

व माताही मी, प्रणव मी, वेद मी, सर्व कांहीं मी आहें; सर्वांची गति मी, सर्वांचा भर्ता ह्म० पोषक मी, विश्रांतीचें स्थान मी, उत्पत्तिस्थितिलय मी व सर्वांचें अव्यय बीजही मीच ( ९–१६ ते १८ ), अशा माझी म्ह० परमात्म्याची जे अनन्यभक्ति करितात त्यांचा सर्व भार मी वाहतों असें भगवान् सांगतात:—

**अनन्यांश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ ९–२२ ॥**

अनन्यभक्ताची भगवान् सर्वतोपरी चिंता वाहतात. येथें मी त्यांचा योगक्षेम वाहतो म्हणून सांगितलें आहे, पुढें १० व्या अध्यायांत त्यांनीं सांगितलें आहे कीं जे ‘ परस्परं बोधयन्तः ’ व ‘ मां कथयन्तः ’ ह्म० माझ्या स्वरूपाची चर्चा करीत व माझे गुणानुवाद गात व ऐकत प्रेमपूर्वक मला अखंड भजतात त्या माझ्या भक्तांना ‘ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ’–मी बुद्धियोग देतों व त्याच्या योगानें ते मला पावतात; पहा कीं त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठीं त्यांच्या बुद्धीमध्यें मी वास करून माझ्या तेजोमय ज्ञानदीपाच्या प्रकाशानें मी त्यांच्या अज्ञानतमाचा नाश करितों ( १०–९ ते ११ ). हें भगवंताचें आश्वासन भाविकांना मोठें महत्वाचें वाटणारें आहे. भगवंतांनीं आपल्याला कीर्तनभक्ति प्रिय आहें असें येथें स्पष्ट सांगितलें आहे. माझ्या अनन्यभक्तांचा मी योगक्षेम वाहतों, त्यांच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पाडून मी त्यांचे अज्ञानतमाचा नाश करितों व त्यांना बुद्धियोग देऊन मी त्यांना आपल्याकडे ओढून घेतों, असें भगवंतांनीं स्वमुखानें येथें सांगितल्यावर भगवंताला अनन्यभावानें शरण जाणें एवढेंच कृत्य जीवाकडे राहतें. त्या शरणागतीचाही मार्ग पुढें ‘ मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ’ ( १२–८ )–मन आणि बुद्धि मला अर्पण कर ह्म० मनाचे संकल्प व बुद्धीचा निश्चय मद्विषयक असों दे असाच सुलभ सांगितला आहे. १२ व्या अध्यायांत देवांनीं भक्तलक्षणें सांगतांना

'मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः' (१२–१४) 'यो मद्भक्तः स मे प्रियः' 'भक्तिमान् यः स मे प्रियः' असें चार पांच वेळ म्हटलें असून शेवटच्या श्लोकांत 'श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः' ( १२–२० ) असा आपल्या प्रेमाचा विषय जाहीर केला आहे. अठराव्या अध्यायाच्या उपसंहारांत सर्व गुह्यतम म्हणून जें सांगितलें आहे त्यांत 'सर्वधर्मांचा परित्याग करून एकमय जो मी त्या मला शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन' ( १८-६७ ) असा भक्ताच्या पापनिवारण्याचाही बोजा देवानें स्वतःच्या शिरावर घेतला आहे; म्हणजे देव भक्तासाठीं सर्व कांहीं करण्यास तयार आहेत. त्याचा योगक्षेम वाहण्याचा ( ९–२२ ), त्याचें अज्ञान दूर करून त्याला ज्ञान देण्याचा (१०–११), त्याचें पापनिवारण करण्याचा (१८–६७), त्याला संसारसागरांतून उद्धरण्याचा ( १२–७ ) व बुद्धियोग देऊन आपल्या स्वरूपीं त्याला मिळवून घेण्याचा ( १०–१० ) ह्याप्रमाणें भक्ताचे सर्व भार वाहण्याचें देवानें वचन देऊन ठेवलें आहे; कां कीं भक्त त्याला अतीव प्रिय आहेत. भक्तांना देवानें सर्व प्रकारें सांभाळण्याचें काम स्वतःच्या शिरावर घेतलें आहे. असा कनवाळूपणा त्यानें केवळ कर्मयोग्याविषयीं, केवळ ज्ञान्याविषयीं किंवा केवळ योग्याविषयीं कोठेंच व्यक्त केला नाहीं! यावरून भगवंतांचें म्हणजे भगवद्गीतेचें रहस्य भक्तिप्रधान आहे हेंच सिद्ध होतें. भगवदर्पणबुद्धीनें स्वधर्माचरण केलें तर तें उपासनेंत जमा होतें. भगवंताला जाणून त्याची भक्ति करायची तर त्याला यथार्थपणें कोण जाणूं शकतो ? त्याला जाणावें कसें व जाणून भजावें कसें ? भगवान् सांगतात कीं माझा प्रभव देवांना व महर्षींना ठाऊक नाहीं, कांकीं मी त्यांच्या फार आधीचा आहे ! मी अज आहे, अनादि आहे व लोकमहेश्वर आहे, एवढेंच जाणणें शक्य आहे व एवढें जाणल्यानेंही मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतो ( १०–२व ३ ). मी भक्तांचा सर्वभार वाहतों पण भक्त अनन्य असावे लागतात.

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ९-२६ ॥**

जो कोणी शुद्धचित्त होऊन एक पान, फूल, फळ किंवा नुसतें उदक मला भक्तिभावानें अर्पण करितो त्याचा तो भक्तीचा उपहार मी-ही प्रेमानें ग्रहण करितों ( द्रौपद्रीच्या थाळीला चिकटलेलें भाजीचें पान, गजेंद्रानें दिलेलें फूल, शबरीचें बोर व बळीनें दिलेलें उदक मी सेवन केलें आहे )! मी सर्वलोकमहेश्वर आहे पण भक्तिप्रेमाला वश आहे.

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ९-३० ॥**

कोणाच्या हातून पूर्वी पापकर्मै घडलीं असलीं तथापि अनुतापानें शुद्ध होऊन तो जर माझी अनन्यभावानें माझी भक्ति करूं लागला तर तो साधुच मानावा; कांकीं तो चांगल्या मार्गाला लागला आहे, योग्य मार्गाकडे वळला आहे. त्याचें पाप नष्ट होऊन तो फार त्वरित धर्मात्मा होतो व त्याच्या जीवाला समाधान प्राप्त होतें. ' न मे भक्तः प्रणश्यति ' अशी माझी प्रतिज्ञा आहे. जो माझा झाला त्याचा नाश नाहीं, तो अधोगतीला कधींही जायचा नाहीं.

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्॥९-३२॥**

माझा ज्यांनीं आश्रय केला, जे मला अनन्यभावानें शरण आले ते पापकुळांत जन्मलेले असोत, ते वैश्य असोत, शूद्र असोत, पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत–तेंही परमगतीला पोंचतात, मग पुण्यकर्म करणारे ब्राह्मण किंवा ऋषितुल्य क्षत्रिय हे माझे भक्त असले तर तरतात यांत नवल काय ? चाऱ्ही वर्णांचे लोक भक्तीच्या योगें तरतात इतकेंच काय पण चांडालादि पापयोनींत जन्म पावलेले पतितही उद्धरतात. तात्पर्य जातिकर्मकुलादिकांकडे मी पाहत नाहीं, जो कोणी अनन्य-भावानें मला शरण येतो त्याचा मी उद्धार करितों. ब्राह्मणांपासून

अंत्यजांपर्यंत सर्वांना उद्धाराचा मार्ग मोकळा आहे, मात्र हा मृत्युलोक अनित्य व असुख आहे हें जाणून म्ह० चित्तीं वैराग्य धारण करून मला शरण आलें पाहिजे. तें कसें ?

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ९-३४ ॥**

माझ्या ठायीं चित्त ठेव, माझी सेवा कर, माझें भजनपूजन कर, मला नमस्कार कर, मत्परायण हो म्ह० मत्प्रीत्यर्थ सर्व कर्मे करणारा हो, व ह्याप्रमाणें सर्वस्वी मला मिळून जा म्हणजे माझ्याच स्वरूपीं अखंड राहशील.

ह्याप्रमाणें ह्या ९ व्या अध्यायांत भगवंतांनीं मोक्षाचें द्वार आचांडाल सर्वांस मोकळें केलें आहे. भगवंतांनीं ‘ सततं कीर्तयन्तो मां ’ ह्या श्लोकांत कीर्तन व नमनभक्ति सांगितली, ‘ अनन्याश्चिन्तयन्तो मां’ ह्या श्लोकांत अखंडचिंतनाचा मार्ग सांगितला, ‘ पत्रं पुष्पं फलं तोयं ’ यांत अर्पणभक्ति सांगितली, व वरील अखेरच्या श्लोकांत मच्चित्त होऊन माझें भजनपूजन कर व सर्वथा मत्परायण हो म्हणून देवांनींच सांगितलें. याप्रमाणें देवांनींच भक्तिमार्ग घालून दिला व माझ्या अनन्यभक्ताचा मी सर्वभार वाहतों, ‘ न मे भक्तः प्रणश्यति’–माझा झाला कीं त्याला अधोगतीची भीति नाहीं, कोणत्याही वर्णाचा, जातीचा स्त्रीपुरुष कोणीही असो–मोठा कुलवंत असो कीं पापयोनि असो–सर्वांचा उद्धार करण्याचें आपलें ब्रीद जाहीर केलें–असा हा नववा अध्याय भगवद्गीतेचें हृदय आहे, भगवंतांनीं भक्तिमार्गाचा किंवा भागवतधर्माचा याप्रमाणें स्वतःच पाया घातला आहे. भगवन्मुखांतून निघालेल्या ह्या धीराच्या वाणीनें लक्षावधि जीवांचा उद्धार केला आहे ! भगवद्गीतेच्या लोकप्रियतेचें बीज यांत आहे.

दहावा, अकरावा व बारावा ह्या तीन अध्यायांचा एक गट आहे. ‘ अनन्याश्चिंतयन्तो मां ’ ह्या श्लोकांत भगवंतांनीं चिंतन करायला

सांगितलें, मन्मन हो, मत्परायण हो म्हणून सांगितलें; पण देवाला कोठें पहावें, कसें पहावें, कसें भजावें, देव सर्वत्र आहे खरा पण तो सगुण आहे का निर्गुण आहे, निर्गुणाला ध्यावें कसें, सगुणाला भजावें कसें इ० विचार भक्तिमार्गाला लागणाऱ्या माणसाच्या मनांत उद्भवतात त्यांचा निवाडा भगवंताच्याच मुखानें ह्या तीन अध्यायांत झाला आहे. ह्या तीन अध्यायांना अनुक्रमें विभूतिविस्तारयोग, विश्वरूपदर्शनयोग व भक्तियोग अशीं नांवें आहेत. हे सर्व अध्याय भक्तियोगाचेच आहेत. ‘ केषु केषु च भावेषु चिंत्योऽसि भगवन्मया ’–कोणकोणत्या वस्तूंमध्यें मी तुझें चिंतन करावें ह्या अर्जुनाच्या प्रश्नावर देवांनीं आपल्या विभूति सांगून ह्यांपैकीं कोठेंही चित्ताची एकग्रता करून मला भज असें प्रथम सांगितलें. देव म्हणतातः—भूतांचा आदिमध्यांत मी असल्या-मुळें माझ्या विभूति अनंत आहेत. ज्योतींत सूर्य, नक्षत्रांत शशी, देवांत इंद्र, इंद्रियांत मन, आदित्यांत विष्णु व रुद्रांत शंकर, स्थावरांत हिमालय, जलाशयांत सागर, शब्दांत ॐ कार, यज्ञांत जप ह्म० नामस्मरण, वृक्षांत अश्वत्थ, देवर्षींत नारद, दैत्यांत प्रल्हाद, गायींत कामधेनु, पक्ष्यांत गरूड, नद्यांत गंगा, विद्यांत अध्यात्मविद्या, ह्याप्रमाणें स्थावरजंगमात्मक सकलसृष्टींतल्या आपल्या कांहीं विभूति सांगून देव म्हणाले कीं ‘जी जी वस्तु ऐश्वर्य, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनीं युक्त असेल ती ती माझी विभूति आहे व माझ्या तेजाच्या अंशा-पासून उत्पन्न झाली आहे असें जाण, फार काय सांगावें ? माझ्या एका अंशानें सारें विश्व मी व्यापून राहिलों आहे. तात्पर्य अशा वेगवेगळया माझ्या विभूति किती पहात बसशील ? यापेक्षां विश्वांतर्यामी विश्वरूप मी एकला एक आहे हें जाण म्हणजे झालें. ’ ! तर मग ‘ हे पुरुषो-त्तमा ! हे योगेश्वरा ! तूं आपलें विश्वरूपच मला दाखीव ना ’ असें अर्जुन म्हणाला. तेव्हां देवांनीं त्याला दिव्यदृष्टि दिली व आपला ऐश्वरयोग दाखविला. स्वतः भगवंतांनीं दिव्यचक्षु दिल्याशिवाय विश्वरूप

दिसत नसतें ! ह्या विश्वरूपाचें वर्णन ११ व्या अध्यायांत आहे. तें विश्वरूप पाहून अर्जुन प्रथम अत्यंत विस्मित व आनंदित झाला व त्यानें देवाचें स्तोत्र गायिलें. त्या विश्वरूपांत प्रभूनें आपलें कालस्वरूप दाखविलें तेव्हां मात्र अर्जुन भ्याला. भगवंतांना अर्जुनाकरवीं दुर्जनसंहार करावयाचा होता म्हणून त्यांनीं भारतीयुद्धांतले वीर कसे पटापट काळमुखीं पडत आहेत हें दाखविलें व म्हणाले.—

**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व । जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।**
**मयैवैते निहताः पूर्वमेव । निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ११-३३**

परमात्मा कालरूपानें प्रगट झाला म्हणजे दुष्टांचा संहार तोच करीत असतो, वीरपुरुषानें निरहंकार होऊन आपण निमित्तमात्र आहोंत हें ओळखून आपल्या भागाला आलेलें कर्म करावें, विश्वचालकाच्या हुकुमाची बजावणी करावी, हेंच याचें तात्पर्य आहे. देवाचें तें विश्वरूप पाहून अर्जुन संतोष पावला व भयभीतही झाला. त्यानें पुन्हां भगवंतांची गोड वाणीनें स्तुति केली ( ११-३६ ते ४६ ). हें स्तोत्र अत्यंत बहारीचें आहे. देवाचें विश्वरूप पाहिल्यावर म्ह० त्याच्या विश्वात्मक निर्गुणस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यावर हें स्तोत्र केलें आहे. भगवंताच्या व्यापक स्वरूपाची ही प्रार्थना आहे. विश्वरूप पाहिल्यावर अर्जुनाला वाटलें कीं हें एकदां पाहिलें हें ठीक झालें, पण आपल्याला तो आपला रोजचा सगुणरूप कृष्णच बरा !

**किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।**
**तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ११-४६ ॥**

भगवान् म्हणाले ' अर्जुना ! मी तुजवर प्रसन्न होऊन आपल्या योगबलानें हें तेजोमय अंनत विश्वरूप तुला दाखविलें, ' न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैः नच क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः'—वेदाध्ययन, यज्ञयाग, दान, उग्रतपें व अनुष्ठानें यांनींही न होणारें हें विश्वरूपदर्शन केवळ माझ्या प्रसादानें झालें

आहे, ' येथें तूं आपलें चित्त स्थिर कर असें म्हणून देवानें अर्जुनाच्या आग्रहास्तव आपलें सौम्य सगुण कृष्णरूप धारण केलें, व म्हणाले—

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ११–५४ ॥
मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ११–५५ ॥

देवांनासुद्धां हें विश्वरूपदर्शन दुर्लभ आहे, हें वेदाध्ययनानें किंवा यज्ञदानतपादि कोणत्याही साधनानें होणारें नाहीं, तथापि केवळ अनन्यभक्तीच्या योगानें मला जाणणें, पाहणें व मत्स्वरूपीं समरस होणें भक्तीला सहज आहे. ह्यांत एक महत्वाचा सिद्धांत आहे. परमात्म्याचें विश्वरूप म्हणजे निर्गुणनिराकाररूप वेदाध्ययनादि साधनांनीं जाणतां येत नाहीं, तें अनन्यभक्तीच्या योगानें आत्मसमर्पण करणाऱ्या व सर्वांभूतीं निर्वैर झालेल्या भक्ताला प्राप्त होतें, तात्पर्य निराकारदेवाचें ज्ञान सगुण भक्तीचे योगानें होतें, ईश्वरप्रसादानें भक्ताला ब्रह्मज्ञान होतें. भक्ति ज्ञानाची जनयित्री आहे, भक्ति आधी नंतर ज्ञानप्राप्ति असा हा प्रकार आहे. ही अर्थात् ज्ञानपूर्व ह्म० गौणीभक्ति होय. ज्ञानोत्तर किंवा परा भक्ति किंवा अद्वैतभक्ति ही अखेरची स्थिति होय. तेथें ज्ञान व भक्ति एकरूप आहेत. ह्यानंतर अव्यक्ताची ह्म० निर्गुणाची उपासना करणारे व व्यक्ताची ह्म० सगुणाची उपासना करणारे ह्यांत युक्ततम कोण हा अर्जुनानें प्रश्न केला. उत्तरांत भगवंतांनीं असंदिग्धरीतीनें सगुणोपासनेस वरचें स्थान दिलें आहे. व्यक्त ह्म० करणगोचर, सोपाधिक, सगुणसाकार रूप, व अव्यक्त म्ह. निरुपाधिक, निर्गुणनिराकार ब्रह्म ( अञ्ज्–अभिव्यक्त करणें ह्या धातूपासून व्यक्त व अव्यक्त दोन्ही शब्द झाले आहेत. ) कोणत्याही प्रमाणानें जें अभिव्यक्त केलें जात नाहीं तें अव्यक्त-अव्यक्ताचें स्वरूप सर्व उपनिषदांनीं वर्णिलें आहे व गीतेनेंही तें स्वीकारलें आहे, तथापि गीतेनें सगुणही स्वीकारिलें आहे.

[library stamp] वाचनालय, सातारा.



देव निर्गुण आहे व सगुण आहे, दोन्ही त्याचींच रूपें आहेत, पातळ तूप व घट्ट तूप यापेक्षां त्यांच्यांत भेद नाहीं, तथापि देवांनीं व्यक्ताची म्ह० सगुणाची उपासना सुलभ व श्रेष्ठ असून अव्यक्ताची म्ह० निर्गुणाची तशीच मोक्षप्रद पण अधिक कष्टाची आहे असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे. सर्वेंद्रियासहित मजमध्यें चित्त घालून जे श्रद्धेनें मला निरंतर भजतात ते श्रेष्ठ होत; आतां जे अक्षर, कूटस्थ, अनिर्देश्य, अचिंत्य, अचल अशा ब्रह्माची उपासना करितात तेही मलाच पोंचतात–'ते प्राप्नुवन्ति मामेव–' पण त्यांना अधिक क्लेश आहेत–'क्लेशोधिकतरस्तेषां'– त्यांना कष्ट अधिक आहेत, अव्यक्त गति देहधाऱ्यांना क्वचितच प्राप्त होते, पण जे सर्वकर्में मला समर्पण करून मत्पर होतात व अनन्यभावानें माझें ध्यानभजन करितात त्यांना ह्या संसारसागरांतून तारून नेणारा मी आहें ( १२-२ते ६ ). ह्यासाठीं मनबुद्धि मला अर्पण कर, मन माझ्या ठिकाणीं निश्चळ ठेवतां येत नसेल तर त्याचा अभ्यास कर, अभ्यासही नियमित काळ होत नसेल तर होणारीं कर्मे मला अर्पण कर, हेंही होत नसेल तर सर्वकर्मफलत्याग कर, तात्पर्य–माझ्या प्राप्तीसाठीं कांहीं तरी कर- मी तुझें साह्य करण्यास तयार आहें असें भक्तप्रेमानें देवांनीं सांगितलें आहे ( १२–७ ते ११ ). सगुणभक्तीच्या बलानें निर्गुणाचें ज्ञान होतें असें वर म्हटलें आहे. निर्गुण म्ह० गुणातीत–सत्व, रज व तम ह्या तीन गुणांच्या पलीकडचें. सकल सृष्टि त्रिगुणात्मक आहे, गुणत्रयानीं व्यापलेलें नाहीं असें ह्या सृष्टींत कांहीं नाहीं, त्रिगुणात्मक पदार्थांनीं मोहित झालेलें हें जग यांच्या पलीकडच्या निर्गुणाला जाणत नाहीं ( ७–१३ ). तीन गुणांची लक्षणें, कार्यें, वगैरेंचें वर्णन १४ व्या अध्यायांत केलें असून कर्मांचा कर्ता गुणांहून अन्य नाहीं व मी गुणांहून वेगळा आहे असें द्रष्टा जेव्हां विवेकानें जाणतो तेव्हां तो निगुर्णाला येऊन मिळतो ( १४–१९ ). सृष्टि हा गुणांचा मोठा बाजार आहे, प्रपंच त्रिगुणानें भरलेला व साधन मार्गही त्रिगुणांनीं वेढला आहे, सर्व कांहीं त्रिगुणात्मक

आहे ( १८–४५ ) हें जाणावें म्हणून भगवंतानीं श्रद्धा, आहार, यज्ञ दान, तप ही त्रिगुणात्मक कशीं आहेत हें १७ व्या अध्यायांत सांगितलें असून १८ व्यांत त्याग, त्यागी, ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धि, धृति व सुख ह्यांचें त्रैविध्य सांगितलें आहे. गुणांत राहून गुणातीत होण्याचा, निर्गुणपद पावण्याचा, उपाय एकच आणि तो भक्ति हा होय असें देव पुढील श्लोकांत सांगतातः—

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**
**स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ १४–२६ ॥**

जो अव्यभिचारी ह्म० एकांतिक भक्तियोगानें मला भजतो तो ह्या गुणांच्या पार जाऊन ब्रह्मभावाला योग्य होतो–कारण 'ब्रह्मणो हि प्रतिष्ठाऽहं'–ब्रह्माची, अव्यय अशा अमृतत्वाची ह्म० मोक्षाची, शाश्वत ह्म० सनातन धर्माची व निरतिशय सुखाची प्रतिष्ठा–आधार व निवासस्थान एक मी आहे ( १४–२६ ते २७ ). गीतेच्या १८ व्या अध्यायाचा ह्म० गीतेचा उपसंहार 'पराभक्ती'च्या दर्शनानें पुनीत झाला आहे. श्लोक ४६ ते ६७ पर्यंत नीट पाहिलें म्हणजे कर्म, उपासना, ज्ञान व ज्ञानोत्तरभक्ति ह्या पायऱ्या क्रमानें ध्यानांत येतात. स्वकर्म–निरत होऊन ' स्वकर्मणा तमभ्यर्च्य'–आपल्या स्वधर्माचरणानें देवाची पूजा करावी. संग व फलाशा सोडून स्वकर्म केल्यानें नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त होते, ' सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ' ही सिद्धि प्राप्त झाली कीं त्याला ब्रह्माची प्राप्ति कशी होते तें ऐक. बुद्धि शुद्ध झालेली, विषयांपासून मन आवरलेलें, एकांतसेवन, युक्ताहारविहार, ध्यानयोगानें वैराग्य अंगीं भरलेलें, षड्रिपूंच्या त्यागाबरोबर 'मी मम' सुटलेलें व यामुळें शांति पावलेला हा पुरुष 'ब्रह्मभूयाय कल्पते' मगः—

**ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।**
**समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ १८–५४ ॥**

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्वतः ।**
**ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ १८–५६ ॥**

येथें ब्रह्मभाव आणि पराभक्ति हीं दोन वेगवेगळीं दिसतनाशी होऊन एकमेकांच्या लाटा एकमेकांत कालवतात, ज्ञानभक्ति एकमय होतात, व त्या एकार्णवांत हा ज्ञानीभक्त लीन होतो. गीतोपदेशाची पराकाष्ठा येथें होते. ईश्वर सर्वभूतांच्या हृदयांत आहेः—

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६३ ॥**

हें गुह्यतर ज्ञान सांगितल्यावर शेवटचा गोड घास ‘ सर्वगुह्यतमं ’— गीतेचें सारसर्वस्व दोन श्लोकांत सांगितलें आहे. त्यांतला एक ‘ मन्मना भव ’ हा पूर्वीं येऊन गेलाच आहे. दुसरा श्लोकः—

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८–६७ ॥**

## ४ गीता आणि उपनिषदें.

वेदाचें सार उपनिषदांत व उपनिषदांचें भगवद्गीतेंत सामावलें आहे. ‘ सर्वोपनिषदो गावो ’ हा गीताध्यानाचा श्लोक सर्व गीतापाठकांच्या परिचयाचा आहे. त्याचा अर्थ असा आहेः—उपनिषद्रूप गाईचें दोहन गोपालकृष्णानें पार्थवत्साच्या निमित्तानें केलें असून त्या थोर गीतामृताचें सेवन करणारे भोक्ते सर्व जाणते लोक आहेत. उपनिषदांचें सार शब्दतः व अर्थतः भगवद्गीतेंत कसें सामावलें आहे हें पाहण्यासारखें आहे. उपनिषदांचें अद्वैतामृत गीतेंत कसें भरलें आहे व उपनिषदांतील सिद्धांत, शब्द व श्लोक गीतेंत कसे उतरले आहेत हें आपण थोडक्यांत पाहूं. आत्म्याचें अमरत्व; जीवपरमात्म्यांचें ऐक्य; सृष्ट्युत्पत्तीची काहणी; दृश्याचा विवर्त; गुरूपदेशाची अवश्यकता; सम्यग् ज्ञान, तप, सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य इ० साधनांची जोपासना;

इ० तत्वें उपनिषदांत तशींच गीतेंत सांगितली असून शोकमोहांना दूर सारून जीवाला ब्रह्मत्वाचें सुख या देहांतच भोगतां येतें अशी धीराची शिकवण उपनिषदांनीं दिली आहे व गीतेचेंही तेंच तात्पर्य आहे. उपनिषदांची भाषा तत्वज्ञानाची आहे, गीतेनें त्याला भक्तीच्या भाषेची जोड दिली आहे. उपनिषदांचा देव निर्गुण आहे तर गीतेचा देव निर्गुण तसाच सगुणही आहे. उपनिषदांत आत्मानुभवावर जोर आहे, गीतेंत ज्ञानयुक्त भक्तीवर जोर आहे. असो, दोहींचें सार एकच आहे. उपनिषदांतील मुख्य सिद्धांत सारे अद्वैतब्रह्माचें प्रतिपादन करणारे आहेत.

आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळें उत्पन्न होणारे ' शोक मोह ' त्याच्या ज्ञानानें दूर होतात हें उपनिषदांनीं सांगितलें आहे व भगवद्गीतेचेंही हेंच तात्पर्य आहे. उपनिषदांतील ब्रह्मविद्या भगवंतानीं गीतेंत आणली आहे व ती आणतांना उपनिषदांतील कल्पना, शब्दयोजना व कांहीं कांहीं तर श्लोकचे श्लोक किंवा श्लोकार्ध गीतेंत जसेच्या तसेच आणले आहेत. थोडीं उदाहरणें देतों. ' अथ धीरा अमृतत्वं विदित्वा ध्रुवं अध्रुवेष्विह न प्रार्थयन्ते ' ( क. २–४–२ ) हा विचार दुसऱ्या अध्यायांतील सांख्ययोगांत स्पष्ट केला आहे. 'ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः ' ( क. २–६–११ ) हें उपनिषदांतील अश्वत्थाचें रूपक गीतेनें १५ व्या अध्यायांत घेतलें आहे. देवयान, पितृयान, धूममार्ग, पितृलोक व चंद्रलोक या कल्पना छांदोग्यांत ( ५–३ ) आहेत त्या व अधिभूत व अध्यात्म हीं पदें तैत्तिरीयोपनिषदामधील ( १–७ ) आहेत. हा सर्वच विषय गीतेच्या आठव्या अध्यायांत आला आहे. क्षराक्षर, व्यक्ताव्यक्त हीं पदें श्वेताश्वतरोपनिषदांत ( १–८ ) आहेत तीं गीतेंत ( अ. १४–१८ ) व ( अ. ८–२० ) यांत आलेलीं आहेत.

( १ ) 'इंद्रियेभ्यः पराह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः' (कठ.१–३–१० ) या श्लोकाचा फक्त चतुर्थचरण ' बुद्धेरात्मा महान् परः ' असा आहे

तो गीतेंत ( ३–४२ ) 'यो बुद्धेः परतस्तु सः' असा बदलला आहे, बाकीचे तीनही चरण एकच आहेत.

( २ ) 'श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः शृण्वन्तोऽपि बहवो यन्न विद्युः। आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धाश्चर्यो ज्ञाता कुशलानुविष्टः' (क.१–१–७) या श्लोकाची छाया गीतेंतील 'आश्चर्य वत्पश्यति कश्चिदेनं' (२–२९) या श्लोकावर पडली आहे.

( ३ ) छांदोग्यांत धर्मस्कंध तीन सांगितले आहेत. यज्ञ, अध्ययन, दान हा प्रथमस्कंध, तप हा द्वितीय व ब्रह्मचर्य आणि आचार्यकुलवास हा तृतीयस्कंध ( छां.२–२१ ). गीतेंत ह्या सर्वांचें महत्व स्पष्टच आहे.

( ४ ) 'त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं हृदींद्रियाणि मनसा सन्निरुद्ध्या' ( श्वे. २–८–२५ ) ह्यांत सांगितलेला योगच गीतेच्या ६ व्या अध्यायांत श्लो. ११ 'समं कायाशिरोग्रीवं' इ. प्रकारें वर्णिला आहे.

( ५ ) अचिंत्य, अव्यय, सूक्ष्म त्याचप्रमाणें अतिजवळ व अतिदूर अशा ह्या आत्म्याचें नेत्रानें किंवा वाणीनें ग्रहण होत नाहीं. 'न तपसा कर्मणा वा' तर हा 'ज्ञानप्रसादेन निष्कलं ध्यायमानः' असें मुण्डकोपनिषदांत म्हटलें आहे. हाच भावार्थ ( गीता अ. ११ श्लोक ४७–४८) मध्यें व्यक्त झाला आहे.

( ६ ) 'भवाप्ययौ हि भूतानां' ( मां. ६-७ ) ( गीता ११-२ )
( ७ ) 'उभौ तौ न विजानीतो' ( क.१-२-२९ ) (गीता २–१९ )
( ८ ) 'नवद्वारे पुरे देही' ( श्वे. ३-१८ ) ( गीता ५-१३ )
( ९ ) 'मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्' ( श्वें. ६-२० ) ( गीता ७-१४ )

( १० ) 'एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि सूर्याचंद्रमसौ विधृतौ'॥ ( बृ. ३-८-९ ) 'यदादित्य गतं तेजो...यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम्' ( गी. १५-१२ )

( ११ ) 'अधश्चोर्ध्वं प्रसृतेदं ब्रह्मैवेदं' ( मुं.२-२-११ ) 'अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा' ( गीता १५-२ )

( १२ ) ' किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ' ( बृ. ४-४ १२ ) ' युद्ध्यस्व विगतज्वरः' ( गीता ३-३० )

( १३ ) 'सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितं' ( श्वेता. ३-१७ ) ( गी. १३-१४ )

## ५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति.

देवाची भक्ति नऊ प्रकारांनीं करितात. नवविधा भक्ति प्रल्हादाच्या मुखानें प्रगट झाली. प्रल्हादाला त्याच्या पित्यानें म्ह० हिरण्यकशिपूनें सांगितलें कीं ' बाळा ! तूं गुरूपाशीं जें शिकलास त्यापैकीं एखादा चांगलासा पाठ म्हणून दाखीव पाहूं ! ' तेव्हां प्रल्हादानें उत्तर केलें, ' बाबा ! नवविधाभक्तीनें विष्णूला भजणें हाच उत्तम पाठ असें मला वाटतें. ' प्रल्हाद म्हणालाः—

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ ७-५-२३ ॥**

विष्णूचें कथाश्रवण, कीर्तन, स्मरण, चरणसेवन, पूजन, वंदन, दास्य, सख्य, व आत्मार्पण ही नवविधाभक्ति. यापैकीं कोणतीही एक भक्ति अत्युत्कटतेनें केली कीं भगवंताची प्राप्ति होते. श्रवणभक्तीनें परीक्षिती, कीर्तनभक्तीनें नारद, शुक व सनत्कुमार, स्मरणभक्तीनें प्रल्हाद, पाद-सेवनभक्तीनें लक्ष्मी, अर्चनभक्तीनें पृथुराजा, वंदनभक्तीनें अक्रूर, दास्यभक्तीनें मारुति, सख्यभक्तीनें अर्जुन व आत्मनिवेदनभक्तीनें बळी, याप्रमाणें भक्त उद्धरल्याचें भागवतानंतर अनेक ग्रंथांत सांगितलें आहे. बृहदारण्यांत ' आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः'—श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार असे जे चार प्रकार सांगितले आहेत त्याचाच भागवतानें सर्व लोकांच्या सोयीसाठीं नवविधाप्रकारानें विस्तार केला आहे. भागवताला हरीच्या निर्गुण-

रूपाप्रमाणें सगुणरूपही संमत असल्यामुळें सगुणोपासनेच्या दृष्टीनें त्यानें नवविधा भक्ति सांगितली आहे.

गीतेंतही भागवतांतली नवविधा भक्ति सूक्ष्मरूपानें प्रतीत होतच आहे, म्हणजे गीता व भागवत ह्या दोन्ही ग्रंथांना नवविधाभक्ति मान्य आहे. गीतेंत नवविधाभक्ति कोठें कशी आली आहे हें संक्षेपानें सांगतों:–

( १ ) **श्रवणः**—'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः' (४–३४ ), 'अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते' ( १३–२५ ), 'अध्येष्यते च य इमं' ( १८–७० ).

( २ ) **कीर्तनः**—'सततं कीर्तयन्तो मां' ( ९–१४ ).

( ३ ) **स्मरणः**—'अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः' ( ८–१४ ), 'यज्ञानां जपयज्ञोस्मि' ( १०–२५ ).

( ४ ) **पादसेवनः**—'सेवया–उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं' ( ४–३४ ).

( ५ ) **अर्चनः**—'यतन्तश्च दृढव्रताः' ( ९–१४ ), 'मद्याजी भव' ( ९–३४ ).

( ६ ) **वंदनः**—'नमस्यन्तश्च मां भक्त्या' ( ९–१४ ), 'तद्विद्धि प्रणिपातेन' ( ४–३४ ), 'नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं' ( ११–५ ), 'नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः' ( ११–३९ ). 'नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोस्तुते ते सर्वत एव सर्व' ( ११–४० ).

( ७ ) **दास्यः**—'करिष्ये वचनं तव' ( १८–७३ ).

( ८ ) **सख्यः**—'सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं' ( ११–४१ ).

( ९ ) **आत्मनिवेदनः**—'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' (१८–६६), 'मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा' ( ३–३० ), 'ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः' (४–२४) 'यत्करोषि यदश्नासि' (९–२७).

वेदोपनिषदांतील गूढ ब्रह्मविद्या लोकांपर्यंत पोंचविण्याचें काम हिंदुस्थानांतील साधुसंतांनीं व कवींनीं केलें, पण देशी भाषांचा उदय

होण्याच्या अगोदर व उपनिषदानंतर गीता आणि भागवत हे दोन लोकोत्तर ग्रंथ संस्कृत भाषेंत निर्माण झाले. एका बाजूला वेदोपनिषदांतील आत्मज्ञान आणि दुसऱ्या बाजूला देशी भाषांतील साधुसंतांनीं पुरस्कारलेला भागवतधर्म या दोहोंमधले हे दोन ग्रंथ दुवे आहेत. उपनिषदांतील ब्रह्म-विद्या ह्या ग्रंथांनीं भक्तीशीं संमिश्र करून लोकांपुढें ठेविली. लोकांना समजतील, पटतील व रुचतील अशीं सुंदर तत्वें ह्या ग्रंथांनीं ग्रथित केलीं. ही गोष्ट तर निर्विवाद सिद्ध आहे कीं गेल्या २।३ हजार वर्षांत ह्या दोन ग्रंथांचा लोकांच्या संस्कृतीवर जो परिणाम झाला तो दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांनीं झाला नाहीं. गीतेवर शंकराचार्यादि आचार्यांनीं भाष्यें करून लोकांच्या ज्ञानविचाराला चालन दिलें व भगवदर्पणबुद्धीनें स्वधर्मकर्म कसें करावें हे शिकविलें आणि भागवतानें कृष्णभक्ति हिंदुस्थानभर फैलावली. भागवतधर्माचे गीता आणि भागवत हे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. पहिल्यानें श्रीकृष्णमुखानें प्रगट झालेलें दिव्य ज्ञान लोकांच्या हातीं दिलें व दुसऱ्यानें श्रीकृष्णचरित्राची माधुरी लोकांस चाखावयास लावून कृष्णोपासनेचे वैष्णवपंथ द्रविड देशांत व महाराष्ट्रांत, गुजराथेंत व राजपुतान्यांत, उत्तर हिंदुस्थानांत व बंगाल्यांत उत्पन्न केले व त्या उपासनेच्या स्फूर्तिबळावर सर्वत्र देशी वाङ्मय उदयास आणलें.

# ४ श्रीमद्भागवत.

## १ गीता आणि भागवत

१ वैष्णवधर्माच्या म्ह० भागवतधर्माच्या प्रसारास जितकी भगवद्गीता कारण झाली तितकेंच किंबहुना अधिकच भागवतपुराण कारण झालें आहे. उपनिषदें, वेदांतसूत्रें व सांख्ययोगादि शास्त्रें भगवद्गीतेच्या पूर्वीं झालीं होतीं व त्यांच्या सिद्धांतांचें एकीकरण भगवद्गीतेनें मोठ्या चातुर्यानें करून सगुणोपासनेची म्ह० भक्तीची गोडी त्यांत घातली. भागवतानें–त्यांत भगवंताचीं व भगवद्भक्तांचीं उज्ज्वल चरित्रें गायिलीं असल्यामुळें–लोकांना परमार्थाचा मार्ग दाखविण्याच्या कामांत गीतेच्याही पुढें एक पाऊल टाकलें आहे. उपदेश आणि चारित्र्य हीं दोन्ही महत्वाचीं असलीं तरी सामान्य जनतेवर उपदेशापेक्षां चारित्र्याचा ठसा अधिक उमटतो ही गोष्ट निर्विवाद आहे. गीता आणि भागवत दोन्ही ग्रंथांनीं केवलाद्वैत सांगितलें आहे व भक्तीच्या योगानें आत्मज्ञान होतें व ज्ञानानंतरही पराभक्तीचें सौख्य भोगण्यांतच परमकल्याण आहे असें शिकविलें आहे. दोन्ही ग्रंथ ज्ञानभक्तिप्रधान व तुल्यबल आहेत. ज्या श्रीकृष्णानें अर्जुनाला भगवद्गीता सांगितली त्याच श्रीकृष्णानें उद्धवाला एकादशस्कंध सांगितला आहे. पहिली भगवद्गीता या नांवानें प्रसिद्ध आहे. एकादशाला उद्धवगीत असेंही म्हणतात. गीता युद्धापूर्वीं प्रसंगानें अर्जुनास सांगितली तर उद्धवगीत ही भगवंताची जगाला अखेरची अमूल्य देणगी आहे. गीता महाभारताच्या भीष्मपर्वांत आहे, उद्धवगीत भागवताच्या एकादशस्कंधांत आहे. अर्जुनगीतेचे १८ अध्याय व ७०० श्लोक आहेत. उद्धवगीताचे ३१ अध्याय व १३६७ म्ह० जवळजवळ दुप्पट श्लोक आहेत. उद्धवगीतापेक्षां भगवद्गीता लोकांच्या अधिक पाठांत आहे, तसें महाभारतापेक्षां भागवत लोकांच्या

अधिक वाचनांत आहे–पारायणांत आहे. भारतांत कौरवपांडवांच्या रम्य युद्धकथा आहेत, भागवतांत भक्तोद्धाराच्या दिव्य कथा आहेत. भारतांतील तशींच भागवतांतील अनेक आख्यानें व उपाख्यानें अन्य पुराणांतूनही वर्णिलेलीं आहेत. भारत व भागवत दोन्ही ग्रंथ लोकांच्या प्रेमादरास पात्र झाले आहेत, दोन्ही ग्रंथ लोकोद्धाराचें कार्य शतकानुशतकें करीत आहेत. वैष्णवसांप्रदायांत विष्णुपुराण, हरिवंशपुराण व मुख्यतः भागवतपुराण, महाभारत व रामायण, नारदपांचरात्र, शांडिल्यांची आणि नारदांची भक्तिसूत्रें हे ग्रंथ सर्वमान्य समजतात, त्यांतही गीता आणि भागवत हे दोन ग्रंथ अत्यंत लोकप्रिय आहेत. भागवतधर्माचे हे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. मराठींत ज्ञानेश्वरांनीं अर्जुनगीतेवर भाष्य केलें आहे, एकनाथांनीं उद्धवगीतावर केलें आहे व 'गीता–भागवत करिती श्रवण । आणिक चिंतन विठोबाचें' म्ह० गीता–भागवताचें अध्ययन करून जे विष्णूची ह्म० कृष्णाची भक्ति करितात त्यांना तुकोबांनीं वैष्णव ह्म० भागवत म्हटलें आहे.

## २ भागवतपुराण

भागवतपुराण हें अठरापुराणांपैकीं एक आहे, पण सर्वांत अत्यंत लोकप्रिय आहे. व्यासांनीं बाराबारा हजार श्लोकांचीं १८ पुराणें केलीं व त्यांत कमीजास्त होत होत तीं सध्याच्या स्थितींत आपणांस मिळालीं आहेत. कित्येक पुराणांत विशिष्ट पंथाच्या अभिमान्यांनीं मागाहून पदरचे भाग घालून भेदभाव माजविला आहे. उदाहरणार्थ, पद्मपुराणांत शिवाची व शैवांची व स्कंधपुराणांत विष्णूची व वैष्णवांची निंदा केलेली आढळते! दक्षिणेंत शैववैष्णवांचे दुराग्रह वाढल्यानंतर हा प्रक्षिप्त भाग त्यांत घुसडला गेला असावा! वेदोपनिषदांत, महाभारतांत व भागवतपुराणांत शिवविष्णूंची एकरूपताच वर्णन केली आहे. रामानुजमध्वांच्या वेळेपासून शैववैष्णवांच्या परस्परविरोधास द्रविड देशांत ऊत आला, तथापि महाराष्ट्रवाङ्मय यापासून अगदीं अलिप्त

राहिलें ही आनंदाची गोष्ट आहे. असो. अठरा पुराणें मिळून एकंदर चार लक्ष ग्रंथ आहे. अठरा पुराणांपैकीं दहा शिवपर, चार विष्णुपर, दोन ब्रह्मापर, एक अग्निपर व एक सूर्यपर आहे. यांपैकीं विष्णुपुराण, भागवतपुराण, मात्स्यपुराण व वायुपुराण हीं अधिक प्राचीन आहेत असें विद्वानांचें मत आहे. हीं पुराणें हल्लींच्या स्वरूपांत दोन हजार वर्षें तरी आहेत. यांपैकीं पहिलीं तीन विष्णुपर व चौथें वायुपुराण शिवपर आहे. ' पुराणे धर्मनिश्चयः '–पुराणांतून धर्माचा निश्चय केलेला असतो. धर्म, इतिहास, विद्या, देवाधर्माच्या गोष्टी, वंशानुचरित, तीर्थ-दानव्रतादिकांची माहात्म्यें पुराणांत वर्णिलीं असून लोकांत धर्मनिष्ठा वाढविण्याचे कामीं पुराणांचा पुष्कळ उपयोग झालेला आहे. आपत्ति-काळीं धैर्यबळ देऊन लोकांना धर्माच्या व नीतीच्या मार्गावर ठेवण्याचे कामीं पुराणांची कामगिरी चांगली झाली आहे. आपणांस येथें सर्व पुराणांत अत्यंत लोकप्रिय व वैष्णवधर्म वाढविण्याचें श्रेष्ठ कार्य करणारें जें भागवतपुराण त्याचाच मुख्यत्वें विचार करावयाचा आहे. हा ग्रंथ ' मंगलाय च लोकानां क्षेमाय च भवायच ' म्ह. लोकांचें कल्याण व्हावें व त्यांचा भव म्ह. उत्कर्ष व्हावा यासाठीं अवतरलें आहे.

## ३ भागवताचा काल.

भारतीयुद्धाचा, गीतेचा व भागवताचा काळ साधारणतः एकच आहे अशी जुनी समजूत आहे. अलीकडच्या विद्वानांनीं भागवताला शक्य तितकें अलीकडे ओढण्याचा अट्टहास चालविला आहे. गीता तीन हजार वर्षांमागची आहे पण भागवत मात्र हजार बाराशें वर्षांतलें आहे असें ठरविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, पण कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं ' पुराणनिरीक्षणांत ' व यशवंतराव कोल्हटकर यांनीं ' भागवतादर्शांत ' अनेक प्रमाणें देऊन भागवत हा ग्रंथही दोन अडीच हजार वर्षांपूर्वींचा आहे असें सिद्ध केलें आहे.

**पाणिनी**च्या अष्टाध्यायींत ( ४–३–९८ ) ' वासुदेव ' व ' अर्जुन ' हीं नांवें आलीं आहेत व पाणिनीचा काल ख्रि० पू. ९०० समजतात.

संस्कृतभाषेचा पहिला पंडित सर वुइल्यम् **जोन्स** म्हणतो कीं 'कृष्ण व त्याच्या कथा खि. पू. ९०० च्या पूर्वींपासून हिंदुस्थानांत लोकप्रिय झाल्या होत्या.' **भासाच्या काळीं** (खि. पू. ५५०–५०० ) ह्म० सुमारें **२५००** वर्षांपूर्वींच कृष्ण ही लोकांची आराध्यदेवता ठरून गेली होती, व कृष्णाला विष्णूचा अवतार किंबहुना प्रत्यक्ष महाविष्णुच मानीत असें **भासाच्या 'बालचरितम्'** ह्या नाटकावरून सिद्ध होत आहे. त्याच्या मंगलाचरणांतच कृतयुगीं जो शेषशायी नारायण, त्रेतायुगीं जो वामनरूपी विष्णु, द्वापारीं जो दूर्वादलश्याम रावणांतकारी राम तोच 'कलियुगे वः पातु दामोदरः' असें म्हटलें आहे. 'त्रिलोककेतुर्जगतश्च कर्ता। भर्ता जनानां पुरुषः पुराणः' तोच वसुदेवदेवकीच्या पोटीं अवतरला आहे असें पुढें नारदानें म्हटलें असून 'चक्रशार्ङ्गगदाशंख-नंदक' हीं पञ्चायुधें कृष्णाच्या सेवेसाठीं आल्याचें वर्णन केलें आहे. तिसऱ्या अंकांत पूतना, शकटासुर, अमलार्जुन, प्रलम्ब, गर्दभवेषधारी धेनुक, तुरगवेषधारी केशी, अरिष्टवृषभ, कालिय इ. असुरांना कृष्णानें बाळपणीं मारल्याचें वर्णिलें आहे. 'भीतानामभयं दातुं समुत्पन्नो महीतले' असें कृष्णाचें ब्रीद असून 'विष्णुना हतस्याप्यक्षयो लोको मे भविष्यति तस्माद्युद्धं करिष्यामि' असें म्हणत अरिष्टासुरानें कृष्णासी युद्ध केलें. तो आणखी म्हणालाः—

**रुद्रो वायं भवेच्छक्रो विष्णुर्वापि स्वयं भवेत्।**
**अमिथ्या खलु मे तर्कः स एव पुरुषोत्तमः ॥** (अंक ३–१२)

श्रीकृष्ण 'अद्यप्रभृति गोब्राह्मणपुरोगासु सर्वप्रजास्वप्रमादः कर्तव्यः' असें कालियाला सांगून त्याला सोडून देतात. 'गोब्राह्मणहिताकडे' कृष्णाचें पूर्ण लक्ष होतें, व 'सर्वप्रजाहितार्थ' त्यांनीं कालियाशीं संग्राम केला होता. यशोदेनें दाव्यानें बांधल्याच्या व गोवर्धनोद्धरणाच्या कथेचा यांत उल्लेख आहे. गोपांगनांवर गोपांप्रमाणेंच कृष्णाचें प्रेम होतें व त्यानें त्यांच्याशीं नृत्य करून त्यांना संतुष्ट केल्याचें भासानें वर्णिलें

आहे. चाणूर, मुष्टीक, कंस यांचा वध केल्याचें ५ व्या अंकांत वर्णिलें आहे. भासाचा काल आतां निश्चित झाल्यामुळें वर दर्शित केलेल्या कृष्णचरित्राची ओळख अडीच हजार वर्षांपूर्वीच भारतीयांस झाली होती हें उघडच आहे ( भासाच्या नाटकावरील 'किरात' यांची प्रस्तावना पहा ). चंद्रगुप्ताच्या वेळीं ( ख्रिस्तपूर्व ४ थें शतक ) त्याच्या दरबारचा ग्रीक वकील **मॅगेस्थनीस** यानें म्हटलें आहे कीं 'शरीरबळ व बुद्धिबळ या दोन्ही गोष्टींत कृष्ण सर्व मानवांपेक्षां श्रेष्ठ होऊन गेला, त्यानें 'पाप्यां'चा नाश केला, व त्याला लोक देव म्हणून भजूं लागले. त्यानें यमुनातीरावरील मथुरानगरी भरभराटीस आणिली. शौरसेनी लोक त्याची विशेष प्रेमानें पूजा करीत.' हिराक्लीज, हर्क्युलीज, हरिकुलज म्हणजे बलराम ! त्याची आणि कृष्णाची बरोबरीनें लोक पूजा करीत असें **सिसरोनें** म्हटलें आहे. राजपुतान्यांत घोसुंडी येथें ख्रि. पू. २०० हून प्राचीन असा एक शिलालेख सांपडला असून त्यांत वासुदेव व संकर्षण यांच्या मंदिराभोंवतालच्या भिंतीचा स्पष्ट उल्लेख आहे. बौद्धग्रंथांत वासुदेव, बलदेव, केशव, कण्ह (कान्हा) हीं नांवें आलीं आहेत. विष्णुपुराण व भागवतपुराण हीं पुराणें गीतेसारखींच प्राचीन आहेत.

विष्णुपुराणाचें तर तामीळ भाषेंत ४ थ्या शतकांत भाषांतर झालें असून दोन्ही पुराणांच्या आधारावर तामीळ वैष्णवांनीं तिकडे कृष्णभक्तीचा संप्रदाय इतर प्रांतांच्या आधी उभा केलेला आहे. पंजाबांत तुसम येथील विष्णुमंदिराजवळ दोन तलाव व एक प्रासाद 'भागवत' या नांवानें ४ थ्या शतकांत प्रसिद्ध होता असें गुप्तांच्या एका शिलालेखावरून सिद्ध झालें आहे. गुप्तराजे आपणांस 'परम भागवत' म्हणवीत असें त्यांच्या नाण्यांवरून स्पष्ट आहे. 'विष्णु सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाचा कर्ता आहे' असें इ. स. ४८४ मधील मध्यप्रांतांतील एरण गांवीं असलेल्या एका स्तंभावर लिहिलें आहे. पांचव्या शतकांतले कित्येक शिलालेख कोंकणांत व राजपुतान्यांत सांपडले आहेत. आण-

खीही नवीन शोध पुढें होतील किंवा न होतीलही, तथापि श्रीकृष्णाची उपासना अडीच तीन हजार वर्षांपूर्वीची आहे व कृष्णोपासनेचा प्रधान ग्रंथ जो भागवत तो निदान त्या सुमारचा असला पाहिजे असें समजण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. आपणांस येथें कालगणनेचा विचार करावयाचा नसून मुख्यतः भागवतग्रंथानें कोणत्या गुणांवर विष्णु ( कृष्ण ) भक्तीस एवढें मोठें चालन दिलें हेंच पाहावयाचें आहे. कांहीं विद्वान् म्हणतात तितका तो अर्वाचीन नाहीं, तर पुष्कळच प्राचीन आहे एवढें खरें आहे.

## ४ अभेदाची बैठक

भागवताचा आरंभ ‘ जन्माद्यस्य यतः ’ ह्या ब्रह्मसूत्रांतल्या दुसऱ्या सूत्रानें केलेला आहे. त्या श्लोकाचा भावार्थ असा आहे: ‘परमात्मा एक सत्यस्वरूप आहे; देवता, इंद्रियें व पंचभूतें हीं त्रिगुणात्मक सृष्टि सत्य नसूनही त्याच्या सत्यत्वामुळें सत्य भासते पण त्याला आवृत करूं शकत नाहीं; माया व मायाकार्य जें जग त्यांचा ब्रह्मावर अध्यास झालेला नसून ब्रह्म हेंच एकाकार स्वप्रकाशानें स्थित आहे त्याचें आम्हीं ध्यान करितों. ’ सगुण किंवा निर्गुण ही जेथें भाषा नाहीं अशा एकमेवाद्वितीय परमात्म्याचें हें ध्यान आहे. दुसऱ्या स्कंधांत ‘चतुःश्लोकी भागवतांत “सृष्टीच्या पूर्वीं मीच होतों, सत् व असत् ह्म० स्थूल सूक्ष्म किंवा ह्या दोहींला कारण असणारी मूलप्रकृति माझ्याहून अगदीं भिन्न नाहीं, ही दिसणारी सारी दृष्टि माझेंच रूप आहे. प्रलयानंतरही मीच राहणार. आदिमध्यावसानीं मज एकावांचून दुसरें काहींच नाहीं, माया ही केवळ कल्पना आहे. विश्वांत मींच व्यापकपणानें सर्वत्र भरलों आहे, तात्पर्य भूतभौतिक अखिल सृष्टि मत्स्वरूपाकार आहे ” ( स्कंध २ अ० ९ श्लोक ३२ ते ३६ ) असें भगवान् म्हणाले आहेत. भागवतांतल्या अवतारांच्या व भक्तांच्या सर्वकथांत व दशमांतल्या श्रीकृष्णचरित्रांतही सर्वत्र भगवंताच्या ह्याच एकमेव स्वरूपाचें वर्णन आहे.

परमात्मा निर्गुण आहे, सगुण आहे, व सगुणनिर्गुणातीत आहे म्हणजे तोच एक सत्य आहे. ( श्रीकृष्णपरमात्म्याला पूर्णावतार अशा निर्गुण परब्रह्माचें सगुण प्रतिरूप मानतात ). या अर्थानें भागवतानें परमेश्वराचें वर्णन, स्तवन किंवा कीर्तन केलें आहे. ही अतिशय महत्वाची गोष्ट ध्यानांत धरल्याशिवाय भागवताचें अंतरंग लक्षांत यावयाचें नाहीं. ऋग्वेदांतल्या नासदीयसूक्ताला किंवा उपनिषदांतील ब्रह्मतत्त्वाला अगदीं धरूनच हें वर्णन आहे. वेद, उपनिषदें, गीता व भागवत या सर्वांतून ओतप्रोत एक परमात्माच वर्णिला आहे. गीतेनें सगुणाची उपासना सर्वजनसेव्य म्हणून सांगितली व त्या सगुणाचीं मनोहर चरित्रें भागवतानें गायिलीं व आबालवृद्धांसाठीं परमात्मसेवा सुगम करून ठेविली. वेदोपनिषदें व गीताभागवत यांची बैठक एकच आहे हें तत्त्व न विसरतां भागवतांत स्वेच्छ संचार करावा. चित्तांतल्या अशुभवासनां-पासून सुटावें अशी शुद्ध बुद्धि ज्याचे ठिकाणीं उत्पन्न झाली आहे त्यानें 'कलिमलापह' असा हा भागवतग्रंथ नित्य पहावा. रसज्ञांना पदोपदीं रुचकर अशा देवाच्या 'अतिमर्त्य' कथा ऐकून परमसमाधान वाटेल. भारतग्रंथ रचिल्यानंतरही व्यासांच्या मनाची तळमळ जाईना, तेव्हां नारदांनीं व्यासांना आत्मचरित्र सांगून भगवंताचें विमल यश गाण्यास सांगितलें. व्यासांनीं त्याप्रमाणें हा भागवतग्रंथ रचिला व त्यांचें त्यानें समाधान झालें. व्यासांपासून शुकांनीं भगवत्कथांचें श्रवण केलें व परीक्षितिराजाला सात दिवसांत त्या सांगून त्याला शोकमोहभया-पासून वांचविलें. वेदरूपकल्पवृक्षाचें परिपक्व झालेलें व अमृतरसानें भरलेलें असें भागवत हें दिव्य फल आहे.

**निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।**
**पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥१–१–३॥**

भागवत सांगणारे शुकाचार्य सर्वसंगपरित्याग केलेले, विरक्त व सर्वांतर्यामित्वानें वास करणारे होते ( १–२–२ ):—

**यं प्रव्रजन्तमनुपेतमपेतकृत्यं । द्वैपायनो विरहकातर आजुहाव ।**
**पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुः । तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि**

## ५ भागवतांतील मुख्य विषय

आतां भागवतांत काय सांगितलें आहे हें आपण थोडक्यांत पाहूं. पुरुषत्वाला उचित आचरण कोणतें या मुख्य प्रश्नाला ‘ विष्णोश्चरितमद्भुतम् ’ म्ह० विष्णूचें अद्भुत चरित्र हें भागवतानें उत्तर दिलें आहे. भागवत हा नुस्ता तत्वज्ञानाचा ग्रंथ नाहीं तर तत्वज्ञानाचा आचरणावर कोणता परिणाम व्हायला पाहिजे हें शिकवणारा ग्रंथ आहे. भागवतांत अद्वैतज्ञान ओतप्रोत भरलेलें आहे पण तें सगुणभक्तीशीं संयुत केल्यामुळें अत्यंत मधुर व सर्वसेव्य झालें आहे. अत्युच्च ज्ञानाचा अतिमधुर भक्तीशीं संयोग करणारा भागवतासारखा दिव्य ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत दुसरा नाहीं. भागवतानें विष्णूचें चरित्र प्राधान्येंकरून सांगितलें आहे व तें चरित्र अधिक रमणीय करण्यासाठीं तदनुषंगानें प्राचीनभक्तांच्या बोधप्रद कथाही सांगितल्या आहेत. अत्यंत प्राचीन कालापासून लोकांत प्रसिद्ध असलेल्या भक्तांच्या दिव्य कथांचा अलौकिक संग्रह भागवतानें केला आहे. भागवताची भाषा क्वचित् आर्ष, क्वचित् कठिण, पण बहुधा अत्यंत प्रासादिक, प्रौढ व मनोहर आहे. भागवतांतील भक्तकथा अत्यंत चित्ताकर्षक व बोधप्रद आहेत. ह्या भक्तांच्या कथांनीं पुढील भक्त निर्माण केले आहेत! ध्रुव, प्रऱ्हाद, अजामेळ, गजेंद्र, सुदामा इ० भक्तश्रेष्ठांच्या कथा; कपिलदेवहूतींचा संवाद; ऋषभदेवाचें आख्यान; दशमस्कंधांतील कृष्णचरित्र; हे व इतर अनेक रमणीय प्रसंग यांनीं भरतखंडाच्या धार्मिक उन्नतीवर केवढा परिणाम केला आहे हें सर्व प्रांतांतील साधुसंतांचें देशी वाङ्मय पाहूनही वाटेल त्याची खात्री पटणार आहे. सर्व कथांचें धोरण भगवद्भक्तिपर असलें तरी त्यांच्या विविधत्वामुळें ग्रंथाला मनोहारित्व आलें आहे. ध्रुव हा बाल राजपुत्र सापत्नमातेच्या छळामुळें तडक वनांत जातो, तेथें त्यास नारद भेटतात, देव कोठें कसा कशानें भेटेल हें सांगतात व तो वासुदेवध्यानानें साक्षात्कार पावतो. याच्या शेजारीं दैत्यपुत्र प्रल्हादाचें चित्र ठेवून पहा. नारायणाचें नैसर्गिक प्रेम चित्तांत

असल्यामुळें अनेक कठोर प्रसंगांतून सत्यनिष्ठा व विश्वास यांच्या बळावर तो पार पडतो. साक्षात् पिता वैरी व छळक! वदान्य देव भेटल्यावर प्रल्हाद इच्छानिवृत्तिच मागतो! निष्काम प्रेमाची कोण सीमा ही! गजेंद्र हा पशु असून भक्तीच्या उत्कटतेमुळें संकटमुक्त होतो. भावानें पशुही तरतात. अजामीळ पापी नामानें उद्धरतो. एकीकडे ऋषिपत्न्यांचें कोमल प्रेम व दुसरीकडे त्यांच्या पतींची न्यायनिष्ठुरता! सुदामदेव एक दरिद्री पण सत्वधीर ब्राह्मण पोह्यांच्या मोबदल्यांत सोन्याची नगरी मिळवितो! कामवासनेनें भरलेली कुरूप कुब्जा पण तिच्या हीनवासनेचें विशुद्ध प्रेमांत रूपांतर होतें! शुक, ऋषभदेव, कपिल इ० वैराग्याचे पुतळे व त्यांच्याच शेजारीं सर्वभोक्ता द्वारकाधीश श्रीकृष्ण! या विविधत्वामुळें भागवतास केवढें मनोहारित्व आलें आहे!

भागवतरूप कल्पवृक्षाचे एकंदर १२ स्कंध ऊर्फ शाखा आहेत. पहिल्या ९ स्कंधांचा एक गट असून त्यांत सृष्टीचे उत्पत्तिप्रलय म्ह. सर्ग, विसर्ग, लय हे मन्वंतरें, वंश व वंशानुचरित यांसह सांगितले असून भगवद्वतारांच्या व भक्तांच्या कथा सांगितल्या आहेत; दशम स्कंधांत संपूण कृष्णचरित्र, एकादशांत कृष्णानें उद्धवास केलेला बोध व द्वादशांत कृष्णावतारानंतर झालेल्या राजांच्या वंशावळी व कलिसंतरणोपाय सांगितले आहेत. भागवताचा 'अत्र संकीर्तितः साक्षात् सर्वपापहरो हरिः' हा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. भगवान् सर्व पापें दूर करणारा, संकटनाशक, इंद्रियनियामक व भक्तरक्षक आहे हें श्रोत्यापाठकांच्या मनावर ठसविण्यासाठीं देवाभक्तांची चरित्रें सांगितलीं आहेत व त्यांच्या कल्याणासाठीं भक्तिज्ञानवैराग्याचें शुद्ध स्वरूप आरशासारखें स्वच्छ दाखविलें आहे. शुकपरीक्षितीसंवादाबरोबर जागोजाग दुसरे अनेक पोटसंवाद आहेत. नारद–ब्रह्मदेव, विदुर–उद्धव, विदुर–मैत्रेय, कपिल–देवहूती, कृष्ण–उद्धव यांच्या संवादांत ज्ञानविज्ञानाचें व भक्तियोगाचें स्वरूप विशद करून सांगितलें आहे. बाराही स्कधांत मुख्य मुख्य विषय कोणते आहेत ते पाहूं:—

**स्कंध १ ला**:—'मी वेद गुरु व अग्नि यांची सेवा केली, स्त्रीशूद्रांसही धर्मज्ञान व्हावें म्हणून भारतमिषानें वेदार्थ प्रगट केला तरी जीवाला सुखसमाधान कां नाहीं' ह्या व्यासांच्या प्रश्नास नारदांनीं आत्मचरित्र सांगून उत्तर केलें कीं 'उत्तमश्लोकानुवर्णन कर, परमेश्वराचीं लीलाचरित्रें गा म्हणजे शांतिसुख मिळेल' ( अ. ४ ते ६ ). हें ऐकून व्यासांनीं भागवतग्रंथ रचून तो शुकाचार्यांस शिकविला. भारतीयुद्धानंतरची पांडवांची हकीकत, राजा परीक्षित, त्याला झालेला शाप, शुकमुनींची भेट. इ०

**स्कंध २ रा**:—शुक भागवत सांगतात. ईश्वराच्या स्थूल स्वरूपाची उपासना व सूक्ष्मस्वरूपाचें ध्यान, पुरुषसूक्तार्थ, अवतारांचें क्रमशः वर्णन ( अ० ७ ) **चतुःश्लोकी भागवत** ( अ० ९ )

**स्कंध ३ रा**:—विदुरमैत्रेयांचा संवाद; कृष्णाच्या निजधामास जाण्याच्यावेळीं प्रगट होणारी उद्धवाची कृष्णभक्ति ( अ० २ ते ४ ), ब्रह्मांडोत्पत्ति, हिरण्याक्षवध, **कपिलमहामुनींचा अवतार आणि त्यांचा व त्यांची माता देवहूती यांचा अत्युत्कृष्ट संवाद** ( अ० २३ ते ३३ ). हे अकरा अध्याय मननीय आहेत. ह्या संवादांत प्रकृतिपुरुषविवेक, योग, भक्तियोगाचे प्रकार, हे विषय चांगले सांगितले आहेत. 'सर्व शास्त्रांचें लक्ष्य एक भगवान् होय' हा सिद्धांत.

**स्कंध ४ था**:—दक्षयज्ञविध्वंस, **ध्रुवाचें रमणीय चरित्र** ( अ० ८ ते १२ ) लोकच्छलक व ब्रह्मद्वेष्ट्या वेनराजाचा वध ( अ० १४ व १५ ), **विष्णुभक्त पृथुराजा** ( अ० १६ ते २३ ), पुरंजनाख्यान, प्राचीनबर्ही व नारद यांचा संवाद.

**स्कंध ५ वा**:—प्रियव्रतराजा ( अ० १ ) **ऋषभाचें दिव्यचरित्र** व त्याचा मुलांना सुंदर उपदेश ( अ. ३ ते ५ ) अर्हताचा पाखांडमार्ग ( अ० ६ ), **जडभरत** ( अ० ८ ते १२ ). ह्यांत जडभरताला रहूगणानें केलेला उपदेश उत्कृष्ट आहे. पृथ्वीपाताळ व नरकांचीं वर्णनें, भूगोलवर्णन व सृष्ट्युत्पत्ति.

**स्कंध ६:—अजामिलाची कथा व नामस्मरणाची उपपत्ति** ( अ० १ ते ३ ), वृत्रासुराची कथा, त्यांत दधीचिऋषि परोपकारार्थ देहसमर्पण करितात ( अ० १० ) तो भाग उपदेशपर आहे.

**स्कंध ७:**—ह्यांत **प्रल्हादाचें अनुपम व उज्ज्वल चरित्र** सर्वच गोड ( अ० २ ते १० ). **वर्णाश्रमव्यवस्था** व स्वधर्माचरणाचें महत्त्व ( अ. ११ )

**स्कंध ८:—गजेंद्रमोक्ष** ( अ० २ ते ४ ), समुद्रमंथन व देवदैत्य-युद्ध, **शंकराचें जगत्कल्याणार्थ विषभक्षण** ( अ० ७ ), सर्व देव सोडून **लक्ष्मी** विष्णूलाच वरिते ( अ० ८ ), **वामनावतार** व बलीचें औदार्य ( अ० १८ ते २२ )

**स्कंध ९:—राजवंशकथन, भक्त अंबरीषराजाचें आख्यान** ( अ० ४।५ ), सूर्यवंशीचे राजेः इक्ष्वाकु, नृग, मांधाता, ककुत्स्थ, भगीरथ, खट्वांग, सगर, दाशरथीराम, तसेंच ऐल, ययाति, नहुष, शंतनु, भीष्म, यदु व यादवकुलोत्पन्न कृष्ण यांच्या कथा.

ह्याप्रमाणें पहिल्या नऊ स्कंधांत कोणकोणते विषय ठळकपणें आले आहेत तें सांगितलें. या पुढील दहाव्या स्कंधांत कृष्णचरित्र वर्णिलें आहे. ह्या स्कंधाचे ९० अध्याय असून सारा स्कंध अत्यंत रसभरित आहे. वसुदेवदेवकींचा विवाह; आकाशवाणी; कंसाचा दुष्टपणा व श्रीकृष्ण-जन्म; जन्मकाळींचीं शुभलक्षणें; कृष्णाला गोकुळांत नंदयशोदा यांच्या स्वाधीन करून वसुदेवाचें कारागृहांत परत येणें; कंसकृत यादवांचा छळ; गाईब्राह्मणांचा छळ; पूतना, माभळभट, अघासुर, वत्सासुर, तृणावर्त, बक इ० बाळपणींच कृष्णाच्या नाशास सज्ज झालेल्या राक्ष-सांचा संहार; कृष्णाची बाळलीला, गोपींची गाऱ्हाणीं, 'आई! मी माती नाहीं खादली!' कृष्णमुखांत विश्वदर्शन, दधिमंथन, कालियामर्दन, गोपालांसह क्रीडा, गोपालांच्या वनभोजनाचा थाट, म्ह० गोपाळकाला, ब्रह्मदेवाचें गर्वहरण, वृंदावन, वर्षाऋतु व शरदृतु यांची सुंदर वर्णनें,

कृष्णाचें मनोहररूप, गोपींचें कात्यायनीव्रत, यज्ञपत्न्याख्यान, गोवर्धनोद्धार, रासक्रीडा ( रासपंचाध्यायी अ० २९ ते ३३ अत्यंत बहारीचें प्रकरण ); मुरलीची चराचरावर मोहनी, शंखचूड, केशी, अरिष्टासुरादिकांचा वध; अक्रूरागमन, अक्रूरकृष्णांच्या भेटीचा मनोहर प्रसंग व अक्रूराची उत्कट कृष्णभक्ति, गोपींचा विलाप, मथुरेस जाणें, मथुरेची रचना, कृष्णाची लोकप्रियता, मल्लांशीं कुस्त्या व गजमुष्टिकचाणूरांसह कंसवध. कृष्णचरित्राचा पूर्वार्ध येथपर्यंत म्हणजे पहिल्या ४९ अध्यायांत संपला. जरासंधाचा मथुरेला वेढा पडला येथपासून उत्तरार्धास प्रारंभ होतो. जरासंध व कालयवन, सतरा युद्धें, द्वारकेची स्थापना, मुचकुंदाख्यान, रुक्मिणीस्वयंवर, स्यमंतकोपाख्यान व सत्यभामा, अष्टनायिकांपैकीं बाकीच्यांशीं विवाह, कृष्णाची व पांडवांची भेट, भौमासुरवध व सोळा हजार राजकन्यांची मुक्तता, त्यांची कृष्णचरणीं निष्ठा, रुक्मिणीशीं विनोद, कृष्णपत्न्यांचें सुख, पुत्रपौत्रप्राप्ति व त्यांचे विवाह, बाणासुर व नृग यांचीं आख्यानें, तोतया कृष्ण पौंड्रक व त्याचा समाचार, कृष्णाचा गृहस्थाश्रम, जरासंधानें छळलेल्या राजांचे अर्ज, भीमाकरवी जरासंधाचा वध; पांडवांचा राजसूययज्ञ, कृष्णाची अग्रपूजा, शिशुपालाचा वध; शाल्व, रोमहर्षण, दंतवक्र, बल्वल, मुर, शंबर, इत्यादिकाशीं युद्धें व सर्वांवर कृष्णाचा विजय, सर्वदैत्यांचा संहार, सुदामचरित्र, गोपींना अध्यात्मज्ञानाचा उपदेश; वसुदेव, नंद व कृष्ण यांच्या भेटीचें गोड वर्णन, मृतपुत्र आणणें; सुभद्राहरण, वेदस्तुति, इ० प्रकरणें या उत्तरार्धांत असून शेवट अध्यात्मांत केला आहे. हा कृष्णचरितामृतानें ओथंबलेला रासपूर्ण दहावा स्कंध उपासकांना इतका प्रिय आहे कीं कित्येक याचींच पारायणें करीत असतात. अकराव्या स्कंधांत कृष्णानें उद्धवास ३१ अध्यायांत परमार्थाचा उपदेश केला आहे. ज्या संवादांत संपूर्ण आत्मज्ञान आलें असून धर्मनिर्णय केला आहे. असा उद्धववासुदेवांच्या संवादामुळें अकरावा स्कंध उत्कृष्ट झाला आहे. बाराव्या स्कंधांत कृष्णावताराच्या

उपर वाचनालय, सातारा.



समाप्तीनंतर भरतखंडांत जे राजे झाले त्यांच्या वंशावळी आल्या असून कलिग्रस्त जीवांचा उद्धार भगवद्गुणगानानेंच होणार आहे असा शेवटीं उपदेश केला आहे.

## ६ श्रीकृष्णाचा संसार!

'श्रेष्ठ पुरुष जसा वागतो त्याप्रमाणेंच इतर लोक वागतात, तो जें प्रमाण मानतो तेंच इतर प्रमाण मानतात; मीं निरलसपणें कर्तव्यदक्ष राहणार नाहीं तर लोकही माझ्याच मार्गानें जातील म्हणून मला कांहीं एक मिळवायचें नसून मीं आपलीं कामें नित्य करीत असतों; इतकेंच कीं, अज्ञजन आसक्त होऊन व फलाशा धरून कर्में करितात व मी अनासक्त राहून कर्में करितों. शाहण्या माणसानें लोकांचा बुद्धि-भेद न करितां लोकांप्रमाणेंच वागावें, मात्र समजून वागावें. यालाच लोकसंग्रह म्हणतात' असें लोकसंग्रहाचें सुंदर तत्व भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे (गीता अ० ३ श्लोक २१ ते २६). या तत्वाप्रमाणेंच भगवंताचें चरित्र होतें. संसारिकांत ते संसारी माणसांसारखें कसें वागत व त्यांच्या वागण्याचा कित्ता सामान्यांनीं कसा घ्यावा हें शिकवण्या-करितां भागवतांत दोन सुंदर अध्याय दिले आहेत. मोठ्या माणसाला सामान्यांसारखें वागावयाचें असून अधिकही कांहीं करावें लागतें. भगवंतांनीं तें अधिक कोणतें हेंही सांगितलें आहे. साधूंचें रक्षण, दुष्टांचा संहार व धर्मसंस्थापना हें त्यांचें विशेष कार्य होय, व हें त्यांनीं केल्याचें महाभारतावरून व भागवतावरून स्पष्टच आहे; कंसशिशुपालादि दुष्टांचा नाश स्वत: केला व उरलेल्या दुष्टांचा नाश पांडवांकडून करविला. भक्तीचें रहस्य त्यांनीं बाळपणीं गोपगोपींना सांगितलें व पुढेंही वेळोवेळीं भीष्म-विदुरांसारख्या जाणत्यांनाही शिकविलें. जगाच्या उद्धारासाठीं त्यांनीं अर्जुनगीत व उद्धवगीत हीं दोन ज्ञानभक्तीचीं अक्षय्य भांडारें उघडिलीं व आपलें दिव्य चरित्र, उज्वल गुण व पावन नाम जगद्धितार्थ पृथ्वीवर ठेवून ते निजधामाला गेले. परमात्म्याच्या कोणत्याही अवतारानें विश्वो-

द्धाराचें इतकें प्रचंड कार्य केलेलें नाहीं. जगद्गुरु हा पदवी श्रीकृष्णाला पूर्णपणें शोभते. असो, सामान्य लोकांना आपल्या रहाणीचा कोणता सुंदर कित्ता त्यांनीं घालून दिला तें आपण पाहूं.

श्रीकृष्णाचा गृहस्थाश्रम पाहण्यासाठीं नारद द्वारकेला आले. घराची कळा अंगण सांगतें ह्या म्हणीप्रमाणें द्वारकेची रचना व शोभा श्रीकृष्णाच्या ऐश्वर्याची व रसिकतेची साक्ष देण्यास उभी होती. नारद व कृष्ण दोन्ही महात्मे, दोन्ही विरक्त, एक बहिस्त्यागी व एक अंतर्बहिस्त्यागी. नारदाला बायको ना पोर, ना घरदार ना संपत्ति; याच्या उलट कृष्णाच्या अष्टनायका, हजारों उपनायका, हजारो मुळेंबाळें व संपत्ति तर काय—लक्ष्मीपतिच तो! दोघांची भेट झाली, त्यांचा संवाद मोठा उद्बोधक होता. पुष्पफलांनीं फुलून गेलेले ते सुंदर बागबगीचे, त्यांतील भ्रमरादिकांचे व इतर अनेक पक्ष्यांचे विविध प्रकारचे मंजुळध्वनि, कल्हारकुमुदोत्पलादि प्रफुल्लकमलांनीं भरलेले तलाव व त्यांतून निनाद करणारे हंससारसादि पक्षी; स्फटिकशिलांनीं व रुप्याच्या तुळयांनीं बांधिलेलीं, पांचमणिखडे बसविलेलीं व सुवर्णहिरेमाणकांच्या साहित्यांनीं शृंगारलेलीं भव्यमंदिरें, तेथील ‘विभक्तरथ्यापथचत्वरापण’ म्ह० गल्ल्या, राजमार्ग, देवड्या व बाजार, तेथील शालागृहें, सभामंदिरें आणि देवालयें ह्या सर्वांनीं द्वारकानगरी गजबजलेली होती. श्रीकृष्णाचे अंतःपूर व त्याच्या राण्यांचे महाल यांची शोभा तर कांहीं अवर्णनीय होती. तेथील पोवळ्यांचे स्तंभ, वैडूर्यरत्नांचे फलक, व इंद्रनीलमण्यांच्या भिंती, मोत्यांच्या सरांचीं छतें—तेथें कमी काय होतें? नारद एका कृष्णमंदिरांत शिरले. नारदांना पाहतांच ‘सकलधर्मभृतां वरिष्ठः’ असे प्रभु लगबगीनें उठले, त्यांनीं नारदाच्या चरणयुगलास वंदन केलें, हात जोडले, नारदास आपल्या आसनावर बसविले व त्यांचे चरण प्रक्षाळून तें पादोदक मस्तकावर धरिलें! कृष्ण स्वतः जगद्गुरु, पण महतांचा आदर गृहस्थानें कसा करावा हें जगाला शिकविण्यासाठीं त्यांनीं नारदांचा असा सत्कार केला. नारदांनींही श्रीकृष्णाची तो परमात्मा

आहे असें जाणून स्तुति केली. नारद यानंतर कृष्णाचे योगमायावैभव जाणावें यासाठीं दुसऱ्या मंदिरांत शिरले. तेथें कृष्ण प्रिया व उद्धव यांसह फांशांनीं खेळत आहे असें दिसलें. तेथून ते कृष्णाच्या अनेक मंदिरांत शिरले. वेगवेगळया मंदिरांत कृष्णाच्या वेगवेगळया लीला त्यांनीं पाहिल्या ! कोठें प्रभु मुलांना खेळवीत आहे, कोठें स्नानाच्या उद्योगांत आहे, कोठें पंचमहायज्ञ करीत आहे, कोठें ब्राम्हणांना जेववून आपण अवशेष घेत आहे, कोठें संध्योपासना व जप करीत आहे, कोठें घोड्यावर किंवा रथांत बसून फिरत आहे, कोठें ढालतलवार घेऊन पवित्र्यावर फिरत पट्याचे हात करीत आहे, कोठें तो मंचकावर शयन करीत असून बंदीजन त्याची स्तुति करीत आहेत, कोठें तो जलक्रीडारत आहे, कोठें सालंकृत गोप्रदानें देत आहे, कोठें इतिहासपुराणें ऐकत बसलेला आहे, कोठें प्रियेबरोबर विनोदकथा बोलून हांसत आहे, कोठें अर्थाचा व कोठें कामाचा व्यासंग करीत आहे, कोठें प्रकृतिपर पुरुषाचें ध्यान करीत आहे, कोठें राजकारणाचीं खलबतें करीत संधि व निग्रह यांचे बेत करीत आहे, कोठें मुलामुलींचीं लग्नें ठरवीत आहे, कोठें लग्नमुंजींत किंवा माहेरवासिनींचे सुखसोहळे पुरविण्यांत दंग आहे, कोठें मृगयेला निघण्याच्या तयारींत आहे, कोठें वेष पालटून अंतःपुरांत मंत्रिमंडळांत किंवा प्रजाजनांत फिरून लोकांची गुप्तकृत्यें पाहत फिरत आहे ! अशा प्रकारें विविध स्थळीं, विविधकाळीं, विविध चरित्रें करीत असलेला एकच कृष्ण नारदाला सर्वत्र दिसला ! श्रीकृष्णाच्या ह्या गृहस्थाश्रमाच्या वर्णनांत मोठें स्वारस्य आहे. सर्वत्र असून अलिप्त, सर्व कर्में करीत असतांही कर्मबंधनांत नाहीं, सर्वदेहीं एकच कृष्ण नांदत आहे, याप्रमाणें कृष्णचरित्राचें रहस्य आहे व हेंच रहस्य ज्ञानीभक्तांच्या चरित्रांत स्पष्ट आहे. प्रपंच, राजकारण, परमार्थ–यांपैकीं भागा आलेलें कोणतेंही कर्म करीत असतांना आपलें असंगपण अनुभवितां येतें किंवा अन्वयानें या सर्वांत आपणच अनुस्यूत आहोंत असा व्यापक आत्मत्वाचा आनंद भोगतां येतो. सर्वांत असून कोठें नसावें,

किंवा सर्वच होऊन राहावें हा बोध भागवतांचें उपास्य कृष्णप्रभु आपल्या चरित्रानें जगास शिकवीत आहेत ! नारदांना असेंच वाटलें:-

**इत्याचरतं सद्धर्मान्पावनान्गृहमेधिनाम् ।**
**तमेव सर्वगेहेषु संतमेकं ददर्श ह ॥ स्कंध १०-६९-४१ ॥**

प्रपंच आणि परमार्थ यांच्यांत विरोधच नाहीं, अंतरांतला भेद गेला कीं दोन्ही एकरूप आहेत. आतां कृष्णांची दिनचर्या कशी आदर्शभूत होती तें पहा:—

**ब्राह्मे मुहूर्ते उत्थाय वार्युपस्पृश्य माधवः ।**
**दध्यौ प्रसन्नकरणः आत्मानं तमसःपरम् ॥ १०-७०-४ ॥**

पहांटे उठून व हातपायतोंड धुवून प्रसन्नचित्तानें अज्ञानाच्या पलीकडे असलेल्या आत्मस्वरूपाचें तें चिंतन करीत. आत्मस्वरूप ह्मणजेच ब्रम्ह. तें उपाधिरहित असल्यामुळें अखंड एकरस आहे, स्वयंज्योति म्ह० ज्ञानस्वरूप, अव्यय, आनंदमय आहे. ध्यानानंतर त्यांनीं निर्मलोदकांत स्नान करावें, संध्योपासनादि क्रिया यथाविधि कराव्या, अग्नींत–होम देऊन मौनपूर्वक गायत्रीजप करावा, उदय पावणाऱ्या सूर्याचें उपस्थान करून स्वांशभूत देवांचें, पितरांचे व ऋषींचें तर्पण करावें, वृद्धांची व ब्राम्हणांची वस्त्रालंकार देऊन सश्रद्ध पूजा करावी, पयस्विनी सवत्स, सुवासस व सालंकृत अशा गाई त्यांना अर्पण कराव्या:—

**गोविप्रदेवतावृद्धगुरून् भूतानि सर्वशः ।**
**नमस्कृत्यात्मसंभूतीर्मंगलानि समस्पृशत् ॥ १०-७०-१०॥**

गाई, विप्र, देवता, कुलांतील वृद्ध माणसें, गुरु व सकल भूतें ह्या ‘आपल्या विभूतींना’ वंदन करावें. नंतर नरलोकांना भूषणीभूत झालेलें आपलें शरीर अनुलेपन, पुष्पमाला, व वस्त्राभरण यांनीं भूषवावें, व ज्यांना ज्यांना जे जे पदार्थ पाहिजे असतील ते ते त्यांना व मंत्रिजनांना देऊन सर्वांना संतुष्ट करावें. माळा, तांबूल, अनुलेपन प्रथम

ब्राम्हणांना अर्पण करून नंतर सुहृज्जनांना, नंतर मंत्रिमंडळाला, नंतर आपल्या स्त्रियांना देऊन, शेवटीं स्वतः उपभोगायचे असा त्यांचा क्रम असे. सूर्यनारायण पूर्वपर्वतावर आरोहण करीत असतां उद्धव व सात्यकि यासह रथावर आरूढ व्हावें व आपल्या सुधर्मनामक सभेस जावें. तेथें सकलयादवाग्रणी एकत्र जमत असत. तेथें गायनवादन होऊन वेदवेत्ते पुरुष वेदमंत्रांचे अर्थ व पुण्यकीर्ति अशा प्राचीन राजांच्या कथा सांगत. असा कृष्णाचा नित्यक्रम असे (स्कंध १० अ० ७०).

संसारही कसा हांसत खेळत आनंदानें व सर्वांची चित्तें प्रेमानें वेधून करावा हें त्यांनीं शिकविलें आहे. संसार क्षणभंगुर आहे, नाशवंत आहे, जीवलोक मृत्युग्रस्त आहे, हें जाणत असतांही मनुष्यानें संसार रडका करूं नये. ज्याला इहलोकीचे व्यवहार सुखासमाधानानें करितां येत नाहींत तो परमार्थांत काय दिवे लावणार? आधी प्रपंचच परमार्थाहून वेगळा कोठें आहे? 'ईशावास्यमिदं सर्व' 'वासुदेवः सर्वमिति' ह्या अनुभवानें श्रेष्ठ पुरुष संसार करीत असतात म्हणून त्यांचा संसारही ब्रह्मरूप व ह्मणूनच आनंदरूप होत असतो. श्रीकृष्णानें सत्यभामेशीं, रुक्मिणीशीं व इतर स्त्रियांशीं त्यांच्या त्यांच्या कलानें पण आत्मप्रेमानें वागून सर्वद्वारका आनंदमय करून सोडली. संसारांत हास्यविनोद, रुसवा-फुगवा, कोपसांत्वन हे सर्व प्रेममूलक पाहिजेत. श्रीकृष्णानें रुक्मिणीशीं केलेला विनोद, त्या विनोदाचा परिणाम, श्रीकृष्णानें केलेलें सांत्वन व शेवटीं रुक्मिणीचें पतिप्रेमपर मार्मिक भाषण (स्कंध १० अ० ६०) हा सर्व भाग संसारदृष्टीनें किती मनोरम आहे! तेथें श्रीकृष्ण म्हणाले आहेत कीं 'घरांत प्रियेसह विनोद करून वेळ घालविणें हा गृहस्थाश्रम्यांना केवढा लाभ आहे बरें! कृतकोपात्मक कलह व सांत्वन यांत केवढी मौज आहे!' रुक्मिणी महासती होती. रुक्मिणीच्या मार्मिक भाषणानंतर "रुक्मिणी! तूं आपल्या निष्काम प्रेमानें आम्हांस जिंकलेंस–'वयं जितास्ते' असें कृष्ण सहृदयतेनें बोलले आहेत! भागवतांतच अन्यप्रसंगानें सतिधर्म सांगितला आहेः—

**पतिं च परया भक्त्या महापुरुषचेतसा ।**
**प्रियैस्तैस्तैरुपनमेत्प्रेमशीलः स्वयं पतिः ॥ ६–१९–१७ ॥**

पत्नीनें परमभक्तीनें पति हाच महापुरुष ह्म० परमात्मा अशा बुद्धीनें त्याला प्रिय ते ते पदार्थ सविनय अर्पण करावेत व पतीनेंही पत्नीला निरंतर प्रेमानें वागवावें हें विष्णुव्रत आहे. अशा दंपत्यावर भगवान् प्रसन्न असतात. आणिक एके ठिकाणीं सीतारामांचें प्रेम वर्णित असतांना भागवतकार म्हणतातः—

**प्रेम्णाऽनुवृत्त्या शीलेन प्रश्रयावनता सती ।**
**धिया ह्रियाच भावज्ञा भर्तुः सीताहरन्मनः ॥ ९–१०–५६ ॥**

सीता भावज्ञा ह्म० पतीचें मनोगत ओळखून वागणारी होती. प्रेम, सेवा, शील, विनयपरता, पातिव्रत्य, धर्माचरण, बुद्धिमत्ता व लज्जा या गुणांनीं पतीचें मन तिनें वश करून घेतलें.

ब्राह्मण आणि अग्नि हीं सर्व देवतारूपीं विष्णूचीं दोन मुखें होत व त्यांची पूजा केली असतां गृहस्थाश्रमी मनुष्य सर्व इच्छा जेथें पूर्ण होतात अशा लोकाप्रत जातो ( ८–१६–९ ), या नियमाप्रमाणें श्रीकृष्ण ब्राह्मण व अग्नि यांचा सन्मान करीत. त्यांना ब्रह्मण्यदेव ह्मणतात, ‘ गोब्राह्मणप्रतिपालक ’ म्हणतात.

सांसारिकानें ‘ धर्माय यशसेऽर्थाय कामाय स्वजनाय च ’ या पांच प्रकारानें आपल्या द्रव्याचा विनियोग करावाः—

**देवर्षिपितृभूतानि ज्ञातीन्बधूंश्च भागिनः ।**
**असंविभज्य चात्मान यक्षवित्तः पतत्यधः ॥ ११-२३-२४**

गोत्रज, आप्त व इतर विभागार्ह लोक व स्वतःचें शरीर यांना यथायोग्य विभाग न देतां जो समंधाप्रमाणें द्रव्याचें नुसतें रक्षण करितो तो अधोगतीस जातो.

**मातरं पितरं वृद्ध भार्यां साध्वीं सुतं शिशुम् ।**
**गुरुं विप्रं प्रपन्नं च कल्पोऽबिभ्रत् श्वसन्मृतः ॥ १०-४५-७ ॥**

नगर वाचनालय, सातारा.



सुदृढ, निरोगी, सामर्थ्यवान् असून जो मातापिता, साध्वीभार्या लहान मुलें, गुरु, विप्र व दीन यांचें भरण ( पोषण ) करणार नाहीं तो जिवंत असून मेला आहे असें समजावें.

जो ब्राह्मण स्वधर्मापासून न ढळणारा, यदृच्छालाभसंतुष्ट असतो, केव्हांही असंतुष्ट असत नाहीं, त्याविषयीं पूज्यभाव ठेवावा. 'अकिंचनोऽपि संतुष्टः शेते सर्वांगविज्वरः ' देव म्हणतातः—

विप्रान्स्वलाभसंतुष्टान्साधून्भूतसुहृत्तमान् ।
निरहंकारिणः शांतान्नमस्ये शिरसाऽसकृत् ॥ १०।५२ ॥

वर वर्णिल्याप्रमाणें श्रीकृष्णाचा बाळमित्र सुदामदेव होता. 'अथोपनीतं पृथुकैकमुष्टिं प्रत्यग्रहीत् प्रीतियुतो महात्मा '–त्यानें अत्यंत भक्तिप्रेमानें दिलेल्या मुठभर पोह्यांचा स्वीकार करून त्याला त्यानें सुखी केलें. तो अकिंचन होता पण विरक्त, आत्मरत व शांत असे. त्याच्याशीं देव मोठ्या प्रेमानें वागले.

भगवानपि विश्वात्मा लोकवेदपथानुगः ।
कामान्सिषेवे द्वार्वत्यामसक्तः सांख्यमाश्रितः ॥
स्निग्धः स्मितावलोकेन वाचा पीयूषकल्पया ।
चरित्रेणानवद्येन श्रीनिकेतेन चात्मनः ॥ (३–३–१९।२० )

भगवान् विश्वव्यापक असूनही वैदिक व लौकिक कर्में करीत म्ह० महाजनांचे व्यवहार व वेदमार्ग यांजला अनुसरून वागत. ज्ञानाचा विचार चित्तांत ठेवून व पोटांत कोठेंही आसक्ति न ठेवितां विहितविषयांचें सेवन करीत. ते द्वारकेंत गृहस्थाश्रम चालवीत होते. वाणीनें अमृतासारखें मधुर भाषण करावें, व सर्वांकडे सप्रेम व सहास्य अवलोकन करावें हा त्यांचा सर्वांशीं वर्तनक्रम होता. त्यांचें आचरण वंदनीय होतें, त्यांचा देह तर लक्ष्मीचें निवासस्थानच होता.

ब्रम्हदेवानें प्रियव्रत राजाला सांगितलें आहे कीं 'जो प्रमत्त' म्ह० ज्याचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत तो वनांत राहिला तरी त्याला संसारभय आहेच, कांकीं कामादि षड्रिपु त्याच्या जवळच असतात; बरें जो

जितेंद्रिय व आत्मनिष्ठ बुध म्ह० सारासारविचारी आहे त्याचें गृह-स्थाश्रम काय वाईट करणार आहे?–'गृहाश्रमः किं नु करोत्यवद्यम्' दमादमानें संसार म्ह० षड्रिपु जिंकणाराला गृहस्थाश्रम हा एक किल्ला आहे, हा सर केल्यावर मनुष्यानें कोणत्याही आश्रमाचा अंगीकार करावा ( स्कं. ५ अ. १ श्लो० १७।१८ ). गृहस्थाश्रमांत मुख्य गोष्ट आहे ती ही कीं सर्वभूतांवर दया ठेवावी, यदृच्छालाभसंतुष्ट असावें व सर्व इंद्रियें प्रशांत असावींत म्ह० त्याच्या ठायीं विषयोपभोगाची मळमळ नसावी. एवढ्यानें भगवान् प्रसन्न होतात ( स्कं. ४-३१–१९ )

श्रीकृष्णाचा गृहस्थाश्रम हा जगाला आदर्शभूत आहे. गृहस्थाश्रमांत संगतीच्या सर्व लोकांशीं समन्वयाच्या प्रेमानें राहून व प्रवाहपतित अशीं प्रपंचाचीं सर्व कर्मे करून आपलें असंगत्व पूर्णपणें कसें राखतां येतें हें श्रीकृष्णानें संसारांत राहून जगाला शिकावलें आहे. श्रीकृष्णाच्या स्त्रीपुत्रांचा परिवार अतिशय मोठा होता. एवढा मोठा संसार, भरत-खंडाचें राजकारण, व भीष्म, विदुर, गोपगोपी, उद्धव अक्रुर, अर्जुन इ० थोर विभूतींना शिकवलेलें ब्रम्हज्ञान, या सर्व गोष्टींचा एकसमया-वच्छेदेंकरून विचार केला कीं जगाच्या इतिहासांत श्रीकृष्णाच्या तोलाचा एकही भगवद्वतार झाला नाहीं असेंच मनांत येतें. इतर अवतार म्हणजे कमी आहेत असें नाहीं, भगवंताचे सर्वच अवतार सारखे पूज्य आहेत, पण भगवंतांनीं आपलें पूर्णत्व ह्या अवतारांत जसें व जितक्या तऱ्हेनें व्यक्त केलें, तसें व तितक्या तऱ्हेनें दुसऱ्या कोण-त्याही अवतारांत व्यक्त केलें नाहीं आणि म्हणूनच भागवतकारांनीं 'कृष्णस्त भगवान् स्वयम्' असें म्हटलें आहे. ब्रम्हविद्येचा लाभ करून घेण्यासाठीं ज्ञानाभिलाषी व विरक्त पुरुष 'भिक्षाचर्यं चरन्ति' असें उपनिषदांत सांगितलें आहे, येथें तर सर्व प्रकारचे राजविलास भोगीत असतांना श्रीकृष्णांनीं ब्रम्हविद्येचा–ज्ञानाचा व भक्तीचा–लाभ अनेकांस करून दिला आहे, व आपल्या भक्तिज्ञानवैराग्याचें व कर्मयोगाचें रहस्य जगाला कळावें म्हणून गीताभागवतरूपानें निरंतरची सोय करून ठेवली आहे.

## ७ भक्तीचें स्वरूप.

**स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ।**
**अहैतुक्यप्रतिहता यथात्मा संप्रसीदति ॥ १-२ ५ ॥**

ज्या धर्माच्या योगेंकरून परमात्म्याच्या ठिकाणीं अहैतुकी म्ह० निष्काम व अप्रतिहता म्ह० निर्विघ्न, निश्चळ, अढळ अशी भक्ति उत्पन्न होते तो पुरुषांचा परमधर्म होय, कां कीं त्या भक्तीच्यायोगानें आत्मप्रसाद होतो. परमात्मा अधोक्षज आहे. अक्ष ह्म० इंद्रियें, अक्षज म्ह० इंद्रियजन्य ज्ञान, तें ज्याच्या शुद्धस्वरूपाला आवरूं शकत नाहीं तो अधोक्षज. ‘ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह ’ असा अतींद्रिय परमात्मा निष्काम व अढळ भक्तीच्या योगानें वश करावा हा जीवाचा परम धर्म होय. भक्तीच्या योगें तत्काळ ज्ञानवैराग्य उत्पन्न होतें, उत्तम प्रकारें आचरलेलें धर्मकर्मही जर विश्वक्सेन ( सर्वव्यापी, विष्णु, वासुदेव )-याच्या ठायीं प्रेम उत्पन्न करूं शकलें नाहीं तर तें धर्माचरण केवळ श्रममात्र होय. ती शरीराची नुस्ती कवाईत होय. म्हणून “ श्रोतव्यः कीर्तितव्यश्च ध्येयः पूज्यश्च नित्यदा ’ म्ह० एकनिष्ठभावानें वासुदेवाचे गुण ऐकावेत, गावेत, त्यालाच ध्यावें व त्याचें पूजन करावें. या उपायानें अंतरांत भक्ति उत्पन्न होतें. वेद, यज्ञ, योग, क्रिया, ज्ञान, तप धर्म हीं सर्व वासुदेवाच्या प्राप्तीसाठीं करावयाचीं आहेत. सर्व साधनांचें प्राप्तव्य (गति) वासुदेव आहे.

**दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ।**
**श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हि साध्यते ॥** (१०-४७.२४ )

अंतःकरणांत ईश्वराचें साक्षाद्दर्शन झालें असतां मनुष्य निःसंदेह होऊन कर्मबंधापासून मुक्त होतो ( स्कं. १ अ० २ )

अशी भक्ति उत्पन्न होण्यास भक्तांचाच समागम केला पाहिजे. भक्तांच्या संगतीनेंच भक्ति उत्पन्न होते. कपिलमुनि सांगतात कीं संत्संगांत ‘ भवन्ति हृत्कर्णरसायनाः कथाः ’—तेथें सतत चालणाऱ्या देवाच्या

गोष्टी कानावर पडतात, त्या हृदयाला व कानाला श्रेष्ठप्रतीचें सुख देतात, तेथें देवाच्या सामर्थ्याचें ज्ञान होतें व मनुष्य मोक्षाच्या मार्गाला लागून 'श्रद्धारतिर्भक्तिरनुक्रमिष्यति'–त्यास श्रद्धा, प्रेम व भक्ति क्रमानें प्राप्त होतात ( स्कंध ३–२५–२५ ). कपिलमुनींचें दिव्यचरित्र स्कंध ३ मध्यें अ० २१–३३ मध्यें वर्णिलेलें साधकांनीं अवश्य वाचावें. त्यांनीं आपली माता देवहूति इला भक्तियोग सांगितला आहे त्यांत ते म्हणतात:–" गंगेच्या ओघाची गति जशी समुद्राकडे असते त्याप्रमाणें ' सर्वगुहाशय ' म्ह० सर्वभूतांच्या हृदयांत राहणाऱ्या परमात्म्याकडे निष्कामबुद्धीनें व अभेदभावानें सर्व अंतःकरणवृत्तींचा अखंड ओघ वाहणें ही पराभक्ति होय ! ही उत्पन्न होण्यास मनुष्यानें निष्काम स्वधर्माचरण करावें, दर्शनस्पर्शनपूजावंदनादि प्रकारांनीं भगवंताचें आराधन करावें, उदात्त चारित्र्य व गांभीर्य ठेवून सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवावा, श्रेष्ठांना बहुमान द्यावा ( ' महतां बहुमानेन ' ), दीनांविषयीं अनुकंपा, व समानांशीं मैत्री ठेवावी, यमनियम पाळावेत, अध्यात्मशास्त्राचें श्रवण करावें, नामसंकीर्तनांत रमायला शिकावें, सरळ वर्तन ठेवून निरहंकार व्हावें व मुख्यतः सत्संग जोडावा. परमात्मा सर्वभूताशयस्थित आहे हें पळभरही विसरूं नये, त्याला विसरून केलेली पूजा हें विडंबन आहे. भूतांचा अंतर्यामी जो देव त्याची हेळणा करून केलेली पूजा म्हणजे भस्मांत हवन केल्याप्रमाणें व्यर्थ होय ! भूतीं भगवंत पाहणें ही मुख्य पूजा आहे. दुसऱ्याचा द्वेष करणें म्हणजे त्याच्या हृदयांतल्या परमात्म्याला दुखवणेंच होय. " ( स्कंध–३ अ०२९ )

भक्तीचें स्वरूप सांगतांना ध्रुवाचें सगळेंच चरित्र येथें उतरून घ्यावेसें वाटतें, पण विस्तारभयास्तव तो मोह आवरून एक दोन गोष्टीच सांगतों. ध्रुव हा सुनीतीचा मुलगा आहे, सुरुचीचा नाहीं ! कठोपनिषदांत ' श्रेयः ' आणि ' प्रेयः ' बद्दल जें तत्व सांगितलें आहे तेंच ह्या कथेच्या रूपानें भागवतांत वर्णिलें आहे. श्रेयः म्ह० पारमार्थिक सुख व प्रेयः म्ह० विषयसुख. ' तयोः श्रेयः आददानस्य साधु-

नगर वाचनालय सातारा

संग्रहावीकृत

र्भवति ' ह्म० या दोहोंपैकीं जो श्रेयाचा मार्ग धरितो त्याचें कल्याण होतें व ' हीयतेऽर्थात् ह्यउ प्रेयो वृणीते '–जो प्रेमाचा मार्ग धरितो तो स्वहिताला मुकतो ( कठ १–२ ). सुरुचि म्ह० विषयांची प्रीति व सुनीति म्ह० धर्मनीतीची प्रीति! ध्रुव सुनीतीच्या पोटीं उत्पन्न होतो, सुरुचीच्या नाहीं; सुरुचि उलटी त्याचा छळ करिते ! ध्रुवाची कथा प्रसिद्धच आहे. ' उत्तम पदाची तुला इच्छा आहे तर भगवंताचें आराधन कर ' असा उपदेश ध्रुवाला सुनीतीनें केल्यावर तो देवाला शोधण्यासाठीं वनांत गेला, तेथें नारदांनीं त्यावर अनुग्रह करून त्याला वासुदेवाचें ध्यान समंत्रक सांगितलें, व ध्रुवानें यमुनातटीं मधुवनांत जाऊन ध्यान केलें. नारदानें ध्रुवाला ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा द्वादशाक्षरी मंत्र सांगितला. व प्रल्हादाचा ' ॐनमो नारायणाय ' हा अष्टाक्षरी मंत्र होता. नारदानें श्रीविष्णूचें ध्यान सांगितलें आहे तें ध्यानाच्या अभ्यासासाठीं मूळांतच पहावें ( स्कंध ४ अ० ८ श्लोक ४४ ते ५२ ). ध्रुवाच्या तीव्र ध्यानयोगानें भगवान् प्रगट झाले. त्यावेळीं ध्रुवानें त्यांची स्तुति केली:—

**योंतःप्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां**
**संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ।**
**अन्यांश्च हस्तचरणश्रवणत्वगादीन्**
**प्राणान्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥ ४–९–६ ॥**

जो सर्वशक्तिमान् परमेश्वर आपल्या ज्ञानशक्तीच्या बलानें माझ्या हृदयांत प्रविष्ट होऊन माझ्या निद्रित वाणीला व हात, पाय, कान, त्वचा व प्राण ह्या सर्वांना जागृत करीत आहे, प्रेरणा देऊन संजीवित करीत आहे, त्या हृदयस्थ पुरुषोत्तमाला माझा नमस्कार असो !

**भक्तिं मुहुः प्रवहतां त्वयि मे प्रसंगो**
**भूयादनन्त ! महताममलाशयानाम् ।**
**येनांजसोल्बणपुरुव्यसनं भवाब्धिं**
**नेष्ये भवद्गुणकथामृतपानमत्तः ॥ ४-९-११ ॥**

हे अनंत ! तुझ्या ठिकाणीं भक्ति करणारे हे अमलाशय म्ह० निर्मळ मनाचे थोर भक्त त्यांचा मला वारंवार समागम ( प्रसंग ) घडावा, म्हणजे मी तुझ्या चरितामृताचें पान करून निश्चिंत होईन व अफाट ( उल्बण ) व अनेक संकटांनीं भरलेला ( उरुव्यसन ) असा हा भवसागर लीलेनें ( अंजसा ) तरून जाईन. असो. ध्रुवाख्यानाच्या शेवटीं पुढील सुंदर श्लोक आहे:—

**भक्तिं हरौ भगवति प्रवहन्नजस्र-**
**मानंदबाष्पकलया मुहुरर्द्यमानः ।**
**विक्लिद्यमानहृदयः पुलकाचितांगो**
**नात्मानमस्मरदसाविति मुक्तलिंगः ॥ ४-१२-१८ ॥**

भगवंतावर त्याच्या भक्तीचा संतत ( अजस्रम् ) प्रवाह चालला असतांना आनंदाचे पूर वारंवार वाहूं लागून तो ओला चिंब झाला (अर्द्यमानः ), त्याच्या हृदयाला हरिप्रेमाचे पाझर फुटले, त्याच्या अंगावर रोमांच उभे राहले, त्याची देहभावना लयाला गेली व ‘ मी ध्रुव आहें, एवढेंही त्याला भान राहिलें नाहीं.

## ८ उत्तम भक्त

मनुष्यमात्राला कल्याणप्राप्तीचें साधन भगवंताचें आराधन हेंच होय. आराधन ह्म० पूजा. ही पूजा करण्याचा अधिकार सर्वांना आहे. सर्व वर्ण व सर्व आश्रम यांतील लोकांनीं व स्त्रीशूद्रांनींही देवाची पूजा करावी. ही पूजा कशी करावी हें ११ व्या स्कंधांतील २७ व्या अध्यायांत उत्तमप्रकारें वर्णिलें आहे. कोणी पुरुषसूक्तादि मंत्रांनीं पूजा करितात, कोणी पांचरात्रादि आगमांत वर्णिलेल्या तंत्रानीं करितात व कोणी वैदिक व तांत्रिक अशा मिश्र प्रकारांनीं करितात. प्रतिमा, स्थंडिल, सूर्य, अग्नि, उदक, ब्राह्मण व स्वतःचें हृदय हीं देवाच्या पूजेचीं सात अधिष्ठानें होत. अन्यत्र सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गाई, वैष्णव, पृथिव्यादि चारभूतें, आत्मा व भूतमात्र हीं पूजेचीं स्थानें ( ११–४१–४२ ) सांगि-

तलीं आहेत. स्नानसंध्यादि करून नंतर पूजेस बसावें. मूर्ति काष्ठाची, पाषाणाची, सुवर्णाची, रत्नाची, लेप्य, लेख्य कसलीही चालते. मानस-पूजेला मनोमयी मूर्ति असते. भगवद्भावनेनें यथामीलित उपचारांनीं सविधि पूजन करावें. श्रद्धा किंवा भक्तिभाव हा मुख्य आहे. हृदयक-मलांतर्वर्ती ईश्वराचें ध्यान करावें व पूज्य पदार्थ चैतन्यमय भावावा. न्यास, आवाहन, पाद्य, आचमन, अर्घ्य, सर्व यथाशास्त्र करावें. स्नान घालून वस्त्रालंकार, धूप, दीप, नैवेद्य, तांबूल, दक्षिणा सर्व यथाशक्ति भगवदर्पण करावें, व संस्कृत किंवा प्राकृत स्तोत्रें म्हणून देवाला आळवावें. पूजा करितांना आपला आत्मा भगवद्रूप आहे अशी भावना ठेवावी.

भगवन्मूर्तींची पूजा कशी करावी हें सांगितलें. पूजेचें फल सर्वत्र परमात्मा दिसावा हें होय. परमात्म्याच्या व्यापक स्वरूपाची ओळख झाली, भूतमात्रीं भगवद्भाव उत्पन्न झाला तरच पूजा करण्याचें खरें फळ! मूर्तीच्या पूजेपासून आरंभ पण हा कांहीं शेवट नव्हे! भक्तांचे तीन वर्ग भागवतकारांनीं सांगितले आहेत.

१ तळचा भक्त प्रतिमेवर हरीची श्रद्धेनें पूजा करितो, प्रतिमा देव-रूप भावतो, पण देवाचें व्यापक स्वरूप न आकळल्यामुळें तो भगवद्रूप असलेले जे भक्त त्यांना ओळखीत नाहीं व त्यांच्या पूजेला संकोचतो. भक्तांतही त्याला देवपण दिसत नाहीं मग इतरांत काय दिसणार?

२ याहून वरच्या पायरीचा भक्त ईश्वरावर प्रेम करितो, भक्तांशीं मैत्रीनें वागतो, दीनांवर दयार्द्रबुद्धि ठेवतो व शत्रूविषयीं उदासीन असतो. हा मध्यम भक्त होय. याचें वर्तन व्यावहारिकदृष्टया सदोष नसेल, पण त्यांत भेदभाव असल्यामुळें तो अस्सल भक्त ठरत नाहीं.

३ पहिल्या प्रतीचा भक्त. हा सर्वांभूतीं भगवंत पाहतो:—

**सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ।**
**भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ ११-२-४६ ॥**

जो आपण भगवद्रूप आहोंत, सर्वभूतांच्या ठिकाणीं हरि व्यापून राहिला आहे, आणि सर्वभूतें माझ्या म्ह० आत्मरूप हरिच्या आश्रयावर आहेत असें पाहतो तो ‘ भागवतोत्तम ’ म्ह० उत्तम भक्त होय. उत्तम वैष्णव तोच कीं जो आपल्यासगट सर्वांभूतांच्या ठायीं भगवद्भाव ठेवतो, सर्व कांहीं हरिच आहे असें जाणतो. अशा बोधावर आरूढ झालेल्या भक्ताला इंद्रियांनीं विषयग्रहण केलें किंवा न केलें तरी हर्षविषाद वाटत नाहीं. जन्ममरण हे धर्म देहाचे, क्षुधातृष्णा हे धर्म प्राणाचे, भय हा धर्म मनाचा, भोगवासना हा धर्म बुद्धीचा व श्रम हा धर्म इंद्रियांचा–हें जाणून जो हरिस्मरण ठेवतो म्ह० देहेंद्रियप्राण–मनबुद्धींच्या वरील संसारधर्मांनीं मोह पावत नाहीं तो उत्तम भक्त होय. विषयेच्छा, कर्में व कोणतीही वासना ज्याच्या चित्तांत अंकुरित होत नाहीं व आपल्या जन्मकर्मांचा व वर्णाश्रमजातींचा ( त्या श्रेष्ठ आहेत असा ) अभिमान ज्याला शिवत नाहीं तो ‘ वासुदेवैकनिलय ’–वासुदेव हाच ज्याचा आश्रय असा–पुरुष उत्तम भक्त होय. त्रैलोक्याचें राज्य मिळत असलें तरी जो भगवच्चरणध्यानापासून निमिषार्धही ढळत नाहीं तो ‘ वैष्णवाग्र्य ’–उत्तम वैष्णव होय. तो अकुतोभय म्ह० सर्वत्र निर्भय असतो.

**विसृजति हृदयं न यस्य साक्षात् । हरिरवशाभिहितोऽप्यघौघनाशः ।**
**प्रणयरशनया धृतांघ्रिपद्मः । स भवति भागवतप्रधान उक्तः ११-२-५५**

प्राण्यानें विवश म्ह० आतुर होऊन आळविलेला व सकल पातकांचा नाश करणारा हरि–प्रेमाच्या रज्जूनें ( प्रणयाच्या रशनेनें ) चरणकमल बांधून टाकल्यामुळें–आपणच ( साक्षात् ) ज्याचें हृदय सोडून जात नाहीं तो पुरुष भगवद्भक्तांत अग्रगण्य होय !

## ९ भगवंताच्या रूपाचें ध्यान.

परमेश्वर सगुणसाकार आहे तर मग त्याच्या कोणत्या रूपाचें ध्यान पूर्वील भक्तांनीं केलें किंवा पुढील भक्तांनीं करावें हें भागवताला

सांगणेंच प्राप्त झालें. विष्णूच्या व विष्णूचा अवतार जो कृष्ण त्याच्या रूपाचीं मनोहर वर्णनें भागवतांत जागोजाग आलीं आहेत. त्याचा थोडासा प्रकार पाहूं. 'त्रिभुवनकमनं तमालवर्णं' ज्याच्या लावण्यानें त्रिभुवन मोहित झालें आहे, ज्याची अंगकांति तमालपुष्पासारखी नील-वर्णाची आहे, ज्यानें रविकिरणाप्रमाणें दिव्य अशीं वस्त्रें परिधान केलीं आहेत, ज्याचें मुखकमल कुरळकेशराजीनें परिवेष्टित आहे, त्या पार्थ-सख्या श्रीकृष्णाच्या रूपावर माझी दृष्टि अचल राहो अशी भीष्मांची प्रार्थना आहे ( १-९-३३ ). देवाचें रूप आपादमस्तक न्याहाळून हृद्यांत ठेवावें व मग त्याच्या प्रसन्न मुखकमलावर व विशेषतः त्यावरील रमणीय हास्यावर चित्ताची एकाग्रता करावी असें नारदानीं सांगितलें आहे. ज्याचें ध्यान करायचें तें रूप सुंदर, उज्ज्वल, मनमोहक व आनंददायी असलें पाहिजे. विरूप, भीषण, उग्र रूपाचें ध्यान तितकें समाधानकारक होत नाहीं. मनुष्याच्या हृदयांतील दुःखशोकादि ज्याच्या दर्शनानें ओसरतात व संसाराचें विस्मरण पडतें असें विष्णूचें (कृष्णाचें) गोड ध्यान भागवतांत वर्णिलेलें आहे. नारद ध्रुवाला सांगतात तें ध्यान असें गोड आहे व विष्णूच्या मंदिरांतून व भक्तांच्या काव्यांतून विष्णुरूप दिसतें तें प्रायः त्या ध्यानानुसारच आढळतें. 'प्रसादा-भिमुख' व 'प्रसन्नवदनेक्षण'—नेत्र व मुख यांत प्रसन्नता भरली असून प्रसन्नतेनें भगवान् आपल्याकडे पाहत आहेत, नासा व भ्रू. ह्म० नाक व भिंवया यांची ठेवण सुंदर आहे, कपोल चारु आहे, देवानांही तें पाहतांना आनंद व्हावा असें त सुरसुंदर आहेः—

श्रीवत्सांकं घनश्यामं पुरुषं वनमालिनम् ।
शंखचक्रगदापद्मैरभिव्यक्तचतुर्भुजम् ॥
किरीटिनं कुंडलिनं केयूरवलयान्वितम् ।
कौस्तुभाभरणग्रीवं पीतकौशेयवाससम्–'

असें तें रूप 'स्मयमानमनुध्यायेत्सानुरागावलोकनम्–' मंदस्मित करीत

प्रसन्नतेनें आपल्याकडे पाहत आहे असें हें ध्यान नारदांनीं ध्रुवाला व सर्व वैष्णवांना दिलें आहे ( स्कंध. ४ अ. ८ ). जन्माच्या वेळीं भगवान् देवकीच्या अग्रभागीं प्रगट झाले त्या वेळचें रूप (१०-३-९):-

**तमद्भुतं बालकमंबुजेक्षणं । चतुर्भुजं शंखगदार्युदायुधम् ।**
**श्रीवत्सलक्ष्म गलशोभिकौस्तुभं । पीतांबरं सांद्रपयोदसौभगम् ॥**

" अद्भुत बालक अंबुजेक्षण म्ह० कमलनयन होतें; त्याच्या चार हातांत शंख, गदा, अरि ( चक्र ) व कमल हीं चार आयुध होतीं; त्याच्या वक्षस्थलावर श्रीवत्सचिन्ह होतें; गळयाच्या सौंदर्यानें कोस्तुभ-रत्नाला शोभा आली होती, त्याचें वस्त्र पीत असून सजल मेघाप्रमाणें तो सुंदर दिसत होता. वरील विष्णूचें ध्यान व हें कृष्णाचें रूप एकच आहे. कठोर तप करून योग्यांना ध्यानांतही न दिसणारें परमात्मरूप ज्यांना प्रत्यक्ष समोर क्रीडा करितांना दिसत असे त्या व्रजवासी जनांचें भाग्य काय वर्णावें ? ( १०-१२-१२ ) ब्रह्मदेवाचा गर्वपरिहार झाल्यावर तो कृष्णस्तवन करितांना म्हणतो:—

**नौमीड्य तेऽभ्रवपुषे तडिदंबराय**
**गुंजावतंसपरिपिच्छलसन्मुखाय ।**
**वन्यस्रजे कवलवेत्रविषाणवेणु-**
**लक्ष्मश्रिये मृदुपदे पशुपांगजाय ॥ १०.१४-१ ॥**

हे ईड्य ! विश्वाच्या स्तवनाला योग्य अशा पुरुषोत्तमा ! तूं पशुपांगज म्ह० नंदगोपाळाच्या पुत्राचें रूप धारण केलें आहेस; तूं अभ्र-वपु म्ह० घननील आहेस. तुझें वस्त्र विद्युल्लतेप्रमाणें ( तडिद् ) पीत-वर्णाचें आहे; गुंजांच्या माळा, कर्णभूषणें व मोराचीं पिसें यांच्या योगानें तुझ्या मुखकमलाला शोभा आली आहे; तुझ्या गळयांत वन्य-पुष्पांच्या माळा विराजत आहेत; दहीभाताचा घांस, वेताची छडी व शिंग ( विषाण ) व वेणु ( मुरली ) ह्या चिन्हांनीं तूं मनोहर दिसत आहेस ! तुझे चरण किती तरी कोमल आहेत !

नगर वाचनालय, सातारा.



अहो भाग्यमहो भाग्यं नंदगोपव्रजौकसाम् ।
यन्मित्रं परमानंदं पूर्णब्रह्मसनातनम् ॥ १२–१४–३२ ॥

गोकुळांत राहणारे नंदादि गोपगोपी व इतर गोपाळ यांचें भाग्य किती थोर कीं परमानंदरूप सनातन परब्रह्म त्यांचा मित्र म्हणून त्यांच्यांत खेळीमेळीनें वागत आहे! कृष्ण वृंदावनांत शिरले त्यावेळचें रूपः—

बर्हापीडं नटवरवपुः कर्णयोः कर्णिकारं
बिभ्रद्वासः कनककपिशं वैजयन्तीं च मालां ।
रंध्रान्वेणोरधरसुधया पूरयन्गोपवृंदे
वृंदारण्यं स्वपदरमणं प्राविशतद्गीतकीर्तिः ॥१०–२१–५ ॥

कृष्णानें मस्तकावर मोराचा टोप ( बर्हापीडं ) घातला होता; शरीर नटाप्रमाणें विचित्र वेष घेऊन शोभविलें होतें; कानांवर कर्णिकारवृक्षाची फुलें ठेविलीं होती; सुवर्णासारखें पिंगट ( कनककपिशं ) असें वस्त्र ( वासः ) धारण केलें होतें ( बिभ्रत् ); कंठांत वैजयन्ती माला धारण केली होती; आपल्या अधरामृतानें मुरलीचीं रंध्रें पूर्ण करीत श्रीकृष्ण मुरली वाजवीत होते; व गोपांचे समुदाय त्याची कीर्ति गात होते, त्याच्या चरणावरील चिन्हें सर्वत्र उमटल्यामुळें सर्वांच्या अंतरीं प्रेम उत्पन्न करणाऱ्या वृंदावनांत त्यानें प्रवेश केला. अक्रूर रामकृष्णांना घेऊन मथुरेकडे चालला असतांना वाटेंत त्यानें यमुनाजलांत स्नानार्थ बुडी मारली तेव्हां त्याला प्रभुदर्शन झालें त्याचें वर्णन ( स्कं. १०–३९ ) फार मधुर आहे. नारदानें ध्रुवाला सांगितलेल्या ध्यानासीं तें पूर्णपणें जुळतें आहे, मात्र थोडें विस्तृत आहे. त्यांतही 'चारु प्रसन्नवदनं चारु हासनिरीक्षणम्' हें मुख्य लक्षण आहेच. कृष्णाचें १६ व्या वर्षांत पाऊल पडत असल्यामुळें त्याच्या दीर्घ व पुष्ट भुजा, उंच खांदे, वळ्यांनीं युक्त पोट, असें वाढत्या शरीराचें वर्णन केलें आहे. **लावण्य, पुष्टि, वाणी, कांति, कीर्ति, तुष्टि,** तेज, **ब्रह्मविद्या,**

व माया या दासींसारख्या त्याच्या सभोंवार हात जोडून उभ्या होत्या असेंही म्हटलें आहे.

निर्गुणनिराकार ब्रह्मच कृष्णरूपानें सगुणसाकार झालें आहे, दोन्ही एका भगवंताचीच रूपें आहेत, हें दशमांत व अन्यत्र आलेल्या कृष्णस्तवनावरून उघड आहे. भगवंतांनीं गोपींना त्यांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन आपल्या ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान करून दिलें ( स्कं. १० अ. ८२) तेव्हां ते स्पष्टच म्हणाले आहेत कीं 'अहं हि सर्वभूतानामादिरन्तोन्तरं बहिः' देव सगुणनिर्गुणरूप एकमेवाद्वितीय आहे हें तर भागवताचें सार आहे. भागवताला 'निगमकल्पतरोर्गलितं फलं'—वेदरूप कल्पवृक्षाचें परिपक्व मधुर फळ असें ग्रंथारंभींच म्हटलें आहे. वेद, योगयाग, कर्म, ज्ञान, तप, धर्म हीं सर्व वासुदेवपर असून तो वासुदेवच देवकीनंदन झाला आहे.

**कृष्णमेनमवेहि त्वमात्मानमखिलात्मनाम् ।**
**जगद्धिताय सोऽप्यत्र देहीवाऽभाति मायया॥१०-१४-५५॥**

चराचर श्रीकृष्णच आहे, कृष्ण परमात्मा आहे, 'भगवद्रूपमखिलं नान्यद्वास्त्विह किंचन'—सारें विश्व भगवद्रूप म्ह० कृष्णरूप आहे.

भगवंतांनीं भगवद्गीतेंत अव्यक्तोपासकांना अधिक क्लेश पडत असून देहवंतांना अव्यक्त गति क्वचितच मिळणारी आहे, तशी माझ्या सगुणरूपाची उपासना नाहीं म्हणून मनबुद्धि माझ्या सगुणरूपाच्या ठिकाणींच ठेव असें अर्जुनाला १२ व्या अध्यायाच्या प्रारंभींच सांगितलें आहे. अगदीं हेंच तत्व भागवतांतही (स्कंध १० अ. १४) आहे. ब्रह्मदेव म्हणतो कीं "ज्ञाने प्रयासं'—ज्ञानमार्गांत फार प्रयास—कष्ट आहेत तथापि हे भगवन्! तुला वश करायचा उपाय सुलभ आहे. सत्संगतींत तुझ्या रूपागुणांचें श्रवण केल्यानें तुझ्याविषयीं प्रेम उत्पन्न होऊन भक्ति दृढ होत जाते. सगुणभक्तीला सोडून जे केवळ ज्ञानाच्या मार्गें लागतात त्यांना कष्ट मात्र होतात'— क्लिश्यन्ति ये केवलबोध-

लब्धये ! कोंडा कांडण्यापासून लाभ काय व्हायचा आहे ? " ह्याचा अर्थ ज्ञान तुच्छ आहे असा नाहीं, पण सगुणभक्तीवांचून, भगवंताच्या रूपाच्या ध्यानावांचून व गुणानुवादावांचून तें व्यर्थ आहे एवढाच आहे. 'अच्युतभाववर्जित' असा निष्काम कर्मयोग किंवा ज्ञानही शोभा पावत नाहीं असा भागवताचा आणि गीतेचा सिद्धांत आहे.

## १० गुणानुवाद व नामसंकीर्तन.

देवाच्या चरित्राविषयीं, देवाच्या रूपगुणाविषयीं, देवाच्या नामाविषयीं जर धर्माचरणानें प्रेम उत्पन्न झालें नाहीं तर तें धर्माचरण केवळ श्रममात्र होय ( १–२–८ ). म्हणून तें प्रेम उत्पन्न होण्यासाठीं भगवान् 'श्रोतव्यः कीर्तितव्यश्च ध्येयः पूज्यश्च नित्यदा' (१–२–१४ )—देवाचे गुणानुवाद ऐकावेत, गावेत, त्याला ध्यावें व त्याचेंच पूजन करावें. देह, वाणी, बुद्धि व मन यापासून उद्भवणाऱ्या विकारांचा किंवा पापांचा क्षय तप, ब्रह्मचर्य, शमदमादि साधनांच्या योगानें होतो तथापि केवल भक्तीचा अवलंब केल्यानेंही सुलभतया पापक्षय होतो. वरील साधनांनीं पापक्षय होतो, प्रायश्चित्तानें पापें जळतात, पण वासनेचें बीजही जाळून टाकण्याचें सामर्थ्य एका भगवंताच्या गुणानुवादांत आहे (स्कंध ६–१). याविषयीं अजामीळाचें चरित्र साहव्या स्कंधांत सांगितलें आहे. 'गुणानुवादः खलु सत्वभावनः'—देवाच्या गुणनामकीर्तनानें असंख्य पतित उद्धरले आहेत. ज्याचे गुण गावेत त्याला हा आपला आहे, याचें आपण रक्षण केलें पाहिजे, असें सहजच वाटतें. देवाचें होऊन जावें म्हणजे निश्चिंतता येते. देवाचें नाम आवडीनें, थट्टेनें, हेळणेनें कसेंही घेतलें तरी तें आपला प्रभाव करितेंच. आवडीनें घेण्यांत सुखानुभव येतो. औषध रोग्यानें गुण कळून न कळून किंवा हेळणेनें घेतलें तरी तें रोग दूर करितेंच ! अग्नीवर पाय नकळत पडला तरी तें दाह करणारच ! सुखाच्या दुःखाच्या कोणत्याही प्रसंगीं नाम घेतल्यानें यातना कमी होतात. 'म्रियमाणो हरेर्नाम गृणन्पुत्रोपचारितं ।

अजामिळोऽप्यगाद्धाम किंपुनः श्रद्धया गृणन् ’ (६–२–४९)-पुत्राचें म्हणून ठेवलेलें नारायणाचें नाम अजामिळानें मरणसमयीं उच्चारलें तर तो तेवढ्यानेंही उद्धरला मग श्रद्धाभक्तिपूर्वक नामचिंतन करणारा मनुष्य संसारसागर तरून जाईल यांत आश्चर्य तें कोणतें ? नामसंकीर्तनादि करून भगवंताला भक्तियोगानें भजणें हाच भागवतधर्म असून ब्रह्मदेव, नारद, शंकर, सनत्कुमार, कपिल, मनु, प्रल्हाद, जनक, भीष्म, शुक्राचार्य, बलि व यम हे बाराजण भागवतधर्माचे प्रवर्तक आहेत ( स्कंध ६–३ ). देव अनंत व नामरूपातीत आहे पण त्याची चरणसेवा करणाऱ्यासाठीं तो नामरूपें घेतो, अवतार घेतो व अनेक लीला करितो (६–४–३३). देवाचे सारे अवतार भूतांच्या उत्कर्षाला कारण झाले आहेत–‘ सर्वे लीलावतारास्ते भूतानां भूतिहेतवः ’ ( ८–२४–२९ ). भगवंताची सेवा सर्वेंद्रियांनीं करावी. मन श्रीकृष्ण चरणकमलाकडे, वाणी त्याच्या गुणवर्णनाकडे, हात श्रीहरिमंदिराचे सडासंमार्जन करण्याकडे, कान अच्युताच्या कथाश्रवणाकडे, डोळे मुकुंदाची मूर्ति व मंदिर यांच्या दर्शनाकडे, अंगसंग त्याला किंवा भक्तांना भेटण्याकडे, नासिका त्याच्या चरणावर वाहिलेल्या तुलसीचा सुगंध घेण्याकडे, रसना त्याला अर्पण केलेल्या अन्नादिकांचें सेवन करण्याकडे, पाय त्याच्या क्षेत्राला नेण्याकडे, व मस्तक त्याच्या चरणीं लीन करण्याकडे–याप्रमाणें सर्वेंद्रियांनीं भगवानच सुसेव्य आहेत. असा अंबरीष राजाचा वर्तनक्रम असे. इंद्रियांकडून घडणारीं सर्व कर्में तो भगवंताला निवेदन करी व सच्छील ब्राह्मणांची आज्ञा घेऊन भूमंडळाचें राज्य करी ( स्कंध ९ अ० ४ ). हीच गोष्ट पुढील सुंदरश्लोकांत १० स्कंधांतल्या ८० व्या अध्यायांत सांगितली आहे:—

**सा वाग्यया तस्य गुणान्वृणीते । करौ च तत्कर्मकरौ मनश्च ।**
**स्मरेद्वसन्तं स्थिरजंगमेषु । शृणोति मत्पुण्यकथाः सकर्णः ॥३॥**
**शिरस्तु तस्योभयलिंगमानमेत् । तदेव यत्पश्यति तद्धि चक्षुः ।**
**अंगानि विष्णोरथ तज्जनानां । पादोदकं यानि भजन्ति नित्यम्४**

वाणी तीच कीं जी परमेश्वराचे गुणानुवाद गाते, हात तेच कीं जे त्याची सेवा करितात मन तेंच कीं जें चराचरांत भरून राहिलेल्याचें चिंतन करितें. कान तेच कीं, जे त्याच्या पुण्यकथा ऐकतात. शिर तेंच कीं जें हरीच्या स्थिर व चर अशा उभयरूपांच्या पुढें नम्र होतें. त्याच्या मूर्तींना पाहतात तेच नेत्र व विष्णूच्या किंवा विष्णुभक्तांच्या चरण-तीर्थांचें सेवन करितात तेच अवयव-तोच देह...

**वाणी गुणानुकथने श्रवणौ कथायां। हस्तौ च कर्मसु मनस्तव पादयोर्नः स्मृत्यां शिरस्तव निवासजगत्प्रणामे । दृष्टिःसतां दर्शनेऽस्तु भवत्तनूनाम् ॥ ( १०-१०-३८ ).**

**निवृत्ततर्षैरुपगीयमानात् भवौषधात् श्रोत्रमनोभिरामात् ।**
**क उत्तमश्लोकगुणानुवादात् पुमान्विरज्येत विनाऽपशुघ्नात् ॥**
**( १०-१-४ )**

पुण्यश्लोक भगवंताच्या गुणानुवादापासून सर्वांसच आनंद होत असतो. निवृत्ततष ह्म० ज्यांच्या तृष्णा गेल्या आहेत अशांना ह्म० मुक्तांना त्याच्या लीलांचें गायन प्रियच असतें; भव ह्म० जन्ममृत्युरूप संसार त्यांतून सुटायची इच्छा करणाऱ्यांना ह्म० मुमुक्षूंना हें उत्तम औषधच आहे व विषयी जनांना हें ऐकायला श्रवणमधुर आहे. त्यांना अद्भुत गोष्टीचें श्रवण, गायन व वाचन हवेंच असतें. याप्रमाणें हरियश बद्ध, मुमुक्षु व मुक्त या तिघांनाही आवडणारें आहे. हें न आवडणारा एकवर्ग राहिला. 'पशुघ्नात् विना' ह्म० पशूंचा निर्दयपणें घात करणारे जे हृदयशून्य निष्करुण लोक ह्यांवाचून, अथवा 'अपशुघ्नात् विना'– शुक् ह्म० शोक ज्यापाशीं नाहीं असा आनंदरूप आत्मा–ह्याचा घात करणारा, आत्मघातकी, आत्महत्यारा–त्यांवांचून–निर्दय किंवा आत्म-घातकी लोकावांचून इतर सर्वांना भगवद्यश आवडणारें आहे असा या श्लोकाचा इत्यर्थ आहे. तात्पर्य हरीचें यश ( गुणानुवाद ) शुकासारख्या मुक्तांना स्वानंददायक म्हणून गायला आवडतें, मुमुक्षुसाधकांना तें भव-

रोगाचें औषध ह्मणून आवडतें व विषयीजनांना त्याच्या अद्भुतरम्य कथांमुळें तें आवडतें; एवंच ज्यांना आवडत नाहीं असे लोक आत्मनाश करून घेत आहेत. 'शृण्वन् गृणन् संस्मरयंश्च चिंतयन् । नामानि रूपाणि च मंगलानि ते'–नारायणा ! जो तुझ्या गुणांचें श्रवण व गायन करितो, दुसऱ्यांना त्याचें स्मरण करवून देतो, तसेंच तुझ्या मंगल नामरूपांचें चिंतन करितो तो 'न भवाय कल्पते'–संसारचक्रांतून सुटतो ( १०–२–३७ ). भगवंताचीं मंगल जन्मकर्में ह्म० रामकृष्णादि अवतारलीला व त्यांनीं धारण केलेलीं नामें गाणारा भक्त लोकलज्जा व बाह्यसंग सोडून गायन करीत स्वेच्छ पृथ्वीतलावर फिरून पृथ्वीला पावन करितो. नामानें अंतरीं अलोट प्रेम उद्भवलें व चित्त द्रवलें म्ह० देहभावविरहित होत्साता कधीं मोठ्यानें रडतो, कधीं हांसतो, कधीं ओरडतो, कधीं गातच राहतो व कधीं प्रेमाच्या उन्मादानें नाचत असतो– 'हसत्यथो रोदिति रौति गायन् । उन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः'

**कथं विना रोमहर्षं द्रवता चेतसा विना ।**
**विनाऽऽनंदाश्रुकलया शुद्ध्येद्भक्त्या विनाऽऽशयः ॥११-१४-२३॥**

अंगावर रोमांच थरारत नाहींत, अंतःकरणाला भक्तिप्रेमाचे पाझर फुटत नाहींत, नेत्रांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहत नाहींत, तर ती भक्ति कसली ? व भक्तिवांचून चित्तशुद्धि तरी व्हावी कशी ? देवाचे गुणनाम गातांना ज्याची वाणी सद्गदित होतें व चित्त प्रेमानें आर्द्र होऊन जो याप्रमाणें हांसतो, रडतो, गातो, नाचतो, तो त्रिभुवनाला पावन करितो –'मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति'

**ता ये शृण्वन्ति गायन्ति ह्यनुमोदन्ति चादृता- ।**
**मत्पराः श्रद्दधानाश्च भक्तिं विन्दति ते मयि ॥ ११-२६-२९ ॥**

इतकी उत्कट भक्ति गुणानुवादानेंच उत्पन्न होते. भगवान् वरील श्लोकांत सांगतात कीं जे माझ्या कथा ऐकतात, गातात व त्यांस आदरपूर्वक अनुमोदन देतात ते मत्परायण व सश्रद्ध होऊन माझें भक्तिसुख पावतात.

**यथायथात्मा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः ।**
**तथातथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवांजनसंप्रयुक्तम् ॥११-१४॥**

देव सांगतात कीं माझ्या पुण्यकथाश्रवणाच्या ( व कीर्तनाच्याही ) योगानें जसजसी बुद्धि निर्मल होते तसतसें डोळ्यांतल्या अंजनानें भूमिगतद्रव्य दिसावें त्याप्रमाणें सूक्ष्म व अतींद्रिय परमात्मवस्तूचें ज्ञान होतें.

भगवंताचा गुणानुवाद हा प्रतिदिनीं श्रवण केल्यानें सकल अमंगलांचा नाश होतो; श्रवण, नामसंकीतन, ध्यान, भजन, पूजन यांनीं भगवान् हृदयांत आविर्भूत होऊन ' जन्मशताशुभं धुनोति '–हजारों जन्मांचीं पापें नाहींशीं करितो; धातुसंसर्गानें वर चढलेले डाग अग्नि जाळून टाकून सोनें शुद्ध करितो–' एवमात्मगतो विष्णुर्योगिनामशुभाशयम्'–त्याप्रमाणें चित्तांत प्रविष्ट झालेला परमात्मा विष्णु आपल्या भक्तांच्या हृदयांतील किल्मिष पार झाडून टाकतो. विद्या, तप, प्राणायाम, सर्वभूतीं प्रेम, तीर्थस्नानें, यज्ञदानतपें हीं सर्व चित्तशुद्धीचीं साधनें योग्यच आहेत, तथापि हृदयस्थ भगवान् जशी अंतरात्म्यास अत्यंत शुद्धि देतात तशीं हीं साधनें देऊं शकत नाहींत.

**कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महागुणः ।**
**कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तसंगः परं व्रजेत् ॥ ५१ ॥**
**कृते यत् ध्यायतो विष्णु त्रेतायां यजतो मखैः ।**
**द्वापारे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥१२-३-५२॥**

कलि हा सकलदोषांचा निधि आहे तरी त्याचा हा महागुण आहे का ह्या युगांत केवल हरिसंकीर्तनभक्तीनेंच मनुष्य संगमुक्त होऊन उत्तम पदास जातो. कृतयुगांत ध्यानानें, त्रेतायुगांत यज्ञाराधनेनें, व द्वापारांत पूजाकर्मानें जें फळ मिळत असे तेंच कलियुगांत हरिकीर्तनानें मिळतें. नानाविध दुःखशोकांनीं गांजलेल्या जनांस याशिवाय दुसरें साधनच नाहीं. भगवंताचे गुणानुवाद गायिले न जातां असत्कथा सांगणारी वाणी व्यर्थ होय. तात्पर्य हरिगुण हेच उद्धारक आहेत.

**तदेव रम्यं रुचिरं नवं नवं तदेव शश्वन्मनसो महोत्सवम् ।**
**तदेव शोकार्णवशोषण नृणां यदुत्तमश्लोकयशोऽनुगीयते ॥**

पुण्यश्लोक पुरुषोत्तमाचें यश ज्यांत गायिलें जातें तेंच भाषण रम्य, रुचिर, सत्य, तेंच मनाला निरंतर नवानवा आनंद देणारें, व शोकसमुद्र आटवून टाकणारें होय. 'यत्राच्युतस्तत्र हि साधवोऽमलाः'– जेथें अच्युत तेथेंच विमल साधु रमतात. सिद्धांत हा आहे कीं निष्काम कर्मयोग व निर्मल ज्ञान हीं भक्तिविरहित पूर्ण शोभा पावत नाहींत:–

**नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं । न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।**

श्रीकृष्णपदाचें अविस्मरण ( विसर न पडणें ) हेंच सकल अमंगलांचा नाश करितें, शांतिसुख विस्तारितें, चित्त शुद्ध करितें व ज्ञान ( औपनिषद् ज्ञान ) व विज्ञान ( अपरोक्षानुभव ) दोन्ही देतें.

## ११ संत व सत्संगाची महती

आपल्यापेक्षां वरिष्ठांची संगति आपल्या उन्नतीला कारण होते हा जगांतला अनुभव आहे. सर्वच श्रेष्ठ पुरुष आपल्याला गुरुरूप असतात; मग ज्यांनीं सत्यस्वरूप परमात्मा आपलासा केला, सत्चें चिंतन करितांकरितां जे सत्स्वरूप झाले, त्यांच्या संगतीपेक्षां अधिक लाभदायक काय आहे? सत्संगांत संतांना जें प्रिय तें आपल्याला आवडायला लागतें, ते ज्यांचा त्याग करितात त्या गोष्टी त्याज्य वाटूं लागतात व मनुष्य संतसंगतींत संतच होतो. संतांना देव अत्यंत प्रिय किंबहुना संत हीं देवाचीं बोलतीं चालतीं रूपें आहेत. त्यांच्या दर्शनाबरोबरच शुद्ध संस्कार जागृत होऊन पावनता येते.

**येषां संस्मरणात्पुंसां सद्यः शुद्ध्यन्ति वै गृहाः ।**
**किं पुनर्दर्शनस्पर्शपादशौचासनादिभिः ॥** स्कंध १–१९–३३

संतांची सेवा केली असतां 'भक्तिर्भवति नैष्ठिकी' ( १–२–१८ ). ध्रुवप्रल्हादादि असंख्य भक्त सत्संगानेंच उद्धरले आहेत, फार काय पण सत्संगाशिवाय कोणीही उद्धरला नाहीं असेंही म्हणायला हरकत

नाहीं. संतांपासूनच जगाला सुखसमाधान मिळतें. मनुष्याची पशुवृत्ति दवडून त्याला देव बनविण्याचें सामर्थ्य संतांत असतें. संत पतितांना तारतात, जडाला बुद्धि देतात, दगडाचे देव बनवितात. ऋषभदेव आपल्या पुत्रास सांगतात कीं 'महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्ते-। स्तमोद्वारं योषितां संगिसंगम्' ( स्कंध ५-५-२ )-संतसेवा हें मोक्षाचें व स्त्रैणांचा संग हें नरकाचें द्वार आहे ! संत हे समचित्त, शांत व दयाळु असतात. ज्ञान हें तपानें मिळत नाहीं, यज्ञयागानें, अन्नदानानें, वेदाभ्यासानें मिळत नाहीं, सत्पुरुषाची पायधूळ मस्तकीं धारण केल्यावांचून ज्ञा० संतांना शरण गेल्यावांचून कशानेंही मिळत नाहीं, कारण संतांच्या घरीं पुण्यश्लोक भगवंताच्या गुणांचें गायन नित्य चाललेलें असतें ( उत्तमश्लोकगुणानुवाद ), तेथें विषयांच्या गोष्टींना ( ग्राम्यकथा ) प्रतिबंध असतो, रोजरोज भगवत्कथा कानांवर पडत असल्यामुळें मुमुक्षूंची बुद्धि निर्मळ होऊन वासुदेवाच्या स्वरूपीं ती अनायासें रंगते ( स्कं. ५-१२-१३ ). 'महीयसां पादरजोभिषेकं'-संतांच्या पायधुळींत लोळण घेतल्याशिवाय भक्तिसुख प्रिय होत नाहीं व भक्तीवांचून भवदुःखाची निवृत्ति होत नाहीं ( स्कंध ७-५-३२ ). गुरुसेवा, भक्ति, आत्मनिवेदन, साधुभक्तांची संगति, व ईश्वराराधन हे संतांचे सहजधर्म आहेत ( ७-७-३० ) व यांचें रहस्य त्यांच्या संगतींतच साधकांना समजत असतें. 'दयया सर्वभूतेषु संतुष्ट्या येन केन वा । सर्वेंद्रियोपशांत्याच तुष्यत्याशु जनार्दनः' ( ४-३१-१९ ) असा भवगत्प्रसादाचा राजरस्ता संत सांगत असतात. संतुष्ट व स्वात्माराम झालेल्या पुरुषाला जें सुख आहे तें कामलोभानें दशदिशा धांवणाऱ्यांच्या कपाळीं कोठचें ? 'सदा संतुष्टमनसः सर्वाः सुखमयाः दिशः' ( ७-१५-१७ ). परदुःखानें विव्हळ होणें व भूतांच्या हितार्थ झटणें हा साधूंचा स्वभाव असतो, हेंच सर्वांतर्यामी परमेश्वराचें आराधन आहे.

**तप्यन्ते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः ।**
**परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ॥ ८-७-४४ ॥**

व ह्मणूनच समस्त संसारपरिश्रम हरणारें भगवंताचें जें गुणानुवर्णन त्यांत ते स्वतः रमतात व जगास रमवितात ( १२–७–४६ ). भगवान् ह्मणतात लोकांच्या दुःखाची आंच माझ्या भक्तांच्या हृदयाला लागली कीं ती माझ्या हृदयाला लागते, कां कीं 'साधवो हृदयं मह्यं साधूनां हृदयं त्वहम् । मदन्यत्ते न जानन्ति नाहं तेभ्यो मनागपि' (९–४–६८)—साधु माझें हृदय आहेत व मी साधूंचें हृदय आहे, ते मजवांचून दुसरें कोणी जाणत नाहींत व मी त्यांच्यावांचून कांहींही जाणत नाहीं. याप्रमाणें देव भक्त अगदीं एकमय आहेत, म्हणून साधूंना लोकदुःखांची आंच बसतांच ती देवाच्या हृदयाला बसते व साधूंचें हें परतापजनित दुःख दूर करण्यासाठीं भगवंताला अवतार घ्यावे लागतात! 'परित्राणाय साधूनां–संभवामि युगे युगे' ह्या गीतावचनाचा अर्थ असा आहे, म्हणूनच 'साधवो दीनवत्सलाः' असें म्हटलें आहे. दुष्टांकडून साधूंचा वेळोवेळीं छळ केला जातो, पण शेवट पाहिला तर पापी मनुष्य आपल्या पापानेंच मरतो व साधूची सर्वत्र समबुद्धि असल्यामुळें तो सर्व संकटांपासून मुक्त होतोः—' हिंस्रः स्वपापेन विहिंसितः खलः । साधुः समत्वेन भयाद्विमुच्यते ( ११–७–१३ )

**न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः ।**
**ते पुनंत्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ १०–८४–११**

उदकें हीं खरोखर तीर्थें नव्हत व मृत्तिकापाषाणांच्या प्रतिमा ह्या देव नव्हत ( त्यांना तीर्थपण व देवपण संतांमुळें येतें ), कारण त्यांना लोकांना पावन करायला पुष्कळ काळ लागतो, व साधु तर दर्शनमात्रानें जीवांचा उद्धार करितात ! देव, तीर्थें व क्षेत्रें दर्शनस्पर्शनार्चादिकांनीं पावन करितात पण ती दीर्घकालानें–आणि ही सुद्धा त्यांच्या ठिकाणची शक्ति साधूंच्या समागमामुळेंच त्यांना येते. भगवान् उद्धवाला म्हणताततः—

**न तथा मे प्रियतम आत्मयोनिर्न शंकरः ।**
**नच संकर्षणो न श्रीर्नैवात्मा च यथा भवान् ॥ १५॥**

[stamp] वाचनालय,



निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शिनम् ।
अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥ ११-१४-१६ ॥

उद्धवा ! तूं मला जितका प्रिय आहेस तितका माझा पुत्र ( आत्मयोनि, ब्रह्मदेव ) प्रिय नाहीं, सखा शंकर, भाऊ बलराम, भार्या लक्ष्मी, फार काय पण माझा मीही मला प्रिय नाहीं ! निरपेक्ष, मननशीळ, शांत, निर्वैर व समदर्शी अशा संतांच्या व भक्तांच्या मागें मागें मी फिरत असतों तो एवढ्याचसाठीं कीं त्यांच्या चरणधूळीनें मी माझ्या उदरांतील ब्रह्मांडांना पावन करून घ्यावें ! म्हणून मी म्हणतों कीं इतर सर्वसंग सोडून–ते खरोखरीच दुःसंग आहेत—केवळ संतांचाच संग करावा. मनाची विषयप्रीति संत उडवितातः—

**संतो दिशंति चक्षूंषि बहिरर्कः समुत्थितः ।**
**देवता बांधवाः संतः संत आत्माहमेव च ॥ ११–२६–३४ ॥**

संत डोळे देतात. अंतर्बाह्य प्रकाश पाडणारे संत होत ! संतच देव, संतच बांधव. संतच आत्मा, फार काय संतच मूर्तिमंत परमेश्वर होत !

## १२ भागवतधर्मांचीं मुख्यतत्वें

एकादश स्कंध हा भागवताचें सार आहे. त्यांत पहिली पंचाध्यायी तर भागवतधर्माचें रहस्य सांगण्यासाठींच लिहिली आहे. ही पंचाध्यायी व २९ वा अध्याय एवढे सहा अध्याय पाहिले तरी भागवतधर्माचें सिद्धांत व भागवतधर्मीयांचें आचरण या दोहोंचाही बोध होण्यासारखा आहे. हे धर्म आचरण्यास फार सुलभ आहेत, व त्याच्या योगानें अज्ञानी जीवालाही ब्रह्मस्थिति सुगम होते.

**( १ ) कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ॥**
**करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ११-२–३६ ॥**

मनानें, बुद्धीनें, चित्तानें, इंद्रियांनीं, शरीरानें, व जन्मस्वभावानुसार जें जें कर्म पुरुष करील तें तें सगळें परमात्मा जो नारायण त्याला

समर्पण करावें. ( गीतेंतही ' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ' ( ९–२७ ) असेंच सांगितलें आहे. दोन्ही श्लोकांचें तात्पर्य हें आहे कीं केवळ धार्मिक कर्मेंच नव्हत तर लौकिक कर्मेंही भगवंताला अर्पावींत. नारायणाला विसरून कर्म केलें कीं देहबुद्धि उत्पन्न होऊन तो वेगळा व मी देहवान् वेगळा असें द्वैत वाढतें व ' भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात्'– द्वैताच्या पोटीं भय आहे म्हणून गुरुचरणसेवा करून नारायणाला भजावें.

**( २ ) शृण्वन्सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ।**
**गीतानि नामानि तदर्थकानि गायन्विलज्जो विचरेदसंगः ॥ ३९ ॥**
**एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ।**
**हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ४०**

द्वैतप्रपंच भयावह आहे, तेथें संकल्पविकल्पात्मक मन चांचल्य आणतें पण हें चांचल्यही ईश्वरगुणानुवादाच्यायोगें नाहींसें होतें; म्हणून ईश्वरानें जे जे मंगलकारक अवतार घेतले व ज्या ज्या लीला केल्या व त्या आपल्या जन्मकर्मासाठीं जीं जीं नावें घेतलीं त्यापैकीं जीं लोकांत प्रसिद्ध असून गायिलीं जातात त्यांचें मनुष्यानें अगदी लाज न धरितां असंगत्वानें गायन व श्रवण करीत स्वानंदांत फिरावें. या योगें आपल्या प्रिय ईश्वराच्या नामसकीर्तनानें अंतरीं प्रेम उद्भवून त्याचें चित्त द्रवतें व तो भक्तीच्या विविध रंगांत डुबून गेल्यामुळें कधीं हंसतो–' अरे ! माझा मी आपल्यालाच कसा हरवलों होतों ! चुकलों होतों पण सांपडलों ' असें मनांत येऊन खदखदा हंसतो, कधीं रडतो– ' ईश्वरानें माझा फार अंत पाहिला ' असें वाटून किंवा आनंदोर्मीचें सुख अनुभवीत त्या सुखांतच रडतो; कधीं ' गुरुदेवाच्या दयेनें मुक्त होऊन मी आपलें मरण डोळ्यांनीं पाहिलें ' या हर्षातिशयानें ' नारायणा नारायणा ' म्हणून मोठ्यानें आरोळया ठोकतो व प्रेमभरानें हरिसुख अंतर्यामीं अनुभवीत गात नाचत सुटतो व लौकिक व्यवहाराच्या पार जातो.

भोजन करणाराला तुष्टि, पुष्टि व क्षुधानाश हे तिन्ही लाभ एकदम होतात त्याप्रमाणें गुणनामसंकीर्तन करणाराला 'भक्तिः परमेशानुभवो विरक्तिः' म्ह. भक्तिप्रेम, ईश्वरसाक्षात्कार व वैराग्य हे तिन्ही एकाकाळींच प्राप्त होतात; भक्तिज्ञानवैराग्याचा एकदम लाभ होतो.

(३) प्रल्हादानें नवविधाभक्ति सांगितली व त्यानेंच 'प्रीयतेऽमलया भक्त्या हरिरन्यद्विडंबनम्'–हरी हा निर्मलभक्तीनेंच प्रसन्न होतो, भक्ति नसेल तर बाकींचीं सर्व सोंगें आहेत असें ह्मटलें आहेच. 'एकांत भक्तिर्गोविंदे यत्सर्वत्र तदीक्षणम्'–हरीला सर्वभूतीं पाहणेंच एकनिष्ठ-भक्तीचें रहस्य आहे.

**गुरुशुश्रूषया भक्त्या सर्वलब्धार्पणेन च ।**
**संगेन साधुभक्तानामीश्वराराधनेन च ॥ ७–७ ॥**

हीं भक्तिविकासाचीं साधनें सांगितलीं आहेत.

( ४ ) ( भगवान् कश्यप आपल्या पुत्रांचें गेलेलें राज्य त्यांना परत कसें मिळेल हा प्रश्न करणाऱ्या अदितीला सांगतात ):—

**उपतिष्ठस्व पुरुषं भगवन्तं जनार्दनम् ।**
**सर्वभूतगुहावासं वासुदेवजगद्गुरुम् ॥ २० ॥**
**स विधास्यति ते कामान् हरिर्दीनानुकंपनः ।**
**अमोघा भगवद्भक्तिर्नेतरेति मतिर्मम ॥ २१ ॥ ( ८–१६ )**

भगवंताचें अधिष्ठान किंवा हरिभजन हें प्रथम प्राप्त करून घ्यावें ह्मणजे परमात्मा सर्व मनोरथ पूर्ण करितो. भक्ति हें अमोघ शस्त्र आहे.

( ५ ) हे भागवतधर्म वेदार्थज्ञानांत व अनुभवांत निष्णात असून शांतिरूप असलेल्या सद्गुरुजवळ तोच आपला आत्मा व देव अशा निर्मळबुद्धीनें साधकानें शिकावेत:—

**तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।**
**शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥ ११–३–२१ ॥**

**तत्र भागवतान्धर्मान् शिक्षेद्गुर्वात्मदैवतः ।**
**अमाययाऽनुवृत्त्या यैस्तुष्यैदात्माऽऽत्मदो हरिः॥११-३-२३॥**

निष्कपट व विमलबुद्धीनें गुरुसेवा करून हे धर्म शिकावेत. भागवताच्या अंगीं शौच, तप, तितिक्षा, मौन, स्वाध्याय, आर्जव (सरलता), ब्रह्मचर्य, अहिंसा, शीतोष्णादि द्वंद्वें सहन करण्याइतकी मनाची समता, सर्वाभूतीं भगवद्भाव, संतोषवृत्ति, सत्य, शम, व दम, इ० गुण पाहिजेत. साधकानें ह्या गुणांचा अभ्यास करावा. ' श्रद्धां भागवते शास्त्रेऽ निंदामन्यत्र चापि हि '–भागवतशास्त्रावर पूर्ण विश्वास ठेवावा पण अन्य शास्त्रांची बिलकूल निंदा करूं नये.

**( ६ ) इष्टं दत्त तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः प्रियम् ।**
**दारान्सुतान्गृहान्प्राणान्यत्परस्मै निवेदनम् ॥ २८ ॥**

यज्ञ, दान, तप, जप, सदाचरण, व स्वतःला प्रिय वाटणारे सर्व पदार्थ ( गंधपुष्पादि ), आणि स्त्री, पुत्र, गृह, प्राण हीं सर्व परमेश्वराच्या सेवेला लावावींत.

**( ७ ) स्मरंतः स्मारयन्तश्च मिथोऽघौघहरं हरिम् ।**
**भक्त्या संजातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकां तनुम् ॥११-३-३१॥**

भक्त हे परस्परामध्यें पापसमूहाचें निरसन करणाऱ्या हरीला स्मरतात व त्याचें स्मरण करून देतात, त्यांच्या अंतरीं सप्रेमलक्षणा भक्ति उद्भवून त्यांचें शरीर रोमांचित होत असतें. भागवतधर्मांत अन्य जीवांना दुःख देणें हें वर्ज्य असल्यामुळें व तो अहिंसामूलक असल्यामुळें पशुहत्या व मांसभक्षण यास पूर्ण निषेध आहे ह उघडच आहे. जे निःशंकपणें पशुमांस खातात त्यानां हे पशुच मरणानंतर खात असतात. ' द्विषंतः परकायेषु स्वात्मानं हरिमीश्वरम् । पशून् द्रुह्यन्ति विस्रब्धाः प्रेत्य खादन्ति ते च तान् ' (११-५-१५) पशुहत्या हा भगवत्द्रोह आहे.

**(८) श्रद्धालुर्मे कथाः शृण्वन् सुभद्रा लोकपावनीः ।**
**गायन्ननुस्मरन्कर्म जन्म चाभिनयन् मुहुः ॥ २३ ॥**

**मदर्थे धर्मकामार्थान् आचरन्मदपाश्रयः ।**
**लभते निश्चलां भक्तिं मय्युद्धव सनातने ॥ ११–११–२४ ॥**

मनुष्यानें मजवर निष्ठा ठेवून माझ्या कल्याणकारक व लोकांना पावन करणाऱ्या कथा ऐकाव्या, माझीं जन्मकर्में इ० अवतारचरित्रें गावीं व चिंतावीं, माझ्या लीलांचें अनुकरण करावें, व धर्मार्थकाम हेही माझ्या आश्रयानें माझ्या संतोषासाठीं साधावेत म्हणजे सनातन —अज, अनादि व नित्य—असा जो मी **परमात्मा** त्या माझे ठायीं निश्चल भक्ति त्याला प्राप्त होते.

माझें व माझ्या भक्ताचें दर्शन, पूजन, स्तवन, व कीर्तन; माझ्या कीर्तनाची आवड; माझें चिंतन; स्वतःला प्रिय असलेल्या वस्तूंचें समर्पण; माझ्या पर्वोत्सवांना अनुमोदन; एकादशीव्रत; माझीं मंदिरें, माझ्यासाठीं उपवनें, विहिरी वगैरे यथाशक्ति बांधणें; माझ्या मंदिरांत झाडसारव वगैरे हरएक प्रकारचें स्वतः दास्य करण; मानदंभादिकांचा त्याग व आपल्या धर्मकृत्यांचा अनुच्चार; इ० आचरणें हीं माझ्या (भगवंताच्या) भक्तीचीं साधनें होत(११-११-३३ ते ४१).

**तस्मात्संगो न कर्तव्यः स्त्रीषु स्त्रैणेषु चेंद्रियैः ।**
**विदुषां चाप्यविश्रब्धः षड्वर्गः किमु मादृशाम् ॥११–२६ ॥**
**परस्वभावकर्माणि न प्रशंसेत् न गर्हयेत् ।**
**विश्वमेकात्मकं पश्यन् प्रकृत्या पुरुषेण च ॥ ११–२८ ॥**
**अतिवादांस्तितिक्षेत नावमन्येत कंचन ।**
**न चेमं देहमाश्रित्य वैरं कुर्वीत केनचित् ॥ १२–६–३४ ॥**

स्त्रीस्त्रैणांचा संग करूं नये, दुसऱ्याच्या स्वभावांचीं व कर्मांची स्तुतिनिंदा करूं नये, दुर्भाषणें सहन करावींत पण आपण कोणाची हेळणा करूं नये, हें वरील श्लोकांत सांगितलें आहे.

(९) ११ व्या स्कंधांतल्या २९ व्या अध्यायांत भागवतधर्म विस्तारानें सांगितले आहेत त्यांचा आपण संक्षेपांत विचार करूं. देव

उद्धवाला सांगतात, "मुमुक्षूनें माझें नित्य स्मरण करावें, व मन माझे ठिकाणीं ठेवावें. भागवतधम आपल्या अंगीं बाणावेत अशी आवड धरावी. भक्त व ज्ञानी जेथें राहतात त्या पुण्यक्षेत्रीं राहावें. त्यांच्या आचरणाचें अनुकरण करावें व त्यांचीं चरित्रें वर्णावींत. एकट्यानें किंवा समुदायासह पर्वणीला यात्रा व महोत्सव करावेत. रागद्वेषरहित चित्त ठेवून स्वतःच्या व सर्व प्राण्यांच्या अंतरीं परमात्मा वसत आहे असें पहावें, याप्रमाणें ज्ञानदृष्टीच्या योगानें सर्वभूतें भगवद्रूप आहेत असें मानून त्यांचें गौरव करावें. ब्राह्मण व चांडाल, चोर व उदार, क्रूर व शांत अशा जातीनें, कृतीनें, स्वभावानें व गुणांनीं परस्परविरुद्ध अशा सर्व जीवांच्या हृदयीं परमेश्वर वसत आहे त्याला पहावें. ही समदृष्टि आहे. तात्पर्य, 'मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायवृत्तिभिः' हा आपल्या कल्याणाचा अत्यंत श्रेष्ठ उपाय आहे, भागवतधर्माचें हेंच परमरहस्य होय. सर्व प्राणि भगवत्स्वरूप पाहणें हा भागवतधर्म व असें जो पाहतो तो भागवत किंवा वैष्णव होय. विनाशी व असत्य अशा शरीराच्या साह्यानें अविनाशी व सत्य अशा परमात्मवस्तूचा लाभ जोडणें–'यत्सत्यमनृतेनेह मर्त्येनाप्नोति मामृतम्' हीच बुद्धिवंताची बुद्धि व शहाण्यांचें शाहणपण होय. सर्व जीव परमेश्वररूप आहेत अशी बुद्धि ठेवली म्हणजे स्पर्धा ( बरोबरच्याविषयीं हेवा ), असूया ( वरिष्ठांविषयीं मत्सर ), तिरस्कार ( हीनांविषयीं तुच्छता ) व अहंकार ( स्वतः विषयीं अभिमान ) हे सर्व मनाचे दोष नष्ट होतात व साम्य-स्थितीचा अनुभव येतो. साऱ्या अध्यात्मविद्येचें हें सार आहे. येथें ज्ञान, भक्ति, योग, सारे एकमय आहेत. जो पुरुष हे भागवतधर्म दुसऱ्यांस समजावून सांगेल तो परमपद पावेल. जाणावयाचें आहे तें एवढेंच ! चतुर्विध पुरुषार्थ मीच आहें म्हणून मला अनन्यभावानें शरण ये." ( अ. २९ श्लोक ८ ते ३४ ).

## १३ गोपींचें भक्तिप्रेम

भक्तभाविकांच्या निरतिशय प्रेमाचें व अर्वाचीन विद्वानांच्या दीर्घशंकेचें एखादें स्थान भागवतांत असलें तर तें श्रीकृष्णाची रासक्रीडा ( स्कंध १० अ० २९ ते ३३ ) हें होय. विद्वानांना गीता पाहिजे, भागवत नको; याच्या उलट भक्तांना भागवत प्रियतर आहे.

कृष्णाकडे त्याच्या अवतारकालापासून आजतागाईत नानाप्रकारचे लोक आपापल्या डोळ्यांनीं पहात आले आहेत. श्रीकृष्ण कंसाच्या रंगमंडपांत शिरले तेव्हां ते प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें दिसले. मल्लांना वज्रासारखा, सामान्यांना लोकोत्तर पुरुष, स्त्रियांना मूर्तिमंत मदन, गोपालांना स्वबांधव, दुष्ट राजांना त्यांचा नियंता, आईबापांना व प्रेमळ वृद्धांना बाळ, कंसाला काळ, अज्ञांना विराट्, योग्यांना परमात्मतत्व, व यादवांना आपली आराध्यदेवता याप्रमाणें ( स्कंध १० ४३-१७ ) विविध रसांची रसमूर्ति असा एकच कृष्ण अनेकांना त्यांच्या त्यांच्या भावनेप्रमाणें दिसला ! रासक्रीडेच्या वेळीं तो संहा सात वर्षांचा बाल होता व रासक्रीडा शुकाचार्यांपासून तुकारामापर्यंत हजारों विरक्त महात्म्यांनीं गायिली आहे, या दोन महत्वाच्या गोष्टी लक्ष्यांत ठेवून ह्या विषयाकडे वाचकांनीं पाहिलें पाहिजे. वृन्दावनांत गाईगोपालांसमवेत कृष्णानें प्रवेश केला व तो आपली मुरली वाजवूं लागला. तो मधुर वेणुनाद कानीं पडतांच कान ताठ उभे करून गाई सुख पावून स्वस्थ उभ्या राहत, गोवत्स स्तनपान करीत असतांना देहभान विसरून जात व त्यांच्या तोंडांतील दुग्धधारा गिळण्याचेंही त्यांना भान राहत नसे ! वृक्षांवरील पक्षी कृष्णरूप पाहत व मुरलिध्वनि ऐकत तन्मय होत. यमुनादि लहानमोठ्या नद्या कृष्णाच्या पायांवर कमळें वाहून वेणुरव ऐकत स्तब्ध होत. कृष्णाला ऊन लागूं नये म्हणून मेघ आपल्या शरीराची त्यावर छायारूपी छत्री धरीत व जलतुषारांचें सिंचन करीत. गोवर्धनपर्वताचें अंग कृष्णचरणस्पर्श होतांच रोमांचित

होत असे. प्यायला स्वच्छ उदक, बसायला मृदु गवत, गुहा, कंद, मूल, फळ देऊन त्याची व त्याच्या संवगड्यांची सेवा करण्यांत तो स्वतःला धन्य मानी. ह्याप्रमाणें चराचर सृष्टि कृष्णरूपाला पाहून व त्याच्या मुरलीचा मनोहर ध्वनी ऐकून तन्मय होऊन जाई (स्कंध १० अ. २१ ). वृन्दावनारण्यांत गाइ चारीत असतांना त्यानें आपल्या संवगड्यांना वृक्षापासून परोपकाराचा बोध कसा घ्यावा हें उत्कृष्ट प्रकारें शिकविलें:—" वृक्ष हे परार्थैकांतजीवित आहेत. कसें तें पहा ! थंडी, वारा, ऊन्ह, पाऊस, यांचे ताप सहन करून दुसऱ्यांच्या पीडेचें ते निवारण करितात ! त्यांच्यापासून याचक विन्मुख जात नाहींत. पत्रेंपुष्पेंफळें, छाया, मूळें, वल्कलें, काष्टें, गंध, चीक, भस्म, मोठालीं इमारतींचीं लाकडें, पल्लवादि अंकुर इत्यादि देऊन ते आपल्या शरीराचा प्राण्यांच्या उपजीवनार्थ व्यय करीत असतात, आणि ह्या जगांत प्राण्यांच्या जीविताचें साफल्य हेंच आहे कीं त्यांनीं आपल्या प्राणांनीं, द्रव्यांनीं, बुद्धीनें व वाणीनें इतर जीवांचें कल्याणच करीत असावें. आणि परोपकारांत सर्वस्व वेंचणारे हे वृक्ष शाखा, पल्लव, गुच्छ, फळें, पुष्पें यांच्या भारानें कसे लवले आहेत पहा ! परोपकार आणि विनय यांचा हे वृक्ष बोध देत आहेत !

**पुत्रपुष्पफलछायामूलवल्कलदारुभिः ।**
**गंधनिर्यासभस्मास्थितोक्मैः कामान्वितन्वते ॥ ३४ ॥**
**एतावज्जन्मसाफल्यं देहिनामिह देहिषु ।**
**प्राणैरर्थैर्धिया वाचा श्रेय एवाचेरत्सदा ॥ १०–२२–३५ ॥**

हा सर्व सुंदर भाग २२ व्या अध्यायांत असून २३ व्यांत यज्ञपत्न्यांचें सुरस आख्यान आहे. गोपालांना क्षुधा लागली म्हणून कृष्णानें यज्ञकर्मनिरत ऋषींकडे अन्न मागण्यासाठीं त्यांना पाठविलें, पण त्या कर्मठ ऋषींनीं त्यांना विन्मुख पाठविलें; ऋषींच्या पत्न्यांनीं मात्र त्यांना पोटभर जेऊं घातलें. सर्व भूतांतरात्मा परमेश्वर हा खरा

यज्ञपति आहे, त्याचा संतोष जोडणें ह सकल कर्मांचें सार आहे, हें कर्मठ व ज्ञानी यांनीं लक्षांत न ठेवलें तर त्यांची कशी फजीती होते व त्यांच्यापेक्षां निर्मळ मनाच्या प्रेमळ स्त्रियाही देवाला कशा जवळ असतात हें ह्या सुंदर आख्यानावरून दिसून येतें.

व्रजांतील गोपींची प्रेमलता व स्वतःविषयींची उत्कट भक्ति पाहून 'वीक्ष्य रंतुं मनश्चक्रे योगमायामुपाश्रितः'—योगमायेचा अंगिकार करून कृष्णानें गोपींबरोबर विहार करण्याचें मनांत आणलें. शरदृतूंतील एका रात्रीं पूर्णचंद्रोदय झाला असतांना त्यानें वृंदावनांत जाऊन मनोहर गायन करण्यास आरंभ केला. तें कानीं पडतांच त्या 'कृष्णगृहीत-मानस' झाल्या म्ह० त्यांचीं अंतःकरणें कृष्णाकडे वेधलीं गेलीं. कोणी धारा काढीत होत्या, कोणी सांजा शिजवीत होत्या, कोणी वाढीत होत्या, कोणी मुलांना पाजीत होत्या, कोणी पतिसेवा करीत होत्या, कोणी भोजनास बसल्या होत्या, पण आपापले व्यवसाय सोडून त्या वृंदावनाकडे धांवत सुटल्या! पिते, बंधु व पति यांनीं प्रतिबंध केला पण त्या कृष्णप्रेमानें मोहित होऊन परतल्या नाहींत—'गोविंदापहृतात्मानो न न्यर्वतत मोहिताः' गोपी कामबुद्धीनें कृष्णाकडे गेल्या, 'आर्यपथं हित्वा' ह्म० आर्यस्त्रियांचा मार्ग सोडून 'जारबुध्याऽपि संगताः' असें म्हणूनही भागवतानें सांगितलें आहे कीं पापपुण्यरूप सकलकर्मांचें फल भोगून गोपींचें कर्मबंधन क्षीण झाल्यामुळें त्या उद्धरल्या. स्वतः भगवान् म्हणाले आहेत कीं, 'मत्कामाः रमणं जारं अस्वरूपविदोऽबलाः। ब्रम्ह मां परमं प्रापुः संगात् शतसहस्रशः' (११।१२।१३)—सहस्रावधि अबला माझें स्वरूप न जाणतां मी सुंदर जार अशा बुद्धीनें मजवर अनुरक्त झाल्या, तथापि परब्रह्म जो मी त्या माझ्या संगानें त्या तरल्या. भगवत्समागमानें पापीही उद्धरतात. गोपी म्हणजे श्रुति किंवा गोपी म्हणजे इंद्रियवृत्ति असाही कोणी अर्थ करितात व रासक्रीडा प्रकरण अध्यात्मपर लावतात. भगवद्गीतेंत 'सर्वधर्म सोडून विश्वात्मक जो एकीएक मी त्या मला परमात्म्याला शरण ये म्ह० मी तुला सर्व पापां-पासून मुक्त करीन' असें जें भगवंतांनीं वचन दिलें आहे त्या वचनाची

प्रतीति रासक्रीडाप्रसंगानें येते. भगवान् स्वतः परिपूर्ण, निष्काम, निष्कलंक व शुद्धतम आहेत व भगवंताच सामर्थ्य असें आहे कीं, कोणी कोणत्याही भावनेनें त्याच्याकडे जावो त्याला सद्गतिच मिळते. देवाच्या ठायीं काम, क्रोध, भय, स्नेह, ऐक्य व भक्ति ह्यांपैकीं कोणत्याही प्रकारची आसक्ति ठेविली तरी हे कामादि विकारच तन्मयता पावतात ( १०–२९–१५ ). कामद्वेषमत्सरादिकांची मोहर भगवंताकडे वळविल्यानेंही अनेक पामर उद्धरून गेले आहेत:—

**कामात् द्वेषात् भयात् स्नेहाद्यथा भक्त्येश्वरं मनः ।**
**आवेश्य तदघं हित्वा बहवस्तद्गतिं गताः ॥ २९ ॥**
**गोप्यः कामाद्भयात्कंसो द्वेषाच्चैद्यादयो नृपाः ।**
**संबंधात् वृष्णयः स्नेहात् यूयं भक्त्या वयं प्रभो ॥७–१–३०**

नारद परीक्षितीस सांगतात. “ राजा ! जसें भक्तीनें तसेंच, काम, द्वेष, भय, स्नेह इ० विकारवशतेमुळेंही ईश्वराच्या ठिकाणीं मन लावल्यानें अनेक पुरुष निष्पाप होऊन तरले आहेत. पहा बरें ! कामानें गोपी, भयानें कंस, द्वेषामुळें चैद्य, संबंधामुळें यादव, व स्नेहामुळें तूं व भक्तीनें मी उद्धरलों आहोंत. ” नारदांनीं भक्तिसूत्रांत ‘ तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ’ असें ६५ व्या सूत्रांत सांगितलें आहे. त्याचें वर्म असें आहे कीं ज्या ज्या वस्तूचें ध्यान करावें मग तें स्नेहानें असो, द्वेषानें असो किंवा भयान असो, तत्तदाकार मन होतें:–‘याति तत्तत्स्वरूपताम्’ (११-९–२२) याला उदाहरण कुंभारणीचें आहेच. कुंभारीण हा एक सपक्ष कीटक आहे. तो भक्ष्य आळीला जातां येतां पायानें टोंचीत असतो. आळीला कुंभारणीच्या भयानें तिचें सतत चिंतन घडतें व या चिंतनाभ्यासानें आळीच कुंभारीण होऊन उडून जाते ! ध्यानानें मन तदाकार होतें. गोपी कामामुळें भगवंताकडे वळल्या व कंस भयामुळें वळला. गोपी तरल्या व कंसही तरला. कंसाला जळीं, स्थळीं, पाषाणीं कृष्ण दिसूं लागल्यामुळें त्याच्या या कृष्णाकारतेमुळें त्याचा उद्धार झाला; तशीच गोपींची स्थिती झाली व त्या

[library stamp] वाचनालय, …



कृष्णमय होऊन उद्धरून गेल्या. हा वस्तुशक्तिमहिमा आहे. हें भगवान् कृष्णाचें सामर्थ्य आहे.

रासक्रीडाप्रकरणाच्या शेवटीं शुकाचार्यांनीं सर्व आक्षेपकांस निरुत्तर उत्तर दिलें आहे. त्या उत्तरांत पुढील गोष्टी सांगितल्या आहेत:-( १ ) 'तेजीयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा'—अग्नि शुद्ध अशुद्ध सर्व पदार्थांचें भक्षण करितो म्हणून अभक्ष्यभक्षणाचें त्याला पाप आहे काय? 'यद्यदाचरति श्रेष्ठः' हा गीतेंतला न्याय कोणी पुढें करील तर त्याला उत्तर असें आहे कीं, ज्याच्यामध्यें ईश्वराचें सामर्थ्य नाहीं अशा देहात्मवादी पुरुषानें असें कर्म मनानें देखील करूं नये, मूर्खपणानें कोणी करील तर तो नाश पावेल. शंकर हालाहल विष प्याले म्हणून भलताच असें विष पिईल तर तो क्षणांत मरून जाईल; म्हणून ईश्वराच्या उपदेशाप्रमाणें वागावें, भलत्याच बाबतींत त्याच्या चरित्राचें अनुकरण करूं नये. पूतनेच्या स्तनांतलें विष पिऊन तें पचविणें, अग्निप्राशन करणें, करांगुलीनें पर्वत उचलणें, पाळण्यांत असतांनाच राक्षसांना मारणें, मुखांत ब्रह्मांड दाखविणें, मृताला जीवंत करणें, कालियासर्पाला दमविणें, हीं लीलामात्र चरित्रें जशीं अनुकरणाच्या बाहेर आहेत तसेंच हें समजावें. ( २ ) परमेश्वराला कांहीं स्वार्थ साधायचा नव्हता, कांहीं कामाहंकारादिकांचा तेथें मल नव्हता. निर्विकार व विश्वनियामक पुरुषाची ती एक अद्‌भुत लीला आहे. भगवद्गीतेंतच 'यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते। हत्वाऽपि स इमान् लोकान्न हन्ति न निबध्यते' ( अ० १८ श्लो. १७ ) असें म्हटलें आहे. निरहंकार व निष्काम अशा भगवंतावर कंसशिशुपालादिकांना ठार मारल्याबद्दल जसा खुनाचा आरोप होत नाहीं किंवा त्याला मनुष्यहत्त्येचें पाप लागत नाहीं, तसें त्यानें स्वतः गोपींशीं विलास केल्याबद्दलही त्या पुरुषोत्तमाला, त्या विश्वात्म्याला, त्या भूताशयस्थित भूतपतीला कोणतेंच पाप लागणें शक्य नाहीं. ( ३ ) त्यानें परस्त्रीसमागम केला असें म्हणतांच येत नाहीं. तो गोपींच्या, तत्पतींच्या व सर्वभूतांच्या अंतरीं अध्यक्षत्वानें

अखंड नांदणारा असल्यामुळें त्या सर्वव्यापीला आपपरभेद नाहीं. ( ४ ) रासलीला करण्यांत भगवंताचा असाही एक उद्देश असावा कीं, शृंगारप्रिय लोकांचीं अंतःकरणें ह्या कथा ऐकून तरी मज ईश्वराकडे लागावींत. मुलाला औषधांत गुळ खायला दिला कीं तो खातांना गोड लागतो व गुणपरिणामीही होतो, त्याप्रमाणें विषयी लोकांना आवडणारी व क्रमानें भक्तीकडे नेणारी कथा प्रसिद्ध व्हावी ! ( ४ ) गोपींच्या पतींच्या मनांत कृष्णाविषयीं द्वेष कधीं उत्पन्न झाला नाहीं, आपल्या स्त्रिया आपल्याजवळच आहेत असें त्यांना वाटे. गोपींचें तसेंच गोपांचे कृष्णावर निरतिशय प्रेम होतें हें स्पष्ट आहे. ' कृष्णाच्या ठिकाणीं त्यांचें चित्त प्रेमानें इतकें रंगून गेलें होतें कीं त्यांना निद्रेंत, बैठकींत, फिरण्यांत, भाषणांत, क्रीडेंत, स्नानांत, भोजनांत, सर्व प्रसंगीं व सर्वस्थळीं स्वतःच्या देहाचें भानही उरत नसे. त्यांची वृत्ति कृष्णमय झाल्यानें देहबुद्धि नष्ट झाली होती'(१०-१९-४६). ह्या सर्व प्रसंगांतून गोपींची कृष्णस्वरूपीं तन्मयता कशी झाली होती हाच मुख्य बोध घेऊन परमात्म्याच्या ठिकाणीं आपली तशीच तन्मयता व्हावी अशा अत्युत्कट प्रेमभक्तीनें भक्ताभागवत गोपींकडे पाहत असल्यामुळें त्यांना गोपी ह्या भक्त्याचार्य होत असेंच वाटत असतें. गोपींच्या तन्मयतेची व भक्तीची सर्व भक्तांनीं लालसा बाळगल्याचें संतवाङ्मयावरून स्पष्ट दिसून येतें.

कृष्णाचें मधुर गायन व त्याचें सुंदर रूप यांच्या लोभानें स्वजनांना टाकून अचिंत्य शक्तीनें ओढून नेल्याप्रमाणें गोपी जेव्हां वृंदावनांत आल्या, तेव्हां कृष्णानें सतीधर्माची त्यांना ओळख देऊन घरीं परत जाण्यास सांगितलें. तो म्हणाला. " तुमचे आईबाप, पति व बंधु तुम्हांला शोधीत असतील, त्यांना संकटांत टाकूं नका, तुम्ही घरीं जा ! निष्कपटपणें पतीची व त्यांच्या बांधवांची सेवा व अपत्यसंगोपन करा. हें कुलवतीचें मुख्य कर्तव्य आहे. स्त्रीला उत्तमलोकाची प्राप्ती व्हावी असें वाटत असेल तर तिनें आपला पति वाईट स्वभावाचा, दरिद्री, वृद्ध, मूर्ख, रोगी, किंवा दुर्दैवी कसाही असला तरी, तो महापातकी नसेल तर, त्याचा त्याग करूं नये. परपुरुषसंगति चांगली

नाहीं. तिच्यांत भय व संकटें असतात; लोकनिंदाही सोसावी लागते. माझ्याविषयीं म्हणाल तर माझ्या चारित्रश्रवणानें, दर्शनानें, ध्यानानें किंवा गुणगानानें माझ्याठायीं जसा भाव बसतो तसा जवळ राहिल्यानें किंवा अंगसंगानें बसत नाहीं. म्हणून तुम्हीं सर्व परत जा. " हें कृष्णाचें भाषण ऐकून गोपी दुःखावेगानें सुकून गेल्या. ज्याच्यासाठीं त्यांनीं सर्व लोकेषणा सोडून दिल्या व ज्याच्यावर त्यांचें निरवधि प्रेम होतें त्यानें झिडकारून टाकल्यामुळें त्यांच्या निराशेस पारावार राहिला नाहीं. त्यांनीं ११ अनुपम मधुर श्लोकांत आपलें हृदयाविष्करण केलें आहे. हे अकरा श्लोक व पुढें कृष्णानें अल्पकाळ त्यांचा त्याग केल्यावरचें गोपीगीत हीं पद्यें गोपींच्या अद्भुत प्रेमाचीं निदर्शक असून त्यांत भक्तहृदयाची अति-कोमल मनःस्थिति कोमल शब्दानीं रेखिली आहे. पहिल्या प्रसंगाचा एकच श्लोक पहाः–

**यत्पत्यपत्यसुहृदामनुवृत्तिरंग**
**स्त्रीणां स्वधर्म इति धर्मविदा त्वयोक्तम् ।**
**अस्त्वेवमेतदुपदेशपदे त्वयीशे**
**प्रेष्ठो भवांस्तनुभृतां किल बंधुरात्मा ॥ १०–२९–३२ ॥**

'तूं मोठा धर्मवेत्ता आहेस हें आम्हांला ठाऊक आहे ! पति, अपत्यें व बंधुजन यांची सेवा करणें हा स्त्रियांचा धर्म आहे असा तूं आह्मांला उपदेश केलास, पण आम्ही म्हणतों तो सारा धर्म तुझा तुझ्यापाशींच असूं दे ! सर्व उपभोगांचा तूं ईश्वर असल्यामुळें पतिपुत्रादिकांचा मूळाधार तूं आहेस, तूंच सर्वजीवांचा अत्यंत प्रियबंधु व आत्मा आहेस.'

गोपी म्हणाल्या " तुझें हास्यावलोकन व कलगीत ह्म० मधुरगायन यामुळें आमचा सर्व काम त्वद्विषयकच झाला आहे. तूं जर आम्हांला पदरांत घेणार नाहींस तर तुझें ध्यान चित्तीं धरून आम्हीं तुझ्या पाया-पाशींच प्राण अर्पण करूं. आम्हीं तुझें दास्य मागत आहोंत. तुझ्या-वांचून आम्हांला सर्व तुच्छ आहेत. आतां मागें पाऊल घेणार नाहीं !"

" हें तुझें त्रैलोक्यसुंदर रूप पाहून गाई, पशुपक्षी व वृक्षादि ही सारी चराचर सृष्टि रोमांचित होते, मग आम्ही अबला तुजवर मोहित झालों

११

यांत नवल काय? देवा! आमच्या तप्त शरीरावर व मस्तकावर तूं आपलें करकमल ठेवून आम्हांला शांत कर, आम्ही तुझ्या दासी आहोंत." गोपींचा हा निर्धार पाहून कृष्ण त्यांच्यावर प्रसन्न झाले व त्यांनीं विहार करण्यास त्यांना संमति दिली. गोपींचीं मुखें प्रफुल्ल झालीं. नक्षत्रसमुदायांत चंद्र तसा कृष्ण गोपींत शोभला. कांहीं काल हास्य-विनोद व नृत्य झाल्यावर 'आपण पृथ्वीवरील सर्व स्त्रियांत धन्य आहोंत' असा त्या व्रजस्त्रियांस गर्व झाला. जेथें अभिमान तेथें देव नाहीं! कृष्ण तेथेंच गुप्त झाला! मग त्या गोपी कृष्णविरहानें तप्त झाल्या. कृष्णाची गति, हास्य, सविलास अवलोकन, मनोहर भाषण, क्रीडा ह्या गुणांनीं त्यांचीं मनें भरलेलीं असल्यामुळें त्यांनीं कृष्णलीलांचें अनुकरण केलें, त्या सर्व कृष्णमय झाल्या. मीच कृष्ण असें प्रत्येकीस वाटे. कृष्णाचे गुण गात त्या वनोवनीं हिंडत. वृक्षवेलींना, पशुपक्ष्यांना 'माझा कृष्ण देखिला काय?' असें विचारीत त्या वृंदावनभर फिरल्या. शेवटीं एके ठिकाणीं ध्वजवज्रांकुश चिन्हांनीं युक्त अशीं कृष्णाचीं पावलें त्यांना उमटलेलीं दिसलीं. तेथील रज–कण त्यांनीं शिरीं वंदिले. इतक्यांत तेथें त्यांना एका स्त्रीचींही पावलें दिसलीं तोंच त्यांचा मत्सर जागृत झाला. इकडे कृष्णाबरोबर गेलेल्या स्त्रीलाही अभिमान झाला व ती कृष्णाला म्हणाली, 'माझे पाय चालून चालून दमले, आतां प्रिया! मला खांद्यावर घे' कृष्णाला तिचा अभिमान सहन झाला नाहीं. ती गोपी कृष्णाच्या खांद्यावर बसायला गेली तों भगवान् अंतर्धान पावले! पुढें पहिल्या गोपी व ही अशा सर्व एक झाल्या व समान-विरहामुळें तप्त होऊन सर्वांनीं एक अत्यंत मधुर असें गीत गायिलें. तें '**गोपीगीत**' या नांवानें प्रसिद्ध आहे. गोपींची तन्मयता पहाः—

**तन्मनस्कास्तदालापास्तद्विचेष्टास्तदात्मिकाः ।**
**तद्गुणानेव गायन्त्यो नात्मागाराणि सस्मरुः ॥ १०–३०–४४**

यमुनेच्या वाळवंटांत सर्व गोपींनीं मिळून जें गोपीगीत म्हटलें तें दशमाच्या ३१ व्या अध्यायांत आहे. ह्या गोपीगीताचें वृत्त कामदा हें असून तें विरहावस्थेला समुचित आहेः—

**जयति तेऽधिकं जन्मना व्रजः । श्रयत इंदिरा शश्वदत्र हि ॥**
**दयित ! दृश्यतां दिक्षु तावका-। स्त्वयिधृतासवस्त्वां विचिन्वते ॥१॥**

'हे कृष्णा ! तुझा जन्म झाल्यापासून व्रजाचा अधिकाधिक उत्कर्ष होत आहे, येथें लक्ष्मी सतत नांदूं लागली आहे. आम्हीं तुझ्या दासी तुला दाही दिशा धुंडीत आहोंत, तुझ्याचसाठीं आम्हीं प्राण धारण केले आहेत. तर प्रिया ! आम्हांला दर्शन दे.

**विषजलाप्ययात् व्यालराक्षसात् । वर्षमारुतात् वैद्युतानलात् ॥**
**वृषमयात्मजात् विश्वतोभयात् । ऋषभ ! ते वयं रक्षिता मुहुः॥३॥**

'कालिया डोहांतील विषमय झालेल्या जलापासून, सर्पाचें रूप घेऊन आलेल्या अघासुरापासून, वृष्टि, वायु, विद्युत्पात, अरिष्टासुर, व्योमासुर इत्यादि संकटांतून हे पुरुषोत्तमा ! तूं आम्हांला सोडविलें आहेस ( आणि ) आतां या मदनाकडून आमचा घात कां बरें करवितोस ! तूं केवळ यशोदानंदन नसून 'अखिलदेहिनां अंतरात्मदृक्' आहेस हें आम्हीं ओळखतों.

**तव कथामृतं तप्तजीवनं । कविभिरीडितं कल्मषापहम् ।**
**श्रवणमंगलं श्रीमदाततं । भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥ ९ ॥**

'तुझ्या विरहानें आम्हांला मृत्युच यायचा, पण तुझें कथामृत प्यावयाला मिळाल्यामुळें आम्हीं जीव धरून आहोंत ! तुझें कथामृत संसारतप्तांचें जीवन आहे, ज्ञात्यांनीं देखील त्याची महति गायिली आहे, हें पापांचा नाश करणारें व ऐकायला मंगलप्रद आहे, हें शांतरसानें भरलेलें आहे व जे पृथ्वीवर तुझ्या कथामृताचें पुष्कळ गायन करितात ते भूरिद म्ह० मोठे दाते-आह्मां सारख्यांचे प्राणदाते आहेत ! आमचें प्रेम निरपेक्ष आहे बरें ! गाईच्या मागें धांवतांना तुझ्या कोमल पायांना कणसे, कठोर तृण व दर्भांकुर बोंचत असतील म्हणून आमचे जीव खालवर होतात ! तूं वनांत गेलास कीं पळपळ आम्हांला युगासारखें वाटतें व सायंकाळीं गोरजांनीं भरलेलें तुझें मुखकमल पाहून आह्मी कामसंतप्त होतों ! नाथा ! तुझा अवतार विश्वमंगल आहे. तुझें तें 'प्रहसिताननं प्रेमवीक्षणं' अशा रूपाच्या दर्शना-

विषयीं आम्ही परम उत्सुक झालों आहोंत. तुझ्या दर्शनासाठीं पति, सुत, भाऊ व कुल या सर्वांना सोडून वनांत धांवत आलों आहोंत.'

गोपींचें हें प्रेमविरहगीत ऐकून श्रीकृष्ण त्यांच्यांत पुन्हां प्रगट झाला तेव्हां शरीरांत प्राण आल्याप्रमाणें त्या सोल्हास झाल्या. शेवटीं त्यानें त्यांच्याशीं रासक्रीडा आरंभिली. कृष्णानें दोघदोघींच्यामध्यें प्रविष्ट होऊन अनेक रूपें धारण केलीं. जितक्या गोपी तितके कृष्ण झाले! प्रत्येकीला वाटे कीं कृष्ण आपल्या जवळ आहे, सुवर्णाच्या मण्यांत जसा पाचेचा खडा तसा कृष्ण गोपींत शोभला!

गोपींनीं वेगवेगळ्या लीला केल्या, गोपींचें नृत्य करितांना विविध विलास होत. हा रास पाहण्यासाठीं देवदेवांगना स्वर्गातून विमानांत बसून आल्या. लहान मुलगा पाण्यांतल्या प्रतिबिंबाशीं खेळतो त्याप्रमाणें गोपींशीं आलिंगन, हस्तस्पर्श, सप्रेम अवलोकन, मनोहर विलास व हास्य इत्यादिकांच्या योगें विहार करून त्यांजबरोबर जलक्रीडा करून त्यानें त्यांचे मनोरथ पूर्ण केले.

भागवतांत गोपींचा उल्लेख पुढें २।३ प्रसंगीं आला आहे. कंसाला मारण्यासाठीं कृष्ण जेव्हां मथुरेंत गेले तेव्हां तेथील स्त्रियांनीं कृष्णाला प्रथम पाहिलें व त्यांना गोकुळवासी जनांची धन्यता वाटली. त्या म्हणाल्या ' दुध काढतांना, कांडतांना, दहीं घुसळतांना, सारवतांना, झोके देतांना, रडव्या मुलांचें सांत्वन करितांना, सडासंमार्जन घालतांना, संसारांतील हरएक काम करितांना ह्या लावण्यसार कृष्णप्रभूवर अनुरक्त होऊन व कंठ प्रेमानें भरून येऊन ज्या गोपी त्याचे गुणानुवाद गातात त्या धन्य होत' (१०–४४–४५). उद्धव हा ज्ञानी भक्त पण गोपींचें सगुणप्रेम पाहून विरघळून गेला व 'पूर्णार्थाः लोकपूजिताः' असे गोपींना त्यानें धन्यवाद दिले ( स्कंध १० अ० ४७ ). गोपींची शेवटीं एकदां भेट झाल्यावेळीं कृष्णानें त्यांना अध्यात्मज्ञानाचा बोध देऊन त्यांचा उद्धार केला ( स्कंध. १० अ० ८२ )

# ५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदाय.

## १ भक्तिमार्गाचें औदार्य.

वेद आणि उपनिषदें यांनीं ज्या गूढ आत्मतत्वाचें स्वरूप व्यक्त केलें त्यालाच सुलभ व सर्वसेव्य असें रूप शिव व विष्णु यांच्या उपासनांनीं दिलें. वैदिक देवतांचा शिव व विष्णु यांत समावेश होऊन हरिहरांच्या उपासना उपनिषत्कालानंतर भरतखंडांत सुरू झाल्या. निर्गुणनिराकाराला उपासकांनीं सगुणसाकार केलें, ज्ञानाच्या भाषेंत जें सांगितलें जात होतें तेंच भक्तीच्या भाषेंत सांगितलें जाऊं लागलें, नामरूपातीताला नामरूप देऊन लोक भजूं लागले, असें झालें तरी उपासनापंथांनीं मूळ सोडलें नाहीं ! परमात्मा एक आहे व अनेक आहे, नामरूपातीत आहे आणि नामरूपांतही आहे, ज्ञानानें वेद्य आहे आणि भक्तिभावानेंही सेव्य आहे, तो हृदयांत आहे आणि बाहेरही आहे. तो अमूर्त असला तरी भक्तिभावाला भुलून मूर्त होतो, तो जीवानें शुद्धभावानें अर्पण केलेले पूजोपचार घेतो, भक्तांचें योगक्षेम चालवितो, भक्तांना संकटीं सांभाळतो, भक्तांना सद्गति देतो. असा देव सर्व साधारण लोकांना सुसेव्य झाला ह्मणून शैववैष्णवादि उपासनापंथ हिंदुस्थानभर बळावले. ज्ञानानें भक्तीचें रूप घेतलें म्हणून वेदोपनिषदांचें माहात्म्य कायम राहिलें व भक्तिपंथाचा प्रसार जाणत्यानेणत्या सर्व लोकांत झाला. ह्या भक्तिमार्गाला भगवद्गीता आणि भागवत हे दोन मोठे आधार मिळाले. गीताभागवतांनीं एक हात उपनिषदांच्या हातांत दिला व दुसरा हात सर्वसामान्य लोकांच्या हातांत दिला. जें आत्मज्ञान बुद्धिगम्य होतें किंवा मनबुद्ध्यादिकांना अगोचर होतें तें हृदयांत स्वयंभू प्रगट झालें. नांवारूपाला आल्यामुळें देव सोपा झाला. बुद्धीचें स्थान हृदयानें पटकावलें. गूढ वनांत केवळ जाणत्यांच्या परिषदांत ज्याची चर्चा चाले तो देव

लक्षावधि आब्राह्मण चांडालांच्या मेळ्यांतून प्रत्यक्ष नाचूं लागला. ज्याचा प्रसाद एखाद्या ज्ञानवान् पुरुषावर, ऋषीवर किंवा महात्म्यावर होत असे तो सर्व जीवांच्या उद्धारार्थ जाति, विद्या, कुल, गोत्र, धन, कर्म इत्यादि भेदभावांचा विचार न करितां बाळगोपाळांच्या मंडळांत बाळगोपाळ होऊन खेळूं रमूं लागला. ब्राह्मण आणि अंत्यज, पुण्यवान् आणि पापी, सती आणि वेश्या, पारमार्थिक आणि प्रापंचिक—सारांश सर्व प्रकारच्या सर्व लोकांना सद्गतीचें द्वार त्यानें खुलें करून दिलें. गीता आणि भागवत, शैवपुराणें आणि वैष्णवपुराणें, शांडिल्यसूत्रें आणि नारदसूत्रें, वैष्णवांचें पांचरात्र आणि शैवांची तंत्रें ह्या सर्वांच्या साह्यानें शैव आणि वैष्णव पंथ हिंदुस्थानभर सर्वत्र सर्व लोकांत पसरले. महाविष्णु म्ह० नारायण व त्याचे रामकृष्णादि अवतार—मुख्यतः श्रीकृष्णावतार यांची उपासना ज्यांनीं स्वीकारली त्यांना वैष्णव म्हणूं लागले व शिवशक्तींची—मुख्यतः शिवाची—उपासना ज्यांना आवडली ते शैव झाले. हिंदुस्थानांत इतर अनेक देवांच्या उपासना चालू झाल्या तरी शिवविष्णूंच्या उपासना प्रधान आहेत. साऱ्या हिंदुस्थानांत शिव आणि विष्णु ह्या देवता, शैव आणि वैष्णव यांचीं मंडळें, व शैव आणि वैष्णव यांचे उपासनाग्रंथ यांचेंच साम्राज्य हिंदुसमाजावर आज दोन अडीच हजार वर्षें पूर्णपणें पसरलें आहे. शिव व विष्णु आणि विष्णूचे रामकृष्णादि अवतार यांचीं मंदिरें हिंदुस्थानभर आणि हिंदुस्थानच्याही बाहेर जावासुमात्रादि बेटापर्यंत सर्वत्र पसरलीं आहेत. तात्पर्य ज्ञानयुगाचें रूपांतर भक्तियुगांत झालें आहे.

## भक्तिमार्ग वेदांत आहे.

भागवतधर्माची उभारणी वेदोपनिषदांस अगदीं धरूनच आहे. भक्तिपंथानें उपासना व नामस्मरणाची आवड सर्व लोकांत उत्पन्न केली व याला वेदोपनिषदांचा पूर्ण आधारही आहे. वेदांत इंद्रादि देवतांच्या प्रार्थना आहेत; भक्तिमार्गांतही शिवविष्णु आदिकरून देवांना भक्ति-

भावानें आळविण्याचाच संप्रदाय आहे. वेदांतल्या ऋषींनीं आपापल्या देवतांना आम्हांला घरदार, धनदौलत, गाईघोडे, शूरवीर पुत्र द्या व आमच्या शत्रूंचा संहार करा अशा विनवण्या केल्या आहेत. वेदांतल्या ऋषींनीं पुढील साधुसंतांप्रमाणें 'आम्हांला सद्बुद्धि द्या, आम्हांला मोक्ष द्या,' अशाही प्रार्थना केल्या आहेत; आम्हांला देववंत किंवा देवधी कर इ० देवाकडे आमची बुद्धि वळीव, आम्हांला सुमति दे, अशा अर्थाच्या प्रार्थना केल्या आहेत. परमेश्वराची नाना नांवानीं स्तुति, त्याचें भजनपूजन, त्याचें नामस्मरण, गायन, संकीर्तन सर्व वेदांत आहे. भागवतानें प्रल्हादमुखानें नवविधा भक्ति स्पष्टपणें सांगितली ती बीजरूपानें वेदांत आहे. 'तस्मा इंद्राय गायत' 'त्वां वर्धन्तु नो गिरः' 'त्वा गीर्भिर्हवामहे' 'विश्वरूपमुपव्हये' इत्यादि वेदवचनें आहेत. प्रभातकाळीं ईश्वराचें भजन करण्याचा प्रघात वेदकालापासून आहे. 'नाम नाम्ना जोहवीति पुरा सूर्यात्पुरोषसः' असें अथर्ववेदाच्या १० व्या मंडळांत स्पष्ट म्हटलें आहे. वेदांतल्या अनेक मंत्रांतून देवाच्या प्राप्तीची अत्यंत तळमळ लागलेली स्पष्ट दिसते. 'आम्हांला अमृतत्व मिळावें, व आम्हीं तमाच्या पार जावें, प्रपंच सावधानपणें करणाऱ्याला विष्णुपदाची प्राप्ति होते, अग्नि आपल्या उपासकांना आपल्या जवळचें ज्ञानरूप रत्न देतो,' अशा प्रकारच्या प्रार्थना ऋग्वेदांतील सूक्तांतून केलेल्या आहेत.

**नम इदुग्रं नम आविवासे नमो दाधार पृथिवी सुत द्याम् ( ऋ. )**
**नमो महद्भ्यो नमो अर्भकेभ्यो नमो युवभ्यो नम आशिनेभ्यः ।**
**यजाम देवान्यदि शक्नवाम माज्यायसः शं समावृक्षि देवाः॥ (ऋ.१।२**

'लहान, थोर, तरुण व म्हातारे सर्वांना नमस्कार असो. देवांचें यजन करूं तर आम्ही समर्थ होऊं. हे देवांनो, आह्मांकडून मोठ्यांच्या गौरवांचा उच्छेद होऊं देऊं नका' यांत देवांना नमन, देवाप्रीत्यर्थ यजन ( पूजा ) व देवाची स्तुतिस्तोत्रें ( शंसं ) यांचे उल्लेख आहेत. रुद्राध्यायांतील नमकाचे सर्व अनुवाक् नमनभक्तीचे आहेत. गायत्री मंत्रांतला ध्यानयोग

लक्षावधि आब्राह्मण चांडालांच्या मेळ्यांतून प्रत्यक्ष नाचूं लागला. ज्याचा प्रसाद एखाद्या ज्ञानवान् पुरुषावर, ऋषीवर किंवा महात्म्यावर होत असे तो सर्व जीवांच्या उद्धारार्थ जाति, विद्या, कुल, गोत्र, धन, कर्म इत्यादि भेदभावांचा विचार न करितां बाळगोपाळांच्या मंडळांत बाळगोपाळ होऊन खेळूं रमूं लागला. ब्राह्मण आणि अंत्यज, पुण्यवान् आणि पापी, सती आणि वेश्या, पारमार्थिक आणि प्रापंचिक—सारांश सर्व प्रकारच्या सर्व लोकांना सद्गतीचें द्वार त्यानें खुलें करून दिलें. गीता आणि भागवत, शैवपुराणें आणि वैष्णवपुराणें, शांडिल्यसूत्रें आणि नारदसूत्रें, वैष्णवांचें पांचरात्र आणि शैवांची तंत्रें ह्या सर्वांच्या साह्यानें शैव आणि वैष्णव पंथ हिंदुस्थानभर सर्वत्र सर्व लोकांत पसरले. महाविष्णु म्ह० नारायण व त्याचे रामकृष्णादि अवतार—मुख्यतः श्रीकृष्णावतार यांची उपासना ज्यांनीं स्वीकारली त्यांना वैष्णव म्हणूं लागले व शिवशक्तींची—मुख्यतः शिवाची—उपासना ज्यांना आवडली ते शैव झाले. हिंदुस्थानांत इतर अनेक देवांच्या उपासना चालू झाल्या तरी शिवविष्णूंच्या उपासना प्रधान आहेत. साऱ्या हिंदुस्थानांत शिव आणि विष्णु ह्या देवता, शैव आणि वैष्णव यांचीं मंडळें, व शैव आणि वैष्णव यांचे उपासनाग्रंथ यांचेंच साम्राज्य हिंदुसमाजावर आज दोन अडीच हजार वर्षें पूर्णपणें पसरलें आहे. शिव व विष्णु आणि विष्णूचे रामकृष्णादि अवतार यांचीं मंदिरें हिंदुस्थानभर आणि हिंदुस्थानच्याही बाहेर जावासुमात्रादि बेटापर्यंत सर्वत्र पसरलीं आहेत. तात्पर्य ज्ञानयुगाचें रूपांतर भक्तियुगांत झालें आहे.

## भक्तिमार्ग वेदांत आहे.

भागवतधर्माची उभारणी वेदोपनिषदांस अगदीं धरूनच आहे. भक्तिपंथानें उपासना व नामस्मरणाची आवड सर्व लोकांत उत्पन्न केली व याला वेदोपनिषदांचा पूर्ण आधारही आहे. वेदांत इंद्रादि देवतांच्या प्रार्थना आहेत; भक्तिमार्गांतही शिवविष्णु आदिकरून देवांना भक्ति-

भावानें आळविण्याचाच संप्रदाय आहे. वेदांतल्या ऋषींनीं आपापल्या देवतांना आम्हांला घरदार, धनदौलत, गाईघोडे, शूरवीर पुत्र द्या व आमच्या शत्रूंचा संहार करा अशा विनवण्या केल्या आहेत. वेदांतल्या ऋषींनीं पुढील साधुसंतांप्रमाणें 'आम्हांला सद्बुद्धि द्या, आम्हांला मोक्ष द्या,' अशाही प्रार्थना केल्या आहेत; आम्हांला देववंत किंवा देवधी कर ह्म० देवाकडे आमची बुद्धि वळीव, आम्हांला सुमति दे, अशा अर्थाच्या प्रार्थना केल्या आहेत. परमेश्वराची नाना नांवानीं स्तुति, त्याचें भजनपूजन, त्याचें नामस्मरण, गायन, संकीर्तन सर्व वेदांत आहे. भागवतानें प्रल्हादमुखानें नवविधा भक्ति स्पष्टपणें सांगितली ती बीजरूपानें वेदांत आहे. 'तस्मा इंद्राय गायत' 'त्वां वर्धन्तु नो गिरः' 'त्वा गीर्भिर्हवामहे' 'विश्वरूपमुपव्हये' इत्यादि वेदवचनें आहेत. प्रभातकाळीं ईश्वराचें भजन करण्याचा प्रघात वेदकालापासून आहे. 'नाम नाम्ना जोहवीति पुरा सूर्यात्पुरोषसः' असें अथर्ववेदाच्या १० व्या मंडळांत स्पष्ट म्हटलें आहे. वेदांतल्या अनेक मंत्रांतून देवाच्या प्राप्तीची अत्यंत तळमळ लागलेली स्पष्ट दिसते. 'आम्हांला अमृतत्व मिळावें, व आम्हीं तमाच्या पार जावें, प्रपंच सावधानपणें करणाऱ्याला विष्णुपदाची प्राप्ति होते, अग्नि आपल्या उपासकांना आपल्या जवळचें ज्ञानरूप रत्न देतो,' अशा प्रकारच्या प्रार्थना ऋग्वेदांतील सूक्तांतून केलेल्या आहेत.

**नम इदुग्रं नम आविवासे नमो दाधार पृथिवी मुत द्याम् ( ऋ. )**
**नमो महद्भ्यो नमो अर्भकेभ्यो नमो युवभ्यो नम आशिनेभ्यः ।**
**यजाम देवान्यदि शक्नवाम माज्यायसः शं समावृक्षि देवाः॥ (ऋ.१।२**

'लहान, थोर, तरुण व म्हातारे सर्वांना नमस्कार असो. देवांचें यजन करूं तर आम्ही समर्थ होऊं. हे देवांनो, आह्मांकडून मोठ्यांच्या गौरवांचा उच्छेद होऊं देऊं नका' यांत देवांना नमन, देवाप्रीत्यर्थ यजन ( पूजा ) व देवाची स्तुतिस्तोत्रें ( शंसं ) यांचे उल्लेख आहेत. रुद्राध्यायांतील नमकाचे सर्व अनुवाक् नमनभक्तीचे आहेत. गायत्री मंत्रांतला ध्यानयोग

प्रसिद्धच आहे. सर्व संतांना अत्यंत प्रिय असणारी नामस्मरणभक्ति ही वेदांत सांगितली आहे. पहा:—

**तमु स्तोतारः पूर्व्यं यथाविद ऋतस्य गर्भं जनुषापि पर्तन।**
**आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे॥**
ऋ २–२–२६

**मर्ता अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे। विप्रास्ते जातवेदसः॥**
**कस्य नूनं कतमस्या मनामहे चारु देवस्य नाम।**
**को नो मह्या अदितये पुनर्दात्पितरं च दृशेयं मातरं च॥**
**नामानि देवा उत यज्ञियानि वः॥**
**उपत्वाग्ने दिवे दिवे दोषा वस्तर्धिया वयम्।**
**नमो भरन्त एमसि॥ १–१–७॥**

'हे अग्ने! प्रत्यहीं दिवसा व रात्रीं आम्हीं ध्यानपूर्वक नमस्कार करीत तुजसमीप येतों' याप्रमाणें वेदांत वंदनभक्ति, स्मरणभक्ति, तसाच ध्यानयोग, (निदिध्यासन) इ. भक्तींचे सर्व प्रकार आहेत.

वेदांतील स्मरण, वंदन व ध्यान किंवा उपनिषदांतील श्रवण मनन निदिध्यास याच आधारावर भागवतांत नवविधाभक्तीची इमारत उभी झाली व हीच नवविधाभक्ति भागवतसांप्रदायी सर्व साधुसंतांनीं मानली आहे. श्रवणमनननिदिध्यासन ही आत्मस्वरूपाची उपासना आहे, तथापि सर्व अधिकारी व अनधिकारी जीवांना ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुगम व्हावा म्हणून गीताभागवतांनीं नवविधाभक्तीचें द्वार खुलें केलें आहे.

वेदांत कर्म, भक्ति व ज्ञान तीनही आहेत. ऋग्वेदांतील प्रार्थनापर ऋचा उपासनाप्रधान किंवा भक्तिप्रधान आहेत; यजुर्वेद व ब्राह्मणें हीं कर्मकांडप्रधान आहेत व उपनिषदें हीं ज्ञानकांडात्मक आहेत. भगवद्गीतेनें तीनही कांडांचा एकवट विचार केला आहे. 'एवं कांडत्रयरूपिणी। श्रुतीच हे कोडिसवाणी। गीतापद्यरत्नांची लेणीं। लेयिली आहे' (ज्ञाने० १५–१४५०) म्ह० कांडत्रयरूपी श्रुतीनेंच

भगवद्गीतेचें गोजिरवाणें रूप धारण केलें असून तिनें आपल्या अंगावर गीतापद्यरत्नांचे अलंकार धारण केले आहेत ! श्रुतीचें मतच गीताभागवतांनीं सर्वलोकोपकारार्थ स्पष्ट करून सांगितलें आहे. ज्ञान आणि भक्ति दोन्ही स्वरूपतः एकच आहेत, ब्रह्मानंदालाच भक्ति म्हणतात.

## ३ पंचरात्र मत व भागवतधर्म.

भागवत धर्म, नारायणीय धर्म, सात्वत धर्म, ऐकांतिक धर्म इत्यादि नावें भक्तिमार्गाला दिलेलीं आहेत. नारायणानें नारदास सांगितलेला म्हणून यास नारायणीय धर्म म्हणतात. भगवंतानें उद्धवार्जुनांस सांगितलेला म्हणून भागवतधर्म, किंवा भगवंताचे ते भागवत व भागवतांचा म्ह. भक्तांचा धर्म म्हणून भागवतधर्म. सात्वत कुळांत जन्मलेल्या श्रीकृष्णानें जनांला दिलेला म्हणून सात्वतधर्म. एकनिष्ठेनें किंवा एकविधभावानें आचरायचा म्हणून ऐकांतिक धर्म. हीं सर्व एकाच भक्तिधर्माची नावें आहेत. नारायणीयधर्म वेगळा व भागवतधर्म वेगळा, त्यांत पुन्हां गीतेचा भागवतधर्म वेगळा व भागवताचा भागवतधर्म वेगळा असा शब्दछल कांहीं विद्वान् करीत असतात, पण त्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. जें गीतेनें तेंच भागवतानें सांगितलें आहे. ‘ मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ’ व ‘सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज’ असें भगवंतानीं गीतेंत स्वमुखानें ‘ सर्वगुह्यतम ’ म्ह० आपलें परमरहस्य सांगितलें आहे; व ‘ एकांतभक्तिर्गोविंदे यत्सर्वत्र तदीक्षणम् ’ म्ह० सर्वत्र परमेश्वराला पाहणें, तो सर्वभूतांतरात्मा आहे हें अनुभवणें, सर्वभूतीं भगवद्भाव ठेवणें, हेंच भागवताचें तरी रहस्य आहे. गीता व भागवत हे भागवतधर्माचे मुख्य आधार मानले आहेत. तरी हा भागवतधर्म वेदांत आहे व उपनिषदांत आहे; रामायणभारतादि इतिहासग्रंथांत आहे व भागवतादिपुराणग्रंथांत आहे. हा अनादि आहे. सर्व जीवांच्या उद्धाराचा हा एकच मार्ग आहे. गीता व भागवत हे ग्रंथ होण्यापूर्वीं नारदपांचरात्र नांवाचा भागवत संप्रदाय रूढ झाला होता हें पांचरात्रमताचा उल्लेख भारतांत आहे व

भागवतांत आहे यावरून स्पष्ट आहे. महाभारतांत शांतिपर्वांत भीष्म-युधिष्ठिरसंवादांत पंचरात्रमताचा उर्फ भागवतधर्माचा उल्लेख आहे. तेथें नारायणानें स्वमुखानें नारदास हा भागवतधर्म सांगितल्याचें स्पष्ट वर्णन आहे. ऋक्, यजुः व साम हे तीन वेद व सांख्य आणि योग हीं दोन शास्त्रें मिळून पांचांचें रहस्य यांत सांगितलें आहे, अर्थात् 'त्रयी सांख्यं योगः' यांतून हा निघाला आहे म्हणून याला पंच-रात्र म्हणतात. या मताचा आणखी थोडा उलगडा शांतिपर्वाच्याच ३३९ व्या अध्यायांत केलेला आहे, त्यांत म्हटलें आहेः "जो नेत्रांना अगोचर आहे, जो त्वचेला कळत नाहीं, ज्याचें इंद्रियांना ज्ञान होत नाहीं, ज्याला त्रिगुणाचा स्पर्श नाहीं, जो भूतमात्रांत साक्षिरूपानें आहे, जो अज, नित्य, शाश्वत, निरंश आहे, जो चोवीस तत्वांपलीकडे आहे म्हणून ज्याला 'पंचविसावा' अशी संज्ञा आहे, जो ज्ञानानेंच कळतो, ज्याचे ठायीं तन्मय झालें असतां मोक्ष मिळतो, त्या सनातन परमात्म्यालाच वासुदेव म्हणतात. हा परमसमर्थ वासुदेव भूतांच्या ठायीं आत्म्याच्या रूपानें वास करितो. पंचभौतिक शरीरांत हा प्रवेश करितो तेव्हां त्या देहवर्ती जीवास संकर्षण म्हणतात, भूतांत मनो-रूपानें राहतो त्यास प्रद्युम्न म्हणतात, व या प्रद्युम्नापासून चराचरसृष्टि निर्माण होते तेव्हां कार्यकारणकर्तृरूपी त्रिरूपभावास अनिरुद्ध म्हण-तात. वासुदेव हा मुख्य परमात्मा. तो जीवरूपानें अवतरतो तेव्हां त्यास संकर्षण म्हणतात, व जीवापासून मन ( प्रद्युम्न ) व मनापासून अहंकार (अनिरुद्ध) होतात. वासुदेवाचे भक्त वासुदेवांतच लीन होतात. हीं चारी रूपें परमेश्वराच्याच मूर्ति होत. संकर्षण (यच्चावत् प्राणिमात्र) हें वासुदेवाचें रूप आहे." ह्या पंचरात्रमतांतील चतुर्व्यूहाची वरील कल्पना कदाचित् कोणास मान्य न झाली तरी पंचरात्रमताशीं वेदांतशास्त्राचा विरोध असण्याचें कांहींच कारण नाहीं. असें असून वेदांतशास्त्राचा प्रधान ग्रंथ जो 'बादरायणप्रणीतब्रह्मसूत्रें' त्यांत पंचरात्रमताचेंही इतर मतांबरोबर खंडण ( अ० २ पाद २ सूत्रें ४२ ते ४५ ) आलें आहे तें काय म्हणून

अशी कोणी शंका काढील तर त्यास उत्तर एवढेंच आहे कीं ब्रह्मसूत्रांत सांख्यमताचेंही खंडण आलें आहे ( अ० २ पाद २ सूत्रें १ ते १० ) पण 'अचेतन प्रधान जगत्कारण असूं शकत नाहीं' एवढ्या एका मुद्यापुरतेंच तें खंडण आहे; एवढ्यानें सांख्यशास्त्र ब्रह्मसूत्रकारांस अमान्य होतें असें होत नाहीं. त्याप्रमाणें चतुर्व्यूहाची कल्पना सूत्रकारांनीं मान्य केली नाहीं म्हणून सारें पंचरात्रमत किंवा भागवतधर्म ब्रह्मसूत्रकारांस अमान्य होता असें सिद्ध होत नाहीं. रामानुजाचार्यांनीं तर म्हटलें आहे कीं ह्या चार सूत्रांपैकीं ( ४२–४५ ) पहिल्या दोन सूत्रांत पंचरात्रावरील आक्षेप सांगितले असून पुढील दोन सूत्रांत बादरायणानीं त्या आक्षेपांचें खंडण केलें आहे व पांचरात्रीय भागवतधर्म आपणांस मान्य असल्याचेंच स्पष्ट सांगितलें आहे ! शंकराचार्यांनीं ह्या सूत्रांवरील भाष्यांत म्हटलें आहे कीं 'ईश्वर हा सृष्टीचें उपादानकारण तसाच निमित्तकारण आहे हें पंचरात्रमताचें म्हणणें आम्हांस पूर्ण मान्य आहे, तसेंच वासुदेव हा शुद्ध ज्ञानस्वरूप, व्यापक व एकमेव असूनही वासुदेव ( परमात्मा ), संकर्षण ( जीवात्मा ), प्रद्युम्न ( मन ) व अनिरुद्ध ( अहंकार ) ह्या चार रूपांनीं तो व्यक्त झाला आहे ह्यांतही आम्हांस कांहीं वावगें दिसत नाहीं, पण परब्रह्मापासून जीव झाला हें मात्र आम्हांस कबूल करवत नाहीं, कांकीं हें कबूल केल्यास परब्रह्माच्या व्यापकत्वास व एकरूपत्वास बाध येणार आहे."

असो. पंचरात्रमत उर्फ मूळचा भागवतधर्म भारतभागवतादि ग्रंथांत सांगितला असल्यामुळें तो ह्या ग्रंथांपेक्षा अर्थात् गीता व ब्रह्मसूत्रें ह्यापेक्षां प्राचीनतर आहे हें उघड आहे. भागवतधर्माला पहिलें तोंड पंचरात्रानें फोडलें असून त्यानंतर गीताभागवतादि ग्रंथ झाले असल्यामुळें पंचरात्रमताची मान्यता भागवतधर्मीयांत केव्हांही कमी होणें शक्य नाहीं.

## ४ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत.

ऋग्वेदकालीं इंद्र, अग्नि इ. देवतांना जरी मुख्य मानीत तरी शिव व विष्णु ह्या देवताही मानलेल्या आहेत. विष्णूचें नांव ऋग्वेदांत १००

वेळ आलेलें असून इंद्राचा मित्र असें त्यास म्हटलें आहे. वृत्राला मारण्याच्या कामांत व दस्यूंचा निःपात करण्याच्या हरएक कामांत विष्णूचें इंद्राला साह्य होत असे. विष्णूनें आपल्या तीन पावलांनीं सर्व विश्व आक्रमिलें आहे. भूर्लोक, भुवर्लोक, व स्वर्लोक हीं त्याचीं तीन पावलें असून तो त्रिविक्रम आहे, त्याचा देह विशाल आहे, तो उरुगाय व व उरुक्रम आहे, त्याचें वसतिस्थान स्वर्ग असून तेथें धर्मिष्ठ लोक आनंदांत राहतात असें वेदांत वर्णन आहे. त्याचा सहचर मित्र जो आदित्य त्याला 'गरुत्मत्' व 'सुपर्ण' (गरुडपक्षी) असें म्हटलें असून विष्णु व इंद्र यांना गिरिशिखरावर बसलेले व म्हणून 'गिरिक्षित्' व 'गिरिष्ठ' असें म्हटलें आहे. तैत्तिरीय संहितेंत तर ( ३–४–५ ) त्याला 'गिरीश' असेंच पद जोडलें आहे. विष्णूनें तीन पावलांनीं पृथ्वी आक्रमण केली ती मनुष्याला राहायला जागा देण्याकरितां व आपद्ग्रस्तांला संकटमुक्त करण्याकरितां होय. याच ऋग्वेदांतील कथेचें स्पष्टीकरण करून ब्राह्मणग्रंथांनीं विष्णूच्या वामनावताराची कथा लिहिली आहे. शतपथब्राह्मणांत विष्णूच्या मत्स्य, कच्छ व वामन ह्या तीन अवतारांच्या कथा वर्णिल्या आहेत. ऐतरेयब्राह्मणांत अग्नीपेक्षांही विष्णूचें माहात्म्य अधिक वर्णिलें आहे. विष्णु व शिव यांचीं लोकप्रसिद्ध नांवें ऋग्वेदाच्या खिलसूक्तांत ( खिल म्ह० पदशिष्ट, परिशिष्ट ) आलीं असून हीं खिलसूक्तें ऋग्वेदसंहितेच्या पाठोपाठच लिहिलीं गेलीं आहेत याविषयीं मतैक्यच आहे. खिलसूक्तांत 'अच्युत, गोविंद माधव, चक्री, हृषीकेश, अमृतेश, वासुदेव, केशव, कृष्ण' हीं विष्णूचीं नांवें व 'विश्वेश्वर, त्रिनेत्र, भूतेश, शंकर, महादेव, नीलकंठ, मृत्युंजय, शर्व, रुद्र' हीं शिवाचीं नांवें आलीं आहेत. ह्याप्रमाणें संहिता व ब्राह्मण ह्या दोन्ही काळांत शिव व विष्णु ह्या देवता पूजनीय होत्या याविषयीं शंका नाहीं. आरण्यकें व उपनिषदें यांच्या वेळींही त्या पूज्य होत्या.

वेदांत शिवविष्णूंचे उल्लेख कोठें आले आहेत ते थोडक्यांत पाहूं. 'ज्यायोगें विष्णु तुमचीं कृत्यें पाहतो ते विष्णूचे थोर पराक्रम पहा.

इंद्राचा तो परम मित्र आहे—' इंद्रस्य युज्यः सखा.' विष्णूचें अत्यंत श्रेष्ठ पद ज्ञाते लोक सदा अवलोकीत असतात—' तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः' तें पद ह्म० ' दिवीव चक्षुराततम् '—आकाशांत उघडलेला जणुं डोळाच आहे (ऋग्वेद मंडल १ सूक्त २२ मंत्र १९।२०) १५४ ते १५६ हीं तीन सूक्तें तर फारच बहारीचीं आहेत. " आतां मी विष्णूचे पराक्रम गातों, त्यानें पृथ्व्यादि सर्व लोक निर्माण केले, त्यानें तीन पावलांत सर्व आक्रमिलें आहे. समर्थ विष्णूला बल आणि स्तोत्र प्राप्त होवो कीं ज्यानें हें विस्तीर्ण जग तीनच पावलांनीं आक्रमिलें आहे व ज्यानें पृथ्वी, द्युलोक व सर्व जग धारण केलें आहे. जेथें देवभक्त आनंदांत असतात तें याचें प्रिय स्थान मला प्राप्त होवो, तो सर्वांचा बांधव आहे, त्याच्या सर्वश्रेष्ठ स्थानीं अमृताचा झरा आहे. ' विष्णोः परमे पदे मध्व उत्सः यत्र देवयवो मदन्ति—" हा १५४ व्या सूत्राचा आशय आहे. "समथ, तारक, शत्रुरहित, व उदार अशा विष्णूचे पराक्रम आह्मी गातों. ह्याचीं दोनच पावलें पाहून मनुष्य भजतो, तिसरें पाऊल कोणीही जाणूं शकत नाहीं. हा महाशरीर विष्णु वेगवेगळ्या स्वरूपांत असतो. हा धांवा केला असतां पावतो" असें १५५ व्या सूक्ताच्या शेवटच्या तीन मंत्रांत ह्मटलें आहे. " हे विष्णो ! तूं आह्मांला मित्राप्रमाणें सुखदायक हो. तूं घृत पिणारा, मोठा भाग्यवंत, रक्षणार्थ सत्वर धांवणारा, व विश्वव्यापी आहेस. विद्वानांना स्तवार्ह आहेस. तूं नित्य, जगत्कर्ता व नित्यनवा आहेस—जो तुला हवि देतो व तुझ्या पूज्य जन्माचें गायन करितो तो कीर्तिमान् होऊन श्रेष्ठ पद पावतो." हा १५६ व्या सूत्राचा भावार्थ आहे. ७ व्या मंडळांतील ९९।१०० सूक्तांत म्हटलें आहे. " हे विष्णो ! आम्ही फक्त पृथ्वी व अंतरिक्ष हे दोन लोक जाणतों; यापेक्षांही पलीकडचे लोक जाणणारा तूंच आहेस. तुझ्या महिम्याचा परंपार सांप्रतचे किंवा पूर्वींचे कोणी जाणत नाहींत. जो अनेकानीं प्रशंसिलेल्या विष्णूला हवि देतो, व सुंदर स्तोत्रांनीं त्याची उपासना करितो तो धन मेळवितो. हे इच्छापूरक विष्णो ! तूं लोक-

हितकारक व निर्दोष अशी सद्बुद्धि आम्हांला दे. विपुल व आल्हादक संपत्तीचा आम्हांला योग दे. तूं प्राचीनांतला प्राचीन आहेस. ह्या पुराण पुरुषाचें नांव गाजो. जन्माचें सार्थक करणाऱ्या विष्णूनें भक्तांकरितां पृथ्वी विस्तृत केली आहे. ”

“ ॐ वषट् ते विष्णवास आ कृणोमि । तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम् वर्धन्तु त्वा सुष्टुतयो गिरो यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ” ( ७-९९-७ ) ‘ हे विष्णो ! मी मुखद्वारां तुझा वषट्कार करितों. हे शिपिविष्ट (किरणशाली, तेजोनिधे !) तूं माझ्या हवींचा स्वीकार कर. माझी उत्कृष्ट स्तोत्रें तुझा उत्कर्ष करोत. ( हे देव हो ! ) तुह्मी सर्वकाळ आपल्या मंगल आशीर्वादांनीं आमचें रक्षण करीत जा.’

हीं ऋग्वेदांतील विष्णूचीं ४।५ सूक्तें जरी पाहिलीं तरी पुढील साधूंच्या हजारों स्तुतिपर कवनांचें तात्पर्य त्यांत आलेलें आहे असें दिसून येतें. आतां विष्णूचीं हीं सूक्तें आदित्याला पूर्णपणें लागत असलीं तरी विष्णूच्या व्यापक स्वरूपाचें यांत वर्णन आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ‘अग्निर्वै देवानामवमो विष्णुः परमः ’ ह्याप्रमाणें सर्व देवांत विष्णूचें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे, व कठांत ‘ सोध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ’ ( ३–६–९ ) म्ह० ज्ञानी पुरुष परमपदाला म्ह. विष्णुपदाला पोंचला कीं त्याचें चालणेंच खुंटतें असें वर्णन आहे.

रुद्राचें एकच सूक्त पाहूं. “ हे मरुतांच्या पित्या रुद्रा ! तुझें सुख आम्हांकडे येवो ! आमचा वीर शत्रूंवर मात करो त्वां दिलेल्या सुखकर औषधींच्या योगें आम्हीं शंभर हिवाळे सुखानें काढूं. आमचे पाप व रोग नाहींसे कर. तूं वैद्यांतला वैद्य आहेस. या स्तोत्रांनीं तुला शांत करूं या. कोमल मनाचा, आळविण्यास सुलभ असा तूं रुद्र आम्हांला क्रोधाच्या स्वाधीन करूं नकोस. उन्हानें तापलेला मनुष्य सावलीचा आश्रय करितो त्याप्रमाणें पापांतून मोकळा होऊन मला रुद्राच्या सुखाचा उपभोग होवो. पीतवर्णाचा, शुचिर्भूत व बलशाली अशा रुद्राला मी आळवितों. बहुरूप

पीतवर्ण व उग्र असा रुद्र दृढ, तेजस्वी व कांतिमान् अंगांनीं शोभत आहे. हे नानाविध हार, हे रुद्रा! तुला फार शोभतात. तुझ्यापेक्षां बलवान् कोण आहे ? सिंहाप्रमाणें भयंकर, शत्रूंना ठार करणाऱ्या रुद्राची स्तुति करा. मुलगा जसा जवळ जाणाऱ्या व कुरवाळणाऱ्या बापाला नमस्कार करितो, तसे हे रुद्रा! आम्ही तुला नमन करीत आहोंत. रुद्राची प्राणघातक आयुधें आम्हांला सोडून जावोत. क्रुद्ध अशी त्याची महाकठोर दृष्टि दुसरीकडे म्ह. शत्रूकडे वळो. हे उदारा ! उपासकांसाठीं तूं आपलें धनुष्य सैल कर. आमच्या मुलाबाळांना सुख दे. हे ज्ञात्या रुद्रा ! रागावूं नकोस व आम्हांला मारूं नकोस. तूं येऊन आमची हाक ऐक" (मं.२–३३).

**'त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् ।**
**उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात्'** (ऋ. ७-५९-६२)

'अत्यंत कीर्तिमान् व भक्तांची संपत्ति वाढविणारा असा जो त्र्यंबक त्याची आम्ही उपासना करितों; काकडी जशी देठापासून तोडतात तसा तो मृत्यूपासून आम्हांला सोडवो व मुक्ति देवो !'

केनोपनिषदांत शिवाची अर्धांगी उमा हिच्यापासून इंद्राला ब्रह्मज्ञान झालें असें सांगितलें आहे: 'स तस्मिन्नेवाऽऽकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमां हैमवतीं' (केन० खंड ३–१२). हेम म्ह० सुवर्ण–सुवर्णालंकारांनीं विभूषित स्त्रीप्रमाणें साक्षात् आत्मविद्याच प्रगट झाली व तिला तो शरण गेला. हा अर्थ प्रथम सांगून 'अथवा उमैव हिमवतो दुहिता हैमवती नित्यमेव सर्वज्ञेनेश्वरेण सह वर्तत इति ज्ञातुं समर्थेति कृत्वा तामुपजगाम' असा श्रीशंकराचार्यांनीं उमापरही अर्थ दिला आहे. हिमवान् पर्वताची कन्या ती हैमवती उमा. ती सर्वज्ञ जो ईश (शंकर) त्याशीं नित्य संगत असलेली व म्हणून महाज्ञानी आहे असें जाणून इंद्र तिला शरण गेला. श्वेताश्वतर उपनिषद् पूर्णपणें शिवपरच आहे. त्यांत विश्वाच्या उत्पत्तीला कारण कोण असा प्रथमच प्रश्न केला आहे:—कोणी म्हणतात कीं मूलकारण काल आहे, कोणी स्वभाव

म्हणतात, कोणी नियति म्हणतात, कोणी यदृच्छा म्हणतात, कोणी पंचभूतें म्हणतात व कोणी पुरुष असें म्हणतात. कोणी या सर्वांचा संयोग म्हणतात व कोणी तर सर्वांचे कारण असलेला आत्माच सृष्टीचें मूलकारण ( योनि ) आहे असें सांगतात ( श्वेता० १–२ ). प्रस्तुत उपनिषदानें पुढील अध्यायांतून या सर्व कारणांचें निराकरण मोठ्या बहारीनें केलें असून पुढें म्हटलें आहे:—

**एको हि रुद्रो न द्वितीयाय तस्थुय इमाँल्लोकानीशत ईशनीभिः ।**
**प्रत्यङ् जनांस्तिष्ठति संचुकोपान्तकाले संसृत्य विश्वाभुवनानि गोपाः**

( श्वेता० ३–२ )–'आपल्या नियामकशक्तीच्या योगानें सर्व लोकांवर सत्ता चालविणारा एक मात्र रुद्र आहे, सृष्टीच्या संहारकालीं तो एकमेवाद्वितीय असा आहे, व प्रभवकालीं तोच सर्वांना उत्पन्न करितो. सर्व भुवनांचा उत्पन्नकर्ता तोच आहे.' तोच 'विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो' असा आहे. 'या ते तनू रुद्र शिवा घोराऽपापकाशिनी' शिव हा सर्व कारणांचा अधिप आहे–'न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः' तो सर्वभूतांतरात्मा, सर्वव्यापी, सर्व कांहीं तो आहे. त्यालाच जाणल्यानें मृत्यु दूर होतो, 'नान्यःपंथा विद्यते अयनाय'–परमपद-प्राप्तीला दुसरा मार्ग नाहीं. 'सर्वव्यापी स भगवांस्तस्मात्सर्वगतः' शिवः' तो सर्वांचा प्रेरक आहे, त्याची प्राप्ति सुनिर्मल आहे. 'सर्वतः पाणिपादं तत्' 'सर्वेंद्रियगुणाभासं' हे श्लोक असेच्या असेच गीतेंत घेतले आहेत, यावरून शिव विष्णु एकरूप आहेत, एकाच परमात्म्याचीं हीं दोन नांवें आहेत हेंच सिद्ध होतें. एकाचे दोन किंवा अनेक जर होतात, तर अनेक हे एकाचींच रूपें आहेत असें कां म्हणूं नये ? एक ते अनेक व अनेक ते एक, अथवा एकअनेकविरहित जें एक तेंच परमेश्वरच आहे, मग त्याला शिव म्हणा, विष्णु म्हणा किंवा आणखी कांहीं ह्मणा. तो शिव 'भावग्राह्य' आहे म्ह० विशुद्ध अंतःकरणालाच ग्रहण होतो. येथें भक्तीचें बीज आहे.

... वाचनालय, सातारा



## ५ शिवविष्णूंची एकात्मता

मैत्रायणीय उपनिषदांत ब्रह्मा, विष्णु, व महेश हीं तीनही मूळ परमात्म्याचींच रूपें आहेत असें स्वच्छ म्हटलें आहे. शिवाची उपासना दोन्ही प्रकारांनीं करितात. शिवाचें तपस्वी रूप, त्याचा गौरवर्ण, जटाजूट, व्याघ्रांबरपरिधान, दिगंबररूप, हें एक मूर्तिध्यान आणि दुसरें शिवलिंगाचें उपासन. यापैकीं लिंगपूजेचें माहात्म्य अधिक सांगितलें आहे व लिंगपूजा सुरू कशी झाली याविषयींची एक कथा (म. भा. सौप्तिकपर्व अ० १७) वर्णिली आहे. लिंग हा शब्द लिग् जाणणें ह्या धातूपासून झाला आहे, अर्थात् लिंग ह्म० ज्ञान, आत्मज्ञान किंवा पारमेश्वरी ज्ञान ( कूर्मपुराण अ० ११ व अ० २४, लिंगपुराण अ० १९ व अग्निपुराण अ० ५३ पहा ). ह्या सर्व ठिकाणीं लिंग ह्म० परब्रह्माचें मूर्तस्वरूप होय असें सांगितलें आहे. वेदी ह्म० पिंडी, पिंडीचा आधारभूत सर्व खालचा भाग. वेदीमध्यें मूलपीठ व ऊर्ध्वपीठ असे दोन भाग आहेत. मूलपीठ, ऊर्ध्वपीठ व पिंडी मिळून महालिंग असें शिवसंप्रदायांत मानतात. मूलपीठ ब्रह्मा किंवा रजोगुणांचें चिन्ह, ऊर्ध्वपीठ विष्णु किंवा सत्वगुणाचें चिन्ह व पिंडी हे शिव किंवा तमोगुणाचें चिन्ह व एकंदर महालिंग ह्म० ब्रह्माविष्णुमहेशात्मक त्रिमूर्तिरूप परब्रह्म. महालिंग हें शिवाचें शरीर व लिंग हें मस्तक. असें म्हणतात कीं समाधिस्थितींत योग्याचें शरीर महालिंगाच्या आकाराचें होतें व स्वयंभू लिंगें हीं महायोग्यांचीं शरीरें होत. शंकराचीं पंचमुखें हीं पंचज्ञानेंद्रियें. पार्वती ह्म० शंकराच्या अंगभूत असलेली प्रकृति. शंकराच्या गळ्यांतल्या रुंरुमाळा, त्याचीं स्मशानांतील वस्ती व भस्मधारण हें वैराग्यद्योतक आहे. महालिंग हें सगुणब्रह्म आहे व म्हणून उपासनेला योग्य आहे. शंकर त्रिपुरासुरांचा त्रिशूळानें वध करितात म्ह० स्थूळ, सूक्ष्म व कारण ह्या तीन देहांचा नाश ज्ञानस्वरूप शंकर हे श्रवणमनननिदिध्यासनरूप त्रिशूळानें करितात. असो. शिवाच्या उपासनेचें वर्म हें असें आहे. विष्णु

हे क्षीरसागराच्या म्ह० शुद्धसत्वाच्या तीरावर अहंकारकालियाला खालीं दडपून अर्थात् शेषाच्या शरीरावर शयन करितात. तिकडे जी पार्वती तीच इकडे लक्ष्मी. शिव तोच विष्णु व विष्णु तोच शिव, व दोघांस जो भेद-भावानें पाहील तो दोघांचाही भक्त नव्हे असें महाभारतांतल्या नारायणीय आख्यानांत स्वतः नारायणानें स्पष्ट सांगितलें आहे. असें असून एक दुस-ऱ्याहून श्रेष्ठ अशा ज्या पुराणांतून कथा आहेत तो उपासनेचा अभिमान आहे किंवा वाग्विलास आहे असें समजावें! महाभारतांत कृष्णानें शिवाचें किंवा शिवानें विष्णूचें आत्मीयभावानें गौरव केलें आहे. हें शिवविष्णूंच्या एकात्मतेचें रहस्य न ओळखून जे भेदभाव वाढवीत असतात ते अज्ञान होत! महाभारतांत अनुशासनपर्वांत उपमन्यूचें आख्यान आहे. तेथें जांबवतीला पुत्र व्हावा या इच्छेनें श्रीकृष्णांनीं शंकराची आराधना केली व शंकराचीं सहस्रनामें श्रीकृष्णानें उपदेशिलीं असें वर्णन आहे! अर्जु-नानें शंकराची आराधना करून त्याला प्रसन्न करून त्याजपासून पाशु-पतास्त्र मिळविल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे (द्रोणपर्व अ. ९०–९३). शिव-विष्णूंचें युद्ध शांतिपर्वांत वर्णिलें असून तेथें नारायण शंकरास म्हणतातः— ‘ जो तुझा भक्त तो माझा भक्त. ज्याला तुझें ज्ञान झालें त्याला माझेंही ज्ञान झालें. तुझ्या माझ्यांत कांहींएक भेद नाहीं. तुझ्या शूलाच्या प्रहा-राचें चिन्ह माझ्या वक्षस्थलावर उमटल्यामुळें मला लोक श्रीवत्सलांछन म्हणतील व माझ्या हाताचें चिन्ह तुझ्या कंठावर उमटल्यामुळें तुला श्रीकंठ म्हणतील. ”

---

१ महाभारतांत पांचरात्रमताचा उल्लेख आहे त्याप्रमाणें पाशुपतमताचाही आहे. तेथें सांख्य, योग, वेदांत, पाशुपत व पांचरात्र हीं पांच ज्ञानें आहेत असें स्पष्ट म्हटलें आहे. पाशुपतदर्शनांत सांख्यांचीं २५ तत्वें व अधिक ११ मिळून ३६ तत्वें मान-तात. ब्रह्मदेवासगट सर्व जीव पशु आहेत. मल, कर्म, माया, जगत् व निरोधकशक्ति या पांच पाशांनीं बांधलेला जीवपशु याला सर्वज्ञत्वादि शक्तियुक्त असा शिव सोडवितो हें मुख्य पाशुपतदर्शन होय. शैवसंप्रदायांत आगम व पाशुपत असे दोन भेद आहेत.

नगर वाचनालय सातारा


शिव आणि विष्णु हीं मूळांत एका परमात्म्याचींच नांवें आहेत यांत शंका नाहीं. 'विष्णुसहस्रनाम' हें महाभारतांत आहे व त्यांत विष्णूच्या सहस्रनामांत 'सर्वः शर्वः शिवः स्थाणुः' ( श्लोक ४ ) व 'स्वयंभूः शंभुरादित्यः' ( श्लोक ५ ) अशीं पदें आहेत. आतां सर्व, शर्व, शिव, स्थाणु, शंभु हीं नांवें शिववाचक असून विष्णूला लावलीं आहेत यावरून 'शिव' व 'विष्णु' एकच आहेत अशीं सहस्रनामें गाणाऱ्या भीष्माचार्यांचीं बुद्धि होती हें उघड आहे. श्रीशंकराचार्यांनीं विष्णुसहस्रनामावरील भाष्यांत 'शर्व' पदाचा 'शृणोति सकळाः प्रजाः संहराति संहारयति वा शर्वः' असा अर्थ दिला असून पुढें 'स ब्रम्ह स शिव इत्यभेदोपदेशात् शिवादिनामाभिर्हरिरेव स्तूयते' असें म्हटलें आहे. उलटपक्षीं रुद्राध्याय हा तर सर्वस्वी शिवपर आहे, पण त्यांतही ४ थ्या अनुवाकांत 'नमो गिरिशाय च नमो शिपिविष्टाय च' अशीं दोन नांवें आलीं आहेत. येथील 'शिपिविष्ट' हें नांव विष्णूचें म्हणून प्रसिद्ध आहे. "विष्णुमूर्तिधारी शिपिविष्टः । 'विष्णुः शिपिविष्ट इति श्रुतेः"–शतपथ ब्राह्मणांत शिपिविष्ट म्हणजे विष्णु असें स्पष्ट म्हटलें आहे. 'ॐवषट् ते विष्णवास आ कृणोमि । तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम्' ( ऋग्वेद ७–९९–७ ) 'हे विष्णो ! मी मुखद्वारां तुझा वषट्कार करितों, हे शिपिविष्ट! तूं माझ्या हवीचा स्वीकार कर'–येथें शिपिविष्ट म्ह० विष्णु. शिव व विष्णु एकरूप आहेत. महाभारतग्रंथाला सूतीचें संस्करण मिळूनही तो आज आहे ह्या स्वरूपांत अडीचहजार वर्षें तरी आहे असें अर्वाचीन पंडितांचें म्हणणें आहे. आतां महाभारतांतही शिव विष्णु ह्याच देवता मुख्य मानलेल्या आहेत. ह्या देवतांच्या प्रतिमा त्यावेळीं मंदिरांतून स्थापिलेल्या असून त्यांची पूजाअर्चा होत असे असें महाभारतावरून स्पष्ट दिसतें. भारतकाळापासून तों शंकराचार्यांपर्यंत शिव, विष्णु स्कंध, देवी यांची भक्ति प्रचलित होती. बाकीच्या वैदिक देवता थोड्या मागें पडून शिव व विष्णु यांच्यासंबंधीं तत्वज्ञानाचे व भक्तीचे दोन पंथ जोरानें वाढत गेले व त्यांस पाशुपत व पांचरात्र अशीं नांवें पडलीं.

महाभारतांत विष्णुसहस्रनाम आहे तसें शिवसहस्रनामही आहे. कोणी शिवास परमदैवत मानीत व कोणी विष्णूस मानीत. पुढें कांहीं पुराणांत विष्णूला श्रेष्ठ म्हटलें आहे, कांहींत शिवाला श्रेष्ठ म्हटलें आहे. उभय-देवांच्या भक्तांत पुढें कांहींकाळ चुरस माजली असली तरी महाभारतांत दोन्ही देवतांना श्रेष्ठ मानलें असून त्यांचें परस्परप्रेम किंवा ऐकात्म्यच वर्णिलेलें आहे. 'शिवस्य हृदये विष्णुर्विष्णोश्च हृदये शिवः' हा सर्वसामान्य लोकांचा विश्वास आजही आहे. विष्णु म्हणा किंवा शिव म्हणा तें परब्रह्माचेंच स्वरूप आहे. उपासकांच्या श्रद्धेप्रमाणें परमात्मा आहे. नारायणीय धर्मांत रुद्राचे भक्त ते नारायणाचे भक्त व जे रुद्राचे द्वेषी ते नारायणाचे द्वेषी असें या दोन्ही देवांचें अभेदानें वर्णन केलें आहे ( शांतिपर्व २३–४१ ).

---

# ६ मधल्या काळाचा थोडा इतिहास.

## १ ब्राह्मण व क्षत्रिय.

वेद, उपनिषदें, शास्त्रें, पुराणें, रामायण, भारत, भागवतादि धर्मग्रंथ हे एकामागें एक निर्माण होऊन भारतीय आर्यांची उन्नतावस्था पराकोटीला पोंचली व कित्येक शतकें राष्ट्रानें सर्व प्रकारचीं ऐश्वर्यें व सुखें भोगलीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण व श्रुतींत ज्यांना वर्णबाह्य म्हटलें आहे असा पांचवा वर्ग हें सर्व आपापल्या स्थितीप्रमाणें वागून आनंदांत राहत होते. ब्राह्मण व क्षत्रिय हे श्रेष्ठ वर्ण तुल्यबल होते. श्रुतिशास्त्राचा अभिमान दोन्ही वर्णांना होता, ब्रह्मनिष्ठता दोन्ही वर्णांच्या अंगीं होती, शास्त्रशुद्ध आचार दोघांचा होता. हजारों वर्षें वेदज्ञ ब्राह्मण व प्रजापालनतत्पर क्षत्रिय राजे गुण्यागोविंदानें येथें नांदत होते. उपनिषत्कालीं तर ब्रह्मविद्या कित्येक ब्राह्मण क्षत्रियांपासून शिकले व कित्येक क्षत्रिय ब्राह्मणांपासून शिकले. बृहदारण्य व छांदोग्य यांत दोन्हीं प्रकारचीं उदाहरणें आहेत, तथापि सामान्यतः ब्रह्मविद्या ब्राह्मणांचेंच प्रधान कर्म होऊन राहिलें. हिंदु समाज हा पहिल्यापासून चातुर्वर्ण्यघटित आहे. चार वर्णांच्या अनंत जाति पुढें पुढें धंद्यांमुळें बनत गेल्या. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' असें भगवान् गीतेंत बोलले आहेत. ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत चार वर्णांची उत्पत्ति एकाच विराट् पुरुषापासून झाली हें सांगितल्याचें सुप्रसिद्ध आहेच. बृहदारण्यांत ब्रह्मानें देवांत प्रथम चार वर्ण उत्पन्न केले व नंतर मनुष्यांत ते झाले असें म्हटलें आहे. इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, मृत्यु, यम, ईशान हे देवांतले क्षत्रिय होत; वसु, रुद्र, आदित्य, आणि विश्वेदेव हे देवांतले वैश्य व पूषन् हा देवांतला शूद्र होय. अग्नि हा देवांतला ब्राह्मण होय. यानंतर देवांतल्या चार वर्णांप्रमाणें मनुष्यांत चार वर्ण

झाले. ( बृह० १–४–११ ते १५ ). आश्रमांचीही व्यवस्था अशीच होती. ' यज्ञाध्ययनदानानि ' हीं गृहस्थाचीं कर्मे, ब्रह्मचर्य व आचार्य-कुलवास हीं ब्रह्मचाऱ्याचीं कर्मे व तप हें तिसऱ्या आश्रमाचें कर्म असें म्हटलें असून ' ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति ' म्ह० ब्रह्मस्थिति प्राप्त झालेल्या पुरुषाला मोक्ष मिळतो असा एका मंत्राचा शेवट केला आहे ( छां. २–२३–१ ). तात्पर्य वर्णाश्रमधर्माची व्यवस्था श्रुतिकालींच रूढ झाली होती व ती कित्येक शतकें अबाधित चालली होती. ह्या दीर्घकाळांत भरतखंडांत अनेक ब्रह्मर्षि व राजर्षि झाले. मध्यंतरीं एकदा क्षत्रिय धनैश्वर्यादिकांमुळें उन्मत्त झाले तेव्हां परशुराम हा भगवंताचा अवतार ब्राह्मणांत झाला व त्यानें ' शापादपि शरादपि ' करून क्षत्रियांना दीन केले; तथापि परशुरामावताराच्या शेवटीं रामावतार हा क्षत्रियांत झाला. रामाचें सकलगुणसंपन्नत्व पाहतांच परशुरामाच्या अंगचें भगवत्तेज रामाच्या अंगांत प्रविष्ट झालें व रामावताराच्या कार्यास प्रारंभ झाला. रामानें भूतभविष्य सर्व क्षत्रियांना आदर्शभूत असें दिव्यचरित्र आचरून दाखविलें. ठिकठिकाणीं तप करीत बसलेल्या ऋषींचें आशीर्वाद घेऊन व त्यांचें प्रेम संपादन करून त्यानें रावणाचा वध केला व साधूंचें परित्राण, दुष्कृतांचा नाश व धर्मसंस्थापना हीं तीनही कार्यें करून दाखवून आपल्या सच्चारित्र्यानें जगाला उत्तमोत्तम क्षत्रियधर्माचा कित्ता घालून दिला. रामाच्या जोडीला त्याचे गुरू वसिष्ठ हेही परम-योग्य भेटले. क्षत्रियोत्तम व ब्राह्मणोत्तम यांची एककालीन जोडी जगाच्या उद्धाराला कारण होते. याज्ञवल्क्यजनक ही गुरुशिष्यांची जोडी अशीच अद्वितीय होऊन गेली. अलीकडील काळांत विजयानगरचें साम्राज्य स्थापन करणारे हरिहरबुक्क व त्यांचे गुरु माधवाचार्य उर्फ विद्यारण्य किंवा मराठी साम्राज्याचे संस्थापक पुण्यश्लोक शिवाजी महाराज व त्यांचे गुरु रामदासस्वामी ह्या जोड्या अशाच लोकोत्तर झाल्या आहेत. एक क्षात्रगुणांचा आदर्श व एक ब्राह्मणगुणांचा आदर्श–असे दोन पुण्यश्लोक एकत्र येऊन एकात्मतेनें वागूं लागल्यावर दुनियेंत

अशी कोणती गोष्ट आहे कीं जी त्यांना असाध्य आहे ! 'दुरासदं च तत्तेजो क्षात्रं च ब्रह्मसंयुतम्'–क्षात्रतेज व ब्रह्मतेज एकरूप झालें कीं जगाला भारी होतें असें कालिदासानें ह्मटलें आहे व मनुस्मृतींतही 'ब्रह्मक्षत्रंच सम्पृक्तमिह चामुत्र वर्धते' म्ह. ब्राह्मण व क्षत्रिय यांत जेव्हां ऐक्य होतें तेव्हां उभयतांचाही अभ्युदय होतो असें म्हटलें आहे. 'पवनाग्निसमागमो ह्ययं सहितं ब्रह्मयदस्त्रतेजसा' म्ह. ब्राह्मण व क्षत्रिय यांचें ऐक्य वायु व अग्नि यांच्या ऐक्याप्रमाणें आहे असं भवभूतिही म्हणतो. ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्या दोन्ही शक्ति प्रचंड आहेत व दोन्ही शक्तींची राष्ट्राच्या कल्याणाला अतिशय गरज असते. दोन्ही शक्ति एकवटल्या तर सर्व राष्ट्राचें त्यांत हित आहे व दोन्हीं शक्तींचा परस्परांशीं विरोध येऊन त्या परस्परांशीं झगडूं लागल्या तर त्या दोन्ही शक्तींचा ऱ्हास होऊन राष्ट्राचा नाश होतो ! असो. रामरायानें दोन्ही शक्ति एक केल्या व प्रजेस रामराज्याचें अलौकिक सुख लाभलें. प्रायः चारी वर्ण सलोख्यानें, प्रेमानें, व परस्पर विश्वासानें आपापल्या कर्मांत निरत होऊन वागत आले आहेत व त्याप्रमाणें एकेक राजघराण्याला आयुष्यही हजारहजार वर्षांचें मिळालें आहे; कित्येक राजघराणीं याहूनही दीर्घायुषी झालीं आहेत. रामाचेंच घराणें पहा. त्या घराण्यांतील किती पुरुषांनीं राज्य केलें व त्यांत किती तरी नामांकित राजे झाले आहेत ! इक्ष्वाकु, पृथु, त्रिशंकु, उत्तानपाद, मांधाता, शिबी, हरिश्चंद्र, रुक्मांगद, धुंधुमार, सगर, भगीरथ, रघु, अंबरीष, दिलीप, अज, दशरथ असले सिंहासारखे कित्येक राजे रामाच्या पूर्वजांत होऊन गेले आहेत. पुढें ह्या एका सूर्यवंशाच्या १०१ कुळी भारतकालीं झाल्या होत्या, अशाच चंद्रवंशाच्या नंतर झाल्या. त्यांतही पुरूरवा, नहुष, ययाति, पुरु, दुष्यन्त, भरत, सुधन्वा, कुरु, शन्तनु, कौरवपांडव, परीक्षिति, जनमेजय, उदयन इ. अनेक श्रेष्ठ राजे झाले. अगदीं अलीकडच्या काळांत मुसलमानी रियासतींतही मेवाडच्या उर्फ उदेपूरच्या एकाच राजघराण्यांत बाप्पारावळ, समरसिंह, हमीर, रायमल, संग्रामसिंह उर्फ राणासंग,

उदयसिंह, प्रतापसिंह, अमरसिंह, राजसिंह इत्यादि सिंहांसारखे भीमपराक्रमी अनेक पुरुष झाले आहेत. राजे प्रजावत्सल, प्रजा संतुष्ट, सर्ववर्ण व जाति आपापल्या कर्मांत नितर, परस्परप्रेमी व धर्मपरायण असा गोड संयोग झाल्यावांचून राजघराण्यांचें बूढ गादीवर दीर्घकाळ टिकत नाहीं, आणि भरतखंडांत हजारों वर्षें राजे व प्रजा, ब्राह्मण व क्षत्रिय, सुशिक्षित व अशिक्षित, स्पृश्य व अस्पृश्य, स्त्रिया व पुरुष, श्रीमंत व दरिद्री सर्व लोक परस्परांशीं अत्यंत प्रेमानें वागत व सर्व मिळून वेदशास्त्रांचें परिपालन करून इहपरलोकीं धन्य होऊन जात. लोकांना हें सुख व हें ऐश्वर्य धर्मबळानें प्राप्त झालें होतें.

## २ अवनतीस प्रारंभ.

भारतीयुद्धानंतर हिंदुस्थानच्या अवतीस आरंभ झाला; कौरवपांडवांची भाऊबंदकी साऱ्या राष्ट्राला भोंवली. उभय पक्षांकडे भरतखंडांतले सारे राजपुत्र व बलवान् क्षत्रिय राजे जमले होते. कांहीं पांडवांना मिळाले होते व कांहीं कौरवांकडे होते. भारती युद्ध झालें त्यांत उभयपक्षाकडे जे रथी महारथी होते ते बहुतेक भारती युद्धांत पतन पावले.ह्या युद्धांत क्षत्रियांचा व शूर वीरांचा फार नाश झाला आणि नंतर युद्धपरिणामाविषयीं अर्जुनानें जें आधीं भाकीत केलें होते त्याप्रमाणें घडून आलें. मोठमोठ्या क्षत्रिय कुलांचा क्षय झाला, सनातन कुलधर्म लोपले, धर्मलोपानंतर उत्तमोत्तम कुळें नाहींशीं झालीं, अधर्माचा प्रवेश झाला म्ह० आद्यधर्म जाऊन विधि-निषेध नाहींसे झाले व त्याबरोबर कुलस्त्रिया दूषित झाल्या म्ह० अधमोत्तम वर्णांच्या सोयरिकी होऊन वर्णावर्णांची भेसळ झाली, त्यामुळें जातिधर्म लोपून सर्वत्र वर्णसंकार झाला, आणि ' संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ' याप्रमाणें पूर्वीची सुंदर वर्णव्यवस्था मोडून संकर झाला. संकराचें फळ श्रेष्ठ कुलांचा, समाजाचा व राष्ट्राचा अधःपात हें ठरलेलेंच आहे. ( गीता अ. १ श्लोक ३९ ते ४४ ). भारतीयुद्धानंतर यादव दुराचारी व उन्मत्त झाले तेव्हां शापाचें निमित्त करून भगवंतालाच यादवांचा

निःपात करावा लागला. तात्पर्य भारतीयुद्धानें आर्यसंस्कृतीला फार मोठा धोका आला व राष्ट्र तेव्हांपासून जें खालीं घसरत चाललें तें अजूनही सावरलें नाहींच, किंबहुना सांप्रत त्याला अत्यंत भयप्रद स्थिति प्राप्त झाली आहे. भारतीयुद्धामुळें व यादवीमुळें सर्वांत अधिक हानी झाली ती क्षत्रियांचीच झाली. क्षत्रियवर्ण संपूर्ण नष्ट झाला नाहीं, त्याची खच्ची झाली. क्षत्रियजात कायम राहिली. भरतखंडांत व महाराष्ट्रांत क्षत्रिय आहेत, मात्र त्यांपैकीं बहुतेकांत संस्कारधर्मलोप झाल्यानें त्यांची राहणी कनिष्ठ झाली आहे. ती सुधारतांच ते पूर्ववत् होतील. युद्धांत तरुण व प्रौढ क्षत्रिय लक्षावधि मेले व त्यामुळें असमविवाहसंबंध घडून व्रात्य जन्मास आले. उत्तमाधमांच्या संयोगानें जी संतति निर्माण होते तिच्यांत वरिष्ठ संस्कृतीचे श्रेष्ठ गुण प्रायःउतरत नाहींत हें पाश्चात्त्य समाजशास्त्रवेत्त्यांनींही अलीकडे आंकडेवारीनें सिद्ध करून दाखविलें आहे. यासाठीं आपल्यांत 'रक्तशुद्धि' संभाळण्याकडे समाजनियामकांचें मुख्य लक्ष असतें. असा हा अधःपात होत असतांना त्यांतच बौद्ध व जैन हे दोन पंथ निर्माण होऊन त्यांनीं त्यांत अधिकच भर टाकली ! त्यांच्या आघातांपासून सनातनधर्म जगविण्याचे कामीं पुढें अनेक राजे, तत्वज्ञानी व साधुसंत यांना फार परिश्रम करावे लागले.

## ३० गौतमबुद्ध व महावीर.

बुद्ध व महावीर यांच्या जन्मकाळीं उत्तर भारताची राजकीय स्थिति अशी होतीः—तेव्हां भरतखंडाचे उत्तरापथ, मध्यदेश व दक्षिणापथ असे तीन भौगोलिक विभाग मानले जात. मगधदेश हा शिशुनागवंशांतील बिंबिसार ह्या प्रबल राजाच्या आधिपत्याखालीं होता. उज्जयिनीस म्ह० अवंतीस प्रद्योत हा त्याचा राजकार्यधुरंधर मंत्री यौगंधरायण याच्या साह्यानें आपल्या सभोंवारचीं लहान मोठीं राज्यें आक्रमीत चालला होता. पांडववंशीय राजे शतानीक व उदयन उर्फ वत्सराज हे यमुनातीरीं प्रयागपासून १५ मैलांवर उत्तरेस असलेल्या

कौशंबी नगरीस राहून यमुनेच्या दक्षिणोत्तर तीरावर पसरलेल्या वत्सदेशावर राज्य करीत होते. प्रद्योताची मुलगी वासवदत्ता हिनें उदयनास वरिलें होतें. कोसलदेशाचा राजा इक्ष्वाकुकुलोत्पन्न प्रसेनजित् ( ख्रि. पू. ६२०–५४२ ) व मृच्छकटिक नाटकाचा कर्ता राजा शूद्रक ( ख्रि. पू. ५७०–४७० ) हे विख्यात राजे गाजले होते. हें राज्य वत्सदेशाच्या ईशान्य व उत्तर दिशेस होतें. याप्रमाणें मगध, वत्स, कोसल व अवंती हीं चार राज्यें प्रमुख होतीं. काशीचें राज्य कोसलच्या आधिपत्याखालीं होतें. शाक्य हे इक्ष्वाकुवंशांतील असून त्यांचें राज्य हिमालयाच्या पायथ्यासी पसरलें होतें. हे त्यावेळीं कोसलेश्वराच्या आधिपत्याखालीं होते. ह्या शाक्यकुलांतच गौतमबुद्धाचा जन्म झाला. शाक्यांचें राज्य लहान पण कुळ मोठें होतें. शाक्यकुळाचीं ८० हजार कुटुंबें असून शाक्यांची शिरगणती दहालक्षावर होती. जैनधर्माचा संस्थापक महावीर याचा जन्म गौतमबुद्धापूर्वी २० वर्षें झाला. हाही त्याच प्रांतांतला पुरुष होता. हा लिच्छी कुळांत जन्मला. हे लिच्छी शूर असून व्यापारधंदे करीत व संपन्न असत. यांचें मिथिलदेशांत वज्जिप्रांतांत प्रजासत्ताक राज्य होतें, त्यांना गण म्हणत. मगधदेशावर बिंबिसार याचें विशाल राज्य चालू असतांना गौतम व महावीर ह्या क्षत्रियकुलोत्पन्न दोन पुरुषांनीं दोन वेगवेगळे धर्मपंथ काढले व त्या पंथांचा प्रसार करण्याचें काम चालविलें. बिंबिसारानें कोसल राजकन्येशीं विवाहबद्ध होऊन दोन्हीं राज्यांचा स्नेहसंबंध जोडला होता, व कोसलाधिपानें एका शाक्यकन्येशीं विवाह केला होता. तात्पर्य गौतम व महावीर यांचे मगधदेशांतील राजघराण्यांशीं संबंध असून त्यांना मतप्रसारार्थ त्या प्रदेशांतील राजवंशीयांकडून चांगली मदत झाली. बिंबिसार व त्याचा पुत्र अजातशत्रु या राजांच्या कारकीर्दींत हे दोन्ही पंथ पसरत चालले. ह्याच मगधदेशाच्या गादीवर पुढें मौर्यवंशीय चंद्रगुप्त व अशोक हे दोन राजे येऊन अशोकानें भरतखंडाचें साम्राज्य मिळविलें व त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केल्यामुळें राजसत्तेच्या बळावर

बुद्धधर्माचा प्रसार हिंदुस्थानभर झाला. बुद्ध म्ह० बोध झालेला, जागा झालेला. हें नांव शाक्य गौतमानें निर्वाणपदप्राप्तीनंतर धारण केलें. जिन म्हणजे जिंकणारा, मन व इंद्रियें स्वाधीन ठेवणारा, हें नांव महावीरानें धारण केलें. हे दोन्ही पंथ वैदिकधर्माला सोडून चालले, किंबहुना चिररूढ अशा वैदिकधर्माशीं बंडखोरपणा करूनच हे उदयाला आले. हजार बाराशें वर्षें यांनीं भरतखंडांत धुमाकूळ घातला. शेवटीं वैदिकधर्मानें जोर मारून बौद्धपंथाला हिंदुस्थानच्या हद्दीपार केलें, व जैन पंथाचें वैदिकधर्मीयांशा थोडें मिळतें असल्यामुळें तो जीव धरून राहिला. वैदिकधर्माला या दोन्ही पंथांशीं दीर्घकाळ झगडावें लागलें व या झगड्यांत त्याची शक्ति फार खर्च झाल्यामुळें नंतर मुसलमान व खिस्तधर्मीय यांचे पाय हिंदुस्थानांत रोवले गेले! या दृष्टीनें हे पंथ अनिष्टपरिणामी झाले.

## ४ वैदिक धर्माचे सिद्धांत.

वैदिक धर्माचे सिद्धांत गौतम व महावीर यांच्या जन्मकाळापूर्वी दृढ होऊन भरतखंडभर पसरलेले होते व त्यांच्या अनुरोधानें श्रुतिस्मृत्युक्त सनातनधर्माची चांगली घडी बसून समाजघटना दृढमूल झाली होती. वेदोपनिषदांतील ब्रह्मविद्या व गीताभागवतादि ग्रंथांतील भक्तिपंथ यांचा मिलाफ होऊन वेदधर्म सर्वजनसेव्य झाला होता. त्यांतील मुख्य मुख्य सिद्धांत सांगतों. ( १ ) वेद हे ईश्वरप्रणीत आहेत, ती देववाणी आहे. ( २ ) वेदोपनिषदांनीं प्रतिपादिलेली ब्रह्मविद्या अमृतत्व देणारी अर्थात् जीवाचा उद्धार करणारी आहे. ( ३ ) वेदांतील इंद्राग्निवरुण व शिवविष्णु इ. ह्या देवता पूजनीय आहेत. ( ४ ) अहिंसातत्व वैदिकधर्माचें प्रधान अंगच आहे तथापि यज्ञप्रसंगीं देवतोद्देशानें केलेली व धर्मप्रजारक्षणार्थ क्षत्रियांना स्वीकारावी लागणारी हिंसा वैदिकधर्माला अमान्य नाहीं. ( ५ ) वैदिकधर्मानुयायी लोकसमाजाचा चातुर्वर्ण्य हा पाया आहे, व त्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य,

शूद्र हा चातुर्वर्ण्याचा क्रम सामान्यतः नित्य असला तरी कोणत्याही वर्णांतल्या गुणश्रेष्ठ स्त्रीपुरुषांचा वैदिकधर्मानें केव्हांही आदरच केलेला आहे. रामकृष्णादि क्षात्रकुलोत्पन्न विभूतींच्या उपासना वैदिकधर्मानेंच लोकांना घालून दिल्या आहेत ( ६ ). समाजाच्याच शिस्तीसाठीं कांहींएक प्रकारचा उच्चनीचभाव कोणत्याही काळीं व कोणत्याही देशांत कोणत्याना कोणत्या रूपानें गुणकर्मानें उत्पन्न होणें अपरिहार्य असल्यामुळें, भेदतत्व मान्य करूनही सर्वात्मभावानें सर्वांशीं वागण्यास वैदिक धर्म शिकवितो. तोंडांत अभेद व पोटांत भेद असला खोटेपणा वेद-धर्मांत नाहीं ! उच्चनीचपण तत्वतः मान्य करूनही आचरणांत अद्वैतभाव अथवा अभिन्न आत्मभाव आणायला शिकवणारा वैदिक धर्म खरो-खरीच अत्यंत उदार आहे. वृक्षवनस्पति पशुपक्षी किंवा कृमिकीटक यांत किंबहुना सकलचराचरांत एक आत्मा ओतप्रोत भरला आहे हें शिक-विणाऱ्या वैदिकधर्मापेक्षां अधिक उदात्त धर्म दुसरा कोठें आहे ? शंकराचें वाहन नंदी, विष्णूचें गरुड, गणपतीचें उंदीर हें सांगणारा व गाईच्या ठिकाणीं सर्व देवता पाहायला शिकवणारा वैदिकधर्म मनुष्या-मनुष्यांत व्यवहारापुरता भेद सांगत असला तरी तो केवळ समाजांतील शुद्ध संस्कारांच्या रक्षणासाठीं व उत्क्रांतितत्वानुसार सर्वांच्या हितासाठींच सांगत आहे ( ७ ) जीव कर्मानुरूप अनेकयोनींतून फिरत असतो व शुद्धकर्माच्या अंतीं मोक्षपद पावतो. चातुर्वर्ण्याप्रमाणें पुनर्जन्म सिद्धांत हाही वैदिक धर्मांतर्गतच आहे. ( ८ ) उपनिषदांनींच यज्ञा-बरोबर संन्यासधर्माची महती गायिली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व तसाच गीताभागवतांनीं प्रामुख्येंकरून सांगितलेला भक्तियोग हे तीन-ही योग अधिकारपरत्वें आचरून सर्व वैदिकधर्मीय मोक्षमार्ग आक्रमण करीत असतात. ( ९ ) आत्मविद्या सर्वांसच पचण्यासारखी नस-ल्यामुळें सामान्यजनतेला प्रतीकोपासनेची ह्म० मूर्तिपूजेची वैदिक धर्मानें सवड ठेवली आहे. कोणत्याही देवतेला भक्तिभावानें भजल्यानें जीव मोक्षमार्गाला लागतो. उपास्यांची अनेकता असली तरी मुख्य

देव एक आहे. एकाचे अनेक व अनेकांचे एक असा देव एकमेवाद्वितीय आहे. ( १० ) सर्व जातींचे स्त्रीपुरुष सदाचार व ईश्वरभक्ति या दोन गोष्टी संभाळून परागतीला पोंचतात. ह्या वैदिकधर्मालाच हिंदुधर्म ह्मणतात.

वैदिक धर्माचीं सर्वांना समजण्यासारखीं अशीं हीं दहा तत्वें सांगितलीं आहेत. हे सिद्धांत वैदिकधर्मानें गौतम व महावीर यांच्या जन्माच्या फार पूर्वीं सांगितले होते व आजही वैदिकधर्माची इमारत ह्या दहाखांबांवर उभी आहे. गौतमबुद्ध व महावीर यांनीं हे वैदिकधर्माचे सिद्धांत नीट न ओळखल्यामुळें किंवा त्यांना ते न मानवल्यामुळें त्यांनीं आपले सवते सुभे काढले व त्यामुळें वैदिकधर्मीयांत फूट मात्र पडली. आर्य समाज द्विधा झाला. त्यांतल्या त्यांत बौद्धमतापेक्षां जैनमत बरें आहे. महावीर तप व संन्यास दोन्ही मानतो, बुद्ध फक्त संन्यासच मानतो. बुद्धानें तप व शरीरक्लेश आपल्या पंथांतून काढून टाकल्यामुळें व आर्य-अनार्य स्त्रीपुरुष इ० सर्वांस आपल्या पंथांत घेण्याचें ठरविल्यामुळें तो अधिक फैलावला. शिवाय अशोक व कनिष्क यांच्यासारखे बलाढ्य सम्राट् नेते मिळाल्यामुळें त्याला राजसत्तेचें पाठबळ मिळालें. हे फायदे महावीराला मिळाले नाहींत किंवा त्यानें ते घेतले नाहींत. त्याला खरा संन्यास पाहिजे होता. उपवासादिकांचे शरीरक्लेश त्यानें धुडकावले नाहींत. शिवाय बौद्धांनीं आपले उपदेश लोकभाषेंत म्हणजे पालीभाषेंत सांगितल्यामुळें ते सर्वांस सहज समजण्यासारखे होते, जैनांनीं आपले ग्रंथ संस्कृतांतच लिहिले. या सर्व कारणांमुळें बौद्धमत हिंदुस्थानभर फैलावलें तितकें जैनमत फैलावलें नाहीं जैनलोक अल्पसंख्याक राहिले व त्यांचें मत दक्षिणेंतच पसरलें. जैनांनीं बौद्धांचें अनुकरण एका बाबतींत केलें; त्यांनीं पुढें आपले ग्रंथ तामीळ, तेलगु व कानडी भाषेंत रचिले व त्यामुळें त्यांच्या मताचा पुढें दक्षिणेंत बराच प्रसार झाला. बौद्धांचें प्राबल्य उत्तरेकडे झालें, जैनांचें दक्षिणेंत झालें. बौद्धांपेक्षां जैनांत तपस्वी, विद्वान् व ग्रंथकार अधिक झाले, त्यांनीं देशी भाषांचें वाङ्मय

समृद्ध केलें. बौद्ध व जैन आधीं मूर्तिपूजेच्या विरुद्ध होते, पण पुढें बुद्धांच्या मूर्तींचीं मंदिरें झालीं व जैन तीर्थंकराचींही मंदिरें उभारलीं गेलीं व या उभयतांच्या स्पर्धेनें हिंदूचींही मंदिरें इ. स. च्या ६ व्या शतकांपासून अधिक वाढत गेलीं ! एकंदरींत बौद्धधर्मानें वैदिक धर्मावर अधिक करडेपणानें हल्ले चढविले व त्यांचा तितक्याच जोरानें पुढें प्रत्याघात झाला. दोन्ही पंथांनीं अध्यात्मविद्येचा माग सोडला व वैराग्य, संन्यास, अहिंसा व भूतदया हीं वैदिकधर्मांतलींच चार तत्वें घेऊन त्यांचा विनियोग मात्र आपापल्या मतानुसार स्वच्छंदानें केला.

## ५ बौद्ध व जैन पंथ

नामरूपात्मक दृश्य सृष्टीच्या मूळाशीं व्यापक व अविनाशी परमात्म-वस्तु आहे असा जो वैदिक धर्माचा मुख्य सिद्धांत आहे तो गौतम-बुद्धास मान्य नव्हता. ब्रह्म किंवा आत्मा अशी कांहीं एक वस्तु नसून तो निव्वळ भ्रम असल्यामुळें त्याच्या छंदांत आयुष्य व्यर्थ घालवूं नये असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे! यज्ञयागादि कर्में निरुपयोगी आहेत असें त्याचें मत असे. कर्मावर किंवा आत्मविचारावर त्याचा विश्वास नव्हता, अर्थात् श्रुतिशास्त्र त्याला मान्य नव्हतें. जन्मच दुःखमूळ असल्यामुळें जन्ममरणांच्या चक्रांतून सुटणें अवश्य आहे असें मात्र त्याला वाटे. वासना किंवा तृष्णा हें सर्व दुःखाचें मूळ असल्यामुळें वासनेचा नाश करण्यासाठीं सर्वसंगपरित्याग करून मनुष्यानें भिक्षु बनावें, एकांतांत बसून निर्वाणपद मिळवावें, हाच बुद्धाच्या मताचा निष्कर्ष होय. संसार-दुःख, त्या दुःखाचें कारण, दुःखनिवारणाची जरूरी व त्याचें साधन वैराग्य–म्ह० ‘ दुःख, समुदय, निरोध व मार्ग ’–ह्या चार तत्वांस बुद्धानें आर्यतत्वें असें नांव दिलें आहे. वैदिक धर्मांतील वासनाक्षय व वैराग्य या गोष्टी बुद्धानें घतल्या पण आत्मानात्मविचाराचा खोल मार्ग सोडून दिला. ह्याप्रमाणें बुद्धमताला आत्मत्वाचा पाया नसल्या-मुळें त्यापासून चिरसुख मिळण्याचा संभवच नव्हता. वैदिक धर्मांतील

संन्यास आणि बुद्धमतांतील त्याग यांच्यांत साम्य कोणतेंच नाहीं. बौद्धांचा हा त्याग म्हणजे वैराग्य नव्हे, हा वैताग आहे! हिंसात्मक यज्ञयाग व चातुर्वर्ण्य बुद्धास मान्य नव्हतें. नीतीनें व परोपकारानें वागावें यापलीकडे त्यानें कांहीं खोल विचार केला नाहीं. मी कोण, हें जग कसें झालें, याचा कर्ता कोणी आहे कीं नाहीं इ. विचार त्याच्या पंथांत नसल्यामुळें तो एक बिनबुडाचा पंथ आहे इतकेंच निष्पन्न झालें. डोंगर पोखरून त्यानें उंदीर काढला. अहिंसावादाचा प्रवर्तक गौतमबुद्ध स्वतः मांस खात असे व मांसानें अजीर्ण झाल्यामुळें त्याला मृत्यु आला असें वर्णन आहे! जैनमताचे लोक बौद्धांपेक्षां अधिक त्यागी व विरक्त असून अहिंसाधर्मानें चालणारे आहेत, असा महावीरापासून त्यांचा लौकिक आहे. एकांतांत भिक्षु होऊन एकटें राहण्याचा बुद्धाचा उपदेश पुढें मागें पडून अशोकाच्या प्रत्यक्ष परोपकाराच्या कृतीचा मार्ग पुढें आला व त्यांतूनच 'महायानपंथ' निर्माण होऊन जुन्या पंथास 'हीनयान' पंथ म्हणूं लागले. चीन, तिबेटकडे महायानपंथच पसरत गेला.

## ६ मौर्य चंद्रगुप्त ( ख्रि. पू. ३३२–३०८ ).

हिंदुस्थानचा चक्रवर्ती राजा अशोक याचे अचाट उद्योग बुद्धपंथाच्या प्रसाराला मुख्यतः कारणीभूत झाले आहेत. मगधदेशाचा राजा जरासंध याला श्रीकृष्णानें भीमाकरवीं मल्लयुद्धांत ठार केल्याची कथा इतिहासपुराणांतून प्रसिद्ध आहे. त्याची राजधानी राजगृह ही गयेजवळ होती. ह्याच मगधदेशावर **बिंबिसार** नांवाच्या राजानें इ. स. पूर्वी ५८२ ते ५५४ पर्यंत राज्य केलें. त्यावेळीं जैन धर्माचा संस्थापक महावीर ( ५९७–५२७ ) व बौद्धधर्माचा संस्थापक शाक्य गौतम ( ५६७–५३८ ) हे दोन पुरुष उदयास आले. अजातशत्रूनें आपल्या राज्याच्या बळकटीसाठीं गंगा व शोणभद्र ह्या नद्यांच्या संगमावर एक किल्ला बांधला व जवळच पाटलीपुत्र नामक आपल्या राजधानीचें शहर ख्रि. पूर्व ५४६ या सालीं बसविलें. पुढें महापद्मनंद नामक

शूर पुरुषानें व त्याच्या मुलांनीं कांहीं काळ मगधाचें राज्य केलें. यांना **नवनंद** म्हणतात. ब्राह्मण मुत्सद्दी चाणक्य यानें नंदवंशाचा उच्छेद करवून मगधदेशाच्या गादीवर **चंद्रगुप्त** नामक पराक्रमी राजास बसविलें. तेथून मौर्यवंश सुरू झाला. चंद्रगुप्तानें आपलें राज्य फार वाढविलें व चाणक्याच्या साह्यानें राज्यव्यवस्था चोख ठेवली. त्यानें पांच राजाच्या फौजा एकदम अंगावर घेऊन सर्वांना पादाक्रांत केलें व भरतभूमीचा सम्राट् होण्याची महत्वाकांक्षा धरिली. ग्रीस देशाचा राजा सेल्युकस मोठी सेना घेऊन हिंदुस्थानावर चाल करून आला असतां चंद्रगुप्तानें समरांगणावर त्याला जेर करून पिटाळून लावलें व त्याच्याशीं तह करून त्याच्या राज्यांतले तीन मोठे प्रांत ( ह्यांना सांप्रत काबूल, कंदाहार व हिरात म्हणतात ) व ५०० हत्ती घेतले. सेल्युकस राजाचा वकील पाटीलपुत्र येथें ६ वर्षे होता. त्यानें चंद्रगुप्ताच्या राज्यपद्धतीचें यथादृष्ट मोठें सुंदर वर्णन करून ठेवलें आहे. चंद्रगुप्तानें पाटलीपुत्र राजधानीचें वैभव अतिशय वाढविलें. प्रजा समृद्ध व सुखी केली. शेतीच्या व व्यापारी दळणवळणाच्या उत्तम सोयी केल्या. धर्मशाळा बांधल्या. विहिरी तलाव खोदले. गुथराथ, व माळवा हे प्रांत जिंकून त्यांवर त्यानें आपले सुभेदार नेमले. दक्षिणेंत चोल, पांड्य व केरल ( म्ह० अर्वाचीन त्रिचनापल्ली , मदुरा व त्रावणकोर ) ह्या राज्यांच्या सीमेपर्यंत त्यानें आपलें राज्य आणून भिडविलें. तक्षशिला येथून गांधार–कंदाहार प्रांताची व उज्जयिनी येथून गुजराथ, माळवा वगैरे प्रांतांची व्यवस्था त्याला पाहतां येत होती. पाटलीपुत्र अर्थात् त्याच्या राजधानीचें शहर. त्याची लोकसंख्या ४ लाखांवर होती ! चंद्रगुप्ताजवळ ६ लक्ष फौज होती व आठ हजार हत्ती होते. त्याच्या राज्याच्या सीमा पूर्वपश्चिम सागराला भिडल्या होत्या. हरतऱ्हेचे व्यापार, कलाकौशल्य व विद्या यांना मोठें आंदोलन मिळालें होतें. हिरे मोतीं माणकें अपरंपार होतीं. चंद्रगुप्त हिंदु खरा पण जैनधर्माकडे त्याचा ओढा होता असें जैन ग्रंथकारांनीं लिहिलें आहे ! चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसर यानें २५ वर्षे

राज्य केल्यावर आपल्या वडील भावांना मारून अशोक मगधाच्या गादीवर आला ! साम्राज्यपदारूढ होतांच त्यानें राजवंशांतील सर्व स्त्रीपुरुषांची मुलाबाळांसगट कत्तल केली व त्याच्या कुरूपपणाला हंसल्याबद्दल अंत:पुरांतील स्त्रियांना त्यानें जिवंत जाळलें अशा त्याच्या क्रूरपणाच्या गोष्टी बौद्धांनीं लिहिल्या आहेत, पण बौद्धधर्माची दयाशीलता खुलून दिसण्यासाठीं त्या मुद्दाम रचल्या आहेत असें रमेशचंद्र दत्त यांचें म्हणणें आहे.

## ७ अशोक ( ख्रि. पू. २७३–२३३ ).

अशोकाला गादीवर बसण्यापूर्वी राज्यकारभाराची चांगली माहिती झाली होती. त्यानें माळव्याच्या सुभेदारीचें काम केलें होतें. हा ख्रि. पू. २७३ ह्या वर्षीं मगधाच्या राज्यावर बसला व त्यानें ४० वर्षें राज्य केलें. त्यानें एकच घोर युद्ध केलें, व त्यांत लक्षावधि लोक मारले. त्यानें नरक नांवाचें कारागृह बांधलें होतें ! त्यानें अमानुष क्रूरता प्रगट करून कलिंग देशांतील लोकांचे हाल करून तो देश आपल्या राज्यास जोडला. कलिंग ( त्रिकलिंग म्ह० आंध्रदेश–तेलंगण ) त्यानें ख्रि. पू. २६५ मध्यें मगध राज्यास जोडला. अशोकाला आपण केलेल्या जीव· हत्त्येबद्दल पुढें फार पश्चात्ताप झाला व त्या पश्चात्तापाच्या उसळीसरसी अहिंसावादी बौद्धधर्माची त्यानें दीक्षा घेतली ! तीन चतुर्थांश हिंदुस्थान सम्राट् अशोकानें आपल्या सत्तेखालीं आणला. अशोकानें बुद्धधर्माची दीक्षा घेतल्यामुळें त्या पंथाला राजसत्तेचें पाठबळ मिळालें. कलिंगयुद्ध होण्यापूर्वीं अशोकानें बौद्धधर्म स्वीकारला कां युद्ध झाल्यानंतर स्वीकारला याविषयीं वाद आहे ! उपगुप्तनामक एका विद्वान बौद्धाला त्यानें गुरु केले व निग्रोध नांवाच्या बौद्ध श्रमणानें अशोकाला बौद्धधर्माची दीक्षा दिली. अशोक बुद्धधर्मीयांच्या पाशांत सांपडल्यावर त्यानें आपल्या राज्यांतील शिकार बंद करून तो बौद्धतीर्थांच्या यात्रा करूं लागला ! नेपाळांत तराईप्रांतांत बुद्धाचें जन्मस्थान आहे, तेथें उपगुप्ताबरोबर तो

जाऊन आला. नंतर कपिलवस्तु, बुद्धगया, इ० बुद्धानें पावन केलेली तीर्थें तो फिरून आला. बुद्धधर्माच्या प्रसारार्थ त्यानें अनेक परिषदा भरविल्या, व हिंदुस्थानाबाहेरील सीरिया, इजिप्त, मॅसिडोनिया इ० दूरवरच्या देशांतही त्यानें बौद्धधर्मोपदेशक पाठविले! ख्रिस्ती लोकांनीं परदेशांत प्रचारक पाठवून धर्मप्रसार करण्याची कल्पना अशोकापासून उचलली. काश्मीर, गांधार, म्हैसूर, महाराष्ट्र, अपरांतक (उत्तर कोकण), कानडा, पेरु, सिंहलद्वीप ह्या हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांवर बौद्धधर्मीय उपदेशकांनीं स्वाऱ्या केल्या. अशोकानें जागोजाग मठ, स्तंभ, स्तूप व विहार उभारले. तीन वर्षांत त्यानें ८४ हजार स्तूप उभारले! नालंद येथील प्रचंड विद्यापीठ त्यानेंच बांधलें असें म्हणतात. बौद्ध भिक्षु देशभर पसरले. त्याचा पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा यांस त्यानें सीलोनमध्यें पाठविलें. त्याचे गिरिलेख उर्फ आदेश, स्तंभलेख, गुहालेख अद्यापही कोठें कोठें आढळतात. प्रयागच्या किल्ल्यांत, चंपारण्यांत, भोपाळजवळ भेलशापाशीं सांची येथें, काशीक्षेत्रापासून २ कोसांवर, संयुक्तप्रांतांत रुक्मिणीदेवीच्या मंदिरासमोर, असे त्याचे अनेक गिरिस्तंभ सांपडले आहेत. गयेजवळच्या पहाडांत त्याचे तीन गुहालेख आहेत. त्याचे एकंदर ३४ शिलालेख व स्तंभलेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवर अशोकाचे आदेश कोरलेले आहेत. अशोकानें आपल्या नांवामागें 'देवानां प्रिय' व 'पियदस्सी' म्ह० प्रियदर्शी अशीं विशेषणें जोडलीं आहेत. 'देवानां प्रिय' ह्याचा अर्थ भट्टोजी दीक्षित व हेमचंद्र यांनीं 'मूर्ख' असा केला आहे! तो अर्थ अर्थातच येथें घ्यायचा नाहीं! अशोक स्वतःच मूर्खपणाची पदवी घेणार नाहीं. शिलेवर कोरलेले लेख धर्मलेख किंवा आदेश या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे लेख सारे पालीभाषेंत आहेत. त्यांत सामान्यनीतीचा बोध चांगला आहे, वागण्याचे नियम उत्कृष्ट आहेत पण विशेष खोल विचार नाहींत व सर्व आदेशांत देवाचा कोठेंच पत्ता नाहीं!

## ८ अशोकाचे आदेश.

अशोकाच्या आदेशांतून काय उपदेश आहे तो पहा:–" धर्म म्हणजे हा कीं दास व सेवक यांच्यांशीं उचित वागणूक ठेवावी; मातापितरांची सेवा करावी; मित्र, परिचित, नातेवाईक, श्रमण व ब्राह्मण यांना दानें द्यावींत, प्राण्यांची हिंसा करूं नये." "देवांचा प्रिय राजा सर्व संप्रदायांतले गृहस्थ व राजे यांचा आदरसत्कार करीत असतो. माणसानें केवळ स्वतःच्याच संप्रदायाचा आदर व दुसऱ्याच्या संप्रदायाची निष्कारण निंदा करूं नये." "येथें ह्म० या राज्यांत कोणत्याही जीवाला मारून त्याचा बळी देण्यांत येऊं नये, किंवा 'समाज' ( मेळा किंवा नाटक ? ) करण्यांत येऊं नये. देवांच्या प्रिय राजाच्या पाठशाळेंत रोज लाखों जीव सूप ( मांसाची कढी ) बनविण्याकरितां पूर्वी मारले जात, पण तें आतां त्यानें बंद केलें आहे, मृग मारण्याचाही नेम नाहीं." "प्रियदर्शी राजाच्या राज्यांत सर्वत्र व त्याचप्रमाणें त्याच्या शेजारच्या ह्म० चोल, पांड्य, केरलपुत्र ( मलबार ), ताम्रपर्णी या राज्यांतून व अंतियोक ( सीरिया देशाचा यवनराजा ) व जे त्याच्या शेजारचे राजे ह्या सर्व देशांतून प्रियदर्शी यानें मनुष्यांच्या व पशूंच्या चिकित्सेची व्यवस्था केली आहे. त्यानें औषधिवनस्पति आणून लावल्या आहेत, रस्त्यानें पशु व मनुष्यें यांच्या विश्रांतिसुखासाठीं झाडें लाविलीं आहेत व विहिरी खोदविल्या आहेत." "मी ही आज्ञा जाहीर करितों कीं अधिकाऱ्यांनीं दौरे काढून लोकांत सांगत फिरावें कीं आईबापांची सेवा करीत जा; तसेंच मित्र, परिचित, ब्राह्मण व श्रमण, यांना दान देणें चांगलें आहे; जीवहिंसा न करणें चांगलें." "मी कितीही परिश्रम केले व राज्यकारभाराचें काम केलें तरी माझा पूर्ण संतोष होत नाहीं. सर्वलोकांचें हित करणें हें मी आपलें मोठें कर्तव्य समजतों. सर्वलोकांच्या हितसाधनाहून दुसरें श्रेष्ठ कार्य नाहीं." "सर्व संप्रदायांतल्या लोकांना संयम व चित्तशुद्धि पाहिजे."

असल्या प्रकारचे अशोकाचे आदेश आहेत. ह्या सर्व गोष्टी फार चांगल्या आहेत, पण त्या पूर्वींच्या ग्रंथांतून अशाच किंबहुना अधिक परिणामकारक रीतीनें उपदेशिलेल्या आहेत, व त्यांत नवीन असें कांहींच नाहीं. नवीन एवढेंच आहे कीं त्या अशोकासारख्या सर्वसत्ताधीश चक्रवर्तीनें हजारों लोकांना कळाव्या म्हणून शिलांवर कोरल्या आहेत व पाश्चात्त्य पंडित त्यांचें कौतुक करीत आहेत ! कलिंगप्रांतांत अशोकानें क्रूरपणानें जो रक्तपात केला त्याबद्दलचा पश्चात्ताप त्यानें ज्यांत व्यक्त केला आहे असा एक शिलालेख महत्वाचा आहे. त्यांत तो म्हणतो: "राज्याभिषेकानंतर आठ वर्षांनीं देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें कलिंगदेश जिंकला. तेथें दीड लक्ष लोक कैद केले गेले, एक लक्ष माणसें मारलीं गेलीं, व त्याच्या कित्येक पट माणसें मेलीं. कलिंगविजयानंतर देवांच्या प्रियाला पश्चात्ताप झाला. नवीन देश जिंकतांना हत्त्या ही व्हायचीच, किती माणसें कैद केलीं जातात त्याची गणती नाहीं. देवाच्या प्रियाला त्यापासून फार दुःख व खेद वाटला. त्याला आणखी दुःख यामुळें झालें कीं ब्राह्मण, श्रमण व इतर संप्रदायी लोक जेथें राहतात त्यांच्यांत ब्राह्मणांची सेवा, मातापितरांची सेवा, गुरूंची सेवा, मित्रपरिचितदास वगैरेंसीं उत्तम आचरण ठेवण्यांत येत असतें. याप्रमाणें दृढभक्तीनें युक्त आहेत अशा लोकांचा नाश व वध व प्रियजनांचा वियोग तेथें करण्यांत आला आहे. सर्वप्रकारची आपत्ति तेथें हरएक माणसाच्या वांट्याला आली आहे. त्यामुळें देवाच्या प्रियाला विशेष दुःख वाटत आहे. देवांचा प्रिय अशी इच्छा करितो कीं सर्व प्राणी निरापद, संयमी, शांत व प्रसन्न राहावे. तो सर्वांना धर्माकडे ओढून आणण्याचा प्रयत्न करीत आहे." अशोकाच्या सर्व आदेशांत धर्म, धर्मानुशासन, धर्मविजय इ० शब्द वारंवार आले आहेत व या सर्व ठिकाणीं धर्म ह्याचा अर्थ बौद्ध मत असाच आहे. 'समाजाचें हित' म्ह० समानधर्मीयांचें हित, बौद्धांचें हित, हेंच त्याला प्रियतर होतें. चंद्रगुप्ताप्रमाणें अशोक हा मूळचा हिंदुधर्मी, पण पुढें बौद्धपंथाचा त्यानें स्वीकार केला व त्या

मताचा हिंदुस्थानांतल्या सर्व प्रांतांत व हिंदुस्थानाबाहेरील देशांत प्रचारक म्ह० भिक्षु व भिक्षुणी पाठवून प्रसार करण्यांत त्यानें आपलें शक्तिसर्वस्व वेंचलें. अशोक हा मोठा प्रतापी, आत्मनिरीक्षण करणारा व लोककल्याणार्थ झटणारा थोर पुरुष होता यांत शंका नाहीं. एका स्तंभलेखांत त्यानें लिहून ठेवलें आहे. "धर्माविषयीं गाढ अनुराग, तीव्र आत्मपरीक्षण, कडक सेवाबुद्धि, पापभीरुता व उत्साह यांच्या-वांचून इहलोक व परलोक या संबंधाचें उद्दिष्ट दुष्प्राप्य आहे." किती सोज्ज्वळ उपदेश आहे. त्यानें आपल्या उद्देशाप्रमाणें हजारों भिक्षुसंघ व भिक्षुणीसंघ उभे केले. गौतमबुद्ध व अशोक हे फार थोर पुरुष होऊन गेले याविषयीं वाद नाहीं. भूतदयेचा, नीतिधर्माचा त्यांनीं उपदेशही उत्तम केला आहे, पण ईश्वराविषयीं त्यांनीं मौन धरल्यामुळें व ब्रह्मविद्येचा त्यांच्या उपदेशांत स्पर्शही नसल्यामुळें एक उच्च दर्जाचा नीतिसंप्रदाय या पलीकडे बुद्धाच्या पंथाला किंमत राहिली नाहीं व हिंदुसमाजावर त्याला कायमचा पगडा बसवितां आला नाहीं. अशोकाला गृहसौख्य मिळालें नाहीं, त्याच्या घरांत फार गोंधळ माजले, त्याचीं माणसें त्याला सोडून गेलीं, अखेर वैतागानें त्यानें राज्यत्याग केला व भिक्षुव्रताची दीक्षा घेतली! त्याचा मुलगा कुनाल गादीवर येतांच कलिंग, आंध्र व काश्मीर हे देश फुटून स्वतंत्र झाले. नंतर त्याचा नातु **दशरथ** हा गादीवर आला. अशोकानें जसें बुद्धधर्मास उचलून धरिलें तसें दशरथानें जैनधर्मास उचलून धरिलें! त्याच्या वेळीं गुजराथ व विदर्भ हेही गेले. दशरथाचा भाऊ संप्रति हाही जनांचाच पक्षपाती निघाला. यानंतर ३।४ राजे झाले पण ते दुर्बळ निघाले. शेवटचा राजा बृहद्रथ याला ठार मारून त्याचा ब्राह्मणसेनापति पुष्पमित्र हा खि. पू. १८५ मध्यें मगधसाम्राज्याच्या गादीवर बसला व त्यानें आपलें स्वतंत्र शुंग घराणें स्थापिलें. १५० वर्षांच्या हयातीनंतर मौर्यांचें साम्राज्य लयाला गेलें. अशोकानें ४० वर्षें साम्राज्य भोगलें. हा एक महाभाग्यवान् पुरुष झाला.

अशोकानंतर २०० वर्षांनीं उत्तरपथाकडे कनिष्क नांवाचा एक

बलाढ्य राजा झाला. त्यानेंही बौद्धधर्माला मोठें पाठबळ दिलें. त्यानें बुद्धाचीं मंदिरें बांधण्यास सुरवात केली. त्याचा पुत्र हुविष्क. हे राजे परदेशी होते, पण लोकांच्या मनधरणीसाठीं यांनीं आपल्या नाण्यांवर ग्रीकदेवतेप्रमाणें स्कंधाचीही मूर्ति कोरलेली आहे ! यांच्यानंतर हिंदु राजा वसुदेव ( इ. स. १८२–२२० ) यानें मथुरेस व उत्तरप्रदेशांवर आपलें राज्य स्थापलें. त्याच्या नाण्यांवर शिव व नंदी यांच्या मूर्ति आहेत. हीं नाणीं मथुरेस पुष्कळ सांपडतात. अशोक व कनिष्क यांच्या शिवाय बुद्धधर्माला उचलून धरणारा तिसरा कोणी विख्यात राजा भरतखंडांत झाला नाहीं.

मौर्यांचें साम्राज्य बुडाल्यावर हिंदुस्थानभर ख्रि. पू. २ ऱ्या शतकांत वैदिकधर्मीय राजांनीं सर्वत्र डोकें वर काढलें व ठिकठिकाणीं हिंदूंचीं मोठमोठीं राज्यें उदयास आलीं. शुंग घराण्यांत पुष्पमित्र व अग्निमित्र यांनीं मगधावर साम्राज्य चालविलें. आंध्रांनीं आपलें साम्राज्य दक्षिणेकडे वाढवून पैठणास आपली राजधानी नेली. उज्जयिनीस प्रसिद्ध विक्रमादित्य उदयास आला. वैदिक संस्कृतीचें रक्षण करण्यासाठीं वैदिक धर्माभिमानी राजे बद्धपरिकर झाले व पुन्हा एकदा वैदिकधर्माचा जयजयकार सुरू झाला. यानंतर हिंदुस्थानांत जे राजे झाले ते क्षत्रियच होते असें मात्र राहिलें नाहीं. अशोकापर्यंत राज्यसंस्था चालविण्याचें काम क्षत्रियच करीत, पुढें हा निर्बंध सुटला व चारी वर्णांपैकीं कोणत्याही वर्णाचा पराक्रमी पुरुष राज्य संपादन करून तें चालवूं लागला, जात मात्र तो कायम ठेवी. या पुढील कित्येक ब्राह्मण घराण्यांनीं राज्यें केलीं आहेत, कांहीं वैश्यानीं केलीं आहेत व कित्येक राजे शूद्रांतही झाले आहेत. बौद्धानंतर चातुर्वर्ण्याला मोठाच धक्का बसला. आत्मरक्षणासाठीं किंवा धर्मासाठीं ब्राह्मण व वैश्य यांनीं शस्त्रग्रहण केल्यास दोष नाहीं, असें मनुस्मृतींत व वासिष्ठस्मृतींत स्पष्ट लिहिलें आहे. क्षत्रियांचा तो नित्य स्वधर्मच आहे.

## ९ पुष्पमित्र व विक्रमादित्य.

मगधराज्य बौद्धमय झालें होतें तेव्हां पहिला प्रत्याघात तेथेंच फार जोराचा झाला. **पुष्पमित्र** ( ख्रि. पू. १८५–१४९ ) मगधाच्या गादीवर बसला. त्यानें बौद्ध व जैन या दोन्ही पंथांच्या मठांची व लोकांची हकालपट्टी केली, त्यांचीं उत्पन्नें जप्त केलीं, व मठ उध्वस्त केले ! बुद्धगया येथील बुद्धाची मूर्ति काढून तेथें त्यानें शिवाची मूर्ति स्थापिली व सनातन हिंदुलोकांना त्यानें सर्वत्र मोठें उत्तेजन दिलें. हा राजा वैदिकधर्माभिमानी असल्यामुळें पुन्हां वैदिकधर्मानें जोर केला. पुष्पमित्रानें ग्रीक राजा मिनॅंडर मोठी फौज घेऊन हिंदुस्थानावर आला होता त्याचा पराभव करून त्याला पिटाळून लावलें व उत्तरेकडील राजांवर आपली छाप बसवून त्यानें एक अश्वमेध यज्ञ केला. पुष्पमित्रानें मगधापासून पंजाबांतील जालंदरमठापर्यंत बौद्धांचे सर्व मठ उध्वस्त करून बौद्धभिक्षूंना हाकून दिलें, व पूर्वीं बौद्ध व जैनधर्मीयांनीं–विशेषतः बौद्धांनीं–जो हिंदूंना त्रास दिला होता त्याचा यानें पुरा वचपा काढला. पुष्पमित्रानें या प्रमाणें ३६ वर्षें राज्य केल्यावर त्याचा मुलगा **अग्निमित्र** हा गादीवर आला. या घराण्यानें १५० वर्षें राज्य केलें. अग्निमित्र हाच कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' ह्या नाटकाचा विषय आहे. पुष्पमित्रानें जो अश्वमेधयज्ञ केला त्या यज्ञाच्या प्रसंगीं व्याकरणकार पतंजलि हजर होता. त्यानें पहिल्या दोन्हीही कारकीर्दी पाहिल्या. पतंजलीच्या महाभाष्यांत व कालिसादाच्या नाटकांत या यज्ञप्रसंगाचा उल्लेख आहे. पुष्पमित्राचा हा यज्ञ अनेकदृष्टीनें महत्वाचा आहे. बौद्धांच्या ३०० वर्षांच्या चळवळीनंतर त्यांच्याच मगध देशावर राज्य करणाऱ्या वैदिकधर्मी हिंदुराजानें मोठ्या प्रमाणावर यज्ञ करण्यांत विशेष अर्थ होता. यानंतर पुढें अनेक राजांनीं यज्ञ केले आहेत. दिग्विजयी राजांनीं अश्वमेधयज्ञ करण्याची पद्धत फार पुरातन आहे. जनमेजय व त्याचे तीन भाऊ यांनीं चार अश्वमेध केल्याचें शतपथ ब्राह्मणांत लिहिलें आहे.

इ. स. पूर्वीं पहिल्या शतकांत माळव्यांत एक नवीन राजघराणें उदयास आलें. विक्रमादित्याचा बाप गंधर्वसेन मालव यानें माळव्यांत प्रथम राज्य स्थापिलें. मालव हे पंजाबांतील रावी नदीच्या काठीं राहणारे सोमवंशी क्षत्रिय होते असें हरिवंशांत ह्मटलें आहे. मालव हे भारतीययुद्धांत कौरवपक्षीय होते. पुढें शिकंदरानें पंजाबावर स्वारी केली तेव्हां यांनीं त्यालाही चांगला हात दाखविला होता. गंधर्वसेनाचा थोरला मुलगा **भर्तृहरी** यानें कांहीं वर्षें राज्य केलें, पण नाथपंथांत शिरून तो विरक्त झाला. भर्तृहरीचीं शृंगार, नीति व वैराग्य यावरील तीन शतकें प्रसिद्ध आहेत. भर्तृहरीची 'गुफा' उज्जयिनीस अजून पाहण्यांत येते. भर्तृहरीनें राज्य सोडल्यावर त्याचा भाऊ विक्रम हा गादीवर बसला. हाच तो सुप्रसिद्ध **विक्रमादित्य** होय. हा अत्यंत पराक्रमी होता. शकांची पहिली टोळी पंजाबांत शिरली व तिनें मथुरेचा पल्ला गांठला, तेव्हां विक्रमादित्यानें मुलतानजवळ कारूर( पंजाब)च्या युद्धांत तिचा पराभव केला, त्यावेळीं पंजाब ही सहजच त्याच्या ताब्यांत आला. पंजाबच्या उत्तरटोंकापासून नर्मदेपर्यंत त्यानें आपलें एकछत्री साम्राज्य पसरिलें. उज्जयिनीस त्यानें महाकालेश्वराचे प्रचंड मंदिर बांधलें. हें पुढें मुसलमानांनीं पाडलें तरी मंदिराच्या कोटाचा चोवीसखांबी दरवाजा अजून मंदिराच्या विशालत्वाची साक्ष देण्यास तेथें उभा आहे. विक्रमादित्याचा काळ ह्मणजे भारतवर्षाच्या उत्कर्षाचा काळ होय. त्याच्या राजवटींत विद्या, विक्रम व वैभव या तिहींची समृद्धि झाली होती. कालिदासादि विश्वविख्यात कवि याच्या वेळींच उदयास आले. विक्रमादित्य शूर, विद्वान्, रसिक व उदार होता. तो विद्वानांचा व सर्वप्रकारच्या गुणिजनांचा पोशिंदा होता. त्याच्या परोपकाराच्या गोष्टी सर्व देशभर प्रसिद्ध आहेत. विक्रमादित्य ह्या नांवाला त्यानें इतकें महत्व आणलें कीं ही पदवी यापुढें अनेक राजांनीं धारण केल्याचें इतिहासांत प्रसिद्ध आह. याच्या नांवाचा विक्रम संवत् उत्तरेकडे अजून चालू आहे. हा पूर्ण वैदिकधर्माभिमानी

नगर वाचनालय, सातारा.



होता. यानें बौद्धजैनांचा छल केला नाहीं, उलट त्यांतील विद्वानांसही त्यानें उत्तेजनच दिलें.

## १० समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य.

मगधप्रांतांतच हिंदूंच्या उत्कर्षाचा पुन्हां एक काळ आला. पूर्वीं मौर्यघराण्यांत अशोक राजा झाला व त्यानें बुद्धधर्माची वाढ केली त्याप्रमाणें गुप्तांच्या घराण्यांत **समुद्रगुप्त** हा हिंदुराजा अत्यंत बलाढ्य होऊन गेला. गुप्त हे वैश्य होत. गुप्तांनींही आपलें साम्राज्य उत्कृष्ट गाजविलें, गुप्तांचा संस्थापक **चंद्रगुप्त** ( इ. स. ३२०–३३५ ) यानें पाटलिपुत्र येथें राज्य स्थापन करून गंगायमुनांच्या कांठचा सारा प्रदेश जिंकून घेतला व तिरहुत, अयोध्या, बहार, इ० प्रांत आपल्या राज्यांत सामील केले. याची राणी कुमारदेवी हिच्या आग्रहास्तव यानें आपला स्वतंत्र गुप्तशक सुरु केला. याचा महाबलाढ्य पुत्र **समुद्र-गुप्त** ( ३३५–३८० ) हा लौकरच उत्तरहिंदुस्थानचा सम्राट् झाला. यानें ४५ वर्षें राज्य अगदीं दणाणून सोडलें. तो शूर लढवय्या व तसाच विद्वान्ही होता. समुद्रगुप्ताच्या पराक्रमाचें वर्णन त्याचा राजकवि हरिसेन यानें इ. स. ३६० मध्यें एका गद्यपद्यात्मक ग्रंथांत लिहून ठेवलें आहे व त्यानें लिहिलेल्या गोष्टींना शिलालेख व नाणीं यांच्यामुळें पुष्टि मिळाली आहे, त्यावरून समुद्रगुप्त हा साऱ्या हिंदुस्थानचा चक्रवर्ती राजा झाला होता असें ठरतें. एका लेखकानें त्याला हिंदुस्थानचा नेपोलियन म्हटलें आहे. त्यानें उत्तरहिंदुस्थानांतलीं सर्व राज्यें आपल्या काबूंत आणलीं. त्यानें कोसलदेशाचा राजा महेंद्र याचें राज्य घेतलें, ओरिसा आणि मध्यप्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडलें. पूर्वेकडे समतट म्ह० गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्यामधील प्रांत, कामरूप ऊर्फ आसाम, गंगेच्या उत्तरेकडील बग्रहा ( बोग्रा ) प्रांत, दिनाजपूर, राजशाही, दाक्षिण नेपाळ, कुमाऊन, कांग्रा, गढवाल, अल-मोरा–हीं राज्यें मोडून त्यानें आपल्या राज्यास जोडलीं. उत्तर व

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

पूर्व दिशा जिंकल्यावर त्यानें दक्षिणेकडे मोर्चा फिरविला. कलिंगाची राजधानी पिठापूर व जंगम यांतील महेंद्रगिरी व कोत्तूर येथील राजे, कृष्णागोदावरींच्या मधील प्रदेशाचा बल्लवराजा, कांची ऊर्फ कांजीवरम् येथील विष्णुगोप व नेल्लोरचा राजा उग्रसेन यांना त्यानें पादाक्रांत केले, त्यांचे कांहीं प्रांत आपल्या राज्यास जोडले व कांहीं राजे मांडलीक बनविले. देवराष्ट्र म्ह० हल्लींचा महाराष्ट्र व एरंडपल्ल (एरंडोल) म्ह० खानदेश हे प्रांत परत फिरतांना त्यानें जिंकून घेतले, व दक्षिणेकडील सर्व राजांवर आपलें प्रभुत्व स्थापून त्यांना आपलें सार्वभौमत्व मान्य करावयास लावलें. पश्चिमेकडील पंजाब, पूर्व रजपुताना, माळवा, भोपाळ, सतलज ह्या सर्व राजांना त्यानें जिंकले व त्याप्रमाणें चौथ्या शतकांत जवळ जवळ पाऊण हिंदुस्थान समुद्रगुप्तानें आपल्या साम्राज्यसत्तेखालीं आणलें! ह्याप्रमाणें चारी दिशांनीं दिग्विजय केल्यावर त्यानें मोठा अश्वमेधयज्ञ केला, ब्राह्मणांना मोठमोठाल्या देणग्या व जमिनी दिल्या, व बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्याचें जणुं जाहीर करून वैदिकधर्माचा प्रचंड जयजयकार केला. त्यानें बौद्धांचा छळ केला नाहीं, त्यांना सदयतेनें वागविलें पण निरुपद्रवी करून सोडलें. बौद्धच हतप्रभ झाले. आपल्या पराक्रमाची वर्णनें त्यानें अशोकानें उभारलेल्या जयस्तंभांवरच खोदून ठेवलीं. अग्निकुंडापुढें यज्ञीय अश्व उभा आहे असें चित्र खोदलेलीं सुवर्णपदकें त्यानें विद्वान् ब्राह्मणांना दिलीं. त्यांतील कांहीं पदकें हल्लीं सांपडलीं आहेत. उत्तर अयोध्याप्रांतांत एक पाषाणाची अश्वमूर्ति सांपडली असून तिच्यावर एक लेख खोदलेला आहे ती लखनौ येथील म्यूझिअममध्यें ठेवलेली आहे. ह्या राजाला संगीताचा छंद असे. तंतुवाद्य घेऊन बसलेली राजाची मूर्ति ज्यांवर खोदलेली आहे अशीं याचीं कांहीं सोन्याचीं नाणीं सांपडलीं आहेत. याला काव्याचीही आवड होती. विद्वानांच्या सभा भरवून त्यांत तत्वज्ञानचर्चा चालवावी व आपण ती ऐकावी याची याला फार आवड होती. सुदैवानें याचा मुलगा चंद्रगुप्त हाही चांगला निघाला. त्यानें गुजराथ घेऊन अनेक शतकें परकी शक लोकांच्या

ताब्यांत असलेला सौराष्ट्र ऊर्फ काठेवाड बापाच्या हयातींतच संपूर्ण सोडविला. ' आसमुद्रक्षितीश ' हें विशेषण यथार्थ लागूं पडेल असा प्रखर प्रताप या सम्राटानें गाजविला. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें हातीं आल्यामुळें समुद्रावरून इजिप्तच्या मार्गानें युरोपशीं असलेला व्यापार समुद्रगुप्ताच्या हातीं आला, व पश्चिमेकडील देशांशीं हिंदुस्थानचें दळणवळण वाढलें. ह्याप्रमाणें समुद्रगुप्तानें अर्धशतकभर आपलें साम्राज्य सर्वत्र यशस्वितेनें गाजविलें. याचा मुलगा वर सांगितलेला **दुसरा चंद्रगुप्त** (इ. स. ३७५ ते ४१४) यानेंही ३९ वर्षें मोठ्या तालेदारीनें राज्ययंत्र चालविलें. उज्जयिनी हें मध्यवर्ती शहर रुद्रसिंह क्षत्रपाच्या ताब्यांत होतें तें त्याजवर चाल करून चंद्रगुप्तानें घेतलें व सुराष्ट्र, कच्छ, कोंकण ह्या पश्चिमभागावर असलेल्या परकी क्षत्रपांची सत्ता पार मोडून टाकली. हे गुप्त राजे पाटलिपुत्रांत राहत व कधीं कधीं अयोध्येंत राहत असत. पाटलिपुत्र म्हणजेच अलीकडचे पाटणाशहर होय. चंद्रगुप्ताच्या कारकीर्दींत प्रसिद्ध चिनी प्रवासी फा-हिआन हा बुद्धधर्माचे ग्रंथ व अवांतर माहिती मिळविण्यासाठीं मगधराज्यांत सहा वर्षें (इ. ४०५ ते ४११) राहिला होता. त्यानें संस्कृतभाषेचा व बौद्धग्रंथांचा अभ्यास केला. त्यानें चंद्रगुप्ताच्या राज्याचें सुरेख वर्णन केलें आहे, त्यावरून त्याच्या राज्यांत उदार देणग्यांवर चाललेल्या मोठमोठ्या संस्था, औषधालयें, धर्मशाळा चांगल्या चालल्या असून लोक संपन्न व सुखी होते असें दिसतें. त्यानें स्पष्ट लिहिलें आहे कीं " ह्या राज्यांत प्रवासाच्या सोयी उत्तम आहेत, कायदे सौम्य आहेत, पुष्कळशा गुन्ह्यांना दंडाची शिक्षा आहे, फांशी बहुतेक होतच नाहीं. ह्या सर्व देशांत कोणी हिंसा करीत नाहीं, कोणी दारू पीत नाहीं, गुरें विकीत नाहींत, बाजारांत खाटकांचीं दुकानें किंवा दारू गाळण्याच्या भट्ट्या नाहींत, बौद्धभिक्षूंनाही राजाकडून देणग्या मिळतात, अन्नवस्त्राची भिक्षा लोक निःसंकोचपणानें घालतात." हिंदु साम्राज्याचें पूर्ण सौख्य गुप्तांच्या वेळीं हिंदुप्रजा भोगीत होती. गुप्तराजे कट्टे हिंदुधर्माभिमानी असून आपल्या

राजवटींत बौद्धांना ते समानतेनें व सदयतेनें वागवीत असत. चंद्र. गुप्तानें गादीवर आल्यावर विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती- त्याच्यानंतर त्याचा मुलगा **कुमारगुप्त** (**इ. स. ४१४ ते ४५५**) यानें ही ४० वर्षें संपूर्ण ऐश्वर्यासह राज्य केलें. त्यानेंही एक मोठा अश्वमेध यज्ञ केला. ह्या साम्राज्यांत ब्राह्मणधर्माचें वर्चस्व पूर्णपणें प्रस्थापित झालें व बौद्धधर्मास उतरती कळा लागली. बुद्धधर्माचीं कपि. लवस्तु, कुशिनगड, श्रावस्ती व बुद्धगया हीं अशोकाच्या वेळीं भरभराटीस आलेलीं शहरें ओस पडलीं. ब्राह्मणधर्माला उत्तेजन मिळालें. गुप्त राजांनीं संस्कृतविद्येला व पंडितांना चांगला आश्रय दिला. चंद्रगुप्त विक्रमादित्यानें उज्जयिनी घेतल्यापासून व त्याचेंही वास्तव्य मधून-मधून तेथें होत असल्यामुळें काव्य, व्याकरण, ज्योतिष, न्याय, वेदांत इ. शास्त्रांच्या अध्ययनाला जोर आला. मुद्राराक्षस, वायुपुराण, मनुस्मृति इ. ग्रंथ ह्या गुप्तकाळांतील होत असें कित्येक पंडितांचें मत आहे- वराहमिहिर हा प्रसिद्ध ज्योतिषी ह्या गुप्त काळांतीलच होय. अर्वाचीन शोधकांच्या संशोधनामुळें वरील ग्रंथांपैकीं कोणाचे काळ थोडे आगेमागें झाले तरी गुप्तांच्या राजवटीमुळें गीर्वाणवाङ्मयसागराला भरती आली एवढी गोष्ट सत्य आहे.

**पांचवा सम्राट् स्कंधगुप्त** (**इ. स. ४५५-४८०**) याच्या वेळीं साम्राज्याला दृष्ट लागली, कांहीं मांडलिक स्वतंत्र होऊं लागले. या सुमारास आशियांतून हूण लोकांच्या टोळधाडी हिंदुस्थानावर येऊन आदळूं लागल्या. तथापि स्कंधगुप्तानें हूणांचा चांगला समाचार घेतला. त्यानें हूणांचा पराभव करून हिंदुस्थानचें रक्षण केलें. इ. स. ४५८ मधील एका शिलालेखांत स्कंधगुप्ताच्या ह्या विजयाचा उल्लेख आहे. स्कंधगुप्ताचें साम्राज्य पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरल्याचा उल्लेख असलेला एक लेख गोरखपूर प्रांतांतील एका स्तंभावर कोरलेला आहे. तथापि हूण लोक इ. स. ४७० मध्यें हिंदुस्थानावर पुन्हा चाल करून आले. त्यांच्याशीं लढतां लढतां स्कंधगुप्त जेरीस आला. त्याचा भाऊ

पुरगुप्त ( ४८०–४८५ ) याचेवेळीं साम्राज्य संपुष्टांत आलें. त्याचा मुलगा नरसिंहगुप्त ( ४८५–५३५ ) ह्यानें नालंद येथें एक बौद्धपंथी देवालय बांधलें एवढ्यावरून तो बुद्धधर्मी झाला असें कोणी म्हणतात पण याला पुरावा नाहीं. त्याचा मुलगा दुसरा गुप्त हा गुप्तसाम्राज्याचा शेवटचा सम्राट् होय. याच्यानंतर केवळ मगधप्रांतावर गुप्तांच्या ११ पुरुषांनीं राज्य केलें. त्यापैकीं फक्त एक आदित्यसेन ( इ. स. ६७१ ) नामक राजा चांगला प्रबळ झाला. त्यानेंही एक अश्वमेध यज्ञ केला. आठव्या शतकाच्या शेवटीं हें गुप्तांचें राजघराणें पार बुडालें व मगधा-वर बंगालच्या पालराजांचा अंमल सुरू झाला. ह्याप्रमाणें गुप्तघराण्यानें ५०० वर्षें राज्य केलें. पाहिल्या पांचसहा राजांनीं तर हिंदुस्थानावर साम्राज्य गाजविलें.

## ११ हूणांच्या टोळधाडी.

मध्यें ६० वर्षें मध्यआशियाखंडांतून हिंदुस्थानावर कोसळलेल्या हूणांच्या स्वाऱ्यांनीं लोकांना बेजार करून सोडलें. गुप्तांचें राज्य या स्वाऱ्यांनीं खिळखिळें केलें व एका गुप्तराजानेंच शेवटीं यांचा सप्पा उडविला. इ. स. ४५५।४६५।४७० असे तीन हल्ले या टोळ्यांनीं हिंदुस्थानावर केले. पहिला हल्ला स्कंदगुप्तानें मोठ्या पराक्रमानें परतवला; दुसरीनें पंजाबकाश्मीरांत आपला पाय रोंविला, तिसऱ्या हल्लयांशीं झगडतांना गुप्त सम्राटाचा पराभव झाला व इ. स. ४८० मध्यें हूणांचा पुढारी **तोरमाण** यानें माळव्यावर आपलें राज्य स्थापिलें, ' महाराजाधिराज ' ही हिंदु पदवी धारण केली व कित्येक आस-पासच्या राजांपासून त्यानें खंडणी घेतली. तो इ. स. ५१० त मेला, त्याचा मुलगा **मिहिरगुल** यानें आपली राजधानी पंजाबांत सिआलकोट येथें नेली. हूणांचें राज्य यावेळीं इराणापासून खोतानपर्यंत पसरलें होतें. त्याला ४० देशचे राजे १८ वर्षें खंडणी देत होते, व हा ती जुलमानें वसूल करीत असे. शेवटीं हिंदु लोक त्रस्त झाले व लहान

मोठे राजे मगधाच्या नरसिंहगुप्ताच्या पुढारीपणाखालीं एकत्र होऊन हूणांशीं लढण्याची त्यांनीं प्रचंड तयारी केली आणि ५२८ मध्यें त्याचा पराभव करून नरसिंहगुप्तानें त्याला कैद केलें व हिंदुलोकांना परकीयांच्या त्रासांतून सोडविलें. याकामीं त्याला मंदोसरचा यशोधर्मदेव ( इ. स. ४९६–५३८ ) याचें अत्यंत साह्य झालें, किंबहुना याच्याच प्रखर पराक्रमामुळें हिंदु पूर्ण यशस्वी झाले. नरसिंहगुप्त ऊर्फ बालादित्य यानें मात्र यावेळीं भलता उदारपणा दाखवून मिहिरगुल याला सोडून दिले ! तो पळून काश्मीरांत गेला व तेथल्या राजानें त्याला एका प्रांताचा अधिपति नेमलें. पण मिहिर गुल दुष्ट व क्रूर. त्यानें काश्मीरचें सिंहासन बळकावलें व गंधारच्या राजाला ठार मारून तेथील लोकांची अमानुषपणें कत्तल केली ! या दुष्टानें शिवाची उपासना घेतली होती व तो आपणांस शिव म्हणवी ! हिंदु लोकांच्या भोळेपणावर परिणाम व्हावा हा त्याचा हेतु उघडच होता. त्यानें पंजाबगांधारकडील अहिंसावादी बौद्धांचे मठ लुटले, स्तूप उध्वस्त केले व अलोट संपत्ति लुटून नेली. हा ५४० मध्यें मेला व या हूणलोकांचा तुर्कांनींच परभारें निकाल लावला. हिंदुस्थानांत बौद्धधर्म संपुष्टांत आला, जैनधर्मीयांपासून लोकांना फारसा त्रास झाला नाहीं. जैन दक्षिणेंत अधिक होते, पण त्यांचा समाचार कांहीं राजांनीं व विशेषतः शैववैष्णव साधूंनीं अनत्याचारीपणानें घेतला व हिंदुस्थानभर लोकांना बरेंच शांतिसुख भोगतां आलें.

## १२ सम्राट् हर्षवर्धन ( ६०६–६४७ )

पुढील पांचशें वर्षांच्या काळांत समुद्रगुप्ताच्या तोलाचा एकच हिंदु सम्राट् उदयास आला व तो कनोजचा हर्षवर्धन (६०६–६४७) राजा होय. याचा जन्म इ. स. ५९० मध्यें झाला. ठाणेश्वर ह्म० कुरुक्षेत्राभोंवतालचा प्रदेश अथवा अलीकडच्या भाषेंत सांगायचें ह्मणजे दिल्लीचा प्रांत. तेथें **प्रभाकरवर्धन** नांवाचा राजा उदयास आला. त्यानें हूणांवर शेवटचा हल्ला करून त्यांना नामशेष केलें व सिंध व राजपुताना येथील

राजे जिंकून आपलें राज्य वाढविलें. त्यानें माळवा व गुजराथ येथील राजांनाही जिंकून नवें साम्राज्य उभें केलें. सूड उगवण्यासाठीं एकवार हूणांनीं ठाणेश्वरावर हल्ला केला पण त्यांना अगदीं अखेरचा तडाखा प्रभाकरवर्धनाचा पुत्र **राज्यवर्धन** यानें दिला. मात्र बापलेक एकामागून एक एक वर्षाच्या आंतच आटोपले. प्रभाकरवर्धनाची कन्या राज्यश्री कनोजचा राजा ग्रहवर्मा यास दिली होती. माळव्याच्या राजानें ग्रहवर्म्यास ठार मारले, राज्यश्रीला कैद केलें व राज्यवर्धनाचाही कपटानें वध केला. अशा आपत्तीच्या वेळीं **हर्षवर्धनाच्या** गळयांत ठाणेश्वरचीं राज्यसूत्रें पडलीं. त्यानें बहिणीस सोडविलें व सहाच वर्षांच्या अल्पावधींत पूर्वपश्चिमेकडे स्वाऱ्या करून व ५००० गजदळ ५०००० पायदळ व लक्ष घोडदळ इतकी फौज घेऊन आपलें साम्राज्य हिंदुस्थानभर पसरिलें. हा हर्षवर्धन मोठा शूर पण शांतताप्रिय सम्राट् झाला. यानें सर्व लोकांस ४० वर्षें राज्य करून फार सुख दिलें. दिग्विजय करून आल्यावर ६१२ पासून यानें आपल्या नांवाचा शक सुरू केला. यानंतर त्यानें दोनच स्वाऱ्या केल्या, व कनोजहून कनोजचा व ठाणेश्वरचा राज्यकारभार यानें पाहिला. परमतसहिष्णुता हा हर्षाच्या अंगीं लोकोत्तर गुण होता. बौद्धांना तो इतक्या उदारपणानें व आदरानें वागवी कीं त्यामुळेंच तो शेवटीं बौद्ध झाला किंवा बुद्धधर्माकडे त्याचा ओढा होता असें कांहीं विद्वानांनीं लिहिलें आहे; पण तें खरें नाहीं. तो हिंदुधर्मीच होता, आणि शैव होता. एका ताम्रपटांत हर्षाला 'परममाहेश्वर' असें म्हटलें आहे. तो दिग्विजयाला निघण्यापूर्वीं शंकराची पूजा करून त्याचा प्रसाद घेऊन बाहेर पडत असे. 'विरच्यय्य परमभक्त्या भगवतो नीललोहितार्चां' असें बाणभट्टानें म्हटलें आहे. तो सर्व धर्मांच्या, मतांच्या लोकांना समतेनें वागवीत असे व राज्य भोगीत असतांना असंगत्वानें राहत असे. दर पांच वर्षांनीं भारतीय पंडितांची धर्मपरिषद भरवून तो आपल्या खजिन्यांतील सर्व द्रव्य त्यांना वाटून टाकी असें ह्युएत्संगनें म्हटलें आहे. त्याच्या-वेळीं कनोज शहर पांच मैल लांब व एक मैल रुंद असून सर्व प्रकारच्या

राजैश्वर्यानें परिपूर्ण होतें. तेथें विशाळ मंदिरें व राजवाडे होते रम्य उपवनें, पाण्याच्या टाक्या व देशोदेशींच्या पदार्थांची संग्रहालयें होतीं.

श्रीहर्षानंतर इतका उत्तम हिंदुसम्राट् हिंदुस्थानला फार वर्षांत मिळाला नाहीं. याच्यानंतर एक शतकांतच यशोवर्मा राजा कनोजच्या गादीवर आला, त्यानेंही वैदिकधर्माचा उत्कर्ष केला. भवभूति त्याच्या कारकीर्दींत झाला. हर्षानंतर पांचशें वर्षांत परकीराजांनीं हिंदुस्थानाकडे वळून पाहिलें नाहीं व ह्या पांचशें वर्षांत कोणी विशेष प्रतापी असा चक्रवर्ती राजाही निपजला नाहीं. प्रत्येक प्रांतांत एखादें घराणें उदयास यावें, दुसऱ्या घराण्याचा उदयकाळ आला कीं त्यांतल्या प्रतापी पुरुषानें पहिलें घराणें नामशेष करून आपण राज्य बळकवावें, असा प्रकार सर्वत्र चालू झाला. हर्षापासून पृथ्वीराजापर्यंत चार पांचशें वर्षें अशीं गेलीं. **काश्मीरचा** इतिहास कल्हण पंडितानें राजतरंगिणींत दिला आहे. तेथील कर्कोटकवंशानें ६०० पासून ८५० पर्यंत राज्य केलें, पुढें उत्पल वगैरे घराणीं झालीं. काश्मीर देश विद्वत्तेविषयीं प्रसिद्ध आहे. तेथील मम्मट, कैय्यट, कल्हण, बिल्हण हे संस्कृतवाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. बंगाल्यांत पाल आणि सेन हीं दोन राजघराणीं एकमेकांच्या स्पर्धेनें राज्य करीत. पालराजे बौद्धांना उचलून धरीत व सेन राजे (हे स्वतः ब्राम्हण होते) वैदिकधर्माला उज्ज्वलता आणीत व संस्कृत विद्येला प्रोत्साहन देत. जयदेव कवि ( गीतगोविंदाचा कर्ता) हा सेन राजांच्या अमदानींतच झाला. माळव्यांत परमारांचें राज्य होतें. रजपुतान्यांतील राजे लढवय्ये व हिंदुसंस्कृतीचे पूर्ण अभिमानी असेच होते. महाराष्ट्रांत चालुक्य, राष्ट्रकूट व देवगिरीचे यादव आणि अगदीं दाक्षिणेकडे पांड्य, चेर ऊर्फ केरल, चोल व पल्लव अशीं नानाप्रकारचीं राजघराणीं उदयास येती झालीं. हीं सर्व वैदिक संस्कृतीचीं अभिमानी होतीं. ह्यांत पल्लव राजे हे हिंदुधर्माभिमानी व शैवसंप्रदायी होते. त्यांनीं कांचीस मोठमोठालीं शिवमंदिरें बांधलीं. दाक्षिणेंतील शैवांचें मुख्य पीठ कांची हेंच आहे. दाक्षिण हिंदुस्थानांत बौद्धधर्म फारसा पसरला नव्हताच, थोडा फार असल्यास ६ व्या शतकापूर्वींच नष्ट झाला. जैनधर्म मात्र

बराच प्रबळ होता पण शैव व वैष्णव पंथांचे जे महान् साधु कवि त्या प्रांतीं झाले त्यांनीं हीं दोन्ही पाखांड मतें मोडून टाकलीं. दक्षिणेंत अद्याप जैनमतानुयायी आहेत, पण सर्व दक्षिणदेश आठव्या शतकांत प्राधान्येंकरून सनातन हिंदुधर्मीयांचा झाला. शंकराचार्यांचा अवतार होण्यापूर्वींच बौद्ध व जैन मतांचें प्राबल्य शैव व वैष्णव साधूंनीं नष्ट केलें होतें. तो सर्व भाग पुढील प्रकरणांत सविस्तर येणार आहे.

## १२ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति.

हर्षवर्धनाच्या काळीं इ० सातव्या शतकांत हिंदुसमाजाची स्थिति कोणत्या प्रकारची होती हें अजमावण्यास दोन उत्कृष्ट साधनें उपलब्ध झालीं आहेत. एक बाणाचें हर्षचरित व दुसरें चिनी प्रवासी ह्युएनत्संग याचें प्रवासवृत्त. बाणकवि हा हर्षाचा आश्रित व मित्र होता. कादंबरी, हर्षचरित व पार्वतीपरिणय हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. कादंबरी हा संस्कृतभाषेंतला एक अनुपम व अतीव सुंदर गद्यग्रंथ आहे. बाणकवीचा मित्र राजा हर्ष हाही विद्वान् होता. त्यानें स्वतः लिहिलेली रत्नावलि, नागानंद व प्रियदर्शिका हीं संस्कृत नाटकेंही प्रसिद्ध आहेत. बाणानें लिहिलेल्या हर्षचरिताला ऐतिहासिक महत्व आहे हें ह्युएनत्संगाचें प्रवास-वृत्त प्रसिद्ध झालें तेव्हां विद्वानांच्या लक्ष्यांत आलें. ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी ६३० ते ६४५ पर्यंत हिंदुस्थानभर हिंडला, तो काशीस राहून संस्कृत व पाली ह्या दोन्ही भाषा शिकला, त्यानें सर्व हिंदुस्थानची राजकीय व धार्मिक स्थिति स्वतः पाहिली, बुद्धधर्माचें संस्कृत व पाली भाषांतले सर्व उपलब्ध ग्रंथ जमवून ते त्यानें आपल्या चीन देशांत नेले व त्याच्या या महान् परिश्रमामुळें बुद्धधर्माचा चीन व जपान देशांत झपाट्यानें प्रसार झाला. असा हा एक अलौकिक पुरुष होऊन गेला. त्यानें हिंदुस्थानांत पाहिलेल्या सर्व गोष्टी व्यवस्थितपणें चिनी भाषेंत लिहून ठेवल्या आहेत. त्याच्या ग्रंथाचें वॉटर्स साहेबांनीं इंग्रजींत

भाषांतर केलें आहे. ह्या ग्रंथामुळें सातव्या शतकाचा हिंदुस्थानचा इतिहास समजण्यास एक मोठें साधन झालें आहे. हें भाषांतर प्रसिद्ध झाल्यावर बाणाचें हर्षचरित ही कादंबरी नसून हर्षाच्या घराण्याचा व पराक्रमाचा हा इतिहास आहे असें विद्वानांच्या लक्ष्यांत आलें. व्यक्तींचीं नांवें, स्थानें व प्रसंग ह्या सर्व बाबतींत हर्षचरित व सदरचें प्रवासवृत्त हे दोन्ही ग्रंथ एक-मेकांशीं पूर्णपणें मिळते असून त्याला उपलब्ध झालेले शिलालेख, ताम्रपत्रें व नाणीं यांनीं दुजोरा मिळाला आहे. ह्युएनत्संग आपल्या ग्रंथांत म्हणतो:– "ह्या देशांत आनुवंशिक संस्काराचे चार वर्ण आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. त्यांत ब्राह्मण हे अतिशुद्ध व सर्वांना पूज्य आहेत. क्षत्रियांचा वर्ग दुसरा असून त्यांत राजेरजवाडे यांचा अंतर्भाव होतो. क्षत्रियांचीं राज्यें येथें पिढ्यान्पिढ्या चाललीं असून भूतदया आणि परोपकार हीं त्यांच्या राज्यव्यवस्थेचीं मुख्य तत्वें आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय यांची वागणूक निष्कलंक व अगदीं साधी असून त्यांत छानछूक बिलकूल नसते. तिसरा वर्ग वैश्यांचा असून ते नानाविध वस्तूंचा देशोदेशीं व्यापार करून द्रव्यसंचय करितात व शूद्र हे शेतीभातीचा व्यवसाय करितात. चार वर्ण मिळून पुष्कळ जाती झाल्या आहेत व त्या सर्व समाधानवृत्तीनें व परस्परांशीं सख्यत्वानें वागतात. या लोकांत विवाह जातीजातींतच होतो. बापाकडून किंवा आईकडून कांहीं पिढ्या-पर्यंत सपिंड संबंध असलेल्या स्त्रीपुरुषांचा विवाहसंबंध होत नाहीं आणि स्त्रिया कधींच पुनर्विवाह करीत नाहींत. वरील चार वर्गांशिवाय आणिक एक वर्ग आहे. खाटीक, मासे धरणारे, कत्तल करणारे, मांग वगैरे लोक इ० विशिष्ट जातींच्या वसतिस्थानावर कांहीं विशिष्ट निशाणी असते व त्यांना गांवाबाहेर राहावें लागतें. गांवाच्या रस्त्यांतून समोर न जातां त्या जातीचे लोक आपल्या डावीकडून हळूच व जपून जपून चालतात." लोकांच्या पोषाखाबद्दल ह्युएनत्संग म्हणतो: "लोकांचे आंतले व बाहेरचे कोणतेच कपडे शिवून तयार केलेले नसतात, व त्यांचा रंग

पांढरा स्वच्छ असतो. पुरुष कंबरेभोंवतीं एक लांब वस्त्र गुंडाळतात व तसेंच दुसरें वस्त्र खाकेपर्यंत नेऊन उजवा खांदा उघडा ठेवतात. स्त्रियाही लांब वस्त्र नेसतात व तें दोन्ही खांद्यांवरून घेऊन खालीं मोकळे सोडतात. ” बाणाच्या हर्षचरितावरून रेशीम, लोकर, कापूस यांची तलम वस्त्रें स्त्रिया पसंत करीत व अगदीं साधी बिनकांठाचीं शुभ्र वस्त्रें विधवा स्त्रिया मात्र वापरीत असें दिसतें. जातिबंधनें हिंदुलोकच पाळीत असें नाहीं, तर बौद्ध व जैनधर्मी लोक सुद्धां पाळीत. बौद्ध लोक बुद्धाच्या व बोधिसत्वांच्या मूर्तींची पूजा करीत व हिंदुलोक मुख्यत्वेंकरून शिव, विष्णु, सूर्य, चंडिका, गणपति व कार्तिक स्वामी यांची आपापल्या घरीं अगर या देवतांच्या मंदिरांतून पूजा करीत. ह्युएनत्संग म्हणतो कीं “ मुलस्थानपूर ( मुलतान ) येथें सूर्याचें एक प्रचंड मंदिर असून त्यांत सुवर्णाची सूर्यमूर्ति आहे व त्या मूर्तीवर रत्नजडित अलंकार आहेत. तेथें निरंतर नंदादीप जळत असतात. धूप, दीप, नैवेद्य, पुष्पांचे हार लोक देवाला दिवसभर अर्पण करीत असतात. मंदिराच्या सभोंवर पाण्याच्या सुंदर टाक्या, तलाव, व रमणीय बागा असून त्या कोणाच्याही नेत्रांला संतोष देतात. काशी येथेंही ७० हात उंचीची पुरुषाकार शिवाची मूर्ति असून ती अत्यंत भव्य आहे व तिच्या दर्शनास रोज दहा हजार माणसें जात असतात. ” त्यावेळीं बहुतेक ब्राह्मणांच्या घरीं अग्निहोत्र असे; संन्यासीही कोठें कोठें दिसत; गाई बैल यांच्याविषयीं लोकांत पूज्यभाव असून गोवध सगळ्या हिंदुस्थानांत कोठेंही होत नव्हता, इतकेंच काय पण गाढव, हत्ती, घोडे, माकडें, डुकरें यांचेंही मांस खाण्याची बंदी असून जे लोक खात ते अंत्यजवर्गांत जात असेंही सदर प्रवाशानें लिहिलें आहे. राजे लोकांना तेव्हां विद्वानांच्या सभा भरवून वादविवाद ऐकण्याची फार आवड असे. शैव, भागवत, पांचरात्र ( वैष्णव ), सांख्य, वेदांती, नैय्यायिक, धर्मशास्त्री, पौराणिक, वैय्याकरणी, केशलुंचक, बौद्ध, जैन इ० पंडितांची मालिका हर्षचरितांत दिली असून

चार्वाकांशिवाय बाकीचे सर्व आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म मानीत असें बाणानें म्हटलें आहे. 'नृत्यगीतादि विदग्ध कलांमध्यें' हर्षाची बहीण राजश्री निपुण होती असें बाणानें म्हटलें आहे त्यावरून राजकन्यांना किंवा अतिश्रीमंतांच्या मुलींना ललितकलांचें शिक्षण मिळत असे असें दिसतें. वरील सर्व प्रकारच्या विद्वानांविषयीं हुएनत्संगाचा ग्रह फार चांगला झाला होता. तो म्हणतो: 'हे लोक उतावळे व चंचलवृत्तीचे असले तरी ते कोणाचें अन्यायानें घेत नाहींत व न्यायानें जें द्यायचें तें अधिक देतात. पापाचें प्रायश्चित्त अन्यजन्मीं भोगावें लागणार अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळें ते पापाला भितात व या जन्मीं नीतीनें वागण्याचा प्रयत्न करितात!' हर्षानें अशोक व समुद्रगुप्त याप्रमाणें आपलें साम्राज्य हिंदुस्थानावर मिरविलें व लोकांना अभूतपूर्व असें शांतिसुख भोगूं दिलें व स्वत:ही भोगलें.

हुएनत्संगच्यावेळीं बहार प्रांतांत नालंदा येथील विद्यापीठ फार भरभराटींत होतें. या विद्यापीठांत तो १९ महिना राहिला होता. त्यावेळीं दहा हजारांपर्यंत विद्यार्थी तेथें ज्ञान संपादन करीत होते. इ. ४५०–९५० पांचशें वर्षेपर्यंत हें विद्यापीठ उत्तम स्थितींत होतें. त्याच्या खर्चासाठीं शेंदीडशें गांव वेगवेगळ्या राजांनीं इनाम दिले होते. तेथील संघाराम विस्तृत व विशाळ होते. तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला येथील विद्यापीठं, व त्यांना मिळत असलेला राजाश्रय व अहमहमिकेनें तेथें राहून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचें औत्सुक्य या गोष्टी भारतीयांच्या विद्याप्रीतिनिर्दशक आहेत. विक्रमादित्य, भोजराजा व काश्मीरतेलंगणांतील राजे यांचें विद्येला व विद्वानांना मोठें उत्तेजन असे.

हर्षाच्या वेळीं कित्येक राज्यें ब्राह्मणांनीं मिळविलीं आणि चालविलीं होतीं. उज्जयिनी, झजोटी, व महेश्वरपूर येथें ब्राह्मणांचीं राज्यें होतीं. संपूर्ण माळवा इ. स. ६४० पर्यंत ब्राह्मणांच्या अंमलाखालीं होता. समतट उर्फ पूर्वबंगाल व कामरूप उर्फ आसाम ह्या देशावर ब्राह्मणी

राज्यें असून तेथें विद्येला चांगलें उत्तेजन होतें. समतट ह्म० पूर्वबंगाल येथें ब्राह्मणी वंश राज्य करीत होता. इ. स. ६५० च्या सुमारास चच नामक ब्राह्मणानें सिंधप्रांतावर आपलें राज्य स्थापन करून तें काश्मीरपासून कच्छपर्यंत वाढविलें होतें हा राजा मोठा शूर व धोरणी होता व यानें बौद्धधर्माचा पाडाव करण्याचा कसून प्रयत्न केला. यानें ४० वर्षें राज्य केलें. याचा पुत्र दाहर हा तसाच पराक्रमी निघाला, तथापि शेवटीं बौद्धांच्या साह्यानें मीरकासीम यानें अरबांच्या टोळयांनिशी सिंधप्रांतावर स्वारी करून सिंध देश घेतला. तेथें यवनांचा अंमल सुरू झाला. अरबांनीं पुढें पंजाब व काबूल घेऊन हिंदूंचा व बौद्धांचाही अनन्वित छळ केला तीनशें वर्षें युद्धें चालून शेवटीं ११ च्या शतकांत यवनांनीं लोकांस बाटवून तिकडे राजसत्ता स्थापिली

हर्षाच्या वेळीं बौद्धधर्मीयांना उतरती कळा लागली असून हिंदुधर्मीय लोक व राजे यांचें प्राबल्य बरेंच झालें होतें. काबूल, कंदाहार, तक्षशिला, टेक्क, पंजाब, सिंध हे प्रांत प्रायः बौद्धांचे असून नेपाळांत राजा बुद्धधर्मी व लोक उभयधर्मी असा प्रकार असून बौद्धांचे संघाराम व हिंदूंचीं मंदिरें एकमेकांस अगदीं लागून होतीं. उत्तर हिंदुस्थानांत पाशुपतमताचे शैव मोठ्या प्रमाणांत असून बौद्धांशीं सामन्याला जागोजाग हिंदुधर्मीयांच्या वतीनें त्यांनाच तोंड द्यावें लागे. काश्मीरांत बौद्ध व शैव साधारण समसमान होते, तथापि राजा हिंदुधर्मीय असल्यामुळें शैवसंप्रदाय अधिक जोरांत होता. हर्षाची राजधानी कनोज येथें सूर्य व महेश्वर यांचीं सुंदर मंदिरें असून गयेच्या पूर्वेस गंगातीरीं नारायणाचें सुंदर मंदिर होतें. मगधराजधानी गया येथें बुद्धांची वस्ती अद्याप बरीच होती, तरी नालंदामठ, चंपा, मोंघीर या ठिकाणचे संघाराम ओसाड व मोडकळीस आलेले होते. कपिलवस्तु हें बुद्धांचें माहेरघर, पण तेथील एक हजार संघाराम सारे उध्वस्त झाले होते. काशीक्षेत्रीं सर्वच हिंदु शैव होते. अयोध्येस बौद्ध अधिक तर प्रयागास काशीप्रमाणें सर्व हिंदुधर्मीय होते.

गयेस एक हजार ब्राह्मणकुटुंबें जूटीनें राहत, व त्यांवर कोणत्याही राजाची सत्ता चालत नसून त्यांना सर्वत्र लोक फार मान देत ! ओरिसा प्रांत बौद्धांचा असून कामरूप (आसाम), समतट (पूर्वबंगाल) येथें सारी वस्ती हिंदूंची होती. बंगाल्यांत कांहीं जैन दिगंबरही होते. सुराष्ट्र ( काठेवाड ) व गुर्जर देश येथील लोक उभयधर्मी होते, पण लोकांचें लक्ष धर्मापेक्षां व्यापाराकडे अधिक असे ! तेथें राजे बुद्धधर्मी पण प्रजा अधिक हिंदुधर्मीच होती. माळव्यांत उज्जयिनी वगैरे तीनही ठिकाणीं राजे ब्राह्मण असून सर्व लोक हिंदुधर्मीय होते. महाराष्ट्रांत बौद्ध व हिंदु समसमान होते. कलिंग, आंध्र, चोल, व कर्नाटक या प्रांतांत बौद्ध व दिगंबर होतेच, पण त्यापेक्षां हिंदु पुष्कळ अधिक होते. हर्षाच्या वेळीं याप्रमाणें सनातनी हिंदु, सुधारकपंथी बौद्ध व जैन या तीनही धर्मांच्या प्रसाराचा सामान्य नकाशा होता. बोद्ध व जैन यांच्यांतही हिंदुधर्मीयांच्या मूर्तिपूजा व जातिभेद या गोष्टी चांगल्याप्रकारें शिरल्यामुळें व्यवहारांत हिंदूंत व त्यांच्यांत फारसा फरक पडत नसे, व त्यांच्यांतलें वैमनस्यही कालगतीनें मावळत चालले होते. बौद्ध व जैन पंथांचा प्रसार होण्यास त्यांच्या उपदेशकांनीं देशी भाषांचा स्वीकार केला हें मुख्य कारण होय. (हिंदुधर्म प्रायः संस्कृतभाषेंतच होता. ) हें वर्म तामीळ शैव व वैष्णव भक्तांनीं प्रथम ओळखून आपलीं काव्यें लोकभाषेंत करण्यास आरंभ केला, यामुळें तेंही त्यांचें वैशिष्ट्य गेलें उरला काय तो तात्विक मतभेद. मीमांसक व शंकराचार्य यांनीं या पाखांडमतांचा धुव्वा उडवला व तामील राजे व संतकवि व आचार्य यांच्या प्रयत्नांनीं पुन्हा दक्षिणभर वैदिकधर्माचा पूर्ण जयजयकार झाला. द्रविड ऊर्फ तामीळ लोकांचा इतिहास, त्यांचें वैभवशाली साम्राज्य, त्यांची अफाट शिल्पकामें, त्यांनीं बौद्ध व जैन पंडितांशीं केलेले झगडे, त्यांच्यांत झालेले आळवार म्ह० वैष्णव, व शैव संतकवि, त्यांच्यांत झालेले नाथमुनि, शंकराचार्य, रामानुजाचार्य इ० आचार्य, हा सर्व इतिहास अत्यंत महत्वाचा असून त्यासाठीं एक स्वतंत्र प्रकरणच देणें उचित आहे

## १३ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें.

**काश्मीर**:—काश्मीर देश हिंदूंनीं मोठ्या शर्तीनें वांचविला. आजही काश्मीरांत मुसलमानांची वस्ती २४ लक्ष व हिंदूंचीं वस्ती ८ लक्ष आहे, तथापि तेथें राज्य हिंदूंचें आहे. काश्मीर हें हिंदु संस्कृतीचें आगर आहे. तेथें गोनर्द, नाग इ० राजघराणीं झालीं. अशोकांनीं आपलें बौद्ध भिक्षु काश्मीरांत पाठवून कांहीं लोक बौद्ध धर्मांत ओढले होते, पण तेथें ब्राह्मणीधर्माचें वर्चस्व लौकरच कायमचें प्रस्थापित झालें. गोनर्द या शैव राजघराण्यानें दीर्घकाल राज्य केल्यावर त्या वंशाचा शेवटचा राजा बालादित्य याचा जांवई **दुर्लभवर्धन** हा शक ६०० च्या सुमारास राज्यावर आला व त्याच्या घराण्यानें २५० वर्षें राज्य केलें. हें नागवंशीय घराणेंहि शैव होतें व या घराण्याच्या वेळीं शिवोपासना काश्मीरांत बळावली व शैवपंथाचें आजतागाईत तेथें वर्चस्व आहे. ह्या घराण्यांत १७ पुरुष ओळीनें राज्य करिते झाले. दुर्लभवर्धनाच्या वेळीं ह्युएनत्संग हा काश्मीरांत आला होता व त्यानें काश्मीरांत ५।७ शतकें शिवोपासना प्रबळ असल्याचें लिहिलें आहे. यावरून आज दोन हजार वर्षें काश्मीर हा शैव हिंदूंचा देश आहे असें सिद्ध होतें. दुर्लभवर्धनाचा मुलगा **प्रतापादित्य** हा न्यायी व प्रजाहिततत्पर राजा होता. त्यानें राज्यांत पुष्कळ शिवमंदिरें बांधलीं. त्याच्या वेळचें शिल्पकाम आजही प्रक्षणीय आहे. त्याचा पुत्र **ललितादित्य** हा काश्मीरदेशच्या इतिहासांत अत्यंत पराक्रमी निघाला. हर्षानंतर हिंदुस्थानचें साम्राज्य यानें मिळविलें व तें दीर्घ काल भोगून तो इ० स० ७३६ मध्यें वारला. बलुचिस्तान, तुर्कस्थान, तुराण, कांबोज, व तिबेट, हे देश त्यानें जिंकले. त्यानें अफाट संपत्ति मिळविली व ती पूल, मंदिरें, अन्नछत्रें, धर्मशाळा, तलाव वगैरे बांधण्यांत खर्च करून प्रजेचें कल्याण केलें. दरद व तिबेट हे देश जिंकून त्यानें तीन वेळां तुर्कांचा पराजय केल्यामुळें त्याचें नांव सर्वतोमुखी दीर्घकाळ

गाजत राहिलें. त्यानें मोठमोठीं प्रचंड मंदिरें बांधलीं. **भूतेश** नामक एका शिवमंदिरासाठीं त्यानें ११ कोट रुपये खर्च केले. अद्यापही शिल्पकलेचा अत्युत्कृष्ट नमुना ह्मणून प्रसिद्ध असलेलें मार्तंडमंदिर ( सूर्याचें मंदिर ), वितस्तानदीवरील प्रचंड पूल, ५४ हात उंचीच्या अखंड पाषाणस्तंभावर उभारलेला गरुड, परिह्रासपूर नांवाचें नगर इ० शिल्पकामें ललितादित्याचें ऐश्वर्य गात उभीं आहेत ! यानें मंदिरांस आठ आठ फूट उंचीचे दगड लावले आहेत ! याचा नातु **जयापीड** हा शूर, विद्वान् व गुणी होता. त्याच्या दरबारीं अमरकोशाचा प्रसिद्ध टीकाकार क्षीरस्वामी, साहित्यग्रंथाचा कर्ता उद्भट, व्याकरण व साहित्य यावरील टीकाकार वामन, कुट्टिणीमताचा कर्ता दामोदरगुप्त इ० विद्वद्रत्नें होतीं. हा राजा शेवटीं शेवटीं बिघडला व जुलमी झाला. हा इ. स. ७८२ मध्यें वारला. याच्यानंतर याच्या घराण्यांत सामान्य राजे झाले. हें कर्कोटक घराणें एकंदरींत मोठें बलाढ्य झालें. त्यांच्या अमदानींत शिवोपासना बळावली व संस्कृत विद्येला व शिल्पादिकलांना प्रोत्साहन मिळून काश्मीरी पंडितांची हिंदुस्थानभर ख्याति झाली. तेथें इ. स. ८६० च्या सुमारास **अवन्तिवर्मा** यानें उत्पल घराणें स्थापिलें. हा राजा पराक्रमी व धर्मशील होता. त्यानें कालव्यांचीं मोठमोठीं कामें करून अनेक गांवें नवीन वसविलीं व हजारों एकर जमीन लागवडीस आणली. भगवद्गीतेचें पारायण करीत असतां त्यानें आपला देह ठेवला ! याच्या पराक्रमी मुलानें चांगला दिग्विजय करून काश्मीरच्या कीर्तींत भर घातली, पण याचे वंशज दुर्बळ निघाल्यामुळें लोकांनीं **यशस्कर** नांवाच्या ब्राह्मणास काश्मीरच्या राज्यावर बसविलें. यशस्कराची कारकीर्द प्रजेला सुखदायी झाली. याच्या राज्यांत अधिकारी मंडळ चांगलें सुशिक्षितांचें होतें. हा इ. स. ९४८ त मरण पावला. यापुढें लोहर घराण्यानें एक शतक राज्य केलें. त्यांत पहिला **संग्रामराज** हा कर्तबगार निघाल्यामुळें त्याच्या कारकीर्दींत प्रजेची भरभराट झाली. त्याचा

नातु अनंतदेव व राणी सूर्यमती ही फार धार्मिक होती. त्यांनीं अनेक शिवालयें बांधून प्रजेला सुख दिलें. त्याचा मुलगा कलश वाईट निघाला पण त्याच्या पश्चात् प्रजारक्षक व विद्वानांचा साहाय्यक **हर्ष** चांगला निघाला. सातवाहनांत **जयसिंह** नांवाचा सद्गुणी व सच्छील राजा झाला. त्याच्याच कारकीर्दीत कल्हण हा प्रसिद्ध पंडित होऊन गेला. काश्मीरचा बाराशें वर्षांचा इतिहास 'राजतरंगिणी' नामक ग्रंथांत त्यानें फार उत्कृष्टरीतीनें लिहिलेला प्रसिद्ध आहे. आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या क्षेमेंद्रादि नृपावलीकारांच्या ग्रंथाधारें व दानलेख, प्रशस्तिपत्रें इ० च्या आधारें कल्हणानें राजतरंगिणी उर्फ काश्मीरचा इतिहास लिहिला आहे. यानें इ. स. ११४८ पर्यंतचा काश्मीरचा इतिहास आठ हजार श्लोकांत दिला असून त्याच्याच अनुकरणानें जोनराज, श्रीधर व प्रज्ञाभट यांनीं पुढील इतिहास इ० स. १५८८ पर्यंत म्ह० अकबरानें काश्मीर आपल्या ताब्यांत आणीपर्यंतचा लिहिलेला आहे. जयसिंहानंतर काश्मीरचा इतिहास मोठासा उद्बोधक नाहीं. इ. स. १३३९ पासून काश्मीरवर मुसलमानी सत्ता सुरू झाली. इ. स. १३९४ मध्यें सुलतान शिकंदर गादीवर आला. यानें हिंदूंच्या रमणीय मंदिरांचा फार विध्वंस केला व हजारों लोक बाटविले. यानंतरचा झैन राजा धोरणी होता. त्यानें नष्ट मंदिरें दुरुस्त करून हिंदूचा विश्वास संपादिला. पन्नास वर्षें पुन्हां हिंदूचें राज्य झालें. पण मुसलमानांनीं १४८६ मध्यें काश्मीरदेश घेतला. जहांगीरला काश्मीरदेश फार प्रिय होता. त्यानें काश्मीरांत ७०० सुंदर बागा बनविल्या. औरंगझेबानंतर काश्मीर पुन्हा स्वतंत्र झाला. कांहीं काळ काश्मीर शिखांच्या ताब्यांत गेला. इ. स. १८४५ पासून काश्मीर पुन्हा हिंदु राजांच्या अमलाखालीं आहे.

काश्मीर देश अत्यंत रमणीय आहे. त्याला पृथ्वीवरील 'नंदनवन' ह्मणतात. हिमाच्छादित पर्वतांच्या रांगा, विशाळ नद्या, भव्य सरोवरें, अनंत वनराजि, सुंदर वनोपवनें, खोल दऱ्या व विपुल पाणी यामुळें हा

देश हिंदभूमीचा मुकुट आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. काश्मीरांत मोठमोठीं विद्यापीठें होती, संस्कृत विद्येला व पंडितांना उत्तेजन मिळे. काश्मीरी पंडितांची हिंदुस्थानभर ख्याति होती, ह्मणूनच शंकराचार्यांना काश्मीरी पंडितांवर विजय मिळवावेसें वाटून तेथें जाऊन मठस्थापना करावी लागली.

**कनोजः**—साहाशें वर्षें पाटलीपुत्राला जो मान होता तो पुढील ६०८ वर्षें ( इ. स. ६००–१२०० ) कनोजला होता, तेथून पुढें तो दिल्लीकडे गेला. हर्षाच्या वेळेस कनोज ही हिंदुस्थानची राजधानी होती. हर्षानंतर तेथें वर्म घराणें आलें. इ० स० ७०० च्या सुमारास तेथें **यशोवर्मा** राज्य करीत असे. याच्या आश्रयास कुमारीलभट्टाचा शिष्य भवभूति व वाक्पाति हे प्रसिद्ध कवि होते. यशोवर्म्यांनें गौडराज्य जिंकलें. त्याच्यावेळीं कनोज हें वैदिकधर्माचें केंद्र बनलें व हें त्याचें महत्व पुढें ५०० वर्षें राहिलें. प्रयागच्या पश्चिमेकडील उत्तर हिंदुस्थानां-तील बहुतेक भाग कनोजच्या राज्यांत मोडत असे. ह्या वर्मघराण्याचा बहुतेक काळ युद्धांत गेला पण त्याच्या कारकीर्दींत ( इ. स. ५००–८०० ) बौद्धधर्माचें उच्चाटन होऊन वैदिकधर्माची भरभराट झाली. यानंतर भोज ( ८००–१००० ) व गहरवार ( १०००–११९४ ) ह्या दोन घराण्यांनीं कनोजवर ४०० वष राज्य केल्यावर कनोज मुसल-मानाच्या ताब्यांत ( ११९४ ) गेलें. भोजापैकीं **मिहिरभोज** ( ८४०–८९० ) हा अत्यंत पराक्रमी निपजला. यानें आपला राज्यविस्तार फार केला व हा सम्राट् बनला पंजाब, राजपुताना, संयुक्त प्रांत, ग्वाल्हेर हे प्रदेश याच्या साक्षात् अंमलाखालीं असत. यानें सौराष्ट्रपासून बंगाल-पर्यंत सर्व राजे आपले मांडलीक बनविले. 'आदिवराह' हें बिरुद यानें धारण केलें. याचीं नाणीं अजून सांपडतात. याचा मुलगा महेंद्रपाल यानें पंजाब गमावला पण मगध आपल्या राज्यास जोडला. त्याचा गुरु प्रसिद्ध कवि राजशेखर हा होय. गहरवार राजे आपणास राठोड

म्हणवीत. कनोज हातचें गेल्यावर या घराण्यांतील पुरुषांनीं रजपुतान्यांत जाऊन जोधपूर इ० राज्यें स्वतंत्रपणें स्थापिलीं. या ४०० वर्षांत कनोजी म्ह० कान्यकुब्ज ब्राह्मण चांगले उदयास आले.

**महोवा**:—बुंदेलखंडच्या चद्देल घराण्याची राजधानी महोवा ही होती. हें घराणें मुसलमानांशीं अत्यंत शौर्यानें लढलेलें आहे. या घराण्यांत **कीर्तिवर्मा** हा राजा विद्वान् होता. त्यानें प्रबोधचंद्रोदय नाटक ( १०६५ ) लिहिलें आहे. त्याच्या नांवाचा ' कीरतसागर ' तलाव महोवाजवळ आहे. अकबराचा ( इ स. १५६४ ) पराभव करणारी शौर्यखाणी **राणी दुर्गावती** ही याच घराण्यांतील होय. या घराण्याचें छोटेसें राज्य अजून बिहारप्रांतांत आहे.

**धार**:—ह्या घराण्याचा मूळ पुरुष कृष्णराज परमार हा रजपूत होता. यानें इ. स ९१० मध्यें आपलें स्वतंत्र राज्य धारानगरी उर्फ धार येथें स्थापिलें उज्जनी, धार, मांडवगड अशा या घराण्याच्या राजधान्या ४०० वर्षांत बदलत गेल्या. हें घराणें पहिल्यापासून शिवोपासक असून त्यानें जैनांसही पुष्कळ आश्रय दिला आहे ह्या घराण्यांत मुंजराज ( ९७३–९९५ ), मुंजाचा धाकटा भाऊ सिंधुराज ( ९९५–१०१० ) व भोजराज ( १०१०–१०५५ ) हे राजे शूर, विद्वान्, दानशौंड व गुणज्ञ असे झाले व त्यामुळें सर्व भरतखंडांत विद्येचें माहेरघर म्हणून धारानगरीची ख्याति झाली. भोजराजाची कीर्ति तर आज हजार वर्षेपर्यंत सर्व हिंदुस्थानभर पसरली आहे. यानें चंबळपासून गोदावरीपर्यंत आपलें राज्य वाढविलें. याच्या दरबारीं १४०० पंडित होते असें म्हणतात.*

* ' गते मुंजे यशःपुंजे निरालंबा सरस्वती ' म्ह० मुंज गेल्यावर सरस्वती निराधार झाली असें वाटत होतें, पण शस्त्रशास्त्रविद् भोजाच्या कारकीर्दीत ती भीति निराधार ठरली. भोज हा विद्वानांचा पुरस्कर्ता तर होताच पण स्वतः विद्वान् व ग्रंथकर्ताही होता. याचा साहित्यशास्त्रावरील ' सरस्वतिकण्ठाभरण ' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तसेंच याचे योगज्योतिषादिकांवरही ग्रंथ आहेत. हा शूर व उदार होता. अनेक युद्धांत हा विजयी झाला आहे. यानें आसेतुहिमाचल लोकोपयोगी कृत्यें केलीं आहेत.

पुढें शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून याच घराण्याचे वंशज पवार म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांच्यांतही अनेक कर्तबगारीचे व विद्वान् राजे झाले असून धार व देवास येथें त्यांच्या दोन शाखा अद्याप राज्य करीत आहेत.

## १४ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार.

हिंदुस्थान ही सुवर्णभूमि असल्यामुळें हिच्यावर झडप घालण्यासाठीं दोन हजार वर्षें बाहेरचीं गिधाडें टपून बसलेलीं होतीं. अलेक्झँडर ( शिकंदर ) बादशहाच्या वेळेपासून ग्रीक, सिथिअन्, शक, हूण व पुढें अरब, तुर्क, मोंगल व शेवटीं पोर्तुगीज़्, डच, फ्रेंच व इंग्रज ह्यांनीं एकामागून एक येथें येऊन येथील लोकांस अत्यंत त्रास दिला आहे ! हिंदु लोकांनीं त्यांचा प्रतीकारही पुष्कळवेळां मोठ्या शौर्यानें करून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य राखण्याची आपल्याकडून पराकाष्ठा केली. प्रथम चंद्रगुप्तानें व नंतर पुष्पमित्रानें ग्रीक लोकांस पंजाबाच्या बाहेर घालविलें; तक्षशिला व मथुरा शंभर वर्षें बळकावून बसणाऱ्या शकांस विक्रमादित्य व पुलुमायी या राजांनीं पिटून काढलें; नंतर कनिष्क, हुविष्क वगैरे पंजाबवर शंभर वर्षें राज्य करणाऱ्या सिथियन लोकांस समुद्रगुप्त यानें पंजाबच्या बाहेर हाकून दिलें; यानंतर हूणांस प्रथम यशोवर्मानें व शेवटीं हर्षवर्धनानें कायमचे हाकून लावले. त्यानंतर सुमारें पांचशें वर्षें हिंदुस्थानावर कोणतीच टोळधाड आली नाहीं. हिंदुस्थानांतील लहानमोठीं अनेक राज्यें आपल्या अमलाखालीं आणून परकीयांशीं यशस्वितेनें झगडणारे चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, यशोवर्मा व हर्षवर्धन यांनीं हिंदुधर्मीयाचें नांव राखिलें, व हिंदुधर्मीयांचा जिवटपणा जगाच्या निदर्शनास आणून दिला. नंतर मुसलमानांच्या टोळधाडी हिंदुस्थानावर कोसळूं लागल्या. महंमद गिझनी हा तुर्क यानें १००० ते १०२६ पर्यंत हिंदुस्थानावर १७ स्वाऱ्या केल्या, व त्यानें गुजराथेवर स्वारी करून सोमनाथाचें देऊळ लुटलें, तथापि तुर्कांना फक्त पंजाब जिंकतां आला.

महंमदनें हिंदुस्थानची उच्च संस्कृति पाहिली व त्याचे डोळे दिपून गेले. त्यानें अनेक शहरें लुटून अपरंपार संपत्ति लुटून नेली. गिझनवी घराण्यानें पंजाब व लाहोर येथें दोनशें वर्षें राज्य केलें. त्यानंतर महंमदघोरीनें ११९२ त दिल्ली व अजमेरचा प्रख्यात राजा पृथ्वीराज चव्हाण यास जिंकून दिल्लीस आपलें राज्य स्थापलें. तें कुतुब्बुद्दीन गुलामानें १२०६ त आपणच बळकावलें. यानंतर गुलाम, खिलजी, तघलख या घराण्यांनीं दिल्लीचें राज्य तीनशें वर्षें केलें. शेवटीं मोंगलांनीं मात्र साम्राज्यपणाच्या ऐश्वर्यानें तें २०० वर्षेंपर्यंत भोगलें ( १५२६ ते १७०७ ). ह्या मोंगल बादशहांत बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगझेब हे सहा बादशहा मोठे पराक्रमी, शाहणे व भाग्यवान् झाले. हिंदुस्थानभर मुसलमानी सत्ता स्थापन झाली व मुसलमानी धर्माचा आडदांडपणानें प्रसार झाला. मुसलमानांनाही हिंदुलोक पुरून उरले. जागोजाग त्यांची लहानमोठीं राज्यें होतींच पण मुसलमानांशीं टक्कर देण्यास उत्तर हिंदुस्थानांत रजपूत व शेवटीं शीख आणि दक्षिणेंत विजयानगरचे सम्राट् व मराठे हे निघाले व त्यांनीं हिंदुसंस्कृति बिकट परिस्थितींतही जतन केली रजपुतान्यांतलें मुख्य राजघराणें मेवाड उर्फ उदेपूरचें. या धराण्यानेंच मुसलमानांच्या सत्तेस आद्यंत मोठ्या मर्दुमकीनें विरोध केला. या घराण्यांत बाप्पारावळ, समरसिंह, हमीर, रायमल, संग्रामसिंह उर्फ राणा संग, उदयसिंह, प्रतापसिंह, अमरसिंह व राजसिंह इ० सिंहासारखे भीमपराक्रमी पुरुष झाले व त्यांनीं आरंभापासून अखेरपर्यंत दिल्लीच्या पातशाहीचीं हाडें खिळखिळीं केलीं. त्यांनीं अनेकवार दिल्लीच्या फौजांचा धुव्वा उडविला. यांची राजधानी प्रथम चितोड येथें होती. नंतर ती उदेपूर झाली. अल्लाउद्दीनखिलजीनें घेतलेलें चितोड हमीरनें त्याच्या फौजेचा पाडाव करून परत घेतलें, त्याच्या मुलास कैद करून आणलें व सर्व रजपुतांची एकी करून मुसलमानांचा पराभव केला. रायमलनें दिल्ली व माळवा येथील सुलतानांचा पराभव

करून गुजराथच्या सुलतानास कैद करून आणले. संग्रामसिंह ऊर्फ राणा संग यानें १८ वेळ यवनांचा पराभव करून सार्वभौमाप्रमाणें अनेक वर्षे राज्य भोगलें. चितोडचा जोहार प्रसिद्धच आहे. प्रतापसिंहाच्या गर्जनेनें दिल्लीचें राज्य ढिलें केलें. ह्या प्रतापसिंहाला झालेल्या त्रासाचा वचपा त्याचा शूर पुत्र राजसिंह ह्यानें काढला. राजसिंहानें सारे रजपूत एक केले, रूपनगरची राजकन्या औरंगजेबाच्या तडाख्यांतून सोडवून तिला वरिलें व औरंगझेब प्रचंड सेनेनिशी मेवाडचें राज्य बुडवायला आला असतांना तीन चार घनघोर लढायांत त्याचा पुरा मोड केला. राणा राजसिंहाशीं औरंगझेब युद्धांत गुंतला त्याचा फायदा मराठ्यांस मिळून शिवाजीस दक्षिणेंत मराठी राज्य स्थापणें कमी अवघड गेलें ही गोष्ट विसरतां कामा नये. ह्याप्रमाणें उत्तरेकडे रजपुतांनीं मुसलमानी सत्तेशीं दांडगा विरोध केला. दक्षिणेंतही विजयानगरच्या साम्राज्यानें यवनीसत्तेचा ओघ थोपवून तिला बरीच खच्ची करण्याचें काम दोनशें वर्षेंपर्यंत उत्कृष्ट रीतीनें केलें. दक्षिणेंत ( गुलबुर्गा ) येथें बाहमनीशाहीचें राज्य इ. स. १३४७ मध्यें स्थापन झालें. याचा संस्थापक बाहामनी यानें दिल्लीची सत्ता झुगारून देऊन हिंदु संस्थानिकांच्या सहानुभूतीनेंच हें राज्य स्थापिलें. दीडशें वर्षांनंतर हें राज्य मोडून याचीं पांच शकलें झालीं. त्याचे आधीं यवनांचा दक्षिणेंत प्रलय पाहून माधवाचार्यांच्या साह्यानें हरिहरबुक्क आदिकरून पांच भावांनीं इ. स. १३३६ मध्यें तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर विजयानगर नांवाचें तटबंदी शहर बांधून पंधरा वर्षांच्या आंत पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंतचा तुगंभद्रेच्या दक्षिणचा सर्व मुलूख आपल्या राज्यास जोडून मोठें साम्राज्य उभें केलें. हें १३३६–१५६५ पर्यंत सुमारें २३० वर्षें मोठ्या थाटांत चाललें. बाहमनीशाहीची व या राज्याची नेहमीं युद्धें होत. बाहमनीशाही अंस्तगत होऊन तिचीं जीं पांच शकलें झालीं त्यांची परस्परांत झुंज लावून तीं निर्जीव करण्याचें व मुसलमानी सत्ता

थोपवून तिला तुंगभद्रेच्या खालीं जाऊं न देण्याचें कार्य विजयानगरच्या साम्राज्यानें केलें. ह्यांत कृष्णदेवराय व रामराय हे दोन मोठे पराक्रमी व कर्तबगारीचे राजे झाले असून यांच्या राजवटींत हिंदु संस्कृतीला मोठें तेज चढलें, राज्यांत पुष्कळ सुधारणा होऊन राज्याचें ऐश्वर्य वाढलें, प्रजा सुखी झाली. मुसलमानांच्या कोणत्याही तीन शाहींशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य ह्या विजयनगरच्या एकट्या साम्राज्यांत होतें. विजयनगरच्या ऐश्वर्याचें एकच गमक पाहिलें म्हणजे पुरें विजयानगरची राजधानी चौदा मैल पसरली असून तींत ३० लाख लोकवस्ती होती ! नुसती प्रमुख देवळें चार हजारांवर होतीं ! शहरांत २० हजार पालख्या वाहत होत्या. मंदिराच्या सभामंडपांतून हिरे माणक व मोतीं यांचे घोस लाविलेले लोंबत होते. व्यापारी पेठा धनधान्यसमृद्धीनें भरगच्च भरल्या होत्या. दारिद्र्याचें नांव नव्हतें. असंख्य विद्यालयें, राममंदिरें, सभामंदिरें समृद्धीनें नुस्ती डोलत होती ! अनेक प्रवाशी व इतिहासकार यांनीं प्रत्यक्ष पाहून विजयानगरच्या ऐश्वर्याचीं जीं वर्णनें लिहून ठेवलीं आहेत तीं आजच्या सर्वतोपरी विपन्नस्थितींत काल्पित कथांसारखीं वाटतात !

शेवटीं पांचही शाखा एक होऊन त्यांनीं तालिकोटच्या लढाईंत ( इ. स. १५६५ ) हें साम्राज्य बुडविलें. ह्यानंतर ६० वर्षांनीं महाराष्ट्रांत शिवाजीमहारांचा जन्म होऊन मराठी राज्य उभें राहिलें. तो इतिहास सर्वांस माहीतच आहे.

## १६ बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण !

बौद्धधर्म हिंदुस्थानांत उत्पन्न झाला पण येथें तो पांचशें वर्षांनंतर अनेक कारणांनीं दुर्बळ झाला, तथापि हिंदुस्थानाबाहेर तो ख्रिस्ती शकाच्या प्रारंभापासून फारच फैलावला व आज पृथ्वीवरील लोकसंख्येपैकीं एक पंचमांश लोक बुद्धधर्मीय आहेत ! सीलोन, आसाम,

ब्रह्मदेश, सयाम, सुमात्रा, तिबेट, चीन, जपान, कोरिया हे देश बुद्ध-धमाच्या छापेंत गेले. अशोक व कनिष्क ह्या दोन बलाढ्य राजांनीं ह्या बाहेरच्या देशांतून उपदेशक पाठविण्याचा प्रघात पाडल्यापासून जिकडे तिकडे ह्या लोकांनीं बुद्धधर्माचा प्रसार केला, पण पुढें मुसलमानांनीं दंडेली करून किंवा ख्रिस्त्यांनीं कपटनीति आदरून जसा आपापल्या धर्माचा प्रसार केला तसा प्रकार बौद्धांनीं केल्याचें दिसत नाहीं. **आसामांत** १३ व्या शतकांत बौद्धधर्म पसरला व तेथें तो ४०० वर्षें फार जोरांत होता पण इ० स० १६११ मध्यें चूचेंग नांवाच्या राजानें हिंदुधर्माचा स्वीकार केला व मागून प्रजेनेंही त्याचेंच अनुकरण केलें. आज आसाम पूर्णपणें हिंदुधर्मीयांचा आहे. सिंहलद्वीपांत अशोकाच्या वेळेपासून बौद्धधर्म चालू झाला. **ब्रह्मदेशांत** प्रथम सर्पपूजा होती पण पांचव्या शतकांत बौद्ध लोकांनीं तेथें आपले पाय पसरण्यास सुरवात केली व इ. स. १०१० मध्यें ब्रह्मी राजानें बुद्धधर्माचा स्वीकार केल्यापासून ब्रह्मी लोकही हळू हळू बुद्ध-धर्मीय होत गेले. ब्रह्मी लोकांच्या घरीं अजून त्यांच्या कुलदेवतांच्या मूर्ति असतात व हिंदुप्रमाणेंच ते त्यांची पूजा करितात ! त्यांच्या मठमंदिरांतून अध्ययनअध्यापन चांगलें चालतें. ह्या लोकांना शिक्षणाची गोडी आहे, व ब्रह्मी लोक बंगालच्या संगतीनें बरेच पुढारलेले आहेत. ब्रह्मदेशांत दागवा नांवाच्या इमारती म्ह० समाधिमंदिरें आहेत. रंगून येथील दागबा अतिशय सुंदर आहे. **सुमात्रा, यवद्वीप ह्म० जावा, बलि व तिकडचीं बेटें** सातव्या शतकापासून बौद्धधर्माकडे झुकलीं. त्याचेपूर्वीं हिंदुस्थानांतील शैवपंथाचे कित्येक लोक तिकडे गेले होते व यवद्वीपांत बुद्धपंथ व शैवपंथ हे दोन्ही पंथ सुरू झाले पण मौज ही कीं हे दोन्ही पंथ गुण्यागोविंदानें नांदूं लागले, तिकडे हिंदूंचीं कांहीं जुनीं देवालयें आहेत व रामायणभारतादि ग्रंथ तिकडील भाषेंत सांपडतात. उशना येथें एक देवालय आहे त्याच्या खालच्या

भागांत शिवाची व वरच्या भागांत एक बुद्धमहंताची मूर्ति आहे ! ही मूर्ति कृतनगर राजानें बांधली असून त्याला मरणोत्तर 'शिवबुद्ध' असें नांव मिळालें ! तिकडील कांहीं काव्यांत शिव व बुद्ध एकच आहेत असें वर्णन आहे. बलिबेटांत थोडेसें चातुर्वर्ण्य आहे व ते लोक वेदाच्या खालोखाल ब्रह्मांडपुराणाला फार मानतात. कांहीं गांवांची (उ० इंद्रमय) व संस्थानांचीं (उ० सुरकर्ता व जुग्जकर्ता म्ह० युद्धकर्ता) नांवें हिंदु आहेत. जावाबेटांत हजारबाराशें वर्षें बुद्ध व हिंदु संस्कृतिच प्रबळ होती. तेथें शालिवाहनशक चालतो. कांहीं लोक मुसलमान झाले आहेत तरी त्यांच्या देवता हिंदु आहेत. बरेच हिंदु व कांहीं ब्राह्मण जावाबेटांत ५ व्या शतकांत गेले व त्यांनीं संस्कृतभाषा व कांहीं काव्येंही तेथें नेलीं. एका जावानिक काव्यांत अमात्य, धर्माध्यक्ष, पति, पुरोहित इ० ४३ संस्कृत शब्द आहेत. त्या भागाचा इतिहास मनोरंजक व बोधप्रद आहे. तिकडे हिंदु, बौद्ध व इस्लाम ह्या तिन्ही संस्कृति एकवटल्या आहेत. **चीन** देशाची लोकसंख्या अफाट. तिकडे बुद्धधर्म सातआठशें वर्षें राजशासनाच्या कलानें वागत वागत हळुहळू पसरला. कनफ्युशिअसचा पंथ हा तेथें राजधर्म असल्यामुळें बुद्धभिक्षूंचें प्राबल्य जेव्हां फार झालें तेव्हां त्यांचा छळ होऊं लागला इकडे बुद्ध झाला त्याच सुमारास चीनदेशांत कन्फ्यूशिअस् नांवाच्या ऋषितुल्य आचरणाचा एक थोर पुरुष झाला होता. याचा काळ खि. पू. ५५० ते ४७८ हा होय. ह्याच्याच पंथाचें चीन देशांत प्राबल्य टिकलें आहे, बुद्धधर्म याच्या खालोखाल आहे. समाजाची व राष्ट्राची घटना नियमानुसार शिस्तीनें झाली पाहिजे यासाठीं या शुद्ध आचरणाच्या परोपकारी पुरुषानें फार प्रयत्न केले. त्याच्या अभिमानानें चिनी राष्ट्र भरलें असल्यामुळें बौद्धांचा प्रतीकार करण्यास राजा व लोकही तयार झाले. नवव्या शतकांत वुत्संग या चिनी बादशहानें बुद्धांचे ४६०० मठ व ४० हजार इमारती उध्वस्त केल्या

व अडीच लाख भिक्षुभिक्षुणींना पुन्हा गृहस्थाश्रम घ्यावयास लावलें ! दहाव्या शतकांत हजारों बौद्धमंदिरांचा विध्वंस करण्यांत आला. चिनी कायद्यानें भिक्षूंची संख्या कमी केली, पण गृहस्थांत बौद्ध बरेच आहेत. **जपान**मध्यें बौद्धधर्म चीनच्या मागून पुष्कळ वर्षांनीं म्ह० ६ व्या शतकांत शिरला. ७ व्या शतकांत तेथील राजानें तो धर्म स्वीकारल्यानंतर जपानमध्यें त्याचा एकसारखा प्रसारच होत चालला. त्याला तेथें ख्रिस्तीधर्म हा एक नवीन प्रतिस्पर्धी भेटला आहे, तथापि जपानी लोकांचें लक्ष राजकीय विचारांनीं भरलें असल्यामुळें धर्माविषयीं ते लोक प्रायः उदासीन होत चालले आहेत. **कोरिया** देशांतही बुद्धधर्म पुष्कळसा पसरला, पण १४ व्या शतकापासून तेथें राजघराण्यानें कन्फ्यूशिअसचा पंथ स्वीकारल्यापासून तेथें बौद्धांला उतरती कळा लागली. याप्रमाणें बुद्धधर्म हिंदुस्थानच्या बाहेर गेला व पुष्कळ देश त्यानें आपल्या काबूंत आणले. बुद्धधर्म हें वैदिक धर्माचेंच एक बंडखोर लेंकरूं असल्यामुळें त्याला त्यानें घराबाहेर घालविलें तरी त्यानें आपला संसार परदेशांत चांगला थाटला याचें त्याला एक प्रकारें समाधानच वाटत असतें !

# ७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्य.

## १ तामीळांची श्रेष्ठ कामगिरी.

गौतमबुद्धाच्या जन्मापासून 'ऐतिहासिक काळास' सुरवात होते असें मानण्यांत येतें, म्हणून मागील प्रकरणांत तेथपासून आरंभ करून आपण भारतीय इतिहासाचें सुमारें दीड हजार वर्षांच्या काळाचें स्थूल पर्यालोचन केलें. या काळांत राजकीय व धार्मिक क्रान्त्या झाल्या, बौद्ध व जैन पंथ उत्पन्न झाले, बळावले व वैदिक धर्मीयांच्या प्रयत्नां-मुळें मोडकळीला आले. अनेक राज्यें आलीं आणि गेलीं. चंद्रगुप्त, अशोक, पुष्पमित्र, विक्रमादित्य, समुद्रगुप्त, हर्षवर्धन, ललितादित्य, भोज इत्यादि महाप्रतापी सम्राट् हिंदुस्थानाच्या इतिहासांत कीर्तिशेष झाले. पण हें सारें प्रायः उत्तरेकडे झालें. दक्षिणेकडे काय चळवळी झाल्या त्या आपणांस अद्याप पहावयाच्या आहेत. ह्या काळांत कलिंग व आंध्र हे पूर्वकिनाऱ्याकडे प्रबळ होते. त्यांच्यापैकीं आंध्र पाय पसरीत पश्चिमे-कडे वळले व शालिवाहन या नांवानें त्यांनीं महाराष्ट्रावर तीनशें वर्षे राज्य केलें. महाराष्ट्राच्या इतिहासाचें सिंहावलोकन आपण पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत करणार आहोंत, तेव्हां आपणांस तेथें राष्ट्रकूट, शालिवाहन, चालुक्य व जाधव या महाराष्ट्रीय राजांची ओळख होईल. तूर्त आपणांस ह्या प्रकरणांत द्रविड देशाकडे पहावयाचें आहे. द्रविड प्रांतांत चोल, पांड्य, चेर, पल्लव इत्यादि नामांकित राजघराणीं झालीं. त्या सर्वांत किंबहुना हिंदुस्थानच्या इतिहासांत चोल उर्फ तामीळ राजांची व तामीळ लोकांची कर्तबगारी कांहीं अलौकिक आहे. तामीळ लोकांसारखें साम्राज्य कोणी गाजविलें नाहीं व त्यांच्याइतकी वैदिक

धर्माची सेवा दुसऱ्या कोणीही केली नाहीं, हें या प्रकरणांत आपणांस पहावयास मिळेल. द्रविड हे आर्य आहेत कां अनार्य आहेत हाच वाद कित्येक घालीत बसतात, पण आर्यसंस्कृतीचें संरक्षण करण्यांत द्रविडांनीं इतर सर्व प्रांतांपुढें पाऊल टाकलें आहे व वैदिक धर्मरक्षकांत तेच अग्रेसर आहेत हें प्रांजळपणें कबूल करणें भाग आहे. तामीळांच्या साम्राज्यांत करिकेल, राजराज, गंगईकोंड ऊर्फ राजेंद्र, जयमकोंड, कुलोत्तुंग, इत्यादि मोठमोठे सम्राट् झाले व लखदिव, मालदिव हीं बेटें घेऊन कृष्णेच्या खालच्या सर्व हिंदुस्थानावर त्यांनीं राज्य केलें, इतकेंच नव्हे तर पूर्वकिनाऱ्यानें कलिंग व आंध्र हे देश घेऊन बंगाल्यांत व ब्रह्मदेशांत आपले पाय पसरले व पुढें जावासुमात्रादि बेटांत आपल्या वसाहती करून तेथें रामायणमहाभारतादि आपले ग्रंथ नेले व रामकृष्णांचीं मंदिरें उभारिलीं! दक्षिणेंत कावेरीतुंगभद्रानदींचा फायदा घेऊन मोठमोठे कालवे व धरणें बांधलीं, स्वतंत्र आरमार ठेवून परदेशांशीं मोठा व्यापार केला व साऱ्या जगांत नाहींत अशीं कांची, मदिरा, तंजावर, शोलापुरम्, श्रीरंगम्, इत्यादि ठिकाणीं भव्य मंदिरें बांधून आपल्या शिल्पकलेचीं जिवंत स्मारकें करून ठेविलीं! देशी वाङ्मय सर्वांत प्राचीन तामीळांचेंच आहे. बौद्ध व जैन पंथांशीं झगडणारे व वैदिकधर्मोद्धार करणारे संत व आचार्य तामीळांतच झाले. आमच्या महाराष्ट्रांत बाराव्या तेराव्या शतकांत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव यांनीं भागवतधर्माची ध्वजा लावली पण त्यांच्या पूर्वीं ५।७ शतकें तरीं त्यांच्याच तोलाच्या तामीळ भगवद्भक्तांनीं धर्मसंरक्षणाचें महत्कार्य तामीळदेशांत केलें आहे! द्रविड देशांतून धर्मकार्याचें हें लोण महाराष्ट्रांत आलें व महाराष्ट्रांतून पुढें गुजराथ, राजपुताना, संयुक्तप्रांत, पंजाब, बंगाल, इकडे जाऊन पंधराव्या सोळाव्या शतकांत वैष्णवधर्मानें सारा हिंदुस्थान आपल्या कबजांत घेतला, पण तो मनोरंजक व बोधप्रद इतिहास दुसऱ्या खंडांत येणार आहे. तूर्त येथें एवढेंच सांगणें पुरें कीं तामीळ संतकवींनीं धर्मजागृतीचें कार्य सर्वांच्या आधीं केलें आहे, त्यांच्यांत

(मराठी वाचनालय, सातारा). सातारा.



ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकापासून ५।७ शें वर्षांत अनेक भक्त व संतकवि झाले. त्यांत बारा अळवार म्हणजे वैष्णव व ६३ शैव प्रसिद्ध आहेत. त्यांची संक्षिप्त माहिती देऊन त्यांच्या कवितेची थोडी ओळख क्रमानें पुढें होणार आहे. नम्माळवार, ज्ञानसंबंदर, अप्पर, माणिक्क वासहर, नंद इत्यादि मोठमोठे संतकवि तामीळांत झाले. त्यांची काव्यें अत्यंत बहारीचीं असून तीं आज दीड हजार वर्षें तिकडे हजारों लोकांच्या तोंडीं आहेत. त्यांनीं वैदिकधर्माचें रक्षण करून आबाल-वृद्धांस भक्तिमार्गास लावलें. हें करितांना त्यांना त्यावेळीं रूढ झालेल्या बौद्धजैनादि पाखांडमतवाद्यांशीं झगडावेंही लागलें आहे. ज्ञानसंबंदर यानें मदुरेच्या पांड्य राजास व अप्पर यानें पल्लवांच्या केदार राजास जैनपंथां-तून परत वैदिकधर्मांत आणले ! ह्या संतांनीं तामीळ भाषेंतच काव्यें रचून लोकांस भक्तिमार्गास लावलें, तर ज्ञानाच्या बळावर वैदिकधर्माचा कैवार घेणारे आचार्यही तामीळांतच झाले आहेत. कुमारीलभट्ट व श्रीशंकराचार्य, तसेच द्वैतमतप्रवर्तक नाथमुनि, यामुनाचार्य व रामानुजाचार्य हे तामीळ-देशांतूनच प्रगट झाले व त्यांनीं हिंदुस्थानभर वैदिक धर्माचा प्रसार केला. मध्वाचार्य मात्र तेलंगणांतून आले. संतांनीं प्राकृत भाषांत काव्यें लिहिलीं व आचार्यांनीं संस्कृत भाषेंत ग्रंथरचना केली, दोघांनीं मिळून वैदिक धर्माचेंच प्रचंड कार्य केलें. याप्रमाणें तामीळांचे सम्राट्, तामीळ संत व तामीळ आचार्य यांनीं हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांनीं त्यांचें निरंतर ऋणी राहिलें पाहिजे अशी आद्वितीय कामगिरी केली आहे. हा सर्व उद्बोधक भाग प्रस्तुत प्रकरणांत यथाक्रम सांगावयाचा आहे.

## २ करिकेलचोल.

चेर, पांड्य, पल्लव, कदंब, गंग व बाण ह्या दक्षिणेकडील सर्व प्राचीन राज्यांपेक्षां चोलांचें साम्राज्य अधिक प्रभावशाली झालें. अशोकाच्याही फार पूर्वींपासून चोल, पांड्य व चेर यांचीं राज्यें होतीं; चोल पूर्वकिनाऱ्यावर, पाण्ड्य दक्षिणेस व चेर पश्चिमेस. महाभारत

व हरिवंश यांतून यांचे उल्लेख आहेत. अशोकाच्या वेळीं सीलोन चोलांच्या राज्यांत मोडत असे. सिंहली लोकांना चोलांशीं अनेक शतकें झगडून स्वातंत्र्य मिळवावें लागलें. कपोतासाठीं स्वतःचें मांस देणारा परोपकारी शिबी राजा हा चोलांच्या राजघराण्यांत झाला. अति प्राचीनकाळापासून तों विजयानगरच्या साम्राज्यांत सामील होई-पर्यंतच्या काळांतला चोलांचा इतिहास उपलब्ध आहे. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं **करिकेल** चोल ( इ. स. १५०–२०० ) हा प्रख्यात राजा होऊन गेला. चोलांचा ऐतिहासिक काळांतला हा पहिला सम्राट् होय. अवंती, मगध व वज्र ( बुंदेलखंड ) येथील राजे याचे दोस्त होते. यानें आपला व्याघ्रध्वज हिमालयावर नेऊन रोवला होता. यानें पूर्वींची उरैयूर ( त्रिशिरापली किंवा त्रिचनापल्ली ) ही राजधानी सोडून कावेरीपट्टण ही आपली राजधानी केली, व तिच्या स्थापनेसाठीं यानें सीलोनमधून १२ हजार मजूर आणले होते. कावेरीपट्टण येथें देशावरी व दर्यावरी व्यापार जोरांत चालत होता. हा राजा अत्यंत संपत्तिमान् असून न्यायनीतीनें राज्य करण्यांत कुशल होता. कांची नगरी यानें सोन्याची केली, व कावेरी नदीला बंधारे घालून यानें मोठमोठे कालवे बांधले. याचें वर्णन करणाऱ्या कवीस यानें एक लक्ष सुवर्णमुद्रा दिल्या. याच्या पदरीं अनेक कवि व पंडित होते. यानें दीर्घकाल राज्य केलें. शिव आणि विष्णु यांना हा सारख्याच भक्तीनें भजत असे, इतका कीं शैव याला शिवभक्त म्हणत व वैष्णव विष्णुभक्त म्हणत. याच्या घराण्यांत तोण्ड-माण व कोचेंगज हे विख्यात राजे झाले. या घराण्यानें पांचशें वर्षें राज्य केलें.

## ३ चोल राजे ( इ. स. ८४६ ते १११८ )

विजयालय याच्या राज्यांत तंजावर, कांची, कन्याकुमारी इ० प्रांत असत. याचा पुत्र पहिला आदित्य यानें आपल्या राज्याची सरहद्द राष्ट्रकूटांच्या सरहद्दीशीं भिडविली. याचा मुलगा **परांतक** ( ९०७–

९४७ ) यानें आणखी राज्यविस्तार केला. हा निष्ठावंत शैव होता. चिदंबरम् येथील शिवमंदिराची पटई यानें सोन्यानें मढविली. याची पत्नी केरळकन्या ही मोठी सती होती. या दंपत्याला पांच पुत्र व अनेक प्रपौत्र झाले. या राणीनें पतीच्या पश्चात् आपल्या पतीचा पुतळा एका मंदिरांत उभा केला, तो अद्याप तेथें उभा असून पूजार्ह झाला आहे. ह्या घराण्यांत **राजराज** ( ९८५–१०१३ ) व त्याचा पुत्र **गंगईकोंड उर्फ राजेंद्र** ( १०१३-१०४३ ) हे पितापुत्र अत्यंत पराक्रमी निघाले व उभयतांनीं चोल साम्राज्याचा अत्यंत विस्तार करून अपार ऐश्वर्य भोगलें. राजराज हा अत्यंत श्रेष्ठ राजा झाला. यानें चेरांचें आरमार घेतलें व पांड्यगंग वगैरे राजे जिंकून आपलें राज्य खालपासून तों थेट कृष्णेच्या मुखापर्यंत भिडविलें. यानें फार मोठी सेना तयार केली व आरमार वाढविलें. सत्याश्रय चालुक्याचा पराभव करून यानें लखदिव व मालदीव हीं बेटें घेतलीं व व्यापार मनस्वी वाढविला. यानें तंजावर ही आपली राजधानी केली व तेथें राजराजेश्वर नामक एक प्रचंड शिवालय बांधलें. ह्या शिवमंदिरांत याच्या कारकीर्दीचा एक विस्तृत शिलालेख आहे. हा कडक शैव होता तरी बौद्धजैनांना हा साह्य करी. यानें आपली प्रजा अत्यंत सुखांत ठेवली. यानें गायनवादननर्तन ह्या ललितकलांना मोठें प्रोत्साहन दिलें. अनेक विद्यालयें काढून त्यांना उदारपणानें नेमणुका दिल्या. हा दाता व धर्मशील होता. यानें सुवर्णतुलादान केलें तेव्हां त्याची राणी सुवर्णधेनूच्या उदरांत बसून समारंभास गेली होती. हा शिवभक्त असल्यानें ६३ शैवांचीं गाणीं याला फार आवडत. यानें त्यांच्या मूर्ति राजराजेश्वराच्या मंदिरांत बसवून तेथें त्यांचीं पदें गाण्याचा प्रघात पाडला. यानें आईबापांच्या मूर्तिही देवळांत बसविल्या. यानें पहिले तीन कालवे बांधले व जमीनधाऱ्याचा उत्तम बंदोबस्त केला. या राजराजाचा मुलगा राजेंद्र हा बापसे बेटा सवाई निघाला. त्यानें १०२५ ते १०२७ ह्या दोनच वर्षांत अंदमान, निकोबार हीं बेटें व ब्रह्मदेशांतला पेगू प्रांत घेतला. त्यानें ईळम् (सीलोन)

वर स्वारी करून तेथून तीन रत्नजडित मुगुट खंडणीदाखल आणले, केरळ व पांड्य या देशांवर आपले पुत्र सुभेदार नेमले व उत्तरेस गंगा-तटाकापर्यंत मोहीम करून ओरिसाचा राजा व बंगालचा राजा महीपाल यांना आपले मांडलिक बनविले. यानें कलिंग जिंकलें, कनोज हस्तगत केलें, आणि केरळराज्य घेऊन तेथील अफाट खजिना व सूर्यमाळानामक बहुमोल कंठा लुटून आणला. यानें अनेक देश जिंकून अपरंपार संपत्ति मिळविली. यानें शेवटच्या बारा वर्षांत देवालयें, तलाव, व अनेक धर्मशाळा बांधून परोपकाराचीं मोठालीं कृत्यें केलीं व प्रजेला सुखसमृद्धि शांतपणें व सुखानें भोगूं दिलीं. आरमाराच्या जोरावर बंगालचा उपसागर ओलांडून यानें ब्रह्मदेशाचा कांहीं भाग आपल्या राज्यास जोडला. अलबेरूनीनें या चोलसाम्राज्याची मुक्तकंठानें स्तुति केली असून प्रयागपासून सीलोनपर्यंतचा पाऊण हिंदुस्थान याच्या एकछत्री साम्राज्याखालीं सुखानें नांदत होता असें म्हटलें आहे. चीन देशांत यानें आपला वकील पाठविला होता! असा वीर व विद्वान् राजा क्वचितच आढळतो. यानें गंगैकोंड शोलापुरम् ( त्रिचनापल्ली परगण्यांत ) येथें एक प्रचंड तलाव बांधला. त्यांत प्रथम गंगेचें पाणी आणून घातलें व तो पवित्र करून घेतला. या तलावाचें नांव त्यानें 'जयस्तंभ तडाग' असें ठेवलें. या तलावाच्या एका बाजूची पाळ पंधरा मैल लांब होती. त्या तलावाचें पाणी त्या प्रांतांत अर्ध्या शेतीला पुरविण्यांत येत असे. याच्या बांधकामाच्या अजस्रपणाची व सौंदर्याची गॅझेटिअरनें फार प्रशंसा केली आहे. अगदीं अलीकडे या तलावाच्या पाळीचे व देवळाचे दगड काढून कोलेरून येथील धरण बांधण्यास नेले आहेत! राजशेखरविलास नामक काव्यांत राजेंद्राच्या सर्व मोहिमांचें वर्णन दिलें आहे. यानें आपला मुलगा **राजाधिराज जयमकोंड** याला उत्तम शिक्षण दिलें. त्यानेंही बारा वर्षें मोठ्या तालेदारीनें राज्य केलें. त्यानें प्रथम गंगमंडळ काबीज करून तेथील जैनमंदिरें लुटलीं. याच्या प्रतापाची एकच गोष्ट सांगितली म्हणजे पुरें कीं यानें चेर,

पांड्य, गंग, पल्लव, चालुक्य व सीलोन ह्या सहा राज्यांवर आपला चुलता व पांच भाऊ यांना आपल्या साम्राज्याचे सुभेदार नेमले ! यानें सर्वांशीं लढाया केल्या व हा सर्वत्र नित्यविजयी असे. हा उत्तरहिंदुस्थानांत मथुरेपर्यंत गेला. यानें आपलें राज्य निष्कंटक केलें व राज्याचा विस्तारही केला. याचा पुत्र **राजमाहेंद्र** यानें राजमहेंद्री शहर वसविलें व श्रीरंगम् देवास वर्षासन नेमून दिलें. त्याचा चुलता **वीरराजेंद्र** यानें बेझवाडा आपल्या राज्यास जोडला, व ब्रह्मदेशाचा दक्षिणभाग खालसा करून दर्यावर मोठाले विजय मिळविले, चोलांचा शेवटचा प्रतापी राजेंद्रचोड ऊर्फ कुलोत्तुंग हा होय. हा गंगईकोंड याचा मुलीकडून नातु होय. **कुलोत्तुंग** ( १०७० ते १११८ ) याचे बरेच शिलालेख उपलब्ध आहेत. या चोलांचा व्याघ्रध्वज असे, व चालुक्यांचा वराहध्वज होता. यानें महिषमंडळ ( ह्मसूर ) प्रांतावर स्वारी करून विक्रमादित्य चालुक्याला तुंगापार घालवून दिलें व पांड्यराजाला जिंकून मानार, तिनेवेल्ली, मलबार व कन्याकुमारी हा सारा प्रदेश आपल्या राज्यांत आणला व पल्लवांचेंही राज्य खालसा केलें. मदुरेस त्यानें आपल्या भावास सुभेदार केले. चेर राजा त्याचा मांडलिक झाला. साऱ्या दक्षिणेंत हा अत्यंत बलाढ्य झाला व यानें आपलें कुलोत्तुंग हें नांव सार्थ केलें. द्रविड, आंध्र व कलिंग ह्या अफाट देशांवर त्यानें न्यायनीतीनें अर्धशतक राज्य केलें. त्यानें कलिंग देश जिंकल्यावर याची कीर्ति आणीकच पसरली. यानें राज्यव्यवस्थेकडेही उत्तम लक्ष दिलें. साम्राज्याच्या जमीनीची यानें मोजणी केली. सारे चोल राजे शैव होते, पण वैष्णवांना त्यांपैकीं कोणीही त्रास दिला नाहीं व जैनांना उपेक्षेनें वागविलें. कुलोत्तुंगानें रामानुजास—ते वैष्णव असल्यामुळें—आपल्या राज्यांत येऊं दिलें नाहीं, तथापि त्याचा पुत्र **विक्रम** यानें वैष्णवी दीक्षा घेतल्यामुळें रामानुज शेवटीं त्याच्या राज्यांत जाऊन राहिले. कुलोत्तुंगानंतर चोल साम्राज्याला उतरती कळा लागली तरी चोलांचें राज्य १३५६ च्या पुढेंपर्यंत चाललेंच होतें. चोल राजांच्या

ह्या ५०० वर्षांच्या राजवटींत, **विजयालय, परांतक, राजराज, गंगै-कोंड, जयमकोंड, कुलोत्तुंग** हे ६ राजे मोठे प्रतापी निघाले व त्यांनीं चोल साम्राज्य दक्षिणभर गाजविलं. चोल साम्राज्याला चोलमंडल ह्मणत. ह्या शब्दाचेंच कारोमांडल हें रूपांतर झालें आहे.

## ४ चोलांची राज्यव्यवस्था.

परांतक राजानें जी उत्कृष्ट शासन व्यवस्था लावून दिली तीच ह्या साम्राज्यांत शेवटपर्यंत चालली. अलीकडच्या सुधारलेल्या राष्ट्रांनाही तीपासून शिकण्यासारखें पुष्कळ आहे. ह्या राज्यांत ब्राह्मणांविषयीं आदर असून ब्राम्हणही तिकडे विद्वान् असल्यामुळें ब्राम्हणांचा राज्यकारभाराला पुष्कळ उपयोग झालेला आहे. ग्राम, ऊर ( शहर ), नाडु ( जिल्हा ), कोट्टम् ( प्रांत ), मण्डपम् ( इलाखा ) अशा क्रमानें अधिकारी नेमले जात. ग्रामपंचायती असत. निरनिराळया खात्यांवर निरनिराळे अधिकारी असत. हे बहुधा विद्वान् ब्राह्मण असत. मंडपचा मुख्याधिकारी सुभेदार असे. दंडनायक, सेनापति, महासेनापति हे लष्करी अधिकारी असत. प्रधानमंडळ वेगळें असे. पाटबंधारखात्यासारखी अनेक लोकोपयोगी खातीं असत. ग्रामपंचायतीच्या ताब्यांत तेथचे कर, देवळें, बागा, तलाव असत. जंगलखातें, सारावसूली अगर माफी यांचे अधिकार पंचायतीला असत. शिल्लक सभेजवळ असे. शिलकींतून शेतकऱ्यांना प्रथम मदत करीत निवडणूक दरसाल होई व सर्व सभासद लोकनियुक्त असत. अधिकाऱ्यांची देखरेख मात्र असे. प्रथम देवस्थान व इनाम आणि मग सरकारी देणें द्यायचा धारा होता, व शिल्लकबाकी सर्व पंचायतीच्या हातीं राही. याप्रमाणें प्रत्येक खेडें म्ह० एक स्वतंत्र राज्य होतें. न्यायनिवाडे पंचायतच करी. फांशीची शिक्षा क्वचित् देण्यांत येई. पंच ह्म० ज्यूरी जो निकाल देई तो सरकार अखेरचा मानीत असे. खटले सरकारी अधिकाऱ्याच्या फक्त देखरेखी चालत. अशी ही चोलांची ग्रामपंचायत पद्धत अगदीं निर्दोष होती. अनेक ग्रामसंस्थांचे प्रतिनिधि मिळून एक

महाजनसभा (पार्लमेंट) असे. हिच्या सभासदांची संख्या पांचशें असे. मत देण्याचा हक्क वयांत असलेल्या सर्व लोकांना असे. फक्त अभक्ष्यभक्षण करणारा, पापकर्मे करणारा, खोटी सही करणारा, गावगुंडीबद्दल शिक्षा झालेला व व्यभिचारी, यांना–यांनीं प्रायश्चित्तें घेतलीं तरी सुद्धां–मतदानाचा अधिकार आमरण नसे. महाजनसभा ३६० दिवस राही. नंतर पुन्हां निवडणुकी होत हें काम न्यायमंडळाकडे असे. पंचप्रधान सर्व खात्यांवर मुख्य असत. त्यांचीही निवडणूक लोकमतानेंच होत असे. चोल साम्राज्याचीं सहा मंडळें होतीं:—

१ तोण्डमंडळ ( दक्षिण व उत्तर पेन्नार नद्यांमधील दुआब )

२ खास चोलमंडळ ( तंजावर व त्रिचनापल्ली जिल्हे ).

३ राजराजमंडळ ( मदुरा जिल्हा व त्रावणकोर संस्थान ).

४ कोंगु किंवा अधिराजमंडळ ( सालेम व कोइमतूर जिल्हा ).

५ गंगैकोंड चोलमंडळ ( म्हैसूर व बंगलोर जिल्हे ).

६ निखरिली चोलमंडळ (कोलार, उत्तर अर्काट, सालेम, व कडाप्पा जिल्हे ).

राजा दरबार स्वतः पाहत असे. राजाच्या कोणत्याही हुकमास मुख्य मंत्री व प्रधानमंडळ यांची संमति लागे. चोलराज्यांत खडें सैन्य असे; त्यांत धनुर्धारी, पायदळ, घोडदळ व गजदळ असे. त्यांचें आरमारही होतें. आरमाराच्या योगानें चोलराजांना सीलोन, निकोबार, ब्रह्मदेश वगैरे प्रदेश पादाक्रांत करितां आले. चोलांना इमारती, मंदिरें, शहरें बांधण्याचा व कालवे, धरणीं व तलाव खोदण्याचा फार नाद असे. कावेरीचे पुष्कळ कालवे काढून त्यांनीं आपल्या राज्यांत बागायती वाढविली. ह्या राज्यांत सडका बांधीत असत. रस्ते उत्तम ६४ विती रुंद असत. चोल राजे शैव असत तरी शिवमंदिरांप्रमाणें विष्णु-मंदिरांनाही ते मोठमोठीं वर्षासनें देत. राजराजानें अप्पर व सुंदर ह्या महाशैवांचीं देवळें बांधलीं तशीं कुलशेखर व तिरुमंगल ह्या वैष्णव

आळवारांचींही देवळें बांधलीं आहेत. चोलांच्या राज्यांत तामीळ भाषेंत मोठमोठे ग्रंथ झाले आहेत, तामीळ वाङ्मयाला त्यांचें मोठे प्रोत्साहन असे.

## ५ पांड्य, चेर व पल्लव.

चोल साम्राज्याचें वर्णन केल्यावर पांड्यादि देशांचें विशेष वर्णन करायला नको आहे, तथापि त्यांचाही थोडासा सत्कार करितों. चोलांच्या खालोखाल महत्व पांड्य राष्ट्राचें आहे. भारतांत केरलचोलांप्रमाणें पांड्यांचाही उल्लेख आहे. वराहमिहिरानें पांड्य, त्यांची ताम्रपर्णी नदी व त्यांचा मोत्यांचा समुद्र या तिघांचाही उल्लेख केला आहे. मदुरा तिनेवेल्ली, त्रिचनापल्ली व त्रावणकोरचा कांहीं भाग एवढा भूप्रदेश प्राचीन पांड्यराज्यांत मोडत असे. ताम्रपर्णीच्या तीरीं कोरकई बंदरांत मोत्यांचा फार मोठा व्यापार चालत असे. पांड्यांच्या नाण्यांवर दोन मासे कोरलेले असत. कुलशेखर पांड्य हा येथील राजवंशाचा मूल पुरुष. हा महावैष्णव म्हणून प्रसिद्ध आहे. यानें मदुरा स्थापिली. त्याचा पुत्र मलयध्वज यानें चोल राजकन्येशीं लग्न लावलें. कुलशेखराचा नातु सुंदर व सुंदरची बायको मीनाक्षी हीं अगदीं देवमाणसें होतीं. त्यांची तिकडे अद्याप देवासारखी पूजा करितात. कुलशेखराच्या वंशांत ७४ पुरुषांनीं राजवैभव भोगलें अशी तिकडे प्रसिद्धी आहे. फार प्राचीनकालीं ग्रीक व रोमन राष्ट्रें मोत्यादिकांचा व्यापार करीत. अद्याप मदुरेकडे रोमननाणीं सांपडतात. भूगोलवेत्ता टॉलेमी ( इ. स. १४७ ) याला पांड्यांच्या बंदरांची व बाजारपेठांची चांगली माहिती होती. पांड्यांचा राजा नेदुम चेलिअन, चोलांचा राजा ( करिकेलचोलाचा नातु ) नेडु-मुडी चोल, चेरांचा राजा चेंकुत्तुवन व सिंहलद्वीपचा गजबाहु हे समका-लीन होते ( इ. स. १५०–२०० ). त्या वेळीं पांड्यराज्यांत विद्याभिवृद्धि करणारी एक उत्तम संस्था होती. तिचें नांव ‘ संगम. ’ कूरल, मणिमेखला वगैरे जैन पंथांचे ग्रंथ तिच्या उत्तेजनानें झाले. ह्युएन-

संग हा इ. स. ६४० मध्यें कांची येथें कांहीं दिवस राहिला होता तो म्हणतो " या वेळीं पांड्यदेशांत बुद्धधर्म मुळींच नसून जैनधर्म व हिंदुधर्म भरभराटींत आहेत. त्यांचीं मठमंदिरें उत्तम स्थितींत आहेत. बुद्धविहारांचा पूर्ण नाश झाला आहे. पांड्यांचें लक्ष विद्येपेक्षां व्यापाराकडे विशेष आहे.' नेडुमारण पांड्य या राजानें जैनपंथाचा स्वीकार केला होता, पण त्याची बायको ही कट्टे शैव जे चोल त्या घराण्यांतील राजकन्या असल्यामुळें तिच्या वजनामुळें व तिरुज्ञान संबंदर या शैव सत्पुरुषाच्या उपदेशामुळें त्यानें जैनमताचा त्याग केला व तो परत शैव झाला. त्यानें नंतर जैनांचा पाठपुरावा करून त्यांना राज्यांतून काढून लावलें. त्यानें जैनांचा अनन्वित छळ केला असें जैन ग्रंथकार म्हणतात, तथापि जैनांचें प्राबल्य पांड्य देशांतून कायमचें नाहींसें झालें ही गोष्ट खरी. तिरुज्ञान संबंदर ह्या शैवभक्ताविषयीं व त्याच्या काव्यांविषयीं विवेचन पुढें येईल. पांड्य पूर्व किनाऱ्यावर तर चेर पश्चिम किनाऱ्यावर ( मलबार ) राज्य करीत. चेर म्ह० चेरळ. ह्या तामीळ शब्दाचें कानडी रूप केरळ. चेरळ, मलबार ह्या शब्दांचा अर्थ पर्वतांच्या रांगा असा आहे यांच्या राज्याचे पांच नाडु ह्म० प्रांत असत, व त्या देशाला चेरळ नाडु म्हणत. त्यांच्यांत चेंगुत्तुवन हा पराक्रमी व चांगला राजा झाला. त्याची राजधानी वंजी, करूर, तिरूकरूर ही होती. हें स्थान कोचीनच्या ईशान्येस १४ कोसांवर आहे. यानें एक मोठा अश्वमेध यज्ञ केला होता. चेर, पांड्य, पल्लव, गंग, बाण हीं द्रविडांतलीं छोटीमोठीं राज्यें नेहमीं एकमेकांशीं भांडत, पुन्हा एक होत. विवाहसंबंधानें तीं सर्व एकाच द्रविड कुळीचीं होतीं असें दिसतें. गंग घराण्यानें ह्मैसुरावर ८ व्या ते ११ व्या शतकापर्यंत राज्य केलें. प्रत्येक राजघराण्यांत चारदोन पुरुषानंतर एखादादुसरा पराक्रमी राजा निघतच असतो. तामीळांच्या साम्राज्याच्या तोलाचें राजवैभव दक्षिणेंत दुसऱ्या कोणीच भोगलें नाहीं. दक्षिणेंत आंध्र साम्राज्यानंतर चोलसाम्राज्यच नांव घेण्यासारखें झालें आहे.

## ६ तामीळांचीं अजस्र शिल्पकामें.

तामीळ लोकांना दीर्घकाळ साम्राज्यसुख भोगतां आल्यामुळें त्यांना आपल्या कर्तृत्वाचीं कांहीं चिरंतन स्मारकें मागें ठेवतां आलीं आहेत. दक्षिणेंत जेवढीं विशाळ मंदिरें आहेत तेवढीं साऱ्या हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंही नाहींत. पांड्य, चोल, चेर, वल्लभ या सर्वांनीं आपापल्या ऐश्वर्यकाळांत मोठमोठीं कारागिरीचीं कामें केलीं. प्रचंड मंदिरें, गोपुरें, कालवे, तलाव वगैरे बांधून त्यांनीं शिल्प, शेती, व व्यापार यांत मोठमोठाल्या सुधारणा केल्या. कांची, मदुरा, श्रीरंगम्, तंजावर इ० ठिकाणचीं अजस्र पण सुंदर मंदिरें ह्या द्रविड लोकांच्या पराक्रमाची, धर्मश्रद्धेची, ऐश्वर्याचीं, कलानिपुणतेची साक्ष देण्यास अद्याप उभीं आहेत. **कांची** हें पहिल्यापासून श्रेष्ठ प्रतीचें विद्यापीठ व धर्मक्षेत्र ह्मणून प्रसिद्ध आहे. कांचीची सप्त मोक्षपुऱ्यांत गणना असून तिला दक्षिणची काशी ह्मणतात. कांची शहराची व तेथील मंदिरांचीं बांधकामें अगदीं दोरीसूद व लोकांच्या सुखसोयीकडे लक्ष देऊन केलेलीं आहेत. मंदिरें भव्य असून कलाकुसरीची कामें अतीव सुंदर आहेत. बरेच वैष्णव व शैवभक्त येथें झाले किंवा राहिले आहेत. आद्य शंकराचार्य येथें आले व त्यांनीं अनेक सभांत पाखांडमतें मोडून अद्वैतसिद्धांताची येथें स्थापना केली, शिवकांची व विष्णुकांची हीं नगरें स्थापिलीं, कामाक्षी देवीची उपासना सुरू केली, मठ स्थापून त्यावर सुरेश्वराचार्यांची स्थापना केली व गुहाप्रवेशही येथेंच केला. नंतर २०० वर्षांनीं रामानुजांनींही विशिष्टाद्वैतमताची येथें घोषणा केली. पल्लवांनीं ४०० वर्षें, चोलांनीं ५०० वर्षें, व विजयानगरनें ३०० वर्षें ह्याप्रमाणें १२०० वर्षें तर ह्या तीन हिंदु सम्राटांनीं येथें राज्य केलें आहे. येथें एकांबरेश्वर ह्मणून एक प्रचंड शिवमंदिर पल्लवांनीं बांधलें आहे, इतकें विशाळमंदिर अन्यत्र कोठेंही नाहीं. त्याचा घेर २५ एकर असून गोपूर १८८ फूट उंच आहे ! विष्णुकांचीत वरदराजाचें (विष्णूचें) मंदिर असून त्याची

लांबी १२०० फूट व रुंदी ८०० फूट आहे ! ह्या मंदिरांत चोलराजांचेही शिलालेख आहेत. यांतला शंभरखांबी सभामंडप विजयानगरच्या कलेचा व वैभवाचा उत्कृष्ट नमुना आहे. **मदिरा** येथें सुंदरेश्वर व मीनाक्षी यांचीं सुंदर मंदिरें आहेत तेथील **त्रिमलनायकाचा वाडा अत्यंत प्रेक्षणीय आहे. तंजावर** येथील राजराजानें बांधलेलें मंदिर अतिभव्य आहे, या मंदिराचें शिखर २०० फूट उंचीचें आहे, व येथील मिनार ८० टन वजनाचा व एकाच दगडाचा असून पायथ्याशीं २५ फूट चौरस आहे ! **शोलापुरम्** येथील शिवमंदिरांतील नुस्तें शिवलिंग ३० फूट उंच आहे ! वैष्णवांच्या उपासनेचें मुख्य मंदिर **श्रीरंगम्** हें त्रिचनापल्लीपासून २ मैलांवर कावेरी नदीच्या दोन फाट्यांच्या मधल्या बेटावर आहे. हें शेषशायी रंगनाथाचें मंदिरही अत्यंत प्रशस्त आहे. प्रस्तुतचें मंदिर जुन्या मंदिराच्या जागीं हजारवर्षांपूर्वी बांधलेलें आहे. त्याचीं सात आवारें असून चौथ्या आवारांत एक हजारखांबी प्रचंड सभामंडप आहे ! एका गंग राजानें शके १२१२ मध्यें जगन्नाथपुरी येथील जगन्नाथाचें विशाल मंदिर बांधलें आहे. दुसऱ्या एका गंगराजाच्या चामुंडराय नामक जैन प्रधानानें म्हैसूरजवळ श्रवण बेलगीळ या गांवीं जिनेश्वराचा ६० फूट उंचीचा भव्य दगडी पुतळा इ. स. ९८३ मध्यें उभा केला आहे ! तामीळांचें साम्राज्य, तामीळांच्या भव्य इमारती हें तर कौतुकावह आहेच, पण तामीळांनीं देशी वाङ्मयांत प्रथम पाऊल पुढें टाकलें असून मोठमोठे शैव व वैष्णव संतवीर त्यांच्यांत होऊन त्यांनीं बौद्धजैन मतांपासून वैदिकधर्माचें संरक्षण केलें हें पाहिलें व शंकराचार्यरामानुजाचार्यांसारखे दिग्विजयी धर्मवीर तामीळांतच झाले हें ध्यानांत आलें म्हणजे तामीळ राष्ट्रानें अखिल भरतखंडावर केवढे उपकार केले आहेत हें मनाला पटून त्यांची धन्यताच गावीसें वाटतें.

## ७ तामीळ वाङ्मय.

सर्व देशीभाषांतील अत्यंत प्राचीन भाषा तामीळ होय व तिच्यांत जितकें प्राचीन वाङ्मय आहे तितकें दुसऱ्या कोणत्याही देशी भाषेंत

नाहीं, आणि आहे तेंही पुष्कळ उच्च प्रतीचें आहे. तामीळ म्ह० गोड. थोडक्या व गोड शब्दांत पुष्कळ अर्थ आणणें हा या भाषेचा गुण आहे. सिलोनमधील निम्मे लोक तामीळ असून मद्रास इलाख्यांत यांची मुख्य वस्ती आहे, तरी हे लोक सयाम, ब्रह्मदेश, मारिशस बेट, नाताळ येथपर्यंत पसरले आहेत. ज्यांची मातृभाषा तामीळ आहे असे लोक १। कोट आहेत. तामीळ भाषेंत शेन ( उच्च ) ही ग्रंथांची भाषा व कोडूम ( खेडवळ ) ही बोलायची भाषा असे दोन प्रकार आहेत. तामीळांत ब्राह्मणादि चार वर्ण व शूद्रवर्णांत १८ जाति आहेत. दक्षिण हिंदुस्थानांत शास्त्रें, वाङ्मय व धर्म यांचा आद्य गुरु म्हणून अगस्ति ऋषीला फार पूज्य मानतात. पांड्य घराण्यांतले राजे विद्येचे भोक्ते होते व त्यांनीं मदुरा विद्यापीठ स्थापून विद्येचा फैलाव केला. यांच्या वेळीं जैनांचें प्राबल्य तामीळ देशांत फार होतें व लोकांना ब्राह्मण संस्कृतीपासून दूर ठेवण्यासाठीं यांनीं तामीळ भाषेंतील देश्य शब्दच आपल्या ग्रंथांत कायम ठेवण्याचा फार प्रयत्न केला ! तामिळ भाषेंतील ग्रंथसंपत्ति दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीन आहे ! शालिवाहन शक सुरू होण्यापूर्वीं मदिरा येथें एक मोठें कविसंमेलन भरलें होतें व त्यावेळच्या ५० हून अधिक कवींच्या कृति आज उपलब्ध आहेत असें म्हणतात ! यांत अनेक पंथांचे व जातीचे लोक आहेत. कांहीं बौद्ध आहेत, कांहीं जैन आहेत, कांहीं वैदिक धर्माचे आहेत. शालिवाहन शकाच्या पहिल्या २।३ शें वर्षांत तामीळ वाङ्मयांत अनेक उत्तमोत्तम ग्रंथ झाले आहेत. 'कलिथ–थोकई' ह्या ग्रंथांत १५० प्रेमगीतें अत्यंत सरस अशीं संकलित केलेलीं आहेत. ह्या गीतांत शुद्ध व पवित्र प्रेम वर्णिलें आहे पुढील काळांतील तामीळ वाङ्मयांत दिसून येणारा अश्लीलपणा व ग्राम्यपणा या प्रेमगीतांत आढळत नाहीं. शुद्ध व पवित्र शृंगाराची हीं गीतें मनोरम काव्यकल्पनांनीं व बहारीच्या वर्णनांनीं युक्त अशीं आहेत. इतर काव्यांतून राजांच्या लढाया, वीरांचे पोवाडे, प्रवास व सृष्टिवर्णनें इ० भाग चांगले आहेत. पांड्य राजांची

संग्रामकीर्ति, न्याय व बुद्धिमत्ता एकानें वर्णिली आहे, एकानें चोल राजांच्या दरबारचें वर्णन केलें आहे, एकानें करिकेलचोल नांवाच्या विख्यात भूपतीचे पोवाडे गायिले आहेत, कोणी पर्वतावरील देखावे तर कोणी व्यापाराच्या घडामोडी, कोणी हिमरात्रीचें वर्णन तर कोणी तरुणतरुणींच्या प्रणयकथा यात्रमाणें तत्कालीन तामीळ कवींनीं व्यवहारांतील अनेक प्रकार मनोरमरीत्या वर्णिले आहेत. 'व्यालुवर कोलर' नामक अद्वितीय काव्याचा कर्ता तेरू वेल्लूवर याची कीर्ति द्रावीड देशांत अजरामर राहिली आहे. एका विद्वान् घराण्यांत वेदमौळी नामक विद्वान् ब्राह्मणाच्या पिरली नांवाच्या मुलाचा अघटित विधिघटनेनें एका अन्त्यज कन्येशीं विवाह झाला! त्या विवाहापासून सात अपत्यें झालीं. तीं सारीं विद्वान् व शास्त्रसंपन्न निघालीं व त्या सर्वांनीं तामीळ भाषेंत उत्कृष्ट ग्रंथरचना केली आहे! त्यांचीं नांवें: अव्हेअर, आपग्गा, वालीज, व मुरग्गा ह्या चार मुली व तेरु, आधिकनान व कपिलर हे तीन मुलगे. हीन अवस्थेंत जन्मलीं व वाढलीं असूनही सातही भावंडें आपल्या अनुपम गुणांनीं व उपजत कवित्वशक्तीच्या योगें चढत चढत कोणाना कोणा राजाच्या आवडीचीं झालीं. पहिली मुलगी अव्वेयार ही नामांकित कवयित्री झाली. नीतिशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, भूगोल, रसायन व साहित्य ह्या शास्त्रांत ही अत्यंत निष्णात झाली. प्रत्येक शास्त्रावर तिचा एक तरी ग्रंथ आहे, नीतिशास्त्रावर तर तीन ग्रंथ आहेत. हिचे ग्रंथ इतके उत्तम आहेत कीं ते सर्व विद्यालयांत शिकवले जात व अजूनही शिकवले जातात! ही कल्पविद्या, मंत्रशास्त्र व धातुवाद यांतही पारंगत असे. वालीज हिचें तामीळ भाषेंत पुष्कळ कवित्व आहे. तेरू यास मैलापूर येथील वेल्लुवर नामक पुरुषानें वाढविलें म्हणून यास तेरुवेल्लुवर म्हणतात. हा मदुरा शहरास गेला व यानें तेथील वेदशेखर राजाच्या दरबारांतील ४९ पंडितास जिंकलें. यानें 'व्यालुवर कोलर' नामक एक श्लोकबद्ध ग्रंथ तामीळ भाषेंत केला आहे. त्याची प्रसिद्धि दक्षिण हिंदुस्थानभर आहे. ह्यानें त्या ग्रंथांत मनुष्यप्राण्याच्या आयुष्यांतील निरनिराळ्या

स्थितींचें उपदेशपर श्लोकबद्ध सरस वर्णन केलें आहे. याची रचना सर्वोत्कृष्ट असून अलीकडे एलिसनें या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर केलें आहे! याची नीतिविषयावर कविताही पुष्कळ आहे. उत्तम कवि, गोड मित्र व पुरा दरबारी—या गुणांत तेरूसारखा तेरूच झाला. सर्व भावंडांतला धाकटा कपिलर हा चेर राजाच्या दरबारीं होता व त्यानें त्यावर प्रसन्न होऊन त्यास कित्येक गांवें इनाम दिलीं होतीं. याची उद्बोधकशक्ति व सर्वप्रियता वाखाणण्यासारखी होती. हीं सातही भावंडें आजन्म अविवाहित राहिली व विद्याव्यासंगांत त्यांनीं आयुष्य खर्च केलें. हे व आणखी कित्येक कवि व ग्रंथकार तामीळ देशांत १८०० वर्षांपूर्वीं झाले हें पाहून आश्चर्य वाटतें! त्यावेळच्या तामीळ ग्रंथकारांना रामायणभारतांतील कथा माहीत होत्या असें दिसतें. तामीळ भाषेंत यानंतर बौद्ध व जैन ग्रंथकार बरेच झाले, पण पुढें शिवभक्त व विष्णुभक्त ( यांना आळवार म्हणत ) यांचा तामीळ लोकांवर पगडा पुष्कळच बसला. बौद्धपंडितांचा पराभव जैनपंडितांनीं केला व जैनांचें प्राबल्य शैव व वैष्णवपंथांनीं कमी केलें. आद्य शंकराचार्यांनीं हिंदुर्माचें वर्चस्व तामीळ देशांत स्थापित करण्याचें काम केलें व पुढें रामानुज व मध्व यांनींही तेंच काम पुढें चालवून वैष्णवपंथ फार झपाट्यानें पसरविला, तथापि ह्या आचार्यांच्याही पूर्वीं व वरील सप्तकानंतर तामीळ देशांत मोठमोठे शैव व वैष्णव भक्त झाले त्यांच्या इतिहासाकडे व काव्यांकडे प्रथम लक्ष देणें जरूर आहे.

## ७ बारा अळवार उर्फ वैष्णव.

१ तामीळ प्रांतांत ३ ऱ्या शतकापासून तों ८ व्या शतकापर्यंतच्या पांचशें वर्षांत अनेक वैष्णवभक्त निर्माण झाले व त्यांनीं तामीळ भाषेंत भक्तिप्रधान सुंदर काव्यें करून बौद्ध व जैन पंथांची हकालपट्टी केली. दक्षिण प्रांतांत पाखांड मतांचें प्राबल्य तेव्हां फार झालें होतें व कित्येक राजांनीं तें मत स्वीकारल्यामुळें वैष्णव व शैव पंथांचा व तत्प्रचारक

भक्तांचा थोडाफार छळही झाला. तामीळ प्रांतांत ह्या पांच शतकांत जे वैष्णव भक्त झाले त्यांत **'बारा अळवार'** प्रसिद्ध आहेत. अळवार म्हणजे वैष्णव, विष्णुभक्त. आपल्या प्रेममधुर गीतांनीं आळवारांनीं तामीळ देश अगदीं हलवून सोडला. हे आळवार एकंदर बारा आहेत. पहिले तीन आळवार अत्यंत प्राचीन आहेत. ते ख्रिस्तीसनापूर्वी होऊन गेले. त्यांच्या कविता फार करून आढळत नाहींत व त्यांच्या चरित्राविषयींही कांहीं माहिती नाहीं. त्यांचीं नांवें पोइकई अलवार, भूत थलवार व पेयलवार अशीं आहेत. परंपरा यांना अडीच हजार वर्षांमागें नेऊन सोडते, तथापि कृष्णस्वामी ऐयंगरच्या मतें हे पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत झाले आहेत. कसेंही असो, विष्णुभक्तीचा उगम तामीळ देशांत यांच्यापासून झालेला आहे. हे तिघे समकालीन होते. तिरुक्कोइलूर येथें हे तीन वेगवेगळ्या गांवांहून आले व एकदा एकत्र आल्यावर हे वेगळे झाले नाहींत. त्या तिघांनाही ईश्वरसाक्षात्कार झाला होता व या तिघांनींही प्रत्येकीं शंभरशंभर तामीळ पद्यांत नारायणाचें गुणगायन केलें. यांच्या पद्यांत विष्णूचें नारायण हें नांवच फार करून येतें. त्रिविक्रम ह्म० वामन हा विष्णूचा अवतार त्यांना माहीत होता व कृष्णाविषयीं त्यांना अत्युत्कट प्रेम होतें. श्रीरंगम्, तिरुपति व अलगारकाइल येथील मंदिरांचा ते उल्लेख करितात, यावरून हीं विष्णुक्षेत्रें फार प्राचीन आहेत असें उघड होतें. विष्णूच्या सगुणरूपाचें ध्यान करावें, त्याची पूजाअर्चा करावी व त्याच्या नारायणनामाचा जयघोष करावा असा त्यांचा उपदेश असे. यांच्या मागून तिरुमल्लिसाई व इतर आळवार झाले. वैष्णवांच्या उपासनेचें मुख्य मंदिर श्रीरंगम् हें होतें. आळवारांत तिरुमालिसाई, राजाकुलशेखर, पेरियालवार व त्याची कन्या आंदल, तोंडाराडिपोडी व शेवटचा तिरुमंगाई हे फार प्रसिद्ध आहेत, तथापि या सर्वांपेक्षां नम्माळवार याची लोकप्रियता जरा अधिक आहे. **कुलशेखर** ह्याची संस्कृत 'मुकुंदमाला' सुप्रसिद्धच आहे. हा त्रावणकोरचा पराक्रमी राजा, पुढें शेर, चौल व पांड्य यांचाही राजा झाला.

हा न्यायनीतीनें राज्य करी. हा रामभक्त होता. साठी उलटल्यावर यानें मुलाला गादीवर बसविलें व राज्यभोग सोडून हा रंगनाथचरणीं लीन होऊन राहिला. त्याचीं तामीळ भाषेंत दहा काव्यें आहेत व तीं तामीळ देशांत आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. त्याच्या काव्यांचा आरंभ असा आहे; " हे भगवन् ! आपणांस वाटतील त्या आपत्ति मजवर आणा, मी मात्र आपल्या चरणावांचून दुसऱ्या कोणाचाही आश्रय करणार नाहीं. मुलाला जन्म देणाऱ्या आईनें क्षणैक रागानें जरी त्या लेंकराचा त्याग केला तरी तें आईचेंच चिंतन करितें आणि रडतें. अगदीं तसाच हे प्रभो ! मी अनन्य आहें !' **पेरियालवार** ( व अर्थात् त्याची कन्या **आंदल** ) हा ब्राम्हण होता. त्याचें मूळ नांव विष्णुचित्त. हार गुंफावेत, चित्रविचित्र पुष्पमाळा तयार कराव्यात व त्या देवाच्या गळयांत घालून देवाचें ध्यान करावें हाच त्याचा उद्योग. हा विद्वान् नव्हता, पण पांड्यराजा वल्लभदेव यानें भरवलेल्या एका विद्वत्परिषदेला देवाच्या प्रेरणेनें हा हजर राहिला व आयत्यावेळीं याला बोलायची स्फूर्ति झाली. राजानें जो सर्व ज्ञात्यांत श्रेष्ठ ठरेल त्याला एक मोठी नाण्यांची थैली द्यायचें आधीं जाहीर केलें होतें विष्णुचित्ताचें स्वयंस्फूर्तीचें भाषण अप्रतिम उठलें व ती थैली त्याला मिळाली. त्यानें गांवीं येऊन ग्रामांतील मुख्य विष्णुदेवाला ती अर्पण केली. असा तो निरपेक्षप्रेमी होता. त्यांचे संगतींत ' आंदल ' ला विष्णुभक्तीचें रहस्य समजलें. कोणी म्हणतात कीं आंदल त्याची कन्या नव्हती त्यानें त्या अर्भकाला कन्येप्रमाणें वाढविलें हें खरें आहे. त्याच्या विष्णुप्रीत्यर्थ माळा गुंफण्याच्या प्रेमकार्यानेंच तिच्या हृदयांत विष्णुभक्ति चेतविली. त्यानें तयार केलेल्या पुष्पमाळा एकदां तिनें तन्मयतेनें आपल्याच गळयांत घातल्या. तेव्हां त्या भक्ताचा मनोभंग झाला, पण विष्णूनें प्रगट होऊन त्या आपल्यास पोंचल्याचें व आपण प्रसन्न झाल्याचें त्यांस पटविलें असें सांगतात ! 'आंदल' नें लग्न करण्याचें नाकारलें व ' विष्णू-शिवाय माझा भ्रतार किंवा स्वामी दुसरा कोणीच नाहीं ' असें उत्तर केलें.

तिच्या पित्यानें तिचें विष्णूशीं लग्न लावण्याकरितां तिला श्रीरंगम्ला नेलें व तेथें देवाच्या पायीं ती गुप्त झाली ! तिच्या पद्यांत उत्कट भक्तिरस भरला आहे. विष्णुस्वरूपाशीं ती अगदीं तन्मय झाली होती. " नारायण सर्वभूतांचा सुहृद् आणि माझा स्वामी आहे माझा ह्या जन्मींचा व जन्मजन्मींचा तो एकच आधार आहे, त्यानें आपल्या पवित्र हस्तांनीं माझें पाणिग्रहण केलें आहे. मातापितरांचा व सर्व बंधुजनांचा त्याग करून मी त्यालाच हृदयाशीं घट्ट धरिलें आहे. हा मायेचा नियंता माझ्यापुढें प्रकट झाला आहे व त्याच्या स्वरूपाला मी मोहित झालें आहें" असें तिनें आपल्या एका पद्यांत म्हटलें आहे. **पेरियालवारच्याही** कविता पुष्कळ आहेत. तो आपल्या एका पद्यांत म्हणतो:–" समुद्रमंथनसमयीं सागरांतून निघालेलें अमृत जसें एखाद्यानें घरांत सांठवावें, त्याप्रमाणें हे प्रभो ! म्यां तृषित जीवानें तुझ्या स्वरूपाच्या आनंदरसानें आपला हृदयघट भरून घेतला आहे. सोन्याचा तुकडा तांबडी रेषा उमटेतों जसा कसावर घांसतात त्याप्रमाणें मी आपलें काव्य नामरंगानें रंगविलें आहे, माझ्या हृदयांत मी तुला स्थापिलें आहे व मी तुझ्यांत विरून गेलों आहें. तुझ्या लीलांनीं व गुणप्रभावांनीं माझें हृदय चित्रित केलें आहे. " **तोंडाराडिपोड्डी ( ब्राह्मण ), तिरुमंगाई ( शूद्र ) व तिरपान** किंवा **तिरुप्पान ( पंचम )** हे अलवार ८ व्या शतकाच्या सुमारास झाले पहिला श्रीरंगम्च्या मंदिरांत एक सेवेकरी होता, दुसरा बंडखोर व आडदांड होता व तिसरा कावेरीतीरावर उभा राहून मुक्तकंठानें श्रीरंगनाथाच्या प्रार्थना करणारा एक प्रेमळ नामशूद्र होता. सर्व अळवारांत नम्माळवार याची ख्याति विशेष झाली. तिरुमंगाई याचीही कविता पुष्कळ उपलब्ध असून तामीळ प्रांतांत ती सर्वमान्य आहे. या **अळवारांच्या निवडक व उत्तमोत्तम कवितांचा एक संग्रह ' प्रबंधम् '** म्हणून **१० व्या शतकांत नाथमुनीनें** इ. स. ९२० मध्यें तयार केला व त्याला तामीळ लोक वेदतुल्य मानतात. **प्रबंधम् हा त्यांचा वेद आहे.** ह्यांत नम्माळवार व तिरुमंगाई यांच्या कविताच

अधिक आहेत. प्रबंधांतल्या ४९०० पद्यांपैकीं १२९३ नम्माळवार याचीं पद्यें आहेत, १०३ कुलशेखराची आहेत व १३६० तिरुमंगाई याचीं आहेत. हे वैष्णव अलवार व त्यांचेच समकालीन शैव यांच्या कवनांत सगुणप्रेमाचा अत्युत्कट रंग असून तत्त्वज्ञानाच्या विचारांशीं तो संलग्न आहे. लग्नकार्यांत, यात्राप्रसंगीं, उत्सवांत, एकादश्यादि पर्वप्रसंगीं हजारों लोक प्रबंधम्‌मधील पद्यें गात नाचत असतात. आतां ह्या अलवारांपैकीं अधिक लोकप्रिय व मोठ्या प्रमाणावर काव्य-रचना करणारा जो नम्माळवार त्याच्याविषयीं चार शब्द सांगतों.

## ८ नम्माळवार.

**नम्माळवार** याचा जन्म ताम्रपर्णी नदीच्या कांठीं तिनेवल्ली जिल्ह्यांत एका विष्णूपासकाच्या घराण्यांत ६ व्या शतकांत झाला. याची जात वेल्लाळ—शेतीवाडी करून राहणें हा वडिलांचा धंदा. हें मूल जन्मतःच फार विचित्र होतें. तें डोळे उघडीत नाहीं, दूध पीत नाहीं व रडतही नाहीं असें पाहून तें त्याच्या आईबापांनीं बाराव्या दिवशीं एका विष्णु-मंदिरांतील आवारांत चिंचेच्या झाडाला दोरीचा पाळणा बांधून त्यांत ठेवून दिलें! त्या मंदिरांतच तें कसें तरी वाढत होतें. देवाच्या स्वाधीन केल्यानें देवानें त्यास वाढविलें अशी लोकांची श्रद्धा झाली. याप्रमाणें तें मूल १६ वर्षांचें झालें! पुढें तेथें **मधुरकवि** नामक एक सामवेदी विद्वान् ब्राम्हण तीर्थयात्रा करीत असतांना कांहीं दृष्टांत झाल्यामुळें आला. चिंचेच्या झाडाखालीं डोळे मिटून पडलेल्या त्या जडभरततुल्य पुरुषाला त्यानें पाहिलें. मधुरकवीनें एक मोठा धोंडा उचलून घेतला व तो त्या सुप्त प्राण्याच्या पुढें दाणकन् आपटला. त्याबरोबर त्यानें **१६ वर्षांनंतर प्रथम डोळे उघडून पाहिलें!** लोकांस मोठा अचंबा वाटला. याला कांहीं बुद्धि आहे कां नाहीं हें अजमावण्यासाठीं मधुरकवीनें त्यास वेदांतांतील कांहीं प्रश्न विचारले. उदाहरण “ जड प्रकृतींत जीवचैतन्यानें जन्म घेतला तर तें चैतन्य

काय खाईल व कशावर राहील ? " **मारण** ( हें त्या मुलाचे पहिलें नांव होतें. ) यानें तत्काळ उत्तर केलें " तें चैतन्य प्रकृतिच खाईल (प्रकृतींतील सुखदुःखें भोगील ) व प्रकृतींतच राहील. " हें उत्तर ऐकून मधुर कवि मनांत चपापला व मारण हा कोणी योगभ्रष्ट पुरुष आहे असें त्यास वाटलें. तो मारणजवळच त्याचा शिष्य म्हणून राहिला व मधुरकवीच्या संवादांमुळें मारणलाही कवित्वस्फूर्ति झाली. त्याला मधुरकवीची संगति व त्याचें संभाषण फार आवडलें व ते दोघेही एकमेकांच्या सहवाससुखांत राहिले. मारणच्या तोंडून स्वयंस्फूर्तीनें निघणारीं पद्यें मधुरकवि ताडपत्रावर लिहून ठेवीत असे. मारण ३५ वे वर्षी वारल्यावर पांड्यराजाच्या दरबारीं ३०० पंडितांच्या सभेंत मधुरकवीनें त्यांपैकीं बऱ्याच कविता गाऊन दाखविल्या व त्या सर्वांस फार पसंत पडल्यामुळें त्यांची पुढें तामीळ देशभर प्रसिद्धि झाली. थिरुक्कुरुहर येथें मारणचें मंदिर बांधण्यांत येऊन त्याच्या मूर्तीची पूजाअर्चा सुरूं झाली. नम्माळवार व मधुरकवी यांत गुरु कोण व शिष्य कोण झ० कोणापासून कोणाला स्फूर्ति झाली हें ठरविणें कठिण आहे. मधुर· कवीचें वेदाच ज्ञान नम्माळवारच्या कवितेंत प्रतिबिंबित आहे एवढें खरें. नम्माळवारला लक्ष्मीनारायणांनीं साक्षात् दर्शन दिलें असें म्हणतात. त्याच्या हजार कवितांच्या संग्रहाला **'तिरुवोयमोळी'** असें नांव आहे. श्रीरंगम्च्या मंदिरांत या संग्रहाला वेदतुल्य मानतात व याचें पठण अद्यापही नित्य होत असतें. याला 'द्राविड' वेद म्हणतात. वैष्णवपंथाच्या प्रसाराला नम्माळवारच्या ह्या काव्यसंग्रहानें फारच मोठें साह्य केलें आहे. त्याच्या कवितेंत वेदार्थ प्रकट झाला आहे. चोल, पांड्य, तिनेवेल्ली, व त्रावणकोर ह्या सर्व प्रांतांतील प्रमुख विष्णुदेवतांच्या स्तुतिपर अनेक सुंदर स्तोत्रें यानें केलीं आहेत, यावरून पुढें मधुरकवीच्या संगतींत नम्माळवार ह्या सर्व प्रांतांतून हिंडून आला असावा. याच्या काव्यांत अध्यात्मदृष्टि सोज्ज्वळ असून जिव्हाळ्याची भक्ति आहे. सृष्टींतील सौंदर्याचेंही पान करण्याची रसिकता त्यांत आहे, त्याच्या प्रेमभक्तीची थोडीशी ओळखः–

"अरे ठका! तूं माझ्या दृष्टीसमोर येत नाहींस काय? अथवा खरेंच आहे–मी किती तरी पातकांचा आगर आहें! एका उडीसरसा भूमि गांठणारा तूं–मी तुला हांका मारीत आहें, माझें चित्त प्रेमानें आर्द्र झालें आहे; नेत्र अश्रु ढाळीत आहेत, हें पाहून 'तूं महापातकी आहेस' एवढें सांगण्यासाठीं तरी प्रकट होणें तुला शोभणार नाहीं काय?... तूं मोठा–फार मोठा आहेस, देवांनाही तूं न दिसणारा आहेस. समुद्र-मंथन करणारा, सुदर्शनचक्र हातीं धरणारा, महासमर्थ आहेस. बापा, तुला व तुझ्या चतुर्भुज रूपाला आलिंगन देण्यासाठीं माझे बाहू फुरफुरत आहेत, माझा जीव झुरत आहे, तर मग तूं नाहीं कां येणार?

"तूं सर्वव्यापी आहेस, पण मला तुझें ज्ञान नाहीं. हे तुलसीमालाधर! ये रे! साऱ्या पृथ्वींतल्या साऱ्या पुष्पांच्या माळा तुझ्या गळ्यांत घालून तुझें मनोहर रूप पाहून मी आनंदभरित कधीं होईन बरें? मी आक्रंदत आहें, आळवीत आहें, दशदिशा तुला धुंडित आहें, आणि तूं दिसला नाहींस कीं लज्जेनें मान खालीं घालून रडत आहें"........

"तुझी एक चरणसेवाच मला पुरे. आद्यपुरुषा! व्यापका दर्शन दे. **आल्यावांचून तुला येतां येतें**! तुझ्या या दिव्यसेवेनंतर मी संसार-कर्दमांत राहीन काय? दयानिधे! ये ये ये."

"मीं त्याला पकडलें आहे, आतां सोडीत नाहीं. देहबंध तुटले. त्याचा मार्ग एकदांचा सांपडला. तो ह्या देहपंजरांत प्रविष्ट झाला आहे. आतां सारा आनंदीआनंद! तूं मला आजवर कां सोडलें होतेंस? नाहीं; खरोखर मीच तुला विसरलों होतों, आतां पळभरही विसरणार नाहीं."

"ऐका. तो ज्ञानातीत आहे. आपल्या अंतर्हृदयांत ध्यानानें त्याला पकडा, सर्व बाह्यविषय सोडून त्याला आंत शोध, तो आंतच आहे."

गोकुळांतील एक गोपी आपली तरुण कन्या श्रीकृष्णछंदानें कशी वेडीपिशी बनली याचें वर्णन करीत आहे. त्या कन्येला वस्तुमात्राच्या ठिकाणीं श्रीकृष्ण दिसत आहे, व प्रत्येक वस्तु श्रीकृष्णास स्मरवीत आहे. ह्या प्रेमळ काव्याचें मी मराठी रूपांतर करून पुढें देत आहे:—

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

## अभंग.

कैसी कन्या माझी झाली वेडीपिसी। काय करूं यासी बाइयानो ॥१॥

* * * * *

भूमीसी खेळतां स्मरे वामनपाय। म्हणे 'सांडूं काय ओवाळूनी' ॥२॥
आकाशीं पाहतां हस्त जोडोनीयां ! म्हणे 'मत्स्वामिया येथ राहे' ॥३॥
सागरासी पाहे म्हणे 'शेषशायी। पहुडे येथ बाई ! काय सांगों' ॥४॥
अश्रुपूर्णाकुल नेत्र चोळोनियां । ध्यानमग्न पाया-कडे पाहे ॥ ५ ॥
बालसूर्याकडे बोट दावी नीट । 'हे तों मूर्ति धीट गोविंदाची' ॥६॥
प्रेमविव्हल होय अश्रूंसीं ढाळित। नाना नामें गात केशवाचीं॥७॥
अच्युत म्हणोनी अग्नी धरी हातें। पांची बोटें घेते पोळोनीयां ॥८॥
शीतवायुस्पर्श स्मरवी रमणा जे। हरिखे मुर्के लाजे अंगसंगें ॥ ९ ॥
पूर्णचंद्राकडे पाहतचि राहे । पसरी ते बाहे आलिंगाया ॥ १० ॥
शैल स्थाणु येई जेव्हां दृष्टीपुढें। म्हणे 'हें तों फुडें विष्णुरूप' ॥११॥
घनवृष्टी झाली-'आला पुरुषोत्तम। करुणामेघश्याम आला आला'१२
गोवत्सांतें प्रेमें आलिंगी वेल्हाळा। म्हणे 'पाठीं गोवळा कृष्ण आहे'१३
दही दूध लोणी आणितां विकाया। म्हणे 'त्यासी खाया आवडे हें' १४
सर्पामागें मागें धांवे ती बेभान। ह्मणे 'हें शयन श्रीधराचें' ॥ १५ ॥
केव्हांही कोठेंही कानीं येतां नाद। ह्मणे 'ऐका! साद मुरलीचा' ॥१६॥
लाज भय चिंता गेली हारपोनी । पुसे 'कृष्ण कोणी पाहिला जी?' १७
पाहे तुळशी तेव्हां खुले प्रेमकळा। ह्मणे 'हा तों गळा कृष्णजीचा'।
भलीं बुरीं भूतें मूर्ती वा राउळें । तितुकीं देउळें कृष्णजीचीं ॥१९॥

* * * * *

ऐसी माझी कन्या केली वेडीपिसी । बोलायाची तिशीं सोय नाहीं।
कोणया चेटकीचें दूध प्यालें बाळ। कृष्णानें वेल्हाळ मोहियेली ॥
गोजिरवाणी वेल माझी हे कोमेली। देहभावा मुकली काय सांगों।
मध्येंची हंसावें मध्येंची रुसावें। मध्येंची रडावें फुंदफुंदो ॥ २३ ॥

नाचावें डोलावें सदा गीत गावें । अश्रूही गाळावे आनंदाचे ॥२४॥
भेटीसी झुरावें भेटतां नुरावें । नानाचार व्हावे लाडकीचे ॥ २५ ॥
कोठोनी हा ठक भेटला हो तिसी । काय मी कोणासी बोल लावूं ।
बाई बाई याची काय सांगों मात । जोडावे हे हात ठकड्यासी ! ।

## ९ तिरुज्ञानसंबंदर

तामीळ प्रांतांत बौद्ध व जैन ह्या पंथांचें प्राबल्य मोडून टाकून लोक सनातनधर्माकडे परत आणण्याचें काम वैष्णवभक्तांप्रमाणें शिवभक्तांनींहीं केलें आहे. शक ५०० पासून शक ९०० पर्यंतच्या चारशें वर्षांच्या काळांत तामीळ देशांत प्रसिद्ध असे एकंदर ६३ महाशैव झाले. **तिरुज्ञानसंबंदर व अप्पर हे दोन पहिले शैव शके ५२० ते ६०० च्या दरम्यान झाले**, तर **सुंदरमूर्ति** स्वामी हा शके ८४० च्या आंतबाहेर होऊन गेला. त्यानें ६२ महाशैवांची स्तुति केली आहे त्यावरून हाच ६३ वा होय हें उघड आहे. राजेंद्र चोल यानें तंजावर येथील राजराजेश्वराच्या मंदिरांत ६३ शैवांच्या मूर्तींची स्थापना केली व त्याची कारकीर्द १०१३–१०४३ या काळांतली आहे तेव्हां हे सर्व ६३ शैव इ. स. १००० च्या पूर्वींचे आहेत हें उघडच आहे. शैवांत सर्व जातींचे भक्त आहेत: ब्राह्मण आहेत, शूद्र व शेतकरी आहेत, आणि **नंदा**सारखा एखादा चोखामेळाही आहे. ह्या ६३ पैकीं सर्वांहून अधिक योग्यतेचे व सर्वलोकप्रिय असे पहिले दोन ज्ञानसंबंदर व अप्पर हेच होत. संबंदर हा तंजावर प्रांतांत शियाळी गांवीं जन्मला व अप्पर हा कुडलूर (कडलोर) जिल्ह्यांतल्या एका खेडेगांवांत जन्मास आला. 'तिरुज्ञानसंबंदर' म्हणजे देवाच्या ज्ञानाशीं सात्म्य पावलेला. अप्पर याचें मूळचें नांव तिरुनांवक्करसू ह्म० वाचस्पति. संबंदर त्याला अप्पर ( बाबा ) असें प्रेमानें म्हणत, म्हणून त्याला लोकांतही अप्पर असेंच म्हणूं लागले. संबंदर हा कौन्डिण्यगोत्री तामीळ ब्राह्मण व अप्पर हा वेळाळन्–वेल्लाळ किंवा शेतकरी वर्गांतला. मंदिरांतून अप्पर याच्या ज्या मूर्ति बसविल्या अहोत

त्यांत अप्पर याच्या हातांत गवत कापण्याचा कोयता दिलेला आहे ! कोयत्यानें तो शिवमंदिरांतील खडे वगैरे काढीत असे. असो. शैवसंप्रदायांतील ह्या संतांनीं तामीळ देशांत मोठी कामगिरी केली. संबंदर व अप्पर हे दोघेही एकनिष्ठ शिवभक्त होते, संबंदर विद्वान्ही होता. अप्परापेक्षां ज्ञानानें व लोकप्रसिद्धीनें संबंदर श्रेष्ठ होता तरी त्या दोघां साधूंची एकदा जी मैत्री जमली ती यावज्जीव अखंड राहिली. कदाचित् ते दोघे नुसते विद्वान् असते तर त्यांच्यांत चुरस माजून राहिली असती ! पण दोघेही भक्त होते–त्यांचीं हृदयें एका शिवस्वरूपीं समरस झाल्यामुळें मत्सरादि क्षुद्र विकारांच्या ते फार पलीकडे होते, ते विमलाशय होते, शिवाय ते कार्यकर्ते होते. बौद्ध व जैन धर्मांचें दक्षिणेंत जें बंड माजलें होतें तें पार मोडून टाकून दोघांनाही सनातन वैदिकधर्माचा प्रसार करायचा होता. ते एकजीव झाल्यानें त्यांचें इष्ट कार्य फार सुकर झालें त्या वेळचा मदुरेचा राजा मूळचा शैव होता पण जैन पंडितांच्या संगतीमुळें त्याच्यावर जैनधर्माचा पगडा बसला व त्यानें जैनधर्म स्वीकारला; तथापि त्या राजाची राणी व त्याचा कारभारी हे पूर्णपणें शैवधर्मी राहिले होते. राजा जैन झाल्याबद्दल राणीला व इतर लोकांनाही वाईट वाटलें व त्यांनीं संबंदर याचे पाय धरिले. राजानें दरबार भरविला व त्या दरबारांत हजारों पंडितांशीं चर्चा होऊन संबंदर यानें लीलेनें जैनपंडितांस वादांत जिंकलें. संबंदरचा जयजयकार झाला. त्यानें राजास पुनः शैवधर्माची दीक्षा दिली. राजा यानंतर फार कडक शैव झाला. त्यानें जैनांना आपल्या राज्यांतून काढून लावले व कोणी म्हणतात त्यानें जैनांचा अतिशय छळही केला. संबंदरनें अनेक बौद्धांसही वादांत जिंकलें व त्यांस शैवदीक्षा घ्यावयास लावलें बुद्धधर्म दक्षिणेंतून काढून लावण्याचें व जैनांचें बळ मोडण्याचें फार मोठें कार्य करून संबंदर यानें सनातनधर्माची थोर सेवा केली. त्यानें शिवोपासना वाढविण्यासाठीं शिवस्तुतिपर सुंदर कविताही केली आहे. इ. स. ६४२ मध्यें संबंदर हयात असल्याचा

पुरावा आहे. तामीळ देशांत सर्व शिवमंदिरांतून संबंदर याच्या मूर्तीची देवासारखीच पूजाअर्चा होते. सखोल ज्ञान व अत्युत्कट भक्ति यामुळें त्यावेळचे बौद्ध व जैन पंडित यांचें त्याच्यापुढें कांहीं चाललें नाहीं व **मदुरेच्या जैनधर्मी पांड्यराजास यानें आपल्या पायांशीं आणिलें** व त्यास शिवदीक्षा दिली. या त्याच्या पराक्रमामुळें व गांवोगांव हिंडून यानें हजारों लोकांस परत सनातनधर्मांत आणलें या कामगिरीमुळें याला शैवसांप्रदायांत ' धर्माचार्य ' म्हटलें आहे. हा शिवाचार्यांचा अग्रणी होय. याचे कांहीं चमत्कारही तिकडे प्रसिद्ध आहेत. हा आद्य शंकराचार्यांच्या अगोदर झाला. संबंदर याचा मठ मदुरा येथें असून तेथील विद्यमान मठपति हा त्यापासून ११६ वा पुरुष आहे. काश्मीरांतल्या शिवसंप्रदायांत ' शिवसूत्राणि ' हा या वेळचा ग्रंथ प्रसिद्ध असून त्याचा पुढें ज्ञानेश्वरांनीं आपल्या अनुभवामृतांत स्पष्ट उल्लेख केला आहे, इतकेंच नव्हे तर त्यांतील शिवस्वरूपाला धरूनच त्यांनीं ' शिवशक्तिसमावेशनाचें ' पहिलें प्रकरण लिहिलें आहे. तामीळ शैव वाङ्मयांत अकरा संग्रह एकत्रित केलेले आहेत, त्यांपैकीं पहिले तीन ज्ञानसंबंदर याचे, तीन अप्पर याचे व एक सुंदरमूर्ति याचा. ह्या सात संग्रहांना तिकडे ' **देवारम्** ' अशी संज्ञा आहे, व ह्या सप्तसंग्रहाला ते लोक वेदाइतकें प्रमाण्य देतात. हे ११ संग्रह व पेरीय पुराण ( श. ११०० ) मिळून तामीळ शैवांचें पवित्र वाङ्मय होय. तामीळांत जी ज्ञानसंबंदर याची कामगिरी झाली ती व तशीच कामगिरी पुढें शंकराचार्यांनीं सर्व भरतखंडांत केली व १३ शतकांत ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्रांत केली, हे तिन्ही अवतार एकच आहेत असें मनांत येतें !

**ज्ञानसंबंदर** याच्या शिवभक्तीची थोडीशी ओळख करून देण्यासाठीं त्याच्या कवितेंतील कांही विचारांचें पुढें मराठी भाषांतर देत आहे:—

" त्याच्या कानांत मोतीं आहेत. तो बैलावर बसला आहे. त्याचें मस्तक चंद्रकिरणांनीं प्रकाशित झालें आहे, स्मशानांतील रक्षेनें त्याचें अंग विभूषित झालें शाहे, ह्याच चोरानें माझें चित्त चोरून नेलें आहे !

" आमचा हा एकमेव स्वामी आहे. जिच्या स्तनांतलें अमृत कोणालाही प्यायला मिळालें नाहीं अशीशीं तो संपृक्त झाला आहे. तो पहा-ह्या अन्नामलीच्या शिखरावर राहत आहे, तेथून फेनधवल निर्झरोदकाच्या धारा खालीं घसरत येत आहेत, सर्व पर्वत मौक्तिकबिंदूंनीं चकाकत आहे. तो पिता आहे व माताही आहे, दोन्ही तोच आहे. त्याला जो शरण जातो तो शुभाशुभकर्मफळांपासून मुक्त होतो.

" कावेरीच्या खळखळणाऱ्या प्रवाहाच्या उत्तरतीरावर तो स्थिर बसला आहे. त्याच्या मस्तकावर अर्धचंद्र, गंगा व सर्प आहेत; त्याच्या भोंवतीं शुद्ध कुमारिकांचें वळें पडलें आहे. "

" त्याच्या गळयांत जानवें आहे, मुखानें तो वेदघोष करीत आहे, अंगावर व्याघ्रचर्म आहे, तो अकिंचन पण निरिच्छ आहे. तो त्रिनेत्र आहे. तो मृत्युंजय आहे. मृत्यु त्यानें पायाखालीं दडपला आहे, त्याला शरण जा. तो सर्व पापांचा नाश करितो."

"तो वेदांचें सार आहे. त्याच्यावांचून माझ्या मनाला दुसरा विषयच नाहीं. माझी भक्ति एकविध आहे. माझी संपत्ति-माझें सुखसर्वस्व तोच आहे."

" तो कंठानें विष प्याला आहे म्हणून त्याला नीलकंठ म्हणतात. माझ्या हातीं वीणा आहे तींतला मधुर ध्वनि तोच आहे. त्यानें माझ्या हृदयांत ठाण मांडलें आहे.

" ते वेडे बौद्ध व खुळे जैन खुशाल निंदा करोत. सत्यमार्गापासून च्युत झालेल्यांनीं दुसरें काय करावयाचें आहे ? "

" बाळा ! प्रेमांकुराला सेवेचें सिंचन घाल म्हणजे तुझ्या हृदयांत प्रकाश पडेल व सर्व बंधांपासून तूं मुक्त होशील. प्रेमाचीं सुमनें त्याला अर्पण कर कीं तुझीं सारीं दुःखें लयाला जातील व जिकडे तिकडे सुखाचा-स्वानंदाचा–सुकाळ होईल. "

× × ×

असलीं प्रेमाचीं गोड गीतें संबंदरनें गायिलीं आहेत. आतां आपण अप्परकडे वळूं.

## १० अप्पर.

अप्पर हा कडलोर जिल्ह्यांतल्या एका खेड्यांत जन्मास आला. त्याला एक वडील बहिण होती. वयाच्या १२ व्या वर्षीं तिचें एका लष्करी अंमलदाराशीं लग्न ठरलें होतें, पण लग्नविधि होण्यापूर्वींच त्याला लढाईवर जाणें भाग पडलें व तो लढाईंत मारला गेला. अप्परच्या बहिणीनें जन्मांत पुनः लग्नाचें नांव काढलें नाहीं. पुढें तिचे आईबापही मरण पावले. तेव्हां त्या मायाळु बहिणीवर धाकट्या भावाचा सांभाळ करण्याचें काम आलें व तें तिनें मोठ्या आस्थेनें केलें. विशीच्या सुमारास अप्पर हा जैन पंडितांच्या पाशांत सांपडला ! हे पंडित हिंदु तरुणांस आपल्या कळपांत ओढायला टपलेले असत. त्यांनीं अप्परला जैनधर्माची दीक्षा दिली. अप्पर जात्या बुद्धिमान् असल्यामुळें त्यानें अल्पकाळांतच जैनांचे मुख्य मुख्य ग्रंथ सर्व वाचून काढले. जैन वाङ्मयांत तो इतका पूर्ण निष्णात झाला कीं अल्पावधींतच जैनांनीं त्याला मुख्य धर्माधिकाऱ्याच्या गादीवर बसविले. इकडे त्याच्या बहिणीला अपार दुःख झालें. लग्न फिसकटलें, आईबाप गेले, ज्याच्यावर मदार ठेवून ती दुःख गिळून राहिली त्या भावानेंही धर्मांतर केलें ! या सर्व आघातांमुळें तिच्या दुःखास पारावार राहिला नाहीं तिनें आपल्या गांवचा त्याग केला व ती एका प्रसिद्ध शिवमंदिरांत जाऊन राहिली. शिवाची तिनें मनोभावें आराधना चालविली. आपला भाऊ पाखांडमतांत शिरला याबद्दल तिला फार वाईट वाटे व तो स्वधर्मांत परत यावा याबद्दल ती शिवाची प्रार्थना करी. कांहीं काळानें शंकरानें तिची प्रार्थना ऐकली ! जैनांचा मुख्य या नात्यानें अप्पर तिकडे मोठ्या वैभवांत व आनंदांत राहिला होता. त्याची विद्वत्ता त्याच्या धर्मगुरुत्वाला भूषणभूत झाली. त्याची कीर्ति जैनांत विस्तारली. त्यानें विवाह करून कदाचित् संसारसुखही भोगलें असल्याचा संभव आहे. तो एकदा एका दुर्धर रोगानें आजारी पडला तेव्हां जैन अनुयायांनीं त्याची

सेवाशुश्रूषा केली, नामांकित वैद्यांनीं उपाय केले; पण तो बरा होण्याचें चिन्ह दिसेना. त्याला अकस्मात् आपल्या प्रेमळ बहिणीचें स्मरण झालें व तिच्या भेटीसाठीं तो उताविळ झाला. त्यानें दूत पाठवून तिला भेटीला बोलावण्याचा प्रयत्न केला, पण त्या शिवभक्त हिंदु स्त्रीनें उत्तर पाठविलें कीं 'मी कदापि जैनांच्या मंदिरांत पाऊल ठेवणार नाहीं किंवा कोणाही जैनाचें तोंड पाहणार नाहीं !' अप्पराला हें उत्तर ऐकून दुःख झालें. एके रात्रीं त्यानें जैनांचा वेष, त्यांचा कमंडलु व तीं मोरांचीं पिसें ह्या सर्वांचा त्याग केला व अतिशय आजारी असूनही तो चालत आपल्या बहिणीकडे गेला आणि तिच्या पायांवर मस्तक ठेऊन तिची त्यानें क्षमा मागितली. बहिणीनें भावाला आनंदानें जवळ केलें, ममतेनें त्याची उत्तम शुश्रूषा केली व शंकराच्या कृपेनें तो लवकरच दुखण्यांतून उठला. बहिणीनें भस्म व शिवचरणोदक एवढेंच देऊन त्याला दुर्धर रोगांतून वांचविलें ! त्याची बहिणीच्या संगतीनें शिवावर निश्चळ भक्ति जडली व त्यानें उत्कट भावानें शिवस्तोत्रें गाण्यास आरंभ केला. तो अहोरात्र शिवोपासनेंत निमग्न झाला. रोगमुक्त झाल्यावर त्यानें जें शिवस्तोत्र केलें तें त्याच्या शिवस्तोत्रमालिकेंत प्रथमच दिलें जातें. त्या प्रांतावर त्यावेळीं **पल्लवांचा राजा केदर** याचा अंमल होता. तो जैनधर्मी होता. जैनांनीं त्या राजाचे कान हातीं घेतले व राजसत्तेच्या बळावर त्या शिवभक्ताचा अनन्वित छळ केला. राजाचा एक अधिकारी शिपाईप्यादे घेऊन अप्परास पकडण्यास गेला त्यावेळीं त्या थोर भक्तानें जें उत्तर केलें त्याचा भावार्थ मी मूळ तामीळ पदाच्या आधारें मराठी पदांत सांगतोंः—

**पद.**

**आम्हि कुणासि जाणत नाहीं । शिवचरणावांचुनि कांहीं ॥ ध्रु० ॥**
**ना आम्हां मृत्युची भीती । ना स्वर्गनरक ही खंती ।**
**नृप काय वांकुडें करिती । शिव समर्थ आमुचा पाहीं ॥ १ ॥**
**त्यजुनियां कामिनीकनक । शिव धरिला चित्तीं एक ।**
**द्या द्या ही माझी भाक । जा तुम्हीं परत जा भाई ॥ २ ॥**

**राजांचा हा शिव राजा । मायबाप स्वामी माझा ।**
**वाहिलें त्याचिया काजा । तनमनधन सर्वही कांहीं ॥ ३ ॥**
**हें भस्मोद्धूलित रूप । हें मंगलगान अमूप ।**
**यापुढें पृथ्वीचे भूप । आम्हीं मुळींच लेखित नाहीं ॥ ४ ॥**
**शिवरूप निरंतर ध्याऊं । शिवनाम अखंडित गाऊं ।**
**शिवपदीं अहर्निश राहूं । शिव व्यापक सर्वांठायीं ॥ ५ ॥**

अप्पराला जैन राजाच्या दरबारांत नेण्यांत आलें. त्याला प्रल्हादाप्रमाणें तप्त तैलाच्या कढईंत टाकण्यांत आलें, त्याची मोट मारून समुद्रांत टाकली, तथापि सर्वकाळीं त्याची शिवभक्ति अढळ राहिली. तो म्हणालाः—

**नसे दास मी हो कुणा मानवाचा**
**नसे राहिला धाक मातें यमाचा ।**
**न पापी—न भी मी कदा रौरवास**
**सदा प्रेमभावें स्मरे या शिवास ।**
**पाखंड—कूपांतुनि सोडवीलें । सद्धर्ममार्गीं मज लावियेलें ।**
**या पार्वतीशें मज रक्षियेलें । प्रेमामृतें मन्मन शांत केलें ॥**

## ११ संबंदर व अप्पर

ह्यानंतर कांहीं काळ अप्पराला आपल्या प्रेमळ बहिणीचें सहवाससुख लाभलें. संबंदर व अप्पर ह्या उभय शिवभक्तांच्या प्रथमभेटीचा प्रसंग मोठा गोड आहे ७०० वर्षांनंतर महाराष्ट्रांत ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या भेटींत जो एकात्मतेचा आनंद उसळला त्याचें वर्णन नामदेवांच्या तीर्थावळीच्या अभंगांत आपणांस पाहावयास मिळतें. अगदीं तसाच थाट संबंदर व अप्पर यांच्या भेटीचा उडाला. संबंदर विद्वान्, ब्राम्हण, एकनिष्ठ शिवभक्त, हजारों भक्तांनीं वेढलेला, राजगुरुत्वाचें पद पावलेला व सर्व द्रविड देशांत प्रख्यात आणि अप्पर जैनांनीं केलेल्या छळामुळें व मधुरशा शिवस्तोत्रामुळें एकाच प्रांतांत प्रसिद्धी पावलेला !

दोघेही श्रेष्ठ पुरुष, दोघेही भक्त, अप्पराच्या शिवभक्तीची ख्याति ऐकून संबंदर प्रथम आपण होऊन त्याच्या भेटीस त्याच्या गांवीं आला! अप्परनें आपल्या गांवचे सारे लोक गोळा केले व त्यांच्यासह तो त्यास सामोरा गेला! संबंदराची स्वारी पालखींत बसून मोठ्या वैभवासह गांवाकडे वळली. अप्पर अत्युत्कट संतप्रेमानें पुढें सरकला व त्यानें संबंदराच्या पालखीस खांदा दिला. पालखी गांवांत येतांच संबंदरानें अप्पराचा शोध केला तेव्हां त्यास कळलें कीं अप्पर आपल्या पालखीस लागला आहे! संबंदरानें लगेच पालखीखालीं उडी घेतली. संबंदर व अप्पर हे एक-मेकांस प्रेमानें कडकडून भेटले व निजठेवा प्राप्त झाल्याचा आनंद भोगीत असतांना उभयतांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या! भक्तांच्या भेटीचा शुद्ध आनंद भक्तांनींच भोगावा! ह्या उभय शिवभक्तांचा अकृत्रिम स्नेह चिरकाल टिकला, दोघांनींही अनेक शिवक्षेत्रांच्या यात्रा बरोबर केल्या व शिवभक्तीचा प्रसार केला. त्यांच्या एकवटलेल्या प्रेमानें शिवभक्तीचा सात्त्विक प्रसार करण्याचें एवढें मोठें कार्य केलें कीं तें कदाचित् दोघां-सही पृथक्त्वानें करितां आलें नसतें. अप्पराच्या शिवभक्तीची ख्याति ऐकून ज्या जैनांच्या केदार राजानें त्याचा पूर्वीं छळ केला होता तोही अनुताप पावला व अप्पर यास शरण आला. अप्परानें मोठ्या प्रेमानें त्यास शिवदीक्षा दिली. त्यानें एक प्रचंड शिवमंदिर उभारलें. ज्ञानसंबंदर विष्णुलोकीं गेल्यावर अप्पर तंजावरप्रांतांत कावेरीतीरीं थिरुऐयरु ह्या शिवक्षेत्रीं दीर्घकाल राहिला. अप्परचीं शिवस्तोत्रें तामीळ देशांत आज कैक शतकें लोकांच्या तोंडीं आहेत. त्याचीं ३०० स्तोत्रें प्रसिद्ध आहेत, प्रत्येक स्तोत्रांत चारचरणी दहा पद्यें असतात. त्याची भाषा साधी पण ओजस्वी आणि हृदयाचे पडदे उकलणारी आहे, त्याच्या कवि-तेचा थोडासा मासला भाषांतररूपानें पुढें देतों:—

**अभंग.**

**सत्यनिष्ठ मुनी तूतें शोधिताती । पार्वतीचा पति प्राण माझा ॥ १ ॥**
**भक्तांच्या हृदयीं योगियांच्या ध्यानीं। राहसि प्रकाशूनी देवदेवा ॥२॥**

प्रेमळांचा सखा विश्वाचें जिव्हार । तूं होसी अपार तोषदाता ॥३॥
मातें मी न जाणे तूतें मी न जाणे । हेंचि एक जाणे दास तुझा ॥४॥

श्लोक.

गंगाप्रवाहीं जरि स्नान केलें । कावेरितीरीं तप आचरीलें ।
विश्वात्मकासी नच वोळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥१॥
आपादिलीं तीं जरि वेदशास्त्रें । बापा! दिलीं त्वां धनधान्यवस्त्रें ।
प्रेमस्वरूपासि न वोळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥ २ ॥
त्या योगसिद्धी जरि राबल्या घरीं । तपार्थ वा आदरिली जरी दरी!
ज्ञानस्वरूपासि न वोळखीलें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥३॥
व्रतोपवासादिहि सर्व केलें । शरीरवाचामन आवरीलें ।
प्रेमामृतीं सर्व न हें विरालें । सारें तरी व्यर्थचि व्यर्थ गेलें ॥ ४ ॥

आर्या.

काष्ठीं अग्नि जसा वा, दुग्धीं घृत, सागरोदकीं लवण ।
पुष्पीं परिमळ तैसा भरला विश्वांत पार्वतीरमण ॥

## १२ सुंदरमूर्ति.

**सुंदरमूर्ति** ह्याचा जन्म अर्काट प्रांतांत ९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. हा जातीनें ब्राह्मण होता, पण ह्याच्या दोन्ही बायका ब्राह्मणेतर होत्या. एक तिरुवारूर येथील शिवमंदिरांतील नर्तकी होती व एक मद्रासकडील वेह्माळ जातींतली होती ! दोन्हीं नारींच्या ह्या दादल्याचा जन्म मात्र दारिद्र्यांत व संकटांत गेला. त्याला बायकांचें पोट भरण्याचीही पंचाईत पडे. संबंदर व अप्पर यांच्या खालोखाल ह्याच्या कवितेची योग्यता मानतात. हा शेवटचा सन्मान्य शैव होय. ह्याच्या काव्यविचाराचा थोडासा मासला पाहूं—

पृथ्वीवृत्त.

तुझें स्मरण जन्मुनी पळभरीहि केलें नसे
शरीर विषयांत वा विषयपुंज देहीं वसे ।

सुखार्थ भ्रमलों जगीं बहु उनाड पोळापरी
परंतु सुखलेशही गवसला न मातें तरी ॥ १ ॥
तुवांचि धरिलें मला निजकरीं कृपासागरा
तुलाचि फुटला कसा मजवरी दयेचा झरा ।
न भक्तिलव ठाउका न घडलीहि सेवा जरा
अशा मज असाधुला झडपिलेंचि भूतेश्वरा ! ॥२॥
न सोडिन तुझे विभो ! चरण, जीव गेला तरी
तुला न विसरेन मी दृढ धरीन अभ्यंतरीं ।
कदाचितचि विस्मृती घडलि थोर पापास्तव
तरी त्यजिल वैखरी न 'जयशंकरा' हा स्तव ॥३॥

ओव्या.

कविजनहो ऐका मात । तुम्हांसि करितों एकांत ॥
द्रव्य पाहिजे प्रभूत । तरीही ऐका वचन माझें ॥ १ ॥
श्रीमंत लौकिकी-जन । असत्यकाटें काटलें मन ॥
शठ कपटी दुर्जन । त्यांचे पवाडे गाऊं नका ॥ २ ॥
द्रव्यास्तव न व्हावें लाचार । श्रीमंत करिती नाना चार ॥
गोष्ट सांगतों साचार । भजा निरंतर शंकरातें ॥ ४ ॥
तो पुरवील सर्व कामना । देईल इहलोकींच्या धना ॥
दुःख निरसूनि मोक्षनिधाना । देईल ऐसा समर्थ ॥ ५ ॥
दुर्बळातें भीमार्जुन म्हणावें । कृपणातें कर्ण बोलावें ॥
ऐसें कासया शिणावें । व्यर्थ चावटी करूनियां ! ॥ ६ ॥

## १३ माणिक्क वासहर

शालिवाहनाच्या ९ व्या शतकांत हा ब्राह्मण मदुरेच्या पांड्य राजाचा मुख्य दिवाण होता. यानें वेदाध्ययन चांगलें केलें होतें. यानें पुष्कळ गुरु धुंडले पण याचें समाधान करणारा कोणी भेटला नाहीं. तंजावर प्रांतांतील एका सुप्रसिद्ध शिवमंदिरांत तो आला असतां शिवानें

त्याचें मन हरण केलें, त्याला शिवभक्तीचें वेड लागलें. हें वेड लागायला त्या मंदिराच्या ओरींतला एक निस्सीम शिवभक्त कारण झाला. सत्संग देवाकडे नेत असतो, सत्संगांतच चित्त देवाकडे रंगतें. त्या दिवाणाला तो शिवभक्त मूर्त शिवावतार वाटला व तो त्याचे चरणीं नम्र झाला. राज्य-कारभारांत त्या दिवाणानें आयुष्य घातलें होतें. दरबारी ऐश्वर्य, संपत्ति, मानसन्मान, सुंदरस्त्रियांचा परिवार या सुखांत त्यानें पुष्कळ वर्षें काढलीं. " सुखसमुद्रांत मी पुष्कळ गिरक्या खाल्ल्या, व्यवहाराच्या बाजारांत पुष्कळ खोटीं कामें केलीं, पण जन्ममरणाच्या भोंवऱ्यांतून सुटावें व 'मी माझें' या पाशांतून मुक्त व्हावें हा विचारही माझ्या मनाला शिवला नाहीं " असें त्यानें म्हटलें आहे. त्या राजस परिस्थितीला त्याचें मन विटलें. शिवभक्तीनें त्या दिवाणाला दिवाणा केला. मदुरेस तो परत गेला व सर्व संपत्ति त्यानें दानधर्मांत खर्च केली आणि वितृष्ण होऊन शिवभक्तींत तो पूर्णपणें रंगून गेला. शिवाचे नामाचा जयघोष करावा व येतील तशीं शिवाचीं गाणीं गावींत हें त्याला व्यसन जडलें. त्याच्या गुरूनें त्याला 'माणिक्य वासहर' म्ह. 'माणिक्यवाचक'—अर्थात् मोत्यांच्या ओळी बोलणारा, ज्याच्या वचनपंक्ति मोत्याच्या दाण्यांसारख्या अमोल आहेत असा—ही पदवी दिली व याच नांवानें तो पुढें लोकप्रसिद्ध झाला. शिवाचें गुणनाम गात तो दाक्षिणभर फिरला. भक्तियोगानें त्याला कांहीं सिद्धीही प्राप्त झाल्या. त्यानें चिदंबरम् येथें शिवप्रसादार्थ तप केलें. एका चोल राजकन्येला त्यानें वाचा दिली, सिंहलद्वीपांतील बौद्ध पंडि-तांना त्यानें वादांत पराभूत केलें, अशा त्याच्या कांहीं गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्याचीं अनेक शिवगीतें प्रसिद्ध आहेत. तिरुक्कोवैय्यार नांवाचें एक ४०० पद्यांचें त्याचें पुस्तक आहे. त्याचीं गीतें गाणारा शिवभक्तींत मस्त होतो. माणिक्याच्या वाणीनें ज्याचें हृदय द्रवत नाहीं त्याचें हृदय कशानेंही द्रवणार नाहीं अशा अर्थाची तामीळ भाषेंत एक म्हण आहे. त्याच्या कवितांचें डॉ. पोप यानें इंग्रजी भाषांतर केलें आहे !

त्याच्या पद्यांत बहुविधत्व आहे. त्याच्या कवितेपैकीं कांहीं अनुतापाच्या व वैराग्याच्या आहेत, कांहींत प्रेमाच्या प्रार्थना आहेत, कांहींत कृतार्थतेचे उद्गार आहेत. माणिक्याची भावगीतें मनोरम आहेत. त्याच्या कवितेंत सत्संगाचा महिमा उत्कृष्ट वाखाणिला आहे. साधुसंगतीची माणिक्याला फार आवड असे. बायकांनीं दळणकांडण करितांना किंवा खेळतांना गावींत अशीं कांहीं गाणीं त्यानें रचिलीं आहेत. हा काव्यप्रकार तेव्हां अगदींच नवीन होता. भ्रमर, कावळा, कोकिळ यांना त्याची कविता थोडीशी स्पर्श करून गेली आहे. त्याच्या वाणीचा आपण थोडासा प्रसाद घेऊं:—

" पृथिवी, वायु, तेज, आकाश, प्राण्यांचें शरीर आणि आत्मा सर्व कांहीं तूं आहेस. जें कांहीं आहे तें तूं आहेस आणि नाहीं तेंही तूं आहेस ! आहे नाहीं सर्व तूंच आहेस. हे शिवराजा ! माणसें ' मी आणि माझें ' याविषयींच्या मूर्खपणाच्या कल्पनांनीं कशीं नाचत असतात हें तूं पाहतोस व त्यांची सर्व सूत्रें तूं आपल्या हातीं वागवितोस ! तुझे अमित गुण कोण वर्णू शकेल ?

" तुझा प्रसाद पूर्ण झाला असा भरंवसा मला कधीं वाटेल ! या भाग्याची सकाळ कधीं उगवेल ? असा दुःखातिरेकानें मी आक्रोश करित असतों हें तुला दिसत नाहीं काय ?

" माझा वासनात्मक अंतर्देह विरघळून गेला, त्याबरोबर प्रेमाची भागीरथी दुथडा भरून वाहूं लागली, माझीं सर्व इंद्रियें शिवस्वरूप झालीं. कांपत अडखळत ' हे देवराया ! ' असे शब्द माझ्या तोंडून आले, मी नम्र होऊन हात जोडले. सुमनाप्रमाणें माझें हृदय विकास पावलें.

" त्यानें माझी भीति निवारली आहे. अमृतवृष्टि करीत तो आला व मी त्याच्या प्रेमांत विरून नाहींसा झालों असतांना त्यानें मला आपलेसें केलें ! यापुढें मी कोणाचाही किंकर नाहीं. मी आतां कोणालाही भीत नाहीं. पावायचें तें सर्व मी पावलों आहे.

" मी वैभव मागत नाहीं, मला धनाची वांछा नाहीं, मला हा लोक

नको, स्वर्ग नको. जन्म किंवा मरण दोन्ही मला नकोत. ज्याच्या अंतरांत माझा शिव नाहीं त्याचा स्पर्शही मला नको ! देवाचे पाय मी चित्तांत धरिले आहेत त्यामुळें मला विश्वाचें साम्राज्य मिळालें आहे, मी मी येथून कोठें जाऊं इच्छित नाहीं.

"मला पाहिजे तर नरकांत ढकल, पण तुझी मजवर दया असों दे. तुझ्यावांचून मी दुसऱ्या कोणाला बरें ईश्वर म्हणून हांक मारूं ?

"मी तुझ्या भक्तांसारखा जगाला दिसलों तरी मी खरोखर तसा नाहीं. हें सारें वरपंग आहे. तुझ्या स्वरूपाकडे माझें चित्त वेगानें धांवत आहे. तुझा प्रसाद होऊं दे, तुझ्या चरणीं अखंड प्रेम दे व प्रेमानें आर्द्र होणारें अंतःकरण दे.

"त्याला सर्व शोधतात पण कोणीही यथार्थ जाणत नाहींत. तो अत्यंत निर्मल व परम मंगल आहे. मनुष्याच्या दृष्टीला न दिसणाऱ्या, कोणाच्याही कानाला ऐकूं न जाणाऱ्या गोष्टी त्यानें मला सांगितल्या आहेत ! त्यानें माझ्या जन्माचें खंडण केलें आहे. त्यानें मला प्रेमानें बांधून घेतलें आहे. असली जादू त्याच्याजवळ आहे !

"मी त्याच्या दासांच्या दासांच्या मेळ्यांत मिसळलों असून मी अधिकाधिक सुखांत वाहत चाललों आहे. नाचावें आणि गावें हाच माझा व्यवसाय आहे."

## भ्रमर[1]-दूत.

"कठिणचित्त व मुग्ध असा मी–पण मला त्यानें कांहीं नांव ठेवलें नाहीं; माझें हृदय कठिण पण त्यानें वितळायला लावलें आणि आपल्या दयेनें त्यानें मला तन्मयता दिली ! त्याच्या तळ्यांत किती सुंदर हंस[2] आहेत. हे भ्रमराधिपा ! धांव, त्याच्या हातांतील सुवर्णकटकावर जाऊन बैस व माझा निरोप गुंजारव करीत त्याला सांग !

"मी मूर्ख पण त्यानें आपले गुणानुवाद गायला मला लावलें आहे. मी

१ मनावर भ्रमराचें रूपक केलें आहे असें वाटतें. २ निर्मल भक्त.

वेडा पण त्यानें क्षमा केली आहे. तो देव ( हर ) व ती माझी आई ( पार्वती ) आहे. भ्रमराधिपा ! जा व माझा निरोप त्याला गुंगत गुंगत कळीव.

" माझें मन व चित्त त्याच्यापासून फार दूर बहकलें असतें पण माझ्या मायबापांनीं ( शंकरपार्वतींनीं ) मला सांवरलें म्हणून मी ठिकाणावर आहे ! त्यांनीं माझा उद्धार केला आहे ! भ्रमरराज ! जा, त्याच्या चरणावर मधुबिंदु आहे. तेथें माझा निरोप गात बैस.

" ह्या जगाच्या भ्रममय द्रव्यनिधानांत मी बुडालों होतों, आत्मवंचना करून अहंकारांत मस्त होतो, जगालाच सत्य मानून उराशीं धरिलें होतें—पण त्यानें मला आपला म्हटलें व मिथ्यामोहांतून सोडविलें ! माझे सर्व प्राण आतां तोच आहे. भ्रमरा ! जा, त्याच्या चरणकमलीं गुंजारव करीत माझे शब्द त्याच्या कानांवर घाल ! "

### कोकिळ.

" ऐका ! ऐका ! ह्या द्राक्षांच्या बागेंत तो कोकिळ गात आहे. त्यानें स्वर्ग तुच्छ केला आहे, व तो आपणां मानवांच्या करुणेनें पृथ्वीवर अवतरला आहे. तो उदार दाता आहे. माझ्या देहपंजरांत तो शिरला पहा ! माझें मनच तो होऊन गेला आहे ! त्या कमलाक्षी पार्वतीचा वल्लभ—तोच तोच ! त्याला मजकडे घेऊन या ! "

### ओवी.

**दीर्घकाल विषय सेविले । आयुष्य म्यां व्यर्थ वेंचिलें ॥**
**शिवचरण नाहीं वंदिले । अभागी मी बापुडा ॥ १ ॥**
**असो झालें तें होवोनि गेलें । परी आतां मद्भाग्य उदेलें ।**
**शिवें आपुलें म्हणितलें । अंगीकारिलें वत्सलें ॥ २ ॥**
**शिव माझा हिरा खरा । सकल मंगलांचा तुरा ।**
**तेणें जन्ममरणांसी चिरा । लावुनी मुक्त पै केले ॥ ३ ॥**

* * * * *

**अत्यंत मूढ मी खरा । परी पावलों या हरा ।**
**आतां दुःखाचें नांवही जरा । उरलें नाहीं ॥ १ ॥**

शिवचरणीं ठेवितां डोई । उद्वेग कांहीं राहिला नाहीं ।
अनंत सुखाचिया डोहीं । तेणें मातें बुडविलें ॥ २ ॥

हें सुख देवादिकांहीं । वांच्छितां स्वर्गींही मिळणें नाहीं ।
बाप भाग्याची नवलाई । अपार मातें दिधलें ॥ ३ ॥

## १४ तिरु मुल्लर

हा म्हणतो "प्रेम व देव भिन्न आहेत असें अज्ञजन म्हणतात, पण प्रेम व देव एकरूप आहेत व हें विरळ पुण्यात्मेच जाणतात ! प्रेम हाच देव होय ! दोनी एकरूप आहेत हें लोकांस कळेल तर ते देवाच्या प्रेमांतच निमग्न होतील. ज्याचें सर्वांभूतीं प्रेम नाहीं त्याचें देवावर प्रेम नाहीं असें खुशाल समजावें."

वेद तूं शास्त्र तूं दानजपयज्ञ तूं
सत्य तूं मिथ्य तूं ज्ञान अज्ञान तूं ।
तेज तूं तमहि तूं, सौख्यदुःखादि तूं
अर्ध तूं सकल तूं, बंधमोक्षादि तूं ॥ १ ॥
सकल वृद्धांहुनी वृद्ध तूं
सकल नूत्नांमधें नूत्न तूं
सर्व तूं-अणुहि तूं, तुजविना नाडळे
नाकळे चरित-मी शरण आलों बळें ॥ २ ॥
भक्त तूं देव तूं माव तूझी हरा
त्वद्विना आमुतें अन्य नच आसरा ।
भक्त रूपें तुझीं सगुण हीं साजिरीं
करुत बा ! दया पूर्ण आम्हांवरी ॥ ३ ॥

चातुर्वर्ण्यबाह्य अशा अंत्यज वर्गात जन्मलेला नंदनामक एक प्रेमळ शिवभक्त अर्काट जिल्ह्यांतल्या एका खेड्यांत होऊन गेला. हा तामीळ प्रांतांतला चोखामेळा होय ! त्याचें मधुर चरित्र आतां आपण गाऊं:—

## १५ प्रेममूर्ति नंद

मृण्मय शिवलिंगाभोंवतीं नाचावें, 'नटराज नटराज' असें भजन करावें, शिवमंदिराच्या शिखराचें लांबून दर्शन घ्यावें, उत्सवांत प्रेमपूज्य-भावानें दुरूनच मनानें सामील होऊन रमावें, परोपकाराची संधी गमावूं नये, असा नंदाचा बालपणींच अंगस्वभाव बनला होता. त्याच्याठायीं भक्तीचा जिव्हाळा फार मोठा होता. मृदंगाला लागणारें कातडें उत्तम कमावून करून तें त्यानें भक्तिभावानें शिवमंदिरांत अर्पण करावें, अंगाला भस्म लावून शिवनामाचीं आवर्तनें करीत आनंदांत नाचावें, हा त्याचा नित्यक्रम असे. एकदा एका ब्राम्हणाच्या तोंडून चिदंबरम् येथील नटराज शिवाचें माहात्म्य ऐकून तो तन्मय झाला चिदंबरम् येथें पंचलिंगांपैकीं एक लिंग आहे. हें क्षेत्र शैव व वैष्णव यांना सारखेंच पूज्य आहे. तेथील शिवमंदिरापासून नजीकच श्रीगोविंदराज पेरुमलचें म्हणजे विष्णूचें प्रख्यात मंदिर आहे. येथील नटवर शिव व गोविंदराज विष्णु हे दोनी देव श्रीमंत आहेत. शैवांचें तर हें चिदंबरम् महाक्षेत्रच आहे. चैतन्यानें व्यापलेलें आकाश असा चिदंबर शब्दाचा अर्थ आहे; मंदिराच्या मध्यभागीं सोन्याचीं कौलें घातलेला 'चित्सभा' नांवाचा मंडप आहे. नटराजाची मूर्ति अतीव मनोहर आहे. मस्तकावरचा जटाजूट, सुंदर व दीर्घ नासिका, आतां जणूं बोलणार असा आविर्भाव दाखविणारे विशाळ नेत्र, सुखानंद व दया यांचें निवास असें सुंदर मुखकमल, विशाळ व उठावदार बाहु व बहुमोल बाहुभूषणें, नृत्याची ऐट, उजव्या हातांतला डमरू—नटराजाचें हें ध्यान नास्तिकालाही प्रेमाचा पाझर फोडील असें सुंदर आहे ! अप्पर-माणिक्यादि शिवभक्तांनीं नटराजाचें ह्म० शिवाचें फार गोड वर्णन केलें आहे. उत्पत्तिस्थितिसंहाररूप जगाचें नाटक करणारा व स्वतः अलिप्त राहून भक्तांचा उद्धार करणारा हा नटराज पाहून भाविक वेडे होतात, अभाविक चकित होतात व चित्रकार दिपून जातात ! विश्वाचे अनंत व्यापार हा या नटराजाचा खेळ आहे. बालांच्या लीलांत, स्त्रियांच्या विलासांत, राष्ट्रांच्या रणरंगांत, नक्षत्रतारांच्या फेऱ्यांत, वृक्षवनस्पतींच्या सौंदर्यांत, उत्पत्तींत आणि प्रलयांत, परमाणूत आणि ब्रह्मांडांत, सर्वत्र

नटराजाचें तांडवनृत्य भक्तांच्या दृष्टीला गोचर होत असतें ! ज्ञानाच्या दृष्टीला ह्या नृत्यांत ब्रह्मानंद होतो. अंतर्गत विकार आणि बाह्य सृष्टीचे व्यापार यांवर विजय मिळवून स्वात्मसुखांत मग्न असणारा महापुरुष कसा असतो ह्याचें हें प्रत्यक्ष चित्र आहे. योगी पतंजलि व भक्त व्याघ्रपाद हे दोघेही नटराजाच्या ध्यानसुखांत मग्न झाले होते.

नंदानें ब्राह्मणाच्या मुखानें चिदंबरक्षेत्राचें व नटराजाचें सुंदर वर्णन ऐकलें व तो तें ऐकतां ऐकतांच तन्मय झाला. त्याच रात्रीं त्यानें चिदंबराला जाण्याचें ठरविलें, पण त्याच्या जातभाईनीं त्याला सांगितलें कीं ' आतां रात्र फार झाली आहे, देवळाचीं दारें लागतील आणि शिवाय तूं ज्या ब्राह्मणाचा नोकर आहेस तो तुझा मालक तुजवर रुष्ट होईल. त्याची तुला परवानगी घेतली पाहिजे. ' नंदाला हें पटलें. तो अत्यंत सात्विक वृत्तीचा व प्रेमळ होता, बंडखोर नव्हता ! त्याच्या मनांत ब्राम्हण, वेद, धर्म, मंदिरें, पूजा, गोपुरें, यात्रा, महोत्सव, भजनें, उपवनें, नद्या, या सर्वांविषयीं पराकाष्ठेचा आदरभाव वसत होता. नंद म्हणाला 'हें म्हणणें बरोबर आहे. परमेश्वरानें मला ज्या स्थितींत ठेवलें आहे तीच मला योग्य असली पाहिजे. देव सर्वज्ञ व दयाळु आहे. माझें कल्याण कशांत आहे हें माझ्यापेक्षां अनंतपटीनें त्याला अधिक कळतें. त्याच्या इच्छेला शरण जाणें हें मंदिरांत जाण्यापेक्षांही अधिक श्रेयस्कर आहे. मी माझ्या ब्राह्मण धन्याच्या पायां पडेन, त्याला विनवीन व त्याला राजी राखून त्याच्या आज्ञेनेंच चिदंबरम्ला जाईन.' त्यानें नंतर आपल्या बंधुवर्गाला मदतीला घेऊन पाणी पिण्याचा एक तलाव खोदला. नंदाला चिदंबरम्चा निदिध्यास लागला शेतांत काम करीत असतांना, जागृतींत व निद्रेंत, घरीं व दारीं, त्याला नटराजाचा सारखा ध्यास लागला. ध्यासांत पारमार्थिक कोडीं सहज उलगडत असतात. त्यानें आपल्या जातीच्या मुलांचें व प्रौढांचें एक 'भजनमंडळ' बनाविलें. शिवाचें नामस्मरण, भस्मलेपन, भजन, प्रहरप्रहर एकांतांत ध्यान, असा त्याचा अभ्यास वाढत चालला, व त्याचें हृदय लोण्यासारखें मऊ होऊन सर्व

प्राणिमात्रांशीं तो अत्यंत नम्रतेनें व प्रेमानें वागूं लागला. त्याची स्थिती निर्वैर व निर्विकार बनत चालली. जनावरांना मारणें, मांसाशन, कटु-भाषण, इ० गोष्टी त्याला वर्ज्य झाल्या. तो आपल्या लोकांना बोध करूं लागला व यामुळें त्याच्या जातीचे कांहीं लोक त्याचा द्वेष व पुढें पुढें छळही करूं लागले! वृक्षवेली, नदीपर्वत, नक्षत्रतारा, चंद्रसूर्य या ईश्वराच्या सृष्टीकडे कौतुकानें पहावें व देवाच्या प्रेमानें त्यानें अधिकच तन्मय व्हावें. तो मनाशींच म्हणाला: 'हा संसाररूप मायेचा पसारा नटराजाच्याच चरणाचा प्रताप आहे. हे शंकर! तूं दिसतोस तसा नव्हे तर आहेस तसा मला पाहूं दे!' नटराजाच्या चरणध्यानांत मग्न होऊन त्याच्या नेत्रांतून अश्रु वहावेत. शहाण्यांनीं नंद पागल बनला असें ठरविलें! त्यांनीं बाहेर शेतांत जमातीची सभा भरवून याला चिंचेच्या झाडावरील पिशाचानें झपाटलें आहे असा ठराव केला! शंभर बकरीं मारून एका क्षुद्र देवतेचा उत्सव गांवकऱ्यांनीं करायचें योजिलें! नंद मनांत म्हणाला, 'नटराजाच्या नाटकांतलाच हा एक प्रवेश चालला आहे.' पेदारि, विर, इकला इ० क्षुद्र व मानीव देवतांच्या नादीं अडाणी पंचम होते. नंद एका महादेवाशिवाय कोणीही जाणत नव्हता. लोकांचा व त्याचा संवाद झाला तो असा:—

लोकः— **पेदारि बावा शेताच्या देवा।**
**नंदाचा सांभाळ तुम्ही करावा ॥ १ ॥**

नंदः— **बळिया नटवर–दुजा न कोणी।**
**नंदाचा लाडका एकच धणी ॥ २ ॥**

लोकः— **पागोटं मोठं 'विराच्या' शिरीं।**
**त्याचेच पाय आम्ही धरूं उरीं ॥ ३ ॥**

नंदः— **व्यापूनि राही ब्रह्मांड सारं।**
**पागोटं त्याला कैचं बारं! ॥ ४ ॥**

लोकः— 'इकला' देवाचि भूकच मोठी ।
हजारो बकरीं त्याच्या पोटीं ॥ ५ ॥
नंदः— अरंरं ! निष्ठुर देव कसं ।
देवाच्या पोटीं दया वसं ! ॥ ६ ॥

नंदाच्या जातभाईना नंदाचें म्हणणें रुचलें नाहीं, नव्हे समजलेंच नाहीं ! त्यांनीं बकरीं वगैरे चराचरा कापायला आरंभ केला. नंदाला हें असह्य झालें. सर्व प्राणी देवाचीं लेकरें आहेत, देव एक नटराज आहे, देव दया-सागर आहे, हें त्यानें लोकांना सांगितलें; पण कोणी ऐकलें नाहीं. नंद तेथून निघून गेला. लोक नंदावर चिडले. त्यांनीं नंदाच्या मालकाचे कान भरले. नंद चिदंबरमला जायला अत्युत्सुक झाला, पण मालकाची आज्ञा होईना. मालक ब्राह्मण जमीनदार श्रीमंत होता व सारे गांवकरी त्याच्या शेतांत खपणारे होते. नंदानें मोठा हिय्या करून मालकाला परवानगी विचारली. मालक संतापला, ' मूर्खा ! तुला चिदंबरला जायला पाहिजे काय ? ब्राह्मण व्हायची तुला हांव सुटली आहे ? ' नंद रडत घरीं आला. तो म्हणाला " देवा ! तूं किती निष्ठुर आहेस ! माझ्या धन्याला मी दोष देत नाहीं. त्याला प्रेरणा देणारा तूंच आहेस. तुझ्या आज्ञेवांचून परमाणुही हालत नाहीं. मी दीन अंत्यज ! ना माझ्यापाशीं धन, ना रूप, ना कीर्ति, ना बुद्धि, ना ज्ञान. पण तुझ्या दयेवांचून मला कांहींही नको. ती दया तूं केव्हां करणार ! धण्याच्या धण्या! बोल किं रे ! मी हीन दीन अमंगळ आहे; पण सर्वस्वी तुझा आहे. " तो आपल्या-शींच बोलला; " नटराजाला माझी काळजी आहे. माझें हित मला कळत नाहीं, माझें हित अनंतपटीनें माझ्या देवाला कळतें ! तर मग ही तळमळ कां ? मी ईश्वराच्या इच्छेला शरण असलें पाहिजे. धन्याची प्रसन्नता मला जोडतां आली नाहीं, तर माझीच बंडखोरी देवाच्या व माझ्या आड येणार आहे. मी आज्ञाधारक व शरणागत झालों कीं माझ्या ब्राह्मण धण्याला द्रव येईल व देवही प्रसन्न होईल. " नंदाच्या

हृदयाची ह्या सात्विक विचारानें शुद्धि झाली, त्याच्या चित्ताला दीर्घकाळ न मिळालेली शांति मिळाली. तो एकांतांत रमूं लागला, ध्यानसाधनांत त्याचा काळ अधिक जाऊं लागला, मला दर्शन देण्याची देवाला इच्छा होतांच माझ्या धण्याची बुद्धि बदलेल व तो मला जाऊं देईल असा त्याचा निश्चय झाला. जें जें दिसेल त्यांत त्याला नटराज दिसूं लागला. कधीं त्यानें वृक्षाला कवटाळावें, कधीं पक्ष्यांच्या मागें धांवावें, कधीं जळाशीं खेळावें! याचें वेड वाढत चालल्याचें पाहून याच्या लोकांना वाईट वाटलें. त्यांनीं याचा परोपरीनें छळ केला; त्याला बांधलें—मारलें सुद्धां! नंद म्हणाला 'हा त्यांचा दोष नाहीं. दयासागरा! ह्या अडाणी जीवांना क्षमा कर.' त्याचें मन अतीव कोमल झालें. रस्त्यांत कीडमुंगी दिसली कीं त्यानें हलक्या हातानें ती उचलून बाजूला ठेवावी, हेतु कीं तिच्यावर कोणाचा पांय पडूं नये! शेतांतून मुंग्यांना साखर घालीत त्यानें फिरावें. सर्वांशीं मृदु शब्दांनीं बोलावें. त्याचे काम, क्रोध, लोभ पार गेले. त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची प्रभा पसरली! त्यानें पुन्हा एकदां रजेचा शब्द काढला तेव्हां धणी म्हणाला: "नंदा! तूं खरोखर भला मनुष्य आहेस, पण अलीकडे तूं उनाड झाला असून कामाकडे तुझें लक्ष नाहीं. हे हंगामाचे दिवस आहेत; तुला माहीत आहे. धान्याची मळणी होऊन रास झाली कीं मी तुला चिदंबरमला जायला रजा देईन." धन्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच नंदाला अत्यानंद झाला व तो हरिणाप्रमाणें उड्या मारीत गात नाचतच धण्याच्या शेतांत गेला. दोन प्रहरांतच परत येऊन तो धन्यास म्हणाला 'चला, एकदां शेतांत येऊन पहा.' नंदाचा तो उल्हास पाहूनच धणी चकित झाला. नंदाबरोबर शेतांत येऊन पाहतो तों त्याला काय दिसलें? सर्व धान्याची मळणी व रास होऊन काम पुरें झालेलें! नंदाचा धनी मनांत चरकला व नंदाला म्हणाला 'नंदा! हें मी काय पाहत आहें? अरे! तुलाच काय पण साऱ्या लोकांना मिळून

१ 'ते वाट कृपेची करीत। ते दिशाचि स्नेहभरित। जीवांतळीं आंथरित। आपुला जीव' (ज्ञाने० १३-२५०).

दोन आठवड्यांतही जें काम करितां आलें नसतें तें अवघ्या दोन प्रहरांत झालें कसें ? माझ्या ह्या शेतांत देवानें हा केवढा चमत्कार करून आज दाखविला आहे ! नंदा ! हा सारा तुझा पुण्यप्रताप आहे खास ! हें तुझ्या भक्तीचें फळ आहे. तुझी योग्यता देवानें आमच्या नजरेस आज आणली आहे. मी साऱ्या जन्मांत तुझ्यासारखा पवित्र भक्त दुसरा पाहिला नाहीं. अरेरे ! तुला नोकर म्हणून वागविण्यांत माझे हातून घोर पाप घडलें आहे. ह्या क्षणापासून नंदा ! तूं माझा स्वामी आणि मी तुझा सेवक आहें असें समज ! माझी सारी संपत्ति व जमीन तुझी आहे. तुझ्या निकटवर्ती शंकराजवळ माझ्याबद्दल विनवणी कर व मला माझ्या उद्धाराचा मार्ग दाखीव !' परमेश्वराच्या कृपेनें सारें पारडें फिरलें. स्वामी तो सेवक व सेवक तो स्वामी ! अत्युत्कट भक्तीचा महिमा किती थोर आहे ! साक्षात् भगवान् जेथें भक्ताचा दास होतो तेथें एका सामान्य जमीनदाराची कथा काय ? असो. त्या ब्राह्मणानें सद्गदित होऊन नंदाचे पाय धरिले, नंदानेंही अश्रु ढाळीत त्याला उठविलें व ' हं हं ! मालक ! असें उलटें कसें होईल ? मी आपला सेवक व आपण माझे मायबाप आहांत ' असें म्हणाला. त्या ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व लोपलें, नव्हे—खरें ब्राह्मण्य उदित झालें ! त्याचा अहंकार गेला. 'तूंच माझा गुरु आणि देव आहेस. मला पातक्याला क्षमा कर ' असें म्हणून त्यानें नंदाच्या गळ्याला मिठी मारली. शिवस्वरूपीं दोघे एकमय झाले, देहबुद्धीच्या दोघेही पार गेले. 'चिदंबरमला जा, पण माझें स्मरण ठेव व नटराजाच्या पायीं माझी दाद लाव. हे साधो ! मला जातांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून मग जा ' असें तो ब्राम्हण म्हणाला, तेव्हां नंद विनयपूर्वक एवढेंच बोलला, " बायकापोरांवर, घरादारांवर, संपत्तीवर जेवढें प्रेम करितां तेवढेंच देवावर करा, यापेक्षां मी आपला दास आपल्याला अधिक तें काय सांगणार ? " नंद चार पावलें गेला नसेल तोंच त्या ब्राह्मणानें नंदाला पुन्हा हांक मारिली, व वियोगदुःखानें विव्हळ होऊन रडत रडतच तो म्हणाला ' नंदा ! माझ्या सद्गुरो ! आपण परत केव्हां

याल ? आपलें दर्शन पुन्हां केव्हां होईल ? ' नंद म्हणाला ' मालक ! चिदंबरम्ला जाऊन परत कशाला यायचें ? देवाच्या भेटीला जाऊन मागें फिरायचें नाहीं ! देवाच्या दर्शनांतच मोक्ष. मी परत नाहीं बरें यायचा. आतां देव तेथें मी. हा देह अन् हा संसार यांना कायमचा रामराम !' नंद उड्या मारीतच चिदंबरम्ची वाट चालूं लागला. पळूं लागला म्हणणें जास्त खरें होईल ! आनंदभरांत नटराजाच्या दयेनें त्याचें चित्त भरून येऊन त्याच्या मुखांतून पुढील अर्थाचें गाणें आलें:—

**औषधी औषधी दिव्य ही औषधी**
**दुःखशोकामया त्वरित संहारित ।**
**हृदयिं उगवुनि विश्वही व्यापिते**
**श्रांत जीवा पहा ! अमृतही पाजिते ॥ १ ॥**
**शांतिबळ देउनी इंद्रियां सुखविते**
**दिव्य ही औषधी मृत्युला मारिते ।**
**प्रेमवल्ली कशी चित्तिं फोपावली**
**जाउनी ती निशा सत्प्रभा फांकली ॥ २ ॥**
**जन्ममरणादि संसार हा लोपला**
**थोर आनंद सर्वत्र विस्तारला ।**
**पार नाहींच स्वानंदसौख्यार्णवा !**
**मृत्युभीती नसे, जन्म झाला नवा ! ॥ ३ ॥**

नंद याप्रमाणें तन्मय होऊन नाचत बागडत देवाच्या भेटीसाठीं चिदंबरमक्षेत्राकडे चालला असतांना देव प्रसन्न होऊन आकाशांत नाचूं लागले, पृथ्वी आनंदानें थरारली, पायाखालीं पसरलेलीं शेतें आनंदानें डोलूं लागलीं व सृष्टीवर आनंदजलाची वृष्टि झाली ! नंद अद्वैयानंदमय झाला. त्याचे पाय चिदंबरमक्षेत्राजवळ आले. कोलॉडम् नदीला पूर येऊन ती तुफान झाली होती, हत्तीलाटा एकमेकांवर आदळत होत्या. पैलतीरावर नटराजाच्या मंदिराचा कळस दिसतांच नंदाची जी अवस्था झाली तिचें नटराजाच्या पायाशीं उचंबळणाऱ्या नदीच्या लाटा व

दोन आठवड्यांतही जें काम करितां आलें नसतें तें अवघ्या दोन प्रहरांत झालें कसें? माझ्या ह्या शेतांत देवानें हा केवढा चमत्कार करून आज दाखविला आहे! नंदा! हा सारा तुझा पुण्यप्रताप आहे खास! हें तुझ्या भक्तीचें फळ आहे. तुझी योग्यता देवानें आमच्या नजरेस आज आणली आहे। मी साऱ्या जन्मांत तुझ्यासारखा पवित्र भक्त दुसरा पाहिला नाहीं. अरेरे! तुला नोकर म्हणून वागविण्यांत माझे हातून घोर पाप घडलें आहे. ह्या क्षणापासून नंदा! तूं माझा स्वामी आणि मी तुझा सेवक आहें असें समज! माझी सारी संपत्ति व जमीन तुझी आहे. तुझ्या निकटवर्ती शंकराजवळ माझ्याबद्दल विनवणी कर व मला माझ्या उद्धाराचा मार्ग दाखीव!' परमेश्वराच्या कृपेनें सारें पारडें फिरलें. स्वामी तो सेवक व सेवक तो स्वामी! अत्युत्कट भक्तीचा महिमा किती थोर आहे! साक्षात् भगवान् जेथें भक्ताचा दास होतो तेथें एका सामान्य जमीनदाराची कथा काय? असो. त्या ब्राह्मणानें सद्गदित होऊन नंदाचे पाय धरिले, नंदानेंही अश्रु ढाळीत त्याला उठविलें व 'हं हं! मालक! असें उलटें कसें होईल? मी आपला सेवक व आपण माझे मायबाप आहांत' असें म्हणाला. त्या ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व लोपलें, नव्हे— खरें ब्राह्मण्य उदित झालें! त्याचा अहंकार गेला. 'तूंच माझा गुरु आणि देव आहेस. मला पातक्याला क्षमा कर' असें म्हणून त्यानें नंदाच्या गळ्याला मिठी मारली. शिवस्वरूपीं दोघे एकमय झाले, देहबुद्धीच्या दोघेही पार गेले. 'चिदंबरमला जा, पण माझें स्मरण ठेव व नटराजाच्या पायीं माझी दाद लाव. हे साधो! मला जातांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून मग जा' असें तो ब्राम्हण म्हणाला, तेव्हां नंद विनयपूर्वक एवढेंच बोलला, "बायकापोरांवर, घरादारांवर, संपत्तीवर जेवढें प्रेम करितां तेवढेंच देवावर करा, यापेक्षां मी आपला दास आपल्याला अधिक तें काय सांगणार?" नंद चार पावलें गेला नसेल तोंच त्या ब्राह्मणानें नंदाला पुन्हा हांक मारिली, व वियोगदुःखानें विव्हळ होऊन रडत रडतच तो म्हणाला 'नंदा! माझ्या सद्गुरो! आपण परत केव्हां

याल? आपलें दर्शन पुन्हां केव्हां होईल?' नंद म्हणाला 'मालक! चिदंबरम्ला जाऊन परत कशाला यायचें? देवाच्या भेटीला जाऊन मागें फिरायचें नाहीं! देवाच्या दर्शनांतच मोक्ष. मी परत नाहीं बरें यायचा. आतां देव तेथें मी. हा देह अन् हा संसार यांना कायमचा रामराम!' नंद उड्या मारीतच चिदंबरम्ची वाट चालूं लागला. पळूं लागला म्हणणें जास्त खरें होईल! आनंदभरांत नटराजाच्या दयेनें त्याचें चित्त भरून येऊन त्याच्या मुखांतून पुढील अर्थाचें गाणें आलें:—

**औषधी औषधी दिव्य ही औषधी**
**दुःखशोकामया त्वरित संहारिते।**
**हृदयिं उगवुनि विश्वही व्यापिते**
**भ्रांत जीवा पहा! अमृतही पाजिते ॥ १ ॥**
**शांतिबळ देउनी इंद्रियां सुखविते**
**दिव्य ही औषधी मृत्युला मारिते।**
**प्रेमवल्ली कशी चित्तिं फोपावली**
**जाउनी ती निशा सत्प्रभा फांकली ॥ २ ॥**
**जन्ममरणादि संसार हा लोपला**
**थोर आनंद सर्वत्र विस्तारला।**
**पार नाहींच स्वानंदसौख्यार्णवा!**
**मृत्युभीती नसे, जन्म झाला नवा! ॥ ३ ॥**

नंद याप्रमाणें तन्मय होऊन नाचत बागडत देवाच्या भेटीसाठीं चिदंबरमक्षेत्राकडे चालला असतांना देव प्रसन्न होऊन आकाशांत नाचूं लागले, पृथ्वी आनंदानें थरारली, पायाखालीं पसरलेलीं शेतें आनंदानें डोलूं लागलीं व सृष्टीवर आनंदजलाची वृष्टि झाली! नंद अद्वैयानंदमय झाला. त्याचे पाय चिदंबरमक्षेत्राजवळ आले. कोलॉडम् नदीला पूर येऊन ती तुफान झाली होती, हत्तीलाटा एकमेकांवर आदळत होत्या. पैलतीरावर नटराजाच्या मंदिराचा कळस दिसतांच नंदाची जी अवस्था झाली तिचें नटराजाच्या पायाशीं उचंबळणाऱ्या नदीच्या लाटा व

नंदाच्या हृदयगंगेंतील प्रेमलहरी यांच्यांत तादात्म्य झालें. आपोनारायणाचें तें रूप–नटराजच प्रत्यक्ष तो! नौकेवर लोक चढले. नंदाचे पायही चढले. नाव चालूं लागली. नंद बेहोष होऊन आनंदानें भजन करीत नाचूं गाऊं लागलाः—

**औषधी औषधी दिव्य ही औषधी**
**श्रीकृपा अंतरीं रोमरोमांतरीं संचली।**
**भक्त देवा तसा देव भक्तासही धुंडितो**
**पावली धांवली वत्सस्नेहार्द्र ही मावली!।**

नौका पाण्यावर नाचत चालली. नंद नौकेवर नाचत होता. नौकेवरचे लोक नंदाबरोबर नाचूं लागले. नंदाच्या हृदयांतल्या भक्तिप्रेमाच्या विजेचे धक्के सर्वांच्या हृदयाला पोंचले. नावाडीही तन्मय होऊन वल्हीं मारावयाचीं सोडून नाचूं लागला. नौका, नंद, नावाडी, सर्व नटराजमय होऊन नटराजाच्या प्रेमांत सानंद नाचूं लागले. नौका तीराला लागली. नंद, नाविक, यात्रेकरू सर्व शिवमय होऊन मंदिराकडे नाचत चालले. पेठेंतले व्यापारी व इतर लोक आपापले उद्योग सोडून या भक्तमेळ्यांत मिसळले. नंद हा भाविकांत साक्षात् नटराजच शोभला. सर्वजण महाद्वारापाशीं आले. नंद म्हणाला "अहाहा! हें कैलासाचें द्वार आहे; भक्तानांच आंत जातां येतें, येथून कोणीही परत जात नाहीं. ह्याच पवित्र द्वारांतून संबंदर, माणिक्य, अप्पर, सुंदर हे थोर भक्त देवाच्या भेटीला गेले! ह्या सर्व भिंतींना व वृक्षपाषाणांना त्यांनीं देवरूप केलें. धन्य ते सभाग्य भक्त! मित्रांनो! देव रूपांत आहे आणि अरूप आहे; तो आंत आहे आणि बाहेर आहे; तो नृत्य करतो आणि स्तब्धही आहे. येथें अज्ञानी ज्ञानस्वरूप होतात व ज्ञानी इंद्रियें विसरतात! येथें देव उघडा प्रकाशमय आहे. ब्रह्मा हाच, विष्णु हाच, माझा नटराज सर्व कांहीं आहे. त्याचें तांडव–त्याचें नृत्य हें प्रेमरूप आहे. देवा! मी कोणत्या शब्दांनीं तुला आळवूं! तुझें स्तवन कसें करूं? देवा! आपल्या पायापासून क्षणभरही मला दूर करूं नकोस. येथून दूर होणें हाच मृत्यु होय व येथें अखंडवास हें केवढें

भाग्य! देवा! मी निष्पाप व शुद्ध आहें ना? मला आतां पायावेगळा करूं नकोस. " देहभानविवर्जित होऊन नंद व त्याचे संवगडी मंदिराभोंवतीं व गांवाभोंवतीं नटराजाचें भजन करीत तीन अहोरात्र प्रदक्षिणा करीत फिरत होते! नंदावर नटराज प्रसन्न झाले. तेथील मंदिराचे जे पुजारी होते त्यांना नंदाला आपल्या दर्शनाला आणण्याबद्दल नटराजाचे दृष्टांत झाले. तेव्हां त्यांनीं सभा भरवून ठराव केला कीं ' अग्नीच्या दिव्यांतून शुद्ध करून घेऊन मग नंदाला मंदिरांत न्यावें. ' नंद दिव्यास आनंदानें कबूल झाला. अनुतापाच्या दिव्यांतून तो आधींच पार झाला होता! शीतल चंदनोदकानें स्नान केल्याप्रमाणें अग्नि त्याला सुखस्पर्श झाला. ब्राह्मणांनीं वाजत गाजत नंदाला मंदिरांत नेलें. त्यानें नटराजाची पूजा केली. तो देवासंन्निध गेला व देवमय झाला.

**नटराज! माझ्या जीवाच्या जिवलगा ॥**
**तुझ्या अंगसंगा लाभलों जी ॥ १ ॥**
**आह्मां तुह्मां आतां भेद नाहीं देवा ॥**
**अभिन्नत्वें सेवा घ्यावी माझी ॥ २ ॥**

असें म्हणत नंदानें देवाच्या पायावर मस्तक वाहिलें व नंद तेथेंच गुप्त झाला! नंद कोठें आहे? नंद कोणासही दिसेना! नंदाची ज्योति नटराजाच्या ज्योतींत मिळाली, इतकेंच नव्हे तर नंद देवाच्या पायीं हजारों लोक पाहात असतांना देहासकट गुप्त झाला! नंदाचा सर्वत्र जयजयकार झाला. घंटा व नौबती झडल्या. तेव्हांपासून तामीळ देशांत ह्याच मार्गशीर्ष महिन्यांत हजारो तरुणी अंगावर नूतन वस्त्रालंकार घालून नंदाचीं गाणीं गात नाचत असतात.

आजकालचे ब्राह्मण व अस्पृश्य ह्या भक्तोत्तम नंदाच्या चरित्रापासून योग्य तो बोध घेतील काय?

नंदाच्या शिवस्तोत्रांतील आणखी कांहीं विचार देऊन नंदाख्यान पुरें करूं:—

" नटराजाचें नृत्य किती गोड ! आपण सर्वजण त्याच्याच सारखें नृत्य करूं म्हणजे तो आपणांस नृत्यांतच सांपडेल–गावें आणि नाचावें पुन्हां गावें आणि नाचावें हेंच काम ! वर्तुळ किंवा फेर धरून त्या राज-राजाचें नाम गावें. तो निर्विकल्प व निर्मळ आहे.

" नृत्य आणि प्रेम यांचा स्वामी, महासमर्थ, प्रेमळांची कामधेनु, प्रेम-सागर, दीनांचा कल्पवृक्ष, शुद्ध प्रकाश–अशा नटराजाला चित्तांत शोधा.

" हे सौम्य, आल्हादक, शुभ्र चंद्रा ! शिवाला प्रिय होण्याचा मला मार्ग दाखीव ! माझा प्राणविसावा जो नटराज त्याच्या मस्तकावर तूं विराजत आहेस ! तूं कोणतें पुण्य केलें आहेस ? रात्र नाहीं व दिवस नाहीं असा तूं ' अहोरात्रांचा पैलकड ' आहेस. मला असें होतां येईल काय ?

" शुभ्र चंद्रा ! त्याच्याशीं मला एकांत कसा करितां येईल ? गड्या सांग ना ! हें किती कठीण आहे ! तो महामानी आहे ! तो आणि मी, मी आणि तो अगदीं एक–अहाहा ! या भावनेनें मी किती सुखी आहें ! ( पंचज्ञानेंद्रियरूपी मुखांचा ) पांचतोंड्या सर्प ( अहंकार ) हा आमच्या आड येतो ! त्याला तूं अमृत पाजून सजीव कर म्हणजे तो मला छळणार नाहीं. शिवाच्या नृत्यानें सारीं ब्रह्मांडें नाचत आहेत. चंद्रा ! एकच अमृतकिरण मला पुरे. तो माझें जीवित आनंदमय करील."

नंदाचें सारें चरित्रच अत्यंत काव्यमय आहे, अत्युदात्त आहे.

## १६ कुमारील भट्ट

शंकराचार्यांच्या अगोदर कुमारील भट्ट यांनीं बौद्ध व जैन मतांचा पाडाव करून वेदधर्माची पुन्हां स्थापना केली. हे आंध्र देशांत जन्मले. हे तैत्तिरीय यजुर्वेदी शाखेचे तैलंग ब्राह्मण होते. यांच्या आईचें नांव चंद्रगुणा ( चांगुणा ) व बापाचें नांव यज्ञेश्वर भट्ट हें होतें. हे ६३ वर्षें जगले होते. वैशाखी पौर्णिमेस यांचा जन्म झाला व माघी पौर्णिमेस यांनीं देहत्याग केला. त्यांच्या देहावसानसमयीं शंकराचार्य आपल्या वयाच्या १५ व्या वर्षी यांना प्रयागास भेटले होते, तेव्हांच त्यांनीं

" श्रुत्यर्थधर्मविमुखान् सुगतान् निहन्तुं ' ह्म० वैदिकधर्माचे विरोधी जे पाखांडी बौद्ध त्यांचा पाडाव करण्यासाठीं आपला अवतार होता असें म्हटलें. कुमारील भट्ट हे कार्तिकस्वामीचा अवतार होत असें हिंदु व जैन पंडितांनींही म्हटलें आहे, " पूर्वी बौद्धादिकांनीं प्रवर्तविलेलें जें वेद-विरुद्ध मत त्यांनीं दूषित झालेल्या लोकांना रस्त्यावर आणण्यासाठीं, भूमंडळावर पसरलेल्या ह्या व अन्य पाखांडी मतांचा उच्छेद करण्यासाठीं आणि वैदिकधर्माचें पुनरुज्जीवन करण्यासाठींच कुमारीलभट्टांच्यारूपानें कार्तिकेय स्वतः अवतरले " असें आत्मपुराण, शंकरविजय इत्यादि ग्रंथांत म्हटलें आहे. यांनीं कर्मकांडप्रतिपादनपर जैमिनीसूत्रभाष्य लिहून नंतर जैनमतभंजन नांवाचा ग्रंथ लिहिला. हे महावादी असून कसलाही पंडित असला तरी वादांत यांच्यापुढें टिकत नसे, म्हणून जैनांनींही आपल्या ग्रंथांत यांच्याविषयीं ' महान् वादी महान् घोरः श्रुतीनां चाभि-मानवान् । जिनानामंतकः साक्षात्...' असें ह्मटलें आहे. बौद्ध वेदांना मानीत नसत, ईश्वर मानीत नसत व त्यांच्या अहिंसाप्रियतेमुळें यज्ञ-यागांचाही ते उच्छेद करीत, यामुळें कर्ममार्ग मोडकळीस आला होता. कुमारील भट्टांनीं वेदांतील कर्मकांडाचा उद्धार केला व लोकांना वेदमार्गावर आणलें. मंडनमिश्र हे त्यांचे साहाय्यक असत. सुधन्वा राजा हा जैनमताचा होता पण कुमारीलभट्टानीं जैनांस व बौद्धांस वादांत जिंकल्यावर तो पुन्हां वैदिकधर्मी झाला, त्यानें जैनांचें नंतर चांगलें कंदन केलें, ' जिनानां येन साधूनां कृतं कंदनमद्भुतम् ' असें जैनांनींच ह्मटलें आहें ! ' कुमारीलमृगेंद्रेण हतेषु जिनहस्तिषु । निष्प्रत्यूहमवर्धंत श्रुतिशाखाः समंततः ' ह्म० जैनांना ह्या मृगेंद्रानें जिंकल्यावर श्रुति-शाखांचा चोहोंकडे प्रसार झाला असें शांकरविजयांत ह्मटलें आहे ! तात्पर्य श्रुतिधर्म लोपला होता त्याचा यांनीं पुनरुद्धार केला, वैदिकधर्माचें पुन-रुज्जीवन केलें, वेद आणि वैदिक आचारांवर लोकांचा उडालेला विश्वास पुन्हा बसविला आणि शंकराचार्यांचा मार्ग सुलभ करून दिला. भट्टांना द्राविडादि भाषाही चांगल्या येत होत्या. द्राविड, पारसिक, बर्बर,

रोमक, व यवन इ. भाषांचा त्यांनीं उल्लेख केला आहे. त्यांनीं बुद्धधर्मांचा अभ्यास बौद्ध भिक्षूंपाशीं व जैनधर्माचा श्रीनिकेतन नामक जैनपंडितांपाशीं केला होता, ह्मणून त्यांना त्या धर्मांचीं मर्मस्थानें चांगलीं ठाऊक होतीं. हे सकल वेदशास्त्रपारंगत होते. अग्निहोत्र व यज्ञादि कर्मांच्या परिपालनानें ह्म० स्वधर्माचरणानेंच मोक्ष होतो असें यांनीं कर्ममार्ग प्रवर्तन केलें. याप्रमाणें सनातनधर्माचें फार मोठें कार्य यांनीं केलें. कुमारील भट्टांनीं कालिदासाचा उल्लेख केला आहे. कर्माच्या पुढची पायरी ज्ञानाची असल्यामुळें यांच्यानंतर ज्ञानभास्कर श्रीमच्छंकराचार्यांचा अवतार झाला यांत सहजत्वच दिसून येतें. वैदिककर्म आणि आत्मज्ञान दोन्ही वैदिकधर्माचीं मुख्यांगेंच आहेत.

## १७ शंकराचार्य ( इ. स. ७८८–८२० )

अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुर्दायांत आसेतुहिमाचल दिग्विजय करून धर्मसंस्थापना करणारे आद्य श्रीशंकराचार्य हे अद्वितीय पुरुष होऊन गेले. बौद्ध, जैन इ. वेदबाह्य मतांचें सप्रमाण खंडण करून व वेदाला मानणाऱ्या पण आपापसांत वाद करीत राहणाऱ्या अनेक वैदिक पंथांचें संघटन करून अद्वैतसिद्धांताची यांनीं भरभक्कम पायावर स्थापना केली आणि सद्धर्मसंस्थापक व जगद्गुरु अशा प्रकारची दिगंत कीर्ति मिळविली. मद्रासचे नारायणशास्त्री यांनीं 'शंकराचार्यांचा काल' ह्या पुस्तकांत 'दहा शंकरविजयांचा' उल्लेख केला आहे; तथापि विद्यारण्य उर्फ माधवाचार्यकृत 'श्रीमच्छंकरदिग्विजय' व आचार्यसमकालीन आनंदगिरिकृत 'शंकरविजय' हे आचार्यांचे दोन चरित्रग्रंथ सर्वमान्य आहेत. शंकराचार्य हे मलबारांतील एका नंबूरी ब्राह्मणाच्या कुलांत जन्मले. यांचा आजा विद्याधिराज, बाप शिवगुरु आणि आई आर्याम्बा हीं कालटी येथें राहात असत. विद्याधिराज आणि शिवगुरु हे अत्यंत विद्वान् असून त्यांस कालटी हा गांव अग्रहार म्ह० इनाम होता. राजशेखर राजानें त्यांच्या पूर्वजास हा अग्रहार दिला होता. कालटी हा गांव

कोचीन संस्थानांत पूर्णा उर्फ पेरियर नदीच्या कांठीं गर्द वृक्षराजींत आहे. आर्याम्बा पूजन करीत असे तो वटवृक्ष, कृष्णमंदिर, जवळच आर्याम्बाची दहनभूमि व डोह हे सर्व शृंगेरीपीठस्थ आचार्यांनीं २० वर्षांपूर्वींच शोधून काढलीं असून तेथें शारदा व शंकराचार्य यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यांत आली आहे. पांचवे वर्षीं उपनयन; आठवे वर्षीं संपूर्ण वेदाध्ययन; तें झाल्यावर पूर्णानदींत मगरानें पाय धरल्याच्या निमित्तानें आईकडून संन्यासग्रहणाची परवानगी; दहावे वर्षीं शास्त्राध्ययन पूर्ण होऊन नर्मदातीरीं ओंकारक्षेत्रीं गुरु गोविंदयतींची भेट व संन्यासग्रहण; चार वर्षें बद्रिकाश्रमीं तपश्चर्या पुरी झाल्यावर १६ वे वर्षीं काशीक्षेत्रीं शारीरभाष्याची रचना; मंडणमिश्रादिकांचा माहिष्मती येथें वादांत पराभव व शिष्यजनसंमर्द; शृंगेरीस शारदामठस्थापना; भरतखंडभर दिग्विजय व काश्मीरांत सरस्वतीपीठावर आरोहण; शृंगेरीमठावर सुरेश्वराचार्यांची स्थापना; कांची उर्फ कुंभकोण येथें कामाक्षीदेवींची स्थापना व श्रीचक्राची सुरू केलेली उपासना, व कांची येथेंच गुहाप्रवेश म्ह० निर्याण असा आचार्यांचा संक्षिप्त चरित्रक्रम आहे. त्यांची जन्मतीथ शक ७१० विभवसंवत्सर, वैशाखशुद्ध १० ही असून त्यांनीं गुहाप्रवेश शके ७४२ मध्यें वैशाख शुद्ध १५ स केला. उपनिषदांतील ब्रह्मविद्येचा पुरस्कार करून यांनीं केवलाद्वैताची प्रस्थापना केली, श्रौतस्मार्तधर्माचें संरक्षण केलें, विविध उपासना एकवटून पंचायतनपूजा ( शिव, विष्णु, गणेश, देवी व सूर्य ) सुरू केली, तामीळ प्रांतांतील शैववैष्णव संतांनीं व कुमारीलभट्टादि मीमांसकांनीं अनेक हिंदु राजांच्या साह्यानें मोडकळीस आणलेल्या बौद्धजैनादि पाखांडमतांचा पुरा उच्छेद केला व त्यांना प्रथम दक्षिणेंतून बंगालबहार प्रांतांकडे व नंतर तेथून हिंदुस्थानच्या पलीकडे तिबेटचीनादि देशांत देशांतर करावयास लावले ! हिंदुस्थानांत बौद्ध व जैनधर्मांचा उदय झाल्यापासून सुमारें हजार वर्षेंपर्यंत ज्या उपनिषदांतील ब्रह्मविद्येचा लोप झाला होता, त्या ब्रह्मविद्येचा आचार्यांनीं पुन्हा उद्धार केला, व नानाविध तर्कटें मोडून काढलीं. ‘**शास्त्रयोनित्वात्**’

आणि '**तत्तु समन्वयात्**' म्ह० ब्रह्मविद्येचा मुख्य आधार शास्त्र उर्फ वेदोपनिषदें व त्यांचा समन्वयपूर्वक विचार हाच मुख्य ज्ञानमार्ग त्यांनीं सिद्ध करून दाखविला, व वेदान्तशास्त्राचा जयजयकार केला.

शंकराचार्यांची गुरुपरंपरा अशी आहे:–शिव, विष्णु, ब्रह्मा, वसिष्ठ, पराशर, व्यास, शुक, गौडपाद, गोविंदयति व शंकराचार्य. शिवानें ज्ञान, विष्णूनें भक्ति व ब्रह्मदेवानें कर्म ह्याप्रमाणें कर्मज्ञानभक्तिरूप त्रिकांडाचा पाया ज्यांनीं घातला ते त्रिमूर्ति जगताचे आद्य गुरु होत. यानंतरची दुसरी त्रयी स्मृतिकारांची आहे. ब्रह्मज्ञान देणारा वसिष्ठ, योग सांगणारा शक्ति मुनि व स्मृतिकार पराशर हे ते तीन स्मृतिकार होत. उपनिषदांतील ब्रह्मज्ञान सूत्ररूपांत संकलित करणारे व्यास व शुकमुनींद्र हे यापुढचे सूत्रकार होत. श्रुति, स्मृति व सूत्रें यांचें उपपादन करणारे हे आठ झाले. हे देव व ऋषि सर्वांनाच पूज्य आहेत. यानंतर श्रुतिस्मृतिसूत्रकारांचा आशय लोकांना सांगणारे आचार्य झाले, हे प्राचीन ग्रंथांचे व्याख्याते हात. ही त्रयी म्हणजे गौडपादाचार्य, गोविंद भगवत्पाद व शंकराचार्य ही होय. गौडपादाचार्यांच्या माडुंक्योपनिषदावरील व नृसिंहतापनी-योपनिषदावरील कारिका प्रसिद्ध आहेत. "ईश्वरकृष्णाच्या सांख्यकारिका या ग्रंथावर शंकराचार्यांचे आजेगुरु गौडपाद यांचें भाष्य असून खुद्द शांकरभाष्यांतही याच कारिकांचे उतारे घेतले आहेत." त्यांनीं नृसिंहतापनीयकारिकांचे शेवटीं आपले गुरु 'श्रीमच्छुकमुनींद्र' आहेत असा स्पष्ट उल्लेख केला आहे. गौडपादांचे शिष्य किंवा अनुग्रहीत 'गोविंदभवत्पूज्यपाद' हे शंकराचार्यांचे गुरु होत. अशी ही अद्वैततत्वज्ञानाची आचार्यांपर्यंत आलेली परंपरा आहे. आचार्यांच्या पूर्वीं ब्रह्मज्ञान अरण्यांत एकट्या दुकट्या अधिकारी शिष्याला मिळत असे. आचार्यांनीं हें ब्रह्मज्ञान मंदिरांत, मठांत, प्रवचनांत आणून सर्व जनांना त्याची पाणपोई घातली हेंच एक मोठें धर्मकार्य केलें आहे. ब्रह्मज्ञान दुर्लभ होतें तें त्यांनीं सुलभ विद्वज्जनसेव्य केलें. विरक्त, संन्यासी, व वनवासी यांनाच प्राप्य

असलेलें ब्रह्मज्ञान आचार्यांच्या भाष्यत्रयीमुळें संसारांत व गृहांत नांद-णाऱ्या गृहाश्रमीयांनाही सुलभ झालें. आचार्यांचे मुख्य शिष्य सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य, हस्तामलकाचार्य व तोटकाचार्य हे होत. याशिवाय चित्सुख, विश्वरूप, सर्वज्ञ, श्रीचरण इत्यादि शेकडो शिष्य त्यांच्याभोंवती नेहमीं असत. सुधन्वा, राजसेन, पूर्णवर्मा, वृषदेव इ० राजे आचार्यांचे शिष्य झाले. त्यांच्यानंतरही मधुसूदन, आनंदगिरी, वाचस्पतिमित्र, माधवाचार्य इ० अनेक विद्वान् शांकरामतानुयायी झाले. शृंगेरीमठावर सुरेश्वराचार्यांची स्थापना करून आचार्य विश्रांतीसाठीं कांची येथें ताम्र-पर्णीनदीचे तीरीं मठ करून राहिले व तेथेंच त्यांचें निर्याण झालें. कोणी गुहाप्रवेश करण्यासाठीं ते हिमालयावर गेले असेंही म्हणतात. त्यांनीं बद्रीकेदार येथें बद्रीनारायणाची स्थापना केली व अद्यापही तेथील पुजारी नंबुद्री ब्राह्मण असून त्याची नेमणूक त्रावणकोर संस्थानामार्फत केली जाते. शंकराचार्यांची शिष्यपरंपरा आज सारा हिंदुसमाज आहे. त्यांच्यामागून द्वैतपंथीय अनेक आचार्य झाले असून ते आचार्यांच्या अद्वैतसिद्धांतावर व मायावादावर तुटून पडले असले तरी हिंदुसमाजांतील शेकडा ७५ लोक शांकरमतानुयायी आहेत. शेकडा १५ रामानुजमताचे, शेकडा ५ माध्वमताचे व बाकीचे फुटकळ संप्रदायांचे आहेत. महाराष्ट्रीय संत सारे शांकरमतानुयायी आहेत. पाश्चात्य पंडितांवरही शांकरमताचीच छाप पडलेली आहे व अखेर जगावर त्यांच्या अद्वैतसिद्धांताचाच झेंडा फडकत राहील असा आजचा रंग आहे.

## १८ शंकराचार्यांची कामगिरी.

महादेव राजाराम बोडस हे आपल्या ‘ शंकराचार्य ’ या प्रबंधांत म्हणतात:—

“ इसवी सनाचे आठवें शतक सर्व जगांत क्रांतिकारक होतें. युरोपांत शार्लमेनचें एकछत्री राज्य होऊन भावी आस्ट्रियन व जर्मन साम्राज्यांचा पाया घातला गेला. मध्य आशियांतील तार्तर लोक चीन

देशावर हल्ले करूं लागले होते व हिंदुस्थानावर हूण व शक हे परकीय लोक राज्यविस्ताराकरितां झटत होते. अरबस्थानांत महंमद पैगंबरानें नवा धर्म स्थापून त्याच्या लाटा पूर्व पश्चिम दिशांस पसरूं लागल्या होत्या व लौकरच सिंध प्रांतांत त्यांचा प्रवेशही झाला. त्यांच्या जुलमास कंटाळून कांहीं ख्रिस्ती लोक मलबारप्रांतांत येऊन राहिले. भरतखंडांत बौद्ध व जैन धर्मांच्या उत्कर्षाची सीमा होऊन नवीन कर्मकांडी वैदिकांची व त्यांची झटापट सुरू झाली होती. कांची नालंद, धान्यकटक, काश्मीर, विक्रमशिला ह्या प्रसिद्ध विद्यापीठांतून अनेक पंडित निर्माण होत असत. दिङ्-नाग व धर्मकीर्ति यासारखे बौद्ध, समंतभद्र-अकलंकासारखे जैन, कुमारील व प्रभाकर यासारखे मीमांसक, उद्योतकार व प्रशस्तपाद यासारखे नैय्यायिक, शाकटायनचंद्रासारखे वैय्याकरण, व सुबंधुबाणभवभूति यासारखे कवि यांनीं लोकांच्या बुद्धीला मनस्वी चालन देऊन नव्याजुन्या कल्पनांचें तुंबळ युद्ध लावलें होतें. भरतखंडाच्या सर्व भागांत मोठमोठ्या राज्यांच्या व घराण्यांच्या उलथापालथी होत होत्या...आंध्रांत बौद्धिक उन्नति झाली तर द्राविडांत भक्तीवर भर देणारे साधुसंत झाले. शैववैष्णव संतांची परंपरा कांची शहरांत उदय पावून सामान्य जनसमूहांत ईश्वरभक्तीचा प्रसार होऊं लागला. जिकडे तिकडे तत्वशोधनाविषयीं प्रबल जिज्ञासा उत्पन्न झाली. कदंब, चालुक्य, पल्लव, गंग, चोल वगैरे राजघराण्यांतील वीरांनीं राज्यें स्थापलीं असून विद्वानांचाही उत्कर्ष वाढविला. याप्रमाणें ७ व्या व ८ व्या शतकांत दक्षिण देशांत विलक्षण जागृति उत्पन्न झाली. याच जागृतीचा परिणाम शंकराचार्यांचा अवतार होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं... बौद्ध, जैन, नैय्यायिक, मीमांसक वगैरे परस्परविरोधी तार्किकांच्या शाब्दिक कोट्यांमुळें सर्वच तर्कवितर्क अप्रतिष्ठित व निर्मूल वाटूं लागले होते. अशा भांबावलेल्या चित्ताला 'तत्वमसि' या महावाक्यानें अंतर्मुख करून 'अहंब्रह्मास्मि' असा आत्मसाक्षात्कार करविला आणि तर्कवितर्कांच्या लाटांत हेलकावे खाणाऱ्या बुद्धीला श्रुत्युक्त ब्रह्मज्ञानानें स्थैर्य

दिलें हेंच शंकराचार्यांचें महत्कार्य होय....शंकराचार्यांच्या अद्वैतमतानें पूर्वीचे सर्व वाद गतार्थ व शुष्क होऊन गेले. तात्कालिक फल मिळवूं पाहणाराला कर्मयोग ठीक आहे पण आत्यंतिक मोक्षाला ज्ञानच पाहिजे, हा धर्माचा खरा सिद्धांत त्यांनीं सनातनधर्मी लोकांच्या अनुभवास आणून दिला...श्रीकृष्णांनीं व बादरायणांनीं अद्वैतमताचा पाया घालून ठेविला होता, त्यावर इमारत बांधून ती लोकप्रिय करण्याचें काम शंकराचार्यांनीं केलें...त्यांनीं श्रुतिस्मृतींचा समन्वय करून उपनिषदांच्या भक्कम पायावर सनातन धर्माची इमारत जी एकदा कायम केली, ती आज बाराशें वर्षांनंतरही अनेक स्वधर्मी व विधर्मी लोकांच्या हल्ल्यांनींही डळमळित झाली नाहीं...सर्व धर्माचें मूळ आत्मज्ञान हा तिचा पाया आहे. गौतमबुद्धाचे वेळेपासून तर्कशक्तीचें व बौद्धिक विचारांचें प्राबल्य झालें होतें पण तर्कशक्तीनें धर्मज्ञान होणें अशक्य आहे असें लोकांस कळून आल्यामुळें मीमांसकांनीं शब्दप्रामाण्याकडे प्रवृत्ति केली व त्यांच्या नियमांना अनुसरून शंकराचार्यांनी वेदांतशास्त्र निर्माण केलें. तर्कशक्ति अप्रतिष्ठित म्ह० अनिश्चित असल्यामुळें ब्रह्मज्ञानाचा मुख्य आधार शास्त्र म्ह० उपनिषदें व त्या उपनिषदांतील वाक्यांचा समन्वय करणें हाच ब्रह्मज्ञानाचा मार्ग होय. हा सनातन धर्माचा सिद्धांत स्थापन करून आचार्यांनीं वादविवादांनीं चंचल झालेली लोकांची बुद्धि-स्थिर केली. जैन व बौद्ध पंडितांचें त्यावेळीं राजदरबारीं चांगलें वजन होतें. कांचीचे पल्लव व मान्यखेटाचे राष्ट्रकूटराजे बौद्धांचे चाहते होते; पण कदंब, चालुक्य, चोल व पांड्य हे वैदिकधर्मानुयायी विद्वानांचे पुरस्कर्ते होते. हळुहळु दक्षिणेंतील बौद्धजैनांचें वर्चस्व कमी होऊन अद्वैतमताचा फैलाव झाला, आणि त्याच वेळीं वैदिकमार्गी राजांचीं राज्येंही वाढलीं.

" जैनबौद्धप्रभृति नास्तिक पंथांनीं माजविलेला घोटाळा नाहींसा करून पुन्हा श्रुतिस्मृतिविहित सनातनधर्माचें प्रभुत्व स्थापन करण्याचें

महत्कार्य शंकराचार्यांनीं केलें. सनातन धर्माचे आधारभूत चार सिद्धांत बादरायणानीं पहिल्या चतुःसूत्रांत गोवले आहेत व आचार्यांनीं आपले वेदांतशास्त्र ह्या चतुःसूत्रीच्या पायावरच रचलें आहे. देहाला शीण देणारें कर्मकांड व बुद्धीला शीण देणारा शून्यवाद दोन्ही निरुपयोगी ठरवून अद्वैतब्रह्मांत बुद्धि स्थिर करणें हा मोक्षाचा खरा उपाय त्यांनीं जगाला दाखवून दिला. लोकांच्या अंतर्मुखवृत्तीला निश्चित ध्येय पाहिजे होतें तें बौद्धांच्या शून्यवादांत नव्हतें व जैनांच्या 'स्याद्वा न वा' —असेल नसेल अशा संशयवादांतही नव्हतें !"

## १९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति.

आचार्यांची ग्रंथसंपत्तिही विपुल असून अत्यंत चित्ताकर्षक आहे. आफ्रेटच्या कॅटलागांत त्यांच्या लहानमोठ्या ग्रंथांची यादी दिली आहे तींत २७१ ग्रंथ आहेत! ह्यांपैकीं कांहीं त्यांच्या मागून पीठावर आलेल्या पुरुषांचे असावेत, तरी खुद्द आचार्यांचे ग्रंथही कांहीं थोडे नाहींत. प्रस्थानत्रयीवरचीं भाष्यें तरी निर्विवाद त्यांचींच आहेत. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य, बृहदारण्यक, कौषीतकी व श्वेताश्वेतर ह्या बारा उपनिषदांवर त्यांचीं भाष्यें आहेत, त्याप्रमाणेंच भगवद्गीतेवर व ब्रह्मसूत्रांवर त्यांचीं भाष्यें आहेत. गीता, ब्रह्मसूत्रें व उपनिषदें यांवर एकसूत्रीपणानें भाष्य करणारास 'आचार्य' ही पदवी देतात. ह्याशिवाय अनेक प्रकीर्ण ग्रंथ व कित्येक स्तोत्रें आचार्यांच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. नृसिंहतापनीय उपनिषदावरील भाष्य, श्वेताश्वेतर व कौषीतकी यावरील भाष्यें, विष्णुसहस्रनामभाष्य, सनत्सुजातीयभाष्य, विवेकचूडामणि, उपदेशसाहस्री, अपरोक्षानुभूति, वाक्यवृत्ति, आत्मबोध, मनीषापंचक, सदाचार, इ० प्रकरणें खास आद्य आचार्यांचींच आहेत यांत शंका नाहीं. आचार्यांच्या नांवावर एकंदर ६५ स्तोत्रें प्रसिद्ध आहेत. त्यांत १३ शिवपर, १३ विष्णुपर, १३ देवीपर, कांहीं गणेश व स्कंध यावर व कांहीं गंगादि देवतांवर आहेत. ह्या स्तोत्रांपैकीं कांहीं स्तोत्रें खास

आचार्यांचीं आहेत. कदाचित् कांहीं मागूनच्या पीठस्थ पुरुषांचीं असतील. आचार्यांच्या स्तोत्रांवरून ते अद्वैतमार्तंड असले तरी भक्तिमार्गाविषयींही त्यांच्या हृदयाचा जिव्हाळा कांहीं असामान्य होता असें ठरतें. सर्वच स्तोत्रें त्यांनीं रचलेलीं नसलीं तरी कांहीं स्तोत्रें तरी त्यांनीं केलेलीं आहेत व सर्वच स्तोत्रें भक्तिरसान्वित असल्यामुळें आचार्यांच्या वाणीला भक्तीचा चांगलाच स्पर्श आहे हें उघड आहे. 'ज्ञानपरिपाको भक्तिः' असें त्यांचें वचन आहे. ज्ञानाचा परिपाक ह्म० भक्ति. स्वस्वरूपानुसंधानानें अखंडैकरसता प्राप्त होणें यालाच ते भक्ति ह्मणतात. अद्वैताला भक्तीचा विरोध आहे अशी कित्येकांची कल्पना आहे पण ती भ्रममूलक आहे. त्यांच्या षट्पदीस्तोत्रांत पुढील श्लोक आहे:—

**सत्यपि भेदापगमे नाथ ! तवाहं न मामकीनस्त्वम् ।**
**सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥**

' सर्वत्र अद्वैतभाव उदित झाल्यामुळें जीवशिवभेद उरला नाहीं तथापि हे नाथ ! तव अहम् ह्म० तरंग समुद्राचा त्याप्रमाणें मी तुझा आहे !' चर्पटपंजरिकास्तोत्रांतील 'भज गोविंदं भज गोविंदं भज गोपालं मूढमते' हा त्यांचा मंजुध्वनि लक्षावधि जीवांचा निद्रामोह दूर करून त्यांना जागृतीवर आणण्यास कारण झालेला आहे. 'गेयं गीतानामसहस्रं ध्येयं श्रीपतिरूपमजस्रम्'—गीता व विष्णुसहस्रनामाचे पाठ कर व लक्ष्मीनारायणाच्या रूपाचें ध्यान कर हा त्यांचा उपदेश कोणाच्या कर्णपथावर गेला नाहीं ? 'संगः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयताम्' सत्संग करा व नारायणाची भक्ति करा हेंच सर्व साधुसंत सांगत आले आहेत. 'मायाविवरण' ह्या प्रकरणांत "इह खलु धर्मार्थकाममोक्षाणां चतुर्विधपुरुषार्थानां मध्ये मोक्ष एव परमपुरुषार्थः । नित्यत्वात् । नच पुनरावर्तत इति श्रुतेः" ह्याप्रमाणें मोक्ष हाच परमपुरुषार्थ सांगितला आहे तरी ह्या प्रकरणाचा आरंभ 'बालानामुपकाराय ममापि ज्ञानसिद्धये । अत्र श्रीबालगोपालकृष्णः सन्निहितो भवेत्' असा सगुणपरच केला आहे. 'पंचीकरणांत' आचार्यांनीं आपला सिद्धांत 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या

जीवो ब्रह्मैव नापरः' असा संक्षेपानें सांगितला आहे, तोच पुन्हा 'शतश्लोकी' ह्या सुंदर प्रकरणांत सविस्तर सांगितला असून हा संसार-वृक्ष असंगशस्त्रानें छेदून बुद्धिवंतानें वासुदेवाचें चिंतन करावें–'छित्वा ऽसंगासिनैनं पटुमतिरभितश्चिंतयेत् वासुदेवम्'–असें सांगितलें आहे. शतश्लोकीचा शेवटचा श्लोकः––

**जातं मय्येव सर्वं पुनरपि मयि तत्संस्थितं चैव विश्वं**
**सर्वं मय्येव याति प्रविलयमिति तत् ब्रह्म चैवाहमस्मि ।**
**'यस्य स्मृत्या' च यज्ञाद्यखिलशुभविधौ सुप्रयातीह कार्यं**
**'न्यूनं संपूर्णतां' वै तदहमतिमुदैवाच्युतं सन्नतोऽस्मि ॥१०१॥**

अद्वैत ब्रह्मज्ञान आणि कोमल भक्ति यांचा आचार्यांच्या स्तोत्रांत अत्यंत मधुर असा संगम झाला असून आचार्य हे ज्ञानभक्तियोगाचे आचार्य आहेत असेंच त्यांचीं स्तोत्रें पाहतां म्हणावेसें वाटतें. विशिष्टाद्वैतमताचा प्रसार करणारे जे विद्वान् आचार्यांच्या पश्चात् झाले त्यांना आचार्यांच्या मायावादावर कठोर प्रहार करतांना त्यांच्या ह्या प्रेमळ स्तोत्रांची कशी आठवण झाली नाहीं याचें नवल वाटतें ! शंकराचार्यांचा अद्वैतबोध रुक्ष व नीरस नाहीं तर भक्तीनें आर्द्र झालेला आहे. 'उत्पत्त्यसंभवात्' ह्या ब्रह्मसूत्रावरील ( अ. २ पाद २ ) भाष्यांत आचार्यांनीं भागवतधर्माबद्दल बोलतांना कायावाचामन देवाच्या ठिकाणीं स्थिर करून देवालयांत जाणें, पूजाद्रव्य तयार करणें इ०, पूजाविधि, स्वाध्याय म्ह० मंत्रपुरश्चरण किंवा जप, आणि ध्यान असे भक्तीचे पांच प्रकार सांगितले आहेत. ते म्हणतातः 'तमित्थंभूतं परमेश्वरं भगवंतमभिगमनोपादानेज्यास्वाध्याययोगैर्वर्षशतमिष्ट्वा क्षीणक्लेशो भगवन्तमेव प्रतिपद्यते.' या पंचविधा भक्तीचा 'श्रुतिस्मृत्योरीश्वरप्रणिधानस्य प्रसिद्धत्वात्' असें म्हणून आचार्यांनीं स्वीकार केला आहे व उपासना चित्तशुद्ध्यर्थ अंगीकारली आहे.

श्रीशंकराचार्यांनीं मायावाद उत्पन्न केला, सृष्टि मिथ्या आहे हें मत नव्यानेंच काढलें, असा त्यांच्यावर अनेक जुन्यानव्या पंडितांचा आक्षेप

आहे, पण तो व्यर्थ आहे. मायावाद आचार्यांनीं काढला नाहीं, तो फार पुरातन आहे. ईशावास्योपनिषदांत ' हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्। तत्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ' असा १५ वा मंत्र आहे. त्याचा अर्थ असा आहे:-हे पूषन् ह्म० सूर्या! सत्यस्वरूप ब्रह्माचें मुख-त्वां सुवर्णाप्रमाणें चकाकणाऱ्या अशा आच्छादनरूपी पात्रानें ह्म० आपल्या तेजोमय गोलानें-झांकून टाकलें आहेस तें दूर कर म्हणजे मला त्याचें दर्शन होईल. ' ह्या प्रार्थनेंत मायेचें आवरण दूर कर म्हणजे ब्रह्मसाक्षात्कार होईल असेंच म्हटलें आहे. छांदोग्यांत ( ६-१-४ ) ' वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ' ह्म० एका मृत्तिकेच्या भांड्यावरून सर्व मृत्तिकेचे विकार जाणतां येतात, कारण विकार ही नुसती भाषा आहे, मृत्तिकाच सत्य आहे असें म्हटलें असून लगेच पुढें ' सत्त्वेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्' एक व अद्वितीय असें ब्रह्मच सत्य आहे बाकी सर्व असत् ह्म० मिथ्या, माया आहे, असें स्पष्ट म्हटलें आहे. कठोपनिषदांत 'तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्ममनृतं न माया चेति' असा पहिल्या प्रश्नांतला १६ वा मंत्र आहे. त्याचा अर्थ असा आहे. ' जे लोक कुटिल नाहींत, मिथ्याभाषी नाहींत व मिथ्याचारी नाहींत त्यांना शुद्ध ब्रह्मलोक मिळतो. ' श्वेताश्वेतरांत तर ' अस्मान्मायी सृजते विश्वमेतत् तस्मिंश्चान्यो मायया सन्निरुद्धः' ' मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ' असे स्पष्ट मायावाचक शब्द आहेत. उपनिषदांची सारभूत अशी जी भगवद्गीता तीही ' दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ' ( ७-१४ ) याप्रमाणें मायेचें वर्णन करीत आहे. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं मायावाद कांहीं आचार्यांनीं निर्माण केला नाहीं.

' वाक्यवृत्ति ' प्रकरणांतील पुढील सुंदर श्लोकांत त्यांनीं अध्यात्मरहस्य सांगितलें आहे:—

**तत्त्वमस्यादिवाक्योत्थं यज्जीवपरमात्मनोः ।**
**तादात्म्यविषयं ज्ञानं तदिदं मुक्तिसाधनम् ॥**

## २० रामानुजपंथाचे आचार्य.

शंकराचार्यांचा अवतार होऊन गेल्यावर कित्येक वर्षांनीं त्यांच्या मतांवर हल्ले करणारा एक आचार्यांचा वर्ग होऊन गेला. त्यांनीं आचार्यांच्या अद्वैतसिद्धांतावर टीका करून विशिष्टाद्वैतमताचा नवा पंथ काढला!

वैष्णवभक्त म्ह० आळवार व शिवभक्त यांच्याविषयीं विवेचन पूर्वीं केलेंच आहे. याशिवाय 'आचार्य' म्हणून जेवढे वैष्णव प्रसिद्ध झाले ते वेगळेच आहेत. त्यांच्याविषयीं दोन शब्द सांगून हें प्रकरण पुरें करूं. (१) **रंगनाथाचार्य उर्फ नाथमुनि** (इ. स. ८५०–९२०) हे यापैकीं पहिले वैष्णव आचार्य होत. या नाथमुनींच्या कानावर नम्माळवार याचीं विष्णुभक्तिपर पद्यें पडलीं, ती त्यांला फार आवडलीं व त्यामुळें विष्णुभक्तीचा अंकुर त्यांच्या मनांत बाळपणींच उद्भवला. त्यांनीं नम्माळवारच्या सर्व उपलब्ध कविता संशोधिल्या, इतर आळवारांच्याही कविता शोधून काढल्या, व त्या सर्व एकत्रित करून त्यांचा प्रसार केला. त्यांनीं श्रीरंगम् येथें व इतर प्रसिद्ध विष्णुमंदिरांत त्या म्हणण्याचा प्रघात जारी केला. नाथमुनि तामीळ व संस्कृत या दोन्ही भाषांत निष्णात होते. त्यांना योगाची माहिती होती, व त्यांनीं योगावर न्यायतत्वनामक एक ग्रंथ रचिला, त्यांत त्यांनीं रामानुजांनीं पुढें ज्या विशिष्टाद्वैतमताचा डंका हिंदुस्थानभर वाजविला त्याचा पाया घातला असें म्हणतात. हा ग्रंथ उपलब्ध नाहीं पण यांतील कांहीं उतारे पुढील आचार्यांनीं आपल्या ग्रंथांत घेतले आहेत, त्यावरून नाथमुनींनाच विशिष्टाद्वैतमताचे पहिले आचार्य म्हणतात. कंबन नांवाच्या तामीळ कवीनें 'तामीळ रामायण' इ. स.८८५ मध्यें रचिलें त्याचाही नाथमुनींनीं पुरस्कार केला. नम्माळवार, विष्णुचित्त व मधुरकवि यांचीं तामीळ पद्यें लोकप्रिय करण्याचें काम यांनीं केलें. यांनीं सकुटुंब बद्रीनारायणाची यात्रा केली. परत येतांना यमुनातीरीं मथुरेस असतांना यांची सून बाळंत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव यांनीं यामुनाचार्य असें ठेवलें. नाथमुनींचा शिष्य

पुंडरीकाक्ष व त्याचा शिष्य राममिश्र हा यामुनाचार्यांचा गुरु होय. (२) **यामुनाचार्य** ( इ. स. ९२०–१०४० ) हा एक फार प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. मीमांसा व वेदांत यांत निष्णात होऊन त्यानें अनेक सभा जिंकल्या, तो चोलराजाच्या दरबारीं अपूर्व सन्मान पावला, दरबारी पंडितांवर त्यानें विजय मिळविल्यावर राजानें त्याला मोठमोठाल्या जमीनी दिल्या व त्यानें दीर्घकाळपर्यंत श्रीमंतीचें ऐश्वर्य भोगलें. दासदासी, शिष्यप्रशिष्य, सोनेंमोतीं यांनीं त्याचा प्रासाद सदा गजबजलेला असे ! त्याची भेट होणें त्याच्या गुरूलाही दुष्कर होऊं लागलें ! शेवटीं एकदां त्याचे गुरु राममिश्र यांनीं त्याची गांठ घेऊन ' नाथमुनींनीं दिलेला गुप्त ठेवा ' त्याच्या स्वाधीन करण्याचे मिषानें त्याला घराबाहेर काढलें व तसेंच श्रीरंगम्‌ला नेले आणि तेथें त्याची कानउघाडणी केली. त्याबरोबर यामुनाचार्यांनीं सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतला ! तेथें अनेक वर्षें राहून त्यांनीं मोठमोठे अनेक ग्रंथ लिहिले. हे अर्थातच विशिष्टाद्वैतमताचे आहेत. श्रीरंगम् येथें अनेक पंडित व विष्णुभक्त यांच्या भोंवतीं जमा झाले. यामुनाचार्यांनीं वेदांत म्ह० ब्रह्मसूत्रें, उपनिषदें व गीता ह्यावर निरूपणें केलीं व विष्णूपासना आपल्या मतानुसार प्रचलित केली. प्रस्थानत्रयीवर त्यांनीं प्रवचनें केलीं व त्यांच्या मतप्रसारार्थ टीकाग्रंथ लिहिण्याचें काम त्यांच्यामागून रामानुज व रामानुजांचे शिष्य यांनीं केलें. ब्रह्मसूत्रांवरील बौधायनाची वृत्ति व द्रमीडाचार्यांचें भाष्य हे ग्रंथ रामानुजापूर्वीं झाले असून त्यांचा विशिष्टाद्वैतपर अर्थ रामानुजानीं केला आहे व त्यांतील उतारेही आपल्या भाष्यांतून दिले आहेत. त्यावेळीं यांच्या मताचे बरेच ग्रंथकार झाले असें दिसतें. यामुनाचार्यांचा पहिला ग्रंथ ' सिद्धित्रय ' हा आहे, यांत आत्मा ईश्वर व संविद् यांची सिद्धि केली आहे. ' एकमेवाद्वितीयं ' या श्रुतिवचनाचा अर्थ अद्वैतपर होत नाहीं असें सांगतांना त्यांनीं दृष्टांत मजेचा दिला आहे; " चोलराजा भूतलावर अद्वितीय सम्राट् आहे असें कोणी म्हटलें तर तत्तुल्य नृपति कोणी नाहीं एवढाच त्याचा अर्थ होईल, यामुळें

त्याच्या पुत्रकलत्रभृत्यादि कोणी नाहींत असा अर्थ होऊं शकत नाहीं!" प्रतिक्षेत्र आत्मा भिन्न आहे असें यामुनाचार्यांचें मत या ग्रंथांत त्यांनीं प्रतिपादिलें आहे. यांचा दुसरा ग्रंथ 'आगमप्रामाण्य.' यांत पांचरात्र व भागवत यांत सांगितलेल्या चतुर्व्यूहाचें मंडण केलें आहे. यांचा तिसरा ग्रंथ 'गीतार्थसंग्रह' हा आहे. यांत कर्म व ज्ञान यांना गौणत्व देऊन भक्तीचें प्राधान्य वर्णिलें आहे. यांचें एक 'स्तोत्ररत्न' नांवाचें विष्णुस्तवन सर्व वैष्णवांना प्रिय आहे. यांनीं दक्षिणेंतील सर्व विष्णुमंदिरांच्या यात्रा केल्या. यांच्या विचारांचा पगडा रामानुजांच्या मतावर बसला.

( ३ ) **रामानुजाचार्य** यांचा जन्म त्रिपति येथें झाला असें म्हणतात. ( श. ९३९–१०५९ ह्म० इ. स. १०१७–११३७ ) यांच्या बाळपणीं यामुनाचार्य सुमार १२० वर्षांचे होऊन वारले. रामानुजानीं त्यांस पाहिलें होते. यामुनाचार्य यांच्यांत वादप्रीति किंवा कलहप्रियता कमी असल्यामुळें चोल सम्राट् शैव असूनही त्यांनीं यांना अगदीं त्रास दिला नाहीं. याच्या उलट अनुभव रामानुज यांना आला. रामानुजांनीं विशिष्टाद्वैत मत प्रतिपादतांना शंकराचार्यांच्या अद्वैतमतावर व मायावादावर कठोर टीका केली आहे व त्यामुळेंच अद्वैती व द्वैती किंवा स्मार्त व वैष्णव यांच्यांत वितुष्ट पडण्यास सुरवात झाली असें दिसतें! दक्षिणेकडे वैष्णवांच्या कलहाला रामानुजांच्या वेळेपासूनच फार जोर चढला. शंकराचार्य जसे अद्वैतसिद्धांताचे मुख्य आचार्य तसे रामानुज हे विशिष्टाद्वैतमताचे मुख्य आचार्य होत. श्रीरंगम्, कांची, तिरुपती, इ० ठिकाणीं विशिष्टाद्वैतमतानें बराच जोर केला. यामुनाचार्यांचे शिष्य शैलपूर्ण हे तिरुपति येथील मठाचे मुख्य होते. त्यांची बहीण कांतिमती हिचा विवाह केशव सोमयाजी यांच्याशीं झाला होता व त्यांना जो मुलगा झाला तोच प्रसिद्ध रामानुजाचार्य हे होत. त्यांचा पहिला गुरु त्यांचा मामा यादवप्रकाश. हा पूर्ण शांकरमतानुयायी होता. त्याच्यापाशीं यांनीं वेदशास्त्राध्ययन केलें. त्याचें व रामानुजाचें पटलें नाहीं, त्यांचा मताचा कल यामुनाचार्यांच्या विशिष्टाद्वैतमताकडे झुकला.

यानंतर अळवारांच्या प्रबंधाचें त्यांनीं अध्ययन केलें व एका चिंचेच्या झाडाखालीं रामाचें आराधन केलें. ते श्रीरंगम् येथें गेले. तेथें त्यांच्या मताचे वैष्णव पुष्कळच होते. ते कावेरीतीरावर आले तेव्हां यामुनाचार्यांच्या अंत्यविधीचा समारंभ हजारो वैष्णव मिळून मोठ्या थाटानें करितांना त्यांनीं पाहिलें. त्यांना अत्यंत खेद झाला. दर्शन झालें पण भाषणाचा योग नव्हता. विशिष्टाद्वैतमताचें ब्रह्मसूत्रावर भाष्य करावें अशी यामुनाचार्यांची शेवटची इच्छा होती ती त्यांस कळून हें काम मींच करीन अशी त्यांनीं ईर्ष्या धरिली. ते नंतर कांचीस गेले व तेथें कांचीपूर्णाजवळ त्यांनीं अध्ययन केलें. कांचीपूर्ण हे ब्राह्मण नव्हते तरी मोठे अधिकारी होते. नंतर तेथेंच महापूर्णाजवळ त्यांनीं भाष्यान्त अध्ययन केलें. ते दोघेही यामुनाचार्यांचेच शिष्य होते. रामानुज मनाचे उदार, सश्रद्ध, व अत्यंत बुद्धिमान् होते. त्यांच्या स्त्रीनें २।३ वेळां त्यांच्या इच्छेविरुद्ध वर्तन केलें यामुळें नाराज होऊन त्यांनीं गृहाश्रमाचा त्याग केला व संन्यास घेतला! रामानुजांच्या भोंवती चांगले विद्वान् शिष्य जमा झाले. कुरेश, दशरथी, गोविंद यति, गोविंद भट्ट, व यज्ञमूर्ति हे त्यांचे मुख्य शिष्य होत. शेवटचे दोघे आधी अद्वैती होते पण ते रामानुजांच्या मताकडे वळले. रामानुज कांची व श्रीरंगम् येथें जाऊन येऊन असत. विष्णूचें नारायण हें नांव त्यांना अत्यंत प्रिय असे.

रामानुजांनीं आपलीं मतें ग्रंथांच्या द्वारें व नंतर सभांच्या द्वारें प्रचलित केलीं. त्यांनीं आपल्या ‘ वेदार्थसंग्रह ’ ह्या ग्रंथांत उपनिषदें अद्वैतपर नसून द्वैतपर आहेत असें प्रतिपादिलें व तें प्रतिपादन करितांना अद्वैतवाद्यांवर ह्म० मुख्यतः शंकराचार्यांवर खूप टीका केली, ‘तत्वमसि’ ह्या महावाक्याचा द्वैतपर अर्थ लावून मायावादावर हल्ला केला व परमात्म्याला नारायणनावानें संबोधिलें पाहिजे–शिवनामानें संबोधितां नये असा उपनिषदांचा अर्थ काढला!

त्यांचा मुख्य ग्रंथ ह्मणजे वेदांतसूत्रांवरील ‘ भाष्य ’ हा होय. शंकराचार्यांच्या पूर्वीं बोधायनानीं वेदांतसूत्रावर जी ‘ वृत्ति ’ लिहिली होती ती

रामानुजांच्या मताला पोषक असल्यामुळें व ती दक्षिणेंत मिळत नसल्यामुळें त्यांनीं आपला शिष्य कुरेश यास काश्मीरांत पाठवून तेथून तिची प्रत मागविली; प्रत मिळालीच नाहीं पण वृत्ति वाचावयास मिळाली, पण कुरेशनें वृत्तीची पोथी वाचतां वाचतां त्यांतील महत्वाचे श्लोक पाठ केले व त्या श्लोकांचा रामानुजांना पुढें आपल्या भाष्यांत उपयोग करितां आला असें ह्मणतात! भाष्यानंतर त्यांनीं वेदांतसार, वेदांतदीप वगैरे ग्रंथ लिहून आपलें 'गीताभाष्य' लिहिलें. ह्या गीताभाष्याचें स्पष्टीकरण पुढें वेदांतदेशिकनामक पंडितानें 'तात्पर्यचंद्रिका' नांवानें ग्रंथ लिहून केलें. रामानुजांनीं यानंतर स्वमतप्रसारार्थ बरोबर मोठा शिष्यसमुदाय घेऊन अनेक यात्रा केल्या. श्रीरंगमहून ते कुंभकोणला गेले. शियाळी, तिरुमंगाई, रामेश्वर, मलबार, त्रावणकोर या प्रांतांतील विष्णुमंदिरें व आळवारांचीं पवित्र स्थळें त्यांनीं पाहिलीं. नंतर ते उत्तरेकडे वळले. गिरनार, द्वारका, जयपूर, मथुरा, बद्रिनारायण, श्रीनगर इ० स्थळीं मुक्काम करीत करीत ते गेले. जयपुरास जैनपंडितांसी वाद करून त्यांना त्यांनीं वादांत जिंकलें. काशी, जगन्नाथ, येथें राहून व अद्वैतीपंडितांशीं वाद करून ते तिरुपति ह्म० व्यंकटेशाची गिरी येथें आले. तिरुपतीचा देव शिव आहे कां विष्णु आहे याचा लढा पडला होता तो त्यांनीं विष्णूच्या बाजूचें मत देऊन मिटविला. श्रीरंगम् येथील मंदिर व तेथील पूजाअर्चा त्यांच्याच धोरणानें चालू होती, किंबहुना तें त्याचें मुख्य क्षेत्रच होतें. तेथे शेंकडो वैष्णव त्यांचे शिष्य होते, त्यांत ७०० संन्यासी व ७० सेवेकरी होते. रामानुजांनीं शिवभक्तीला विरोध केल्यामुळें हजारो शैव त्यांच्यावर नाराज झाले. खुद्द चोलराष्ट्राचा सम्राट् कुलोत्तुंग हा कडक शिवभक्त असल्यामुळें त्यानें रामानुजांना व त्यांच्या शिष्यांना श्रीरंगम्मधून काढून दिले! मग ते रानावनांतून हिंडत होयसळ यादवांच्या द्वारसमुद्र (हाळेबीड) नामक राजधानींत येऊन राहिले. तेथील राजकन्येच्या अंगांतील भूत त्यांनीं काढल्यामुळें राजाराणी त्यांवर प्रसन्न झाली, व त्यांनीं त्यांचा वैष्णवपंथ स्वीकारिला (१०९६).

तेथें जैनांचा त्यांनीं पराभव केला व राजानें ( जैनांना ) आपल्या राज्यांतून हुसकावलें! रामानुज ह्यानंतर होयसळांच्या म्हैसूर राज्यांत २० वर्षें शांततेनें राहिले. त्यांचा संप्रदाय वाढला व बेलूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं नारायणाचीं मंदिरें बांधलीं व पूजेचा एक विशिष्ट क्रम स्वपंथीयांना आंखून दिला. त्यांनीं जैनांप्रमाणें बुद्धपंडितांनाही वादांत हटविलें. चोलसम्राट कुलोतुंग वारल्यावर त्याच्या जागीं आलेला राजा वैष्णवांकडे सहानुभूतीनें पाहणारा होता, त्यामुळें रामानुजांनी आपलें आसन पुन्हां श्रीरंगमला नेलें व तेथें त्यांच्या पूर्वींच्या अनुयायांनीं त्यांचा जयजयकार केला. तेथेंच ते शेवटपर्यंत राहिले. रामानुजांना नारायणानें दीर्घायुष्य दिलें व ते वयाच्या १२१ व्या वर्षीं समाधिस्थ झाले. रामानुज हा एक अलौकिक पुरुष होऊन गेला यांत शंका नाहीं. सर्व दर्जांच्या व जातींच्या लोकांना त्यांनीं भक्तिमार्गाला लावलें. अंत्यजांवर सुद्धां त्यांची दयादृष्टि होती. वादी कडक पण मनुष्य प्रेमळ व लोकसंग्रहकर्ता. त्यांची कृष्णभक्ति अनुपम होती. त्यांच्या ग्रंथांत पुढें वेदांतदेशिक, महामुनि वगैरे अनेक विद्वान् ग्रंथकार झाले व हा पंथ दक्षिणेंत फार पसरला. कबीराचे गुरु रामानंद व बंगालचे कृष्णचैतन्य हे रामानुजपंथांतलेच होते असें म्हणतात. शंकराचार्यांच्या खालोखाल कोणी सनातनधर्मप्रसाराचें कार्य केलें असेल तर तें रामानुजांनींच असें म्हणावयास हरकत नाहीं. तात्विक सिद्धांतांबद्दल मतभेद कांहींही असोत, भक्तिपंथाचे एक प्रमुख आचार्य व महापुरुष या नात्यानें ते सर्वकाळीं सर्वांस वंद्यच वाटले पाहिजेत. प्रपत्ति म्ह० आत्मार्पण, शरणागति. त्यांनीं प्रपत्तीचा अधिकार चारीवर्णांस दिला.

## २१ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें.

### ( १ ) शंकराचार्यांचीं मतें:—

( १ ) एका परब्रह्माव्यतिरिक्त दुसरें कांहीं सत्य नाहीं. ‘ एकमेवाद्वितीयं ब्रह्म, ’ ‘ नेह नानास्ति किंचन ’ ‘ नेति नेति इ० श्रुतिवचनांनीं एका ब्रह्माचीच सिद्धि होते. ‘ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ’ हा मुख्य सिद्धांत.

( २ ) ‘ जगत् मिथ्या ’ याचा अर्थ जगत् केवल मिथ्या आहे असें नाहीं, व्यवहारांत जग सत्यच आहे. जगाला व्यावहारिक सत्ता आहे, पारमार्थिक सत्ता नाहीं. स्वप्नांत पाहिलेले पदार्थ स्वप्नांतापर्यंत सत्यच आहेत, जागृतींत ते मिथ्या आहेत; त्याप्रमाणें ब्रह्मप्रतीति येईतोंपर्यंत जग सत्य, तदनंतर मिथ्या.

( ३ ) ब्रह्म निर्विशेष, निरंजन व निर्गुण आहे, निराकार आहे, सदोदित आहे, ज्ञातृज्ञानज्ञेयविहीन म्ह० त्रिपुटीरहित् एकीएक आहे, तद्व्यतिरिक्त सर्व भास आहे. जगत् स्वप्नवत्, मायाकारित भासमात्र आहे, वस्तुतः सत्य नाहीं.

( ४ ) जीव अनंत नाहींत व परमात्म्याहून भिन्न नाहींत. जीव स्वरूपतः ब्रह्मच आहे, तथापि मायाकल्पित देहेंद्रियोपाधिवशात् जीवास भिन्नत्वाचा व्यवहार आहे. ब्रह्मावांचून सत्पदार्थच नाहीं.

( ५ ) जगाचें निमित्तकारण व उपादानकारण ( विकारभूत ) ब्रह्मच आहे. उपादानकारणही रज्जुसर्पन्यायानें आरोपित आहे, परिणामी ( दुधाचें दहीं तसें ) नव्हे. ब्रह्मानें जग उत्पन्न कां केलें यास उत्तर ‘ ही त्याची केवल लीला आहे ’ हें आहे. अविद्याकल्पित प्रपंचाहून ब्रह्म निराळें आहे. अविद्या ही सर्वज्ञ ईश्वराची माया, शक्ति, प्रकृति आहे.

( ६ ) तत्वमस्यादि महावाक्यांनीं आत्मसाक्षात्कार होऊन अविद्यानिवृत्ति झाली कीं शरीर असूनही मोक्ष होतो. ही जीवन्मुक्ति होय. अज्ञाननिवृत्ति हाच मोक्ष. चार मुक्तींपैकीं फक्त सायुज्यता ही खरी मुक्ति होय.

( ७ ) मुक्तीनंतर जीव-ब्रह्मांत भेद नाहीं. मुक्तावस्थेंत सुखदुःखाचें नांवही नाहीं. मात्र अशी अभेदप्रतीति होईपर्यंत जीवानें शास्त्रोक्त कर्म केलें पाहिजे.

( ८ ) जगताचें नानात्व भासतें हें अविद्याकार्य आहे. रज्जु-सर्प, शुक्तिका-रजत याप्रमाणें ब्रह्मावर जगताचा विवर्त भासतो. ब्रह्माचे ठिकाणीं कार्यकारणभाव नाहीं.

( ९ ) माया ऊर्फ अविद्या सत् का असत् हें सांगतां येत नसल्यामुळें अनिर्वचनीय आहे. हिला अनिर्वचनीय ख्याति म्हणतात.

( १० ) श्रुतिशास्त्र सर्वथा प्रमाण. तर्क किंवा बुद्धि यांना अतींद्रिय ब्रह्मप्राप्तीच्या बाबतींत प्रतिष्ठा नाहीं. जीवब्रह्मैक्य झाल्यावर मात्र श्रुतिस्मृतींचें दास्य उरत नाहीं.

( ११ ) ज्ञानानंतर ज्ञान्याच्या पूर्वकृत कर्मांची व्यवस्था अशी लागते:—त्याचें सुकृत सुहृदांकडे जातें, दुष्कृत निंदकांकडे जातें व प्रारब्धकर्म अनुभवानें नष्ट होतें. अनुभवानंतर ब्रह्मज्ञानी ब्रह्मच होतो. ज्ञानानें ब्रह्मत्व सिद्ध होतें.

( १२ ) ब्रह्माचीं एकाच काळीं सगुण व निर्गुण हीं दोन रूपें आहेत. ब्रह्मच माझा आत्मा ही निर्गुणाची उपासना. नामरूपविकारभेदोपाधियुक्त अशा सगुणाची उपासना सुलभ आहे. सगुण ब्रह्म हें उपासकाला त्याचें सर्व अपेक्षित केवल संकल्पमात्रानें देतें. सगुणोपासकालाही क्रमानें निर्वाण ( मोक्ष ) मिळतो, त्यालाही पुनरागमन नाहीं.

( १३ ) जीवाचें कर्तृत्व भगवदधीन आहे. पूर्वकर्माप्रमाणें जीवांकडून परमात्मा कर्में करवितो. मोक्षही भगवंताच्या अनुग्रहानेंच मिळतो.

### ( २ ) रामानुजांचीं मतें:—

( १ ) चित् व अचित् हीं एकाच ईश्वराचीं रूपें असल्यानें ईश्वर चिदचिद्विशिष्ट आहे, ह्म० ईश्वराचें शरीर चिदचिद्विशिष्ट आहे. ह्या सूक्ष्म चिदचिदापासून ( कारण ) स्थूल चित् ह्म० जीव व स्थूल अचित् ह्म० जगत् हें (कार्य) उत्पन्न होतें. ईश्वर एक आहे हें मान्य आहे, पण तो चित् ह्म० जीव व अचित् ह्म० दृश्य व जड असें जगत् या विशेषांसह रामानुजी मानतात म्हणून या मताला विशिष्टाद्वैत म्हणतात. ' ईश्वरः चिदचिच्चेति पदार्थत्रितयं हरिः '—एक नियंता, एक भोक्ता व एक भोग्य असे तीन पदार्थ मिळून हरि एक आहे.

( २ ) परमात्मा हरिभक्तांच्या उद्धाराकरितां पांच स्वरूपें धारण करितो:—अर्चा, विभव, व्यूह, सूक्ष्म व अंतर्यामी. अर्चा ह्म० मृत्तिका-

शिलामय प्रतिमा; विभव रामकृष्णादि अवतार; व्यूह ह्म० पांचरात्रमतांत –सांगितलेले चतुर्व्यूह–'संकर्षणो वासुदेवः प्रद्युम्नश्चानिरुद्धकः'; सूक्ष्म ह्म० ऐश्वर्यादि षड्गुणसंपन्न वासुदेव व अंतर्यामी ह्म० नियामक.

( ३ ) ईश्वर ज्ञानस्वरूप असून सर्वज्ञत्वादि गुणांनीं युक्त, अनंत कल्याणगुणाश्रय, सर्वात्मक व आनंदमय आहे. सर्वात्मक ह्म० सर्वांशीं अभिन्न नव्हे तर सर्वांचा अंतर्यामी—प्रेरक ! तो ज्ञानस्वरूप असून ज्ञानगुणाश्रय आहे ह्मणून त्याचे ठायीं ज्ञातृत्वही आहे.

( ४ ) तत्वमस्यादि महावाक्यरूप उपासनेनें परमात्मा प्रसन्न होतो. उपासना ही अखंडस्मरणरूप आहे. ती ध्यानज्ञानभक्ति यांनीं वाच्य आहे. परमात्मा प्रसन्न होऊन मुक्ति देतो. मुक्तींत त्याचा व जीवाचा आनंद एकरूप असतो.

(५) यावच्छरीर सुखदुःखानुभव असल्यानें जीवदशेला सायुज्यमुक्ति नाहीं; जीवन्मुक्ति शक्य नाहीं. कर्मक्षयानंतर लौकिकशरीर जाऊन दिव्य-देह प्राप्त होतो व परमात्म्याशीं सलोकता व समीपता मात्र प्राप्त होतात.

( ६ ) मुक्तीनंतरही जीवब्रह्मांचा भेद आहे. मुक्तावस्थेंत दुःखलेशाशीं अभिन्न असें सुखाधिक्य असतें.

( ७ ) ईश्वर सत्य, जगत् सत्य व जीवही सत्य. जीव अनंत व भिन्नभिन्न आहेत. डाळिंबांत अनेक दाणे असले तरी डाळिंब एकच आहे!

( ८ ) जीव व जगत् सविकार आहेत. जीव हा अणुपरिमाणु व हृदयस्थ आहे, पण ईश्वरासारखाच नित्य आहे.

( ९ ) प्रलयांत जीव व जगत् ब्रह्मांत लीन असतात, पण उत्पत्तिकालीं ईश्वरेच्छेनें जीव व जगत् यांचें कार्य सुरू होतें. ईश्वरसांनिध्यानें प्रधान हें जगदाकारानें परिणाम पावतें. जीव व जगत् यांची उत्पत्ति व विकास परिणामवादाप्रमाणें ( जसें दुधानें दही ) होतात. जग सत्य आहे अशी प्रचीति येते म्हणून या मतास सत्ख्याति म्हणतात.

( १० ) श्रुतिशास्त्र सर्वथा प्रमाण व तर्काला अतींद्रियविषयांत प्रतिष्ठा नाहीं. श्रुतिशास्त्रांचा अधिकार देहपातापर्यंत अबाधित चालतो.

(११) सत्य, अहिंसा इ० धर्म सर्वजीवांस सारखेच आहेत, मात्र ब्रह्मविद्येचा अधिकार शूद्रांस नाहीं, तथापि भागवतधर्मनिष्ठापूर्वक भगवदाराधनेच्या योगानें सर्वांस मुक्ति लभ्य आहे. भक्ति म्ह० भजन व प्रपत्ति म्ह० अनन्यशरणागति हीं दोन मोक्षसाधनें आहेत.

## २२ मध्वाचार्य ( इ. स. ११९७–१२७९ )

दक्षिण कानडा प्रांतांत उडुपी गांवाजवळ पाजक नांवाच्या खेड्यांत यांचा जन्म झाला. हे कर्नाटकी आश्वलायन ब्राह्मण. यांच्या बापाचें नांव मध्यगेह व आईचें नांव वेदवेदी. त्यांनीं अनंतेश्वराच्या उपासनेमुळें हा पुत्र झाल्यामुळें त्याचें नांव वासुदेव ठेविलें. गुरुगृहीं वेदाध्ययन झाल्यावर त्यांनीं आपले गुरु अच्युतप्रेक्ष्याचार्य यांच्या अनुज्ञेनें तारुण्यांत संन्यास घेतला. गुरुंनीं त्यांस आनंदतीर्थ हें नांव दिलें व नव्या आश्रमाचें नांव 'पूर्णप्रज्ञ' असें ठेविलें, तथापि मध्वाचार्य या नांवानेंच ते लोकांत प्रसिद्धि पावले. त्यांनीं हिंदुस्थानभर यात्रा केल्या, बद्रीनारायणाला ते जाऊन आले व उडुपी येथें श्रीकृष्णमूर्तीची स्थापना करून राहिले. यांनीं ब्रह्मसूत्रांवर, गीतेवर व कांहीं उपनिषदांवर भाष्यें लिहिलीं. यांच्या शिष्यांच्या नांवाच्या शेवटीं 'तीर्थ' पद आहे, जसें पद्मनाभतीर्थ, माधवतीर्थ इ०. वेदांतशास्त्राचें त्यांनीं स्वतंत्रबुद्धीनें अध्ययन केलें व आपल्या मतानुसार टीका लिहिल्या. यांचें मत रामानुजमतांशीं अधिक जुळतें असून अद्वैतावर यांची फारच करडी नजर आहे. जीव अणुप्रमाण आहे, तो ईश्वराचा दास आहे, वेद अपौरुषेय व स्वतःप्रमाण आहेत, प्रपंच सत्य असून मायावाद खोटा आहे, जीवेश्वरांचें ऐक्य कदापि होणें नाहीं, द्वैतमतच श्रुत्यनुसार सत्य आहे, पांचरात्रमत यथार्थ आहे, भक्तीनेंच ईश्वर प्रसन्न होतो इ० यांचीं मतें आहेत. रामानुजांचा तत्वविभाग त्रिविध आहे, यांचा द्विविध आहे. यांच्या मतें स्वतंत्र व अस्वतंत्र अशीं दोनच तत्वें आहेतः—

**स्वतंत्रमस्वतंत्रं च द्विविधं तत्वमिष्यते ।**
**स्वतंत्रो भगवान्विष्णुर्निर्दोषोऽशेषसद्गुणः ॥**

सकल सद्गुणांनीं युक्त व निर्दोष असा एक भगवान् विष्णु आहे, तो मात्र स्वतंत्र आहे, बाकी सर्व परतंत्र आहे. विष्णु हेंच ब्रह्म. यांच्या मतांत भेदवाद फार आहेत. जीव–ईश्वर भेद, जड–ईश्वर भेद, जीव–जीव भेद, जड–जीव भेद, जड–जड भेद असे हे पांच भेद अनादि आहेत ! प्रपंच या पांच भेदांनीं युक्त आहे. प्रपंच सत्य आहे, भ्रांतिकृत् नाहीं; अर्थात् मायावाद मिथ्या आहे, जीवेश्वरांचें ऐक्य आहे असें बोलणेंच महापाप आहे, अशीं यांचीं मतें आहेत. ईश्वर सेव्य आहे व जीव सेवक आहे. मी ब्रह्म आहे म्हणणारा जीव नाश पावतो ! सेवकाला स्वामीचें स्थान कसें मिळावें ? मी राजा आहे असें म्हणणाऱ्या सेवकाचा राजा नाश करील, पण तोच जर राजाचे गुणानुवाद गाईल तर राजा त्यावर प्रसन्न होऊन त्याला समीप येऊं देईल, जवळ करील !

**घातयन्ति हि राजानो राजाहमितिवादिनः ।**
**ददत्यखिलमिष्टंच स्वगुणोत्कर्षवादिनाम् ॥**

स्वातंत्र्य व पूर्णत्व हे फक्त ईश्वराचे गुण आहेत, जीव हा निरंतर परतंत्र व अल्प आहे. भगवत्प्रसाद होणें हाच जीवाचा मोक्ष आहे. देव सर्वज्ञ, पूर्णस्वतंत्र आहे व जीव याहून भिन्न आहे हें ओळखणें म्हणजेच बंधापासून सुटणें आहे. ह्या पूर्णप्रज्ञदर्शनांत तत्वज्ञान विशेष नाहीं, तथापि तप्तमुद्रा घेणें म्ह० 'अंकन' आहे. याशिवाय यांच्या पंथांतील उपासनेची पद्धत चांगली आहे. अद्वैतावर सामान्य कोट्या लढवून प्रहार करणें व अद्वैताचा उपहास करणें या कामीं माध्वांची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहींत ! अंकन, नामकरण व भजन अशी त्रिविध सेवा करण्यास हे सांगतातः नारायणाच्या शंखचक्रादि आयुधांच्या तप्तमुद्रा अंगावर धारण करणें ही अंकनसेवा; निरंतर विष्णुस्मरण व्हावें ह्मणून पुत्रादिकांचीं नावें विष्णूचींच ठेवणें ही नामकरण-सेवा. भजन दशविध आहे. सत्य, हित, प्रिय भाषण व स्वाध्याय हें वाचिक कर्म; दान, परित्राण ह्म० लोकरक्षण व परिरक्षण ह्म० देवपूजन हें त्रिविध कायिक कर्म; व दया, स्पृहा व श्रद्धा हें त्रिविध मानसिक

कर्म करून तें नारायणास समर्पण करणें हें भजन होय. हें दशविध भजन अद्वैत्यांसही मान्य होणारें आहे. द्वादशीचें व्रत इ० एकादशीचें उपोषण व पूजाअर्चा हा भाग माध्वांचा फार गोड असतो. मध्वाचार्यांना वायूचा अवतार मानतात. हा संप्रदाय धारवाड, कानडा, म्हैसूर या प्रांतींच विशेष आहे.

माध्वांच्या मतें वेद, भारत, पंचरात्र, मूलरामायण, हीं शास्त्रें व यांस अनुकूल असलेलीं इतर शास्त्रें प्रमाणभूत आहेत, याहून अन्य शास्त्रें अयोग्य जीवांना मोह पाडण्यासाठीं विष्णूच्या आज्ञेनें रुद्रानें केलीं व करविलीं आहेत ! वेदांत कोठें रुद्राची स्तुति केलेली आढळते तेथें 'रुद्र' शब्द विष्णुवाचकच समजावा अशी त्यांनीं आपल्या मतास पुस्ती जोडली आहे ! शांकरमतांत शिवविष्णूंत भेदाभेद मानलेला नाहीं, पण रामानुज व माध्व यांनीं विष्णु हा एकच देव मानला आहे. यांतही कांहीं बिघडत नाहीं, पण त्यांनीं शिवाच्याविरुद्ध मोहीम सुरू केल्यामुळें दक्षिणेंत शैव आणि वैष्णव हा नस्ता तंटा माजून राहिला आहे! आनंदोद्रेकानें पुरुष गातो नाचतो, त्याप्रमाणें परमात्म्यानें त्याचा दुसरा कांहीं एक हेतु नसून स्वसुखार्थ ही सृष्टिरचना केली आहे असें माध्व मानतात. जीव हा अणुपरिमाणु असून हृदयांत आहे, जीव अनंत आहेत व ते परमात्म्याहून अत्यंत भिन्न आहेत असें त्यांचें मत आहे. हरिगुरुभक्ति, शमदमादि, श्रवणमननादि साधनांनीं परमात्मा प्रसन्न होऊन मोक्ष देतो, हृदयस्थ बिंबरूपी परमात्म्याचें अपरोक्षज्ञान म्हणजेच मोक्ष, पांचभौतिक देहसंबंधाची निवृत्ति म्ह. मोक्ष, मोक्षांत जीवांना योग्यतेनुरूप आनंद होतो, देवऋषि यांच्या पत्न्यांना मात्र वेदाधिकार आहे–इतर स्त्रियांना नाहीं, त्रैवर्णिकांतही विष्णुगुरुभक्त शमादियुक्त असतील त्यावांचून इतरांना वेदाधिकार नाहीं, पूर्वजन्मीं अपरोक्षज्ञान झालेले जे विदुरधर्मव्याधादि त्याशिवाय इतर शूद्रांना वेदाधिकार नाहीं, इत्यादि माध्वांचीं मतें आहेत; व तीं रामानुजमतांशीं कांहीं मिळतीं आहेत व कांहीं भिन्न आहेत. विष्णूची उपासना हा एकच मार्ग त्यांना माहीत आहे. विष्णु आनंदपूर्ण

आहे, अंतर्यामी आहे, पृथ्वीस्वर्गाद्याधार, अदृश्य, अवयवावयविभेद-विहीन, सर्वगत, अव्यक्त, सकलगुणोपेत आहे; तो अदृश्य असला तरी ज्यांवर त्याची प्रसन्नता होते त्यांना तो व्यक्त होतो. विष्णु स्वामी व मी त्याचा सेवक या भावनेनें त्याची उपासना केली पाहिजे. माध्वांचीं मतें या प्रकारचीं आहेत.

## २३ तीनही आचार्यांचें मतैक्य.

तीनही आचार्यांच्या मतांचा विचार केला तर त्यांच्यांत जसे कांहीं भेद आहेत तसें ऐकमत्यही आहे असें आढळून येतें. ब्रह्म हें व्यापक आणि शाश्वत असून तेंच सृष्टीचें निमित्तकारण आहे असें तिघांचेंही मत आहे. सृष्टीचें उपादानकारणही तेंच आहे असें पहिल्या दोन आचार्यांचें मत आहे, फक्त माध्वांस हें मान्य नाहीं. सृष्टि ही परमात्म्यानें लीलेनें केली असें सर्वांचें मत आहे. अनादिसंसारमुक्तता हें सर्वांचें ध्येय आहे; उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व भगवद्गीता हे वेदांतशास्त्राचे मुख्य ग्रंथ तिघांसही मान्य आहेत; ब्रह्मनिरूपणाच्या बाबतींत श्रुतिप्रामाण्य मुख्य असून श्रुतिविरुद्ध नसेल तर तर्कालाही वाव आहे; तर्काला मर्यादा असल्यामुळें श्रुति हेंच अखेरचें प्रमाण आहे अशा प्रकारची श्रुतिशरणता सर्वांस कबूल आहे; कर्म केवल चित्तशुद्धीचें साधन असून ज्ञान व भक्ति त्याहून वरिष्ठ आहे असें तिघांचेंही मत आहे; उपासना तिघांनाही पाहिजे आहे; भगवंताच्या अनुग्रहानेंच मोक्ष मिळतो याविषयीं तिघांचीही एकवाक्यता आहे; व्यावहारिक बाबतींत सृष्टि सत्य असून शास्त्रमार्गानें जाण्यांतच परमार्थलाभ होतो याविषयींही मतैक्य आहे; फक्त शंकराचार्यांचा मुख्य भर ज्ञानावर आहे तर रामानुजमध्वांचा भर भक्तीवर आहे एवढेंच मतांतर आहे. तथापि ज्ञानांत भक्ति व भक्तींत ज्ञान समाविष्ट आहे हें पाहिलें म्हणजे उरलेला मतभेदही विरघळून जाणारा आहे परमताविषयीं औदार्य ठेवून तीनही आचार्यांचे अनुयायी परस्परप्रेमानें वागतील तर सनातन वैदिकधर्माची सेवा त्यास अधिक चांगली करितां येईल.

# उत्तरार्ध

# ८ महाराष्ट्र देश व मराठे लोक.

## १ दण्डकारण्य.

महाराष्ट्राला फार प्राचीन काळीं दण्डकारण्य म्हणत. रामाच्या ६५ पिढ्यांचा मागचा पूर्वज इक्ष्वाकुनामक भरतखंडाचा एक सम्राट होऊन गेला. त्यानें आपलीं अनेक राज्यें आपल्या मुलांत वाटून दिलीं. त्यापैकीं दण्डनामक पुत्राच्या वांट्यास विंध्यपर्वतापासून तों नीलपर्वता-पर्यंतचा दक्षिणापथ आला. ह्या दण्डराजानें धर्मनीतिव्यवहाराचे फार चांगले नियम ( दण्डक ) लोकांना घालून दिले व दीर्घकालपर्यंत उत्तमप्रकारें राज्य केलें म्हणून ह्या दक्षिणापथाला दण्डकारण्य म्हणूं लागले. येथें पूर्वीं फार मोठालीं अरण्यें असत ( व अजूनही आहेत ), आणि त्यामुळें उत्तरपथापेक्षां लोकवस्ती येथें विरळ होती. महाराष्ट्र व कर्नाटक अशीं नांवें मागाहून ज्या प्रदेशाला पडलीं त्या दोन्ही विभा-गांचा दण्डकारण्यांत तेव्हां अंतर्भाव होत असे. भृगु व अगस्ति ह्या दोन ऋषींनीं उत्तरेकडील आर्यांची संस्कृति विंध्यापासून रामेश्वरापर्यंत सर्व दक्षिणभागांत पसरली व ती द्रविड संस्कृतीशीं मिश्र होऊन महाराष्ट्रीय संस्कृति निर्माण झाली. आर्य व द्रविड अशा उभय संस्कृतींच्या मिश्रणानें महाराष्ट्रीय संस्कृति बनली. असें विद्वानांचें मत आहे. महाराष्ट्रीय आर्य आहेत व द्रविडही आहेत. आर्यसंस्कृतीबरोबर आर्यांचें चातुर्वर्ण्यही महाराष्ट्रांत आलें.

दण्डकारण्यांत पूर्वीं राक्षस राहत, तसे ऋषिमुनिही तपश्चर्येसाठीं राहत. कोळी, कातकरी, कैकाडी, वडार, भिल्ल, वार्ली, गोंड वगैरे अनाडी जाती येथें पूर्वींपासून राहत आल्या आहेत. येथें कांहीं राक्षस ह्मणजे मनुष्यभक्षक होते व मृत प्राण्यांच्या मांसावर राहणारे लोकही होते; पण आर्यांनीं राक्षसांचा संहार करून पंचमांना वस्तीपासून जरा

दूर ' अस्पृश्य ' म्हणून ठेवले. अयोध्याधिपति रामाचें सीताशोधनाच्या निमित्तानें दण्डकारण्यांत आगमन झालें त्यापूर्वींच येथें आर्यांची वस्ती झाली होती. येथें राम येण्याच्या पूर्वींही ब्राह्मणादि सर्व वर्णांचे लोक होते असें वाल्मीकिरामायणावरूनही दिसतें. रामाला येथें शूर्पणखा भेटली, तसी शबरीही भेटली. शूर्पणखा राक्षसीण होती, शबरी भिल्लीण होती. शबरी अनाडी लोकांत वाढलेली पण शुद्ध सात्विक मनोवृत्तीची होती. रामानें खरदूषणत्रिशिरादि १४ हजार राक्षस मारले पण इतर सर्वांना जवळ केले. शबरीची प्रेमळ रामभक्त म्हणून ख्याति झाली. मातंग ऋषीच्या आश्रमांत राहून तिची मनोभूमि उज्ज्वल झाली होती, मातंग गुरूच्या कृपेनें तिला रामाची भेट झाली व रामानें तिला कृतार्थ केलें. दण्डकारण्य ही केवळ राक्षसांची भूमि असें म्हणतात तें बरोबर नाहीं. येथें राक्षस होते व मुनीही होते. ' राक्षसांना मारून यशस्वी हो ' असा आशीर्वाद देणारे मुनिही रामाला दण्डकारण्यांत भेटले. राम चौदा वर्षांच्या वनवासापैकीं १२ वर्षें गोदातीरीं पंचवटींत राहिले होते. त्र्यंबकेश्वराजवळच्या डोंगरावर मारुतीला जन्म देणारी तपस्विनी अंजनी माता राहत होती व गोदातीर सोडून राम तुंगभद्रेकडे गेले तेव्हां तेथें त्यांना मारुति, सुग्रीव, अंगद इत्यादि धर्मात्मे भेटले व त्यांच्याच साह्यानें रामानें रावणप्रमुख राक्षसांचा वध केला व दक्षिण देश राक्षसांच्या त्रासापासून मुक्त केला. दण्डकारण्य अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे पहिल्यापासून पुण्यभूमी आहे.

दण्डकारण्यांतील घनारण्यांची अवर्णनीय शोभा तपस्विजनांना व एकांतप्रिय मुनींना आपल्याकडे ओढून घेत असे. विंध्य व तापीनर्मदा ओलांडून उत्तरेकडील माणसें दक्षिणापथांत आलीं कीं त्यांना गोदावरीचा रमणीय परिसर मोहून टाकी. उत्तुंग गिरिशिखरें, निबिड व घनघोर अरण्यें, लहान मुलांप्रमाणें इतस्ततः स्वैर धांवणारे नदीनाले, नंदनवनालाही लाजविणाऱ्या सुंदर वनराजि, मोठमोठे गिरिशृंग, दरेदरकुटे, पाठारे व मैदानें, गिरिगव्हरें, विवरें व भूयारें व सर्वत्र स्वानंदानें विहर-

णारे विविध जातींचे, आकारांचे व रंगाचे संदर पक्षुपक्षी यामुळें हें दण्डकारण्य–हा आमचा प्राचीन महाराष्ट्र–पृथ्वीवरचा अत्यंत रमणीय, अत्यंत पावन व अत्यंत मोहक असा सोन्याचा तुकडाच आहे.

वाल्मीकिरामायणाच्या अरण्यकांडांत ( अ० १३ ते १५ ) दण्डकारण्याचें फार नामी वर्णन आलें असून त्याच्या सौंदर्याची आजही प्रतीति येते. राम येथें येण्यापूर्वी राक्षसांपासून ऋषिमुनींना व ब्राह्मणादि सर्वधार्मिकांना फार त्रास होत असे, हे राक्षस धर्मकृत्यांना विघ्न करीत. अगस्त्यमुनींचा आशीर्वाद घेऊन राम सीतालक्ष्मणांसह जनस्थानांत ह्मणजे नाशीकपंचवटींत आले. गोदातीरचा पुण्यप्रदेश पाहून त्यांनीं येथें ‘ विशाल पर्णशाला ’ बांधली. ‘ इदं पुण्यमिदं मेध्यं ’ असें त्यांना या भूप्रदेशाविषयीं वाटलें. ‘ रम्यां गोदावरीं नदीं ’–अशा गोदावरीचें त्रिवर्गानें नित्य स्नान करावें व ‘ नित्यपुष्पितकानन ’ व ‘ प्राज्यफलमूल ’ अशा या प्रदेशांत स्वानंदानें संचार करावा. स्वतः श्रीराम स्वमुखानें लक्ष्मणाला सांगतातः—

**अत्र गोदावरी रम्या पुष्पितैस्तरुभिर्वृता ।**
**दृश्यन्ते गिरयः सौम्य फुल्लैस्तरुभिरावृताः ॥**
**सालैस्तालैस्तमालैश्च खर्जूरपनसाम्रकैः ।**
**निवारैस्तिमिशैश्चैव पुन्नागैश्चोपशोभिताः ॥**
**चूतैरशोकैस्तिलकैश्चपंकैः केतकैरपि ।**
**पुष्पगुल्मलतोपेतैस्तैस्तैस्तरुभिरावृताः ॥** ( अ०१५ )
**खर्जूरपुष्पाकृतिभिः शिरोभिः पूर्णतंडुलैः ।**
**शोभन्ते किंचिदानम्राः शालयः कनकप्रभाः** ( अ० १६ )

रामाच्या वेळचे हे वृक्ष आजही जनस्थानांत दृष्टीस पडतात. खर्जूर म्ह० खारीक, आम्र व च्यूत म्ह० आंबा, चंपक म्ह० चाफा, केतकी म्ह० केवडा, साल म्ह० सालई[1] इ० वृक्ष दण्डकारण्याला शोभा आणीत असत.

---

१ साल किंवा सालई. हे सालवृक्ष मोठे असतात. त्यांचीं लांकडें जाळलीं कीं सुगंध सुटतो, त्यांच्या चिकापासून धूप होतो व लांकडापासून काड्याच्या पेट्या करितात.

शेवटच्या श्लोकांत वर्णिलेलीं किंचित् लवलेलीं, कनकप्रभ व तंडुलपूर्ण अशीं शोभायमान भातखाचरें रामाप्रमाणें आजही कोणाला समाधान देत नाहींत ? राम म्हणतात कीं येथें दिवस 'मृदुसूर्य' व 'सुमारुत' असे असतात; येथें फिरणें फार सुखाचें वाटतें–'अत्यंत सुखसंचाराः' असो. गोदावरीच्या परिसरांत रामाला जें सुख झालें तें आज कोणासही होणारें आहे. रामाचें येथें एक तप वास्तव्य झाल्यानें नाशिकपंचवटीला महाक्षेत्राचें स्वरूप आलें व दण्डकारण्यांतील लोकांवर त्याच्या लोकोत्तर सद्गुणांची छाप पडून लोकांना उत्तम वळण लागलें. हा भूप्रदेश रामचरणरजांनीं पावन झालेला आहे.

रामावतारानंतर किती शतकें गेलीं कोणांस ठाऊक, पण पुढें कृष्णावतारीं आपण आज ज्याला वऱ्हाड म्हणतों तो विदर्भ देश पुढें आला. बृहदारण्यकांत 'विदर्भी कौंडिण्य' असें एका ऋषीचें नांव आलें आहे त्यावरून विदर्भदेशाची फार पुरातनकालापासून प्रसिद्धी आहे असें दिसतें. कौण्डिण्य ऋषीच्या नांवावरूनच पुढें कुंडिनपूर ऊर्फ विदर्भनगरी वसविली गेली असावी. तीच पुढ वऱ्हाडची राजधानी झाली. विदर्भदेश रामावतारापूर्वीपासून प्रसिद्ध होता. विदर्भ राजघराण्यांतील अनेक राजकन्या अयोध्येच्या सूर्यवंशी राजघराण्यांत पडल्या होत्या. रामाचा पूर्वज सगर राजा याची राणी केशिनी ही विदर्भराजकन्या होती. विदर्भाच्या भोजराजाची बहिण इंदुमती ही रामाची आजी होती. लोपामुद्रा, दमयंती व श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी ह्या नामांकित पतिव्रता विदर्भराजकन्याच होत्या. कृष्णाच्या वेळीं कुंडिनपूरचा विस्तार अमरावती ( उमरावती ) पर्यंत होता, व ज्या देवीच्या देवळांतून कृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें तें देऊळही अजून उमरावतीस आहे. रुक्मिणीचा

१ वाल्मीकिरामायणाचा रचनाकाल विद्वानांनीं तूर्त ख्रि. पू. २१०० हा ठरविला असल्यामुळें दण्डकारण्याचें वरील वर्णन चार हजार वर्षांपूर्वीचें आहे हें उघड आहे ! रामकथेवर भासकवीचीं ( ख्रि. पू. ५५०–५०० ) दोन नाटकें प्रसिद्ध आहेत.

भाऊ रुक्मी याचें कृष्णाशीं युद्ध झाल्यावर रुक्मी कुंडिणपुरास परत गेला नाहीं व त्यानें कुंडिणपुराहून ७ कोसांवर भोजकट नांवाची नगरी वसविली. यानंतर द्वारकेच्या यादवघराण्यांतील अनेक लोक वऱ्हाडांत येऊन राहिले. महाभारतांत विदर्भ, त्याची राजधानी भोजकट, व तेथील पयोष्णा नदी यांचा उल्लेख आला आहे. रुक्मीला भारतांत 'दाक्षिणात्यपति' म्हटलें असून या लोकांना 'दाक्षिणात्य' म्हटलें आहे. हे वऱ्हाडांतील भोज व गोदातीरस्थ रट्ट हे सोमवंशी यादव असून त्यांच्यांत आपले-पणाची जाणीव होती, त्यांच्यांतच कृष्णातीरस्थ कुंतल लोकांचा समा-वेश होऊन तिघांचा मिळून महाराष्ट्र बनला. चालुक्य घराणें सूर्यवंशी होतें. या घराण्याच्या रट्ट व भोज घराण्याशीं सोयरिकी झाल्या आहेत. यांतूनच मराठ्यांच्या ९६ कुळी झाल्या. महाराष्ट्रांतील मोठमोठीं शूर मराठ्यांचीं घराणीं निःसंशय क्षत्रियबीजाचीं आहेत. महाभारतांत महाराष्ट्र हें नांव नसलें तरी भीष्मपर्वांत पाण्डुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र व अश्मक ह्या राष्ट्रांचा उल्लेख आहे. यांतील गोपराष्ट्र म्हणजे गोदातीरचा नाशीकच्या भोंवतालचा प्रदेश व अश्मक म्हणजे देवगिरीपैठणच्या टापूंतला प्रदेश. कृष्णेच्या उगमापासूनचा दक्षिणचा प्रदेश याला कुंतलदेश म्हणत. त्याचा विस्तार तुंगभद्रेपर्यंत होता. तुंगभद्रेच्या खालच्या प्रदेशास चोल, पाण्ड्य, तामीळ व केरळ हीं नांवें असून पूर्वकिनाऱ्याकडे कलिंग ( ओरिसा ) व आंध्र ( तैलंगण ) हे प्रांत होते. चोल, पाण्ड्य, तामीळ, केरळ, कलिंग व आंध्र याशिवाय उरलेल्या नर्मदेच्या दक्षिणेच्या सर्व विस्तीर्ण प्रदेशास ( अपरांत म्हणजे उत्तरकोंकण धरून ) महाराष्ट्र

१ राजशेखरानें ( इ. स. ९१०–९६० ) आपल्या भुवनकोशांत म्हटलें आहे कीं माहिष्मतीच्या खालीं दक्षिणापथ आहे. माहिष्मती ह्म. नर्मदातीरावरील महेश्वर किंवा मंडला. दक्षिणापथांतील महाराष्ट्र, माहिषक, अश्मक, विदर्भ, कुंतल, क्रथकौ-शिक व शूर्पार इत्यादि देशांचीं त्यानें नांवें घेतलीं आहेत, व अगदीं दक्षिणेकडील लोकांचा वर्ण काळा असून पश्चिमेकडील म्हo महाराष्ट्रांतील लोकांचा वर्ण पांडु आहे असें म्हटलें आहे.

२०

अशी संज्ञा कालांतरानें प्राप्त झाली. अर्थात् महाराष्ट्रांत दक्षिणेस कुंतल देश ( ज्यास आपण हल्लीं दाक्षिण महाराष्ट्र म्हणतों तो देश ), पूर्वेस वऱ्हाड, पश्चिमेस कोंकणपट्टी, शिवाय दण्डकारण्यविशेषनामक मधला सर्व भूप्रदेश ह्या विशाळ प्रदेशास महाराष्ट्र असें नामाभिधान मिळत मिळत मिळालें. महाराष्ट्री बोली व समान आचारविचार यांची साधारण एकरूपता असलेल्या या अनेक राष्ट्रांचें मिळून महाराष्ट्र बनलें. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तरी आर्य लोक इ. स. पूर्वी सातव्या शतकांत महाराष्ट्रांत आले असें डॉ. भांडारकर म्हणतात. बुद्धाच्यावेळीं वैदिक ब्राम्हणधर्म महाराष्ट्रांत चालू होता हें सिद्ध आहे. शूर्पारक उर्फ सोपारें हें अपरांतांत ( ठाणें जिल्ह्यांत ) प्रसिद्ध आहे. तेथें अशोकाचा एक स्तंभ आहे. बुद्धाचा शिष्य यानें सोपारा येथें एक मठ बांधला व हजारों लोकांस बौद्ध केलें पण तिकडे तेव्हां ब्राह्मणक्षत्रियादि जाति होत्या व वैदिकधर्म प्रचलित होता ही गोष्ट स्पष्ट आहे.

समुद्रगुप्ताच्या लेखांत महाराष्ट्रास ‘ देवराष्ट्र ’ म्हटलें आहे, यावरून महाराष्ट्रांतील लोकांची सात्त्विक स्वभावाबद्दल इ. स. च्या ४ थ्या शतकापूर्वी उत्तरेकडे बरीच ख्याति झाली असावी असें दिसतें.

## २ महाराष्ट्राच्या चतुःसीमा.

राजसत्तेच्या दृष्टीनें महाराष्ट्रदेशाच्या सीमा वेळोवेळीं संकोचविकास पावत असल्या तरी महाराष्ट्रीय संस्कृतीच्या ह्म० लोकव्यवहार, भाषा, धर्म, चालीरीती, दळणवळण इत्यादिकांच्या दृष्टीनें महाराष्ट्राच्या व्याप्तीची सामान्य अटकळ यावी यासाठीं त्याचें एक स्थूल शब्दचित्र येथें चितारीत आहे. नर्मदेपासून तो तुंगभद्रेपर्यंतचा दक्षिणोत्तर टापू व पश्चिमसमुद्रापासून तों नागपूरभंडाऱ्यापर्यंतचा पूर्वपश्चिम टापू एवढा

१ अलबरूनी यानें ( इ. स. १०३० ) लिहिलें आहे कीं ‘ **मराठ** देश नर्मदेच्या दक्षिणेस आहे. ’

ठक्कर वाचनालय, सातारा.



भरतभूमीचा विशाळ प्रदेश महाराष्ट्रांत येतो. पालघरपासून गोकर्णापर्यंतचा समुद्रकांठचा अपरान्त उर्फ कोंकणप्रांत, विजापूर व अर्धा बेळगांव जिल्हा, कऱ्हाडवाईपासून कोल्हापूरपर्यंतचा दक्षिण महाराष्ट्र, सोलापूर, नगर, पुणें व नाशिक हे चार जिल्हे, सेउणप्रांत उर्फ खानदेश, वैदर्भ ह्मणजे मोगलाईतल्या मराठवाडींतल्या चार जिल्ह्यांसगट आजचा सगळा वऱ्हाड, व त्याच्या पूर्वेकडचा नागपूरप्रांत एवढा भूप्रदेश ह्मणजे महाराष्ट्र होय. सह्याद्रीच्या व सातपुड्याच्या रांगा व त्यालगतचे इतर कित्येक डोंगर व डोंगरी किल्ले—म्हणजे पन्नगालय उर्फ पन्हाळा व केदारेश्वर उर्फ जोतिबाचा डोंगर, रायरी उर्फ रायगड व महाबळेश्वर, महादेवाचें शिंगणापूर अथवा शिखर—शिंगणापूर, भीमाशंकर व शंभुमहादेव, सप्तशृंगी व ब्रह्मगिरी उर्फ त्र्यंबकेश्वर, अंबरनाथ व कनकेश्वर, नरनाळा व गोविलगड आणि इतर अनेक पर्वतराजींचा महाराष्ट्रांत समावेश होतो. महाराष्ट्राची मुख्य नदी गोदावरी; तथापि तापी, नर्मदा, भीमा, कृष्णा, पयोष्णी उर्फ पूर्णा, पाइनगंगा, वरदा उर्फ वर्धा इत्यादि अनेक नद्या महाराष्ट्रांतून वाहत आहेत. वेरूळ व अजंठा, कऱ्हाडजवळील आगाशिवाचीं लेणीं, कार्लें व भाजें येथील लेणीं, नाशीकजवळचें पांडवलेणें, कान्हेरी, जोगेश्वरी व घारापूर येथील लेणीं—हीं सर्वलेणीं महाराष्ट्रांत आहेत. महाराष्ट्रांत तीर्थक्षेत्रें व नगरेंहीं विपुल आहेत. करवीरची अंबाबाई, कऱ्हाडवाईची कृष्णाबाई, धौम व गोकर्ण, पूनक उर्फ पुणें, आळंदी, पुणतांबें, नेवासें, नाशिकपंचवटी, औंधची यमाई व तुळजापूरची तुकाई उर्फ भवानी, मातापूर उर्फ माहूर, चिपळूणचा परशुराम, पुळें व थेऊर येथील गणपति, जेजूरीचा खंडोबा, पैठण, बीड, जोगाईचें आंबें, औंढ्या नागनाथ, गाणगापूर व वाडी, पंढरपूर, नीरानरसिंगपूर, अष्टविनायक व बाराज्योतिर्लिंग यापैकीं कित्येक स्थानें, बार्शी,

* १ जोतिबा हा काशीचा कोतवाल (भैरव) होय. 'उत्तरेचा देव दाक्षिणेस आला' असें त्याच्या आरतींत आहे.

परभणी व नांदेड, अंबिकापूर उर्फ उमरावती व वाशीम, लोणार, मेहेकर, कारंजा, नागपूर, ऋद्धिपूर, पाथरी इत्यादि अनेक तीर्थक्षेत्रें व नगरें महाराष्ट्रांत आहेत. महाराष्ट्रांतील डोंगरी किल्ले व हवापाणी यांच्या नित्य-संगतीमुळें सर्व जातींच्या मराठ्यांत उमदेपणाचे अनेक गुण आहेत. शौर्य, धाडस, स्वातंत्र्यप्रीति, मुत्सद्दीपणा, अपमानाची चीड, हे गुण त्यांत सहज असून चढित व पडित अशा दोन्ही काळांत बाणेदारपणानें वागण्याचें उत्कृष्ट वळण त्यांस लागलें आहे. यादवीपणाचा दुर्गुण मात्र या वरील गुणांस मोठेंच गालबोट आहे ! गणपति, देवी, दत्त, शिव व विष्णु आणि त्याचे नृसिंहादि अवतार, ह्या देवतांचे भक्त महाराष्ट्रभर पसरले आहेत. बाराव्या शतकांत पंढरपूरचा उपासनापंथ बळावत चालला व ज्ञानेश्वरनामदेवादि भक्तांमुळें महाराष्ट्रांत तोच अग्रेसर व सर्वगामी पंथ ठरला पण त्याच्यापूर्वी शिव व पार्वती ( देवी ) यांचीच उपासना जारी होती. प्राचीन देवळें बहुतेक शिवाचींच आहेत यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

## ३ राष्ट्रकूट व शालिवाहन.

महाराष्ट्रांतील माहीत असलेलें अगदीं पहिलें राजघराणें राष्ट्रकूटांचें होय. राष्ट्रकूट हे यादववंशीय असून सात्यकीच्या कुळांतले होत. अनेक प्राचीन ताम्रपटांवरून हें सिद्ध झालें आहे. ह्या कुळांत एक 'रट्ट' नांवाचा राजा झाला, त्याच्या मुलाचें नांव राष्ट्रकूट होतें व त्याच्या नांवावरून त्याच्या वंशास राष्ट्रकूट म्हणूं लागले. अशोकाच्या 'शहाबाजगढी' येथील स्तंभलेखांत 'माझे शेजारी राष्टिक व पिटिणिक ( पैठणकर ) यांचीं राज्यें आहेत' असें स्पष्ट म्हटलें आहे यावरून त्याचे वेळीं खि. पू. (२७३–२३३) म्ह. तिसऱ्या शतकांत राष्ट्रिकांचें व पैठणकरांचें अशीं दोन महाराष्ट्रीयांचीं राज्यें नर्मदेच्या दक्षिणप्रदेशीं होती असें दिसतें. राष्टिक म्हणजेच राष्ट्रिक. रट्ट–राष्ट्र; महारट्ट-महाराष्ट्र. महत्वलालसेनें भोज जसे आपणांस महाभोज म्हणवीत तसे रट्ट आपणांस महारट्ट

म्हणवूं लागले व महारट्टांचा देश तो महाराष्ट्र झाला. महाराष्ट्र–मराहाट–मराठा. महारथी, राष्ट्रिक, महाराष्ट्रिक, महारट्ट, मराठे हीं नांवें सर्व एकच आहेत. लहान लहान राष्ट्रिकराजे किंवा या राजांचीं कुळें महाराष्ट्रांत अशोकाच्याही पूर्वींपासून पसरलीं होती व त्यांच्यामुळेंच आपल्या देशास महाराष्ट्र हें नांव मिळालें, व या देशाच्या बोलीस महाराष्ट्र भाषा म्हणूं लागले. राष्ट्रिक अथवा राष्ट्रकूट हे महाराष्ट्रांत अगदीं जुन्यांतले जुने आहेत. यांच्या कर्तृत्वामुळें सर्व राष्ट्रास यांचें नांव मिळालें. वऱ्हाडांतील भोज, हे राष्ट्रकूट व नाशीककडील यादव हे महाराष्ट्रांतील मराठा क्षत्रियांचे पूर्वज होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठा हा शब्द महाराष्ट्रांतील सर्वजातींच्या लोकांचा वाचक झाला. ह्या सर्व जातींत मराठा क्षत्रिय व मराठा ब्राह्मण हे आपल्या कर्तबगारीनें सर्वांचे पुढारी झाले व ते आजतागाईत पुढारीच आहेत.

अशोकानंतर मौर्यांचें साम्राज्य बुडालें, व सर्वत्र वैदिक धर्माच्या लोकांनीं व राजांनीं डोकें वर काढलें. त्या सर्वांत आंध्रांनीं पहिला नंबर पटकावला. आंध्र हें अशोकाच्या पूर्वींपासून आपल्या देशावर राज्य करीतच होते पण त्यांनीं आपले पाय इतके पसरले कीं हिंदुस्थानभर आंध्राचेंच साम्राज्य तीन शतकेंपर्यंत गाजलें. गोदावरी व कृष्णा यांच्या मधला पूर्वसमुद्राकडील भाग याला आंध्र ह्मणतात. हे सातवाहन किंवा शालिवाहन नांवानें प्रसिद्ध आहेत. शालिवाहन हे आंध्र होते कां महाराष्ट्रीय होते, हे जातीनें कुंभार होते का ब्राह्मण होते कां क्षत्रिय होते याविषयीं विद्वान् लोकांत वाद चालू आहेत. ख्रि. पू. १५० पासून इ. स. १५० पर्यंत यांनीं महाराष्ट्रावर राज्य केलें. यांना आंध्रभृत्य असेंही ह्मणतात. आंध्रभृत्य याचा अर्थ आंध्रांचें स्वामित्व कबूल करणारे, मांडलिक. यांचीं नाणीं व शिलालेख नाशीक, कन्हेरी व कार्ले येथील लेण्यांत ह्मणजे महाराष्ट्रांतच सांपडले आहेत. त्यांत 'सातवाहन हें' नांव आहे पण आंध्र हें नांव नाहीं यावरून सातवाहन महारा-

ष्ट्रीय असावेत असें एक मत आहे, पण पुराणांतून सातवाहन हे आंध्र होते असें ह्मटलें आहे. ह्या घराण्यांतील एक विख्यात राजा गौतमीपुत्र याच्या शिलालेखावरून असिक, अश्वक, मुलक, सुराष्ट्र, अपरांत, विदर्भ, अकरवन्ती इ० देशांवर त्यांचें राज्य पसरलें असून विन्ध्य, सह्याद्रि, ऋक्षवत्, श्रीस्थान ह्म० श्रीशैल, मलय, महेंद्र ह्या पर्वतराजि त्यांच्या राज्यांत असल्याचें स्पष्ट होत आहे. मुलक ह्म० मूळ आंध्र, मूलिक नाडु. हे आंध्र देशांतून कर्नाटकांत पसरले. आंध्र, कर्नाटक, कुन्तल [ह्म० दक्षिण महाराष्ट्र, मुख्य महाराष्ट्र, गुजराथ, काठेवाड, इ० राष्ट्रें आपल्या राज्यांत क्रमानें सामील करून त्यांनीं आपलें प्रचंड साम्राज्य उभारलें व प्रतिष्ठान उर्फ पैठण ही आपल्या साम्राज्याची राजधानी केली. पैठण त्यांच्या साम्राज्यसत्तेमुळें सर्वत्र गाजून राहिलें. पद्म, कूर्म, लिंग, भविष्य, इ० पुराणांत व जातककथांत प्रतिष्ठानचें ऐश्वर्य उल्लेखिलेलें सांपडतें. पश्चिमसमुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत कृष्णागोदांचा सारा प्रदेश शालिवाहनांच्या साम्राज्यांत प्रमुखत्वानें मोडत होता. यांच्या ऱ्हास-कालीं हे प्रतिष्ठान सोडून आपल्या मूळच्या आंध्र प्रांतांत गेले. ह्या घराण्यांत ४०० वर्षांत २३ राजे झाले. त्यांत १७ वा राजा हॉल ( इ० स० ७८ ) हा अत्यंत भाग्यशाली व विद्वान् निघाला. याचें राज्य हा गादीवर आला तेव्हां पाटलीपुत्र ( मगध ) पासून ह्मैसुरापर्यंत पसरलें होतें. 'लीलावतीपारिणय' नांवाचा एक प्राकृतभाषेंतला ग्रंथ अगदीं अलीकडे उपलब्ध झाल्याचें मद्रासेकडील 'भारती' नांवाच्या तेलगू मासिकावरून कळतें. ह्या ग्रंथांत १३५० श्लोक असून त्यांत 'शालिवाहन' व 'शालि-वाहननरेंद्र' अशीं विशेषणें 'हालराजास' लावलीं आहेत. हालाचा प्रधान सिद्ध नागार्जुन हा बौद्ध होता व त्यानें बांधलेले स्तूप व गुहा गंतूरकडे आहेत. तोही आंध्रच होता. सिंहलद्वीपाची राजकन्या लीलावती हिचा हालराजाशीं सप्तगोदावरीच्या तीरीं पाशुपतभीमाच्या मंदिरांत विवाह झाल्याची कथा सदर काव्यांत वर्णिली आहे. 'सत्तगोदाअरी'च्या तीरीं 'तस्स कनअ(क)देवालयस्स दाहिण दिसइ अणुलग्गं'—दक्षिणदिश्यनु-

लग्नम्. तिकडे गौतमीपुत्र शातकर्णीचाही एक शिलालेख अलीकडे सांपडला आहे. यज्ञ शातकर्णी (शालिवाहन) राजाचाही एक शिलालेख कृष्णेच्या उगमाशीं सांपडला आहे. पुलमेयीराजाच्या शिलालेखावरून शालिवाहन घराणें ब्राह्मणाचें होतें असें दिसतें! तेव्हां शालिवाहन हे आंध्र असून ब्राह्मणही होते असें वाटण्याकडे मनाचा कल होतो. ब्राह्मणांनीं गेल्या २ हजार वर्षांत हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं राज्यें केल्याचें निर्विवाद दिसत आहे, तेव्हां शालिवाहन ब्राह्मणजातीय नव्हते असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. आंध्र स्त्रिया पहिल्यापासून सौंदर्याविषयीं प्रसिद्ध असून त्या कंचुकी घालीत नसत. कंचुकी घालण्याचें त्या महाराष्ट्रीयांपासून शिकल्या असाव्या, 'पैठणी रविक' व 'पयित' ह्या आंध्रदेशांतील शब्दांवरून आंध्रदेशीय स्त्रिया स्तनाच्छादन करायला शिकल्या असें दिसतें. शालिवाहन घराण्याचा संस्थापक सिमुक किंवा श्रीमुख हा इ० पू. २२४ वे वर्षीं हयात होता. दुसरा राजा कृष्ण ( कन्हा ) यानें नाशिक प्रांत घेतला. हालाचा काळ इ. स. ७८ हा होय. गौतमीपुत्र शातकर्णी हा इ० स० ११३ व पुलुमायी हा इ. स. १५० मध्यें हयात होता. गौमतीपुत्रानें शकांस जिंकलें, व शक त्यानंतर उज्जयिनीस गेले.

श्रीमुख, कृष्ण, श्रीशातकर्णी म्हणजे शालिवाहन, गौतमीपुत्र शातकर्णी, व सिष्टीपुत्र पुलुमायी, श्रीशिवमुख, श्रीयज्ञ, श्रीचंद इत्यादि राजांचे मिळून २४ शिलालेख सांपडले आहेत. हे संस्कृत व प्राकृत भाषेंत आहेत, कोणत्याही द्रविड भाषेंत नाहींत.

हालाच्या सप्तशतींत विक्रमादित्याचा उल्लेख आहे. अमरकोशांत अवंतीच्या विक्रमादित्याबरोबर 'शूद्रकस्त्वग्निमित्रो वा हालःस्यात् शालिवाहनः' शूद्रक, अग्निमित्र व सातवाहन हाल यांचीं नांवें चक्रवर्ती राजांच्या नामावळींत दिलीं आहेत. शालिवाहनांचें राज्य महाराष्ट्रावर ३०० वर्षें होतें पण हे परके म्हणून येथें राहिले नाहींत, त्यांनीं महाराष्ट्र देश आपला म्हटला, महाराष्ट्रीयांत ते मिळून गेले व महाराष्ट्रीभाषेचा त्यांनीं नुस्ता अंगीकारच नव्हे तर पुरस्कारही केला हें

गाथासप्तशतीवरून स्पष्ट दिसतें. पल्हव या परदेशीयांच्या (पर्शिअनांच्या) स्वाऱ्या त्यांनीं परतविल्या. हें घराणें पूर्ण वैदिकधर्मीय होतें, त्यानें बौद्धजैनांना आपल्या राज्यांत चढूं दिलें नाहीं, पण त्यांना थोडें फार साह्यच केलें. नाशीक किंवा पैठण येथें राहून आपल्या विस्तृत राज्याचा हे राजे कारभार चालवीत. सातवाहनांच्या वेळीं देश मोठ्या भरभराटींत होता, साऱ्या दक्षिणेंत तरी आंध्रांचें पूर्ण प्राबल्य होतें. सप्तशतींतील पुढील दोन गाथा पहाः—

**सच्चं भण गोदावरि पूव्वसमुद्देण साहिआ सन्ती ।**
**सालाहणकुलसरिसं जइ ते कूले कुलं अत्थि ॥**

'हे गोदावरि ! तूं सत्य (सच्च, साचें, खरें) सांग (भण). उगमापासून पूर्वसमुद्रापर्यंत तूं वाहत जातेस. तुझ्या तीरीं शालिवाहन कुलासारखें (सरिस—सदृश) एकतरी (नामांकित) कुल आहे (अत्थि, आथी). काय ?'

**उत्तरओ हिमवन्तो दाहिणओ सालवाहणो राआ ।**
**समभारभरक्कन्ता तेण न पल्हत्थए पुहवी ॥**

' उत्तरेस हिमालय व दक्षिणेस शालिवाहन राजा (राजा, राया, राय)या दोघांच्या समभारानें आक्रांत झालेली पृथ्वी समतोल राहिली आहे.' शालिवाहनांच्या लोकांशीं मिळूनमिसळून वागण्याच्या व तेजस्वी राज्यकारभारामुळें त्यांच्या राजधानीला—पैठणला—फार महत्व प्राप्त झालें, व पैठण वैदिक संस्कृतीचें एक महाकेंद्र बनलें. तें पैठणचें महत्व २० शतकानंतरही विद्या व कलाकौशल्याच्या बाबतींत तरी कायम राहिलें आहे. पैठणची रेशमी व जरीकाठी वस्त्रें पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. स्त्रियांच्या जरीच्या वस्त्रांना 'पैठणी' म्हणतात. यानंतर बदामी, कल्याणी, मान्यखेड (मालखेड), देवगिरी इत्यादि महाराष्ट्राच्या राजधान्या झाल्या तरी पैठणचें ऐश्वर्य दुसऱ्या कोणत्याही राजधानीस मिळालें नाहीं. संशोधक कोणताही शोध लावोत पण शालिवाहन शक हा ह्या लोकप्रिय व वैदिकधर्मी शालिवाहन हालराजाच्या राजघराण्यापासूनच महाराष्ट्रांत

चालू झाला आहे असें राजवाड्यांप्रमाणें मलाही वाटतें. नहपन व कनिष्क ह्या परधर्मी लोकांशीं शालिवाहनशकाचा संबंध जोडतां येत नाहीं. बाण आणि पल्लव या दक्षिणेकडील राजांच्या शिलालेखांत शक २६१ व शक १८० हे शालिवाहनराजांचेच शक दिलेले आहेत. शालिवाहनांनीं महाराष्ट्रावर ख्रि. पू. १५० पासून इ. स. १५० पर्यंत सुमारें तीनशें वर्षें दणदणित राज्य केलें. कासवी आपलें पसरलेलें अंग पुन्हा आपल्या मूळदेहांत ओढून घेते त्याप्रमाणें आंध्रांनीं आपत्कालीं महाराष्ट्रांतून पाय काढून घेतला व आपल्या आंध्रदेशांत पुन्हा जाऊन बसले. इ. स. २०० ते ५०० पर्यंत नंतर महाराष्ट्रांत अव्यवस्था माजली. ज्याच्या हातीं जेवढा प्रदेश लागेल तेवढाच त्यानें घेऊन बसावें असें चाललें. त्यांत राष्ट्रकूटांचींही २।३ फुटकळ राज्यें होतीं. नाशीकखानदेश या दोन प्रांतांवर आभीर उर्फ गौळी यांनीं दोन शतकें राज्य केलें, व पैठणदेवगिरीकडे वाकाटकांनीं राज्य केलें. हें वाकाटक व त्यांचे प्रधान बौद्धधर्मी असल्यामुळें बौद्धांना जरा अवसान चढलें. चालुक्यही महाराष्ट्रांत डोकावूं लागले. वाकाटकांच्या प्रोत्साहनानें बुद्ध मठ व भिक्षुभिक्षुकिणींचे संघ यांचा सुळसुळाट झाला. बौद्धभिक्षूंसाठीं वाकाटकांनीं अजिंठ्याच्या डोंगरावर कांहीं लेणीं खोदविलीं. त्या लेण्यांत या घराण्यांतील विंध्यशक्ति व प्रवरसेन यांची नांवें आढळतात. 'अश्मक' राजाचाही त्यांत उल्लेख आहे. राष्ट्रकूट व चालुक्य हीं दोन्ही घराणीं यादववंशीय व पूर्ण वैदिक धर्माभिमानी. बौद्धांचा पाडाव करून राष्ट्रकूटांनीं गोदावरीच्या पूर्वभागावर आपलें राज्य स्थापिलें, तथापि थोडक्याच काळांत चालुक्य पुढें सरसावले व त्यांनीं इ. स. ५०० च्या सुमारास वाकाटकांस मोडून काढलें व बाकीचीं छोटीशीं राज्यें एकवटून आपलें साम्राज्य बांधण्याची मनीषा धरिली.

ही त्यांची मनीषा पूर्ण होण्याचा योगही आला. जयसिंह चालुक्यानें गोविंदराष्ट्रकूटाचा पराभव करून आपलें राज्य वाढविण्यास प्रारंभ केला. त्याचा मुलगा रणराग व रणरागाचा पुत्र पहिला पुलकेशी.

## ४ पुलकेशी चालुक्य.

दाक्षिणेंतील द्रविड राज्यांवर शह बसावा म्हणून पुलकेशीनें विजापुराजवळ वातापी ऊर्फ बदामी येथें आपली राजधानी नेली. त्यानें इ.स.५५० ते ५६७ पर्यंत १७ वर्षें राज्य करून आपल्या राज्याचा विस्तार केला. सभोंवारचा पुष्कळसा प्रदेश आपल्या राज्यास जोडून त्यानें सम्राट् होण्याची महत्वाकांक्षा धरिली. बौद्धजैनांचा पाडाव करून त्यानें वैदिकधर्मविजयार्थ मोठा अश्वमेध यज्ञ केला. 'सत्याश्रय' 'पृथ्वीवल्लभ' ही पदवी त्यानें धारण केली. त्याला कीर्तिवर्मा व मंगलीश असें दोन पुत्र होते. त्यांनीं त्याच्या पश्चात् एकामागून एक अशीं ४२ वर्षें राज्यें केलीं. इ. स. ६१० मध्यें कीर्तिवर्म्याचा पुत्र **दुसरा पुलकेशी** हा राज्यावर आला. चालुक्य घराण्यांत याच्यासारखा पराक्रमी कोणी निघाला नाहीं. यानें ३२ वर्षें खरोखरीचें साम्राज्य गाजविलें. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंतचा सर्व प्रांत यानें आपल्या साक्षात्सत्तेखालीं आणला व पुढें कांचीपर्यंतच्या राजांना आपले मांडलिक बनविले. त्यानें कदंब, चोल, पांड्य, केरळ, पल्लव, चेर इत्यादि दाक्षिणेकडील राजांवर तर आपलें आधिराज्य प्रस्थापित केलेंच; पण गुजराथ, रजपुताना व माळवा ह्या प्रांतांवरही स्वाऱ्या करून विजय व अपार संपत्ति मिळविली. '९९००० ग्रामांच्या तीन महाराष्ट्रकांवर त्याचा प्रत्यक्ष अधिकार चालत असे' व वेंगी वगैरे दूरदेशींच्या राज्यांवर त्यानें आपले भाऊ वगैरे बसविले. याचा भाऊ जयसिंह हा गुजराथेंतील चालुक्य घराण्याचा मूळ पुरुष होय. इ. स. ६२० मध्यें उत्तरेकडील सम्राट् हर्षवर्धन यानें दाक्षिणेवर प्रचंड सैन्यानिशी स्वारी केली, तथापि पुलकेशीनें त्याचा पराभव करून त्याला नर्मदेपार लावून दिलें. यावेळीं नर्मदेच्या उत्तेरस हर्ष व दाक्षिणेस पुलकेशी असे भरतखंडांत दोन तुल्यबल महान् सम्राट् होते. पुलकेशीची कीर्तिप्रभा सर्वभर फांकली. इराणचा राजा खुशरू यानें पुलकेशीच्या दरबारांत आपला वकील पाठविला, यानेंही आपला वकील इराणांत पाठविला ( इ. स. ६२५ ). इराणचा वकील या चालु-

क्यराजाला विनयानें आपले खलिते अर्पण करीत आहे असें एक चित्र अजिंठ्याच्या लेण्यांत ( लेणें पहिलें ) कोरलेलें आहे. ह्युएनसंग हा पुलकेशीच्या दरबारीं ( इ. स. ६४० ) आला तेव्हां पुलकेशीचा मुक्काम नाशीकजवळ होता. ह्युएनसंग यानें मराठ्यांच्या पराक्रमाचें व पुलकेशीच्या भाग्याचें पुष्कळ वर्णन केलें आहे. लढाईतून कोणी पळून आला किंवा अपकीर्ति घेऊन परत आला तर त्याला गाढवावर बसवून लोक त्याची धिंड काढीत इतकी मराठ्यांना पळपुट्या वीरांची चीड आहे असें ह्युएनसंगनें लिहिलें आहे! तो म्हणतो कीं " हे महाराष्ट्रांतील लोक इमानी, करडे व करारी आहेत. हे कृतज्ञ आहेत, पण अपकार सहन करणारे नाहींत. शत्रुचा पुरा सूड उगवल्याशिवाय ते कधींही स्वस्थ बसावयाचे नाहींत. हे लोक शत्रूंवर चालून गेले कीं माघार घेणें त्यांस ठाऊकच नाहीं. मत्तपणें शत्रूंवर ते हल्ला चढवितात व जय किंवा मृत्यु याशिवाय तिसरी गोष्ट ते जाणत नाहींत. कपटानें शत्रूंवर ते घाव घालीत नाहींत, तर शत्रूंस सावध करून मग ते लढतात. " हें मराठागड्याचें वर्णन यथायोग्य आहे. मराठे वीर उंच, धिप्पाड व मजबूत असतात असें त्यानें म्हटलें आहे. अंगावर चिलखत व हातीं भाला घेऊन हे लढतात. खरोखर पुलकेशीची कारकीर्द मराठ्यांच्या भाग्यसीमेची होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. शालिवाहनानंतर ६०० वर्षांनीं महाराष्ट्राला तसाच किंबहुना अधिकच भरभराटीचा असा हा काळ आला. या काळांत विद्याकलाकौशल्याभिवृद्धीकडे लक्ष देण्यास मात्र चालुक्यांना फावलें नाहीं. पुलकेशीनें ३२ वर्षें दणदणित राज्य केलें पुलकेशी चालुक्य हा वर्णानें क्षत्रिय व जातीनें मराठा होता, याचे विचार प्रौढ व अंतःकरण दयाळु होतें व हा प्रजावत्सल होता असें ह्युएनसंगनें म्हटलें आहे. पुलकेशीचा शेवट मात्र ठीक झाला नाहीं. कांचीचा पल्लवराजा नरसिंहवर्मा यानें वातापीवर स्वारी करून ती राजधानी हस्तगत केली व पुलकेशीला ठार मारलें, तथापि त्याचा पुत्र विक्रमादित्य यानें इ. स. ६५५ मध्यें वातापी परत घेतली व कांचीच्या राजाला चांगलें वठणीस आणलें. तो

थेट कांचीपर्यंत गेला तेव्हां कांचीचा राजा पळून गेला. हा विक्रमादित्य कांचीस पुष्कळ काळ राहिला व तेथील विष्णुशिवांची मंदिरें त्यानें दुरुस्त केलीं व कांहीं नवीन बांधलीं. तो व त्याचा पुत्र विनयादित्य ( ६९६–७३२ ) हे दोघेही पराक्रमी निघाले. शेंपन्नास वर्षें चालुक्य राजे व कांचीचे पल्लव राजे यांचें हाडवैर चाललें होतें व ते एकमेकांच्या मुलखावर स्वाऱ्या करून परस्परांस जेर करीत. शेवटीं चालुक्यांपासून महाराष्ट्राचें राज्य राष्ट्रकूटांनीं इ. स. ७५० च्या सुमारास घेतलें. चालुक्य घराण्यांतील बरेच राजे मोठे पराक्रमी व कर्तृत्वशाली होऊन गेले. सर्व तेव्हां भरतखंडभर वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन चालू होतें, त्यांत चालुक्य घराण्यानेंही आपला वाटा उचलला. महाराष्ट्रांत अगदी प्राचीन शिवाचीं मंदिरें आहेत तीं बहुधा याच सुमारास बांधलीं गेलीं. श्रुतिस्मृतिपुराणोक्त हिंदुधर्माचा पसारा वाढत चालला. कुमारीलभट्ट हे प्रख्यात मीमांसक चालुक्यांच्याच राजवटींत झाले. ताडपत्रावर कोरलेल्या एका दानपत्रांत पुलकेशीचा पुत्र चंद्रादित्य ( हा त्यावेळीं सावंतवाडी प्रांतावर अमंल चालवीत होता ) याला ' रामायणभारतेतिहासकुशलः ' ' अग्निष्टोमवाजपेयपौण्डरीकबहुसुवर्णाश्वमेधावभृथस्नानपवित्रीकृतशरीरः ' परराष्ट्रावमर्दी ' ' परमभागवतः ' इ० विशेषणें लावलीं आहेत त्यांवरून चालुक्यांच्या धार्मिकतेचा बोध होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' चालुक्याचें 'च ' साळुंखे ' झाले.

## ५ पुन्हां राष्ट्रकूट

राष्ट्रकूटांनीं महाराष्ट्रावर २२५ वर्षें पुन्हां राज्य केलें. (इ०स० ७५०–९७५ ). इतक्या काळांत ह्या घराण्यांत १०।११ पुरुष राज्यकर्ते झाले व त्यापैकीं ५।६ जणांची विश्वसनीय माहिती मिळण्याचें एक साधन उपलब्ध झालें आहे. धुळ्याचे कै० चांदोरकर यांनीं राष्ट्रकूटांचा इ० स०७७५ चा एक ताम्रपट शोधून प्रसिद्ध केला आहे. तो फार महत्वाचा आहे. त्यावरून गोविंदराज, कर्कराज, इंद्रराज, दन्तिदुर्ग, त्याचा चुलता

कृष्णराज, कृष्णराजाचे पुत्र गोविंद व ध्रुव इतक्या पुरुषांची कांहीं माहिती मिळते. या घराण्यांत **दन्तिदुर्ग** व **कृष्णराज** हे दोन पुरुष कर्तबगारीचे व पराक्रमी निघाले. ह्या घराण्याची धर्मप्रीतिही ह्या ताम्रपटावरून स्पष्ट होत आहे. दन्तिदुर्गानें कीर्तिवर्मा चालुक्याचा पूर्ण पराभव करून महाराष्ट्राचें संपूर्ण राज्य मिळविलें व त्यानें व कृष्णराजानें व कृष्ण-राजाच्या दोन्ही पुत्रांनीं तें मर्यादेबाहेर वाढवून साम्राज्यपदवीला पोंच-विलें. वरील ताम्रपटाच्या मंगलाचरणांत हरिहरांना नमन आहे. हे शिवभक्त होते व विष्णुभक्तही होते. यांनीं बांधलेल्या अनेक शिवा-लयांवरून यांची मुद्रा शिव होती असें दिसतें. शिवाची 'बसलेली मूर्ति' त्यांच्या एका ताम्रपटावर आहे. कित्येक ताम्रपटांवरून यांची मुद्रा विष्णु किंवा कमलस्थित लक्ष्मी होती असेंही दिसतें. शिव व विष्णु यांत भेद न मानतां दोघांनाही भजावें ही महाराष्ट्रीयांची समबुद्धि पुढें साधुसंतांच्या कवनांवरून अगदीं उघड झाली आहे तीच राष्ट्रकूटांच्या ठिकाणीं सातव्या शतकांत व्यक्त झाली आहे, अथवा कांहीं दुराग्रही द्रविड लोक वगळून सर्व हिंदुलोकांची हीच समतेची बुद्धि हिंदुस्थान-भर आजही प्रगट दिसत आहे. सदर ताम्रपटांत 'कर्णाटक' चालु-क्याचा दन्तिदुर्गानें फडशा उडवला व कांची, केरल, पाण्ड्य, चोल, श्रीहर्ष, वज्रट इत्यादिकांना पुरून उरणारे महाबलाढ्य चालुक्य यांना नामोहरम् केलें याबद्दल दन्तिदुर्गाचा यथार्थ गौरव केला आहे. चालुक्य व वल्लभ यांना जिंकून दन्तिदुर्ग हा 'राजाधिराजपरमेश्वरतामवाप.' त्यानें पश्चिमसमुद्रापासून उत्तरेस हिमालयापर्यंतचे बहुतेक देश जिंकले व–' येनेयं जगती स्वविक्रमबलेनैकातपत्रा कृता'–त्यानें भरतभूमीवर एकछत्री राज्य केलें. वरील कृष्णराजाच्या कारकीर्दीत त्यानें एक अद्भुत गोष्ट केली. कृष्णराजाच्या किंबहुना सर्व राष्ट्रकूटांच्या राजवटीचें चिरंतन स्मारक म्हणजे वेरूळच्या लेण्यांपैकीं अत्युत्कृष्ट असें जें 'शिवलेणें' तें होय. हें कृष्णराजानें ७७० च्या सुमारास खोदविलें. अजंठा येथील सर्व कोरीवलेणीं हीं बुद्धधर्मीयांचीं

आहेत. हीं एकंदर २९ असून त्यांत ५ चैत्य ( बौद्धमंदिरें ) व २४ विहार आहेत यांपैकीं कांहीं लेणीं आंध्रांनीं कोरविलीं आहेत. हीं शालिवाहन शकपूर्वकाळापासून तों इ. स. ८०० पर्यंत कोरीत आलेलीं आहेत. ह्या लेण्यांत बौद्ध संस्कृति व हिंदु कला दोन्ही सांपडतात. वेरूळच्या ३४ लेण्यांपैकीं मध्यवर्ती १७ लेणीं हिंदूंचीं, एकीकडचीं बारा बौद्धांचीं व दुसरीकडचीं पांच जैनांचीं आहेत. पण सर्व लेण्यांत अत्यंत विशाळ, भव्य, सुंदर व साधें व म्हणून अप्रातिम असें जें ' **शिवलेणें** ' आहे तें आमच्या महाराष्ट्रीय कृष्णराज राष्ट्रकूटानें कोरविलें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हें लेणें प्रेक्षणीय व शिल्पशास्त्रदृष्ट्याही सर्वोत्कृष्ट असें आहे. अजंठा व वेरूळ ह्या दोन्ही ठिकाणचीं लेणीं सांप्रत निजामच्या राज्यांत मोडत आहेत ! सह्याद्रिपर्वताच्या ज्या रांगांत चांदवडचे डोंगर, धोडपचा किल्ला, सप्तशृंगीचा डोंगर हे आहेत त्याच रांगांत पुढें हीं लेणीं कोरलेलीं आहेत. राष्ट्रकूटांची दुसरीही एक मोठी राष्ट्रीय कामगिरी सांगावयाची आहे. अहिंसेचें अवास्तव स्तोम माजविणाऱ्या बौद्धांच्या मदतीनें अरबांनीं सिंधप्रांत घेतल्यावर अरबांच्या टोळधाडी दक्षिणेवर कोसळल्या पण राष्ट्रकूटांनीं त्यांना बिलकूल दाद न देतां त्यांचा धुव्वा उडविला व नर्मदेपार त्यांना हाकून दिले व महाराष्ट्राचें मोठ्या अरिष्टापासून रक्षण केलें. राष्ट्रकूट हे प्रथम नाशिक जिल्ह्यांतील मयूरखण्डि ऊर्फ मोरखंड या नांवाच्या किल्ल्यावर राहत व तेथून ते पुढें मान्यखेत उर्फ मालखेड येथें गेले. ' मालखेडचे राष्ट्रकूट ' हें नांव त्यांच्या पुढील पिढ्यांना मिळालें. राष्ट्रकूट हे कधीं चांदूर ( चांदवड ), कधीं मालखेड, कधीं लट्टपूर ( लातूर ) येथें राहत, व आपल्या विशाळ प्रांतांवरील राज्य चालवीत. हें सर्व घराणें धर्मशील होतें हें वर सांगितलेंच आहे. कृष्णराजाच्या वर्णनांत पुढील श्लोकार्ध आहे:—

**त्रय्याश्चापि कृताद्विजामरगुरुप्राज्याज्यपूजादरः**
**दाता मानभृदग्रणिर्गुणवतां योऽसौ श्रियो वल्लभः ॥**

त्रयी म्ह० वेदत्रयी. वेदांचा रक्षक, देव, ब्राम्हण व गुरु यांची श्रद्धापूर्वक पूजा करणारा असा तो होता. तो दाता होता, मानी होता व लक्ष्मीवल्लभ असून अत्यंत गुणवान् होता. वर उल्लेखिलेला ताम्रपट ' ध्रुवराज राष्ट्रकूटानें ' शके ६९७ मध्यें कार्तिक वद्य ३० स सूर्यग्रहणीं ' मया मातापित्रोः आत्मनश्च—ऐहिकामुष्मिकपुण्ययशोभिवृद्धये ' असा संकल्पपूर्वक एक गांव एका सत्पात्र ब्राम्हणास दान दिल्याबद्दलचा आहे. या सर्व गोष्टींवरून राष्ट्रकूटांची धर्मशीलता व्यक्त होते. महाराष्ट्रांत राष्ट्रकूटांचें राज्य चालू असतां द्रविडदेशांत शंकराचार्यांचा अवतार झाला.

## ६ उत्तर चालुक्य

असो. राष्ट्रकूटांचें राज्य यानंतर कालवश झालें. या घराण्यांतला शेवटचा राजा कर्क अथवा कक्कल याचा चालुक्य तैलपराजानें पराभव केला ( इ. स. ९७३ ) व राष्ट्रकूटांचें साम्राज्य बुडविलें.

उत्तर महाराष्ट्रांत म्ह० गोदातीरच्या प्रदेशांत यादवांचें, पश्चिम महाराष्ट्रांत म्ह० कोकणांत शिलाहारांचें, तसेच दक्षिण महाराष्ट्रांत चालुक्यांचें राज्य इ. स. ९७३ ते ११८९ पर्यंत चालू होतें. दुसरीं दोन राज्यें इ. स. १२००च्या आंतबाहेर लयाला गेलीं व यादवांचें राज्य पुढें १०० वर्षें चालून नष्ट झाल्यावर मुसलमानी सत्ता चालू झाली. राष्ट्रकूट व चालुक्य ह्या घराण्यांचा महाराष्ट्रांत सतत झगडा चालत होता, त्यांत राष्ट्रकूटांचे घराण्यास तैलप चालुक्यानें इ. स. ९७३च्या सुमारास कायमचें बुडविलें व ह्या उत्तर चालुक्य घराण्यानें बेदरजवळ कल्याण येथें आपली राजधानी करून २२५ वर्षें पुन्हां राज्य केलें. ह्या घराण्यांत तैलप (९७३–९९७), सत्याश्रय (९९७–१००८), त्रिभुवनमल्ल ( १००८–१०१८), जयसिंह जगदेकमल्ल ( १०१८–१०४० ), सोमेश्वर पहिला १०४०–१०६८ ), सोमेश्वर दुसरा ( १०६८–१०७६ ), त्रिभुवनमल्ल पर्मांडी उर्फ विक्रमादित्य ( १०७६–११२५ ), सोमेश्वर तिसरा ( ११२५–११३८ ), प्रतापचंद्र जगदेकमल्ल ( ११३८–११५० ), तैलप दुसरा

( ११५०-११८२ ), सोमेश्वर चौथा ( ११८२–८९ ) इत्यादि राजांनीं राज्य केलें. चालुक्य हे उत्तरेकडून आलेले असोत किंवा मूळचे महाराष्ट्रांतले असोत, महाराष्ट्राच्या कोणत्याना कोणत्या भागावर सात आठ शतकें राज्य करून हे पुरते महाराष्ट्रीय बनले. तैलपानंतरच्या दोनशें वर्षांत महाराष्ट्र–कर्नाटक ह्या संयुक्त प्रदेशावर त्यांनीं राज्य केलें. चोल, आंध्र वगैरे राजांस जिंकून तैलपानें लोकांस सुख दिलें. माळव्याचा राजा मुंज यांशीं तो शौर्यानें लढला व मुंजास पराभूत केलें. चालुक्यांचें चोलराजांशीं नेहमीं तंटे चालत व युद्धाच्या नियमांप्रमाणें कधीं हे तर कधीं ते विजयी होत ! तथापि महाप्रतापी राजराज चोल यानें आपल्या कारकीर्दींत चालुक्यांचा फार मोठा पराभव करून महाराष्ट्र देश उद्ध्वस्त केला, आणि याच्या उलट जयसिंह चालुक्यानें राजेंद्र चोलाला जेरीस आणले! चालुक्य राजे प्रथम प्रथम राष्ट्रकूटांची राजधानी मालखेड येथें राहत, पुढें ते कल्याणला राहायला गेले. ह्या घराण्यांत **त्रिभुवनमल्ल** हा सर्वांत अधिक पराक्रमी निघाला व यानें दक्षिणेस व पूर्व पश्चिमेस अनेक स्वाऱ्या करून दक्षिणेंतले सारे राजे नमविले व स्वतःस विक्रमादित्य ही पदवी घेऊन त्यानें आपला नांवाचा शकही सुरू केला. तो शक कांहीं वर्षें चालून नष्ट झाला. कऱ्हाडच्या शिलाहारराजाची कन्या अत्यंत सुखरूप होती. तिच्याशीं यानें विवाह केला. तिच्या सौंदर्याची ख्याति काश्मीरपर्यंत जाऊन काश्मीरच्या राजानें महाराष्ट्रावर स्वारी करून तिला हरण करण्याचा बेत केला होता पण तो जागच्या जागींच जिरला ! विक्रमादित्यानें चौफेर यश मिळविलें व अर्धशतक राज्य केलें. यानें प्रजेस फार सुख दिलें, व व्यवस्थित कायदे करून न्यायनीतीनें प्रजापालन केलें. याचा प्रधान **विज्ञानेश्वर** यानें याज्ञवल्क्यस्मृतीवर मिताक्षरानांवाची सर्वप्रसिद्ध टीका केली. हिंदुकायद्यावरील अत्यंत श्रेष्ठ पुस्तक म्हणून आजही तें सर्वमान्य झालेलें आहे. विक्रमादित्याचा मुलगा तिसरा सोमेश्वर हा बापासारखा विद्वान् निघाला. त्यानें मानसोल्हास उर्फ अभिलषितचिंतामणिनामक प्रसिद्ध ग्रंथ केला आहे.

ह्या ग्रंथांत राजनीतिशास्त्र, अश्वशास्त्र, काव्य, दान, ज्योतिष इ० सर्व शास्त्रांचा उत्कृष्ट विचार केलेला आहे. दुसऱ्या तैलपाच्या वेळीं या घराण्याला उतरती कळा लागली. तैलपाचा सेनापति विज्जल हा एक कलचूरी क्षत्रिय होता. त्यानें तैलपाविरुद्ध बंड उभारलें. तो कांहीं वर्षें कल्याण येथें तैलपाच्या कैदेंत पडला होता. तेथून आपली सुटका करून घेऊन त्यानें अण्णेगिरी येथें राज्य केलें व नंतर कल्याण घेऊन तेथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. एका धार्मिक तंट्यांत त्याचा खून झाला व त्याचा ब्राह्मण प्रधान बसव यानें जैनधर्माच्या विरोधामुळें आपला वैदिकधर्मानुयायी असा लिंगायत पंथ स्थापन केला. कलचूरी घराण्यानें ११६०–११८४ पर्यंत २४ वर्षेंच राज्य केलें पण त्याचें नांव लिंगायत पंथाच्या उदयामुळें प्रसिद्धीस आलें. दक्षिण महाराष्ट्रांत बरेच वैश्य जैन झाले होते, त्यांनीं बसवानंतर भराभर जैनधर्ममत सोडून देऊन लिंगायतपंथाचा स्वीकार केला! बसवपंथानें वैदिकधर्मावर हा एक उपकारच केला. असो. चालुक्यानंतर जाधवघराण्याकडे महाराष्ट्राचें प्रभुत्व गेलें.

## ७ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार.

जाधवांचें राज्य नाशीक–देवगिरीस गाजत होतें त्याचवेळीं महाराष्ट्रांत अपरान्त म्ह० कोकण प्रांतावर शिलाहारांचें राज्य चालू होतें. शिलाहारांचेंच पुढें मराठींत शेलार झाले. या नांवाचें गांवही पुणेप्रांतीं तळेगांवाजवळ आहे व शेलारवाडीस राहणारा तानाजीचा शेलारमामा शिवाजी महाराजांच्या वेळीं सिंहगडच्या वेढ्यांत प्रसिद्धीस आलेला आहे. शिलाहारांनीं इ. स. ८०० ते १३०० पर्यंत ठाण्यास राज्य केलें. ठाणें जिल्ह्यांत कन्हेरी ( कृष्णागिरी ) येथें एक प्रसिद्ध बौद्धलेणें असून त्या लेण्यांत शालिवाहन शकारंभापासून पोर्तुगीजांच्या ताब्यांत वसईप्रांत जाईपर्यंत जवळजवळ १५ शतकें बौद्ध संन्यासी राहत असत! त्यांच्या वाऱ्याला कोणी गेले नाहीं, त्यांनींही फारशा चळवळी केल्या नाहींत. शिलाहार हे प्रथम राष्ट्रकूटांचे मांडलिक होते पुढें ते स्वतंत्र झाले. यांचा पहिला

स्वतंत्र राजा अपराजित हा आपल्यास राष्ट्रकूटांचा महामंडलेश्वर म्हणवीत असे हें इ. इ. ९९७ च्या एका ताम्रपटावरून सिद्ध झालें आहे. शिलाहारांची राजधानी शूर्पारक उर्फ सोपारें ही होती, व त्यांचें राज्य मुख्यत: ठाणें, कुलाबा व रत्नागिरी ह्या जिल्ह्यांवर होतें. अपराजितानें देवगिरीकर सिंघण नामक यादव राजास युद्धाच्या कामीं साह्य केलें होतें. इ. स. ९९० ते १२०० पर्यंतच्या २१० वर्षांत या घराण्यांत ११ राजे होऊन गेले. अंबरनाथ येथील शिलालेखावरून इ स १०६० मध्यें महमवानी हा राज्य करीत होता असें दिसतें. त्याचा पुतण्या अनंतदेव ( १०८५–११२५ ) हा आपणास ‘ कोकणचक्रवर्ती ’ म्हणवीत असे. त्यावेळीं कोंकणपट्टींत अरबांनीं बंदरांतून आपल्या वसाहती केल्या असून ते परदेशांशीं जहाजांतून व्यापार करीत. पार्शीही या काळांत कोंकणांत उतरले होते. मुसलमानांच्या व हिंदूंच्या कटकटी होऊन देवब्राह्मणांचा कांहीं छळ होऊन अनंतपालानें मुसलमानांच्या बंडाचा बीमोड केला व छलकांना जबर शिक्षा केल्या. मल्लिकार्जुन ( ११५५-११७५ ) याच्या गुजराथच्या चालुक्यराजाशीं लढाया होऊन शेवटीं तो मारला गेला. शिलाहारांचा शेवटचा राजा अपरादित्य ( ११७५–१२०० ) हा थोडा कर्तबगारीचा निघाला. कोकणच्या बऱ्याच मोठ्या भागावर यानें राज्य केल्याचें दिसतें. हा राजा विद्वान्‌ही होता. यानें याज्ञवल्क्यस्मृतीवर अपरार्क नांवाची प्रसिद्ध टीका लिहिली व या टीकेचा आधार काश्मीरांत अजून घेतला जात आहे. काश्मीरच्या पंडितसभेला यानें आपल्या तर्फेचा एक पंडितही पाठविला होता. शिलाहारांचें राज्य नष्ट झाल्यावरही शंभरवर्षें कोकणांतील हिंदु संस्कृतीला यांचा बराच उपयोग झाला असावा. इ. स. १३२८ त महाराष्ट्र मलिक्काफरनें जिंकल्यावर १४ व्या शतकांत ठाणेंही मुसलमानांच्या ताब्यांत गेलें. यादवांचें महाराष्ट्रावर राज्य चालू असतां शिलाहारांनीं कोकणपट्टीला हिंदु संस्कृतीखालीं सांभाळलें एवढेंच या कथेचें तात्पर्य आहे. हे शिलाहार क्षत्रिय मराठे आहेत यांत शंका नाहीं.

मराठ्यांच्या ९६ कुळींत हे शेलार म्हणून नावाजले आहेत, व हे चंद्रवंशी यादवकुळींतले मानले गेले आहेत. शिलाहारांच्या राज्य-व्यवस्थेंत नेहमीं पांच प्रधान असत व कदाचित् यावरून पुढें शिवाजी महाराजांना अष्टप्रधानांची व्यवस्था सुचली असावी असा एक तर्क आहे. ठाण्याचा किल्ला शिलाहारांनीं बांधला असावा. यांच्यावेळीं संजान, सोपारा, वसई, ठाणें, कल्याण, चौल, चिपळूण इत्यादि बंदरांतून मोठा व्यापार चालत असे, व राजाला जकातीचें उत्पन्न मोठें असे, तथापि बंदरांत उतरणाऱ्या परकीय लोकांना कायद्यांच्या ढिलाईमुळें हातपाय पसरायला सवड सांपडली, व आधीं मुसलमानांनीं व शेवटीं पाश्चात्य राष्ट्रांनीं तिचा पूर्ण फायदा घेतला हें प्रसिद्धच आहे घारापुरीची एलिफंटा लेणीं हीं शिलाहारराजांनीं ८ व्या ९ व्या शतकांत खोदलेलीं आहेत. पुरी म्ह० घारापुरी येथें राहूनच शिलाहार-राजांनीं कोंकणचें राज्य केलें असेंही कोठें कोठें म्हटलें आहे.

## ८ छोटीं मराठी संस्थानें.

कृष्णानदीच्या दक्षिणेस ह्मणजे दक्षिण महाराष्ट्रांतही पांच सात छोटी संस्थानें यावेळीं होती. ( १ ) ठाण्याच्या शिलाहारांप्रमाणें कऱ्हाड अथवा कोल्हापूर येथें एक शिलाहारघराणें इ. स. १००० पासून १२०० पर्यंत राज्य करीत होतें. राजापूर ( खारेपाटण ) येथें ही एक शिलाहार होते. कोल्हापूरचे शिलाहार हे कऱ्हाड, मिरज, कुंडी, कोल्हापूर व दक्षिण कोकण ह्म० राजापूर या प्रांतांवर अंमल चालवीत होते. यांचा मुख्य किल्ला पनाळ ( पन्हाळा ) हा होता. शिलाहारांची कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी, व यांचें लांछन सुवर्णगरुड होतें. या घराण्यांत नरसिंह ( इ. स. १०६० ) हा बलाढ्य झाला असून यानें बरींच देवळें बांधलीं. याचा पुत्र गंडिरादित्य यानें मिरजप्रांतांत एक मोठा तलाव बांधला व त्याच्या काठीं शिव, बुद्ध व जिन यांचीं देवळें बांधलीं. यानें प्रयागास एक लक्ष ब्राह्मण भोजन घातलें. याचा भाऊ विजया-

दित्य व त्याचा पुत्र भोज ह्या दोघांनींही जैन मंदिरांस व जैनांस दानपत्रें दिलीं आहेत व कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या प्रसादानें आपणांस ऐश्वर्य मिळाल्याचेंही लिहिलें आहे. हें कोल्हापूरचें क्षत्रिय मराठ्यांचें घराणें हिंदु वैदिकधर्माभिमानी होते, तथापि जैनांसी त्यांचा विरोध नसून सहानुभूति होती. बाराव्या शतकांत दक्षिण महाराष्ट्रांत हिंदु व जैन परस्पर प्रेमानें वागत होते, बौद्ध मात्र मुळींच नव्हते. हें राज्य इ. स. १२०५ नंतर देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्यांत सामील झालें. ( २ ) यावेळीं हनगळ येथें एक व गोवें प्रांतांत एक अशीं कदंबांचीं दोन घराणीं राजसत्ता गाजवीत होतीं. हीं दोन्ही घराणीं अस्सल मराठा क्षत्रियांची असून कदंबांचेच पुढें कदम झाले. हनगळचे कदंब राजे विष्णुभक्त होते. हनगळ हें धारवाड जिल्ह्यांत असून याला पांथीपूर व विराट् नगर म्हणत. गोव्यांतील कदंब शिवभक्त असून खानापूरपर्यंतचा देशावरचा भाग त्यांच्याच अमलाखालीं असे. यावरून धारवाडसुद्धा सारा दक्षिण महाराष्ट्र आणि गोवाप्रांत महाराष्ट्रांतला असून त्यावर शिलाहार व कदंब ह्या मराठा घराण्यांचें राज्य सारखें २५०-३०० वर्षें पर्यंत होते! चालुक्य व कदंब हे समान योग्यतेचे होते. कदंबांचे विवाह दूरदूरच्या प्रांतांतील राजघराण्यांशीं होत. या घराण्यांत जयकेशी व त्याचे पुत्र शिवचित्त व विष्णुचित्त म्ह० विजयादित्य ( ११५८-११७२ ) हे चांगले पराक्रमी निघाले. शिवचित्त पेरमाडी याची राणी सोमवंशोत्पन्न कमलादेवी हिनें लक्ष्मीनारायणाचीं दोन दगडी कोरीव सुंदर देवालयें बांधलीं असून तीं संपगाव तालुक्यांत ( जि. धारवाड ) असून त्यांत शिलालेखही आहेत. त्यावेळचीं कदंबांची कांहीं सोन्याचीं नाणींही सांपडलीं आहेत. (३) यावेळीं शिंदे घराण्याचें येलबुर्ग ( निजामशाहींत ) येथें एक छोटेसें राज्य होतें. बदामी, बागलकोट यांचा त्यांत समावेश होत असे. पुलकेशी म्हणून चालुक्यघराण्यांत जो प्रख्यात सम्राट् ८ व्या शतकांत होऊन गेला त्याचा मामा सेंद्रक घराण्यांतला असून तो त्याचा सेनापति होता. सेंद्रकाचेच पुढें शिंदे झाले.

शिंदेकुल नागवंशी आहे. याप्रमाणें **शिलाहार** ( शेलार ), **कदंब** ( कदम ), **सेंद्रक** ( शिंदे ) या क्षत्रिय मराठा घराण्यांनीं दक्षिण महाराष्ट्रावर तीनतीनशें वर्षें राज्यें केलीं व इ० स० १२०० च्या आंतबाहेर हीं छोटीं राज्यें देवगिरीच्या जाधवांच्या मोठ्या साम्राज्यांत समाविष्ट झालीं.

## ९ देवगिरीचे जाधव.

देवगिरीचे जाधव राजे हे द्वारकाधीश श्रीकृष्ण यांच्या घराण्यांत झाले. यादवांच्या शाखा ८ व्या शतकाच्या सुमारास आर्यावर्तांत सर्वत्र पसरल्या होत्या. जी एक शाखा सौराष्ट्र ( सोरट, काठेवाड ) प्रांतांत गिरनार ( जुनागड ) येथें राज्य करीत होती त्यांतील दृढप्रहारी नामक पुरुषानें नाशीक जवळ आपलें छोटेसें राज्य इ. स. ७४५ च्या सुमारास स्थापिलें. त्यानें श्रीनगर उर्फ सिन्नर ही आपली राजधानी केली. कोणी त्याची राजधानी चंद्रादित्यपूर उर्फ चांदूर ही होती असें म्हणतात. सिन्नर व चांदूर हीं दोन्हीं ठिकाणें नाशीक जिल्ह्यांतच आहेत. दृढप्रहारीपासून १८ वा पुरुष भिल्लम यानें राज्यविस्तार करून स्वतंत्र साम्राज्य उभारलें हा मोठा पराक्रमी निघाला. यानें आपली राजधानी शके ११०९ मध्यें देवगिरि ( दौलताबाद ) येथें नेली. यानंतर त्याच्या ७।८ पिढ्यांनीं सार्वभौमत्व भोगलें.

**भिल्लम** ( शके ११०९–१११४ )
|
जैतुगी उर्फ जैत्रपाळ ( शक १११४–११३२ )
|
**सिंघण** ( शक ११३२–११६९ )
|
जैतुगी उर्फ जैत्रपाळ
|
**कृष्णदेव** (शक ११६९–११८२) | **महादेव** ( श.११८२–११९३)
|
रामचंद्र उर्फ **रामदेव**राव ( शक ११९३–१२३१)
|
शंकरदेव ( श. १२३१–१२३४ )

## १० भिल्लम व सिंघण.

**भिल्लमानें** सोमेश्वर चालुक्यास जिंकून प्रथम महाराष्ट्र आपल्या सत्तेखालीं आणला. " त्यानें श्रीवर्धनच्या अंतल राजास, मंगलवेष्टक ( मंगळवेढें ) येथील वज्रीराजास, कल्याणच्या चालुक्यराजास व म्हैसुराकडील होयसळ यादवांच्या नृसिंहराजास जिंकून आपलें राज्य आणि यश वाढविलें " असें हेमाद्रीनें आपल्या राजप्रशस्तींत म्हटलें आहे. ह्या राजप्रशस्तींत देवगिरीच्या जाधव राजांचा बहुतेक इतिहास त्यानें दिला असून त्याच्या सत्यत्वास आधार देणारे १०० वर शिलालेख, ताम्रपत्रें वगैरे संशोधकांनीं शोधून काढलीं आहेत. भिल्लमानें कृष्णानदीच्या उत्तरेस आपलें राज्य सुस्थिर केलें. त्याच्या वेळच्या दानपत्रांत व शिलालेखांत ' प्रतापचक्रवर्ती, महाराजाधिराज ' इ० बिरुदें त्याच्या नांवास जोडलेलीं आढळतात. भिल्लमानें आपली राजधानी शक ११०९ ( इ. स. ११८७ ) मध्यें श्रीनगर येथून देवगिरी उर्फ दौलताबाद येथें नेली. देवगिरीस यादवांनीं बांधलेला सुंदर दगडी किल्ला आहे.

**स दंडकामंडलमंडयित्रीमकंपसंपत्प्रभवैर्विलासैः ।**
**चक्रे पुरं देवगिरिं गिरीशप्रसादसंसादितदिव्यशक्तिः ॥**

याचा अर्थः–' शंकराच्या प्रसादानें ज्यानें दिव्यशक्ति प्राप्त करून घेतली आहे अशा त्या भिल्लमानें अचल संपत्ति, अपार वैभव व नानाविध विलास यांनीं युक्त व दंडकामंडलाला म्ह० महाराष्ट्राला भूषणभूत झालेली देवगिरीनामक नगरी स्थापन केली. भिल्लमानें देवगिरीस स्वराज्यस्थापना केली त्याच सुमारास मराठी भाषेचे आद्यकवि मुकुंदराज यांनीं आपला विवेकसिंधु ग्रंथ वैनगंगेच्या तीरीं रचला स्वराज्य आणि स्वभाषा यांचा उदय एककालीनच झाला. भिल्लणाचा पुत्र **जैत्रपाळ** यानें तिलंगाधिपतीशीं घोर युद्ध करून त्याची रणयज्ञांत पूर्णाहुती दिली. त्याच्या दरबारचा मुख्य पंडित भास्कराचार्यांचा नातु लक्ष्मीधर हा

नगर वाचनालय सातारा
संग्रहावरील

होता. **सिंघण**राजाच्या कारकीर्दींत जाधवांचें राज्य वैभवाच्या शिखरास पोंचलें. सिंघणदेव उर्फ सिंहलदेव हा महाप्रतापी निघाला. 'प्रौढप्रतापचक्रवर्ती, पृथ्वीवल्लव, यादवचक्रवर्ती, समस्तभुवनाश्रय ' इ. बिरुदें त्यानें धारण केलीं व तीं त्यास साजत होतीं. हेमाद्रीनें याचें वर्णन मोठें मार्मिकपणें केलें असून त्या वर्णनास पुष्टि देणारे ५० प्राचीन लेख उपलब्ध झाले आहेत. छत्तीसगड, माळवा, धारानगरी, गुर्जर, करवीर, पांचाळ, केरळ, चोल, मगध, पांड्य इ. देशांच्या राजांस त्यानें अनेकवार जिंकले व करभार द्यावयास लावले. त्याच्या निरनिराळ्या प्रांतांवरील प्रतिनिधींस महाप्रधान, मंडलेश्वर किंवा दंडनायक म्हणत. सिंघण राजाला **खोलेश्वर** व **बिच्चण** हे दोन शूर सेनापति मिळाले. खोलेश्वर उत्तरेकडे व बिच्चण दक्षिणेकडे स्वाऱ्या करून महाराष्ट्रभूपतीचें ऐश्वर्य वाढवीत होते. खोलेश्वर हा वऱ्हाडी ब्राह्मण होता. याचें गोत्र मुद्गल होतें. यानें व याचा मुलगा राम यानें अनेक लढाया मारून यादवांचें राज्य सर्वभर पसरलें. खोलेश्वरानें वर्धातटावर अनेक विहीरी, मंदिरें बांधलीं, ब्राह्मणांना अग्रहार दिले. बिच्चण हाही खोलेश्वराचाच मुलगा होता असें ह्मणतात. बिच्चणनें दक्षिण कोंकण व दक्षिण महाराष्ट्र जिंकून कदंब व पांड्य राजांना ठोकीत कावेरीतीरावर यादवांचा जयस्तंभ ( श. ११६० ) उभारला. याप्रमाणें यादवांची कीर्ति पसरण्याचे कामीं हेमाद्रि, खोलेश्वर, व बिच्चण ह्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांनींही पुष्कळ मर्दुमकी गाजविली. मराठे क्षत्रिय व मराठे ब्राह्मण हे एकचित्त होते. सिंघणाच्या वेळीं मराठे क्षात्रिय व मराठे ब्राह्मण यांच्या तलवारीचें पाणी साऱ्या भरतखंडानें अनुभविलें. देवगिरीच्या जाधवांचें निशाण ' सुवर्णगरुडध्वज ' हें होतें. सिंघणाचा एक मंडलेश्वर ' मायीदेव ' हा शक ११४८ मध्यें १२ हजार गांवांवर अंमल गाजवीत होता.

## ११ विद्या व कला यांना प्रोत्साहन.

भास्कराचार्यांचा नातु लक्ष्मीधराचा पुत्र चंगदेव याला सिंघणाचा आश्रय होता. चंगदेवानें भास्कराचार्यांच्या ग्रंथांचा अभ्यास वाढावा

यासाठीं एक मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय उभारलें. खानदेशांत चाळीसगांवच्या नैऋत्येस १० मैलांवर पाटण म्हणून गांव आहे तेथें तो मठ होता, अद्याप तेथें त्या मठाच्या खुणा सांपडतात. पाटण गांवांत भवानी देवीच्या देवळांत एका शिळेवर चंगदेवाचा लेख आहे. त्या लेखांत त्यानें सर्व हकीकत दिली आहे. तीवरून भास्कराचार्य व त्यांचें विद्वान् घराणें खानदेशी म्हणजे महाराष्ट्रीय होते हें सिद्ध आहे. भास्कराचार्यांनीं आपल्या सिद्धांतशिरोमणिग्रंथांत आपल्या जनकाविषयीं म्हटलें आहे ( गोले प्रश्नाध्याये ):—

**आसीत् सह्यकुलाचलाश्रितपुरे त्रैविद्यविद्वज्जने**
**नानासज्जनधाम्नि विज्जडविडे शांडिल्यगोत्रो द्विजः ।**
**श्रौतस्मार्तविचारसारचतुरो निःशेषविद्यानिधिः**
**साधूनामवधिर्महेश्वरकृती दैवज्ञचूडामणिः ॥ ६२ ॥**

यावरून भास्कराचार्यांच्या वाडवडिलांपासून सह्याद्रिपर्वताच्या सन्निध असलेल्या पुर ह्म० पाटण गांवींच ते राहत असत असें उघड दिसतें. विज्जडविड पाटणाचें नांव असावें किंवा त्याजवळ त्या नांवाचें एखादें खेडें असावें, पण तें बीड किंवा बेदर नव्हे—कां कीं तेथें सह्याद्रि नाहीं. भास्करनंदन ( लक्ष्मीधर ) हा वेदार्थवित् व ऋतुक्रियाकांडविशारद आहे असें पाहून जैत्रपालराजानें त्याला ह्या पुरांतून ( पाटण गांवांतून ) आपल्या दरबारीं नेऊन सभापति केलें. चंगदेव पुढें आपल्या मठाबद्दल म्हणतो:—

**तस्मात्सुतः सिंघणचक्रवर्तीदैवज्ञवर्योऽजनि चंगदेवः ।**
**श्रीभास्कराचार्यनिबद्धशास्त्रविस्तारहेतोः कुरुते मठं यः २३**

भास्कराचार्यांचा जन्म शके १०३६ ( इ. स. १११४ ) मध्यें झाला. त्यांचे ग्रंथ सिद्धांतशिरोमणि ( श. १०७२ ), करणकुतूहल ( श. ११०५ ) व लीलावती हे प्रसिद्ध आहेत. हे दीर्घायुषी होते. चंगदेवानें आपले आजे भास्कराचार्य यांच्या शास्त्रग्रंथांचा अभ्यास व

विस्तार व्हावा ह्यासाठीं हा मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय स्थापन केलें व त्याला सिंधणराजाचा आश्रय मिळाला. हें घराणें मुख्यत: ज्योतिष्यांचें पण वेदवेदांगांत व अन्यशास्त्रांतही तें निष्णात होतें. ह्या घराण्यांत पुढेंही अनेक विद्वान् व ग्रंथकर्ते झाले. पुर म्ह० पाटण हें देवगिरीपासून जवळच आहे व सह्याद्रीचे फांटे जे चांदवडचे प्रसिद्ध डोंगर त्यांच्या-लगत आहे. भिल्लमाचा, जैत्रपाळाचा व सिंघणाचा 'श्रीकरणाधिप' सोढल हा काश्मिरी ब्राम्हण असून त्याचा पुत्र शार्ङ्गधर ह्यानें 'संगीत-रत्नाकर' नामक गायनकलेवर एक ग्रंथ लिहिला आहे. शिखरसिंगणा-पूर येथील शिवमंदिर याच सिंघणराजानें बांधलें. सिंघणाचा पुत्र जैत्रपाल अल्पवयी वारल्यामुळें पुढें २४ वर्षें त्याच्या नातवांनीं राज्य केलें.

## १२ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव.

इ. स. १२४७ ते १३०९ ह्या ६२ वर्षांत सिंघणाचे नातु कृष्ण व महादेव आणि कृष्णदेवाचा पुत्र रामदेवराव ह्या तिघांच्या राजवटी झाल्या. ह्याच काळांत मराठी भाषेचा उत्कर्ष झाला—महानुभावपंथीय वाङ्मय निर्माण झालें व ज्ञानेश्वरनामदेवांनीं पंढरपुरीं महाराष्ट्रधर्माची संस्थापना केली. कृष्णदेव व महादेव हे बंधु सारख्याच वयाचे असून त्यांचें परस्परांवर रामलक्ष्मणांसारखें प्रेम होतें. हेमाद्रीनें महादेव व रामदेव ह्या उभयतांच्या कारकीर्दींत श्रीकरणाधिप ह्या नात्यानें राज्यशकट हांकला. कृष्णदेव हा शूर असून धर्मशील होता व महादेव शौर्यानें सरस होता. सिंघणाच्या प्रतापानें देवगिरीच्या साम्राज्याचा सर्वत्र वचक बसविला होता त्यामुळें त्याकडे वांकड्या नजरेनें कोणी सहसा पाहिलें नाहीं व सिंधणाच्या नातवांना राज्यसुख उत्तम प्रकारें भोगतां आलें. कृष्णदेवानें गुर्जराधिपतीस युद्धांत पराभूत केलें व कोकणांतील राजांना चांगली दहशत बसविली. महादेवानें तर कोकणचा शिलाहारवंशांतला शेवटचा राजा सोमेश्वर याचीं गलबतें पाण्यांत बुडविलीं व त्याबरोबर तो राजाही

यासाठीं एक मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय उभारलें. खानदेशांत चाळीसगांवच्या नैऋत्येस १० मैलांवर पाटण म्हणून गांव आहे तेथें तो मठ होता, अद्याप तेथें त्या मठाच्या खुणा सांपडतात. पाटण गांवांत भवानी देवीच्या देवळांत एका शिळेवर चंगदेवाचा लेख आहे. त्या लेखांत त्यानें सर्व हकीकत दिली आहे. तीवरून भास्कराचार्य व त्यांचें विद्वान् घराणें खानदेशी म्हणजे महाराष्ट्रीय होते हें सिद्ध आहे. भास्कराचार्यांनीं आपल्या सिद्धांतशिरोमणिग्रंथांत आपल्या जनकाविषयीं म्हटलें आहे ( गोले प्रश्नाध्याये ):—

**आसीत् सह्यकुलाचलाश्रितपुरे त्रैविद्यविद्वज्जने**
**नानासज्जनधाम्नि विज्जडविडे शांडिल्यगोत्रो द्विजः।**
**श्रौतस्मार्तविचारसारचतुरो निःशेषविद्यानिधिः**
**साधूनामवधिर्महेश्वरकृती दैवज्ञचूडामणिः ॥ ६२ ॥**

यावरून भास्कराचार्यांच्या वाडवडिलांपासून सह्याद्रिपर्वताच्या सन्निध असलेल्या पुर ह्म० पाटण गांवींच ते राहत असत असें उघड दिसतें. विज्जडविड पाटणाचें नांव असावें किंवा त्याजवळ त्या नांवाचें एखादें खेडें असावें, पण तें बीड किंवा बेदर नव्हे—कां कीं तेथें सह्याद्रि नाहीं. भास्करनंदन ( लक्ष्मीधर ) हा वेदार्थवित् व ऋतुक्रियाकांडविशारद् आहे असें पाहून जैत्रपालराजानें त्याला ह्या पुरांतून ( पाटण गांवांतून ) आपल्या दरबारीं नेऊन सभापति केलें. चंगदेव पुढें आपल्या मठाबद्दल म्हणतो:—

**तस्मात्सुतः सिंघणचक्रवर्तीदैवज्ञवर्योऽजनि चंगदेवः।**
**श्रीभास्कराचार्यनिबद्धशास्त्रविस्तारहेतोः कुरुते मठं यः २३**

भास्कराचार्यांचा जन्म शके १०३६ ( इ. स. १११४ ) मध्यें झाला. त्यांचे ग्रंथ सिद्धांतशिरोमणि ( श. १०७२ ), करणकुतूहल ( श. ११०५ ) व लीलावती हे प्रसिद्ध आहेत. हे दीर्घायुषी होते. चंगदेवानें आपले आजे भास्कराचार्य यांच्या शास्त्रग्रंथांचा अभ्यास

विस्तार व्हावा ह्यासाठीं हा मठ उर्फ ग्रंथसंग्रहालय स्थापन केलें व त्याला सिंधणराजाचा आश्रय मिळाला. हें घराणें मुख्यतः ज्योतिष्यांचें पण वेदवेदांगांत व अन्यशास्त्रांतही तें निष्णात होतें. ह्या घराण्यांत पुढेंही अनेक विद्वान् व ग्रंथकर्ते झाले. पुर म्ह० पाटण हें देवगिरीपासून जवळच आहे व सह्याद्रीचे फांटे जे चांदवडचे प्रसिद्ध डोंगर त्यांच्यालगत आहे. भिल्लमाचा, जैत्रपाळाचा व सिंधणाचा 'श्रीकरणाधिप' सोढल हा काश्मिरी ब्राम्हण असून त्याचा पुत्र शार्ङ्गधर ह्यानें 'संगीतरत्नाकर' नामक गायनकलेवर एक ग्रंथ लिहिला आहे. शिखरसिंगणापूर येथील शिवमंदिर याच सिंघणराजानें बांधलें. सिंघणाचा पुत्र जैत्रपाल अल्पवयी वारल्यामुळें पुढें २४ वर्षें त्याच्या नातवांनीं राज्य केलें.

## १२ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव.

इ. स. १२४७ ते १३०९ ह्या ६२ वर्षांत सिंघणाचे नातु कृष्ण व महादेव आणि कृष्णदेवाचा पुत्र रामदेवराव ह्या तिघांच्या राजवटी झाल्या. ह्याच काळांत मराठी भाषेचा उत्कर्ष झाला—महानुभावपंथीय वाङ्मय निर्माण झालें व ज्ञानेश्वरनामदेवांनीं पंढरपुरीं महाराष्ट्रधर्माची संस्थापना केली. कृष्णदेव व महादेव हे बंधु सारख्याच वयाचे असून त्यांचें परस्परांवर रामलक्ष्मणांसारखें प्रेम होतें. हेमाद्रीनें महादेव व रामदेव ह्या उभयतांच्या कारकीर्दींत श्रीकरणाधिप ह्या नात्यानें राज्यशकट हांकला. कृष्णदेव हा शूर असून धर्मशील होता व महादेव शौर्यानें सरस होता. सिंघणाच्या प्रतापानें देवगिरीच्या साम्राज्याचा सर्वत्र वचक बसविला होता त्यामुळें त्याकडे वांकड्या नजरेनें कोणी सहसा पाहिलें नाहीं व सिंधणाच्या नातवांना राज्यसुख उत्तम प्रकारें भोगतां आलें. कृष्णदेवानें गुर्जराधिपतीस युद्धांत पराभूत केलें व कोकणांतील राजांना चांगली दहशत बसविली. महादेवानें तर कोकणचा शिलाहारवंशांतला शेवटचा राजा सोमेश्वर याचीं गलबतें पाण्यांत बुडविलीं व त्याबरोबर तो राजाही

पाण्यांत बुडाला, तेव्हां यानें कोंकणप्रांत आपल्या राज्यास जोडला. यानें अपोर्याम नांवाचा यज्ञ मोठ्या थाटानें केला व नर्मदेपासून म्हैसूरपर्यंत एकछत्री राज्य केलें. सिंहण तर सिंहच होता, पण त्याचे हे नातूही सिंहाचे छावे होते. महादेवाच्या कारकीर्दीचें वर्णन करितांना हेमाद्रि म्हणतो:—

**सा संपत्तदिदं यशो बलमिदं सोयं प्रतापो महान्**
**एकैकं पृथिवीभृतो भुवि महादेवस्य लोकोत्तरम् ।**
**यस्य श्रीकरणाधिपः स्वयमयं हेमाद्रिसूरिः पुरः**
**प्रौढप्रातिभवर्ण्यमानविलसद्वंशो भृशं शोभते ॥**

" संपत्ति, यश, बल, प्रताप हे एकेक गुण महादेवाच्या ठिकाणीं लोकोत्तर आहेत व ह्या राजाच्या दरबारांत श्रेष्ठ बुद्धिमत्ता व विद्वत्ता ह्या गुणांनीं मंडित असलेल्या वंशांत हेमाद्रि ' श्रीकरणाधिप ' ह्या अधिकारावर उत्तम प्रकारें शोभत आहे. देवगिरीचें राज्य त्रैलोक्यांतील संपत्तीचें विश्रांतिस्थान आहे; येथील मोठाले वाडे देवांची वस्ती असलेल्या शैलशिखरांशीं स्पर्धा बांधीत आहेत; येथील लोक, त्यांचीं भूषणें, वस्त्रें व भाषणें परममधुर व चित्ताकर्षक आहेत," असें ह्यावेळच्या महाराष्ट्राचें वर्णन हेमाद्रिसारख्या कर्त्या व विद्वान् ब्राम्हणानें करून ठेविलें आहे. तो म्हणतो:—

**आस्ते मण्डितदण्डकापरिसरः श्रीसेउणाख्यः परं**
**देशः पेशलवेषभूषणवचोमाधुर्यधुर्याकृतिः ।**
**तस्मिन्देवगिरिःपुरी विजयते त्रैलोक्यसारश्रियां ।**
**विश्रांतिः सुरशालिशैलशिखरस्पर्धिष्णुसौधावलिः ॥**

---

१ ' स्रीसके १२११ विक्रम संवत्सरे प्रतापचक्रवर्ति स्री रामदेवरावप्रधान हेमाडिपंडित ' यांचा एक उनकेश्वर ( वऱ्हाड ) येथील शिलालेख यादवराव काळे यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्याचें मंगलाचरण ' नमो गणाधिपतये नमः ' असें आहे. ' हरिहरप्रसाद ' ' दोही देवां ' या त्यांतील उल्लेखांवरून ज्ञानदेवनामदेवांनीं हरिहरांच्या समानपूजेचा जो प्रघात सार्वत्रिक केला त्याचा संबंध कळतो.

येथें महाराष्ट्राला सेउणदेश असें म्हटलें आहे. यादवांच्या घराण्याचा पहिला पुरुष जो दृढप्रहरी त्याचा मुलगा सेउणचंद्र नांवाचा होता व त्याच्या पराक्रमामुळेंच त्याच्या ताब्यांत असलेल्या देवगिरीपासून नाशीकपर्यंतच्या प्रदेशास सेउणदेश असें म्हणत. ह्यांतल्याच कांहीं भागास पुढें खानदेश म्हणूं लागले. महादेवाच्या कारकीर्दीचें वर्णन वरप्रमाणें हेमाद्रीनें केलें आहे. ह्या महादेवाचें एक उत्तम व्रत होतें. 'अयं शिशुस्त्रीशरणागतानां हंता महादेवनृपो न जातु' म्हणजे तो स्त्रिया, मुलें व शरणागत यांवर शस्त्र चालवीत नसे. हें जाणून आंध्रांनीं आपल्या गादीवर एक स्त्री बसविली व मालवेश्वरानें एक अर्भक बसविलें! ह्याच यादववंशांत पुढें जन्मलेल्या जिजाईच्या पुत्रानें म्ह० शिवरायानें आपल्या पूर्वजांचा हा थोर कित्ता गिरविला:–" परमुलखांत पोर, बायका न धरावी. गाई न धरावी. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. कोणी बदअंमल म्ह० जुलूम न करावा." ( सभासदांची बखर )

## १३ हेमाद्री व बोपदेव.

कृष्णदेव व महादेव यांच्या राजवटींत संस्कृत विद्या व कला यांना प्रोत्साहन मिळालें व यज्ञयागादि पुण्यकर्मे यांना भर येऊन कालवशात् क्षीण झालेल्या धर्माला तारुण्य आलें. कृष्णदेवाचा गजसेनाधिप जल्हण हा शूर व विद्वान् होता. त्यानें सुभाषितांवर 'सूक्तिमुक्तावलि' नामक सुंदर ग्रंथ केला असून त्याचा आश्रित अमलानंद यानें आचार्यांच्या वेदांत-सूत्रभाष्यावर 'वेदांतकल्पतरु' नामक ग्रंथ केला आहे. पण ह्या काळचे मुख्य ग्रंथकार **हेमाद्रि** व **बोपदेव** हे होत. ही गुरुशुक्रांची जोडी महादेव व रामदेवराव यांच्या राजवटींत महाराष्ट्रभर गाजली बोपदेव हा पंडित व भक्त होता व हेमाद्रि हा मुख्यतः राजकार्यधुरंधर असून विद्वान्, धर्मशास्त्री, ग्रंथकार व कलाभिज्ञ असा चौरस होता. महाराष्टांत हेमाड-पंत या नांवानें हा अद्यापही सर्वमान्य आहे. शेकडों हेमाडपंती देवळें

हीं याचीं स्मारकेंच आहेत. हा माध्यंदिनशाखेचा, वत्सगोत्री, पंचप्रवरी विद्वान् ब्राह्मण कार्यकर्ता पुरुष होऊन गेला. हा शिल्पशास्त्रनिपुण होता. राज्यकारभाराच्या व आयव्ययाच्या पद्धतीही यानें ठरविल्या. याच्या बापाचें नांव कामदेव, आजाचें वासुदेव व पणज्याचें वामन होतें. कुलस्वामी महालसा उर्फ मोहनीराज. ह्यानें धर्मशास्त्रावर व व्याकरण, वैद्यक इ० शास्त्रांवर अनेक ग्रंथ केले असून 'चतुर्वर्गचिंतामणि' हा याचा ग्रंथ सर्वमान्य आहे. ह्या ग्रंथाचें व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड व मोक्षखंड असे चार भाग आहेत. परिशेषखंड नामक पांचव्या खंडांत देवतापूजा, श्राद्धविधि, मुहूर्तनिर्णय, प्रायश्चित्त इत्यादि विषय आहेत. आयुर्वेद–रसायन नांवाचा वैद्यकावर यानें स्वःत ग्रंथ लिहिला असून आपला आश्रित व मित्र जो बोपदेव त्याजकडूनही अनेक ग्रंथ लिहविले आहेत. हेमाद्रि व बोपदेव यांचा स्नेह अकृत्रिम होता. बोपदेव हा महाराष्ट्रीय व वऱ्हाडी ब्राह्मण. त्याचा आजा महादेव व बाप केशव केशवाच्या 'सिद्धमंत्र' नामक वैद्यकी ग्रंथावर बोपदेवानें 'सिद्धमंत्रप्रकाश' नामक टीका लिहिली असून त्यांत महादेव 'वेदपदाभिधान–महाराष्ट्री विप्र' होता असें म्हटलें आहे. यावरून वरदा उर्फ वर्धानदीच्या तीरीं असलेल्या वेदपद नांवाच्या गांवचे हे रहिवासी अर्थात् वऱ्हाडी ब्राह्मण होत असें दिसतें.

मुक्ताफलावरील टीकेंत हेमाद्रीनें म्हटलें आहे कीं बोपदेवानें व्याकरणावर १०, वैद्यकावर ९, ज्योतिषावर १, साहित्यशास्त्रावर ३ व भागवततत्वावर ३ मिळून २६ एकंदर प्रबंध लिहिले आहेत;असें सांगून भूगीर्वाण शिरोमणेरिह गुणाः के के न लोकात्तराः' याप्रमाणें बोपदेवाचें गौरव केलें आहे! बोपदेवानेंही 'मंत्रिहेमाद्रितुष्टये' 'हेमाद्रिर्बोपदेवेन मुक्ताफलमचीकरत्' इत्यादि प्रकारें हेमाद्रीचे उल्लेख केले आहेत. हे दोघेही समशील पंडित लोकोत्तर होत. त्यांतही हेमाद्रीच्या सर्वांगीणबुद्धीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच वाटतें. हेमाद्रीच्या विद्वत्तेनेंच मनुष्य गुंग होतो, मग

सुमारें ४० वर्षें तो जाधवांच्या राज्याचा 'श्रीकरणाधिप'[1] किंवा राज्यसूत्रधार होता या गोष्टीचा व त्यानें केलेल्या सुधारणांचा विचार मनांत आणला म्हणजे हेमाद्रीसारखा हेमाद्रीच-'अनामिका सार्थवती बभूव' असेंच म्हणावेसें वाटतें. हेमाद्रीनें 'श्रीकरणाधिप ही स्वतःची पदवी आपल्या ग्रंथांत दिली आहेच, शिवाय श. ११९४ च्या एका ताम्रपत्रांतही ह्या त्याच्या पदवीचा स्पष्ट उल्लेख आहे. हेमाद्री जसा शूर व राजकार्यनिपुण होता, तसाच धर्मशास्त्रज्ञ, पंडित, गुणग्राही व उदारमनाचा होता. याच्या वजनानें अनेक विद्वानांस राजाश्रय मिळाला. महानुभावीय पंडितांनाही यानें राजाश्रय मिळवून दिला होता. 'गुणी च गुणरागी च विरलः सरलो जनः' हें सुभाषित हेमाद्रीला पूर्णपणें लागतें. हेमाडपंतानें लंकेंतून बाजरी, इमारती बांधण्याची एक विशिष्ट तऱ्हा व मोठी लिपी महाराष्ट्रांत आणल्या असें म्हणतात. हेमाडपंती लिपी व हेमाडपंती देवळें या गोष्टी महाराष्ट्रांत आज ६०० वर्षें लोकांच्या तोंडीं आहेत. हेमाडपंती देवळें तर शेकडों पाहण्यांत येतात. असा हा अद्वितीय कर्तृत्वाचा व अलोट बुद्धिमत्तेचा थोर मराठा ब्राह्मण यादवसाम्राज्याच्या उत्तरकाळांत सूर्यासारखा चमकून गेला. त्या वेळच्या कार्यकर्त्यांतला अग्रेसर हेमाडपंत व साधुसंतांचा मुकुटमणि ज्ञानेश्वर हे दोघेही देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण होते. जाधवांचा काळ हा यजुर्वेद्यांच्या उत्कर्षाचा काळ होता. परमात्म्याला सर्व जाति व पोटजाति सारख्याच प्रिय असल्यामुळें तो एकेकाला एकेक उत्कर्षकाळ देत असतो! जाधवांच्या वेळीं यजुर्वेदी अग्रेसर होते, एकनाथांपासून राजारामापर्यंतच्या भोसल्यांच्या काळीं ऋग्वेदी पुढे होते, शाहूच्या वेळेपासून कोंकणस्थ पुढे आले! इंग्रजशाहींत सारे ब्राह्मण व सारे मराठे अपकर्षाच्या चरकांत सांपडले आहेत! ऐक्यप्रेमानें वागले तर तरतील!

---

१ ह्या पदवीसंबंधानें भांडारकर म्हणतात 'This office seems to be that of the chief secretary or one who wrote and issued all orders on behalf of his master and keeps the record.'

असो. कृष्णदेवाच्या राजवटींत देवगिरीकर जाधवांना 'निर्वीरमुर्वीतलं' कसें झालें होतें हें सांगून त्यांनीं अनेक यज्ञयाग व नाना पुण्यकर्मे केलीं व त्यामुळें 'क्षीणः कालवशात् पुनस्तरुणतां धर्मोऽपि संप्रापितः' म्हणजे कालवशात् क्षीण झालेल्या धर्माला तारुण्य प्राप्त झालें असें हेमाद्री म्हणतो आणि तें खरेंही आहे. धर्माला तारुण्य आणण्याच्या कामीं जाधव राजांना हेमाद्रिबोपदेवांनीं पुष्कळ साह्य केलें. जाधव राजे हे जात्याच धर्मशील आचरणाचे, विद्वानांना उत्तेजन देणारे व वैदिक धर्माचें संरक्षक होते कृष्णभक्ति ते कृष्णकुलोत्पन्न असल्यामुळें त्यांच्या हाडींमासीं खिळली होती. भास्कराचार्य हे 'कंसरिपुप्रसादितपदः' म्ह० कृष्णभक्त होते असें पाटणच्या शिलालेखांत चंगदेवानें म्हटलें आहे. हेमाद्रि व बोपदेव हेही कृष्णोपासकच होते. हेमाद्रीचा कुलस्वामी नेवाशाचा मोहनीराज—कीं ज्याच्या चरणापाशीं ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाला—हा होता. बोपदेवाची कृष्णभक्ति त्याच्या ग्रंथांवरूनच प्रगट आहे. बोपदेवानें श्रीमद्भागवतावर एकंदर चार ग्रंथ लिहिले. १ हरिलीला—यांत भागवताचें स्कंधशः सार दिलें आहे २ मुक्ताफल—यांत भागवताचें तात्पर्य सांगितलें आहे. ३ परमहंसप्रिया ही भागवतावर बोपदेवीय टीका आहे. ४ मुकुट—हा भागवतसाररूप ग्रंथ आहे. श्रीकृष्णभक्ति व भागवतावर प्रेम या समानगुणामुळें उभयतांचें सख्य स्थिरता पावलें. हरिलीलेंत बोपदेव म्हणतोः—

**श्रीमद्भागवतस्कंधाऽध्यायार्थादिनिरूप्यते ।**
**विदुषा बोपदेवेन मंत्रिहेमाद्रि तुष्टये ।**

बोपदेवाच्या हरिलीला व मुक्ताफळ ह्या ग्रंथावर हेमाद्रीनें वृद्धपणीं हरिलीलाभाष्य व कैवल्यदीपिका नांवाच्या टीकाही लिहिल्या आहेत. तात्पर्य, जाधवांचें राजघराणें, त्यांचे कारभारी व विबुधवर हे सर्व कृष्णभक्त होते. आतां त्यावेळचा सामान्य जनसमाज सुद्धां कृष्णभक्तीनें कसा आकर्षिला गेला होता हें पाहूं.

## १४ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय

कृष्णभक्तीचें महाराष्ट्रीय आदिपीठ म्हणजे पंढरपूर. पंढरीचा विठ्ठल (विष्णु–कृष्ण) याची उपासना पुंडलीकापासून चालू होती. पुंडलीकाचा कालनिर्णय करण्यास कांहीं साधन नसलें तरी ज्ञानेश्वरनामदेवापूर्वीच ही उपासना सार्वलौकिक झाली होती हें सिद्ध आहे. शके ११३१ चा एक शिलालेख आळंदीस एका स्वामीच्या समाधीवर कोरलेला सांपडला असून त्यावर विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति आहेत. तसेंच ११५९ च्या पंढरीच्या एका शिळेवरच्या लेखांत 'पंडरिगे' क्षेत्र, व पुंडलीक मुनि यांचा व देवाला एका गांवचे लोक वर्षासन देत होते त्याचा उल्लेख आहे. पण या काळच्या सर्व लेखांत महत्वाचा लेख पंढरीसच विठ्ठलमंदिरांत '**चौऱ्याशीचा शिलालेख**' म्हणून जो प्रसिद्ध आहे तो होय. तो शके ११९५ चा आहे. त्यांत 'श्रीकांतं घननिलं भक्तानुगं विठ्ठलं' यास वंदन केलें असून पुढें आठ रकान्यांत 'विठ्ठलदेवरायाच्या' पूजेअर्चेसाठीं मोठाल्या रकमा देणाऱ्यांचीं नांवें कोरलीं आहेत! "स्वस्ति श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर (फाल्गुनी पौर्णिमेस?) श्रीविठ्ठलदेवरायासि तिसासि ती (?) फुलें दांडे आचंद्रार्क चालावेया नाना भक्तमालिआं दत्त पैकाचा विवरु (तपशील)" गद्यान नामक १५ रुपये किंमतीचें एक सोन्याचें नाणें. कोणी किती गद्यान दिले त्यांचा तेथें हिशेब आहे. देणाऱ्यांचीं नांवें वाचतांना कोठून कोठून कोण लोक विठ्ठलाच्या यात्रेला येत हें समजून येतें. कांहीं नांवें महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांचीं आहेत, कांहीं कानडी, व तेलंगी आहेत. प्रत्येक रकान्यांत कोणाच्या मार्फत किती पैका जमला तें दिलें आहे, यावरून मंडळ (कमिटी)

---

१ हा प्रथम राजेंद्रलाल इंद्रजी यांनीं उजेडांत आणला, राजवाडे यांनीं तो लावण्याचा चांगलाच प्रयत्न केला, पण मूळ शिलालेखाचा ठसा त्यांनीं दिला असता तर ज्यास्त बरें झालें असतें.

नेमून त्याच्यामार्फत शिस्तीनें काम झालेलें दिसतें. श्रीपतिदणाक ( नाक-कां नाईक ? ), गंगाधर नायक, मांघोली येथील बाबा सेणवै ( सेनेचा नायक ), विजापूर येथील गौरुबाहू, मांईबाई दामोदरभट, विठनायक विनायक व देऊबाई हें त्रय, कोंकणा केसवदेव, हौगल येथील मलोदेव, आवंढ्याचा जातिदेव, बामरसचा नायअय्या जोसी, आंबे येथील कृष्णदेव, पैठणचा चांगदेव, आवडे येथील रासपंडित, सालीव येथील यादो सेवणै, पुराणिक हयवाहअय्या, जाईदेव सेठवल, रामण्णदेव पदुबाई करणिक, बोडबंग येथील भणगे, वैराग येथील दाठीनायक, झिंबदेव दलवै ( दळवी ), भिंगिआर ( भिंगार ) येथील हत्तिदेव सेंडा सेट्ठ ( शेंडे श्रेष्ठी ), मेहकर नागंण्णा, उभेमार्गी ( उभाघर? ) येथील तिंगवसेठ, लाड हरिदेव, श्रीधरदासी, कान्हो राई आप्पा, हीं एवढींचि नांवें पुरेत ! ह्यावरून कर्नाटक, तेलंगण, पैठण, नगर, वऱ्हाड, इ० सर्व भागांतून सर्व जातींचे भाविक विठ्ठलभक्त 'श्रीविठ्ठल देव-रायाच्या' दर्शनास शके ११९५ च्या फार पूर्वींपासून येत असें स्पष्ट-दिसतें. आनंदाची गोष्ट ही कीं रामदेवराव जाधव व त्यांचे कारभारी हेमाडपंडित यांचींही नांवें या शिलेच्या मध्यमागीं मोठ्या अक्षरांत आदरपूर्वक कोरलेलीं आहेत. तेव्हां ह्या विठ्ठलाच्या सेवाकार्यांत राजापासून रंकापर्यंत सर्वांनीं आपापल्यापरी साह्य केलें आहे. "स्वस्ति श्रीसकु ११९८ ईश्वर संवछरे मार्गसीर सुदि १५ सुक्रे ( शुक्रवारीं ) श्रीविठ्ठलदेवरायासी पांडरीफडमुख्य ( पांढरीच्या सभेचे अध्यक्ष ) श्रीजादवनारायण प्रौढ-प्रतापचक्रवर्ती श्रीरामचंद्र देवराय" यानीं, राजघराण्यांतील स्त्रियांनीं व सर्वाधिकारी यांनींही देणग्या दिल्या आहेत. कोणा राजस्त्रीनें–'बलदेव-बायकें वांव ( विहीर ) बांधण्यास भहूसी' ( भूयसी–मोठी दक्षिणा ) दिली होती. 'कोठारी ठाकवी ( ठकवी ) तेयासी श्रीविठ्ठलाची आण' घातली आहे. ह्याच लेखांत आषाढ सुध ( शुद्ध ) व बहुल ( वद्य ), एकादशीलाच देणग्या दिल्याचें स्पष्ट दिसतें. पंढरपूरच्या

शके ११९५ च्या शिलालेखावरून स्पष्ट दिसतें कीं त्याकाळीं पंढरपूरच्या वारकऱ्यांनीं श्रीविठ्ठलाच्या पूजाअर्चेची कायम व्यवस्था लावण्यासाठीं एक मोठी रक्कम उभारली व त्यासाठीं एक व्यवस्थापक-मंडळ नेमलें. त्या मंडळाचे अध्यक्ष रामदेवराव जाधव हे होते. यावरून पंढरपूरच्या कृष्णभक्तिसंप्रदायाच्या उन्नतीकडे रामदेवरावांचें चांगलें लक्ष होतें हें उघड दिसत आहे. देणग्या देणाऱ्यांच्या यादींत मध्यभागीं रामदेवरावांचें नांव आहे. त्या यादींत हेमाडपंतांचेंही नांव आहे. जाधव राजे महाराष्ट्रीय संस्कृतीशीं किती एकजीव झाले होते, त्यांना महाराष्ट्राविषयीं किती आपलेपणा वाटत होता, याचें हें एक बलवत्तर प्रमाण आहे. जाधवांचें राज्य म्हणजे स्वराज्य याची महाराष्ट्रालाही जाणीव होती, म्हणूनच ज्ञानेश्वरांनींही रामदेवरावांचें सप्रेम गौरव केलें आहे.

## १५ ज्ञानेश्वरांनीं केलेलें रामदेवरावांचें गौरव.

ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांत ( अ०१८ ) ग्रंथाचा स्थलकालनिर्देश केला आहे त्यांत तत्कालीन महाराष्ट्रभूपति जे रामदेवराव जाधव यांचें ज्ञानेश्वरांनीं 'सकलकलानिवास' व 'न्यायपोषक' अशा दोन विशेषणांनीं गौरव केलें आहे. ते म्हणतात:—

**ऐसें युगीं परि कळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं ।**
**श्रीगोदावरीच्या कूळीं । दक्षिणलिंगीं ॥ १८०३ ॥**

**त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र ।**
**जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे ॥ १८०४ ॥**

**तेथ यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु ।**
**न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥ १८०५ ॥**

**तेथ महेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ।**
**केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥ १८०६ ॥**

शके बाराशे बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकू जाहला ॥ १८११ ॥

भावार्थः—"ह्याप्रमाणें ह्या कलियुगांत आणि महाराष्ट्रमंडळांत गोदावरीच्या दक्षिणप्रदेशांत विश्वसूत्रधार श्रीमहालया ( मोहनीराज ) देवाचें त्रिभुवनांत अत्यंत पवित्र व पांच कोसांचें अनादि क्षेत्र आहे. ह्या देशावर म्हणजे महाराष्ट्रमंडळावर सांप्रत यदुवंशविलास म्हणजे जाधवांच्या घराण्याचें भूषण, व सकळ कळांचें केवळ निवासस्थान असा व न्यायानें प्रजापालन करणारा श्रीरामचंद्र नांवाचा राजा ( रामदेवराव जाधव ) राज्य करीत आहे. तेथें—त्याच्याच राज्यांत—ह्या महालसा क्षेत्रांत म्हणजे मोहिनीरूप घेऊन नांदणाऱ्या श्रीविष्णूच्या नेवांसें-नामक क्षेत्रांत—महेश म्हणजे आदिनाथ शंकर यांच्या परंपरेंतल्या श्रीनिवृत्तिनाथांच्या शिष्यानें म्हणजे ज्ञानदेवानें गीतेच्या अंगावर हा (ज्ञानेश्वरीरूपी) प्राकृत अलंकार चढविला आहे. शके १२१२ मध्यें ज्ञानेश्वरांनीं ही टीका केली व सच्चिदानंदबाबानें ती आदरपूर्वक लिहिली."

## १६ स्वराज्याचें सुख.

महाराष्ट्रभूमीचा डोंगरपर्वतांशीं राजकीयदृष्टीनें व धर्मदृष्टीनें संबंध अधिक आल्यानें व डोंगराळ हवापाण्याच्या सकसपणामुळें महाराष्ट्रीयांच्या अंगांत महत्वाकांक्षा, शक्ति, कंटकपणा, स्वातंत्र्यप्रीति इ. पौरुष

---

१ नेवासें येथील हें महालसाक्षेत्र पुढें शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या काळींही महाराष्ट्रांत लोकप्रिय होतें. शके १५८४ च्या कार्तिकांतील एक व पौषांतील एक अशीं शाहजी राजे यांचीं दोन पत्रें उपलब्ध आहेत. पहिल्यांत 'श्रीमाहालसा देवी कसबे नेवासे यास नैवेद्य पेसजी मोईन करून सनद सादर केली आहे' असें वाक्य आहे व दुसऱ्यांत 'कसबें नेवासें बु॥ एथें श्री माहालसा देवी जागृत स्थानक आहे' असें वाक्य आहे. पुजाऱ्याच्या विनंतीवरून शहाजी राजे यानीं 'इनाम दुमाल करणें हें धर्मकृत्य आहे असें जाणून' अधिकाऱ्यांस हुकूम सोडले आहेत. ( इतिहास आणि ऐतिहासिक—वर्ष ३ अंक २८ ते ३१ )

गुण नैसर्गिक आहेत. नगरें थोडीं व खेडीं फार, व्यापार कमी पण शेती अधिक, नागरिक थोडे व गांवढे जास्त अशी स्थिति राष्ट्राच्या सुखसंपन्नतेची द्योतक असते. जाधवांच्या राजवटींत महाराष्ट्रांत शेती मुख्य होती. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नौकरी' ही आपली म्हण आपल्या देशापुरती तरी त्या वेळीं यथार्थ होती. देवगिरि हें राजधानीचेंच शहर होतें, तेथें सर्व कांहीं होतें. तेथें शूरवीर होते, राजकारणी होते, व्यापारी होते, पंडित होते, धार्मिक होते, नानातऱ्हेचे गुणी लोक होते. चार वर्ण व विविध धंद्यांमुळें झालेल्या अनेक जाति होत्या. महार, मातंग उर्फ मांग, चांडाल इ० पंचम वर्णाचे लोकही होते व ते 'अस्पृश्य' गणले जात हें ज्ञानेश्वरींत चार-पांच वेळ त्यासंबंधीं जे उल्लेख आले आहेत त्यावरून उघड दिसतें; तथापि ज्ञानेश्वरनामदेवांनीं मोक्षाचें द्वार सर्वांस खुलें करून दिलें. सर्व जातींत साधुसंत झाले असून ते सर्ववंद्य आहेत. असो. संस्कृतविद्या, काव्येंनाटकें, पुराणें, धर्मशास्त्र, न्याय, व्याकरण, सांख्य, योग, मीमांसा, वेदान्त, ज्योतिष, वैद्यक, शिल्प, अश्वविद्या इ. विद्यांना व कलांना जाधवराजांचें प्रोत्साहन मिळाल्यामुळें त्या ऊर्जित दशेस आल्या, व जाधवराजांची संस्कृत व मराठी भाषांविषयीं प्रीति असल्यामुळें ग्रंथकारांना त्यांचें प्रोत्साहन मिळालें. त्यांची भागवतधर्माविषयीं सहानुभूती होती. जाधवांच्या वेळचे शंभरावर **शिलालेख व ताम्रपत्रें** उपलब्ध झालीं आहेत. एकट्या रामदेवराव जाधवांच्या संबंधाचे २५-३० लेख उपलब्ध आहेत. हेमाद्रीनें आपल्या प्रशस्तींत जाधवराजांची विश्वसनीय पूर्ण हकीगतही दिली आहे, यामुळें जाधवांच्या साम्राज्याची बरीच कल्पना करितां येते. "प्रौढप्रतापचक्रवर्ती, पृथ्वीवल्लभ, समस्तभुवनाश्रय, महाराजाधिराज" इ. जाधवराजांचीं बिरुदें होतीं. महाराष्ट्राबाहेरचेही अनेक राजे यादवांचे मांडलीक होते.

ज्ञानेश्वरांचे वेळीं जाधवांचें साम्राज्य कळसाला पोंचलें असून महाराष्ट्र स्वराज्याचें पूर्ण सुख अनुभवीत होता. गीतेच्या शेवटच्या श्लोकावर

ज्ञानेश्वरांचें जें भाष्य आहे त्यावर तत्कालीन सुखपरिस्थितीची छाया पडलेली दिसतेः—

**तयाचिये देशींच्या झाडीं। कल्पतरूंतें होडी ( पैजेनें )।**
**न जिणावें कां ? येवढीं। मायबापें असतां !॥ १६४३ ॥**
**ते पाषाणही आघवे। चिंतारत्नें कां नोहावें ?।**
**तिये भूमिके कां न यावें। सुवर्णत्व ?॥ १६४४ ॥**
**जेथ तो श्रीवल्लभ। जेथ भक्तकदंब।**
**तेथ सुख आणि लाभ। मंगळाचा॥ १६५८ ॥ अ. १८**

हेमाद्रिबोपदेवांसारखे पंडित, नामदेवांसारखे सद्भक्त, ज्ञानेश्वरांसारखे अवतारी पुरुष, रामदेवराव जाधवांच्या राज्यांत नांदत होते. राजा व प्रजा एका धर्माच्या, एक भाषा बोलणाऱ्या, एकाच संस्कारांनीं व चालीरीतींनीं बांधलेल्या, एका मनोधर्माच्या असून राजा न्यायनीतीनें व धर्मानें राज्य करीत आहे व अठरापगड जातींच्या प्रजा सुखसंतोषानें व अन्योन्यप्रेमानें नांदत आहेत असा तो खऱ्या स्वराज्याचा काळ होता.

परधर्मीय व परदेशस्थ लोकांचें महाराष्ट्रांत बोट शिरकलें नव्हतें. यवनांची पहिली धाड ज्ञानेश्वरांच्या अवतारसमाप्तीनंतर महाराष्ट्रावर येऊन आदळली. ज्ञानेश्वरांचें संपूर्ण अवतारकार्य स्वराज्याच्या भरभराटीच्या काळांत झालें. त्यांनीं परराज्य कल्पनेनेंही अनुभविलें नाहीं. ज्ञानेश्वरींत एकही यावनी शब्द नाहीं किंवा परकीय संस्कृतीची छाया नाहीं. सारा ग्रंथ ज्ञानभक्तीच्या परमोल्हासानें दुमदुमित भरला आहे. 'अवघें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें आहे' (९–२००) अस्सल मराठेपण ज्ञानेश्वरीच्या व इतर संतकवींच्या शब्दाशब्दांत वोसंडत आहे. महाराष्ट्र स्वराज्य, स्वाराज्य, साम्राज्य यांच्या सुखसाधनांनीं समृद्ध होता. ज्ञानेश्वरींत 'स्वराज्य' शब्द पारमार्थिक अर्थानें कां होईना पण एकदा आला आहे. 'ऐसेनि ब्रम्हैक्यासारिखें। स्वराज्य

येतां जवळिकें । झळंबत आहे हरिखें । तिन्हीलोक ' (१८–१०७२) ज्ञा० जीव आणि ब्रम्ह यांच्या ऐक्यासारखें स्वराज्य जवळ असतांना तिन्ही लोकांत आनंद दुमदुमून राहिला आहे. जीव व ब्रम्ह यांच्या ऐक्यांत जर पूर्णानंद आहे तर राजा व प्रजा, पिता व पुत्र, गुरु व शिष्य, पति व पत्नी, स्वामी व सेवक, ज्ञानी व अज्ञानी यांच्या ऐक्यांतही मर्यादित स्वरूपाचा कां होईना पण आनंद आहेच आहे. ऐक्यांत स्वराज्य आहे, द्वैतांत–फुटींत नाहीं ! आपल्यावर आपली संपूर्ण सत्ता –पराची नाहीं– याचें नांव स्वराज्य. आपल्या स्वधर्माप्रमाणें मनुष्य वागत असला कीं तो आत्मतंत्र म्हणजे स्वतंत्रच आहे:—

**स्वधर्म जरी लोपला । तरी सर्वसुखाचा थारा मोडला ।**
**जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥**
**निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे ॥** (अ. ३)

अस्तु. त्यावेळीं प्रजा स्वधर्मानें वागत होती, व स्वधर्मी राजा धर्मपालन करीत व करवीत होता, यामुळें सर्व जातींत पूर्ण ऐक्य होतें व म्हणून स्वराज्य नांदत होतें. मऱ्हाठे क्षत्रिय व मऱ्हाठे ब्राह्मण परस्परविश्वासानें व प्रेमानें वागत होते, व या पुढारलेल्या दोन कार्यकर्त्या प्रमुख जातींच्या अनुरोधानें बाकीच्या सर्व जाति गुण्यागोविंदानें वागत होत्या. अर्जुनासारख्या अभिजात क्षत्रियाला जो भगवंताचा उपदेश आहे तो ज्ञानेश्वरांच्या मुखानें सर्व राजांनीं व क्षत्रियांनीं चिरकाल ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.—

**यालागीं पाहीं । तुम्हां क्षत्रियां आणिक कांहीं ।**
**संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणे ॥ १८९ ॥**
**निष्कपट होआवें । उसिणा घाई झुंजावें ।**
**हें असो–काय सांगावें । प्रत्यक्षावरी ! ॥ १९० ॥** ( अ० २ )

---

१ शत्रूच्या घावाला प्रतिघाव देत लढावें.

ज्ञानेश्वरांचें जें भाष्य आहे त्यावर तत्कालीन सुखपरिस्थितीची छाया पडलेली दिसते:—

> **तयाचिये देशींच्या झाडीं । कल्पतरूंतें होडी ( पैजेनें ) ।**
> **न जिणावें कां ? येवढीं । मायबापें असतां ! ॥ १६४३ ॥**
> **ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें कां नोहावें ? ।**
> **तिये भूमिके कां न यावें । सुवर्णत्व ? ॥ १६४४ ॥**
> **जेथ तो श्रीवल्लभ । जेथ भक्तकदंब ।**
> **तेथ सुख आणि लाभ । मंगळाचा ॥ १६५८ ॥ अ. १८**

हेमाद्रिबोपदेवांसारखे पंडित, नामदेवांसारखे सद्भक्त, ज्ञानेश्वरांसारखे अवतारी पुरुष, रामदेवराव जाधवांच्या राज्यांत नांदत होते. राजा व प्रजा एका धर्माच्या, एक भाषा बोलणाऱ्या, एकाच संस्कारांनीं व चालीरीतींनीं बांधलेल्या, एका मनोधर्माच्या असून राजा न्यायनीतीनें व धर्मानें राज्य करीत आहे व अठरापगड जातींच्या प्रजा सुखसंतोषानें व अन्योन्यप्रेमानें नांदत आहेत असा तो खऱ्या स्वराज्याचा काळ होता.

परधर्मीय व परदेशस्थ लोकांचें महाराष्ट्रांत बोट शिरकलें नव्हतें. यवनांची पहिली धाड ज्ञानेश्वरांच्या अवतारसमाप्तीनंतर महाराष्ट्रावर येऊन आदळली. ज्ञानेश्वरांचें संपूर्ण अवतारकार्य स्वराज्याच्या भर-भराटीच्या काळांत झालें. त्यांनीं परराज्य कल्पनेनेंही अनुभविलें नाहीं. ज्ञानेश्वरींत एकही यावनी शब्द नाहीं किंवा परकीय संस्कृतीची छाया नाहीं. सारा ग्रंथ ज्ञानभक्तीच्या परमोल्हासानें डुमडुमित भरला आहे. 'अवघें जगचि महासुखें । डुमडुमित भरलें आहे' (९-२००) अस्सल मराठेपण ज्ञानेश्वरीच्या व इतर संतकवींच्या शब्दाशब्दांत वोसंडत आहे. महाराष्ट्र स्वराज्य, स्वाराज्य, साम्राज्य यांच्या सुखसाध-नांनीं समृद्ध होता. ज्ञानेश्वरींत 'स्वराज्य' शब्द पारमार्थिक अर्थानें कां होईना पण एकदा आला आहे. 'ऐसेनि ब्रम्हैक्यासारिखें । स्वराज्य

येतां जवळिकें। झळंबत आहे हरिखें। तिन्हीलोक ' (१८–१०७२) ज्ञा० जीव आणि ब्रम्ह यांच्या ऐक्यासारखें स्वराज्य जवळ असतांना तिन्ही लोकांत आनंद दुमदुमून राहिला आहे. जीव व ब्रम्ह यांच्या ऐक्यांत जर पूर्णानंद आहे तर राजा व प्रजा, पिता व पुत्र, गुरु व शिष्य, पति व पत्नी, स्वामी व सेवक, ज्ञानी व अज्ञानी यांच्या ऐक्यांतही मर्यादित स्वरूपाचा कां होईना पण आनंद आहेच आहे. ऐक्यांत स्वराज्य आहे, द्वैतांत–फुटींत नाहीं ! आपल्यावर आपली संपूर्ण सत्ता –पराची नाहीं– याचें नांव स्वराज्य. आपल्या स्वधर्माप्रमाणें मनुष्य वागत असला कीं तो आत्मतंत्र म्हणजे स्वतंत्रच आहे:—

**स्वधर्म जरी लोपला । तरी सर्वसुखाचा थारा मोडला ।**
**जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥**
**निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे ॥** (अ. ३)

अस्तु. त्यावेळीं प्रजा स्वधर्मानें वागत होती, व स्वधर्मी राजा धर्मपालन करीत व करवीत होता, यामुळें सर्व जातींत पूर्ण ऐक्य होतें व म्हणून स्वराज्य नांदत होतें. मऱ्हाठे क्षत्रिय व मऱ्हाठे ब्राह्मण परस्परविश्वासानें व प्रेमानें वागत होते, व या पुढारलेल्या दोन कार्यकर्त्या प्रमुख जातींच्या अनुरोधानें बाकीच्या सर्व जाति गुण्यागोविंदानें वागत होत्या. अर्जुनासारख्या अभिजात क्षत्रियाला जो भगवंताचा उपदेश आहे तो ज्ञानेश्वरांच्या मुखानें सर्व राजांनीं व क्षत्रियांनीं चिरकाल ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.—

**यालागीं पाहीं । तुम्हां क्षत्रियां आणिक कांहीं ।**
**संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणे ॥ १८९ ॥**
**निष्कपट होआवें । उसिणा घाई झुंजावें ।**
**हें असो–काय सांगावें । प्रत्यक्षावरी ! ॥ १९० ॥** ( अ० २ )

---

१ शत्रूच्या घावाला प्रतिघाव देत लढावें.

जगीं कीर्ति रूढवीं । स्वधर्माचा मान वाढवी ।
इयां भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे ॥ १९० ॥ ( अ० ३ )

ह्या शेवटच्या सुंदर ओवींत तर क्षात्रधर्माचें रहस्यच सांठविलें आहे. जाधवराजे व त्यांचे सद्धर्मपालक दुसरे ब्राह्मणादि साहाय्यक हें ह्यांतील तत्वाप्रमाणें वागत होते तोंवर महाराष्ट्रप्रजा स्वराज्यसुख अनुभवीत होती. तात्पर्य स्वराज्यलक्ष्मी, सरस्वति व आत्मविद्या यांचा उत्कर्ष जाधवराजांच्या राजवटींत झाल्यामुळें ह्या काळाला महाराष्ट्राच्या इतिहासांतलें 'सुवर्णयुग' म्हणावेसें मला वाटतें.

महाराष्ट्र देश व मराठे लोक यांच्या संबंधाचें विवेचन ह्या प्रकरणांत केलें, आतां मराठ्यांची जी महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा तिच्या संबंधानें चार शब्द पुढील प्रकरणांत सांगतों.

# ९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा.

## १ देशी भाषांचा उगम.

अगदीं मूळ शब्द केव्हां उत्पन्न झाला, स्वरव्यंजनात्मक भाषा कशी बनली, मानवी प्राण्यांची अगदीं पहिली भाषा कोणती, एका भाषेच्या अनेक भाषा कशा झाल्या व असंख्य शब्दांची टांकसाळ प्रत्येक भाषेंत कशी झडत गेली इ० प्रश्नांचा विचार अत्यंत मनोरंजक असला तरी त्याची फलनिष्पत्ति आकाशाला गवसणी घालण्यापेक्षां अधिक यशस्वी होईलसें मला वाटत नाहीं ! ऋग्वेद हा जगांतला अत्यंत प्राचीनतम ग्रंथ होय व यामुळें वैदिक भाषेच्या पलीकडे मनुष्याची दृष्टि पोंचणें अशक्य आहे, तथापि वैदिक भाषेच्या विरहित पृथ्वीवरील मनुष्यांचे वाग्व्यवहार होत नव्हते असें म्हणतां येणार नाहीं. काल निरवधि आहे व पृथ्वी विपुल आहे, तेव्हां ह्या पृथ्वीचे विभाग केव्हां कसे पडले व देशकालविभागानुसार भिन्नभिन्न भाषा कशा प्रसृत झाल्या याचा निर्णय करणें मनुष्यबुद्धीच्या आटोक्याबाहेरचें दिसतें. ऋग्वेदांत प्रतिबिंबित झालेली आर्यांची संस्कृति हीही कित्येक शतकांपासून बनत बनत आली असली पाहिजे व ह्या पूर्वीच्या काळांत मनुष्यांचे वाग्व्यवहार होत असले पाहिजेत. आर्य लोक उत्तरेकडून पंजाबांत सरस्वती तीरावर प्रथम आले असें कांहीं विद्वान् म्हणतात तर आर्यलोक मूळचे येथलेच असून त्यांपैकीं कांहीं आर्य फक्त वसाहतीसाठीं उत्तरध्रुवाकडे गेले होते असें पावगीप्रभृति कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे. ऋग्वेद आर्यांना भरतखंडाच्या उत्तरभागांत ते असतांनाच मिळाला एवढें सत्य आहे. त्यावेळीं भरतखंडांतील वेगवेगळ्या प्रांतांतील लोक वेगवेगळ्या बोली बोलत असले पाहिजेत. कालांतरानें वैदिक भाषेंतूनच लौकिक संस्कृत भाषा निर्माण झाली. वेदोपनिषदांची वैदिक उर्फ आर्ष भाषा, नंतरची

पाणिनीयभाषा, नंतरची शास्त्रपुराणेतिहासांची पौराणिक भाषा, तिच्यापासून झालेली काव्यनाटकांची लौकिक संस्कृत भाषा आणि नंतरची भाष्यांची भाषा अशा अवस्थांतून गीर्वाण भाषा उत्क्रांत झाली आहे. किती शतकांचा हा खेळ आहे याचा विचार भाषा पंडितें करीत आहेत. संस्कृत भाषा आधीची का प्राकृत भाषा आधीची याविषयींही संशोधकांत वाद चालले आहेत.संस्कृतभाषा लोकांच्या बोलण्यांत येऊन सार्वलौकिक होण्यापूर्वींही लोकव्यवहार कांहीं प्रांतिक भाषांतून होत असले पाहिजेत व त्या व्यवहाराला अनुसरून त्यांच्या भाषाही त्यांच्या संस्कृतीपुरत्या ठीक असल्या पाहिजेत असें कित्येकांचें मत आहे; तर संस्कृतापासूनच प्राकृतभाषा झाल्या असें कांहीं म्हणतात. पहिल्या वर्गाचें म्हणणें आहे कीं प्राकृत भाषा मूळच्या असून त्यावर संस्कार होऊन संस्कृत भाषा नंतर झाली; प्राकृत म्हणजे प्रकृतिभव, अर्थात् मूळची, अगोदरची भाषा, लोकांच्या बोलण्यांतली सुलभ भाषा व संस्कृत म्हणजे संस्कार पावलेली अर्थात् नंतरची भाषा. सोन्याचे खाणींतून सोन्याचे कणकण गोळा करून त्यांना अग्निसंस्कार दिल्यावर त्यांचें शुद्ध सोनें बनतें, त्याप्रमाणें प्राकृत भाषांवर संस्कार होऊन शुद्धतर बनलेली ती संस्कृत भाषा. प्राकृत भाषा प्रायः सवघड असते व संस्कृत अवघड असते. संस्कृतप्राकृतच्या या खोल वादांत न पडतां आपण इतकें म्हणूं कीं कोणत्याही प्राकृत भाषेवर संस्कृत भाषेचें अतिशय संस्कार झाले आहेत. संस्कृत भाषेंतल्या सर्वमान्य ग्रंथांपूर्वींचा एकही प्राकृत ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. अडीच तीन हजार वर्षांमागचा कोणत्याही प्राकृतभाषेंतला ग्रंथ आज आपणापुढें नाहीं. बोलण्याच्या ह्म० लौकिक संस्कृत भाषेच्या आधारावर चार प्राकृत भाषा आडीचहजार वर्षांपूर्वीं नुत्त्या क्षितिजावर येऊं पाहत

१ ऋग्वेदाला ६००० वर्षें झालीं, पाणिनी हा ख्रि. पू. ८०० वर्षांमागचा व पतंजलि ख्रि. पू. २०० च्या सुमारचा इ. शोध यांनीं लावले आहेत. ते ह्मणतात कीं पाणिनीच्या वेळीं प्राकृत भाषा नव्हत्या.

होत्याः त्या मागधी, शौरसेनी, पैशाची व महाराष्ट्री या होत. त्यांतही मागधी प्रथम पुढें सरसावली. मागधी किंवा अर्धमागधी म्हणजे पाली. बुद्धधर्मप्रसाराचें काम पालीभाषेनें केलें त्या अर्थीं त्यावेळीं पाली ही मगधाकडची लोकभाषा असली पाहिजे हें उघड आहे. संस्कृत भाषेंतला पहिला प्रसिद्ध नाटककार भास हा बुद्धसमकालीन होता. भासाचा काल खि. पू. ५५०–५०० हा निर्णीत झाला आहे. त्याचीं १३ नाटकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यावरून असें दिसतें कीं त्याच्या वेळीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण नित्याचे व्यवहार संस्कृतभाषेंत करीत, पण स्त्रीशूद्रादि प्राकृत भाषेंत बोलत. त्यांची प्राकृत म्हणजे संस्कृतचा अपभ्रंश होती. ह्या अपभ्रष्ट संस्कृत भाषेलाच तेव्हां प्राकृत म्हणत. प्राकृत म्ह. असंस्कृत अडाणी लोकांची भाषा. कांहीं देशी शब्दांमुळें प्राकृत भाषा वाढत गेल्या. तत्सम, तद्भव, व देशी असे तीन प्रकारचे शब्द देशी भाषेंत आले. भासाच्या नाटकांत खालच्या पात्रांच्या तोंडांत जी भाषा घातली आहे तीवरून २५।२६ शतकांपूर्वी प्राकृत भाषा कशा बनत चालल्या होत्या हें दिसतें. हर्ष–हरिस; नास्ति–णत्थि ( पुढें नाथी ); हस्त–हत्थ ( हात); अयमस्मि–अअह्मी ( आह्मी ); गिलति–गिलई ( गिळतो ); तक्र तक्क ( ताक ); नित्य–णिच्च ( नीच ); अशीं शब्दांचीं रूपें पालटत चालली होतीं. मृच्छकटिक नाटकांतही अह्माणं गेहं (अस्माकं म्ह० आमचें घर), सुक्ख ( शुष्क ), रण्णा ( राणा, राजा, ), उट्ठेहि ( ऊठ ), बह्मण ( ब्राह्मण, बामण ), मग्ग ( मार्ग ), पडामि, खादन्ति, खटखटायते इ. प्राकृत शब्दप्रयोग आढळतात. **मागधी** म्हणजे मगध आणि बंगाल या देशांतल्या लोकांची–गयाप्रयागाकडची भाषा. खि. पू. २०० च्या सुमारास मागधी उर्फ पाली जरा मागें सरली व **महाराष्ट्री** पुढें आली. शालिवाहनांची कारकीर्द म्हणजे महाराष्ट्रीच्या अभ्युदयाची वेळ. **शौरसेनी** म्ह० शूरसेनाच्या देशांतली, मथुराआग्रावृंदावनाकडच्या यमुनातीरवासी लोकांची भाषा. शौरसेनीचें अतिमृदुल स्वरूप म्ह. व्रजभाषा. हीच पुढें गुजराथ, माळवा, राजपुताना ह्या देशांत पसरली. **पैशाची** ही

पिशाचपूर, पुरुषपूर-पेशावर या प्रांतापर्यंतच्या उत्तरेकडील लोकांची भाषा; पंजाब, काबूल, कंदाहार या उत्तरेकडच्या लोकांची भाषा. अशोकाचे स्तंभलेख सारे पालीभाषेंत आहेत. मगधप्रांतांत बुद्धमताचें प्राबल्य होऊन पुष्कळ विहार बांधले गेले, म्हणून विहार–बिहार–बहार याप्रमाणें मगधाचे बहारांत रूपांतर झालें.

बौद्धांनीं पालीभाषेचा व जैनांनीं महाराष्ट्रीचा स्वीकार आपापल्या मतप्रसारार्थ केला, पण पुष्पमित्रविक्रमादित्यांच्या वेळेपासून वैदिकधर्माचा पुन्हा हिंदुस्थानावर पगडा बसत चाललेला पाहून त्यांनींही संस्कृतभाषेंत आपले ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला. इ. स. २०० पासून तो इ. स. १२०० पर्यंत जे ग्रंथ जाले, ताडपत्रांवर, ताम्रपत्रांवर, शिलांवर जे लेख लिहिले–कोरले गेले ते प्रायः संस्कृतभाषेंतच आहेत; तथापि त्याच वेळेपासून लोकांचा सामान्य व्यवहार प्राकृतांत होत गेला. यामुळें विद्वानांची व शास्त्रीपंडितांची भाषा संस्कृत झाली व सामान्य जनतेची प्राकृत झाली! संस्कृत ही लोकांच्या बोलींतून गेली व प्राकृतभाषा पुढें सरसावल्या. जेमतेम आठव्या शतकापर्यंत कांहीं वरिष्ठ वर्णाचे लोक संस्कृत बोलत, पुढें संस्कृत ही ग्रांथिक भाषा झाली. तामीळ, तेलंगण, कर्नाटक ह्या द्रविड देशांत अद्याप कांहीं विद्वान् ब्राह्मण संस्कृतभाषेंत लीलेनें अस्खलित बोलूं शकतात, पण एकंदर हिंदुस्थानचा विचार करितां संस्कृतभाषा बोलण्यांतून निःशेष जाऊन इ.स. ६ व्या ७ व्या शतकापासून साऱ्या प्राकृत भाषा झपाट्यानें वाढत चालल्या. आठव्या शतकानंतर श्रीशंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, विज्ञानेश्वर, सायणाचार्य इ. कांहीं महापंडितांनीं संस्कृतभाषेंत सुंदर ग्रंथरचना केली आहे, तथापि त्यावेळेपासून प्राकृतभाषांचा अभ्युदयकाळ सुरू झाला.

## २ वररुचीचें व्याकरण

प्राकृतभाषेवरील वररुचीचें व्याकरण इ. स. पूर्वीं २५० च्या सुमारास झालें. ‘प्राकृतप्रकाश’ या नांवानें तें प्रसिद्ध आहे. त्यांत

नगर वाचनालय, सातारा.



महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची ह्या चार मुख्य प्राकृत भाषांचें वर्णन आहे. संस्कृत वैय्याकरणांत जी पाणिनीची योग्यता तीच प्राकृत वैय्याकरणांत वररुचीची समजली जाते. त्याच्या पूर्वी चार दोन व्याकरणकार झालि, पण वररुचीनंतर ते मागें पडले. अशोकाच्या वेळीं बौद्धांच्या मागधी भाषेस ह्म० पालीस जें महत्व होतें तें ओसरलें व महाराष्ट्रीचा त्याच वेळीं भाग्योदय झाला. 'कच्चायणो' (कात्यायन) यानें नंदाच्या वेळीं पालीभाषेचें महत्व वर्णिलें होतें व पाली सर्व प्राकृतभाषांचें मूल असें म्हटलें होतें, आतां तें पारडें वररुचीच्या वेळीं फिरलें व त्यानें महाराष्ट्रीस अग्रस्थान दिलें. वररुचीच्या प्राकृत प्रकाशाचे १२ परिच्छेद असून त्यांत पहिल्या ९ परिच्छेदांत त्यानें महाराष्ट्रीचा व पुढील ३ परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी या तीन प्राकृत भाषांचा विचार केला आहे. वररुचि महाराष्ट्री व शौरसेनी या प्राकृत भाषा मुख्य मानतो, व त्यानें महाराष्ट्रीस प्रमुख स्थान दिलें असून इतर भाषांच्या संबंधानें 'शेषं महाराष्ट्रीवत्' याप्रमाणें तो महाराष्ट्रीवर हवाला देतो, याचा अर्थ इतकाच कीं महाराष्ट्री भाषेचा विस्तार व प्रसार राष्ट्रकूटांच्या प्राबल्यामुळें याच्यावेळीं पुष्कळ झाला होता.

वरील चार भाषांशिवाय इतर शेकडों पोटभाषा त्यावेळीं हिंदुस्थानांत बोलल्या जात होत्या व एकमेकींचा एकमेकींशीं मिलाफ होत होता. महाराष्ट्री भाषा जरी संस्कृतापासून निघाली आहे तरी स्वर, व्यंजनें, लिंग, विभक्ति, क्रियापदांचे काळ वगैरे बाबतींत तिनें आपलें स्वातंत्र्य कोठें कसें राखलें आहे हें वररुचीनें अनेक उदाहरणें देऊन सांगितलें आहे, तसेंच त्यानें धातूंचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्रींत कांहीं शब्द संस्कृत आहेत, कांहीं संस्कृतोद्भव आहेत व कांहीं निव्वळ देशी आहेत. नाथ–नाहो (पति); वृषभ–वसू ( बैल ); प्रतिपत्–पाडिवआ ( पाडवा ); अंगार–इंगालो ( इंगळ ); शय्या–सेज्जा ( सेज ); वल्ली–वेल्ली ( वेल ) अरण्यम्–रण्णम्, राण, ( रान ); स्वैरम्–सइरम् ( सैर, सैरा ); राधिका–राहिआ ( राही ); षष्ठी–छटी ( सट ); नदी–णई ( नई ); पर्यस्त–

नगर वाचनालय सातारा
संग्रहणार्थ

पल्लत्थ-( पालथा ); कुक्षि-कुच्छी ( कूस ); कृष्ण-कण्हो ( कान्हा ); राजकुलम्-राउल ( राउळ ); विद्युत्-विज्जू ( विज, बिजली )-अशा प्रकारें शब्दांची रूपांतरें होत होत महाराष्ट्री भाषा बनत चालली होती. डुडुळ, दादला, बाप, चिखल, आंबुला-आंबुली ह्म० नवराबायको असे कांहीं मूळचे देशी शब्दही महाराष्ट्रींत होते. संस्कृत, महाराष्ट्री, मराठी या क्रमानें हजार बाराशें वर्षें मराठी भाषा बनत चालली होती व तशी ती बनतां बनतां शके १२१२ पर्यंत नागरी मराठी बनून तिच्यांत ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगसुंदर ग्रंथ निर्माण झाला.

## ३ हालाची सप्तशती

महाराष्ट्रभाषेंतले '**सप्तशती**' व '**सेतुबंध**' हे ग्रंथ आज उपलब्ध आहेत. सप्तशती अधिक प्राचीन असून सेतुबंध त्यानंतर ३।४ शे वर्षांनीं झालेला आहे. सेतुबंध काव्य हें रामायणकथेवर रचिलें असून त्याचा कर्ता एकच आहे. सप्तशती ग्रंथ हा शालिवाहनाच्या नांवावर असून त्याचा कर्ता एक नाहीं. हालनामक शालिवाहनराजानें हा ग्रंथ केला किंवा करविला आहे. वस्तुतः तो एकाचा स्वतंत्र ग्रंथ नसून अनेकांच्या काव्यांचा तो संग्रह आहे. हा गाथावृत्तांत असून त्याच्या दोन्ही चरणांच्या १२।१८ व १२।१५ अशा मात्रा आहेत. सप्तशतींत ७०० गाथा असून त्याच्या कर्त्यांत ५० वर पुरुष व ७ स्त्रिया आहेत ! स्त्रियांच्या नांवावरच्या गाथा अवघ्या १२ आहेत. ५० गाथा एकट्या हालराजानें रचलेल्या आहेत. सुभाषितसंग्रहासारखा हा एक वेंच्यांचा संग्रह आहे. यांत शृंगारिक गाथांचा भरणा अधिक आहे तथापि सामान्यनीतिपर गाथाही कांहीं आहेत. सप्तशती ग्रंथ मोठा रसाळ व चटकदार आहे. त्यांत विलक्षण रसवत्ता आहे. ह्या ग्रंथाची बाणभट्ट व त्याच्यानंतरचे कवि यांनीं स्तुति केली आहे.—

**अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहनः ।**
**विशुद्धजातिभिः कोषं रत्नैरिव सुभाषितैः ॥**

' सातवाहनानें शुद्ध व जातिवंत रत्नांप्रमाणें सुभाषितांचा हा कोष ( भांडार ) तयार केला आहे; व अविनाशी ह्म० चिरकाळ लोकांत राहणाऱ्या व शिष्टजनोचित आणि निर्दोष अशा सुभाषितरत्नांचें हें कोठार आहे ' असें बाणानें ह्मटलें आहे. काव्यादेशकार दण्डीनेंही ' महाराष्ट्रदेशांत चालणारी भाषा ही प्रकृष्टप्राकृत ह्म० प्राकृतांत उत्कृष्ट आहे म्हणून या भाषेंत 'सागरः सूक्तिरत्नानां सेतुबंधादि तन्मयम्' म्ह० सूक्तिरत्नांचा सागर म्ह० सप्तशती व सेतुबंध इत्यादि सुंदर काव्यें निर्माण झालीं आहेत असें ह्मटलें आहे. सरस्वतिकंठाभरणांत व काव्यप्रकाशादि अनेक संस्कृतग्रंथांत सप्तशतींतल्या आर्या उदाहरणार्थ घेतल्या असून राजशेखरानेंही सप्तशतीची स्तुति केली आहे. तात्पर्य महाराष्ट्रींतला हा जवळजवळ पहिलाच ग्रंथ असून विद्वन्मान्य झाला आहे. सप्तशतींतच हें 'प्राकृतकाव्य अमृत' आहे व म्हणून जे याचा रसास्वाद घेणार नाहींत ते अरसिक आहेत असें म्हटलें आहे ! प्राचीन महाराष्ट्रीचा व जुन्या मराठीचा परिचय असलेल्या कोणाही मराठी वाचकांस सप्तशती ग्रंथ समजायला विशेष कठिण जाणार नाहीं ! ह्यावेळच्या महाराष्ट्रींत ऋ, ॠ, ऌ, ॡ, ऐ, औ हे स्वर नाहींत व द्विवचनही नाहीं ! ही प्राचीन महाराष्ट्री, ज्ञानेश्वरी मऱ्हाठी व नंतरची मराठी अशी सांखळी चांगली जोडतां येते. हृदय–हिअअ–हिय्या; देवकुळ–देअउळ–देऊळ; अग्नि–अग्गी–आग; अश्रु–अंसु; पानीय–पानिअ–पाणी; सज्जन–सज्जण–सजण; द्वे–दो; भाजन–भाअण–भाण; कार्य–कज्ज–काज; रिक्त–रित्त–रिता; स्फुरान्ति–फुरन्ति; रुष्याति–रुसइ–रुसतो; त्वं–तुम्–तूं; भगिनी–भहिणी–बहीण; ( भू म्हणजे होणें )–भवन्ति–हुवन्ति किंवा होन्ति–होतात; भवतु–होदु–होऊ; वृक्ष–रुक्ख–रुख, इ० अनेक शब्दांवरून व शब्दप्रयोगांवरून सातवाहनाची महाराष्ट्री ज्ञानेश्वरीमराठीकडे कशी लोटत चालली होती तें दिसतें. ' उदरं बिभ्राति ' या संस्कृत वाक्याचें त्यावेळच्या मराठींत ' पोट्टं भरन्ति ' हें रूप झालेलें आहे ! सप्तशतींत कांहीं देशी शब्दही आहेत. अत्ता ( आत्या ), कच्छ

( कांस ), कंजिअ ( कांजी ), खोक्खा ( खोकला ), पाडी ( रेडकू ), बोल्ल ( बोलणें ), भंड ( भांडणें ), पिट्ट (पिटणें), पुस ( पुसून टाकणें ), फिट्ट ( फिटणें ), दाव ( दाखवणें ), डोर ( दोर ), पिलुअ ( पिलु ), चिक्खल ( चिखल ), चुक्क ( चुकणें ), भुक्क ( भोकणें ) लड्डुक ( लाडू ), हिंड, रुंद इ० इ०. आपण आतां 'सप्तशती 'च्या महाराष्ट्रीचा थोडा अंतरंगपरिचय करून घेऊं:—

**सन्तमसन्तं दुक्खं सुहं च जाओ घरस्स जाणन्ति ।**
**ता पुत्तअ महिलाओ सेसाओ जरा मनुस्साणम् ॥**

' घरांतील माणसांचें सुखदुःख सारासारविचारानें ज्या जाणतात म्हणजे जाणून वागतात त्यांनाच हे पुत्रक ! महिला म्ह० कुलवती हें नांव योग्य आहे. इतर स्त्रिया पुरुषांना केवळ जरा म्ह० म्हातारपण आणणाऱ्या मात्र आहेत ! '

**छज्जइ पहुस्स ललिअं पिआइ माणो खमा समत्थस्स ।**
**जाणन्तस्स अ भणिअं मोणं च अआणमाणस्स ॥**

'प्रभु ( पहु ) असेल त्यालाच हव्या त्या लीला केलेल्या शोभतात, प्रिया ( पिआ ) म्ह० पतीची जी आवडती असेल तिलाच माण ( मानीपणा ) शोभतो, समर्थाला क्षमा ( खमा ) शोभते, जाणत्यालाच भाषण ( भणिअ ) शोभतें व अजाणत्याला म्ह० मूढाला मौन शोभतें !'

**पक्काइ वि णिम्बफलाइं णवरं काएहिं खज्जन्ति ।**

'पक्क झालेलीं (कडु) निंबाचीं फळें केवळ कावळेच सेवन करितात !' ' निंब निंबोळियां मोडोनि आला । तो काउळियांसीच सुकाळ जाला ' ( ज्ञाने० ९–४३८ ).

**सो अत्थो जो हत्थे तं मित्तं जं णिरन्तरं वसणे ।**

' तोच अर्थ ( पैसा ) आपला कीं जो आपल्या हातांत ( हस्त–हत्थ–हात ) आहे; तोच मित्र कीं व्यसनें म्ह० संकटकाळीं ( ही ) जो टिकून असतो.'

शालिवाहनाच्या वेळेपासून आजतागाईत महाराष्ट्रांत पुरुषांप्रमाणें स्त्रियाही कविवर्गांत मोडत आहेत. रोहा (बाई )ची पुढील सुंदर गाथा पहा:—

**जेण विणा ण जिविज्जइ, अणुणिज्जइ सो कआवराहो वि ।**
**पत्ते वि णअगदाहे भण कस्स ण वल्लहो अग्गी ॥**

'ज्या ( प्रिया ) वांचून जगणेंही अशक्य तो कृतापराध असला तरी त्याची मनधरणी केली जाते. नगरदाह प्राप्त झाला तरी अग्नि कोणाला प्रिय नाहीं ? '

तसीच ससिप्रभा ( शशिप्रभाबाई ) ची पुढील गाथा पहा:—

**जह जह वा एइ पिओ तह तह णच्चामि चंचले पेम्मे ।**
**वल्ली वलेइ अंगं सहावथद्धे वि रुक्खम्मि ॥**

'प्रिय ( पति ) जसजसा ( वाद्य ) वाजवितो, तसतसी मी चंचल प्रेमांत नाचते. वृक्ष जरी स्वभावस्तब्ध राहिला तरी वेली त्याच्या अंगाला वेष्टूनच राहते !'

मरहट्ट स्त्रियांची पतिविषयक प्रीति या दोनच गाथांवरून प्रतीत होणारी आहे. त्यांची रसिकता व उपजत काव्यस्फूर्तिही यावरून दिसते.

सप्तशतीवरून तत्कालीन समाजस्थितीवर बराच प्रकाश पडतो. सदर सप्तशतींत यशोदा, कृष्ण, गोपी, राधा ( इतर गोपींप्रमाणेंच कुमारिका ), राम, लक्ष्मण इ० नांवें आलीं आहेत; मंगलाचरणांत शिवपार्वती, लक्ष्मीनारायण व गणपति आहेत; तांबडी वस्त्रें घेणाऱ्या म्ह० रक्तांबरजैनांचा उल्लेख आहे. नद्यांत 'गोदा' चा उल्लेख बराच वेळ येतो; नर्मदा, तापी व काळी यमुना यांचाही येतो–विंध्य-पर्वत व विंध्यावरील भिल्लांचा व कोळ्यांचा उल्लेख पुलिंद नांवानें येतो. 'वलअ' म्ह० वलय–बांगड्या ही सौभाग्याची खूण समजत. 'हसतांना

दांत न दाखविणें, उंबऱ्याच्या बाहेर सहसा न पडणें, व मान वर न करितां पाहणें ही कुलवधूचीं लक्षणें मानीतः—

**हसिअं अदिट्ठदन्तं भूमिमणिक्कन्त देहलीदेसम् ।**
**दिट्ठमणुखित्तमुहं एसो मग्गो कुलवहूणम् ॥**

वडील भावाची मुलगी धाकट्या बहिणीच्या मुलास देण्याची चाल मरहट्टांत होती. वेल पुढें गेला पाहिजे, परत वेलाची चाल नाहीं. बायका अंगांस वासाचीं तेलें व उटण्या लावीत. अर्गजा किंवा बुक्का नवऱ्याच्या अंगाला स्त्रिया लावीत व त्यास गंधोदकाचें स्नान घालीत. बायका 'कणअडोर' म्ह० कनकदोर, कंडोरा, सोन्याचा कमरपट्टा घालीत. न्हातांना अंगास हळद लावीत. फणीनें–जालवलय–केंस विंचरीत. नाटकें होत तेव्हां कलावंतिणी बायकांच्या सोंगांची बतावणी करीत. स्त्रिया तांबडीं पातळें व तांबड्या चोळ्या घालीत. पत्राचा आरंभ 'स्वस्ति' शब्दानें करीत. बायका नवऱ्यास पत्रें लिहीत, व अनेक वचनांनीं बोलत. पुढच्या दारावर तोरण असून त्यावर पुष्पमाला घालीत व त्यांस 'वंदनमालिका' म्हणत. दारापुढें दोन 'मंगल कलश' ठेवीत. प्रत्येक घरीं गृहदेवता म्हणून एक देवीची मूर्ति असे व ताज्या पुष्पमाळा तिच्या गळयांत घालून रोज पूजा करीत. 'लाडू, गुळ, चणे, साळीचे तांदूळ' यांचे उल्लेख आहेत. शिमग्याच्या सणाचें धुळवडीसगट आजच्यासारखेंच वर्णन आहे.

**तात्पर्यः**—हालाचा हा सप्तशती ग्रंथ, त्या ग्रंथाची महाराष्ट्री भाषा, त्यांत व्यक्त झालेली विचारसरणी व प्रतिबिंबित झालेल्या लोकरीती यावरून शालिवाहन राजे महाराष्ट्राशीं एकजीव झाले होते हें उघड दिसतें.

## ४ कर्पूरमंजरी.

राजशेखराचा 'कर्पूरमंजरी' नामक एक महाराष्ट्रभाषेंतला ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा कवि इ. स. ८८४ ते ९५९ पर्यंतच्या ७५ वर्षांत झालेला

आहे. हर्षवर्धन, यशोवर्मन् प्रभृति जे पूर्वी विद्याभिलाषी राजे झाले त्यांच्या दरबारीं भवभूति, बाण, वाक्पतिराज, इत्यादि महाकवि होते. त्याचप्रमाणें कनोजच्या महेंद्रपालराजाचा राजशेखर हा गुरु व राजकवि होता. यानें आपल्या 'काव्यमीमांसा' ग्रंथांत एक अध्याय –भुवनकोशनांवाचा–भूगोलविषयक लिहिला आहे. राजशेखराचें बालरामायण, बालभारत, विद्धशालभंजिका, व कर्पूरमंजरी असे चार ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भवभूति हा वऱ्हाडी अर्थात् महाराष्ट्री ब्राह्मण होता, त्याप्रमाणें राजशेखर हाही महाराष्ट्रब्राह्मणच होय. त्यानें बालरामायणांत आपल्या पणजाला 'महाराष्ट्रचूडामणि' असें म्हटलें आहे; या पदाचा अर्थ महाराष्ट्रभाषेचा महापंडित असाही होऊं शकतो, तथापि महाराष्ट्रभाषेचा पंडित महाराष्ट्रीयच असावा असें अनुमान काढतां येण्यासारखें आहे. कर्पूरमंजरींत सूत्रधाराच्या तोंडीं 'वीणा' 'मिअंग' ( मृदंग ) व 'कांस्यताल' ( काश्याच्या धातूचे टाळ ) ह्या महाराष्ट्रीय वाद्यांचा उल्लेख आहे. मृदंग, टाळ, वीणा ही कीर्तनाची सामुग्री ९ व्या शतकांतच महाराष्ट्रीयांत प्रसार पावली होती असें दिसतें. संस्कृतबंध 'परुष' ( कठिण ) म्हणून हें 'सुकुमारपाडअ बंध' ह्म०कोमल प्राकृतकाव्य मी लिहिलें आहे असें राजशेखरानें म्हटलें आहे.

**महाराष्ट्री**–जादं कुंकुमपंकलीढमरठगिण्डप्पहं चम्पअ=

**संस्कृत**—जातं कुंकुमपंकलीढमरठीगण्डप्रभं चम्पकम्.

महाराष्ट्रीच्या गळ्यांत संस्कृतांतले मोठमोठे समास त्यावेळीं पडूं लागले होते याचें हें एक गमक दिलें आहे. संस्कृत शब्दांचे महाराष्ट्रींत अपभ्रंश कसे होत चालले होते हें राजशेखराच्या कर्पूरमंजरींतील कांहीं शब्दांवरून कळून येणार आहे. महाराष्ट्री–'टप्परकण्णा' याचा मराठींत 'टोपलीएवढे कान' असा अर्थ आहे.

**संस्कृत–महाराष्ट्री.**

**आत्मा**–अप्पा.

**धन** धण, **स्थान**–ठाण.

**द्वि**–दो.

**स्नेहग्रंथिः**–णेहगण्ठि.

**स्तन**–थण ( थान ).

**अस्मादृशाः**–अह्मारिसो.

**युगलम्**–जुअलम् ( जुळें )

**मातृष्वसा**–माउस्सिआ ( मावशी )

**प्रसाद**–प्पसाद ( पसाय ).

**कर्पूर**–कप्पूर ( कापूर ).

**नित्यं**–णिच्चं ( नीच, निच ).

**चतुर्दशी**–चउद्दसी ( चौदा, चौथ )

**पार्श्वे**–पासे, पासम्मि ( पास, पाशी ).

**कनिष्ठ भगिनी**–कणिठ्ठ बहिणी.

**पतन्ति**–पडन्ति; पतन–पडण.

**संस्कृत–महाराष्ट्री.**

**लक्ष्मी**–लच्छी, लक्ष्मण–लछमन.

**चंद्र**–चंद ( चांद )

**गर्भ**–गब्भ ( गाभा ).

**सप्त**–सत्त ( सात ).

**शर्करा**–सक्करा ( साखर ).

**नास्ति**–णत्थि, नाथी ( नाहीं ); हस्त–हत्थ ( हात ).

**मधुर**–महुर, मुख–मुह, मेघ–मेह.

**आर्द्र**–ओल्लं, आद्रक–आलें.

**अद्य**–अज्ज ( आज ).

**कांहीं वाक्यें पहाः—**

१ अत्थि दक्खिणावहे वच्छोमंणाम णअरम्–अस्ति दक्षिणापथे वैदर्भ नाम नगरम्.

२ तं णात्थिभूमिवलए मह जं णं सज्जम्–तन्नास्ति भूमिवलये मम यन्न साध्यम्.

## ५ मराठी भाषा बनत होती.

सातवाहनकालीन महाराष्ट्री भाषा ही ज्ञानेश्वरकालीन मराठीची आई आहे. महाराष्ट्री ही मराठीची आई व संस्कृत ही आजी आहे. महाराष्ट्री व मराठी यांच्यामध्यें एक अपभ्रंश भाषा होती असें कोणी ह्मणतात पण त्या भाषेंतला एकही ग्रंथ उपलब्ध नाहीं. शालिवाहनाच्या आरंभीं लोक जी महाराष्ट्री बोलत तीच वाढतवाढत बाराव्या शतकांत नागर मऱ्हाठी झाली. हजारबाराशें वर्षें मराठी भाषा बनत बनत चालली होती. ओघ एकच, पण पूर्वीं जिला महाराष्ट्री म्हणत तिलाच सुसंपन्नस्थितींत

मऱ्हाठी म्हणूं लागले. हजार दीडहजार वर्षानंतर मूळच्या रोपाचा प्रचंड वृक्ष झाला. ह्या दीर्घकाळांत महाराष्ट्राच्या इतिहासांत केवढाल्या घडामोडी झाल्या! शालिवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, जाधव यांचीं मोठालीं साम्राज्यें महाराष्ट्रावर राज्य करून गेलीं. महाराष्ट्रावर इतर प्रांतांच्या व इतर प्रांतांवर महाराष्ट्रीयांच्या स्वाऱ्या नेहमीं होत. वैदिक धर्मांतर्गत शैव आणि वैष्णव किंवा स्मार्त आणि भागवत, तसेंच वेदबाह्य बौद्ध आणि जैन आणि इतर शेकडों मतमतांतरें व पंथ यांचे परस्परांशीं नित्यसंबंध येत. वैदिक धर्मावर बौद्धांचें व जैनांचे आघात झाले व ह्या आघातांवर प्रत्याघातही झाले. राजकीय व धार्मिक चळवळींमुळें भरतखंडांतले सर्व प्रदेश एकमेकांशीं कधी संलग्न व कधी विलग्न होत. राजकारण, धर्म, भाषा, शास्त्रें, व्यापार, व्यवहार इ० अनेक बाबतींत हे एकमेकांच्या जवळ येत व कांहीं बाबतींत वेगळे राहत. अशा नानाविध आंदोलनांत प्राकृत भाषांचे एकमेकींवर नित्यशः आघात प्रत्याघात होत, व त्यामुळें कांहीं बाबींत त्या संमिश्र व कांहीं बाबींत विभक्त झाल्या. लोकव्यवहारांतून भाषा बनत गेल्या व भाषांमुळें लोक-व्यवहार चालले. आधी लोकव्यवहार, मग भाषाप्रचार व नंतर काव्य-शास्त्रादिकांची रचना असा सर्वत्र क्रम दिसतो. लोक आधी, भाषा मागून व वाङ्मय त्यापुढें. लोकांच्या संस्कृतीप्रमाणें भाषेचें व वाङ्मयाचें संवर्धन होत जातें. ज्ञानेश्वरींत ५६ भाषा आहेत या समजुतीचा उगम विविधप्रांतीय भाषांच्या संघट्टणांत आहे. बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. महाराष्ट्रदेश एक व त्याची भाषा एकच म्हणजे मराठी, पण तिच्या पोटभाषा किती तरी आहेत! अनेक प्रांतांतील लोकांचा एकमेकांशीं संबंध येतो, व्यवहार घडतो, जाणें येणें चालू राहतें, विचारविनिमय होतो, नानापंथ व नाना मतें नवीननवीन उत्पन्न होत असतात त्यामुळें भाषेंतील शब्दसमुच्चय वाढत बदलत जातो व यामुळें कोणत्याही एका भाषेवर आसपासच्या अनेक भाषांचा व व्यवहारांचा नित्य परिणाम घडत राहतो. अशा तऱ्हेनें शालिवाहनाच्या काळची महाराष्ट्री

गंगेच्या ओघाप्रमाणें अनेक रूपांतरें पावत, पलटी खात, वळणें घेत, ज्ञानेश्वरकालीन मऱ्हाठींत परिणत झाली आहे. महाराष्ट्री भाषेच्याही मागें दृष्टि पोंचवून बोलायचें झाल्यास वैदिक किंवा आर्षभाषा, पाणिनीय भाषा, काव्यपुराणांची अभिजात संस्कृतभाषा, महाराष्ट्री उर्फ प्राकृत भाषा, व त्यानंतरची ज्ञानेश्वरकालीन मऱ्हाठी भाषा अशी मराठी भाषेची परंपरा लावतां येते. तथापि नदीचें तसेंच भाषांचेंही मूळ सांपडणें कठिण!

**शके ११०२ मधला परळ येथील शिलालेख** हा तेथें 'रीसर्च लॅबोलेटरी' म्ह० वैद्यकाचें संशोधनगृह बांधीत असतां पायांत सांपडला. यांतील २४॥ ओळींपैकीं २२ ओळी संस्कृत असून २ ओळी मराठी आहेत:—

**॥ अथ तु जो कोणु हुवि ए शासन लो**
**पी तेया श्रीवैद्यनाथदेवाची भाल सकुटुंबीआ पडे**
**तेहाची माय गाढवें... ... ...॥**

'आतां जो कोणी (आपण) होऊन हें शासन लोपील त्याला वैद्यनाथ देवाची भाक म्ह० शपथ आहे ती त्यावर सहकुटुंब पडेल. त्याच्या आईला.........'

सर्व लेख संस्कृतभाषेंत असून शेवटची भाक तेवढी मराठी भाषेंत लिहिली आहे यावरून मराठी तेव्हां लोकांच्या बोलण्यांतली भाषा होती असें उघडच दिसतें.

**शके ११२८ मधला खानदेशांतील पाटण येथील शिलालेख,** पाटण येथील हेमाडिदेव नांवाचा निकुंभराजा यानें भास्कराचार्यांचा नातु चांगदेव याच्या मठाच्या योगक्षेमाकरितां कांहीं उत्पन्न करून दिलें त्याचा निर्देश प्रस्तुत शिलालेखांत आहे. याच्या ओळी २६ असून शेवटच्या ५।६ ओळी मराठींत आहेत. हा शिलालेख प्रथम डॉ. भाऊदाजी यांनीं १८६४ मध्यें छापला, नंतर बर्जेस व फ्लीट यांनीं त्यांचा ठसा घेऊन तो छापला, त्यानंतर तो थोडासा दुरुस्त करून

किल्हॉर्न यांनीं १८९२ मध्यें छापला व शेवटीं राजवाडे यांनीं त्याच्या शेवटच्या मराठी ओळी नीट लावल्या त्याच्या शेवटच्या ओळींवरून तत्कालीन मराठीची कांहींशी कल्पना होते. त्या ओळी अशाः—

२२ इयां पाटणीं जें केणें उघटे तेहाचा असि आई जो राउला होता ग्राहकापासीं तो मढा दीन्हला ॥ ब्राह्मणां जें विकतेयापासीं ब्रह्मोत्तर तें ब्राह्मणीं दीन्हलें ॥ ग्राह—

२३ कापासीं दामाचा विसोवा आसूपाठी नगरें दीन्हला । जल-दाइया बैला सिद्धवै ॥ नाहीरिला आसूपाठी गिधवें ग्राहकापासीं । पांच पोफली ग्राहकापासी ॥ पहि—

२४ लेआ घाणेआ दाणाची लोटि मठा दीन्हली ॥ जेती घाणे वाहति ते तीयाप्रति पली पली तेला ॥ एथ जे मविजे तें मढीचेन मापें मवावें मापाऊ मढा अर्द्ध ॥ अर्द्ध—

२५ मापहारी रूपाचें सूंक । तथा भूमिः । चतुराघाट विशुद्ध ॐ डुग्रामु पषड (म) बालेआ कामतुमध्यें चहवंटा ॥ एकलवंटा ॥ पंडितांचा कामतु ॥ श्रीते ग्रा—

२६ मी चाउरा : धामोजीचीअ सोंढिआं ॥

२२ ह्या पाटण नगरींत जें केणें ( क्रीणनं, विकायला ठेवलेला माल ) उघटें ( उद्घट ) म्ह० विकायला उघड ठेवलें जाईल त्यावरील राजानें ( राउळ ) घ्यावयाचें उत्पन्न ( आय ) मठास दिलें आहे. माल विक-णाऱ्यांपासून जें ब्रह्मोत्तर घ्यावयाचें तें ब्राह्मणांनीं मठास दिलें.

२३ गिऱ्हाइकांपासून ( माल विकत घेणाऱ्या ग्राहकांपासून ) दर आसूमागें ( आसूपाठीं ) दामाचा विसावा भाग ( विसोवा ) नगरानें म्ह० नगरातर्फे मठास दिला. मठास पाणी पुरवणाऱ्या बैलास सिद्ध ठेवावे. बाहेरील ( शहराबाहेरील कां बाजाराबाहेरील ? ) दर आसूमागें (आसू=सोन्याचें नाणें) गिधवें ग्राहकापासीं(?) पांच पोफळी (पांच करार)

२४ पहिल्या घाण्याची ( तेलाच्या ) दाण्याची लोटी मठाला दिली. ( पहिल्या घाण्यांत जितके दाणे जातील त्याच्या तेलाची एक लोटी मठाला दिली ). यापुढें जितके घाणे चालतील तितक्या प्रत्येक घाण्याबद्दल एकेक पळी तेल ( मठाला ). जेथें जें मापायचें तें मठाच्या मापानें मोजावें. मापाचें अर्धें मठाचें व अर्धें मापाऱ्याचें.

पुढील अक्षरें नीट लागत नाहींत व लावलेला अर्थ ओढाताणीचा वाटतो म्हणून येथें देत नाहीं. वरील अर्थ प्रायः सर्वसंमत व्हावा. २३ व्या ओळींतला ५ वा शब्द किल्हार्न 'नगरें' असा वाचतो, राजवाडे 'मगरें' वाचतात व भावे 'गनरें' असा छापून अर्थ मात्र किल्हार्नचाच घेतात !

हा शिलालेख लावायचा राजवाडे यांनीं फार प्रयत्न केला आहे व त्यांनीं मराठी भाषेचा आरंभ मागें खेंचीत खेंचीत चवथ्या शकापर्यंत नेला आहे. ! Epigraphica Indica व Indian Antiguary ह्यांत प्रसिद्ध झालेल्या ताम्रपटांतून मराठी शब्द कसे डोकावत आहेत हें त्यांनीं दाखविलें आहे. त्यांनीं १३ लेखांतून पुढील शब्द वेंचून घेतले आहेत:—

( १ ) शक ६०२ मधल्या ताम्रपटांत–पन्नास, प्रिथिवी ( पृथिवी )

( २ ) श. ६२१ ( चालुक्यांचा शिलालेख ) सुंक, बादावी, हित.

( ३ ) श. ६७५ ( सामानगड ताम्रपट )–देऊळवाडे, पारगांव, आईतवाडें.

( ४ ) श. ६८० चा ताम्रपट–दोसिराज ( जोशिराज ), भंडारगविट्ठगे ( भांडारकवठें. )

( ५ ) श. ७२८ चा वणीचा ताम्रपट–वारिखेड ( सध्याचें वारखेड ).

( ६ ) श. ७३५ चा ताम्रपट–खळखळ.

( ७ ) श. ७५७ चा ताम्रपट–येज्ञ ( यज्ञ ).

(८) श. ८१० चा राष्ट्रकूटांचा ताम्रपट–न्हा, पुन्य, जो ( सर्वनाम ,) सिंध ( सिंह ), दह ( दश ), थिति ( स्थिति ) रिपू, इ०

(९) श. ८३२ चा ताम्रपट–वइरि ( वैरी ), निशेष, सिंध.

(१०) श. ९००चा ताम्रपट–सांब्राज्य.

(११) श. ९२२ चा शिलालेख–करणिक, थीर.

(१२) श. १०१६ चा ताम्रपट–कोंकण, रिषि, सोमण, संवतु, छेपाटी, भाभण ( बाबण ), नोर, राय.

(१३) श. १०४९ च्या शिलारांच्या ताम्रपटांत–सकु ( शक ), संवतु, घोरपड, वरवली, ऊसर, मोर, मोबली गाँडीमार्ग.

वरील शब्दमालिकेवरून राजवाडे अनुमान काढतात कीं “शक ११०२ तील परळ येथील शिलालेखापासून शक ६०२ तील ताम्रपटापर्यंत मराठी शब्दांची परंपरा वरील यादीवरून अविच्छिन्न लागलेली दिसते. पूर्वचालुक्य, राष्ट्रकूट, उत्तरचालुक्य व यादव, ह्यांच्या राशियतींत महाराष्ट्रांत मराठी भाषा चालत होती असें विधान करणें वरील यादीवरून शक्य होतें...शके ६०२ च्या सुमारास हाल, सातवाहन वगैरेंची महाराष्टीभाषा सामान्य लोकांच्या बोलण्यांतून बहुतेक गेली होती आणि तिच्या ऐवजीं मराठी भाषा सुरू झाली होती”...वरील लेखांत ‘सकु, संवतु, गाँडि( गाडी )वाहन, घोरपड, मोर, ऊसर, वावर, छेपाटी, रिषि, ( ऋषि ), नोर, राय, सांब्राज्य, येज्ञ इ० शब्द अर्वाचीन मराठीशब्दांसारखेच ज्या अर्थीं आहेत त्या अर्थीं “शक ६०२ त मराठी–आपण बोलतों ती मराठी–महाराष्ट्रांत सामान्य लोक बोलत हें मात्र निश्चित आहे” असें राजवाडे यांनीं निःसंदेह लिहिलें आहे! मराठीभाषा याच्याहीमागें नेतां यावी य़ासाठीं राजवाडे यांनीं ‘मंगळवेढें येथील शक ४१० तील मराठी ताम्रपट’ शोधून धुळ्याच्या प्रभातमासिकांत छापला. हा लेख बराच दुर्बोध असून शोधकासही नीट लागला नाहीं. हा ताम्रपट ४१० चा तर नाहींच,

पुष्कळ अर्वाचीन आहे. डॉ. गुणे तो शक १४१० मधला असावा असें म्हणतात व भावे त्याला शक ११२६ हा काल देतात! सरावण (श्रावण) ते दीनी (त्यादिवशीं), गोजराजसरीतें (गो अथवा भो) म्ह० भोजराजश्रीतें पत्र लीहील, पुढील, नाईकवडी, पवार, जाद्व, मोर्री ( मोरे ), मगल-वड्यासी आल ( आले ), पटलकुळकणी ( पाटीलकुलकरणी ), म्हाजन ( महाजन ) लाड, दसाई ( देसाई ), दाजी, इ० शब्दांवरून हा ताम्रपट उघडच फार अर्वाचीन दिसतो. अर्थात् "शक ४१० त महाराष्ट्रांतील सामान्य लोक मराठी भाषा लिहित व बोलत. महाराष्ट्री भाषा शक १५० च्या सुमारास सातवाहन साम्राज्याच्या नाशाबरोबर लोप पावली. शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा लोकांत प्रचलित झाली होती" इ० राजवाडे यांचीं विधानें मान्य होणें कठिण आहे. महाराष्ट्री भाषा लोपून अपभ्रंशभाषा आली व अपभ्रंश लोपून मऱ्हाठी आली असें म्हणण्याचा बऱ्याच विद्वानांचा आशय दिसतो, मला वाटतें कीं तीनही भाषा भिन्न नसून काल व व्यवहार यांच्या योगाचें पालटत जाणाऱ्या एकाच भाषेचीं ही तीन रूपें आहेत किंवा तीनही मिळून एकच भाषा आहे. जिला पूर्वीं महाराष्ट्री म्हणत तिलाच १० व्या ११ व्या शतकांत मऱ्हाठी म्हणूं लागले. मुकुंदराज, भास्कर, ज्ञानेश्वर, नामदेव यांच्यापूर्वीं कित्येक शतकें मराठी भाषा हळुहळु बनत चालली होती. मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर यांनीं ज्या 'नागर बोलींत' आपले ग्रंथ रचले ती साधारण त्या स्वरूपांत ८ व्या ९ व्या शतकापासून आली असली पाहिजे. १२ व्या १३ व्या शतकांत **रचलेले** मराठी ग्रंथ आज आपणांपुढें आहेत, पण ते त्या **वेळच्या मराठींत लिहिलेले नाहींत**; त्यांचे लिखाण पंधराव्या शतकांपासूनचें आहे!

## ६ मुकुंदराज व मराठी भाषा.

'विवेकसिंधु' व 'परमामृत' या ग्रंथांचे कर्ते आदिकवि मुकुंदराज यांच्या विषयीं व यांच्या ग्रंथाविषयीं पुढें विवेचन येणार आहेच, येथें फक्त

मराठी भाषेविषयीं व मराठी वाङ्मयाच्या धोरणाविषयीं ते काय म्हणतात तेवढेंच पाहावयाचें आहे. हे कवि ज्ञानेश्वरांच्या आधीं झाले. दोघांत एक शतकाचें अंतर आहे. दोघांचाही संप्रदाय एक आहे, तत्वज्ञान एक आहे, विषयप्रतिपादनाची शैली एक आहे, दोघांचें अध्यात्मरहस्य अगदीं एक आहे, अनुभव एक आहे. ज्ञानेश्वरसूर्याचा अरुणोदय म्हणजे मुकुंदराज होत. त्यांचे दोन्ही ग्रंथ उत्कृष्ट आहेत, व ते परमार्थप्रिय लोकांच्या वाचनांत असतात. ज्ञानेश्वरांच्या अमित तेजामुळें व लोकप्रियतेमुळें ते जरा मागें पडले. शिवाय ते नागपूरसारख्या महाराष्ट्राच्या अगदीं पूर्वटोंकाकडे झाल्यामुळें त्यांचा प्रकाश इकडील प्रांतांवर लवकर पडला नाहीं. वैदिक संस्कृतीचा महाराष्ट्रीय संस्कृतीशीं मुकुंदराजांनीं प्रथम सांधा जुळवला. वैदिक वाङ्मयांतून वेदांत उर्फ उपनिषद्विद्या तेवढी त्यांनीं घेतली व शंकराचार्यांच्या मतानुसार अद्वैतसिद्धांताचा मराठी भाषेंत प्रथम प्रसार केला. त्यांच्या विवेकसिंधूचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. हा ग्रंथ शास्त्रीय असूनही अतिशय सुबोध झाला आहे. ‘ शंकरोक्तीवरी । मी बोलिलों मऱ्हाठी वैखरी । म्हणूनि निर्धारावी चतुरी । शास्त्रबुद्धि ’ ( पू. ७–४७ ). जयंतपाळ राजासाठीं ‘हा ग्रंथरचनेचा गदारोळ ’ त्यांनीं केला. ‘म्यां आपुली निजवाणी । पवित्र केली इहीं वचनीं ’ तरी या प्रसंगानें ‘ जग सुखिया होय ’ असाही विश्वास त्यांना वाटत होता. ‘ परापकारार्थ बोलावें ’ अशी गुर्वाज्ञा होऊन त्यांनीं मऱ्हाठींत ग्रंथरचना केली. पहिल्याच प्रकरणांत ते म्हणतात:—

**वेदशास्त्राचा मथितार्थू । मऱ्हाठिया होय फलितार्थू ।**
**तरी चतुरीं परमार्थू । कां न घ्यावा ? ॥**

रुईच्या झाडालाच मध्याच्या कावडी भरून मिळूं लागल्या तर रानावनांत हिंडायचे श्रम कां घ्यावेत ? ऊंस काळा दिसला तरी रस गोड आहे ना ? तसें माझे बोल आर्ष पण विवेकाचे आहेत. ‘ नवरासिक व चातुर्याचे बोल असले ’ तरी ‘ जया अखंड अनुभवणें । परमतत्व ’ तयां ते मान्य होणार नाहींत म्हणून मीं हा मऱ्हाठी ग्रंथ लिहीत आहे.

कल्पतरूचेनि पाडें । जरी फळती घरचीं झाडें ।
तरी तिये आवडीचेनि कोडें । न लावावी कां ? ॥ २४ ॥
देशी हो का मऱ्हाठी । परी उपनिषदाचीच राहाटी ।
तरी हा अर्थू जीवाचिया गांठीं । कां न बांधावा ? ॥२५ ॥

'याचि देहीं आपुले डोळां' सायुज्यमुक्तीचा सोहळा जर केवळ बोधानें भोगायला मिळतो तर तो अनायासें आलेला–कोणता शाहणा दवडील? मुकुंदराज ग्रंथाच्या उपसंहारांतही म्हणतात कीं 'उपानिषदांचें निर्मित । काढूनि केला हा ग्रंथ' तरी आतां श्रोत्यांनीं 'रोकडें ब्रह्मसुख भोगावें.' त्यांच्यासाठीं मी 'या मऱ्हाठिया उक्ती'। ग्रंथरचना केली आहे.

शृंगारादि नवरस । हे येथें दिसती विरस ।
तें परब्रह्म एकरस । जाणावें पै ॥

तात्पर्य, उपनिषदांतील ब्रह्मविद्या प्राकृतजनांना सुलभ करण्यासाठीं मुकुंदराजांनीं आपले मराठी ग्रंथ लिहिले आहेत. हाच कित्ता पुढील कवींनीं गिरवला आहे. शृंगारादि नवरसांकडे न वळतां मराठीकवीनीं प्रथम-पासूनच आपली दृष्टि उपनिषदांकडे लाविली व म्हणूनच मराठी कविता इतकी सोज्ज्वळ राहिली ! मुकुंदराजांनीं आपल्या ग्रंथांत जागोजाग उपनिषदांतील वाक्यें आधारासाठीं घेतली असून अद्वैतवेदांताचा विषय आपल्या स्वानुभवानें मोठा गोड करून दाखविला आहे. उपनिषदांप्रमाणें सांख्य, योग, गीता व भागवत यांचेही आधार मुकुंदराजांनीं आपल्या ग्रंथांत प्रमाणार्थ घेतले आहेत व त्या ग्रंथांना आपली मान्यता दाखविली आहे. 'पांचही दर्शनें जंबुकें । वेदांतसिंहाचे हाकें । ऐकोनि म्हणती

१ 'स्वरूपपरिपूर्णत्वाकारणें । परमपुरुष ऐसें बोलणें । हें बृहदारण्यकातें पुसणें । नामनिर्वचन ॥ स्थूल देह तोचि पुर । तेथें जीव निद्रिस्त निरंतर । म्हणोनि तो पुरुष हें उत्तर । व्याकरणसिद्ध ॥ ६० ॥ ऐसीं प्रकृतिपुरुषांचीं द्वंद्वें । उठलीं अनादिसिद्धें । हे भगवद्गीतेंत गोविंदें । बोलिलें असे ॥ ६१ ॥' ( पू० प्र० ५ ) 'द्वितीयाद्भयं भवति । ऐसी ही बृहदारण्यकश्रुती' ( पू० प्र० ७–१०१ ) इ० इ०

राखे । भाजिलों जी ' ( पू. ७–१२ ) याप्रमाणें फक्त वेदांत व तोही शांकरमतानुसारी तोच मुकुंदराजांनीं घेतला आहे. असो. मुकुंदराज मराठीचे आद्यकवि असल्यामुळें त्यांनीं कोणत्या धोरणावर ग्रंथरचना करून कवित्वाचा प्रथम पायंडा पाडला तें येथवर सांगितलें. त्यांनीं आपले ग्रंथ शास्त्रीयपद्धतीनें लिहिले असून चार्वाक, वैशेषिक, नैय्यायिक इत्यादिकांच्या मतांचें खंडण केलें आहे. त्यांचा योगाचा परिचय गाढ आहे.

## ७ महानुभाव व मराठी भाषा.

मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांच्या मध्यकालीं महानुभावपंथाचे संस्थापक चक्रधर हे झाले. महानुभावपंथ व त्या पंथाचें मराठी वाङ्मय यांची ओळख पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत करून द्यावयाची आहे. येथें मराठी भाषेसंबंधी या पंथाची मनोवृत्ती कशी होती तेवढेंच पाहूं. या पंथाचें मुख्य वाङ्मय शके ११८५ ते १२८५ च्या दरम्यान झालें.

कोणत्याही धर्मप्रचारकाला आपलें विचार लोकांना लोकभाषेंतच सांगावे लागतात. पूवा बौद्ध व जैन प्रचारकांनीं हेंच केलें म्हणून त्यांचे पंथ लोकांत झपाट्यानें प्रसार पावले. महानुभावपंथाच्या प्रचारकांनीं व ग्रंथकारांनीं हेंच केलें व म्हणून त्यांना वऱ्हाडसारख्या मराठी भाषेच्या प्रांतांत आपल्या विचारांचा थोडाफार तरी प्रसार करितां आला. या पंथाचें मूळ गोविंदप्रभु हे वऱ्हाडी ब्राह्मण असल्यामुळें त्यांची मातृभाषा मराठीच होती. त्यांचे शिष्य व या पंथाचे संस्थापक चक्रधर हे गुजराथी नागर ब्राह्मण असले तरि ऋिद्धिपूरला दीर्घकाळ वस्ती केल्यापासून त्यांनीं मराठी हीच मातृभाषा म्हणून स्वीकारली. त्यांचे रोजचे व्यवहार बोलणेंचालणें सर्वच मराठीभाषेंत होत असे व त्यांच्याभोंवतीं जी शिष्यशाखा जमली ही वऱ्हाड, खानदेश व नगर ह्या तीन जिल्ह्यांतूनच आलेली होती. चक्रधरांचे मुख्य शिष्य नागदेवाचार्य हे बीड परगण्यांतील पुरी या गांवाहून ऋद्धिपूरला आले; त्यांचें ' लीलाचरित्र ' गाणारे

महीभट उर्फ महींद्रव्यास हे अंहमदनगरकडील सारोळे गांवचे षट्शास्त्री ब्राह्मण; प्रख्यात कवि व ‘ शिशुपालवधादि ’ ग्रंथांचे कर्ते कवीश्वर भास्कर व त्यांचे बंधु ‘ चक्रधराची दिनचर्या ’ लिहिणारे भावे देवव्यास हे परभणीकडील कासारबोरी येथले रहिवासी; ‘ सिद्धांत-सूत्रपाठाचे ’ लेखक केशवराजसूरी व त्याचे बंधु गोपाळ पंडित हे पैठण-जवळील वाडें गांवचे रहणवाले; गीताटीकाकार लक्ष्मेंद्रभट देऊळवाडेकर व निवृत्तिदेव वाठोडकर हे अनुक्रमें एलिचपूर व दर्यापूर तालुक्यांतील राहणारे; ‘ वत्सहरण ’ कर्ते दामोदर पंडित हे असेच गोदातीरस्थ एका खेड्यांतून आलेले—याप्रमाणें चक्रधराच्या भोंवतीं जमलेले त्यांचे शिष्य-प्रशिष्य सारे मराठी भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्रांतले होते—महाराष्ट्रीय होते. हे सारे विद्वान् संस्कृतज्ञ शास्त्री पंडित होते व यापैकीं बहुतेकांना संस्कृतभाषेंत ग्रंथरचना करितां आली असती. गोविंद प्रभु व चक्रधर हे परमार्थांत चांगले मुरलेले व थोर होते म्हणूनच असलीं भाविक व विद्वान् माणसें त्यांना आपल्याकडे आकर्षितां आलीं. हे लोक कोणी आबाळ-गबाळ नव्हते हें त्यांच्या ग्रंथांवरून पुढें दिसणारच आहे. तात्पर्य ऋद्धि-पूर येथ स्थापन झालेल्या महानुभावसंप्रदायाच्या उदयकाळीं जे लोक तेथें जमा झाले त्यांची मातृभाषा मराठी होती व त्यांनीं ग्रंथरचना केली ती साहजिकरीत्या मराठीभाषेंतच झाली.

प्राकृत भाषांच्या उदयाचा काळ समीप आला आहे हें नागदेवा-चार्यांनीं ओळखलें व संस्कृतांत ग्रंथरचना करण्याच्या प्रवृत्तीस आळा घातला. केशवराजसूरीनें ‘ सिद्धांतसूत्रपाठ ’ हा ग्रंथ आधीं मराठींत तयार केला व लगेच त्याचें संस्कृत भाषांतर करण्याचें त्यानें मनांत आणलें तेव्हां नागदेवाचार्यांनीं त्यास त्यापासून परावृत्त केले. ते म्हणाले: “ नको गा केशवदेया ! येणें माझीये स्वामीचा ( चक्रधराचा ) सामान्य परिवारु नागवैल कीं: परमेश्वरें तरी जीवाचेया संकोचता आन अनेक व्यसना अयोग्यता जाणौनि आन काठिन्यता चुकवौनिः सकळांसी

अल्पायासें ब्रह्मविद्याचियां ठायें गिवसितां येवौनि परमात्मलाभुद्यमा वावु होआवा: म्हणौनीच महाराष्ट्रीयें निरोपिलें कीं गा:–" नागदेवाचें म्हणणें कीं संस्कृत भाषा सामान्य लोकांस समजण्यास कठिण, ती शिकण्यांत अनेक व्यसनें म्ह. अडचणी असल्यामुळें व ती सर्वांस समजण्याची योग्यता नसल्यामुळें सर्वांस अल्पायासानें ब्रह्मज्ञान व्हावें यासाठीं स्वत: माझे गुरुदेव चक्रधरस्वामी हे मराठींतच निरूपणादि करीत असत; सबब आपण त्यांच्या शिष्यांनीं गुरुवचनाला जर संस्कृतवेष दिला तर भाळेभोळे संस्कृत न कळल्यामुळें नागवले जातील, त्यांची त्यानें हानि होईल "! नागदेवाचार्य हे या पंथाचे पहिले आचार्य म्हणून मानले जात असल्यामुळें त्यांनीं मराठी ग्रंथरचनेचा हा जो मार्ग शिष्यांना आंखून दिला त्यामुळेंच या सहाशें वर्षांत महानुभावपंथाचे लहानमोठे गद्यपद्यात्मक पांच सहा हजार ग्रंथ मराठींत झाले आहेत! हे सारे ग्रंथ आजपर्यंत कडीकुलपांत होते त्यांना आतांशा कुठें बाहेरचा वारा लागूं लागला आहे! चक्रधराच्याही मनांत मराठीविषयीं अभिमान उत्पन्न झाला होता. त्यानें आचारप्रकरणांत आपल्या शिष्यांना सांगितल्याचें प्रसिद्ध आहे कीं "कानडदेसा तेलंगदेसा न वचावें: ते विषयबहुल देस: तेथ अवधूत मान्य: महाराष्ट्रीं असावें: मातापुरा: कोल्हापुरा न वचावें: तीयें साभिमानिये स्थानें "–कानडी व तेलंगी देश विषयासक्त असल्यामुळें तिकडे जाऊं नका, कोल्हापुराकडेही जाऊं नका, महाराष्ट्रांतच संचार करा असा चक्रधराचा संदेश होता. कोल्हापूर त्याच्या मतें त्यावेळीं कानडदेशांत असावें. चक्रधराचा हा महाराष्ट्र देशाचा व मराठी भाषेचा अभिमान त्याच्या शिष्यांतही संचरला. 'तेथ अवधूत मान्य' असें जें वर एक वाक्य आहे त्याचा कटाक्ष दिगंबर जैनांवर असावा. 'मातापुरा कोल्हापुरा न वचावें' असें जें वर वाक्य आहे तेंही विचारणीय आहे. मातापूर उर्फ माहूर वऱ्हाडांत आहे. माहूरच्या डोंगरावर एक दत्ताचें व एक देवी रेणुकेचें अशीं दोन फार प्राचीन मंदिरें आहेत. पायथ्याशीं महानुभावांनीं एक मंदिर मागाहून बांधलें आहे, तेथें

ओठ्यावर दत्ताचा मुखवटा ठेवून ते त्याची पूजाअर्चा करितात; पण कांहीं महानुभाव अजूनही डोंगरावरील मंदिरांकडे वळत नाहींत. मातापूर व कोल्हापूर येथील देवीच्या उपासनेविरुद्ध त्यांचा जो कटाक्ष आहे त्यांतही दुराग्रह दिसतो ! वस्तुतः महानुभावही मूर्तिपूजक आहेत. सूत्रपाठाचे भाष्यकार महाराष्ट्रदेश, त्याची सीमा व त्याचा विशेष या संबंधानें लिहितात "देश ह्मणिजे खंडमंडळः जैसें फलेठाणापासौनि दक्षिणेसि मऱ्हाठी भाषा जेतुला ठाइं वर्ते तें एक मंडळः तेयासी उत्तरे बालेघाटाचा सेवट असे ऐसे एक खंडमंडळः मग उभय गंगातीर तेहि एक खंडमंडळः आन तयापासोनि मेघकरघाट ते एक मंडळः तयापासौनि आवघे वराड तेहि एकमंडळः पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे" त्याच ग्रंथकारानें महाराष्ट्रीयांचे थोरवीबद्दल लिहिलें आहे: "महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र । महंत म्हणजे थोर । जेतुला अर्थी आपली थोरी असे तेतुलाही अर्थी आणिकासी थोरी करी" रुक्मिणीस्वयंवरकर्ता नरेंद्रपंडित म्हणतो:—

**"श्रीभागवत पद्मपुराणी । या कामधेनु दोनी ।<br>
दोहीलीया आदुमणी । मग केलें रुक्मिणीस्वयंवर ॥<br>
हे पुण्यपावन मराठी । आइकती आदरें कर्णपुटी ।<br>
तेयासी कव्हनी न पडे कामाठी । संसाराची ॥<br>
ऐसी प्रबंधरचना वाणितां । संतोष मानीत श्रोते आतां ।<br>
आर्पित पावो श्रीजगंनाथा । विनती माझी ॥"**

ऋद्धिपूरवर्णनकर्ता नारायणपंडित बहाळे म्हणतो:—

**"जेथची नांव तऱ्ही मऱ्हाटीः परि षड्दर्शनातें दळवटी ।<br>
प्रमेय धांडोळितां सृष्टींःआर्थीचिना ॥"**

'नांव मात्र मराठी भाषा, पण षड्दर्शनाच्यांवर मराठीची कडी आहे ! सिद्धांत पहाल तर मराठीसारखे सृष्टींत कोणत्याच भाषेंत तसें सांपडणार

नाहींत !' असा या ओवीचा अर्थ आहे. महानुभावियांनीं मराठी भाषेचा असा अभिमान वाहिला व मराठींत बहुत ग्रंथरचना केली हें त्यांचें मराठी भाषेवर मोठे उपकार आहेत. त्यांचा पंथ कोणांस आवडो अथवा व आवडो, त्यांची मराठीवाङ्मयसेवा निःसंशय प्रशंसनीय आहे.

## ८ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी–साहित्य आणि शांति

सिद्धांत आणि भाषा ह्या दोन्ही दृष्टींनें पाहतां ज्ञानेश्वरांची बरोबरी एकंदर मराठी वाङ्मयांत दुसरा कोणीच करूं शकत नाहीं. ते मराठीचे आचार्य आहेत; मराठी भाषेविषयीं त्यांनीं उत्कृष्ट अभिमान आणि प्रेम आपल्या ज्ञानेश्वरींत जागोजाग मोठ्या रसभरित वाणीनें व्यक्त केलें आहे. त्यांचें मराठी भाषेवरील अगाध प्रेम व त्यांचे लोकोद्धारक उदात्त विचार यांचा आपण आतां परिचय करून घेऊं. ज्ञानेश्वरांची वाणी जात्याच अद्भुतरम्य व भावनाप्रधान आहे याचा प्रत्यय आपणांस येथेंच येईल.

आपली मराठी भाषा प्रौढ व मधुर आहे हा सोज्वळ अभिमान, नवरसांपेक्षां शांतरस अधिक सरस व चित्ताकर्षक आहे ही निष्ठा आणि गोड विनयाशीं संगत झालेला आत्मप्रत्यय ह्या तीन दिव्यप्रवाहांचा ज्ञानेश्वरी हा प्रयाग आहे ! हे तीन भाव ज्ञानेश्वरींत एकमय झालेले आहेत. ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात कीं टिटवीनें चोंचीनें सागर उपसायचा प्रयत्न करावा त्याप्रमाणें मीं गीतार्थ कवळूं पाहत आहे, पण 'श्रीगुरु सानुकूळ' आहेत व 'संतकृपादीपक सोज्वळ' आहे, या आधारावर मीं हें ग्रंथाचें कार्य अंगावर घेत आहे; श्रोत्यांनीं 'गंभीरपणें व स्थिरावलेनि अंतःकरणें' ऐकावयास सिद्ध व्हावें. सज्जनांच्या बुद्धीला विसावा देणारें हें गीतामृत आहे. येथें 'शांतचि अभिनवेल' शांतरस अपूर्व नवलाईनें प्रगटेल. हा शांतरस असा गोड आहे कीं 'जयाचिया बरवेपणीं। कीजे आठां रसां वोवाळणी'–शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स व रौद्र हे आठ रस त्यावरून ओवाळून टाकावेत ! हे माझे 'मऱ्हाटे बोल' आहेत पण 'समुद्राहूनि सखोल। अर्थभरित'

आहेत. लावण्यगुणकुळवती असून एखादी स्त्री जशी पतिव्रता असावी त्याप्रमाणें ‘ येथ **साहित्य** आणि **शांति** ’ हे दोन्ही स्पष्ट आहेत. येथें साहित्याची शोभा आहे व शांतिरसाचा अनुस्यूत प्रवाह आहे. ‘साहित्य’ म्ह० सहितत्व, अर्थ आणि वाणी हे दोनी जेथें समान ऐश्वर्यानें नांदतात तें साहित्य. ‘ वागर्थाविव संपृक्तौ ’ असें कालिदासानें रघुवंशाच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें यथोचित सुंदर शब्दरचना आणि उदात्त विचार यांचें जेथें साहचर्य आहे तें खरें साहित्य. औषधांत साखर मिळाली तर अवश्य घ्यावी, मलयानिल मंद सुगंध आहे त्यांतच अमृताचा स्वाद मिळाला व तेथेंच दैवयोगानें मधुर नाद ऐकायला आला तर कोण बहार उडेल ! ‘ तरी स्पर्शें सर्वांग निळवी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेवींचि कानांकरवी म्हणवी । बाप माझा ( शाबास )’ ह्या प्रमाणें सर्वांगाला सुखविणारी, रसनेला आनंद देणारी व श्रवणाला मधुर अशी ही माझी मराठी भाषा ऐकून श्रवणेंद्रियांचें पारणें फिटेल, व संसारदुःख विसरलें जाईल. दूधासाखरेनेंच रोग जातो तर मग कडुनिंब कशाला प्यावा ? तात्पर्य ‘ मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजी ’ म्हणून संतोषवृत्तीनें श्रोत्यांनीं गीतार्थ ऐकावा ( अ. ४ ओवी २१३ ते २२५ ). शांतरसाचा पूर पात्र भरून वोसंडत आहे व म्हणून ‘ बोलापरौतें बोलणें ’ होत आहे ( ५–६४ ). हा साहवा अध्याय ‘ साहित्याचिया बरवा ’ म्ह. अलंकारादिकांच्या सौंदर्यासह सांगितला जाईल. ‘ माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परी अमृतातेंहि पैजा जिंके । ऐशीं अक्षरें रसिकें । मेळवीन ’ माझा हा आवडीचा मऱ्हाठा बोल आहे पण तो अमृतापेक्षांही मधुर आहे अशीं अक्षरें मी रसिकांकडून मिळवीन किंवा अमृतालाही प्रतिज्ञेनें जिंकील अशी रसभरित शब्दरचना करीन ! माझ्या कोवळ्या शब्दांपुढें स्वरांचे नाद उणे भासतील व शब्दवेधापुढें परिमळ फिका पडेल ! **रसाळपणाच्या** लोभानें कानालाच जिभा येतील व इंद्रियांत परस्परकलह माजेल ! शब्दविषय सहजच कानाचा आहे पण रसना म्हणेल कीं हा

रस आमचा आहे! घ्राण याच्या परिमळामुळें म्हणेल कीं हा विषय माझा आहे! येथील धांवत्या ओव्यांची रचना पाहून डोळ प्रसन्न होऊन म्हणतील कीं ही तर रूपाची खाण आहे! अंतःकरण बाहेर धांवेल व शब्दांला आलिंगन द्यायला बाहू पुढें सरसावतील! 'कैवल्यरसानें वोगरलेलीं (भरलेलीं) हीं बोलांचीं ताटें मी निष्काम सज्जनांपुढें' ठेवीत आहें. आत्मप्रभेच्या प्रकाशांत 'जो इंद्रियांतें चोरूनि जेवी' त्यालाच याचा स्वाद घेतां येणार आहे. शब्द दूर सारून अंगानें ब्रह्माला भिडावें व सुखांतच सुखाशीं रंगून जावें–असा ज्याला भावनेनें कोमळपणा येईल त्यालाच हें कैवल्यसुख भोगतां येईल, 'यऱ्हवीं आघवी गोठी होईल । मुकया बहिरयाची !' स्वर्गसंसारसुखाची आशा सोडतील तेच याची गोडी जाणतील. 'जैसा वायसीं चंद्र नोळाखजे । तसा प्राकृतीं ग्रंथ हा नेणिजे । आणि तो हिमांशुचि जेविं खाजें । चकोराच ॥ तैसा सज्ञानांसी तरी हा ठावो । आणि अज्ञानांसी आन गांवो !-' कावळा चंद्राला ओळखूं शकत नाहीं तसा विषयीपामरांना हा ग्रंथ समजायचा नाहीं. अज्ञानी जीवांनीं आपल्या तोलाचे दुसरे ग्रंथ पहावेत! प्रसंगानें हें बोललों, याची सज्जनांनीं क्षमा करावी (अ० ६ ओवी १२ ते ३१).

'अवधान एकलें दीजे । मग सर्वसुखासी पात्र होइजे' अशी माझी प्रतिज्ञा आहे, पण हें प्रौढीचें बोलणें आहे असें समजूं नका -अवधान द्यावें अशी सुज्ञ श्रोत्यांना माझी 'सलगीची विनवणी' आहे. तुम्हांसारखीं 'श्रीमंतें माहेरें' भेटल्यावर मग माझे लळे कां पुरणार नाहींत ? तुमच्या (श्रोत्यावाचकांच्या) कृपादृष्टीच्या ओलाव्यानें प्रसन्नतेचा मळा टवटवीत झाला म्हणून त्याच्या सावलींत मी श्रांत लोळत आहे. तुम्ही सर्वज्ञ प्रभु, मी तुमचा पढियंता (लाडकें लेकरूं). 'ऐसें वक्तृत्व करणा आहे । जेणें रिझा तुम्ही !' मी जरी बाळमती चावटी करितों तरी तुम्ही संतोषतां 'ऐसी जाती । प्रेमाची असे!' वेद जेथें मौनावतात 'तो गीतार्थ **मऱ्हाठिया** बोलिजे । हा पाड काई ?'–ही काय माझी योग्यता आहे ? पण धिटिवा (धीटपणा) करून 'तुम्हां पढियतया (प्रिय)'

व्हावें या आशेनें बोलत आहें. तुमची दृष्टि वळली कीं पुरें ' ये-हवीं कोंभेला उन्मेष सुके । जरी उदास तुम्ही '–तुम्ही उदास राहिलांत तर अंकुरदशेला येणारी माझी स्फूर्ति कोमेजून जाईल. दयाघन संतसज्जनांचें पुरें अवधान असलें कीं ' अर्थ बोलाची वाट पाहे । अभिप्रावोचि अभिप्रायातें विये । भावाचा फुलौरां होत जाये । मतिवरी !' उलटपक्षीं ' श्रोता दुश्चित तरी वितुळे । मांडिला रस. ' ' अहो चद्रकांत द्रवता कीर होये । परी ते हातवटी चंद्रीं आहे । म्हणउनि वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनविण. ' ( अ. ९ ओवी १ ते २९ ). जें बुद्धीला आकळायला कठिण, जे वाचेला बोलायला दुर्घट, तें निवृत्तिगुरुकृपेनें मी पाहीन व ह्या ग्रंथांत तुम्हां श्रोत्यांना दाखवीन ! गुरुकृपादृष्टीला काय अशक्य आहे आणि ती तर मजवर परिपूर्ण आहे ' येणें कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवीं ।' (अ० ६ ओवी ३२ ते ३६ ). गुरुचरण हृदयीं असले कीं उन्मेष म्ह. ज्ञानस्फूर्ति सहज होते, शब्दसृष्टि स्वाधीन असते, वक्तृत्वाचा प्रवाह सुरू असतो, व रससिद्धि अनुकूल होते, तात्पर्य ' सारस्वत आघवें । जिव्हेसी ये ' ( अ० १३ ओवी २ ते ५ ).

## ८ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी.

आतां माझी मऱ्हाठी भाषा संस्कृतच्या बरोबरीची कशी आहे तें सांगतों:––

**देशियेचोनि नागरपणें । शांत शृंगारातें जिणें ।**
**वरि वोविया होती लेणें । साहित्यासी ॥ ४२ ॥**
**मूळ ग्रंथीचिया संस्कृता–। वरी मऱ्हाठी नीट पाहतां ।**
**अभिप्राय मानलियां चित्ता । कवण भूमी हें न चोजवे ॥४३॥**

---

1 'To an author nothing is more dangerous than neglect ( Dr. Johnson ).

२ फुलोरा, फुलौरा, फुलवरा=पुष्पोद्गम, पुष्पगुच्छ.

जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें ।
तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ ४४ ॥
तैशी देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं ।
शोभती आयणी । चोखट आइका ॥ ४५ ॥ ( अ. १० )

ज्ञानेश्वरांच्या पूर्वी व वेळीं संस्कृतभाषेंतील काव्यनाटकांच्याच नादीं पुष्कळ विद्वान् असत व त्यांनीं शृंगाररसाला अग्रपूजेचा मान दिला होता. नवरसांत शृंगाररस पहिला समजत. महाराष्ट्रीचा सर्वप्रिय ग्रंथ 'गाथा सप्तशती' त्यांतही शृंगारालाच प्राधान्य दिलेलें आहे. हा वैषयिक ओघ वळवून ज्ञानेश्वरांना लोकांच्या मनांत परमार्थाचें बीज रुजवायचें होतें, ब्रह्मानंदाचें व भक्तीचें साम्राज्य पसरायचें होतें. शांतरसावरून नवरस ओवाळून टाकावेत इतका तो बहारीचा आहे असें त्यांनीं पूर्वी म्हटलेंच आहे. येथें नवरसांतला मुख्यरस जो शृंगाररस त्यालाही आपल्या सौंदर्यानें, मोहकपणानें व माधुर्यानें शांतिरस जिंकून टाकील असें ते वरील ओळीच्या पूर्वार्धांत म्हणतात. कोणी म्हणेल कीं साहित्यशास्त्र संस्कृतांत पुष्कळ वाढलें आहे तर त्याला उत्तरार्धांत ते उत्तर देतात कीं 'मराठींत साहित्यावर कोणी ग्रंथ लिहील तर त्याला पुरून उरतील इतकी अलंकारादिकांचीं उदाहरणें माझ्या या ग्रंथांत त्यास सांपडतील ! माझा ग्रंथ हा साहित्यावरचा अलंकार आहे. ! शिवाय गीतेच्या संस्कृत श्लोकांशीं माझ्या मऱ्हाठी ओव्या नीट ताडून पहाल व दोहींचा अभिप्राय ध्यानांत आणाल तर येथें भूमि ह्म० मूळग्रंथ कोणता व टीकाग्रंथ कोणता हें समजणार नाहीं ! गीतेच्या ७०० श्लोकांवर मी भाष्य केलें आहे कां माझ्या ओव्यांचा संक्षेप गीतेनें केला आहे हें ठरवणें कठिण जाईल ! सुंदर शरीरावर दिव्य अलंकार चढविले तर कोणी कोणाला सौंदर्य आणलें—कां शरीरानें अलंकार खुलले कां अलंकारांनीं शरीराला सौंदर्य दिलें—याचा निर्णय करणें कठिण जाईल ! एका भावार्थाच्या सुखासनावर संस्कृत भाषा व मराठी भाषा समान अधिकाराच्या बहिणींप्रमाणें दिसतील, पण हें निरभिमानतया

पाहिलें पाहिजे. मराठी व संस्कृत भाषा एका भावार्थाच्या सुखासनावर बरोबरीच्या नात्यानें विलसत आहेत.' संस्कृतभाषा ही मराठी भाषेची आई आहे कीं बहिण आहे हा भाषाविषयक प्रश्न बाजूला ठेवूं. विचारसंपत्तीच्या व सौंदर्याच्या दृष्टीनें मराठी भाषा संस्कृतच्या बरोबरीची आहे असें ज्ञानेश्वरांचें स्पष्ट सांगणें आहे. संस्कृतभाषेचें मराठीभाषेवर अगणित उपकार झाले आहेत व रामायणभारतभागवतादि महाग्रंथ, उपनिषदें, गीता, योगवासिष्ठ ह्या संस्कृत ग्रंथांच्या साह्यानेंच मराठी भाषा इतक्या प्रौढतेला पोंचली आहे ह्या गोष्टी निर्विवाद आहेत. भावार्थाला संस्कृत व मराठी ह्या समान आहेत असें अनेक कवींनीं म्हटलें आहे, पण दोहींची तुलना करितांना दृष्टांतउपमादिकांत तरी मराठीला बहुतेकांनीं न्यूनत्व दिलें आहे. मराठीला यत्किंचित् लघुत्व न देतां तिची सर्वत्र सर्वस्वी थोरवी गाणारे व तिला संस्कृतच्या बरोबरीचा मान देणारे ज्ञानेश्वर हे पहिले व एकटेच मराठी कवि आहेत हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे !

## ९ मऱ्हाठी शांतरसाचें घर !

नवरसांपेक्षांही शांतरस श्रेष्ठ आहे असें म्हणून शांतरसाला ज्ञानेश्वरांनीं मूर्धाभिषिक्त रस ठरविलें आहे व सहा शतकांवर मराठी काव्यवाङ्मयांत शांतरसानें आपलें पहिलें स्थान संभाळलें आहे. शांतरस म्ह० केवळ वैराग्य नव्हे, शांतरस म्ह० औदासीन्य नव्हे. नवरसांत केवळ प्रपंचविषयक वृत्तींचा खेळ असतो. शृंगारवीरकरुणरस महाकवींच्या काव्यांत कोठें कोठें शांतरसाच्या उच्चतेला पोंचले आहेत, पण सामान्यतः स्थूल शारीरभाव किंवा देहभावच त्यांत उत्कटतेनें प्रगट झालेले असतात. शांतरसांत ' देहभाव हारपला । तुज पाहतां विठ्ठला ' असें देहातीतपणाचें अनिर्वाच्य सुख असतें. सर्व दैहिक किंवा लौकिक वृत्ति जेथें उपशम पावल्या असून ब्रह्मानंदांत किंवा भक्तिसुखामृतांत जीव समरसता पावतो तो ' शांतरस.' अंतर्मुखतेची परमावधि येथें होते. उपनिषदें, गीताभागवत व संतांचीं काव्यें यांत शांतरस परिपूर्ण आहे. मराठी

भाषेच्या सौंदर्यामुळें शांतरसाला तारुण्य आलें असून अशाप्रकारें मी अनिर्वचनीय असें गीतातत्व सांगत आहे ( अ. १० ओवी ४२ ते ४७ )

गीताज्ञानेश्वरी हें शांतरसाचें घर आहे. येथें विश्वरूपदर्शनाच्या प्रसंगानें अद्भुतरस हा पाहुणा आला आहे:—

**येथ शांताचिया घरा । अद्भुत आला आहे पाहुणेरा ।**
**आणि येरांही रसां पांतिकरां । जाहला मान ॥ २ ॥**
**अहो वधूवरांचिये मिळणीं । जैसीं वराडियाही लुगडींलेणीं ।**
**तैसे देशियेचे सुखासनीं । मिरवले रस ॥ ३ ॥** ( अ० ११ )

'यजमान शांतरस व मेजवानीच्या प्रसंगाचा मुख्य पाहुणा अद्भुतरस ! त्यांच्या पंक्तीस येणाऱ्या ( तदनुकूल ) इतर रसांचाही येथें मान होईल. वधूवरांच्या विवाहसमारंभांत इतर वऱ्हाड्यांनांही त्यांच्या त्यांच्या अधिकारांप्रमाणें वस्त्रालंकारांचे आहेर होतात, त्याप्रमाणें मऱ्हाठीच्या दरबारांत इतर रसांनाही त्यांच्या योग्यतेप्रमाणें बसविले जाईल.' शांत व अद्भुत यांची ही भेट म्हणजे हरिहरांची किंवा गंगायमुनांचीच भेट आहे, किंवा अवंसेच्या पर्वणीला चंद्रसूर्य एकत्र यावेत तसाच हा प्रकार आहे. मला पुढें करून माझे गुरु निवृत्तिनाथ यांनीं '**संस्कृताचीं गहन तीरें तोडून तेथें मऱ्हाठी शब्दसोपानें** ( शब्दांचे घाट ) **बांधले आहेत.**' जेथें पूर्वी पोहणारांचींच सोय होती तेथें आज आबालवृद्धांसाठीं सोपे घाट बांधले आहेत असें म्हणून संतश्रोत्यांना ज्ञानेश्वर विनवितात कीं:—

**हें सारस्वताचें गोड । तुह्मींच लाविलें जी झाड ।**
**तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥ १९ ॥**
**मग हें रसभावफुलीं फुलेल । नानार्थफळभारें फळा येईल ।**
**तुमचेनि धर्मे होईल सुरवाड । जगा ॥ २० ॥**

हा महाराष्ट्रसारस्वताचा गोड वृक्ष 'हें उघडें कैवल्य' तुम्हींच लावला आहे म्हणून अवधानामृत शिंपून त्याला वाड ( मोठा ) करणें तुमच्याकडेच आहे ! तुह्मीं त्याला अवधानामृतानें वाढविलेंत कीं तो फोपावत जाऊन रसभाव-

फुलांनीं फुलेल, नानार्थ फलभारांनीं समृद्ध होईल व तुमच्या या उदार व प्रेमळ वर्तनानें सर्व जग सुखी होईल (अ. ११ ओवी १–२०) 'गीता आली मऱ्हाठिये' म्हणून 'सर्वांना कैवल्य उघडें' झालें आहे! संतांकडून मिळणारी स्फूर्ति, उत्तेजन, गौरवपर किंवा समाधानाचे शब्द हे वक्त्याचें किंवा ग्रंथकाराचें मुख्य भांडवल आहे ह्मणून ज्ञानेश्वरांनीं प्रेमळ शब्दांनीं वारंवार संतश्रोत्यांची विनवणी केली आहे.

ह्या महत्कार्याला यश देणारी 'अनवरत आनंद वर्षणारी गुरुकृपा-दृष्टिच' मुख्यतः कारण आहे. तिची प्रार्थना करून ते म्हणतात 'हे अंबे! ह्या ग्रंथांत नवरसांचे सागर भरीव, योग्य विचाररत्नांचे आगर उभे कर, व **भावार्थाचे पर्वत निर्माण कर.** ह्या देशी–मराठीभाषारूप पृथ्वीच्या पोटांत साहित्यसोन्याच्या खाणी उघड व वर विवेकवल्लीची लावणी कर. गुरुशिष्यसंवादांचीं भांडारें उघड व प्रमेयांची (सिद्धांतांची) उद्यानें लाव. **नास्तिकपणाच्या दऱ्या, पाखांडाच्या आडवाटा, व कुतर्कांची दुष्ट श्वापदें ह्या महाराष्ट्रभाषारूप पृथ्वीवर नसोत!** श्रीकृष्णगुण-गायनांत मला सर्वत्र विजयी कर व माझ्या श्रोत्यांना (वाचकांनाही) श्रवणसुखाच्या राज्यावर बसव. 'ये मऱ्हाठियेचिया नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं। घेणें देणें सुखचिवरी। हो देईं या जगा'–ह्या मऱ्हाठीभाषेच्या नगरींत ब्रह्मविद्येचा सुकाळ कर व ह्या जगांत केवळ सुखाचीच देवघेव होवो. तूं आपल्या दयेचा शेला माझ्या अंगावर घालशील तर मी आतांच हें सर्व करून दाखवीन!" या विनवणीबरोबर श्रीगुरूंनीं ज्ञानेश्वरांकडे कृपादृष्टीनें पाहिलें व त्यांना अभयवर मिळाला (अ. १२ ओवी १२ ते १८)

श्रीकृष्णार्जुसंवादरूप हा वोवियेचा प्रबंध नागरी (सुंदर) बोलींत मी विशद करून सांगतों. यांत नुस्तीच शांतिकथा आहे पण ती शृंगाराच्या माथां पाय ठेवी'–अशी गोड आहे, म्हणजे तिच्या श्रवणानें शृंगारादि-रसवृत्ति पार दबून जातील:—

**दाऊं वेल्हाळ देशी नवी। जे साहित्यातें वोजावी।**
**अमृतातें चुकी ठेवी। गोडसपणें॥ ११५८॥**

**खेचरांचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा ।**
**श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ॥ ११६० ॥**

'माझी लाडकी देशीभाषा नवीन आहे ह्म० तिच्यांत फारसे ग्रंथ अजून झाले नाहींत, तथापि ती साहित्यशास्त्राला शोभा आणील व अमृतालाही आपल्या माधुर्यानें मागें सारील! तिच्यांत आणखी एक गुण आहे तो हा कीं पिशाच्च्यांच्या (आसुरीप्रकृतीच्या) माणसालाही ती सात्विकाचा पान्हा फोडील, मग शुद्धचित्त सात्त्विक लोकांना तर श्रवणाबरोबर समाधिसुख दाखवील हें काय सांगायला पाहिजे?' (अ०१३).

## १० मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे!

**तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेसी विश्व भरूं ।**
**आनंदाचा आवारू । मांडूं जगा ॥ ११६१ ॥**
**फिटो विवेकाची वाणी । हो कानामना जिणी ।**
**देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ११६२ ॥**
**दिसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।**
**रिघो महाबोधसुकाळा-। माजीं विश्व ॥ ११६३ ॥**

गीतार्थानें विश्व भरून टाकीन व आनंदाचें आवार एवढें विशाल करीन कीं त्याच्या पोटांत साऱ्या जगाला घेईन! 'विश्व अवघें आनंदमय' करीन.

विवेकाचा दुष्काळ जाऊन सुकाळ होईल व प्रत्येकाला आपल्या कानाचें व मनाचें साफल्य झाल्याचें समाधान वाटेल. **वाटेल त्यानें ही ब्रह्मविद्येची खाण पहावी**, ह्या खाणीवर सर्व विश्वाची मालकी आहे! **सर्वांना येथें अधिकार आहे.** सर्वांच्या डोळ्यांना परब्रह्म प्रत्यक्ष दिसो, सुखाचा सोहळा उदय पावो, व महाबोधाच्या सुकाळांत सारे लोक तन्मय होवोत. हें सर्व आतांच घडून येईल असें मी उत्कृष्ट बोलेन, कां कीं श्रीगुरूंनीं माझा अंगिकार केला आहे. म्हणून मी मर्म व्यक्त करणाऱ्या शब्दांनीं, उपमादिकांची गर्दी उसळून देऊन, प्रतिपदीं

ग्रंथार्थांचें रहस्य प्रकट करीन. माझ्या गुरूंनीं मला परिपूर्ण विद्येनें श्रीमंत केलें आहे. त्यांच्या कृपेनें मी बोलेन तें सारें सामावून जाईल, आणि शिवाय तुम्हां संतांचे चरण मला लाभले आहेत, ह्यामुळें मला कसलीच अटक राहिली नाहीं. काश्मीरी ( वाग्देवता, सरस्वती )–हिच्या पोटीं चुकून सुद्धां मुकें मूल होणार नाहीं! शुभ अशा सामुद्रिक चिन्हांची लक्ष्मीला काय वाण आहे ? ( अ. १३ ओवी ११५६–११७१ ).

'जगाला आनंदाचें आवार' मांडण्याचा हा अधिकार ज्ञानेश्वरांचा होता यांत संशयच नाहीं वाटेल त्यानें ब्रह्मविद्येचा आनंद लुटावा व ब्रह्मतत्व डोळ्यांनीं पाहून महाबोधाच्या सुकाळांत तृप्त व्हावें ही त्यांची मनीषा पूर्ण झाली आहे. विद्येचा अल्पमात्र संस्कार ज्यांना झाला आहे असे सहस्रावधि भाविक वारकरी ज्ञानेश्वरीच्या श्रवणपठणमात्रानें सुखांत डोलतांना ज्यांनीं पाहिलें आहें त्यांना याची प्रचीति येईल. 'ह्या अडाण्यांना हें ब्रह्मज्ञान काय कळत असेल' असें अंतरावर उभें राहून पाहणाऱ्या व कचित्काळीं कीर्तननिरूपण उभाउभी ऐकणाऱ्या विद्वानांना वाटतें; पण नित्यनिरंतर श्रवणभजनांत रंगणाऱ्या वारकऱ्यांच्या मेळ्यांत जे पुरे मिसळतात त्यांना हे लोक 'ज्ञानेश्वरमाउली' चा भावार्थ बरोबर जाणतात हें कळून येतें. ब्रह्मज्ञान यथार्थ कळून कृतार्थ होणें ही गोष्ट ज्याच्या त्याच्या पुण्याईची, कमाईची, व देवभक्तांच्या कृपेची आहे ही गोष्ट सत्य आहे; तथापि ज्ञानेश्वरांनीं अठरापगड जातींच्या हजारो लोकांना अध्यात्माच्या सीमेवर आणून ठेवलें आहे यांत शंका नाहीं. 'मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एक मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजी' ( अ० ४–२२४ ) हें श्रवणभक्तीचें मर्म ज्ञानेश्वरीच्या निरूपणप्रसंगीं अनुभवास येतें. उपसंहारांत ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे कीं मूळ शब्दांत न सांपडणारें परब्रह्म गीताश्लोकांच्या रूपानें स्त्री शूद्रादिकांच्या प्रतिभेला आकळण्यासारखें झालें असल्यामुळें जगालाच भगवंतांनीं 'महानंद सोपा' करून ठेवला आहे, व श्रीकृष्णोक्तीला व्यासांनीं ग्रंथाचा आकार दिलेला पाहून मी तो 'आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया !'

## ११ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान

परतत्वाला स्पर्श करणारेंच काव्य उत्कृष्ट होय. एक पुरुष नवरसांना अनुसरत असतां नवविध प्रकारचा भासतो ( १८–३२९ ); पण शांतरसांत नानाविधत्व नाहीं, एकविधत्व आहे. तो एकच रस सर्वाधिक आहे म्हणून त्याचा आस्वाद घेतां आल्यास नऊही रस फिकेच वाटतात ! म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात कीं सर्व ऋतूंत शरदृतु उत्तम, त्यांतही शरच्चंद्र उत्तम, त्यांत पौर्णिमेचा चंद्र उत्तम; किंवा वसंतांत आराम, आरामांत प्रियसंगम, त्यांत आणखी सर्वोपचारसमृद्धि; अथवा पुष्पांत कमळ, कमळांत विकसित कमळ व त्यांत पराग–त्याप्रमाणें '**वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व-स्पर्श जैसा**' १८–३४७ ). व्यासांनीं श्रीकृष्णवचनाला ग्रंथाचा जो आकार केला तोच मी व्यासाचीं पदें पाहतां पाहतां 'आणिला श्रवणपथा मऱ्हाठिया ! व्यासादिकांची स्फूर्ति जेथ सांशक राहटली 'तेथ मीही एक रंक । वाचाळी करी.' पण गीतेश्वर भोळा आहे. जो व्यासादिकांच्या सुमनमाळांचा स्वीकार करितो ती माझ्याही दूर्वादळांचा अव्हेर करणार नाहीं. "क्षीरसागरतीरीं मोठाले हत्ती पाणी पिण्यास येतात तेथें मुरकुटालाही तो वारीत नाहीं ! आकाशांत गरुड उडतो, तेथें पांखफुटें पांखरूंही उडतें। राजहंसाचें चालणें फार सुंदर असतें, म्हणून दुसऱ्या कोणी चालूंच नये कीं काय ? कलशांत पुष्कळ पाणी मावतें म्हणून काय चुळींत तें घेऊं नये ? मशालीचा उजेड मोठा, तथापि वातही आपल्यापरी प्रकाश धारण करितेच. विशाळ समुद्रांत आकाशाचें मोठें प्रतिबिंब पडतें, डबक्यांत डबक्याच्या आकाराचें पडतें ! अरुण (सूर्याचा सारथि म्हणून) सूर्याला पाहतो, पण सूर्याला भूतळीची मुंगी पाहात नाहीं काय ? ज्या सागरांत मंदराकार मोठाले मासे संचरतात तेथें शफर ( लहान मासे ) ही पोंचतात:— ' यालागीं आम्हां प्राकृतां । देशिकारें बंधे गीता । म्हणणें हें अनुचिता । कारण नोहे '–आम्ही प्राकृतांनीं देशी भाषेंत गीता आणली तर हें अनुचित

आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. आणि बाप पुढें चालत असतां त्याच्या पावलाच्या अनुरोधानें मूल चालूं लागलें तर तें ठिकाणीं पोंचणार नाहीं काय ? त्याप्रमाणें व्यासांचा माग घेत व भाष्यकारांना ( शंकराचार्यांना ) वाट पुसत मी चाललों तर गीतार्थाच्या ठिकाणीं मी –अयोग्य असलों तरी–जाईन, नाहीं तर दुसरें कोठें जाईन ?

**तैसा व्यासाचा मागोवा घेत । भाष्यकारातें वाट पुसत ।**
**अयोग्यही मी न पवन । कें जाईन ? ॥ १८–१७२३ ॥**

शिवाय "तो सर्वोपकारी समर्थ । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ। राहाटत असे मजही आतां रिघोनियां ॥ म्हणोनि माझे नित्य नवे । श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे । श्रीगुरुकृपा काय नाहे। ज्ञानदेवो म्हणे"–परमसमर्थ माझे गुरु मला आंतून बोलवीत असल्यामुळें माझे सारे श्वासोच्छ्वासही काव्यप्रबंध होताहेत. गुरुकृपा काय एक करीत नाहीं ? म्हणून मी गीतार्थ मऱ्हाठींत आणून लोकांच्या दृष्टीचा विषय केला आहे. ' मऱ्हाठे बोल रंगें । कवळितां पै गीतांगें'–माझ्या मराठी बोलांच्या रंगानें कोणी गीतेचीं पदें समजून घेईल तर त्याला-तो संस्कृतज्ञ नसला तरी–एकदेशीपणा येणार नाहीं गीतेचे श्लोक सांगून कोणी माझे मराठी बोल सांगेल तर गीतेला तो अलंकार चढाविल्यासारखा होईल, बरें कोणी नुस्तीच ज्ञानेश्वरी सांगेल तरी तो नुस्ती गीता सांगणाऱ्यालाही उणेपणा आणील ! सुंदर देहावर सुंदर अलंकार घातला नाहीं तर नुस्ता अलंकारही शोभेल, बरें घातला तर यापेक्षां अधिक उचित काय आहे ? मोतीं सोन्यालाही शोभा देतात, बरें मोकळींच ठेवलीं तरी आपल्या अंगानेंच तीं शोभिवंत दिसतात. वसंतांतलीं मोगरीचीं फुलें गुंफिलीं किंवा मोकळीं ठेविलीं तरी परिमळ सुटायचा तो सुटतोच. तात्पर्य, संस्कृत गीतेसह माझी टीका सांगण्यांत आली अथवा संस्कृत न सांगतां नुस्तीच माझी टीका ( ज्ञानेश्वरी ) सांगितली तरी शोभादायकच आहे. असा उभयप्रकारें लाभ देणारा हा ओवीग्रंथ मी केला आहे. ' हा वोवीचा

प्रबंध मी **आबाळसुबोध** ' केला आहे–जाणत्यानेणत्यांनीं पहावा. त्यांत ' ब्रह्मरससुस्वाद देणारीं अक्षरें मीं गुंफिलीं' आहेत. ' प्रबंध हा श्रवणीं । लागतखेवों समाधि आणी '–हा माझ्या ग्रंथ कानांवर पडतांच श्रोत्यांना ( वाचकांनाही ) समाधि आणतो, मग त्याचें निरूपण ऐकायला बसलेल्या श्रोत्यांना काय श्रवणाचें वेड लावणार नाहीं ? हा पाठ करितांना ज्ञानाचा प्रकाश पडतो व रसास्वाद घेतांना तर अमृताची (मोक्षाचीही) आठवण राहत नाहीं. **श्रवणमननिदिध्यासाचें सारें फळ आतां ज्ञानेश्वरीच्या एका श्रवणानें मिळणार आहे.** ही ओवीबद्ध टीका वाटेल त्याला स्वानंदभोग पूर्णपणें देईल व श्रवणेंद्रियांकडून सर्वेंद्रियांना ( अध्यात्मरसाचें ) पोषण मिळेल ! चंद्रामृताच्या भोगांत चकोर चतुर असतो, पण चांदणें सर्वसामान्य जीवांनाही सुखकरच असतें, ' तैसें अध्यात्मशास्त्रीं इयें । अंतरंगाचि अधिकारिये । परी लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया'–ह्या अध्यात्मशास्त्रग्रंथाचे अधिकारी अंतर्मुख वृत्तीचे लोकच आहेत, तरी इतर सर्व लोक वाक्चातुर्यानें सुखी होतील! पण हा सारा निवृत्तिनाथांचा थोरपणा आहे, हा ग्रंथ माझा नोहे–'वैभव । कृपेचें तिचें'–गुरुकृपेचें हें वैभव आहे. (१७०७-५१) माझी योग्यता ह्मणाल तर ' वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणे स्वामीची' मग मला ग्रंथरचनेची योग्यता कोठून असणार ? पण माझ्या गुरूंनीं मला निमित्त करून ' **प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा** '–मी पुरोहितपणें उणें पुरें बोललों असेन त्याची क्षमा करावी. ' शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पा चढिजे । अळंकार ह्मणजे । काय तें नेणे. ' कळसूत्राच्या बाहुल्याप्रमाणें स्वामीनें मला बोलविलें आहे, म्हणून ग्रंथांतील गुणदोषांविषयीं मला क्षमा मागण्याचें कारण नाहीं. 'वोहळें हेंचि करावें । जें गंगेचें आंग ठाकावें '–याप्रमाणें मी तुम्हां संतांच्या सभेंत तुमचा म्हणून बोललों आहे. तुमच्या कृपेनें मी सर्वकामीं परिपूर्ण झालों व माझें ग्रंथाचें आळियाडें ( हट्ट ) पुरा झाला. 'वर्षला शांतरसें तो हा ग्रंथ ' ( १७६२–१७७६ )

तो मी येक मुका । बोलोनि मऱ्हाठिया भाखा ।
करीं डोळेवरी लोकां । घेवों ये ऐसें ॥ १७८० ॥
काय बहु बोलों सकळां । मेळाविलों जन्मफळा ।
ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ॥ १७८५ ॥
मजलागीं ग्रंथाची स्वामी । इजी सृष्टि जे हे केली तुह्मीं ।
तें पाहोनि हांसों आह्मी । विश्वामित्रातेंही ॥ १७८७ ॥
किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्तन हें सिद्धी नेलें ।
येथ माझें जी उरलें । पाईकपण ॥ १७९३ ॥ (अ० १८)

ज्ञानेश्वरी अत्यंत लोकप्रिय आहे. अमृतानुभव अध्यात्म–ग्रंथांचें शिरोरत्न आहे. हरिपाठाचे अभंग ही वारकऱ्यांची संध्या आहे. स्वानुभवी लोकांसाठीं 'अमृतानुभव,' मुमुक्षुसाधकांसाठीं 'ज्ञानेश्वरी,' व सर्वांच्या नित्यपाठासाठीं 'हरिपाठ' व 'अभंग' अशी ज्ञानेश्वर माउलीनें सर्वांची सोय केली आहे. ज्ञानभक्ति किंवा अद्वैतभक्ति कृष्णोपासनेच्या योगें अंगीं अनुभवणें व तत्सिद्ध्यर्थ सत्संगीं नामसंकीर्तन करणें हा भक्तिमार्ग परमकारुणिक ज्ञानेश्वर माउलीनें जगास दाखविला आहे. माउलीच्या ग्रंथरचनेचा जीवांना ब्रह्मानंद देणें हाच हेतु होता.

## १२ जुन्या काव्यांच्या प्रती.

महानुभावांनीं १३ व्या शतकांत मराठीभाषेचा जो पुरस्कार केला व शिशुपालवध–वत्सहरणादि सुंदर काव्यें व इतर गद्यपद्यात्मक वाङ्मय निफजविण्याचा जो उद्योग केला त्याबद्दल त्यांचे सर्व महाराष्ट्रीयांनीं आभारच मानले पाहिजेत. त्यावेळचे ग्रंथ त्यावेळच्याच भाषेंत लिहिलेले आज उपलब्ध नाहींत. आदिकवि मुकुंदराज, महानुभावकवि किंवा ज्ञानेश्वरनामदेवादि संत यांचे ग्रंथ जसे लिहिले गेले तसेच्यातसे आज मिळणें जवळजवळ दुरापास्त आहे. ग्रंथांच्या नकला व त्या नकलांच्या पुन्हा नकला असे होत होत प्रत्येक नकलकाराच्या व्युत्पन्नतेप्रमाणें किंवा अडाणीपणाप्रमाणें शुद्धलेखन, प्रत्यय, कानामात्रा, ऱ्हस्वदीर्घ

इत्यादिकांत कालमानाप्रमाणें फरक होत होत पंधरासोळाव्या शतकांतल्या लेखनाच्या प्रति आपणांपर्यंत आल्या आहेत. त्यांतल्यात्यांत पुन्हां जे ग्रंथ किंवा जीं पद्यें लोकांच्या पाठांत अधिक येत गेलीं त्यांचें अर्वाचीकरण फार झालें आहे. याचकारणानें १३ व्या शतकांतले नामदेव व सोळाव्या शतकांतले तुकोबा यांचे अभंग जवळजवळ सारखेच वाटतात. अभंग, पदें, श्लोक हे अधिक लोकांच्या तोंडांत अधिक वेळ खेळत राहिल्यानें त्यांचें अर्वाचीकरण अधिक झपाट्यानें होत असतें व याच कारणानें ज्ञानेश्वरांचे हरिपाठांचे अभंग त्यांच्या ज्ञानेश्वरीपेक्षां अधिक अर्वाचीन दिसतात. महानुभावांचे ग्रंथ प्रथम प्राचीन अशा बालबोधी देवनगरी लिपींतच लिहिले जात असले पाहिजेत. अनेक कारणांमुळें महानुभावांनीं जेव्हां आपलें धर्मज्ञान लोकांपासून गुप्त ठेवण्याचें ठरविलें तेव्हां त्यांनीं ‘ संकेत लिपी ’ शोधून काढल्या. शके १२७५ नंतर या संकेतलिपी अस्तित्वांत आल्या. रवळो व्यास यानें प्रथम शके १२७५ मध्यें ‘ सकळ ’ लिपी कल्पिली व या लिपींतच त्यानें आपले ग्रंथ लिहिले. शके १२८५ मध्यें ‘ सुंदरी लिपी ’ व १२९०च्या सुमारास ‘पारमांडल्य’ लिपी या जन्मास आल्या. महानुभावपंथांतही चक्रधरानंतर अनेक पक्षभेद झाले, आम्नाय वगैरे निघाले, तेव्हां सर्वसामान्य लोकांशीं सुरू केलेला चोरटेपणा त्यांच्यात्यांच्यांतही वाढत गेला, व २०।२५ भिन्नभिन्न लिपी जन्माला आल्या ! भावे यांनीं ४।५ लिपींचे नमुने दिले आहेत. प्रत्येक ‘लिपी’ ला एक ‘ किल्ली ’ असते व ती हातांत आल्याशिवाय ती लिपी व त्या लिपींत लिहिलेले ग्रंथ वाचतां येत नाहींत. राजवाडे, भावे, चांदोरकर यशवंतराव देशपांडे वगैरेनीं मनावर घेऊन या ‘ किल्ल्या ’ हस्तगत करून घेतल्यामुळें महानुभावांचे ग्रंथ सर्वांच्या वाचनांत येण्याची सोय झाली आहे. जुन्यांत जुनी ‘ सकळ ’ लिपींतली पोथी भास्कराच्या एकादशस्कंधाची उपलब्ध झाली आहे व ती शके १४९८ मधील आहे, म्हणजे याच्यापूर्वी नकललेली महानुभावपंथांतली पोथी अजून सांपडली नाहीं. ‘लीलाचरित्र’ ग्रंथाच्या ज्या पोथीवरून भावे यांनीं उतारे घेतले आहेत त्या

पोथीचा नकलकाळ शके १५४४ हा आहे. ऋद्धिपूरवर्णनाची जी प्रत रा. यशवंतराव देशपांडे यांनीं छापली आहे ती २५० वर्षांपूर्वीं म्ह० १६०० च्या सुमारास लिहिलेली असावी असें त्यांनींच म्हटलें आहे. नामदेवकृत भारताचीं कांहीं पर्वें सांपडतात तीं शके १५०० ते १५३० च्या काळांतील ह्म० एकनाथकालीन आहेत. हा नामदेव १३ शतकांतील नामदेवरायाहून अर्थात् भिन्न आहे. दासोपंतांची कविता त्यांच्या हातची लिहिलेली जोगाईच्या आंब्यास आहे; पण दासोपंतांची हयात शक १४७३ ते १५३७ ही असल्यामुळें त्यांच्या कवितेचें लेखन यापूर्वींच्या काळांतील असणें शक्य नाहीं. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं दासोपंत-एकनाथांच्या काळीं वैष्णवधर्माची मोठी लाट उसळून मराठी काव्यसमुद्रास भरती आली आणि त्याच सुमारास म्ह० १५ व्या किंवा १६ व्या शतकांत महानुभावपंथीही जागे होऊन आपलें मागील वाङ्मय पाहूं लागले व जुन्या काव्यांच्या प्रती शोधून त्यांच्या नकला करूं लागले. असा तो धर्माच्या व वाङ्मयाच्या पुनर्जागृतीचा काळ होता. शिशुपालवधादि महानुभावी ग्रंथ १३ व्या शतकांत **रचले** गेले असले तरी त्यांच्या या जीर्णोद्धारकाळांतील **नकललेल्या प्रतिच** आपणांपुढें आज आहेत. याच काळांत एकनाथांनीं ज्ञानेश्वरीच्या जुन्या प्रतींचें संशोधन करून आपली ज्ञानेश्वरी प्रत शके १५०६ मध्यें तयार केली व तिच्याच नकला छापलेल्या व न छापलेल्या आज सर्व लोकांच्या वाचनांत व पाठांत आहेत. राजवाडे यांनीं शके १८३० मध्यें बीड येथील पाटांगणदेवस्थानांत त्यांना मिळालेली ज्ञानेश्वरीची प्रत छापली, तीही याच सुमारास म्ह० १५ व्या किंवा १६ व्या शतकांत नकललेलीच असली पाहिजे! त्या प्रतीच्या शेवटीं 'श्रीसद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा। विद्याधराय शिष्याय स्वीये स्वत्वं न शोभते'—असा एक श्लोक आहे. ह्या श्लोकाच्या आधारावर "ही प्रत सुप्रसिद्ध कवि मुकुंदराजाची आहे व ही शक १२१२ पासून शक १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे...ह्या पोथींतील भाषा जी ज्ञानेश्वर

बोलला, जी ज्ञानेश्वरानें नेवाशांतील शिलेवर लिहिली, जी शक १२१२त नागर मराठे बोलत, तीच साक्षात् आहे. तात्पर्य ही पोथी थेट ज्ञानेश्वराच्या वेळची आहे" अशी राजवाडे यांनीं एक कल्पनेची टोलेजंग इमारत उभारली आहे! 'दुसरा कोणी मुकुंद शक १२१२ पासून १२४० पर्यंत हयात नव्हता' असें राजवाडे म्हणतात! पण मुकुंदराजाची हयात १११० च्या आंतबाहेरची आतां ठरली आहे!

राजवाड्यांच्या प्रतीवर लेखनकाल नाहीं. कोणीतरी मुकुंद व कोणीतरी विद्याधर! नाथांच्या काळीं जुनीं काव्यें शोधून काढून त्यांच्या आपल्या पाठार्थ नकला करण्याची किंवा नवीन काव्यें रचण्याची जी जंगी चळवळ झाली त्या चळवळीच्या काळांतच त्यांची प्रत कोणातरी मुकुंदानें नकललेली दिसते। ती नाथकालीं किंवा फार तर नाथांच्या पूर्वी ५।२५ वर्षें नकललेली असावी. ऱ्हस्व, दीर्घ, कानामात्रा, शब्द, प्रत्यय, इत्यादिकांत कालमानानें थोडथोडा फरक पडत गेला तरी ग्रंथकाराचा आशय कांहीं जात नाहीं. शिशुपालवध किंवा वत्सहरण हीं काव्यें किंवा ज्ञानेश्वरी व नामदेवादिकांचे अभंग आपल्यापुढें आज ज्या स्वरूपांत आहेत, त्या स्वरूपांतही आपल्याला त्यांच्या पद्यांतला भाव समजतो, व ग्रंथकाराचा आशय बरोबर ध्यानांत आल्याशिवाय राहत नाहीं. राजवाड्यांच्या एका विधानाचा येथें थोडा विचार केला पाहिजे. प्रसिद्ध व लोकांत प्रचलित असलेल्या ज्ञानेश्वरीच्या सर्व प्रतींवर व त्या छापणाऱ्या प्रकाशकांवर ताशेरा उडवून ते म्हणतात कीं "आजपर्यंत जेवढ्या म्हणून ज्ञानेश्वरीच्या प्रती छापिल्या गेल्या आहेत त्या सर्व अशुद्ध व अविश्वसनीय आहेत, तथापि त्या लोकांत प्रचलित आहेत. सध्या भक्तिमार्गी लोक इतके गचाळ झाले आहेत कीं व्याकरण, व्युत्पत्ति, इतिहास, शास्त्र यांची त्यांना बिलकूल पर्वा राहिलेली नाहीं... ज्ञानेश्वरीच्या नांवावर चिताड व गचाळ बाडें भक्तिमार्गी लोकांत खोट्या वेदांताचा व भोळेपणाचा प्रसार करितात" इ. इ० गरीब बिचारे वारकरी व भक्तिमार्गी लोक! 'व्याकरण, व्युत्पत्ति, इतिहास, शास्त्र' एवढीं अवजड ओझीं डोक्यावर घेण्याचें सामर्थ्य सर्व सामान्य लोकांत कोठचें असणार?

व तें नसलें म्हणून परमार्थदृष्ट्या त्यांची हानी ती काय होणार ? हीं ओझीं डोक्यावर घ्यायला समर्थ असे सुशिक्षितांतही राजवाड्यांसारखे एक राजवाडेच झाले आहेत ! राजवाडे यांची सूक्ष्म बुद्धिमत्ता, शोधकपणा, श्रमसातत्य, नानाशास्त्रांवर फिरणारी त्यांची विशाल व व्यापक दृष्टि हे गुण खरोखरीच असामान्य होत. राजवाड्यांच्या तोडीचे तर काय पण त्यांचें शिष्यत्व पत्करायलाही लायक असे सुशिक्षितांत तरी त्यांना चार दोन अनुयायी मिळाले आहेत काय ? बिचाऱ्या भोळ्या भक्तिमार्गी लोकांचें त्यांना व त्यांच्या मताच्या विद्वानांना असें नम्र उत्तर आहे:-" हीं व्याकरणव्युत्पत्त्यादिकांचीं अगडबंब ओझीं तुम्ही विद्वान् लोकच संभाळायला समर्थ आहांत ! शब्दशास्त्र, भाषाशास्त्र, व्युपत्तिशास्त्र इ. शास्त्रांचीं आम्हांला नांवेंही माहीत नाहींत. आम्हांला ज्ञानोबाराय, नामदेवराय, व इतर संत सांगतात तें या शास्त्रांशिवायही समजतें. त्यांचा बरोबर आशय आम्हांला ठाऊक आहे- देवाला भक्तिभावानें भजावें; संसार त्याचा ह्मणून त्याचें सेवादास्य करावें; होईल तेव्हढा परोपकार करावा; अहिंसा, सत्य, दया, क्षमा इ० सद्गुण यथाशक्ति अंगांत आणण्याची तळमळ व धडपड करावी व भगवंताचा मार्ग चोखाळावा यापेक्षां खेड्यापाड्यांतले आम्ही गरीब लोक दुसरें काय करणार ? देवाला निष्कपट प्रेमभावानें भजावें, व सदाचारानें रहावें हेंच सारे संत सांगत आहेत. तुम्ही शहरांतले विद्वान् लोक अनेक शास्त्रें पढतां ! तुम्हांला बुद्धि आहे, सवड आहे, साधनें आहेत. तुम्हांला तर्कशक्ति, चिकित्साबुद्धि, शोधकबुद्धि आहे. तुम्ही धन्य आहां ! आम्हांला एक विमळ प्रेमभाव पुरे आहे. शास्त्रीय शोधानें तीक्ष्ण झालेली बुद्धि व तिच्या साह्यानें प्राप्त झालेलें विविध प्रकारचें शब्दज्ञान शुद्ध भक्तिभावाला पोषक आहे किंवा कसें याचा आम्ही विचार करीत नाहीं, आम्हांला देवाच्या प्रेमसुखापुढें व नामसंकीर्तनसुखापुढें बाकी कांहीं आवडत नाहीं. वेदांत खरा कोणता व खोटा कोणता हें तुम्हीच पहा. आम्हांला ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम हे

आमचे परमगुरु जो वेदांत सांगतात तो परंपरेच्या अध्ययनानें तयार झालेले आमचे पुढारी आम्हांला नेहमी ऐकवतात. आम्ही संतांचे ग्रंथ नेमानें घरीं पहात असतों. पंढरपूर, आळंदी, पैठण, त्र्यंबक, देहु, येथील वाऱ्यांत आम्हांला श्रवणसुख चांगलें मिळतें. वाटेल तीं चिताड व गचाळ वाडें आम्ही घेतों हें शोध केल्याशिवाय तुम्ही बोलत आहां. परंपरा सोडून आम्ही सैरां धांवत नाहीं. तसें असतें तर एकनाथांनीं संशोधलेली ज्ञानेश्वरी सोडून आम्ही तुमच्या बीडच्या पटांगणांतल्याच प्रतीला नसतें कां कवटाळलें ? पण तसें आह्मी करीत नाहीं ना ! शक्य तितक्या चौकसबुद्धीनें आह्मी परंपरामार्गानें चालणाऱ्यांचेच ग्रंथ घेतों व त्यालाच मानतों.' असो. हें थोडें विषयांतर झाल्यासारखें वाटेल पण सांगायचा मुद्दा एवढाच आहे कीं परंपरित पोथ्यांशिवाय वारकरीच काय पण कोणीही पंथवाले जात नाहींत. चूकभूल नेणतेपणानें कोठेंही होतच असतें. महानुभावांच्या किंवा तदितर भागवतधर्मीयांच्या वाङ्मयाची १५ व्या १६ व्या शतकांत जी छाननी झाली, ज्या नकला झाल्या, जी नवीन काव्यरचना झाली, तिच्या भाषेंत एक प्रकारचें साम्य आहे. ग्रंथतात्पर्य किंवा आशय या दृष्टीनें पाहिलें तर कांहीं फरक होत नाहीं. भाषेंत फरक होतो, व्याकरणदृष्ट्या फरक पडत जातो, शब्दांचीं रूपें, प्रत्यय, वगैरेंत फरक होत जाणें अपरिहार्य आहे. इंग्रजी वाङ्मयाकडे पाहिलें तरी चॉसरची भाषा, शेक्सपीअरची भाषा व आजकालची भाषा यांत पुष्कळ फरक पडलेला आहे. चॉसरच्या मूळभाषेंतले ग्रंथ वाचणारे भाषापंडित फार थोडे असतात, आजच्या लोकांसाठीं त्याचे ग्रंथही कांहीं अर्वाचीकरण करूनच छापलेले असतात. त्या त्या वेळचा भाषेचा एकंदर डौल कायम ठेवून पण प्रत्ययादिकांस अर्वाचीन रूप देऊन ग्रंथ छापतात व वाचतात. विवेकसिंधु ( शके १११० ), शिशुपालवध ( श. ११९५ ), वत्सहरण ( श. १२०० ), महदंबेचे धवळे ( श. १२०४ चा सुमार ), ज्ञानेश्वरी ( श. १२१२ ), अमृतानुभव ( शक १२१३चा सुमार ) नामदेवादिकांचे अभंग ( शके १२१०–१२४० ), इत्यादि प्राचीन ग्रंथांत भाषारचना,

शब्दसमूह, कल्पनावैशिष्य, उपासनाप्रेम, उपमादृष्टांतांचें वैपुल्य याविषयीं साधारण पुष्कळच एकपणा आहे. हे ग्रंथ एकाकाळीं रचले गेले व सुमारें २५०–३०० वर्षांनंतर एकाचकाळीं नकलले गेले, यामुळें यांच्या व यांच्या वेळच्या इतर ग्रंथांच्या अध्ययनानंतर एक चांगला शब्दकोश तयार करितां येण्यासारखा आहे. या कोशाच्या साह्यानें या वेळच्या वाङ्मयाचें अध्ययन करणें सोयीचें होईल. ह्या वेळच्या ग्रंथांना मूळ आधार गीताभागवतादि संस्कृत ग्रंथांचा असल्यामुळें संस्कृतमराठी ग्रंथांच्या तौलनिक अध्ययनानें मराठी ग्रंथकारांचें विशिष्टत्व कोठें व कशांत आहे हेंही समजून येईल. महानुभावी ग्रंथांत कांहीं शब्द अधिक आहेत ते वारकरी पंथाच्या वाङ्मयांत सांपडत नाहींत व कांहीं शब्द ज्ञानेश्वरींत अधिक आहेत; तथापि शेंकडा ८० शब्द व शब्दप्रयोग दोहींकडे साधारण आहेत ! उदाहरणार्थ:–रेखा (कवित्वरचना), त्रिमाळिकें धवळारें ( तीनमजली चुनेगची वाडे ), पसायदान, बावना ( चंदन ), अळुमाळ, लाठा, माजिठें ( तांबडें वस्त्र ), मांदोडा ( मंडप ), उळिग, असलग, दुसरे ( दोनपदरी ), जोइसी ( जाशी, ज्योतिषी ), बोनें, बुंथी, बाप ( मोठा ), पहुरण, परिये, राउत, राउळ, पारिकेआ ( परका ), दळवै, पांखरुवें–वांसुरुवें, आंतौरी, मांदी, हाथियेर, ( पाहुने(णे)र, गदारोळ, बुझावनी, वडप, पडप, हडप, आंगवण, लोथ था ( मोठा ), मांदुस, बांदोडी, नागर–नागरी बोली, पाइक–पाइकी, भणे–भणौनि, उपनली, महुर ( मधुर ), पायाचा मोगरु ( पायदळांचे नायक ), चोखाळ, निकें, निऱ्हा, निसा(शा)ण), ठाणांतर, जोहार ( नमस्कार ), सांतां ( असतां )–पातां ( पाहतां ), उजु, विरु ( विरुद्ध ), पढियासें, नाभीकारु दिहा ( दिवसां ), रळी, एकावळी, पवाडा, बीक, ढसाळ, साजनी( णी ), आंसुवे, जुझारु, बडिवारु, धायपण ( दाईपण ), लाघवी, इत्यादि शब्द जे सहज आठवले तेवढेच येथें दिले आहेत. असे हजारो शब्द महानुभावी ग्रंथांत आहेत व इतके सारे ज्ञानेश्वरींतही आहेत. ताककाढा, खेडकुळी, निह्माळा, मातावळी, लावक-कळिलावा, थाप,

फुन, हिंदोळा, नायकवडी, गुढरू इत्यादि महानुभावी ग्रंथांत येणारे शब्द मला इकडे आढळले नाहींत. उलटपक्षी ज्ञानेश्वरींत येणारे कित्येक शब्द महानुभावी ग्रंथांत आढळत नाहींत महानुभावी ग्रंथांत श्रीकृष्णाच्या रूपाचें, अंगप्रत्यंगांचें, नगरीचें, लग्नसोहळ्याचें, भोजनाचें, वस्त्रपात्रादिकांचें, युद्धप्रसंगांचें, अश्वांचें, वर्णन अधिक सविस्तर आल्यामुळें त्या त्या विषयांवरील शब्दादिकांचा भरणा त्यांत अधिक सांपडतो. त्यांच्या 'दिनचर्या' वर्णनांत रोजच्या साध्या राहणीचें सुंदर शब्दचित्र रंगविलेलें आहे. उलटपक्षीं ज्ञानेश्वरींत भक्तिज्ञानवैराग्यांचें उत्कृष्ट उद्बोधन झालेलें असल्यामुळें उंच वातावरणांतला शब्दसंग्रह संपूर्ण मिळतो व दृष्टांतांत संसारसुखाच्या व लोकव्यवहाराच्या भाषाचित्रांचेंही नमुने सांपडतात. दोघांचेंही वाङ्मय पाहिल्यावर त्यावेळच्या मराठी भाषेच्या संपन्नतेची चांगली अटकळ येते. महानुभावपंथाचा प्रसार तेव्हांही मर्यादितच होता. वऱ्हाड, खानदेश, थोडा नागपूरप्रांत व थोडा नगरप्रांत यांच्या बाहेर हा पंथ फारसा गेला नाहीं. हा पंथ पुढें सोळाव्या शतकापासून पंजाबकडे पसरला. कृष्णमुनीनें हा पंथ तिकडे नेला. लाहोर, अमृतसर, काबूल येथें या पंथानें कृष्णमंदिरें बांधलीं असून तिकडे महानुभावांना कट्टे सनातनधर्मीय समजतात! या पंथानें आपली मराठीभाषा काबूलकंदाहारपर्यंत नेली आहे. यांच्या ' तीर्थमालिका ' ग्रंथांत ( १४ वें शतक ) २५० गांवांत मिळून यांचीं ६५० तीर्थस्थानें असल्याचें वर्णन आहे. सामान्यतः बोलायचें म्हणजे मोगलाई, वऱ्हाड, खानदेश या प्रांतांत हा महानुभावपंथ पसरला, त्यामुळें कित्येक वऱ्हाडी व खानदेशी शब्दप्रयोग त्यांच्या काव्यांत अधिक असल्यास नवल नाहीं. आजही वऱ्हाडची मराठी व तदितर महाराष्ट्राची मराठी यांत थोडासा तरी फरक आहे. हें लक्ष्यांत आणतां ज्ञानेश्वरांच्या वेळीं मोठ्या महाराष्ट्रांतील ग्रंथ व महानुभावीयांचें ग्रंथ यांत शेकडा ८० शब्द समान आहेत, भाषासरणी एक आहे, यावरून नागपूरपासून पंढरपुरापर्यंत अखिल महाराष्ट्रांत एक अभिजात मराठी भाषा लोकांच्या बोलण्यांत होती हें उघड आहे. प्रांतीय फरक केव्हांही राह-

णारच. त्यावेळची मराठी भाषा सुसंपन्न, नागर, संमृद्ध व पावन होती हें त्यावेळचे संतकवींचे ग्रंथ पाहतां कोणाच्याही ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. मराठीभाषा ही शांतिरसप्रधान आहे तरी ती शृंगारवीरादि नवरसांनाही अंगाखांद्यावर खेळविण्याइतकी संपन्न व रसिक आहे. भक्तिरस हें तिचें हृदय आहे तर शृंगार व वीर हे तिचे डावेउजवे हात आहेत. भास्कर, ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर हे मराठीभाषेचे विश्वकर्मे आहेत. मनांतले विचार व हृदय उचंबळून सोडणाऱ्या भावना सहज लीलेनें व अनुरूप शब्दांनीं व्यक्त करणारे कवि व ग्रंथकार हे भाषेचे खरे मूर्तिकार होत. साहित्य, छंद, व्याकरण, कोश इ० शास्त्रांनीं 'वाचमर्थोऽनुधावति' या न्यायानें त्यांच्यामागें धांवावे व कृतार्थ व्हावे. हे शास्त्रांचे निर्मिते आहेत, शास्त्रांचे गुलाम नाहींत. यांच्या ज्ञानविचारांचे व अंतरंग भावनांचे प्रचंड प्रवाह शब्दांचे तट फोडून बाहेर पडतात. ते शब्दांची वाट पाहत नाहींत, शब्द सहज घडले जातात. ह्या संतांच्या व कवींच्या पुण्याशीर्वादानें पावन झालेली मराठीभाषा गर्भश्रीमंत आहे. तिची श्रीमंती बाहेरून आणलेली नाहीं, अंगभूत आहे. तिला कल्पनांचे, शब्दांचे, अलंकारादिकांचें दारिद्र्य पहिल्यापासून ठाऊक नाहीं. तिच्या आईसारखी श्रीमंतीण साऱ्या जगांत दुसरी नाहीं. गीर्वाणवाणीला अनेक लेकरें आहेत, तरी मराठी बोली हें तिचें अत्यंत लाडकें लेकरूं आहे. तिचें तिच्यावर जिव्हाळ्याचें प्रेम आहे. तिनें आपली श्रीमंती या लाडक्या लेकीला दिली आहे. लेकीला बिलकुल उणेपणा येऊं नये याविषयीं ती निरंतर जपत असते. आई श्रीमंतीण आणि कन्या प्रबुद्ध व रसवती—मग तेथें कोणतें उणें राहील ?

# १० आदिकवि मुकुंदराज.

( इ. स. ११२८-११९८ )

मुकुंदराज ज्ञानेश्वर-। प्रमुख देशभाषाकार ।
सिद्धांतवक्ते ज्ञानभास्कर । स्मरोनि सादर वंदिले ॥ १ ॥

—कृष्णदयार्णव.

## १ कालगणना.

मराठी वाङ्मयसागरांतील पहिलें दिव्य रत्न म्हणजे आद्यकवि मुकुंदराज हे होत अशी पहिल्यापासून आजवर महाराष्ट्रांत प्रसिद्धि आहे. ज्ञानेश्वरीग्रंथाची रचना झाल्यावर निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांस म्हणाले कीं 'तूं भाष्यानुसार गीतेवर टीका लिहिलीस, पण धन्य मुकुंदराज कीं ज्यांनीं विवेकसिंधूसारखा ग्रंथ स्वमतीनें लिहिला;' यावर 'आपली आज्ञा असेल तर मीही असा स्वतंत्र ग्रंथ लिहीन' असें म्हणून ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव ग्रंथ लिहिला अशी एक आख्यायिका प्रचलित आहे व या आख्यायिकेवरूनही ज्ञानेश्वरमंडळापूर्वीच मुकुंदराज होऊन गेले असें अनुमान लोक काढीत आले आहेत. विवेकसिंधूंत व परमामृतांत यावनी भाषेचा अगर अमलाचा अस्पष्टही संबंध कोठेंही दिसत नाहीं, यावरून यावनी सत्तेची आहाळ महाराष्ट्राला लागण्यापूर्वीच मुकुंदराज होऊन गेले असेंही अनुमान करितां येण्यासारखें आहे. जोगाईच्या आंब्याचा राजा जयंतपाळ याच्यासाठीं विवेकसिंधु ग्रंथ कवीनें लिहिला अशी प्रसिद्धि आहे, पण या जयंतपाळाचा इतिहासांत कांहीं मागमूसही अजून सांपडला नाहीं. विवेकसिंधूच्या पूर्वार्धांत शेवटीं ओव्या आहेत:—

नृसिंहाचा बल्लाळ । तयाचा कुमर जयंतपाळ ।
तेणें करविला गदारोळ । ग्रंथरचनेचा ॥ ५५ ॥

**भगीरथाचेनि दैवयोगें । विश्व सुस्नात गंगे ।**
**तैसें जयंतपाळाचेनि प्रसंगें । जग सुखिया होय ॥ ५६ ॥**

नृसिंह-बल्लाळ-जयंतपाळ ही कोठल्या राजघराण्याची वंशावळ आहे याचा आजवर पत्ता लागलेला नाहीं सर्व देशांचे व प्रांतांचे इतिहास उपलब्ध नसल्यामुळें जयंतपाळ नांवाचा राजा कोठें व केव्हां होऊन गेला हें अजमावतां येण्यास मार्ग नाहीं. जयंतपाळाच्या कोणत्या 'प्रसंगामुळें' विवेकसिंधु निर्माण झाला या संबंधाची मात्र एक आख्यायिका आहे. जयंतपाळाला परमार्थाची अत्यंत आवड होती. त्याच्या राज्यांत जे कोणी शास्त्री, पंडित, पुराणिक किंवा साधुसंत येत त्यांना तो एकच प्रश्न करी: 'तुम्ही परब्रह्माच्या गोष्टी सांगतां पण ब्रह्म अनुभवलें आहे काय? मला साक्षात्कार करून देतां काय?' यावर शब्दपंडित काय उत्तर देणार? उत्तर मिळालें नाहीं कीं यानें त्यांना बंदिवासांत पाठवावें! असे ५००।६०० सज्जन कारागृहवासांत अडकून पडले होते! राजाचा हेतु वाईट नव्हता. इतक्या लोकांत कोणी साक्षात्कारी पुरुष भेटतो कीं काय हें त्याला पहायचें होतें. हा विरोधभक्तीचाच एक प्रकार होय. 'चंदनं न वने वने' या न्यायानें साक्षात्कारी पुरुष केव्हांही विरळच असणार. मुकुंदराजाच्या कानीं साधूंच्या कारागृहवासाची गोष्ट गेली. ते स्वतः साक्षात्कारी होते. बंदिस्त साधूंना सोडवावें अशी त्यांना इच्छा झाली व त्यांतच जयंतपाळाचें भाग्य उगवलें. मुकुंदराजांनाही त्यानें वरीलसारखाच प्रश्न केला. त्यांनीं रामकृष्णपरमहंसांनीं विवेकानंदांना उत्तर केलें त्याच जातीचें उत्तर दिलें; 'तुला साक्षात्कार पाहिजे असेल तर हवा तेव्हां व हवा तेथें होईल.' प्रचीतीसाठीं त्यानें राजाकडून अश्वशाळेंतून एक उमदा घोडा आणविला व घोड्यावर बसण्याकरितां राजानें रिकीबींत पाय ठेवला तोंच मुकुंदराजांनीं राजाच्या मस्तकावर हात ठेवला आणि राजाची समाधि लागली. राजा घोड्यावरच तीन अहोरात्र समाधिस्थितींत होता! समा-

धींतून व्युत्थानांत आल्यावर अष्ट सात्विकभाव देहावर उत्पन्न होऊन त्यानें आनंदाश्रूंनीं मुकुंदराजांचे चरण न्हाणिले व तो त्यांना शरण गेला. गुर्वाज्ञेवरून राजानें बंदिवासांतून सर्व साधूंची मुक्तता केली व वस्त्रेंभूषणें देऊन त्यांना सत्कारानें आपापल्या गांवीं पाठवून दिलें. ह्या जयंतपाळाला पूर्णबोध देण्यासाठीं मुकुंदराजांनीं विवेकसिंधु ग्रंथ रचिला. 'जयंतपाळानें ग्रंथरचनेचा हा गदारोळ करविला' व 'जयंतपाळाचेनि प्रसंगें जग सुखी झालें' असें वरील ओव्यांत स्वतः मुकुंदराजांनीं म्हटलें आहे, त्याचा अर्थ वरील आख्यायिकेनें स्पष्ट होतो असें वाटतें. जयंतपाळ, जैत्रपाळ, जैतपाळ, अशी या राजाचीं नांवें आढळतात. कृष्णदयार्णवांनीं मुकुंदराजावर जी आरती केली आहे तींतही 'जैतपाल भूपतीनें केला दर्शना कोंड। अपरोक्ष बोध वाहे त्यांसी घातलें कोड।' असा उल्लेख असून या 'वेदांतज्ञानमार्तंडानें' भूप चिन्मात्र केला' असें म्हटलें आहे. दुसऱ्या ऐतिहासिक प्रमाणाच्या अभावीं वरील आख्यायिका सत्य मानण्यास हरकत नाहीं असें वाटतें. विवेकसिंधूच्या कांहीं हस्तलिखितपोथ्यांतून पुढील दोन ओव्या आढळतातः—

**शके अकरा दाहोत्तरू। साधारण संवत्सरू।**
**राजा शारंगधरू। राज्य करी॥**
**ऐसा समयो सर्वोत्तमू। तेथ मुकुंद द्विजोत्तमू।**
**विवेकसिंधू मनोरमू। निर्मिता जाला॥**

हा शारंगधर राजा कोण, कोठचा व त्याचा मुकुंदराजांशीं संबंध काय हें ठाऊक नाहीं. जयंतपाळाचा उल्लेख प्रत्यक्ष ग्रंथांतच आहे. वरील ओव्यांत दिल्याप्रमाणें पाहतां शके १११० ला साधारण संवत्सर येत नाहीं, कीलक येतो. साधारण संवत्सर शके १११२ ला येतो, तथापि शके १११२ च्या सुमारास म्हणजे ज्ञानेश्वरीपूर्वी बरोबर १०० वर्ष विवेकसिंधु ग्रंथ रचला गेला असें मानण्यास व मुकुंदराजाकडे मराठीं-तील आदिकवि हा मान चालूं ठेवण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा असें

वाटतें. वरील ११११० हा शक खरा मानल्यास त्यावेळीं मुकुंदराजाचें वय साठीच्या घरांत असावें.

**मज श्वासनिमेषाचा श्रम । तेथ कायसा या ग्रंथाचा उद्यम ॥**
**परी फळला मनोधर्म । सदैवांचा ॥ ५४ ॥** ( प्रक० ७ )

श्वासनिमेषाचे कष्ट होत असतांना या ग्रंथाचा उद्योग माझे हातून न व्हावा पण सद्भाविकांच्या दैवानें तो झाला आहे, असा या ओवीचा भावार्थ आहे. यावरून ग्रंथरचनाकालीं कवि चांगले ६० च्या आंत-बाहेर असावेत. हें खरें धरल्यास मुकुंदराजांचा जन्म शके १०५० च्या सुमारास झाला असावा व त्यांचें आयुर्मान शके १०५०–११२० पर्यंत धरण्यास हरकत नसावी. यावरून मुकुंदराज भास्कराचार्यांचे ( जन्म शक १०३६ ) साधारण समकालीन दिसतात.

## गुरुपरंपरा

२ मुकुंदराजानें आपल्या **गुरुपरंपरेची माहिती** विवेकसिंधूचे शेवटीं दिली आहे:

**आदिगुरू श्रीआदिनाथ । तेथूनि श्रीहरिनाथ ।**
**तयाचा शिष्य श्रीरघुनाथ । जो गुणसिंधु ॥ ३४ ॥**

आदिनाथ-हरिनाथ–रघुनाथ व रघुनाथाचा शिष्य मुकुंदराज. * ‘ गुरु-परंपरेचें परिज्ञान ’ शिष्याला अवश्य पाहिजे. हरिनाथांचें चरित्र कवीनें जरा सविस्तर दिलें असून त्यानें त्यांना पाहिलें होतें हें स्पष्ट आहे.

**वैनगंगेच्या तीरीं । मनोहर अंबानगरी ।**
**तेथ प्रगटले श्रीहरी । जगदीश्वर ॥ ३८ ॥**

* मुकुंदराजांचा महाभाष्य म्हणून एक संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहे त्यांतही त्यांनीं हीच आपली गुरुपरंपरा दिली आहे. तींत हरिनाथ ‘ श्रीसकलयोगीश्वराचार्य ’ होते असें म्हटलें आहे, व स्वताचा उल्लेख ‘ श्रीमुक्तिनाथ मुकुंदमुनि ’ असा केला आहे, व त्यामागें ‘ निरस्ताखिलसंसारविकार ’ असें विशेषण लावलें आहे. हरिनाथ माध्यंदिन होते व मुकुंदमुनीनें नित्यपाठासाठीं हा ग्रंथ केला अशी त्यांत माहिती आहे.

**माध्यंदिन शाखे । अवतार केला परमपुरुखें ।**
**चांफे गोरटेनि वेखें ( वेषें ) । अतिमनोहर ॥ ३९ ॥**
**वेदशास्त्रांचा अभ्यास । जयासी करितां नलगे आयास ।**
**जो चतुर्विध वाचेचा ईश । तेथें विस्मय कैंचा ? ॥ ४३ ॥**

हरिनाथांची जन्मभूमि वैनगंगेच्या तीरीं मनोहर अंबानगरी होय. अंबानगरी म्हणजे जोगाईचें आंबें अशी लोकांची समजूत होती पण ती चुकीची आहे. मध्यप्रांतांत भंडाऱ्याजवळ वैनगंगा नदी असून तिच्या काठीं ' अंभोर '–नामक एक तीर्थ आहे तीच अंबानगरी होय. तेथें हरिनाथांचा जन्म झाला व तेथेंच त्यांची समाधिही आहे. तेथें अजून तत्प्रीत्यर्थ मोठ्या थाटाचा वार्षिकोत्सव होत असतो. रघुनाथांची समाधि याच प्रांतांत छिंदवाड्यांत आहे व मुकुंदराजांची समाधिही बैतुलजवळ खेडलें नामक गांवीं जुन्या पडक्या किल्ल्यांत आहे; यावरून मुकुंदराज, त्यांचे गुरु रघुनाथ व परमगुरु हरिनाथ ही त्रयी नागपूर प्रांताकडील असून मराठी वाङ्मयाला आद्यकवि नागपूरप्रांतानें दिला ही गोष्ट तत्रस्थांस मोठी अभिमानास्पद वाटणारी आहे. जोगाईच्या आंब्यालाही मुकुंदराजांची समाधि दाखवितात पण ती वास्तविक समाधि नसून कवीच्या कोणा शिष्यानें त्यांच्या पादुका तेथें स्थापित केल्या असाव्यात. असो. हरिनाथांचा जन्म वैनगंगेच्या तीरीं अंबानगरींत झाला. तेथें पित्यानें त्यांचें ' मेखलाबंधन ' म्ह० मुंज केली. त्यांचें वेदशास्त्राध्ययन सहज लीलेनें झालें. काशीस जाऊन त्यांनीं बारा वर्षे पाशुपत महाव्रत केलें व शंकरास प्रसन्न करून घेतलें. त्यांची उपासना शंकराची होती. विवेकसिंधूंतही मुंकुदराजानें आपली गुरुपरंपराप्राप्त शिवभक्ति जागोजाग व्यक्त केली आहे. हरिनाथानें यानंतर तीव्र अनुष्ठान केलें, व शेवटीं महाकुंडीं हवन आरंभिलें. पूर्णाहुतीचे वेळीं घृतधारेसरिसी स्वयंज्योती प्रगटली.

**तिये ज्वाळेआंत । शंभु प्रगटला ' ना भी ' म्हणत ।**
**जो भक्तांचा वेळाईत । करुणासिंधु ॥ ५८ ॥**

याप्रमाणें 'स्वयंज्योति श्रीआदिनाथ' यांनीं हरीला सप्रेम गाढ आलिंगन दिलें व 'क्षण येक दोघे जाले लीन । आनंदसागरीं'

**सुखासी महासुख भेटलें । किंवा स्वानुभवासी पडप जोडलें**
**तैसें आनंदें फुंजों लागले । हरि शंकर ते ॥ ६१ ॥**

आदिनाथांनीं हरिनाथास '**वर माग**' म्हणतांच '**प्रेम देई आपुलें । कैवल्यदानी**' असें त्यानें म्हटलें व शिवपार्वतींचीं स्तुति करून:—

**जे पडले संसारघोरबंदीं । नेणती आपुली शुद्धी ।**
**जय जय करुणानिधी । तुवां तारावे जी ॥ ७५ ॥**

असें जीवांच्या करुणेनें विव्हळ होऊन वरप्रदान मागितलें. 'हें सिद्धाचि काय मागितलें ? आणिकही वरप्रसाद देतों' असें आदिनाथ म्हणाले व 'तुझ्या संप्रदायांतल्या पुरुषांना ज्ञान अनायासें होईल व तें तुझ्या शिष्यदेहीं संक्रमेल' असा आशिर्वाद दिला. सदाशिवाच्या वरप्रसादानें हरिनाथाच्या देहीं 'शांभवतेजाचा समावेश' झाला–'ते वेळीं चित्त समरसे । हरीचें परब्रह्मीं' ब्रह्मसुखाची समाधि हरिनाथास २२ दिवस लागली. त्या दीर्घ समाधिसुखानंतर हरिनाथाची दिनचर्या कशी होती ?:—

**जडचर्या आचरतु । पिशाचवत् खेळतु ।**
**निजानंदें डुलतु । हरि योगिराज ॥ ९४ ॥**
**ढाळेंढाळें चालणें । विसरत विसरत बोलणें ।**
**कांहीं नेणोनि हांसणें । हरिनाथासी ॥ ९५ ॥**
**कर्मवासना सरली । विवेकीं इच्छा निमाली ।**
**पूर्ण दृष्टी जाली । म्हणऊनियां ॥ ९६ ॥**
**परापेक्षां स्नानभोजन । परापेक्षां वस्त्रपरिधान ।**
**कवणासी गोष्टी संनिधान । करणें आथीचि ना ॥ ९६ ॥**

हरिनाथ याप्रमाणें पूर्णत्वास पोंचले. त्यांनीं असंख्य शिष्यांस प्रबोध दिला. पण रामचंद्रावर त्यांची पूर्ण कृपा झाली. रामचंद्र यांनींही:—

नगर वाचनालय, सातारा.



अठरा दिवसपर्यंता । जाली उन्मनी अवस्था ।
मनाचिया वृत्ति समस्ता । खुंटलिया पै ॥ १०४ ॥
वर्णाश्रमाचा पांग । न करी राम निःसंग ।
अखंड फळला राजयोग । म्हणौनिया ॥ १०६ ॥

हा ' उर्मीरहित ज्ञानसमुद्र ' मुकुंदराजावर वोळला. ' मेघाच्या धारा गणवती । पृथ्वीचे परमाणु मोजवती ' पण माझ्या रघुनाथाचे गुण शेषालाही वर्णवणार नाहींत, असें गुरुभक्तिप्रेमभरानें मुकुंदराज म्हणतात.

## ३. ग्रंथरचना.

मुकुंदराजांचे **विवेकसिंधु** व **परमामृत** असे दोन ग्रंथ लोकमान्य आहेत. दोन्ही ग्रंथ ओवीबद्ध आहेत. विवेकसिंधूच्या पूर्वार्धाचीं सात प्रकरणें असून त्यांतील ओव्यांची संख्या ७७७ आहे व उत्तरार्धाचीं अकरा प्रकरणें असून त्यांतील ओव्यांची संख्या ८९४ आहे म्हणजे संपूर्ण ग्रंथाचीं १८ प्रकरणें असून एकंदर ओवीसंख्या १६७१ आहे. परमामृत याहून लहान आहे व त्याचीं प्रकरणेंही छोटीं आहेत. त्याच्या १४ प्रकरणांत मिळून ३०३ ओव्या आहेत. दोन्ही ग्रंथांच्या मिळून जवळजवळ दोन हजार ओव्या आहेत. याशिवाय पवनविजय, पंचीकरण, मूलस्तंभ, इ० ग्रंथ व कांहीं पदें अभंग वगैरेही मुकुंदराजांच्या नांवावर मोडतात, पण हा कवित्वभाग मुकुंदराजांचा असावा असें वाटत नाहीं. मुकुंद, मुकुंदस्वामी, मुकुंदकवि, मुकुंदनीन वगैरे पांच सहा मुकुंद मागाहून झाले असून त्यांचीं छोटीं मोठीं प्रकरणें मराठींत प्रसिद्ध वा अप्रसिद्ध स्थितींत आहेत. त्या सर्वांपेक्षां विवेकसिंधु व परमामृत ह्या ग्रंथांचा दर्जा फार मोठा आहे. ह्या दोन्ही ग्रंथांचें धोरण व विचारसरणी एकाच प्रकारची आहे. हे दोन्ही ग्रंथ वेदान्तपर आहेत, यांची मांडणी सरळ, सुबोध असून यांत पूर्ण प्रसाद आहे. विवेकसिंधूची श्रीसमर्थांच्या दासबोधावरही छाप आहे पण हें पुढें पाहतां येईल. दोन्ही ग्रंथ शंकरा-

चार्यांच्या मताचे असून शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेले आहेत, तथापि ते स्वानुभवाचे आहेत, सुबोध आहेत.

## ४ विवेकसिंधु.

प्रथम विवेकसिंधु ह्या ग्रंथांत जे विषय प्रतिपादिले आहेत त्यांचें विहंगमदृष्टीनें अवलोकन करूं. पहिल्या प्रास्ताविक भागानंतर सद्गुरु, सच्छिष्य व असच्छिष्य यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. 'जे संसारासी वेगळे। ज्ञानवैराग्यें आगळे। ब्रह्मरसास्वादा आनंदले। ते सद्गुरु जाणावे.' कामक्रोध, हर्षविषाद, सुखदुःख यांनीं चित्त दुभंग होत नाहीं, विषयांचे डोहळे कधींच होत नाहींत, सकळ भूतजातीं समभावानें वागतात, ज्यांच्या प्रपंचराहाटींतही परमार्थच नांदत असतो, जे विधिनिषेधांनीं लिंपत नाहींत पण जे विधिनिषेध पाळतात, अवस्थात्रयीं ज्यांचा अखंड ब्रह्मबोध असतो ते सद्गुरुपदाचे अधिकारी होत. 'जे विषयरसीं आसक्त। अथवा अहंकारें गर्वित। ज्यासी पाषांडाची संगत। ते शिष्य न करावे.' आळशी, कुचर, निंदक, नास्तिक, वादक, महंतीसाठीं भुकाळु, असा शिष्य नसावा. शिष्य शुद्धचित्त व आस्थावंत व 'आणीक परदैवत नेणती। श्रीगुरुवांचुनी' असा एकनिष्ठ असावा. शिष्य सानुराग व सेवारत असावा. अशा शिष्याच्या ठायीं गुरूपदेश ठसतो व तो तात्काळ ब्रह्मरूप होतो. असत् शिष्यही शरण आले तर गुरूनें अंगीकारून मार्गाला लावावे. तेही गुरुचरणप्रसादानें उद्धरतात. परीस, कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि इ० दृष्टांत गुरूला लावतात, पण हे दृष्टांत हीन होत. 'परोपकाराचेनि संतोखें। पात्र कुपात्र ऐसें नोळखे। गुरुमेघ सर्वत्र वरुखे (वर्षे)। उदारपणें.' सखोल भूमींत पाणीं सांचतें, उथळ जमीनीवर थेंबही राहत नाहीं. 'आईबाप थोर खरे पण बंधविच्छेदक मात्र श्रीगुरुवांचून कोणीच नाहीं.' श्रीगुरूला शरण जावें म्हणजे ते सांप्रदायक्रम सांगतात कीं जो आचरल्यानें 'साम्राज्यातें पावे रंक' असें होऊन जातें. शिष्याच्या ठिकाणच्या सर्व विषयऊर्मी जिरून जातात व

तो स्वानुभवसंपन्न होतो. स्वरूपसुखाच्या भरें तो 'एकछत्रीराणीव राजयोगाची' भोगायला समर्थ होतो, ( प्रकरण १ ). इंद्रियांची धांव मोडून तीं आनंदजळांत बुचकळलीं असतांना शिष्य गुरुस्तव करितो, 'मन प्रेमरसें भरलें' म्हणून तो वारंवार गुरुचरणीं मस्तक ठेवतो. 'जें अनादि हारपलें । मी मजचि होतें चोरिलें । तें मातें भेटविलें । श्रीगुरुरायें' या कृतज्ञताजनित प्रेमानें त्याचे ठायीं अष्टसात्विकभाव उदित होतात, व गुरुदास्यप्रीति उत्पन्न होते ! 'मंत्रयंत्रादि उपदेशिते । गुरु घरोघरीं असती आइते ।' परंतु ज्याच्या कृपादृष्टीनें भवदुःख नष्ट होऊन ब्रह्मानंदाचें साम्राज्य मिळतें अशा श्रीगुरूचे उतराई कसें होतां येईल ? 'माझा बोधसमुद्र उल्हासविणारा तूं चंद्र आहेस' म्हणून प्रेमानें गुरुही शिष्याला आलिंगन देतात व 'दृढतेकारणें साधन' सांगतात. मनुष्याला आपल्या देहाची जन्मभूमि अत्यंत प्रिय वाटते मग 'जीवाची जन्मभूमि' प्राप्त झाल्याचा आनंद कोणी वर्णावा ? गुरु शिष्याला अनुभवाची खूण पटवून जीवब्रह्मैक्य करवितात ( प्रक० २ ). जीव, ब्रह्म, सगुण, निर्गुण, माया, अविद्या, प्रपंच, परमार्थ इ० पदांच्या स्पष्टीकरणार्थ गुरुशिष्य-संवादरूपानें यापुढील प्रकरणांतून विवरण केलें आहे. हे विषय सूक्ष्म आहेत म्हणून 'विवेकाचे कान करूनच' हे सर्व ऐकले पाहिजेत. 'पाथरवटाची टांकी कितीही तीक्ष्ण झाली तरी तिनें कांहीं मोत्याला भोंक पाडतां येत नाहीं,' तसा स्थूलबुद्धीचा हा विषय नाहीं ! एक घनदाट परब्रह्म हरिहरब्रह्मादिकांनाही विश्राममंदिर आहे. तें अनिर्देश्य पण निजानंदकर आहे. 'अहंकार गळे । आणि कल्पना मावळे । तरीच ब्रह्म आकळे । स्वानुभवासी.' माया ही ब्रह्मीचा विवर्त आहे. ब्रह्म सत्य व माया मिथ्या असा सिद्धांत आहे. आदिब्रह्माचा विवर्त ती मूळ-माया, तेथें गुणत्रयाची साम्यता आहे, सांख्य तिलाच प्रकृति म्हणतात. तिच्यापासून अनेक तत्वांची सृष्टि झाली, तरी 'जें जें तत्व निपजे । तें तें व्यापिजे चैतन्यें'। हें विसरू नये. कार्यांत कारण अनुस्यूत असतें यामुळें कारण सत्य व कार्य मिथ्या असें

समजावें. मूळमाया ही ‘सगुण’ ब्रह्म व येर जें अशेष उरलें तें ‘केवल’ ब्रह्म. मूळमायेंत पुरुष साक्षित्वानें असतो व कर्तृत्व प्रकृतीचें असतें. यांची अभिन्नता मोडत नाहीं. पण हे ऐकमेकांस ओळखीत नाहींत ! मूळमाया–तिच्यापासून गुणक्षोभिणी–तेथून त्रिविध अहंकार–सात्विक अहंकारापासून ज्ञानशक्ति, राजस अहंकारापासून क्रियाशक्ति व तामस अहंकारापासून द्रव्यशक्ति. तामस अहंकारापासून आकाश, वायु, तेज, आप व पृथ्वी या क्रमानें हीं पंचभूतें शब्दस्पर्शरूपरसगंध या पंचविषयांना घेऊन उठलीं. राजस अहंकारापासून पंचदशतत्वें म्ह० पंचप्राणेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रियें निर्माण झालीं. सात्विक अहंकारापासून अंतःकरणमनबुद्धिचित्तअहंकार हें अंतःकरणपंचक झालें. अंतःकरण भोक्ता, इंद्रियें भोगसाधनें व पंचभूतात्मक विषय हे भोग्य, अशी ही त्रिपुटी झाली. अशाच कर्ता, कारण, कार्य या अन्वयें अनेक त्रिपुट्या निर्माण झाल्या. पंचभूतें हीं आधीं सूक्ष्म होती तीं नंतर परस्परानुप्रवेशानें स्थूल झालीं. याप्रमाणें नानातत्वांची ही सृष्टि झाली. तरी सर्व तत्वें चैतन्याधिष्ठित आहेत किंबहुना चैतन्य मात्र त्रिकाल सत्य असून तत्वें भासमान आहेत. याप्रमाणें तत्वसृष्टिकथनाचें तिसरें प्रकरण आहे ( प्रक० ३ ) चवथ्या प्रकरणांत सर्वेश्वराचा सूक्ष्म देह पंचवीस सूक्ष्म तत्वांचा कसा आहे व पंचभूतें व अहंकार व महत्तत्व हीं दोन मिळून सप्तकंचुक ब्रह्मांड हा विराट पुरुषाचा देह कसा आहे हें सांगितलें आहे. मूळमाया हिरण्यगर्भ व विराट् हे प्रभूचे तीन देह आहेत, हा या प्रकरणाचा विषय आहे. या पुढील ४ व ५ प्रकरणांत जीवाच्या सूक्ष्म व स्थूल देहांचें विवरण आहे. पण हा पंचीकरणाचा विषय स्वतंत्र असून मूळांतच मननपूर्वक पाहिल्याशिवाय चांगला कळणार नाहीं, म्हणून त्याचें येथें विवरण करीत नाहीं. ३।४ प्रकरणांत तत्पदाचा व ५।६ या प्रकरणांत त्वंपदाचा विचार सांगून ७ व्या ‘सर्वब्रह्म’ प्रकरणांत असिपदानें त्यांचा समन्वय केला असल्यामुळें या प्रकरणांतून ‘तत्वमसि’ या महावाक्याचा स्पष्ट विचार सांगितला आहे हें उघड आहे. हें शब्दानें

कळणें शक्य तोंवर ग्रंथ सांगतच आहे, पण याचा पूर्ण विचार गुरुमुखा-शिवाय उलगडणार नाहीं.

**प्रतिग्रामीं अवभासक । जैसा तरणीच एक ।**
**तैसा सर्वजीवां प्रकाशक । परमात्माचि पै ॥ प्र० ५–१६॥**

तूर्या व उन्मनी या अवस्थांचा भेद व ऐक्य कसें मार्मिकपणें सांगितलें आहे पहा; जागृति, स्वप्न. सुषुप्ति या जीवाच्या अवस्था सर्वांस माहीत आहेत. चौथी अवस्था तूर्या म्ह० सर्वसाक्षिणी, व पांचवी उन्मनी. जनकादि साक्षित्वानेंच तरले, तथापि उन्मनी ही पूर्णता असून तिच्या-शिवाय मोक्ष नाहीं. कां कीं तूर्या हीही एक वृत्ति आहे व परब्रह्म तर वृत्त्यतीत आहे. आतां श्रुतीनें उन्मनी ही अवस्था मान्य केली नाहीं. अशा स्थितींत मुकुंदराजांनीं समन्वय ( प्र. ६) मौजेचा केला आहे:—

**तूर्येची परिपक्वता । तेचि उन्मनी अवस्था ।**
**निंबोळियांत मधुरता । जैशी पक्वदशे ॥ ८७ ॥**
**तूर्या ते शुद्धवासना । तेथें हाचि कडवटपणा ।**
**उन्मनी ब्रह्म निर्वासना । म्हणोनि गोड ते ॥ ८८ ॥**
**जैसी साखर उदकीं विरे । परी तेथीची मधुरता उरे ।**
**तैसी तूर्या स्वरूपीं मुरे । ते उन्मनी गा ॥ ८९ ॥**
**अवस्था पंचमा नास्ति । ऐसी वदे वेदश्रुति ।**
**म्हणोनि तूर्येची परिणामस्थिति । ते उन्मनी गा ॥ ९० ॥**

देहाच्या ठिकाणीं आत्मबुद्धि ठेवणें हें बंधन, म्हणून ती तेवढी सोड व सर्वात्मकपणाच्या अनुभवानें मोठा ( ब्रह्म ) हो:—

**अगा सर्वही आपण व्हावें । अथवा कांहींच न व्हावें ।**
**कांहींच न होऊन असावें । नेणूं काई जें ॥ ५४ ॥**
**कांहींच न व्हावयापासाव । सर्वही होणें हें बरव ।**
**जेथ सुखदुःखासी वेगळीक । आथीचि ना ॥ ५५ ॥**

आदिअंतीं साळी देखिली । मध्यें तृणाकार विस्तारली ।
परी साळी येणें शब्दें बोलिली । विबुधजनीं ॥ ५६ ॥
तैसें आदिअंतीं ब्रह्मचि असे । मध्यें प्रपंचाकार भासे ।
परी ' सर्वही ब्रह्मचि ' असें । वेदीं बोलिजे ॥ ५७ ॥

शून्य होऊन पडण्यापेक्षां ' सर्व मी सर्वात्मा ' होणें चांगलें. आदिअंतीं साळीं, मध्येंही साळीच; आदिअंतीं ब्रह्म तर मध्येंही प्रपंचाकार विस्तारलेलें ब्रह्मच जाण !

तत्वता तूं निराकार । जगत् जीव ईश्वर ।
हे तुझेचि अंकुर । आनंदकंदाचे ॥ ६१ ॥
अहो अंगासी संलग्नें । केशनखें अचेतनपणें ।
तीं चैतन्यासी वेगळीं कवणें । निवडावीं ? ॥ ३३ ॥
तैसें अचेतन हें निखळ । चैतन्यासी नाहीं वेगळ ॥
म्हणूनि ब्रह्मचि केवळ । तूंचि एक ॥ ६४ ॥ ( प्र. ७ )

येथें ग्रंथाचे पूर्वार्ध संपलें. उत्तरार्धात स्थूल, सूक्ष्म, कारण महाकारण या पिंडाच्या चौदेहांचें व ब्रह्मांडीच्या चौदेहांचें निरसन पहिल्या सहा प्रकरणांत केलें आहे. चौदेहांची उभारणी पूर्वार्धात केली व त्यांचीच संहारणी उत्तरार्धात केली आहे. तूं पंचभूतात्मक देह नव्हेस, पंचवीस सूक्ष्मतत्वांचा सूक्ष्म( लिंग )देह नव्हेस, अज्ञानकारण देह नव्हेस, व साक्षीरूपाचा महाकारण देहही नव्हेस; तर चहूंदेहातीत स्वयंप्रकाश स्वस्वरूप आहेस, असें सांगून जीवपणाचें निरसन चार अध्यायांत केलें आहे व असेंच जीवसाक्षेप शिवपणाचें त्यापुढील दोन अध्यायांत निरसन केलें आहे. यांत पंचप्रळयादि अनेक मौजेचे विषय आले आहेत. ७ व्या व ८ व्या प्रकरणांत जीवपरमात्मैक्यविचार सांगितला आहे. यांत सदसत् याहून वेगळा, सजातीय, विजातीय व स्वगत भेदांहून निराळा, आत्मा कसा आहे हें उत्कृष्ट सांगितलें आहे 'जें हेतुदृष्टान्तविवर्जित । अनुपम्य सुखभरित । द्वैताद्वैतरहित । परमतत्व ' (प्र०

८–७३) आहे व 'जाणोनि कांहींच नेणें । तें अनिर्वाच्य तूं' असा बोध केला आहे. ९ व्या प्रकरणांतलें अद्वैतप्रतिपादन समन्वयदृष्टीनें सुंदर आहे. हें प्रकरण अवश्य पहावें म्हणजे ऐक्यबोध चांगल्या प्रकारें होईल. १० व्या प्रकरणांत सच्चिदानंदपदाचा विचार सांगून–'सच्छब्दें नित्य सन्मात्र । ज्ञानशब्दें ज्ञप्तिरूप चिन्मात्र । आनंदशब्दें स्वानंदमात्र । परब्रह्म तें'–शिष्याला कृतार्थ केलें आहे व शिष्यानें 'मज ब्रह्मत्वासी नाहीं चाड । तुझें भजन अत्यंत गोड' याप्रमाणें श्रीगुरुजवळ 'मुक्तीवरील प्रेमभक्ति' मागितली आहे. ११ व्या प्रकरणांत गुरुप्रशंसापूर्वक कवीनें आपले संप्रदायाची व गुरु व परमगुरु यांची माहिती सांगून ग्रंथ संपूर्ण केला आहे.

## ५. परमामृत.

विवेकसिंधूंत जे विषय पूर्णत्वें वर्णिले आहेत ते येथें संक्षेपानें सांगितले आहेत. दोन्ही ग्रंथांतील विषयप्रतिपादनाची शैली एक आहे, तरी याची भाषा सुगम व विवेकसिंधूची प्रौढ आहे. हा ग्रंथ लहान पण अत्यंत सरस आहे. परमामृतांत प्रथमप्रकरणांत श्रीगुरुस्तवन आहे. दुसऱ्यांतः—

**जें जाणोनि सर्व कीजे । जें सर्वदा अभ्यासिजे ।**
**जेथ परतोनि चित्तें राहिजे । बुडी देउनी ॥ १ ॥**

असें अभ्यंतरीचें ज्ञान सांगेन असा हेतु पहिल्याच ओवींत प्रगट केला आहे. संकल्पविकल्प उभें करणारीं नानामतें व नानादर्शनें, व्रतें, मंत्रयंत्रें, होमहवनें, जपतपें व अनुष्ठानें हीं सर्व आचरलीं तरी सर्वांचें सारभूत जें आत्मज्ञान त्यावांचून मोक्ष नाहीं. महावाक्याचें विवरण चित्तांत धरून व जीवेश्वरउपाधि निरसून स्वात्मसुख अंतरीं भोगावें. 'तत् त्वं असि' या तीन पदांचा संपूर्ण अर्थ मनांत ठसवून कैवल्यपद पावावें (प्रक० २). शुद्ध परब्रह्म ज्ञानघनानंद आहे; हरिहरब्रह्मा व त्यांचें उगमस्थान जी मूळमाया तीहूनही तें पर आहे; स्थूल सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांचे अभिमानी जे विश्व, तैजस, प्राज्ञ व

प्रत्यगात्मा यांहूनही तें वेगळें आहे–तें 'अखंड एकरस ब्रह्म' मी आहे हा अनुभव महावाक्यविवरणानें घेतला पाहिजे ( प्रक० ३ ). तुझा देह २५ तत्वांचा आहे. रोम, त्वचा, नाडी, मांस व अस्थि हे पांच पृथ्वीचे अंश; लाळ, मूत्र, शोणित, मज्जा व रेत हे पांच आपाचे अंश; क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा व मैथुन हे पांच तेजाचे अंश; चलन, धांवन, निरोधन, प्रसरण व आकुंचन हे पांच वायूचे अंश; व काम क्रोध, शोक, मोह व भय हें पांच आकाशाचे अंश असा २५ तत्वांचा हा स्थूल देह आहे. याचे वर्ण, व्यक्ति, नामरूप हे सर्व जाणता तूं याहून वेगळा आहेस ( प्रक० ४ ). तसाच तूं सूक्ष्मवासनात्मक लिंगदेहाहूनही भिन्न आहेस. पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, पंचप्राण, मनबुद्धिचित्तअहंकार व अंतःकरण मिळून अतःकरणपंचक, या सर्व पंचकांचा साक्षी तूं आहेस, अर्थात् याहून वेगळा आहेस ( प्रक० ५ ). आतां स्थूल व सूक्ष्म देह हे अज्ञानामुळें उत्पन्न होतात, त्या अज्ञानाचा ( कारणदेहाचा )ही जाणता तूं असल्यामुळें ह्या तीनही देहांहून तूं वेगळा आहेस ( प्रक० ६ ). नेणीव म्हणजे अज्ञान हा जर कारणदेह तर त्या अज्ञानाला जाणतें जें ज्ञान म्हणजे जाणीव तो महाकारण देह. 'फिटूनियां नेणणें। आपआपणा जाणणें। तिहीं देहांचेनि साक्षीपणें। महाकारण देह.' स्थूलसूक्ष्म देहांचें कारण तो कारणदेह व कारण व कार्य ( दोन्ही देह ) या कार्यकारणांचेंही कारण तो महाकारण देह. कार्यकारण शून्य झाल्यावर महाकारण कोठें राहिलें ?

याप्रमाणें चारी देहांचें निरसन झालें कीं:—

**आहे स्वयंभू आपण। जाणे आपली आपण खूण।**
**परब्रह्म निर्वाण। निजस्वरूप॥ ११॥**

त्या स्वस्वरूपाचें अनुसंधान ठेवल्यानें विज्ञान सहज होतें तेव्हां 'प्रपंचाचें मिथ्यापण। प्रत्यया ये'. जेथून स्वस्वरूपज्ञान स्फुरतें तेंच आपण. 'तो घनानंद चढे ना वोहटे। अपरिमित'। 'तेंच अविनाश स्वरूप।

अखंडित.' ( प्रक० ७ ) तें शून्य आहे असें शून्यवादी म्हणतात, पण शून्य आहे हें जाणलें कोणी ? म्हणून शून्यवाद टिकत नाहीं. तें सूक्ष्म घनानंदस्वरूप आहे 'तो निजद्रष्टा स्वयंप्रकाश । परमात्मा तूं' आहेस. तो निरालंब साक्षी तूं आहेस.

**जें ज्ञानाचें जिव्हार । आस्तिक्याचें घर ।**
**सुखाचें सागर । घनानंद तूं ॥ १२ ॥**
**जें सर्वसाक्षीचें दीपन । जें प्रकाशाचें कोंदण ।**
**जें आत्मानंदाचें निदान । कैवल्य तूं ॥ १३ ॥**

असा शुद्धबुद्ध परमात्मा तूं आहेस. असें असून 'तुझा त्वां हारविला महिमा.' तर आतां त्याचा अभ्यास कसा करावा तें सांगतात. (प्रक० ८) 'जेथें जेथें चंचल मन जाईल तेथून तेथून–विषयांपासून, इंद्रियांपासून, सकल दृश्यापासून–त्याला परतवून आत्मस्वरूपीं लाव. याला आत्मचिंतन किंवा निदिध्यास ह्मणतात. एकांतीं बैसावें, स्थूलाचा अभिमान सांडून व दृश्यमात्रीं त्यागबुद्धि धरून युक्तीनें मन एकवटावें:—

**जिकडे मनाची राहटी । न लागावें तयाचे पाठीं ।**
**माघारीं घालोनियां दृष्टी । स्वस्वरूपेसीं ठेविजे ॥ ८ ॥**
**नदी उगमीं स्थिरावे । तरी सिंधूपण कां न पावे ? ।**
**तैसें जीवाचें ब्रह्म कां न व्हावें । या स्थिती राहतां ? ॥१२॥**

हा अभ्यास नित्यनेमें करावा. द्रष्टा आपणांस जर पाहूं लागेल तर दृश्य समोर उभेंच राहणार नाहीं. कूर्म जसें आपलीं करचरणाशिर हीं अंगें आकुंचन करून घेतें व मग 'आपणया आपण उरलें । अखंडित" तसा दृश्यजात बाहेर सांडून:—

**आपण एकीं एकला । दुजा नाहीं देखिला ।**
**ज्ञानमात्र संचला । आत्माराम ॥ २१ ॥** ( प्रक० ९ )

आत्मा स्वप्रकाश असतांना जीव गडद अज्ञानांत गुरफटतो कसा ? दृश्यभासाला भुलतो कसा ? आपल्या स्वरूपाला विसरल्यामुळें !

**उजेडीचा घरांत आला । तंव दृष्टीं अंधार भरला ।**
**डोळे असतां अदेखणा जाला । आपणासि तो ॥ ३ ॥**

मध्यरात्रीच्या अंधःरांत डोळयाला गडद् पडतें तसें अज्ञानांधकारांत गुंतणें बरें नव्हे. देहासहित ब्रह्मांड शून्य करून आत्मचिंतनीं रत हो. 'आत्म-प्रभा उजळली चिदादित्याची' म्हणजे मनबुद्धि स्वरूपींच मावळतील. तरंग जळाला सोडून कोठें जात नाहींत तसें आत्म्याला सोडून अंतः-करण म्हणजे मनबुद्धिचित्त कोठें जाणार ? पण तूं आत्मस्फूर्तीकडून त्यांजकडे पहा. मी स्वतः निराभास आहें हें स्मरण ठेवल्यानें वृत्ति-भासानें तूं फसणार नाहींस. जाणीवनेणीव भावाभाव हें ज्याला स्पर्शत नाहींत 'तेंच तें स्वयमेव स्वस्वरूप' ( प्रक० १० ). अज्ञान हें कांहीं नाहींच, 'घनानंद कोंदाटलें स्वस्वरूप.'

**दृश्य द्रष्टा दर्शन । या तिन्ही भावां विलक्षण ।**
**एकलेंचि आपण । ज्ञप्तिमात्र ॥ ११ ॥**

दृश्य लयाला गेलें कीं देखणें खुंटलें व दृश्य गेल्यावर द्रष्टा तरी कोठचा ? म्हणून दृश्य-द्रष्टा-दर्शन या त्रिपुटीविरहित ज्ञप्तिमात्र आपलें आपणच आहोंत अशा अभ्यासानें मन निश्चळ करावें (प्रक० ११). मन स्वरूपीं स्थिरावलें व स्वात्मानंद प्राप्त झाला, पण त्या स्वानुभवसुखाचें शब्दांनीं वर्णन कोणी करावें ? 'पावे साम्राज्य-संपत्ति । रंक जैसा' । तसा तो महानंद प्राप्त होतांच अष्ट सात्विकभाव शरीरावर उठतात, चित्त चैतन्यीं हारपतें व त्या स्वात्मसुखांत विवेकही हारपून जातो.

**अहंता स्वरूपीं गळे विषयतृष्णा मावळे ।**
**इंद्रियांचे लळे । क्रियेवीण पूर्ण होती ॥ ६ ॥**
**आनंद आनंदासी घोटी । बोलतां परेसी पडे मिठी ।**
**मुक्यानें सुखाच्या गोठी । केविं कीजे ? ॥ १२ ॥**
**खुंटलें मनाचें जाणणें । तें सुख अनुवादावें कवणें ? ।**
**हें अनुभवी तोचि जाणे । इतरां टकमक ! ॥ १३ ॥ (प्रक०१२)**

ही योगखूण पावून जो परिपूर्ण स्वानंद भोगतो त्याला संसाराचा शीण नाहीं. सदा स्वानंदनिमग्न असल्यामुळें त्याच्या ठायीं संकल्पविकल्प उठत नाहींत. स्वरूपसुखाच्या संगतींत त्याचीं इंद्रियें नित्यतृप्त असतात. साधन असाधन, करणें न करणें, हें संपतें. ध्यानधारणासमाधि त्याची पूर्ण होतात. 'चुबुकळित आनंदघन। आपणामाजी' असा तो विधिनिषेध, पापपुण्य यापासून मुक्त असतो. त्या अखंडानंदाला बंधमोक्षाची वार्ताही उरत नाहीं, असें असून 'लोकांमाजी दावीत। भक्तिरहस्य' तो वावरत असतो.

**भक्तिज्ञानवैराग्य पाहीं। करूनि दाविती आपुले देहीं।**
**जगासी लावती सोई। तारक ते ॥ १२ ॥**
**भोगिती स्वरूपरहस्य। करिती सद्गुरूचें दास्य।**
**परी भेद नाहीं—सामरस्य। जाणती जीवेश्वरांचें ॥ १३ ॥**
**गुरु-परमेश्वर ऐक्यता। तद्रूप जाणोनि भजतां।**
**सन्मान देती संतां। अतिप्रीतीनें ॥ १५ ॥**
**आणि विश्वामाजीं ईश्वरू। एकचि व्यापक सद्गुरु।**
**म्हणोनि सर्वाभूतीं आदरू। करिती ते ॥ १६ ॥**
**हृदय जयांचें कोमळ। सदा शुचिष्मंत निर्मळ।**
**निरंतर आचारशीळ। पवित्रपणें ॥ १७ ॥**

मानापमान, सुखदुःख, लाभहानि यांची त्यांना बाधा नसते. याप्रमाणें ते जनांत वागतात किंवा पिशाचवृत्तीनें जनांवेगळें वागतात. अशालाही लोक मग वेडा म्हणतात, पण तो सहजानंदीं मग्न असतो, 'जना उद्धरावें कीं त्यजावें' हा विचारही त्याला स्फुरत नाहीं ( प्रक० १३ )

मुक्तपुरुष वर सांगितल्याप्रमाणें दोन प्रकारानें वागतात. तूं मात्र तुला पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अभ्यास कर. तूं ब्रह्मस्वरूपच आहेस, 'परी पाहिजे आलें प्रत्ययासी.' शेंदाडें पिकलीं कीं तीं देठापासून सोडवावीं लागत नाहींत, तीं अपाप गळून पडतात—तशी दशा आली तर उमगलें म्हणायचें:—

**पाहें पां शेंदाडें पिकलीं । तीं काय देठींहूनि सोडविलीं ? ।**
**तैशी दशा जरी आली । तरीच राहिलें ध्यानीं ! ॥ ३ ॥**

पण तोंवर सांगितल्याप्रमाणें रीतीनेंच चाललें पाहिजे. स्वरूपानुसंधान ठेवलें तरच परमार्थप्राप्ति होईल.

**नित्य करावा ऐसा नेम । पडों नेदावा संसारभ्रम ।**
**धरावा स्वरूपाच्या कामें । साधनपंथ ॥ ५ ॥**
**हें नित्य श्रवण करावें । मननिदिध्यासें अनुभवावें ।**
**आळस करूनि न दवडावें । आयुष्य वृथा ॥ ६ ॥**

सद्गुरूसी जीवेंप्राणें जीवें धरावें हें सारांतलें सार आहे.

**आतां तनमनधन । करी सद्गुरूसी समर्पण ।**
**नाहीं तयावीण । अन्य दैवत जगीं ॥ १२ ॥**

हें वेदांतशास्त्र गुह्य ठेवावें, वाटेल त्याला सांगूं नये. गुरुसंप्रदायाच्या मार्गानें न चालतां गुह्य तेवढें समजून अनधिकारी लोक चाट ( वाचाट, चावट ) होतील, म्हणून सद्भाव पाहूनच हें शिष्यास सांगावें. तात्पर्य ' सेवूनि सद्गुरूचे चरण । सुखिया होइजे.' ( प्रक० १४ )

## ६. वेदांत व राजयोग.

गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें ज्ञान लोकहितबुद्धीनें जनीजनार्दनास अर्पण करणें हा सज्जनांचा सहजस्वभाव आहे. मुकुंदराजांनींही जयंतपाळाच्या निमित्तानें आपलें गुह्यज्ञान विवेकासिंधुद्वारां जगांत प्रगट केलें आहे. ' ज्ञानेविण न सुटिजे ' ' न फिटतां अज्ञानपांग । सुटिका नाहीं' 'अज्ञान-निवृत्तीवीण मोक्ष कैंचा ? ' असें त्यांनीं अनेकवार म्हटलें आहे. ज्ञान म्हणजे अर्थात् आत्मज्ञान. आत्मज्ञान देणारें मुख्य शास्त्र वेदांत, तेव्हां वेदांतांचा अर्थात् शांकरवेदांताचा म्हणजे अद्वैततत्वज्ञानाचा कवीनें पुरस्कार केला आहे.

**शंकरोक्तीवरी । मी बोलिलों मऱ्हाठी वैखरी ।**
**म्हणोनि निर्धारावी चतुरीं । शास्त्रबुद्धी ॥ ४७ ॥**

नगर वाचनालय सातारा

संग्राहक पुस्तक

**विवेकसिंधूचीं शब्दरत्नें । कंठीं धरिजे प्रयत्नें ।**
**तरी जनकाचेनि महिमानें । श्लाघ्यता पावे ॥ ५२ ॥** (प्रक० ७)

शंकराचार्यांच्या सिद्धांताचाच मी मराठींत अनुवाद करीत असल्यामुळें माझ्या ह्या विवेकसिंधु ग्रंथाकडे शाहण्यांनीं शास्त्रबुद्धीनें पाहावें व यांतील शब्दरत्नें कंठीं धरून मननिदिध्यासद्वारां त्याचा अनुभव घेत जनकाप्रमाणें प्रपंचांत राहूनही अध्यात्मयोगाचा आनन्द भोगावा, ह्यालाच कवीनें राजयोग म्हटलें आहे. गीता ज्याला ' राजविद्या, राजगुह्य ' म्हणते त्यालाच ते ' राजयोग ' म्हणतात. विद्येंतली मुख्य विद्या अध्यात्मविद्या, गुह्यांतलें परमगुह्य स्वरूपानुभव, योगांतला श्रेष्ठयोग राजयोग. अन्यशास्त्रांहून वेदांतशास्त्र श्रेष्ठ आहे, व वेदांताचा अनुभव तो राजयोग. ' मी राजयोगी श्रीमुकुंदमुनी ' माझ्या ग्रंथांत ' राजयोग ' सांगत आहे असें त्यांनीं अनेकवार म्हटलें आहे. षट्दर्शनांतील पांच दर्शनें एकीकडे व वेदांत एकीकडे. ' पांचही दर्शनासी झुंजार । हा वेदांतासी साजे बडिवार. ' पांच दर्शनें हीं जंबुकें व त्यांसी लीलेनें झगडणारा वेदांत हा एकांगवीर आहे असें त्यांनीं ७ व्या प्रकरणांत म्हटलें आहे. इतर दर्शनें वेदांताची एकेक बाजू पुढें मांडून त्यास थोडेंसें साह्य करितात हें खरें, पण तीं केवळ साधनें आहेत, साध्य वस्तु तात्काळ हातीं देणारें एक वेदांतशास्त्रच. स्वाधिष्ठानादि षट्चक्रें व उड्डियानादि बंध या साधनांत न पडतां आत्मज्ञानाचा राजमार्ग चोखाळः—

**न लगे वेदशास्त्राचा पांग । अभ्यासावा न लगे अष्टांग ।**
**जरी पाविजे राजयोग । श्रीगुरुप्रसादें ॥** (उत्तरभाग प्र० ११-११७)

अज्ञानाचा निरास ज्ञानानें—स्वस्वरूपपरिज्ञानानें होतो. आत्मज्ञान म्हणजेच ज्ञानाची पूर्णता. खंडज्ञान तारक नाहीं. ' खंडज्ञान उपदेशिती । मोक्ष उधारें बोलती ' अशा अपरोक्षज्ञानहीन गुरूपासून कांहीं आत्मलाभ होत नाहीं. खरोखर ' याचि देहीं आपुले डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ' हा लाभ खऱ्या सद्गुरूपासून होतो. मुक्तीचा सोहळा

भोगण्यासाठीं प्रपंच सोडावा लागत नाहीं. कां ? ‘ **प्रपंचाशीं भिन्नत्व नाहीं परब्रह्मीं** ’ ( पू. प्रक०६–१०५ ). प्रपंचाशीं परमार्थाचा विरोध नाहीं. प्रपंच हा परब्रह्माहून मुळीं भिन्नच नाहीं. जग मिथ्या आहे, संसार मायिक आहे, पंचीकरणानें चौदेहांहून आपण वेगळे आहोंत, हें तीव्रतम वैराग्यासाठीं सांगितलें असतें; वस्तुतः परब्रह्म जर ‘ **एकमेवाद्वितीय** ’ आहे, तर प्रपंच त्याहून वेगळा कोठें आहे ? प्रपंचाला अधिष्ठान जर ब्रह्माचें आहे व ‘ **जें जें जेणेंवीण नाहीं । तें तेंचि वस्तु पाहीं** ’ असा जर सिद्धांत आहे, तर सकल प्रपंचपसारा ब्रह्मस्वरूप आहे हें अगदीं उघड आहे. तरंगाला अधिष्ठान जल, अलंकाराला सुवर्ण, पत्रपुष्पफलभारांना बीज, तसें प्रपंचजाताला अधिष्ठान ब्रह्म होय. म्हणून ब्रह्मच एक सत्य आहे, ब्रह्मावांचून कांहींच नाहीं व दृश्यभासात्मक व नामरूपात्मक विश्वरूपानें तेंच नटलें आहे–अर्थात् ब्रह्मच प्रपंचरूपानें भासत आहे. जग मिथ्या म्हणजे नामरूप मिथ्या, व हें कोणाला मान्य नाहीं ? ‘सर्वं खल्विदं ब्रह्म ’ ‘ पुरुष एवेदं सर्वं ’ ‘ ब्रह्मैव संसरति–ब्रह्मैव विमुच्यते ’ इ. श्रुति ब्रह्माची प्रपंचाशीं एकरूपताच दर्शवीत आहेत. यालाच अद्वैत म्हणतात व हाच शंकराचार्यांचा सिद्धांत आहे. वर सांगितल्याप्रमाणें मुकुंदराजांनीं शंकरोक्तीचें रहस्य आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे व मराठी साधुसंतांनीं हेंच परोपरीनें वर्णिलें आहे. हा राजयोग ज्यांना साधला त्यांना प्रपंचाचा बागुलबोवा राहिलाच कोठें ? ‘ जे देह असतांचि सुटले । म्हणोनि जीवन्मुक्त बोलिले. ’–देह असतांनाच विवेकानें देहापासून किंवा ब्रह्मांडापासून वेगळे होण्याचा अथवा दुसऱ्या भाषेंत बोलायचें म्हणजे देहापासून मूळमायेपर्यंतचा प्रपंच आपलेपणानें पहाण्याचा प्रकार उत्तराधाच्या ९ व्या प्रकरणांत पहावा. तें प्रकरण समग्र पहावें. सर्व ब्रह्म जाणून जे आपणच ब्रह्म होऊन राहिले त्यांना संसार वेगळा कोठें आहे ? अग्नीहून वेगळें असेल तें अग्नींत जळेल, अग्नि काय आपल्याच तेजानें पोळेल ? अशा अनुभवसंपन्न पुरुषाला मग एकांतसेवन, साधनसामुग्री, समाधि लावणें व

उतरणें, हें कार्य राहिलें नाहीं. तो साधनातीत झाला अथवा त्याचें साध्यसाधन एक झालें.

**ऐक तयाची प्रचीती । जनकाचिया राज्यस्थिती ।**
**नाना संभ्रमें सेविता । डंडळेना ॥** उ० ९–६७ ॥

आत्मज्ञान मुरालें कीं सहजप्राप्त कर्में करीत असतांनाही समाधि खंडित होत नाहीं. 'प्रपंच वैरी मारावा । किंवा आपलासा करावा' (पू० ७–४४). प्रपंच शिरजोर होत असेल तर मारावा म्हणजे विवेकानें जिंकावा किंवा आत्मपणानें तो वेढावा. प्रपंच अधिकारपरत्वें सत्यही आहे व मिथ्याही आहे ! सत्यपणानें तो जर बोकांडीं बसेल तर त्याचें मिथ्यात्व ओळखून त्याला मारावा, बरें मिथ्यत्वानें प्रतीत होत असेल तर त्याशीं वैर करण्याचें कारण नाहीं म्हणजे ब्रह्मत्वानें त्याजकडे पाहून त्याला स्वस्वरूपीं मिळवून घ्यावा ! आपल्या घरीं कोणी चोर म्हणून आला तर ठोकावा, साव म्हणून आला तर त्याचा सत्कार करावा ! आत्मानुभवी सत्पुरुषालाच प्रपंच साव म्हणून आपलासा करितां येतो. संसारसंभ्रमांत गुंतला असतांना समजा त्याला स्वरूपाचा विसर पडला तरी त्याला संसाराची पीडा होणार नाहीं. एखादी सुवासिनी समजा क्षणभर आपलें सौभाग्य विसरली तर काय ती वैधव्यदुःखसागरांत बुडून जाईल ? तसेंच एकदां शुद्धस्वरूपज्ञान झालेल्या पुरुषाला प्रपंचसंगतींत रजतमाच्या लाटांनीं जर्जर केलें तरी काय त्याचें आत्मज्ञान नष्ट होईल ? राजाला बाहेर अटकाव करणारे शेंकडो राखणाईत असले म्हणून काय त्याला अंतःपुरांत प्रवेश करायच्या वेळीं कोणी निरोध करूं शकेल ?

**असतां इंद्रियव्यापार । परी तो ब्रह्मरूपें व्यवहार ।**
**पूर्णबोधासी संसार । परमार्थचि ॥** उत्तरा. ९–७८ ॥

ज्याच्या कृपाकटाक्षाबरोबर संसारज्वर फिटतो तो राजयोगी, ज्ञानी व भक्त. त्याचें दर्शन, स्पर्शन व संभाषण पापविमोचक होय. ' कर्मशेषें देहीं वर्तती । परी ते कर्मबंध नेणती '. निर्विकल्प समाधीनेंच मोक्ष मिळतो,

सविकल्पसमाधि भोगणाऱ्या राजयोगानें मोक्ष मिळत नाहीं, असें कोणी म्हणतात व ‘ शुको मुक्तो वामदेवो वा ’ ही श्रुति पुढें करितात. त्यांना आम्ही असें उत्तर देतों कीं शुक निरंतर निर्विकल्प समाधींत होते असें तुम्ही म्हणतां, पण शुकांनीं तर भागवतग्रंथ परीक्षितीला सांगितला आहे. बरें, ते मुक्त होते असें श्रुतिच सांगते. शुकवामदेवादि कांहीं अंध, बधिर, मुके नव्हते. त्यांचीं इंद्रियें लोकव्यवहार करीतच होतीं. तात्पर्य प्रपंच-व्यवहार करीत असतांनाही जनकाप्रमाणें जीवन्मुक्ताचें पूर्ण सुख भोगतां येतें. यालाच **राजयोग** म्हणतात. हा सर्व योगांत श्रेष्ठ आहे. हा राजयोग सर्वांस तारक आहे व अन्यसाधननिरपेक्ष म्हणजे स्वतंत्र आहे. हा सांगण्यासाठींच मुकुंदराजांनीं ग्रंथरचना केली आहे.

## ७ सगुणोपासना.

राजयोग कोणाला एकदम साध्य होत नसेल तर त्यानें सगुणाची उपासना करावी व त्यामार्गें निरालंब निर्गुणपद गांठावें.

**चित्तअवलंबनेवीण । जरी न राहे स्थिरपण ।**
**तरी देवाचें सगुण–। स्वरूप चिंतावें ॥ ९३ ॥**
**तेथें हृदयाच्या शेजारीं । षोडशोपचारें पूजा करी ।**
**उपासावा श्रीहरी । अनन्यभावें ॥ ९४ ॥**

सगुणभक्ति करितां करितां ‘ निर्गुणीं परमपुरुषीं । जीवा ऐक्य होय शेखीं ’ ( विवेक० प्र० २ ). सगुण ब्रह्म तरी कोणतें ?

**जेणें मायेतें व्यापिलें । तें सगुण ब्रह्म बोलिलें ।**
**येर जें अशेष उरलें । तें केवल ब्रह्म ॥**

मायोपाधिक ब्रह्मालाच सगुण ब्रह्म म्हणतात. ‘ तें ब्रह्म सगुण । तोचि परमात्मा जाण ’ ( विवेक० प्र० ३ ). व्यापक ब्रह्म ‘ भक्ताकारणें मूर्तिमंत ’ होतें हें पूर्वार्धाच्या ५ व्या प्रकरणांत चांगलें सांगितलें आहे. परमात्मा निर्गुण निराकार जर आहे तर सगुणोपासना कशाला पाहिजे या

शंकेस उत्तर मोठें बहारीचें दिलें आहे. नट नाट्य करीत असतांना स्वतःस विसरत नाहीं, तसे परमात्मा रामकृष्णादि अवतारकार्यें करीत असतांना स्वस्वरूपापासून चळत नाहीं. सगुण रूप मायिक म्हणून त्यास जे भजणार नाहींत ते मूढ होत–त्यांना सगुण वळत नाहीं व निर्गुण कळत नाहीं! असें पहा. सोंग उत्तम वठलें कीं आपण संतुष्ट होऊन नटाच्या अंगावर वस्त्रेंभूषणें टाकतों-येथें सोंग मिथ्या आहे पण तीं नटालाच पोंचतात; तद्वत् अवतार मायिक असले तरी त्यांचें केलेलें भजनपूजन मुख्य परमेश्वरालाच पावतें! म्हणून नवविधा भक्तीनें देवाला अवश्य भजावें म्हणजे देवच ज्ञानदान करून बंध तोडतोः—

**सोंग संपादितां तोषलेपणें। नटासी दीजेति अलंकारभूषणें।**
**सोंग मिथ्या-परी पावणें। नटासीचि! ॥ २० ॥**
**तैसें कीर मायिक अवतरण। तेथें कीजे जें भजन।**
**तें होय समर्पण। जगदीश्वरीं ॥ २१ ॥**
**नवलक्षण भजनें। सर्वेश्वर आभारलेपणें।**
**ज्ञान देऊनि बंधनें। तोडी निजसेवकांचीं ॥ २४ ॥**
**जीवासी तत्वज्ञानावीण। नाहीं भवबंधछेदन।**
**ती करावी सोडवण। ईश्वरेंचि कीं ॥ ३० ॥ ( प्रक० ५ )**

सगुणप्रेमा वाढविण्यासाठीं काय करावें ?

**करावा विषयांचा त्याग। धरावा साधूंचा संग।**
**रागद्वेषाचा प्रसंग। घडूंच न द्यावा ॥ ७७ ॥**
**वेदशास्त्रपुराण। साधुमुखें निरूपण।**
**तें करावें श्रवण। विवेकदृष्टी ॥ ७८ ॥ ( प्रक० ७ ).**

संतसद्गुरूंच्या मुखानें श्रवणलाभ होण्यांतच विशेष काय आहे हें अनुभवानेंच समजत असतें. सगुणोपासनेच्या व नवविधाभक्तीच्या मार्गानें जाऊन ब्रह्मज्ञान होतें व ज्ञानोत्तरभक्ति ही तर खरोखर बहार आहे.

उत्तरार्धाच्या १० व्या प्रकरणांत गुरुमुखानें ब्रह्मज्ञान झाल्यावर 'श्रीगुरु हीच परमात्म्याची प्रगट( सगुण )मूर्ति आहे ' अशा उत्कटप्रेमानें शिष्य गुरूस म्हणतो ' मज ब्रह्मत्वाची नाहीं चाड । तुझें भजन अत्यंत गोड । भजनेवीण कोड । कांहीं नाहीं. ' तो ' भक्ति मजलागुनी । दिधलीच देईं ' ' तुझे ठायीं प्रेमभाव । जीव गेला परी न जाव ' असेंच दान मागतों. ' **ब्रह्मप्राप्तीवरी भक्तीचा सोस** ' कां असतो हें स्वानुभवी संतसज्जनच जाणूं शकतात. कोणास याबद्दल शंका असेल तर मुकुंदराज स्पष्ट सांगतातः—

**ब्रह्मप्राप्तीची पदवी । तिहीं कानींचि ऐकावी ।**
**परी सद्गुरुभजनेवीण अनुभवी । नव्हतीच कीं ॥ ४३ ॥**

नुस्तें शाब्दिक ब्रह्मज्ञान काय कामाचें ? आचार तसा भाव व भाव तसा अनुभव अशी परंपरा आहे. जे आपल्या मतानें नानाप्रकारच्या युक्ती चाळीत असतात पण साधुवचनीं विश्वास ठेवीत नाहींत, संतसेवा करीत नाहींत, अशांना ब्रह्मज्ञान सांगणें म्हणजे भुजंगांना पयःपान करविण्यासारखें व्यर्थ आहे. तात्पर्य, मायोपाधिक सगुण ब्रह्म, रामकृष्णादि अवतार, देवांच्या सगुण मूर्ति व संतसद्गुरु हे सर्व परमात्म्याच्या सगुणोपासनेचेच प्रकार आहेत, असा मुकुंदराजांपासून सर्व सत्कवींचा अनुभव व उपदेश आहे. संतसद्गुरूंच्या ठिकाणीं ज्यांना ब्रह्मभावाचा अनुभव येत नाहीं त्यांना ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' या सिद्धांताचा अनुभव कोठून येणार ?

# महानुभावपंथाचें मराठी वाङ्मय.

## १ पंथाचे संस्थापक व प्रचारक.

श्रीज्ञानेश्वरनामदेवादि महापुरुष इकडे पंढरपुरास श्रीविठ्ठल चरणापाशीं भागवतधर्माची मोठी राष्ट्रव्यापी प्रचंड चळवळ करीत होते त्याचवेळीं –दहावीस वर्षें अगोदर–तिकडे वऱ्हाडांत कृष्णोपासनेचा एक नवा पंथ क्षितिजावर डोकावूं लागला होता. दोन्ही चळवळींचें एकमेकींस ज्ञान होतें असें दिसत नाहीं. पहिली चळवळ महाराष्ट्रभर पसरली, दुसरी संकुचित होऊन राहिली. पहिलीच्या प्रवर्तकांत ज्ञानेश्वरांपासून चोखामेळापर्यंत अठरापगड जाती सामील होत्या, दुसरीचे प्रवर्तक आरंभीं तरी वऱ्हाडखानदेशाकडचे विद्वान् शास्त्रीपंडित होते. पहिली सर्वांशीं वर्णाश्रमधर्माला धरून होती, दुसरी कांहींशी मोकाट होती. दोन्हीकडे कृष्णभक्ति प्रधान होती. पहिली श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतसिद्धांताला बरोबर घेऊन चालली होती, दुसरीचे आचार तरी लोकमताला धरून नव्हते. शंकराचार्यांचा ( कां बुद्धाचा ? ) संन्यासमार्ग व मध्वाचार्यांची भक्ति यांचा मिलाफ करून चक्रधरनामक पुरुषानें वऱ्हाडांत ऋद्धिपूर येथें महानुभावपंथाची उभारणी केली. ह्या पंथाचीं मतें सर्वांस मानवलीं नाहींत तरी या पंथानें पहिल्या उसळीसरसें मराठी वाङ्मयाचें फार मोठें कार्य केलें आहे, तिकडे दुर्लक्ष करून चालायचें नाहीं. मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांना गोरक्षनाथ पंथानें हातीं धरून मराठी भाषेंत ग्रंथरचनेची स्फूर्ति दिली. मुकुंदराजानंतर आणि ज्ञानेश्वरापूर्वीं महानुभाव पंथ वऱ्हाडांत जमत चालला होता व ज्ञानेश्वरीच्या पूर्वीं १०।२० वर्षें त्यानें मराठी ग्रंथरचनेस आरंभही केला होता. त्यानें त्यावेळीं मराठींत पद्याप्रमाणें गद्यांतही रचना केलेली आहे. या पंथानें मराठी वाङ्मयाची सेवा कशी काय केली, त्यांत कोणकोणते ग्रंथकार झाले व त्यांच्या ग्रंथांची ढब कशी

आहे हें आपणांस ह्या प्रकरणांत पहावयाचें आहे. राजवाडे, भावे, यशवंतराव देशपांडे, वामनराव देशपांडे यांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ व लेख सर्व पाहून हें प्रकरण मी लिहावयास घेतलें आहे. या पंथाच्या मराठीवाङ्मयाकडे वळण्यापूर्वी पंथाचा थोडासा इतिहास देतों.

महानुभावपंथाचे मूळ पुरुष **गोविंद प्रभु** गुंडम प्रभु उर्फ गुंडोबा हे काण्वशाखीय ब्राह्मण वऱ्हाडांत ऋद्धिपूर येथें राहत असत. यांचा जन्म वऱ्हाडांतच काठसुरे गव्हाण नामक ऋद्धिपूरजवळ एक खेडें आहे तेथें शके १११० च्या सुमारास झाला. यांचा जन्मकाळ कोणी शक १०८३ देतात, कोणी ११०० देतात. यांचे आईबाप लहानपणीं वारल्यावर यांच्या मावशीनें यांना ऋद्धिपूर येथें नेले व तेथेंच त्यांची मुंज व विद्याभ्यास झाला. परमार्थसुखाचा यांना छंद लागून हे कांहीं काळानंतर सिद्धकोटीला पोंचले. हे मोठे तपस्वी व प्रेमळ कृष्णभक्त होते. या पलीकडे यांची माहिती नाहीं. हे या पंथाचे आद्य पुरुष. यांचा प्रसाद चक्रधरावर होऊन **चक्रधर** या पंथाचे संस्थापक झाले. गोविंद प्रभु हे अस्सल वऱ्हाडी ब्राह्मण पण चक्रधर हे गुजराथेंतून वऱ्हाडांत येऊन पुढें वऱ्हाडी झाले, चक्रधर हे भरवस उर्फ भडोच येथील मल्लदेवराजाचे प्रधान कोणी विशालदेव नामक सामवेदी नागर ब्राह्मण होते त्यांचे पुत्र होत. मल्लदेव निपुत्रिक वारल्यामुळें त्यानें आपलें राज्य मृत्युसमयीं विशालदेवास दिलें. विशालदेवाचा पुत्र हरिपाल ( पुढें चक्रधर ) यानें बापाच्या राजवटींत व नंतरही कित्येक लढाया मारल्या, दोन तीन लग्नें केलीं. राजकारणें करून ऐश्वर्य भोगलें. पुढें त्यास ऐश्वर्याचा वीट येऊन आईच्या आज्ञेनें तो रामटेक येथील यात्रेस निघाला असतांना वाटेंतच ऋद्धिपूर येथें त्याचा मुक्काम पडला. तेथें गोविंदप्रभूचें त्यास दर्शन झालें व त्यांचे चरणीं त्याची निष्ठा बसून त्यानें तेथेंच कायम वस्ती केली. गाविंदप्रभूंचा त्यावर पूर्ण प्रसाद झाला व त्याचें सांप्रदायिक नांव त्यांनीं चक्रधर असें ठेविलें. महानुभवपंथांत ‘ चक्रधर ’ असें श्रीकृष्णास म्हणतात, व हें उपास्याचेंच नांव उपासकास मिळालें. गुरु व शिष्य दोघेही

दीर्घायु होते. चक्रधराचा जन्म शके १०७३ मध्यें झाला असें म्हणतात. शके ११८५ मध्यें त्यास पैठण येथें श्रीदत्तात्रेयाचा साक्षात्कार झाल्यावर त्यानें संन्यासदीक्षा घेतली व परत ऋद्धिपुरास येऊन त्यानें आपल्या संप्रदायाचें निशाण उभारलें. शके ११८५ ते ११९४ पर्यंतच्या ९ वर्षांत त्याच्याभोंवतीं ५०० शिष्यांचा मेळा जमला. त्यांत १३ स्त्रिया होत्या. गोविंदप्रभु साक्षिमात्र असून चक्रधरानें हा संप्रदाय उभा केला व त्यास योग्य वाटलें तें त्यानें वळण दिलें. कृष्ण व दत्त या दोन मुख्य देवता धरून संन्यासमार्गावर त्यानें भर दिला. गीतेंतील 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यान्ति परां गतिम्' (अ० ९-३२) ह्या चरणाच्या उत्तरार्धावर भर देऊन स्त्रीशूद्रांसही संन्यास देण्याचा त्यानें उपक्रम केला! येथें श्रीशंकराचार्यांच्या संन्यासाची अतिव्याप्ती होऊन हा त्याचा संन्यास बुद्धाच्या वळणावर गेला व वैदिकधर्मीयांशीं त्यानें उघड बंडखोरी केली! लोकांच्या मनांत चक्रधराविषयीं विपरीतबुद्धि होऊन चक्रधराविषयीं नाना तऱ्हेच्या खऱ्याखोट्या कंड्या उठूं लागल्या व तो सामान्य जनतेच्या मनांतून उतरला. धुळ्याच्या 'इतिहास व ऐतिहासिकांत 'मानभाव कीं बौद्ध' ह्या शीर्षकाखालीं कै. गो. का. चांदोरकर यांनीं ह्य० काळाउलट पंथाची बाजू पुढें मांडली आहे, व चांदोरकरांच्या मताला सरदार मेहेंदळे यांनीं पुष्टी दिली आहे. तथापि चक्रधराच्याभोंवती त्याच्या अनुयायांचें चांगलें वळें पडलें होतें. त्यांत त्याचा पट्टशिष्य नागदेवाचार्य हा एक कर्तबगारीचा पुरुष निघाला. त्यानें चक्रधराचा संप्रदाय वाढविला. नारायण बहाळे म्हणतो कीं 'पक्षिणी पिलाला पंखांचा उबारा देऊन पाळते तसें चक्रधरांनीं नागदेवाला आपल्या सहवासांत पूर्ण ज्ञान देऊन 'दीक्षागुरुआचार्य केले व त्यानें भास्कर कवि, केशवसूरी, दामोदर पंडित, गोपाळ पंडित इत्यादिकांना ज्ञान देऊन निवृत्ताचार शिकविला.' नागदेवाचार्य (शके ११५८–१२२४) हे या पंथाचे प्रमुख प्रचारक होत. गोविंदप्रभूचें तप, चक्रधराची वेधशक्ति व नागदेवाची संघटनशक्ति ह्या तीन शक्ति एकवटून हा पंथ

उभा राहिला. संप्रदायाचें मुख्य केंद्र ऋद्धिपूर झालें. चक्रधर शके ११९४ मध्यें बद्रिनारायणाकडे गेले व तिकडेच त्यांनीं देह ठेविला. गोविंदप्रभु १२०७ मध्यें गेले. तात्पर्य गोविंदप्रभु ह्या पंथाचे आदिपुरुष, चक्रधर संस्थापक व नागदेव प्रमुखप्रचारक होत. महीभट्टांनीं लिहिलेलें 'लीळाचरित्र' केसवराजसूरींचें 'रत्नमालास्तोत्र' (संस्कृत), भावे देवव्यास याचा 'पूजावसर किंवा दिनचर्या,' मुनिराज कोठी यांची 'स्थानपोथी' (श. १३५२), शारंगधर भोजने यांची 'तीर्थमालिका' इ० महानुभवीय ग्रंथांच्या आधारें चक्रधरांचें विस्तृत चरित्र लिहितां येईल.

## २ महानुभावपंथाचे आचारविचार.

या पंथानें तत्वज्ञानाचा विशेषसा विचार केलेला दिसत नाहीं, तथापि हा एक उपासनापंथ आहे. गोविंदप्रभु, चक्रधर, किंवा नागदेवाचार्य हे पंथाचे संस्थापक असून त्यापैकीं एकानेंही ग्रंथ लिहिलेला नाहीं! चक्रधराच्या तोंडून प्रसंगोपात्त निघालेलीं कांहीं वचनें मागाहून त्याच्या शिष्यांनीं संग्रहीत करून ठेवलेलीं आहेत. चक्रधराचा शिष्य महींद्रव्यास किंवा महीभट्ट यानें 'लीळाचरित्र' म्हणून एक ग्रंथ लिहिला त्यांत चक्रधराच्या १५०० वर लीळा वर्णिल्या असून त्यांत जागोजाग चक्रधराच्या तोंडचीं जीं कांहीं वचनें आलीं आहेत तेवढींच एकत्र करून 'केशवराजसूरी' यानें शक १२२० च्या आंतबाहेर त्यांची सूत्रबद्ध मांडणी केली व ह्या सूत्रसंग्रहास '**सिद्धांतसूत्रपाठ**' असें त्यानें नांव दिलें. ह्या सूत्रपाठास 'आचार्यसूत्रें' असेंही म्हणतात. हा सूत्रपाठ म्हणजेच 'चक्रधराच्या उक्ति' होत. हाच ह्या पंथाचा मुख्यग्रंथ आहे. ह्या ग्रंथाला ते आदिग्रंथ म्हणतात व पूज्य मानतात. प्रत्येक महानुभावाला हा ग्रंथ नित्यनेमानें रोज वाचावा लागतो. ह्या ग्रंथांत एकंदर सूत्रें १६०९ आहेत. कित्येक वर्षांनंतर रामेश्वरनामक एका ग्रंथकारानें या सूत्रांचे ११ भाग पाडले. त्यांचीं नांवें १ अन्यव्यावृत्ति २ युगधर्म ३ विद्यामार्ग ४ संहार ५ संसरण

६ महावाक्य ७ निर्वचन ८ उद्धरण व ९ आस्तीपरि. ह्या नऊ भागांला मिळून ते 'लक्षणपाठ' अथवा 'लक्षणान्वयपाठ' असें म्हणतात. दहावे भागांत आचार व आचारमालिका व अकराव्यांत विचार व विचार-मालिका दिल्या आहेत. तेव्हां **लक्षणपाठ** अथवा **लक्षणान्वयपाठ, आचारप्रकरण** व **विचारप्रकरण** अशा तीन प्रकरणांचा हा सिद्धांत-सूत्रपाठ आहे. ह्याशिवाय दृष्टांत म्हणून एक बारावें प्रकरण आहे त्यांत फक्त चक्रधरानें दिलेले दृष्टांत एकत्रित केले आहेत. या सिद्धांतसूत्र-पाठाशिवाय ह्या पंथाचे लोक भगवद्गीता व भागवत हे दोन ग्रंथ मानतात; मात्र सूत्रपाठांत द्वैतप्रतिपादन असल्यामुळें त्याच्या अनुरोधानें ते गीता लावतात! भागवत–विशेषतः दशम स्कंध–श्रीकृष्णचरित्रपर असल्या-मुळें व श्रीकृष्णच ते मुख्य परमात्मा मानीत असल्यामुळें ते प्रमाणग्रंथ म्हणून मानतात, तसेंच एकादशस्कंधही मानतात. एकादशस्कंधांत श्रीकृष्णानें उद्धवास उपदेश केलेला असल्यामुळें उद्धवास या पंथांत भक्तराज म्हणून मानण्यांत येतें. ह्याप्रमाणें सूत्रपाठ, गीता व भागवत ह्या तीन ग्रंथांना ह्या पंथांत मान आहे. तथापि सिद्धांतसूत्रपाठ हा त्यांचा सांप्रदायिक मुख्य ग्रंथ आहे. हा सर्व ग्रंथ अर्थातच मराठींत आहे. ह्या ग्रंथाच्या 'लक्षणपाठांत' त्या ग्रंथाचे मुख्य मुख्य सिद्धांत सांगितले आहेत. ते काय आहेत हें आपण थोडक्यांत पाहूं.

महानुभावांत चार युगांचे **चार अवतार** मानतातः कृतयुगांत हंसा-वतार, त्रेतायुगांत दत्तावतार ( दत्त म्ह० एकमुखी चतुर्भुज विष्णु ), द्वापारयुगांत द्वारकाधीश श्रीकृष्णचक्रवर्ति व कलियुगांत चक्रधर! सूत्रपाठांत प्रथम पंचकृष्ण सांगितले आहेत तेः १ द्वारकाधीशश्रीकृष्ण २ दत्तात्रयप्रभु ३ द्वारवतीचे चांगदेव राउळ ( हे पूर्वी एक सिद्ध पुरुष होऊन गेले. ते महाविरक्त असतांही त्यांजवर एक वेश्या लुब्ध झाली, तिला त्यांनीं वैराग्याचा उपदेश करून पाहिला तरी तिचें मन वैराग्या-कडे वळेना म्हणून त्यांनीं देहत्याग केला व चक्रधराच्या कुडींत प्रवेश केला). ४ गुंडम् राउळ म्ह० चक्रधराचे गुरु ऋद्धिपुरचे गोविंदप्रभु व ५

२७

खुद्द चक्रधर. असे हे यांचे पंचकृष्ण आहेत. आतां सूत्रपाठांत चक्रधराच्या तोंडून जीं तत्वें प्रगट झालीं आहेत तीं सांगतों:—

**“ सृष्टीमध्यें कव्हणें करणें मुचिजेना एके परमेश्वरेंविण ।**
**तोचि परमेश्वरु निर्वव निराकारु असे ।**
**पर कृपावशें सावेवो साकारु होअे ।**
**अवतरे आपुलें सन्निधान दे । तें दास्यमोचक ॥ ”**

परमेश्वर निरवयव निराकार आहे पण जीवांच्या उद्धरणासाठीं सावयव साकार होतो व आपलें सन्निधान देतो. तें दास्यमोचक आहे. सृष्टींत एका परमेश्वरावांचून कोणीही मुक्त करणारा नाहीं. त्याचा लोकांच्या उद्धरणार्थ घेतलेला नरदेह मायानिर्मित असतो.

**“ कर्मभूमीचिया देवता होती पर परमेश्वरु नव्हेती. ”**

आठ देवयोनि, अंतराळीचे गंधर्व, स्वर्गीचे इंद्रचंद्रादि, कैलासवैकुंठीचे हरिहरब्रह्मादिक, शेषशय्या, अष्टभैरव, विश्वरूप व चैतन्य–ह्या सर्व देवता होती पर परमेश्वरू नव्हेति, ‘ चैतन्यापर परमेश्वर तो सकळ जीवांतें रक्षिता व उद्धरिता ’ होय.

“ कृतयुगीं आत्मोपास्ति हा धर्म, त्रेतां भक्ति, द्वापरीं याग व कलियुगीं तीर्थक्षेत्रव्रतदान हा धर्म. ” पहिल्या दोन युगांत भक्ति हा अधर्म व दुसऱ्या युगांत याग अधर्म !

**“परमेश्वरें परमेश्वरू जाणिजे।परमेश्वरें परमेश्वरु पाविजे।”**
**“एकी विद्या । दोनी विद्या । आठ विद्या । नवकोडि विद्या।**
**एकी विद्या ब्रह्मविद्या ।”**

“ सत् शब्दें ब्रह्म बोलिजे । चित् शब्दें माया बोलिजे । आनंद शब्दें ईश्वरु बोलिजे । ब्रह्म माया ईश्वरु ऐसा त्रिअंशु परमेश्वरु एक आथि ”– ह्याला **परमेश्वरनिर्धार** म्हणतात. ‘ नित्य केवळ अनादिअविद्यायुक्त वस्तु एक ’ तिला ‘ **जीव** म्हणतात, व विश्वरूपापासून तों मृत्तिकेपर्यंत

'**प्रपंच**' म्हणतात आणि जीवप्रपंचव्यतिरिक्त तो परमेश्वर. हा सकळ शक्ति, देवता गुण, ज्ञान, विज्ञान यासहित आहे. त्याचे सौंदर्यादि-अनंतगुण व नित्यत्वव्यापकत्वादि अनंतशक्ति आहेत. ह्याला 'महावाक्य' म्हणतात.

**"सृष्टीमध्यें परमेश्वरु अवतरति। मनुष्यवेशधार्ये होती। नखचर्मरोमादिकरुनि सुध (शुद्ध) चैतन्याचि ते...ऐसिया मायापुरातें स्वीकारुनि...जीवां ज्ञानपर्यंत आपुला संबंधु देति। एकां प्रेम संचरीती। प्रेम बोलिजे भक्ति बोलिजे। प्रेमसंचारमात्रें विकार विकल्पु स्वभावो तीन्ही उच्छेदूनि जाति। भक्ताचें सकळै सन्निधानि चरितार्थ होय."**

ह्या सूत्रपाठांवर महानुभावांच्या अनेक टीका, भाष्यें व लापिका आहेत. विश्वांत जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर अशीं चार तत्वें हे मानतात व त्यापैकीं प्रपंच अनित्य आहे, देवता नित्यबद्ध आहेत, जीव बद्धमुक्त (अविद्यायुक्त असल्यामुळें बद्ध पण परमेश्वराच्या कृपेनें मुक्त होणारे), आहेत व परमेश्वर नित्यमुक्त आहे, असें हे म्हणतात. यांच्या मतें जीव अनंत आहेत व परमेश्वर (त्याचे अवतार) हेही अनंत आहेत. जीवेश्वरांचा स्वामीभृत्यसंबंध अनादीचा आहे असें चक्रधराचें स्पष्ट मत असल्यामुळें तो उघड **द्वैतवादी** ठरतो.

जीव हा दुर्बळ आहे पण त्याच्याबरोबर असणारा मायास्वरूपाचा अंश जो '**संलग्न**' तो स्वतः साक्षिभूत राहून जीवास प्रेरणा करितो व त्याच्या प्रेरणेनें जीव कर्में करितात व त्या शुभाशुभकर्मांची पुण्य-पापादि फळें भोगावयास देवता लावतात. प्रत्येक देवतेचें कार्य करण्यासाठीं जीवास एकेक देह दिला जातो. याप्रमाणें जितक्या देवता तितके देह जीवास प्राप्त होतात. देवता अनंत व देह ही अनंत! त्या देहांस लिंगदेह किंवा '**मल**' म्हणतात. अनेक लिंगदेह मिळाल्यावर जीवास मनुष्यादि स्थूलदेह प्राप्त होतात. परमेश्वर कृपापरतंत्र होऊन

जीवास ज्ञान देतो. देवताविषयक ज्ञान स्वर्गादि लोकांची प्राप्ति करून देतें, पण तें ज्ञान कांहीं मोचक नव्हे, म्हणून देवताभक्ति ही खालची आहे, तारक नाहीं. ईश्वरविषयक ज्ञान मात्र तारक आहे. परमेश्वर जीवाच्या दास्यभक्तीनें प्रसन्न होऊन जेव्हां अपरोक्षज्ञान देतो तेव्हां जीवाची 'मलां'पासून ह्म० लिंगदेहांपासून सुटका होते व त्यास मुक्ति मिळते. सर्वदेवदेवींचा त्याग करून एका परमेश्वरास अनन्यभावें शरण जावें म्हणजे मुक्ति मिळते.

या पंथाचें तत्वज्ञान अशा प्रकारचें आहे. अहिंसा, संन्यास, सगुण भक्ति, सदाचार, परोपकार—हे त्याचे मुख्य सिद्धांत नीट समजून घेतले म्हणजे त्यांत घेण्यासारखा भाग पुष्कळ आहे. त्यांची कृष्णोपासना, सगुणभक्ति, व नामस्मरण या गोष्टी तर सर्व भागवतीसंप्रदायांत सर्वसामान्य आहेत. तत्वज्ञानाचा भाग थोड्यांस कळतो व त्यांत मतभेद असूं शकतात; पणः—

**आतां अंहिसे निःसंगुः निवृत्ति भक्तियोगुः**
**तो नमस्कारूं परमार्गुः दातारांचा ॥ ऋद्धिपूरवर्णन ॥ २५ ॥**

अहिंसा, निःसंगता ( संन्यास ), निवृत्ति म्ह० प्रवृतिधर्मकर्मरहितत्व व सगुणभक्ति हा त्यांचा आचारभाग सर्वांस आकळावयाजोगा आहे.

चक्रधराचा हा जसा एक श्रीकृष्णोपासनेचा तसा गुरुभक्तीचा पंथ होता. चक्रधराला त्याचे शिष्य कृष्णरूप मानीत. चक्रधर 'चांफेगौरु' ह्म० सुंदर होता असें भास्कर म्हणतो, तसा तो शिष्यांशीं प्रेमळ होता. श्रीचक्रधराविषयीं महानुभावांचा अत्यंत आदर आहे हें साहजिकच आहे. त्याच्या तोंडचा प्रत्येक शब्द, त्याची प्रत्येक लीला, त्याच्या विषयींच्या आदरोक्ति या सर्व त्यांना अत्यंत प्रिय आहेत. त्याचे शिष्यांशीं वागणें प्रेमाचें व लडिवाळपणाचें असे. 'दिनचर्येंत' या संबंधीं एक मौजेची गोष्ट दिली आहे. "सर्वज्ञ एकु श्रीचरणु भट्टाचेया ( नागदेवाच्या ) वक्षस्थलावरी ठेवीतिः उपानौ परित्यजौनि ठेवीति उपानौसहित ठेवीतिः

भटोबासां जाड्य आलें असेः चक्रधर श्रीचरणीचेनि अंगुष्ठें वक्षस्थळ दाटीतिः भट जागे होतीः श्रीचरण हृदइंसी धरीतिः आळंगीतिः लल्लाटावरि ठेवीतिः नमस्करीतिः मोमे देतिः ऐसे विळास करीतिः भट्टोबासीं सुख थोर होय. तया सुखा परिमाण कव्हणीचि नेणतिः भटोबाचि जाणातिः श्रीचरण कांहीं केलियां सोडूं न सकतिः" असल्या जातीचे गुरुशिष्यप्रेमाचे प्रकार अद्यापही कोठेंकोठें पाहण्यास मिळतात. या गोष्टीवरून चक्रधराचें शिष्यांशीं वर्तन तुटकपणाचें व करडेपणाचें नसून ऐक्यत्वाचें, जिव्हाळ्याचें होतें असें दिसतें, व यामुळेंच चक्रधर व त्याचे संबंधीची प्रत्येक वस्तु शिष्यजनांस प्रिय व आदरणीय वाटूं लागली. त्याच्या साक्षात् किंवा परंपरित प्रत्येक वस्तूला दंडवत घालणें इ० **प्रसादसेवा** करणें असें महानुभाव मानतात. 'आंगी, टोपरें, बहीरवासु, फुटा, पडदणी, पासवडी, सोनेसळा, क्षीरोदक इ० वस्त्रें; थाळा, ताट, वाटे, गंगाळ, आरिसा, तांबकळस (तांब्याचा तांब्या), चौरंगाचें किंवा करवतेयाचें किंवा कवाडाचे लोंहे इ० धातु; खांब, माचा, चौरंग, महाद्वारीचें कवाड, पाट, उंबरवड, फणी, इ० काष्ठसंबंधीं वस्तु; तशाच पाषाणसंबंधी वस्तु; यापैकीं कोणत्याही वस्तूचें दर्शन घडतांच ती वस्तु चक्रधराच्या संसर्गानें पवित्र झाली आहे अशा श्रद्धेनें 'तया माझें दंडवत' म्हणून नमस्कार करणें हें महानुभावांच्या आचारधर्माचें एक प्रधान अंग आहे! पूज्य वस्तुसंबंधी असा आदरभाव दाखविण्याचा प्रघात सर्व जगभर आहे.

एकदा भटोबास चक्रधर म्हणाले, "प्रसादसेवेस्तव पुरुषु धर्मी दक्ष होयिः ईश्वरीं आर्ति उपजेः अविधि परिहरेः विघ्ना उपशांति होयेः दैव साह्यातें करीः तामसे काळीं सत्व उपजेः गेलें सत्व येः सन्निधान देयावयाची प्रवृत्ति उपजे" हें ऐकून भटोबा सद्गदित होऊन बोललेः "स्वरूपा! देवा! मी सर्वथा अपवित्र आहे. अभिलाष, कामक्रोध, मदमत्सर, रागद्वेष हे सर्व अपवित्र आहेत. आतां ये सृष्टीमध्यें तूं एकुवांचौनि हा जीव

अणिकें काइसेनही पवित्र नव्हे गा जीः श्रीचक्रधरा ! आतां आपुलेनि दरिसनें, स्परिसनें, संभाषणें, अवलोकनें, अंतःकरणें, मातें अपवित्रातें पवित्रा कीजो जीः तुझें नाम, लीला, मूर्ति, चेष्टा, स्थान, प्रसाद याचें सेवादास्य घडउनि मातें पवित्रा कीजो जी." या लोकांत प्रसादसेवेचें जें महत्व वाढलें त्याचें बीज ह्या वरील गुरुशिष्यसंवादांत आहे.

या पंथांत कांहीं आचार राष्ट्राच्या पूर्वपरंपरेहून भिन्न आहेत निःसंगत्व याचा अर्थ घरदार, बायकापोरें या सर्वांचा त्याग येथपर्यंत केला जातो! 'स्वदेशुसंबंधु त्याज्यः स्वग्रामुसंबंधु त्याज्य' असें खुद्द चक्रधराचें सूत्र आहे. स्वदेश, स्वग्राम व स्वसंबंधी यांना त्याज्य ठरवून चक्रधर आपल्या सर्वच शिष्यांना संन्यासदीक्षा देऊन त्यांच्या हातीं भिक्षेची झोळी देत असत! दिनचर्येंत लिहिलें आहे. 'भक्तजन भीक्षे जातिः भीक्षा करूनि येतिः झोळिया दृष्टपूता करीतिः झोळिया काठिये घालीति.' चारी वर्णांच्या घरची भिक्षा जातगोत न पाहतां यांच्यांत घेण्याचा प्रघात पडला. तथापि भिक्षेसंबंधी कांहीं नियम होते, 'निर्धूमनगरु जालेया भिक्षे रिगिजेः मौन्यें भिक्षा कीजेः धर्मभिक्षा घेयावी, निरोधें न घेयावीः क्षण एकू उभेआ (उभे) असिजेः भिक्षा करितां पायाची वासु पाहावीः दाराची वासु न पाहावीः हाताची वासु न पाहावीः झोळियेची वासु पाहावीः गोदोहनमात्रें उभया असिजेःभिक्षा करितां कव्हणीकडे न पाहावेः निर्हेतुक भिक्षा कीजेः घरें न निवाडितु भिक्षा कीजेः तोरणमंडळाचिअे द्वारां न वचावेंः संपन्नाचेआ ओळखीचेआ घरा न वचावेः हिंसकानिंदकाचेया घरा न वचावेः प्राणांसी आहारु देआवा-इंद्रियां नेदावाः इंद्रियार्थ रसु न सेवावाः जठराप्राणाहुतीचीं पीडा हरे इतुकें घेयावेः झोळी दृष्टपूता करौनि भिक्षान्नु सेविजेः नदीतीरीं भोजन कीजेः भिक्षे उष्णु ए, शिळें एः सदन्नु ए कदन्नु एः मग घेइजेः जेवितां आवडी नावडी का गोडी न होआवीः। भिक्षान्नु सांडावे नाः आपणेया लागे तितुकेंचि मागावें" हे नियम स्वतः चक्रधरानें आपल्या शिष्यांस

घालून दिले होते. भिक्षावृत्ति पत्करल्यावर हे नियम पाळावेत. हे फार चांगले आहेत. विषयांच्या–स्त्रियांच्या संगापासून दूर राहण्याचा त्याचा उपदेश आहे. ' पुरुष जेतुली जेतुली विषयसेवा करी तेतुलतेतुला धर्मीं निवळू ( निर्बळ ) जाणे: स्त्री भणजे मत्तद्रव्याचा राॐ ( राव, राजा ) गा: आणिकें द्रव्यें सेविलेयां माजवीतिः स्त्री दर्शनमात्रोंचि माजवी: चित्रीचीही स्त्री न पाहावी." भिक्षावृत्ति संन्याशांना हा उपदेश चांगला आहे. संसारिकांनाही त्यांत घेण्याजोगे बरेंच आहे. चक्रधराचा नीत्युपदेश सर्वांसच घेण्यासारखा आहे. " निरपेक्षा होआवे: निरभिमानिया होआवे. ब्रह्मविद्ये इतरुतर विद्या आनुखं( षं )गिका: ईश्वर बोधें बोधवंता जे स्वस्थता आति ते अन्य विद्येच्या विद्यावंता नाहीं.... नामस्मरणेसीं पदीं पदीं पावो ठेविजे कीं: तुह्मां शयनीं आसनीं भोजनीं परमेश्वरु होआवा: विकल्पु स्फुरे ऐसेया स्थानीं न बैसावें: हिंसा निंदा जिये स्थानीं वर्ते तिये स्थानीं न बैसावें: उत्तराभिमुखु बैसोनी नामस्मरणू कीजे:...महात्मेनि प्रियवक्तेया होआवे: राग क्रोध मदमत्सरु यांचा त्यागू याचि नावें संन्यासू कीं: अहंतेचे मूळ सकंदी उपडावे मग शांतीचीं रोपें लावावीं: परमेश्वराची आर्ति होआवी: विषयांची निवृत्ति होआवी: देहावरी अनास्था होआवी:...हें ( मी ) देखीले तैसें आठवीजे: नाम लीळा मूर्त चेष्टा: स्मरण, अनुस्मरण: सुकृतस्मरण:" -- हा सर्व उपदेश अतीव सुंदर आहे. बाराव्या शतकांतल्या मराठी गद्याचे हे नमुने नीट पाहण्यासारखे आहेत.

महानुभावपंथांत चक्रधराच्या वेळींच स्त्रीपुरुष दोघांनाही घेत व दोघांनाही संन्यासदीक्षा देत असें दिसतें ! एकच उदाहरण पुरें आहे:–दामोदरपंडितांची बायको हिरांबा हिला नवऱ्याच्या आधी वैराग्य उत्पन्न झालें व तिनें नागदेवाचार्यांपासून या पंथाची शके ११९४ मध्यें संन्यासदीक्षा घेतली ! दोन वर्षांनीं तिनें आपल्या नवऱ्याची त्याच्या संसारविषयक आसक्तीबद्दल चांगली कानउघाडणी

केली, तेव्हां त्यानेंही श. ११९६ मध्यें संन्यासदीक्षा घेतली. शके ११९६ मध्यें हें पतिपत्नींचें जोडपें–हें पहिलें नातें सोडून–नागदेवाचार्यांच्या पायाशीं संन्यासदीक्षा घेऊन राहूं लागले ! पतिपत्नी होते ते बहिणभाऊ झाले ! वैदिकधर्मांत स्त्रियांना संन्यासदीक्षा विहित नाहीं, तेव्हां बौद्धांपासून व मुख्यतः जैनांपासून ही महानुभावपंथी यानीं स्वीकारलेली आहे हें उघड आहे. त्यावेळीं इकडे बौद्ध नव्हते, जैन होते.

महानुभावांच्या अंगावर 'काषायवस्त्रें–पालाशकुसुमवत्–संध्यारागवत्' म्हणजे भगव्या रंगाचीं वस्त्रें शके १२८५ पर्यंत तरी होतीं असें ऋद्धिपूरवर्णनांतील नगरप्रवेशवर्णनांतल्या १४ व १५ या दोन ओव्यांवरून स्पष्ट होतें. मग हीं काळें वस्त्रें आलीं केव्हां ? या प्रश्नास रा. यशवंतराव देशपांडे असें उत्तर देतात. " मुसलमानांच्या अमदानींत स्वपंथाच्या रक्षणासाठीं महानुभावीयांनीं काषायवस्त्रें टाकून कृष्णवस्त्रें परिधान केलीं. शाहपोष म्ह० काळीं वस्त्रें धारण करणारे म्हणून पातशहांनीं यांस 'जेझिया' करमाफीच्या सनदा दिल्या आहेत. अलीकडे कृष्णवस्त्रें टाकून पुन्हां पूर्वींचीं काषायवस्त्रें परिधान करण्याची प्रवृत्ति या लोकांत वाढत आहे. पंजाबांतील महानुभावांत तर काषायवस्त्राचीच प्रथा आहे."

## ३ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां ?

महानुभावपंथीयांचें वाङ्मय सावधगिरीनें व कसोशीनें तपासून घेण्याची गरज आहे. हें वाङ्मय आज ६०० वर्षें अंधारात होतें तें प्रथमच उजेडांत येऊं पाहत आहे म्हणून सावधगिरीची थोडी अवश्यकता वाटते. दुसरें असें कीं या पंथाविषयीं महाराष्ट्रीय जनतेंत पहिल्यापासून एकप्रकारचा अनादर व तिरस्कार वसत आहे तो कां, याचीं कारणें सांपडलीं तर त्यांचा विचार अवश्य केला पाहिजे, किंवा न सांपडलीं तर परस्पर–अविश्वास पार काढून टाकून खुल्या दिलानें यापुढें व्यवहार झाला पाहिजे. नामदेव, एकनाथ, तुकाराम, गिरिधर, वामनपंडित इत्यादि

सत्पुरुषांनीं या पंथाविरुद्ध त्यांना दिसलें व वाटलें तें लिहिलें आहे. महानुभाव व इतर हिंदु यांच्यांतल्या कज्जांचे फैसले मराठी साम्राज्याच्या काळांत महानुभावांविरुद्ध कां होत असत हें आज समजणें कठिण आहे. ' मानभाव शब्द ' कपटी, ढोंगी या अर्थीं रूढ झाला आहे ! मराठींत 'मानभावी कावा, गडबडगुंडा, करणी कसाबाची व बोलणीं मानभावाची,' इ० शब्दप्रयोग लोकांत रूढ आहेत ! चांदोरकरांनीं या पंथाविरुद्ध असलेलें काळेंबेरें बरेंच छापलें आहे, मेहेंदळे यांनीं जरा सावधगिरीनें व राजवाडे यांनीं साशंकतेनें लिहिलें आहे. या पंथाचें वाङ्मय पाहून मला जें वाटलें तें मी सहानुभूतीच्या दृष्टीनें सरळ लिहित आहे. पंथाची दृष्टी सोडली तरी या लोकांचीं वाङ्मयसेवा स्तवार्ह आहे असें मला वाटतें. रामदेवराव जाधव व त्यांच्या पूर्वींचे २।३ महाराष्ट्रीय सम्राट् यांच्या कारकीर्दींत महानुभावपंथीय ग्रंथकार व कवि यांना दरबारीं मान असे, त्यांची राजवाड्यांत व राणिवसांत येजा असे, चक्रधराचें राजघराण्यावर कांहीं काळ वजनही होतें; असें असून रामदेवरावांचें व महानुभावांचें पुढें कुठें बिनसलें, महानुभावीय हे लोकांत अमान्य व अप्रिय कां झाले, आपले धर्मग्रंथ पंथीयांशिवाय इतरांना दुर्गम करून टाकण्यासाठीं त्यांना अनेक प्रकारच्या संकेत लिपी कां शोधाव्या लागल्या व कोणत्या परिस्थितीमुळें व गूढ कारणांमुळें महाराष्ट्रीय जनतेसी या पंथाला फुटून राहावें लागलें हें आज इतक्या दीर्घकालानंतर यथार्थ समजणें दुरापास्तच आहे. भावे म्हणतात: "कदाचित् महानुभाव संन्याश्यांची भिन्न राहणी, विटाळशीचंडाळशीच्याहि अस्पृश्यतेचा अभाव, त्यांचा पेहराव व महाराष्ट्राच्या हाडींमासीं खिळून गेलेल्या अनेक चालीरीतींची टाळाटाळ हीं कारणें या द्वेषभावास बऱ्याच अंशीं कारणीभूत झालीं असावींत असें दिसतें." बौद्ध व जैन मतांप्रमाणें महानुभावपंथही ' वैदिक धर्माचें प्रधान

अंग जें चातुर्वर्ण्य त्याच्याशीं विरोधी होता' अशी लोकांची झालेली समजूत हेंही एक कारण असलें पाहिजे. रामदेवराव जाधवांचा व खुद्द चक्रधराचा बेबनाव झाला असला पाहिजे तो याच कारणामुळें असावा. खुद्द चक्रधराच्या तोंडचीं दोन वाक्यें ह्या बेबनावाची साक्ष देतात. सूत्रपाठांत विचारप्रकरणांत 'काळेंकरूनि या राष्ट्रा ( महाराष्ट्राचें ) समूळौंचि विनश्यन्ति होईल गा' असें चक्रधराच्या तोंडचें एक वाक्य दिलें असून त्यावर 'स्थळपोथी' नामक टीकाग्रंथांत विवरण आलें आहे तें असें: "तरी ऐसा ईश्वरें अभिमान सांडलेया काइ होय पां: तें राष्ट्र समूळेंचि नासातें पावे—काळें करूनि ह्मणिजे तोकडेनीचि काळें ( थोडक्याच काळांत ): या राष्ट्रा ह्मणिजे या मंडळा: ऐसं होईल: जैसें समूळेंचि विनश्यति: ह्मणिजे जैसें एकाधें समूळेंचि नास ( पावे ): ऐसें **भवीष्य** सांघीतलें" चक्रधरानें रामदेवरावास हा **शाप** दिला असें कोणी ह्मणतील म्हणून त्याच्या या वचनास टीकाकारानें भाविष्यवाणी ठरविली आहे! रामदेवरावांचा पंढरीच्या वारकरी पंथाकडे असलेला ओढा हें चक्रधराच्या नाराजीचें कारण असेल काय ?

## ४ सात प्रमुख ग्रंथ.

पण आपणांस येथें ह्या पंथाच्या वाङ्मयाकडे विशेष लक्ष पुरवायचें आहे. ह्या महानुभाव पंथांत 'साती ग्रंथ' विशेष पूज्य मानले जातात. हें पंथाच्या

---

१ रा. यशवंतराव देशपांडे कळवितातः "स्त्रीशूद्रांना दीक्षा दिल्यावर संन्याशीधर्मांत चातुर्वर्ण्यभेद न पाळतां चारी वर्णांची भिक्षा संन्याश्यांनीं घ्यावी असें पंथप्रवर्तक म्हणतो व त्याचें वर्तनही संन्यासी महानुभावीयाचें होतें. परंतु संन्यास न पत्करलेला शिष्यवर्ग श्रीचक्रधरांचा व त्यांच्या संन्यासी शिष्यांचा बराच होता तो वर्ग चातुर्वर्ण्य पाळी, ब्राह्मण वेदविहित कर्में करीत व इतर वर्णांचें अन्नही घेत नसत. हीच पद्धती हल्लींही प्रचलित आहे. उपदेशी वर्ग वर्णाश्रम पाळतो, त्यांतले ब्राह्मण वेदविहित कर्में करितात. लग्नव्यवहारही इतर ब्राह्मणांत त्या त्या शाखेंत होतात."

स्थापनेपासूनच्या पहिल्या शंभर वर्षांतच झाले आहेत, व यांच्या बहुतेक लेखकांस चक्रधराचा साक्षात्सहवासही घडला होता. हे सात ग्रंथ– ' साती ग्रंथ–' ओवीवृत्तांत रचलेले आहेत.

१ **शिशुपालवध**-शक ११९५ कवीश्वर भास्कर उर्फ भानुभट बोरीकर.

२ **एकादशस्कंद**–शक ११९६ कवीश्वर भास्कर.

३ **वत्सहरण**–शक १२०० दामोदर पंडित.

४ **रुक्मिणीस्वयंवर**–शक १२१० नरेंद्रकवि. ( यानें आपला हा ग्रंथ रामदेवराव जाधव यांस वाचून दाखविला होता. )

५ **ज्ञानबोध**–शक १२५३ विश्वनाथ बाळापूरकर यानें गीतेचे पांच श्लोक घेऊन त्याच्या आधारावर हा स्वतंत्र लिहिला आहे.

६ **सह्याद्रिवर्णन**–शक १२५४ रवळोव्यास, ह्यांत दत्ताचे लीलाचरित्र वर्णिलें आहे.

७ **ऋद्धपूरवर्णन**–शक १२८५ नारो व्यास उर्फ नारायण पंडित बहाळे.

ह्या सात ग्रंथांपैकीं पहिले चार कृष्णचरित्रपर आहेत, पुढले तीन थोडेफार सांप्रदायिक वर्णनाचे आहेत. ह्यांत काव्यदृष्टीनें ' शिशुपाल-वध ' व ' वत्सहरण ' हे सर्वसामान्य वाचकांसही आवडणारे आहेत. या पंथांत पुढें गीतेवर सुमारे ५–५० व रुक्मिणीस्वयंवरावर १०–२० तरी ग्रंथ लिहिले गेले आहेत. गीतेवरील ग्रंथांत विशेष नावाजण्या-सारखा ग्रंथ कोणताच झाला नाहीं.

## ५ कवीश्वर भास्कराचा 'शिशुपालवध.'

नागदेवाचार्यांचा मुख्य शिष्य भास्कर कवीश्वर याचा जन्म मोग-लाईत कासारबोरी येथें झाला व याचें शिक्षण पैठण व काशी येथें झालें. हा अत्यंत बुद्धिवान्, विद्वान् व रसिक असून कृष्णोपासक होता. उज्जयिनीस कारागृहवासांत कांहीं दिवस राहण्याचा यावर प्रसंग आला होता. तेथून सुटल्यावर यानें महानुभावपंथाची दीक्षा घेतली ! यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत त्या सर्वांत याचें ' शिशुपाल-

वध' हें काव्य बरेंच सरस आहे. या ग्रंथाच्या १०८७ ओव्या असून हा यानें शके ११९५ मध्यें लिहिला. काव्याच्या मंगलाचरणांत 'श्रीकृष्ण' व 'दत्त' यांच्या नमनाबरोबरच चक्रधर व नागार्जुन यांनाही त्यानें नमन केलें आहे, यावरून महानुभावपंथाची दीक्षा घेतल्यावर त्यानें हा ग्रंथ लिहिला हें उघड आहे. पदलालित्य, विचार-सौंदर्य, भाषासौंदर्य, उपमाचातुर्य, व भक्तिप्रवणता इ० गुणांनीं हा इतका मंडित आहे कीं हा कोणाचेंही मन मोहून टाकील.

'शिशुपालवध' या नांवावरून हा ग्रंथ वीररसप्रधान असावा असें वाटतें, पण ग्रंथ वाचल्यावर यांत वीररसापेक्षा भक्तिमय शृंगार प्रधान आहे हें समजून येतें. वीररस फक्त शेवटच्या २०० ओव्यांत आहे व तो चांगला साधला आहे. या ग्रंथाची रचना अगदीं स्वतंत्र आहे. भागवती आख्यानाला हा जितका धरून आहे त्यापेक्षां माघाच्या शिशुपालवधाला व नाटकांना अधिक धरून आहे. काव्यरसिकास व विशेषतः श्रीकृष्णभक्तीचें बाळकडु प्यालेल्या रसिकास हा ग्रंथ मनोरम वाटावा. यांत उत्तान शृंगार बराच आहे. विनोदहास्य हे रसही या ग्रंथाच्या मध्यांत बरे साधले आहेत. तात्पर्य शृंगार, भक्ति, व वीर हे रस हास्यविनोदांसह यांत साधले असून वर्णनांत व संवादांत मोकळ्या मनाचा उमदेपणा आहे.ह्या ग्रंथाचा साक्षात् परिचय करून घेऊं. 'देखौनि महाकवींचा पंथू । मज होतुसे मनोरथू । वाणावेया यादवनाथू । श्रीकृष्णराओ ॥ ८ ॥' त्याला प्रमाणप्रदीपांच्या बंबाळ्यानें वेद पाहूं गेले तों त्यांचे डोळे तरळ झालें व ब्रह्मादिकांना श्रीकृष्णरूप निहाळतां आलें नाहीं, असें हें सांवळें परब्रह्म कोणाला गोचर होईल ? भास्कर म्हणतोः 'मज नाहीं मतीचा प्रकाशु । केंवी वर्णू राणा परेशु । परी जीवां होतुसे उल्हासु । स्तुतीलागीं.' येथें शृंगाराच्या मेळांत साहित्याचा परिमळ श्रोत्यांस मोहित करील व केवळ परब्रह्म वाणितां रसाळ बोल त्यांच्या कानीं पडतील:—

मोतियांचे घोषे । रांविले कुकुमरसें ।
तऱ्ही न एति करौं सरिसे । प्रबंधेसी ॥ १७ ॥
पांतां[1] प्रमेयाची गोडी । अमृता उपजे अनावडी ।
साकरेची कीजे कुरौंडी[2] । कवितालतेसी ॥ १८ ॥
वाणितां कान्हु[3] चौहातु[4] मल्लु[5] । ओड[6]ओ होतसे नवलु ।
बोलु रसें दोंदिलु । नाचत दिसे ॥ २१ ॥
वाणितां वनमाळी । शब्दसुखाची होअे नव्हाँळी[7] ।
कवितां भली पार्खाळी[8] । सुरंग दिसे ॥ २३ ॥
फुनं[9] वाचा रसाळां । गर्वू सांडवीन कोकिळां ।
कळहंसा अवकळा । करीनं[10] मी ! ॥ २७ ॥
भणौनि[11] शिशुपाळवधी कथा । जे भक्तिरसाची थाँ[12] ।
कीं सोनवै कैवल्यपथा । पाजळली ते ॥ ३० ॥
ना ते मुक्तिवनितेची दूतिका । कीं ज्ञानांजनाची शलाका ।
कीं कैवल्यमंदिरीची पताका । झळकतुसे ॥ ३१ ॥
नातरी शांतिरसें सींपतां । साँसीनली[13] ज्ञानलता ।
कीं विवेकाची सौभाग्यदेवता । मूर्ति जाली ॥ ३२ ॥
कीं प्रबंधवसंतीची कोकिळा । जीवुचकोरसंजीवनी चंद्रकळा ।
कीं निम्होंळ[14] संसारवाटेची विश्रामुशाळा ।आर्तजनांलागी ३३॥

द्वारकेस धर्ममहासभेंत श्रीकृष्ण बसले असतांना नारदांची स्वारी अकस्मात पातली. देवभक्तांच्या भेटींत किंवा दोन महात्म्यांच्या भेटींत परस्परांविषयीं आदरयुक्त प्रेमा कसा प्रगट होतो याचें मनोरम चित्र येथें कवीनें उठविलें आहे. श्रीकृष्ण ह्मणाले ' घराच्या बांदोडींत ह्म० प्रपंचाच्या कैदखान्यांत सांपडलेल्यांना तुमचें दर्शन दुर्लभ आहे

१ पाहतां. २ ओवाळणें. ३ कृष्ण, कान्हा. ४ चतुर्भुज ५ बळकट, सदृढ. ६ प्राप्ति, लाभ ७ अपूर्वता. ८ शुद्ध. ९ पुन्हां, शिवाय. १० कवीचा आत्मप्रत्यय येथें व्यक्त आहे. ११ ह्मणून. १२ स्थान १३ भरास आली. १४ बिनमोल.

ह्मणून आजचा दिवस आम्हांला धन्य वाटतो ! यादवांचा दैवद्रुम फळला ह्मणून तुमचें आगमन झालें. तुमच्या दर्शनानें येथून यादवांचें पुढें भलें होणार ऐसें आह्मां जाणवलें !'

चंद्र निववी जगातें । मेघो वरुषे अमृतातें ।
तेवीं साधु आपणेयातें । दाखविती स्वभावतूं ॥ ७१ ॥
साधुसंगाचेनि भांडवलें । ज्ञानमार्गाचा व्येवसा ३० फळे ।
जो न जोडे पुण्यांचेनि बळें । ब्रह्मादिकांसी ॥ ७३ ॥

ह्या गोड सत्कारानें नारद चकित झाले व 'काइसें मानाचें ओझें । मी दासु किंकरु तुझें । देविका-ताटकाढा हे ब्रीदु माझें । तिहीं लोकीं' ॥ ७६ ॥ देवकीच्या घरचा उष्टी काढणारा मी ! हे चैतन्यगिरिदुर्गीच्या राया ! 'अठरा पुराणांचे डोळे । तूतें पातां ( पाहतां ) जाले आंधळे ।' वेद, पुराणें, आगम, काव्यें हे तुला पाहूं शकत नाहींत. आम्हांला वेदाची आशा–' जया वेदांची आज्ञा आशु । तेयां गिवसितां जाले सायासु !' तूं 'मानुषपणाची बुंथी' घेतलीस पण 'ब्रह्मगोळकांच्या माळा' तुझ्या गळ्यांत ! असा तूं देवाधिदेव आहेस.

तुआं स्नेह सांडिलें । तरी जळों हें जिआलें[१] ।
आणिकें भणती[२] आपुलें । तें काई करावें ? ॥ १०१ ॥
तूं पिता जालासी । फुन लॉळउँनि[३] कहीं न बोलाविसी ।
तें दुःख मनावाचेसी । अनुवादवेना ॥ १०२ ॥
तूं निर्गुण गुणसागरू । साकार सांतां[४] निराकारू ।
तुझा करी नये निरधारू । कव्हणीपरी ॥ १०८ ॥
तुझा उजूं[५] दिठिवा[६] पडे । तेचि जीवा तूंसी भेटी घडे ।
एऱ्हवीं होतु का पुण्याचें गाडे । तेणें कांहीं नोहे ॥ ११४ ॥

हें गंभीर भाषण झाल्यावर उद्धवाचा व नारदाचा विनोद झालाः—

१ जीवित. २ म्हणती. ३ प्रेमानें. ४ असतां. ५ सरळ. ६ कृपादृष्टि.

उद्धवः—नारदा! तें असो, पण आतां 'तुम्ही आलेति कवणे काजे' कांहीं कोठें 'झुंज भांडण' लावलेंत काय ? त्यावांचून तुह्मांला करमायचें नाहीं, जेवणसुद्धां सुचायचें नाहीं ! 'कळीवांचून काळ व्यर्थ जात आहे !' 'तुमतें एता देखिले। तैंचि माझा जीवें धुस गेलें। कांहीं सांघाल उद्देलें। हें जाणवेना !'

नारदः--तुम्ही थोर. 'धुराचां ठायीं ऐसें बोलणें। हें तुम्हां साजे मंत्रिपणें !' मुत्सद्दी पडलेत म्हणून मालकाच्या समोर तुम्हांला असें बोलवलें ! 'आमुतें म्हणतां कळिलावे। तरी आम्ही काइसेआं बोलावें !' कळिलावे म्हणतां, मग बोलाच कशाला ? बरें न बोलावें 'तरी आमुचें पोटु फुगे। न बोलतां !' नारद लावालावी करणारा असें सारे म्हणतात, म्हणून आम्ही कैलासाला जाणें सोडलें ! एकदा मी कैलासाला सहज गेलों होतों तेव्हां हा कळिलावा आला याला बांधून टाका असें लोक म्हणाले. तेव्हां मी तेथून पळालों व तापसी होऊन वाराणशीस आलों व जप करीत राहिलों ! चाहाडाला चाहाडी आवडते, ब्रह्मविद्या थोडीच आवडायचीय ! चाहडी म्हणजे पापाचा मार्ग. आतां विचार केला आहे कीं 'तनु जाली म्हातारी । जियावें दीसु दोनीचाऱ्ही। तंव भणावें हरि हरि। माणिकर्णिकेसी।' हो ! एके दिवशीं माणिकर्णिकेवर मी जप करीत बसलों असतांना तेथें शिशुपाळ आला व त्यानें विश्वेश्वरापाशीं अनेक तापसी मारले, 'ते वेळीं मी पळालां । जीवु घेऊनी ॥ पळतु पळतु पाचारी । एके हातीं नीरी धरी । तेवीचि भणें हरि हरि। जीवाभेणू ॥ १४३ ॥ भणतू नारायणु। पळालां सार्ध योजनु मग केलें संध्यावंदनु। सायंकाळीचें ॥ १४४ ॥ दैवें देह वांचलें । भणौनि हे चरण देखिले। आतां माझें विणविलें। अवधारिजे ॥१४५॥' यानंतर नारदानें कृष्णाच्या कंसवधादि वीरकृत्यांची व अवतारहेतूची श्रीकृष्णास आठवण देऊन शिशुपालास मारण्याची सूचना केली व आपण निघून गेले ! श्रीकृष्णांनीं सभा विसर्जन केली व ते रुक्मिणीच्या महालाकडे निघाले.

मागील शांतरसाच्या गोड प्रसंगानंतर त्याच्या पाठोपाठ हा व या तऱ्हेचा विनोद उचित आहे कीं कसें याचा वाचकांनीं विचार करावा! ही एक प्राचीन ‘नाट्यछटा’ आहे!

पुढें शृंगारमिश्र हास्यविनोदरसाची लयलूट आहे. त्यांत पाल्हाळ कमी असता तर बरें होतें. राणिवसाचें चित्र मात्र हुबेहुब काढलें आहे, शृंगारपरिपोषक भाषणेंही चांगलीं वठलीं आहेत, पण पहिलें गांभीर्य येथें नसून आपण हे एखाद्या नाटकांतले चार दोन प्रवेश पाहत आहोंत कीं काय असा भास होतो! एकदम् ‘सीन’ बदलतो. मनांत येतें कीं भास्करकवीनें हा ग्रंथ ओवीवृत्तांत न लिहितां त्याचें नाटक बनविलें असतें तर तें फार चांगलें झालें असतें! पण कवीचें हृदय कृष्णभक्तीनें भरलेलें असल्यामुळें त्याला प्रस्तुत विषयावर नाटक लिहिणें सुचलें नसावें, बाकी संस्कृत नाटकांचा, चंपूंचा व महाकाव्यांचा त्याचा अभ्यास अध्यात्मापेक्षा फार दांडगा होता एवढें मात्र ह्या काव्यावरून स्पष्ट दिसतें.

कृष्ण भीमकाच्या मंदिरानजिक आले तों दासींची धांदल व सखींचा विनोद चालला होता. लीलावती, प्रबोधावती, कमळावती! तो रुक्मिणीचा कोप, सख्यांचें सांत्वन व धीर देणें, कृष्ण आले ही वार्ता कानीं येतांच रुक्मिणी ‘आपुलेनि शहाणपणें। आंगीचे सात्विकु (अष्ट सात्विकभाव) लपवूं जाणे। फुन चोळी ताणताये जेणें। तो भाऊॅ (भावो) लपवेना ॥ १८९ ॥ ही तिची मदनाक्रांत स्थिति, पुढें रुक्मिणीकृष्णांचा विनोद, इ० भाग आहे पण त्यांत प्रौढी फारच कमी आहे!

कृष्ण—‘आह्मां विषयांचा विटाळु सदा। भणौनि न विसंबों ब्रह्मपदा’ उर्वशी स्वयंवराला आली तेव्हां तिलाही परत पाठविली, पण काय बुद्धि झाली, हिला भाळलों! तो ‘एक साबडा ब्राह्मण’(सुदेव) आला. त्याला ‘हो ह्मटलें’ अन् ही गळ्यांत पडली! ‘एऱ्हवीं ऐसीं माकडें। आह्मां कां लागती!’

रुक्मिणीः—पहा हो याचें बोलणें! ‘मातें माकड केलें एणें।

मागील शांतरसाच्या गोड प्रसंगानंतर त्याच्या पाठोपाठ हा व या तऱ्हेचा विनोद उचित आहे कीं कसें याचा वाचकांनीं विचार करावा! ही एक प्राचीन ‘ नाट्यछटा ’ आहे !

पुढें शृंगारमिश्र हास्यविनोदरसाची लयलूट आहे. त्यांत पाल्हाळ कमी असता तर बरें होतें. राणिवसाचें चित्र मात्र हुबेहुब काढलें आहे, शृंगारपरिपोषक भाषणेंही चांगलीं वठलीं आहेत, पण पहिलें गांभीर्य येथें नसून आपण हे एखाद्या नाटकांतले चार दोन प्रवेश पाहत आहोंत कीं काय असा भास होतो ! एकदम् ‘सीन’ बदलतो. मनांत येतें कीं भास्करकवीनें हा ग्रंथ ओवीवृत्तांत न लिहितां त्याचें नाटक बनविलें असतें तर तें फार चांगलें झालें असतें ! पण कवीचें हृदय कृष्णभक्तीनें भरलेलें असल्यामुळें त्याला प्रस्तुत विषयावर नाटक लिहिणें सुचलें नसावें, बाकी संस्कृत नाटकांचा, चंपूंचा व महाकाव्यांचा त्याचा अभ्यास अध्यात्मापेक्षा फार दांडगा होता एवढें मात्र ह्या काव्यावरून स्पष्ट दिसतें.

कृष्ण भीमकाच्या मंदिरानजिक आले तों दासींची धांदल व सखींचा विनोद चालला होता. लीलावती, प्रबोधावती, कमळावती ! तो रुक्मिणीचा कोप, सख्यांचें सांत्वन व धीर देणें, कृष्ण आले ही वार्ता कानीं येतांच रुक्मिणी ‘आपुलेनि शहाणपणें । आंगीचे सात्विकु (अष्ट सात्विकभाव ) लपवूं जाणे । फुन चोळी ताणताये जेणें । तो भाऊॅ ( भावो ) लपवेना ॥ १८९ ॥ ही तिची मदनाक्रांत स्थिति, पुढें रुक्मिणीकृष्णांचा विनोद, इ० भाग आहे पण त्यांत प्रौढी फारच कमी आहे !

**कृष्ण**—‘ आह्मां विषयांचा विटाळु सदा । भणौनि न विसंबों ब्रह्मपदा ’ उर्वशी स्वयंवराला आली तेव्हां तिलाही परत पाठविली, पण काय बुद्धि झाली, हिला भाळलों ! तो ‘ एक साबडा ब्राह्मण ’( सुदेव ) आला. त्याला ‘ हो ह्मटलें ’ अन् ही गळ्यांत पडली ! ‘ एऱ्हवीं ऐसीं माकडें । आह्मां कां लागती ! ’

**रुक्मिणीः**—पहा हो याचें बोलणें ! ‘ मातें माकड केलें एणें ।

आपुली से नाहीं ! ' गोकुळांत वाढला म्हणून याला कोणी आपली लेक देईना, ' तेया उर्वशी स्वयंवरा आली: वदतां लाज नाहीं ! ' ताक विकीतिया गौळणी, त्यांतही कोणी याला पत्करीना ! 'आंगा आठुवरपण (निबरपण ? ) आलें, तेव्हां ' नंदें लग्न लावलें । तुळशीसी !' पण तुळस काय ? झाड ! 'आपुलिये इच्छे भुंजों नये ' तेव्हां ' रानीं हिंडतां पाहे । गौळणीतें ! 'ययासी कुळ ना ज्ञाती । रूप ना संपत्ती । गाईराखैयाचिया परौती । वृत्ति नाहीं !' भगवंता ! मी ' कासौटेकारां कैसी वरपडी झाले !'–ह्या लंगोट्याच्या गळ्यांत कोठून पडले ! ' शिहाना नाहीं दादापरता'–माझ्या लग्नाला मोडा घालणारा दादा-त्याच्यापेक्षां शाहणा खरेंच कोणी नाहीं !

**कृष्णः—' आह्मी कासोटेकार भिकारी । तो राजकुमरू तूं सुंदरी ।
दोघे नांदतां सेजारी । भली दिसतीति ॥ २१४ ॥**

**रुक्मिणीः** काय हो हें बोलणें ! 'कैसी घालिताए गरळें । काळकूटाचीं !' कसलीं माणसं हीं, व्यर्थ तोंडाचें पाप करितात.

'श्रीकृष्ण तवंकले ( चमकले )' माच्यावरून एकदम उठले व जायला निघाले तेव्हां रुक्मिणीच्या सख्या ' गोसावी निगाले । बुझावी वहिली'– अगोदर त्यांची समजूत पाडा, असें तिला ह्मणाल्या. ती ह्मणाली 'तुह्मांला गोमाशा लागल्या तर तुह्मीच त्या वारा, जा !' अरुणावती रुक्मिणीचा राग शमवूं लागली. कुमुदहंसिनी त्यांत धीट होती. रुक्मिणीची कामातुरता ओळखून ती ह्मणाली ' तूं मोठीच शहाणी दिसतेस ! ' हे चोळी गेली उतटोनि ' तेव्हांच मी ओळखलें. ' कंपू लपविसी आंगीचा । स्वेदु पुससी कपोळीचा । ऐसेनी भावो उचंबळला मनीचा । तेआं तूं काई करिसी ?' ( २२६ ). सखीच्या बोलानें वैदर्भबाळी वरमली, ' मग पायां पडों लागैली । प्राणेश्वराच्या' ॥ तिनें ' सखिया पाठवणी दिधली–' सख्यांना दूर लावून दिलें व रात्र संभोगसुखांत घातली !

नर्मभाषणाचा जो प्रकार वर वर्णिला आहे त्यांत मर्यादेचें उल्लंघन झालेलें आहे. या हास्यविनोदांत हलकेपणा दिसतो, उच्चसंस्कृतीला हा

विनोद शोभण्यासारखा नाहीं. हा दोष अर्थात् कृष्णरुक्मिणींचा नाहीं, भास्करकवीचा आहे! तशांत कृष्णरुक्मिणी म्हणजे उपास्य देव! मायबापांचा शृंगारविनोद आधीं वर्णन करणें हा दोष, व असल्या हलक्या भाषेनें तो सांगणें हा तर महादोष आहे.

यापुढचा एक भाग मात्र रमणीय आहे. धर्मानें राजसूययाग आरंभिला व कृष्णाला सत्कारानें नेण्यासाठीं मोठी सेना व वीरमंडळ पाठविलें. त्यांचा नायक वीरचूड. तो यादवांच्या राजधानीस आला. त्यानें 'शिल्पविद्येची अधिष्ठात्री देवता' अशी ती द्वारका पाहिली. द्वारकेचें, द्वारकेच्या परिसरांतील उपवनांचें, त्यांतील पशुपक्ष्यांचें व श्रीकृष्णरूपाचें वर्णन हीं काव्यात्मक वर्णनें मनोहर अशीं साधलीं आहेत (ओवी २३३-४३०). द्वारकानगरी दुरून पाहतांच 'कां ही दिव्यतेजाची मांदूस उघडली, कां विश्वप्रकाशांची पेटी फुटली, कां समुद्रांतील नवरत्नांची खाण लागली, कां समुद्रांत हें वैकुंठ प्रतिबिंबलें' असें त्या वीरचूडास होऊन गेलें. तो द्वारकेचें ऐश्वर्य व शोभा पाहून भांबावला. 'तेथें सतरा शतें उद्यानु। तीनी सहस्रें उपवनु'—सर्वच एकापेक्षां एक दिव्य! तेथें 'सदा साही ऋतूंचा मेळावा' होता! चंदनतरूची सावली, कोकिळांचा कलकलाट— 'जो आइकिलेयां होय हृदयस्फोटु। विरहियांसी!' वसंत तर तेथें जडा उपजवी कामकळा' असा उद्दामपणा आणीत असे. राजकुमरी काकुळतीस येऊन फुलांच्यासेजारी लपूं गेल्या तों त्या मदनशरांनीं विद्ध झाल्या!

**माधवी मंडपाचां सेजारी। योगियांतें झळंबी कामुलहरी।**
**ते विषयांची भूलि संसारीं। कवणां न ठके ?॥ २७७॥**
**बापू रे चोज। कैसें माजिरें पुष्परज।**
**कोन्ही कोन्हाची न धरी लाज। जग पिसें जालें॥ २७८॥**
**ऐसी कवणी ते मानिनी। जे न मनी बुझावनी।**
**आपैसेयां लागेना चरणीं। प्राणेश्वराचां ?॥ २७९॥**

'मदनमोगऱ्याची मकरंदमदिरा' पिऊन मधुकर 'रुंझी घालिताती.'

उद्यानांतील वृक्षांतही येथें मदनसंचार झाल्याचें वर्णन आहे ! आंबा, कुरबक, अशोक, बकुळ, पुंनांग, नागचाफा, पोफळी, नारंगी, जांब, द्राक्ष, वाटोगरें (वटमोगरे ?), पार्जातक, मांदार, इ० वृक्षांच्या वर्णनांतही कवीनें खच्चून शृंगार भरला आहे ! ' बापु कामाचें पिसें । झाडां लागलें ' असें कविदृष्टीला दिसलें ! असो. ' रत्नें विकिती कवडेनि । आळोआळीयां चिंतामणी !' अशी द्वारकेची अफाट संपत्ति पाहून बिचारा वीरचूड वेडा झाला. ' आंगणांचेनि चोखाळपणें । प्रतिबिंबली तारांगणें। तियें फुलें भणौनि शिहाणे । वेंचों धांवती ' ॥ ३४३ ॥ अशी एखादी बहारीची अतिशयोक्ति मधूनमधून चमकते. वीरचूड धर्मसभेंत जेव्हां शिरला तेव्हां त्याला तेथें काय दिसलें ? ' तेथें गातीं वातीं । वाणितीं वाखाणितीं । दिसतीं पात्रें नाचतीं । मेणिकेऐसी ॥ ३४९ ॥ वक्ते वार्तिकू । रसाळें पुराणिकू । विडंबती तार्किकू । महाविद्यांतें ॥३५०॥ साहित्याचेनि परागें उटिजे । शृंगाराचेनि पाणियें न्हाणिजे । तें कवित्व कानीं आइकिजे । महाकवींचें ॥ ३५१ ॥' त्या सभेंत वाहणधरू, चवरधरू, भांडारी, गुपितिये ( गुप्त हेर ), मातुसांगते ( गोष्टी सांगणारे ) हे रायाजवळ होते.

परमानंदाची फळी । चैतन्यें घडिली ।
ते केंवि वाणिजे बोलीं । श्रीकृष्णमूर्ति ॥ ३६७ ॥
देखौनि श्रीमूर्ति उघडी । ब्रह्मविद्या डोळे मोडी ।
मुक्ति धांवे उघडी । पाठोपाठीं ॥ ३७२ ॥
आगांचा मेळाॐ देखिजे । तरि मदनाची कुरवंडी कीजे ।
लावण्याचे उतरिजे । निंबलोण ॥ ३७३ ॥
कीं तें मुक्तीचें वश्यकरण । कीं ब्रह्मविद्ये अनुरागाचें ध्यान ।
कीं चरतें मोक्षनिधान । मोहांधकारीं ॥ ३८१ ॥

श्रीकृष्णाचें तें परमसुंदर रूप पाहून ' पुरुषां उपजती डोहळे । कामिनीपणाचें !' असें कवि म्हणतो. पुढें श्रीकृष्णाच्या अंगप्रत्यंगाचें सविस्तर वर्णन कवीनें केलें आहे तें सर्वच चित्तवेधक आहे; ध्यानयोग्य

आहे. रातोत्पलाच्या पाकळ्यासारखे त्याचे सुंदर चरणकमळ, इंद्रनीळ पांचासारखी त्याची दिव्य अंगकांति, केळीसारख्या त्याच्या मांड्या, कैवल्यसरोवरासारखें गंभीर वक्षस्थळ, रविमंडळाभंवतीच्या तारांगणांसारखे कौस्तुभाजवळचे ते एकावळीचे तेजःपुंज मोतीं, मुदियाचे हिरे, व त्याचा चंद्रबिंबतुल्य प्रसन्न मुखचंद्रमा, पवळ्यांच्या प्रभेनें शोभलेल्या चंद्रबिंबासारखें त्याचें मधुरस्मित, त्या विश्वजननयनमनोहर मूर्तीचें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे! त्याचे डोळे, त्याचे कटाक्ष, त्याच्या भिंवया, त्याचा ल्लाटप्रदेश, त्याच्या कपाळावरील हरिचंदनाचा अर्धचंद्राकार टिळा, हें सर्व पाहून वीरचूड अत्यंत विस्मित झाला. त्यानें कृष्णाचें स्तवन केलें व आपल्या आगमनाचा हेतु सांगितला. 'स्थूळासूक्ष्मावेगळा । तूं कैवल्याचा पुतळा । तेणें तुवां मायावेषु धरिला । कृपावशें. ' धर्माच्या राजसूययज्ञाला जायचें किंवा आधी शिशुपाळाचा निःपात करायचा याविषयीं श्रीकृष्णानें बळरामास प्रश्न केला. तेव्हां शत्रूचा संहार आधी केला पाहिजे हें बळिभद्रानें सांगितलें. त्याप्रसंगीच्या ओव्या क्षात्रधर्मोचित व मार्मिक आहेत:—

**तंव बळिभद्रें म्हणितलें । आम्हां होंचि प्रत्यया आलें ।**
**जे चालावें सर्वदळें । शिशुपालावरी ॥ ४६७ ॥**
**व्याधी आणि वैरी । अें ( इयें ) कोंवळीं जवचिवेऱ्हीं ।**
**तंव तोडावीं सर्वप्रकारीं । जाणतेनी[1] ॥ ४६९ ॥**
**वैरी सरिसा जिये । तरि निद्रा कैसेनि ये ।**
**लांबतिये सुरियें । केवि लाजिजेनु ॥ ४७० ॥**
**राया राणिवेचा जाला । जरि घे लोहाचा कांटाळा**
**तरि क्षत्रियाचियां कुळां । बोलू लागे ॥ ४७१ ॥**
**नातरी राणीव सांडावी । कापडें भगवावीं ।**
**वाराणसी सेवावी । तापसां होऊनी ! ॥ ४७५ ॥**

---

१ ही ओवी कालिदासाच्या ' मालविकाग्निमित्र ' नाटकांतील एका श्लोकाचें भाषांतर आहे.

बळरामदादाचें ह्मणणें पडलें कीं "शत्रु आणि रोग प्रबळ झाले नाहींत तोंवर त्यांना ठेंचून टाकलें पाहिजे. वैरी समीप जिवंत आहे तोंवर सुखाची झोप कशी येईल ? शत्रूनें मारायला सुरी उपसली असतांना भीड काय कामाची ? राजा राज्याचा स्वामी झाला आणि राज्यरक्षणार्थ जर शस्त्र धरण्यांत आळस करील तर त्याच्या क्षत्रियत्वाला कमीपणा येईल. त्याला शस्त्र नको असेल तर त्यानें राज्य सोडावें, भगवीं वस्त्रें अंगावर घ्यावीं आणि तापस होऊन काशीस जाऊन राहावें !" दादाचें हें ठसकेदार बोलणें कृष्णाला आवडलें. त्यानें मग उद्धवाला सल्ला विचारला 'राजसूययज्ञाला जावें, जातां जातां भीमाकरवीं जरासंधाचा कांटा काढावा आणि मग शिशुपालाचा समाचार घ्यावा. राजसूययज्ञाच्या वेळीं सारे राजे आयतेच जमतील, त्यांत आपले परावे निवडूं येतील, तेथें शिशुपालही येईल, धर्म अग्रपूजा तुमचीच करील, त्याचें त्याला वैषम्य वाटेल, कटकट उभी राहील, शिशुपालाला तुम्ही माराल' असा मंत्र उद्धवानें दिला व तोच सर्वांस पसंत झाला. 'दिग्गजां पांडवांकरवीं। रिपूंची अवधी तोडावी। कांटिया कांटी झाडावी। बाहेरीबाहेरी' या उद्धवाच्या मताप्रमाणें अखेर श्रीकृष्ण सैन्यानिशीं निघाले.

**तंव डौंडीची वीरघंटाः। सनसनिती जेंगटाः**
**वाजिताती एकदटाः। एकेवेळे ॥ ५२२ ॥**
**तरारिती काहाळाः घुरघुरिती टिवाळाः**
**रणभयासुरा ढोलां। मेरू थरारी ॥ ५२३ ॥**
**डुमडुमिती बोंबतियाः घनघनिती तांबकियाः**
**खिनखिनिती तुररियाः खरसिंगेसी ॥ ५२४ ॥**
**डमडमितिया हुडुकांः कडकडितिया शंखाः**
**वाजतां ब्रह्मगोळकाः तढा तुटतसे ॥ ५२५ ॥**
**ढवस पढहो भेरीः रायें गिडगिडिया रणमोहरींः**
**निशानाचा गजरीं। आकाशु फुटे ॥ ५२६ ॥**

फडफडिती उपरगुढियाः फूजिती वाघवडाइयाः
डोलती पढवळकाठियाः चहूंकडे ॥ ५२७ ॥
लफलफिती महा पड । फगफगिती टके निवाडः
फेंपारती कुंचे जंवदंड । दळवेयांचे ॥ ५२८ ॥

ह्यांत रणवाद्यें, निशाणें वगैरेंचें वर्णन आहे. जेंगट, कहाळ, निशान, ढोल, शंख, भेरी, उपरगुढिया ( निशाणें ), टके हे शब्द आपल्या साधारण परिचयाचे आहेत; पण बाकीच्या शब्दांचा व अर्थवाहक क्रियापदांचा आपणांस मौज वाटण्यापलीकडे कांहीं अर्थबोध होत नाहीं, तरी वीररसाचा आविर्भाव या शब्दांत आहे हें मात्र पटतें !

असो. 'सैन्यें पृथिवी दाटली', असंख्य गजरथतुरंगमांच्या टापांनीं उडालेला 'धुरौळा गेला अंतराळीं । सत्यलोकुवेऱ्हीं.' अक्रूर सर्वांचे पुढें चालला. त्याचे मागें सात्यकी व उग्रसेन. 'जो पाताळफणींद्रू । कोपें काळाग्निरुद्रू । तो चाले बाळिभद्रु । डाविये भुजे.' कृष्ण मध्यें व पाठीमागें इतर वीर. देव यमुनातीरीं इंद्रप्रस्थास आले. युधिष्ठिरप्रमुख पांडवांनीं त्यांचा सप्रेम सत्कार केला. नगरीनें मोठा उत्साह केला. परमानंदाचा सुकाळ झाला. 'घोसाळा कांकणांचे हातीं । नारी सडे घालिताती'–टप्पुऱ्या हिऱ्यामोत्यांचीं कांकणें ज्यांच्या हातांत अशा थोरामोठ्यांच्या बायकांनीं सडे घातले. 'रांगवळ्या घातल्या' 'गुढिया उभिलिया घरोघरीं.' 'मखरें तोरणें' बांधलीं. कृष्णदर्शनार्थ नगरी परमोत्कंठित झाली. 'रत्नांच्या चित्रशाळा' अशा राजस्त्रिया गच्चीवरून पाहत उभ्या राहिल्या. नरनारी आनंदोत्फुल्ल झाल्या. 'प्रेमभरें वेडैली । मनें आलिंगावया धांविन्नली' अशी स्त्रियांची धांदल उडाली. हें वर्णन येथें फार विस्तृत केलेलें आहे. 'रतिदूतिका, नृत्यनायिका,नाट्यचंद्रिका'–यांची कोण गर्दी!राजसूययज्ञाच्या पूर्वतयारीसाठीं धर्मानें भीमास पूर्वदिशेस व अर्जुनास उत्तरदिशेस धाडले होते. सर्व वीर विजयी होऊन आले. मग श्रीकृष्ण भीमार्जुनास घेऊन जरासंधवधास गेले. इकडे कृष्णस्त्रियांना विरहावस्था अतिदुर्धर झाली. 'सोळा सहस्र अंतःपुरः

तेतुलेया नाना उपचारः तें सांगतां स्थळ होईल अपारः तरि रसु आवरेना ' ॥ ७५३ ॥ कवीचा आवडता रस शृंगार ! तो विषय त्याला पुन्हा मिळतांच त्याची वाणी तिकडे वाहवली ! रुक्मिणीची विरहावस्था, तिचे उपचार, तिच्या मैत्रिणी—रत्नावलि, भूतसमुद्रावलि, प्रबोधावति, प्रेमतरंगिणी, कुमदललिता इत्यादिकींशीं तिनें काढलेले प्रेमालाप, रुसवे, सांत्वनें यांत कवीनें पुन्हां शंभर ओव्या खर्च केल्या आहेत ! रुक्मिणीची मूर्छा व सावध होणें यांत तिच्या मैत्रिणी गुंगल्या. इतका विस्तार करून कवि म्हणतो कीं रुक्मिणीच्या विरहदुःखाचें वर्णन मी अधिक केलें असतें पण श्रोत्यांचींहीं अंतःकरणें दुःखावेगानें विरून जातील म्हणून आवरतें घेतों ! ' जगासी विरहावस्था होईल नवी । रसाळपणें ' म्हणून कवीला बिचाऱ्या जगाची कींव आली आहे ! इकडे भीमाकरवी जरासंधाला मारून श्रीकृष्ण परत आल्यावर राजसूययागाला आरंभ झाला. श्रीकृष्णाला ' अग्रपूजेचा मान ' मिळतांच शिशुपाळ खवळला. त्यानें कृष्णाची निंदा केली. ती सहन न होऊन पांडव युद्धाला प्रवृत्त झाले. श्रीकृष्णाच्या फौजा व शल्याशिशुपाळांच्या फौजा यांच्यांत घनघोर युद्ध झालें, व शेवटीं कृष्णाच्या हातानें शिशुपाळाचा वध झाला. ज्योतींत ज्योति मिसळली व काव्य संपलें. शेवटच्या दोनशें ओव्यांत वीररस चांगला साधला आहे, मात्र वीरांच्या प्रौढीच्या भाषणांत विशेषशी प्रौढी नाहीं ! श्रीकृष्ण ज्या घोड्यावर बसले त्या घोड्याची वीरश्री नामी वर्णिली आहे. खवळलेला कृतांत किंवा उठावलेला महाकाळ अशा त्या घोड्याच्या अंगांत श्रीकृष्णाची वीरश्री संचरली व ' समुद्रीचें तारूं ' तसा तो शत्रुसेनेंत वेगानें चालला:—

**वेल्हावती( लांब ) टापु घाली: चामके मागिलीं दोचि पाउलीं:**
**पुढिलें खरपुटें ठेवी कुंभस्थळीं: दिग्गजांचां ॥ १००७ ॥**

**रागां दाटलेयां उसळें: सूर्यमंडळापरौता चौताळे:**
**परी वरिचावरी घे संवफळें: दिग्गजांसी ॥ १००८ ॥**

**जोड करितां खरपुटीं: तोडौनि अरिशिरें गोमटीं:**
**जैसा रेवांता धूर्जेटी: पूजा बांधितुसे ॥ १००९ ॥**

आतां शेवटीं वीररसात्मक वर्णनाच्या कांहीं सुंदर ओव्या देऊन ह्या काव्याची रजा घेतों:—

**उठविले असिवारू ( घोडेस्वार ): जैसै काळकूटाचें धुधुकारू:**
**तैसे पायाचे मोगरू ( पायदळाचे नायक ): निगताती ॥ ९३२ ॥**
**ना ते प्रळयानिळाचें धांवणें: कीं काळाचें आमंत्रणें:**
**देयावया निगाले मी भणें ( म्हणे ): शिशुपाळासी ॥ ९३३ ॥**
**हातियारांचेनि खडाडें: खांडा (तलवारीस) कीकसु (तुकडे) पडे:**
**चौमेरीं लोळविताती धडे: तेथ खिची थोर जाली ॥ ९५ ॥**
**ते ( राउत ) झुंझूं सांगों कैसे: तुटौनि पडती शिसें:**
**रोंडे झुंझेति आवेशें : खंडविखंडीं ॥ ९७२ ॥**
**मोडलेचि न मोडेती: खोंचलेचि न खोंचेती:**
**कव्हणी कव्हणा न लोटिती: तेथ खिची थोर जाली ॥ ७३ ॥**
**रणकर्कशें भयासुरें: बोंबाती मुडदरें:**
**सातां पाताळांचे दरे: थरथरताती ॥ १८५० ॥**

## ५ भास्कराचा एकादशस्कंध.

शिशुपालवध हा ग्रंथ लिहून झाल्यावर भास्करकवीनें आपला गुरुबंधु भावे व्यास यास तो समग्र वाचून दाखविला. तेव्हां भावे व्यास “ भट्टो हा ग्रंथु निका जाला असे: परि निवृत्ताजोगा नव्हेचि: हा शृंगारियां प्रवृत्तांजोगा जाला असे ” असें मार्मिकपणें म्हणाला. यानंतर भास्करकवीनें भागवताच्या एकादशस्कंधावर ‘ उत्तरगीता ’ नामक टीका लिहिली. ही त्यानें सिंह्यशिखरीं मातापूर उर्फ माहूर येथें आरंभिली व रामदरा येथें पूर्ण केली. ग्रंथारंभीं कवि म्हणतो: ‘प्रथम वोवीबन्द्व शिशुपालवध हा ग्रंथ केला तो देवव्यासी निराकारिला कां पा विरक्तायोग्य नव्हे मग रामदराक्षेत्रीं ( बीड परगण्यांत ) एकादशु ग्रंथ केला. ’ पहिला ग्रंथ विरक्ता-

योग्य नव्हे असा भावेव्यास यांनीं योग्य अभिप्राय दिला तरी ' इतर विद्वांस तो परमार्थउत्थापनप्रवर्तनी आहे' असें म्हणाल्याचें भास्करकवीनें सांगितलें आहेच! असो ' एकादशु ग्रंथाच्या ' मंगलाचरणांत ' नमीन यादवकुळतिळकु। जो चैतन्यलताकुसुमस्तबकु। उदैला आनंदमृगांकु। मोहांधकारी ' याप्रमाणें श्रीकृष्णास वंदन करून कवि ' शांतरसु बोलावया ' प्रवृत्त झाला आहे. ' प्रमेय ' आणि ' साहित्य ' हें दोनी जर एकत्र आणले तर ' कवितावश्यकरण। कवणासी नव्हे ? ' एकादशस्कंधावर भास्करकवीनें ८२७ ओव्या रचल्या आहेत. ग्रंथांत कवीनें ग्रंथरचनेचा काल दिला नाहीं, तथापि तो शके ११९८ आहे असें ह्मणतात. ग्रंथ लहानच आहे व मूळ एकादश-स्कंधाच्या मानानें तुटपुंजा आहे, अगदीं त्रोटक आहे. एकादशांतील बहारीचे विषय यांत आलेच नाहींत! एकादशावर सर्वांगसुंदर टीका ह्मणजे एकनाथांची; पण तो ग्रंथ मराठींत अवतरण्याच्या ३०० वर्षे अगोदर हा छोटा ग्रंथ निर्माण झाला हाच याचा विशेष आहे. शिशुपालव-धाची काव्यमाधुरी यांत नाहीं तथापि त्यापेक्षा हा सुबोध व सुगम आहे. याची ओवी सहजासहजी समजण्यासारखी आहे. मूळ एकादशांतील तत्त्वबोध किंवा भक्तीची लयलूट भास्कराच्या ह्या ग्रंथांत नाहीं. हा संन्या-शाच्या उपयोगासाठींच लिहिलेला दिसतो! पहिल्या ग्रंथांत शृंगाराचा अतिरेक तर ह्या दुसऱ्यांत स्त्रीविषयाची तितकीच निंदा! हे दोन ग्रंथ दोन टोंकाचे आहेत! पुरुरवा अगदीं पागल होऊन नागवाच उर्वशीच्या मागें लागला, तिचे त्यानें आर्जव केलें, 'सवेंचि विरहानळें। सर्वांग कवळलें। चैतन्य मुसावलें। प्राणकळिके—आंतु ', आणि ती याला टाकून गेली तेव्हां ' स्त्रियेचा विश्वास मानसीं। कवणीं न करावा ' हा उजेड त्याच्या मनांत पडला! मग काय ? मग स्त्रियांची सडकून निंदा! " हे कपटाची कसवटी। अनृत्याची महावटी। ना हे उकलली पुटी। क्रोधभुजंगाची ॥ ७५५ ॥ हे पापाची उत्तरवेठ। नरकाची राजवाट। मुक्तीचे वज्रकपाट कामिनी हे ॥ ७५६ ॥ दुर्गंधीचे टाकशाळे। अमेध्याचे मोप पडिले।

तया नांव ठेविलें । स्त्री ऐसें ! ॥७५७॥ अस्थीचा पुंजा, गुंडाळिला मज्जा, शोणिताचा बोझा"–नको तें हिडिस वर्णन. महानुभावांच्या या अतिरेकाच्या वैराग्याला आणि संन्यासधर्माच्या मिथ्या कल्पनांना कंटाळून स्त्रीवर्गानें त्यावर बहिष्कारच टाकला असला पाहिजे !

एकादशस्कंद हा कृष्णोद्धवसंवादरूप आहे. श्रीकृष्ण निजधामास जाणार हें ऐकून उद्धवास विरहावस्था झाली व कृष्णानें त्याचें सांत्वन केलें, या उपोद्धातावरच २५० ओव्या खर्ची पडल्या आहेत. ह्या विरहवर्णनांत दुःखसंवेदनेपेक्षां काव्यकल्पनाच अधिक उठावदार दिसते. पुढें दत्तात्रेयांनीं २४ गुरु केले तो कथाभाग २५० ओव्यांत दिला आहे. त्यांत पिंगळाख्यानानंतर ऋष्यशृंगाचीही कथा कवीनें पदरची सांगितली आहे. 'पुरुषाचेनि संबंधे स्त्री पिंगळा विकरली (विकार पावली)' तर पुरुषच स्त्रीच्या उद्धाराला विघ्नरूप आहे असें कोणास वाटेल, ह्मणून 'स्त्रियेचेन संबंधे पुरुष ऋष्यशृंग विकरला ह्मणून तोही सांगितला. एवं उभय साधनवंतांसी परस्परें एकेक विघ्नत्व असे ऐसें जाणावे' अशी कवीश्वरांची यावर स्वतःची टीप आहे ! स्त्रीपुरुष परस्परांस मोक्षमार्गी विघ्नरूप आहेत ह्मणून पुरुषानें स्त्रीचा व स्त्रीनें पुरुषाचा सर्वस्वी त्याग करून संन्यासच घेतला पाहिजे असा महानुभावपंथाचा जो एक जगद्विलक्षण सिद्धांत आहे तो या ग्रंथांच्या द्वारें भास्करकवीनें पुढें मांडला आहे ! मूळ एकादशाचें तात्पर्य एकीकडे आणि हें भास्करकाव्य दुसरीकडे ! सरस उतारे पुढें देत आहें:—

( १ ) अवधूतानें अग्नीपासून कसा बोध घेतला तें पहा:—

**आचारु आणि विचारु । जाणावया अग्नि गुरु । केला तो प्रकारु । आइकें राया ॥ तापसपणें निलागु । अग्नी नव्हे असळगु ( सुगम ) । तैसा होआवा निसंगु । एकांतनिष्ठ ॥ पात्रादि आलंबन । नाहीं, हुताशन । स्वीकारावया अन्न । उदरचि पात्र ॥ पवित्रापवित्रें दोन्हीं । जैसी कां नाहीं वन्ही ।**

आणि पापपुण्य चिन्हीं। घेपवेना ॥ जैसा कां काष्ठांतु। अग्नी असे सर्वगतु। पुनः प्राणियांसी नव्हे हेतु। दृष्टादृष्टीं ॥ तो जेंव्हेळीं होय प्रगटु। तेंव्हेळां भजनें जोडे अदृष्टु। पाकनिष्पत्ती दृष्टु। एका होये ॥ तैसा परमेश्वरू। सर्वात्मा निराकारु। पर जीवास साकारु। उपकारकू ॥ (ओवी २८४ ते २९१).

(२) नरदेह सर्वदेहांत श्रेष्ठ आहे हे सुंदर दृष्टांतांनीं सांगितलें आहे:—

देशोदेशीं हर्णाचे दडे। पर कस्तूरियामृग न जोडे। वनोवर्णी चापयांचे झाडे। पर नाहीं पार्जातकू ॥ घरोघरीं ठिकाचीं लेणीं। पर नाहीं चिंतामणी। हाटोहाटीं विकती कांचमणी। पर नाहीं पाचिगरुडोद्गार ॥ झाडोझाडीं फुलें असोसे। पर नाहीं मुक्ताफळांचे घोषे। गावोंगावीं उदकें बहुवसें। पर नाहीं वोघू गगणगंगेचा ॥ विपायें कर्मभूमीचिये पेठे। नरदेह लाधिलें औचटें। तर मुक्तीरत्न घ्यावें गोमटें। जंव मृत्यातें पावेना ॥ (ओवी ५१५–५१९)

(३) जैसे बहिऱ्याचिया स्थानी। उपेक्षे कोकिळांची रंगध्वनी। नातरी कमळांचा उद्यानीं। चकोरा चंद्रकरु जैसे ॥ ठिकाचा अळंकारु। लेवविल्या केविं जाणे वान्नरू। चंदनें डवरिला सौरू। तर तें वायांच जाये ॥ तैसे पात्र नव्हे बोलावया। तर शब्दाचे जिव्हांर जाये वाया। म्हणोनी भलतया। ज्ञान प्रकाशो नये ॥ (ओवी ६२४–६२७).

## भास्करकवीचें श्रीकृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ.

भास्करकवि काव्यनाटकांत चांगला व्युत्पन्न पंडित होता हें त्याच्या 'शिशुपालवधा' वरून स्पष्टच आहे. त्यानें ३९ श्लोकांचें एक संस्कृत स्तोत्र केलें आहे. त्यांतील नमुन्याकरितां एक श्लोक देतों:—

**लीलांदोलनलोलकंकणरणत् झंकारचारुस्वनैः**
**गीतैः सुंदरनूपुरैरणुरणन्माणिक्यमालाकुलैः ।**
**स्विद्यन्मौलिकपालभालफलकैरंगैरनंगालसै-**
**र्नृत्यद्भिर्व्रजसुंदरीभिरभितः कृष्णो वृतः पातु वः ॥ ८ ॥**

भास्करकवीनें विरहाष्टक, गीताष्टक, दत्तात्रेयचरित, ईशस्तुति वगैरे गद्यपद्यात्मक छोटीं प्रकरणें केलीं आहेत. ईशस्तुतींतले श्लोक निर्यमक आहेत. त्याचें '**श्रीकृष्णचरित्र**' हा गद्यग्रंथही महानुभावीयांत फार वाचला जातो, ह्मणून त्यांतील २।३ छोटेसे उतारे पुढें देतों:—

"युधिष्ठिरें रायें राजसूययज्ञ आरंभिलाः दुर्योधनासि मूळ पाठविलें: दुर्योधनु परिवारेंसी आलाः मग युधिष्ठिरें दुर्योधनासि जळस्थळें दाखेवीलिं: तेथ राजपुत्रु जळकेली खेळतुं असेतिः अैसें देखौनि दुर्योधनें जळ भणौनि उडी घातुनैलीः तेणें तयाचे गुढगें कोंपरूं फुटीन्निलें: तें देखौनि भीतरीं रायें मुखा मुखा करौनि समस्त सैन्यें हांसीनलीं: मग कव्हणी एकीठाइं स्थळ ह्मणौनि रिगौ बैसीन्निला तंव उदकांतु उडी पडीलीः वस्त्रें वोलीं जालीं: तंव द्रौपदी हांसीनली. ऐसा दुर्योधनाचेया चातुर्याचा उपहासु जालाः थोरू लाजीन्निला:"

"मग युधिष्ठिरें अग्रपूजा मांडिन्निलिः तेथें अठ्यांसी सहस्रऋषीः आन समस्त राये बैसिन्नले होतिः आन समस्त कुळियांचे रायेः रायारायांचें कुमरुं बैसलें होतिः युधिष्ठिरुयें येत्रौनि हात जोडौनि पुढें उभा ठाकिन्निलाः समस्तांतें भणितिलें: माझा यज्ञ सिद्धी पावलाः आतां अग्रपूजा कवणासि करावी तें आज्ञा दीजोः तेह्वाळिं[1] तेंहीं अवघा ऋषीं विचारिलें: शुकदेवो ज्ञानिया होए आन तपोवृद्ध होएः तो पूजें योग्य होए तेयासि अग्रपूजा करावि: ते ह्वेळिं शुकदेवु लेंकुरुवांतु उभा ठाकौनि श्रीचक्रवर्तीची लीळाचरित्रें पांतुर्चि[2] होताः अवघां तेआतें बोलावो पाठवीले तैसाचि शुकदेवो आलाः बैसकारु[3] दीह्लाः अवघां शुकदेवातें भणितिले तुह्मी अग्रपूजा अंगीकरावीः तेह्वळि शुकें भणतिलें[4]: हे काइंः आमासीं

१ ते वेळीं. २ पाहतच. ३ आसन. ४ ह्मटलें.

अग्रपूजा काइंसीः तेह्वाळि तेहीं अवघा विवक्षा[1] केलीः जो बाळब्रह्मचारी आन ज्ञानी असैल तेयाची अग्रपूजाः आमांमाजी कवनी नाहींः

शुकदेवें भणितलें: अवघां तुह्मी मज प्रमाणु मानिलें तर मी निर्द्धारेनु[2] ते तुह्मी अवघें मानाँलुः[3] समस्तां भणतिलें अवश्युः शुकदेवें भणतिलें: सकळ ज्ञानियां शिरोमणी सकळ ज्ञानियांचा बापु श्रीकृष्ण असेचिः तरी यासी अग्रपूजा कराना कां पां: हे आईकौनि दुर्योधनादिकु क्षोभैलेः तेह्वाळिं श्रीकृष्ण चक्रवर्ती श्रीकरीं कनकाचें भाजनु घेवौनि ब्राह्मणां ऋषींसि क्षीरू वाढीत होते. इतुका श्रीकरू अन्नें माखीन्निलें होतें: श्रीकरींचा अनुकारूः आंगीचिया बाहिया वरौतिया खोवीनिलिया होतियांः मोकळे केस कळापुः कटीप्रदेसीं फूँटा[4]: युधिष्ठिरें चक्रवर्तीसी बोलावों पाठविलें: तैसेचि श्रीकृष्णचक्रवर्ती बीजें केँलें[5]:.... ...समस्तां ऋषी प्रार्थौनि भणतिलेः आगा ए श्रीकृष्णा अवतारूः परमेश्वर पूर्णब्रह्मः आमुतें काइसेया झकवितासीः

" यज्ञमंडपी आसनु राचिलें: श्रीचरण प्रक्षाळनु करौनि आसनीं उपविष्ट होआवेयां प्रार्थिलेः आसनीं उपविष्ट जालेः मग युधिष्ठिरें मंगल महाद्याअेंनसी श्रीचक्रवर्तीची अथोचितु[6] अग्रपूजा केलीः बैसोनि अग्रपूजा स्वीकारीन्निलीः मग युधिष्ठिरें येथानुक्रमें ऋषीः मुनीः देवः दानवः रायें पूजिलेः अैसां समइं तेथ शिशुपाळु आलाः श्रीकृष्णचक्रवर्तीसि सँवियां[7] देओ लागैलाः तेअे वेळीं श्रीकृष्णचक्रवर्ती तेयांचियां शँतभरीं[8] सवियां साहींनिलियां: एकीं आंगळी आली[9] आन सुदर्शनचक्रां प्रेसौनि[10] शिशुपाळाचें शिर छेदिलेः मां तें सिरकमळु यागीं पडिलेः आन तेयाचे देहो बाणवेऱ्ही पींटौनि यागीं घातलें: आन हाःकारू प्रवर्तैलाः "

तेराव्या शतकांतला मराठीगद्याचा हा एक नमुना पाहण्यासारखा आहे.

---

१ विचार. २ निर्णय करोन. ३ मानाल काय ? ४ वस्त्र. ५ जाणें केलें. ६ यथोचित. ७ शिविया, शिव्या. ८ शंभरपर्यंत. ९ अधिक. १० प्रेषून, फेंकून.

## महदंबेचे धवळे.

नागदेवाचार्यांची चुलतबहिण ' महदंबा ' ही महानुभावीय ग्रंथकारांत एक प्रसिद्ध स्त्री होऊन गेली. हिनें चक्रधराचा उपदेश घेतला होता. हिनें आपल्या गुरूची मनोभावें सेवा केली. हिला त्या पंथांत अजून मोठा मान आहे. हिच्या घराण्यांत वेदविद्या व ज्योतिष यांचें अध्ययन पूर्वापार चालत होतें. हिचा पणजा वामनाचार्य देवगिरीच्या जाधवांच्या दरबारीं राजज्योतिषी ह्मणून मान्यता पावला होता. हिचे आजेगुरु गोविंदप्रभु यांनीं एकदा श्रीकृष्णविवाहोत्सव भक्तीनें साजरा केला तेव्हां महदंबेस कृष्णाची करवली ह्मणून गाणीं ह्मणण्यास सांगितले, त्यावेळीं तिनें जीं गाणीं गायिली त्यांस धवळे ह्मणतात ! या धवळ्यांतील प्रत्येक कडवे चार चरणांचे असून पूर्वार्धांत ८७ व उत्तरार्धांत ६४ मिळून १५१ कडवीं आहेत. नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरांत ' धवळे गाती स्वानंदें ' ( १६–४६ ) असा ओवीचा एकपाद आढळतो. धवळे किंवा ढवळे या शब्दाचा अर्थ शुभ्रयशाचे पोवाडे, किंवा मंगल गीतें असा आहे. हे महदंबेचे धवळे श्रीकृष्णभक्तिरसानें भरलेले आहेत. हे गाण्याची तेव्हांची चाल काय असेल कोण जाणे ! कडव्याच्या चारी चरणांत अक्षरें सारखीं नसतात, कमजास्त असतात. हें गद्यवजा पद्य आहे:—

**जयजय श्रीप्रभु गोविंदा । सच्चिदानंद आनंदकंदा ॥ ध्रु० ॥**
**श्रीकृष्ण रुखुमिणी गजरथ तुरे यादव दाट्टगा येः**
**श्रीचक्रधराचे शिरीं धरौनिया श्रीचरणु धवळे गाइजता येः**
**गोविंदराणा जेणें रुखुमिणी हरियेलि पवाडे केले अतीः**
**बहुता पाठविले परमागती भक्तीं आइकतां श्रीकृष्णचरितीं ॥२॥**

रुक्मिणीहरणाची सारी कथा येथें सांगण्यांत स्वारस्य नाहीं, ही स्वयंवराची कथा पहिल्यापासून आपल्या लोकांत अतिप्रिय आहे. एक तर ती सर्वजनप्रिय श्रीकृष्णाच्या विवाहाची कथा व दुसरें तींत शृंगाररसा-

बरोबर वीररसाचाही प्रसंग आहे. महाराष्ट्रीय मनाला ह्या दोन्ही रसांची आवड आहे. पन्नास मराठी कवींनीं ही कथा गायिली आहे! अलीकडे सामराजकवीचें या विषयावर एक काव्य प्रसिद्ध झालें आहे तें काव्य-दृष्टीनें सरस आहे. नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरांत कथाभाग अध्यात्म-रसांत मुरविला असल्यामुळें तें ज्ञात्यांना प्रिय आहेच, पण महाराष्ट्र-मंडळांतल्या विवाहांतले सर्व संस्कार व त्यावेळच्या रूढी त्यांत यथातथ्य वर्णिल्या असून त्या प्रत्यक्ष पटणाऱ्या आहेत. शिवाय नाथांच्या दिव्य प्रासादिक वाणीमुळें त्यांचें काव्य फारच उज्ज्वल झालें आहे. मराठींतल्या रुक्मिणीस्वयंवरावरच्या सर्व काव्यांत या नाथांच्या कवितेला कोणीही जाणता रसिक पहिलेंच स्थान देईल, तथापि नाथांच्या पूर्वीं ४०० वर्षें गायिलेले हे महदंबेचे धवळेही गोड आहेत.

ह्या काव्यांत रुक्मिणीनें विप्रोत्तम सुदेवाबरोबर पाठविलेल्या 'रुक्मिणीच्या पत्रिकेचा' कोठेंही संबंध दाखविला नाहीं. 'श्रुत्वा गुणान् भुवन-सुंदर शृण्वतां ते' इ. श्लोक भागवतांत असून ते अतीव सुंदर आहेत. महदंबेला संस्कृत येत नसावें असें वाटतें, तथापि तिनें स्त्रीस्वभावानुसार स्त्रियांना महत्वाचे वाटणारे प्रसंग चांगले वर्णिले आहेत व श्रीकृष्ण-रूपाचें वर्णन व रुक्मिणीचे पातिव्रत्यधर्म उठावदार रीतीनें गायिले आहेत. 'ब्राह्मणां आडकाठी नाहीं तिआ राजद्वारीं' याचा तिला संतोष वाटलेला आहे. श्रीकृष्ण लग्नाच्या तयारीनें सारें वऱ्हाड घेऊन एकदमच कुंडिनपुरास गेले आहेत.

**ऐसा रथीं राम कृष्णु श्रीउद्धव अर्जुनुः**
**अश्वभाटीं वसुदेॐ गजभारीं उग्रसेनुः**
**पुरुषापाठीं वरमाया मेघडंबरीं छत्रीं अंधःकारूः**
**श्रीकृष्ण प्रणॐ करितां बीजे करितां ब्रह्मादि देॐकरिति**
**जअेजअेकारू २९**

धवळारीं शिशुपाळाला 'जानवसा' दिला होता, 'रुखवंतु दीन्हले होतें. श्रीकृष्णाची मार्गप्रतीक्षा करीत 'उपरिये उभी ठेली भीमकाची

दुहिता । तंव विप्रु देखिअेला गूढीअेंसी एतां '–असंख्य गजरथ घोडे, पालव, छत्रें, श्रीगिरिया व श्रीकृष्णाचा गरुडध्वजरथ आणि त्यांत 'पीतांबरपरिधानु कंठीं कौस्तुभमणि' असा श्रीकृष्ण तिनें पाहिलाः—

सुंदरु श्रीकृष्णु झळकीतां देखीन्निलाः
आठै सात्विकु प्रगटले चित्ता संभ्रमु जालाः ॥
उपरिअे वरौनि घालों ठेली झेंपु तंव विप्रें सांवरिली बाळाः
वदे देवी हें नोहे तुज उचितु यया काळा ॥ ३५ ॥

भीमक राजानें श्रीकृष्णाचा सत्कार केला, पाहुणेर केला, व 'मज घरी केळावली असे रुक्मिणी बाळा' असें सांगितलें. रुक्मिणीनें कृष्णाकडे 'रुखवत' पाठविलेः 'आपण मुख्य सुगरिणी रुखुमिणी पाक करी नाना परी !' परिवारासमवेत कृष्णानें भोजन केलें.

पढळे ताटे ठाणवेया अन्येकें सुवर्णेः
अ्गारू अ्गरीती अष्टादश पक्वान्नेंः
शाखा संख्या नाहीं पये पन्हे कालवीतीः
आन आनंदितु श्रीकृष्णराअ् आरोगिती ॥ ५५ ॥

सुंगधी 'तांबौल व देवांगें म्ह. वस्त्रें' सर्वांना दिलीं. कृष्णाचें परियेळांतलें ताटांतलें अन्न–'तें अन्न मी स्वीकरी ने घे आणिकें अन्नें' हा रुक्मिणीचा निर्धार होताः कां कीं तिनें:—

'सकळांचा त्यागु केला दृढ धरियेल प्रभो तुमचे श्रीचरण' ५७

विप्रानें तो सुवर्णपरियेळ रुक्मिणीहातीं दिला व तेव्हां 'श्रीसाष्टांगा दंडवतें नमस्करौनि तिये माथां ठेविला' व 'पतिरायांचें प्रेमान्न' ब्रह्मादिकां दुर्लभ तें प्रेमानें सेवन केलें, व श्रीकृष्णानें कौस्तुभावर ठेवून घातलेला अमूल्य हार, जो गोविंदाला प्रिय झाला होता, तो गळयांत घालून ती परमानंद पावली. तिच्या सख्या मग कृष्णरूपाचें वर्णन करूं लागल्या. 'देखिले जचि आंगा तेथौनि न ढळेति लोचना' म्हणून तुझा कांत आम्ही सर्वांअंगीं पाहूं शकलों नाहीं असें त्या म्हणाल्या. 'तुझा पति परि आम्हां पिता दुजा नाठवेचि विचारु' असें त्या बोलल्या.

नगर वाचनालय, सातारा.


श्रीकृष्णाच्या माता, सखिया, सुवासिनी यांना मंगलस्नानें घातलीं. वाजंत्र्यांच्या घोषांत वेदमंत्रोच्चारपूर्वक वधूवरांना स्नानें घातलीं, वस्त्रालंकार दिले. ' पीतांबर, एकावळी, कौस्तुभ, मकरकुंडलें, तुरे, ' इ० श्रीकृष्णाच्या अंगावर व ' साडेपंधरेयाचीं सरळें ' ह्म० साडेपंधरा भावाची ह्म० उत्तम सोन्याचीं कडीं त्याच्या हातांत पाहून सर्वांस आनंद झाला. ' लोण उतरी देवकी माता. ' गायननर्तन झालें. ' बाळा मुग्धा प्रौढा सर्वे जेविं रतिरायाची सेना.' दांडिया ह्म० पालख्या—त्यांत जशोदा देवकीदेवी सुवासनींसह बसल्या. राजवाड्याच्या मंडपांत समारंभानें प्रवेश झाला.

**वऱ्हाडियांसहितु वरु पातैला मंडपाचिया द्वारांः**
**वरमाया वधुमाया वरु वोवाळिला देखौनि श्रीकृष्णराउँ**

भीमकाच्या मातेनें 'निंबलोण उतरले' वरमायेला ' घडिया घाली '—पायघड्या घातल्याः नंतर सर्वांना यथान्याय उच्चासनांवर बसविलें, मग ' रायें भीमकें श्रीकृष्णा मधुपर्क आदरिला. ' ' पदककुंडलें केयूर अगदें मौक्ताहार ' जावयास अर्पण केले. नंदनंदन मग ' गौरीहरा ' पाशीं आले. ' घडियेजवळ ' प्रजापति, समीप सावित्रीगंगापार्वती, ' वसिष्ठ भणें सावधानु ब्रह्में साकारु मंत्रें पटु फेडिला '—सावधान होतांच अंतरपाट दूर केला ! यथाविधि लग्न लागलें, आनंदीआनंद झाला. भेरी निशाणी यांची गर्जना झाली. अप्सरांचें नर्तन गायन झालें.

**अंगुलियां रुखुमिणी धरौनि उभे होमासंन्निधी आलेः**
**वधुवरां देखौनि सकळ नरनारी चित्तु वेधाविलेः**

होमविधी सारून सभा पूजियेली, ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें यथासन्मानें दान केलें.

**ऋषिदेवां अर्चौनि देउ बहुलां चढियेले श्रीयेसहितुः**

विप्रांनीं मंगलोच्चारपूर्वक मंत्र म्हटले, आरत्या झाल्या, निंबलोण उतरले. मग भोजनें झालीं.

**लेह्य पेय चोख्य भोज्य चतुर्धाअन्नें षड्रसीं ओगरिलीं:**

चंदनादि कर्पूरविडे दिले. 'राळिया चाले'—थट्टामस्करी झाली. सर्वांना यथाधिकार वस्त्रालंकार दिले. 'रुक्मिणीमुळें मज सर्वेश्वर जोडले, माझे जन्म सुफळ झालें' असें भीमक बोलला. सारें वऱ्हाड द्वारकेस परत आलें तेव्हां तेथेंही थाटाचा समारंभ झाला.

**गुढिया तोरणें द्वारके नित्य उच्छाऊ:**
**विशेखें रुखुमिणी प्रणौनि आले श्रीकृष्णराऊ:**
**कुंकुमाचे सडे मौक्तिकाचे चौकु परिकरें:**
**द्वारके ब्रह्मविद्यातेजें लोपिन्नलें चराचर: ॥ ५० ॥**

भीमकराजाला द्वारकेची रचना पाहून आनंद झाला. कृष्णरुक्मिणीचा साऱ्या द्वारकेनें सप्रेम सत्कार केला. 'गौरी श्यामा बाला प्रौढा रामा करिती आक्षवणी (औक्षण).' नारदानें 'तुज पती गौळी' असा रुक्मिणीशी विनोद केला!

**मनें संभ्रमीतु ठेली जाली ते निश्चळा:**
**हृदयकमळीं तोची श्रीकृष्णु सावळा:**
**योगिये का ब्रह्मविदु तैस जालें रुखुमिणीबाळा**
**विसरलिये विषयभावो चित्तचैतन्यु रंगलें गोपाळां॥६६॥**

रुक्मिणीचा व तिच्या मैत्रिणींचा 'भक्तोद्धरणहेतू मायावेषें अवतरला संवसारीं' असा श्रीकृष्णाविषयीं विमलभाव होता. दुसरे दिवशीं पांहटे श्रीकृष्ण उठतांच 'जसोदेनें' त्याच्या स्नानाची तयारी केली. मर्दन चाललें असतां 'देवगंधर्व ऋषिमुनी तेथ वेद पढती आनंदें!' स्नानोत्तर श्रीकृष्ण पिवळा 'सोनेसळा' नेसला, ललाटीं त्यानें मृगमदटिळा लाविला, 'हिऱ्याचें बाशिंग' बांधलें, गळयांत पुष्पमाळा घातल्या. कंठांत 'एकावळी' घातली, कानांत 'रत्नांचें शळबुंकें' घातलें, 'करीं सारळें साखळिया चरणीं तोडरु' घातला 'विजयी होई, ह्मणून विप्रांनीं आशीर्वाद दिले. कृष्णांनीं उद्धवासी 'कानमंत्र केला' व कटकांतले

घोडे पालाण ( पल्याण, खोगीर ) घालून संनद्ध ठेवण्यास सांगितलें. इकडे रुक्मिणीलाही स्नानादि घातले, 'कांकणें कळाविया अंदु पायवटें पदकु कंठीं लेवविती '–भीमकराजानें ' घडिएसी प्रतिष्ठेत '–घटस्थापना केली, ' लोणवणें तेलवणें मूळ नहाणाची केली आइती ' ( सिद्धता )

**रुखुमिणी भीमकातें भणे ताता राज्यछत्रधराः**
**मियां नवसिली असे आद्य अंबिकायात्राः**
**तंव राऊ वदे ' वेगु करा गुढरू घाला वारू पालाणाः '**
**आरूढैली गजस्कंधीं दृढ धरियले श्रीकृष्णाचिया चरणा ॥७८॥**

अंबिकेच्या मंदिरांत जाऊन रुक्मिणीनें ' पूजा केली रत्नालेणीं षोडषोपचारी. ' रुक्मिणी समोरून ' सांवळा कमलनयन ' पाहून आनंदित झाली व ' दोन्हीं करीं जोहारिला श्रीगोविंदु, ' तेव्हां ' कंपितु चकितु आंगीं रोमांच स्वेद ललाटीं ' अशी तिची स्थिति झाली. ' भीमकिये देखौनी क्षेत्री कामविव्हलु जाले व त्यांच्या हातून ' हातियेरु गळिन्नले, ' इतक्यांत पवनवेगानें श्रीकृष्णानें आपला रथ पुढें केला व रथांत रुक्मिणीला उचलून घेतले तोंच रुक्मिणीनें श्रीकृष्णाच्या गळयांत माळ घातली, वाजंत्र्यांचा कडकडाट झाला व देवांनीं जयजयकार केला. कवयित्रीनें विवाहकालही दिला आहे तो ' मास माधव कृष्णपंचमी भृगुवासर धनिष्ठानक्षत्र ' हा आहे. माळ घालतांना श्रीकृष्णाला ( वैशाख ) रुक्मिणीनें डोळे भरून पाहिले व ' अमूर्त ब्रह्म वो कैसें रूपासि आलें ' अशी पतीच्या ठिकाणीं तिची परमेश्वरबुद्धि दृढ झाली. प्रेमानंदु प्रगटला, नेत्र सजल झाले व सद्गदित वाचेनें ' देवा ! बोलण्याप्रमाणें केलेंत ' एवढेंच बोलली !

पूर्वार्ध संपला, व येथून उत्तरार्धास प्रारंभ झाला. कृष्णानें रुक्मिणी हरण केली हें पाहतांच रुक्मा, शैल्य, दंतवक्र, जरासंध इ० विरुद्ध पक्षाचे वीर चतुरंगदळ घेऊन कृष्णावर धांवले. रामकृष्णांनीं त्या सर्वांचा पराभव करून त्यांना धुडकावून लावले व रुखुमियाचीं शस्त्रास्त्रें

व वस्त्रें हरण करून 'खांडार्ध स्मश्रु भाद्रौनि शिरीं पंचपाटीं केलें क्षौरु !' हा तुला 'सालेपणाचा' ( श्यालक, मेहुणा ) आहेर' म्हणून त्याला वस्त्रालंकार देऊन कृष्णानें सोडून दिलें. भीमक राजानें वऱ्हाड नगरींत नेऊन मोठ्या समारंभानें श्रीकृष्णरुक्मिणींचा विवाह लावला.

साडे साहशें वर्षांपूर्वी महदंबेनें रुक्मिणीस्वयंवरावर पौराणिक कथेचा आधार घेऊन पण स्वतंत्र असें हें मनोहर काव्य रचिलें आहे. महाराष्ट्रीय समाजांत तेव्हां चालू असलेल्या व निदान तेव्हांपासून आजतागाईत अविच्छिन्नपरंपरेनें रूढ झालेल्या विवाहपद्धतीचें हें यथातथ्य चित्र आहे.

## ८ चक्रधराची दिनचर्या.

चक्रधराच्या शिष्यांत **भावेव्यास** नामक नेवाश्याकडील राहणारा एक गृहस्थ विशेष मान्यता पावला होता. हा सर्वांत अधिक ज्ञानी व विरक्त होता. याचे चारपांच छोटे गद्यग्रंथ आहेत, त्यांत 'पूजा अवसर' उर्फ श्रीचक्रधराची दिनचर्या' हा ग्रंथ विशेष महत्वाचा आहे. त्यांतून चार दोन उतारे पुढें देत आहे:—

" समस्त भक्तजनें एतिः सर्वज्ञेचेया श्रीचरणां लागातिः पासि बैसातिः सर्वज्ञास निरूपणाची प्रवृत्ति असे तरि निरूपण करीतिःना रात्रि वेंडील असे तरि पहुडु होयेः नातरि आसनी नीश्चलु बैसातिः महदंबे प्रस्नु करीतिः जी जी आम्हीं सर्वज्ञातें चींतु सर्वज्ञ काई चींतीतिःम्हणाति बाई हें सकल जीवांतें चींतिः नागंबे प्रस्नु करीतिः बाबा आम्हीं बाबातें चींतु बाबा काई चींतीतिः सर्वज्ञ भणाति बाइ हें श्रीप्रभूची थोंपु चींति.'

" तंव अरुणोदयो होएः आधीली दीसीं भटोबासीं सीलींका दोनि आणौनी ठेवीलिया असती, आंबीयाचिया कां जांबुळीचिया कदाचीतु बोरीचीयाः तिया दोन्ही श्रीकरीं ओळंगवीतिः एकी जानुवरि ठेवीति एकी दंतधावनु करीतिः दंतधांवनु करूं सरे ते परित्यजीतिः ते डावेनि

---

पुष्कळ. २ निद्रा, पहुडणें ३ हें ह्म० अहम् ह्म० मी ४ गोष्टी. ५ काड्या. ६ घालतात. ७ संपलें.

श्रीकरें घेऊनि आंगुठ्याचेनि नखें चीरूनि दोनि फोडि करीतिः एकीकि आंगुलियांमध्यें धरीतिः एकी धनुष्याकार वळीति त्या जीव्हामळ आकर्वीतिः[1] बाईसे उस्नोदकाची तांबतौली[2] आणीतिः मग गुळळा होएः श्रीमुख प्रक्षालन होएः बाइसे श्रीचरण प्रक्षाळीतिः चरणोदक असें तें समस्तां भक्तजनां प्रसादु होएः हातपाए धूति तोंड धूतिः सोविळें वस्त्र वेढीतिः भटोबासु गोपीचंदन उगाळीतिः बाइसे गोसावी यांचा भालप्रदेसीं गोपीचंदनाचा ऊर्ध्व पौंड्र टीळा रेखीतिः दोन्ही रेखा सरसीयाचि एतिः आधीलां दीसीं पुष्पें आणुनि ठेवीलीं असतिः तो गळदंडा[3] श्रीकंठीं ओळगवीतिः श्रीमुगुटीं मुगुटमाळ मोकळेया पुष्पांची पूजा करीतिः श्रवणीं शळबुंके, बाहूभूषणें कळीकांचे हातसरें श्रीकरीं फुलांचा झेला ओळगवीतिः धुपटणा आंगारा आणीति तयावरि दसांग धूपु घालीतिः बाईसे पांचै वार्ती उजळीतिः आर्ती पालिभांडा ठेवीतिः सर्वज्ञां धुपार्ती मंगळार्ती होऐ " जय तूं मंगळमंगळा परममंगळरूपा " हे जतु[4] ओळगवीतिः बाईसासी आठै सात्वीक प्रगटेतिः बाईसे नीराजन करीतिः सर्वज्ञास फोडी[5] ओळगवीतिः वीडिया करूनि देतिः भटोबास मंत्रअवसरू ( पुरुषसूक्त ) ह्मणातिः यापरी सपूजित श्रीचक्रधरू घटिका एकी आसनीं उपविष्ट असतिः "

" भटोबास श्रीचरणी उर्पाणौ[6] आळगवीतिः रायांगणीं उभे ठाकति आंगीटोपरें उभे सरीसे करूनि आणीतिः दुनीचिया आंगीचिया बाहीया एकेवेळे लेववीतिः कसेयांसि गांठी पाडीतिः "

" बाईसे कणीकी तीमीतिः तांदुळे भीजत घालीतिः...कानवँडा[7] लावीतिः ताट करीतिः चक्रधर भीतरि बीजें करीतिः[8] तुपभातु पहीतः[9] दोनी साकवंतीयाः[10] कढीः ऐसें आरोगण[11] होएः पोळी तरी चौतकोरः मांडा तरी दीढः पुरी तरि एकिः पाठी ताकाभाताची आरोगण होएः वीडीया करूनि

---

१ आकर्षतात, खरडून काढतात. २ तांबली ३ गळ्यांतला हार ४ छंद, गाणें ५ सुपारीचीं खांडें ६ पादरक्षा, खडावा. ७ आडसर ८ जातात. ९ वरण १० भाज्या. ११ भोजन.

देतिः भटाचा हातु धरूनि सत पदें वेढे करीती ओटेयावरि पद्मासन असे संयनासन करीतिः चक्रधर पहुंडु स्वीकरीतिः नागांवा भीक्षान्न काढीतिः काला करीतिः मूदा करीतिः वरि प्रसादु ठेवीतिः भक्तजना पांती प्रसादु भोजन होएः ”

“ नागाम्बा पूढा जातिः सडासंमार्जन करीतिः चौक रंगमाळिका भरीतिः ओढेयावरि आसन भरीतिः—चक्रधरा आठां दीसां क्षौरःचौ दीसां मार्दनें हो ए. ”

महदंबा, भास्कर व दामोदरपंडित इ० कवींच्या काव्यांपेक्षां या पूजा-अवसरांत एक विशेष आहे, आणि तो हा कीं इतरांनीं प्राचीन काळीं झालेल्या व अनेक संस्कृत कवींनीं वर्णिलेल्या द्वारकाधीश श्रीकृष्ण प्रभूच्या लीला गायिल्या आहेत तर भावेव्यास यांनीं समक्ष पाहिलेल्या व त्याच्या काळीं हयात असलेल्या गुरुपदारूढ अशा एका महात्म्याची दिनचर्या वर्णिली असल्यामुळें तींत त्याच्या काळच्या समाजस्थितीचें चित्र चांगलें उमटलें आहे. यांत घराऊ भाषा व सामान्य स्थितींतल्या मनुष्याची राहणी चांगली प्रतिबिंबित झाली आहे. ‘आम्ही तुमचें चिंतन करितों, तुम्ही कोणाचें चिंतन करितां !’ असा प्रश्न कोणाही महात्म्यास विचारल्यास ‘आम्ही परमेश्वराचें चिंतन करितों व सर्व जीवांचें कल्याण चिंतितों’ असेंच उत्तर तो सहज देईल, तेंच येथें चक्रधरानें आपल्या शिष्यांस दिलें आहे. आंबे, जांभूळ, बोरी याच्या काड्या नखानें चिरून त्यानें दांत व जिव्हा घांसणें व तांबलींतल्या उष्णपाण्यानें गुळण्या करणें हेंच आपल्याकडचें पूर्वापार ‘दंतमंजन’ आहे. चक्रधराच्या पूजेचें व आर्तीचें जें वर्णन येथें आलें आहे त्याप्रमाणेंच गुरूच्या व संतांच्या पूजेचा प्रकार आपल्याकडेस आजही रूढ आहे. पूजेंत पुष्पें, पुष्पहार, फुलांचे झेले, हातसर, धूप, दीप, पंचारती, मंगलार्ति, नीरांजनविधि, मंत्रपाठ हे सर्व प्रकार

१ शत; शतपाउली २ शयनासन. ३ निद्रा.

आजही आपल्या समाजांत रूढ आहेत. ज्ञानेश्वरीच्या १३ अध्यायांतील ‘ आचार्योपासनम् ’ ह्या पदावर व्याख्यान करितांना व एकदोन ठिकाणीं मंगळाचरणांत ज्ञानेश्वरांनीं पूजेचें जें स्वरूप वर्णिलें आहे तेंच वरील वर्णनांतही आढळून येतें. आंगीं, टोपरें, बाह्या, कसे, दुनीचीं चीण हे प्रकारही येथें वर्णिले आहेत, यावरून मुसलमानी राज्य होण्यापूर्वींचे आपले आंगरखे आहेत असें वाटतें. ‘ वत्सहरणांत ’ एके ठिकाणीं ‘लांब कासोट्याचा’ उल्लेख आहे, त्यावरून आपले त्यावेळचे पूर्वज आतांसारखींच धोतरें नेसीत असावेत. सोवळयाचा तसाच पासोड्याचा उल्लेख इतरत्रही आहे. मध्यम स्थितीच्या लोकांच्या आहारविहारांत भात, वरण, तूपभात, पोळी, दोन भाज्या, मांडे, पुऱ्या, ताकभात, भोजनानंतर विडे, सुपारीचीं खांडें, भोजनोत्तर शतपावली, हे सर्व प्रकार ६५० वर्षांपूर्वींही होते. घरापुढें सडासंमार्जन, रांगोळया काढणें, पुरुषांनीं आठां दिसां क्षौर करणें, कधी कधी सुगंधी तेलानें अंगमर्दन करणें हें त्याही वेळीं होतें. तात्पर्य, ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्रीयांची सामान्य रहाणी जशी होती तशीच आजही आहे, तींत विशेषसा फरक झालेला दिसत नाहीं !

## ९ केशवराज सूरि

नागदेवाचार्यांचे शिष्य **केशवराज सूरी** व **दामोदर पंडित** या दोघांनींही मराठी ग्रंथरचना केली आहे. केशवराजसूरीनें संस्कृत व मराठी मिळून १५।१६ ग्रंथ लिहिले आहेत ! त्यांत ‘ **मूर्तिप्रकाश** ’ व ‘ **सिद्धांतसूत्रपाठ** ’ हे दोन ग्रंथ महानुभावांत विशेष प्रसिद्ध आहेत. सिद्धांतसूत्रपाठासंबंधी पूर्वींच लिहिलें आहे. त्या ग्रंथांत कवीनें महींद्र-भटाच्या ‘लीलाचरित्र’ ह्या ग्रंथांतून चक्रधराच्या तोंडचीं वचनें निवडून काढून एकत्र ग्रथित केलीं आहेत. त्यांत केशवसूरीचें स्वतःचें असें कांहीं नाहीं, तरी मोठ्या मनुष्याच्या ‘ उक्तींचा संग्रह ’ करणें हें कामही कमी चातुर्याचें आहे असें नाहीं. ‘ मूर्तिप्रकाश ’ ह्या ग्रंथांत त्यानें चक्रधराविषयींची माहिती दिली असून त्याच्या रूपगुणांचें वर्णन केलें आहे.

केशवसूरीला चक्रधराचा सहवास घडला होता यामुळें त्याच्या वर्णनाला प्रत्यक्षतेचें महत्व आहे. हा ग्रंथ शके १२०६ मध्यें निर्माण झाला. केशवसूरीच्या वाणींत कवित्वस्फूर्ति चांगली आहे व त्याची भाषाही रसाळ आहे, त्याचा आपल्या कवित्वशक्तीविषयीं विश्वासही दांडगा आहे. तो म्हणतोः—

**वानितां श्रीचक्रधराचा मूर्तिमयंकु ।**
**आनंदें डुलवीन त्रिभुवनीचा लोकु ।**
**सुमना करीन संतोखु । सभेचिया ॥**
**चातुर्याचेनि सौरसें । छेदीन महामूर्खांचें पिसें ।**
**कवितालते लेववीन घोसें । सारस्वतफळांचें ॥**

'खेळवीन ज्ञानगंगे । मनें महंतांचीं' असा त्याला स्वतःविषयीं भरंवसा वाटत होता. त्याच्या काव्यांत उपमारूपकउत्प्रेक्षादि अलंकारांची गर्दी असते. तो म्हणतो कीं माझा प्रस्तुत ग्रंथ हाः—

**ब्रह्मविद्येची कसवटी । पाहतां सकळ शास्त्रांतें दळवटी ।**
**कीं ज्ञानरत्नांची उघडली पेटी । सारग्राहकांलागीं ॥**
**कीं कारुण्यशक्ति आपण । निफजविलें प्रेमाचें पक्वान्न ।**
**तें आतां करावें भोजन । आवडीपूर्वक ॥**
**कीं ते कृपेची कामधेनु । सर्वसुखें जियापासुनु ।**
**ते ग्रंथवेषें अवतरौनु । स्रवे षड्रसांतें ॥**
**कीं ते लावण्यलतेचीं रसाळें । लागलीं शांतिक्षमेचीं फळें ।**
**कीं शृंगारु फुलला परिमळें । साहित्याचेनि ॥**
**कीं सौंदर्यसंगीत उल्हासलें । औदार्य तुळापुरुषीं बैसलें ।**
**कीं सौभाग्य सौरभ्यें हातवसिलें । श्रोतयांलागीं ॥**

## १० दामोदर पंडिताचें 'वत्सहरण.'

केशवसूरीसारखाच दामोदर पंडित हाही विद्वान्, रसिक व रसाळ कवि होता. हा गायनपटु होता व कविता फार जलद लिहीत असे.

'वत्सहरण' ह्या भागवती कथेवर यानें लिहिलेलें एक सुमारें ५०० ओव्यांचें सुंदर काव्य प्रसिद्ध झालें आहे. ह्या ग्रंथांत केशवराजसूरीचें नांवही ३।४ वेळ आलेलें आहे, त्यावरून हा ग्रंथ केशवराजसूरीचा का दामोदरपंडिताचा याविषयीं संशय वाटण्यासारखा आहे; तथापि लीला-चरित्रांतील पूर्वपीठिकेंत या ग्रंथाचें कर्तृत्व दामोदरपंडिताकडे दिलें आहे व महानुभावीयांत तशीच प्रसिद्धि आहे; म्हणून आम्हीही दामोदरपंडिताचें कर्तृत्व काढून घेत नाहीं. केशवराज हे दामोदर पंडिताचे जेष्ठ गुरुबंधु व परमामित्र होते.

**जेयापासौनि जगा जन्मुः जें परिपूर्ण आत्मारामुः**
**तें ध्याइलें परब्रह्मुः गुरुप्रसादें ॥ १ ॥**
**तेयां साकारां सगुणांः सर्वभावीं केलें नमनाः**
**त्रिभुवनुजीवनांः श्रीकृष्णरायां ॥ २ ॥**
**भक्त उद्धरावेयां अपारुः जें जें ईश्वराचे अवतारुः**
**तेयां साष्टांगीं नमस्कारुः केला मिया ॥ ४ ॥**
**महिमा मनां अगोचरुंः परि कवींसी हाचि परिहारुंः**
**जें स्वमती वाणावा ईश्वरुंः जेणें पवित्र वाचा ॥ ८ ॥**

ईश्वराचे गुण जीवाला काय कळणार, पण 'जेयातें श्रुती भणती नेती' ते भक्तीनें गायिले तर त्यांत दूषण कांहीं नाहीं, कां कीं 'हरि-कथाश्रवणेवीणः जीवां कांई चोखाळेपण ?' 'उपमाश्लेषादि' अलंकार कवितेवर घालून आम्ही 'सकळ लोक रंजवूं,' संतांचें जीवन अशा 'परब्रह्माची कीर्ति' गाऊं; 'नागरीं बोलीं स्वच्छ वाणिजेः सकलरसांतें पोखिजे' असें काव्य लिहूं; पुराणीचे आरिख ( आर्ष ) बोल तशी प्रबंधरचना करून कदंबपरिमळाप्रमाणें सर्वांस वेधून टाकील अशा रचना करूं; असा कवीनें आत्मविश्वास बाळगिला आहे. भक्तांना कृष्ण-कथेची आवड असते आणि ही वत्सहरणाची कथा 'जे जीवांतें चोखाळिती: कां मनातें नीववीतिः भक्तिभावातें पोखितीः श्रवणमात्रें' अशी मधुर आहेः--

**कुलस्त्रियेची गुणसंपत्तीः भोगावी एकेचि पतीः**
**तैसी हरिकथारसीं रतीः भक्तांवांचौनि नाहीं ॥ २० ॥**
**जेया संताचियां संगतीः नि-हा होये निर्मळप्रतीः**
**उपजे श्रीकृष्णीं भक्तीः अखंडितु ॥ २५ ॥**
**जैसा विकाशु पाझिणीः उदेलियां तरणीः**
**तैसें संतजनांचां मनीं: श्रीकृष्णचरितु ॥ २६ ॥**

म्हणून परमानंदैकनिरत अशा भक्तांना ' जें श्रवणासी अमृतपानः धर्माचें जन्मस्थानः वस्तुतें दावितें दिव्यांजनः सकलजनांसी ' असें हें गोड कृष्णकथामृत आवडेलच !

**असंख्यातु कवी वैकारः वाणितातिं निरंतरः**
**परि नित्यनूतन मधुरः श्रीभागवती कथा ॥ २७ ॥**

कवीचा हा प्रस्तावच मोठा मधुर आहे. कवीनें ही वत्सहरणाची कथा मूळ भागवतांतन घेतली आहे. भागवताचा दशमस्कंध सारा श्रीकृष्णचरित्रपर आहे. त्याच्या १२ व्या अध्यायांत अघासुरवधाची आणि १३ व १४ व्यांत वत्सहरणाची कथा आहे. हे मूळांतले तीनही अध्याय प्रस्तुत काव्यांशीं ताडून पाहिलें म्हणजे मूळ कथाभागाला धका न लावितां कवीनें प्रस्तुतकाव्य स्वतंत्रपणें सुंदर मराठी भाषेंत लिहिलें आहे असें दिसून येतें. ह्यांतील वृंदावनाचें वर्णन मूळाला धरून केलें आहे, ब्रह्मदेवानें श्रीकृष्णाची केलेली स्तुति मूळांत विस्तृत व अतिशय गोड आहे तथापि ह्या काव्यांत तिचा संक्षेप केला आहे, तरी हा संक्षेपही मधुर आहे. ' भागवतीकथा नित्यनूतन मधुर ' आहे हें कवीचें ह्मणणें यथार्थ आहे. कृष्णचारित्र नवरसात्मक कसें आहे हें कवि सांगतो—

**जै देवा रासक्रीडा खेळिन्नलाः तै मूर्त 'शृंगारु' जालाः**
**गौळणीं विनोदें नाचविलाः तैं 'हास्यरसू ' ॥ ५१ ॥**
**जसोदां भेडाविलाः तै ' करुणारसु ' उठाविलाः**
**विखारूं काळिया जिंतिला । तै ' रुद्रू ' जाला ॥ ५२ ॥**

**मातें श्रीमुख दाखविलें: तैं ' अद्भुतासी ' रूप जालें:**
**विश्वरूपु प्रकटिलें: तै ' भयानकु ' ॥ ५२ ॥**
**दैत्यां करी संहारू: तै ' बीभत्सु ' आणि 'वीरू' ।**
**'शांतु' तो निरंतरू: तेथेंचि असे ॥ ५४ ॥**

ऐसें नवरस नाटक खेळणाऱ्या देवाचें ' निजरूप ' ब्रह्मादिकांसही कळत नाहीं. " निर्गुण सगुण कां जालें ? निराकारां साकारपण कां आलें ? निरभिमान्याला दैत्यनिर्दलन कसें ? अरूपाला सुंदर रूप कसें ? अद्वैताला अनंत अवतार कसे ? अनामी व सहस्रनामी अशा आत्मयारामाला बायकापोरांचा परिवार कोठचा ? परब्रह्माला आश्रमधर्म कशाचा ? सकळभूतग्रामीं बसणाऱ्याला एका गोकुळांतले खेळ कसे पुरेत ? " असे कवीनें अनेक प्रश्न केले आहेत व उत्तरार्थीं म्हणून दोन ओव्या दिल्या आहेत:—

**साना होऔनि निऱ्हां थोरू: भीतरीं असौनि सकळां परू:**
**अकर्ता करी सृष्टिसंहारू: हें अघटित नोहे ॥ ६० ॥**
**ऐसियां विरुद्धधर्मांचिया प्रवृत्ती: एकीं ईश्वरींचि आती:**
**ते वेदशास्त्रें तर्कें नेणतीः जाणती भक्तजनु ॥ ६१ ॥**

याला **परमार्ग** म्हणतात, व उपनिषदांचा अध्यात्मयोग याहून निराळा नाहीं असें कवि म्हणतो.

**सकळभुवनें जयाची करणी: जो वाणिजे वेदीं पुराणीं:**
**तेयातें लोणी देऊनि गौळणी: नाचवितातिं ॥ ६५ ॥**

त्रिभुवनांचा दातार, सकळयज्ञाधिपति, सकळप्रमाणांना अगोचर, असें परब्रह्म परदैवत गोकुळांत रांगतें बाळ कसें झालें हें वर्म भक्तच जाणतात.

एकदा कृष्णानें पेंधा, वडजा, वांकुडा, सुदामा, बामा, बागडा, बळ, सुबळ इ. आपले सवगंडी बरोबर घेतले; शिंगें, पावे, मोहरीं इ० वाद्यें घेतलीं व गात नाचत व गाईंना 'हरित सोज्वल तृणें चारीत' वनोपवनांत ते सारे फिरत चालले. रत्नांचें लेणें, पुष्पांचीं भूषणें, गुंजांचीं आभरणें,

माथां मोरपिसे, कंबरेला सोनेसळा, गळ्यांत वनपुष्पांच्या माळा, असा श्रीकृष्ण गोपाळांच्या मेळ्यांत आनंदांत चालला. गोप 'सुछंदें टाळघोळ' वाजवित व दैत्याविभांडांचे पवाडे गात' म्ह. कृष्णानें दैत्याशीं युद्धें इ० करून त्यांना मारले त्या विषयांची त्याचीं गाणीं गात चालले होते. मग ते नानाविध खेळ खेळले: हमामा, हुंबली, चेंडुफळी इ० कोणी पक्ष्यांचे आवाज काढावेत, कोणी वानरांसारख्या उड्या माराव्यात; कोणी मयूरनृत्यें नाचती, कोणी राजहंसगती चालती, कोणी कृष्णाचें लीलानुकरण करीत म्ह. एकानें पूतना व्हावें व दुसऱ्यानें कृष्ण होऊन तिचा प्राण घ्यावा अशा कृष्णलीलांचें अनुकरण करीत. वृंदावनाचें अतिसुरस वर्णन ४० ओव्यांत (१२६ ते १६७) केलें आहे. वर्णनाच्या ओघांत नानावृक्षांचीं, वेलीचीं, फळांचीं, फुलांचीं नांवें आलीं आहेत. 'तेथें गज सिंह शार्दूलः एकत्र मृगव्याघ्र चितळः श्रीकृष्णें निववीले पशु सकळः आनंदें रोवंताति!' वृंदावनांत:—

**एकु जीवपरमात्मया ऐक्य भावितुः एकु सेव्यसेवकभावें उपासितुः**
**एकु भेदाभेदविवर्जितुः राहिले निरालंबीं ॥ १४८ ॥**
**देखोनि मेघसांवळी श्रीमूर्तीः आनंदें मयूरें नृत्यें करितीः**
**शुकसारका संवादतीः वेदांतसिद्धांती ॥ १६४ ॥**

हा सारा प्रकार पाहत पाहत देव गोपांसह यमुनातीरावर आले. कृष्णदर्शनीं यमुनेला केवढा आनंद झाला!:—

**आळिंगावया श्रीकृष्णराजाः तियां बहुतीं केलिया भुजाः**
**तैसें तरंगु पढियासलें मजः कालिंदियेचें ॥ १७१ ॥**
**मग आनंदसागरीं मीनलीः तैसी निश्चलु जालीः**
**कीं देहभावो विसरैलीः श्रीकृष्णवेधें ॥ १७२ ॥**

कृष्णरूप पाहून वृक्षवेलीप्रमाणेंच पशुपक्षीमत्स्यादिही भुलले, द्विजवृंद (ब्राह्मण व पक्षी,) बक, चक्रवाक, राजहंस या पक्ष्यांवरील श्लेषात्मक रूपकें चांगलीं साधलीं आहेत:

उभये कुळीं द्विजवृंदें: निजकर्मरतें निःशब्दें:
दृष्टिपूतें ठेविती पदें: जैसे मुनिराजु ॥ १८० ॥
एकांगुष्ठतपिये बकः नासाग्रीं दृष्टी घालिती ढोंकः
यज्ञदीक्षित तैसे चक्रवाकः प्रियांतें सांडितीना! ॥ १८१ ॥
प्रकृतिपुरुषविवेकातें: जैसे परमहंस जाणते:
तैसें क्षीरानीरा निवाडू करितः निर्मल राजहंस ॥ १८२ ॥

कृष्णाच्या दृष्टिपातानेंच 'पांखिरुवें'–पांखरें, पक्षी–आनंदभरित जालीं व 'तयांचा नामींच वेधु' लागला. यमुनातीरीं पशुपक्षी आपलाला वैरभाव–निसर्गसहज वैरभाव–विसरले:—

हातिरुवें सिंहेसीं खेळतुः मग व्याघ्रासीं कुरवाळें करितुः
मोरांचा पाखवा विश्रामतुः फणिकु देखा ॥ १८६ ॥

श्रीकृष्ण व त्याचे संवगडी यांनीं मग यमुनेच्या वाळवंटांत भोजनें केलीं. सर्वांनीं आपापल्या 'मोटा' ( शिदोऱ्या ) काढल्या. श्रीकृष्ण-रूपाचें सुंदर वर्णन ओवी २१८ ते २४६ पर्यंत आलें आहे त्याची गोडी भक्तभाविकच जाणतील. शिशुपालवधांत असेंच वर्णन आलें आहे तें याशीं ताडून पाहतां दोन्ही कवि हाडाचे कृष्णभक्त होते असें दिसतें. प्रस्तुत कवि म्हणतो:—

इंद्रनीळांची दीप्तीः नीलोत्पलांची कांतीः
एकवटली–तैसी सांवळी श्रीमूर्तीः मिरवतुसे ॥२१८॥
सकुमारें चरणकमळें: आनंदमकरंदबहळें:
जेथ मुनिजनअळिकुळें: लुब्धें जालीं ॥ २१९ ॥
जयाचिया नखचंद्रदीप्तीः भक्तसोमकांतें द्रवतीः
योगीजनकुमुदें विकासतीः निवारी तापत्रय ॥ २२१ ॥
परिसें लोह होए कनकुः तैसें चरणरजें जालें उदकुः
परि फेडी जगाचें महापातकुः संगमात्रें ॥ २२२ ॥
हास्यु करितां गोपाळाः दंतपंक्तीची फांकतुसे किळाः
ते सानुराग सुनिर्मळाः जैसी कां ब्रह्मविद्या ॥ २३९ ॥

ह्या ओव्यांतील उपमारूपकांचें सौंदर्य, भाषेचा डौल व आंतला भक्तीचा कोमल प्रवाह हे सर्व गुण वर्णनीय आहेत. 'याचेंनि दास्यें संसारू । निभ्रांतू तरतो' हा प्रस्तुत सद्भक्ताचा देवावरचा विश्वास ग्रंथभर प्रगट दिसतो. मत्सरामुळें ब्रह्मदेवानें गाईवासरें चोरून सत्यलोकीं नेलीं. यावर कवीनें ३।४ मोठ्या सुंदर उत्प्रेक्षा केल्या आहेत ( ओवी २६५ ते २६८ ) श्रीकृष्णाचें सान्निधान करितांना मध्यें कांहीं विघ्न झालें असावें, किंवा भगवंताचें होऊन गेल्यावर तिन्ही लोकांत पशूंनाही संचार करितां येतो हें नारदादिकांच्या नजरेस आणावें ( व त्यांचा गर्व हरावा ), अथवा परमात्मवस्तूची जवळीक झाल्यावर सिद्धावस्था सहज प्राप्त होते तशी ती गोवत्सांना झाल्यामुळें त्यांना सिद्धींचा भोग देण्यासाठीं सत्यलोकास नेलें असावें नातरी श्रीकृष्णाचें उच्छिष्टसेवन झाल्यामुळें गोवत्स ब्रह्मादिकांनाही वंद्य झाले असावे अशा ह्या चारी कल्पना मनोरम आहेत. कवीचें येथील कल्पना-चातुर्य अथवा भावनाविलास अत्यंत मनोरम आहे. ब्रह्मदेवाचें हें कृत्य देवाच्या लक्ष्यांत आलें व त्याला तोड म्हणून 'देव आपणचि झाले वत्सगोपाळ!' हें देवानें कां केलें? 'गाईस्त्रियांचें मन व्याकूळ न व्हावें म्हणून.' हें देवाला कसें करितां आलें?:—

**आधींचि देवो सर्वगतुः वरि तैसाची जाला मनोरथुः**
**तेतुलीं रूपें धरौनि असे खेळतुः हें काई नवल हेयां ?॥ २७३ ॥**
**एकु कोविं जाला अनेकुः ऐसें बोले नेणतां लोकुः**
**तरि सहस्रघटीं शशांकुः प्रतिबिंबतुसे ॥ २७५ ॥**
**जैसा मणिगणीं तंतुः मेघावली गगनांतुः**
**तैसा भूतीं विश्वनाथुः कीं भूतें तेयामाजी ॥ २७६ ॥**

देवाचा निर्धार कोण करील? तो कृपा करील तरच हें कळेल. 'जेयाचा जैसा शृंगारूः जैसीं वस्त्रें जैसा अलंकारूः तें तो जाला सर्वेश्वरूः आदिनाथू' ( २८८ ) नंदयशोदेच्या घरीं खेळणारा एक गोविंद आतां गौळ्यांच्या घरोघरीं परमानंदरूप झाला. 'भक्तीं सुलभु मुरारी' हेंच खरें!

**कवण ठावोवेऱ्ही सदैवपण: जें वस्तु निराकार निर्गुण:**
**तें आळी करोनि मागे जेवण: गौळणींतें ॥ २९६ ॥**
**अगाध चाटु स्तवितां: न बोले वेदें बोलवितां:**
**तो गाई हंबारव करितां: पाठीं धांवे ॥ २२८ ॥**

श्रीकृष्ण हे गोपाळ व वत्स सर्व आपण होऊन वृंदावनांत नांदत होते. एके दिवशीं नित्याप्रमाणें गोवर्धनपर्वताच्या पाठारावर खिल्लारीं गाई चारीत होते, तळवटीं मुरारी वेणु वाजवीत होते व वत्सें सभोंवार बागडत होतीं. खरीं वत्सें ब्रह्मदेवानें चोरून नेलीं होतीं. त्या त्या वत्सांच्या अनंतरूपांनीं कृष्णच पृथ्वीवर वावरत होते. एकदा गाईंनीं वरून कृष्णरूप वत्स पाहतांच त्या पान्हावल्या, उड्या घेतच खालीं आल्या व आपापल्या वत्सांना चाटूंपाजूं लागल्या:

**प्राकृतां अपत्यांचें आलिंगण:जालेया नीवती सकलै जन:**
**वरि ते कैवल्यानंदुघन: बालवेषें ! ॥ ३३० ॥**
**नेणतां कीजे अमृतपानु: तरी मानवां होये अमरपणु:**
**तैसें पुत्रभावें ब्रह्मालिंगनुं: दे निर्वाणसुखातें ॥ ३३१॥**
**सगुणा ईश्वराचिया संगतीं: कैसीं जीवस्वरूपें नीवतीं:**
**तें निरौता खूणु जाणतीः भक्तयोगीजनु ॥ ३३२ ॥**

गाई, वत्स, गौळी यांचें तें अलौकिक प्रेम पाहतांच बळराम चमकले. ते ज्ञानदृष्टीनें पाहूं लागले, तेव्हां देवांचा देव जो कृष्ण त्यांची ही माव त्यांच्या लक्षांत आली. 'एणें मुखामाजी दाविलें त्रिभुवन' हा मागचा प्रसंग त्यास आठवला. सर्वच प्रसंग त्यांच्या डोळयांपुढें आले, आणि भक्तकैवारी कृष्णाची ही अतिमानुष लीला पाहून त्यास धन्य झालें:—

**एरें प्राकृतें (वत्सें) काई जालीं: तंव देखे ब्रह्मेनि नेलीं:**
**भणें हाचि खेळतुसे अनेकीं खेळीं: स्वामी माझा ॥ ३४७ ॥**

ब्रह्मदेवाचा एक क्षण झाला ह्म० संवत्सर पालटला. वर्ष झालें. तो पहायला मर्त्यलोकाला आला. पाहतो तों गोपाळ व वत्स त्यानें नेलें होतें ते तसेच

येथेंही आहेत ! पुन्हा सत्यलोकांत तेथेंही आहेत ! मग त्याचें कोठें उलगडलें. कृष्ण हा परात्पर परब्रह्म आहे ही खूण त्यास पटली. त्यानें कृष्णाची क्षमा मागितली व देवाची पोटभर स्तुति केली. कथा संपली; पण गीत राहिलें आहे ! गोपवासरुवें आनंदभरित आहेत हें ब्रह्मदेवानें पाहिलें, तेव्हां ' सकळही चतुर्भुज गोपाळः करीं शंख चक्र गदा कमळः पीतांबरधारी सुनीळः कौस्तुभकंठी ! ' हें त्याला दिसलें, इतकेंच काय पण ' एकैकू ब्रह्मा देखिला । एकैकापासीं ! एकेकापासी सकळ तत्वें, सकळ सृष्टिचक्रें, ब्रह्मा विष्णु महाकाळ, सकळ दिक्पाळ, महाभूतें, क्षुद्र-देवता, हें सर्व कांहीं आहे असें त्यानें पाहिलें ! गोपाळांच्या ऋद्धि पाहिल्या, रोमरोमांत अनंत ब्रह्मांडें आहेत व प्रत्येकांत एकेक ब्रह्मा आहे हें पाहिलें आणि ब्रह्मदेवाचा अभिमान पार नष्ट झाला, आपण किती लहान आणि चक्रपाणी श्रीकृष्ण केवढा थोर हें त्यानें ओळखलें आणि त्यानें देवाची स्तुति केली.

**तोचि धेयावा मनीं: तेयाचे पवाडे आइकावे कानीं:**
**भणे केशवराजु मुनी: श्रोतयांतें ॥ ३७५ ॥**

ब्रह्मदेवानें केलेली स्तुति भक्तिरसानें ओथंबलेली आहे. तिचा थोडासा उतारा पुढें देऊन ह्या काव्याचें विवेचन संपवितों.

ब्रह्मदेव म्हणतोः—

**भणे जालेया रवीचा प्रकाशुः न दिसे खद्योताचा आभासुः**
**तैसा माझिया बुद्धीचा विकाशुः तुजपुढें ॥ ४८४ ॥**
**तूं न होतासि भृत्यवत्सलुः न करितासी आनंदाचा सुकाळुः**
**तरी संसाररूप दुःकाळुः जीवां केविं जाते ? ॥ ३९६ ॥**
**तूं न करितासी उदारपणः नेदितासि आपुलें ज्ञानः**
**तरी घोर संसारभ्रमणः जीव केविं जातें ? ॥ ३९७ ॥**
**तूं निराकारु निर्गुणुः जरि न होतासि सगुणुः**
**तरि पतितांचा कुढावा कवणुः करिता सांघें ॥ ४०० ॥**

तूं न करितासि अवतारूः तरि कवण फेडिता भूमीचा भारूः
दैत्यांचा करौनि संहारूः कवण स्थापिते देवांतें ॥ ४०२ ॥
तुझिया पुण्यकथा नाइकितांः जीवां नाहीं पवित्रताः
तरि परमार्गीं योग्यताः केविं होये ? ॥ ४१० ॥
यमनियमु आसनींः सकलै योगुसाधनींः
तुझेनि बोलेवीण ब्रह्मज्ञानींः रिगावा नाहीं ॥ ४१३ ॥
तैंचि मुक्तीचें द्वार उघडेः जरि संतांचा संगु घडेः
उदंड आइकीजेती पवाडेः श्रीकृष्णा तुझे ॥ ४२४ ॥
जें सर्वगत निराकारूः मनावाचे अगोचरूः
कूटस्थ भणिजे अक्षरूः कैवल्यरूप ॥ ४२७ ॥
परि सांवळें साकारूः जेथ गुण असेति अपारूः
तें तुवां लीलां धरिलें सुंदरूः मनुष्यरूप ॥ ४२८ ॥
जय अनंतरूपा अव्यक्ताः जय निर्गुणा गुणातीताः
जय चराचरभर्ताः विश्वरूपा ॥ ४६८ ॥
जे पातले तुझा योगुः तेयां भक्तांचा मज देई संगुः
जेथ तुझिये कथेचा प्रसंगुः निरंतरू ॥ ४८१ ॥

## ११ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर

रामदेवरावाच्या आश्रयाला नृसिंह, शैल्य व नरेंद्र असे तीन बंधु होते. यांचें आडनाव 'अयाचित' होतें. तिघेही भाऊ विद्वान् होते व कवि होते. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. नृसिंहानें मराठी ओवीछंदांत 'नलोपाख्यान' लिहिलें, शैल्यानें 'रामायण' व नरेंद्रानें 'रुक्मिणीस्वयंवर' लिहिलें. नामदेवानें 'साळ्या रसाळाच्या रामायणाचा' उल्लेख केला आहे यावरून शैल्य हाच 'साळ्या रसाळ' असावा अशी शंका येते. कदाचित् हें खरेंही असेल, पण हें सिद्ध होण्यास आणखी बळकट पुरावा पाहिजे. ह्या ग्रंथाचे चारदोन उतारेच प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून महदंबेच्या धवळ्याइतका तो प्रसादयुक्त नसावा

असें वाटतें. कदाचित् समग्र ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर हें मत बदलावें लागेल. नरेंद्रानें महानुभावपंथाची दीक्षा घेण्यापूर्वी हा ग्रंथ लिहिला. याच्या मंगलाचरणांत प्रथम गणपतीचें, व मग शारदेचें स्तवन केलें आहे. 'उमेशंकराचा कुमरु । कीं सांघों गणांचा ईश्वरु । तो सेन्दूर सांडवरु । गोरा मेरु जैसा.' गणेश सिद्धिबुद्धिदायक आहे, विद्येचा अधिपति आहे, विघ्नतम घालविण्याचें सामर्थ्य त्याचे 'दांतांचे तेजांत' आहे:—

**तें गणराजाचें उदार रूपडें । थोरपणें देवतें जिंतिलें होडें ।**
**कवींसी शब्दब्रह्माची राणीव कोडें । जेणें पाळिली ॥**

'कविकुळदीपक' 'साहित्य सृष्टीचा चालक' व 'सारस्वतगंगेचा त्र्यंबक' असा कुमाराचा वेष घेणारी शारदा हिचें गौरव यापुढें कवि करीत आहे. शारदेच्या रूपाच्या चांदण्यांत कवींस प्रेमयाचे वोपणें म्ह. सिद्धांताची देणगी किंवा दान मिळत असतें. ती आपल्या कृपेनें महाकवींवर नवरसांच्या मेघांची दृष्टि करिते.

शारदेच्या उजेडांत कवि चालतात, त्यांतच जर गुरुकृपेचें अंजन त्यांच्या डोळयांत पडलें तरच त्यांना कृष्णकृपेचे ठेवे स्वच्छ दिसतात. कवि म्हणतो 'श्रीकृष्णाचा वार्णिता कीर्तीचंद्रु ! चढवीन सुखाचा समुद्रु.' नरेंद्रकवीजवळ कल्पनावैपुल्य आहे पण माधुर्य नाहीं.

## १२ ज्ञानप्रबोध

शके १२५३ मध्यें विश्वनाथ बाळापूरकर यानें हा सातीग्रंथांपैकीं एक ग्रंथ लिहिला आहे. याच्या १२०० वर ओव्या आहेत. गीतेच्या १३ व्या अध्यायांत 'अमानित्वादि' जीं ज्ञानाचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांच्या स्पष्टीकरणार्थ यानें १२५ ओव्या रचिल्या असून बाकीची सर्व रचना स्वतंत्र आहे. कवि म्हणतो, मी 'करोनि गीतेची भिंती । ज्ञानचित्र पाडिलें' आहे. 'तेथ अध्याय तेरावा । देवें सांगितला ज्ञानरत्नाचा ठेवा । तो गुरुवाक्यांजनें सुहावा । काढोनि दाविला.' कवीनें आपलें नांव विश्वनाथ, विश्वनाथमुनि, 'विशो' असें दिलें असून गुरूचें

नांव ' अचळ शिव ' असें दिलें आहे. नागार्जुन त्याच्या परंपरेचा मूळ-पुरुष असल्यामुळें त्याविषयीं कवीची अर्थातच पूज्यबुद्धी आहे. 'अचळा शिवाचेनि बरें । बुद्धी अधिष्ठिली तत्वविचारें । मूर्ती वर्णिली तदाधारें । ह्मणे विश्वनाथु' ( १०१ ); ' अचळा शिवाचेनि प्रसादें । विश्वनाथमुनी प्रा( प्र ? )ज्ञामंदें । भक्ती बोलिली मुनीवृंदें । परिसतु वाणी' ( १०२२ ) ग्रंथकर्त्यानें ग्रंथसमाप्तीचा शक दिला आहे.' शके बाराशेंत्रेपन ( १२५३ ) भीतरी । प्रजापतीनाम संवत्सरीं । माघेपंचमी प्रथम प्रहरीं । तै ग्रथन पूर्ण जाले ' हा संसारांत असतांनाच यानें कमलाकरनामक पुरुषाचा उपदेश घेतला होता. अचळ हाही त्याचा एक गुरु होता. हा कामराजनामक एका धनाढ्य व्यापाऱ्याचा कोशाध्यक्ष होता. धन्याची मर्जी कांहीं कारणानें जाऊन हा बंदिवासांत पडला. त्यांतून त्याला शिवव्यासानें सोडविलें. लगेच त्यानें शिवव्यासापासून महानुभावपंथाची संन्यासदीक्षा घेतली. ज्ञानप्रबोधाचे शेवटीं ' नमस्कारू जाले प्राप्तियोग्य । शिव कमळाकरू ॥ तया उभयांचेनि वरदहस्तें । माझें जन्म सुफळवसतें' असें म्हटलें आहे. यानें 'ज्ञानचंद्रिका' नांवाचा एक गद्यग्रंथही लिहिला आहे. दोन्ही ग्रंथांवरून कवीचा ज्ञानाधिकार थोर होता असें दिसतें. ज्ञानप्रबोधावरून त्याच्या विचाराची व भाषेची थोडी ओळख करून घेऊं.

शारदेच्या स्तवनांत पुढील सुंदर ओव्या आल्या आहेत:—

**ते मेघगंभीर वाचा । वर्षाव करी ज्ञानाचा ।**
**तैं पूर ये जाणीवेचा । उन्मेषसंगें ॥ ३८ ॥**
**जैसे सोमकान्त द्रवकरीं । जंव भेदतीना अंतरीं ।**
**तंव द्रवोनि स्रवती बाहिरी । जीवनातें ॥ ३९ ॥**
**नातरी मूढ नेणतें । प्राज्ञ होती सारस्वतें ।**
**मग तेंचि सकळसृष्टीतें (शब्दसृष्टीतें) चाळिते होती ॥ ४० ॥**

कथामहत्ववर्णनांत कवि म्हणतो:—

**पर तो भक्तीचा कुवासा । भावग्राहिक या आशा ।**
**बांधतसे धिंवसा । स्तुतीलागी ॥ ४८ ॥**

न करितां गुणकथन । वाचेशीं नाहीं पवित्रपण ।
न स्मरतां श्रीचरण । जीव शुद्ध नव्हे ॥ ५० ॥
पर कोरडिया जाणिवा । चाड नाहीं देवदेवां ।
तो आभारिजे सेवां । भक्तिभावें ॥ ५२ ॥

श्रोत्यांची प्रार्थना:—

या लागीं ग्रंथसुवर्णाच्या ताटीं । रसाची वोणे वाटी ।
प्रेमपूर्वक देईन गोमटी । देवां आरोगण ॥ ५३ ॥
सिद्धांत-कर्पूरवासें । घोळून साहित्यरसें ।
भाव-विडा प्रबंधमिषें । स्वामीं देईन ॥ ५४ ॥
तरी पोखलेनि प्रेमभावें । महंतीं आदरें आइकावें ।
हें न लगे प्रार्थावें । आर्त म्हणोनी ॥ ५५ ॥

अमानित्वादि लक्षणांवरच्या ओव्यांवर ज्ञानेश्वरीची पूर्ण छाप पडलेली आहे. विश्वनाथानें ज्ञानेश्वरीचा उल्लेख केला नसला तरी ज्ञानलक्षणें सांगतांना ज्ञानेश्वरी त्याच्या पुढें होती यांत शंका नाहीं. ज्ञानेश्वरींतील शेकडों शब्द (वाक्यार्थही) या ग्रंथांत तशाच अर्थानें आले आहेत.

'तो मानाचेनि भारें दडपे । पूजेतें भिउनी कांपे । पुरस्करिलिया वासिपे । वर्में जेवीं ॥ ७५ ॥ जन-अव्हेराची करी आस । पाहे अवज्ञे येउती वास । धिक्करण याची बहुवस । चाड जीवीं ॥ ७७ ॥ म्हणोनि रंकवृत्तीचिये खोपें । जो **महिमाभेणें लपे** । तैं अमानित्व आरोपे । तया आंगीं ॥ ७९ ॥ अवाच्यतेच्या कूपीं । अभ्यासिली सामग्री लोपी । **आथिले गुण** निक्षेपी । अकर्तेपणामाजी ॥ ८१ ॥ जडत्वाचीं आंग-भूषणें । **वेडीवतेचि मिरवणें** । उन्मत्तवत् बोलणें । विचरे पिशाचवत् ॥ ८२ ॥ येऱ्हवी तयाचेनि पाडें । शाहणा कुशल न जोडे । चातुर्य असोनि फुडें । क्रीडे बालकवत् ॥ ८३ ॥ तरी आत्मवंतें भूतें । ऐसे घेतले जयाचेनि चित्तें । हेंचि वर्म निरुतें । अहिंसेचें ॥ ८७ ॥ आपणातें न दुखवी जैसें । भूतमात्रा वागवी तैसें । तृणादिकरून मानसें । न भावी

विरु ॥ ८९ ॥ असो हें भूतजात–खेदें । जयाचा आत्मा भेदे । **ज्ञान सपरिवारीं नांदे । तयाचां ठायीं** ॥ ६६ ॥ जो आपुल्या सद्गुणीं । करी पुढिलांच्या दोषा धुणी । ह्मणोनि पवित्रा शिरोमणी । तीर्थभूत ॥ ११४ ॥ न घालावें तें घाली मुखीं । इ. इ०

ह्या ओव्या वाचतांना प्रतिपदीं ज्ञानेश्वरी वाचकांच्या डोळ्यांपुढें उभी राहील. विश्वनाथाच्या वाणींत सुलभता आहे, सहज प्रवाह आहे, कृत्रिमता नाहीं, मधून मधून वक्तृत्वाचा जोर आहे, कांहीं कांहीं ओव्या फार सुंदर आहेत: ‘ जो मायाबंध तुटे । ऐशीं शस्त्रें नाहीं तिखटे । आणि व्यामोहतम फिटे । ऐसें भेषज नाहीं ’ ( ३६७ ); ‘ ह्मणोनि ईश्वर आणि कृपा । दोहीं भेद नाहीं स्वरूपा । जेवीं प्रभे आणि दीपा । वेगळीक नाहीं ’ ( ३७८ ); ‘ विचारसामग्रीचेनि बळें । उघडती व्युत्पत्तीचे डोळे । तैं स्वरूपबुझाचे झावळें । बुद्धीचें फिटे ’ ( ६८२ ); ‘ यापरी विचारें मन धरिजे । आचारें इंद्रियांतें निरोधिजे । संयमें स्वभावातें दमिजे । देह सुकौनि ’ ( ८१६ ); ‘ भक्तीचेनि मापें घेईजे । कैवल्यसुख ’ ( ८४७ ); ‘ तयां संतांचा महिमा । बोलतां न दिसे उपमा । असो हे सरिसे आत्मा–। रामा म्हणोनी ’ ( ८९७ ); ‘ जें ज्ञानाशीं मंडण । वैराग्यांशीं भूषण । वैराग्याशीं पांघरूण । भक्ती हे ’ ( १०१५ ); इत्यादि ओव्या व त्यांतील विचार फार बहारीचे आहेत. श्रीमूर्तीचें वर्णन शंभर ओव्यांत केलें आहे पण त्यांत भास्कर कवीश्वराचा किंवा केशवराजसूरीचा ओलावा नाहीं, कदाचित् हा कवि ज्ञानाकडे अधिक खेंचला गेल्यामुळें असें झालें असेल ! त्यांतही ‘ पक्व डाळिंबाचिया बिया । होती सुरंगझळालिया । पर उपमे नव्हती तिया दंतपंक्तीशीं ( ४७१ )’ अशी एखादी ओवी ओढून आणलेली दिसते.

ओवी ६४०पासून अविद्याखंडणाच्या ज्या १०।१५ओव्या आहेत त्यांतही अमृतानुभवांतील अविद्याखंडणाची छाया दृष्टीस पडते. पुढील दृष्टांत मात्र स्वतंत्र आणि मौजेचे आहेत. आत्मा पवित्र तेथें अविद्या व्हावी कशी ?

आधी अविद्या येऱ्हां निरसे। तेह वेळीं शुद्ध आत्मा ब्रह्मीं पैसे
तेथही अविद्या असे। हें अघटित नव्हे ? ॥ ६४३ ॥
अहो जे धर्मपवित्र काशी। दर्शनें महापापें नाशी।
ते दोषें व्यापिली ऐशी। हे विरुद्धोक्ति नव्हे ? ॥ ६४४ ॥
गरुडां गरळ चढे ?। सिद्धा क्षयव्याधी अडे ?।
वज्रशरीरिया केवि घडे। शस्त्रें मरण ? ॥ ६४५ ॥
गुणियांचेनि मंत्रवटें। आणिकांचें पिसें फिटें।
तयाही भूतबाधा घडे। तर झाडी कवण ? ॥ ६४६ ॥
तैसें जयाचेनि कृपादर्शनें। अविद्येचें उठी ठाणें।
तया अविद्या बाधे स्वगुणें। तर फेडी कोण ? ॥ ६४७ ॥

यापुढें चार दोन दृष्टांत अमृतानुभवांतलेच घेतले आहेत. स्वयंप्रकाश नित्यमुक्त आत्म्याचे ठिकाणीं माया झाली हें म्हणणेंच गैर आहे, विश्वाकार हा ब्रह्माचा खेळ आहे,.पण ब्रह्माला स्वानंदांत कांहीं कमतरता आली म्हणून त्यानें खेळ मांडला! म्हणून अविद्या ही अनादि आहे, व जीवशिवांचें द्वैत अनादि आहे असा विश्वनाथानें सिद्धांत केला आहे- तो महानुभावीयांच्या द्वैतवादाला तोंड फोडणारा आहे.

अविद्या जीवीं अनादीची। स्वयं उमटली मुळीची।
जैसी त्वचा देहीची। आंगासरिसी ! ॥ ६५८ ॥
जेवीं कोंडा लागला कणेंसीं। तेविं अविद्या जीवेसी।
जीवबंध मायागुणपाशीं। तो ब्रह्मेसी सरी नव्हे ॥ ५९ ॥
अहो उत्तमा राजहंसा। केवीं सरी हीना वायसा ?।
तेवीं अमृतमया भूतेषा( शां )के पाड जीवीं कृमीं ? ॥ ६६० ॥
चिंतामणि आणि स्फटिकां। काचा आणि माणिकां।
दर्पणा आणि मयंका। भेद दोन्ही ! ॥ ६६२ ॥
रायां आणि रंकां। स्वामीं आणि सेवकां।
नायकां आणि पायकां। तेविं भेद जीवेश्वरां ! ॥ ६६४ ॥

ज्ञानेश्वरांबरोबर विश्वनाथकवि अविद्याखंडणापुरते चिदाकाशांत वर उडायला गेले, पण पुढें त्यांना जणुं घेरी येऊन ते खालीं द्वैताच्या खोड्यांत पडले ! असो. हा 'ज्ञानप्रबोध' ग्रंथ एकवार वाचून टाकण्यासारखा व जाणत्यांनाही मनोरंजक वाटण्यासारखा आहे. ग्रंथसमाप्तीचे समयास कवीनें आपलें दीनपण व रंकपण अगदीं केवीलवाण्या सुरांत व्यक्त केलें आहे, तें त्याच्या द्वैतबुद्धीला अनुसरूनच आहे. अविद्येचें व विद्येचें, अज्ञानाचें व ज्ञानाचें, सच्चिदानंद या त्रिपदाचेंही खंडण करून म्ह० विवेकानें त्याग करून स्वानंदसाम्राज्यपटावर आरूढ होणारे ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वर खरेच आहेत, हें संशयितासही पटवून देण्यासाठीं ज्ञानप्रबोधासारख्या ग्रंथाचा उपयोग होत असल्यास त्यांत वावगें काय आहे ? शेवटीं कवीनें 'लौकिकी शृंगारसहित काव्यें साहित्यलंकारयुक्त' असलीं तरी भक्तीवांचून रचलेलीं काव्यें मोक्षास कारण होणार नाहींत असें म्हटलें आहे. 'भक्ति गोड मंगलदायक । वर चढविजे साहित्याचें बीक' असलीं अमृतोपम काव्यें निःसंशय श्रेष्ठ होत.

## १३ ऋद्धिपूरवर्णन.

हा ६४५ ओव्यांचा ग्रंथ नारायण पंडित व्यास उर्फ नारो बहाळिये यानें शके १२८५ मध्यें लिहिला. बहाळिये हें गांव खानदेशांत असून त्या गांवचा रहिवासी म्हणून त्यास बहाळिये हें उपनांव पडलें ! प्रस्तुत ऋद्धिपूरवर्णनाचा प्रसंग साधून ह्यांत कवीनें आपली संसारार्त स्थिति व्यक्त केली आहे. हा ग्रंथ महानुभावांचे मुख्य क्षेत्र जें ऋद्धिपूर त्याच्या वर्णनाचा असून नारायणपंडिताच्या निःसीम गुरुभक्तीच्या ओलाव्यानें तो ओथंबलेला आहे. नारायण पंडिताची आध्यात्मिक योग्यता ह्या ग्रंथावरून फार उच्च कोटीची होती असें दिसून येतें. भाषा अत्यंत साधी आणि विचारांचा किंवा भावनांचा ओघ अतिशय प्रबळ व सहज असल्यामुळें सारा ग्रंथ रसभरित झाला आहे.

श्रीमहाक्षेत्र पंढरपुर दुरून पाहतांच वारकऱ्याच्या मनाची जी स्थिति होते तीच नारायणपंडिताची ऋद्धिपूरक्षेत्राचा बाह्यप्रदेश दिसतांच

झाली. गोविंदप्रभूच्या चरणानें पुनीत झालेलें हें स्थळ पाहतांच त्यानें लोटांगण घातलें. क्षेत्रांतील वृक्षराजी, त्यावरील पक्षिगण, त्यांच्या तळीं असलेले महानुभाव संत, मंदिरांचीं शिखरें, तलाव, पुष्करणी, रायांगण, राजमठ, मंदिराचे स्तंभ, ओटा, भोजनस्थान इत्यादिकांचें सविस्तर वर्णन कवीनें मोठें हृदयंगम केलेलें आहे. गोविंदप्रभुविषयीची त्याची पराकाष्ठेची पूज्यबुद्धि, परमेश्वराचे गुणवर्णन व आपल्या उद्धाराची याचना, ज्ञानाचा उपदेश करणारे संतमहात्मे यांच्याविषयीं प्रेमभाव यामुळें ह्या ग्रंथाला अतिशय माधुर्य आलें आहे. प्रस्तुत काव्याचें स्वरूप लक्षांत यावें म्हणून याखालीं त्यांतील चार दोन अवतरणें देतों. ऋद्धिपूरक्षेत्राचें दर्शन होतांच कवीचा प्रेमभाव कसा उचंबळला पहाः—

जें आर्तांसि कारणें[1]ः संसारश्रमाचे विसंवणेंः
तें श्रीऋद्धिपूर देखिलें तेणेंः दुरौनिया ॥ ४४ ॥
रोगिया अमृतपानुः लाहे तान्हैला जीवनुः
स्वामि जालेआ प्रसन्नुः जैसें सेवकां होएः ॥ ४७ ॥
सासुरवासें शीणलीः तिये भेटे जेवि माउलीः
असो हे तैसी परी जालीः श्रीऋद्धिपूर देखिलेआं ॥ ४८ ॥
धांडोळितां तीनि लोकांः मी उपमा न देखे आणिकाः
जे जालें जगदेकनायकाः क्रीडास्थानु ॥ ४९ ॥
तें हें कैवल्यबीजाचें क्षेत्रः कीं निवृत्तांचें परत्रः
कीं परसुखाचें छत्रः मांडिलें आर्तांसिः ॥ ५० ॥
कीं धर्माची उत्तरवेंठ[2]ः कीं सिद्धीची ॲळँगवटः[3]
ना तो संसृतीसि ताठः वज्रलेपः ॥ ५१ ॥
श्रुतीस्मृतींचेनि अर्थेंः स्वधर्में अनुष्ठातेः
जेथें सदाचार नांदतेः ब्रह्मविदः ॥ ५४ ॥
ते देखौनि देवनगरीः साष्टांगें नमस्कारीः
जाली तापांसि बोहरी[4]ः ते परिएसा पां ॥ ५५ ॥

१ आर्तीकारणें. २ उतारपेठ. ३ प्राप्तीचें स्थान. ४ त्रिविधतापांचा नाश.

निर्गुण तेंच सगुण झालें अशाबद्दल कवीचे उद्गार:—

तैं व्यापकु[1] हालें: कूटस्थ चाले:
अनिर्वाच्य बोलें: अमृतोपम: ॥
जेथ निरंतरासि स्वंण[2]: अकर्तेआंसि करणें[3]:
निर्गुणासि गुण: आलौकिक ॥
निराकारासि अवयव: निरुपाधीसि बरवें[4]:
जेथ नि:प्रपंचका सेव्य: निजकिंकरी: ॥
परमाणुचेनि पाडें: रोमें लपालीं ब्रह्मांडें:
तें परब्रह्म क्रीडे: जिये मठीं: ॥

परमेश्वराची प्रार्थना:—

बोलावेया जयाचें पद: मुके जाले वेद:
तयातें उपायें केवि जात्यंध: देखो पांती: ॥
बापु जीवाचिये कणवें: जे अज्ञाना मायेची सवें:
भणौनि तोचि वेषु देवें: अंगिकारिला: ॥
जो अगाधु अक्षोभु: अव्यक्त अनादि स्वयंभु:
तो मायावेषं श्रीप्रभु: अवतरिला: ॥
नि:कामा निरभिमाना: निजानंदें परिपूर्णा:
केवळ सुखा कीं व्यसना: जीवोद्धरणाचें: ॥
भलतैसें दुष्ट लेंकरूं: परि माउलिये नये अव्हेरूं: ॥
देवो कृपेचा सागरू: आणि मी तृषा फुटे: ॥
अवलोकितां श्रीमूर्ति: न लगती नेत्रांचीं पातीं:
ते जैसे डोळे वाट दाखविती: परसुखाची: ॥
वज्रापासाव कठिणु: मज दैवहताचें अंत:करणु:
एरव्ही तुझेनि वीरहें प्राणु: जावें कीं ॥

१ व्यापक असून २ स्थान ३ इंद्रियें ४ बाह्योपाधींचा स्वीकार, शोभा.

भणे अहोजी जगजीवनाः मी फुटतु असे तान्हाः
तूं मायावेषु तरि मज अज्ञानाः कां विसंवलासिः ॥
तूं परब्रह्म मज क्षुधाः तूं सुखदानि मी दुखिया सदाः
तूं मोचकु मी भवबंधाः वश जालाः ॥
तूं कृपाळु मी अनाथुः तूं जगदात्मा मी भूतुः
तूं तारकु मी बुडतुः भवार्णवीः ॥
लेंकरूंवाचेनि दुःखें: जेवि माउली उभी सुकेः
तेवि तूं जगदंबिकेः मजलागौनिः ॥
देॐ आत्मरमणु मीः कामबाणीं विच्छिन्नुः
देॐ सकळ सुरशरण्युः मी हीनु बहुतें पाडें: ॥
देॐ परात्पर तरुः मी अधोगामिया निरंतरुः
देॐ पूर्ण सुखसागरूः मी दुःखग्रस्तः ॥

## १३ महानुभावपंथ व वारकरीपंथ.

आपण कवीश्वर भास्कराचा ‘ शिशुपालवध, ’ केशवराजसूरीचें ‘ वत्सहरण, ’ महदंबेचे ‘ धवळे, ’ भावे व्यास याचा ‘ पूजावसर, ’ नारायण पंडिताचें ‘ ऋद्धिपूरवर्णन ’ इ० ग्रंथांचें परीक्षण केलें आहे. ‘ सिद्धांतसूत्रपाठा ’चा विचार त्याच्यापूर्वींच केला आहे. हे सर्व ग्रंथ अत्यंत रसाळ आहेत. शिशुपालवधांत उत्तान शृंगार व हलक्या प्रकारचा विनोद हे दोन दोष आहेत तरी एकंदरीनें ग्रंथ सुरस आहे. कवि व्युत्पन्न, रसिक, भाषाप्रभु व प्रेमळ कृष्णभक्त आहे. त्याची संस्कृत व मराठी दोन्ही भाषांत चांगली गति आहे. हीच गोष्ट दामोदर पंडिताची, त्याच्या वत्सहरणांत विचारांची खोली व प्रौढी अधिक आहे. नारायण पंडित या सर्वांत परमार्थाचा अंतरंग अधिकारी अधिक योग्यतेचा दिसतो. पंढरपुरास मुक्ताबाई व जनाबाई प्रेमळ विठ्ठलगीतें गात होत्या त्याचवेळेस ऋद्धिपुरास महदंबा रुक्मिणीस्वयंवराचे ढवळे गात होती ! ह्या तिघी एकत्र आल्या असत्या तर काय मौज झाली

असती! तिघी कवयित्री कृष्णप्रेमानें भरलेल्या हृदयांनीं एकमेकींस भेटल्या असत्या तर ह्या गंगायमुनासरस्वतींचा प्रयाग पुंडलीकाच्या चरणांपाशींच झाला असता! गोविंदप्रभूच्या आज्ञेवरून महदंबेनें आपले 'धवळे' गायिले हें मागेंच सांगितलें आहे व गोविंद प्रभू शके १२०८ मध्यें देवलोकास गेले यावरून हे धवळे शके १२०८ च्या पूर्वींच गायिले गेले होते हें उघड आहे. मुक्ताबाईचें वय यावेळीं ७।८ च्या सुमारचें होतें. यावरून या तिघी कवयित्री समकालीन खऱ्या, पण त्यांत आद्यकवयित्रीपणाचा मान महदंबेकडेच जातो असें मला वाटतें. तिघीही सारख्याच प्रेमळ होत्या. मुक्ताबाईजनाबाईविषयीं आपण पुढें बोलणार आहोंत. पंढरपुरास आणि ऋद्धिपुरास मराठी भाषा एकाच वेळीं परमेश्वराच्या गुणानुवादांत दंग झाली होती. ऋद्धिपूरचे कवि काव्यें लिहीत होते, गद्य लिहीत होते, विविधवृत्तांत सयमक निर्यमक श्लोकही लिहीत होते, नवरसात्मक काव्यें गात होते, मराठी भाषेचें ऐश्वर्य व सामर्थ्य वाढवीत होते. मराठी शब्दांची टांकसाळ दोहींकडे झडत होती. वऱ्हाडांत गोविंदप्रभु व इकडील महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरमहाराज, तिकडे चक्रधर आणि इकडे नामदेव ह्यांच्या छत्राखालीं मराठी वाङ्मयाचा प्रभाव महाराष्ट्रभर पडत होता. हे चारीपुरुष एकत्र आले असते तर भारी मजा आली असती. कदाचित् ऋद्धिपूर पंढरपुरांत तेव्हांच सामील होऊन गेलें असतें! पंढरपुरास अठरापगड जातींचे भक्तभाविक एक झाले होते, इकडे ऋद्धिपुरास विद्वान् शास्त्री-पंडित सुंदर काव्यें लिहीत होते. शिशुपालवध, धवळे, वत्सहरण हीं कृष्णभक्तिमय काव्यें पंढरपूरच्या वारकऱ्यांस खास आवडलीं असतीं, त्यांत त्यांना न रुचण्यासारखें कांहींएक नाहीं. धवळे व वत्सहरण हीं महानुभावांचीं काव्यें आहेत असें न सांगतां वारकऱ्यांच्या मेळ्यांत वाचलीं तर आजही वारकरी तीं ऐकून आनंदानें डोलत राहतील इतकीं तीं भागवतधर्मीय भावनांनीं व विचारांनीं परिपूर्ण आहेत. पंढरपूरचे टाळघोळ व नामसंकीर्तनाचा थाट तेराव्या शतकांत ऋद्धिपूरच्या भाविकांत प्रगट

झाला असता तर ज्या कांहीं रूढी त्यांच्यांत पडत चालल्या होत्या त्या न पडतां आळंदी, पैठण, देहू ह्या क्षेत्रमालिकेंतच ऋद्धिपूरचें नांव गोविलें गेलें असतें. अस्तु, जें मागें न झालें तें यापुढें व्हावें व महानुभाव महंत, त्यांचे ग्रंथ व त्यांचा पंथ पंढरपूरच्या महासागरांत एकमय होऊन जावा, अशी माझी उत्कट इच्छा आहे.

आणि महानुभावपंथाचे भास्करादि कवि आणि पंढरपूरचे संतमंडळ यांच्या साध्यसाधनांत कांहीं महत्वाचे भेद दिसत नाहींत, उलट पुष्कळच साम्य आहे. पंढरपूरच्या संप्रदायाला महानुभावपंथ जितका जवळ आहे इतका दुसरा कोणताही पंथ जवळ नाहीं. दोघांचें उपास्य एकच ह्म० श्रीकृष्ण. भास्कर कवीश्वर व केशवसूरि यांच्या कृष्णचरित्रांवरील आख्यानांत श्रीकृष्णाच्या गुणरूपाचें जें वर्णन आहे तसेंच वारकरी संतांच्याही अभंगादिकांतून आहे. निर्गुणनिराकार परब्रह्मानेंच लोकोद्धारार्थ कृष्णरूप घेतलें आहे; सगुण निर्गुण एक आहे; सत्संग, गुरुसेवा आणि नामस्मरण हेंच मुक्तीचें परमसाधन आहे; असें दोघांचेंही सांगणें आहे. तात्पर्य उपास्य व उपासनापंथ यांत दोघांचेंही ऐकात्म्य असल्यामुळें दोघेही निःसंशय भागवतधर्मीय आहेत.

(१) साधुसंगाचेनि भांडवलें । ज्ञानमार्गाचा व्यवसावो फळे ।
जो न जोडे पुण्याचेनि बळ । ब्रह्मादिकांसी ॥ ७३ ॥

(२) तूं निर्गुण गुणसागरु। साकार सातां (असतां) निराकारु॥१०८॥

(३) देखौनि श्रीमूर्ति उघडी । ब्रह्मविद्या डोळे मोडी ।
मूर्ति धांवे उघडी । पाठोपाठीं ॥ ३७२ ॥

(४) जेयापासौनि जगा जन्मु । जें परिपूर्ण आत्मारामु ।
जें ध्याइलें परब्रह्मु । गुरुप्रसादें ॥ १ ॥
तेयां साकारा सगुणा । सर्वभावीं केलें नमना ।
त्रिभुवनुजीवना । श्रीकृष्णराया ॥ २ ॥
भक्त उद्धरावेया अपारु । जे जे ईश्वराचे अवतारु ।
तेयां साष्टांगीं नमस्कारु । केला मियाः ॥४॥ (शिशुपालवध)

(५) साना होऔनि निऱ्हा थोरू । भीतरीं असौनि सकळां परू ।
अकर्ता करी सृष्टिसंहारू । हें अघटित नोहे ! ॥ ६० ॥

ऐसिया विरुद्धधर्मांचिया प्रवृत्ति । एकीं ईश्वरींचि आथी ।
ते वेदशास्त्रें नेणती । जाणती भक्तजनु ॥ ६१ ॥

(६) एकु जीवपरमात्मया ऐक्य भावितु । एकु सेव्यसेवकभावें उपासितु ।
एकु भेदाभेदविवर्जितु । राहिले निरालंबीं ॥ १४८ ॥ (वत्सहरण)

श्रुतिस्मृतीचेनि अर्थें । स्वधर्में अनुष्ठाते ।
जेथें सदाचार नांदते । ब्रह्मविद ॥

(७) सांडौनि अन्यरससेवा । नामाची गोडी लागली जिव्हा । (ऋद्धि०)

हेच विचार वारकरीपंथाच्या वाङ्मयांतही आहेत. यांत त्यांना विरुद्ध वाटण्यासारखें कांहींच नाहीं. माध्वांचें द्वैतमत महानुभावांनीं स्वीकारलें असलें ( व उपासनेपुरतें पाहिलें तर त्यांत कांहीं गैर नाहीं ) तरी अद्वैतमताचा ओघ त्यांच्या वरील सर्वकाव्यांत एकसारखा वाहत आहे. वत्सहरणाची कथाच अद्वैतसिद्धांत दृढ करणारी आहे. माध्व-सांप्रदायी लोक हें आख्यान आपल्या भागवतांत घेत नाहींत, त्यांच्या भागवताच्या ' विजयध्वजी ' टीकेंत हें आख्यान मुळींच गाळलेलें आहे ! ब्रह्मदेवानें गोपाळ व वत्स चोरून नेल्यावर भगवंतानें स्वतः गोपाळांचीं व वत्सांचीं रूपें घेतलीं ही रम्य कथाच जीवब्रह्मैक्यप्रतिपादक आहे ! नागार्जुनांचे शिष्य केशवराजसूरी हे 'वत्सहरण' काव्यांत म्हणतातः—

आधीच देवो सर्वगतु । वरि तैसाचि जाला मनोरथु ।
तेतुलीं रूपें धरौनि असे खेळतु । हें काई नवल हे पा ? ॥२७३॥

एकु केवि जाला अनेकु । ऐसें बोले नेणता लोकु ।
तरी सहस्रघटीं शशांकु । प्रतिबिंबतुसे ॥ २७५ ॥
जैसा मणिगणीं तंतु । मेघावली गगनातु ।
तैसा भूतीं विश्वनाथु । कीं भूतें तेयामाजी ॥ २७६ ॥

यांत अद्वैतसिद्धांत निःसंदेहपणें सांगितला आहे आणि हा ग्रंथ महानुभावांच्या ‘ साती ’ ग्रंथांत आहे. तसेंच नरेंद्राच्या रुक्मिणी-स्वयंवरांत हिंदुरीतीप्रमाणें ग्रंथारंभीं गणेशशारदांचें वंदन केलें आहे, व गणेशास ‘ उमेशंकराचा कुमरु ’ ‘ सेन्दुर सांडवरु ’ विद्येचा अधिपति ‘ विघ्नतम घालविणारा ’ इ० विशेषणें लावलीं आहेत ! महानुभावी लोक श्रीकृष्णावांचून अन्यदैवत मानीत नाहींत असें म्हणतात, पण येथें नरेंद्रानें गणेशशारदांचें स्तवन केलें आहे आणि हा नरेंद्राचा ग्रंथ ‘ साती ’ ग्रंथांपैकीं आहे व महानुभाव ‘ साती ’ ग्रंथांस पूज्य मानतात !! नरेंद्राचा भाऊ शैल्य (साळ्या रसाळ?) यानें एक ओवीबद्ध रामायण लिहिलें आहे ! असो. महानुभावपंथाचें शास्त्र व रूढी कांहीं सांगत असल्या तरी त्या पंथाच्या प्राचीन प्रमुख ग्रंथकारांनीं आपले पूर्व-संस्कार कांहीं सोडले नाहींत, किंवा ते त्यांना सुटले नाहींत. नागदेवाचार्य व अर्थात् त्यांची चुलतबहीण महदंबा, केशवराजसूरी, दामोदर पंडित, नारायण पंडित इत्यादि सारे विद्वान् कवि व ग्रंथकार वऱ्हाडखानदेशाकडील आश्वलायन शाखेचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. या पंथाला प्रथम सारे ब्राह्मणच अनुयायी मिळाले. त्यांचें अध्ययन पंथाला मिळण्यापूर्वींच झालें होतें. पांडित्य संपादन केल्या-वरच ते नागदेवाचार्यांच्या पंथास मिळाले. यांचे पूर्वींचे संस्कार कोठें जाणार ? आणि असेंही मनांत येतें कीं त्यावेळीं ‘ महानुभावपंथ ’ असा कांहीं वेगळा पंथच नसावा. ह्या कवींच्या ग्रंथांत ‘ महानुभाव ’ शब्द कोठेंच आढळत नाहीं ! ‘ महात्मा ’ शब्द मात्र आढळतो. या पंथास ‘ महात्मापंथ, महानुभावपंथ, जयकृष्णीपंथ अच्युतपंथ ’ अशीं नावें पुढें पुढें मिळत गेलीं. चक्रधरांच्यावेळीं चक्रधर हे अनेक गुरुपंथांपैकीं एक गुरु होते, त्यांनीं शिष्यांस उपदेश करितांना इतर गुरुंप्रमाणें कांहीं आचारविचारांचे नियम तोंडानें सांगितले. आपण कांहीं वेगळा पंथ काढीत आहोंत व आपला पंथ भागवतधर्माहून वेगळा गणला जाईल अशी त्यांस कल्पनाही नसेल. तर मग जो पंथ मूळांतच वेगळा नाहीं,

ज्याचे ज्ञानभक्तीचे सिद्धांत वेगळे नाहींत, ज्याचा आचार फारसा वेगळा नाहीं, तो हिंदुधर्माच्या—भागवतधर्माच्या-बाहेरचा असें तरी कां मानावे ? त्यांचे कांहीं विशिष्ट आचार असतील पण असे कोणत्याही पंथांत असतातच, त्यांकडे कानाडोळा केला पाहिजे.

महानुभावपंथ शके ११८५ मध्यें स्थापन झाल्यापासून तों शके १२८५ पर्यंतच्या शंभर वर्षांत या पंथांत जे कवि व ग्रंथकार झाले त्यांपैकीं आज ( शके १८५३ ) ज्यांचीं काव्यें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांच्या सर्व मुख्य काव्यांचें स्वरूप आपण येथवर पाहिलें. गोविंद प्रभु, चक्रधर व नागदेवाचार्य ह्या आद्य संस्थापकांचीं संपूर्ण चरित्रें प्रसिद्ध झालीं आणि 'लीलाचरित्र' व 'सिद्धांतसूत्रपाठ' हे दोन ग्रंथ आपणांपुढें आले म्हणजे आपणास महानुभावपंथाची यथार्थ कल्पना करितां येईल. तूर्त आपल्यापुढें जें साहित्य आहे त्यावरूनच आपणांस कांहीं अनुमानें बांधावयाचीं झाल्यास महानुभावपंथासंबंधानें आपल्या लोकांत जे गैरसमज पसरले आहेत ते दूर झाल्यास व या पंथांत एकंदर हिंदुपरंपरेशीं विसंगत अशा कांहीं चालीरीति रूढ झाल्या आहेत त्या या पंथांतल्या समंजस लोकांनीं काढून टाकल्यास हा पंथ सनातनवैदिकधर्मींतलाच एक पंथ आहे असें सर्वांसच कबूल करावें लागेल. भरतखंडांत आजवर पुष्कळ पंथ व संप्रदाय निघाले आहेत व निघतील, पण जे वेदबाह्य समजले जात नाहींत त्यांच्यांत कांहीं मतभेद असूनही परस्परसख्य राहतें. महाराष्ट्रांत आज पंढरीचा वारकरी पंथ हा मोठ्यांतला मोठा व लोकप्रिय संप्रदाय आहे. याशिवाय गाणगापूरवाडीचा दत्तसंप्रदाय आहे, रामदासीसंप्रदाय आहे, देवीसंप्रदाय आहे; गणेशभक्तांचा संप्रदाय आहे, तसेच शिव, विष्णु, गणेश दत्त, खंडोबा, ज्योतिबा, भवानी, इत्यादि देवदेवींचे उपासक पंथ व व्यक्ति आहेत; द्वैती आहेत, विशिष्टाद्वैती आहेत, अद्वैती आहेत; तथापि सर्व सनातन हिंदुधर्मांतर्गत आहेत याविषयीं कांहीं कोणाचा मतभेद नाहीं. तूं हिंदु नाहींस, सनातन वैदिकधर्माचा नाहींस, असें यापैकीं कोणी कोणास म्हणूं शकत नाहीं. लिंगा-

यतपंथही शिवोपासक व वेदप्रामाण्य मानणारा असल्यामुळें आपल्या हिंदुधर्मांतलाच आहे. केवळ लोकायतिक म्ह० चार्वाकमताचे, लोक, बौद्ध व जैन हे वेदप्रामाण्य मानीत नसल्यामुळें सनातन धर्माच्या कक्षेबाहेर आहेत. या वेदबाह्य पाखांडमतांनाही आपल्या पोटांत घेऊन साऱ्या जगाचा एकच आणि तो सनातन वैदिकधर्मच होईल असा काळ केव्हां तरी येईल व वेदवेदांताची ब्रह्मविद्या हांच जगाचा एकीएक शाश्वत धर्म राहील ! तो पुढचा विचार आहे, तूर्त बाजूला राहो. बौद्ध किंवा जैन मतांसारखा महानुभाव पंथ वेदबाह्य तर नाहींच नाहीं, पण भागवतधर्माचा हा एक पंथ आहे असें या पंथाचें वाङ्मय पाहिलें असतां निभ्रांत वाटतें. जैनमार्ग हा आडमार्ग आहे व वेदपंथ हा राजमार्ग आहे— ' जेथ जैनमार्गाचिया आडबिदीं: वेदपंथाचियां राजबिदीं ' असें कवीश्वर–भास्करानें शिशुपालवधांत ( ओवी ९६ ) स्पष्ट म्हटलें आहे. वेदांविषयीं महानुभावपंथीय कवींची पूज्यबुद्धि आहे, त्यांचें मुख्य उपास्य कृष्ण आहे; त्यांच्यांत मूर्तिपूजा आहे; ते वेदपुराणाविषयीं आदरानें बोलतात; त्यांचा पूजाविधी, त्यांची गुरुभक्ति, त्यांचे बरेचसे आचारविचार इतर हिंदुंसारखेच आहेत म्हणून कांहीं आचारविचारांतल्या मतभेदांकडे कानाडोळा करून हिंदुसमाजानें त्यांना आपल्यासारखे सनातनधर्मीय समजावे, आपल्यांत मिळवून घ्यावे व त्यांनींही समंजसपणानें आपल्यांतले एकंदर हिंदुसमाजाला बोंचणारे कांहीं आचारविचार काढून टाकावेत व हिंदुसमाजाशीं एकरस व्हावे यांत उभयतांचें व एकंदर हिंदुराष्ट्राचें कल्याण आहे. हें मी सांप्रतच्या हिंदुसमाजघटनेच्या दृष्टीनें बोलतों असें नाहीं, तर या पंथाचें वाङ्मय पाहिल्यावर व त्यांचा आपला उपासनाभक्तीचा जिव्हाळा पूर्णपणें एक आहे हें सर्वथा पटल्यावर अंतरात्म्याच्या साक्षीनें बोलत आहे !

# १२ नाथपरंपरा.

## (१) मुकुंदराजांची गुरुपरंपरा.

आदिनाथ
|
हरनाथ
|
रघुनाथ
|
मुकुंदराज

## (२) ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा.

- १ आदिनाथ
  - उमा
  - मच्छेंद्रनाथ
    - गोरक्षनाथ
      - गैनीनाथ ( गायिनीनाथ, गहिनीनाथ )
        - निवृत्तिनाथ
          - ज्ञाननाथ उर्फ ज्ञानेश्वर
            - विसोबाखेचर
              - नामदेव
                - चोखामेळा
          - सोपानदेव
          - मुक्ताबाई
            - चांगदेव
    - चर्पटीनाथ
  - जालंदरनाथ
    - कानीफनाथ
    - मैनावती ( गोपीचंदमाता )

## ( ३ ) ज्ञानेश्वरांची नाथपंथीय शिष्यपरंपरा.

ज्ञाननाथ–सत्यामलनाथ–गैबीनाथ–गुप्तनाथ–उद्बोधनाथ–केसरीनाथ–शिवदिनकेसरी.

## १ गोरक्षनाथ.

या नाथपंथांत गोरक्षनाथ हे एक अलौकिक पुरुष होऊन गेले, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील सर्व अव्वल धर्मसंस्थापकांत यांची कामगिरी फारच मोठ्या योग्यतेची आहे. यांचा कालनिर्णय बरोबर करितां येत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. यांची हयात ७ व्या शतकापासून तों १३ व्या शतकापर्यंत निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळ्या वेळीं धरली आहे ! या बाबतींत पाश्चात्त्य संशोधकांची तर फारच तारंबळ उडाली आहे. कोणी कोणी गोरक्षनाथांस ख्रिस्ती शकाच्या पूर्वी नेलें आहे ! उज्जयिनीचा राजा भर्तृहरी यांस गोरक्षनाथांनींच नाथपंथाची दीक्षा दिली असून भर्तृहरीचा भाचा म्ह० मैनावतीचा मुलगा बंगालचा राजा गोपीचंद यास जालंदरनाथांनीं उपदेश केला अशी कथा प्रसिद्ध आहे ! गोरक्षनाथ या नांवाचे कां अनेक पुरुष झाले, कां एकच गोरक्षनाथ चांगदेवाप्रमाणें आपल्या योगसामर्थ्यानें अनेक शतकें वांचले, कां दत्ताप्रमाणें ते चिरंजीव आहेत, या गोष्टीचा कांहींएक उलगडा होत नाहीं. योगबलापुढें ऐतिहासिक कालगणनेचा विचार लंगडा पडतो, पण प्रस्तुतसारख्या ग्रंथांतही इतिहासाला अगदींच डावलतां येत नाहीं! म्हणून मी सोयीसाठीं तूर्त इतकेंच म्हणतों कीं गोरक्षनाथ हे बाराव्या शतकांत हयात होते. त्यांच्या अद्भुत लीला व आख्यायिका निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या तऱ्हेनें प्रसिद्ध आहेत. त्यांची एकवाक्यता करण्याचा चांगलासा प्रयत्न अजून झाला नाहीं. संशोधकांचें हें क्षेत्र अजून तसेंच पडलें आहे. गोरक्षनाथांची जन्मकथा अद्भुतरम्य आहे. अयोध्येजवळ जयश्रीनामक एका नगरांत सद्बोध ब्राह्मणाची सद्वृत्ति नांवाची बायको होती. स्त्रीस्वभावानुसार तिला पुत्रमुखदर्शनाची फार हौस होती. मत्स्येंद्रनाथ एकदा भिक्षामिषानें फिरत फिरत तिच्या गांवीं अगदीं तिच्या घरापाशीं आले. हे सत्पुरुष आहेत असें जाणून तिनें त्यांजपाशीं मुलाची गोष्ट काढली. त्यांनीं तिला विभूति दिली, पण तिनें प्रसाद-

बुद्धीनें ती विभूति न घेतां उकिरड्यावर टाकून दिली! बारा वर्षांनीं मत्स्येंद्रनाथ पुन्हा तेथें आले 'व तुझा मुलगा कोठें आहे?' म्हणून तिला विचारलें. तिनें खरी हकीकत सांगितली. तेव्हां उकिरड्यापाशीं जाऊन मत्स्येंद्रनाथांनीं 'अलक्ष्य' (अलख) म्हणून हाक मारिली. तेव्हां 'आदेश' असें प्रत्युत्तर देत गोरखनाथांची बालमूर्ति बाहेर पडली! गोरक्षनाथांची जन्मकथा अशी आहे, ते अयोनिसंभव आहेत असें सांगण्याचें ह्या कथेचें तात्पर्य दिसतें. गोरक्षनाथ यानंतर गुरुपाशीं सकल विद्या शिकले, व 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' या न्यायानें त्यांनीं गुरूवर ताण केली. गुरु जसे योगी होते तसे भोगीही होते, पण शिष्याचें वैराग्य अग्नीसारखें प्रखर होतें. ते 'धगधगीत पुण्यराशी महापुरुष' होते. ते महायोगेश्वर होते. त्यांच्या योगसिद्धीच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत, त्या येथें सांगत नाहीं. त्यांचे गुरु मत्स्येंद्रनाथ हे 'कुइ योगि कहे कुइ भोगि कहे कुइ त्यागि कहे । हम् है सो है' म्ह० योगी म्हणा, भोगी म्हणा, त्यागी म्हणा, मी आहे असा आहे—या बाण्याचे होते! ते एकदा सिंहलद्वीपच्या प्रमिला राणीच्या प्रेमपाशांत सांपडले तेव्हां गोरक्षनाथांनीं त्यांतून आपल्या गुरूची सुटका केली! गोरक्षनाथ योगी होते, शिवोपासक होते, अद्वैतमती होते, किमयागार होते, काय काय होते म्हणून सांगावे? ते सर्वज्ञ होते, सर्वगामी होते, महाकर्तृत्ववान् होते, ते धर्मसंस्थापक होते. त्यांनीं वेगळा पंथ काढण्यासाठीं कांहीं वाद केले नाहींत. ते कोणाशीं फुटून नव्हते, सर्वांशीं मिळून होते. त्यांच्या कर्तृत्वाचीं स्मारकें हिंदुस्थानभर पसरलीं आहेत. त्यांची मठमंदिरें सर्वत्र आहेत, बंगाल्यांत आहेत, नेपाळांत आहेत, पंजाबांत आहेत, काठेवाडांत आहेत, महाराष्ट्रांत आहेत, सिंहलद्वीपांत आहेत, दक्षिणोत्तर सर्व दिशांकडे आहेत. मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ हे नेपाळांतल्या गुरखे लोकांचे देव आहेत. तेथें मत्स्येंद्रनाथांचा यात्रोत्सव दरसाल सात दिवस मोठ्या समारंभानें होत असतो. गोरक्षनाथ ही शूर गुरख्यांची मुख्य देवता आहे, त्यानां गुरखे ही संज्ञा गोरक्षनाथांपासूनच

मिळाली आहे. गोरक्षाचे ते गुरखे. गोरक्षनाथांचा परंपरित शिष्यवर्ग म्हणजे सारे गुरखे आहेत. पुढें नानकानें जसे शीखांचें वीरराष्ट्र निर्माण केलें, त्याप्रमाणें गोरक्षनाथांनीं नेपाळी गुरख्यांचे वीरराष्ट्र उत्पन्न केलें. त्यावेळीं नेपाळांत बौद्धांचा महायानपंथ जोरांत होता, त्याला गोरक्षनाथांनीं चांगलाच खो दिला. त्यांनीं सर्व लोकांस शिवाची उपासना दिली. गोरक्षनाथांचे हजारों शिष्य सर्वत्र फैलावले. त्यांचा एक शिष्य धर्मनाथ यानें कच्छप्रांतांत ' कानफाटे ' नांवानें ओळखला जाणारा एक नाथपंथ उभारला. काठेवाडांतली गोरखमठी फार प्रचंड आहे. हरिद्वार व गोरखपूर येथें त्यांचे मठ आहेत. गिरनार पर्वतावरचें सर्वांत उंच शिखर गोरखनाथ या नांवानें प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राशीं व मराठी भाषेशीं गोरक्षनाथांचा फार निकटचा संबंध आहे. मुकुंदराज व ज्ञानेश्वर हे नाथपंथी आहेत.

## २ नाथपंथाचीं मतें.

मेखला, शृंगी, पुंगी, कंथा, कर्णमुद्रा, कौपीन, व्याघ्रांबर, खडावा, व झोळी हीं ह्या पंथाची बाह्य निशाणें होत. नाथपंथी लोक कानास भोकें पाडतात ( व ह्मणून यांस कानफाटे म्हणतात ) व त्यांत मोठालीं वाटोळीं लाकडीं कुंडलें घालतात व त्याला ते मुद्रा म्हणतात. त्यांच्या शिरस्त्राणांत एक लोखंडाचें चक्र असतें.

**शैली शृंगी कंथा झोली विभूत लगाया तनमो ।**
**कोटिचंद्रका तेज झुलत है चली आपने गतमो ॥**

असा हा नाथांचा बाह्य वेष असतो. भिक्षेच्यावेळीं हे कुका नांवाची एकतारी वाजवून गाणीं म्हणतात व ' अलख ( अलक्ष्य ) ' म्हणून भिक्षा मागतात. भोजनाचे वेळीं हे पुंगी वाजवून मग जेवतात. मुद्राधारण करतेवेळीं त्यांस गुरूकडून उपदेश केला जातो तो असा—

**' मुद्रा संतोष सरम पत झोली, धिमान कीं करे विभूति,**
**चिंता अकाल कुमारी काया, जगती डंडा परतति ।**
**आयी पंथी सकल जमाती, मन जीते जग जीत ।**

आदेश तिले आदेश,
आदि आमील अनादि अनाहति जुग जुग एको वेस '।

" नाथांची कर्णवेधस्वरूप मुद्रा हाच संतोष व ' तत्वमसि ' महावाक्याचें चिंतन ही योग्यांची संतोषरूपी मुद्रा, लज्जा अर्थात् ज्ञाननम्र होणें हीच योग्यांची भिक्षेची झोळी, ईश्वरस्मरण हें भस्मलेपन, जन्मरहित होणें हेंच त्यांचें आचरण, कंथा व दंड हा त्यांचा साक्षात्कार होय. मनोजयानेंच पंचमहाभूतांवर जय मिळवितां येतो, सर्व पंथांत श्रेष्ठ हाच. ब्रह्माकारवृत्तिद्वारें विषयाकारवृत्तीवर जय मिळवून सर्वांवर ताबा चालवितां येणें हें त्यांचें ध्येय. आदि, निर्गुण, अनादि, अक्षय, व युगायुगांतरीं एकभावापन्न असणाऱ्या ह्या परमात्म्यास मी वंदन करितों."

" अपरोक्ष साक्षात्कार हा परमात्म्याच्या दयेचें भांडार असून तोच चराचरविश्वांत व्यापून राहिला आहे. परमात्मा कोठें स्वयंभू, कोठें जगदुत्पत्तिकर्ता तर कोठें ऋद्धिसिद्धिस्वरूपांत दिसून येतो. हा ज्ञानाज्ञानातीत असून ज्ञान व अज्ञान हीं दोन्हीं खरीं नाहींत " असें **गोरक्षनाथ** ह्मणत. चर्पटनाथांनीं याची अशी व्याख्या केली आहे कीं, " ज्याप्रमाणें पाणी व तरंग हे एकच होत त्याप्रमाणेंच संसार-परमार्थांत ज्ञानअज्ञान कांहींएक नसून ज्ञानाज्ञानाचा त्याग करून एक अपूर्व पण पूर्ण अवस्था प्राप्त करून घेणें हीच खरी स्वरूपस्थिति आहे."

## ३ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध.

ज्ञानेश्वरांची साक्षात् परंपरा नाथपंथाची आहे. आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गैनीनाथ, निवृत्तिनाथ व ज्ञाननाथ ( किंवा ज्ञानदेव अथवा ज्ञानेश्वर ) अशी त्यांची परंपरा आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं नाथपंथीय सत्पुरुषांनीं धर्मजागृतीचें मोठें कार्य महाराष्ट्रांत केलें होतें, व खुद्द ज्ञानेश्वरांच्या घराण्याशीं नाथपंथीय महात्म्यांचा निकट संबंध होता. ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरक्षनाथांचा उपदेश ( श. ११२९ ) असून आजे गोविंदपंत यांनीं गैनीनाथांचा अनुग्रह

घेतला होता ! मत्स्येंद्रनाथांनीं नाशीक जिल्ह्यांत सप्तशृंगीच्या डोंगरावर हातपाय तुटलेल्या चौरंगीनाथांना पूर्णावयवी केलें ही गोष्ट खुद्द ज्ञानेश्वरांनींच सांगितलेली आहे: 'तो मत्स्येंद्र सप्तशृंगी। भग्नावयवा चौरंगी॥ भेटला कीं तो सर्वांगीं। संपूर्ण जाला' ( ज्ञाने० १८–१७५४). त्र्यंबकेश्वरच्या पाठीमागें जो प्रसिद्ध ब्रह्मगिरी पर्वत आहे त्यावर गोदावरीच्या उगमाजवळ गोरक्षनाथांची गुहा व गैनीनाथांचा मठ असून त्या पर्वताच्या प्रदक्षिणेच्या वाटेंतच गैनीनाथांनीं निवृत्तिनाथास उपदेश केला व आपल्या संप्रदायांत ओढलें आणि लगेच निवृत्तिनाथांनीं ज्ञानेश्वरादि भावंडांस तोच उपदेश केला. निवृत्तिनाथांनीं अखेर समाधिही ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं त्र्यंबकेश्वरानजीकच घेतली असून तेथें प्रतिवर्षीं तन्निमित्त पौष महिन्यांत एक लाखावर यात्रा भरत असते. नेवाशाच्या डोंगरांत गोरक्षनाथांची समाधि असून सातारा प्रांतांत मस्त्येंद्रगडावर मत्स्येंद्रनाथांची समाधि आहे व तेथें दरसाल चैत्र वद्य ५ ला मत्स्येंद्राची यात्राही भरते. या गडावर गोरखचिंच नांवाचा एक वृक्ष दाखविण्यांत येतो. कृष्णातीरीं जोंधळा चांगला पिकतो व तिकडे कऱ्हाडच्या आसपासच्या जोंधळयास 'मत्स्येंदरी शाळू' असें म्हणतात. गोरक्षनाथांचा संचार बंगाल, बहार व नेपाळ या प्रांतांकडे फार असून त्या बाजूला त्यांनीं योगमार्गाच्या प्रसारासाठीं मोठाल्या चळवळी केल्या व त्यांच्या चळवळींचें केंद्रस्थान गोरखपूर या नांवानें प्रसिद्धही आहे; तथापि मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ व गैनीनाथ या तीनही नाथांनीं नाशीक, नगर व सातारा ह्या प्रांतांत म्हणजे महाराष्ट्रांत संचार करून अद्वैतमार्गाची व योगाचीही दिशा लोकांस दाखवून दिली हें वरील हकीकतीवरून उघड दिसतें. ज्ञानेश्वरांनीं 'योगाब्जिनीसरोवर' व 'विषयविध्वंसैकवीर' ह्या विशेषणांनीं गोरक्षनाथांस संबोधिलें आहे, म्ह० त्यांच्या योगाधिकाराचें

१ उज्जयिनीस 'भर्तृहरीच्या गुफे' पासून पाव मैलावर क्षिप्रातीरीं 'मछंदरकी कबर' दाखवितात.

व वैराग्याचें वर्णन केलें आहे; व गोरक्षनाथांनीं कलिग्रस्त लोकांच्या उद्धारासाठीं आपलें 'शांभव अद्वयानंदवैभव' ह्म० आदिनाथ शंकरापासून परंपरेनें प्राप्त झालेलें अद्वैतज्ञानाचें महासुख गैनीनाथास दिलें व त्यांच्यापासून तें निवृत्तिनाथांस प्राप्त होऊन पुढें तें आपणांस मिळालें असें ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट म्हटलें आहे. यावरून **योगविद्या, वैराग्य व अद्वयानंद ही या नाथपरंपरेची प्रधान लक्षणें असून या परंपरेचा शिवसंप्रदाय होता** हें निर्विवाद ठरतें. ज्ञानेश्वरांना योगविद्या व अद्वयानंद हे नाथांच्या शिवसंप्रदायाच्या द्वारें मिळालें हें सिद्ध होतें.

बाराव्या शतकांत या संप्रदायानें महाराष्ट्रांत धर्मजागृतीची मोठीच कामगिरी बजावली आहे. मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांना या संप्रदायांतील थोर पुरुषांचा उपदेश होता. आदिनाथापासून मुकुंदराज हे चवथे व निराळ्या परंपरेनें ज्ञानेश्वर हे सहावे पुरुष होत. नाथपंथांतील योगाची व अद्वैतवेदांताची परंपरा या दोघांतही पूर्णपणें मुरलेली आहे. वेदोपनिषदांनीं प्रगट केलेला व शंकराचार्यांनीं विशद रीतीनें प्रतिपादलेला अद्वैतसिद्धांत नाथसंप्रदायानें स्वीकारलेला असून योगमार्गानें त्याचा अनुभव घेण्यास शिकविलें आहे. ज्ञानेश्वरांनीं नाथपरंपरेनें आलेला योग व अद्वैतसिद्धांत हे दोन्ही घेतले आणि त्यांत भक्तिप्रेमानंदाची भर घालून अद्वैतभक्तीचा ह्म० भागवतधर्माचा पंथ महाराष्ट्रांत निर्माण केला. त्यांनीं आपली योगविद्या सत्यामळनाथासारख्या थोड्या अधिकारी शिष्यांस दिली पण सर्वसामान्य जनतेला योगाचा अधिकार नाहीं हें जाणून अद्वैतभक्तीचाच पुरस्कार केला व तिला नामदेवांच्या संगतींत विशेष बहर येऊन उभयतांच्या सप्रेम एकात्मतेनें पंढरपुरचा भागवतधर्म उर्फ वारकरीपंथ भरभराटीस आला. नाथपंथांतील योग आणि अद्वैतविद्या तेवढी घेऊन नाथपंथ महाराष्ट्रापुरता वारकरीपंथानें आपल्यांत जिरवून टाकला! नाथपंथाची शैली, शृंगी, कर्णमुद्रा इ० बाह्यसाधनें सोडून त्यांच्या ऐवजीं मृदंग, टाळ, वीणा, दिंड्यापताका इ० बाह्य साधनांचा त्यांनीं अंगीकार केला!

मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांनीं या परपंराप्राप्त अद्वैतब्रह्मविद्येला ‘शांभवी विद्या’ किंवा ‘शांकरी विद्या’ ह्म० आदिगुरु शंकरापासून आलेली विद्या असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरींत याला ‘शांभव अद्वयानंद-वैभव’ असें म्हटलें आहे.

## ४ गोरक्षनाथांचें कवित्व.

गोरक्षनाथांची ग्रंथरचनाही अवाढव्य आहे. त्यांचें कवित्व हिंदी, व्रज, संस्कृत व मराठी भाषांत आहे. हिंदी भाषेचे तर ते आद्य ग्रंथकार समजले जातात. गोरक्षकिमयागार, गोरक्षशतक, गोरक्षगीता, गोरक्षकल्प, गोरखबोध, दत्तगोरक्षसंवाद, योगचिंतामणि, ज्ञानसिद्धांतयोग, योगमार्तंड, विवेकमार्तंड, सिद्धसिद्धांतपद्धति इ०६०।७० ग्रंथ गोरक्षनाथांच्या नांवावर मोडत आहेत! श्रीशंकराचार्यांचा अद्वैतसिद्धांत व पतंजलीचे योगशास्त्र या दोन विद्यांवर त्यांचा मुख्य भर आहे. नाथपंथीयांचें हठयोग व किमया यांकडेही अजूनही लक्ष असतें. नवनाथभक्तिसारांत ‘गोरक्षजालंदरचर्पटाश्च ’इ० नवनाथसिद्ध सांगितले आहेत. हठयोगप्रदीपिकेंत चौदा नाथ सांगितले असून कोठें कोठें तर ८४ नाथांचीं नांवें दिलीं आहेत. असो. आपणास येथें फक्त गोरक्षनाथांकडे व त्यांच्या मराठी कवित्वाकडेच पाहावयाचें आहे.

गोरक्षनाथांनीं रचिलेला ‘**अमरनाथसंवाद**’ हा योगपर मराठी ग्रंथ उपलब्ध आहे, त्यांतील एक उतारा देतों—

**“ वृक्षाचीं पानें झडती । आणि माघौति नीगति । परि तेंचि ह्मणुं नयेति किं । दिवेयापासौनि निघालिया काजळी । त्याचा पोटि काई आणिकी षाणि असे । मग निगालिये नदी उदकें अनित्यें । परि प्रवाही नित्य जाणावी किं ॥ तैसा दृश्यु प्रपंचु पदार्थु अनित्यु । परि त्या प्रवाहो नित्यु जाणावा । केळिचा गाभा उकलिता काई लाभु**

असे । आणि फळपानिचें निकें पिकलें! पिकलयाचा ऊ॰डौचि पाहतां बरवा दिसे । स्वप्निचें सुख स्वप्नींचि बरवें । मग निर्धारितां तेथें कांहीं असेः तैं संसारिचे सुष दिसे निके । सेंषी सुरस नव्हे ॥ एसें ज्ञानें जाणावें । आकाशकुसुमीं जरि परिमळु भे( टे ) । नातरि नाथलिये वांझेचे लेंकरु त्रिभुवन भोगीः ससेचेया सींगें तिषटें । हें बोलणेंचि लटिकें ॥ तैसा दृश्यु प्रपंचुः असत्याचि लटिका असें । मृगजल जळीं नाहींः परि मृगासि जळभ्रमु असे । कुसुममाळेचां नाथिला भोगिया आभासे । शुक्तिचां ठाई रजतबुद्धि लटिकीः तैसा दृश्यु प्रपंचु लटिकाचिः परि दिसत ( ता ) असे । हा संसारू दुखः-रूप ऐसाः त्याची जया आपुली ओळषी नाहीं: हें साकार पंचधा म्हणत खेऊ॰ तिये गोडीचीए रुचिः सांडौनि काई तिषट होती असेः हा उष्ठ वांकुडा दिसेः परि त्याचा रसु गोडिचीए सोए न संडितः वांकुडपणीं परि रसीं नाहींः कि हे कस्तुरी काळी दिसेः परि तिचिया परिमळाचें सौरभ्यपण अणलेकीं । एवढीये सृष्टीचे अढाल जेयाचेनि चालेः त्याते ऊ॰ळखेः तो या संसाराआतु सुखदुःखी लिपेनाः जैसे पद्मिणीचें पत्र उदकाभीतरि असौनि अलिप्त तया जन्माचें आणि कर्म्मभक्तीचे फळ तें किंः जै आत्मज्ञान जाणिजे श्रीगोरक्षनाथविरचिते अमरनाथ(संवादे) आत्मज्ञान कथंति निजविचारं ॥ ११ ॥ ”

ह्या उताऱ्यांतील विचार व उपमादृष्टांतादिकांचा थाट ज्ञानेश्वरींत असाच पण अधिक मोहकरूपानें परिणत झालेला आढळतो व त्याव-रून दोन्ही ग्रंथकार एकाच वळचणीखालून गेले आहेत असें दिसतें. वरच्या उताऱ्यांतील पहिल्या पांचचार ओव्यांच्या शेजारीं ज्ञानेश्वरींतील

(अ. १५) प्रपंचवृक्षाला ‘अश्वत्थ व अव्यय’ अशीं दोन विरुद्ध विशेषणें कां लावलीं आहेत याच्या स्पष्टीकरणार्थ दिलेल्या ओव्या ठेवून वाचाव्यात. तसेंच स्वप्नांतलें सुख, वांझेचें लेंकरूं, सश्याचें शिंग, मृगजल, काळी कस्तूरी इ० दृष्टांत येथें व ज्ञानेश्वरींत सारख्याच प्रसंगानें आलेले आहेत. ‘ख’ बद्दल येथें ‘ष’ लिहिला आहे. जसें, षाणि–खाणि, सुष–सुख, सेषीं–शेखीं ( शेवटीं ), तिषटें–तिखटें, इ० ज्ञानेश्वरांच्या वाणींतही हा यजुर्वेदी प्रकार ( पुरुष एवेदं–पुरुख एवेदं ) स्पष्टच आहे.

गोरक्षनाथांचा **‘गोरक्षगीता’** नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ आहे त्यांतील योगविषयक अनुभव ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायांतील १४ व्या श्लोकांवरील योगविषयक विचारांशीं तंतोतंत जुळणारा आहे. कुंडलिनी जागृत करणें हा ह्या पंथाचा एक विशेष असल्यामुळें दोघांनींही तत्संबंधी एक प्रकारचेंच विवरण केलें आहे. थोडा नमुना पहाः––

**( १ ) तेणें कामशक्ति खुंटली । मग वायूते उर्ध्वगति जाली । आला मणिपुराजवळि । देखिली बाळा कुंडली ॥ प्राणायाम करितां नेटें । तै कुंडलिनी चिमुटे । वेळे उकलुनि सुसाटे । गगन मार्गें ॥**

**( २ ) आपान मौघाता मुरडला । स्वाधिष्ठानावरि चालिला । क्षोभोनिया माजला । झुंजे मणिपुरेसी ॥ बाहाडुळी धाविली त्वरे । कोठ्यामाजि संचरे । कफपित्तादिकांचे थारे । मोडोनि टाकी ॥ ५१ ॥ वेढे येकायेकी उकली । बहुतां दिवसांची असे भुकेली । ऊर्ध्व होऊनि सुखें गिळी । वाहाडुळी गा ॥ ५४ ॥ इडा पिंगळा एकमेळी । तिन्हि नाडीची ग्रंथी सुटली । षट्चक्राचे पदर मोकळी । करिती झाली ॥** ( गोरक्षगीता )

**( २ ) जो मूळबंधें कोंडला । अपान माघौता मुरडला । तो सवेंचि वरी सांकडला धरी फुगू ॥ क्षोभलेपणें माजे ।**

उवाइला ठाईं गाजे । मणिपुरेसी झुंजे । राहोनियां ॥ मग थांबलिये वाहाडुळी । सैंघ घेऊनि घर डहुळी । बाळपणीची कुहीडुळी । बाहेरि घाली ॥ भीतरी वळी न धरे । कोठ्यामाजी संचरे । कफपित्तांचे थारे । उरों नेदी ॥ तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा । शक्ति करी उजगरा । कुंडलिनी ते ॥...तैसी सुबंध आटली । पुटीं होती दाटली । ते वज्रासनें चिमुटली । सावध होयः ॥ सहजें बहुता दिवसांची भुक । वरी चेवविली ते होय मिख । मग आवेशें पसरी मुख । उर्ध्वउजू ॥ ...॥ तंव अध वरौते आकुंचे । ऊर्ध्व तळौतें खाचे । तया खेवामाजी चक्राचे । पदर सुटती ॥"

(ज्ञाने० अ० ६)

पाषाणाचीं देऊळें पाषाणाचा देवो ।
पाषाणाची पाऊळी तेथ न फिटे संदेहो ॥
कैसं बोलों पंडितो देवो कवणेठाईं ।
निजलिंग न्याहाळितां आम्ही तुम्ही नाहीं ॥
गंगेचे उदकें स्नान पै कीजे ।
बाहिर पाखाळितां भीतर केंवि भीजे ॥
सजिवे तोडुनि बाबु निर्जिवें पूजिती ।
कर्मं करुनि प्राणी केंवि उद्धरती ॥
येहि विधि हे जग पडियेले धांदा ।
आत्मलिंग हृदयीं कोई न बुझती अंधा ॥
वदति गोरखरायें सद्गुरुवाणी आम्ही ।
निजलिंग न्याहाळुनि संसारा दिल्हे पाणी ॥

पाषाणाची पूजा, गंगेचें स्नान, सजीव प्राण्यांच्या मांसाचा नैवेद्य, ह्या बाहेरच्या गोष्टी आहेत पण जग ह्याच वाहणीला पडलें आहे.! खरा

देव हृदयीं आहे पण त्याकडे कोणी पाहत नाहीं ! ' निजालिंग न्याहाळितां आम्ही तुम्ही नाहीं '—आत्मस्वरूपाच्या दर्शनानें भेदभाव नाहींसा होतो. गोरखराय सांगतात कीं आम्ही सद्गुरुकृपेनें स्वरूपसाक्षात्काराला पावलों आहोंत व त्यामुळें संसाराचा निरास झाला आहे. '

## ५ गहिनीनाथांचा बोध.

गोरक्षनाथांचा भर योगावर अधिक तर गहिनीनाथांचा कृष्णभक्तीवर अधिक. गहिनीनाथांपासून निवृत्तिनाथांना व त्यांच्या द्वारें ज्ञानेश्वरादि भावंडांना कृष्णभक्तीचा उपदेश झाला व योगाची अनुभविक विद्याही मिळाली. या पंथांत योगाच्या द्वारां भक्तीचा उपदेश होत असे. योगावर, नामस्मरणावर व गुरुभक्तीवर मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ यांची हिंदींत बरीच पदें आहेत. गहिनीनाथांचा निवृत्तिनाथांना झालेला उपदेश त्यांच्या अभंगांतही व्यक्त झाला आहे.

(१)

**लयलक्ष करा धारणेसी धरा । आवरोनि वारा वरुते पहा ॥ १ ॥**
**तयाचेनि बळें जिंकिजे कळिकाळा । घेइजे सोहळा आत्मत्वाचा ॥२॥**
**मग भय नाहीं गहिनी ह्मणे तुज । निवृत्तीसी गुज सांगे कानीं ३**

(२)

**अष्टांग साधनें साधिती पवन । ज्यासी योगीजन शिणताती ॥ १ ॥**
**तो हा कृष्ण गोपीगोपाळांमाझारी । क्रीडा नानापरी करी आत्मा २**
**अठरासाहीजणें बोलती परवडी । तो माखणासी जोडी स्वयें कर ३**
**निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय।गहिनीनाथें सोय दाखवीली ॥४॥**

गहिनीनाथांचें निर्धाराचें सांगणें आहे कीं ' आकाश तडतडी मेरु हा कडाडी । तरी आत्मसुखगोडी सांडूं नये ! ' देव जवळच आहे, संदेह सोडून पहा, आत्मनिष्ठा अभंग ठेव व कृष्णरूपीं रत हो '—हा त्यांचा बोध निवृत्तिनाथांनीं पूर्णपणें पचविला.

## ६ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग

### अभंग.

आदिनाथ उमाबीज प्रगटलें । मत्स्येंद्रा लाधलें सहजस्थिती ॥ १ ॥
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गैनीनाथा ॥ २ ॥
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ॥३॥
निर्द्वंद्व निःशंक विचरतां मही । सुखानंद हृदयीं थिर झाला ॥ ४ ॥
विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख । देऊनी सम्यक अनन्यता ॥ ५ ॥
निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण । कुळ हें पावन कृष्णनामें ॥ ६ ॥

**ह्याचा भावार्थः**—"आदिनाथ शंकरांनीं पार्वतीला स्वबोधाचें रहस्य सांगितलें तें सहज मत्स्येंद्राला प्राप्त झालें. तोच प्रेमयुक्त बोध त्यांनीं गोरक्षाला दिला व त्यांनीं तो गैनीनाथाला पूर्णपणें दिला. वैराग्यानें तापलेले गैनीनाथ त्या प्रेमबोधानें निवाले, त्यांना तो शांतिसुखाचा ठेवाच सांपडला. चित्तांत अभेदभावाचा उदय झाल्यामुळें ते पृथ्वीवर निःशंकपणानें पुष्कळ फिरले व त्यामुळें तो सुखानंद त्यांच्या चित्तांत स्थिर झाला. "निवृत्ति हा वैराग्यशील असून ह्याच्या चित्तांत अनन्यप्रेम उत्पन्न केलें तर हा अन्वयाचें मुख म्हणजे सांप्रदायाचा प्रसार करण्याचें उत्तम द्वार होईल" असें जाणून गैनीनाथांनीं अनन्यप्रेम देऊन निवृत्तीवर पूर्ण कृपा केली व (निवृत्तिनाथ म्हणतात) "आम्हांला त्यांनीं दिलेल्या श्रीकृष्णोपासनेनें आमचें कुळ त्यांनीं (माझ्या द्वारें) पावन केलें आहे." निवृत्तिनाथांनीं आपला बोध ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ह्या तीनही भांवडांस देऊन त्यांना कृतार्थ केलें. निवृत्तिनाथ हेच तीनही भांवडांचे गुरु झाले. भगवत्तत्व हें 'निवृत्ति दिधलें आमुच्या करीं' किंवा 'निवृत्तीनें चोखाळ दाखविलें' अशा प्रकारचे उद्गार तीनही भावंडांच्या अभंगांत सांपडतात. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या अखेरीस गुरुपरंपरेच्या पुढील ओव्या दिल्या आहेतः—

## ७ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओव्या.

क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं ।
नेणों कै श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जें ॥ १७५२ ॥
तें क्षीरकल्लोळाआंत । मकरोदरीं गुप्त ।
होता तयाचा हात । पैठें झालें ॥ १७५३ ॥
तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगी ।
भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥ १७५४ ॥
मग समाधी अव्यत्यया । भोगावी वासना या ।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥ १७५५ ॥
तेणें योगाब्जिनीसरोवर । विषयविध्वंसैकवीर ।
तिये पदीं कां सर्वेश्वर । अभिषेकिले ॥ १७५६ ॥
मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव ।
संपादिलें सप्रभव । श्रीगैणीनाथा ॥ १७५७ ॥
तेणें कळिकळित भूतां । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥ १७५८ ॥
" ना आदिगुरु शंकरा–। लागोनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसरा । जाला जो आम्हुतें ॥ १७५९ ॥
तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां ।
सर्वप्रकारीं धांवा । करीं पा वेगीं " ॥ १७६० ॥
आधींच तंव तो कृपाळु । वरि गुरुआज्ञेचा बोलु ।
जाला जैसा वर्षाकाळु । खवळणें मेघां ॥ १७६१ ॥
मग आर्ताचेनि वोरसें । गीतार्थग्रथनमिसें ।
वर्षला शांतरसें । तो हा ग्रंथ ॥ १७६२ ॥
तेथ पुढां मीं बापिया । मांडला आर्ती आपुलिया ।
कीं यासाठीं येवढिया । आणिलों यशा ॥ १७६३ ॥

**एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें ।**
**तें ग्रंथें बोधोनि दिधलें । गोसावीं मज ॥ १७६४ ॥**

**साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि मातें ।**
**प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा ॥ १७६६ ॥ (ज्ञाने०अ०१८)**

ह्या ओव्यांचा **भावार्थ** असा आहे:—"क्षीरसागराच्या परिसरांत श्रीत्रिपुरारी जे आदिनाथ शंकर त्यांनीं पार्वतीच्या कानांत जें (ज्ञान) सांगितलें—केव्हां सांगितलें तें माहीत नाहीं—तें क्षीरकल्लोळांतल्या एका मत्स्याच्या पोटांत गुप्तरूपानें असणाऱ्या मत्स्येंद्रनाथांना प्राप्त झालें. त्या ज्ञानाचा प्रताप एवढा होता कीं मत्स्येंद्रनाथ संचार करतां करतां सप्तशृंगावर आले, तेव्हां ज्यांचे शरीरावयव भग्न झाले होते असे चौरंगीनाथ मत्स्येंद्रनाथांचें दर्शन होतांच पूर्णावयव झाले. पण अशी उपाधि जास्त वाढूं नये व अव्यत्यय म्ह० निर्विघ्नपणें समाधिसुख भोगतां यावें म्हणून मत्स्येंद्रनाथांनीं आपलें ज्ञान उर्फ प्रेममुद्रा गोरक्षनाथांना दिली. गोरक्षनाथ हे योगकमलिनीचें सरोवर होतें म्हणजे योगविद्येंत पारंगत होते व विषयविध्वंस करण्याच्या कामांत परम शूर होते; अशा त्या योगनिष्ठ व विरक्त गोरक्षनाथांना स्वात्मपदावर गुरूंनीं चढविलें. त्यांनीं तें शंकरापासून परंपरेनें आलेलें अद्वयानंदवैभव सप्रभव (सशक्तिक) असें गैनीनाथांस दिलें. कलीनें सर्व प्राणी ग्रस्त झाले आहेत असें पाहून गैनीनाथांनीं निवृत्तिनाथांना आज्ञा केली कीं "आदिगुरु शंकरापासून शिष्यपरंपरेनें जें हें बोधाचें ऐश्वर्य आमच्यापर्यंत आलें आहे तें आम्ही तुझ्या स्वाधीन करितों व तूं कलीनें गिळलेल्या जीवांना दुःखापासून सोडविण्याकरितां सर्व प्रकारचा धांवा कर म्ह० त्वरा करून त्यांचा उद्धार कर." आधींच निवृत्तिनाथ दयाशील, आणि त्यांत श्रीगुरूंची अशी आज्ञा! मग काय विचारतां? जसा वृष्टि करण्याविषयीं मेघ उत्सुक असून त्यांतच वर्षाकाळ आला म्हणजे तो खवळतो तशी त्यांची स्थिति झाली. संसारानें ग्रस्त झालेल्या जीवांच्या

कळवळीनें गीतार्थ प्रगट करण्याच्या मिषानें निवृत्तिनाथांनीं शांतिरसाचा जो वर्षाव केला तो हा ( भावार्थदीपिका ) ग्रंथ होय ! त्या वेळीं चातकासारखा अनन्य होऊन आपल्यावर प्रसाद व्हावा म्हणून उत्कंठित झालेला मी शिष्य जवळ होतों म्हणून त्यांनीं मजवर कृपा केली व मला ह्या यशाचें मालक केलें. गुरु निवृत्तिनाथांनीं मला निमित्त करून ह्या ग्रंथाच्या ( ज्ञानेश्वरीच्या ) द्वारें जगाचें रक्षण केलें आहे. ” ज्ञानेश्वरांचा पुढील अभंग सांप्रदायिकांत नित्य म्हणण्याची पद्धत असून आळंदीस प्रत्यहीं ज्ञानेश्वरमहाराजांची पंचपदी करितात त्यावेळीं म्हणतात:—

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मत्स्येंद्र तयाचा मुख्य शिष्य १**
**मत्स्येंद्रानें बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती २**
**गहिनीप्रसादें निवृत्ति दातार । ज्ञानदेवा सार चोजवीलें ३**

नामदेवांनीं ‘ राईएवढें पांखरूं त्रिभुवनिं त्याचा फेरा रे ’ याप्रमाणें ब्रह्मावर पांखराचें एक रूपक केलें आहे. त्या रूपकाच्या पदांत ‘ ऐसें तें पांखरूं गोरक्षरायें वळखिलें रे । पिंडीं आणि ब्रह्मांडीं मच्छेंद्रनाथें देखियलें रे ’ अशी आपली गुरुपरंपरा देऊन त्यांनीं पुढें म्हटलें आहे कीं त्या नाथांच्याच अंगसंगानें तें वळखून सद्गुरुनाथानें मला दाखविलें व ‘ त्यांचियाचि प्रसादें नामा शिष्यानें गाईलें रे !

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



ज्ञानियांचा राजा गुरु महाराव । म्हणति ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥

*　　*　　*　　*

जयानें घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥

—तुकाराम

# १३ श्रीज्ञानेश्वरदर्शन.

## १ कालानुक्रम.

शके ११८९ गोरा कुंभार यांचा जन्म तेरढोकी येथें.

शके ११९२ नामदेवांचा जन्म. कार्तिक शु. ११ रविवार, प्रमोदनाम संत्वसर.

शके ११९३-१२३१ महाराष्ट्रीय भूपति रामदेवराव जाधव यांची कारकीर्द

शके ११९५-११९९ पंढरपूरचा चौऱ्याशीचा शिलालेख–'श्रीविठ्ठल देवरायाच्या' मंदिराच्या जीर्णोद्धारकार्याची सार्वजनिक चळवळ.

शके ११९५ श्रीमुखसंवत्सर माघ व० १ प्रा:तकाळ. निवृत्तिनाथांचा जन्म.

शके ११९७ युवा संव० श्रावणकृष्ण ८ मध्यरात्र:–ज्ञानेश्वरांचा जन्म.

शके ११९९ ईश्वर संव० कार्तिक शु. १५ प्रहररात्र:–सोपानदेवांचा जन्म.

शके १२०१ प्रमाथि संव० आश्विन शु. १ माध्यान्ह:–मुक्ताबाईचा जन्म.

शके १२०९-१० ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविले, बोपदेव पंडितानें शुद्धिपत्र दिलें ( सर्वजित् माघ शु. ५ )

शके १२१२ ज्ञानेश्वरीग्रंथाचा उद्भव–नेवासें येथें.

शके १२१७ सच्चिदानंद बाबांचा ग्रंथ ' ज्ञानेश्वरविजय ' (अनुपलब्ध).

शके १२१८ दुर्मुखनाम संव० आषाढ कृष्ण १४:–मोडलिंबजवळ अरण ( अरणभेंडी ) येथें सांवतामाळी यांची समाधि.

शके १२१८ दुर्मुख संव० कार्तिक वद्य १३ गुरुवार–आळंदी येथें इंद्रायणीतीरीं ज्ञानेश्वरमहाराजांची समाधि.

शके १२१८ मार्गशीर्ष व० १३ सोपानदेवांची समाधि–संवत्सर ह्म० सासवड येथें निऱ्हातीरीं.

शके १२१९ वैशाख व० १२ एदलाबादेहून ३ कोसांवर व चांगदेव गांवापासून २ मैलांवर तापीतीरीं महद्ग्राम उर्फ मेहूण येथें मुक्ताबाई गुप्त झाल्या.

शके १२१९ ज्येष्ठ व० १२ निवृत्तिनाथांची त्र्यंबकेश्वर येथें समाधि. ( पण यात्रा मात्र पौष वद्य ११ ला भरते. ).

शके १२२० तापीतीरीं चांगदेव येथें चांगदेवांची समाधि.

शके १२३१ विसोबा खेचरांची समाधि–सौम्य संव० श्रावण शु. ११

शके १२३५ प्रमादी संव० माघ कृ० १ नरहरीसोनारांची समाधि पंढरपूर येथें.

शके १२४० कालयुक्त संव० माघ शु. १५ बंकामहारांची समाधि.

शके १२५२ प्रमोद संव० कार्तिक शु. ११ जगमित्रनागा यांची समाधि जोगाईच्या अंब्याजवळ परळी येथें.

शके १२६० वैशाख कृ. ५ मंगळवेढ्यास चोखामेळा गांवकुंसूखालीं पडले, व पंढरपुरास महाद्वारीं वद्य १३ शुक्रवारीं नामाच्या गजरांत त्यांस समाधि दिली.

" मार्गशीर्ष व. १४ बारशी येथें जोगा परमानंद यांची समाधि.

मार्गशीर्ष व. ११ कान्हो पाठक यांची समाधि–केंदूर येथें दरसाल उत्सव होतो. ( शक सांपडत नाहीं. )

शके ११७२ विकृती संव० आषाढ कृ. १३–पंढरपूर येथें पायरीजवळ नामदेवांची समाधि.

" त्याच दिवशीं जनाबाईची समाधि.

शके १४५०–१५२० एकनाथांचें अवतारकार्य.

शके १५३०–१५७१ तुकोबांचें अवतारकार्य.

शके १५३०–१६०३ रामदासांचें अवतारकार्य.

## २ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें.

ज्ञानेश्वरांचीं सविस्तर अगर संक्षिप्त चरित्रें गद्यपद्यांत अनेकांनीं गायिलीं असलीं तरी त्या सर्वांत दोन चरित्रें अधिक प्राचीन व अधिकृत पुरुषांनीं लिहिलीं असल्यामुळें तींच प्रमाणभूत मानलीं पाहिजेत. त्यांपैकीं एक ज्ञानेश्वरांचें प्राशिष्य नामदेव यांचें व दुसरें त्यांचेच अनुग्रहीत सत्यामलनाथ यांचें. पहिलें अभंगवृत्तांत आहे व दुसरें ओवीवृत्तांत आहे. दोन्ही आज उपलब्ध आहेत, मात्र एक जनतेपुढें आहे व दुसरें अज्ञात व अप्रकाशित आहे. **नामदेवांनीं** ज्ञानेश्वरांवर '**आदि**' '**समाधि**' व **तीर्थावळि**' अशीं तीन प्रकरणें लिहिलीं आहेत. 'आदि' प्रकरणाचे ३० अभंग असून त्यांत ज्ञानेश्वरांच्या आईबापांचा वृत्तांत दिला आहे, 'समाधि' प्रकरणाचे २६६ अभंग असून त्यांत चारी भावंडें व चांगदेव या पंचायतनाच्या समाधींचें सविस्तर वर्णन आहे. तीर्थावळि प्रकरणांत ५९ अभंग असून त्यांत ज्ञानदेव व नामदेव यांनीं केलेल्या उत्तरेकडील यात्रेचें व मावंद्याचें वर्णन आहे. तीनही प्रकरणांत मिळून ३५० लहानमोठे अभंग आहेत. वर्णनें विस्तृत, रसभरित व अत्यंत मधुर आहेत. समाधिप्रकरणाच्या अभंगांत नामदेवाशिवाय आणखी कोणाचा तरी हात शिरला असावा अशी कल्पना येते, कांकीं समाधिप्रकरणाची पुरवणी म्हणून 'नामदेवांची आळ ( हट्ट )' या नांवाचे जे २४ अभंग आहेत त्यांत ह्या मंडळानंतर दोनशें वर्षांनीं झालेल्या भानुदास व कान्हूपात्रा ह्या भक्तांचीं नांवें आलीं आहेत. तथापि आदि व तीर्थावळि ह्या प्रसंगांवरील अभंग तरी सर्व निःसंशय नामदेवांचेच दिसतात. ही वाणी साध्या कवीची नसून प्रेमळ व मुरलेल्या भक्ताची आहे, तींत पूर्ण प्रसाद आहे.

ज्ञानेश्वरांचें दुसरें चरित्र म्हणजे त्यांचे योगपरंपरेंतले शिष्य सत्यामळनाथ यांनीं सिद्धांतरहस्य उर्फ 'ललितप्रबंध' नामक ग्रंथांत दिलेलें होय. हा ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहे. ह्याची प्रत एदलाबाद

येथील सद्गृहस्थ श्री. दाजीसाहेब देशमुख यांचे ग्रंथसंग्रहांत होती, ती कल्याणचे संशोधक कै० दिवेकर यांचे हातीं आली व त्यांचेकडून ती मला दोन महिने पाहण्यास मिळाली होती. सदर प्रत ही अस्सल नसून नकल होती. प्रस्तुत ललितप्रबंध ग्रंथाचीं १० प्रकरणें असून त्यांत सुमारें बारा हजार ओवी आहे! ग्रंथकार त्या वृत्ताला ओवी म्हणतात पण त्याचे चरण धांवत्या अभंगांसारखे लीलेनें म्हणतां येतात. चरण सुटसुटित आहेत व वाणी प्रौढ व प्रासादिक आहे ह्या ग्रंथावर ज्ञानेश्वरीचा बराच संस्कार झालेला आहे, तरी मांडणी स्वतंत्रपणाची आहे. ग्रंथकार अद्वैत व योग यांत पूर्ण निष्णात आहे. मराठी वाङ्मयांतल्या पहिल्या दहा ग्रंथांत ह्या ललितप्रबंधाची गणना झाली पाहिजे इतक्या योग्यतेचा हा ग्रंथ आहे. माझा ग्रंथ हा एकाद्या संस्कृत ग्रंथावरील टीका नसून स्वतंत्र आहे व 'वेदांतवनीचीं वेंचोनियां फुलें। दहा हार केले प्रकर्णांचें' असें ग्रंथकार म्हणतो. नववें प्रकरण अनुपलब्ध आहे. दहाव्या प्रकरणाच्या १५२५ व्या ओवीपासून तों १७०० व्या ओवीपर्यंत १७५ ओव्यांत ज्ञानेश्वरांचें चरित्र वर्णिलें आहे. सत्यामळनाथांचा काळ निश्चित करितां येत नाहीं. ५ व्या प्रकरणांत 'भूतभावी संतराजी'ला नमन आहे त्यांत रामदासतुकारामांचीं नांवें आहेत त्यावरून हे बरेच अलीकडचे वाटतात, पण एकनाथांच्या अभंगांत सत्यामळनाथांचा उल्लेख आहे त्यावरून हे नाथांच्या पूर्वीं होऊन गेले असावेत असेंही वाटतें! दिवेकरांच्या मतें नाथांचा अभंग प्रक्षिप्त असावा, पण मला वाटतें कीं नकलकारानें ही संतराजी पदरची घातली असावी! ग्रंथरचनेचा ओघ व विषयप्रतिपादन नाथांच्या पूर्वीचें दिसतें. सत्यामळनाथ हे ज्ञानेश्वरांचे अंतरंगांतले अनुग्रहीत आहेत खास!

ज्ञानेश्वरीचे लेखक सच्चिदानंदबाबा यांनींही 'ज्ञानेश्वरविजय' नामक ग्रंथ लिहिल्याचे उल्लेख सांपडतात, पण तो ग्रंथ उपलब्ध नाहीं. नाभाजीची 'भक्तमाला' शके १६०० च्या सुमारची आहे. ती व्रज

भाषेंत आहे, तींत १९७ छप्पा असून १०० वर भक्तचरित्रें आहेत. तीं बहुतेक उत्तर हिंदुस्थानांतील भक्तांचीं आहेत, पण त्यांत ज्ञानेश्वर, नामदेव व सेना न्हावी या तीनच महाराष्ट्रीयांची चरित्रें नाभाजीनें वर्णिलीं आहेत. एकनाथांनीं शके १४८० सुमारास ज्ञानेश्वरादि भावंडांवर ४६ अभंग लिहिले आहेत. तुकारामनिळोबांनींही त्यांचें गुणगौरव केलें आहे. महिपति, व निरंजनमाधव यांनीं नामदेवांच्या आधारें सविस्तर चरित्रें वर्णिलीं आहेत. मराठी चरित्रांत एकरूपता अधिक आहे.

भिंगारकरबोवा व पारख यांची चरित्रें गद्यांत असून 'भिंगारकरबोवांचा' कालनिर्णयात्मक निबंध उत्कृष्ट आहे. माझें 'श्रीज्ञानेश्वरचरित्र' शके १८३४ मध्यें प्रसिद्ध झालें असून त्याची दुसरी आवृत्ति शके १८४५ मध्यें निघाली आहे. ह्या ग्रंथांत १ श्रीज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र २ कुल-वृत्तांत ३ गुरुसंप्रदाय ४ मुंज व वेदशास्त्रमर्यादा ५ पैठणचे चमत्कार ६ तीर्थयात्राप्रकरण ७ चांगदेव व ज्ञानदेव ८ समाधिप्रकरण ९ उपासना आणि गुरुभक्ति १० ग्रंथविवेचन ११ उत्कृष्ट वेंचे व १२ स्तुतिसुमनांजलि अशीं बारा प्रकरणें असून त्यांत मी ज्ञानेश्वरांचें संपूर्ण चरित्र सविस्तर वर्णिलें आहे. प्रस्तुत प्रकरणांत त्या चरित्रांतील कथांची पुनरुक्ति करायची नाहीं. हें प्रकरण अगदीं निराळ्या पद्धतीनें लिहिलें जात आहे. इतिहासाची व वाङ्मयाची दृष्टि न सोडतां ज्ञानेश्वरांच्या अंतरंगाचें दर्शन वाचकांस करवावें असा येथें हेतु आहे.

## ३ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र.

ज्ञानेश्वरांचें घराणें मूळचे आपेगांवचें,–आपेगांव पैठणपासून ४ कोसांवर गोदावरीच्या उत्तरतीरीं आहे. ज्ञानेश्वरांचे आजे गोविंद व आजी निराई या उभयतांस गहिनीनाथांचा उपदेश असून त्यांची गुरूवर मोठी निष्ठा असे. गुरूपासून त्यांना विठ्ठलाची उपासना मिळाली होती. त्यांना एक पुत्र झाला त्याचें नांवही त्यांनीं विठ्ठल हेंच ठेवलें. ह्या विठ्ठल 'वैराग्य डोळस मूर्तिमंत' होता. व्रतबंध व गायत्रीउपदेश

होऊन त्यानें कांहीं काव्यव्याकरण पाहिलें व वेदपठणही केलें. क्रमानें तो 'निपुणशास्त्रवक्ता' झाला. उपजत वैराग्यशील असल्यामुळें त्यानें तीर्थयात्रा केल्या. द्वारावती, पिंडारक, सुदामपुरी, माधवतीर्थ, प्रभास, सोमनाथ, त्र्यंबक, नाशीक, पंढरी इ. त्यावेळचीं प्रसिद्ध क्षेत्रें करून विठ्ठल अलकापुरास ( आळंदीस ) आला. तेथील कुळकर्णी सिधोपंत त्यास भेटले. कोण कोठील हा प्रश्न विचारतांच त्यानें आपलें नांव सांगून 'वृत्ति आपेगांव गोदातीरीं' असें सांगितलें. दृष्टांत होऊन सिधोपंताच्या कन्येचें त्यानें पाणिग्रहण केलें व स्त्रीचें नांव 'रुक्मिणी' ठेविलें. पंढरीचा मेळा पाहून त्याबरोबर नामघोषानंदांत हाही पंढरीस गेला. सिधोपंताची आज्ञा घेऊन विठ्ठल पुन्हां तीर्थाटणास बाहेर पडला व श्रीशैल्यादि दक्षिणयात्रा करून आला. गोकर्ण, करवीर, कऱ्हाटक इ० क्षेत्रें वाटेंत पाहिलीं. 'चालतां सुपंथीं हृदयीं विठ्ठलमूर्ती । मुखीं नामकीर्ती गात चाले.' परत आपेगावीं येऊन तो आपल्या मातापितरांस भेटला. कांहीं काळानें त्याचे आईबाप वैकुंठास गेले. 'संसाराची चिंता–नाहीं विठ्ठलासी । अखंड वृत्तीसी समाधान' अशा स्थितींत विठ्ठलपंत असतां सिधोपंत आपेगांवास आले व 'अलंकापुरीं राहावें सुखरूप' असें सांगून विठ्ठलरुक्माईस आळंदीस घेऊन गेले. विठ्ठलपंत तेथेंही उदासीनपणें राहिले. त्यांचें वैराग्य प्रबळ होतें. कांहीं निमित्त काढून ते घराबाहेर पडले व त्यांनीं काशीस जाऊन संन्यास घेतला !

**करावे सार्थक रखुमाईनें तेव्हां । आरंभिली सेवा अश्वत्थाची ॥१॥**
**जाणोनी पै देवें उग्र अनुष्ठान । तेथें जालें येणें श्रीपादाचें ॥ २ ॥**

रखुमाईनें श्रीपादास (यतीस) वंदन केलें व त्यांनीं 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला. साहजिक तिला हंसूं आलें. त्यांनीं कारण पुसतांच तिनें सारें वृत्त सांगितलें. श्रीपादांच्या लक्ष्यांत सारा प्रकार येऊन ते काशीस परत आले व चैतन्याश्रमस्वामी ( पूर्वाश्रमीचे विठ्ठलपंत ) यांस समोर उभें करून सत्य पुसिलें व त्यांनीं सांगितलें. तेव्हां श्रीपादांनीं त्यांस आज्ञा केली कीं:—

**स्वदेशा जाउनी करावा आश्रम । सुखरूप स्वधर्म चालवावा ॥**
**अविधीकर्माचें न धरावें भय । यासी आहे साद्य जगदीश ॥**

संन्यासाश्रमांतून विठ्ठलपंत परत गृहाश्रमांत आले तेव्हां ‘ द्विजीं वाळियेलें जगीं सांडियेलें । शेखीं उपेक्षिलें आप्तवर्गी ’ असा त्याचा साहजिक परिणाम झाला. यानंतर विठ्ठलरखुमाईला दोन दोन वर्षांच्या अंतरानें चार मुलें झालीं. त्यांची त्यांनीं निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशीं नांवें ठेविलीं. मुलगे व्रतबंधायोग्य झाले हें पाहून आईबाप चिंतातुर झाले. ‘ जातिकुळावेगळीं पडिलीं निराळीं ’ याचें त्यांना वाईट वाटलें. विठ्ठलपंतांनीं आळंदीच्या ब्राह्मणांचे पुष्कळ आर्जव केले व ‘ धर्मशास्त्रनिर्णय पाहून आम्हांला क्षमा करा ’ असें विनविलें. त्यांनीं यावर ‘ देहांत प्रायश्चित्त ’ हा निर्णय केला ! हा देह अनुतापानें दंडीन व त्रिवेणीसंगमीं घालीन, असें बोलून पुत्रगृह त्यजून विठ्ठलपंत सस्त्रीक आळंदीच्या बाहेर पडले. ‘ त्याग आणि वैराग्य हेंचि प्रायश्चित । जाला शुचिर्भूत गुरुकृपे. ’ इकडे आळंदीच्या शास्त्रीपंडितांनीं निवृत्तीस सांगितलें कीं ‘ तुम्ही पैठणच्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र आणा, तें आम्हीं मान्य करूं. ’ याप्रसंगीं निवृत्ति व ज्ञानदेव या उभयतांनीं जीं भाषणें केलीं तीं त्यांच्या अवतारकार्यास अनुरूप अशींच होतीं. **निवृत्ति** म्हणाले ‘ मी चार वर्ण, चार आश्रम, पंचभूतें, महत्तत्व, सगुणनिर्गुण यांच्या पलीकडचें शुद्ध परब्रह्म आहे, अर्थात् मला शुद्धिपत्राची व व्रतबंधाची इच्छा नाहीं. ’ **ज्ञानेश्वर** म्हणाले ‘ स्वस्वरूपीं भेदाभेद नाहीं हें खरें, पण वेदविधि पाळणें ’ हा आपला धर्म आहे. ‘ अविधि आचरण परम दूषण ’–

---

१ विसोबा खेचर, नामदेव, जनाबाई व सच्चिदानंदबाबा या चौघानींही ज्ञानेश्वरांचा जन्म ११९७ हा दिला आहे-श्रावण कृष्ण ८ ह्म० कृष्णाष्टमी, गुरुवार, रोहिणी नक्षत्र मध्यरात्र, चंद्रोदय, युवा संवत्सर हा त्यांचा जन्मकाळ आहे.

**स्वधर्म अधिकार जातिपरत्वें भेद । उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥**
**म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जना दाखवावें वर्तोनियां ॥**
**प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालतां । पावन अवस्था जरी झाली ॥**

**सोपानांनीं** तिसराच मार्ग काढला. ते म्हणाले "पांडव, दुर्वास, वसिष्ठ, अगास्ति, गौतम, व्यास, वाल्मीकि यांचें कुळगोत काय होतें ? तसेंच आमचें समजा; 'भक्ति हे सरती जाती न सरती। ऐसी आत्मस्थिति स्वसंवेद्य" यानंतर हीं भांवडें यात्रा करीत अनाथ, पतित, व शरणागत यांचा उद्धार करीत पैठणास गेलीं. तेथें ब्रह्मसभा धर्मनिर्णयार्थ भरली तेव्हां यांनीं 'होतें तैसें स्पष्ट निवेदिलें,' त्यावरून हीं संन्याश्याचीं मुलें आहेत हें सर्वांस कळून चुकलें. पैठणच्या ब्राह्मणांनींही तुह्मांला प्रायश्चित्त नाहीं असाच निर्णय केला, पण याला एक शास्त्रोक्त उपाय आहे असें सांगितलें. 'अनन्यभक्तीनें अनुसरावें' व 'तीव्र अनुतापें करावें भजन । गो खर आणि श्वान वंदोनीयां' हाच तो उपाय. ब्रह्मभावनेनें गोखरश्वान वंदावें, ब्राह्मणापासून अंत्यजांपर्यंत सर्वांस ब्रह्मरूप पहावें व अनन्यभक्तीनें ईश्वरास भजावें असा पैठणकर ब्राह्मणांनीं शास्त्रोक्त उपाय सांगितला व तो तिघांनींही आनंदानें मान्य केला. 'निवृत्ति संतोषला चित्तीं, मुक्ताई सोपान आनंदलीं' व 'ज्ञानदेव ह्मणे सांगाल तें मान्य' आहे. यानंतर तेथून परतायचें तों कांहीं ब्राह्मणांनीं यांची कुचाळी केली. यांना यांचीं नावें विचारलीं' व यांनीं तीं सांगितलीं. 'नांव काय ह्मणे 'ज्ञानदेव' आमच्या येथें 'ज्ञान वाहत आहे पखालीसी'–पखालीचा रेडाही ज्ञान वाहून नेत असतो !

**ज्ञानदेव ह्मणे तोही माझा आत्मा । वेगळीक आह्मां नाहीं तया ॥**
**मारिती आसूड ह्मैसियाचे पाठीं । तोचि वळ उठी ज्ञानदेवा ! ॥**

बैलाचे पाठीवर आसूड मारतांच ज्ञानदेवांचे पाठीवर त्याचे वळ उठले! 'रेडा जर ज्ञानरूप आहे तर त्याचे तोंडून वेद बोलीव पाहूं !' असें ब्राह्मण ह्मणाले व त्यांनीं रेड्यास आज्ञा केली तों रेडा प्रणवपूर्वक

वेद ह्मणूं लागला ! हें पाहतांच ब्राह्मण मनीं दचकले व 'हीं संन्याशाचीं मुलें खरीं पण अवतारी आहेत, आह्मी कर्मठपणानें ठकलों व देहबुद्धीनें नाडलों आहोंत, आम्ही कुटुंबाचे दास आहोंत, भक्तिज्ञानवैराग्याचा लेशही आमचे अंगीं नाहीं' असें त्यांनीं प्रांजळपणें कबूल केलें व ह्या दिव्य विभूतींचे चरण वंदिले आणि त्यांचा आनंदानें जयजयकार केला. 'ज्ञानदेव म्हणे तुमच्या चरणांचा महिमा। सामर्थ्य हें आम्हां नाहीं अंगीं.' ज्ञानदेवांचें अद्भुत सामर्थ्य व विनय पाहून द्विजवर संतुष्ट झाले.

**अध्यात्मग्रंथ पाहती पैठणीं। गीतासंबोधनी जवळी असे ॥**
**सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन। पैठणीचे जन बोधियेले ॥**

यांनीं एका गृहस्थाचे घरीं 'पितर मंत्रोच्चारीं आव्हानिले.'

**अवघे द्विजवर म्हणती धन्यधन्य। यासारिखे ब्राह्मण नाहीं कोणी॥**
**उपनिषद्भाग पढलों वेदांत। परि हें सामर्थ्य नाहीं आम्हां ॥**
**नाहीं आयकिले ना कोठें वर्तलें। ये सृष्टी देखिले आजि दृष्टी ॥**

मग त्या ब्राह्मणांनीं शुद्धिपत्र लिहून तें निवृत्तीच्या स्वाधीन केलें. सर्वांनीं ब्राह्मणांस नमस्कार घातला व तेथून निघाले. नेवाशास येऊन ज्ञानदेवांनीं गीतेला प्राकृतरूप दिलें. निवृत्तींच्या आज्ञेवरून त्यांनीं अमृतानुभव ग्रंथ लिहिला. नंतर ते आळंदीस आले. इतकें चरित्र सांगून नामदेव लिहितातः—

१

**तिन्ही देव जैसें परब्रह्मीचे ठसे। जगीं सूर्य जैसे प्रकाशले १**
**धन्य तो निवृत्ती धन्य तो सोपान। धन्य तो निधान ज्ञानदेव २**
**उपजता ज्ञानी हें वर्म जाणोनी। आले लोटांगणीं चांगदेव ३**
**प्रत्यक्ष पैठणीं भट्टीं केला वाद। रेड्यामुखीं वेद बोलविले ४**
**सोहं सुकृताच्या सोडोनियां गांठीं। केलीसे मराठी गीतादेवी ५**
**नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे। एक वेळ जाइजे अलंकापुरा ६**

२

ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणें निगमवल्ली प्रगट केली १
गीताअलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली २
अध्यात्मविद्येचें दाविलेसें रूप । चैतन्याचा दीप उजळला ३
नामा म्हणे ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ४

## ४ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वरचरित्र.

आपेग्राम गोदातटाकि प्रसिद्ध । तेथील गोविंद कुळकर्णी ॥ २५ ॥
विठ्ठलचरणिं सर्वदा निरत । अंतरिं दुःखित अपुत्रत्वें ॥ २६ ॥
प्रतिअब्दि यात्रा पंढरिचि करी । रेखिलि जिव्हारीं हरिनामें ॥ २७ ॥

गोविंदपंताला जरा–आगमनीं म्ह० वृद्धपणीं पुत्रप्राप्ति झाली. पुत्राचें नाम विठ्ठल ठेविलें, वयाला द्वादश वर्षें होतांच विठ्ठलानें तीर्थयात्रेला जाण्यास पित्याची आज्ञा घेतली. तीर्थें हिंडत हिंडत ‘ ब्रह्मचर्य अंगीं चारु शोभा’ अशी ती विठ्ठलमूर्ति आळंदीस आली. तेथें सिधोजी नामक ग्रामजोशी होता, त्याचे घरीं भोजन झालें. त्याला रुक्मादेवी नांवाची एक कन्या होती. ‘ आपली कन्या या तरुण ब्राह्मणाला दे ’ असा सिधोजीस दृष्टांत झाला. त्याच रात्रीं असाच दृष्टांत विठ्ठलासही झाला. गोत्रघटितही जमलें. साहित्य जमवून सिधोजीपंतांनीं विठ्ठलास विध्युक्त विवाहविधीनें रुक्माई अर्पण केली. विठ्ठलास कांहीं काळ श्वशुरगृहीं वास घडला. एकदा विठ्ठलपंतांनीं आषाढीएकादशीची पंढरीची यात्रा केली. चतुर्मास पंढरीस वास केला. तेथें त्यांचे वडील गोविंदपंतही आले होते. ते नंतर स्नुषापुत्रास सवें घेऊन आपेगांवीं आले.

वैराग्याचा कोंभ कितीका दिनांति । उगवला चित्तीं विठ्ठलाच्या ५८

मग त्यानें ‘ अपृच्छगमन केलें ’ म्ह. कोणासही न विचारतां गमन केलें. वाराणसीप्रति पातला, तेथें ‘ तेजें सूर्य तैसा यति ’ देखिला व त्याला शरण होऊन ‘ संन्यासग्रहण संपादिलें. ’ आपलें पूर्ववृत्त न सांगतां ‘ एकटा मी जगीं ’ असें यतीस खोटेंच सांगितलें. कांहीं काळानें

यतिराज रामेश्वराच्या यात्रोद्देशानें दक्षिणेंत आले. सहज आपेगांवीं त्यांचा मुक्काम पडला. रुक्माईनें संन्यासी वंदिला त्यानें 'सौभाग्य-वती पुत्रवती 'भव' असा आशीर्वाद दिला. तिनें पतीचा वृत्तांत सांगितला. तो ऐकून यति मनीं 'चवकला' म्ह० चमकला. त्याच्या लक्ष्यांत सारा प्रकार आला.

**न होतां भार्याज्ञा संन्यासग्रहण । केलें व्यर्थपण आले दीक्षे ॥७२॥**
**यालागीं आणीन पति त्वत्सन्निध। संन्यासाचा बाध करोनिया॥७३॥**

असें रुक्माईस आश्वासन देऊन व शिवपुरीस म्ह० काशीस जाऊन यतीनें विठ्ठलपंतास आपेगांवीं आणलें व संतप्त होऊन त्यास भार्येचा अंगीकार करण्यास आज्ञा केली. 'लोकीं विरुद्धता उभया संकोच' म्हणून विठ्ठलपंतांनीं प्रथम थोडा संकोच केला, पण यतीच्या आज्ञेपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. रात्रीं शिवहारिब्रह्मा व चतुर्थ चिन्मात्र योगमाया प्रकट होऊन आज्ञा केली:—

**'उदरशुक्तिके चाऱ्ही मुक्ताफळे । निफजल्या काळे महापंथीं॥८६॥**
**उभयाणीं कीजे गमन येथोनी । निर्दोष करणी होईल हे '॥ ८७ ॥**
**सद्गुरूची आज्ञा स्वप्नचमत्कार। लाधल्या येकत्र होती दोघे ॥९१॥**
**वर्ततां गार्हस्थ्यधर्मीं शिवतेज । फांकलें सहज गर्भकोशीं ॥ ९२ ॥**

यानंतर त्यास निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशीं चार अपत्यें दोनदोन वर्षांच्या अंतरानें जालीं.

**येका रूपाचिया चत्वार दीपिका। उजळिल्या या का मूर्तिमंत १९१९**
**येका तेजाचिया येका सत्वाचिया। येका सुखाचिया चाऱ्ही मूर्ती २०**
**येका ज्योतीचिया येका दीप्तीचिया । येका ज्ञानाचिया चाऱ्ही मूर्ती ॥**
**येकेचि लावण्यें येकेचि प्रकाशे। येकोचि उल्हासे वर्तती जी ॥ २२॥**

मुलें मातापित्यांना सहज प्रिय असतात, त्यांत असलीं दिव्य व दिव्यगुणी मुलें खेळतांरांगतांना पाहून विठ्ठलरखुमाईस परमानंद होत असल्यास नवल काय? हीं उपजत ज्ञानी मुलें पाहून गुर्वाज्ञापरिपालनाचें विठ्ठलपंतास सार्थक वाटलें. निवृत्तिनाथ आठ वर्षांचे व मुक्ताई अवघी दोन वर्षांची असतांना ते यतिराज पुन्हा आपेगांवीं आले व संन्यास-ग्रहणानंतर गृहस्थधर्म चालविल्याबद्दल शास्त्रतः एक प्रायश्चित्त आहे तें घेण्यास त्यांनीं विठ्ठलपंतास सांगितलें:—

**आचरोनि दोषापासाव निर्मुक्त । तुम्ही महापंथगामी होणें ॥ ४८ ॥**

झालें. संसार आटोपला. त्या चार लहान अर्भकांस टाकून महापंथाला जाण्यास विठ्ठलरुक्माई निघाले. आईचें अंतःकरण द्रवलें:—

**कैसे वोडवले अदृष्ट आडवे । बाळकें हे दैवे अंतरलिं ॥ १६५५ ॥**
**रुदन करिता अश्रुपातपूर । लोटला दुस्तर महिवरि ॥ ६६ ॥**
**मज्जन्मद्रुमाची हे चत्वार फळें । अमृताची काळे तुटलिया ॥५७॥**
**कोणाते निरऊ कोणाहाती देऊ । निवृत्ति ज्ञानदेवो सोपान हा ५८**
**स्वरूपें सुंदर वृत्तित्वें प्रशांत । निवृत्ति हा आप्त केंवि त्यागो ॥६१॥**
**माझा ज्ञानदेव जिवाचा विसावा । लावण्याचा ठेवा केंवि त्यागो ६२**
**सौंदर्यद्वीपाचे लावण्यनिधान । धाकुटा सोपान केंवि त्यागो ॥६३॥**
**परम सकुमार चिद्रत्नकळिका । मुक्ताई अंबिका केंवि त्यागो ६४**
**धरा उलो पाहे पडो पाहे नेत्र । उतो पाहे अंभ श्रीगंगेचे ६९**

इतक्यांत एक सिद्धपुरुष आंगणीं ठाकला व त्यानें रुक्माईचें सांत्वन केलें:—

**निवृत्ति वोळखी शंभु त्रिपुरारी । ज्ञानदेव हरि महाविष्णु ८३**
**चतुर्मुख ब्रह्मा तोचि हा सोपान । मुक्ता अवतीर्ण आदिमाया ८४**
**सर्वत्र व्यापक जन्मक्षयातीत । जाले मूर्तिमंत ब्रह्माचि कीं ८५**
**मातेच्या अंतरिं तत्प्रकाशे शांति । मनोबुद्धिप्रति निडारलि ॥ ९० ॥**

**जेष्ठा निरविले सिद्धाचिये हातीं । धाकुटे निवृत्तिहातीं दिले ॥९१॥**
**चौघाते निरोपी सांभाळा मुक्ताई । लोटांगणे पाई सजळाक्ष ॥९२॥**
**घालोनियां पुत्रे मातापितयाते । महास्वर्गपंथें बोळविले ॥ ९३ ॥**

विठ्ठलरुक्माई महास्वर्गपंथाला निघाले. हिमाद्रिपर्यंत त्यांनीं पंथ आक्रमिला, व तेथें देहपात होऊन दोघे वैकुंठधामाला गेले.

**येरिकडे सिद्धपुरुषें निवृत्ति । न कळतां वृत्ति उपदेशिला ॥ ९६ ॥**
**श्रीगैणीनाथ आमुची वोळखी । देखोनी स्वसुखी नांदविले ॥ ९८॥**
**निवृत्तिपासाव उपदेशप्राप्ति । अनुज लाहति तत्साक्षित्वे ॥ ९९ ॥**

तो सिद्धपुरुष म्हणजे प्रत्यक्ष श्रीगैणीनाथच होत. त्यांनीं निवृत्तिनाथांला उपदेश केला व त्यांच्या समक्ष निवृत्तिनाथांनीं आपल्या भावंडांना उपदेश दिला. यानंतर या चौघांना पैठणास पाठवून गैणीनाथ गुप्त झाले. ह्या चार मूर्ति जेथें जेथें जात तेथें तेथें दर्शनोत्सुक लोकांची गर्दी लोटे. कित्येक समागमें चालले.

**दर्शनें संतोष सर्वांचिया मनिं । पाहाता नयनीं लाचावले॥१६०३॥**
**म्हणती कोठोनि प्रकाशाचि खाणी । कोंभोनि तरणी फाकले हे ॥४॥**

प्रतिष्ठानास (पैठणास) आले तेव्हां त्यांच्या दर्शनार्थ लोकांच्या थाटी पातल्या. यांच्या भोंवतालचें तेजोमंडळ पाहून लोक आश्चर्यचकित झाले. कित्येक अभिमानी द्विजांना मात्र या मूर्तींची ओळख पटली नाहीं. यांनीं विनीतवचनें द्विजांना विनविलें. 'अस्मज्जन्म यतिपासाव जी' हेंही त्यांनीं सांगितलें. आम्ही अवर्ण आहोंत तेव्हां आम्हांला ' वर्णगंगेमाजी मेळवीजे ' म्ह० वर्णगंगेंत मिळवून घ्या, अशी त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. त्यानंतर ज्ञाननाथांनीं रेड्याकडून वेद बोलविले. तेव्हां ब्राह्मण हतगर्व होऊन त्यांचे पायीं लागले, व तुम्हीं ईश्वरमूर्ति आहां, योग्यांचे इंद्र आहां, इ० प्रकारें स्तुति केली.

**विधिनिषेधाचा नसे तुम्हा पांग । नाममात्रें जगु उद्धरां कीं १६४०**

यानंतर ह्या चारी मूर्ति नेवासें येथें आल्या.

हे वर्तल्यावरी नेवासा येवोनि । लक्षिला मोहनीराज नेत्रीं ॥ ५२ ॥
तेथें सच्चिदानंदबाबा मित्र जाला। नाथें उपदेशिला तद्भक्तित्वें ॥५३॥
भगवद्गीतेवरी शृंगार मोकळा । दिव्य लेववीला वोवीरूपे ॥ ५४ ॥

मग ह्या चारी मूर्ति इंद्रायणीतीरीं आळंदीस आल्या, व मातामहवस्ति म्हणोन आळंदीसच स्थिर झाल्या.

प्रशांत वर्तन चक्रतीर्थी स्नान । नित्य अनुष्ठान सिद्धटेकी ॥ ६७ ॥
एवं प्रवर्ततां कीर्तीची कस्तुरी । करंडामाझारि ब्रह्मांडाच्या ॥ ६८ ॥

तेथें चांगदेव आला. 'तो दक्षिणप्रयागीं सुंदरक्षेत्रीं' राहणार होता.

शिष्य समागमें व्याघ्राचा तुरंग । हस्तकी उरग साट केला ॥ ७१ ॥
नाथाचिया भेटी येता जाले श्रुत । होते उपश्रित भिंतीवरी ॥१७१॥

श्रीज्ञाननाथानीं जड भिंत चालविली.

थरारिली गात्रें अहंता विरोनी । रिघाला नमनीं चांगदेव ॥ ७६ ॥

चांगदेव ज्ञाननाथमंडळापैकींच एक होऊन राहिले. एकदां मुक्ताई वस्त्र दूर ठेऊन स्नान करीत असतांना चांगदेव अकस्मात् तेथें आले, पण मुक्ताईस पाहून त्यांनीं हातानीं डोळे झांकून घेतले व माघारले. मुक्ताई नंतर बाहेर आली व बंधूच्या समक्ष चांगदेवास म्हणाली:—

चतुर्दशशतें वयातें लोटली । परी नाहीं गेली मनोभ्रांति ॥ ८६ ॥
व्यर्थची सायास योगाभ्यासीं केले । नाहीं वोळखिलें आत्मतत्व ॥८७॥
जे उरे पेलिजे जे जे हाते वारिजे । चालता ठेविजे पायवरी ॥८८॥
ते वर्म चांगया चुकोनि शरीरा । पोशिले दर्दुराचियेपरी ॥ ८९ ॥
स्त्रीपुरूषव्यक्ति हे भावना मनी । 'पदार्थाभाविनी' नाहीं प्राप्त॥ ९० ॥

चांगदेवांनीं मुक्ताईच्या चरणीं मस्तक ठेविलें व दीन जाला.

निजानंदामृते 'जीववी तु मला । सुखाचा सोहळा दावी मज '१७००

तिनें चांगदेवाला सन्मुख बसविलें व आत्मबोधाचा ठेवा त्याचे हातीं देऊन त्याचा उद्धार केला.

सत्यामळनाथांच्याच तोंडून येथें ज्ञानेश्वरकथा वदविली आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथ नेवासे येथें झाल्यावर ज्ञानेश्वरमंडळी पंढरपुरास गेली. तेथें नामदेवादि विठ्ठलोपासकांच्या गांठीभेटी होऊन आनंद झाला. पुढें ज्ञानेश्वरनामदेवादि मंडळी तीर्थयात्रेस गेली. ह्या यात्रेंत निवृत्तिनाथादि चाऱ्ही भावंडांबरोबर विसोबा खेचर, नामदेव व परिसाभागवत हे होते असें परिसाभागवताची 'संतांची आरती' पाहतां उघड होतें. 'लाधलों समसुख काशिये जातां। विश्वनाथीं प्रेमा यांचिया सत्ता' असें त्यांनीं म्हटलें आहे. यासंबंधानें नामदेवांचे तीर्थावळीचे अभंगही पाहण्यासारखे आहेत, ते पुढें पाहूं. चांगदेवाच्या नादानें ही मंडळी तप्तीतीरीं वाळवंटांत नाचूनबागडून आल्याचें दिसतें. ज्ञानेश्वरांनीं आळंदीस शके १२१८ च्या कार्तिक वद्य १३ स समाधि घेतली. एक महिन्यानें सासवडास सोपानदेवांनीं देह ठेविला. शके १२१९ च्या वैशाख वद्य १२ ला तापतीरीं एदलाबादेजवळ माणगांव येथें मुक्ताबाईनीं व जेष्ठ वद्य १२ ला त्र्यंबकेश्वर येथें श्रीनिवृत्तिनाथानीं देह ठेवले. सहा महिन्याच्या अंतरानें हीं भावंडें सूर्यासारखी चमकून अदृश्य झालीं.

## ५ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र !

आतां ज्ञानेश्वरांनीं स्वतःबद्दल काय लिहिलें आहे तें पाहूं. नामदेवादि समकालीन संतांनीं त्यांच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टी सांगितल्या असून त्यांचें अत्यंत प्रेमानें गौरव केलें आहे. ज्ञानेश्वर हे 'उपजता ज्ञानी' आहेत, ते 'योग्यांची माउली' आहेत असें म्हणून नामदेवांनीं सांगितलें आहे कीं "वेदाचें सार गीता, पण ती संस्कृत भाषेंत आहे यामुळें ती लोकांस कळत नाहीं 'संस्कृत भाषा जगासी कळेना। म्हणूनि नारायणा दया आली'। तेव्हां 'देवाजीनें त्वरें घेतला अवतार। म्हणती ज्ञानेश्वर तयालागीं;' यास्तव महाविष्णुच ज्ञानेश्वररूपानें प्रगट झाले आहेत." सर्व साधूंनीं व कवीनीं ज्ञानेश्वर हे विष्णुचा अवतार आहेत असें एकमुखानें म्हटलें आहे. त्यांनीं पैठणास रेड्याकडून वेद

बोलविले व आळंदीस जड भिंत चालवून चांगदेवासारख्या योगिवर्याला पायाशीं आणलें या त्यांच्या चरित्रांतील दोन ठळक गोष्टी सर्वांनीं प्रेमानें वर्णिल्या आहेत.

अद्भुत चमत्कारांवर अर्वाचीनांचा विश्वास नसला तथापि नामदेवादि सर्व समकालीन संतांनीं व नंतरच्या अनेक सत्कवींनीं त्या वर्णिल्या असल्यामुळें त्या सांगणें अवश्यच आहे. रेडा वेद बोलेल व भिंत चालेल हें आजकाल लोकांस पटत नाहीं, तथापि प्रमाणभूत संतांनीं वानिलेल्या गोष्टी डावलून कसें चालेल? शिवाय त्या घडल्याच नाहींत किंवा ज्ञानेश्वरासारख्या योगेश्वरांनाही सृष्टिनियम उल्लंघितां येत नाहींत असें ठांसून सांगणेंही धाडसाचेंच होईल! योगेश्वरांना अशक्य काय आहे? योगसामर्थ्यानें समुद्रावरून चालतां येतें, अंतराळीं अल्पकाळ कां होईना राहतां येतें, सोमल पचवितां येतो व मुंगीचें मनोगत ओळखतां येतें, असें ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत स्पष्ट सांगितलें आहे. अतींद्रिय विषयांवर चौकस अशा पाश्चात्त्य पंडितांचे अनेक शोध चालले आहेत व कितीतरी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य कोटींत येऊं पाहत आहेत. तेव्हां पुढें काय काय शोध लागतील हें आज कोणी सांगावें! सत्याच्या दृष्टीनेंही अद्भुत चमत्कारांच्या गोष्टी नमूद करून ठेवणें तरी अवश्य आहे. त्या ज्यांना पटत नसतील त्यांनीं त्या बाजूला ठेवून त्यांच्या ग्रंथांचा सूक्ष्मतऱ्हेनें अभ्यास करावा व पटेल तेवढें तरी घेऊन समाधान पावावें.

ज्ञानेश्वरीसारखा अतुलनीय ग्रंथ १६ वर्षांच्या वयांत मुखांतून येणें हाच चमत्कार आधी काय लहान आहे? ज्ञानेश्वरांच्या प्रत्येक वचनांत त्यांचें चरित्र सांठवलें आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व अभंग या त्यांच्या ग्रंथांत त्यांचें खरें चरित्र प्रगट आहे. ज्ञानेश्वरांच्या चरित्राला पार्थिवत्व कोठेंही चिकटलें नसून अद्वयानंदाचा दिव्य संदेश जगाला देण्यासाठींच त्यांचा अवतार मनुष्यदेहांतून चमकून गेला व मानववंशाला त्यानें धन्य केलें.

ज्ञानेश्वरानीं भिंत चालविली ही अद्भुत गोष्ट सर्व संतांनीं सांगितलीच आहे, पण श्रीगुरुनिवृत्तिनाथांनींही ' चालविली भिंती एका अभंगानें ' असें म्हटलें आहे ! तो अभंग असा आहे:—

**देव करी तरी काय न होई । दगडाचिये नंई तरिजेल ॥ १ ॥**
**सूर्यकिरणावरी मुंगियाच्या हारी । अग्नीचे पाठारीं पीक होय॥२॥**
**फुटतील पाय चालतील भिंती । मेरु मशक येती समतुका ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे अघटित घडे । गुरुकृपें जोडे परब्रह्म ॥४॥**

ज्ञानेश्वरांना अल्पवयांत एवढें अगाध ज्ञान कोठून प्राप्त झालें, भक्तिज्ञानाची अलोट गंगा बालवयींच त्यांच्या मुखांतून कशी वाहिली, श्रुतिशास्त्रांचे गूढ सिद्धांत त्यांना अचूक कसे प्रगट झाले, व्यवहारांत न पडतांही दृष्टांतमिषानें त्यांना संसारांतला लौकिकभागही कसा रेखाटतां आला, शब्दशास्त्रनैपुण्य व साहित्यपारंगतता ते केव्हां कोठ कोणापाशीं शिकले, इत्यादि प्रश्न त्यांचे अलौकिक ग्रंथ पाहतांना वाचकांच्या मनांत उद्भवतात व नामदेवांप्रमाणेंच ते ' उपजत ज्ञानी ' होते, ते ईश्वरी अवतार होते, असे मनांत आल्याशिवाय राहत नाहीं. ज्ञानेश्वरी वाचतांना किंवा ऐकतांना ' धन्य ज्ञानेश्वरमाउली ' असे उद्गार अनेकवार सहज मुखावाटे बाहेर पडतात. असो आपण वरील प्रश्नांचें उत्तर ज्ञानेश्वरांनाच विचारूं.

( १ ) तें म्हणतात कीं जें कुळ नीतिधर्मानें चालत आहे, जितेंद्रियता हा ज्याचा स्वभाव आहे, जें सत्यानें पवित्र झालेलीच वाणी बोलतें, जें शास्त्रदृष्टीनें पाहतें, ज्या कुळांत वेद जागृत आहे, स्वधर्माचरण हाच ज्याचा व्यवसाय आहे, सारासारविवेक हा ज्याचा मंत्री आहे, ज्या घरांत ईश्वरचिंतन अखंड चालू आहे;-अशा पवित्र कुळांत ज्ञानयोगी जन्म घेतो. आणखी:—

१ मुमुक्षु ( फेब्रुवारी १९२७ ) २ नदी. ३ सारख्या वजनाच्या होतात.

जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं ।
जे कुजती कोकिळ वनीं । संतोषाच्या ॥ ४५० ॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले आहाति नित्यफळीं ।
तया योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥ ४५१ ॥

जे 'एकमेवाद्वितीयं ब्रह्मं' ह्या महासिद्धांताच्या सिंहासनावर आरूढ होऊन त्रैलोक्यीचें राज्यसुख भोगीत आहेत, जे संतोषवनांत आनंदानें शब्द करणारे कोकिळ आहेत, व जे विवेकद्रुमाच्या बुडाशीं ब्रह्मरूप मधुरफळाचें सेवन करीत स्वस्थ बसले आहेत, अशा योग्यांच्या कुळांत त्याला जन्म मिळतो. त्याचें मूळचें भांडवल मोठें, आणि पवित्रकुळांत जन्म मिळालेला–मग त्याला अलभ्य काय आहे ?

मोटकी(लहानशी)देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पहांट फुटे।
सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥ ४५२ ॥
तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयात ॥ ४५३ ॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वत दुभे ।
मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ३५२ ॥
तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय ।
तेथ संसरेवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ४५९ ॥ ( अ० ६ )

पूर्व संस्कारामुळें दिव्यांजन डोळयांत पडून अभ्यासावांचून ( संसरेवीण ) दुर्गम अशीं रहस्यें त्याच्यापुढें प्रकाशमान होतात, बालवयांतच त्याच्या बुद्धींत आत्मज्ञानाचा प्रकाश पडतो, त्याच्या मुखांतून शास्त्रसिद्धांत स्वयमेव बाहेर पडतात; !

( २ ) सत्वगुणाची पूर्णवद्धि झाली म्हणजे ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें इतकीं पवित्र होतात कीं निषिद्धवस्तु किंवा पापसंकल्प इंद्रियांच्या बाहेरच्या अंगणांतही डोकावत नाहींत !

**जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समाती बाहेरी वोसंडे ।**
**वसंतीं पद्मखंडें । द्रुती जैसी ॥ २०६ ॥**
**धाराधरकाळें । महानदी उचंबळे ।**
**तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥ २१२ ॥**

' वसंतांत कमळाच्या पाकळ्यांत न मावल्यामुळें सुवास बाहेर पडतो त्याप्रमाणें त्याची प्रज्ञा आंत न मावून बाहेर लोटत येते ! पावसाळ्यांत जसा महानदीला अपरंपार पूर येतो त्याप्रमाणें त्याची बुद्धि सर्व शास्त्रांत पसरत जाते–अर्थात् तिला सर्व शास्त्ररहस्यांचें सहज आकलन होतें ' ( ज्ञाने० अ० १४ ओवी २०४ ते २११ ).

ह्या दोन्ही उताऱ्यांत ज्ञानेश्वरांनीं वरील प्रश्नांना उत्तर देऊन आत्मचरित्रच सांगितलें आहे असें वाटतें. श्रीगुरुकृपेनें आपण कृतकृत्य झालों, पूर्णकाम झालों, आपलें जन्म सफल झालें, असें त्यांनीं ज्ञानेश्वरींत व अभंगांत शतशः म्हटलें आहे. हे त्यांच्या स्वानंदाचे ढेकर आहेत.

**( ३ ) माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प ।**
**तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु ॥ ३२ ॥**
**पुण्यें पोशिलीं असाधारणें । तियें तुझे गुण वानणें ।**
**देऊनि मज उत्तीर्णें । जालीं आजी ॥ ३३ ॥**
**जीवित्वाच्या आडवीं । आतुडलों होतों मरणगावीं ।**
**ते अवदसाचि आघवी । फेडिली आजी ॥ ३४ ॥ ( अ० १६ )**

' माझ्या वाचेनें, हे प्रभो ! पुष्कळ कल्पपर्यंत सत्यव्रत पाळलें त्या तपाचें फळ मला हें मिळालें आहे कीं ह्या गीताव्याख्यानेंरूपी बेटाला माझी वाचा सुखरूप येऊन पोंचली आहे. मी लोकोत्तर पुण्यें आचरलों म्हणून तुझें गुणवर्णन करणें हा प्रसाद मला देऊन माझीं तीं पुण्यकर्में आज माझ्या ऋणांतून मुक्त झालीं आहेत ! जीवदशेच्या अरण्यांतील मरणगावीं मी सांपडलों होतो, पण त्या दुर्दशेंतून तुम्ही आज मला मुक्त केलें आहे !'

( ४ ) ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायाच्या शेवटीं शेवटीं ज्ञानी-भक्ताचें जें रसभरित वर्णन केलें आहे त्यांत ज्ञानेश्वर जणुं आत्म-चरित्रच देत आहेत !

**जे पुरुषार्थसिद्धी चौथी । घेऊनि आपुलिये हातीं ।**
**रिगाला भक्तिपंथीं । जगा देत ॥ २१९ ॥**
**कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सांडीबांधी करी ।**
**कीं जलाचियेपरी । तळवट घे ॥ २२० ॥**

हरिपाठाच्या अभंगांत 'मागिलिया जन्मा मुक्त झालों' 'यमें कुळगोत्र वर्जियेलें' 'ज्ञान गुरुगम्य ज्ञानदेवा लाधलें' 'ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान' असे उद्गार त्यांनीं काढले आहेत. त्यांच्या स्फुट कवनांतही आत्मसमाधानाचे असे उद्गार जागोजाग सहज निघाले आहेत. गुरुकृपेनें 'श्रीकृष्णध्यान हृदयासी आलें'; 'ज्ञानदेवा घर चिदानंदीं दिलें'; चित्तवित्तगोत सर्व हरिच झाल्यामुळें 'देहीं देहभाव गेला माझा'; 'निवृत्तीनें प्रेमखुण दिली;' 'सोहं ह्या सिद्धमंत्रानें त्यांनीं संसार प्रोक्षिला' व 'मरणाची येरझारा खुंटविली'; 'विठ्ठलचि डोळां बैसलासे'; 'माझें चैतन्य चोरिलें चैतन्य चोरिलें' इ० प्रकारें ज्ञानेश्वरांनीं आपल्या कृतकृत्यतेची खूण दाखविली आहे. त्यांनीं आत्मस्थिति अनेक सुंदर अभंगांत व्यक्त केली आहे. उदाहरणार्थः—

**साधुसंत मायबाप तिहीं केलें कृपादान ।**
**पंढरीय यात्रे नेलें घडलें चंद्रभागे स्नान ॥**
**पुंडलीकें वैद्यराजें पूर्वीं साधिलें साधन ।**
**वैकुंठीचें मूळपीठ डोळां ल्याला तें अंजन ॥ ५ ॥**
**कृष्णांजन येकवेळां डोळां घालितां अढळ ।**
**तिमिरदुःख गेल फिटलें भ्रांतीचें पडळ ॥**
**श्रीगुरुनिवृत्तिराजें मार्ग दाविला सोज्ज्वळ ।**
**बापरखुमादेवीवर विट्ठल दीनाचा दयाळ ॥ ६ ॥**

अमृतानुभवाच्या ८ प्रकरणांत त्यांच्या पूर्णतेची खूण चांगलीच पटणारी आहे:–‘ आह्मांलागी गुरुदेवें आह्मींच केलों ’–‘ किंबहुना श्रीनिवृत्ती। ठेविलों असों जये स्थिती। तें काय देऊं हातीं। वाचेचिया ?॥’

असो. ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र याप्रमाणें त्यांच्या स्वानुभवोक्तींतच खरें खरें सांपडणारें आहे.

## ५ पूर्वील ग्रंथांचे संस्कार.

केवढाही मोठा ग्रंथकार असला किंवा ज्ञानेश्वरांसारखा ‘उपजत ज्ञानी’ असला तरी त्याच्या परंपरेंत येणारे त्याच्या पूर्वीचे कांही तरी ग्रंथ त्याच्या नजरेखालून गेलेले असतात व त्यांचे कांहीं ना कांहीं संस्कार त्याच्या विचारांवर घडल्याशिवाय राहत नाहींत. ज्ञानेश्वरांच्या विचारांवर अशा कोणत्या ग्रंथकारांचे संस्कार घडले आहेत याचें किंचित् दिग्दर्शन करितों. पैठणास गेल्यावर त्यांनीं अध्यात्मग्रंथ पाहिले असें नामदेवांनीं म्हटलें आहे. वेद, उपनिषदें, हरिवंश, गीता, भागवत, शंकराचार्यांचे भाष्यादि ग्रंथ, योगवासिष्ठ, गोरक्षनाथांचे ग्रंथ–यांचे ज्ञानेश्वरीवर उघड उघड संस्कार झालेले दिसतात. ज्ञानेश्वरीचें मंगलाचरणच त्यांच्या बुद्धीच्या व्यापकतेची साक्ष देत आहे. वेद, स्मृति, अष्टादश पुराणें, काव्यनाटकें, षड्दर्शनें, न्यायशास्त्र, अर्थशास्त्र, वेदांत, बौद्धमत, दोन्ही मीमांसा, द्वैताद्वैतमतें, दशोपनिषदें या सर्वांचा उल्लेख पहिल्या गणेशस्तवनांत त्यांनीं केला आहे. वेदाच्या ‘बृहत्सामसूत्रा’चा उल्लेख आहे ( ज्ञाने० १३–६८ ). ‘ नासदीयसूक्ताचें ’ थोडेसें स्पष्टीकरण ‘ ज्ञेय’पदाच्या विवरणांत केलेलें आहे ( अ. १३ ओवी ८६८ ते ८७२. ह्या ग्रंथांतील पृ० २३ व २४ वरील टीपा पहा ). सांख्यशास्त्र त्यांनीं कसें संक्षेपानें उत्कृष्ट समजावून दिलें आहे हें आपण मागें पृ० ४२–४३ वर पाहिलेंच आहे. कठ व तैत्तिरीय उपनिषदांतील दोन मंत्रांचें स्पष्टीकरण ज्ञानेश्वरींतील ९ व्या अध्यायांतील एका प्रसंगानें केलेलें आपण मागें पृ० ५१ वर पाहिलेंच आहे. बृहदारण्यांतील ‘ स वै

नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत्' ह्या मंत्राचें विशदीकरण ह्म० अमृतानुभवाचें पहिलें शिवशक्तींचें प्रकरणच होय. 'यस्य भासा सर्वमिदं विभाति' (कठ) हें उपनिषद्वचन असेंच अमृतानुभवांत आलें आहे. आत्मज्ञानाविषयीं अंध असलेला मनुष्य इतर सर्व शास्त्रें शिकला तरी तें त्यांचें अध्ययन व्यर्थ आहे असें सांगतांना कर्मकांड, ज्योतिष, शिल्प, सूपकर्म, अथर्वणविधि, कोकशास्त्र, आगम, वैद्यक, गारुडीविद्या, निघंट, व्याकरण इ० शास्त्रांचे उल्लेख त्यांनीं केले आहेत (ज्ञाने० अ० १३ ओवी ८२६ ते ८४०). तेथें 'शास्त्रजात जाण। आघवेंचि अप्रमाण। पार्था अध्यात्मज्ञानेवीण। एकलेनि' हा सिद्धांत त्यांनीं केला आहे, व उपनिषदें व योगशास्त्र यांची मात्र प्रशंसा केली आहे. ज्ञानेश्वर हे वादांत कोठेंच पडले नाहींत. त्यांना वादाची प्रीति नव्हती व त्यांच्या वेळीं वादार्थ कोणी प्रतिपक्षीही त्यांच्या पुढें नव्हते. तामीळ संत व शंकराचार्य यांनीं बौद्ध व जैन मतांचें खंडण केल्यापासून हे दोन्हीं पंथ अपापच मागें पडले होते व महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांच्या वेळीं हे पंथ तादृश जोरांत नव्हते, तथापि 'अहिंसेचें' व्याख्यान करितांना त्यांनीं जैनमताचा समाचार घेतला आहे; तेथें पशुहिंसा करणारे याज्ञिक व आयुर्वेदी यांच्या मताचेंही खंडण केलें आहे. (ज्ञाने० १३ ओवी २१७ ते २४०). ज्ञानेश्वरी ग्रंथ हा भाष्यकारातें ह्म० शंकराचार्यांतें वाट पुसत त्यानीं केला आहे, तेव्हां त्यांच्या ग्रंथांशी त्यांचा चांगलाच परिचय होता, हें उघड आहे. आचार्यांच्या स्फुट प्रकरणांकडेही त्यांनीं पाहिलें होतें. आचार्यांच्या 'शतश्लोकी'ची छाया त्यांच्या ग्रंथावर पडली आहे:—

**(१) यद्वत् श्रीखंडवृक्षप्रसृतपरिमलेनाभितोऽन्येपि वृक्षाः।**
**शश्वत्सौगंधभाजोऽप्यतनुतनुभृतां तापमुन्मूलयन्ति।...॥२॥**

---

१ 'विभाति यस्य भासा। सर्वमिदं हा ऐसा। श्रुति काय वायसा। ढेंकरू देती?' (अमृता० प्र-७-२९०) ह्या वचनाचा अनुवाद भागवतानेंही केला आहे: 'यस्य भासा सर्वमिदं विभाति सचराचरम्' (स्कंध १०-१३-५५).

'ज्याप्रमाणें चंदनवृक्षापासून पसरलेल्या परिमलानें आसपासचे इतर वृक्षही निरंतर सुगंधयुक्त होतात, इतकेंच नव्हे तर पुष्कळ लोकांचा तापही दूर करितात'–हा चंदनाचा दृष्टांत ज्ञानेश्वरांनीं घेतला आहे:—'चंदनें वेधिलीं झाडें। जालीं चंदनाचेनि पाडें' ( ज्ञा. १८–१७३२ ). 'पाहें पा चंदनाचेनि अंगानिळें। शिवतले निंब होते जे जवळें'। (ज्ञा.९–४८४).

**(२) कश्चित्कीटः कथंचित्पटुमतिरभितः कंटकानां कुटीरं**
**कुर्वस्तेनैव साकं व्यवहृतिविषये चेष्टते यावदायुः ।...६॥**

एखादा बुद्धिमान् कीटक प्रयासानें आपल्या भोंवतीं कांट्यांचें घर करून त्यासह आपला व्यवहार साधण्यासाठीं क्रिया करीत असतो:—

**येऱ्हवीं कोशकीटकाचिये परी। तो आपणया आपण वैरी।**
**जो आत्मबुद्धि शरीरीं। चारुस्थळीं ॥ ज्ञा० ६–७२॥**

**(३) तिष्ठन् गेहे गृहेशोऽप्यतिथिरिव निजं धाम गन्तुं चिकीर्षु–**
**र्गेहस्थं दुःखसौख्यं न भजति सहसा निर्ममत्वाभिमानः। १६॥**

× × × ×

**छायां मार्गद्रुमोत्थां पथिक इव मनाक् संश्रयेत् देहसंस्थां। १७॥**

ह्या दोन्ही श्लोकांची संपूर्ण छाया पुढील ओव्यांवर पडली आहे:—

**तरी जो या देहावरी। उदास ऐसियापरी।**
**उखिता** ( अतिथि ) **जैसा बिढारीं। बैसला आहे ॥ ५९४ ॥**
**कां वृक्षाची साउली। वाटे जातां मिनली।**
**घरावरी तेतुली। आस्था नाहीं ॥ ५९५ ॥**
**आणि प्रजा जे जाली। तियें वस्तिकरें** ( पथिक ) **आली।**
**कां गोरुवें** (गुरें) **बैसलीं। रुखा**( वृक्षाच्या )**तळीं ॥५९७॥**
**दारागृहपुत्रीं। जयासी नाहीं मैत्री।** ( निर्ममत्वाभिमानः )
**तो जाण पा धात्री** ( जन्मभूमि )**। ज्ञानासी गा ॥ ६०० ॥**
**कां तिन्ही काळ होता। त्रिधा नव्हे सविता।**
**सुखदुःखीं चित्ता। भेदु नाहीं ॥ ६०२ ॥ ( अ० १३)**

ज्ञानेश्वरांच्या वाणीवर आचार्यांच्या शतश्लोकीची छाया याप्रमाणें घनदाट पडलेली दिसते, त्याप्रमाणेंच त्यांच्या ' **विवेकचूडामणी**'चीही पडलेली आहे. एकच उदाहरण पुरें:—

**( ४ ) शब्दादिभिः पंचभिरेव पंच पंचत्वमापुः स्वगुणेन बद्धाः**
**कुरंगमातंगपतंगमीनभृंगा नरः पंचभिरंचितः किम् ॥७८॥**

ज्ञानेश्वरांच्या ' असे न दिसे ' या अभंगांत:—

**' स्पर्शें मातंग दीर्ती पतंग नादें मृग घ्राणें भृंग रसेन मीन '**
या पांचाही विषयीं मारिले ' इ० इ०

**योगवासिष्ठ** व ज्ञानेश्वरी दोन्ही ग्रंथ पाहतांना पुष्कळ स्थळीं विचारांचे व दृष्टांतादिकांचें साम्य आढळतें. 'योगवासिष्ठा'वर ज्ञानेश्वरांनीं ओवीबद्ध ग्रंथ केल्याचें प्रसिद्ध आहे, पण तो अद्याप उपलब्ध झाला नाहीं. धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें एक ' योगवासिष्ठ ' ज्ञानेश्वरांचें म्हणून छापलें आहे, पण तो मानभावी ग्रंथ असून ज्ञानेश्वरांचा नाहीं हें देवचांदोरकरप्रभृतींस पूर्वींच सांगण्यांत आलें होतें व त्यांनाही तें मागाहून पटल्याचें त्यांनीं मजपाशीं समक्ष कबूलही केलें आहे ! ज्ञानेश्वरांच्या अवलोकनांत योगवासिष्ठ ग्रंथ आला होता हें मात्र खरें. एकच उदाहरण देतों ( निर्वाण प्रकरण ४५–४० ):—

**अतज्ज्ञायैव विषयाः स्वदन्ते न तु तद्विदः ।**
**न हि पीतामृतायांतः स्वदते कटकांजिकम् ॥**

या श्लोकाचा कांजीच्या दृष्टांतासह स्पष्टार्थच पुढील ओव्यांत आहे:

**तैसें आपणपें नाहीं दिठे । जयातें स्वसुखाचे सदा खरांटे ।**
**तयासीचि विषय हे गोमटे । आवडती ॥ ज्ञा० ५–११२ ॥**
**जो अमृतातें ठी (दोष) ठेवी । तो जैसा कांजी न सेवी ।**
**तैसा स्वसुखानुभवी । न भोगी ऋद्धि ॥ ज्ञा० २-३६ ॥**

' **अध्यात्मरामायण** ' ह्या ग्रंथाचा ज्ञानेश्वरांच्या एका अभंगांतील " शिवभवानिये—उपदेशी प्राणप्रिये । निजमानसीं ध्याये परमानन्दु पाहे ॥ राम सखा राम सखा " ह्या चरणाशीं संबंध आहे.

ज्ञानेश्वरीचा भागवताशीं फारच निकटचा संबंध आहे. भागवत ग्रंथ ज्ञानेश्वरीनंतरचा असून ज्ञानेश्वरीशीं त्याचा बिलकूल संबंध नाहीं असें मागें ' भारद्वाज ' ( भारदे ), प्रो. भानू वगैरे विद्वानांनीं लिहिलें होतें ! भागवताचा ज्ञानेश्वरीशीं निकट संबंध आहे म्ह० भागवताचा ज्ञानेश्वरीवर पूर्ण संस्कारच घडला आहे, याचीं स्पष्ट प्रमाणें देऊन या वादाची मी येथें समाप्ति करितों ! कोणत्याही मिषानें मला भजले असतां जीव माझ्या स्वरूपाला पावतात असें सांगतांना भगवान् ( ज्ञान० ९ ) म्हणतात:—

**(१) पाहे पा वल्लभाचेनि व्याजें । तिया व्रजांगनांचीं निजें ।**
**मज मिनलिया काय माझें । स्वरूप नव्हती ? ॥ ४६५ ॥**
**नातरी भयाचेनि मिसें । मातें न पविजेचि काय कंसें ? ।**
**कीं अखंड वैरवशें । चैद्यादिकीं ? ॥ ४६६ ॥**
**अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायुज्य यादवा ।**
**कीं ममत्वें वसुदेवा- । दिकां सकळां ॥ ४६७ ॥**
**नारदा ध्रुवा अक्रुरा । शुका हन सनत्कुमारा ।**
**इयां भक्ती मी धनुर्धरा । प्राप्य जैसा ॥ ४६८ ॥**
**तैसाचि गोपिकांसि कामें । तया कंसा भयसंभ्रमें ।**
**येरां घातकां मनोधर्में । शिशुपालादिकां ॥ ४६९ ॥**

आतां याच ओव्यांच्या शेजारीं पुढील भागवतीश्लोक ठेवून पहावेत म्हणजे ओव्या भागवतीश्लोकांचें सरळ भाषांतर आहेत असेंच दिसेल !

**कामात् द्वेषात् भयात् स्नेहात् मया भक्त्येश्वरे मनः ।**
**आवेश्य तदघं हित्वा बहवस्तद्गतिं गताः ॥ २९ ॥**
**गोप्यः कामात् भयात् कंसो द्वेषात् चैद्यादयो नृपाः ।**
**संबंधात् वृष्णयः स्नेहात् यूयं भक्त्या वयं प्रभो ॥३०॥**
**तस्मात्केनाप्युपायेन मनः कृष्णे निवेशयेत्**॥(अ०७-१-३०)

भागवताचे ज्ञानेश्वरीवर संस्कार बहुत आहेत, किंबहुना भागवतांतील सिद्धांत ज्ञानेश्वरींत आल्यामुळेंच ज्ञानेश्वरी भागवतधर्मीयांस मान्य झाली आहे ! पुढील ओवींत शुक–भागवताचा संबंध स्पष्ट आहे:—

(२) एऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दाटुले ।
ते विषयोचि वानितां जाहले । भाट जयाचे ॥ ११–१७३ ॥

( ३ ) हें कलेवर ( देह ) पडल्यावर त्याला विष्टा, किडे किंवा राख ह्यापैकीं एखादें रूप येतें–' कलेवरो वृट्‌क्रमिभस्मसंज्ञितः ' ( स्कंध १०–५१–५२ ) या पदाचें विवरण ज्ञानेश्वर कसें करितात पहाः—

हें विपायें आगींत पडे । तरी भस्म होऊनि उडे ।
जाहलें श्वाना वरपडें । तरी ते विष्टा ॥ ११०६ ॥
या चुके दोहीं काजां । तरी होय कृमीचा पुंजा ।
हा परिणाम कपिध्वजा ! । कश्मल गा ( १३–११०७ )

( ४ ) ध्रुवाख्यानांतील ( स्कं ४–९–४ ) ' कृतांजलिं ब्रह्ममयेन कंबुना । पस्पर्श बालं कृपया कपोले ' याबरोबर ज्ञानेश्वरींतील ( अ. ११–१८४ ) पुढील ओवी पहाः—

नातरी मधुवनीं ध्रुवासि केलं । जैसें कपोल शंखें शिवतलें ।
आणि वेदांचियेही मती ठेलें । तें लागला बोलों ॥

पण एवढ्या खटाटोपाचेंही कारण नाहीं. भागवताचा नामोल्लेख ज्ञानेश्वरींत असंदिग्धपणें आला आहेः—

(५) ते हे कल्पादि भक्ति प्रियां । श्रीभागवतमिषें ब्रह्मया ।
उत्तम म्हणोनि धनंजया । उपदेशिली ॥ १८–११३२ ॥

असा नारायणानें ब्रह्मदेवास ' उत्तम उपदेश ' केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. हा उपदेश केल्याची कथा भागवतांत स्कंध २ अ० ९ मध्यें आहे. ह्या उपदेशामुळेंच ब्रह्मयास ' विश्वसृजनयोग्यता ' आल्याचें ज्ञानेश्वरांनीं आणखी एकदा ( ज्ञाने० १७ ओवी ३३५ त ३४१ ) सांगितलें आहे. भागवताचा याप्रमाणें ज्ञानेश्वरीवर अनेक ठिकाणीं संस्कार घडल्याचें स्पष्ट दिसत आहे. सिद्धांताच्या दृष्टीनें तर ज्ञानेश्वरी व भागवत अगदीं एकमय आहेत. भागवतांनीं वर्णिलेल्या ध्रुव, प्रल्हाद, अजामीळ, गजेंद्र इ० भक्तकथांचे दृष्टांत ज्ञानेश्वरांनीं शतशः घेतले आहेत.

पुणे वाचनालय, बावारी.


'हरिवंशपुराणा'चा उल्लेख हरिपाठाच्या अभंगांत ( अभंग १८ ) आला आहे.

'**शिवसूत्रांचा**' उल्लेख अनुभवामृतांत पहा:–'आणि ज्ञानबंधु ऐसें। शिवसूत्राचेनि मिसें। म्हणितलें असे। सदाशिवें' ( प्र० ३–१६ ).

**विष्णुसहस्रनामाचा** उल्लेख ज्ञानेश्वरींत 'नामाचेया सहस्रवरी। नावा इया अवधारी' ( १२–९० ) येथें स्पष्टच आहे.

**पुरुषसूक्ताचा** संबंध 'सहस्रशीर्षयाचे दाखले। कोटिवरी होताति एके वेळे' ( अ० ११–२६९ ) येथें उघड आहे.

**सुभाषितें** तर शेंकडो आहेत: 'दर्वी पाकरसानिव'–'नातरीं नानारसीं। रिघोनि दर्वी जैसी। परी रसास्वादासी चाखों नेणे' ( १६-२४८ ); 'प्रोद्दीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः–'येऱ्हवीं ऐसें घडे। जो जळत घरीं सांपडे। तो मग न पवाडे। कुहा खणो' ( ज्ञा–१३–५४९ ) इ० इ०

## ६ श्रीगुरु निवृत्तिनाथ.

ज्ञानेश्वरांचे वडिल बंधु, गुरु व नित्यसंगतीचें छत्र असे श्रीनिवृत्तिनाथ हे तत्वतः या संप्रदायाचे प्रवर्तक होत, पण त्यांनीं आपलें संपूर्ण अध्यात्मधन ज्ञानेश्वरांना देऊन त्यांना यश दिलें व आपण त्या यशापासूनही निवृत्त झाले! एके ठिकाणीं निवृत्तिनाथांनीं म्हटलें आहे कीं गयनीनाथांपासून आम्हांला कृष्णभक्तिरसायन मिळालें व 'गोरक्ष गुह्यभाव सांगती मज'–गोरक्षनाथांनीं त्याचें रहस्य सांगितलें; यावरून निवृत्तिनाथांना गुरु व परमगुरु या उभयतांची भेट झाली होती असें दिसतें. गुरुशिष्यांच्या एकांताच्या गोष्टी गुरुशिष्यानांच माहीत असाव्या. आपला परंपरेचा योगमार्ग व अद्वैतज्ञानासह कृष्णभक्तीचा उपदेश निवृत्तिनाथांना गुरुपरंपरेनें मिळाला हें त्यांच्याच सांगण्यावरून समजतें:–

**(१) निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय। गयिनीनाथें सोय दाखविली॥**

**(२) निवृत्ती संपन्न कृष्णरूप ध्यान । गयिनी तल्लीन नाम घेतां ॥**
**(३) निवृत्तीचें धन गोकुळीं श्रीकृष्ण । गयनी सहिष्ण प्रेमें डुल्ले ॥**

असें निवृत्तिनाथांनीं स्थळस्थळीं म्हटलें आहे. ते म्हणतात कीं आमचा आचारविचार सर्व हरिरूप आहे व ' धन्य माझा भाव गुरूचा उपदेश ' कां कीं सर्व हरिरूप आहे हा बोध ठसल्यामुळें ' एक्या जन्में खेप हरिली माझी '–मी जन्ममरणांच्या यातायातींतून सुटलों, ' न करूं हा शोक आला गेला–' शोकमोहाच्या आम्ही पार गेलों ! निवृत्तिनाथांनीं आपलें परमार्थधन ज्ञानेश्वरांस व त्यांच्या द्वारें आपल्या भावंडांस दिलें म्हणून ' कुळ हें पावन कृष्णनामें. ' निवृत्तीचें गोत कृष्णनामें तृप्त असा त्यांना विश्वास वाटला.

**पूवपुण्य चोख आह्मांसी सफळ । गयनि कल्लोळतुषार आह्मां ॥**
**चंद्रसूर्यकिरणें आकाश प्रावरण । पृथ्वी अंथरूण सर्वकाळ ।**

* * * *

**निज तेजबीज नाठवे हा देह । हारपला मोह संदेहेसी ॥**
**विदेह पै गंगा पारुषली चित्तीं । चिद्रूपीं हे वृत्ति बुडोनि गेली ॥**

* * * *

**हरीवीण न दिसे जनवन आह्मां । नित्य ते पूर्णिमा सोळाकळीं ॥**
**देवीं नांद रसना धर्मीं नांदे भावो । एकतत्वीं देवो क्षरला असे ॥**

* * * *

' जो रेखा अव्यक्त रेखेसीही पर । दृश्यद्रष्टाकार सर्वांभूतीं ' तो कृष्णरूपानें नांदत आहे व तो ' दृश्यद्रष्टाभिन्न एकाकी ' आहे हें आमच्या अनुभवास आलें आहे.

निवृत्तिनाथांचे ४०० अभंग उपलब्ध आहेत. त्यांत कांहीं अभंग योगपर, कांहीं अद्वैतपर व कांहीं कृष्णभक्तिपर आहेत. **निवृत्तीची ओळख ज्ञानाशिवाय कोणाला होणार ?** ज्ञानेश्वरांनींच निवृत्तिनाथांना

यथार्थ जाणलें. अज्ञानी लोकांत नेहमीं प्रवृत्तीचाच थयथयाट चाललेला असतो! भरतखंडाच्या सांप्रतच्या स्थितीकडे पाहिलें तर प्रकृतीच थैमान घालून राहिली आहे, येथें ज्ञानाचीच कदर नाहीं, मग ज्ञानोत्तरभक्तीकडे कोण पाहणार व निवृत्तीला कोण भजणार? तें जाऊं द्या. निवृत्तिनाथांचे भक्तिज्ञानपर उद्गार आपण ऐकूं. ज्ञानेश्वर जेथें नम्र झाले ते निवृत्तिनाथ बोलतांना ऐकण्यांतही आनंद आहे!

श्रुतिप्रतिपाद्य शास्त्रांसी जें वंद्य । निर्गुणाचें आद्य भाग्यनिधी ॥
तें रूप सांवळें भाग्ययोगें वोळे । नंदाचे सोहळे पाळियेले ॥

* * * *

मध्यबिंदुनादउन्मनी स्वानंद । रूपरस गोविंद गुणनिधी ॥
निवृत्ति निवाला प्रेमरसें धाला । सर्वसुख डोळां रामकृष्ण ॥

* * * *

सर्वघटवासी सर्वत्रनिवासी । आपण समरसीं बिंबलासे ॥
पूर्णपुण्य चोख आचरिले आह्मी । तरीच ये जन्मीं भक्ति आह्मां ॥

* * * *

त्रैलोक्यपावन जनीं जनार्दन । त्यामाजीं परिपूर्ण आत्मज्योती ॥
नाहीं आह्मां काळ नाहीं आह्मां वेळ । अखंड सोज्ज्वळ हरि दिसे ॥

* * * *

सूर्यातें जो निवटी चंद्रातेंही घोटी । उन्मनी नेहटी बिंबाकार ॥
सत्रावी उलंडी अमृत पिऊनी । ब्रह्मांड निशाणीं तन्मयता ॥
तें रूप सांवळें योगियांचें हित । देवांचें दैवत कृष्णमाय ॥

* * * *

ज्या नामें अनंत न कळे संकेत । वेदाचाही हेत हारपला ॥
अनंत अनिवार न कळे ज्याचा पार । जेथें चराचर होतें जातें ॥
तें रूप सानुलें यशोदे तान्हुलें । भोगिती निमोले भक्तजन ॥

* * * *

**हरिरूप घरीं सोळासहस्र नारी । बाळब्रह्मचारी गाई राखे ॥**
**योगियांचें धन ब्रह्मतासंपन्न । तो हा जनार्दन नंदाघरीं ॥**

ज्या डोळ्यांनीं निवृत्तिनाथ श्रीकृष्णरूपाकडे पाहत ती सोज्वळ व सुखमय दृष्टि त्यांनीं ज्ञानेश्वरांना दिली व ज्ञानेश्वरांनीं सर्व भाविकांना दिली. सद्भक्तांच्या मेळ्यांत सद्भावानें रमणाऱ्या प्रेमळांना ती दृष्टि मिळत असते. साधनांनीं न आकळणारा हरि सत्संगीं लाभतो. 'गयानिप्रसादें निवृत्तीसी बोधु । अवघाचि गोविंदु अवघ्या रूपीं'

निर्गुण निराकार ब्रह्मच सगुणसाकार कृष्णपणानें आहे हें आपण ऐकलें; आतां तेंच कृष्णरूप पंढरीस विठलरूपानें उभें आहे हें ऐका:—

**प्राणिया उद्धार सर्व हा श्रीधर । ब्रह्म हें साचार कृष्णमूर्ति ॥ १ ॥**
**तें रूप भीवरे पांडुरंग खरें । पुंडलीकनिर्धारें उभे असे ॥ २ ॥**
**युगे अठ्ठावीस उभा हृषीकेश । पुंडलीकसौरस पुरवीत ॥ ३ ॥**
**निवृत्तीचें गुज पांडुरंग बीज । विश्वजनकाज पुरे कोड ॥ ४ ॥**

* * * *

**निराकार वस्तु आकारासी आली । विश्रांति पै जाली विश्वजना ॥१॥**
**भीवरासंगमीं निरंतर सम । तल्लीन ब्रह्म उभे असे ॥ २ ॥**

* * * *

**देवमुनि सर्व ब्रह्मादिक लाठे । पंढरिये पेठे प्रेमपिसे ।**
**निवृत्ति निर्वाळला ज्ञानदेव सोपान । खेचर तल्लीन विनटला ॥**

* * * *

**जनांसी तारक विठ्ठलचि एक । केलासे विवेक सनकादिकीं ॥ १ ॥**
**तें रूप वोळले पंढरीस देखा । द्वैताची पै शाखा तोडियेली ॥ २ ॥**
**उगवलें बिंब अद्वैत स्वयंभ । नाम हें सुलभ विठ्ठलराज ॥ ३ ॥**
**निवृत्तीचें गुज विठ्ठल सहज । गयनीराजें मज सांगितलें ॥ ४ ॥**

गोरक्षनाथ, गयनिनाथ, निवृत्तिनाथ ही परंपरा कृष्णभक्तीची, व निर्गुणब्रह्मच कृष्णरूपानें म्हणजे विठ्ठलरूपानें पंढरीस विटेवर उभें आहे

ही या परंपरेची उपासना ज्ञानेश्वरादिकांस मिळाली. पंढरीस **श्रीविठ्ठल-मूर्तीच्या मस्तकावर शिवाची पिंडी आहे** ह्म० विठ्ठलानें शंकरास प्रेमानें आपल्या शिरावर धारण केलें आहे, ही ह्या संतांची श्रद्धा असल्यामुळें हरिहरांत भेद नाहीं असा अभेदभाव सर्वांच्या अंतरीं बिंबला. यासंबंधीं निवृत्तिनाथ म्हणतात: —

**रूप पाहतां तरी डोळसु । सुंदर पाहतां गोपवेषु ।**
**महिमा वर्णितां महेशु । जेणें मस्तकीं वाहिला ॥**

ह्या संतांच्या काव्यांत 'कानडा विठ्ठलु कर्नाटकु' असे शब्द येतात त्यावरून विठ्ठलदेव कर्नाटकांतून आणला अशी कांहींची समजूत आहे पण ती चुकीची आहे. 'कानडा' शब्दाचा अर्थ मराठींत दुर्गम, समजण्यास कठिण, दुर्ज्ञेय, असा आहे. 'वन्ही झाला कानडा । दीपत्वासाठीं' अशी ज्ञानेश्वरींत एक ओवी आहे, तेथेंही हाच अर्थ आहे. पंढरीच्या देवाच्या पायांवर—अस्पृश्यांशिवाय सर्वांना—मस्तक ठेवण्याचा अधिकार आहे. सर्वांना देवाची पूजा करितां येते, देवाला कडकडून भेटतां येते. पंढरीस हा प्रघात अनादि आहे. कानडामुलखांत शैव-वैष्णवांचे तंटे त्यावेळीं जोरांत होते व अजूनही आहेत. महाराष्ट्रांत शिवविष्णु एकरूप आहेत, येथील वैष्णवांत कानडी लोकांचा करडेपणा व अतिशय सोवळेपणा नाहीं, येथें हरिहरांची एकात्मता आहे. एकादशी आणि शिवरात्र दोन्ही पर्वें वारकरी सारख्याच प्रेमानें पाळीत आहेत. विठ्ठल व्यापक परब्रह्म आहे, हरिहर तोच, रामकृष्ण तोच, दशावतार त्याचेच, क्षीरसागरवासी तोच, व विष्णु तोच. योग्यांचें निधान, ज्ञान्यांचें ज्ञेय, व भक्तांची माउली एक विठ्ठल आहे. 'तया एकेवीण दुजें नाहीं सृष्टी !' उपनिषदांतील ब्रह्मविद्येचें हेंच सार आहे. हें अद्वयानंदामृत सर्वांस पाजण्यासाठीं संतांचे अवतार आहेत.

निवृत्तिनाथांचा संदेश संकलितरूपानें सांगतों:—

**हरीविण सुटिजे ऐसें नाहीं बोलिलें ।**
**सर्वही शोधिलें शास्त्र आह्मीं ॥ १ ॥**

संसारबंधांतून हरीवांचून सोडविणारा कोणी नाहीं व हरिभजन हेंच सर्व साधनांचें सार आहे, असा आपला निश्चय ते सकलशास्त्रमंथन करून सांगत आहेत. श्रीहरि सर्वभूतीं वसत असल्यामुळें द्वैतभाव सोडून सर्वभूतीं अद्वैत हरि पहा असा त्यांचा संदेश आहे. ‘ **देवोचि दिसतु सर्वांघटीं** ’ ‘**गोपाळ सकळां देहीं नांदे**’ ‘ **जनीं जनार्दन हेंचि खरें** ’ ‘**सर्वांघटीं राम पाहे**’ इ० सूत्ररूप वाक्यांत निवृत्तिनाथांनीं हा संदेश पुनः पुन्हा सांगितला आहे. हें आचरणांत आलें पाहिजे व यासाठीं ‘ परापवादनीं परनिंदा झणी । परपीडा मनीं ’ न ठेवण्याबद्दल त्यांनीं वारंवार बजावलें आहे. परनिंदा, परापवाद, परपीडा, परपापोच्चार कानीं पडलाच तर तुह्मी नामस्मरण अधिक तीव्रतेनें करा, कारण ‘ उच्चार पापाचा विभाग ये त्याचा. ’ पराच्या गुणदोषोच्चारानें आपला अद्वैतभाव सुटून द्वैताचें पाप गळ्यांत येऊन पडतें यासाठीं हा मार्गच बंद करून टाका व नामाचा आनंद भोगीत अद्वैतपणें सर्वत्र हरि पहा. ‘ दूजिया पीडणें द्वैत तेंचि जाण । अद्वैताची खूण हरि येक ’ ‘ दुजियाची निंदा दुजेपण सदा । ‘ द्वैत त गोविंदा नावडे रया । ’–हरि अद्वैत एकला आहे व आपणही अद्वैत झाल्याशिवाय हरीचें व आपलें सख्य कसें होणार ? ‘ एकेवीण दुजें तत्व नाहीं सृष्टी ’ ‘ सर्व नारायण बिंबलासे ’ ‘ ब्रह्म सनातन सर्वांघटीं ’ हा महासिद्धांत अनुभवाला येण्यासाठीं ज्या ज्या योगानें द्वैतभाव उठतो तें तें पाप समजून त्यापासून दूर रहा–‘ द्वैताची भावना दूरी करी.’ कर्मजाड्य अंगीं येऊं न देतां कर्ममार्गानें चाला. अद्वैत हरि जेणें आपला होतो तेंच सत्कर्म. जगाच्या गुणदोषाविवेचनेंत न पडतां वासना, मन, भाव आपला चोख ठेवा. ‘ मनाची वासना मनेंचि नेमावी । सर्वत्र धरावी विठ्ठलसोय ’ ‘ वासना पै चोख तेथोंचि वैकुंठ । भावेंचि प्रगट होय जना ’. सर्वभूतीं दयाक्षमाशांति ठेवून ‘ शांतीचें भजन क्षमेचा कळवळा ’ ठेवा व ‘ अहिंसेचें स्वरूप हेंचि हरिरूप ’

जाणून सर्वांशीं कायावाचामनानें अहिंसाबुद्धीनें वागा; तात्पर्य सदाचारानें वागा व अद्वैतभावें हरिभजन करा हेंच निवृत्तिनाथांच्या संदेशाचें सार आहे. 'संसार सुफळ हरिनाम उच्चारितां' होतो व रामकृष्णनाम 'मनाचें मोहन नित्य समाधान' आहे म्हणून नामस्मरणयोग साधा.

**भावभक्तिप्रेम दया शांति क्षमा। अखंडित प्रेमा असों द्यावा ॥१॥**
**सर्वभूतीं भजन करावें सर्वथा। रामनामकथा आरंभाव्या ॥ २ ॥**
**आपपर देहीं विचार न करावा। हरि नामें दोहावा सर्वांरूपीं ॥३॥**
**निवृत्तीचें जाप्य आन नाहीं चित्तीं। रामनामें तृप्ती सदा असे ॥४॥**

हा विठ्ठलभक्तीचा संप्रदाय 'श्रीगुरु निवृत्तिरायें दाविला' व 'निवृत्तिकृपें ज्ञानदेवें प्रगट केला' असें सेना न्हावी यांनीं गौळणीवरील अभंगांत म्हटलें आहे.

## ७ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति.

सकल अवगुण, गुण व अगुण या पलीकडची गुरुब्रह्माची भक्तिआहे. अध्यात्मसुखानुभवी लोकांत 'गुरुभक्ति' हा सर्वश्रेष्ठ गुण समजला जातो, आणि तो तसाच आहे. ज्याच्या कृपाप्रसादानें अनंतजन्मांचे बंध तुटून निजात्मभावाची प्राप्ति झाली त्याच्यावर प्राप्तीनंतरही निरतिशय प्रेम असणें हें उचित आहे. ज्ञानेश्वरमहाराजांची गुरुभक्ति अशी अलोट आहे. १३ व्या अध्यायांतल्या ७व्या श्लोकांत 'आचार्योपासनम्' हें एक ज्ञानलक्षण दिलें आहे. हें नुस्तें पद पाहतांच त्यावर त्यांची वाणी सुमारें १०० ओव्या बोलून गेली आहे. 'जिये गुरुसेवेविखीं। जीव माझा अभिलाखी'–गुरुसेवेची मला अत्यंत आवड पण गुरुसेवा माझ्या हातून कांहींच झाली नाहीं, तथापि 'मनीं निका सानुराग–' पण ती घडावी अशी फार फार इच्छा, किंबहुना 'तेणें पै कारणें। स्थूल हें पोसणें–' गुरुसेवेसाठींच हा स्थूल देह मी पोसला आहे असें म्हणून त्यांनीं श्रीगुरूची नवविधाभक्तीनें अति गोड अशी वाङ्मय पूजा केली

आहे. ती मूळांतच ( ओवी ३६८ ते ४६० ) पाहिली पाहिजे ' गुरुगृह जिये देशीं । तो देशचि वसे मानसीं ' ' तियेकडोनि येतसे वारा । देखोनि धांवे सामोरा ' 'साचा प्रेमाचिया भुली । तिये दिशेसीचि आवडे बोली ' ' गुरुकुळीचेनि नांवें । महासुखें अति थोरावे ' या या प्रकारें गुरुभक्ताचें चित्त श्रीगुरूकडे ओढत असतें. गुरूचें ध्यानसुखही नानाप्रकारें तो भोगीत असतो. गुरूला शेषशायी भावून आपण पाय चुरणारी लक्ष्मी होतो, किंवा दास्यार्थ गरुडासारखा सन्मुख उभा ठाकतो, अथवा:—

**एकाधिये वेळे । गुरु माय करी भावबळें ।**
**मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ॥ ३९६ ॥**

कधी ' गुरुकृपास्नेहसलिलीं । आपण होय मासोळी, ' कधी 'चक्षुपक्षेवीण । पिलूं होय आपण ' किंवा ' गुरूतें पक्षिणी करी । चारा घे चांचूवरी । गुरु तारू, धरी । आपण कांस ' अशा विविध प्रकारांनीं तो गुरुध्यानसुख भोगीत असतो. तो गुरूचें ' ताट मी काढीन । सेज मी झाडीन । चरणसंवाहन । मीचि करीन ' अशा प्रकारचें गुरुदास्य स्वत: अत्यंत आवडीनें करितो व श्रवणकाळीं गुरुवचनामृत आनंदानें पिऊन पचवून टाकतो.

**गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम ।**
**गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ॥ ४४५ ॥**
**गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता ।**
**जो गुरुसेवेपरता । मार्ग नेणे ॥ ४४६ ॥**
**जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।**
**गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥ ४४८ ॥**

गुरुचरणोदकाला तीर्थ मानून गुरुचरणरजाला कैवल्यासमान मानतो. अशी अत्युत्कट गुरुभक्ति जेथें आहे तेथें ' मूर्तिमंत ज्ञान ' आहे. ज्ञानेश्वरीचीं मंगळाचरणें गुरुभक्तिरसानें ओथंबलेलीं आहेत.

पहिल्याच मंगलाचरणांत 'मज हृदयीं सद्गुरु। जेणें तारिलों हा संसारपूरू । म्हणऊनि विशेषें अत्यादरू। विवेकावरी ॥' असं सांगून मी गुरुकृपेनें पूर्णकाम झालों आहें असें म्हटलें आहे. गरुकृपांजनानें अतींद्रिय वस्तुही प्रत्यक्ष होते. दहाव्या अध्यायांत 'विशदबोधविदग्ध'– विमलबोध देण्यांत कुशल, 'विद्यारविंदप्रबोध'–ज्ञानरूप कमलाला विकसित करणारा, परावाणीच्या अर्थाशीं रमणारा, संसारतम नाहींसें करणारा अशा गुरुरूप 'आराध्यलिंगाला' वंदन करीत त्यांनीं म्हटलें आहे कीं 'दिठी जयावरी झळके। कीं हा पद्मकर माथां पारुखे। तो जीवचि परी तुके। महेशेशीं'–ज्यावर श्रीगुरूची कृपादृष्टि वळते किंवा त्याचा पद्महस्त ज्याच्या मस्तकावर पडतो ता जीव असतांही शिवाच्या कोटीला पोंचतो. बाराव्यांत 'अनवरत आनंद वर्षणाऱ्या, डोळ्यांवरची विषयाची झांज उडविणाऱ्या, प्रसादरसकल्लोळांनीं कृतार्थ करणाऱ्या गुरुकृपादृष्टीची' प्रार्थना केली आहे.

**म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिये पाउली ।**
**याकारणें मी साउली । न संडी तुझी ॥ १२–८ ॥**

चौदाव्याच्या मंगलाचरणांत श्रीगुरुपाशीं प्रज्ञास्फूर्तीची याचना केली आहे. 'समस्तसुरवर्य ( सर्वदेवांचा देव ), प्रज्ञाप्रभातसूर्य, विशदविद्या-वधूवल्लभ, सुखोदय' इ. विशेषणांनीं गुरुगौरव केला आहे तो साभिप्राय आहे. माझ्या ठिकाणीं प्रज्ञेचा प्रभात झाला असला तर तूं प्रज्ञेचा सूर्य आहेस, मी विद्यावधूचें लेंकरूं असलों तर तूं विद्येचा वल्लभ आहेस–तूं जगदाद्य आहेस. 'यालागीं आतां । स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथां । हेंचि भल'— आपल्या कृपादृष्टीनें मजकडे पहा म्हणजे हे गुरो ! माझ्या उन्मेषसागराला भरती येईल. माझ्या प्रज्ञावेलीला मधुर फळें देणारे आपण वसंत व्हा.

**अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादचंद्रमा ।**
**करूं मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी ॥ १४–२३ ॥**

पंधराव्यांतली गुरुचरणपूजा फारच बहारीची असून प्रत्येक गुरुभक्तानें ती आपल्या नित्यपाठांत ठेवून गुरूची मानसपूजा करीत तन्मय व्हावें. 'आपल्या शुद्धहृदयाचा चौरंग करून त्यावर श्रीगुरूच्या पावलांची स्थापना करूं. ऐक्यभावाच्या ओंजळींत सर्वेंद्रियांच्या कमळकलिका भरून त्या पुष्पांजळीचें त्यावर अर्घ्य देऊं; आनंदपरिमळानें दरवळलेलें व अष्टसात्विक भावांनीं विकास पावलेलें अष्टदळ पायावर वाहूं; अहंचा धूप जाळूं व नाहं ( निरभिमान ) बोधाच्या नीरांजनानें ओंवाळूं; सामरस्यानें आलिंगूं; स्थूलसूक्ष्मदेहांच्या खडावा पायांत घालूं; भोगमोक्षांचें निंबलोण करूं'–अशा प्रकारें श्रीगुरुचरणपूजा करूं.

सोळाव्याच्या मंगलाचरणाच्या २१ ओव्यांत चित्सूर्य श्रीनिवृत्तीचें ह्म० अद्वयानंदपरमात्म्याचें एक अनुपम स्तोत्र आहे. जीवशिवांची आटणी जेथें होते अशा ' चित्सूर्य श्रीनिवृत्ती 'ची ही स्तुति आहे. येथें ज्ञानाचा उत्कर्ष आहे व भक्तिभाग्याची सीमा आहे. शांति व साहित्य येथें एका रेषेंत आले आहेत, यांतील रूपक शेवटपर्यंत फार चातुर्यानें संभाळलें आहे.

**मावळवीत विश्वाभास । नवल उदयला चंडांश ।**
**अद्वयाब्जिनीविकास । वंदूं आतां ॥ १ ॥**
**जो अविद्याराती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणिया ।**
**जो सुदिन करी ज्ञानिया । स्वबोधाचा ॥ २ ॥**
**जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।**
**सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥**
**लिंगदेहकमळाचा । पोटीं वेंचतया चिद्भ्रमराचा ।**
**बंधमोक्ष जयाचा । उदैला होय ॥ ४ ॥**
**शब्दाचिया आसकडीं । भेदनदीच्या दोहीं थडीं ।**
**आरडत विरहवेडीं । बुद्धिबोध ॥ ५ ॥**
**तया चक्रवाकांचें मैथुन । सामरस्याचें समाधान ।**
**भोगवी जो चिद्गगन । भुवनदिवा ॥ ६ ॥**

जेणें पाहालिये पाहंटे । भेदाची चोरळी फिटे ।
रिगती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥ ७ ॥
जो प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेचा माध्यान्हीं आलिया ।
लपे आत्मभ्रांतिछाया । आपणपातळीं ॥ १० ॥
ते वेळीं विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामती निद्रेतें ।
सांभाळी ? नुरेचि जेथें । मायाराती ! ॥ ११ ॥
तो अहोरात्रांचा पैलकड । कवणें देखावा ज्ञानमार्तंड ।
जो प्रकाश्येवीण सुरवाड । प्रकाशाचा ॥ १६ ॥
तथा चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमोचि म्हणों पुढतपुढती ।
जे बाधका येईजसे स्तुती । बोलाचिया ॥ १७ ॥
जो सर्वनेणिवा जाणिजे । मौनाचिया मिठिया वानिजे ।
कांहींच न होनि आणिजे । आपणपयां जो ॥ १९ ॥
तया तूतें मी सेवकपणें । लेववी बालकेया स्तोत्राचें लेणें ।
हें उपसाहावेंही म्हणतां उणें । अद्वयानंदा ॥ २० ॥

"सूर्य ( चंडांशु ) उगवला असतां विश्वाभास प्रगट करितो व द्वैत–भाव वाढवितो, पण हा चित्सूर्य असा अद्भुत आहे कीं याचा उदय झाल्याबरोबर जगदाभास मावळतो म्ह० जग बाधित होतें व अद्वैतरूप कमलिनीचा विकास होतो. गुरुरूप सूर्य चिदाकाशांत प्रगट झाला कीं प्रपंचभान नाहींसें होऊन अद्वयानंद प्रगट होतो. हा मायारूपरात्रीचा निरास करून ज्ञान व अज्ञान उभयरूप चांदण्या नाहींशा करितो व व ज्ञानी लोकांना आत्मज्ञानाच्या निरभ्र स्वच्छ दिवसाची जोड करून देतो. याच्या उदयानें आत्मज्ञानाचे डोळे मिळून जीवपक्षी देहबुद्धीचीं घरटीं सोडून बाहेर पडतात, व वासनात्मक सूक्ष्मदेहरूप कमलांत अडकून पडलेल्या जीवभ्रमरांची बंधापासून मुक्तता होते. शब्दशास्त्रांच्या माऱ्यांत सांपडलेले बुद्धि व बोध हें चक्रवाकपक्ष्यांचें जोडपें अविद्येच्या रात्रीं भेदनदीच्या तीरावर आरडत होतें त्यांचा वियोगकाल संपून तें एकत्र

येतें व बुद्धीची बोधाशीं गांठ पडून दोघेही ‘ सामरस्याचें समाधान ’ पावतात. भेदवादाची चोरवेळ संपून योगमार्गाचे पांथिक आत्मानुभवाच्या वाटेला लागतात. अंतर्मुखतेनें ‘ मी ब्रह्म ’ आहें अशा बोधाच्या माथ्यावर हा चित्सूर्य आला कीं आत्मभ्रांतिरूप छाया साधकाच्या आत्मानुभवरूपी पायांखालीं दडून जाते ! अशावेळीं ह्म० आत्मभ्रांति ( स्वरूपाचा विसर ) जाऊन आत्मबोध झाला आहे अशा वेळीं माया-रात्रीचा मागमूस राहिला नसतांना विश्वस्वप्नासह प्रगट होणाऱ्या विपरीतज्ञानरूपनिद्रेचें स्मरण तरी कोणाला होणार ? रात्र आणि दिवस ह्म० अज्ञान व ज्ञान या उभय भावांपलीकडचा तो ज्ञानसूर्य कोणी पहावा ? त्याला प्रकाश्य कोणी नसून तो प्रकाशाचाच सुकाळ आहे. माझ्या चित्सूर्य श्रीगुरुनिवृत्तिनाथांचें हें स्वरूप आहे! त्याला मी पुनः पुनः वंदन करितों. शब्दांनीं त्याची स्तुति करितां येत नाहीं. दुसरें कांहीं न जाणल्यानें श्रीगुरूला जाणतां येतें, त्याची स्तुति करूं जातां मौनाची मिठी पडते. आपण कांहीं न झालों ( विशेषत्वाला न आलों ) ह्मणजे ते आपल्याला भेटतात. अशा श्रीगुरूला मी सेवकाच्या नात्यानें स्तुतिसुमनालंकार वाहतों. हा हे श्रीगुरो ! आपण घ्यावाच व असें म्हटल्याबद्दलचा अपराध हे अद्वयानंदा ! आपण क्षमा करावा.”

एवढें मोठें व सुंदर रूपक ज्ञानेश्वरींत किंबहुना संपूर्ण वाङ्मयांत दुसरें नसल्यामुळें येथें सविस्तर दिलें आहे. रूपकाचा भाव बाजूला ठेवून त्यांतील ब्रह्मानंदसुख भोगण्याला गुरुभक्तच सर्वतोपरी योग्य आहेत. परब्रह्मस्वरूप व श्रीगुरुस्वरूप हीं भिन्न नाहींत हें ‘ ब्रह्मानंदं परमसुखदं ’ ह्या प्रसिद्ध श्लोकावरून सर्वांस माहीतच आहे. परब्रह्मस्वरूप ज्यांच्या कृपेनें प्राप्त झालें ते श्रीगुरु तेंच आहेत किंबहुना तें गुरूच्या सगुणमूर्तींत प्रगट झाल्यामुळें अधिकच सुसेव्य झालें आहे.

ज्या ज्या विशेषणांनीं श्रीगुरुला वानावे तीं तीं विशेषणें अपुरीं पडतात, कां कीं ‘दृश्य हें तुझें रूप नव्हे, तूं दृश्यद्रष्टेपणाच्या अतीत आहेस

हें जाणूनही स्तुति करावीशी वाटल्यास नवल काय ? सागर मर्यादा सांडीत नाहीं, पण चंद्रोदय झाल्यावर त्याला गप्प बसवतें काय ? 'सोमकांत निजनिर्झरीं । चंद्रा अर्ध्यादिक न करी ?' वसंताच्या भेटींत वृक्षाला पालवी फुटते ही कोणाला थांबवितां येईल ? 'तैसा तूतें जेथ मी स्मरे । तेथ मीपण मी विसरे' व स्तुति मुखानें येतेच. पोट भरल्यावर ढेकर हा यायचाच !

**तूं जी एकरसाचें लिंग । केवीं करूं गुणागुणीं विभाग ? ।**
**मोतीं फोडोनि सांधितां चांग । कीं तैसेचि भलें ? ॥ २० ॥**

श्रीगुरो ! तूं अखंडैकरस आहेस. तूं गुणवंत आहेस किंवा गुणातीत आहेस असा भेद तरी म्यां कसा करावा ? मोतीं फोडून मग सांधणें चांगलें कीं आहे तसेंच पूर्ण ठेवून त्याकडे पूर्णतेच्या दृष्टीनें पाहणें चांगलें ? म्हणून तूं आहेस तशा तुला नमन असो !

**स्तुति–कांहीं न बोलणें । पूजा–कांहीं न करणें ।**
**संन्निधी–कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ! ॥ १८–२५ ॥**

अमृतानुभवाच्या दुसऱ्या प्रकरणांत सद्गुरुस्तवनाचाच विषय आहे. सद्गुरुचीं दोन रूपें आहेत. एक वाच्य सोपाधिक सगुणरूप म्ह० निवृत्तिनाथांची मूर्ति व दुसरें लक्ष्य ब्रह्मस्वरूप. ब्रह्मस्वरूपच मूर्त झालें आहे अशी सच्छिष्याची बुद्धि असते. श्रवणमननादि साधनांना गुरु-कृपेनें सफलता येते, गुरु 'आज्ञेचा अहेवतंतु' म्ह० ब्रह्मविद्येचें मंगळसूत्र अर्थात् सौभाग्य आहेत, ते अमूर्त असून कारुण्याची मूर्ति आहेत, असें पहिल्याच ओवींत म्हटलें आहे. मायाकुंजराला मारून ते मुक्तमोत्यांचें शिष्याला भोजन देतात. त्यांच्या कृपाकटाक्षानें जीव मुक्त होतो. 'कैवल्यकनकाचिया दाना । जो न कडसी थोरसाना'- मुक्तिसुख देतांना ते लहानथोर हा भेद पाहत नाहींत. खरोखर पाहतां परब्रह्म हेंच गुरुशिष्यांचें मिष करून दोन्ही रूपानें आपणच नटून आपलें सुख आपण भोगतात !

**शिष्य आणि गुरुनाथु । हा दोही शब्दांचा अर्थु ।**
**श्रीगुरुचि परि होतु । दोहीं ठाईं ॥ ६१ ॥**

सुवर्ण आणि लेणें, चंद्र आणि चांदणें, कापूर आणि परिमळ, गूळ आणि गोडी, त्याप्रमाणें गुरुशिष्यमिषानें एक परमात्माच नांदतो. अशा अद्वयानंदाला ऐक्यभावानें वंदन करून ( ज्ञानेश्वर म्हणतात ) मी चारी वाणींच्या ऋणांतून मुक्त झालों.

## ८ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग.

ज्ञान ही इतकी पवित्र वस्तु आहे कीं देणाऱ्याघेणाऱ्यांच्या ह्म० गुरुशिष्यांच्या अंतःकरणांची निर्मलप्रेमानें पूर्ण एकरूपता झाल्याशिवाय ती देतांघेतां येत नाहीं ! ‘ सुमन आणि शुद्धमती । अनिंदक आणि अनन्यगती ’ असा शिष्य भेटला तरच त्याला गुरु आपलें गुह्यज्ञान देत असतात ( ज्ञा. ९–४० ). कैवल्यकनकाचें दान करणारे सद्गुरु व तें घेण्यास पात्र असा शिष्य अशी जोडी विरळच आढळणार. **निवृत्ति–ज्ञानेश्वर, जनार्दन–एकनाथ, रामदास–कल्याण** अत्यंत विरळ! **कृष्णार्जुनसंवाद** हा अशाच लोकोत्तर गुरुशिष्यांचा संवाद होय.

‘ अर्जुन उवाच ’ व ‘ भगवान् उवाच ’ हें मूळ गीतेंतच आहे, तेवढेच शब्द ठेवून सर्वांनीं टीका लिहिल्या आहेत. कृष्णार्जुनांची अन्योन्यप्रीति कशी गाढ व शुद्ध होती व म्हणूनच एकमेकांच्या हृदयांचे पडदे कसे विरल होत होत शेवटीं नाहींसे झाले व दोन हृदयांची एकरूपता होऊन गुरुच्या हृदयांतले संपूर्णज्ञान शिष्याच्या हृदयांत कसें उतरलें हें ज्ञानेश्वरांनींच दाखविलें आहे. कृष्णार्जुनांचें सख्य पहिलेंच होतें तें गुरुशिष्यरूपांत परिणत झालें. पहिल्या सख्याचें वर्णनही ज्ञानेश्वरांनीं बहारीचें केलें आहे (ज्ञाने० अ० ११ ओवी ५४४–५५५ ). त्यांचें सख्य एवढें गाढ असूनही अर्जुन शिष्यत्वानें शरण जाईतों भगवंतांनीं आपलें ज्ञानहृदय खुलें केलें नव्हतें. कोणी विचारल्याशिवाय ज्ञान सांगूं नये, ज्ञानाची भूक लागल्याशिवाय ज्ञानान्न चारलें तरी तें जिरत नसतें ! म्हणून शोकमोहांच्या घायापासून

मला सोडीव अशी अर्जुनानें विनवणी केली तेव्हांच देवांनीं आपलें अध्यात्मज्ञानरहस्य त्याला दिलें. असो. आपण कृष्णार्जुनांच्या म्हणजे गुरुशिष्यांच्या अन्योन्यप्रेमाचा रंग ज्ञानेश्वरांनीं कसा भरला आहे तो पाहूं- हा रंग म्हणजे त्यांच्या स्वतःच्या प्रेमवृत्तीचेंच आविष्करण होय. अत्यंत प्रेमळ, रसभरित, हृदयाचे पडदे दूर करणारें हें वर्णन आहे. अर्जुनाचें सारथ्य श्रीकृष्णानें स्वीकारलें याचें कौतुक वाटून ते प्रथमच म्हणतात: 'देखा! नवल तया प्रभूचें। अद्भुतप्रेम भक्ताचें। जे सारथ्यपण पार्थाचें। करित असे ॥ पाइक पाठीसीं घातला। आपण पुढां राहिला' (अ० १). 'न प्रतियोत्स्यामि' म्हणून अर्जुन धनुष्य खालीं टाकून स्वस्थ बसला. अर्जुन समरसूर्य होता, पण मोहानें व्याप्त झाला. 'मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांतिकवळुनु। जैसा घनपटळीं भानु आच्छादिजे.' महापर्वत वणव्यानें पेटावा तसा तो पेटला, तेव्हां कृपामृतानें सजळ असलेला तो सुनीळ महामेघ त्यावर वोळला. 'आतां तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळ निवेल। मग नवी विरूढी फुटेल। उन्मेषाची' (२-७९). तिसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं अर्जुन म्हणाला देवा 'असंदिग्धपणें खरा निर्णय दे. मी तनुमनजीवें तुला शरण आलों आहे, 'येथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची!' जन्मजन्मांन्तरीचें पुण्य फळास आल्यामुळें तूं जोडला आहेस. 'आधीच विवेकाची मोठी। वरि प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी। जाणि भक्तराज किरीटी। परिसत असे!' मग त्याची अद्भुत गोडी काय सांगावी? जें पितया वसुदेवाला, बंधु बळिभद्राला किंवा माता देवकीला सांगितलें नाहीं तें गुह्य देव अर्जुनाला सांगूं लागले! 'तूं प्रेमाचा पुतळा। भक्तीचा जिव्हाळा। मैत्रियेची चित्कळा। धनुर्धरा!' असें देवांनीं ह्मणावें व 'तूं संसारश्रांताची साउली। अनाथ जीवांची माउली। आह्मांतें कीर प्रसवली। तुझीच कृपा' असें अर्जुनानें म्हणावें! अर्जुनानें विचार करून पुसावें तें आधीच जाणून 'परचित्तलक्षणाचा राव' अशा देवानें

आधीच बोलावें व म्हणावें ‘ अर्जुना ! तूं परिससी । आणि परिसोनि अनुष्ठिसी ’ मग सांगायला आमचें काय जातें ? ‘ ज्ञात्वा मां शांति-मृच्छति ’ असें म्हणून देवांनीं अतिप्रीतीनें अर्जुनाकडे पाहिलें:—

**तें म्हणों कारुण्यरसाची वृष्टि । कीं नवया स्नेहाची सृष्टि ।**
**हें असो–नेणिजे दृष्टि । हरीची वानूं ! ॥ १७१ ॥**
**जे अमृताची वोतली । कीं प्रेमचि पिऊनि मातली ।**
**म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली । निघों नेणे ! ॥ १७२ ॥** ( अ० ५ )

श्रीकृष्णाची अर्जुनावर जी कृपादृष्टि पडली तिचें हें वर्णन आहे कां समोर बसलेल्या निवृत्तिनाथांच्या कृपादृष्टीचें हें वर्णन आहे हें ज्ञानेश्वरांनाच ठाऊक ! ‘ योगी युंजीत सततं–एकाकी यतचित्तात्मा ’— ( गीता ६–१० ) अद्वैतानुभव घेणाऱ्या योग्याची स्थिति ऐकतां ऐकतां अर्जुन अद्वयानंदांत वाहवला ! तें देवाला सहन झालें नाहीं, कां कीं आतांच ब्रह्मविद्या उघडी केली तर ‘ अर्जुन माझा पढियंता ’ ही द्वैतसुखाची गोडी कमी होईल ! यासाठीं वेगळेपणानें भक्तीचें सुख भोगतां यावें म्हणून देवानें द्वैताचा पातळ पडदा ठेवला !

**अहंभाव ययाचा जाईल । मी तेंचि हा जरी होईल ।**
**तरी मग काय कीजेल । एकलेया ! ॥ ११६ ॥**
**दिठीच पाहतां निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे ।**
**नातरी दाटूनि खेव दीजे । ऐसें कोण आहे ? ॥ ११७ ॥**

अर्जुनाचा अहंभाव जाऊन हा आतांच ब्रह्म झाला ‘ तरी मग काय कीजेल एकलेया ! ’ ज्याला पाहतांच डोळयांना समाधान होतें, किंवा ज्याच्याशीं तोंडभर बोलतां येतें, अथवा ज्याला कडकडून मिठी मारतां येतें, असें मग कोण राहील ! मनांत न मावणारी एखादी गोष्ट घडली तरी ‘ ते कवणेसी चावळावी । जरी ऐक्य जाहलें ? ’ अर्जुन हा श्रीकृष्णसुखाची ओतीव मूर्तिच होय !

**हें असो वयसेचिये सेवटीं । जैसी एकाचि विये वांझोटी ।**
**मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे ॥ ६–१२१ ॥**

देवाचा अर्जुनाविषयीं प्रेमातिशय हें मला बोलवीत आहे! 'के उपदेश केउतें झुंज' पण येथें भक्तप्रेम देवाला नाचवीत आहे! उघडच आहे– 'आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी। पिसें आणि न भुलवी। तरी ते काई?'–वेड आणि भुलवीत नाहीं असें कधीं झालें काय? देवाला भक्तिबीजाला आज सुक्षेत्र भेटलें खरें! अर्जुन हा सख्यभक्तीच्या आसनावरची 'अधिष्ठात्री देवताच' आहे. देवकीनें उदरीं वाहिला, यशोदेनें सायासें पाळिळा, पण हा शेवटीं पांडवाच्या उपेगा गेला!

**येथ अर्जुनचि विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा ।**
**जे तो त्रिभुवनीचिया दैवा । एकायतन जाहला ॥ १३० ॥**

येथें देवाला सोडून अर्जुनाचीच प्रशंसा करावी असें मला वाटतें. कां कीं, त्रिलोकीचें भाग्य जो प्रभु त्याच्या प्रेमाचा तो एकीएक विषय झाला! 'पाहां पा अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे। ते पतीहूनि न वानिजे। काय पतिव्रता?॥ १२९॥ (अ. ६ ओ. ११३ ते १३७)

अर्जुनही प्रश्न विचारून देवाच्या पोटांत शिरणारा मोठा चतुर होता. मागचा पडताळा घेऊन पुढचा आभिप्राय डोळ्यांपुढें ठवून मध्यें आपली उत्सुकता शिरवून गुरूला कसे प्रश्न करावेत, भिडेची शिव तर ओलांडं नये पण हृदयाला बिलगावें हें अर्जुनापासूनच शिकावें!

**अहो श्रीगुरूतें जै पुसावें । तैं येणें मानें सावध व्हावें ।**
**हें एकचि जाणें आघवें । सव्यसाची ॥ अ० ७–२०४ ॥**

ज्ञानविज्ञानाचे राजगुह्य अर्जुनास सांगतांना देव म्हणतात 'आमुचे जीवीचें पडो। तुझ्या जीवीं' म्हणून हें गुह्य उत्साहानें तुला सांगत आहे. तूं 'आस्थेचीच संज्ञा (मूर्ति) आहेस, व 'बोलिलिये गोष्टीची अवज्ञा। नेणसी करूं' म्हणून हें तुला सांगणार आहे. आमचें गुह्य आमच्या-

पाशीं आहेच आहे, पण आईच्या स्तनांतलें दूध अनन्य लेंकरूं भेटलें कीं जसें सार्थकीं लागतें तसें गुह्य ग्रहण करणारा अनन्य शिष्य भेटला कीं गुरूलाही आपलें परम रहस्य त्याला द्यावेंसें वाटतें:—

**वासरूं देखलियाचि साठीं । धेनु खडबडोनि मोहें उठी ।**
**मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा धरे ? ॥ अ. ११–४० ॥**

मला विश्वरूप दाखीव असें अर्जुनानें म्हणतांच 'पश्य मे पार्थ रूपाणि' म्हणतच देवानें विश्वरूप दाखवून आपल्या शिष्याचे मनोरथ पूर्ण केले. पण तें दाखवितांना केवढा उल्हास ! 'श्रीकृष्ण कृपापीयूषसजळ । आणि येरु जवळां आला वर्षाकाळ । नाना श्रीकृष्ण कोकिळ । अर्जुन वसंत ॥ नातरी चंद्रबिंब वाटोळें । देखोनि क्षीरसागर उचंबळे...' ऐसा देव प्रेमभरें उल्लसित जाहला. लक्ष्मी, श्रुति, शेष, गरुड, या सर्वांपेक्षां पांडव व त्यांतही अर्जुन देवाला किती आवडला ?

**पढविलें पांखरूं ऐसें न बोले ! । क्रीडामृगही तैसा न चले ! ।**
**कैसें दैव येथ सुरवाडलें । तें जाणों न ये ॥ १७० ॥**
**हा कोपे कीं निवांत साहे । हा रुसे-तरी बुझावीत जाये ।**
**नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ! ॥ अ. ११–१७२ ॥**
**मग ह्मणे 'प्रज्ञाकांता ! । उजवली आजि वक्तृत्वता ।**
**जे बोलाएवढा श्रोता । जोडलासी ॥ अ. १४–६४॥**
**ऐसें प्रेमरसें सुरफुरें । बोलिलें जंव यादववीरें ।**
**तंव अवधान अर्जुनाकारें । मूर्त जाहलें ॥ अ. १५–६८ ॥**
**श्रीकृष्णोक्तिसागरा । हा अगस्तीच दुसरा ।**

आकाशींचा चंद्र जसा क्षीरार्णवांत उमटावा तसा देवाच्या हृदयांतला संपूर्ण बोध अर्जुनाच्या हृदयांत उमटला, किंवा स्फटिकाच्या भिंतीवर समोरचें चित्र उमटावें तसा कृष्णार्जुन मिळून बोधच नांदूं लागला.

**दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें ।**
**तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ॥ ४५४ ॥**

**एवं आह्मी तुम्ही येथें । देखावें एका अर्थातें ।**
**सांगते पुसते येथें । दोन्ही एक ॥ १५–५५५ ॥**

असें अद्वैतांत जातां जातां द्वैतांतलें सुख नाहींसें होईल या शंकेनें ‘ जिरो हा माझ्या ठायीं वेग हा माझा ’ असें वरचेवर देव म्हणत ! येथें सांगण्यापुसण्याची सीमा झाली. श्रोतेवक्ते एकरूप होणें हीच वक्तृत्वाची पूर्णता आहे, दोघांचे दोघेपण-संवाद संपला. बोलणें खुंटलें, तरी प्रेमळांनीं एकमेकांकडे सस्नेह पाहण्यांत–एकमेकांजवळ नुसतें असण्यां-तही–मोठें सुख असतें !

**वत्स धालयाहीवरी । धेनु न वचावी दुरी ।**
**अनन्यप्रीतीची परी । ऐसी आहे ॥ ७८ ॥**
**तेणें काजेवीणही बोलावें । तें देखिलें तरी पाहावें ।**
**भोगितां चाड दुणावें । पढियंतया ठायीं ॥ ७९ ॥ (अ०१८)**

ही अनन्यप्रेमाची जात आहे. दर्पणांत रूप पाहावें तसें संवादाच्या मिषानें गुरुशिष्य व्यवहारातीत स्वात्मसुख भोगीत असतात कृष्ण व अर्जुन यांच्या अन्योन्यप्रेमांत ज्ञानेश्वरांनीं आपलें प्रेम मिसळलें व त्यांच्या ऐक्यज्ञानांत आपुला स्वानुभव ओतला! त्यांचे श्रीकृष्ण ( निवृत्तिनाथ ) सन्मुख होते व आपण अर्जुन होऊन आपलें गुरुभक्तिसुख कृष्णार्जुन-संवादांत भोगून त्यांनीं व्यक्तरूपांत आणलें. दोन हृदयें एकमेकांसमोर आलीं. अर्जुनाचें हृदय शोकमोहानें व्यापलें होतें व कृष्णाचें शोकमो-हातीत असून कोणत्याही अवस्थेंत स्वानंदसुखमय होतें. पहिलें दुस-ऱ्याचा स्वानंद व सामर्थ्य पाहून त्यापुढें नम्र झालें व हें मला दुःखमुक्त करील अशा विश्वासानें त्याकडे पाहूं लागलें. दोन हृदयें जवळ येत, संशयपटल येऊन पुन्हां दूर होत, जवळिकेचें सुख पाहून पुन्हां जवळ येत. उभयतांचें परस्पराकर्षण वाढत चाललें. पहिलें मोहानें मृदु झालें होतें, दुसरें त्याहूनही मृदु होतें पण विवेकाचा नेत्र उघडा असल्यामुळें मृदु व कठीण हे रंग त्याला वर दाखवितां

येत तरी तें अचल होतें. त्याची स्थिरता, त्याची कांति व त्याचें सुख पाहून पहिलें त्याला भाळलें, दुसऱ्यानें त्याला अधिकच जवळ केलें. दोन्ही हृदयें परस्पर-प्रेमानें द्रवलीं. हृदय हृदयाशीं बोललें. त्यांच्या गुजगोष्टी झाल्या. खुण पटली. संशयाचे पडदे विरळ होत होत होत नाहींसे झाले. बोलून दाखवितां येत नव्हतें व बोललेलें ऐकूनही आकळतां येत नव्हतें असें अजून कांहीं तरी राहिलें होतें तें देण्यासाठीं दोन्ही हृदयांची मिठी पडली ! हृदयाला हृदय मिळालें. 'हृदया हृदय एक जाहलें । ये हृदयीचें ते हृदयीं घातलें'–पण येथें एक भारी वर्म आहे. 'द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना' (अ० १८–१४२१). दीपाला दीप लावावा, तसा हा प्रसंग झाला. 'द्वैत न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना,' ह्म० श्रीकृष्णांनीं अर्जुनाला कृष्णपद देऊन त्याचें अर्जुनपण ( व्यवहापुरतें ) कायम ठेविलें. निवृत्तिपद पावून पुन्हां ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वरच राहिले. पतिस्वरूपीं सर्वस्व वाहून व स्वतःला विसरून सती पुन्हां पतिसेवेपुरती सतीत्त्वानें वेगळीच राहते. शिव होऊन भक्त शिवाला असेच भजतात. 'मी होउनि मातें । सेवणें आहे आईतें' हेंच रहस्य आहे. पांडुरंग झाल्यावरही भजन रहात नाहीं असा भक्तांचा अनुभव आहे. हें ज्ञानभक्तीचें रहस्य आहे.

## ९ समकालीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा.

ज्ञानेश्वरांच्या अलौकिकत्वाची साक्ष त्यांच्या समकालीन संतांनींही दिली आहे. त्यांच्याविषयीं सर्वांचा परमप्रेमभाव होता. ज्ञानेश्वर हे आपले गुरु, मार्गदर्शक, मायबाप आहेत, हे जीवांच्या उद्धारासाठीं अवतरलेले साक्षात् भगवान् विष्णु आहेत अशी त्यांच्याविषयीं सर्वांची प्रेमादराची बुद्धि होती. ज्ञानेश्वरीची छाप बहुतेकांच्या वाणीवर पडलेली स्पष्ट दिसतेच, पण त्यांच्या विचारांशींही या सर्वांची पूर्ण एकात्मता झालेली होती. ज्ञानेश्वर हे सर्वांच्या जीवीचा जिव्हाळा होऊन राहिले होते. त्यांचा श्रेष्ठ अधिकार सर्वांच्या प्रत्ययास आला होता व तेही

सर्वांशीं खेळीमेळीनें वागत होते. ज्ञानोत्तरभक्तीचें रहस्य सर्वांना त्यांच्याकडून मिळालें होतें व तेही सर्वांच्या सद्भावाचा, नामसंकीर्तनाचा व समागमाचा आनंद भोगीत होते. सर्व मिळून एकमय झाले होते. ज्ञानेश्वरांच्या व नामदेवांच्या भेटींतला आनंद 'तीर्थावळीच्या' अभंगांत **नामदेवांनींच** स्वमुखानें व्यक्त केला आहे.

**संसारीं आसक्त मायामोहं रत । तापत्रयसंतप्त जाले जीव ॥**
**ऐसिया पतितांचा करावा उद्धार । यालागीं अवतार तुमचा जगीं ॥**

असें नामदेव म्हणाले व ज्ञानेश्वरांनींही नामदेवांचा सप्रेम गौरव केला—

**प्रेमसुखगोडी तुजाचि फावली । वासना मावळली समूळ तुझी ॥**
**धन्य तूं संसारीं भक्तिभावशीळ । साधिलें त्वां केवळ प्रेमसुख ॥**

नामदेवांनीं आपल्या अभंगांतूनही ज्ञानेश्वरांचें, त्यांच्या चारित्र्याचें व ग्रंथरचनेचें प्रेमभरानें स्तवन केलें आहे हें आपण पाहिलेंच आहे.

नामदेवांचे गुरु **विसोबा खेचर** यांना ज्ञानेश्वरांचा अनुग्रह होता, अर्थात् ज्ञानेश्वर हे नामदेवांचे परमगुरु किंवा आजेगुरु होत. ते ह्मणतात:—

**महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥**
**विश्व तारावया आले । खेचर वंदितो पाउलें ॥ ६ ॥**

इतरत्रही त्यांनीं 'अलंकापुरीं राहिली । श्रीगुरु ज्ञानाई माउली' असेंच म्हटलें आहे. तात्पर्य गुरुशिष्य या दोघांही समकालीन व संगतीच्या थोर पुरुषांनीं ज्ञानेश्वरांना विष्णूचा अवतार म्हटलें असून ते 'विश्व तारावया आले' असें स्पष्ट म्हटलें आहे.

**विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥**
**मरोनीया जावें । बा माझ्याच्या पोटा यावें ॥ २ ॥**
**ऐसें करिं गा माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥**
**जाइन ओवाळूनी । म्हणे जन्मोजन्मीं जनी ॥ ४ ॥**

ह्या गोड अभंगावरून **जनाबाईची** अत्यंत जिव्हाळयाची ज्ञानेश्वरभक्ति दिसून येत आहे.

'ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायीं। धांवोनियां येईं दुडदुडा' असा तिनें धांवा केला असून 'नामयाची जनी म्हणावी आपुली' अशी लडिवाळपणानें विनवणी केली आहे! 'अहो सखिये साजणी मज पाडसाचीं माय' 'संत अग्रगणी' इ० प्रेमळ विशेषणांनीं जनाबाईनें 'ज्ञानाई माउलीची' कीव भाकली आहे. सारे संत ज्ञानेश्वरांना 'आई, माउली' म्हणत यावरून उभयतांच्या मनाचा कोमळपणा अद्भुत असला पाहिजे! ज्ञानेश्वरीचे लेखक **सच्चिदानंद बाबा** म्हणतात कीं ज्ञानेश्वरीच्या ओव्या 'बोध चालती कौतुकें' याप्रमाणें सहजओघाबरोबर त्यांच्या मुखांतून आल्या आहेत व त्यामुळें अगाध गीतातत्व जनांस सुगम व सुलभ झालें आहे–'गीता गंभीरगंगा। ज्ञानदेवीं प्रगट जगा.' बाबा सांगतात कीं मजवर 'ज्ञानदेवाचा प्रसाद' आहेच पण 'जीव उद्धरले उद्धरले। ज्ञानदेवीं मुक्त झाले'–असंख्य जन उद्धरले आहेत. नामदेवांचे एकनिष्ठ भक्त **परिसाभागवत** हे यात्राप्रसंगीं बरोबर होतेच, त्यांनीं 'ज्ञानेश्वरसंगतीं घडलें। तीर्थमिसें जगदुद्धार'। असें म्हटलें आहे. 'नामा तोचि देव' अशी नामदेवचरणीं निष्ठा असलेले नामदेवांचे दुसरे शिष्य **केशवदास चांगा** हे 'ज्ञानदेवो सोपानदेवो निवृत्ती। तिहींची एकी मूर्ति होऊनि ठेली' या प्रमाणें तिन्ही बंधूंच्या एकात्मतेचें सुख वानीत आहेत.

**सवंगडे निवृत्ति सोपान मुक्ताई। ज्ञानदेवापायीं भाव माझा**

हा **नरहरी सोनारांचा** सद्भाव पहावा व लगेच **सेना न्हावी** काय म्हणतात तें ऐकावें:—

**अलंकापुरवासिनी। ज्ञानाबाई मायबहिणी ॥ १ ॥**
**आम्हां लेंकुरांची चिंता। वागवावी कृपावंता ॥ २ ॥**
**करूनी विनवणी। सेना लागला चरणीं ॥ ३ ॥**

चोखामेळांचा उद्गार:—

**ज्ञानेश्वरनामें धरिला अवतार। क्षेत्र अळंकापूर इंद्रायणी ॥१॥**
**अद्वैतज्ञानाची करूनी उजरी। टीका ज्ञानेश्वरी ग्रंथ केला ॥२॥**
**अमृतअनुभवीं गुरुगम्य ज्ञान। दाऊनीयां जन उद्धरिले ॥ ३ ॥**

**बंका महारानें** ' ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर माउली'च्याच परंपरेंतला चोखोबांचा मी शिष्य आहे असें म्हटलें आहे. ( चोखोबा हे नामदेवांचे शिष्य होते ). सरते शेवटीं **भागु महारीण** काय म्हणते तें ऐकूं:—

**कृपेच्या सागरा । मायबापा ज्ञानेश्वरा ॥ १ ॥**
**जेणें पाषाण तारिले । मुखें पशु वेद बोले ॥ २ ॥**
**भिंती चालविली । ऐसी कृपाळु माउली ॥ ३ ॥**
**ऐसा कृपाळु भक्तांचा । मायबाप हा आमुचा ॥ ३ ॥**
**विश्रांतीचा ठाव । भागु म्हणे ज्ञानदेव ॥ ५ ॥**

## १० भक्तीचा जिव्हाळा व हृदयींची प्रेमलता.

ज्ञानेश्वर महाराजांचें हृदय ज्ञानीभक्ताचें असल्यामुळें निर्गुणज्ञानाशीं सगुणभक्तीची एकरूपता त्यांनीं अनेक स्थळीं फार बहारीनें दाखविली आहे. ज्ञानाचा भक्तीशीं विरोध आहे, अद्वैतज्ञानानंतर भक्तीचें काम नाहीं, अशी कित्येक विद्वानांची कल्पना आहे पण ती बरोबर नाहीं. ज्ञानेश्वर सांगतात:–' क्रिया कीर न साहे । तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें–नव्हे । बोलाऐसें ' ( अ० १८–११५१ ). ज्ञान-भक्तींच्या एकरूपतेचा सोहळा ज्ञानीभक्तच भोगूं जाणत. भक्ति खालची, ज्ञानाची पायरी वरची, ही भाषाही फोल आहे. ज्ञान व भक्ति एकच आहे.

( १ ) ' ब्रह्मणोहि प्रविष्ठाऽहं ' ह्या १४ व्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकावर टीका करितांना ज्ञानोबाराय म्हणतात. ' परी माझें आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान । तेथ मी हन साधन । गमेल हो ॥ ४०३ ॥ तरी झणीं ऐसें । तुझ्या चित्तीं पैसे । पै ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ॥४०४॥ पै मंडल आणि चंद्रमा । दोनी नव्हती सुवर्मा । तैसा **मज आणि ब्रह्मा । भेद नाहीं** ॥ ४०६ ॥ '–येथें भगवान् सांगतात: ' माझ्या उपासनेनें ब्रह्मत्वाप्रत जीव पोंचतो असें म्हटल्यानें मी ( सगुण ) ब्रह्मत्वाचें ( निर्गुणाचें ) साधन आहे असें समजूं नकोस. मंडळ आणि चंद्र यांत जसा भेद नाहीं तसा सगुणनिर्गुणांत भेद नाहीं.

(२) 'जें अक्षरांत सांपडत नाहीं, जें वाचेच्या किंवा कानाच्या आटोक्यांत येत नाहीं, जेथून शब्द मागें फिरतो, जेथें सारे संकल्प आटतात, जेथें विचाराचा वाराही शिरत नाहीं,–' जें उन्मनियेचें लावण्य। जें तुर्येचें तारुण्य। अनादि जें अगण्य। परमतत्व ॥ ३२० ॥ जें विश्वाचें मूळ। जें योगद्रुमाचें फळ। जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा ॥ ॥३२१॥ जें आकाराचा प्रांत। जो मोक्षाचा एकांत। जेथ आदि आणि अंत। विरोनि गेले ॥ ३२२ ॥ जें महाभूतांचें बीज। जें महातेजाचें तेज। एवं पार्था। जें निजस्वरूप माझें ॥ ३२३ ॥' असें जें निर्गुण परब्रह्म–पण तें पाहायचें कोठें? '**ते हे चतुर्भुज कोंभेली**। जयाची शोभा रूपासि आली। देखोनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदें' ॥३२४॥ (अ०६) नास्तिकांनीं भक्तांचा छळ केल्यामुळें जें चतुर्भुजरूपाला आलें तेंच हें–दोहींत वेगळीक नाहीं! आणखी एकच प्रसंग सांगतोंः—

(३) अर्जुनाला भगवंतांनीं दिव्य दृष्टि देऊन आपलें विश्वरूप दाखविलें तेव्हां तो म्हणाला, "देवा! तुझें विश्वरूप तूं डोळ्यांना दाखविलेस तें पाहिलें, त्यानें मन हर्षित झालें पण तुला एक विचारतोंः–' आतां ऐसी चाड जीवीं। जे तुजसी गोठी करावी। जवळिक हे भोगावी। आलिंगावयासी ॥ तें इयेंचि रूपीं करूं म्हणिजे। तरि कोणे एके मुखेसी चावळिजे?। आणि कवणा खेंव दीजे?। तुज लेख नाहीं! ॥"–तुझ्याशीं दोन गोष्टी कराव्या, किंवा तुझी संगत करावी, तुला आलिंगावें, असें मला वाटलें तर तुझ्या या अनंत रूपांपैकीं कोणत्या रूपाशीं मी संग करूं? म्हणून तुला सांगतों कीं हें पुरें आतां! मला तुझें पहिलें कृष्णरूपच पाहिजे. मौजेसाठीं सारें जग फिरून आल्यावरही मनुष्याला घर हें लागतेंच, '**तैसें चतुर्भुज रूप तुझें। तो विसावा आम्हां** ॥ आम्ही योगजात अभ्यासावें। तेणें याचि अनुभवा यावें। शास्त्रजात आलोडावे। परी सिद्धांत तो हाचि' ॥–आम्ही योगयाग करावे, वेदशास्त्रें पहावींत, दानपुण्यादिकें करावींत, या सर्वांचें अंतिम फळ तुझें चतुर्भुज रूपच होय! मला या चतुर्भुजरूपाची आवड आहे म्हणून तूं पहिल्यासारखा सगुणसाकार हो! (अ. ११ ओवी ५८८–५९८).

सगुणाची–मूर्त चतुर्भुजाची–भक्ति अतिशय मधुर आहे. देवाला सुद्धां भक्ताची भक्ति करावीशी वाटतें ! त्याशिवाय त्यालाही चैन पडत नाहीं ! ' म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आम्ही माथां मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आह्मी ॥ तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी । तयाची कीर्ति श्रवणीं । आह्मी लेवूं ॥ तो पाहवा हे डोहळे । ह्मणोनि अचक्षूसी मज डोळे । हातीचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ दोंवरी दोनी । भुजा आलों घेऊनी । आलिंगावया लागूनी । तयाचें आंग ॥ तया संगाचेनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणें घडे । किंबहुना आवडे । निरुपम ॥ पार्था गा जगीं । तेचि भक्त तोचि योगी । उत्कंठा तयांलागी । अखंड मज ॥ आह्मी तयांचें करूं ध्यान । ते आमुचे देवतार्चन । ते वांचूनि आन । गोमटें न मनूं ॥ " ( ज्ञाने० अ० १२ ओवी २२१ ते २३६ ).

देवाला जर भक्ताची इतकी आवड आहे तर भक्ताला देवाची ह्म० त्याच्या सगुणरूपाची आवड कां नसावी ? देवाला भक्ताची व भक्ताला देवाची अशी अन्योन्यप्रीति आहे. आकर्षण परस्पर असतें, व त्यांतच भक्तीचा सुखसोहळा आहे. ज्ञानेश्वरांच्या वाणीला जी अद्भुत गोडी आहे ती त्यांच्या भक्तियोगाच्या जिव्हाळ्यामुळें, सगुणाच्या निस्सीम आवडीमुळें आली आहे. त्यांना देवाचें सगुणरूप श्रीनिवृत्तिनाथांच्या रूपानें प्रत्यक्षच होतें, त्या एकाच मूर्तींत तें अमूर्तही अनुभवीत होतें ! सगुणनिर्गुण दोन्ही एक परमात्माच आहे. 'तुज सगुण ह्मणों कीं निर्गुण रे सगुण निर्गुण एक गोविंदु रे '' तेंचि भक्ति तेंचि ज्ञान । एक विठ्ठलचि जाण ' असें अभंगांतून त्यांनीं म्हटलें आहे. हीच ज्ञानभक्ति होय.

ह्या ज्ञानभक्तीलाच त्यांनीं अभेदभाक्ति, अद्वैतभक्ति, ज्ञानोत्तरभक्ति, सहजस्थिति, स्वसंवित्, पराभाक्ति, परमभक्ति इ० नांवें दिलीं आहेत. ही प्रकाशरूपा आहे. ही सर्वभूतांतर्यामी आहे, जनीजनार्दनरूपानें हीच एक नांदत आहे.

ह्या भक्तीचा आनंद अपार आहे व त्याच्या ओलाव्यानें ज्ञानेश्वरांची वाणी रंगली आहे व जाणत्यानेणत्यांनाही रंगवित आहे.

इतर टीकांतून ‘ भगवान् उवाच ’ ह्म० श्रीकृष्ण बोलले एवढेंच जेथें येते, तेथें ज्ञानेश्वर कांहीं तरी प्रेमळ विशेषण लावल्याशिवाय बोलले नाहींत, यांतही त्यांच्या भक्तीचा जिव्हाळा स्पष्ट दिसत आहे. नुस्ते भगवान् किंवा श्रीकृष्ण एवढ्या साध्या नांवानें समाधान न होतां त्यांच्या कृष्णप्रेमलहरी अशाही प्रसंगीं प्रगट झाल्या आहेत.

**ऐसें सावळेनि परब्रह्में । तेणें भक्तकामकल्पद्रुमें ।**
**बोलिलें श्रीआत्मारामें । संजयो म्हणे ॥ ज्ञाने० ९–५२१ ॥**

× × × × ×

**जो चराचर परमगुरु । चतुरचित्तचमत्कारु ।**
**तो ऐका यादवेश्वरु । बोलता जाहला ॥ १०–४७ ॥**

× × × × ×

**ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदें ।**
**बोलिले मुकुंदें । संजयो म्हणे ॥ २३९ ॥**
**राया जो निर्मळु । निष्कळंक लोककृपाळु ।**
**शरणागता स्नेहाळु । शरण्य जो ॥ २४० ॥**
**तो भक्तजनवत्सल । प्रेमळजनप्रांजळ ।**
**सत्यसेतु सकळ– । कळानिधी ॥ २४३ ॥**
**तो श्रीकृष्ण वैकुंठीचा । चक्रवर्ती निजांचा ।**
**सांगे–येरु दैवाचा । आइकत असे ॥ २४४ ॥ ( अ० १२ )**

सगुणनिर्गुण एक परमात्मा आहे असा त्यांचा अनुभव असल्यामुळें त्यांनीं भगवंताला ज्ञानेश्वरींत जागोजाग जीं विशेषणें लावलीं आहेत तीं एकवट केलीं तरी एक सुंदर ‘ कृष्णसहस्रनाम ’ तयार होईल !

**निर्गुणनामें**:––श्रीसर्वेश्वर, जगदाद्य, जगन्निवास, वेदांतवेद्य, विश्वमूर्ति, अद्वितीय, अरूप, अनाम, पुरुषोत्तम, सद्गुरु, चराचरैकभाग्य, हृषीकेश, हृदयस्थ, साक्षीभूत, आत्माराम, कैवल्यपति, सर्वरूपरूपस, सर्वदृष्टिडोळस, त्रैलोक्यपटाची घडी, आकाराची पैलथडी इ०

**सगुणनामें**:—श्रीपति, श्रीरंग, लक्ष्मीवल्लभ, महाविष्णु, विष्णु, वराह, नृसिंह, बळिबंधन, षट्गुणाधिकरण, शारंगधर, सांवळें परब्रह्म, मूर्त, अनंतनाम, सर्वज्ञ, सत्यप्रतिज्ञ, कृपानिधि, उदारांचा राणा, औदार्यांचा कुरुठा ( घर ), सर्वसुखाचा वसौटा ( आधार ), स्नेहाचें अवतरण, प्रेमळांचा प्रियोत्तम, अनन्यांचा सोयरा, अनाथांचा सखा, भक्तकामकल्पद्रुम, यादवेंद्र, पार्थसारथि, द्वारकेचा नरेंद्र, नारायण, मुकुंद, मुरारी, गोविंद, गोपाळ, हरी, राम, कृष्ण इ० इ०

सगुणनिर्गुण उभयरूप एक भगवान् श्रीकृष्ण आहेत व ज्ञानानें त्यांला ओळखणें आणि भक्तीनें भजणें ह्या दोन्ही अनुभवांचें सुख अभिन्नपणें एका हृदयाला एककालीं भोगतां येतें असा ज्ञानेश्वरांचा अनुभव होता व तो त्यांनीं आपल्या ग्रंथांत सर्वभर व्यक्त केला आहे.

ज्ञानेश्वरांच्या चरित्राला व त्यांच्या वाणीला ज्या अनेक कारणांनीं अद्भुत गोडी आली आहे त्या कारणांत ज्ञानेश्वरांच्या हृदयाचा लोकोत्तर प्रेमळपणा हें प्रमुख कारण होय. तो त्यांचा प्रेमळपणा पदोपदीं व्यक्त झाला आहे. ज्ञानेश्वरींत कर्म आहे पण कर्माची कटकट नाहीं, ज्ञान आहे पण ज्ञानाचा रुक्षपणा नाहीं, भक्ति आहे पण ती भोळ्या अज्ञानाची नाहीं; कर्म, ज्ञान व भक्ति सर्वच त्यांच्या अंतस्थ प्रेमाच्या ओलाव्यानें गोड झालीं आहेत. त्यानीं तत्वज्ञानाला प्रेमाची माधुरी आणली आहे व भक्तीला ज्ञानाचा डोळा दिला आहे. खळदुर्जनांचा दुर्गुण सांगतांना सुद्धा त्यांची वाचा शीण पावते इतका कोमळपणा त्यांच्या अंतरांत आहे. 'यांत्यधमां गतिं' म्हणतांना त्यांच्या जीवावर आलें: 'अहा सांगतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे । कटारे मुखीं केवढें । जोडले निरय' (१६–४२१). आचार्योपासन हें पद दिसतांच ज्यांची वाणी प्रस्फुरित होऊन तिच्यांतून गुरुप्रेमानें शंभर ओव्या चट्दिशीं बाहेर आल्या तीच वाणी 'गुरुभक्तिहीन' हें पद दिसतांच संकोचली! श्रीगुरुविषयीं प्रेम, कुष्णार्जुनाविषयीं प्रेम, गीतेविषयीं प्रेम, संतश्रोत्यांविषयीं प्रेम, मराठीभाषेविषयीं प्रेम, आपण रचीत असलेल्या ग्रंथा-

विषयीं प्रेम, भक्तिज्ञानवैराग्याविषयीं प्रेम—जो जो विषय ज्ञानेश्वरींत येत गेला त्यात्या विषयीं प्रेम—अशा लोकोत्तर प्रेमभावानें, कळकळीनें, कोमळपणानें, उदारमनस्कतेनें, भक्तिनम्रतेनें ज्ञानेश्वरी ग्रंथ आद्यंत इतका प्रेमरसान्वित झाला आहे कीं विश्वाच्या वाङ्मयांत ज्ञानेश्वरी-सारखा ग्रंथ ज्ञानेश्वरीच असें मला म्हणावेसें वाटतें.

अभंगांत व ज्ञानेश्वरींत कृष्णभक्तिप्रेमानें व गुरुप्रेमानें त्यांची वाणी अत्यंत रंगली आहे. त्यांच्या दृष्टांतांतही कौटुंबिकांविषयीं, पशुपक्ष्यांविषयीं व चराचरसृष्टीविषयीं अतुल प्रेम पदोपदीं वोसंडत आहे. स्वतः अत्यंत विरक्त असून अविरक्त हीनदीन पामरांविषयीं आत्मीयत्वाचें प्रेम असणें ही फार उंच कोटी होय. त्यांच्या वैराग्यांत रखरखितपणा नाहीं, व ज्ञानांत रुक्षपणा नाहीं. वेदांताचा विषय म्हटला कीं प्रायः सामान्य जनांचें डोकें उठतें, पण ज्ञानेश्वरीच्या आरंभीं 'वेदांत तो महारसु । मोदक मिरवे'—ज्ञानेशांनीं गणेशाच्या हातीं वेदांताचा गोड असा मोदक दिला आहे! अखेरच्या वरप्रसादांत 'जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो । भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ॥'—खळदुर्जनांविषयीं प्रथम प्रार्थना केली आहे! जगाला आनंदाचें आवार मांडण्याची केवढी हौस! 'स्त्रियो वैश्या स्तथा शूद्रास्तेपि यान्ति परां गति'—यावरील व्याख्यानांत 'अंत्यजांनाही' ते विसरले नाहींत. अत्यंजही सद्भक्त असतील तर परागतीला पोंचतील असें त्यांनीं स्वच्छ म्हटलें आहे. ब्राह्मणजातींत जन्मल्याशिवाय मोक्ष नाहीं असा कर्मठांचा संकुचितपणा त्यांच्यांत नव्हता. 'कुळ उत्तम नोहावे । जाति अत्यंजही व्हावें" 'ते पापयोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड' पण परमेश्वराला भजतील तर तेही तरतील. ते पापयोनि असोत, अधीत नसोत—तात्पर्य हें आहे कीं 'भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण!'

**तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तैंचि सर्वज्ञता सरे ।**
**जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ४५५ ॥**
**ह्मणोनि कुळजातिवर्ण । हें आघवेंचि गा अकारण ।**
**एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ४५६ ॥**

**तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ।**
**जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ४६० ॥**

भक्तिप्रेमाच्या जिव्हाळयामुळेंच नामदेवांच्या पहिल्या भेटींत ते एकमेकांना परम प्रीतीनें भेटले, एकमेकांच्या पायां पडले, एकमेकांना त्यांनीं हृदयाशीं धरिलें व एका हरिप्रेमांत मग्न झाले. चोखामेळा, त्याची बायको, बंका महार, असल्या प्रेमळ भक्तांनाही त्यांनीं हृदयाशीं धरिलें. 'विवेकसागर । सखा माझ्या ज्ञानेश्वर' असें ज्ञानेश्वरांच्या प्रेमानें गाणें गात असलेली जनाबाई माझ्या डोळयापुढें नेहमी उभी राहते ! ज्ञानेश्वर सर्वजातीय संतांच्या जीवींचा कलिजा झाले तें ज्ञानाच्या बळावर नाहीं तर प्रेमाच्या बळावर झाले व जगांत कोणालाही न मिळालेली 'माउली' ही पदवी त्यांना सर्वांनीं एकमतानें दिली ! 'ज्ञानेश्वर माउली' हीं दोनच अक्षरें! यांत ज्ञानेश्वरांचें विश्वप्रेम प्रगट आहे! प्रेमानें विश्व आपलें होतें. 'ज्ञानेश्वरमाउली' हा महाराष्ट्राचा महामंत्र झाला. ज्ञानाच्या अत्त्युच्य शिखरावर राहणारे ज्ञानेश्वर वारकऱ्यांच्या मेळयांत पंढरपूरच्या वाळवंटात हरिप्रेमानें गात नाचत आहेत हें किती गोड दर्शन आहे! त्यांनीं ज्ञान भक्तिप्रेमांत विरघळवून टाकलें, ज्ञानाचें रूपांतर भक्तिप्रेमांत केलें ! असलें विशुद्धप्रेम हेंच ज्ञानदेवांचें दर्शन होय. जग जगद्विलास आहे, वस्तुप्रभा आहे, प्रपंच हरिरूपानें नटला आहे, भूतमात्रीं एक हरि नांदत आहे हें 'ज्ञानेश्वरमाउलीनें' आचरून जगाला शिकविलें आहे !

संतमंडळाचे आचार्य, अध्यक्ष, व गुरु ज्ञानेश्वर हेच आहेत. सर्वांनीं एकमुखानें त्यांना तसें मानलें आहे. त्यांनीं संतसंघटना केली, सारे संत एकवटले, सर्वांना स्वसुखाचा मार्ग दाखविला. वेदपरंपरा त्यांच्या ठिकाणीं मूर्त झाली. त्यांच्या ज्ञानाला, प्रेमाला, व मूर्तीला भुलून सर्वांच्या हृदयवृत्तींनीं त्यांना संतप्रभावळीचे प्रभु म्हणून एकदम् स्वीकारलें. आपेगावीं जन्मले, नेवाश्यास ज्ञानेश्वरी रचिली, पंढरपुरास जाऊन सर्व संतमेळा भजनीं लाविला, सर्वांना अद्वयानंदामृत पाजून व सर्वांच्या आधी आळंदीस समाधि घेऊन सर्वांना चटका लावला. सारा खेळ सहा वर्षांचा ! सहा वर्षांत ह्या एका मूर्तीनें पंढरपूरच्या वाळवंटांत भागवत-

धर्माचा नगारा पिटला, वैकुंठीचें सुख भूतळावर आणलें. विठ्ठल-स्वरूपीं ज्ञानदेव व नामदेव हे एक झाल्यामुळें ह्म० ज्ञानाचें नामाशीं तादात्म्य झाल्यामुळें ‘ जाणानेणा ’ सकळांची ह्म० जाणत्या-नेणत्या सर्व लोकांची एकरूपता झाली. एवढें मोठें कार्य दुसऱ्या कोणत्याही धर्मसंस्थापकानें इतक्या अल्पावकाशांत केलेलें नाहीं. महाराष्ट्रांत मराठ्यांची राज्यें झालीं आणि गेलीं, पुन्हां होतील आणि जातील, पण लक्षावधि लोकांच्या हृदयांत आत्मसुखाची शीतल छाया पाडणारा ‘ ज्ञानेश्वरी ’ सारखा दैदीप्यमान हिरा हें महाराष्ट्राचें आणि मराठी भाषेचें चिरकालीनचें परमऐश्वर्य आहे ! विश्वाच्या वाङ्मयांत ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगसुंदर ग्रंथ झालाच नाहीं. ‘उपमा कालिदासस्य’— कालिदासाच्या उपमा, भारवीचें अर्थगौरव, व दंडीचें पदलालित्य हे संस्कृत साहित्यांतले तीनही गुण ज्ञानेश्वरांच्या दिव्य वाणींत उत्कर्षानें प्रगट झाले आहेत. त्यांत अंतरंगाचा पूर्णप्रसाद आहे व वाक्चातुर्याची सीमा आहे. कवित्वाच्या प्रसन्न ओघाबरोबर अचूक सिद्धान्त गळीं उतरविण्याचें त्यांचें कौशल्य अत्यद्भुत आहे. जी जी ओवी समोर येते ती ती द्राक्षापाक ! कठोरता कोठेंच नाहीं. तोंडांत कानांत पडल्याबरोबर समाधान ! प्रेम, प्रसाद आणि प्रतिभा तिघांचा रम्य संयोग त्यांच्याच वाणींत झालेला आहे. ज्ञानेश्वरमाउलीनें कर्म-ज्ञानउपासनांना एका रेषेंत आणून ज्ञानभक्तीच्या भजनीं लावलें आहे, सगुणनिर्गुण, द्वैताद्वैत, शैववैष्णव इत्यादि सारे भेद अद्वयानंदाच्या महासागरांत बुडवून टाकले आहेत ! जीवब्रह्मैक्य, उपास्यउपासकांचें ऐक्य, गुरुशिष्यांचे किंवा श्रोत्यावक्त्यांचें ऐक्य, साध्यसाधनांचें ऐक्य, सगुणनिर्गुणांचें ऐक्य,—सर्वत्र एकपणाचा अनुभव देणारी अमृत-निर्झरी एक ज्ञानेश्वरांचीच वाणी होय ! निर्गुणब्रह्मच सगुणविष्णु-स्वरूप, तेच रामकृष्णादि अवतार, तेच विठ्ठल मूर्तींत व व गुरुरूपांत व तेच आपलें आपण असा हा अद्वैतानंदाचा अनुभव माउलीनें जगास दिला आहे ! धर्म, तत्वज्ञान, कवित्व, साहित्य, साऱ्यांची एक मूस ! भेदाची भावना कोठेंच नाहीं.

---

# १४ भक्त नामदेव ( पूर्वार्ध )

## १ नामदेवांच्या अभंगांची गाथा.

श्रीनामदेवांच्या अभंगांचा गाथा पुण्याचे आवटे यांनीं छापला आहे. या गाथेंत सुमारें २५०० अभंग नामदेवांचे म्हणून छापले आहेत, त्यांत आपल्या नामदेवरायांचे अभंग चारपांचशें असतील, बाकीचे अभंग दुसऱ्या नामदेवांचे आहेत ! गाथ्यांत कित्येक अर्वाचीन व प्राचीन संतांचीं चरित्रें गायिलीं आहेत. हरिश्चंद्र, श्रियाळ, प्रल्हाद, ध्रुव, उपमन्यु, सुदामा, शुक आणि ह्माळसेन यांच्या कथा त्यांत आहेत, पण याशिवाय जगमित्र नागा, चोखमेळा, जनाबाई, सावता माळी, गोरोबा व राका कुंभार, कबीर, कमाल, मिराबाई, जनजसवंत, भानुदास, बोधले बोवा, नरसी मेहता, संताजी पोवार या अर्वाचीन साधुसंतांच्याही कथा त्यांत आहेत ! आतां पौराणिक कथा कोणाही नामदेवाच्या असूं शकतील, पण नरसी मेहता ( श. १३३५ ), भानुदास ( श. १४२० ), बोधले बोवा, मिराबाई, संताजी पोवार इ० मागाहून झालेल्या संतांच्या कथा शके १२७२ मध्यें समाधि घेणाऱ्या नामदेवरायांनीं गायिल्या असतील हें कोणीही कबूल करणार नाहीं. वरील पौराणिक संत व अर्वाचीन संत यांच्या कथांची धाटी व कवितेचें वळण अगदीं एक आहे व म्हणून हा संतकथा गाणारा ' विष्णुदास नामा ' अगदीं निराळाच असला पाहिजे. यानें शुकाख्यान श. १५१७ संपविल्याचें शेवटीं लिहिलें आहे. दोघेही नामदेवशिंपी व दोघेही ' विष्णुदास ' ह्म० विठलभक्त म्हणून त्यांचे अभंगांची खिचडी जुन्या हस्तलिखीत गाथ्यांतून झाली आहे व असेंच एक बाड आवट्यांच्या हातीं लागून तें जसेंच्या तसेंच त्यांनीं छापलें आहे ! विष्णुदास नामाची एक 'बावनअक्षरी' राजवाडे यांनीं छापली आहे तींत त्यानें नामदेवरायांना नमन केलें आहे. ' नाम-

देवाचें पवित्र । नाम उच्चारी अखंडित । नामें होय हरिहरभक्त । नाम प्रिय गोविंदा '–विष्णुदासाचा नामा ह्म० विष्णुदास नामक सत्पुरुषाचा शिष्य नामा अशा अर्थाचें याचे दोन अभंग सांपडले आहेत. कपोताख्यानांत विष्णुदासनामा यानें आपल्या गुरूचें नांव 'रामभारथी' असें दिलें आहे ! तात्पर्य हे दोन नामदेव भिन्न आहेत. या दोहोंशिवाय तिसरा एक नामदेव आहे आणि तो महानुभावपंथीय व नामदेवरायांचा समकालीन असून त्यानें महाभारतावर ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे. महाभारतावर ओवीबद्ध ग्रंथ लिहिणारा नामदेव महानुभावपंथीय होता कीं काय याविषयीं शंका आहे. हाही आपणास 'विष्णुदासनामा' म्हणवितो ! याच्या भारताचें कर्णपर्व हरिभाऊ आपटे यांस मिळालें होतें, सभापव देशपांडे यांजपाशीं आहे व आदिपर्व आणि भीष्मपर्वाच्या पुढचीं कांहीं पर्वें मी स्वतः ३० वर्षांपूर्वीं पंढरपुरास पाहिलीं होतीं. हा महाभारतकर्ता नामदेव जर महानुभावीय ग्रंथकार असता तर त्याच्या पर्वांना पंढरपूरच्या जुन्या संग्रहांत स्थान मिळणें कठिण होतें; आणि देशपांडे तर आपल्या 'महानुभावीय मराठी वाङ्मयांत' म्हणतात कीं "विष्णुदासनामा ज्यानें भागवतावर ओव्या केल्या आहेत त्याचे मानभावी लिपींतही ग्रंथ असून त्यास शके ११९८ मध्यें महानुभाव दामोदर पंडित यानें उपदेश (महानुभाव पंथाची दीक्षा) दिला. यानें भारतावरही ओवीबद्ध काव्य केलें आहे." असो. भारत लिहिणाराला नामदेव महानुभाव असो कीं नसो, किंवा दोन्ही नामदेवांनीं दोन ओवीबद्ध भारतें लिहिलीं असोत, भारतकथा लिहिणाऱ्या नामदेवाहून व वर उल्लेखिलेल्या संतचरित्रें गाणाऱ्या नामदेवाहून आपले नामदेवराय ह्म० ज्ञानेश्वरमंडळांतले नामदेवराय अगदीं भिन्न आहेत हें वाचकांनीं विसरूं नये. आवटे यांच्या गाथ्यांत अभंगांची फार खिचडी झाली आहे, तथापि तारतम्यबुद्धीचा कसोशीनें शक्य तितका उपयोग करून नामदेवरायांचे खास अभंग कोणते असावेत हें मनाशीं ठरवून मी नामदेवरायाविषयीं चार शब्द लिहित आहें.

## २ नामदेव.

आपल्या नामदेवांचे पूर्वज यदुशेट हे शिंपी जातींतील असून त्यांचा धंदा कापड विकण्याचा व कपडे शिवण्याचा असे. यदुशेट यांच्या वेळेपासून त्यांच्या घराण्यांत पंढरीच्या विठ्ठलाची उपासना चालत होती व त्याचें घराणें वारकऱ्यांत मोडत असे. यदुशेटच्या घराण्यांतील पांचवा पुरुष दामाशेट हा नामदेवांचा जनक होय. कल्याणीचा शिंपी गोमा व त्याची स्त्री उमा यांस एक गोणाईनामक कन्या होती ती दामाशेटीस दिली होती:—

**नरसी बामणीचा दामाशेट शिंपी । केशिराजरूपीं मग्न असे ॥**
**गोणाई दामशेटी जालें पाणिग्रहण । संसारीं असोन नरसी गांवीं ॥**

नरसी ब्राह्मणी हें गांव मोगलाईत परभणी जिल्ह्यांत आहे. दामाशेट गोणाईसह सुखानें संसार करीत असतांना त्यास दोन अपत्यें झालीं. पहिली—कन्या आऊबाई व दुसरा—पुत्र नामदेव. गोणाई शके ११९२ प्रभवसंवत्सरीं कार्तिक शु. ११ रविवारीं सूर्योदयसमयीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला त्याचें नांव नामदेव. हे अयोनिसंभव होतें असें भक्तविजयकार महिपति म्हणतात. नामदेवांचा म्हणून जो एक अभंग प्रसिद्ध आहे त्यांत:—

**अधिक ब्याण्णव गणित अकराशतें । उगवतां आदित्य रोहिणीसी ॥**
**शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रमोद संवत्सर शालिवाहनशक ॥**
**प्रसवली माता मज मळमूत्रीं ।**

असें सांगितलें असून जनाबाईनें ‘ गोणाईच्या पोटा आले नामदेव ’ असें म्हटलें आहे. नामदेवाकडून शतकोटी अभंग होऊन ते ८० वर्षे वांचतील असें जन्मपत्र बाबाजी नामक ब्राह्मणानें केलें होतें असें सांगतात. नामदेव हे प्रल्हादासारखे उपजत भगवद्भक्त होते, त्यांना बालभागवत म्हणत म्हणून व कालिदासानें ‘ न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ’—प्रभातरल ज्योतीचा पृथ्वीशीं संबंध नसतो असें जें

म्हटलें आहे त्याचा लाक्षणिक अर्थ घेतला तर महिपतींचें म्हणणें निरर्थक नाहीं असें वाटतें. घरोघरीं आईबाप आहेत व घरोघरीं मुलें होतात, पण नामदेवासारखा ध्रुवप्रल्हादांच्या कोटीचा—ज्याची देवाविषयीं 'नैसर्गिकी रतिः' म्ह० स्वभावसिद्ध आवड आहे असा उपजतभक्त सामान्य जीवांप्रमाणें 'योनिसंभव' आहे असें म्हणतांना महिपतींची वाणी चांचरली असली तर त्यांत फारसें नवल वाटायला नको. ती भक्तिप्रेमानें असें वदली असेंच म्हटलें पाहिजे. दामाशेटजींच्या अंगाखांद्यावर खेळतांना 'श्रीविठ्ठल श्रीविठ्ठल' असा नामघोष नामदेवाच्या कानांवर पडत असे व मला वाटतें हाच त्याला मंत्रोपदेश झाला. शिक्षकांनीं नामदेवाला 'ॐ नमः सिद्धं' हा पहिला पाठ दिला तेव्हां 'ॐ' म्हणूनच नामदेवांनीं थांबावें व 'न' म्हणूंच नये याचें वर्म गुरुजीस कळलें नसलें तरी प्रणवरूप विठ्ठलास कळलें खास ! ह्या पहिल्याच पाठांत 'न' काराचा उच्चार त्या बालभागवताच्या तोंडीं येईना ! गुरूनीं ताडन करीन म्हणतांच देहाभिमानाचें ताडन अवश्यच आहे असें या बालभागवतास वाटावें ! त्यानें आपल्या धुळपाटीवर 'विठ्ठल विठ्ठल' हींच अक्षरें लिहून त्या अक्षर परब्रह्मास आळवावें. विठ्ठलाची मूर्ति, विठ्ठलाचें नाम, विठ्ठलाचा जयघोष, विठ्ठलनगरी पंढरी—यांचा निदिध्यास घेऊन नामदेव विलठ्ठलमय झाले. विठ्ठलमूर्ति ही सचेतन आहे, हाच खरा देव आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा. वयाच्या आठव्या वर्षीं नामदेवाच्या हातचा नैवेद्य देवानें खाल्ला, नामदेवाच्या हातचें दूध देव पिऊं लागले. नामदेवाचा निग्रहच बलवान्. 'या वाटींतलें दूध न प्याल तर मी जन्मांत दुग्धप्राशन करणार नाहीं' असा त्याचा बालहट्ट पाहून देवाला पाषाणाची खोळ बाजूला ठेवून दुध प्यावेंच लागलें ! नामदेवाला जी जी वस्तु त्याच्या आईबापांनीं द्यावी ती ती त्यानें विठ्ठलास अर्पण करावी. त्याला ही थोर आत्मनिवेदनभक्ति बाल्यांतच घडली. नवव्या वर्षींच नामदेव पंढरीच्या वारकऱ्यांत बालभागवत म्हणून गाजून राहिले. पुढें लौकरच नामदेवांचें गोविंदशेट सदावर्ते

यांची कन्या राजाई इजबरोबर लग्न झालें. नामदेवाच्या वयाबरोबर त्याच्या भक्तीचा उत्कर्ष होऊं लागला. राजाई वयांत आली. नामदेवांचें लक्ष गृहप्रपंचाकडे मुळांतच नव्हतें कांहीं व्यापारटापार करावा, चार पैसे कमवावेत, चारचौघांप्रमाणें संसार प्रतिष्ठेनें थाटावा, असें त्याच्या कधीं मनांतच येत नसे. त्याचें प्रपंचाकडे पूर्ण दुर्लक्ष होतें. याबद्दल गोणाई व राजाई या दोघी सासूसुनांनीं वारंवार कुरकुर करावी रागवावें, बोलावें, भांडावें, देवाकडे गाऱ्हाणें न्यावें, असा प्रकार चालू राहिला. गोणाईची तक्रारः—

**गोणाई म्हणे नाम्या सोडी देवपिसें । बुडविसी कैसें घर बळें ॥**
**शिवण्या टिपण्या घातलेसें पाणी । न पाहसी परतोनी घराकडे ॥**
**कैसी तुझी भक्ती लौकिकावेगळी । संसाराची होळी केली नाम्या ॥**
**अन्नेसीं उपवासी बैसलासी येथें । काय देईल तूतें विठ्ठल हा ॥**

यावर नामदेवाचें उत्तरः—

**आह्मां कीर्तन कुळवाडी । आणिक नाहीं उदीमजोडी ॥**
**वाचा पिकली पिकली । हरिनामाची वरो झाली ॥**
**एकादशीचे दिवशीं । जाल्या कैवल्याच्या राशी ॥**
**आजि आवंतण संतांचें । जेवण जेऊं हरिनामाचें ॥**
**आह्मी जेवलों जेवलों । नामामृतें पूर्ण धालों ॥**
**नामा केशवाचा म्हणे । माझें हृदयीं नारायण ॥**

राजाईच्याही अशाच तक्रारी व नामदेवाचीं अशींच उत्तरें—हें असेंच कांहीं काळ चाललें होतें. नामदेवाची पंढरीच्या भक्तमंडळांत मोठी ख्याती झाली. पंढरीच्या लोभामुळें आपला नरसीबामणी हा गांव सोडून नामदेव पंढरपुरासच कायम येऊन राहिले. गोरोबाकाका, सावंतामाळी, वगैरे भक्तांच्या त्यांच्या भेटीगांठी होऊन स्नेह जमला. नामदेव पंढरीस भक्तांचे अग्रणी ह्मणून लौकरच सर्वप्रिय झाले. त्यांची तन्मयता आणणारीं प्रेमळ भजनें व कीर्तनें सुरू झालीं.

नामदेवांचा संसार संसारासारखाच चालू झाला ! त्यांचें लग्न वयाच्या ९ व्या वर्षी झालें. कालक्रमानें त्यांना चार मुलगे व चार मुली झाल्या. मुलांचीं लग्नें होऊन सुना घरीं आल्या–त्यांच्या घरांतल्या मंडळीबद्दल जनाबाईचा एक अभंग आहे तो असा:—

**गोणाई राजाई दोघी सासूसुना । दामा नामा जाणा बाप लेक १**
**नारा विठा गोंदा महादा चौघे पुत्र । जन्मले पवित्र त्याच्या वंशीं २**
**लाडाई गोडाई येसा साखराई । चौघी सुना पाहीं नामयाच्या ३**
**लिंबाई ती लेकी आऊताई बहिणी । वेडी दासी जनी नामयाची ४**

दामाशेटी–गोणाई

नामदेव–राजाई आऊताई

नारा-लाडाई विठा-गोडाई गोंदा-येसाई महादा-साखराई लिंबाई.

जनाबाईनें दुसऱ्या एका अभंगांत म्हटलें आहे कीं नामदेव–राजाई, त्याचे आईबाप चौघे पुत्र, चौघी सुना, आऊबाई व लिंबाई असे 'चौदा-जण स्मरती हरी ' पंधरावी जनाबाई. नामदेवांचें कुटुंब याप्रमाणें १५ माणसांचें होतें. नामदेवांची हयात ८० वर्षांची होती. पंढरीच्या भागवतधर्माचा प्रसार करण्यांत त्यांच्या आयुष्याचें पूर्वार्ध गेलें, उत्तरार्धांत भक्तिमार्गाचा प्रसार त्यांनीं पंजाबांत केला.

## ३ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति.

संत प्राय: आषाढीकार्तिकीच्या सोहळयासाठी आपापल्या गांवांहून पंढरीस येत व सोहळयाचा आनंद स्वतः भोगून व त्यांत आपापल्या प्रेमशिदोऱ्यांची भर घालून तो चिंतनानें वर्षभर भोगण्यासाठी परत घरीं जात. नामदेवांचें तसें नव्हतें. ते पंढरीस राहण्यासच आले होते, त्यामुळें त्यांना ती चंद्रभागा, ते पुंडलिक, ते विठ्ठलराय, ते निरंतर येणाजाणारे वैष्णवभक्त, तीं महाद्वारीं व वाळवंटीं नित्यनवीं चालणारीं

कथाकीर्तनें यामुळें त्यांना पंढरीचें व विठ्ठलाचें अत्यंतात्यंत प्रेम वाटे. विठ्ठलाचें त्यांना पिसें लागलें होतें, अंतर्बाह्य देव त्यांच्याशीं खेळत होता. 'पंढरीपेठेचा शेट्या पुंडलीक भक्त' याच्यासाठी 'गोकुळीचा देव' ह्म० 'द्वारकेचा राणा' पंढरीस येऊन राहिला व त्याबरोबर पृथ्वी-वरचीं सकळ तीर्थक्षेत्रें व सर्वदेव या देवादिदेवाच्या सन्निध येऊन राहिले आहेत अशी त्यांची दृढ श्रद्धा होती व यामुळें पंढरीसारखें क्षेत्र व चंद्रभागेसारखें तीर्थ या त्रिभुवनांत नाहीं, कटीवर ज्याचे कर नाहींत व जो विटेवर उभा नाहीं त्याला मी देवच म्हणणार नाहीं, अशी त्यांची एकांतभक्ति होती, व ही ध्यानाच्या अभ्यासाला उपकारक आहे. नामदेव ध्यानयोगी होते.

**तृण पक्षी सर्व जाले ऋषि देव । पाहती वैभव पंढरीचें ॥**
**टाळनृत्यघोष पताकांचे भार । गर्जे भीमातीर सर्वकाळ ॥ ४ ॥**

येथें 'विठ्ठलनामें घेणें विठ्ठलनामें देणें । विठ्ठलनामें करणें सकळ काम' याप्रमाणें विठ्ठलनामसुखाची देवघेव चालते व संसारांतील सर्व कर्में नामस्मरणपूर्वक करण्याचा धडा मिळतो. 'गुजगौप्य जीवींचें विठ्ठला सांगावें' म्हणजे हा देव आपल्या भक्ताचे सर्व कोड पुरवितो. येथें 'अनंता तीर्थांचें माहेर व अनंता रूपांचें सार' असा 'सकला आदिदेव' कटीं कर ठेवून भक्तांची वाट पाहत उभा आहे व 'जे धरिती पंढरीचा नेम' ( वारी ) त्यांना हा पुरुषोत्तम जीवेंभावें विसंबत नाहीं. 'एवढा ब्रह्मानंद कैचा आणिका ठायीं ?' म्हणून 'पंढरीची सरी येका नाहीं.' पंढरीक्षेत्र देवानें आपल्या सुदर्शनावर वसविलें आहे. 'आषाढी कार्तिकी कधीं येते अशी पंढरीकडे दृष्टि ठेवून जे विठोबा-रायाच्या भेटीसाठीं उत्कंठित असतात 'त्यांची चक्रपाणी वाट पाहे.' विटेवर त्रिभुवनीचा स्वामी उभा आहे 'अरूप रूपासी आलें । परब्रह्म ठसावलें । भक्ता पुंडलिका फावलें । गौप्य जालें प्रगट' असा वेदश्रुतींसी कानडा ( अगम्य, दुर्लभ ) देव पंढरीस उघडा ( प्रगट ) झाला आहे. त्याचें रूप गोड, त्याचें नाम गोड, त्याचें यश गोड, त्याचें सर्वच गोड !

ऐसें तीर्थ कोण्ही दाखवा गोमटें । जेथें प्रत्यक्ष भेटे परब्रह्म ३
ऐसें तीर्थ कोण्ही दाखवा साजिरें । सदा प्रेमपूर वोसंडत ४
ऐसें तीर्थ कोण्ही दाखवा सुलभ । जेथें समारंभ हरिकथेचा ५
नामा म्हणे आम्हां दीनांचे माहेर । धन्य पंढरपूर गीतीं गातां ७

१

पंढरीचें सुख जिहीं अनुभविलें । भावें अनुसरलें विठ्ठलपायीं ॥१॥
कायावाचामनें रंगलें चरणीं । धरियेला मनीं पांडुरंगा ॥ २ ॥
नामाचेनि बळें उडविलीं साधनें । तोडिलीं बंधनें संसाराचीं ॥३॥
मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं । हिंडे वाळवंटीं दीनरूप ॥ ४ ॥
हर्षें निर्भर नामा नाचे महाद्वारीं । कीर्ती चराचरीं वर्णीतसे ॥ ५ ॥

२

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥
हेंचि मज घडो जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥ २ ॥
मुखीं नाम सदा संतांचें दरुशन । जनींजनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥
नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ ४ ॥

३

शास्त्राचें हें सार वेदाचें गव्हर । उतारावया पार आणिक नाहीं १
विठ्ठलविठ्ठल म्हणा उघडामंत्र जाणा।कळिकाळ अंकणा होइल तुम्हा।
सिद्धींचें हें सार मुक्तीचें माहेर । उतरावया पार दुजें नाहीं ॥ ३ ॥

४

पंढरीस जावें जीवन्मुक्त व्हावें । विठ्ठला भेटावें जिवलगा ॥ १ ॥
कायावाचामन चरणीं ठेवावें । प्रेमसुख घ्यावें सर्वकाळ । ।२ ॥
सुखाचें साजिरें श्रीमुख पाहावें । जीवें उतरावें निंबलोण ॥ ३ ॥
बाहेरभीतरीं कैवल्य आघवें । वाचे न बोलवे ब्रह्मानंद ॥ ४ ॥
चिरंजीव नामा कंठीं धरी प्राण । करी तुझें ध्यान अहर्निशी ॥ ५ ॥

* * * *

४

कस्तुरीचा टिळा रेखिला कपाळीं। तेणें ते शोभली मूर्ति बरी ॥१॥
श्रीवत्सलांछन वैजयंती गळा। नेसला पाटोळा तेजःपुंज ॥ २ ॥
पाउलें समान विटेवरी नीट। नामा ह्मणे भेट घ्यावी त्याची ॥३॥

* * * *

न लगे वैकुंठ न वांछूं कैलास। सर्वस्वाची आस देवापायीं ॥
न लगे संतती नलगे धनमान। पुरें एक ध्यान विठोबाचें ॥

* * * *

गोवर्धनधर गोपीमनोहर। भक्तकरुणाकर पांडुरंग ॥
तूंचि माझा वक्ता तूंचि माझा श्रोता। तूंचि देता घेता प्रेमसुख ॥

* * * *

आपुली पदवी सेवकासी द्यावी। तो एक गोसावी पांडुरंग ॥ १ ॥
भावाचा आळुका भुलला भक्तिसुखा। सांपडला फुका नामासाठीं २
प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी। क्षणैक न सोडी संग त्याचा ३
नामा ह्मणे आम्हां दीनांचें माहेर। तो एक उदार पांडुरंग ॥ ४ ॥

* * * *

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा। पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥१॥
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं। नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥२॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस। तोडीं भवपाश पांडुरंगे ॥ ३ ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज। चारा घालीं मज पांडुरंगे ॥ ४ ॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ। मागें पुढें उभा सांभाळिसी ॥५॥

* * * *

डोळे शिणले पाहतां पाहतां वाटुली। अवस्था दाटली हृदयामाजी॥१॥
तूं माझी जननी सरसिये सांगातिणी। विठले धांवोनि क्षेम देईं॥२॥

तूं अवकाश मी भूमिका, तूं लिंग मी साळुंका (शिवलिंगाची वाटोळी बैठक ), तूं समुद्र मी चंद्रिका, तूं वृंदावन मी चिरी ( खालचा पाषाण ),

तूं तुळशी मी मंजिरी, तूं चांद मी चांदणी, तूं नाग मी पद्मिणी, तूं कृष्ण मी रुक्मिणी,—

**नामा ह्मणे पुरुषोत्तमा । स्वयें जडलों तुझ्या प्रेमा ।**
**तूं कुडी मी आत्मा । स्वयें दोन्ही ॥ ६ ॥**

या प्रेमळवर्णनांत एक रहस्य आहे. महाराष्ट्रीय संत हे केव्हांही द्वैती नव्हत, अद्वैतभक्तीचें पूर्णसुख भोगणारे आहेत. देवा 'तूं माझी जननी' मजकडे वत्सलतेनें पहा, अथवा 'सरसिये सांगातिणी' श्रेष्ठ मैत्रीण ह्म० बरोबरीची मैत्रीण म्हणून पहा–'सयुजौ सखायौ' पण हें द्वैतसुख भोगण्यापुरतें आहे, वस्तुतः 'स्वयें दोन्ही!' तूं आणि मी (देव आणि भक्त) दोन्ही मिळून तूंच आहेस!

**गाऊं नाचूं आह्मी आनंदें कीर्तनीं । भक्तिमुक्ति दोन्ही भोगूं देवा ॥३॥**
**वृत्तिसहित मन बुडे प्रेमडोहीं । नाठवती देहीं देहभाव ॥ ४ ॥**
**सगुणीं निर्गुणीं एकचि आवडी । मनें दिली बुडी चिदाकाशीं ॥५॥**
**नामा ह्मणे देवा ऐसी मज सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ॥६॥**

भक्ति आणि मुक्ति, सगुण आणि निर्गुण दोन्ही एकरूप आहेत. चिदाकाशीं बुडी दिल्यावरही सेवाच मागायची ह्म० पूर्ण अद्वैतज्ञान ठसावल्यावरही सेवेची गोडी ठेवायची. 'निर्गुणीचें वैभव आलें भक्तिमिषें। तें हें विठ्ठलवेषें ठसावलें.' हें विठ्ठलस्वरूप 'चोविसांवेगळें सहस्राआगळें' ह्म० प्रकृतीच्या पलीकडचें (ज्ञाने० अ० १० ओवी १५० पहा) व अनंतनामातीत म्हणजे नामरूपातीत आहे, जेथें 'वेदा मौन पडे' व 'पुराणा कुवाडें' (दुर्बोध) असे जें हें विठ्ठलस्वरूप अगदी तेंचः—

**भावाचें आळुकें भुललें भक्तिसुखें । दिधलें पुंडलीकें साधोनीयां ५**
**नामा म्हणे आह्मां अनाथालागुनी । निडारले नयनीं वाट पाहे ६**

ज्ञानोत्तरभक्तीची आणखी मौज पहाः—

**ब्रह्म अविनाश आनंदघन । याहूनि चरण गोड तुझे ॥ १ ॥**
**परात्पर वस्तु जे कां अपरंपार । तियेचा साक्षात्कार पाय तुझे ॥२॥**

**मीपणासहित आनंदीं बुडालें। न निघे कांहीं केलें चित्त माझें ॥३॥**
**नामा म्हणे एक उरलीसे वासना। स्वामीसेवकपणा देई देवा ॥४॥**

नामदेवराय सगुणभक्त मूळचेच होते व या सगुणभक्तीच्या सुखार्थच ज्ञानेश्वरमंडळ त्यांजकडे ओढलें गेलें होतें, पण त्यांच्या भोळ्या विशुद्ध-भक्तीला ज्ञानाची जोड मिळून ज्ञानोत्तरभक्तीचें रहस्य त्यांना या मंडळाच्या संगतीनें व गुरूच्या उपदेशानें कळलें. ' संतसंगें मज पालट हा झाला ' असें त्यांचें वचन आहे.

यासाठीं हा देव ' संतसंगतीं साधावा । धरूनि हृदयीं बांधावा !' संतसंगतींत गोड प्रेमसुख मिळतें, त्यापुढें मोक्षसुखही फिकें वाटावें हा सकलसंतांचा अनुभव आहे, यावर नामदेवांचा अभंग पहाः—

**पाहतां तुझे चरण हरली भवव्यथा । पुढती एक चिंता वाटतसे ॥**
**झणीं मुक्तिपद देसी पांडुरंगा। मग या संतसंगा कोठें पाहूं ! ॥**
**मग हे पंढरी आनंदसोहळा । कवणाचे डोळां पाहूं देवा ! ॥**
**मग हे हरिकथा अमृतसंजीवनी । कवणाचे श्रवणीं ऐकों देवा ? ॥**
**नामा म्हणे मज पंढरीची सोय । अनंतजन्म होय याचिलागीं ॥**

पंढरीचें अनुपम सुख व संतसमागमाचा अपूर्व आनंद यासाठीं अनंत जन्म होऊंदे, पण मुक्तपद देऊं नकोस ( तुकोबाही ' मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ' असें म्हणतात ). विठ्ठलाचें अनिवार प्रेम नामदेवांच्या हृदयांत खेळत होतें व त्यांचा भक्तीचा निर्धारही अढळ होता. त्यांनीं इहलोकीचे सर्व भोग सोडले तेव्हां देव जोडलाः—' भोगावरी आम्ही घातला पाषाण ' भोगत्यागावांचून ह्म० वैराग्यावांचून परमार्थ कोठें कोणी कधी साधला आहे? अशाश्वताविषयीं त्यागबुद्धि ठेवल्यानेंच अविनाश देव हातीं येतो, त्याचें भक्तिसुख पूर्ण अनुभवितां येतें. भक्तिसुख, ब्रह्मानंद, दिव्य निरपेक्षप्रेम, या सर्वांचा अर्थ एकच आहे. तो प्रेमठेवा हातीं यावा व अखंड टिकावा याच एका

योगक्षेमाची भक्तांना गरज असते. नामदेवांची भक्ति अशी शुद्ध स्वरूपाची व अत्युत्कट होती.

देवाकडे आईचें आणि बापाचें अशीं दोन्हीं नातीं आहेत. मी जगाचा पिता आहे, माता आहे, धाता व पितामहही आहे असें देवच गीतेंत बोलले आहेत. यांत मातेचें नातें अधिक जवळिकेचें, प्रेमाचें, सलगीचें असल्यामुळें नामदेवादि भक्त या नात्यानेंच देवाकडे पाहतात व 'विठाई माउली 'ची करुणा भाकतातः—' तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा। पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ' ' विठ्ठल माउली कृपेची साउली । आठवितां घाली प्रेमपान्हा ' ' नेत्र तान्हेले पाजी पाणी । पंढरपुरचे मायबाहिणी ' ' तूं मायमाउली ह्मणोनि आस केली । विठ्ठले पाहिली वास तूझी ' ' रंगा येई वो विठाई सुंदरी । पाउलें गोजिरीं कै देखेन ' इ. करुणापर अभंगांत देवाला दयेचा पाझर फुटावा असीच नामदेवांची आस आहे. बाळकृष्णावरील पुढील गोड अभंग पहा:—

**मुक्ताफळ नथ नाकीं । चरणीं ल्याली वाळेवाकी ।**
**पीतांबरें अंग झांकी । कृष्णम्मा माझी ॥ १ ॥**
**गाईपाठीं लागली । पळतां नाहीं भागली ।**
**मायबहीण चांगली । कृष्णम्मा माझी ॥ २ ॥**
**देहुडा पाउलीं । उभी माझी माउली ।**
**विश्रांतीची साउली । कृष्णम्मा माझी ॥ ३ ॥**
**उभी नीट विटेवरी । शोभे भीवरेचे तीरीं ।**
**नामयाची कैवारी । कृष्णम्मा माझी ॥ ४ ॥**

विठ्ठलावर गाईचें रूपक केलेला त्यांचा एक अभंग प्रसिद्ध आहे. त्याचे दोन चरण पहा:—

**वेणुनादीं चरे पाणी पी भीवरे । ते धेनु हुंबरे भक्तांलागी १**
**वाणते सांवळी नाम ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें २**

प्राप्य वस्तु प्राप्त झाल्याच्या खुणाही नामदेवांच्या अभंगांत सांपडतात, व कोठें कोठें योगाचीही त्यांना ओळख झाली होती असें स्पष्ट दिसतें. 'सत्य नित्य युक्त शुद्धबुद्ध मुक्त । कारणरहित निरंजन' असें परब्रह्म–श्रुति जेथून 'नेति नेति' म्हणून परतल्या–तें 'आम्हां गीतीं गातां सांपडलें! पांडुरंगाच्या ध्यानानें व माझ्या भावबळानें 'आशा तृष्णा माझ्या मावळल्या देहीं' आणि देहबुद्धि पार लयाला गेली. पण हें निर्गुण ज्ञान होण्यास अभ्यास कोणता केलांत म्हणाल तर नामदेव सांगतात 'सावळी श्रीमूर्ति हृदयीं बिंबली' म्हणून ही कृतकृत्यता प्राप्त झाली. तात्पर्य सगुणाच्या ध्यानानें निर्गुणबोध झाला किंबहुना सगुणनिर्गुणातीत परब्रह्म अंगासी आलें. याप्रमाणें त्यांनीं आपल्याला **ध्यानयोगानें प्राप्तव्य प्राप्त** झालें असें स्पष्ट सांगितलें आहे. "**सांवळे कृष्णरूप' ध्यानीं ध्यातां चित्तचैतन्यांची समरसता झाली**, तें सुख मी वाचेनें काय सांगूं असें ते म्हणतात. गुरूंनी कानीं पेरिलें तें नयनीं उगवलें, 'डोळयांतील बाहुली माझी विठाई झाली' व 'घनानंद मूर्ति ध्यानासी आली !' देहमंदिराभीतरी:—

**ध्यानीं पहुडला सांवळा । जवळी नारी बारा सोळा ।**
**विंजणें वारिती सकळा । सोहंशब्द जागरणी ॥ ३ ॥**
**धिं धिं तुरे वाजती । अनुहतध्वनी गर्जती ।**
**तेथें निद्रा ना सुषुप्ती । चंद्रसूर्य मावळले ॥ ४ ॥**
**मनपवना नाहीं भेद । तयाठायीं हा गोविंद ।**
**तेथें खुंटला अनुवाद । वेदश्रुती आटल्या ॥ ५ ॥**
**म्हणे विष्णुदास नामा । जन्ममरण नाहीं आम्हां ।**
**कृपा केली मेघश्यामा । संतसंगें तारिलों ॥ ६ ॥**

## प्रेमाचा रुसवा !

नामदेवांनीं कोठें कोठें लडिवाळपणा व प्रेमाचा रुसवा केला आहे. प्रेमाशिवाय कोणी कुणावर रुसत नाहीं, व रुसल्यास त्याला किंमत नाहीं !

**पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।**
**पतीतपावन न होसि ह्मणुनी जातों माघारा ॥ १ ॥**
**घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार ।**
**काय देवा ! रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥**
**सोडीं देवा ! ब्रीद आतां न होसि अभिमानी ।**
**पतीतपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ॥ ३ ॥**

नामदेवासारख्या एकांतिक भक्ताच्या रुसव्यांतही प्रेमामुळें मोठी गोडी येते, रुसव्याचा परिणाम प्रेमोद्रेकांत होतो. 'रुसलासे नामा देवासी न बोले' याचा सहज परिणाम देवानें 'करें कुर्वाळिलें वदन' हाच व्हायचा ! रुसावें कीं प्रेमविषयाला समजाविशी करावीच लागते ! पण भलत्याला रुसतांच येत नाहीं ! रागावणें, रुसणें, पाठ फिरवणें, वर्मी किंवा छद्मीं लागेल असें प्रेमाचें बोलणें, अभिमानाचें बोलणें हे सर्व प्रेमाचेच प्रकार आहेत व प्रेम असलें तरच हे गोड वाटतात !

**आह्मी शरणागतीं केलासे सरता । येरवीं या अनंता कोण जाणे ! ॥**

खरेंच आहे. भक्तांनींच देवाला उभें केलें आहे. आधीं भक्त मग देव !

**वेदशास्त्रपुराणीं उबगोनी सांडिलासी ।**
**तो आह्मी धरिलासी हृदयकमळीं ॥**
**सहस्रैकनामीं झालासी संपन्न ।**
**तरी हेंही भूषण आमुचेनी ॥**

देवाच्या नामाचा बडिवार भक्तांनीं वाढविला. नाना नामारूपांचीं लेणीं त्यांनींच देवाचे अंगावर चढविलीं, 'तुज नाहीं नामरूप जातीकुळ' त सर्व आह्मीं भक्तांनींच दिलें, 'आम्ही भक्त तरी तूं भक्तवत्सल'–ऐसी 'आमुचेनि भोगिसी थोरीव !' आह्मां भक्तांच्या प्रेमामुळेंच देवाचें देवपण टिकलें आहे. आह्मांला जसें तुझें वेड आहे तसें तुलाही आमचें वेड असलेंच पाहिजे. बरें, नसलें तुला आमचें वेड तरी त्यांत आमची काय हानि आहे ? आमचें प्रेमसुख तुला तरी हिरावून नेववेल ?

**प्रीति नाहीं रायें वर्जियेली कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥**
**रायाचा तो पुत्र बहु अपराधी । तो काय आणिका दंडवेल ? ॥**

तसे 'आम्ही दंभधारी तरी तुझे आहोंत, आमचें कोण काय वांकडें करणार ?' 'बहात्तर खोडी देवमण कंठीं'–घोड्यांत पुष्कळ दोष असले तरी कंठीं एक देवमणि ( गळ्यांमधला भोंवरा )असला तर तो शुभच आहे !

**समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हांसती सकळ लोक कोणा ? ॥**

आमुचा देव आणि दैन्य आमुचे घरीं !–असें होईलच कसें ?

**ऐसा तूं अविनाश त्रैलोक्यीचा राजा । नामा ह्मणे माझा तूचि स्वामी ॥**

## भक्तीचें प्रेमसुख.

नामदेवांची भक्त म्हणून ख्याति आहे, विठ्ठलाचे निस्सीम भक्त म्हणून ते आपल्या समकालीन संतमंडळांत गाजले व सर्वप्रिय झाले. भक्ति म्हणजे ईश्वरविषयक प्रेमाची अत्युत्कटता, भक्ति म्हणजे भावनेची जाज्वल्यता, भक्ति म्हणजे सर्वस्वार्पणाची किंवा आत्मनिवेदनाची परिपूर्णता. जागृतिस्वप्नादि सर्व अवस्थांत देवाव्यतिरिक्त कांहींही न आवडणें, 'तच्चिंतनं तत्कथनं अन्योन्यं तत्प्रबोधनम् ' असें भागवतांत म्हटल्याप्रमाणें देवाचें चिंतन व देवाच्याच कथावार्ता सांगण्याची व ऐकण्याची अतीव प्रीति असणें व त्यांतच अहोरात्र निमग्न असणें, काया-वाचामनेसहित आपला जीवभाव देवाला वाहून देवाच्या परमप्रेमांत आपण विरून विरघळून जाणें–नाहींसें होणें यालाच भक्त म्हणतात. असें अत्युत्कट भक्तिप्रेम ही देवाची देणगी आहे, ही अभ्यासानें वाटेल त्याला मिळत नाहीं. ज्याला देव परमप्रिय झाला त्याला देवाचें स्थान, देवाची मूर्ति, देवाचे गुणानुवाद, देवाचे भक्त, देवाचें सर्व कांहीं प्रिय असतें. भक्ति-प्रेमांत निरतिशय सुख आहे, त्या सुखाला लालचावलेला जीव तें सुख पळभरही सोडीत नाहीं. तो सुखाला सोडीत नाहीं, नव्हे–सुख त्याला सोडीत नाहीं ! नामदेवांच्या सर्व अभंगांत हें अत्युत्कट भक्तिप्रेम अथांग भरलेलें आहे. 'पंढरीच्या सुखा अंतपार नाहीं लेखा ' 'पंढरीस जातां

प्रेम उचंबळत । आनंदें गर्जत नामघोष ’ ‘ अवघी हे पंढरी सुखाची वोवरी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंदु ’–

**त्रिभुवनीचें सुख आलें भक्तिमुसें । तें हें विठ्ठलवेषें अवतरलें ॥ १ ॥**
**भावाचें आळुकें भुललें भक्तिसुखें । दिधलें पुंडलीकें साधूनीयां २**
**सर्वसुखराशी भीवरेच्या तीरीं । आमुची पंढरी कामधेनु ॥**
**प्रेमामृते दुभे सदा संतजना । वोसंडतो पान्हा नित्यनवा ॥**

‘ गूळ गोड न लगे म्हणावा ’–गुळाचें वर्णन कशाला पाहिजे ? मुंगी होऊन त्याला बिलगावें व गुळ खावा ! ‘ सेवी तोचि चवी जाणे । येरां सांगतां लाजिरवाणें ! ‘ भक्तिसुखाचें असेंच आहे.

हें सुख कसें मिळेल ? काय केल्यानें साध्य होईल ? ‘ न पढावे वेद नको शास्त्रबोध ’–याला शब्दांच्या खटाटोपाची गरज नाहीं. ‘ नव्हे ब्रह्मज्ञानें न होये वैराग्यें–ज्ञानवैराग्यानेंही हें मिळतेंच असें नाहीं. ‘ येर क्रियाकर्म ’–कर्मजालांत अडकलेला कोण तरला आहे ? मग हें सुख कशानें मिळेल ? हें सुख भोगणाऱ्यांच्या संगतींतच मिळेल–‘ साधा भक्तिभाग्य संतसंगें ! ’ हा माझा अनुभव आहेच, पण शिवाय ‘ नामा म्हणे मज सांगितलें संतीं ’–हाच अनुभव सगळयांनीं सांगितला आहे !– विश्वास ठेवा कीं ‘ यापरती विश्रांती आणिक नाहीं ! ’

‘अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध’–आणखी शिवाय नाना कला साध्य केल्यात तथापि ‘ प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं ’–तंव तें काय होय ? ‘प्रसंगीं पुराणें ऐकिलीं श्रवणीं’–पण ऐकूनही सांडलें काय आणि मांडलें काय ? प्रवृत्ति दण्डिली काय ? स्वभावधर्म जिंकलेत काय ? पुष्कळ यात्रा केल्या आणखी ‘ अनंत या मूर्ती पाहिल्या लोचनीं ’– स्वप्नींचे पुष्कळ आभास किंवा चित्रपट पाहिल्यानें कार्यभाग होतो काय ? एके ठिकाणीं ‘ न धरीच विश्वास चित्त तूझें ’ तर मग मोठाल्या यात्रा केल्या अन् अनंत मूर्ति पाहिल्या पण त्यांचा वास्तविक उपयोग काय ? ( वरील सर्व साधनें निरर्थक आहेत असें मी सांगत नाहीं पण ) विठोबाचें

वर्म प्रेमावांचून हातीं येत नाहीं हच रहस्य समजा. वांझेच्या स्तनाला लागून काय पोट भरेल ? प्रेमानें पान्हावणाऱ्या विठाईमाउलीला चित्तीं धरा, प्रेमानें तिला वश करा–'दृष्टीचें देखणें श्रवणीचें ऐकणें । मनाचें बैसणें एक होय'–एकनिष्ठतेनेंच विठाई भेटेल व कायाही पालटून कैवल्यरूप होईल !

## खऱ्याखोट्याची निवड.

नामदेवांच्या उपदेशांत निर्मळ अशा भोळ्याभावाचा रंग आहे, तरी ढोंग, खोटेपणा, दंभ, कपट, यांचा तितकाच तिटकारा व्यक्त आहे. '**आले वो संसारा सोडवणें करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥१॥ प्रपंच न सरे कदा कल्पकोडी । वासनेची बेडी पडे पायीं ॥ २ ॥**' असा त्यांचा साधा उपदेश आहे, पण वासनेचे किडे मनांत बुजबुजत असतांना शरणागतीचें ढोंग करून, बळेंच हरिभक्त ह्मणवून घेऊन, जे भाविकांना लुबाडण्याचा धंदा करीत असतात त्यांचा त्यांनीं तीव्र निषेध करीत करीत त्यांना खरा मार्ग दाखविला आहे व खरा परमार्थ बाह्य वेषांवर अवलंबून नसून अंतरंगशुद्धीवर व हरीला सर्वांभूतीं पाहून भूतमात्रावर दया करण्यांत आहे हें सांगितलें आहे. साधनें किंवा साधनमार्ग खोटे नाहींत पण साध्य जी हरिकृपा ती मिळवायच्या मार्गांत राहायचें सोडून साधनांचाच पसारा मांडून त्यांच्या जोरावर जगाला भुरळ घालणारे जे ठक त्यांची त्यांनीं कानउघाडणी केली आहे. 'एक म्हणती आम्ही देवचि झालों' असें म्हणून उपासनामार्ग बुडवितात. 'आम्ही देवासमान' 'आह्मी देवाचींच रूपें' असल्या वल्गना करूं नका; देवानें शिळा उद्धरल्या व ( वराहरूपानें ) मेदिनी उचलली, तुमच्यानें एक गोणी सुद्धां उचलवत नाहीं, म्हणून देवाची बरोबरी करूं नका; 'विठ्ठलाचें पद जो कोणी अभिलाषी । तो महापातकी म्हणे नामा.' उपासकानें आपला अधिकार जाणून देवाचें होऊन जाण्यांतच शोभा आहे. 'त्यागेवीण विरक्ति । प्रेमावांचुनि भक्ति । शांति नसतां ज्ञप्ति । शोभा न पवे !' सोंगाचें वैराग्य, ज्ञान किंवा भक्ति हें अनर्थाचें

मूळ आहे. आसन, टिळे, टोपी, माळा एवढ्या बाह्यरंगावरच भोळ्या भाविकांस गोवणें हें मोठें पाप आहे. 'वेष पालटे। परी अंतरीची आस न तुटे'–तोंवर संन्यास घेतला तरी तो व्यर्थ आहे, 'विषय देखोनि उदास' याचें नांव संन्यास! उपवास, अनुष्ठानें, जपतप, तीर्थाटणें केलीं पण अनुतापानें अंतर शुद्ध झालें नाहीं तर त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. 'काय करूनि तीर्थाटणें। मन भरिलें अवगुणें॥ काय करावें तें तप। चित्तीं नाहीं अनुताप॥' शुद्धभावानें केलेलीं साधनें सुफलित होतात, भाव शुद्ध नसतां तीं व्यर्थ आहेत हेंच याचें तात्पर्य आहे. वेदाध्ययनानें वैदिक होशील, पुराण सांगून पुराणिक होशील, गायन करितां गायक होशील 'परी वैष्णव न होसी अरे जना' ह्मणून अंतरंगप्रेमानें हरिगुण गा व वैष्णव होऊन जा! 'शास्त्रज्ञ पंडित तो एक मी मानी। आपणातें देखोनी तन्मय जाला;' इतरांचा मी अवमान करणार नाहीं, ग्रंथाचें रक्षण ह्मणून त्यांना नमन करीन! वेदपारग, पुराणिक किंवा हरिदास हे जर विषयविरागी, विध्युक्तधर्म पाळणारे, सदासमाधानी असून विष्णूचे अंतरंग भक्त असतील तर, 'नामा ह्मणे ऐसे भेटवीं विठ्ठला। त्यालागीं फुटला कंठ माझा!' त्यांच्या भेटीची मला अत्यंत तळमळ आहे! जे हरिभक्तीविषयीं, हरीच्या नामाविषयीं व हरिसेवेविषयीं सप्रेम आहेत तेच खरेखुरे भक्त व संत होत. जें 'सर्वांभूतीं मातें (देवातें) भजती' ते संत. 'हरि' हें एकच आत्मतत्व सर्वीं सर्वाकारणें संचलें आहे, हेंच वेदाचेंही सार आहे. 'ऐसा माझा विठो सर्वांघटीं समान। न संडावें वर्म नामा ह्मणे.' हें वर्म न कळतां केलेलीं साधनें फोल आहेत. सर्प पवनाचा आहार (वायुभक्षण) करून राहतात, मासे पवित्र गंगाजळ सेवितात, रीस व व्याघ्र वनवासांत असतात, पण यांना कोणी योगी ह्मणेल काय? 'कडुवृंदावन साखरें घोळिलें' तरी त्याचें कडूपण जात नाहीं, त्याप्रमाणें तपतीर्थाटणादि साधनें केलीं तरी खऱ्या अनुतापानें अंतर शुद्ध होऊन हरीच्या प्रेमानें तें भरलें तरच उपयोग!

बहुरूप्याचा नटा माथां भार जटा । भस्म राख सोटा हातीं दंड ॥
त्रिपुंड्र टिळे अंगीं चंदनाची उटी । घालोनियां कंठीं तुळसीमाळा ॥
व्यापक हा हरी न धरितां चित्तीं । लटकियाची गती गातु असे ॥

टिळे टोपी माळा दावी । भोळयां भाविकांसी गोवी ॥
नामा म्हणे त्याचा संग । नको—चित्ता होय भंग ॥

दावी जडीबुट्टी जारणमारण । नागवें हिंडणें काय काज ? ॥
दावी उग्र तप केले उपवास । फिरतांही देश काय काज ? ॥
शिकला गाणें रागआळवण । लोकां रंजवण करावया ॥

भजन चालले उफराटें । कोण जाणे खरें खोटें ॥ १ ॥
सजीवासी हाणी लाथा । निर्जिवपायीं ठेवी माथा ॥ २ ॥
तोंड धरूनि मढा मारा । म्हणती सोमयाग करा ॥ ३ ॥
नामा ह्मणे अवघें खोटें । एक हरिनाम गोमटें ॥ ४ ॥

अशाप्रकारें नामदेवांनीं ज्ञानी, योगी, भक्त, संतमहंत, गोसावी, वारकरी, रामानुज, माध्व इत्यादि संप्रदायांत जे जे खोटे व दांभिकपणाचे प्रकार त्यांना आढळले त्यांचा त्यांचा धिक्कार करून शुद्ध भक्तिभावानें देवाला भजा असें जनांस कळवळ्यानें सांगितलें आहे. लोकांच्या कल्याणासाठीं सद्बुद्धीनें त्यांचे दोष दाखविणें ही कांहीं निंदा होत नाहीं. निंदेचा व विशेषतः संतनिंदेचा त्यांनीं त्यागच सांगितला आहे व निंदकांना श्वानाच्या जातीचे ठरविले आहे ! ‘ निंदक दंडावे दंडावे नेउनि आंधारीं कोंडावे ॥ जो कां करा संतनिंदा । त्यासी दंडावे गोविंदा ’ असें ते स्पष्ट म्हणतात; पण ‘ संत ते कोण असंत ते कोण ’ हें जगास कळावें म्हणून त्यांना निवड करून दाखवावी लागली. भक्ताचा स्वानंद नेणणाऱ्या दांभिक व नास्तिक लोकांच्या हितासाठीं व भोळ्या भाविकांना त्यांच्या पकडींतून सोडविण्यासाठीं संत दोष दाखवीत असतात. यांत भूतदयेचाच हेतु असतो. ‘ परदारा परधन परनिंदा परपीडण । सांडोनियां भजन हरीचें करा ’ म्ह० सदाचारानें वागा व हरीला सर्वांभूतीं भजा एवढेंच त्यांचें सांगणें असतें. ‘ **सर्वांभूतीं समदृष्टी । हेचि भक्ति गोड मोठी** ’

**नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । ऐसी बोले वाणी वेदशास्त्रीं ॥१॥**
**नामा म्हणे नाम ॐ काराचें मूळ । ब्रह्म तें केवळ विटेवरी ॥२॥**

## नामदेवांच्या वाणीची गोडी.

नामदेवांच्या वाणींत अत्यद्भुत गोडी आहे. ही सारी गोडी त्यांच्या उत्कट विठ्ठलभक्तीमुळें आली आहे, त्यांच्या वाणीच्या माधुरीचें बीज त्यांच्या भक्तिप्रेमाच्या जिव्हाळयांत आहे. पंढरी, पंढरीचा विठ्ठल, विठ्ठलाचें वैष्णव भक्त, विठ्ठलभक्तांचा ह्म० वारकऱ्यांचा समागम, विठ्ठलाचें नामसंकीर्तन यांविषयीं त्यांच्या हृदयांत अपार प्रीति नांदत होती, तीच त्यांच्या अभंगांतून उसळली आहे. त्यांची वाणी मधुर असून साधी आहे, तथापि ज्ञानेश्वरांच्या अद्वैतभक्तीचा अंतरंग तिला चांगला ठाऊक आहे. सर्व जातींच्या स्त्रीपुरुषांना, ती समजणारी व आवडणारी आहे. ‘ मऊ मेणाहूनी आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ’ अशी तुकोबांच्या वाणीला दुधारी पात आहे, नामदेवांच्या वाणीला कठीण विचारांचा प्रायः संपर्क लागलेला नाहीं. तुकोबांना स्वतःचा परमार्थ व लोकोद्धार या दोन्ही गोष्टी साधायच्या होत्या, व त्यामुळें ती कोठें मृदु व कोठें तीक्ष्ण अशी आहे. नामदेव स्वतःच्याच अंतर्मुखवृत्तींत व अंतरंग प्रेमोल्हासांत सर्वदा निमग्न असत.

**संपत्तीच्या बळें येक जाले आंधळे । वेढिले काळिकाळें स्मरण नाहीं २**
**येक विद्यावंत जातीच्या अभिमानें । ते नेले तमोगुणें रसातळा ३**
**नामा ह्मणे कृपा करूनि ऐशा जीवा । सोडवी केशवा मायबापा ४**

अशा कोमळ अंतःकरणांतून प्रखरतेच्या ठिणग्या बाहेर पडल्या नाहींत. स्वभावभेद व परिस्थितिभेद यामुळें असें झालें, तथापि केवळ कोमलभक्तीच्या बाबतींत नामदेव हे तुकोबांचे गुरु आहेत यांत शंका नाहीं. ज्ञानेश्वर आणि त्यांचे शिष्य व नामदेवांचे गुरु विसोबा खेचर यांच्यापासून ते ज्ञानभक्तीचें रहस्य शिकले तरी त्यांची कोमल सगुणप्रीति उपजतच होती. नामदेव संतांच्या मेळ्यांत वाढले व तुकोबांना संतपण

आपल्या हृदयांतच शोधावें लागलें. घरांतल्या मंडळींचा विरोध सोसून दोघांनाही आपला परमार्थाचा मार्ग आक्रमावा लागला. नामदेवांची प्रकृति अधिक शांत व परिस्थिति अधिक शीतळ होती, यामुळें त्यांच्या वाणींत भक्तीचें शांत तेज विलसत आहे, भक्तीचा सौम्य विकास झाला आहे.

**आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा। माझिया सकळा हरिच्या दासा १**
**कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं। ही संतमंडळी सुखी असो २**
**अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझ्या विष्णुदासां भाविकांसी ३**
**नामा म्हणे तया असावें कल्याण। ज्या मुखीं निधान पांडुरंग ४**

ही नामदेवांची भाविकांच्या तर्फेची 'सार्वजनिक प्रार्थना' व 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' ही पांडुरंगाची आरती भजनकीर्तनांच्या शेवटीं म्हटल्याशिवाय त्यांची पूर्तता होत नाहीं. 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो' ह्या त्यांच्या निर्धाराच्या वचनानें अनेकांच्या भक्तिभावाला निश्चळत्व दिलें आहे.

## पहिला शिष्य परिसाभागवत!

"नामदेवा! तूं ऊठ इथून, चल चालता हो! अरे! तूं हरिदास झालास तरी तुझे पूर्वज माझे चरणापाशीं बसले आहेत, तूं काय समजलास? तूं काय वेदशास्त्र पाहिलेस? हजारो वैष्णवांना भुरळ पाडणारा तूं कवटाळ्या आहेस! तुझ्याशीं वाद घालूं लागलों तरी हे लोक मला हांसतील. तूं माझा सेवक आहेस. बोल, खरें कीं खोटें!"

"अगदीं खरें आपण म्हणतां तें आपलें बोलणें ऐकून माझ्या मनाला फार संतोष झाला. माझे पूर्वज आपलें पायीं आहेत हें ऐकून आनंदानें माझें मन भरून येत आहे. आपल्या पवित्र चरणांचा महिमा माझ्या पूर्वजांना कळला, म्हणून आपले पाय मला वंद्य आहेत. महाराज! आपलें चरणतीर्थ मला द्या. माझ्या पूर्वजांना आपल्या चरणीं ठाव दिलांत, आणि मी काय असा दुष्कृती की मला चरणांपासून दूर लोटतां?

चारी वर्णांचे लोक आपल्या पायां पडतात व तेणेंकरून त्यांचे दोष जातात. हें मला आधींच कळतें तर मी इतका हिंडलों नसतों, आपले पाय धरून पायापाशींच राहिलों असतों. ”

हा संवाद परिसाभागवत आणि नामदेव यांच्यांत झाला ! ‘ भागवत परिसा ’ म्हणजे भागवत ऐका असें हे म्हणत म्हणून यांना ‘परिसा भागवत’ हेंच नांव पडलें. हा अनुष्ठानी ब्राह्मण पंढरीस रुक्मिणीची उपासना करून राहिला होता. महाद्वारीं ते रामायण व भागवत यांवर पुराणें सांगत, अनेक भक्तभाविक त्यांच्या श्रवणाला जमत. वरील संवाद झाल्यावर ते आपल्या घरीं गेले व आपल्या बायकोला आपली प्रतिष्ठा सांगूं लागले ! तिचें नांव कमलजा असून ती मोठी समंजस होती.

“ ऐकलेंस कां ? सर्व जनांसमोर आज नामदेवाला मी खूप फजीत केला. आह्मी त्याची निर्भर्त्सना केली तरी तो आमचे पाय धरूनच राहिला. शरण आला मग आह्मी त्याला मोठेपणानें सोडून दिलें ! खरे विष्णुदास आह्मी, त्यानें आपल्याला फार तर विप्रदास ह्मणवावें. तें सोडून तो स्वतःलाच ह्मणतो विष्णुदास ! तूं सदा माझ्यापाशीं नामदेवाची स्तुति करून ह्मणत असतेस कीं ‘भक्त एक नामदेव, त्याला उपमा नाहीं.’ पण आतां पहा बरें, ‘त्यापाशीं असता परमात्मा । तरी कां आह्मां शरण येता ? ’ तस्मात् त्याची पायरी खालची व आमची वरची हें आतां तरी सिद्ध झालें ना ? माझें कुळगोत्र धन्य, माझें पूर्वपुण्य थोर. मी वेदांत जाणतों, मला भागवत ह्मणतात.”

“ मी ह्मणतें, जरा विनंति करितें, कोपूं नका ! ‘ तुह्मांसी गर्व जरी नसता । तरी घरीं भेटता परमात्मा !’ पाषाणावर अमृत ओतलें व पाषाण कोरडा राहिला तर त्याचा काय उपयोग ? ‘ ब्राह्मण पवित्र धन्य । मुखीं वेद हरीचें नाम । वरी गर्व—अवलक्षण । तरी सकळधर्म लोपले ! ’ गर्वानेंच तुमचा घात केला आहे. तुह्मांसी चाड जरी हरीशी । तरी मत्सरू करूं नका नामदेवासी । तो आलिया घरासी । हरि तुम्हांसी भेटेल. ’ नामदेवाच्या प्रसादानें तुम्हांआम्हांला हरीची भेट होईल. ‘ महादेवद्वारीं

कीर्तन मांडिलें । हें आवंढ्यासी वर्तलें । देऊळ तयाकडे फिरलें । भलें नवल नामयाचें, ' म्हणून मी स्पष्ट सांगतें कीं नामदेवाचा तुम्ही मत्सर करूं नका, तो हीनयातीचा म्हणून त्याला तुच्छ करूं नका, परमात्मा त्याला वश आहे, नामदेवाला प्रेमानें आदरानें वागवा, त्याच्या कृपेनें आपला उद्धार होईल. गर्व-अहंकार हा परमार्थाचा महान् शत्रु आहे, त्याचा सर्वस्वी त्याग करा. "

त्या पतिव्रतेचा हा सदुपदेश पतीच्या मनावर ठसला. त्याचें उपास्य-दैवत रुक्मिणी इनेंही त्याला दृष्टांतीं तसेंच सांगितलें. त्यानें यापुढें नाम-देवांचीं कीर्तनें निर्मत्सरबुद्धीनें ऐकिलीं. परिसा भागवत स्वतः म्हणतात:—

**मागें होत तें अवघेंचि विसरलों । लोटांगणीं आलों नामयासी १६**
**परिसा म्हणे नाम्या तुझें बरवें गाणें । जैसें कां नाणें टांकसाळीचें १७**

परिसाभागवतांचें अंतरंग निवळलें. नामदेवांच्या कीर्तनांत प्रत्यक्ष पांडुरंग नाचतात हें संतांच्या मेळ्यांत त्यांच्याही अनुभवाला पुरें आलें तेव्हां त्यांनीं नामदेवांचे चरण सद्गदित होऊन घट्ट धरिले, पूर्वीं केलेल्या अपराधांची क्षमा मागितली, नामदेवांचे धन्यवाद गायिले व नामदेवांनींही आपल्या साधुत्वास शोभेसें ' चरणींचा रज सेवक संतांचा। विशेषही तुमचा आज्ञाधार ' असें त्यास नम्रतेचें उत्तर केलें. ' नामया रे तुवां कोणें योगें साधिलें । निजरूप ठाकलें परब्रह्म' असें परिसांनीं नामदेवास एकांतीं पुसलें व नामदेवांनीं निजखूण दाखवून त्यांचें समाधान केलें. परिसा भागवत सर्व अहंकार सोडून नामदेवांचे शिष्य झाले. ' नामा आणि केशव एकाचि जाणावे ' ' देवभक्त झाले दोन्ही एकरूप' इ० खुणेचे उद्गार त्यांचे निघूं लागले. परिसाभागवत पुढें ज्ञानेश्वर, चांगदेव वगैरे संतांच्या मेळ्यांत मिळाले.

**ज्ञानीं ज्ञानदेव ध्यानीं नामदेव । भक्तीं चांगदेव पुढारले ॥ २४ ॥**
**या तिन्ही मूर्ति एकचि पै असती । याची कांहीं भ्रांती न धरावी२५**
**परिसा म्हणे जैशा सरिता सागरीं। तैसे ते श्रीहरि मिळोनि गेले२६**

नामदेवज्ञानेश्वर हे तीर्थातटणाला गेले तेव्हां त्यांच्याबरोबर जी संतमंडळी होती त्यांत परिसाभागवतही होते. 'ज्ञानेश्वरसंगती घडलें। तीर्थमिसें जगदुद्धार' असें त्यांनीं एका अभंगांत म्हटलें असून 'संतांची आरती' त्यानीं केली आहे तिच्यांत सर्वांचा नामोच्चार केला आहे. ही आरती सुंदर आहे. 'ऐसे परउपकारी लोळावें त्यांच्या द्वारीं। तेंचि केशवध्यान येर लटिकें संसारीं' असें त्यांनीं स्वानुभवानें या आरतींत म्हटलें आहे. काशीयात्रेला जातांना वाटेंत चांगदेवांच्या आग्रहास्तव त्यांच्या गावीं जाऊन तापीच्या वाळवंटांत या सर्व संतांनीं पंढरीचा सुख-सोहळा भोगला होता असें ह्या आरतींतील 'धन्य तप्तीतीर बरवें वाळु-वंट' इ० उद्गारावरून दिसतें. ह्या आरतीची शेवटचीं कडवीं पहाः—

**लाधलों सन्मुख काशिये जातां। विश्वनाथीं प्रेमा यांचिया सत्ता।**
**बाणली वीरश्री पंढरिनाथा। जिकडे तिकडे देखे हरिदास गर्जतां ५**
**निवृत्ति सोपान हे ज्ञानेश्वर। मुक्ताबाई चांगदेव वटेश्वरु।**
**खेचरविसा ब्रह्मीं देखे आनंदाचा पूर। अवघिया अवघा साक्षात्कारु ६**
**त्याचे चरणीचा रजरेण हा नामदेवसिंपा। तया पाहतां अनुभव सोपा।**
**हे एकचि मूर्ति पावतां पावलों अशखा।**
**सकळांचरणीं परिसाभागवत देखा ॥ ७ ॥**

परिसा भागवतांचे २० अभंग उपलब्ध आहेत त्यांतला एक पहाः—

**अणुमाजी राम रेणुमाजी राम। तृणकाष्ठीं राम वर्ततसे ॥ १ ॥**
**बाहीजुंभींतरीं राम चराचरीं। विश्वीं विश्वाकारीं व्यापलासे ॥ २ ॥**
**रामेविण स्थळ रितेंचि पै नाहीं। वर्ते सर्वांठायीं राम माझा ॥ ३ ॥**
**ब्रह्मा विष्णु रुद्र मूर्तीपै जे ध्यानीं। अखंड जपती रामनाम ॥ ४ ॥**
**परिसाभागवत कायावाचामनें। श्रीरामावांचूनि आन नेणे ॥ ५ ॥**

* * * *

**पैल मेळा रे कवणाचा। नामा येतो केशवाचा ॥**
**परिसा येतो लोटांगणीं नामा तयाचे चरणीं**

## ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा.

नामदेवांचा गोड सहवास पोटभर मिळावा यासाठीं नामदेवांस पंढरीच्या बाहेर काढावें असें ज्ञानदेवांच्या मनांत आलें. पुढचा प्रकार नामदेवांनीं स्वतः 'तीर्थावळीच्या' प्रेमळ अभंगांत वर्णिला आहे तो आपण त्यांच्याच मुखानें ऐकूं. ज्ञानदेव नामदेवांच्या भेटीस आले. नामदेवांनीं त्यांना 'देउनी आलिंगन प्रीतिच्या पडिभरें । पूजिले आदरें यथाविधी !' 'तापत्रयसंतप्त झालेल्या जीवांचा उद्धार करावा यासाठीं तुमचा अवतार आहे, मी तुह्मांसारख्या संतांचा रजरेणु आहे म्हणून पंढरीनाथ प्रेमजीवन देऊन मला पाळीत आहे, तुमच्या चरणांच्या आधारानें मी भवनदीपार जाईन असा मला भरंवसा आहे,' याप्रमाणें नामदेवांनीं त्यांचें गौरव केलें. ज्ञानदेवांनींही नामदेवांच्या भक्तीचें कौतुक करीत ह्मटलें कीं 'तूं भक्तशिरोमणि आहेस, ' प्रेमसुखगोडी तुजसि फावली । वासना मावळली समूळ तूझी.' आतां ' तुझिये संगतीचें नित्यसुख घ्यावें ' व तुझ्यासंगें तीर्थयात्रा करावी असें मनांत येऊन मी आलों आहें तर प्रयाणास मुहूर्त पाहून ठेव ! नामदेव म्हणाले कीं विठ्ठलाची आज्ञा पुसा ह्मणजे मी येतों. ज्ञानदेव ह्मणाले:– तुझें गौप्यगुज मला सर्व कळलें आहे. तुझा प्रेमभक्तीचा अधिकार थोर आहे. ' धन्य तूं संसारीं भक्तिभावशीळ । साधिलें त्वां केवळ प्रेमसुख !' पंढरिनाथ नामदेवाकडे पाहून ह्मणाले कीं 'नाम्या ! तुझें भाग्य केवढें थोर ! पहा कीं ' प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर । करितसे आदर संगतीचा, ' तूं ज्ञानेश्वराबरोबर सुखानें तीर्थयात्रा कर पण लवकर परत ये. ' देव मग ज्ञानदेवास ह्मणाले कीं माझ्या नामदेवाला जपून घेऊन जा–' हें कृपेचें पोसणें माझें आवडतें । क्षण जीवापरतें न करीं कदा ' यानंतर दोघेही तीर्थयात्रेस निघाले. इकडे पंढरिनाथांस नामदेवावांचून क्षणभर करमेना, त्यांचें चित्त उद्विग्न झालें. याप्रसंगीं देव आपल्या भक्ताचा महिमा स्वमुखानें गाऊं लागले. तो अभंग फारच गोड आहे:–

**माझे भक्त मज अनुसरले चित्तें ।**
**त्याहूनि पढियंते मज आणिक नाहीं ॥ १ ॥**

व्यक्तीस येणें मज तयांचिये आवडी ।
युगायुगीं प्रौढी हेचि मिरवी ॥ ४ ॥
ते माझे आश्रम मी त्यांचा विश्राम ।
जिहीं रूपनाम केलें मज ॥ ५ ॥
जिहीं तनुमनप्राण लाविला मजकडे ।
मी तया आवडे जीवाहूनी ॥ ६ ॥
त्यांचें गुजगौप्य मीचि एक जाणे ।
माझी प्रेमखूण कळली तया ॥ ८ ॥
आपुलियाचि किरणें विराजे गभस्ती ।
परी किरण न होती आन जेवीं ॥ १० ॥
तैसे माझे दास मजमाजी उदास ।
असती समरस दुजेनवीण ॥ ११ ॥
मी तों भक्तरूप भक्त माझें स्वरूप ।
प्रभा आणि दीप जयापरी ॥ १२ ॥

अशा भक्ताच्या नित्यसंगतीसाठीं देव उतावीळ असावेत व ‘ नाम्यापुढें मज दुजें नावडे ’ असें त्यांना वाटावें हें सहज आहे. इकडे ज्ञानदेव व नामदेव मार्गानें सुखसंवाद करीत सुखरूप चालत असतांना ‘ चित्त पांडुरंगीं नामयाचें ’ असे. त्याचेंही केशवाचें ध्यान अभंग असेः—

फुटोनी हृदय होती दोनी भाग । मज बहुउद्वेग वाटताती ॥
तूंचि माझें व्रत तूंचि माझें तीर्थ । तूंचि धर्मअर्थकाम देवा ॥

ज्ञानदेवांनीं नामदेवाचें सांत्वन करावेंः—

प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या हृदयीं आला ।
तूं कां वेळोवेळां खंती करिसी ॥
विचारीं सावध होई भक्तराजा ।
सुखानंद तुझा तुजचिजवळी ॥

तरी ' जें पुंडलिकापुढें उभें असे ' त्या एका विठ्ठलावांचून माझ्या जीवाला विश्रांति वाटत नाहीं असें नामदेवांनीं म्हणावें, पुन्हां ' व्यापक विठ्ठलु आहे सर्व देशीं ' असें ज्ञानदेवांनीं सांगावें, तरी ' पंढरिनिवास जीवन माझें ' हें नामदेवांचें गाणें सुटूं नये. त्यांचा एकविध भाव पाहून ज्ञानदेवांला त्यांची धन्यता वाटली.

**जें अक्षर अव्यक्त देशकालरहित । ज्ञानी उपासीत सोहंभावें ॥**
**सर्वगत संपूर्ण सर्वकाळ असणें । होणें आणि जाणें नाहीं जया ॥**

असें अद्वैतसुख नामदेवा ! तुझें तुजजवळ आहे, तूं अनुभवीं मन ठेवून पहा, असें ज्ञानदेवांनीं नामदेवांस वारंवार शिकवावें; पण ' नामा ह्मणे माझा सुखाचा विसावा । आवडे या जीवा पंढरिरावो ! ' याप्रमाणें नामदेवांनीं उत्तर द्यावें, असा त्या उभयतांचा वाटभर संवाद चाले. एकदां ज्ञानदेवांनीं नामदेवाला पुसलें ' कीं भजनविधि कसा साधावा, मनबुद्धि सत्वशील कशी करावी, श्रवणादिसाधनांचें वर्म काय, भक्ति व ध्यान कोणतें, हें सर्व तुझ्या तोंडून ऐकावेसें मला वाटतें; तर तूं आपला अनुभवाचा साधनउपाय सांग बरें ' हे प्रश्न ऐकतांच नामदेवांनीं सद्गदित होऊन ज्ञानदेवांचे चरण धरिले व ' कृपेचें पोसणें मी पंढरीरायाचें । एवढें भाग्य कैचें मज जाणिवेचें ' असें उत्तर केलें ! मला ज्ञान नाहीं, मी बहुश्रुत नाहीं, मला कांहीं समजत नाहीं ह्मणून देवानें मला तुमच्या हातीं दिलें आहे; ' कल्पतरु याचक कृपणाचे द्वारीं ' किंवा कामधेनूनें दरिद्र्याचे घरीं दैन्य दाखवावें तसें तुमचें हें विचारणें आहे, तुह्मी माझें कवतुक करून ' सुखें सुख वाढवीत आहांत. ' असो. आतां पांडुरंगाच्या कृपेनें सुचेल तें बोलतों—असें नामदेवांनीं उत्तर केलें. ' पंढरीरायाचा तूं प्रेमभांडारी आहेस ह्मणून तुझे सुरस बोल ऐकायला माझे कान उत्सुक झाले आहेत तरी अनुभवाची गोष्ट तेवढी बोल ' असें ज्ञानदेव ह्मणाले; तेव्हां:—

**नामसंकीर्तन मज वाटे गोड । येर ते काबाड वायावीण ॥**
**नमन ते नम्रता न देखे गुणदोष । अंतरीं प्रकाश आनंदाचा ॥**

**ध्यान तया नांव निर्विकार निकें । जें विश्वीं देखे माझ्या विठोबासी ॥**
**अखंड हृदयीं तेंचि आठवण । साजिरे समचरण विटेवरी ॥**
**नादीं लुब्ध जैसें आसक्त हरिण । जाय विसरोन देहभाव ॥**
**यापरी तल्लीन दृढ राखे मन । या नांव श्रवण आवडीचें ॥**
**कीटकी भ्रुकुटिये जैसें अनुसंधान । निकें निजध्यासन एकविध ॥**
**सर्वभावें एक विठ्ठलुचि ध्याये । सर्वाभूतीं पाहे रूप त्याचें ॥**
**सर्वांहूनि निराळा रजतमावेगळा । भोगी प्रेमकळा तेचि भक्ती ॥**
**अनुरागें गोविंद ध्यायिजे एकांतीं । यापरती विश्रांती आणिक नाहीं ॥**
**नामा ह्मणे हेंही बोलविले तेणें । उदारें सर्वज्ञें पांडुरंगें ॥**

'भक्त भागवत बहुसाल ऐकिलें पण या नामयासारखा कोणी ऐकला नाहीं, हें नामयाचें बोलणें कवित्व नव्हे,-हा भक्तिरस अद्भुत आहे, ही सुखविश्रांति नामदेवावांचून अन्यत्र कोठेंही नाहीं-मोठे शास्त्रवक्ते, पंडित, बुद्धिवंत, कर्मनिष्ठ, कळावंत, कवि, आत्मज्ञानी, योगी-कोणी ही असोत पण या नामयाची सर कोणालाही येणार नाहीं' असें ज्ञानेश्वर म्हणाले.

असो. पश्चिमप्रभास, द्वारका इ० क्षेत्रें व मोक्षपुऱ्या सर्व पाहत पाहत हे 'जीवन्मुक्त दोनी भक्त आणि ज्ञानी' परत फिरले. वाटेंत बिकानेर-पासून १०।१२ कोसांवर कोलादगी नामक गांव आहे त्या ठिकाणीं उभयतांना तहान लागली. पाणी तर जवळपास कोठे दिसेना. एक कूप दिसला पण तो कोरडा ठणठणित! ज्ञानदेव योगीच होते. त्यानीं 'लघिमेचें लाघव करूनि ते अवसरीं । उतरोनि भीतरीं घेतलें उदक,' व नामदेवालाही म्हणाले कीं तुला याच मार्गानें मी पाणी आणून देतों. नामदेव म्हणाले 'माझी चिंता काय विठोबाला नाहीं? त्याचें कौतुक आपण पाहूं.' मग नामदेवांनीं विठ्ठलाचा धांवा केला:—

**कायावाचामनें विनटलों चरणांसी ।**
**तो मी शरण आणिकासी जाऊं कोणा ॥**

जन्मोनी पोसणा तुझाचि म्हणती ।
मोकलितां अंतीं लाज कोणा ॥

तृषाक्रांत नामा देवाचा धांवा करीत असतांना तो आर्तबंधु द्रवला:-

**तंव कडकडीत कूप उदकें वोसंडला। कल्पांतीं खवळला सिंधु जैसा।**
**ज्ञानदेव म्हणे झालें अभिन्नव। कैसा ऋणिया देव येणें केला।**
**सावध करोनियां दिलें आलिंगन। जीवें निंबलोण उतरिलें ॥**
**येरें चरणावरी ठेवियेला माथा। म्हणे आहे माझी चिंता विठोबासी॥**
**नामा म्हणे माझे लळे पुरविले। कै देखेन पाउलें विटेवरी ॥**

ज्ञानदेव म्हणाले 'बा नामदेवा ! मला तीर्थयात्रेची चाड नव्हती पण तुझ्या संगतीची आवड होती ती पूर्ण झाली. तूं परमात्मा जवळ केलास या तुझ्या प्रेमापुढें सारें फिकें आहे. बापा! धन्य तूं व तुझें कुळगोत !'

यात्रा करून दोघेही परत आले. नामा 'भेटला जिवलगा विठोबासी'. नामदेव देवास म्हणाले 'अज्ञानाचा भ्रम होता माझे मनीं । हिंडविलें म्हणोनि दारोदारीं !' पण देवा! मी माझा निर्धार सांगतों. पंढरीचें सुख अन्यत्र स्वप्नींही नाहीं. उदंड तीर्थें आहेत 'परी चित्त माझें वोढी चंद्रभागे.' तुझ्यावांचून दुसऱ्या देवाकडे माझे पाय चालत नाहींत, माझे कान दुसऱ्या कोणाचें यश ऐकत नाहींत. 'कटींतटीं जेणें कर नाहीं ठेविले। न देखे पाउलें विटेवरी'-त्याला देव म्हणतांना माझें चित्त लाजतें! 'कुंचे गरुडटके न देखे पताका' तो देव कसला? जेथें वैष्णवांचा मेळा नाहीं व हरिकथेचा सुकाळ नाहीं तें क्षेत्र कसचें? हें सर्व पंढरीस विठोबाचे पायीं आहे म्हणून मी तुझ्यावांचून कोणी जाणत नाहीं.

देवांनीं यात्रेचे मावंदे केलें त्याचें वर्णन पुढील अभंगांत आहे.

( १ ) परिसा भागवत संतांच्या आरतींत म्हणतात:—

**हरिदासांचे भार मिरवती गरुडटके गोमटे ।**
**धन्य तप्तीतीर बरवे वाळुवंटें ।........**

**लाधलों समसुख काशिये जातां । विश्वनाथीं प्रेमा यांचिया सत्ता ॥**
**बाणली वीरश्री पंढरिनाथा । जिकडेतिकडे देखे हरिदास गर्जतां ॥**
**निवृत्ति सोपान हे ज्ञानेश्वरु । चांगदेव मुक्ताई हे वटेश्वरु ।**
**अवघिया अवघा साक्षात्कारु । सद्गुरु जाण तो विसोबाखेचरु ।**
**त्याचे चरणीचा रजरेण हा नामदेव सिंपा ।**
**तयासी पाहतां अनुभव सोपा ।**
**सकळा चरणीं परिसा भागवत देखा ॥**

( २ ) नामदेवांचें अभंगांत ज्ञानेश्वर व विश्वेवर यांच्या भेटीचें वर्णन आलें आहे. ' ज्ञानदेव आले काशी ' व विश्वेश्वर त्यांना सामोरे आले. ' ज्ञानोबाचा हात । प्रेमें धरी विश्वनाथ ॥ ' इ० कथांवरून यांच्या काशीयात्रेचें स्वरूप स्पष्ट होतें.

ज्ञानेश्वरनामदेवांनीं आपले आवडते वारकरी भक्त बरोबर घेऊन पंढरीची दिंडी उत्तरेकडे काशीस नेऊन आणली असें यावरून स्पष्ट दिसतें ! ह्या यात्रेच्या वेळीं ज्ञानेश्वरपंचक, विसोबाखेचर, नामदेव, परिसा भागवत ही मंडळी बरोबर होती, व ती द्वारका करून मेवाडांतून काशीस गेली व काशीयात्रा करून खानदेशांतून चांगदेवांच्या तापी-तीराच्या वाळवंटांत भजनरंगानें गाऊन नाचून परत पंढरपुरास मावं-ह्यासाठीं आली असें दिसतें. वाटेंतल्या मुक्कामावर कीर्तनाचें काम प्रायः नामदेवांकडेच असे म्हणून गुजराथेंत व उत्तर हिंदुस्थानांत हा नामदेवांचा मेळा म्हणूनच गाजून राहिला. नामदेवांची उत्तरेकडची ही पहिली यात्रा ज्ञानेश्वरांच्या संगतींत झाली.

## गोरा कुंभार

त्या वेळच्या संतमंडळांत गोरोबा कुंभार हे वयानें अधिक होते, ह्मणून गोरोबांना सर्व 'काका' म्हणत. हे 'तेरढोकी ' येथील रहिवासी. गोरोबाचा ज्ञानीभक्त ह्मणून अधिकारही थोर होता. वैराग्य व करारी-पणा याविषयीं त्यांची प्रसिद्धी होती—त्यांना संती व रामी अशा दोन

स्त्रिया होत्या. गोरोबा विरक्त व करारी होते आणि अत्यंत प्रेमळ भक्तही होते. ते चिखल तुडवीत असतांना भजनानंदांत तल्लीन होऊन इतके नाचले कीं रांगतें पोर पायांखालीं तुडवतांना मेलें याचीही त्यांना शुद्धि नव्हती ! 'माझ्या अंगाला हात लावाल तर तुह्मांला विठोबाची शपथ' असें संती सहज ह्मणाली तों यांनीं तिला स्पर्श करण्याचेंही सोडून दिलें ! मग आपल्या बहिणीपासून तरी यांना मूल होऊन वंश चालो ह्मणून संतीनें स्वखुषीनें रामीशीं यांचें लग्न लावून दिलें. लग्नसमयीं 'दोघी बहिणींना समानतेनें वागवा' असा सासऱ्यानें उपदेश केला तों यांनीं तिच्याही अंगाला हात लावायचा नाहीं असें ठरविलें ! दोघी बहिणींनीं एके रात्रीं यांचे दोन्ही हात आपले पोटावर घेतले तों आपले हात पापी समजून तोडून हे थोटे बनले ! अशा यांच्या करारीपणाच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. नामदेवांना मस्तकावर थापटणें मारून 'कच्चा घट' ह्मणून यांनींच ठरविलें व मग कच्चेपण काढून टाकण्यासाठीं नामदेव विसोबाखेचरांना शरण गेले. गोरोबांचा परमार्थांत अधिकार थोर होता, हें त्यांनीं नामदेवांना केलेल्या उपदेशपर अभंगांवरून स्पष्ट दिसतें. वेदांतपरिभाषेचें शब्द व अनुभवाच्या खुणा ज्यांत आहेत असे यांचे १०।२० अभंग आहेत. 'निःसंगाचा संग' धरिल्यामुळें 'अनेकत्व गेलें अनेकत्व गेलें। एकलें सांडिलें निरंजनीं ॥ एकत्व पाहतां अनेकत्व लटिकें। जें पाहे तितुकें रूप तुझें' असा त्यांना अनुभव होता. नामदेवाला 'अंतरीचें गूज' सांगतांना त्यांनीं अनुहतध्वनि, सत्रावीचें जळ, खेचरी मुद्रा यांची ओळख पटवून दिली आहे. 'नाहीं दिवसराती नाहीं कुळयाती। नाहीं मायाभ्रांति' अशी तन्मयतेनें त्यांची अवस्था होत असे. 'एकाचे अनेक विस्तारलें' 'जेवित्याची खूण वाढत्याचि जाणे' 'जग हें शाहणें करणें बापा' 'आहे तें ब्रह्मांडीं रूप तुझें' असा त्यांनीं 'जिवलगा नामदेवाला' वडिलपणें बोध केला आहे. यांचे २ अभंग पहा:—

( १ ) केशवाचे भेटी लागलेसें पिसें। विसरलों कैसें देहभावा ॥१॥
जाली झडपणी जाली झडपणी। संचरलें मनीं आदिरूप॥२॥
न लिंपेचि कर्मीं न लिंपेचि धर्मीं। न लिंपे षडूर्मीं पुण्यपापा॥३॥
म्हणे गोराकुंभार सहजीं जीवन्मुक्त। सुखरूप अद्वैत नामदेवा४

( २ ) ब्रह्ममूर्ती संत जगीं अवतरले। उद्धराया आले दीन जना ॥१॥
ब्रह्मादिक ज्यांचे वंदिती पायवणी। नाम घेतां वदनीं दोष जाती॥२॥
हो कां दुराचारी विषयीं आसक्त। संतकृपें त्वरित उद्धरती ॥३॥
अखंडित गोरा त्यांची वास पाहे। निशिदिनीं ध्याये संतसंग ॥४॥

## कच्चा घट !

त्या भक्तमंडळांत एका नामदेवावांचून बाकीचे सर्व गुरूपदिष्ट होते, नामदेवांनीं मात्र गुरूचा उपदेश घेतला नव्हता. नामदेवांना वाटे कीं साक्षात् पंढरिनाथ माझ्याशीं बोलतात, हंसतात, खेळतात, मला हर-प्रकारें सांभाळतात. गुरुकृपेनें देव जोडायचा तर तो देव आधींच माझा झाला आहे, विठ्ठलच माझे गुरु, मग मला दुसऱ्या गुरूची गरज काय आहे ? पण सर्व संतांनीं विचार केला कीं नामदेव प्रेमळ भक्त खरे पण त्यांच्यांत अद्याप थोडीशी अपूर्णता आहे, मी भक्त असा थोडासा अहं-भाव पोटीं वागत आहे, तर ही उणीव काढून टाकली पाहिजे; भक्तीला ज्ञानाची जोड देऊन ज्ञानभक्तीचा अनुभव त्यांस आणून दिला पाहिजे. मग त्या प्रेमळभक्तांनीं एक मोठी प्रेमाची लीला केली. निवृत्तिप्रमुख सर्व संत नामदेवांकडे आले. सर्वांनीं नामदेवांस वंदन केलें व त्यांच्या भक्तिप्रेमाचें कोडकौतुक केलें. नामदेवांच्या पायांवर सर्वांनीं मस्तक लवविलें पण ' नामा म्हणे काय वंदू यांचे चरण। अंगें परब्रह्म मज-पाशीं ! ' नामदेवाच्या चित्तीं अद्याप अहंतेचें ठाण आहे हें पाहून मुक्ताई चमकली. ती म्हणाली ' नामदेव हें चंदनाचें झाड आहे पण त्याला अहंतासर्पिणीचा वेढा पडला आहे हें बरें नाहीं. याला अजून स्वरूपानुभव नाहीं. हरिभक्त आहे पण ' आंतली ती सोय न ठाउकी ! '

हा गुरुवीण अंतरीचा कोरा आहे.' निवृत्तिनाथ म्हणाले ' जाऊं दे ग ! यानें भक्तीच्या बळें देव ऋणायित केला आहे, प्रेमानें पांडुरंग वेडा केला आहे, जाऊं दे ' सोपानदेवांचें ह्मणणें असेंच पडलें. पण 'संतांचा सन्मान याला कळत नाहीं, हें कच्चें मडकें आहे, कुंभ भाजल्यावांचून पाण्याच्या संगतींत टिकायचा नाहीं, करितां आपण गोरोबाकाकांना येथील सारे कुंभ तपासून पहायला सांगूं ! भांडें भाजलें कां कच्चें हें त्यांना चांगलें पाहतां येतें !' असा मुक्ताईनें हट्ट धरिला. नंतर गोरोबांनीं हातीं अनुभवाचें थापटणें घेऊन सर्वांच्या मस्तकीं हाणून निर्णय केला कीं ' नामदेव अजून कोरा आहे, हें भांडें मात्र भाजलेलें नाहीं, बाकीचीं सारीं भांडीं पक्कीं आहेत ! 'नामदेवाला संतांच्या मेळ्यांत आपला अपमान झाला असें वाटून त्यानें आपलें गाऱ्हाणें पांडुरंगाकडे नेलें तेव्हां देवांनीं सांगितलें कीं ' गुरूवांचून मोक्ष नाहीं हा संतांचा निर्णय मला मान्य आहे, संतवचनाला मान तुकावणें मलाही भाग आहे ! तूं ऊठ, औंढ्या नागनाथाला जा व तेथें विसोबा खेचरांला शरण जा, ते तुझे गुरु आहेत !' नामदेव मोठ्या नाखुषीनें विसोबांकडे गेले. विसोबांनीं अंतर्ज्ञानानें सर्व जाणलें व कुत्सित रूप घेऊन शिवलिंगावर पाय ठेवून निजले ! नामदेव आले व तो प्रकार पाहून चपापले. ' नाम्या ! अरे ! मी वृद्ध आहें, माझे पाय उचलत नाहींत. जेथें देव नसेल तेथें माझे पाय ठेव !' नामदेवानें विसोबांचे पाय ठेवावेत तों खालीं शिवलिंग आहेच. दाही दिशांना गुरूचे पाय फिरवून पाहिले. जेथें गुरूचे चरण तेथें देव आहेच ! हें पाहतांच नामदेव उमजले. त्यांनीं विसोबाखेचरांचे चरण धरिले व ते त्यांना शरण गेले.

## गुरु विसोबाखेचर.

पंढरपुराहून सुमारे ५० कोसांवर परभणी प्रांतांत नरसीब्रह्मणी अगर नरसीबामणी नामक एक गांव आहे. नरसी हा गांव बामणी गांवाखालीं मोडत असे पण नरसी व बामणी या दोन गांवांत १० कोसांचें अंतर

आहे. नामदेव हे मूळ नरसी बामणीचे रहिवासी. नरसीपासून पांच कोसां-वर औंढे नागनाथ नामक फार पुरातन शिवक्षेत्र प्रसिद्ध आहे. हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक आहे. तेथें विसोबा खेचर हे राहत असत. विसोबा हे यजुर्वेदी ब्राह्मण पूर्वीं सराफीचा धंदा करीत. पुढें हे ज्ञानेश्वरमंडळांत समाविष्ट झाल्यानंतर योगज्ञानांत निपुण झाले व साधु ह्मणून मानले जाऊं लागले. विसोबा खेचर हे स्वतः मोठे अधिकारी पुरुष होते तरी नामदेवांचे गुरु ह्मणून ते अधिक लोकमान्यता पावले आहेत यांत शंका नाहीं. ज्ञानदेव व नामदेव यांच्यांतला अभंगसांधा ह्मणजे विसोबा खेचर होत. यांना उपदेश ज्ञानेश्वरांचा होता. तरी सोपानदेवांनाही हे गुरु मानीत. ज्ञानेश्वरांच्या जन्मकाळावर एक व समाधीवर एक असे यांचे दोन अभंग आहेत.

**महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥**

× × ×

**अलंकापुरीं राहिली । श्रीगुरु ज्ञानाई माउली ॥ १ ॥**

ह्या सर्व उल्लेखांवरून ज्ञानेश्वर हेच विसोबा खेचरांचे गुरु होते हें स्पष्ट आहे. तथापि 'माझी मूळपीठिका सोपान सद्गुरु । तेणें माथां करु ठेवियेला' ह्या अभंगावरून त्यांचे गुरु सोपानदेव वाटतात. ह्याच अभं-गांत विसोबा खेचर सांगतातः—

**चांगयाचा अंगिकार मुक्ताईनें केला । सोपान बोळला मजवरी**
**जन्ममरणाचें भय नाहीं आतां । खेचरी तत्वता मुद्रा दिली ॥ ३ ॥**

यावरून विसोबा खेचर दोघांनाही गुरु मानीत, दोघेही त्यांना गुरुस्थानीं होते असें दिसतें. योगाची खेचरी मुद्रा देऊन मस्तकावर वरदहात ठेविला सोपानदेवांनीं, व योगाचीं आणखी कांहीं रहस्यें सांगून अद्वैतबोध व भक्तिमार्ग यांचा उपदेश केला ज्ञानेश्वर महाराजांनीं! शिवाय सच्छिष्यांना सर्व गुरुकुळ गुरुरूपच असतें. मुक्ताईनीं नामदेवांशीं बोलतांना 'ज्ञानदेवीं बीज वाढविलें जनीं ।

तेंचि आम्ही तुम्ही संपादिलें ' असें म्हटलें आहे. विसोबांना जसा सोपानदेवांचा अनुग्रह, तसा मुक्ताईला निवृत्तिनाथांचा होता, तथापि त्या वेळच्या सर्वच भक्तमंडळांत 'ज्ञानदेवीं बीज वाढविलें जनीं '– ह्याप्रमाणें ज्ञानेश्वरीआदि ग्रंथाच्या द्वारें ज्ञानेश्वरांनीं अद्वैतभक्तीचा सर्वत्र प्रसार केला असल्यामुळें ज्ञानेश्वरांना तत्कालीन सर्व संत गुरु-स्थानींच मानीत, सर्वांच्या अभंगांवर ज्ञानेश्वरांच्या वाणीची छाप पडलेलीही स्पष्ट दिसत आहे. विसोबांनीं नामदेवास उपदेशिलेले दोन सुंदर अभंग प्रसिद्ध आहेत. गुरुशिष्यांच्या प्रथमभेटीचा प्रसंग कसा मौजेचा झाला तें पहा:—

**( १ ) खेचरीं धरिली माव । लिंगावरी ठेविला पाव ।**
**पहावया भाव । नामयाचा ॥ १ ॥**
**नामा तेथें आला । देव नमस्कारिला ।**
**देखोन बोलिला । वचन त्यासी ॥ २ ॥**
**लिंगावरी चरण ठेविले । ' काढाजी वहिले ।**
**दिसतां वरी भले । करणी न कळे ! ' ॥ ३ ॥**
**तंव येरु बोलिला । ' नाम्या ! तूं भक्त भला ।**
**मज नाहीं कळला । देव तुझा ॥ ४ ॥**
**जेथें नाहीं देव । तेथें ठेवी पाव ।**
**सर्वज्ञ सदेव । तूंचि असशी ॥ ५ ॥**
**मीपणें भुललों पाहीं । मज न कळेचि कांहीं ।**
**देव नसे ते ठायीं । पाय ठेवीं ' ॥ ६ ॥**
**तंव नामा विचारी । होय शब्दाची कुसरी ।**
**पाहतां निर्धारी । सान नोहे ॥ ७ ॥**
**देवावीण ठाव । हें बोलणेंचि वाव ।**
**परतोनि संदेह । पडला मज ॥ ८ ॥**

'आपलें उमाणें[1] । आपण उगवावें ।
मजसी तारावें । भवसागरीं ॥ ९ ॥
नामा धरी चरण । अगाध तुमचें ज्ञान ।
आपुलें नाम कोण । सांगा स्वामी ' ॥ १० ॥
येरु ह्मणें खेचर । विसा पै जाण ।
लौकिकीं मिरविणें । अरे नाम्या ॥ ११ ॥
नाम आणि रूप । दोनी जया नाहीं ।
तोचि देव पाहीं । येर मिथ्या ॥ १२ ॥
जळस्थळ काष्ठ पाषाण । पिंड ब्रह्मांड अणुरेणु ।
सर्वस्वें आपणु । साक्ष असे ॥ १३ ॥
हें जाणोनिया परते । जाणे आप आपणियातें ।
खेचर ह्मणे नामयातें । अवघाचि देव ' ॥ १४ ॥
श्रवणीं सांगितली मात । मस्तकीं ठेवियेला हात ।
पदपिंडविवर्जित । केला नामा ॥ १५ ॥

(२) खेचर विसा प्रेमाचा पिसा । तेणें नामा कैसा । उपदेशिला ॥१॥
सांगितलें गुज दाखविलें निज । पाल्हाळीं तुज काय काज ? ॥२॥
खेचर ह्मणे मज ज्ञानराज गुरु । तेणें अगोचरु नामा केला ॥३॥

ह्या अभंगांत जो अद्वयानंदाचा उपदेश विसोबा खेचरांनीं नामदेवास केला आहे तो बोधही त्यांना ज्ञानेश्वरापासूनच झाला असल्यानें येथें त्यांनीं ' मज ज्ञानराज गुरु ' असेंच म्हटलें आहे. येथें ' पदपिंडविवर्जित केला नामा ' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ असा आहे:— पद ह्म० ब्रह्म व पिंड ह्म० जीव, तेव्हां पदपिंडविवर्जित म्हणजे

१ माप, झडती. ' तेथ आपुलें तंव करणें । कर्ता कर्तव्या घे उमाणें ( ज्ञाने० १८–५०० ), ' नातरी स्वप्नविकारां समस्तां । चेउनीयां उमाणे घेतां । तो आपणया परौता । न दिसे जैसा ( ज्ञा० १८–११९१ )

...वाचनालय, सातारा



जीवभाव व ब्रह्मभाव हे दोन्ही घालवून केवळ ब्रह्म केलें, कैवल्यपदावर बसविलें असा अर्थ आहे. ' तैसे रागद्वेष निमाले । तरी ब्रह्मीचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ॥३७१॥ ते गुरुशिष्यांची गोठी । पिंडपदांची गांठी । तेथें स्थिर राहोनि नुठीं । कवणे काळीं ' ( ज्ञाने० अ. ३-२७२ )-गुरुशिष्यांच्या गोष्टींत पिंड व पद यांची गांठ पडून ह्म० जीवब्रह्मैक्य होऊन तो आपलें सुख आपणच भोगतो. अशा प्रकारें पिंड व पद यांचा उल्लेख ज्ञानेश्वरींत आला आहे तोच वरील विसोबांच्या अभंगांतही पण आलेला आहे.

विसोबांना ' खेचर ' ही पदवी ज्ञानेश्वरांनींच दिली असावी. खेचर ह्म० आकाशांतून जाणारा. ज्ञानेश्वरींत योगांत खेचर कोणास ह्मणतात तें सांगितलें आहे. योगाभ्यासानें कुंडलिनीचें तेज प्रगट होऊन ती वायुरूप होते तेव्हां योग्याचा देह सावयव असला तरी जणुं वायूचाच बनला आहे असा हलका होतो. ' तैसें होय शरीर । तैं ह्मणिजे खेचर । हें पद होता चमत्कार । पिंडजनीं' ( ज्ञाने० अ० ६-२९६ ) याप्रमाणें शरीर वायुरूप होऊन अधांत्रीं तरंगू वगैरे लागले ह्म० त्याला 'खेचर' ह्मणतात. योग्याला असल्या सिद्धि सहज सुलभ आहेत. "पै अभ्यासाचेनि बळें । एका गति अंतराळें । व्याघ्रसर्प प्रांजळें । केले एकीं " ( ज्ञाने० १२-१११ ) असो. विसोबा खेचर योगमार्ग व ज्ञानमार्ग या दोन्ही मार्गांत निष्णात असून आपल्या गुरुप्रमाणें भक्तिमार्गांतही प्रविष्ट झाले होते हें त्यांच्या दहापांच अभंगांवरून उघड दिसतें.

---

१ विसोबा खेचरांच्या वाणीवर ज्ञानेश्वरीचा संस्कार घडल्याचें आणखीही एक उदाहरण देतों. ' भवजलधि अगाध तरावया दुस्तर । रचिलें पंढरपूर चंद्रभागीं ' ह्या अभंगांत " सडियातें कासे लावीत आपण । कुटुंबियें जाण नांवें विसोबांच्या " तेथेंच " वरी प्रेमाचे पेटे बांधोनियां पोटीं । उतरी जगजेठी पैलपारु " हे दोन चरण आहेत. ज्ञानेश्वरींतही १२ व्या अध्यायांत याचसारख्याच ओंव्या आहेतः-" सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परिगृही घातले । तरियांवरी ॥ ९१ ॥ प्रेमाची पेटी । बांधली एकाचिये पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥

पंढरीनाथाचें प्रेम हें सर्वांच्याच अंगीं भिनलें होतें. विसोबा पूर्वाश्रमीं सराफी करीत. सराफ, शिंपी वगैरे लोकांत सांकेतिक आंकडे योजण्याची पद्धत तेव्हांपासून आजतागाईत आहे. ह्या आंकड्यांचा त्यांनीं शंकरावरील एका अभंगांत मौजेनें उपयोग केला आहे:—

**मुळु वदनाचा अंगुळु हाताचा । उधानु नेत्राचा स्वामी माझा ॥१॥**
**मुगुट जयाचा केवल्याआगळे काटी । पइतृ तळवटी चरण ज्याचे॥२**
**पोकु ते भागले सेली वेडावले । अंगुळुमंगी झाले थक्कित रया ।३।**
**ढकारू वदनाचा आला वर्णावया । जिव्हा चिरलिया नकळे त्यासी॥४॥**
**सद्भावें शरण आवारु जोडूनी । खेचरविसा चरणीं विनटला ॥५॥**

मुळु=पांच; अंगुळु=दहा; उधानु=तीन; केवला=एक व काटी=वीस. केवल्याआगळे काटी ह्म० एकागळे वीस अर्थात् एकवीस; पइतृ=सात; पोकू=चार; सेली=सहा; मंगी=आठ; अंगुळुमंगी=अठरा. ठकार=हजार; आवारु=दोन ( हात ). ह्या आंकड्यांचा सांकेतिक अर्थ ध्यानांत आणावा कीं विसोबा खेचर यांच्या वरील अभंगाचा अर्थ सुंदर लागतो. तो असा:—मुळु वदनाचा ह्म० पांच तोंडांचा, पंचतुंडधर; अंगुळु हाताचा ह्म० दहा हातांचा; उधानु नेत्रांचा ह्म० तीन डोळ्यांचा, त्रिनयन; जयाचा मुगुट केवल्याआगळे काटी ह्म० एकवीस स्वर्ग व ज्याचे चरण पइतृ तळवटी ह्म० सप्त पाताळ; ज्याचें स्वरूप पाहतां पोकू ह्म० चार अर्थात् चार वेद भागले, सेली ह्म० सहा अर्थात् शास्त्रें—सहा शास्त्रें वेडावलीं, अंगुळुमंगी ह्म० अठरा अर्थात् अठरा पुराणें थक्कित झालीं; ढकारु ह्म० हजार, सहस्र—वदनाचा ह्म० शेष ज्याला वर्णावयाला आला, पण ज्याचें स्वरूप न कळल्यामुळें त्याच्या जिव्हा चिरल्या; विसोबा खेचर म्हणतात कीं मी आवारु ह्म० दोन अर्थात् दोन हात जोडून त्याला शरण येऊन त्याच्या ( शंकराच्या ) चरणीं विनटलों आहे.

विसोबा खेचरांच्या उपदेशानें मी कृतार्थ झालों असें नामदेवांनीं अनेकवार म्हटलें आहे:—

खेचरें खेचरी बुद्धि अगोचरी । नामा झडकरी देवो केला ॥
अहंसोहं भाव हारपल्या श्रुती । नामयाची तृप्ती खेचरीं झाली ॥
तवं पाहें भोंवतें तंव लिंग नाहीं तेथें। आतां चरण हे केउते कोठें ठेऊं ॥
आप आपणचि हे सृष्टि शिवाची । मग ह्मणे वायांचि बोलिलों यासी

नामदेवाला विसोबांनीं:—

सर्वकाळीं परमात्मा आहे सर्वदेशी । भावना हे अहर्निशी दृढ धरी
संतसमुदाय मिळती जेथें जेथें । जाय तेथें तेथें लोटांगणीं ॥

असा बोध केला. विसोबा खेचरांनीं नामदेवास काय बोध केला हें आपण पाहिलेंच आहे. नामदेवांच्या अभंगांतही अनेक उल्लेख आले आहेत:—

'सुखाचा सुखतरू सद्गुरु खेचरू । स्वरूपसाक्षात्कारू दाखवीला॥'
'सांडोनी मीपण सद्गुरूच्या चरणा । लागलों संपूर्ण भावार्थैसी ॥'
'नामा म्हणे निकी सांपडली सोय । न विसंबे पाय खेचराचे ॥'
'नामा म्हणे माझी खेचर माउली । विठोनें दाखविली वाट मज॥'
सद्गुरूचे पाय जीवें न विसंबावे । मन वळवावें वृत्तीसहित ॥ १ ॥
डोळियाचे डोळे उघाडिले जेणें । आनंदाचें लेणें लेवाविलें ॥ २ ॥
जन्ममरणाचे फेडिले सांकडें । कैवल्यचि फुडें दाखविलें ॥ ३ ॥
मोहरले तरु पुष्पफलभारें । तेचि निराकारें सनकादिक ॥ ४ ॥
नामा ह्मणे स्वामी खेचर माउली । कृपेची साउली केली मज ॥५॥

'ग्रंथसाहेब' यांतही गुरुभक्तिपर नामदेवांचे बरेच उद्गार आहेत:—

(१) सफल जन्म मोकौ ( माझा ) गुरु कीना ( गुरूनें केला )।
दुख बिसारि सुख अंतरलीना ॥ १ ॥
ज्ञान अञ्जन मोकौ गुरु दीना ।
रामनामबिन जीवन गनहीना ॥

(२) गुरुबुद्धीमुळें नरदेहांत येऊन मी स्वर्ग जिंकला असें औषध गुरूनें दिलें. नरते 'उपजि स्वरगको जीत्यो सो औषध मै पाई ॥'

नगर वाचनालय सातारा संगणकीकृत

( ३ ) ज्या गुरूमुळें जिवंतपणीं मरणाचा सोहळा भोगता येतो, दशदिशा धांवणें थांबतें, नामीं लय लागतो, न बोलण्यासारखी गोष्ट कळून येते, देह अमृतमय होतो, 'जो गुरु दैवत छापरि छाई' ज्या गुरुकृपेमुळें देवही घराचें छप्पर शेकारायला येतो-'जो गुरुदैवत संशा तुटे । जो गुरुदैवत यम ते छूटे।' त्या गुरूला मी शरण आलों आहे: —

**बिन गुरुदेव और नहि जाई । नामदेव गुरुकी शरणाई ॥**

## नामदेवांच्या घरची मंडळी

नामदेवांच्या घरची मंडळी जनाबाईसकट पंधरा होती हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. भगवद्भक्ताच्या भक्तीचे संस्कार त्यांच्या कुटुंबीयां-वरही कसे होतात हें आपणांस नामदेवांच्या चरित्रांत पाहण्यास मिळतें. नामदेवांची व इतर संतसज्जनांची संगति व भक्तिसुखागर अशा पंढरीक्षेत्राचा वास यामुळें नामदेवांच्या घरच्या सर्व मंडळींच्या मनावर विठ्ठलभक्तीचा ठसा उमटला. नामदेवांचें त्यांच्या वैराग्यभाग्या-मुळें संसारावरचें लक्ष उडालें व प्रपंचव्यवहाराकडे दुर्लक्ष होऊं लागलें, यामुळें साहजिकच त्यांची आई गोणाई व बायको राजाई यांचे रुसवे-फुगवे कांहीं काळ चालू होते, पण नामदेवांना त्यांच्या अत्युत्कट भक्तिमार्गापासून मागें खेंचणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे असें कळून चुकल्यामुळें त्यांनीं प्राप्त झालेल्या परिस्थितीला कवटाळण्याचें ठरविलें व पुढें पुढें देव भक्ताला कसें सांभाळतो याचे त्यांना वेळोवेळीं अनुभव येत गेल्यामुळें त्यांचेंही चित्त विठ्ठलभक्तीकडे लागत गेलें. नामदेवांची आई, बहीण, मुलगे, सुना, लेकी या सर्वांनीं थोडथोडे अभंग केले, त्यांतील कांहीं आज उपलब्ध आहेत. नामदेवांचा नगारा व जना-बाईची मंजुळ सनई या आवाजांपुढें त्यांचे अस्पष्ट आवाज लोकांच्या कानांवर फारसे ऐकूं येईनासे झाले हें साहजिकच आहे. सर्वांच्या अभं-गांचें सार एकच आहे, व तें विठ्ठलभक्तिपर आहे. त्यांतल्यात्यांत नामदेवांच्या विठा नामक पुत्राच्या अभंगांत कांहीं 'राम' आहे.

नामदेवांचे पुत्र व सुना त्यांच्या पश्चात् हयात होत्या याबद्दल त्यांच्या अभंगांतच प्रमाणें सांपडतात. ‘ सर्वांनीं देह अर्पिला विठ्ठलीं । मज कां ठेविली पापिणीसी ’ अशी लाडाईनें कुरकूर केली आहे.

नामदेवांचे पुत्र नामदेवांच्या बरोबरीला आले नाहींत तरी ते त्यांना शोभणारे नव्हते असें म्हणतां येत नाहीं. त्यांचा पुत्र नारा व विशेषतः विठा यांच्या अभंगांत कांहीं स्वारस्य आहे. ‘ नामयाचा नारा ’ ‘ नामयाचा विठा ’ याप्रमाणें त्यांनीं बापाची आठवण ठेविली आहे. ‘ नामयासारिखा आणिक कोण आहे । सृष्टीमाजीं पाहे विचारूनी ’ याप्रमाणें लोकमान्य व देवमान्य बापाच्या पोटीं जन्म मिळाल्याची त्यांना धन्यता वाटत होती ही गोष्ट काय कमी आहे ? चारी भावांचे मिळून १२५ वर अभंग प्रसिद्ध आहेत, त्यांत विठाचेच ७५ आहेत. ‘ वंशपरंपरा दास तूझा ’ ‘ नारा म्हणे माझ्या बापाचें साधन । सांपडली खूण अंतरीची ’ ‘ तुझ्या नामीं अनुसरलों । तिहीं लोकीं सरते झालों ’ ‘ संतचरणींचा रजःकण । नारा नामयाचा जाण ’ असे नाराचे उद्गार आहेत, त्याचा एकच अभंग देतो. त्यांत तो आपल्या पंथाचे सुलभ लक्षण सांगत आहे:—

**आम्हां व्रत एकादशी । देव केशव तीर्थ तुळशी ॥ १ ॥**
**अनेक नेणों बा साधन । आमुचा विषय हरिकीर्तन ॥ २ ॥**
**संतसंगतीं निरंतर । प्रेमधन हें भांडार ॥ ३ ॥**
**विनवी विष्णुदासाचा नारा । आमुची ऐसी परंपरा ॥ ४ ॥**

गोंदानें नामदेवावर १६ अभंग केले आहेत पण त्यांत विठ्ठल, रखुमाई व नामदेव हे तिघेजण एकत्र जेवल्याचें पाल्हाळिक वर्णन आहे, विशेष कांहीं नाहीं. त्यांत नामदेवाची जनीसारखी नागी म्हणून दुसरी एक दासी होती असें म्हटलें आहे. नागीविषयीं कांहींच माहिती नाहीं. गोंदाच्या अभंगांत २।३ चरण मला आवडले. ‘ भजावें भजन नामयाचे परी ’ ‘ नामा विठ्ठलासी नाहीं द्वैतपण । धरिले चरण गोंदा म्हणे ’ ‘ ऐसा नामा भक्त पूर्ण केली सेवा । उद्धरिले जीवा संगतीच्या ’ हे ते चरण

होत. नामदेवांनीं महाद्वारीं समाधि घेतल्याचे गोंदा लिहितो यावरून नामदेवांचे पश्चात् तो कांहीं काळ हयात होता असें दिसतें.

'आमुचा नामा तुज गेला निरवून' 'नामदेवें सांगितलें जातां' इ० उद्गारांवरून विठाही नामदेवांचे मागें जिवंत होता असें दिसतें. माझ्या बापानें 'वृत्तींसहित मन ठेवुनि तुझे पायीं। तुझे परतें कांहीं जाणेचि ना॥ तो तूं आम्हांलागीं शब्दें न पुससी' अशी विठानें कांहीं अभंगांत देवापाशीं तक्रार केली आहे. क्वचित् 'नामयाचें विठें खवळलें' आहे! 'आमचें दुर्बळाचें ठेवणें कां ठेविलें?'

**आमुचा बाप आम्हां सांगे। भाक दिधली पांडुरंगें॥ १॥**
**'तुह्मां न विसंबें सर्वथा। तुमचा भार माझे माथा'॥ २॥**

असें असून 'आम्हां न पुससी' असें विठाचें विठोशीं भांडण आहे. 'चहूं युगें नामा सांगतोचि आहे.' बापामुळें 'अवघे वैष्णव माझे सखे' झाले हें विठा जाणत होता.

**ऐसें सुख कोठें आहे। मुक्ति मागुनि करिसी काये?॥ १॥**
**सांडुनि पंढरीची वारी। मोक्ष मागे तो भिकारी॥ २॥**
**सांडुनि वाळुवट। कां बा इच्छिसी वैकुंठ?॥ ३॥**
**मुखीं कवळ काल्याचें। ऐसे वैकुंठीं बा कैचे?॥ ४॥**
**नामयाचा विठा खेळे। बाप नामचि माझें भोळें॥ ५॥**

नामदेवाचें पारमार्थिक धन संपूर्णतया लुटणारा नामदेवाच्या पुत्रांत कोणी दिसत नाहीं, तें भाग्य 'नामयाची दासी जनी' हिला प्राप्त झालें! मांसवंशापेक्षां विद्यावंश श्रेष्ठ हें उघड आहे!

# १५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय.

## प्रास्ताविक

मागील दोन प्रकरणांत ज्ञानेश्वर व नामदेव यांची आपण ओळख करून घेतली, आतां ह्या प्रकरणांत त्यांच्या प्रभावळींतल्या इतर सद्भक्तांची व त्यांच्या कवित्वाची थोडी ओळख करून घेऊं. निवृत्तिनाथ, नामदेव, त्यांचे पट्टशिष्य परिसा भागवत, गोराकुंभार व गुरु विसोबा खेचर यांच्या अभंगवाणीचा परिचय झाला, आतां इतर संतांच्या वाणीचा परिचय करून घेऊं. प्रथम ज्ञानेश्वरांच्या दिव्य अभंगवाणीचा साद ऐकूं, व ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ह्या त्यांच्या मुख्य ग्रंथांकडे आपण पुढील प्रकरणांत वळूं. वैष्णवांच्या मेळयाचा आनंद प्रत्यकानें त्यांत भर टाकून मनसोक्त भोगला आहे. ह्या वैष्णवांत पुरुष आहेत, स्त्रिया आहेत; ब्राह्मणेतर आहेत व अस्पृश्यही आहेत, ज्ञानी आहेत व केवळ भक्तीनें मान्य झालेले साधेभोळेही आहेत. पण सर्वजण जातिकुलादिकांच्या अभिमानापलीकडे गेलेले आहेत, परमात्मसुखापुढें व परस्परप्रेमापुढें त्यांना इतर कसलीही आठवण नसे. सर्वांनीं परस्परांचें अत्युत्कट प्रेमपडिभरानें गौरव करावें व त्या गुणगौरवांत डोलावें, सुखानंद द्यावा आणि घ्यावा, असा त्यांचा हृदयाशय शुद्ध होता. हे सर्व संत संसारी होते, व हरीला सर्वस्व वाहिल्यानें त्यांनीं संसारच ब्रह्मरूप करून टाकला होता. महानुभावीयांची भिक्षावृत्ति आणि संन्यास या संतांना मान्य नव्हता ! ते जातिकुलस्वभावें आलेलें संसारकृत्य आनंदानें करीत. 'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी' याप्रमाणें सावता माळी आपल्या मळ्यांतलें काम करीत करीत असतांना गुणगुणत, जनाबाई गवऱ्या थापीत, चोखामेळा मोलमजूरी करीत, सेना न्हावी, नरहरी सोनार इ० सर्वजण आपापले धंदे संभाळून असत. ते आपल्या पोटाचा भार दुसऱ्यावर घालीत नसत. सर्वांचें अन्योन्यप्रेम इतकें होतें कीं

कोणीही कोणाचेही अभंग उतरून घेत. निवृत्तिनाथांचे अभंग सोपानकाका उतरून घेत. ज्ञानेश्वरांचे लेखक सच्चिदानंदबाबा होते हें प्रसिद्धच आहे. मुक्ताबाईचे अभंग स्वतः ज्ञानेश्वर लिहीत. जोगा परमानंदाची कविता विसोबा खेचर, सावतामाळ्याची काशिबा गुरव, व चोखामेळ्याची अनंतभट्ट हे लिहून घेत! जातिभेदाचा बागुलबोवा कोणालाही भेडसावीत नसे व संकराचा मार्गही कोणी पत्करीत नसत! गुणगौरवाचा आनंद सर्वांच्याच उदार हृदयांत सारखा भरलेला असे. भेदभावशून्य एका श्रीहरीच्या परमानंदसुखांत सर्व डोलत असत.

## १ ओवी व अभंग.

मराठी भाषेचीं स्वतंत्र वृत्तें अभंग, ओवी, साकी, दिंडी, कटाव, पोवाडे इ० होत. ज्ञानेश्वरकालींच अभंगवृत्त प्रचारांत आल्याचें दिसतें. महानुभावांत अभंगरचना नाहीं. मूळ अनुष्टुभ् वृत्तांतूनच अभंग व ओवी हीं वृत्तें निघालीं. साधा अभंग ओवीसारखा व ओवी अभंगासारखी ह्मणतां येते. ज्ञानेश्वरीची पहिलीच ओवी घ्या. ‘ ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा. ’ ही ओवी साडेतीन चरणांची असून तींत ‘ द्या ’ ह्या अक्षराची तीनदा आवृत्ति झाली आहे. अर्थात् ज्ञानेश्वरी ओवी ३॥ चरणांची व ३ यमकांची आहे. हीच ओवी अभंगाच्या धर्तीवरही म्हणतां येते. ‘ ॐनमोजी आद्या वेदप्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या आत्मरूपा ॥ १ ॥ ’ हा झाला अभंग. पुढें एकनाथांनीं ओवी ४ चरणांची व चार यमकांची बनविली. नाथभागवताची पहिलीच ओवी पहाः ‘ ॐ नमोजी जनार्दना । नाहीं भवाभवभावना । न देखोनि मीतूंपणा । नमन श्रीचरणा श्रीगुरुराया. ’ ज्ञानेश्वर व रामदास यांची ओवी आटपसर आहे, नाथांची जरा प्रशस्त आहे, वामनपंडितांच्या ओवींत तर अक्षरांचा कांहींच धरबंध नाहीं! अभंगांतही कांहीं निर्बंध नाहीं, किंबहुना तो पहिल्या पासूनच नव्हता. तीन चरणी अभंगापासून तो शंभरचरणी दोनशेंचरणी

सुद्धा अभंग आहेत, पण हे अभंग ओवीसारखे म्हणतां येतात; म्हणजे ओवी व अभंग तेथें सारखेच असतात. अभंगांत अक्षरांचा व चरणांचा निर्बंध नाहीं. ठाकठिकीची रचना तुकोबांची असल्यामुळें व त्यांचे अभंगही अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें ‘ अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ’ अशी म्हणच पडून गेली. ओवी आणि अभंग हीं दोन्हीं वृत्तें महाराष्ट्राचीं आवडतीं आहेत. तीं गायला व समजायला सुलभ असून मराठींतलें बहुतेक नामांकित वाङ्मय ह्याच दोन वृत्तांत प्रगट झालें आहे. नामदेवज्ञानेश्वरकालीं अभंगवृत्त प्रचारांत आलें. यांच्या मेळ्यांतल्या सर्व संतांनीं आपापलें हृद्गत अभंगांतच प्रकट केलें आहे. त्यांत ज्ञानेश्वर व नामदेव, मुक्ताबाई व जनाबाई, आणि चोखामेळा यांचे अभंग सर्वोत्कृष्ट व लोकप्रिय आहेत. यांच्यानंतर एकनाथ, तुकाराम, रामदास, निळोबाराय यांचे अभंग तसेच लोकप्रिय झाले आहेत. सर्व संतांनीं अभंगांच्या द्वारें भागवतधर्माचा प्रसार महाराष्ट्रभर केला व तन्निमित्तानें खेड्यापाड्यांतून व ब्राह्मणापासून अंत्यजांपर्यंत सर्वांना मराठी वाङ्मयाची गोडी लावली. आधीं ज्ञानेश्वरांच्या अभंगाकडे वळूं.

## २ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत.

ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव वेगळे व अभंगांचे कर्ते ज्ञानदेव वेगळे असा एक वाद ४० वर्षांपूर्वीं निघाला होता व त्याचें खंडणही तेव्हां झालें होतें. तो जुनावाद उकरून न काढतां आमच्या अभ्यासाचा निष्कर्ष मात्र येथें सांगतों–ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरांचे अभंग या दोहींच्या विचारसरणींत अगदीं एकरूपता आहे, बाह्यवेषांत थोडासा फरक भासला तरी त्यांचा आत्मा एक आहे. जे सिद्धांत ज्ञानेश्वरींत जशा तऱ्हेनें सांगितले आहेत तेच सिद्धांत तशाच तऱ्हेनें त्यांनीं अभंगांत सांगितले आहेत. ज्ञानेश्वरीचा वक्ताच अभंगांत बोलत आहे. ज्ञानेश्वरी हा व्यवस्थित स्वरूपाचा विचारगंभीर व प्रौढ असा मोठा ग्रंथ आहे, अभंग हे वेगवेगळ्या प्रसंगीं निघालेले स्फुट उद्गार आहेत. निवृत्तिनाथ व इतर संत यांच्यासमोर भगवंतांच्या

वाणीचा विशद् अर्थ ज्ञानेश्वरींत सांगितला आहे, नामदेवाच्या संगतींत तीर्थयात्रा करून आल्यावरच विठ्ठलभक्त संतांच्या मेळ्यांत खेळीमेळीनें वावरत असतां ज्ञानेश्वरांच्या अभंगांची रचना झाली आहे. अभंगांत मोकळेपणा अधिक असतो. दोहींकडे कृष्णभक्तीचा धागा ओतप्रोत भरला आहे, गुरुप्रसाद व सत्संग यांचा आनंद सारखाच आहे. ज्ञानेश्वरींत विठ्ठल हें नाम नाहीं व अभंगांत तें आहे याचा अतिशय करून कोणी कितीही कुतर्क काढले तरी कृष्ण आणि विठ्ठल दोन नाहींत ही गोष्ट आरशासारखी स्वच्छ आहे. भक्तांच्या मेळ्यांत आपला प्रिय कृष्णच विठ्ठलनामी आहे ह्या अधिक लोकप्रिय असलेल्या नांवाचा त्यांच्याच-साठी केलेल्या अभंगांत जर ज्ञानेश्वरांनीं अधिक वेळ उच्चार केला. असेल तर त्यानें कांहीं कृष्ण व विठ्ठल यांच्या स्वरूपांत भेद होत नाहीं ज्ञानेश्वरीची भाषा थोडी दुर्बोध आहे, अभंगांची भाषा सुलभ आहे. ज्ञानेश्वरीची प्रसिद्धी पुढें नाथांच्या वेळेपासून विशेष झाली असल्या-मुळें तिच्या भाषेची प्राचीनता कायम राहिली आहे, अभंगांची गोष्ट तशी नाहीं. अभंगांतही हरिपाठाचे अभंग इतर अभंगांहून अधिक सुलभ आहेत, कां कीं ते लक्षावधि लोकांच्या नित्यपाठांतले आहेत. यामुळें अभंगांच्या भाषेला अर्वाचीनत्व येणें साहजिक आहे. अठरापगड जातींच्या लक्षावधि लोकांच्या तोंडीं अभंग जावयाचे असल्यामुळें ज्ञानेश्वरांनीं बुद्धिपुरस्सर हे अधिक सुलभ केले असतील असेंही ह्मणतां येईल. शास्त्रग्रंथाहून अधिक सोप्या भाषेंत उत्तम ग्रंथकाराला लिहितां येत नाहीं असें म्हणण्याचें कारण नाहीं. शारीरभाष्य लिहिणाऱ्या शंकराचार्यांनीं सुलभ अशीं स्तोत्रें केलीं नाहींत काय? अभंग हे भाळ्याभोळ्या जाणत्यानेणत्या सर्वांसाठीं असतात, ग्रंथ हा जाणत्या लोकांसाठींच असतो. शिवाय भाषादृष्टीनें पाहिलें तरी ज्ञानेश्वरी व अभंग यांत त्यावेळीं लोकभाषेंत रूढ असलेले पण दीर्घकाल गेल्यामुळें आतां दुर्बोध झालेले शेंकडो शब्द आलेले आहेत.

साते, वोज, चोज, चोखट, गोमटे, वोखटें, साउमा (समोर), न होनि, वाडेकोडें, आफाविलें, माल्हाथिलें, उमाणें, माजिठे, बाहेजुभीतरी, कापडी, पोखरणी, अळुमाळ, सुढाळ, ठाण, कामारी, माथुला, अतिसो, महुर, बुंथी, बावना, गाडोरा, एकबंकी, अदट, नावेक, सोकरणें, पडिपाड, कानडा, कुवासा, वाल्हीदुल्ही, साइखडियाचें बाहुलें, नाहो, पारुषणें, आन, उगाणा, सूदलें, फुडें, वालभ, निकें, भांगारें, काश्मिरी, कुडे, निडारले, पढियंते, आव्हाटा, खेव इ० शेंकडो शब्द[1] ज्ञानेश्वरींत, अमृतानुभवांत व अभंगांत सारखेच सांपडतात. भ्रमर, चकोर, चातक, मयूर, राजहंस यांचे दृष्टांत; अंबुला, पाईक, शुकनलिकान्याय, कासवीचें दूध, चित्रीचे लेप, बहुरूपी वगैरे विषयींच्या कल्पना; योगाची शास्त्रीय प्रणाळिका; देव, संत व नामसंकीर्तन याविषयींच्या भावना–हे सर्व प्रकार जसे ज्ञानेश्वरींत तसेच व त्याच भाषेंत अभंगांतही आहेत, या कारणांस्तव ज्ञानेश्वरीकर्ते तेच अभंगांचेही कर्ते आहेत याविषयीं तिळमात्र शंका बाळगण्याचें कारण नाहीं. ज्ञानेश्वरींतील कांहीं विशिष्ट कल्पना अभंगांतही जशाच्या तशाच कशा उतरल्या आहेत हें ४।५ उदाहरणें देऊन दाखवितों. अभंगांचे आंकडे विष्णुबोवा जोगांच्या गाथ्यांतून दिले आहेत.

(१)

**ये-हवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दाटुले ।**
**ते विषयोचि वानिता जाहले । भाट जयाचे ॥** ज्ञाने० ११–१७३ ॥
**नामेंचि तरले । शुकादिक दाटुले । जडजीव उद्धरले कलियुगीं ॥**
**॥ अभंग ४२५ ॥**

---

१ 'मदवी' ह्म० वस्त्र. हा शब्द मराठी वाङ्मयांत प्रायः कोठें आढळत नाहीं, पण तो ज्ञानेश्वरींत आहे ( अ० १८–६९० ), अमृतानुभवांत आहे( प्र०७–१२६ ) व अभंगांतही आहे ( अभंग ३४९) !

वाणीचा विशद अर्थ ज्ञानेश्वरींत सांगितला आहे, नामदेवाच्या संगतींत तीर्थयात्रा करून आल्यावरच विठ्ठलभक्त संतांच्या मेळ्यांत खेळीमेळीनें वावरत असतां ज्ञानेश्वरांच्या अभंगांची रचना झाली आहे. अभंगांत मोकळेपणा अधिक असतो. दोहींकडे कृष्णभक्तीचा धागा ओतप्रोत भरला आहे, गुरुप्रसाद व सत्संग यांचा आनंद सारखाच आहे. ज्ञानेश्वरींत विठ्ठल हें नाम नाहीं व अभंगांत तें आहे याचा अतिशय करून कोणी कितीही कुतर्क काढले तरी कृष्ण आणि विठ्ठल दोन नाहींत ही गोष्ट आरशासारखी स्वच्छ आहे. भक्तांच्या मेळ्यांत आपला प्रिय कृष्णच विठ्ठलनामी आहे ह्या अधिक लोकप्रिय असलेल्या नांवाचा त्यांच्याच-साठी केलेल्या अभंगांत जर ज्ञानेश्वरांनीं अधिक वेळ उच्चार केला असेल तर त्यानें कांहीं कृष्ण व विठ्ठल यांच्या स्वरूपांत भेद होत नाहीं ज्ञानेश्वरीची भाषा थोडी दुर्बोध आहे, अभंगांची भाषा सुलभ आहे. ज्ञानेश्वरीची प्रसिद्धी पुढें नाथांच्या वेळेपासून विशेष झाली असल्या-मुळें तिच्या भाषेची प्राचीनता कायम राहिली आहे, अभंगांची गोष्ट तशी नाहीं. अभंगांतही हरिपाठाचे अभंग इतर अभंगांहून अधिक सुलभ आहेत, कां कीं ते लक्षावधि लोकांच्या नित्यपाठांतले आहेत. यामुळें अभंगांच्या भाषेला अर्वाचीनत्व येणें साहजिक आहे. अठरापगड जातींच्या लक्षावधि लोकांच्या तोंडीं अभंग जावयाचे असल्यामुळें ज्ञानेश्वरांनीं बुद्धिपुरस्सर हे अधिक सुलभ केले असतील असेंही ह्मणतां येईल. शास्त्रग्रंथाहून अधिक सोप्या भाषेंत उत्तम ग्रंथकाराला लिहितां येत नाहीं असें म्हणण्याचें कारण नाहीं. शारीरभाष्य लिहिणाऱ्या शंकराचार्यांनीं सुलभ अशीं स्तोत्रें केलीं नाहींत काय? अभंग हे भाळ्याभोळ्या जाणत्यानेणत्या सर्वांसाठीं असतात, ग्रंथ हा जाणत्या लोकांसाठींच असतो. शिवाय भाषादृष्टीनें पाहिलें तरी ज्ञानेश्वरी व अभंग यांत त्यावेळीं लोकभाषेंत रूढ असलेले पण दीर्घकाल गेल्यामुळें आतां दुर्बोध झालेले शेंकडो शब्द आलेले आहेत.

साते, वोज, चोज, चोखट, गोमटे, वोखटें, साउमा (समोर), न होनि, वाडेकोडें, आफाविलें, माल्हाथिलें, उमाणें, माजिठे, बाहेजुभीतरीं, कापडी, पोखरणी, अळुमाळ, सुढाळ, ठाण, कामारी, माथुला, अतिसो, महुर, बुंथी, बावना, गाडोरा, एकबंकी, अदट, नावेक, सोकरणें, पडिपाड, कानडा, कुवासा, वाल्हीदुल्ही, साइखडियाचें बाहुलें, नाहो, पारुषणें, आन, उगाणा, सूदलें, फुडें, वालभ, निकें, भांगारें, काश्मिरी, कुडे, निडारले, पढियंते, आव्हाटा, खेव इ० शेंकडो शब्द[1] ज्ञानेश्वरींत, अमृतानुभवांत व अभंगांत सारखेच सांपडतात. भ्रमर, चकोर, चातक, मयूर, राजहंस यांचे दृष्टांत; अंबुला, पाईक, शुकनलिकान्याय, कासवीचें दूध, चित्रीचे लेप, बहुरूपी वगैरे विषयींच्या कल्पना; योगाची शास्त्रीय प्रणाळिका; देव, संत व नामसंकीर्तन याविषयींच्या भावना—हे सर्व प्रकार जसे ज्ञानेश्वरींत तसेच व त्याच भाषेंत अभंगांतही आहेत, या कारणांस्तव ज्ञानेश्वरीकर्ते तेच अभंगांचेही कर्ते आहेत याविषयीं तिळमात्र शंका बाळगण्याचें कारण नाहीं. ज्ञानेश्वरींतील कांहीं विशिष्ट कल्पना अभंगांतही जशाच्या तशाच कशा उतरल्या आहेत हें ४।५ उदाहरणें देऊन दाखवितों. अभंगांचे आंकडे विष्णुबोवा जोगांच्या गाथ्यांतून दिले आहेत.

(१)

**येऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दाइुले ।**
**ते विषयोचि वानिता जाहले । भाट जयाचे ॥** ज्ञाने० ११–१७३ ॥
**नामेंचि तरले । शुकादिक दाइुले । जडजीव उद्धरले कलियुगीं ॥**
**॥ अभंग ४२५ ॥**

---

१ 'मदवी' ह्म० वस्त्र. हा शब्द मराठी वाङ्मयांत प्रायः कोठें आढळत नाहीं, पण तो ज्ञानेश्वरींत आहे ( अ० १८–६९० ), अमृतानुभवांत आहे( प्र०७–१२६ ) व अभंगांतही आहे ( अभंग ३४९) !

( २ )

स्तुति कांहीं न बोलणें । पूजा कांहीं न करणें ।
सन्निधि कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ॥ ज्ञाने० १८–२५ ॥
कांहीं न करिजे तें तुझी सेवा । कांहीं नव्हेसि तें तूं देवा ॥ १ ॥
स्तुति करणें तें तुझी निंदा । स्तुतिजोगा नव्हेसि गोविंदा ॥ ३ ॥
बाप रखुमादेवीवरा विट्ठला। येवढा साभिलाषु कां दाविला अ० ३६०

( ३ )

ये-हवीं तरी माझियां भक्तां । आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ? ॥ ज्ञाने० १२–८५ ॥
राजयाची कांता काय भीक मागे । अ० २५२॥

( ४ )

विषयविषाचा पडिपाडु । गोड परमार्थ लागे कडू ।
कडू विषय तो गोडू । जीवासी जाहला ॥ ज्ञाने० १०–१५९॥
परमार्थ तो कडू विषय तो गोडू । अ० ३८९॥

( ५ )

जैसा नक्षत्राचिया आभासा–। साठीं घात जाला तया हंसा ।
माजीं रत्नबुद्धीचिया आशा । रिगोनियां ॥ ज्ञाने० ९–१४६॥
रत्नाचिया आशा घात जाला तया राजहंसा । ज्ञणें भुलों नको
तें सारें रें अ० ५१८॥

( ६ )

आतां गृहादिक आघवें। हें कांहीं नलगे त्यजावें ।...॥ ज्ञाने० ५–२२॥
म्हणोनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां ।
आहे योगसुख स्वभावतां । आपणपांचि ॥ ज्ञाने० ६–५१॥
कां सांडिसी गृहाश्रम । कां सांडिसी क्रियाकर्म । सारा अभंग ४६६॥

( ७ )

पाहे पां बंधभावना दृढा । नळियेवरी तो बापुडा ।
काय मोकळिया चवडा । न पवेचि पुसा ? ॥ ज्ञाने० १८–३९३
मिथ्या मोहफांसा शुक नलिक जैसा । मुक्त परि अपैसा पळो नेणें ॥
अभंग ५०५ ॥

ह्यावरून लक्ष्यांत येईल कीं ज्या मुखांतून ज्ञानेश्वरी प्रगट झाली त्याच मुखांतून हे अभंगही प्रगट झाले आहेत. भाषा, शब्दरचना, विचारसरणी, उपमादृष्टांतरूपकादि साहित्य, अध्यात्म, योगभक्ति इ० सर्व बाजूंनीं विचार करितां ज्ञानेश्वरीकर्त्याहून अभंगकर्ते ज्ञानदेव भिन्न आहेत असें मानायला यत्किंचितही कारण नाहीं. तेंच व्यापक ज्ञान, तोच भगवद्भक्तीचा जिव्हाळा, तेच स्वात्मसुखाचे उद्गार–दोहींकडे एकच हृदय, एकच भाषापद्धती, एकच कवित्व ! तात्पर्य ज्ञानेश्वरी व अभंग सर्वस्वी एकरूप आहेत, दोहींचा वक्ता एकच आहे व ते ज्ञानेश्वर होत.

## ३ ‘ बाप रखुमादेवीवर ’

ज्ञानेश्वरांच्या अभंगांतही ज्ञानेश्वरीची बहार आहे. प्रत्येक अभंगाच्या शेवटीं जेथें कविनाम येतें तेथें ज्ञानदेव, ज्ञानेश्वर, निवृत्तिदास, पण प्रायः **बाप रखुमादेवीवर** असा नामनिर्देश असतो. ‘ बाप रखुमादेवीवर’ या पदाचा थोडासा उलगडा केला पाहिजे. रखुमादेवी अर्थात् रुक्मिणी व रखुमादेवीचा वर म्ह० कृष्ण–विठ्ठल. बाप म्ह० जनक, मोठा, व्यापक. ज्ञानेश्वरांच्या आईबापांचीं नांवेंही हींच होती, रुक्मिणी आई व विठ्ठल बाप–रखुमादेवीवर या पदानें उपास्यांच्या नांवाचा त्याचप्रमाणें आईबापांच्या नांवाचाही बोध होतो. आतां विठ्ठलरखुमाईच्या सगुणमूर्तीचें अधिष्ठान पंढरपुरास आहे, व त्यांच्या आध्यात्मिक स्वरूपाचा बोध अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणभर आहे, तो तेथेंच पहावा. सांख्य ज्याला पुरुषप्रकृति म्हणतात, व अमृतानुभवांत ज्याला शिवशक्ति म्हटलें आहे ( रामदास ज्याला गणेशशारदा म्हणतात ) तेच

विठ्ठलरखुमाई होत. दोन्ही मिळून एकच, एकपण न फुटूं देतां एकाचे दोन भासतात. ' स्त्रीपुरुषनामभेदें । ऐकलें शिवपण नांदे–' असो वारकऱ्यांत विठ्ठलरखुमाई किंवा **विठोबारखुमाई** किंवा नुस्ते विठ्ठल या नामाचें जें भजन आहे अथवा रामदासीसंप्रदायांत सीतापति रामाचें जें भजन आहे किंवा उत्तरेकडे ' **राधेश्याम** ' असें जें भजन चालू आहे किंवा ' **जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ** ' असें कालिदासानें म्हटल्याप्रमाणें शिवपार्वतीचें जें भजन शिवभक्तांत रूढ आहे त्या सर्व भजनांत केवढें उदात्तपण आहे हें अमृतानुभवाचें हें प्रकरण किंवा गीतेच्या १३ व्या अध्यायांतला **प्रकृतिपुरुष**विवेक नीट उमगून घेतल्यानेंच कळणार आहे. उपास्याच्या नामगजरांत उपास्याचें प्रेम चित्तांत दाटणें, अहंभाव किंवा जीवभाव विसरून जाणें, त्यांत आपण विलीन होणें, हाच मुख्य हेतु असतो. अहंभाव जसजसा विरत जातो तसतसा स्वानंदानुभव प्रत्ययास येतो हें नामप्रेमी आहेत त्यांना ठाऊक आहेच !

## ४ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी.

ज्ञानेश्वर हे **कृष्णभक्तीचे आचार्य** आहेत. श्रीकृष्णाचें बालरूप, त्याच्या बाललीला, गोपांचें व गोपींचें त्यावरील विशुद्ध प्रेम, गोपींच्या यशोदेजवळ गाऱ्हाणीं, गोपींच्या विरहव्यथा, या सर्व गोष्टी अनेक कृष्णभक्तांनीं आपापल्यापरीनें गायिल्या आहेत, त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांनींही गायिल्या आहेत. यांच्या वर्णनांत कोमलता आहे, काव्यदृष्टि आहे व भक्ति तर आहेच आहे. गोपींच्या वर्णनांत त्यांनीं त्यांचा अत्युत्कट भक्तिप्रेमाच घेतला आहे. कृष्णाच्या सर्वच बाललीला मधुर आहेत. तो ' जटिल, धुळिधूसर, दोंदिल ( बाळसेदार )' असा गौळियांच्या छंदानें ' थुरथुर चालत भूमी पाय ठेवित ' यशोदेच्या अंगणीं खेळणारा ' बाळचंद्र ' कोणाचें मन आकर्षित नाहीं ? ' विश्वप्रतिबिंबाचें बिंब तो कान्हया श्रीहरि ' गोपगोपींत आपल्या मनोहरवेषानें व रम्य लीलांनीं सर्वप्रिय कसा होणार नाहीं ? त्याला ' वोसंगी ' ( मांडीवर ) घेऊन गोपी मोठ्या औत्सुक्यानें स्तनपान देत.

तुझिये निढळीं कोटिचंद्र प्रकाशे ।
कमलवदन हास्यवदन हांसे ॥ १ ॥
हाल का रे कृष्णा डोल का रे कृष्णा ।
घडिये घडिये गुज बोल का रे कृष्णा ॥ २ ॥
उभा राहोनियां कैसा हालवितो बाहो ।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलु नाहो ॥ ३ ॥

* * * *

भोंवरी सांडूनि पाव ठेवी रे गोपाळा ।
नाच चिदानंदा सुख होईल सकळा ॥ १ ॥
रंगीं रंगला रे रंगीं रंगला रे ।
आदिमध्यांतत्रिगुणरहित विश्वीं प्रकाशला रे ॥ २ ॥

* * * *

पावया छंदें तल्लीन गोविंदें । नाचती आनंदें गोपाळ कैसें ॥ १ ॥
यमुनेच्या तीरीं गाई चारी हरी । गोपाळ गजरीं आनंदले ॥ २ ॥

* * * *

लक्ष लावुनि अंतरीं । कृष्णा पाहती नरनारी ।
लावण्यसागरु हरी । परमानंदु ॥ १ ॥
छंदें छंदें वेणु वाजे । त्रिभुवनीं घनु गाजे ।
उतावेळ मन माझें । भेटावया ॥ २ ॥
ब्रह्मविद्येचा पुतळा । गाई राखितो गोवळा ।
श्रुति नेणवे ते लीळा । वेदां सनकादिकां ॥ ३ ॥

* * * *

विसरल्या चार विसरल्या पार । तल्लीन साचार कृष्णमूर्तीं ॥ १ ॥

* * * *

आवडीचें वालभ ब्रह्म पुंजाळलें । गोपवेषें गाई राखे ॥ १ ॥
कांबळीची बुंथी घेउनि कल्पद्रुमातळीं। त्रिभंगी ठाण मांडिले गे माय२

* * * *

**माथां मोरपिसा वेठी गंडस्थळीं पडे दीप्ती ।**
**स्वयें विस्मित श्रीपती तेजःपुंज ।**
**तरुघोंस खोंविले शिरीं वेणु ठेवुनि अधरीं ।**
**नंदरायाचा खिल्लारी वोज काय सांगूं गे माय ।**

* * * *

**कृष्ण परब्रह्मपुतळा । कीं आनंदाची कळा ।**
**तो हा भोगविताहे लीळा । मदनाची गे माय ॥**

अशा त्याच्या दिव्यरूपगुणांनीं वेड्यापिशा झालेल्या गौळणी मथुरेच्या बाजारांत ( साते ) डोकीवर दहींदूध घेऊन विकायला बाहेर पडल्या कीं ' दहीं घ्या दूध घ्या ' म्हणावयाच्या ऐवजीं ' गोविंदु घ्या कुणि गोपाळु घ्या ' असें म्हणत गांवभर हिंडत !

**दुडीवरी दुडी साते निघाली । गौळणी गोरसु म्हणों विसरली ॥**
**गोविंदु घ्यावो दामोदरु घ्यावो । तंव बोलती मथुरेच्या नारी वो॥**

आयांना ' लेंकुरें नसतील काय वो घरोघरीं ?। परी हे दशा वेगळी ग बाई हो !' असें ' निर्गुण ' लेंकरूं त्रैलोक्यांत नाहीं ! हा न दिसला तर ' जीव निघों पाहे व आला तर उरों नेदी कांहीं !' " नेणों कैसें बाळसें । डौरलें डोळां लासे । माजी महुरता हें हांसे । भोळिवेचे देखिलियांचि पुरें । घालूनि दृष्टीचें भुरें । मग तें हृदयीं वावरे । इच्छासवें गे माय ॥ ' यशोदेला याचीं गाऱ्हाणीं सांगायला जातांना ' गौळणी उचंबळत ब्रह्मरसें !' त्याचा विरह त्यांना सोसत नसे !

**जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा। तुजवांचूनि केशवा अनु नावडे**
**जीवें अनुसरलिये अजुनि कां नये। वेगीं आणा तो सये प्राण माझा॥**
**सौभाग्यसुंदरु लावण्यसागरु । बाप रखुमादेवीवरु श्रीविठ्ठलु ॥**

कृष्णविरहानें वेडावलेल्या गोपींचा प्रेमा 'आजि शुभ लवे लोचनु' या अभंगांत पहावा. 'वृंदावनीं आनंदु रे । विठ्ठलदेव आळविती रे' ह्या अभंगपादावरून वृंदावनीचा कृष्ण म्हणजेच पंढरीचा विठ्ठल हें उघडच आहे.

'रूप पाहातां लोचनीं । सुख जालें वो साजणी ॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा' ह्या ज्ञानेश्वरांच्या अभंगानें वारकरीकीर्तनास आरंभ होत असतो. साजणी ह्म० सखे किंवा सहाशास्त्रें. 'बहुता सुकृताची जोडी । ह्मणुनि विठ्ठलीं आवडी ॥ सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर' असा वरील अभंगाचा उत्तरार्ध आहे.

हा विठ्ठल विटेवर उभा व कटीवरी कर देऊन उभा आहे, पण हा वास्तविक कोण आहे ! 'बाप रखुमादेवीवरु विठ्ठलु नंदनंदनु । आदि अंतीं एक पूर्ण सनातनु गे माय ।' वसुदेवकुमरु देवकीनंदनु हाच 'दिस चहूंकडे एक तत्व' म्ह० श्रुति ज्याला परब्रह्म म्हणतात तोच नंदनंदनु येथें पंढरीस विटेवर उभा आहे आणि तोच 'ज्ञानविज्ञान हरि । नांदे आमुच्या घरीं । बाह्यजुअभ्यंतरीं । जाला देव'—आमच्या आंत-बाहेर तोच भरून राहिला आहे. ही घनानंदमूर्ति, हें देहुडें ठाण ( दीड पायावरची मुरलीधर कृष्णाची मूर्ति ),

**त्रिभंगी देहुडा ठाण मांडूनिया माये ।**
**कल्पद्रुमातळीं वेणु वाजवीत आहे ॥ १ ॥**
**गोविंदु गे माय गोपाळु वो ।**
**सबाह्याभ्यंतरीं अवघा परमानंदु वो ॥ ध्रु० ॥**

असा हरि आम्ही पाहिला आहे. आकाशतत्वाहून पलीकडचा 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' याप्रमाणें श्रुतीनें वानिलेला हरि 'पाहते व पाहणें सोडून' आम्ही पाहिला आहे. कोठें ? पंढरीस विटेवर तो प्रत्यक्ष उभा आहे:—

**सत्यज्ञानानंद गगनाचें प्रावर्ण । नाहीं रूप वर्ण गुण जेथें ॥ १ ॥**
**तो हा रे हरी पाहिला डोळेभरी । पाहते पाहणें दुरी सारोनियां ॥ध्रु०॥**
**ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निजज्योती । ते हे उभी मूर्ती विटेवरी ! ॥२॥**

* * * *

**योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी ।**
**पाहतां पाहतां मना न पुरे धणी ॥ १ ॥**

**देखिला देखिला गे माय तो हा देवाचा देवो ।**
**फिटला संदेहो निमाले दुजेपण ॥ ध्रु० ॥**
**अनंतवेषीं अनंतरूपीं देखिले म्यां त्यासी ।**
**रखुमादेवीवर विठ्ठलीं खूण बाणली कैसी ॥ २ ॥**

या देवाचें दर्शन कसें होतें म्हणाल, तर हा अगणित लावण्याचा पुतळा असून 'न वर्णवे तेथींची शोभा.' हा कानडा ह्म० दुर्गम आहे. 'कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु । तेणें मज लाविले वेधी ।' हा मूर्तीची 'खोळबुंथी' घेऊन बसला आहे व आळविला तरी हातीं लागत नाहीं ! त्याच्या गांठभेटीचा थाट्च कांहीं न्यारा आहे. 'शब्देंवीण संवादु दुजेवीण अनुवादु'–परेपरतें त्याचें बोलणें वैखरीनें म्यां कसें सांगावें ? 'पायां पडूं गेलों तंव पाउलचि न दिसे । उभाचि स्वयंभु असे । समोर कीं पाठीमोरा नकळे । ठकचि पडिलें कैसें !' त्याला आलिंगन देण्यास माझा जीव आसवला व बाहू स्फुरूं लागले, म्हणून 'खेव देऊं गेलें तंव मीचि मी एकली !' रूप न्याहाळूं लागलें तेव्हां 'दृष्टीचा डोळां पाहूं गेले तंव भीतरी पालटूं झाला.' हा आनंद भोगायला पाहिजे असेल तर 'सकळ नेणोनियां आन ।एक विठ्ठलचि जाण–' एका विठ्ठलावांचून बाकी सर्व विसरून जा, त्याच्या ध्यानांतच एकमय हो. 'हेचि भक्ति हेंचि ज्ञान । एक विठ्ठलचि जाण' ही गुरुगम्य खूण गुरुभक्त होऊन पावावी.

**हरि आला रे हरि आला रे । संतसंगें ब्रह्मानंदु झाला रे ॥ १ ॥**
**हरि पाहीं रे हरि ध्याई रे । हरिवांचुनि दुजें नाहीं रे ॥ २ ॥**

हरि हा आनंदमय आहे. सत्संगांत नामसंकीर्तनानें व ध्यानाभ्यासानें हरि जोडतो, दुसरे कांहीं आयास करायला नकोत.

**हृदयपरिवारीं कृष्ण मनोमंदिरीं । आमुच्या माजघरीं कृष्ण बिंबे ॥**

आमच्या हृदयांत 'सावळी विराजे कृष्णमूर्ती' म्हणून नित्य कृष्णसुखानें आम्ही पूर्ण आहोंत.

**सावळें सगुण सकळा जीवांचें जीवन ।**
**घनानंद मूर्ति पाहतां हारपलें मन ॥ २ ॥**

**शून्य स्थावर जंगम व्यापूनि राहिला अकळ ।**
**बापरखुमादेवीवर विठ्ठलु सकळ ॥ ३ ॥**

याला म्हणावें तरी काय ? याला 'सगुण म्हणों कीं निर्गुण,' 'स्थूल म्हणों कीं सूक्ष्म', 'साकार म्हणों कीं निराकार' 'दृश्य म्हणों कीं अदृश्य'–अनुमानेना, अनुमानेना, म्हणून या गोविंदाला वेद 'नेति नेति' म्हणतात; आम्ही म्हणतों कीं सगुणनिर्गुण, स्थूलसूक्ष्म, साकारनिराकार, दृश्यादृश्य, व्यक्ताव्यक्त–हा सारा एक गोविंदच आहे. एका गोविंदावांचून अणुरेणु रिता नाहीं. आहे नाहीं जाऊन हा विठ्ठलच एकी एक उरला आहे 'हा रखुमादेवीवर विठ्ठलु। हृदयाआंतु रया.' याला न्याहाळूं जातां 'मनाचे नयन उमलताती' हा उपनिषदांचा गाभा व सौंदर्याची शोभा–'परी देहुडा पाउली । वृंदावनीं उभा' आहे.

**देव आहे जैसा तैसा नेणवे सहसा । भांबावला कैसा विश्वजनु ॥**

हा सर्वगत, निराळा, अद्वैत, पण जन याला मूर्त करून ध्यातात. 'तो येकट येकला रचला ना वेंचला । आदिअंतीं संचला । अनंतपणें' त्याला यथार्थ जाणून भक्तिभावानें भजावें, तो प्रेमभावाला वश आहे. असा हा आमचा विठ्ठल आहे! तो श्रीगुरुकृपेनें आमच्या हृदयीं ठसावला आहे, यामुळें 'अंतरीच्या सुखा नाहीं पै मर्यादा' असा परमानंद आम्ही निरंतर भोगीत आहोंत, 'मरणाची येरझार खुंटली' आहे, 'केशव सहज सर्वभूतीं प्रत्ययाला येत आहे:—

**इवलेसें रोप लावियेलें द्वारीं ।**
**त्याचा वेलु गेला गगनावरी ॥ १ ॥**
**मोगरा फुलला मोगरा फुलला ।**
**फुलें वेचितां अतिभारु कळियांसी आला ॥**

* * * *

**पांचासहित लयातीत जालिये वो ।**
**प्रेमभक्ति अनुसरले काळया रूपासी वो ॥ १ ॥**

नीळ, घननीळ, मेघश्याम, श्यामसुंदर अशा कृष्णाच्या रूपाला प्रेम-भक्तीनें अनुसरल्यामुळें मी आतां कार्यरूप जीं पंचभूतें त्यांच्यासुद्धां मरणाच्या पार गेलों आहे. ‘ बापरखुमादेवीवरें आतां जन्मावेगळें केलें ’ आहे.

## ५ ‘ गोपाळेविण नुद्धरिजे ’

भगवंताच्या प्राप्तीसाठीं कितीही केवढीही साधनांची आटाटी केली तरी साक्षात् परमात्माकडूनच अखेरचा महल्लाभ झाला पाहिजे, त्याच्या प्रसादावांचून जीवाचा उद्धार होत नाहीं, चिदचित्ग्रंथी सुटत नाही, रहस्याचा उकल होत नाहीं, म्हणून त्याला सर्वभावानें सर्वकाळ शरण असावें हाच जीवाचा मुख्य धम ठरतो. लहानमोठे लक्षावधि दीप लावले किंवा कोट्यवधि नक्षत्रतारा आकाशांत चमकल्या तरी सूर्यनारायण प्रगट झाल्यावांचून रात्र सरत नाहीं व दिवस उगवत नाहीं; त्याप्रमाणें कितीही साधनें केलींत तरी नारायणावांचून अविद्येची रात्र संपत नाहीं व आत्मप्रभेचा दिवस उगवत नाहीं:—

**दीपदीपिका शशी तारा होतु का कोटीवरी रे ।**
**परी न सरे निशी नुगवे दिवसु दिनकरनाथेविण जियापरी रे ॥१॥**
**नुद्धरिजे नुद्धरिजे नुद्धरिजे गोपाळेविण नुद्धरिजे ॥ ध्रु० ॥**

आणिक एक सुरस दृष्टांत. नगराच्या भोंवतील तटाला प्रदक्षिणा घालण्यांत जन्म घातला तरी वेशीपाशील द्वाराशिवाय नगरांत प्रवेशच होत नाहीं, त्याप्रमाणें भजनपूजनयज्ञयागादि केल्याचें सार्थक साक्षात् भगवान् कृपा करून कोडें सोडवतील तरच होणार आहे:—

**नगर भ्रमतां जन्म जावो परि प्रवेशु एक्या द्वारें रे ।**
**तैसा यजिजो भजिजो पुजिजो परि उकलु एक नंदकुमरु रे ॥२**
**नुद्धरिजे नुद्धरिजे नुद्धरिजे गोपाळेविण नुद्धरिजे ॥ ध्रु० ॥**

भगवंतावांचून जीवाचा उद्धार कोणीही करूं शकत नाहीं हें त्रिवार ज्ञा० निश्चयात्मक सांगतात. यापुढें सदर पदांत दृष्टांतांची नुस्ती गर्दी

उडवून दिली आहे. शरीर सर्वावयवी सांग आहे पण त्यांत जीव नाहीं तसा विठ्ठलदेवानें ज्याचा अंगीकार केला नाहीं तो वक्ता व तसाच श्रोता यांचा धिक्कार असो. शिरावांचून देह, उदकावांचून नदी, चंद्रावांचून आकाश 'तैसें हरिविण जिणें असार रे.' **ज्याच्या अंतःकरणांत रुक्मिणीरमण आहे तो चांडालही उद्धरतो व नाहीं तो संन्यासीही भवबंधांतून सुटत नाहीं!** मोराच्या पिसावरचे डोळे किंवा अकाळीचे मेघ तशीं गोपाळावांचून मनुष्याचीं सर्व कर्में निष्फळ आहेत. हृदयांत घनश्याम श्रीहरि ठाण मांडून उभा ठाकला नाहीं तोंवर यमनियमादि अष्टांगयोगाचा कांहीं उपयोग नाहीं. उच्चनीचभाव किंवा द्वेषाद्वेष हे मावळले नाहींत तोंवर कर्माचे कष्ट सोसूनही सुखलाभ होणार नाहीं. 'आतां असोत हें भेदाभेद आम्ही असो एक्या बोधें रे'–ही सारी निवृत्तिनाथांची कृपा आहे. उपमादृष्टांतादिकांनीं कवित्वाचा रंग भरण्याची ज्ञानेश्वरांची हातोटी त्यांच्या अभंगांतहि दृष्टीस पडते, हें वरील पदावरून वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. तथापि आणखी १।२ सुंदर उदाहरणें देतों:—

**मलयानिळ शीतळु पालवीं नये गाळूं।**
**सुमनाचा परिमळु गुंफितां नये ॥ १ ॥**
**तैसा जाणा सर्वेश्वरु म्हणों नये सानथोरु।**
**त्याच्या स्वरूपाचा निर्धारु कवण जाणे ॥ २ ॥**

अणूपेक्षां सान ह्म० सूक्ष्म व आकाशापेक्षां मोठा ( अणोरणीयान् महतो महीयान् ) अशा परमात्म्याच्या स्वरूपाचा निश्चय कोणीं जाणावा! शीतळ मलयवात पदरांत गाळून घेतां येत नाहीं, पुष्पांची माळ गुंफतां आली तरी त्यांच्या परिमळाची माळ गुंफतां येत नाहीं, 'मोतियाचें पाणी भरूं नये रांजणीं'– मोत्याला पाणी ( तेज ) असतें म्हणून काय त्याच्या पाण्यानें रांजण भरितां येतील? आकाशाला गवसणी कोण घालील? डोळ्यांतली बाहुली काढून काय हातांत धरितां येईल? विठ्ठल-

रखुमाईचें भांडण कोण मिटवील म्ह० प्रकृतिपुरुष किंवा शिवशक्ति यांचें यथार्थ ज्ञान होणें दुर्घट आहे म्हणून ' तया विठ्ठलचरणीं शरण ज्ञानदेवो. ' प्रियवस्तु मनांत निरंतर असते यामुळें ती दूर असली तरी जवळच आहे:—

**पढियंतें मानसीं बहु वसे । असे दूरी तें जवळींच वसे रया ॥ध्रु०॥**

या सिद्धांताला दृष्टांत मजेचे दिले आहेत. ' दो लक्षीं सोम अंबरीं । त्याचे गुण उमटती सागरीं–' चंद्र दोन लक्ष मैलांवर आहे तरी त्याचा प्रभाव सागरावर दिसतो ( भरतीओहटी होते त्यावरून ) ! मेघ आकाशांत, आणि ' क्षितिवरी नाचती मयूरें ! ' चंद्र गगनांत तळपतो आणि 'अमृत घेवों जाणती चकोर ! ' सत्तावीस नक्षत्रें असतांना स्वातीनक्षत्राचाच पाऊस पडला कीं त्याचे थेंब शुक्तिसंपुटें ( समुद्रांतल्या शिंपा ) झेलतात व त्याचीं मोत्यें बनतात ! तात्पर्य, चित्तांत प्रेम असलें कीं वस्तु दूर असली तरी जवळच !

ज्ञानेश्वर सांगतात कीं ' अष्टांगयोगें न शिणिजे '—यमनियमादि बिकट योगसाधनांच्या नादीं लागूं नकोस. मग काय करावें ह्मणशील तर ' वाचा गीत गाइजे । वाचा गीत गाइजे '—वाणीनें देवाचे गुण गात रहा. ' गीतछंदें अंग डोलिजे । लीलाविनोदें संसार तारिजे रया '—हरिगुणगायनाच्या रंगीं दंग रहा म्हणजे संसार लीलेनें तरून जाशील. ' रखुमादेवीवर विठ्ठल नामें जोडे—हा उपाय कीजे '—दुसऱ्या उपायांच्या नादीं लागूच नकोस ! प्रणवाचा विचार करूनही विठ्ठल आकळत नाहीं, पण तो ' संतांचे संगती प्रेमाच्या कल्लोळा । आनंदें गोपाळांमाजी खेळे ॥ बाळे भोळे भक्त गाताती साबडे । त्यांचें प्रेम आवडे विठोबासी '—देव प्रेमळभक्तांच्या मेळयांत सहज सांपडतो. वैष्णव आनंदानें नाम गातात तेव्हां ' चौदाही भुवनें भरती परब्रह्में '—तो सुखसोहळा आम्हांला पंढरीस नित्य भोगायला मिळतो, म्हणून ' सकळही गोत माझें पंढरीसी जाण. ' देव सर्वत्र व्यापक आहे,

सर्वांतर्यामी आहे, हें शब्दानें कळलें तरी तो साधुसंगांत प्रत्यक्ष होतो ! ' सुलभ सोपारा सर्वांघटीं असती । साधुसंगें दिससी आम्हां रया ' संत तेथें नाम व नाम तेथें नामी म्ह० देव. देव भक्त आणि नाम हा त्रिवेणीसंगम नित्य आहे. देव ' सकळ मंगळमंगळनिधी ' आहे. त्याचें नाम गायिलें जातें तेथें पाप व दुःखशोक औषधालाही मिळत नाहीं.

**रामकृष्ण गोविंद गोपाळा । तूं माय माउली जीवीचा जिव्हाळा ॥**
**तुझियेचि नामें सकळ संदेहो फिटला । बाप रखुमादेवीवरा विठ्ठला गा।**

नारायणनामानें ' उत्तमापासुनि अंत्यजवरी ' सर्वांना मुक्तीचा दरवाजा खुला ठेवला आहे, म्हणूनच रामकृष्ण हीं दोन गोडनावें हृदयांत स्मरा व ' आपुली आपण करा सोडवण । संसारबंधन तोडा वेगीं '

**दिनु तैसी रजनी जाली गे माये ।**
**अवस्था लावूनि गेला अजुनि कां नये ।**
**गरुडवाहना गुणगंभीरा येईं गा दातारा ।**
**बाप रखुमादेवीवरा श्रीविठ्ठला ॥**

याप्रमाणें देवाला प्रेमपडिभरानें नित्य आळवितां व त्याच्या नामरूपीं चित्त जडतां देव सहजच अंगाला येतो.

**आजी सोनियाचा दिनु । वर्षे अमृताचा घनु ॥ १ ॥**
**हरि पाहिला रे हरि पाहिला रे ॥ ध्रु० ॥**
**सबाह्याभ्यंतरीं अवघा व्यापक मुरारी ॥ २ ॥**
**बरवा संतसमागमु । प्रगटला आत्मारामु ॥ ३ ॥**
**कृपासिंधु करुणाकर । बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥**

* * * *

**सोनियाचा दिवस आजी अमृतें पाहला ।**
**नाम आठवितां रूपीं प्रगट पै झाला ॥ १ ॥**
**सुखाचिये गोठी सुख आलें भेटी ।**
**यया लाभासाठीं जीव वेंचिला गे माय ॥ २ ॥**

ज्ञानेश्वरांच्या संगतींत पामरालाही ' सर्व हा संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ' अशी स्फूर्ति होते व तो आनंदभरित होतो, म्हणूनच कीं काय कोण जाणे ' जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ' अशी त्यांची ख्याती आहे. पिंपळ ह्म. अश्वत्थ व अश्वत्थ ह्म० संसार.

## ६ ' आवडे ते करिसी देवा '

सृष्टि किंवा लोकव्यवहार नीट चालावेत म्हणून देवानें जे नियम घालून दिले आहेत त्या नियमांनीं तो स्वतः बांधला आहे किंवा नाहीं असा एक वाद विद्वान् लोकांत चालत असतो. त्याचा निर्णय ज्ञानेश्वरांनीं ' **आवडे तें करिसी देवा । कवण करी तुझा हेवा रे**' ह्या पदांत दिला आहे! जीव ईश्वरकृत नियमांनीं बांधलेला आहे, पण ईश्वरच आपल्या नियमांनीं बांधला जाईल तर मग त्याचें ईश्वरत्व तें कोठें राहिलें ? ह्यासाठीं देव स्वतंत्र आहे असें भक्तांचें सांगणें आहे; इतकेंच काय पण नियमाविरुद्ध जें देव करील किंवा अनुमोदील तेंही जगाला मान्य करावें लागतें. देवाला जें आवडतें तेंच विश्वमान्य होतें. ' यमनियम पापपुण्य आम्हांसी आणि आपण भलतेंच करिसी !' तूं थोर आहेस, आम्हीं भिऊन असावें यांतच आमची शोभा आहे. पहा बरें, ' प्रत्यक्ष जगीं बाटली नारी ' त्या अहल्येचें आम्ही रोज सकाळीं स्मरण करितों व तें स्मरण ' महापातकनाशन ' ठरतें ! पुराणांनीं तिच्या पातिव्रत्याचा डांगोरा पिटला आहे. ' पांचापासुनि पांचजण ( पांडव ) जन्मले एक पत्नीच्या ( कुंतीच्या ) पोटीं । गोत्रवध करुनि राज्य करिती '—पण ते ' विश्वासि वंद्य ' झाले ! प्राण जाईतों तुला हाका मारणाऱ्या दशरथाच्या कपाळीं पतन आणि पांखराला राघवनांवानें प्राण जातां संबोधणाऱ्या गणिकेला ऊर्ध्वगति ! कशाला कांहीं मेळ ! येथें बोलणेंच खुंटलें ! मांडव्य तपाचा राशी, पुण्याचा पुतळा, तीर्थमंत्रांचा तीर्थरूप—तो कोठें व पापी अजामेळ कोठें ! पण भुंगा मारल्याबद्दल मांडव्यऋषीला सूळ आणि अजामीळाला वैकुंठ ! यज्ञमुखीं

अवदानें–हविष्यान्नें देतात 'त्या करिसी वांकडें तोंड' आणि गोपिकांच्या घरीं लोणी चोरायला उत्सुक ! तुझ्या संगतीचे, तूंच वाढविलेले छपन्न कोटि यादव त्वां शापाचे धनी केलेस आणि 'कोळियानें तुज विंधिले पायीं । त्यासी देशी सायुज्यता !' अष्टांगयोगानें शरीर दंडणारे, पुत्रदाराधन सांडून रानावनांत फिरणारे, त्यांना गति मिळतांना कोण सायास आणि 'विष पाजूं आली पूतना राक्षसी सायुज्यता देणें तियेसी रया' ह्या पुराणांतील कथा ऐकून तुझी माया न कळतां जन भांबावतो !

**वारया मोट बांधेल कोण ? आकाशासी कुंप कायसा ? ।**
**सूर्यापुढें दिवा लाऊनियां चालणें वाउगाचि शीण जैसा ॥**

तैसा तूं देवाधिदेव आहेस म्हणूनच 'आंवडे ते करिसी देवा !'

## ७ आंधळा, घोंगडी व काऊ

ज्ञानेश्वरांच्या अभंगांत वासुदेव, कापडी ( यात्रेकरु ), पाईक ( सेवक ), अंबुला ( नवरा ), हमामा, विरहिणी, आंधळा, पांगळा, घोंगडी इ. अनेक स्फुट विषयांवरही कांहीं पद्यें आहेत. कित्येक कूटेंही आहेत. इतर संतकवींचींही या प्रकारचीं स्फुटें आहेत व नाथांचीं तर फारच फार बहारीचीं आहेत. तीं सर्व नाथांचे भारुड या नांवानें प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरांच्या या प्रकारच्या कवनांत **आंधळा, काऊ** ( कावळा ) व **घोंगडी** हीं तीन उत्तम आहेत व तीं वारकरीमंडळांत नेहमीं ऐकावयास मिळतात.

**१ आंधळा—पूर्वजन्मीं पाप केलें तें हें बहुत विस्तारलें ।**
**विषयसुख नाशिवंत सेवितां तिमिर कोंदलें ।**
**चौऱ्याशीं लक्ष योनी फिरतां दुःख भोगिलें ।**
**ज्ञानदृष्टी हारपली दोन्ही नेत्र आंधळे ॥ १ ॥**

---

१ हेंच तुकोबा 'अंगीकार ज्यांचा केला नारायणें । निंद्य तेंही तेणें वंद्य केलें' या अभंगांत सांगतात व 'अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी' हीं उदाहरणें देतात.

**धर्म जागो सदैवांचा जे बा परउपकारी ।**
**आंधळ्या दृष्टिदाते त्यांचें नाम मी उच्चारी ॥ ध्रु० ॥**
**संसार दुःखमूळ चहूंकडे इंगळ**
**विश्रांति नाहीं कोठें रात्रंदिवस तळमळ ।**
**कामक्रोधलोभ शूनी पाठीं लागती वोढाळ ।**
**कवणा आतां शरण जाऊं दृष्टि देईल निर्मळ ॥ २ ॥**

कोणा संसारी जीवाचा ( आंधळ्याचा ) हा अनुभव नाहीं? 'इष्टमित्र सज्जनसखे हे तों सुखाची मांडणी!' संसारदुःखाला विटलेला पण आत्मज्ञानाविषयीं आंधळा झालेला हा जीव याला 'येथें कोणी सोडवीना एका सद्गुरुवांचूनी' असें वाटायला लागतें. अशा मुमुक्षु जीवांना, ज्ञानदृष्टी हारपलेल्या आंधळयांना, ज्ञानदृष्टि देणारे परोपकारी जे संत आहेत त्यांच्या धर्माचा जयजयकार असो, तो साऱ्या जगांत पसरो. असे दृष्टिदाते जगांत आहेत. आपल्या गुरूचें उदाहरण देऊन ज्ञानेश्वर सांगतातः—

**कृष्णांजन एकवेळां डोळां घालितां अढळ ।**
**तिमिरदुःख गेलें फिटलें भ्रांतीचें पडळ ।**
**श्रीगुरु निवृत्तिराजें मार्ग दाविला सोज्ज्वळ ।**
**बाप रखुमादेवीवर विठ्ठल दीनाचा दयाळ ॥ ६ ॥**

ह्यांत अज्ञानतमानें उत्पन्न होणाऱ्या संसारदुःखाचें वर्णन यथार्थ असून त्यांतून उत्तीर्ण होणारा मार्गही दाखविला असल्यामुळें हें नित्याच्या प्रार्थनेस उत्तम आहे.

**२ घोंगडीः—कान्हा ! तुझी घोंगडी चांगली ।**
**आम्हांसि कां दिली वांगली रे ॥ ध्रु० ॥**
**स्वगत सच्चिदानंदें मिळोनी शुद्धसत्वगुणें विणली रे ।**
**षड्गुणगोंडें रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे १**
**कामकर्मअविद्यात्रिगुणपंचभुतांनीं विणली रे ।**
**रक्तरेतदुर्गंधीजंतूनरकमुतानें भरली रे ॥ ३ ॥**

षड्विकार षड्वैरि मिळोनी तापत्रयानें विणली रे ।
नवाठायीं फाटुनि गेली ती त्वां आम्हांसि कां हे दिधली रे३
ऋषिमुनि ध्यातां मुखिं नाम गातां संदेहवृत्ती विरली रे ।
बाप रखुमादेविवर विठ्ठले ! त्वत्पदिं वृत्ती मुरली रे ॥ ४ ॥

घोंगडी म्ह० तनु, देह. हे कृष्णा ! तुझी घोंगडी किती चांगली आणि आमची घोंगडी किती वाईट ! आम्हांला ही वाईट घोंगडी तूं कां दिलीस ? तुझा देह कसा आणि आमचा कसा ! तुझी घोंगडी आत्मस्वरूपाकार व सत् चित् आनंद यांनीं युक्त असून ती शुद्धसत्वगुणानें विणलेली आहे, तिला षड्गुणांचे गोंडे लावले असून ती रत्नजडित आहे व हे श्यामसुंदरा ! तुझ्या अंगावर ती किती शोभत आहे बरें ! [ तूं घोंगडीहून वेगळाच आहेस म्हणूनच सत् चित् आनंद या तीन पदांचा शुद्धस्वरूपीं लाग नाहीं असें अमृतानुभवाच्या ५ व्या प्रकरणांत दाखविलें आहे. षड्गुणाचें गोंडे–' आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणावयव । वसती जेथ ॥ ३७ ॥ म्हणोनि तो भगवंत । जो निःसंगाचा सांगात ' ( ज्ञाने० अ० ६ ). भगवान् षड्गुणैश्वर्यसंपन्न आहेत. ] आतां आमची घोंगडी कसली अमंगळ आहे पहा बरें ! काम, कर्म, अविद्या, त्रिगुण, पंचभूतें यांनीं विणलेली व रक्त, रेत, दुर्गंधी, नरक, मूत यांनीं भरलेली आमची घोंगडी किती ओंगळ ही ! अस्ति, भाति, वर्धते, विपरिणमते, क्षीयते, व नश्यति हे सहा विकार, कामक्रोधलोभमोहमदमत्सर हे सहा रिपु व आध्यात्मिक आधिभौतिक व आधिदैविक हे त्रिविध ताप यांचा या आमच्या घोंगडींत सारा बुजबुजाट असून ती पुन्हां नऊ ठिकाणीं फाटलेली आहे ! ' नवद्वारे पुरे देही '–दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुद व उपस्थ हीं ह्या देहाची नऊ दारें आहेत यालाच ' नवा ठायीं फाटली घोंगडी ' असें म्हटलें आहे. देवा ! अशी ही अमंगळ घोंगडी तूं आम्हांला कां दिलीस बरें ! असो ! ही घोंगडी

टाकून देऊन तुझीच घोंगडी अंगावर घ्यायचा उपायही आम्हांला सांपडला आहे! तुझ्या रूपाचें ध्यान व गुणाचें गान करितां करितां अनेक ऋषि, मुनि व संत निःसंदेह होऊन त्वत्पदीं विरून गेले आहेत! ध्यानानें देह बदलतो. ज्याचें ध्यान करावें तदाकार मन होतें. [ ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनीं—असा तुकोबांनीं स्वानुभव सांगितला आहे. ] ज्ञानेश्वर महाराज म्हणतात कीं ह्याच ध्यानाच्या व नामसंकीर्तनाच्या मार्गानें जाऊन माझीही वृत्ति त्वत्पदीं मुरली आहे.

घोंगडीवर ज्ञानेश्वरांचे सोळा अभंगही आहेत. पहिलें रकटें मी आतां 'श्रीपंढरीनाथाजवळीं सांडिलें' आहे, आतां मला 'संतचरणीं रुळलेलें व श्रीरंगीं रंगलेलें श्रीविठ्ठलाअंगींचें घागडें' मिळालें आहे, हें घोंगडें फाटणारें नाहीं, अद्वैतपेठेंत हें आम्हांस मिळालें आहे, असें त्यांनीं त्यांत म्हटलें आहे! 'तूं माझा स्वामी मी तुझा रंक। पाहतां न दिसे वेगळिक॥' असें अद्वैतभक्तीच्या आनंदांत असतां ते म्हणतात, 'मीतूंपण जाऊं दे दुरी। एकचि घोंगडें पांघरूं हरी!' अनंत जन्मांच्या बाजारांत हिंडतांहिंडतां हें दिव्य 'सुरंग घोंगडें हाता आलें आहे!'

२ काऊः देवाच्या भेटीसाठीं उतावाळ झालेल्या मनाला जड व अजड सृष्टि आपली साह्यकर्ती आहे असें भावत असतें, हें कावळ्याचें दृष्टांतानें सांगतातः—

**पैल तो काऊ कोकताहे। शकुन गे माये सांगताहे॥ ध्रु०॥**
**उड रे उड रे काऊ। तुझें सोन्यानें मढीन पाऊ।**
**पाहुणे पंढरिराऊ घरा कै येती॥ १॥**
**दहीभाताची उंडी। लावीन तुझ्या तोंडीं।**
**जीवा पढियें त्याची गोठी सांग वेगीं॥ २॥**
**दुधें भरूनि वाटी लावीन तुझे वोटीं।**
**सत्य सांगें गोठी विठो येईल कायी? ३॥**

ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणें ।
भेटती पंढरिराणे शकुन सांगें ॥ ४ ॥

कावळा झाडावरून उडाला कीं पाहुणा निश्चित येणार अशी एक पुरातन समजूत आहे ! याच अर्थाची ‘ काव काव सोन्याचे पाव । पाहुणा येत असला तर उडून जाव ’ अशा जुनी म्हणही जुन्या लोकांत प्रसिद्ध आहे ! कावळ्याला दहीभाताची उंडी किंवा दुधाची वाटी देण्याची लालूच एवढ्याचसाठीं द्यायची का जीवाला प्रिय असलेल्या पंढरिरायाच्या आगमनाची त्यानें उडून जाऊन सूचना द्यावी ! कालिदासानें मेघाला वार्ताहर बनविला, येथें ज्ञानेश्वरांनीं कावळ्याशीं अशीच कानगोष्ट केली आहे. प्रियवस्तूच्या भेटीची अतीव उत्कंठा लागली कीं चेतन व अचेतन असा उत्कंठित पुरुषाच्या ठिकाणीं भेदभाव उरत नाहीं हें याचें वर्म आहे; त्याच्या तादात्म्याची ती खूण आहे.

## ८ हरिपाठाचे अभंग

आतां ज्ञानेश्वरांच्या ‘ हरिपाठाचा ’ विचार करूं. हे अभंग अवघे २७ आहेत. हे सर्व वारकऱ्यांच्या नित्यपाठांत असतात व यामुळेंच हरिपाठाला ‘ वारकऱ्यांची संध्या ’ म्हणतात. नामस्मरणानें हरि जोडतो हें हरिपाठाचें सार आहे. ‘ **हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा।** पुण्याची गणना कोण करी ’ हें पहिल्या अभंगाचें ध्रुवपद असून प्रत्येक अभंगाचे शेवटीं हें ध्रुवपद म्हणण्याचा प्रघात आहे, यावरून ‘ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ’ हेंच सर्व अभंगांचें ध्रुवपद आहे–सार आहे अशीच समजूत आहे व ती बरोबर आहे. हे अभंग सोपे आहेत कां कठिण आहेत हें सांगणें सोपें नाहीं–कठिण आहे ! सामान्यतः ह्या अभंगांचा अर्थ म्हणतां म्हणतां कळण्याइतका सोपा आहे, पण खोल विचार करून पाहतां ज्ञानेश्वरांच्या सर्व वाङ्मयाचें हें मथित आहे असें दिसतें. ‘ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ’ हा हरिपाठाचा प्रथम चरणच पहा–हा म्हटला तर सोपा

आहे, म्हटला तर कठिण आहे! 'देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी'- देव कळला पाहिजे व त्याचें द्वार कळलें पाहिजे-या विचारांत 'क्षण-भरी' नाहीं 'जन्मवरी' उभा राहण्याचा प्रसंग प्राप्त होतो! 'देवाच्या' दारांत क्षणभर उभे राहण्यानें चारी मुक्ति मिळतात, पण 'देवळाच्या' दारांत जन्मभर उभे राहिल्यानेंही चार मुक्ति तर काय पण एका मुक्तीचा एक कोपराही दिसत नाहीं! पंढरीस नामदेवांनीं महाद्वारांत समाधि घेतली अशी प्रथा आहे पण तें महाद्वार कोणतें? महाद्वारांत एकट्या नामदेवांनींच समाधि घेतली कां सर्व ज्ञानीभक्तांना समाधी घेण्याचें तें एकच स्थान आहे? समाधि म्हणजे तरी काय? यमनियमादि योगमार्गानें मिळणारी समाधि ती ज्ञानभक्तांच्या समाधीहून वेगळी आहे असें नाथांनीं भागवतांत प्रतिपादिलें आहे. ज्ञानेश्वरमहाराज 'देव' कोणाला म्हणतात व त्या देवाचें द्वार 'मह-त्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेः'-संतांची, ह्म० सद्गुरूची सेवा हें मोक्षाचें द्वार आहे असें भागवत सांगतें, याप्रमाणें मोक्षाचें द्वार जर संतसेवा तर देवाचें द्वार कोणतें? मोक्ष, ज्ञान, देव या पदांचा अनुभविक अर्थ काय? तात्पर्य, ज्ञानेश्वरमहाराजांचें ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ह्या ग्रंथांत प्रगट झालेलें पण संतमुखानेंच उमगणारें व भगवत्प्रसादानें अनुभवास येणारें हृद्गत अनुभविल्याशिवाय देव कोण व त्याचें द्वार कोणतें हें आकळावें कसें? मग 'देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी' हा अभंग सोपा आहे कीं कठिण आहे? देवप्राप्तीसाठीं 'हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा' हें साधन सांगितलें आहे. 'हरि मुखें ह्मणा' याचा उघड अर्थ तोंडानें-वैखरीनें उच्चारा असा केला आहे व तो युक्तही आहे, पण 'हरिनाम ठक, ठाकुर और चोर' उच्चारतात, आणि ज्या नामानें ध्रुवप्रल्हाद तरे 'वो नाम कुच और' असें संत सांगतात तर तें नाम कोणतें? 'ओठ कंठ हाले नही जिभ्या स्मरे न नाम। राम हमारा जप करे हम बैठे आराम' असें कबीर साहेब म्हणतात, त्यांतला भाव काय?

तात्पर्य देव, देवाचें द्वार, हरि, हरिनाम हें सर्व उच्चारायला सोपें आहे पण—संतांचें वाङ्मय संतमुखोंनच ऐकायला पाहिजे. असो. हरीचें नामस्मरण हेंच एक तत्त्व मनाशीं दृढ धरून 'रामकृष्ण गोविंद' ह्या सुलभ नामाचा प्रेमानें जयघोष करीत जा. 'नामापरतें तत्व नाहींरे अन्यथा' हें जाणून दुसऱ्या साधनांकडे वळं नकोस. सर्व शास्त्रांनीं सर्वसुखगोडी एका नामांत आहे असा निर्णय केला आहे, म्हणून 'रिकामा अर्धघडी राहूं नको'–निरंतर अंतरीं जपमाळ घे. देहाहून वेगळा हो व इंद्रियांशीं तादात्म्य करूं नकोस. तीर्थव्रतीं भाव धर, दयाधर्माप्रमाणें वाग, चित्तांत शांतिदया ठेव म्हणजे तेथ हरि येऊन राहील. हरिपाठ हें समाधीसंजीवन आहे–हरिस्वरूपीं जागृति देणारें आहे–असा श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेनें–ज्ञानदेव म्हणतात–माझा अनुभव आहे.

हरिपाठाच्या अभंगांचा हा तात्पर्यार्थ आहे. योगयागविधि, तीर्थाटण, व जपतप इत्यादि सर्व साधनांहून नामस्मरण हें सुलभ व वरिष्ठ असून वेदशास्त्रपुराणांचें हेंच सार आहे, नामचिंतनानें मृत्युलोकच वैकुंठरूप होतो, नाम आणि नामी यांच्यांत अभेद असल्यामुळें सर्वरूप हरीला नामप्रेमानें वश करा व कुळासह उद्धरून जा, मी ही संतगुरुमुखानें ऐकलेल्या ज्ञानानें हरिस्वरूपाशीं तन्मयता पावलों आहे व नामपाठानेंच तरलों आहे, शांतिक्षमादयाधर्मानें वागा व सत्संगतींत नामामृताची गोडी घ्यायचा अभ्यास करून उद्धरून जा, असा हरिपाठांत ज्ञानेश्वर-माउलीचा सर्व लोकांस उपदेश आहे. हरिपाठ ही मोत्यांची माळ आहे, त्यांतील कांहीं पाणीदार मोत्यें पहा:—

**( १ ) देवाचीये द्वारीं उभा क्षणभरी ।**

**( २ ) मंथुनी नवनीता तैसें घे अनंता ।**

**( ३.) त्रिगुण असार निर्गुण हें सार ।**

**( ४ ) साधूचे सांगातीं तरणोपाव ।**

(५) भावेंवीण भक्ति भक्तीवीण मुक्ति।
बळेंविण शक्ति बोलों नये॥
(६) कापुराची वाती उजळली ज्योती
ठायींच समाति झाली जैसी॥
(७) सर्वांघटीं पूर्ण एक हरि नांदे।
(८) प्रपंची निवाले साधुसंगें।
(९) भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे।
करतळीं आवळे तैसा हरी॥
(१०) बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें
एक्या केशिराजें सकळसिद्धी॥
(११) मनोमार्गें गेला तो तेथें मुकला।
(१२) संतांचे संगती मनोमार्गें गती।
(१३) काळवेळ नाम उच्चारितां नाहीं।
(१४) तें नाम सोपारें रामकृष्ण गोविंद।
(१५) जपतपकर्म क्रियानेमधर्म।
सर्वां घटीं राम भावशुद्ध॥
(१६) नामापरतें तत्व नाहीं रे अन्यथा।

ज्ञानेश्वरीचें श्रवणमनन व यथाकाल कथाकीर्तन करणारे जे सुजाण असतील त्यांना त्यांच्या श्रवणमननाचें सार हरिपाठांत सांपडेल, अजाणांनाही नामाची गोडी लावायला हरिपाठाचे अभंग पुरे आहेत. हरिध्यानांत व नामस्मरणांत दंग राहून संसार सुखानें तरून जावा असा ज्ञानेश्वरमाउलीचा मनुष्यमात्रास ह्या हरिपाठांत संदेश आहे.

## ९ मुक्ताबाई.

ज्ञानेश्वरांची धाकटी बहिण मुक्ताबाई ही आपल्या भावंडांप्रमाणेंच जीवन्मुक्त कोटींतली होती. निवृत्तिनाथांचा ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताई ह्या तिघांसही उपदेश होता. ' मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल।

'निवृत्तीनें चोखाळ दाखविलें,' 'निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं,' 'आदिअंतीं खुण निवृत्तीची' इ० प्रकारें हरितत्त्व निवृत्तिनाथांनीं 'आमुच्या करीं' दिलें असें मुक्ताईनीं अभंगांत जागोजाग म्हटलें आहे. मुक्ताईच्या अभंगांवरून विठ्ठलभक्तीचा, नामस्मरणाचा व कथा-कीर्तनाचा मार्ग त्यांनीं चोखळला होता तरी त्यांना 'नादबिंदु, शून्या-शून्य, मनपवनयोग, सत्रावी, अनाहतध्वनि, सहस्रदळ, अजपाजप' ह्या योगमार्गाच्या खुणा चांगल्याच ठाऊक होत्या, अर्थात् त्या योग-मार्गांतहि निष्णात होत्या हें अगदीं स्पष्ट आहे. मुक्ताई **योगानुभवांत निष्णात** होत्या व शिवाय त्यांच्यापाशीं **अद्वैतानुभव व सगुणप्रेम उत्कट होतें** म्हणूनच त्यांचे चांगदेवांनीं पाय धरिले. मुक्ताबाईचें वय लहान, पण अधिकार केवढा होता ! 'मुक्ताई चिंतनें मुक्त झाली' 'मुक्ताई जीवन्मुक्तचि सर्वदा,' 'मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त' असें त्यांनीं आत्मप्रत्ययोद्गार ठायीं ठायीं काढले आहेत.

**निवृत्तीनें दिली शक्ति । चित्त पावलें विश्रांती १**
**विसांविया आलें मन । मन जाहलें उन्मन २**
**धन्य जीविताची थोरी । एकविध चराचरीं ३**
**भास मावळला ठायीं । सुखी झाली मुक्ताबाई ४**

आम्ही सर्वच ब्रह्मरूप असल्यामुळें '**अवघाचि संसार केला आम्ही गोड**' तसा तुम्हींही सर्वत्र ब्रह्मभावानें पहा म्हणजे '**आनंदाचें लेणें मुक्ताबाई ल्याली**' तें लेणें तुमच्याही अंगावर पडेल! याला कांहीं धरावें-टाकावें लागत नाहीं–'सांडणें मांडणें दोन्ही नाहीं.' वासना व वितंड-वाद् सोडून हरिप्रेमसुख भोगावें. 'विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाईक' 'वेदशास्त्रवक्ता आणि वितंडवादक,' तसाच 'योगिया म्हणवी आणि इंद्रियांचा रंक'–काय म्हणावें याला !'तयाचा **विवेक जळो परता** !'
**मुक्ताई म्हणे ज्याचा परमार्थ माइकु । तयाचा विवेकु जळो परता ॥४॥**

## १० ताटीचे अभंग.

मुक्ताबाईचे '**ताटीचे अभंग**' प्रसिद्ध गाथ्यांतून सांपडत नाहींत. वारकरी ते प्राय: मानीत नाहींत, तथापि ते मुक्ताबाईचेच असावेत असें मला वाटतें. ते अभंग उंचा आहेत. लोकनिंदा व छल होत असतांना एकदां ज्ञानेश्वर रागावून व रुसून ताटी लावून कोपटांत बसले व बाहेर येईनात, अशा वेळीं मुक्ताईनें बाहेरून 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी त्यांची विनवणी केली, असा कांहींसा या अभंगांचा संदर्भ दिसतो. मुक्ताईची लाडिकपणाची धिटाई व त्याचबरोबर बंधूच्या योग्यतेची जाणीव हे भाव येथें मोठ्या कोमलवाणीनें प्रकट झाले आहेत. रागाची फार मोठी कल्पना न करितां **लाडिकपणाचा रुसवा व लाडिकपणाची समजाविस** या लाडिकपणाच्या बुद्धीनेंच या अभंगांकडे पहावें! **ताटी ह्म० बुद्धीचें द्वार** असाही अर्थ असू शकेल। आईबापांनीं बाळपणींच सोडून दिलेल्या व लोकच्छलांत सांपडलेल्या बहिणभावांनीं लहानमोठे-पण विसरून जिव्हाळ्याच्या प्रेमानें एकमेकांची समजूत कोमलवाणीनें पाडली तर त्यांत गैर काय आहे? ज्ञानेश्वरासारखा भाऊ आणि मुक्ताईसारखी बहीण असा बहिणभावंडाचा जोडा वाङ्मयाच्या इति-हासांत दुसरा नाहीं. '**तुह्मी तरुनि विश्व तारा**' असें भावाला लोको-द्धारकार्यांत प्रोत्साहन देणारी बहिण कोणा कोठें ऐकली आहे.?

**योगी पावन मनाचा । साहीं अपराध जनाचा ॥ १ ॥**
**विश्व रागें जालें वन्ही । संतें सुखें व्हावें पाणी ॥ २ ॥**
**शब्दशस्त्रें जाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥ ३ ॥**
**विश्व पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥**

* * * *

**संत तेचि जाणा जगीं । दया क्षमा ज्यांचे अंगीं ॥ १ ॥**
**लोभअहंता न ये मना । जगीं विरक्त तेचि जाणा ॥ २ ॥**

इहपरलोकीं सुखीं । शुद्ध ज्ञान ज्यांचे मुखीं ॥ ३ ॥
मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

* * * *

एक आपण साधु झाले । येर कोण वायां गेले ? ॥ १ ॥
उठे विकार ब्रह्मीं मूळ । अवघे मायेचें गाबाळ ॥ २ ॥
माया समूळ नुरे जेव्हां । विश्व ब्रह्म होइल तेव्हां ॥ ३ ॥
चिंताक्रोध मागें सारा । ताटीं उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

* * * *

ब्रह्म जैसें तैशापरी । आह्मां वडिल भूतें सारीं ॥ १ ॥
अहो क्रोधें यावें कोठें ? । अवघे आपण निघोटे ! ॥ २ ॥
जीभ दांतांनीं चावली । कोणें बत्तीशी पाडिली ? ॥ ३ ॥
मन मारुनि उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

अशी विनवणी ' लडिवाळ मुक्ताबाईनें ' केली, हेतु हा कीं:—

तुम्हीं तरूनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा !

## ११ मुक्ताबाई व चांगदेव

चांगदेव ऊर्फ **चांगा वटेश्वर** हे तापीतीराचे रहिवाशी. खानदेशांत सातपुड्यालगत **एदलाबाद**नामक एक जुनाट शहर आहे. तेथून जवळच चांगदेव नांवाचें गांव आहे. हा गांव तापी व पयोष्णा ऊर्फ पूर्णा या नद्यांच्या संगमावर आहे. तेथें चांगदेवाचा जन्म झाला. चांगदेवानंतर नदीकांठीं टेंकडीवर चांगदेवाचें देऊळ बांधलें गेलें आहे तें अनेक दुरुस्त्या होऊन शिल्लक राहिलें आहे ! देऊळ भव्य असून त्याच्या दारावर प्राचीन शिलालेख आहेत, पण ते नीट लागलेले नाहींत. देऊळ यादवकालीन आहे. चांगदेवाला पूर्वीं सुंदरपूर म्हणत असें सांगतात. एदलाबाद येथें मुक्ताबाईचें मंदिर असून दरवर्षीं माघ वद्य ११ ला ३० ते ४० हजारांवर मुक्ताबाईची यात्रा भरते ! हा सर्व टापू मुक्ताबाई व त्यांचे शिष्य चांगदेव यांच्या नांवांनीं दुमदुमून राहिला आहे. संगमावर ज्ञाने-

श्वर व त्यांची मंडळी भजनकीर्तन करीत गातनाचत असे चांगदेव, विसोबा खेचर, परिसा भागवत यांच्या कवितेंत उल्लेख आहेत त्यावरून चांगदेव ज्ञानेश्वरमंडळांत समाविष्ट झाल्यावर त्यांच्या प्रेमाग्रहास्तव ही मंडळी तिकडे जात असावी असें दिसतें. चांगदेव नांवाचे पांचचार पुरुष गेल्या सातशें वर्षांत होऊन गेले आहेत ! त्यांपैकीं चांगा वटेश्वर व चांगा केशवदास हे दोघे ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. बाकी चांगा मुधेश ( शके १४२७ ), व चांगा मरुद्गण वगैरे मागून झालेले आहेत. चांगा वटेश्वर हे महायोगी म्हणून गाजल्यानंतर त्यांचें नांव त्यांच्या वंशांत म्हणा किंवा संप्रदायांत म्हणा पुढें अनेकांनीं घेतलें आहे. असो. आपला संबंध येथें चांगा वटेश्वर यांच्याशीं आहे. हे महायोगी होते व योगबळानें हे समाधिस्थ होऊन मृत्युकाळ टाळीत. हे **चौदाशें वर्षें** जगले होते, असें यांचें वणन केलेलें आढळतें. यांना अनेक सिद्धी अनुकूल होत्या. ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद बोलविल्याची लोकोत्तर वार्ता यांच्या कानावर जाऊन यांना कौतुक वाटलें व त्यानां यांनीं पत्र लिहिण्याचें योजलें. पण मायना ' चिरंजीव ' लिहावा कां 'तीथरूप' लिहावा हें न ठरून त्यांनीं कोरेंच पत्र शिष्यांबरोबर पाठविलें ! मुक्ताबाई आपल्या बालवयानुरूप विनोदानें तें पत्र हातीं घेऊन म्हणाल्या कीं, '**चौदाशें वर्षें वांचून चांगदेव कोराचा कोराच राहिला !** ' यानंतर चांगदेव वाघावर बसून व हातीं सापाचा आसूड घेऊन ज्ञानेश्वरादिकांस भेटण्यास आळंदीस आले. हीं भावंडें तेव्हां सहज भिंतीवर बसली होतीं. चांगदेव शिष्यांच्या जयघोषांत येतांच ज्ञानेश्वरांनीं भिंतीस ' चले बये ' म्हणून आज्ञा केली तों ' ती **भिंत चालूं** लागली. ' हा चमत्कार पाहतांच चांगदेव हतगर्व झाले. योगबळानें व्याघ्रसर्पासारख्या सचेतन प्राण्यांवर ते सत्ता चालवीत, पण अचेतन जड पदार्थांवरही ज्ञानेश्वरांची सत्ता चालते हें पाहून ते त्यांना शरण गेले. ज्ञानेश्वर योगी असून आत्मनिष्ठ होते. केवळ योगाची अद्वैतानुभवापुढें मात्रा चालत नाहीं हें जाणून त्यांचा अभिमान गळाला व ते

ज्ञानेश्वरास शरण गेले. पण ज्ञानेश्वरांनीं त्यांस '**चांगदेवपासष्टी**' चा बोध केला तरी त्यांचें सद्‌गुरुपण मुक्ताबाईकडेच गेलें. मुक्ताबाईनीं त्यांस गुरुगुह्य सांगून आत्मपदीं चढविलें. मुक्ताबाई ही आपली आई व आपण तिचें मूल अशी चांगदेवाची भावना होती व चांगदेवालाही मुक्ताबाई आपला पुत्रच समजत असे ! अशा भावार्थाचे उभयतांचेही अभंग आहेत. मुक्ताबाईनें अध्यात्मयोगाचें रहस्य चांगदेवास सांगितलें व त्याला कवाइतीच्या योगविद्येपासून परावृत्त केलें. "गुण ना निर्गुण शब्दातीत। तेथें तूं निश्चिंत बाळा निज॥ पाळणा लाविला हृदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते" अशा प्रकारें 'वटेश्वरसुत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवीत ज्ञानदृष्टी'

(१)

**निर्गुणाचे डाहाळी पाळणा लाविला। तेथें सुत पहुडला मुक्ताईचा १**
**निज निज बाळा न करी पै आळी । अनाहत टाळी वाजवित २**
**एकवीससहस्र साहशें वेळे बाळा । तोही डोळा स्थिर करी ३**
**निद्रा ना जागृती निजसी रे काई । परियेसी चांगया बोले मुक्ताबाई ४**

(२)

**अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला । तेथें पहुडला योगिराज १**
**सोहं सोहं षट्चक्रन्यासें । तुज परिये देतां मीच न दिसे २**
**ऐसी निद्रा तुज लागो दे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रा ३**

मुक्ताईमातेनें आपल्या मुलास ज्ञानामृताचें स्नान घातलें, अव्यक्तानें विणलेल्या अविनाशी पाळण्यांत घातलें, त्याच्या डोळयांत अंजन घातलें, त्याचें नामकरण केलें, अनुहत टाळी वाजवून व कानांत खेचरीमंत्र सांगून त्याला स्वस्वरूपीं निजविलें व मनपवनाचा दोर हातीं घेऊन व अजपाजपावर त्याचा डोळा स्थिर करून झोके देत ज्ञानदृष्टीनें शांतवीत राहिली ! हा सर्वच प्रकार अपूर्व आहे. चांगदेवाचें वय काय, मुक्ताईचें काय पण तो विचारच कशाला ?' 'न खलु वयस्तेजसो हेतुः'—

चांगा सोय धरी ज्ञानवटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारीं बोध करीं ' असें स्वतः चांगदेव आपल्या अभंगांत ह्मणतात.

( १ )

चांगयाचें वऱ्हाड मुक्ताईनें केलें । मूळ जें फेडिलें जन्मांतरिचें १
आजवर होतों भाजियेलें हाड । नाचे संतांपुढें फुंदफुंदों २
चौदा शतें जालीं बुद्धि माझी गेली । सोय दाखविली मुक्ताईनें ३
धन्य निवृत्तिदेव धन्य सोपानदेव । परब्रह्म ठेव दाखविली ४
धन्य ज्ञानदेव धन्य मुक्ताबाई । चांगा म्हणे आईपोटीं आलों ५

( २ )

आनंदवनीं भ्रमत होता । झुंकारें उडाला गेला केउता १
नाम नाहीं रूप नाहीं । पाहों गेलों तंव कांहींच नाहीं २
रुंझी राहिली शब्द निमाला । वटेश्वरीं चांगा विस्मित जाला ३

## १२ जनाबाई.

५. ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयांत किंबहुना संपूर्ण मराठी वाङ्मयांत जनाबाईचें स्थान विशेष महत्त्वाचें आहे. नामदेवांच्या घरची दळणकांडण करणारी आईबापविरहित पोरकी झालेली सामान्य दासी, पण सत्संगतींत केवढ्या अधिकाराला पोंचली ! नामदेवांचे घरीं पंधराजणें पांडुरंगाचें भजन करीत. पंधराहीजणांनीं थोडेफार अभंग केले आहेत, पण नामदेव व जनाबाई यांच्या वाणींतला प्रेमळपणा कांहीं और आहे; खुद्द नामदेव व जनाबाई यांच्या अभंगवाणींत अधिक सरस कोणती हें ठरविणें कठिण आहे! जनाबाईच्या अभंगांवर नामदेव व ज्ञानेश्वर ह्या दोघांच्याही वाणीची छाप पडलेली आहे. दोघांतली गोडी त्यांत उतरली असली तरी जनाबाईपणाची स्वतःची अंतरंगगोडीही अद्भुत आहे ! तिच्या अभंगवाणींत नामदेवांची सगुणप्रीति आहे व ज्ञानेश्वरांची योगानुभूति आहे. तिच्या अभंगांत भक्तीची माधुरी व योगाची खोली दोन्ही अथांग असून तिचे सारे अभंग प्रेमानें ओथंबलेले, सरळ, सोपे व अत्यंत प्रासादिक आहेत.

जनाबाईच्या वाणीला कृष्णनाथाच्या मुरलीचीच उपमा द्यावीशी वाटते. तिचे ३५० च अभंग उपलब्ध आहेत. त्यांनीं अतृप्ति होते व आणिक अभंग मिळत नाहींत याबद्दल चुटचुट लागते. हे पेढे सगळेच्या सगळे जिव्हेवर ठेवतांच विरघळून जातात व आणखी मिळावेत अशी असोशी वाढते. तिच्या विठ्ठलभक्तीपुढें कल्पनाशक्ति थिजून जाते. नवल वाटतें कीं विठ्ठलाला ही पोरकी पोर इतकी कां आवडली? तिची अनेक जन्मार्जित पुण्यसंपत्ति लोभनीय आहे. ज्ञानेश्वरनामदेव या दोघांची ती लाडकी. दोघांनीं तिला भक्तिज्ञानयोगाचा खाऊ दिला व तिनें तो खाऊन पचविला. 'आदि ठाणें पंढरपूर । नांदे कान्हाई सुंदर' अशा 'विठाबाई आनंदीचा' तिला लो ह्म० छंद लागला. गोदातीरीं गंगाखेड येथें दमा नामक शूद्राच्या पोटीं जनीचा जन्म झाला. तिचे आईचें नांव करुंड असें होतें. ती मेल्यावर दमानें पंढरीस येऊन दामशेटींचे स्वाधीन तिला केले व तो निघून गेला.

'माय मेली बाप मेला। आतां सांभाळी विठ्ठला ॥ मतिमंद तुझी दासी। ठाव द्यावा पायापाशीं ॥' अशी उत्कट भावना धरून ती पंढरीस दामाशेटच्या घरीं कामाला राहिली; तेथें नामदेवांचा जन्म झाला, नामदेवाला तिनें बाळपणापासून अंगाखांद्यावर खेळविलें, व नामदेवाला आपला धनी, गुरु व सर्व आधार मानून ती शरण गेली व 'नामयाची दासी जनी' 'वेडी जनी' म्हणून जगांत वावरली! ज्ञानेश्वर पंढरीस आले तेव्हां त्यांची व नामदेवांची गांठभेट होऊन रहस्य जमलें. तेव्हां 'धन्य हे पंढरी, धन्य नामदेव, धन्य पंढरिराव' व 'धन्य ज्ञानदेव धन्य त्याचा भाव' असे आनंदाचे उद्गार काढणाऱ्या जनाबाईंत 'पालट पैं झाला.' कां कीं खास तिला 'भेटावया आला पांडुरंग!' देवळांतून सगळी मंडळी निघून गेल्यावर व कामधाम आटोपल्यावर रात्रींचे प्रहरीं जनाबाई विठाईमाउलीला आळवी, त्याचें '**रूप न्याहाळीत डोळां। पुढें नाचत वेळोवेळां**'–सर्वांठायीं हरीला पाहत व गात असतांना 'धांवा

करितां रात्र झाली । दासी जनीसी भेट दिली.' सर्वांठायीं हरि दिसावा यासाठीं 'गुणदोष मना नाणी । म्हणे बहिरी होय जनी' "ऐसा पुत्र देई संता । तरी त्या आवडी पंढरिनाथा ॥ गीता नित्यनेमें । वाची ज्ञानेश्वरी प्रेमें ॥ कन्या व्हावी भागीरथी । जिचें प्रेम तुझे चित्तीं" असें जनाबाईनीं म्हटल्याप्रमाणें त्या स्वत: गीता–ज्ञानेश्वरींचें श्रवणमनन करीत व देवाचें प्रेम चित्तीं अखंड ठेवून त्याच्या नामानंदांत विरघळून जात. नामदेवाचें घर देवासमोर, जेव्हां वेळ सांपडेल तेव्हां दिवसारात्रा देवळांत जाण्याचा त्यांचा क्रम असे. नामदेवाचे अभंग एकतां ऐकतां जनाबाईला अभंगांतच देवाचे गुणानुवाद गायची स्फूर्ति होऊन तिचे मुखांतून अभंग निघत व ते देवाला फार फार आवडत. जनाबाईचा देवळांत नित्य जाण्याचा वापर असल्यामुळें एकदां 'पदक विठ्ठलाचें गेलें । ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें'–जनाबाईवर चोरीचा आळ आला ! 'अगे शिंपियाचे जनी । नेलें पदक दे आणुनी ॥ देवासमोर तुझें घर । तुझें येणें निरंतर' असें पुजारी म्हणूं लागले. तिनें 'सख्याविठ्ठलाची आण' घेऊन मीं चोरी केली नाहीं म्हणून पुष्कळ सांगितलें, पण तिचें ऐकतो कोण ? तों देवाची करणी ! तिच्या अंगावरच्या धोतरांतून पदक खालीं पडलें ! मग काय ? 'दंडा लावल्या काढण्या' तेव्हां 'विठो धांव रे धांवण्या' अशी देवाची करुणा भाकण्याशिवाय तिच्याजवळ कांहीं उरलेंच नाहीं ! 'चंद्रभागे लाविला सूळ । जनाबाईस आलें मूळ !'– मरण्याची पाळी आली. 'ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला ॥ तंव सूळाचें झालें पाणी । धन्य म्हणे दासी जनी !' देव भक्ताचें संकटीं कसें रक्षण करितो याचा प्रत्यय आल्यावर जनाबाईची विठ्ठलावर अधिकच निष्ठा बसली. **जनाबाईच्या अभंगांत** देव भक्ताला कसे सांभाळतो व त्याची संकटें निवारून त्याचे लाड पुरवितो हें अनेकवार द्रौपदी, उपमन्यु, गजेंद्र, अजामीळ, ध्रुव, प्रल्हाद, बळी, भिल्लीण म्हणजे शबरी, मारुति, शुक इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन त्यांनीं सांगितलें आहे व राधामुरारींचें

अन्योन्यप्रेम वाखाणून व शिवाय हरिश्चंद्राख्यान व थालीपाक यावर सुरस आख्यानें रचून त्यांनीं भाविकांसही बोध केला आहे. जनाबाईंनीं आपल्या साधुवृत्तीला अनुसरून आपल्या मेळयांतल्या व संगतींतल्या साधु-संतांच्या कथा गाऊन त्यांच्याही उदाहरणांवरुन भक्तिभावाचेंच पोषण केलें आहे. सेना न्हावी, गोरोबा कुंभार, चोखामेळा, यांविषयीं त्यांनीं प्रेमोद्गार काढले आहेत. नामदेव, सोपानदेव व ज्ञानेश्वर यांविषयीं तर त्यांचा गुरुभाव होता, त्यांचें त्यांनीं आदरप्रेमपूर्वक गुणगौरव केलें आहे.

**विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेंकुरांचा मेळा १**
**निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी २**
**पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ३**
**गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ४**
**बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ५**
**जनी म्हणे रे गोपाळा । करीं भक्तांचा सोहळा ६**

नामदेव जनाबांईचे धणी व गुरु, सारा परमार्थ त्यांच्या कृपेनें झालेला, त्यांच्या संगतीनें ज्ञानेश्वरादि संतमहंतांच्या गांठीं पडलेल्या, त्यांच्यामुळें विठ्ठल सोपा झालेला, तेव्हां नामदेवांविषयीं त्यांचा प्रेमादर अलोट होता यांत नवल नाहीं. 'नोवरिया संगें वऱ्हाडीचा सोहळा' होऊन तिला मांडे व पुरणपोळया खायला मिळतात, परिसाच्या संगतीनें लोहाचें सुवर्ण होऊन त्याचे अलंकार श्रीमंतांचीं भूषणें होतात, तशीं 'जनी म्हणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची ह्मणोनिया.' नामदेवाच्या घरीं मुलेंबाळें पुष्कळ होतीं, पण '**नामयाचें ठेवणें जनीस लाधलें**'–नामदेवाचा पारमार्थिक ठेवा सगळाच्या सगळा एकट्या जनीला लाभला. ठेवा कोणता ? '**धन सांपडलें विटेवरी**' 'सर्व सुख पायीं लोळे । जनीसंगें विठ्ठल बोले', 'जनी अंगें ब्रह्म झाली'–ही माझ्या नामयाची कृपा. 'नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग' हा सुखसोहळा नित्य भोगायला मिळाल्यामुळें नामयाच्या जनीला अखंड

प्रेमरस मिळाला. नामा वाळुवंटीं कथा करी तेथें टाळ घेऊन मागें जनाबाई उभी आहेच! नामदेवांचा व माझा अनेक जन्मांचा ऋणानुबंध आहे असें जनाबाई सांगतात. नामदेव प्रल्हाद झाले तेव्हां मी त्यांची श्रेष्ठ दासी पद्मिणी होते, नामदेव अंगद झाले तेव्हां मी मंथरा होते, नामदेव कृष्णावतारीं उद्धव झाले तेव्हां मी कुब्जा होते, आतां कलींत त्याच नामदेवांच्या ‘ सेवेलागी दासी जन्मली जनी. ’ जनाबाईनीं विठोबाची एक सुंदर काकडआरती केली आहे, तिचा गोड शेवट पहाः—

**चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं ।**
**पाठीमागें डोळे झांकुनि उभी दासी जनी ॥ ८ ॥**

सोपानदेव व ज्ञानदेव यांजविषयीं जनाबाईचा असाच प्रेमभाव आहे. ‘ सोपानदेव धरितां ध्यानें । पुन्हां जन्मा नाहीं येणें ॥ दासी जनी तल्लीन जाली । सोपानचरणीं विनटली. ’ वारकरीसंप्रदायास ज्ञानेश्वरांनीं सर्रास अद्वैतभक्तीचा उपदेश केला; पण विसोबाखेचर, नामदेव, जनाबाई, ही मंडळी त्यांच्या योगमार्गाच्या अंतरंगांतही प्रविष्ट झाली होती. जनाबाईच्या अभंगांत योगाच्या खुणा व ज्ञानदेवाविषयीं अत्यादर स्पष्टच आहेः—

(१)

**रक्तवर्ण त्रिकुट स्थान । श्रीहाट पाहे श्वेतवर्ण १**
**श्यामवर्ण ते गोल्हाट । नील बिंदु औटपीठ २**
**वरी भ्रमरगुंफा पाहे । दशमद्वारीं गुरु आहे ३**
**नवद्वारांतें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी ४**

(२)

**ज्योत परब्रह्मीं होये । खेचरी दर्पणीनें पाहे १**
**इडा पिंगळा सुषुम्ना । तिन्ही पाहे हृदयभुवना २**
**हृदयकमळावरी जासी । जनी म्हणे मुक्त होसी ३**

## १३ जनाबाईंची प्रेमळवाणी

( १ )

वैकुंठीचा हरी । तान्हा यशोदेच्या घरीं १
रांगतसे हा आंगणीं । माथां जावळाची वेणी २
पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ३
धन्य यशोदा ते माय । दासी जनी वंदी पाय ४

( २ )

ब्रह्मा वंदी ज्याचे पाय । त्यासी यशोदा ते माय १
साम्राज्याचा जो दानी । मागे यशोदेसी लोणी २
क्षीरसागर ज्याचे चरणीं । त्याला पायांवरतें न्हाणी ३
देव ब्रह्मांडपाल कीं । त्याची टाळू हातें माखी ४
शुकसनकादिकयोगी । लागे दळूं जनीलागी ॥ ५ ॥

( ३ )

पाय जोडुनि विटेवरी । कर ठेवुनि कटावरी १
रूप सांवळें सुंदर । कानीं कुंडलें मकराकार २
गळां माळ वैजयंती । पुढें गोपाळ नाचती ३
गरुड सन्मुख उभा । म्हणे जनी धन्य शोभा ४

( ४ )

पंढरीचा वारकरी । त्याचे पाय माझे शिरीं १
हो कां उत्तम चांडाळ । पायीं ठेवीन कपाळ २
मुखीं नाम गर्जे वाणी । म्हणे नामयाची जनी ३

( ५ )

आधीं घेतलें पदरीं । आतां न धरावें दुरी १
तुम्हां थोरांचीं उचितें । हेंचि काय सांगों तूतें २
अहो ब्रह्मयाच्या ताता । सजणा लक्ष्मीच्या कांता ३
दयेच्या सागरा । जनी म्हणे अमरेश्वरा ४

( ६ )

रुक्मिणीच्या कुंका । सुरां असुरां प्रिय लोकां १
धांव पाव माझे आई । सखे साजणी विठाबाई २
शिवाचिया जपा । मदनताता गा निष्पापा ३
आपुली म्हणउनी । आपंगावी दासी जनी ४

( ७ )

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई १
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा २
इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ३
माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ४

( ८ )

आंधळयाची काठी । आडकली कवणे बेटीं ? १
माझिये हरणी । गुंतलीस कवणे रानीं २
मुकें मी पाडस । चुकले भोंवे पाहे वास ३
तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ४
आतां जीव जाऊं पाहे । धांव घाली माझे आये ५
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ६

( ९ )

कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला १
मायबाप तूंचि धणी । मला सांभाळीं निर्वाणीं २
त्वां बा उद्धरिले थोर । तेथें कोण मी पामर ३
दीनानाथा दीनबंधु । जनी म्हणे कृपासिंधु ४

( १० )

गंगा गेली सिंधूपासीं । त्याणें अव्हेरिलें तिसी १
तरि तें सांगावें कवणाला । ऐसें बोले गा विठ्ठला २
जळ काय जळचरा ? । माता अव्हेरी लेंकुरा ? ३
जनी म्हणे शरण आले । अव्हेरितां ब्रीद गेलें ? ४

(११)

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा १
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिलापाशीं २
माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापासी ३
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधूनी उदरीं ४
तैसी आम्हां विठ्ठलमाये । जनी वेळोवेळां पाहे ५

(१२)

ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी १
उणें पडो नेदी त्याचें । वारें सोसी आघाताचें २
तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ३
आंग आपुलें वोढोनी । त्याला राखे तो निर्वाणी ४
ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ५

(१३)

जनी डोईनें गांजली । विठाबाई धांविन्नली १
देव हातें बुचडा सोडी । उवा मारितसे तांतडी २
केश विंचरुनि मोकळे केले । जनी म्हणे निर्मळ झाले ३

(१४)

दळण्याच्या मिषें । विठ्ठल आला अवकाशें १
देहबुद्धीचें वैरण । द्वैत खंडा रे निसून २
एकलीच गाणें गातां । दुजा साद उमटतां ३
कोण गे तुझे बरोबरी । गाणें गातो निरंतरीं ४
अंतरींच विचारितां । देव दिसे तया भक्ता ५
खूण कळली नामदेवा । विठ्ठल भुले जनिच्या भावा ६

जनाबाईच्या सगुणप्रेमाचें रूप आपण पाहिलें आहे. त्यांचा निर्गुण बोधही पूर्ण होता, अद्वैतभक्तीचें स्वरूप त्यांच्या कांहीं अभंगांत व्यक्त आहे.

( १५ )

**धरिला पंढरीचा चोर। प्रेमें बांधोनियां दोर १**
**हृदय बंदिशाळा केलें। आंत विठ्ठला कोंडिलें २**
**शब्दें केली जडाजोडी। पायीं विठ्ठलाच्या बेडी ३**
**सोहंशब्दें मारा केला। विठ्ठल काकुळती आला ४**
**जनीं म्हणे गा विठ्ठला। आतां जीवें न सोडि तुला ५**

प्रेमरज्जूनें विठ्ठलरूप चोराला मी पकडलें आहे. '**प्रणयरशनया** धृतांघ्रिपद्मः' ( भागवत स्कंध ११–२–५६ ) म्हणजे प्रेमरज्जूनें त्याचे पाय बांधले आहेत. 'वेदबाह्य तें कर्म सांडी न करीं अधर्म'—वेदबाह्य मतें व कर्में सोडा व अधर्मानें वगूं नका, भक्तिमार्गानें चाला, देवनिष्ठ आहे त्याला आह्मी ज्ञानी म्हणतों, हा जनाबाईचा एका अभंगांत उपदेश आहे. 'अंगीं हो पै शांती। दया क्षमा सर्वांभूतीं ॥ आवडी असावी कीर्तनीं। लावावें संतांचे चरणीं ॥ जैसी दया पुत्रावरी। तेचि पाहे चराचरीं।" असा त्यांचा गोड उपदेश आहे. अखंड चित्त शुद्ध ठेवावें व देवाचें नांव अमृतसंजीवनी आहे म्हणून नामानें देव वश करावा.

१६

**सुखें संसार करावा। माजीं विठ्ठल आठवावा ॥ १ ॥**
**असोनियां देहीं। छाया पुरुष जैसा पाहीं ॥ २ ॥**
**जैसा सूर्य घटाकाशीं। तैसी देहीं जनी दासी ॥ ३ ॥**

१७

**शूराचें तें शस्त्र कृपणाचें धन। विध्वंसिल्या प्राण हातां न ये ॥१॥**
**गजमाथां मोतीं सर्पाचा तो मणी। वेंचिलियां प्राण हातां न ये ॥ २ ॥**
**सिंहाचें तें नख पतिव्रतेचें स्तन। वेंचिलियां प्राण हातां न ये ॥ ३ ॥**
**विराल्यावांचूनी देहीं देहभाव। जनी म्हणे देव हातां न ये ॥ ४ ॥**

## १४ मुक्ताबाई व जनाबाई.

सारख्या वयाच्या, समान अधिकाराच्या, भक्तिज्ञानवैराग्यादि गुणालंकारांनीं नटलेल्या, परमानंदाचें नित्य एकत्र भोजन करणाऱ्या,

मुक्ताबाई व जनाबाई पंढरपुरीं नामदेवाच्या घरीं झोपाळ्यावर बसून प्रेमाचीं गाणीं गात आहेत, निवृत्तिज्ञानदेवनामदेवादि गुरुजन हा सुखसोहळा भोगीत समोर बसले आहेत, नामदेवांच्या मुलाबाळांनीं घर भरलें आहे, प्रेमळ भक्तभाविक ज्ञानाच्या व नामाच्या ऐक्यतेचा आनंद अनुभवीत आहेत, विश्वाचे मायबाप रुक्मिणीपांडुरंग मृत्युलोकीं दुर्लभ असा हा संतमेळ्याचा परमानंद भोगीत सर्वांच्या अंतर्यामीं नाचून डोलून राहिले आहेत–अशा एका अत्यंत मंगलसमयीं जनाबाई मुक्ताबाईस म्हणते, ‘ताई ! आपण **झोपाळयावरचीं** गोडशीं गाणीं म्हणूं. गडे ! तूं एक आधीं म्हण, मग मी म्हणेन” बरं म्हणून **मुक्ताबाईनें** पुढील गाणें म्हटलें.

**पहिली माझी ओवी । परतूंनी[1] पाहिलें ।**
**दृष्टीनें देखीलें । निजरूप ॥ १ ॥**
**दूसरी माझी ओवी । दूजें नाहीं मनीं ।**
**लक्ष तूझे चरणीं । लागीयेलें ॥ २ ॥**
**तीसरी माझी ओवी । लाभे सायुज्यता ।**
**हात तुझा माझा । सद्गुरुनाथा ॥ ३ ॥**
**चवथी माझी ओवी । शून्य जेथें आटे ।**
**वस्तु[2] घनदाट । मागेंपूढें ॥ ४ ॥**
**पांचवी माझी ओवी । पांचही अणुआरांचा[3] ।**
**पचवीसीयांचा[4] । रीघ नाहीं ॥ ५ ॥**
**साहवी माझी ओवी । सादृश्य देखणें ।**
**वरकड बोलणें । फोल झालें ॥ ६ ॥**
**सातवी माझी ओवी । साच वाटे मना ।**
**अंतरीच्या खुणा । काय सांगों ॥ ७ ॥**

---

१ मागें, अंतर्मुख होऊन ‘उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खासी’ हें मुक्ताईचें चांगदेवास उपदेशपर पद आहे. २ परमात्मवस्तु मागें पुढें घनदाट आहे. ‘नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते’ ( गीता ११–५० ) ३ आणुआर, बारीक चाराचुरा ( ज्ञाने० १८–३६ ) पंचभूतें हा विश्वांतला अणुआर आहे. ४ पंचीकृत पंचमहाभूतें.

आठवी माझी ओवी । आठव नाहीं जरा ।
निर्गुण सोयरा । पर्णियेला[1] ॥ ८ ॥
नववी माझी ओवी । नांदू मी लागले ।
परपुरुषा[2] रतले । जीवेंभावें ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी । धालें माझें मन ।
डोळां दिसे ऊन । रात्रीमांजी[3] ॥ १० ॥
म्हणे मुक्ताबाई । निवृत्तीचें देणें ।
योगीयाचें खुणे । योगी जाणे ॥ ११ ॥

हे मुक्ताबाईचें गाणें ऐकून सर्वजण डोलूं लागले. यावर **जनाबाईची** पाळी आली. तिनें पुढील सोपें पण गोड गाणें म्हटलें.

पहिली माझी ओवी । ओवीन जगत्र ।
गाईन पवित्र । पांडुरंग ॥ सांवळा पां० ॥ १ ॥
दूसरी माझी ओवी । दूजा नाहीं कोठें ।
जनीं वनीं भेटे । पांडुरंग ॥ २ ॥
तिसरी माझी ओवी । तीजा नाहीं ठाव ।
अवघाची देव । पांडुरंग ॥ ३ ॥
चवथी माझी ओवी । वैरीले दळण ।
गाईन निधान । पांडुरंग ॥ ४ ॥
पांचवी माझी ओवी । माझिया माहेरा ।
राहे निरंतरा । पांडुरंग ॥ ५ ॥
सहावी माझी ओवी । सहाही शिणले ।
गुरुमूर्ती भेटले । पांडुरंग ॥ ६ ॥
सातवी माझी ओवी । आठवे वेळोवेळां ।
देखिले म्यां डोळां । पांडुरंग ॥ ७ ॥

१ लग्नांत वरला. २ क्षराक्षरातीत पुरुषोत्तम. ३ दिवसा चांदणें व रात्रीं ऊन दिसणें हा योग्यांचा अनुभव आहे.

आठवी माझी ओवी । अठ्ठावीस युगें ।
उभा चंद्रभागे । पांडुरंग ॥ ८ ॥
नववी माझी ओवी । संपलें दळण ।
चुकवी मरण । पांडुरंग ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी । दहा अवतारीं ।
यावें संवसारीं । पांडुरंग ॥ १० ॥

झोके घेत असतांना किंवा दळणकांडण करीत असतांना स्वयंस्फूर्तीनें तत्काळ रचून गाणीं म्हणणाऱ्या स्त्रिया अजूनही कोठें कोठें आढळतात, पण या मुलींच्या अधिकाराच्या मुली कोठें दिसणार ! त्यांना हें शिक्षण कोठें मिळालें ? त्यांच्या शाळा, त्यांचीं पुस्तकें, सर्व कांहीं त्यांच्या भक्तिपूर्ण अंतःकरणांतच होतीं. त्यांना ज्ञानदेवनामदेवांसारखे अत्यंत श्रेष्ठ गुरु भेटले व सत्संग मिळाला हें त्यांचें परम भाग्य होय. पंढरपूरच्या विश्वविद्यालयांत संतचरणापाशीं त्या तयार झाल्या. सत्संगांत काय काय लाभ होत नाहींत !

## १५ सोपानदेव

ज्ञानेश्वरांचे हे धाकटे बंधू. ‘ ज्ञानदेवीं आन ’ ह्या अभंगांत त्यांनीं ज्ञानदेव हे आत्मा व परमात्मा हे भेदाभेद निरसून ‘ एकतत्व अभेद जनीं वनीं ’ भोगीत आहेत व दीपाच्या एका ज्योतींत दुसऱ्या दिव्याची ज्योत मिळून जावी त्याप्रमाणें त्यांच्या जीवनांत माझें जीवन एकमय झालें आहे असें म्हटलें आहे ! ज्ञानेश्वरांच्या ज्योतींत ज्योत मिळवून सोपानदेव मुक्त झाले. हा आत्मसमर्पणाचा आनंद गुरुभक्तांनाच ठाऊक असतो. एकतत्त्व, हरि, श्रीकृष्ण, विठ्ठल, ज्ञानेश्वर हे शब्द भिन्न पण यांचा जो एकरस आनंद त्यांत सोपानदेव ‘ आपणयासगट ’ विलीन झाले. ‘ वैकुंठीची वाट पंढरी जाणा ’ असें ‘ पूर्ण मनोरथ विठ्ठलदेवें ’ केल्यावर ते सांगतात, व ‘ हाचि मार्ग सोपा उघड जनांसी ’ असी ग्वाही देतात. ‘ कृष्णाचिया पंथें चालिलों दातारा, ’ श्रीकृष्ण सर्वांघटीं

पूर्ण आहे हा बोध श्रीगुरुकृपेनें झाल्यामुळें 'गोविंद माधव हा जपु आमुचा। नाहीं प्रपंचाचा आम्हां लेशु' असें ते सांगतात. निवृत्तिनाथांनीं विज्ञानाची खूण दाखविली व तेथें 'सोपान झडकरी झोंबियेला,' व निवृत्तिरूप ब्रह्माच्या ठायीं त्यानें बुडी दिली.

**दुजेपणीं ठाव तें द्वैत फेडिलें। अद्वैत बिंबलें तेजोमय ॥ १ ॥**
**तेजाकार दिशा बिंबीं बिंब एक। निवृत्तीनें चोख दाखविलें ॥ २ ॥**

× × × ×

**निष्काम निश्चळ निश्चित स्वरूप। तेथ निर्विकल्प मन गेलें ॥ १ ॥**
**सर्व हरी हरी सबाह्य अभ्यंतरीं। एक चराचरीं आत्माराम ॥ १ ॥**

× × × ×

**सर्वघटीं राम जीवशिव सम। सर्वरूपें ब्रह्म भरलें सदा ॥ १ ॥**
**सोपान निकट परब्रह्म सेवी। सर्व हा गोसावी विठ्ठलराज ॥ २ ॥**

'मन आधीं मुंडीं वासनेतें खंडीं। विठ्ठल ब्रह्मांडीं एक आहे,' म्हणून वासना व भावना निर्मळ करून विठ्ठलाला वहा, त्याच्या नामरंगांत रंगा, हरी देहींच नांदतो म्हणून अंतर्मुख होऊन आंतच हरीला पहा म्हणजे 'एकाचि गोपाळें जनवन' भरलें आहे हें तुम्हांस कळेल, 'परतालिया दृष्टि चैतन्याची सृष्टि। नामेंचि वैकुंठीं पावे जना' असा सोपानदेवांचा जनांना उपदेश आहे.

### अभंग.

**पृथिवी सोवळी आकाश सोवळें। मन हें वोवळें अभक्तांचें ॥१॥**
**ब्रह्म हें सोवळें न देखों वोवळें। असो खेळीमेळीं इये जनीं ॥ २ ॥**
**ब्रह्मांड पंढरी सोवळी हे खरी। तारिते निर्धारीं एक्यानामें ॥ ३ ॥**
**सोपान अखंड सोवळा प्रचंड। न बोले वितंड हरीविणें ॥ ४ ॥**

## १६ सच्चिदानंद बाबा.

ज्ञानेश्वरीचा लेखक 'सच्चिदानंद बाबा' याच्याविषयीं विशेष माहिती मिळत नाहीं. बाबाचे चार दोन अभंग व ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास

लखोटा' एवढीच याविषयीं वाङ्मयात्मक माहिती उपलब्ध आहे. 'दंड कमंडलु मेखली' असे संन्यासी व 'नखकेशवीर्यस्तंभ' इत्यादि बाह्यवेषी लोकांवर त्यांचा कटाक्ष दिसतो. 'सच्चिदानंद आत्मा येक। विकट वेषें भुलविले लोक' असे ते ह्मणतात. 'ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास लखोटा' हा सात अभंगांचा आहे व त्यांत ज्ञानेश्वरांनीं बाबास योगाच्या खुणा सांगितल्या आहेत त्यावरून बाबांना महाराजांनीं आपलें योगविभव दिलें असावें असें दिसतें.

**नवाचे माझारी औटपीठासेजारी। शून्याची वोहरी सुनीळ प्रभा॥इ०**

हें रहस्य 'पार्वतीलागीं आदिनाथें दाविलें' व ज्ञानदेव ह्मणतात कीं 'निवृत्तीनें दिधलें धरूनि हातीं' व 'गुरुमुखें खूण वोळखूनि घ्यावी। देहींच पहावी मुक्तदशा' असा त्यांचा बाबास उपदेश आहे.

**ते खूण माझिया दाटली नयनीं। चिद्रत्नाची खाणी उघडली॥**
**निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव लाधला। सुखिया पै जाला येणें सुखें॥**

## १७ कान्हू पाठक.

कान्हु पाठक, ( कान्हो त्रिमल पाठक ) हे शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण पुणें जिल्ह्यांत केंदुरपाबळचे वृत्तिवान् जोशी होते. हे ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रेमांतले होते. ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतली त्यावेळीं समाधिनंतरचें कीर्तन यांनीं केलें व तो मान अजून त्यांचे घराण्याकडे चालत आहे. त्यांच्या गुरूचें नांव नागनाथ. यांचा 'गीतासार' ग्रंथ व एक काव्य उपलब्ध आहे. 'नामा पाठक' यांचे नांवावर अश्वमेध ग्रंथ व नामरत्नमाला, भरतभेट इ० प्रकरणें उपलब्ध आहेत. यांचा पुत्र हरि व नातु नामा पाठक. नामा पाठक शके १३०० च्या सुमारास झाला आहे. याचा वंश केंदुरपाबळ येथें आहे.

पाठकाचे मूळनांव राजपाठक. हे चाकणच्या कोणा मांडलिक राजाचे ज्योतिषी होते.

× × × ×

वाद करितां नींदा । घडती दोश ॥ २ ॥
जरी तुज देवाचा छंद । तरी सांडी कामक्रोध ।
तेणें परमानंद । होउनी ठासी ॥ ३ ॥
जरी तुज देवचि होवा । तरी मौन धरी पा जीव्हा ।
तेणें तूं अनुभवा । पावसील ॥ ४ ॥
जरी तुज देवाचा सांगात । होवा अखंडीत ।
तरी बैस पा नींवांत । साधुसंगीं ॥ ५ ॥
जरी तुज देवाचा विश्वास । तरी हृदयीं धरी नागेश ।
म्हणे कान्हो पाठक । अरे जना ॥ ६ ॥

## १८ सेना न्हावी.

पंढरीचा धोपटमार्ग यांनीं प्रेमानें उचलला व स्वतः नामस्मरण व कीर्तन करीत काळ सार्थकीं लाविला. ज्ञानेश्वरादिकांच्या समाधीनंतर हे बरींच वर्षें होते व त्यांची स्मृति ताजी ठेवण्यासाठी यांनीं त्यांच्या समाधि-स्थानावर अभंग केले. यांचे १५० अभंग उपलब्ध आहेत. ते अतिशय साधे, प्रेमळ व सरळ आहेत. कोणा राजाच्या आश्रयाला असतांना त्याची स्मश्रू करितांना कांहीं चमत्कार होऊन रायास उपरती झाल्याची एक कथा प्रसिद्ध आहे. ही नाभाजीनेंही 'भक्तमाळ' ग्रंथांत दिली आहे.

करितां नित्यनेम । रायें बोलाविलें जाण ॥ १ ॥
पांडुरंगें कृपा केली । राया उपरती झाली ॥ २ ॥
मुख पाहातां दर्पणीं । आंत दिसे चक्रपाणी ॥ ३ ॥
कैसी झाली नवलपरी । वाटीमाजी दिसे हरि ॥ ४ ॥
रखुमादेवीवर । सेना म्हणे मी पामर ॥ ५ ॥

भक्ताचा संपर्क कोणाचाही उद्धार करील यांत नवल काय? सेनाची पुण्याई थोर, 'वडिलीं साधिलेलें' विठ्ठलभक्तीचें प्रेम 'पुरातन ही माझी भक्ति' अशा परंपरेनें सेनास प्राप्त झालें. घराण्यांत चालत आलेल्या विठ्ठलभक्तीस सत्संगतीनें पालवी फुटून सेना न्हावी हा

उत्कट भक्त झाला व त्याच्या संगतीनें राजाही सन्मार्गास लागला. यावरून सर्वांनीं मोठा बोध घेण्यासारखा आहे. धंदा कोणताही असो, तो मनीं हरिचिंतन असलें तर पवित्र होतो. कोणताही धंदा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाहीं, कोणीही प्राणि उंच किंवा निच नाहीं. सदाचार व हरि-भक्ति या गुणांनीं मनुष्यास श्रेष्ठत्व येतें; तसें तें सेनास आलें.

**आम्ही वारीक वारीक । करूं हजामत वारीक ॥ १ ॥**
**विवेकदर्पण दाऊं । वैराग्यचिमटा हालवूं ॥ २ ॥**
**उदकशांती डोई घोळूं । अहंकाराची शेंडी पिळूं ॥ ३ ॥**
**भावार्थाच्या बगला झाडूं । कामक्रोध नखें काढूं ॥ ४ ॥**
**चौवर्णा देउनि हात । सेना राहिला निवांत ॥ ५ ॥**

सेनांच्या अभंगांवर ज्ञानेश्वरांच्या वाणीची छाया पडलेली स्पष्ट आहे. यांचे सारे अभंग साध्याभोळ्या वारकऱ्यांला शोभण्यासारखे आहेत. श्रीकृष्णभक्ति व संतप्रीति हे दोनच भाव यांच्या अभंगांत स्पष्ट आहेत.

**उदार तुम्हीं संत । मायबाप कृपावंत ॥ १ ॥**
**केवढा केला उपकार । काय वानूं मी पामर ॥ २ ॥**
**जडजीवां उद्धार केला । मार्ग सुपंथ दाविला ॥ ३ ॥**
**सेना म्हणे उतराई । होतां न दिसे कांहीं ॥ ४ ॥**

लोकांच्या उद्धाराचा व परोपकाराचा मार्ग संतांनीं चोखाळावा असें यांचें कळकळीचें सांगणें आहे.

**स्वहित सांगावें भलें । जैसें आपणासी कळे ॥ १ ॥**
**त्याच्या पुण्या नाहीं पार । होय अगणित उपकार ॥ २ ॥**

× × ×

**करितां परोपकार । त्याच्या पुण्या नाहीं पार ॥ १ ॥**
**करितां परपीडा । त्याच्या पापा नाहीं जोडा ॥ २ ॥**
**उघडा घात आणि हित । सेना म्हणे आहे निश्चित ॥ ३ ॥**

सेना न्हावी यांनीं स्वजातीच्या लोकांना उपदेश केला आहे कीं:—

**जे म्हणविती न्हाविंयाचे वंशीं । तेणें पाळावे स्वधर्मासी ॥ १ ॥**
**शास्त्रें नेम नेमियेला । सांडोनी अनाचार केला ॥ ३ ॥**
**सत्य पाळा रे स्वधर्मासी । सेना म्हणे आज्ञा ऐसी ॥ ४ ॥**

× × × ×

**न्हावियाचे वंशीं । जन्म दिला हृषीकेशी ।**
**प्रतिपाळावे धर्मासी । व्यवहारासी न खांडावे ॥ १ ॥**

दोन प्रहर धंदा करावा व मग ‘ करूनियां स्नान । मुखीं जपा नारायण ॥ मागुती जाण । शिवों नये धोकटी–’ संतांची व शास्त्राची आज्ञा पाळा, विठोबाला शरण जा म्हणजे देव तुम्हांला सांभाळील.

सेना न्हावी यांचे गौळणीवर अभंग आहेत, त्यांत राधेचें विशेष प्रेम वर्णिलें आहे. गौळणींनीं यशोदेकडे कृष्णाच्या खोड्यांचीं गाऱ्हाणीं नेलीं आहेत, गौळणीच्या अंगावरच्या ‘ बिरुद्या, जोडवी, पोल्हार, वाळया, वाक्या, नाकीचे मुक्ताफळ, मोतियाच्या जाळी’ या दागिन्यांचें वर्णन आहे. निवृत्तिनाथांचें समाधिस्थळ त्र्यंबकेश्वर, ज्ञानेश्वरांची आळंदी, व सोपानदेवाचें कऱ्हातीरीं सासवड यावर सेना न्हावी यांचे सुमारें २० अभंग असून वर्णनें अचूक आहेत व त्यांत या त्रिवर्गाविषयीं अतुल प्रेम व्यक्त झालें आहे. ‘ शिव तो निवृत्ति आदिमाया मुक्ताई, ब्रह्मा तो सोपान विष्णु ज्ञानदेव पाहीं ’ याप्रमाणें या चौघांचें त्यांनीं स्तवन केलें असून ‘ ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारूं ’ व ज्ञानदेवानें मला ‘ निजखुण ’ दाखविली, तो माझें निधान आहे, याप्रमाणें ज्ञानेश्वरांपासून हा बोध आपणांस झाला असें सप्रेमभरित वर्णन केलें आहे. ‘ जुनाट जुगादीचें गुप्त ठेविलें । तेंचि निवृत्तिनाथा दीधलें । ज्ञानदेवें प्रगट केलें । जगा दाविलें निधान ’. चारी मूर्तींनीं जगाचा उद्धार केला, त्यांत विशेष ‘श्री ज्ञानराजें केला उपकार। मार्ग हा निर्धार दाखविला ’. मार्ग कोणता ? ‘ अविनाश पंढरीं भूमीवरी पेठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविलें ! ’

## १९ नरहरि सोनार.

नरहरि सोनार हे पंढरीसच राहत असत, मात्र हे एकांतिक शिवभक्त असल्यानें इतर देवतांचें दर्शन घ्यावयाचें नाहीं असा यांचा बाणा होता. पंढरीस राहून पांडुरंगाचें यांनीं कधीं दर्शन घेतलें नाहीं! एका सावकारानें विठोबाच्या कंबरेस येईल असा सोन्याचा करगोटा तयार करण्याचें काम यांचेकडे सोंपविलें. सावकारानें देवाच्या कंबरेचें बरोबर माप यांस घेऊन दिलें होतें, तरी यांनीं तयार केलेला करगोटा लांब तरी व्हावा नाहीं तर आंखुड तरी व्हावा, असें चार वेळ झालें! असें कां होतें याचा सर्वांस आचंबा वाटला. शेवटीं विठोबाचें तोंड पाहायचा प्रसंग येऊं नये म्हणून डोळे बांधून स्वतः नरहरि सोनार देवळांत गेले व ते हातांनीं विठ्ठल मूर्ती चांचपूं लागले तों त्यांच्या हाताला पांच मुखें, दहा तोंडें, सर्पालंकार, मस्तकीं जटा व जटेंत गंगा अशी शंकराची मूर्ति लागली! हे शंकरच आहेत असें वाटून त्यांनीं डोळे सोडले तों विठ्ठलमूर्ति डोळ्यांना दिसली! डोळे बांधले तों शंकर व डोळे उघडले तों विठ्ठल! असें तीन वेळ झालें. तात्पर्य हें कीं, हरिहर एकरूप आहेत हा त्यांना त्या प्रसंगानें बोध झाला व उपासनेचें एकदेशीपण जाऊन सर्वात्मकपण त्यांच्या प्रचीतीस आलें, द्वैतभाव जाऊन अद्वैतबोध झाला. मग नरहरि सोनार वारकरीमंडळांत समाविष्ट होऊन विठ्ठलभक्त झाले. या नंतरचा पुढील अभंग आहेः—

**शिव आणि विष्णु एकचि प्रतिमा। ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित ॥१॥**
**धन्य ते संसारीं नर आणि नारी। वाचे हरि हरि उच्चारिती ॥२॥**
**नाहीं पैं तो भेद अवघाचि अभेद। द्वेषाद्वेषसंबंधा उरी नुरे ॥ ३ ॥**
**सोनार नरहरी न देखे पै द्वैत। अवघा मूर्तिमंत एकरूप ॥ ४ ॥**

नरहरि सोनारांच्या नांवावर ३०।४० अभंग छापले आहेत, पण त्यांत कांहीं ‘ गुरु गैबीनाथ। नरहरि दास हा अंकित ’-ह्या नरहरीचे आहेत व कांहीं ‘ नरहरी मालो ’चे आहेत. हे दोन्ही भक्त शेंदीडशें

वर्षांपूर्वीं झाले असून ते शिवदिनकेसरींच्या परंपरेंतले आहेत. त्या अभंगांत 'तुकोबा देहासुद्धा गेला' व 'बोधराजें देव वचनीं गोविला' ह्या २५० वर्षांपूर्वींच्या संतांच्या गोष्टी दिल्या असून त्यांत 'कान्हुपात्रा' आहे—किल्ली, हवेली, लंपट, मसणवट इ० शब्द आहेत! हे असले अभंग वगळले म्हणजे नरहरी सोनारांचे ८।१० च अभंग राहतात.

(१)

**भस्म उटीं रुंडमाळा । हातीं त्रिशूळ नेत्रीं ज्वाळा ॥ २ ॥**
**गजचर्म व्याघ्रांबर । कंठीं शोभे वासुकीहार ॥ २ ॥**
**भूतें वेताळ नाचती । हर्षयुक्त रमापती ॥ ३ ॥**
**सर्व सुखाचें आगर । म्हणे नरहरी सोनार ॥ ४ ॥**

'सत्य ज्योतिर्लिंग बारा' ह्या अभंगांत सुप्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांचें वर्णन केलें आहे. त्यांच्या सुवर्णकारित्वाची ओळखण पटविणारा पुढील अभंग पहा:—

**(२) देवा तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार ॥ १ ॥**
**देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोनें ॥ २ ॥**
**त्रिगुणाची करूनि मूस । आंत ओतिला ब्रह्मरस ॥ ३ ॥**
**विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केला चूर्ण ॥ ४ ॥**
**मनबुद्धीची कातरी । रामनाम सोनें चोरी ॥ ५ ॥**
**ज्ञानताजवा घेउनि हातीं । दोन्ही अक्षरें जोखिती ॥ ६ ॥**
**खांदा वाहोनी पोतडी । उतरला पैलथडी ॥ ७ ॥**
**नरहरीसोनार हरीचा दास । भजन करी रात्रंदिवस ॥ ८ ॥**

ह्या अभंगांतहा 'ताजवा' 'पोतडी' हे शब्द संशयास्पद वाटतात. ज्ञानेश्वरादिकांविषयीं त्यांचे प्रेमळ अभंग आहेत.

**(३) निगम हा वेल प्रकाशमान जाला। भक्तिफुलें त्याला शोभताती १**
**निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई। घनदाट पाहीं फळें आलीं ॥२॥**
**तयांचिये चरणीं सोनार नरहरी । झाडलोट करी तयाद्वारीं ॥ ३ ॥**

पुढील अभंगपाद नरहरि सोनारांची थोर योग्यता पटवितात.

**ते हे विटेवरी समचरण साजिरे। पाहतां गोजिरे नीलवर्ण ॥ २ ॥**
**उदंड वर्णिलें उदंड ध्याइलें। उदंड गाइलें परी न सरेची ॥ ३ ॥**

× × × ×

**सुखाची विश्रांती सुख आलें भेटीं। प्रेम दुणावे पोटीं वोसंडलें॥१॥**
**सांवळें सगुण साजिरें निर्गुण। पाहतां आनंद पूर्ण मना होय ॥२॥**
**अलक्ष्य अपरंपार न कळे विचार। नरहरी सोनार ध्यात चित्तीं ३**

× × × ×

**नव्हे तें सगुण नव्हे तें निर्गुण। जाणती ते खूण तत्त्वज्ञानी ॥ १ ॥**
**म्हणे नरहरी सोनार क्षराहूनी पर। परेहूनी पर विटेवरीं ॥ ४ ॥**

## २० सावता माळी

पंढरपुरापासून १०।१२ मैलांवर मोडलिंबाजवळ अरणभेंडी येथें सावता माळी रहात असत. हे विठ्ठलाचे एकनिष्ठ भक्त होते. एकदां पांडुरंग ज्ञानेश्वर आणि नामदेव यांस बरोबर घेऊन लहूळ येथें कूर्मदासाच्या भेटीस जात असतां वाटेंत अरण येथें आले. 'तुम्ही येथें थांबा, मी सावत्यास भेटून येतों' असें ज्ञानदेव व नामदेव यांस सांगून पांडुरंग सावत्याकडे आले व म्हणाले, 'सावत्या मला अगोदर कोठें तरी लपव, माझ्यामागें दोन चोर लागले आहेत.' इतकें म्हणतांच सावतोबांनीं खुरप्यानें आपलें पोट चिरलें व देवास आंत ठेवून वर धोतर गुंडाळलें! बराच वेळ देव येत नाहींत असें पाहून ज्ञानदेव व नामदेव सावतोबाकडे गेले. सावतोबा नामस्मरणांत तल्लीन झालेले पाहून येथेंच देव असावेत असें म्हणून देवाची व माझी भेट करून द्यावी अशी नामदेवांनीं विनंति केली. सावतोबांनीं त्याला बाहेर काढतांच सर्वांसच प्रेमाचें भरतें आलें.

भगवद्भक्त जो धंदा, व्यवसाय किंवा कर्म करितात तो त्यांच्या अंतर्निष्ठ उपासनेच्या बळानें पवित्र होऊन जातो. जो आपल्या वांट्याला आलेलें काम चोख करितो त्याच्यामुळें धंद्याला उच्चता येते. सावता माळी आपलें बागेचें कर्म हरिसेवा या बुद्धीनें करीत असल्यामुळें तें

कर्मच पावन झालें. कर्त्याच्या बुद्धीमळें कर्माला श्रेष्ठत्व किंवा गौणत्व येतें. आपले संत विविध व्यवसाय करणारे होते, पण त्यांच्या संतपणाला कांहीं बाध आला नाहीं. पूजाकर्मही हीन बुद्धीनें केलें तर तें निष्फळ होय व प्रपंचकर्मही हरिसेवाबुद्धीनें केलें तर ती हरीची पूजाच होय. सावता माळ्यांना बागेंतलें कर्म करितांना पहा:—

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥**
**लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥ ३ ॥**
**सावता ह्मणे केला मळा । विठ्ठलपायीं गोविला गळा ॥ ४ ॥**

मला ज्ञान नको, मानसन्मान नको, भुक्ति नको, मुक्ति नको—एक तुझी निर्मळ भक्ति पाहिजे: 'स्नान नाहीं संध्या नाहीं । यातिकूळसंबंध नाहीं ' असा मी हीनयाति पामर तुलाच सतत हृदयीं बाळगणारा आहे असें त्यांनीं अभंगांतून म्हटलें आहे. गौळियांच्या भक्तीला भुलून भक्त परतंत्र झालेला व विटेवर उभा राहिलेला हा परब्रह्मपुतळा! त्याजवरून 'तनुमनाची कुंरवडी' करून त्याच्या प्रेमांत व नामचिंतनांत अहोरात्र तन्मय होऊन राहणें यापरतें मला कांहीं नको असें त्यांचें मागणें आहे.

**नामाचिये बळें न भीऊं सर्वथा । कळिकाळाच्या माथां सोटं मारूं ॥१॥**
**वैकुंठीचा देव आणूं या कीर्तनीं । विठ्ठल गाउनी नाचों रंगीं ॥ २ ॥**
**सुखाचा सोहळा करूनी दिवाळी । प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं ॥३॥**
**सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणें मुक्ति द्वारां वोळंगती ॥ ४ ॥**

## २१ जगमित्र नागा.

बार्शीहून परळी वैजनाथ हें क्षेत्र सुमारें २५।३० कोसांवर आहे. तेथें जगमित्र नागा नांवाचा एक ब्राह्मण राहात असे. त्यांच्या गोड स्वभावामुळें त्यांचें मूळचें नांव लोपून लोक याला जगमित्र ह्मणूं लागले व त्यांच्या गुरूचें नांव नागेश होतें म्हणून त्यांनीं आपल्या नांवापुढें नागा असें पद जोडलें. जगमित्र हे कोणी म्हणतात भिक्षावृत्तीनें राहत व कोणी म्हणतात हे

श्रीमंत असून कालगतीनें संपत्ति नष्ट झाल्यावर भिक्षा मागून राहूं लागले. यांचे वंशज पुण्यापासून १०।१२ मैलांवर असलेल्या पिरंगुट गावीं शके १२५२ पासून कुळकर्ण करीत असल्याचे लेख सांपडले आहेत. हे जगमित्र खरे, ह्म० मनांतून हे कोणाचाही हेवादेवा करीत नसत, पण अजातशत्रु पुरुषाचीही द्वेषनिंदा करणाऱ्या ‘ ते के न जानीमहे ’ या कोटींतल्या व्यक्ति जगांत सर्वकाळ असतातच! त्याप्रमाणें कोणी द्वेषबुद्धीनें यांच्या मठीस आग लावली व त्यांतून हे ईश्वरकृपेनें सुरक्षित राहिले. या गोष्टीस अनुलक्षून त्यांनीं एक अभंग लिहिला आहेः—

**अग्नि जाळी तरी न जळे प्रल्हादु । हृदयीं गोविंदु ह्मणोनियां ॥१॥**

ह्यापुढें गोपाळ, पांडव, बिभीषण इ० भक्तांवर आलेल्या असल्याच प्रसंगाचे दाखले देऊन जगमित्र म्हणतातः—

**जगमित्रनागा नजळे जरि अग्नि जाळि। हृदयीं वनमाळी ह्मणोनियां ५**

पुराणांतील उदाहरणें देऊन एखादा सिद्धांत सांगण्याची यांची हातोटी चांगली आहे. ‘ त्यासी गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही ’ हें सांगण्यासाठीं त्यांनीं ‘ भक्त भीष्म पडियेला रणीं । कर्ण विदारिला अर्जुनाच्या बाणीं । हरिश्चंद्र वाहे डोंबाघरीं पाणी । परिक्षिती बैसला मरणाच्या आसनीं–‘ त्यासी गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही ’–असें सांगून गोविंद मनीं धरा ह्मणजे तो सर्व संकटांपासून तुम्हांला सोडवील असें श्रोत्यांच्या मनावर त्यांनीं बिंबवलें आहे.

विठोबाची काकडआरती व देवाचें पंचामृताचें मंगलस्नान याचेविषयीं त्यानें प्रेमळ वर्णन केलें आहे.

**सकळ भूषणांचें भूषण । कंठीं धरा नारायण ॥ १ ॥**

ह्या अभंगांत ‘ शिव मस्तकीं धरिला । भेद भक्तांचा काढिला ’ ह्याप्रमाणें पंढरीस विठ्ठलाच्या शिरीं शंकराची पिंडी आहे ही गोष्ट त्यांनीं उघड केली आहे. भेददृष्टि सोडा व ‘ आत्मा आहे हा भूतांत । भूतें आहेती आत्म्यांत ’ अशी अद्वैतभावाची उपासना करा अशी यांची शिकवण आहे.

**कृष्ण लोणी खाया गेला । येउनि गोपीनें धरिला ॥ १ ॥**
**मायेपाशीं घेउनि आली । तेथें कृष्णा पाहती जाली ॥ २ ॥**
**येथें कृष्ण तेथें कृष्ण । जिकडे तिकडे अवघा कृष्ण ॥ ३ ॥**
**ऐसें आश्चर्य गे माये । जगमित्र नागा पाहुनि धाये ॥ ४ ॥**

## २२ जोगा परमानंद

१ जोगा हें याचें नांव व परमानंद हें त्याच्या गुरूचें नांव. हा जातीनें तेली होता असें म्हणतात. याची कविता फार थोडी आहे, तरी आहे ती फारच प्रेमळ असून आणखी उपलब्ध होईल तर बरें असें वाटतें. हा बार्शीस राहात असे. बार्शीस भगवानाचें मंदिर आहे. जोगा भगवानाचें दर्शनास जातांना रोज गीतेचा एक श्लोक म्हणून नमस्कार घाली. एका भाविकानें त्याच्या अंगाला खडे टोचूं नयेत म्हणून त्याला पीतांबर नेसविला. यानंतर तो मळूं नये म्हणून जोगा नमस्कार जपून घालूं लागला. अधिक वेळ लागल्यामुळें मंदिरांतली आरती संपून गेली. जोगास फार वाईट वाटलें. हा पीतांबर देवाच्या भजनाच्या आड आला ह्मणून त्यानें तो पीतांबर फाडून टाकला ! देवाला गरीबी आवडते, श्रीमंती आवडत नाहीं. श्रीमंती प्रायः परमार्थाला विघ्न करते, म्हणून भक्तजन तिची इच्छा करीत नाहींत. जोगा हा पंढरीनाथाचा प्रेमळ भक्त होता व पंढरीच्या प्रसंगानें जो सत्संग घडे त्याची याला अत्यंत प्रीति होती. ' रोमांच रवरवितु स्वेदबिंदु डळमळितु । पाहतां नेत्र उन्मीळितु ' अशा अवस्थेंत अष्टसात्विकभाव देहीं उमटून ' प्रेमभरित अंतःकरणांत देव प्रगटावा ' असें याचें देवापाशीं मागणें आहे. ' राया विठोबाचे डिंगर प्रेमें बोधले डुल्लती ' असे संत प्रत्यक्ष ' सच्चिदानंदाचिया मूर्ति ' आहेत, संत हे ' माझें माहेर ' आहे, असें यांनीं म्हटलें आहे, तें सर्वकालीन सत्यच आहे.

' भक्ती हे घोंगडी पांघरलों फुडी । उतरलों थडी भवनदीची ' याप्रमाणें आपण भवपार झालों याचा संतोष जोगांनीं व्यक्त केला आहे.

१

हृदयीं प्रगटला साकार । जो लावण्यगुणसागर ।
परमानंदें वाहे पूर । तेणें गहिंवर न संवरे ॥ १ ॥
प्रेमें पाझरती लोचन । पाहतां जगजीवन ॥ ध्रु० ॥
मेघश्याम पाहतां आपोआप । डोळयां लागले वडप ।
अष्टही सात्त्विकांचें रोप । हृदयआळां उगवलें ॥ २ ॥
भक्तिभावें वोल्हावलें । प्रेमफळासी पै आलें ।
नवविधा हें पिकलें । परमानंद म्हणे जोगा ॥ ३ ॥

२

मन निवालें निवालें । कैसें समाधान जालें ॥ ध्रु० ॥
संत आलिया अवसरीं । नवल आरतियांची परी ।
आनंदलें नरनारी । परमानंद प्रगटले ॥ १ ॥
द्यावया आलिंगन । बाह्यां येतसे स्फुरण ।
सजळ जाले लोचन । जैसे मेघ वरुषती ॥ २ ॥
आजी सुदीनसोहळा । संत जीवनाची कळा ।
जोगा विनवितो सकळां । भेटी परमानंदेसी ॥ ३ ॥

जोगांची कविता अशी प्रेमरसानें आर्द्र झालेली आहे. जोगा परमानंदांची समाधी बारशीस असून तेथें मार्गशीर्ष वद्य ४ स त्यांच्या पुण्यतिथीचा मोठा उत्सव होतो.

३

जोगा परमानंदांचे गुरगुडीवर एक मार्मिक पद आहे तें पुढें देतों:—

बैसुनि संतांघरीं हो । घेतलि गुरगुडी हो ॥ ध्रु० ॥
आधीं ब्रह्मांड नारळ । मेरु सत्व तो अढळ ।
निर्मळ सत्रावीचें जळ । सोहं गुरुगुडी हो ॥ १ ॥
चिलीम त्रिगुण त्रिविध । मीपण खडा तो अभेद ।
तमतमाखु जाळुनि शुद्ध । वैराग्यविंगळ धडधडी हो ॥ २ ॥

**सावधान लावुनि नळी । मीपण झुरका विरळा गिळी ।**
**जन्ममरण मुरकुंडि सांभाळी । विषयधूर सोडी हो ॥ ३ ॥**
**लागला गुरुगुडीचा छंद । त्याला प्रसन्न परमानंद ।**
**जोगास्वामी तो अभंग । गुरुचरण न सोडी हो ॥ ४ ॥**

"संतांच्या घरीं बसून म्हणजे कबीरका घर त्रिकुटी त्या भृकुटीमध्यांत म्हणजे आज्ञाचक्रांत तप्तहेमाप्रमाणें परमात्मरूप आहे. त्या प्रकाशरूपाचेवर त्रिकूटचक्र आहे. ह्या त्रिकूटाचलावर मी गुरगुडी म्हणजे गुरुगोडी घेत बसलों आहे ! या गुरुगोडीचा रसास्वाद घेत असतां प्रथम सहस्रार कमलरूप ब्रह्मांड हाच त्या गुरगुडी ( गुरुगोडी ) चा नारळ होय. आतां ह्या सहस्रार कमलरूप नारळाची दांडी म्हणजे मेरुदंड होय, ज्याला पृष्ठवंश असेंही म्हणतात. वरील त्रिकूटशिखरावरून सत्राव्या जीवनकलेचें उदक प्राप्त होऊन योगी इच्छामरणी होतात. चंद्र जसा एके कलेनें वाढत जातो, त्याप्रमाणें जीवचंद्राच्या जन्मापर्यंत सोळा कळा होतात त्या अशाः—१ आकाश २ वायु ३ अग्नि ४ आप ५ औषधी ६ अन्न ७ रेत, व मातेच्या उदरांत नऊ महिनेपर्यंत नऊ कळांनीं जीव वाढत जातो याप्रमाणें १६ सोळा कळांचा पूर्ण जीवचंद्र उदयाला येतो व अशा या जीवाचे गुरुकृपेनें अगर योगमार्गांतील खेचरी मुद्रेनें बाहेरचे श्वास बंद होऊन भ्रूमध्यापासून हृदयापर्यंत श्वास चालतात. श्वास बाहेर न गेल्यानें प्राणगतीचा रोध होतो, व अशावेळीं जिव्हा भ्रूमध्याचे जवळ गेल्यामुळें पडजिभेजवळ आंतील चित्रिणीपासून निघालेलें अमृत परस्पर उदरांत जातें. बाह्य श्वासोच्छ्वास बंद होत असल्यानें जीवनक्षय होत नाहीं. अशा प्रकारची सतरावी जीवनकला योग्यांना साध्य झाल्यानें ते इच्छामरणी होऊन जातात. आज्ञाचक्रांत सोहंरूपी गुरुगोडीचा आस्वाद प्रात होतो. सोहं म्हणजे अजपा गायत्री. ह्या अजपाजपगायत्रीचा अनुभव दोन प्रकारचा आहे. 'उर्ध्वस्रोता वै देवाः अधोस्रोता वै जीवाः' एक अधोस्रोत व एक उर्ध्वस्रोत. हंस हा उर्ध्वस्रोत

म्हणजे देवमार्ग व सोहं हा अधोस्रोत म्हणजे जीवमार्ग. सोहं ह्या मार्गानें मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धि व आज्ञा ह्या क्रमानें जीव येतो. आतां ह्या गुरगुडीचा दांडा म्हणजे मेरूदंड अगर पृष्ठवंश होय. ह्या मेरूदंडाला संलग्न झालेलीं वर उल्लेखिलेलीं षट्चक्रें आहेत. मूलाधार चक्र गुदद्वाराचे समोर मेरूदंडास लागून आहे. तिसरें चक्राचें नांव अग्निचक्र म्हणूनच आहे. हें अग्निचक्र म्हणजे अग्निप्रदीप्त असलेली चिलीम होय. हें अग्निचक्र त्रिकोणात्मक आहे, म्हणजे त्रिगुणात्मक व तीन प्रकारचें आहे. आतां ह्या त्रिकोणात्मक अग्निचक्रांत मीपणाचा खडा ठेवला आहे, हा मीपणाचा खडा म्हणजे स्वयंभुलिंग होय. ह्या त्रिकोणात्मक अग्निचक्रांत तम म्हणजे अंधकाररूपी तमाखु असतें. तिला वैराग्यानें व अभ्यासानें पुन्हांपुन्हां प्रयत्नानें कुंडालिनी जागृत करून सहस्रार चक्रांतून सहस्रांशुपेक्षांही प्रखर असा अग्नि उद्दीपित केला म्हणजे तें अग्निचक्र प्रदीप्त होतें. आतां या गुरगुडीला नळी पाहिजे ती म्हणजे नासिकारंध्रें हीच ती नळी होय. ह्या नळींतून झुरका घेत असतां कांहीं लोकांची मुरकुंडी वळते, ती मुरकुंडी म्हणजे जन्ममरण ही होय. हा मीपणरूपी झुरका घेतांना तो गिळूं नये व जन्ममरणरूपी मुरकुंडींतून मुक्त व्हावें. तसेंच धूर सोडावयाचा तो पंचविषय हाच धूर सोडावा. अशा गुरगुडीचा ( गुरुगोडीचा ) ज्याला छंद लागेल त्याला परमेश्वर प्रसन्न होईल. जोगाचा गुरुस्वामी परमानंद हा अभंग असल्यामुळें जोगा हा आपल्या गुरूचे चरण सोडीत नाहीं व सदासर्वकाळ आत्मानंदांत निमग्न होऊन रहातो." ( योगी त्र्यंबकशास्त्री खरे यांचें पत्र ).

## २३ चोखामेळा

तामीळ प्रांतांत चांभारांच्या जातींत जसा 'नंद' नांवाचा भक्त होऊन गेला ( पृ० २६५ ते २७४ ) तसा महाराष्ट्रांत महारजातींत चोखामेळा झाला. नंद शिवभक्त होता, चोखामेळा विष्णु ( विठ्ठल ) भक्त होता. नंदाला लोकछळ सोसावा लागला, चोखामेळा हा ज्ञानेश्वर-

नामदेवादि संतांच्या प्रेमांत विसावला. चोखामेळा हा मंगळवेढ्यास राहत असे. पंढरपुरास तो मधूनमधून येई. पंढरीस त्याला नामदेवांचीं कीर्तनें ऐकावयास मिळालीं व त्याचें चित्त विठ्ठलभक्तीनें भरून गेलें. नामदेवास त्यानें आपला 'गुरु' च मानलें आहे.

कामधंदा करीत असतांना चोखोबा सर्वकाळ विठ्ठलभजन करीत असे. संसारदुःखाचे आघात त्याला सोसावे लागले. ते कोणाला सुटले आहेत? 'एकापुढें एक पडती आघात। सारितां न सरत काय करूं?' असें त्यांनीं म्हटलें आहे. संसारदुःखावर औषध एक भगवच्चिंतन आहे, त्याचा चोखोबानें उत्कृष्ट अभ्यास केला व पांडुरंगाला त्यानें वश करून घेतलें. पंढरीस भक्तमंडळ जमून आनंद करीत; 'चोखामेळा तेथें वंदितो चरण। घाली लोटांगण महाद्वारीं.' पंढरीचा आनंद लुटून मंगळवेढ्यास जातांना त्यानें निश्चय करावाः—

**बैसोनी निवांत करीन चिंतन। कायावाचामनेंसहित देवा॥**
**नामाचा आठव हेंचि सोपें वर्म। अवघे कर्माकर्म पारुषती॥**

व अहोरात्र नामचिंतनांत निमग्न असावें. एकदा विठ्ठलानें या आपल्या लाडक्या भक्तास राउळांत आणून दर्शन दिलें व त्याच्या गळ्यांत रत्नहार व तुळशीची माळ घालून कपाळास बुक्का लावला! दर्शनानंदीं लय लागलेल्या चोखोबास पुजाऱ्यांनीं पाहिले व त्याचा वेष पाहिला. चोरीस गेलेला रत्नहार यानेंच चोरला असा त्यावर ठपका ठेवून त्यांनीं त्यास मारही दिला!

**'विठोबाचा हार तुझ्या कंठीं कसा आला?'।**
**शिव्या देउनि म्हणती 'महारा! देव बाटवीला'॥**

पुजाऱ्यांपाशीं देव नव्हता, तो चोखोबाजवळ होता! जनाबाईनें म्हटलें आहेः—

**चोखामेळ्याची करणी। तेणें देव केला ऋणी॥**
**यातीहीन चोखामेळा। त्यासी भक्तीचा कळवळा॥**
**देव बाटविला तेणें। हांसे जनी गाय गाणें॥**

एकापाशीं देव आणि दुसऱ्याला नुस्ताच फुंज—याचें जनाबाईस हंसूं आलें! जनाबाईनें आपल्या अभंगांतून चोखोबाची योग्य प्रशंसा केली आहे:—

**चोखामेळा अनामिक। भक्तराज तोचि एक॥**
**परब्रह्म त्याचे घरीं। न सांगतां काम करी॥**
**चोखामेळा संत भला। तेणें देव भुलविला॥**
**चोखामेळासाठीं। ढोरें ओढी जगजेठी॥**

ज्ञानेश्वर आपल्या मंडळीसह पंढरपुरास आले व त्यांचे आणि नामदेवांचें अत्यंत प्रेम जमलें व सारे संत एक झाले. त्या वैष्णवांच्या मेळ्यांत चोखोबाचाही समावेश झाला. चोखोबांच्या भक्तीला सारे भुलले, चोखोबा साऱ्यांचा प्रेमविषय झाला. पंढरी, विठ्ठल, पुंडलीक, नाम, वैष्णव याविषयीं चोखोबांच्या मनांत निर्विकल्प प्रेम होतें. पंढरीचे वारकरी—'तयांचे पायावरी भाळ माझें'.

(१)

**विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी॥ १॥**
**होतो हरिनामाचा गजर। दिंड्या पताकांचे भार॥ २॥**
**निवृत्ति ज्ञानदेव सोपान। अपार वैष्णव ते जाण॥ ३॥**
**हरिकीर्तनाची दाटी। तेथें चोखा घाली मिठी॥ ४॥**

(२)

**अनादि निर्मळ वेदाचें जें मूळ। परब्रह्म सोज्ज्वळ विटेवरी॥ १॥**
**कर दोन्ही कटीं राहिलासे उभा। नीळवर्ण प्रभा फांकतसे॥ २॥**
**आनंदाचा कंद पाउलें साजिरी। चोखा म्हणे हरी पंढरीये॥ ३॥**

चोखोबा म्हणतात कीं आम्हांला ज्ञान नाहीं, पुराण कळत नाहीं, शास्त्रांचा संवाद समजत नाहीं, योगयागदानव्रतजपादि कांहीं एक उमगत नाहीं व होत नाहीं—तथापि 'चोखा म्हणे माझा भोळा भाव

देवा । गाईन केशवा नाम तूझें । ' बरें, निरंतर नामाचें चिंतन करीत असल्यामुळें ' चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहींच भेटला देव आम्हां । ' भक्तभाविक कथाकीर्तनांत तन्मयतेचें सुख भोगूं लागले कीं चोखोबानें संतांची विनवणी करावी:—

**जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥ १ ॥**
**बहु भुकेला जालों । तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ॥ २ ॥**
**बहुत केली आस । तुमच्या दासाचा मी दास ॥ ३ ॥**
**चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्ट्यासाठीं ॥ ४ ॥**

उच्छिष्टासाठीं पाटी डोक्यावर घेऊन हिंडणारे वतनदार महार गांवोगाव आहेत, त्यांतलें हे नव्हत ! पाटी कोणती ? उच्छिष्ट कोणतें ? मागणारा कोणत्या अधिकाराचा व दाते केवढ्या योग्यतेचे ! हा विचार मनांत आणूनच वरील अभंग लावायला पाहिजे ! मनुष्य जें अन्न स्वतः खातो त्यांतलाच अवशेष दुसऱ्याला देत असतो. ज्ञानभक्तिप्रेमाचें वरान्न सेवन करणारे जे ज्ञानेश्वरनामदेवादि संत त्यांच्यापाशीं त्याच अन्नाचें ( ब्रह्मरसाचें ) उच्छिष्ट चोखोबा आपली बुद्धिरूप पाटी किंवा अंतःकरणाचा पदर पुढें करून त्यांत मागत आहेत ! ' संतांचें उच्छिष्ट ' हें आहे. संतांचें तोंड ज्याला लागलें आहे अर्थात् त्यांनीं जपून सिद्ध केलेला जो नाममंत्र तो त्यांच्याच तोंडून ऐकण्यांत म्ह० त्यांचें उच्छिष्ट सेवन करण्यांतच कृतार्थता आहे ! गुरूच्या किंवा संतांच्या तोंडांतल्या पोळीभाताच्या घासाला उच्छिष्ट म्हणणें हा अडाणीपणाचा किंवा भोळ्याभावाचा प्रकार आहे ! चोखोबांचा शुद्ध भक्तिभाव अतीव निर्मळ होता.

**ऊंस डोंगा परि रस नोहे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा ॥ १ ॥**
**कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा ॥ २ ॥**

**नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें ।**
**काय भुललासी वरलिया सोंगें ॥३ ॥**
**चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा ॥ ४ ॥**

डोंगा म्ह० वाईट, वांकडा, हीन. 'नाहीं देह शुद्ध याति अमंगळ' हें डोंगें, पण भाव शुद्ध–निर्मळ. एकवेळ पंढरीनाथ चोखोबांचे घरीं जेवायास आल्याचा उल्लेख आहे:––

**विठोबा पाहुणा आला आमुचे घरां । निंबलोण करा जीवेंभावें ।**
**षड्रसपक्वान्नें विस्तारलें ताट । जेवूं एकवट चोखा ह्मणे ॥ २ ॥**

चोखोबाची पत्नी सोयराबाई व बहिण निर्मळाबाई या भक्तिमान् होत्या. सोयराबाईचें बाळंतपण पांडुरंगांनीं स्वहस्तें केल्याचे उल्लेख आहेत ! त्यांचा मुलगा कर्ममेळा. या सर्वांचे थोडथोडे अभंग आहेत. बंका महार हा चोखोबाच्या बायकोचा भाऊ असून तोही भक्त होता. याप्रमाणें हें घराणेंच पवित्र होतें. देव चोखोबाचे घरीं जेवायला आले व त्यांनीं त्याच्या बायकोचें बाळंतपण केलें इत्यादि गोष्टी भक्तांच्या दृष्टीनें पाहिल्या पाहिजेत म्हणजे त्यांतली मौज समजेल. मंगळवेढ्यास गांवकुसूं बांधीत असतां चोखोबासही कामास लाविलें होतें. चार महिन्यांनीं तें कुसूं कोसळून पुष्कळ महार चिरडून मरण पावले, त्यांतच चोखोबांचा अंत झाला. त्यांच्या अस्थि नामदेवांनीं पंढरपुरास नेल्या. ज्या अस्थींतून 'विठ्ठल'ध्वनि निघेल त्या चोखोबांच्या आहेत अशी खूण धरून नामदेवांनीं अस्थि पंढरीस आणल्या व स्वहस्तें आपल्या शिष्योत्तमाच्या अस्थि महाद्वारांत पुरल्या आाणि त्यावर समाधि बांधली. अस्थींतूनही विठ्ठलध्वनि निघाल्याबद्दल सकल संतांनीं चोखोबाचा जयजयकार केला. चोखोबांचे अभंग भावभक्तीनें कसें भरले आहेत तें आपण पाहूं—

५

**देहीं देखिली पंढरी । विठ्ठ अविनाश विटेवरी ॥ १ ॥**
**रुक्मिणी अंगना । आत्मा पुंडलीक जाणा ॥ २ ॥**

आकार तितका नासे । निराकार विठ्ठल दिसे ॥ ३ ॥
ऐसें गुज ठायींचें ठायीं । चोखा ह्मणे लागा पायीं ॥ ४ ॥

६

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट ही चालावी पंढरीची ॥ १ ॥
पताकांचे भार मिळाले अपार । गर्जे भीमातीर जयजयकार ॥ २ ॥
खटनट यावें शुद्ध होउनि जावें । दवंडी पिटी भावें चोखामेळा॥ ३ ॥

७

नवल पाहीं नवल पाहीं । पाहों जाणे तेणें पाहिलें नाहीं ! ॥ १ ॥
निर्गुणीं सगुण सगुणीं निर्गुण । दोहींचें कारण तेचि ठाईं ॥ २ ॥
चोखा म्हणे पाहतां पाहणें लपालें । हृदयीं बिंबलें हृदयाचि ॥ ३ ॥

८

कोण तो सोंवळा कोण तो ओवळा। दोहींच्या वेगळा विठू माझा ॥१॥
कोणासी विटाळ कशाचा जाहला । मुळीचा संचला सोंवळाची ॥२॥
पापांचा विटाळ एकाचिये अंगा । सोंवळा तो जगामाजी कोण ॥३॥
चोखा म्हणे माझा विठ्ठल सोंवळा । अरूप आगळा विटेवरी ॥ ४ ॥

चोखोबांची स्त्री सोयराबाई इचे अभंगाचा मासला:—

नाहीं उरली वासना । तुह्मां नारायणा पाहतां ॥ १ ॥
उरला नाहीं भेदाभेद । झालें शुद्ध अंतर ॥ २ ॥
विटाळाचें होतें जाळें । तुटलें बळें नामाच्या ॥ ३ ॥
चौदेहाची तुटली दोरी । ह्मणे चोखयाची महारी ॥ ४ ॥

निर्मळाबाईचा अभंग:—

मज नामाची आवडी । संसार केला देशधडी ॥ १ ॥
सांपडलें वर्म सोपें । विठ्ठल नाममंत्र जपे ॥ २ ॥
नाहीं आणीक साधन । सदा गाय नारायण ॥ ३ ॥
निर्मळा म्हणे देवा । छंद येवढा पुरवावा ॥ ४ ॥

## २५ वैष्णवांचा मेळा

नामदेवांची महाभक्त म्हणून सर्वत्र ख्याती झाल्यावर ती ज्ञानेश्वर-मंडळ नेवासे मुक्कामीं असतांना त्यांचे कानावर आली. ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ नुक्ताच झाला होता रेड्याकडून वेद बोलवणें, भिंत चालवणें, या त्यांच्या सिद्धिचमत्काराच्या गोष्टीही पंढरीच्या भक्त-भाविकांत पसरल्या असून ज्ञानेश्वरीचा आस्वाद चाखलेले कित्येक लोक पंढरीस आले व त्यांच्याकडून ज्ञानेश्वरांची कीर्ति नामदेवांच्या कानीं येऊन त्यांच्या मनांत ज्ञानेश्वराविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला. परस्प-रांस परस्परांच्या भेटीची उत्कंठा लागून राहिली. अखेर निवृत्तिनाथ आपल्या भावंडांस बरोबर घेऊन पंढरपुरास आले. आधीच ते सारे निस्सीम कृष्णभक्त. त्यांत श्रीकृष्णाची बालमूर्ति विटेवर उभी राहिलेली पाहून, चंद्रभागेच्या वाळवंटांतला तो भक्तमेळा पाहून व नामदेव-रायांचें अलोट सप्रेमाचें कीर्तन ऐकून त्यांस अत्यानंद झाला. ज्ञानेश्वर-पंचक व नामदेवराय व त्यांची मंडळी यांच्या परस्परांच्या गांठीभेटी होऊन सर्वांचें परमसख्य जमलें. सज्जनांचें सख्य फार लवकर जमतें व तें चिरकाल राहतें. त्यांत ते एका उपासनेचे असले कीं मग कांहीं अवर्णनीय अद्वयानंद तेथें उभा राहतो. निवृत्तिनाथांचें वैराग्य, ज्ञानेश्वरांचा ज्ञान-भक्तियोग, सोपानदेवांचा एकांत, मुक्ताबाईचें लडिवाळपणाचें व धिटाईचें वागणें, नामदेवांचा सगुणप्रेमा, जनाबाईची सद्भक्ति, चांग-देवांचें योगैश्वर्य, गोरोबाकाकांचा अधिकार, चोखोबांचा प्रेमळपणा-सर्व संतांचें सर्वच गोड गुण एकमेकांच्या प्रेमोत्कर्षास कारण झाले, व अहोरात्र तेथें भक्तिप्रेमाचा महानंद उचंबळून राहिला.

**विठूचा गजर हरिनामाचा । झेंडा रोंविला ।**
**वाळवंटीं चंद्रभागेच्या तटीं । डाव मांडिला ॥**
( किंवा ) **संतांचा मेळा गोपाळांचा । डाव मांडिला ॥**

पंढरीस उसळणाऱ्या भक्तिप्रेमाचें सर्वभक्तांनीं गोड वर्णन केलें आहे:—

**आले वैष्णवांचे भार । दिले हरिनाम नगार ॥ १ ॥**
**अवघी डुमडुमिली पंढरी । कडकडाट गरुडपारीं ॥ २ ॥**
**टाळमृदंग-धुमाळी । रंगणीं नाचे वनमाळी ॥ ३ ॥**
**ऐसा आनंदसोहळा । दासी जनी पाहे डोळां ॥ ४ ॥**

नामदेवाबरोबर वैष्णवाचा मेळा निरंतर असायचाच.

सत्संगावरील अभंगांत निवृत्तिनाथांनीं आपली भांवंडें व शिष्य ज्ञानेश्वर सोपान व मुक्ताबाई आणि विसोबा खेचर, नरहरि सोनार, नामदेव व त्यांचे पुत्र नारा व विठा, व चांगदेव इतक्यांचीं नांवें सकौतुक घेतलीं आहेत. ते म्हणतात:—

**चांगया लाधलें नामया फळलें । दिधलें विठ्ठलें हरिकृपा ॥ १ ॥**
**प्रेमाचे पुतळे भीमातीरा आले । जयजयकार केले हरिभक्तीं ॥२॥**
**निवृत्ति निवाला आनंदें नाचतु । उन्मनीभरितु ज्ञानदेवो ॥ ४ ॥**

आपली भावंडें व त्यांच्या वाढत्या मेळ्यांत समाविष्ट झालेले संत हरिनामकीर्तन करीत व सत्संगाचें सुख जगास देत पंढरीस जात येत असतांना अंतःकरण सप्रेमभरित होऊन निवृत्तिनाथ उद्गारलेः—

**सुमनाचेनि वासें भ्रमर भुलले । मार्ग पै विसरले इंद्रियांचा ॥ १ ॥**
**तैसे हे संत विठ्ठलीं तृप्त । नित्य पै निवांत हरिचरणीं ॥ २ ॥**
**नाठवे हे दिन नाठवे हे निशी । अखंड आम्हांसी हरिराजा ॥ ३ ॥**
**तल्लीन प्रेमाचे कल्लोळ अमृताचे । डिंगर हरीचें राजहंस ॥ ४ ॥**
**टाहो करूं थोर विठ्ठलकीर्तनें । नामाच्या सुमनें हरी पूजूं ॥ ५ ॥**
**निवृत्ति निवांत तल्लीन पै जाला । प्रपंच अबोला हरिसंगें ॥ ६ ॥**

अशा संत्संगांत पंढरीच्या आनंदसोहळ्यांत निमग्न असतां ' मनाची कल्पना देहाची भावना । शून्य ते वासना हरिमाजी ' असा थोडा फार अनुभव आजही येत असतो.

## २६ दहीकाल्याचा प्रसाद

**सोडिल्या शिदोरी । दहीभात काला करी ॥ १ ॥**
**घ्यारे अवघे समस्त । हरी गोपाळांसी देत ॥ २ ॥**

**कांहीं न ठेवा उरी । आजी देतो पोटभरी ॥ ३ ॥**
**सेना बैसला द्वारीं । प्रसाद वांटितो श्रीहरी ॥ ४ ॥**

काल्यावर खुद्द श्रीनिवृत्तीनाथांचे १२ अभंग प्रसिद्ध आहेत. सर्व संतमंडळी काल्याच्या सोहळ्यास हजर असायचीच. कीर्तनाचार्य नामदेव यांजकडे मुख्यकीर्तनाचा भाग असे व ज्ञानेश्वरांकडे लाह्याचा प्रसाद सर्वांना वांटण्याचें काम असे! हे सर्व गोपाळ श्रीकृष्णाचे जिवलग सखे दशमीपासून पौर्णिमेपर्यंत सहा दिवस पंढरीस भजन-कीर्तनाचा रंग भरीत व लुटीत असत. ‘कालया कौशल्य नामदेव जाणे’ ह्म० काल्याची कुशलता नामदेव जाणतात व त्याची खूण आम्ही ओळखतों असें निवृत्तिनाथ म्हणतात. दहीपोहे किंवा दहीलाह्या सर्वांनीं घरून सुंदर कालवून आणायच्या, सर्वांच्या ह्या शिदोऱ्या एकत्रित करायच्या व कीर्तनानंतर त्यांचा प्रसाद ज्ञानेश्वरांनीं सर्वांना द्यायचा, त्यांचे गोळे उडवावयाचे व झेलायचे व श्रीकृष्णसंगतींतला हा आनंद आपण त्याचे सवंगडी आज प्रत्यक्ष भोगीत आहोंत या स्वानंदानुभवांत सर्वांनीं तल्लीन व्हावयाचें असा हा काल्याचा सोहळा असे. हा देवाचा परमानंद सर्वांनीं अपार भोगला. देवानें प्रत्यक्ष प्रत्येकाच्या मुखांत कवळ घातला, याची खूण निवृत्तिनाथ म्हणतात कीं आह्मी जाणतों! परमानंदाचा कवळ किंवा प्रसाद साक्षात् भगवंतांनीं मुखीं घातल्याशिवाय कोणाचा परमार्थ तडीस गेला आहे? तात्पर्य ही सारी मंडळी भगवत्प्रसाद झालेली, साक्षात्कारसुख भोगणारी होती. निर्विकल्प देव त्यांना प्रत्यक्ष होता, इतरांना लपलेला देव त्यांना सन्मुख होता. नामदेवांची तल्लीनता तर कांहीं अवर्णनीयच होती. त्यांचें प्रेमाचें फुंदन चाले, ‘नुघडितां दृष्टि न बोले तो वाचा’ अशी त्यांची अवस्था होई. ‘वेणुनादीं’ याप्रमाणें काला एकत्र करून ‘हरिनाम विनट हरि उच्चारीत सप्रेम डुल्लत’ भक्तजन देवमंदिरांत येत. जनाबाई म्हणतातः—

**नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग ।**
**जनी म्हणे ‘बोला, ज्ञानदेवा ! अभंग ॥’**

अभंग बोलतां रंग कीर्तनीं भरला ।
प्रेमाचेनि छंदें विठ्ठल नाचूं लागला ॥
ऐसा कीर्तनमहिमा सर्वांमाजीं वरिष्ठ ।
जडमूढभाविकां सोपी केली पायवाट ॥
नामयाची जनी लोळे संतांच्या पायीं ।
कीर्तनप्रेमरस अखंड देइ ग विठाई ॥

ही सर्व भक्तमंडळी पंढरपुरीं कीर्तनाचा काल्याचा सोहळा मोठ्या उल्हासानें करीत. शुद्धदशमीपासून पौर्णिमेपर्यंत हा सहा दिवसांचा सोहळा आषाढीकार्तिकीचा असे. उपासनेंत उपास्याच्या लीलानुकरणाचें एक अंग असतें हें आजही उत्तरहिंदुस्थानांत 'रामलीला' व 'कृष्णलीला' ज्यांच्या पाहण्यांत आहेत त्यांना ठाऊक आहे. श्रीकृष्ण यमुनेच्या वाळवंटांत आपले सवंगडे जमवून व सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून दहींपोह्यांचा काला करून तो प्रसाद आपल्या हातानें सर्वांस देत व ते एकमेकांच्या तोंडांत प्रेमानें घालीत. ह्या गोड प्रसंगाच्या स्मरणार्थ पंढरपुरास चंद्रभागेच्या वाळवंटांत कीर्तनें करून गोपाळपुरीं दहींहंडी फोडण्याचा व काला एकमेकांस देण्याचा प्रघात ह्या संतमंडळीनीं सुरू केला. तो आज ६५० वर्षें अव्याहत सुरू आहे.

चला रे वैष्णव हो जाऊं पंढरियेसी ।
प्रेमामृतखुण मागों त्या विठ्ठलासी ॥ १ ॥
चालिले गोपाळ वाहताति वांकुलिया ।
भरले प्रेमरसें मग ते वाताति टाळिया ॥ २ ॥
दिंड्या गरुडटके मृदंगाचे नाद ।
गाताती विठ्ठलनाम करिताती आल्हाद ॥ ३ ॥
गजर गोपाळांचा श्रवणीं पडियेला ।
शंख चक्र करीं विठ्ठल सामोरा आला ॥ ४ ॥
कासवदृष्टी न्याहाळितु रंगीं नाचतु पै उगला ।
सोपान म्हणे आम्ही वाळुवंटीं केला काला ॥ ५ ॥

# १६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग.

## १ साहित्याची शोभा.

ज्ञानेश्वरीचे खरे अधिकारी अंतरंग पुरुषच आहेत, तथापि साहित्य-प्रेमी रसिकही बहिरंगाचा मनोहर थाट पाहून डोलतील, याची जाणीव ज्ञानेश्वरांना होती. **साहित्य** आणि **शांति** या दोहोंकडेही त्यांचें लक्ष पूर्ण होतें. माझा हा ज्ञानेश्वरी ग्रंथ साहित्याचा अलंकार आहे, शृंगारादि नवरसांच्या शिरीं पाय देऊन शांतिरसाला मी मूर्धाभिषिक्त केलें आहे, मऱ्हाठी भाषा हें शांतिरसाचें घर आहे, ज्ञानेश्वरीनें ब्रह्मविद्येची खाण सर्वांसाठीं उघडली असून जगाला आनंदाचें आवार केलें आहे, मऱ्हाठी भाषेची योग्यता संस्कृत भाषेच्या बरोबरीची आहे, ही अमृताची खाण आहे, माझा हा आबाळसुबोध मऱ्हाठी ग्रंथ केवळ श्रवणानें वाटेल त्याच्या पदरांत मोक्षफळ टाकण्यास समर्थ आहे, अशा प्रकारचे मराठी वाङ्मयाच्या व मराठी भाषेच्या गौरवाचे उद्गार ज्ञानेश्वरांनीं काढलेले आपण मागे ऐकलेच आहेत ( पृ. ३६७ ते ३८० ). ज्ञानेश्वरी ग्रंथ जाधवराजांच्या सत्तेखालीं महाराष्ट्र स्वराज्यसुख भोगीत असतांना निर्माण झाला व रामदेवांचें ज्ञानेश्वरीनें गौरवही केलें आहे ( मागें पृ. ३३७ ते ३४२ ). हा ग्रंथ ज्या नाथपरंपरेंत निर्माण झाला त्या परंपरेची माहिती व गोरक्षनाथांच्या विचारांशीं ज्ञानेश्वरांच्या विचारांची एकरूपता या गोष्टीही आपण पाहिल्या असून निवृत्ति-नाथ व ज्ञानेश्वर यांचें गुरुपरंपरेचे उद्गारही आपण ऐकले आहेत ( पृ० ४८८ ते ४९६ ). 'श्रीज्ञानेश्वरदर्शन' ह्या प्रकरणांत तर ज्ञानेश्वरांच्या अंतरंगाची आपणांस पुरी ओळख झाली आहे. त्यांत प्रथम ज्ञानेश्वरांचें चरित्र आपण नामदेव व सत्यामळनाथ यांच्या तोंडून ऐकलें असून खुद्द ज्ञानेश्वरांच्या 'आत्मचरित्रपर' उद्गारांवरून व श्रीगुरु निवृत्तिनाथाविषयींच्या त्यांच्या प्रेमळ स्तोत्रांवरून त्यांच्या अंतराची

ओळख होणारी आहे व ती समकालीन संतभक्तांनीं त्यांच्याविषयीं जे प्रेमोद्गार काढले आहेत त्यावरूनही दृढतर होते. 'ज्ञानेश्वरी'वर भागवतादि पूर्वील ग्रंथांचे संस्कार झाल्याचें आपण पाहिलें आहे. ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति व कृष्णार्जुनप्रेमप्रसंग या विषयांवरील त्यांच्या प्रेमोद्गारांवरून त्यांच्या अंतरंगाशीं होणारा परिचय त्यांच्या 'भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता' पाहून दृढतर होऊन 'श्रीज्ञानेश्वरदर्शनाचा' प्रत्यक्ष साक्षात्कार होणार आहे. हें प्रकरण ह्या ग्रंथाचें केवळ हृदय होय. नामदेवांचा व त्यांचा परस्परजिव्हाळ्याचा संबंध १४ व्या प्रकरणावरून स्पष्ट होतो. पंधराव्यांत त्यांच्या अभंगवाणीचें श्रवण होतें व आतां ह्या प्रकरणांत ज्ञानेश्वरीचें रहस्य आपणांस ऐकावयाचें आहे, पण रहस्याकडे वळण्यापूर्वीं बहिरंगाचे कांहीं विचार सांगून टाकून मगच रहस्यांत शिरणें बरें—वस्तुतः ज्ञानेश्वरांच्या वाणीला अंतरंग-बहिरंग हा भेद ठाऊक नाहीं. ती अद्वयानंदाची केवळ खाण असून पेढ्यासारखी आंत-बाहेर गोडच गोड आहे! यांच्या बहिरंगांतही अंतरंगाचाच आनंद आहे. असो. ज्ञानेश्वरींत उपमादृष्टांतरूपकांच्या वर्षावामुळें जो एक विशेष उत्पन्न झाला आहे त्याचा आधीं विचार करूं.

## २ उपमारूपकादिअलंकारांची गर्दी.

ज्ञानेश्वरींत **रूपकें** फार बहारीचीं आहेत व कित्येक रूपकें सर्वावयवी व सर्वांगसुंदर आहेत. मूळ गीतेनेंच क्षेत्रक्षेत्रज्ञाचें व अश्वत्थाचें अशीं दोन सुंदर रूपकें दिलीं आहेत, तथापि त्या रूपकांचेंही विस्तृत, मनोवेधक व विशद स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांसारखें कोणीही केलेलें नाहीं. याशिवाय त्यांचीं स्वतंत्र लहानमोठीं अशीं कितीतरी रूपकें ज्ञानेश्वरीभर विखुरलीं आहेत. यांपैकीं चार ठळक स्थळें येथें दाखवितों पहिल्या व सतराव्या अध्यायांच्या मंगलाचरणाचीं गणेशाचीं रूपकें, तिसऱ्या अध्यायांतील 'काम एष क्रोध एष' या श्लोकावरील रूपक, सातव्या अध्यायांतील मायानदीचें व तेराव्यांतील प्रकृतिपुरुषांचें रूपक, पंधराव्याच्या

प्रारंभीच्या गुरुपूजेच्या ओव्या, अठराव्यांतील गीताप्रासादाचें रूपक व सर्वांवर कळस म्हणजे सोळाव्यांतील गुरुरूप चित्सूर्याचें रूपक अशीं कांहीं रूपकें मूळांतूनच पाहिलीं पाहिजेत. हीं सर्व रूपकें इतकीं सर्वांग-परिपूर्ण आहेत कीं तीं पाहतांना ज्ञानेश्वरांच्या स्फूर्तीची, कल्पना-चातुर्याचीं व भाषाप्रभुत्वाची धन्यता वाटते. प्रत्येक विषयाची परिभाषा, समर्पक शब्दांची योजना, कठिण विषयांनाही मनोहारित्व आणणारें पदलालित्य, हे सर्व प्रकार पाहून ज्ञानेश्वर हे अध्यात्माचेच नव्हे तर मराठी भाषेचेही सर्वश्रेष्ठ प्रभु आहेत असें सहजच मनांत येतें. "ज्ञान-निधीचे भुजंग । विषयदरीचे वाघ । भजनमार्गीचे मांग । मारक हे ॥ हें देहदुर्गींचे धोंड । इंद्रियग्रामींचे कोंड" असें कामक्रोधादि विकार प्राण्यांना कसें बुडवितात तें पहा; "इहीं विवेकाची त्राय फेडिली । वैराग्याची साल काढिली । जितया मान मोडिली । उपशमाची ॥ इहीं संतोषवन खांडिलें । धैर्यदुर्ग पाडिले । आनंदरोप सांडिलें । उपडूनियां ॥ हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । न बोलतां कवाळिती । प्राणियांतें ॥ हे शस्त्रेंवीण साधिती । दोरेंवीण बांधिती । ज्ञानियांसी तरी वधिती । पैज घेऊनी ॥ हे चिखलेंवीण रोविती । पाशेंवीण गोविती । हे कवणाजोगें न होती । आंतुवटपणें ॥" किती वक्तृत्वपूर्ण वाणीचा अस्खलित ओघ हा! (अ० २ ओवी २३९ ते २५९) आतां ह्या विकारांचा ज्यांच्यावर प्रभाव चालत नाहीं ते संत हे "आनंदाचें अनुकार। सुखाचे अंकुर। कीं महोबोधें विहार। केले। जैसे ॥ ते विवेकाचे गांव। कीं परब्रह्मीचे स्वभाव। नातरी अळं-कारलें अवयव। ब्राह्मविद्येचे ॥" (अ० ५ ओवी १३७-१४४) असे असतात, कां कीं ते "ज्ञानगंगे नाहले। पूर्णता जेऊनि धाले। शांतीशी जाले। पल्लव नवे ॥ ते परिणामा निघाले कोंभ। कीं धैर्यमंडपीचे स्तंभ। जे आनंदसमुद्रीं कुंभ। चुबुकळोनि भरलें" (अ० ९ ओवी १९०-९१) मायानदीच्या किंवा प्रासादाच्या रूपकांत त्या त्या विषयाला

अनुरूप अशीच परिभाषा सहज आलेली आहे. चित्सूर्याचें रूपक अन्यत्र दिलें असून त्याचा अर्थही दिलेला आहे. ( पृ. ५३२ ते ५३४ )

आतां उपमाचातुर्याचे कांहीं प्रकार पाहूं:—

( १ ) भाऊबंदकीचे दुष्परिणाम हिंदुस्थानवासीयांस कांहीं सांगायला नकोत ! अनेक घराणीं व राज्यें यामुळें रसातळास गेलीं आहेत पुढील ओव्या पहा:–' जैसें काष्ठें काष्ठ मथिजे। तेथ वन्हि एक उपजे। तेणें काष्ठजात जाळिजे। प्रज्वळलेनि ॥ २४३ ॥ तैसा गोत्रींचि परस्परें। जरी वध घडे मत्सरें। तरी तेणें महादोषें घोरें। कुळचि नाशे'॥१-२४४॥

( २ ) अर्जुन ' मोहफणिग्रस्त ' झाला व त्या मोहसर्पाच्या लहरी त्याला आवरतना. तो कठिण प्रसंग जाणून श्रीहरि गारुडी तेथ पातला. तो आतां ( गीतोपदेशानें ) त्याचें विष उतरील. या पुढील २ सुंदर रूपकें पहा:–' मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांतिकवळुनु। जैसा घनपडलीं भानु। आच्छादिजे ' येथें ' फाल्गुन ' हें अर्जुनाचें नांव साभिप्राय आहे ! भानूच्या दृष्टांतानें अर्जुनाचें मोठेपण राखलें आहे. अर्जुन हा दुःखशोकाच्या वणव्यानें पेटलेला महापर्वत आहे–' म्हणोनि सहजें सुनीळ। कृपामृतें सजळ। तो बोळला श्रीगोपाळ। महामेघ ॥७७॥ तेथ सुदर्शनांची द्युती। तोचि विद्युल्लता झळकती। गंभीरवाचा ते आयती। गर्जनेची ॥७८॥ आतां तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळ निवेल। मग नवी विरुढी फुटेल। उन्मेषाची ॥' (२–७९). येथें अर्जुन–पर्वत; दुःखशोक–वणवा; सुनीळ व कृपामृतयुक्त गोपाळ–महामेघ, कृष्णाच्या शुभ्रदंतांची प्रभा–विद्युल्लता; त्याचे गंभीर बोल–गर्जनेचा थाट; ज्ञानोपदेश–वृष्टि; वृष्टीनंतर अर्जुनाचळ निवेल व त्यावर नवे ज्ञानांकुर उगवतील–सर्व रूपक मोठें बहारीचें आहे (अ. २ ओवी ७० ते ७९)

( ३ ) त्रिगुणात्मक विश्व मज परमात्मापासून झालें असून भूतें मला कां जाणत नाहींत ? यावर दृष्टांतरूपानें उत्तर: ' सांगें अग्नीस्तव धूम होये। तिये धूमीं काय अग्नि आहे ?। तरी विकार मी हा नोहे।

जरी विकारला असे ॥ परी उदकीं जाली बाबुळी ( शेवाळ ) । ते उदकातें जैसी झांकोळी । कां वायांचि आभाळीं । आकाश लोपे ॥ हां गा स्वप्न लटिकें म्हणों ये । परी निद्रावशें बाणलें होये । तंव आठव काय देत आहे । आपणपेया ? ॥ हें असो डोळियांचें । डोळांचि कीर पडळ रचे । तेणें देखणेपण डोळयांचें । न गिळिजे कायी ? ॥ तैसी हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली । कीं मजचि आड वोडवली । जवनिका जैसी ' ॥ ( अ. ७ ओवी ५९ ते ६३ )

( ४ ) देवावांचून ब्रह्मांडांत ' आणिक कांहीं गोमटें ' नाहीं असा कायावाचामनानें ज्याचा पूर्ण निश्चय झाला आहे त्याच्या भक्तीचें रूप सांगण्यासाठीं सती आणि पति, गंगा आणि समुद्र, प्रभा आणि सूर्य, लहरी आणि पाणी असे चढते दृष्टांत दिले आहेत. " रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें ( संकटभयभेद ) । तिये कांतेचेनि पाडें । अनुसरला जो ॥ ६०७ ॥ मिळोनि मिळताचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ६०८ ॥ सूर्याच्या होण्या होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे । हें विकलेपण साजे । प्रभेसि जेंवि ॥ ६०९ ॥ पै पाणियाचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें । ते लहरी ह्मणती लौकिकें । येऱ्हवी तें पाणी ॥ ६१० ॥ " ( अ० १३ )–याप्रमाणें आत्मार्पण करून देवाशीं जो एकमय झाला आहे आणि पुन्हां ' मी होऊन ' मला भजतो आहे–तेथें ज्ञानभक्ति एकरूपच आहे.

( ५ ) ज्ञान स्वयंभू आहे, अज्ञान किंवा अविद्या उडवणें एवढेंच परमार्थाचें काम आहे. माझें अज्ञान दूर करून भगवंतांनीं बुद्धीचा बोधाशीं ( परतत्वाशीं ) योग करुन दिला हें सांगतांना अर्जुन म्हणतोः ' जैसा केरु ( ढग ) फिटालियां आभाळीं । दिठी रिगे सूर्यमंडळीं । कां हातें सारूनि बाबुळी ( शेवाळ ) । जळ देखिजे ॥ ७४ ॥ नातरी उकलूनियां सापाचे वेढे । जैसें चंदना खेंव देणें घडे । अथवा विवसी ( पिशाच )

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

पळे मग चढे । निधान हातां ॥ ७५ ॥ तैसी प्रकृती हे आड होती । ते देवेंचि सारोनि परौती । मग परतत्व माझिये नती । शेजार केलें ॥ ७६ ॥ ( अ० ११ ). सूर्यावर ढग, जळावर शेवाळ, चंदनावर साप, किंवा निधानावर पिशाच, तसें ज्ञानाला आच्छादन करणारें अज्ञान होय.

( ६ ) शुचित्व हें ज्ञानाचें एक लक्षण होय. शुचित्व म्ह० आंत-बाहेर निर्मळ–' आंग मन जैसें । कापुराचें ' एखादें रत्न जसें सबाह्य चोखडें किंवा सूर्य जसा अंतर्बाह्य तेजाळ तसा ' बाहेरीं कर्में क्षाळला । भीतरीं ज्ञानें उजळला '–बाहेर शुद्ध व आंत ज्ञानसंपन्न असाच पुरुष शुचिर्भूत असतो. नुस्ताच बाहेर कर्माचा डंभ आणि आंत अशुद्ध तो शुद्ध नव्हे. ' मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थीं न्हाणिला । कडू दुधिया माखिला । गुळें जैसा ॥ ४६९ ॥ वोस घरीं तोरण बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुमसेंदुर केलें । कांतहीनेनें ॥ ४७० ॥ कलश ढिमाचे ( मुलाम्याचे ) पोकळ । जळो वरील ते झळाळ । काय करूं चित्रीव फळ । आंत शेण ॥ ४७१ ॥'–अंतर्शुद्ध नसतां केवळ कर्माचा बाह्यात्कार याला येथें आठ उपमा दिल्या आहेत. अंतर्बाह्य शुचित्व पुढील दृष्टांतानें फार खुलून दिसतें: ' म्हणोनि सद्भाव जीवगत । बाहेरी दिसती फांकत । स्फटिकगृहींचे डोलत । दीप जैसे ' ॥ ४७६ ॥ ( अ० १३ ओवी ४६२ ते ४७६ )

( ७ ) ' सत्य ' शब्दाची व्याख्या देतांना त्या व्याख्येंत सत्य, हित, मित, पथ्य व मधुर हे सारे अर्थ जणुं ओतले आहेत. जाईच्या कळीसारखें तीक्ष्ण पण मृदु, किंवा ' तेज परी शीतळ । शशांकाचें '; बुबुळालाही न लागणारें पण पर्वताचा कडा फोडणारें मऊ पाणी; संदेह फेडण्यांत शस्त्राची जणुं धार पण श्राव्यत्वें मधुरांतलें मधुर; सत्य इतकें कीं जसें मूर्तब्रह्म पण मधुर इतकें कीं ' ऐकों ठातां कौतुकें । कानातें निघती मुखें; '–' किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकवूं नेणें । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा ॥ ' कानाला मधुर

लागतें पण ' अर्थें विभांडी जिव्हार '–मर्मभेद करिते, असलें भाषण काय कामाचें ? आई जशी अहितीं वरवर कोपते पण ' लालनीं मऊ जैसें पुष्प ' ' तैसें **श्रवणसुखचतुर** । परिणमोनि **साचार** । बोलणें जें **अविकार** । तें सत्य येथें ' ( अ० १६ ओवी ११५ ते १२४ ).

( ८ ) लोक देहबुद्धीचे झाले, त्यांची बुद्धि व आस्था विषयपर झाली, विवेकवैराग्याचा मार्ग सुटून ते देवाला विसरले ! त्यांना उज्ज्वल बुद्धियोग कसा आवडावा ? ' दिगंबरांना वस्त्रांची गरज कोठें राहते ? जात्यंधांना रवि काय होय ? बहिऱ्यांच्या समाजांत मधुर गायन कोण ऐकणार ? कोल्ह्याला चांदणें आवडावें कसें ? चंद्रोदय होण्याच्या आधीच ज्यांचे डोळे फुटतात ते कावळे चंद्राला कोठून ओळखणार ?' ( अ. ४ ओवी २० ते २५ ).

( ९ ) आसुरी प्रकृतीच्या लोकांची जन्मकर्मे, आशा, ज्ञान कशीं व्यर्थ जातात हें पहा. पर्जन्यकाळ नसतांना पसरणारे मेघ, मृगजळा-वरील तरंग, कोल्हेरीचे असिवार इ० मातीच्या चित्राचे घोडेस्वार, बोडंबरीचे ( जादुगिरीचे ) अलंकार, गंधर्वनगरीचे आवार, निर्फळ व पोकळ अशा सांवरी, शेळीचे स्तन–' तया मूर्खाचें तैसें जियालें !' त्याचें पढणें इ० ' मर्कटें नारळ तोडिलें । कां आंधळयाहातीं पडिलें । मोतीं जैसें. ' त्याचीं शास्त्रें इ० कुमारीहातीचीं शस्त्रें किंवा अशौच्य पुरुषास सांगितलेलीं मंत्रबीजें ' ( ९ ओवी १७२ ते १७७ )

( १० ) स्वधर्म आचरायला जरी कठिण असला तरी परिणामाकडे नजर देऊन तोच आचरणें हितावह आहे. तो कठिण किंवा कडु म्हणून सोडला तर मोक्षसुखाला आंचवणें ओघानें येतें. " निंबसेवनानें रोगनाश व आरोग्यलाभ होत आहे तर त्याच्या कडवटपणाला कंटाळून कसें चालेल ? आपली आई कुब्जा असली तरी आपण तिच्या ज्या प्रेमावर वाढतों तें प्रेम कांहीं कुऱ्हें ( वाकडें ) नाहीं. इतर रंभा पुढें आल्या तरी त्या बाळकाला काय होत ! पाण्यापेक्षां तुपांत गुण अधिक आहेत म्हणून

मासा काय तुपांत वांचेल! जगाला जें विष तें विषांतल्या किड्यांना अमृत आहे, जगाला गूळ गोड पण त्यांना त्यांत मरण आहे! पराचार बरवा असला तरी आचरूं नये. पायाचें चालणें काय डोक्याला साधेल? ' यालागीं कर्म आपुलें। जें जातिस्वभावें असे आलें। तें करी–तेणें जिंतिलें। कर्मबंधातें '– आणखी असा एक प्रश्न आहे कीं स्वधर्माचारांत आयास आहेत आणि परधर्माचारांत काय ते नाहींत! सरळ रस्त्यानें चालण्यानें पाय शिणतात आणि आडरानांत धांवल्यानें काय पायाला शीण होत नाहींत? डोक्यावर शिळा घेतली किंवा शिदोरी घेतली तरी ओझें सारखेंच पडतें, मग ज्यांत जीवाला श्रमानंतर विसावा मिळतो अशी शिदोरीच कां घेऊं नये? कण आणि भूस कांडण्यांत शीण सारखाच, मग कणच कां कांडून घेऊं नयेत? पाणी घुसळणें व दहीं घुसळणें यांत श्रम सारखेच, शेगडीचें पेटवण व नित्याचा होम या दोहोंतही डोळ्यांला धूर लागतोच, एखादी धांगडी ठेवली व लग्नाची बायको सांभाळली तरी अन्नवस्त्र द्यावें लागतेंच, मग ज्यांत सुख, प्रतिष्ठा व चित्ताचें समाधान राहतें तें स्वधर्माचरणच कां करूं नये? पाठीवर शत्रूचा घाव बसला तरी मरण जर चुकत नाहीं तर मग समोरासमोर धैर्यानें शत्रूशीं दोन हात कां खेळूं नयेत? कुलस्त्री परक्याच्या घरांत घुसली तरी जर मार चुकत नाहीं तर मग पतीचा मार खाऊनही पतिगृहीं राहणेंच अधिक शहाणपणाचें नाहीं काय? ' तैसें आवडतेंही करणें। न निफजे शिणल्याविणें। तरी विहित बा रे कोणें। बोले भारी?'॥ तात्पर्य स्वधर्मानुष्ठानानेंच जीवाचें इहपरलोकीं आत्यंतिक कल्याण आहे, म्हणून जीवानें तोच आचरावा. स्वेच्छ वागण्यांतही कष्ट चुकत नाहींत मग विहितकर्मच कां सोडावें? स्वधर्मामृतसेवनानें सुखसमाधान व अक्षयत्व मिळतें म्हणून विवेकी पुरुषानें स्वधर्माचेंच परिपालन करावें, परधर्माचें विष घेऊन आत्मघात करूं नये व संकटींही स्वधर्म सोडूं नये" (अ० १८ ओवी ९२० ते ९५०)

( ११ ) ज्ञानेश्वर हे उपमाकिरणांचे जणुं सूर्य आहेत. त्यांच्या उपमा उदात्त, समर्पक व सुंदर असतात. बाराव्या अध्यायांतील भक्त लक्षणें सांगतांना चैतन्य, प्राण, वसुधा, सूर्य, गंगा, समुद्र, पक्षी, दीप, वृक्ष, इक्षुदंड, आकाश, चंद्रिका, हिमाचल, उदक, मेरु, इ० अंतर्बाह्य सृष्टीतले विशाल व निर्मल पदार्थ उपमारूपानें त्यांच्या काव्यमय दृष्टी-पुढें जसे नाचत येतात, किंवा मेघधारेप्रमाणें त्यांचा वर्षाव सुरू होतो!

"तो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपर नाहीं । **चैतन्या** जेविं ॥१४४॥ उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे। हें कांहींच नेणिजे । **वसुधा** जेविं ॥ १४५ ॥ कां रायाचे देह चाळू । रंका परौते गाळूं । हें न म्हणेचि कृपाळू । **प्राण** पै गा ॥ १४६ ॥ गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि कां करूं । **तोय** जैसें ॥ १४७॥ तैसी आघवियाचि भूतमात्रीं। एकपणें जया मैत्री । कृपेसी **धात्री** । आपण जो ॥ १४८॥ वार्षियेवीण **सागर** । जळें जैसा निर्भर । तैसा निरुपचार । संतोषी जो॥१५१॥ तरि सिंधूचेनि माजें। जळचरां भय नुपजे। आणि जळ-चरीं नुबजे। **समुद्र** जैसा॥१६५॥ तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंती नलगे। आणि जयाचेनि आंगें। न शिणे लोक ॥१६६॥ किंबहुना पांडवा। **शरीर** जैसे अवयवा । तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥ १६७ ॥ व्यापक आणि उदास। जैसें कां **आकाश** । तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥ १८० ॥ संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें विनटला । व्याधाहातोनि सुटला । **विहंगम** जैसा ॥ १८१ ॥ वोखटें कां गोमटें । हें कांहींच जया नुमटें । रात्रिदिवस न घटे । **सूर्यासि** जेविं ॥ १९४ ॥ पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं। रिपुमित्रां दोहीं। सरिसा पाडु॥१९७॥ कां घरिचियां उजियेड करावा। पारिकियां आंधार पाडावा । हें नेणेचि गा पांडवा। **दीप** जैसा॥१९८॥ जो खांडावया घाव घाली। कां लावणी जयानें केली । दोघां एकाचि साउली । **वृक्ष** दे जैसा ॥ १९९ ॥ ना तरी **इक्षुदंडु** । पाळितया गोडु । गाळितया कडु । नोहेचि जेविं ॥२००॥ तिहीं ऋतूं समान । जैसें

नगर वाचनालय सातारा

कां **गगन** । तैसा एकचि मान । शीतोष्णीं जया ॥२०२॥ दक्षिण उत्तर मारुता । **मेरु** जैसा पांडुसुता । तैसा सुखदुःखप्राप्तां । मध्यस्थ जो ॥ २०३ ॥ माधुर्यें **चंद्रिका** । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥ २०४ ॥ आघविया जगा एक । सेव्य जैसें **उदक** । तैसें जयातें तिन्ही लोक । कांक्षिती गा ॥ २०५ ॥ जो निंदेतें नेघे । स्तुती न श्लाघे । **आकाशा** न लगे । लेप जैसा ॥ २०७ ॥ जो यथालाभें संतोषे । अलाभे न पारुखे । पाउसेंवीण न सुके । **समुद्र** जैसा ॥ २१० ॥ आघवाचि आकाशस्थिती । जेविं **वायूसि** नित्य गती । तेविं जगचि विश्रांति–। स्थान जया ॥ २१२ ॥ हें विश्वाचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ॥२१३॥ (अ० १२)

ह्या सर्व ओव्या अत्यंत सुलभ असून प्रसादप्रतिभादिगुणांनीं उज्ज्वल आहेत. येथें क्षणभर भक्तलक्षणें दृष्टिआड राहून दिव्यउपमांनींच चित्त क्षणभर वेधलें गेलें तर तो वाचकांचा दोष म्हणतां येणार नाहीं! उपमांनीं उपमेय वस्तु अधिक खुलून दिसावी, पण येथें उपमांनीं उपमेयाला शोभा आणली आहे कां उपमेयानें उपमांना भूषविलें आहे हें ' जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगाचि होय लेणें । तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ' ( अ० १०–४४ ) या न्यायानें सांगणें कठिण आहे!

ज्ञानेश्वरांचें उपमायोजनेंत चातुर्य आहे व समर्पकताही आहे. चढत्या पायरीच्या व वाढत्या सौंदर्याच्या उपमा देत देत सिद्धांत श्रोत्यांच्या गळीं उतरविणें हें–त्यांचें उपमा देण्यांत एक धोरण असतें. उदारणार्थः ' मया ततमिदं सर्वं ' यावरील पुढील दोन ओव्या पहाः—

**माझिया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगाचि नोहे आघवें ? ।**
**जैसें दुध मुरालें स्वभावें । तेंचि दहीं ॥ ६४ ॥**
**कां बीजचि जाहलें तरु । कां भांगाराचि अलंकारु ।**
**तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ ६५ ॥ ( अ० ७ )**

माझा विस्तार म्हणजेच हें जग असें नाहीं काय ? होय. ब्रह्म तेंच जगद्रूपानें विस्तारलें आहे. येथें दूधदहीं, बीजवृक्ष व सुवर्णालंकार अशा तीन उपमा दिल्या आहेत, पण त्या उत्तरोत्तर अधिक समर्पक आहेत. दुधाचें दहीं होतें तसें ब्रह्माचें जग झालें. ब्रह्माचा परिणाम जगत्. पण हा परिणामवाद वेदांताला मान्य नाहीं व यांत न्यूनही आहे. दुधाचें एकदां दहीं झालें कीं पुन्हां त्यांत दूध नाहीं तसें ब्रह्माचें जग झालें म्हटल्यास जगाचें आदिकारण ब्रह्म असलें तरी जगपणांत ब्रह्म नाहीं असें होतें व शिवाय यांत ब्रह्माला विकार होतो असें मानावें लागतें. ब्रह्म तर अखंड निर्विकार आहे, तेव्हां ही उपमा अपुरती ठरली. आतां दुसरी उपमा बीजवृक्षाची–पण येथेंही एक दोष आहे. वृक्षाचें आदि बीज व अंतही बीज, त्याप्रमाणें जगाचें मूळ ब्रह्म व शेवटही ब्रह्म. जगाच्या आदिअंतीं ब्रह्म. येथवर ठीक आहे, पण वृक्षपणांत बीज नाहीं त्याप्रमाणें जगपणांत ब्रह्म नाहीं असें या उपमेनें गोचर होतें हाच येथें दोष आहे. सविकारपणाचाही दोष येथें येतोच. म्हणून ही उपमा सोडून तिसरी सुवर्णालंकाराची घेतली. येथें सुवर्ण आधी आहे, अलंकारपणांतही आहे व अलंकार आटण्यांतही आहे, त्या प्रमाणें आदिमध्यावसानीं जग ब्रह्मरूप आहे. ही उपमा सपखल बसली हें पाहतांच यापुढें उपमा देण्याचें बंद करून 'तैसा मज एकाचा विस्तारु। तें हें जग' याप्रमाणें सिद्धांत सांगून हा मुद्दा आटोपता घेतला. उपमा देण्यांत दुसरेंही एक धोरण आहे. हा लोकव्यवहार विविध प्रकारचा आहे व श्रोते किंवा वाचक विविध व्यवसायाचे व स्वभावाचे असणारच; तेव्हां प्रत्येकाला त्याच्या ओळखीची उपमा मिळाली कीं साखरेबरोबर बाळ औषधही गट्ट करितें त्याप्रमाणें आवडत्या उपमेबरोबर सिद्धांतही पटून जातो ! उदाहरणार्थ 'अदंभित्व' हा ज्ञानगुण सांगतांना ज्ञानी 'सुकृत तोंडानें सांगत नाहीं' असें म्हणायचें आहे याला पांच समर्पक उपमा दिल्या आहेत ( अ० १३ ओवी २०२–२०७ ):–

( १ ) लोभी 'जीव जावो परी नुमसे। ठेविला ठावो '–प्राण गेला तरी ठेवा कोठें लपवून ठेवला आहे हें कृपण सांगत नाहीं.

( २ ) 'खडाणे आला पान्हा। पळवी जेविं अर्जुना '–दूध चोरणारी गाय दूध चोरते.

( ३ ) 'कां लपवी पण्यांगना। वडिलपण '–वेश्या वय चोरते.

( ४ ) 'आढ्य आंतुडे आडवी। मग आढ्यता जेविं हारवी '–धनाढ्य मनुष्य अरण्यांत सांपडला असतां आपली श्रीमंती लपवितो.

( ५ ) 'नातरी कुळवधू लपवी। अवयवांतें '–उघडच आहे !

## ३ गीतेची थोरवी

गीताशास्त्राची थोरवी ज्ञानेश्वरांनीं जागोजाग वानिली आहे. हा करमणुकीचा विषय नसून आत्मोद्धाराचा विषय आहे, 'अध्यात्मशास्त्रीं इयें। अंतरंगचि अधिकारिये'–अंतर्मुखतेनेंच ह्या अध्यात्मशास्त्राकडे पाहिलें पाहिजे. 'विवेकतरूचें उद्यान, सर्वविद्यांचें मूळपीठ, सकल शास्त्रांचा आधार, सज्जनांचें जिव्हार व धर्माचें माहेर ' अशा महाभारताचें सार म्हणजे गीता आहे, गीता हा भारतकमलाचा पराग आहे. शब्दब्रह्माब्धीचें मंथन करून त्याचें हें व्यासांनीं नवनीत काढलें आहे. 'जें अपेक्षिजे विरक्तीं। सदा अनुभविजे संतीं। सोहंभावें पारंगतीं। रमिजे जेथ ॥ जें आकर्णिजे भक्तीं। जें आदिवंद्य त्रिजगतीं' असें हें गीताशास्त्र आहे व हें 'गंभीरपणें व स्थिरावलेनि अंतःकरणें' सूक्ष्मबुद्धींनेंच ग्रहण केलें पाहिजे. गीतेचीं वचनें हीं साधीं अक्षरें नव्हत, तर ही 'ब्रह्मसाम्राज्यदीपिका' असून 'अर्जुनालागी चित्कळिका। उजळलिया श्रीकृष्णें ' ( ११–१७८ ). गीतामाउली उदार आहे. 'श्रवणें अर्थे पठणें मोक्षचि लाभे '–श्रोत्यांना, अर्थज्ञांना व पाठकांना सारखाच मोक्ष देणारी आहे ( १८–४८ ). हा 'ब्रह्मविद्या रावो ' आहे ( १०–१९ ).

**हें गीतानाम विख्यात। सर्व वाङ्मयाचें मथित।**
**आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय ॥ १८–१३२३ ॥**

**कांडत्रयरूपिणी । श्रुतीच हे कोडिसवाणी ।**
**गीता पद्यरत्नांचीं लेणीं । लेयिली आहे ॥ १८-१४५० ॥**

आत्म्यासारखें रत्न हातीं देणारें सर्व वाङ्मयाचें हें सार आहे. गीता ही लहानगी श्रुतिच आहे. कर्मज्ञानउपासना ही वेदांतील तीनही कांडें गीतेनें संक्षेपानें सांगितलीं आहेत. ' नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा ' हें खरें आहे, तथापि स्त्रीशूद्रादिकांना वेदानें अनधिकारी ठरविल्यामुळें त्यांना भवव्यथेंतून सुटण्याचा मार्ग राहिला नव्हता ! वेद ' कानीं लागला । तिहीं वर्णांच्याचि '–फक्त त्रैवर्णिकांना म्ह० द्विजांनाच वेदानें जवळ केलें होतें. पण मोठ्यांचा दोष लहानांना काढतां येत नाहीं ! वेद समर्थ व सर्वपूज्य, तेव्हां कृपणपणाचा आपल्यावर येणारा आक्षेप वेदानेंच गीतेचें सर्वसेव्यरूप घेऊन काढून टाकला !

**वेद संपन्न होय ठायीं । परी कृपण ऐसा आन नाहीं ।**
**जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ॥ १८-१४५७ ॥**
**तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें ।**
**वेद वेठला भलतेणें । सेव्य होआवया ॥ १८-१४५९ ॥**
**यालागीं मागिली कुटी । भ्याला वेद–गीतेच्या पोटीं ।**
**रिगाला–आतां गोमटी । कीर्ति पावला ॥ १८-१४६५ ॥**

तात्पर्य ' वेदाची सुसेव्यता । ते हे जाण मूर्त गीता ' अर्जुनाच्या मिषानें जगदुद्धार करून गीतेनें ' संसाराएवढें थोर ओझें । फेडिलें जगाचें ' ( १८-१४७० ). गीता ही ' प्रभूची वाङ्मयमूर्ति आहे. ' ( १८-१६६५ ).

**हे ज्ञानामृताची जान्हवी । कीं आनंदचंद्रीची सतरावी ।**
**विचारक्षीरार्णवीची । लक्ष्मी जे हे ॥ १५-५७३ ॥**
**साचाचि बोलाचें नव्हें हें शास्त्र । पै संसारजिणतें शस्त्र ।**
**आत्मा अवतरवी ते मंत्र । अक्षरें इयें ॥ १५-५७७ ॥**

गीता जो यथार्थ जाणेल ' तो समस्ता मोहा मुके '.

## ४ अठरा अध्यायांतील विषय

ज्ञानेश्वरींत गीतेच्या अठरा अध्यायांपैकीं पहिल्या सहांत कर्म, दुसऱ्या षट्कांत भक्ति व तिसऱ्या षडध्यायींत ज्ञान प्रतिपाद्य आहे' असें टिळक म्हणतात, पण ही चूक आहे. गीतेच्या अठरा अध्यायांत कोणकोणते विषय आले आहेत हें ज्ञानेश्वरांनीं अध्यायवार ज्ञाने० अ० १० ( ओवी २४ ते ३९ ) व अ० १८ ( ओवी १४३५ ते १४५६ ) अशा दोन ठिकाणीं स्पष्ट सांगितलें आहे.

( १ ) अर्जुनाचा विषाद, शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव, म्ह० गीताशास्त्राची प्रवृत्ति कां झाली याची प्रस्तावना उर्फ ओळख करविणारा अध्याय.

( २ ) ह्यांत योग ह्म० कर्मयोग विशद सांगितला आहे व त्याचा सांख्ययोगाशीं भेदही दाखविला आहे. ह्यांत सांख्यसद्भाव ( ज्ञानमार्ग ) प्रकाशिला आहे. गीताशास्त्र हें ' ज्ञानप्रधान असून मोक्षदानी स्वतंत्र ' आहे हें यांत सूत्ररूपानें सांगितलें आहे.

( ३ ) अज्ञानानें बांधलेला ह्म० बद्ध जीव त्याला मोक्षपदीं नेणारा 'साधनारंभ' यांत सांगितला आहे. देहाभिमानी जीवानें काम्यनिषिद्ध-कर्में सोडून केवळ बिहित ह्म० नित्यनैमित्तिक कर्में अप्रमादें ( न चुकतां, यथाशास्त्र ) व सद्भावानें करावीं असा निर्णय येथें केला असल्यामुळें येथें केवळ **कर्मकांड** प्रतिष्ठिलें आहे.

( ४ ) तिसऱ्यांत 'केवळ कर्म प्रतिष्ठिलें' आहे तें चवथ्यांत 'ज्ञानेसी' ह्म० ज्ञानासह प्रगटिलें आहे. देहाभिमान्याला नित्यादिक कर्म आवश्यक म्हणून सांगितलें व तें आचरितांना मोचक म्हणजे सोडविणारें कसें होईल अशी अपेक्षा झाली ह्म० जीव बद्ध होता तो मुमुक्षु झाला. त्यानें 'ब्रह्मार्पणत्वें क्रिया' करावी—अर्थात् कायावाचामनानें विहित कर्म 'एक ईश्वरोद्देशें' करावें असें ह्या चौथ्या अध्यायांत सांगितलें आहे.

चौथ्या अध्यायाच्या शेवटीं शेवटीं कर्म ईश्वरार्पण करावें हें सांगतांना उपासनेचा विषय आला आहे, तो तेथपासून तों विश्वरूपदर्शनाचा ११ वा अध्याय संपेतों म्हणजे संपूर्ण आठ अध्याय सर्व प्रतिबंध किंवा पडदे दूर करून देवताकांड सांगितलें आहे. ही अष्टाध्यायी ( ४ थ्या पासून ११ व्या पर्यंत दोन्ही धरून ) **उपासनाकांडात्मक** आहे.

( ५ ) ' पंचमीं गव्हरिलें योगतत्व ' ह्म० पांचव्यांत योगतत्व गूढार्थानें सांगितलें आहे.

( ६ ) साहवा अध्याय अभ्यासयोगाचा आहे. यांत आसनापासून आरंभ करून जीवब्रम्हैक्यापर्यंतची योगस्थिति सांगितली असून योगभ्रष्टाला कोणती गति मिळते तेंही वर्णिलें आहे.

( ७ ) सातव्यांत आरंभीं कार्यकारणरूप प्रकृतीचें रूप सांगून चतुर्विध भक्तांची स्थिति दाखविली आहे.

( ८ ) सातव्याच्या शेवटीं उल्लेखिलेल्या सप्त प्रश्नांचीं ( ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ व प्रयाणकालीन गति ) उत्तरें आठव्यांत दिलीं असून प्रयाणसमयशुद्धीचें विशेष विवरण केलें आहे.

( ९ ) हा राजविद्या—राजगुह्याचा अध्याय तर गीतेचें हृदयच आहे. साऱ्या भारतांत जशी गीता तसा साऱ्या सप्तशत गीतेंतला नवमाध्याय ! हा गीतेचें सर्वस्व आहे. भगवंताचें सारें हृद्गत या अध्यायांत प्रगट झालें आहे. ज्योतिषांतही ८ वें घर मृत्यूचें व ९ वें ईश्वरप्राप्तीचें आहे !

( १०–११ ) हे अध्याय देवताकांडांतले असून विभूतिविस्तार व विश्वरूपदर्शन हे यांतील विषय आहेत.

( १२–१५ ) उपासनाकांड बाराव्या अध्यायाच्या १२ श्लोकांअखेर संपलें, तेथून ज्ञानकांडास आरंभ झाला. १२ व्या पासून १५ व्या पर्यंतचे चार अध्याय ज्ञानकांडाचे आहेत. गुरुसंप्रदायानें जाणाऱ्या भक्तावर ईशप्रसाद झाला म्हणजे कोंवळें ज्ञान उद्भूत होतें. अद्वेष्टा

सर्वभूतानां इ० बाराव्यांतल्या श्लोकापासून किंवा 'अमानित्वमदंभित्वं' इ० तेराव्यांतल्या श्लोकापासून ज्ञानलक्षणें सांगितलीं आहेत. ह्याच ज्ञानाचा परिपाक होत होत पंधराव्यांत पुरुषोत्तमयोग सांगितला आहे. तेथपर्यंतच्या चार अध्यायांत **ज्ञानकांड** आहे.

( १६ ) मोक्षसाधन असें जें ज्ञान त्या ज्ञानाला प्रतिबंधक जो अज्ञानवर्ग ( आसुरी संपत्ती ) त्याचें ( दैवी संपत्तीसह ) वर्णन सोळाव्या अध्यायांत केलें आहे.

( १७ ) अज्ञानलक्षणें टाकून ज्ञानलक्षणें घेतांना शास्त्राचा सोबती बरोबर घ्यावा हें सतराव्यांत मुख्यत्वें सांगितलें आहे.

( १८ ) अठरावा अध्याय हा कलशाध्याय. सतराही अध्यायांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचें यांत एकीकरण केलें आहे.

## ५ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे.

ज्ञानेश्वरीच्या रहस्याबद्दल 'रहस्यकारांनीं' जें विधान केलें आहे तेंही बरोबर नाहीं:-" तस्माद्योगी भवार्जुन' ( ६-४६ ) याचा ज्ञानेश्वरांचा अर्थ-यासाठीं हे अर्जुना! तूं योगी हो म्हणजे योगाभ्यासांत प्रवीण हो, असें अर्जुनास सांगून सर्व मोक्षपंथांत पातंजल योगासच भगवंतांनीं पंथराज म्ह० सर्वोत्तम पंथ ठरविलें आहे." सहाव्या अध्यायांत ज्ञानोबांनीं पातंजलयोग सांगितला असला तरी हा योग हें ज्ञानेश्वरीचेंच काय पण त्या अध्यायाचेंही तात्पर्य नाहीं. 'तस्माद्योगी भवार्जुन' म्हणजे अर्जुना! तूं आतां पातंजलयोगाचा अभ्यास करून त्यांत प्रवीण हो असा अर्थ ज्ञानेश्वरीच्या माथीं मारणें म्हणजे ज्ञानेश्वरीचें रहस्य लेशमात्र न समजणें होय. कोणीही निराग्रही मनुष्य समग्र ज्ञानेश्वरी रहस्य समजण्याच्या बुद्धीनें एकवार जरी वाचील तरी तो ज्ञानेश्वरीनें पातंजलयोगाभ्यास हाच सर्वोत्तम मोक्षपंथ सांगितला आहे असें म्हणण्याचें धाडस करील असें मला वाटत नाहीं. 'तस्माद्योगी भवार्जुन' यावरील ज्ञानेश्वरांची टीका पाहिली तरी त्यांचें

रहस्य पातंजलयोगपर नसून वेगळेंच आहे असें दिसून येईल. वरील ४६ व्या श्लोकाचा अर्थ ज्ञानेश्वर महाराज कसा करितात तें पहा:—

"कर्मीनें चालणारा कर्मनिष्ठ, ज्ञानाचें वज्रकवच अंगावर घेऊन प्रपंचाशीं झगडणारा ज्ञानी किंवा तपोदुर्गाच्या कड्यावर तप करणारा तपी, या सर्वांना दुष्प्राप्य असें जें 'भजतियां भज्य। याज्ञिकांचें याज्य। एवं जें पूज्य। सकळां सदा' तें परब्रह्म जो स्वयें आपण जाहला ह्म० ज्याचे सकलमनोधर्म 'जीवपरमात्मासंगमाला पावले असा तूं योगी हो." येथें योग ह्म० पातंजलयोग नसून 'जीवपरमात्मसंगम' आहे हें उघड आहे. याचाच स्पष्टार्थ पुढील ओव्यांतून दिला आहे. 'अगा योगी जो म्हणिजे। तो देव जाणिजे। आणि सुखसर्वस्व माझें। चैतन्य तो॥ तेथ भजता भजन भजावें। हें भक्ति साधन जें आघवें। तो मीचि जाहलों अनुभवें। अखंडित'

सहाव्या अध्यायाचाच तात्पर्यार्थ ज्ञानेश्वरांच्या मुखानें ऐकला तर योग म्हणजे 'जीवपरमात्मसंगम' असून पातंजलयोग नव्हे हें नीट समजून येईल. ज्ञानेश्वरींत योगमार्गानें कुंडलिनी जागृत करण्याचा उपाय सुमारें २०० ओव्यांत सांगितला आहे. (अ० ६ ओवी १६२ ते ३२६). योगाचा विषय आणखी ५।६ वेळ पुढें आलाच आहे. त्या स्थळांचा फक्त नामनिर्देश करितों. (१) अ० ९ ओवी २१२ ते २१८) (२) अ० १२ (ओवी ४ ते ८ व ४६ ते ५७). (३) अ० १३ (ओवी ५०७ ते ५१०) अ० १८ (ओवी १०३५ ते १०४१).

ज्ञानेश्वरांनीं ६ व्या अध्यायांत प्रसंगानुसार आपला जो योगानुभव सांगितला तो ते स्वतः योगेश्वर होते, समोर श्रोत्यांत श्रीगुरु निवृत्तिनाथांसारखें योगविद्यापारंगत होते व त्यांचा नाथसंप्रदाय हा मूळचा योगपरंपरेचा होता या तीन कारणांमुळें सांगितला. 'पिंडीं पिंडाचा ग्रास। तो हा नाथसंकेतीचा दंश'–म्हणजे पिंडाच्या ठायीं (ठिकाणीं) शरीराचा ग्रास–देहांत जागृत झालेल्या कुंडलिनीनें जागृत केलेल्या

रसधातूंचा ग्रास, हें नाथसंप्रदायाचें मर्म आहे. दुसरें ‘ ग्राहीक श्रोते ’– ह्या योगमार्गाच्या मालाचें गिऱ्हाईक–माझ्यासमोर दिसले म्हणून मी यथार्थाची घडी उलगडून दाखविली असें त्यांनींच स्पष्ट म्हटलें आहे म्हणजे योगवर्णन विषयांतर करून मी केलें आहे अशी त्यांनींच कबूली दिली आहे. वरील वर्णनाच्याच पुढें शरीर ‘ खेचर ’ म्ह० आकाशसंचारी कसें होतें व ‘अणिमादि’ सिद्धि सहज कशा प्राप्त होतात हें सांगतांना ‘ तेणें काय काज आपणपयां ’–आपल्याला त्या सिद्धींशी काय करायचें आहे असें भगवान् म्हणतात ! योगमार्ग बिकट असल्यामुळें परमगति देणारा असला तरी फार थोड्या लोकांसाठीं तो आहे, सर्व-साधारण जनतेसाठीं नाहीं, हें ज्ञानेश्वरांचें मत अनेक ठिकाणीं व्यक्त झालें आहे. १२ व्या भक्तियोगाच्या अध्यायांत त्यांनीं योगमार्ग ४०–५८ पर्यंत ओव्यांत सांगितला असून ५९ वी ओवी अशी आहे: ‘ वांचूनि योगाचेनि बळ । अधिक कांहीं मिळें । ऐसें नाहीं— आगळें । कष्टचि तया’– शिवाय योगाचरणाच्या बळानें जो सगुणभक्तीनें होत नाहीं असा कांहीं विशेष लाभ होतो असें नाहीं, कष्ट मात्र पदरांत पडतात ! महेंद्रादि पदें वाटमारेपण करितात, ऋद्धिसिद्धि आडव्या पडतात, कामक्रोधांचें उपद्रव टळत नाहींत, ‘ताहानें ताहानाचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी ’ असा हा अग्निप्रवेश आहे, हें मरणेसी झुंज आहे !

‘ म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वाटा । भागा आला ॥ ६९ ॥ ’ म्हणून जे ‘ भक्तिपंथा वोटंगले ’ ते नेणतीच हे व्यथा ! ज्ञानेश्वरांचे अनेक योगपर अभंग आहेत तरी पुष्कळ अभंगांतून हाच भाव त्यांनीं व्यक्त केला आहे. ‘ अष्टांगयोगें न सिणिजे । यमनियमनिरोध न कीजे रया ॥ १ ॥ वाचा गीत गाईजे वाचा गीत गाईजे ’ । ‘ योगयागविधी येणें नोहे सिद्धी ’–म्हणून ‘हरि-मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा ’ अशा भावार्थाचे त्यांचे बरेच अभंग आहेत. तात्पर्य, ज्ञानेश्वर स्वतः योगी होते व योगाभ्यास त्यांचा आवडता होता,

तरी त्यांनीं आपल्या एकंदर वाङ्मयांत जनांस अध्यात्मयोगाचा उर्फ अद्वैतभक्तीचाच उपदेश केला आहे.

योगाभ्यासानें तरी साध्य काय आहे ? एका अद्वैतानुभवावांचून दुसरें काय साध्य असणार ? ' पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहलें अद्वैतदिवसें । मग आपण-पाचि आपण असे । अखंडित.' ज्ञानानें, भक्तीनें, योगानें, नैष्कर्म्यानें, साध्य असा हाच एक अद्वैतानुभव आहे. ' आंत सुख वाढे । तेथें सहजचि योग घडे । नाभ्यासितां.' अंतर्मुख व्हावें तेव्हां ' परतोनी पाठिमोरें ठाके । आणि आपणियातें आपण देखे । देखतखेंवों वोळखे । म्हणे तत्व हें मी ॥ ३६६ ॥ तिये वोळखीचिसरिसे । सुखाचिया साम्राज्यीं बैसें । मग आपणयां समरसें । विरोनि जाय ॥३६७॥' आत्मसुखासाठीं ज्ञानबळ पाहिजे असतें. ' शनैः शनैरुपरमेत् '–बुद्धीनें धैर्य धरून मनाला अनुभवाच्या वाटेनें ' हळुहळु आणूनि करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ' ' मी तंव सकळदेहीं असे । येथ विचार नाहीं'–मी सर्व देहांत आहे. ही गोष्ट सिद्ध आहे आणि ' तैसेंचि माझिया ठायीं सकळ असें ' हेंही उघड आहे. मी सर्व देहांत व सकळ विश्व माझ्यांत असें हें संचलें-परस्पर मिसळलें–आहे. मग ' जो एकवटालिया भावना । सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें । केवळ एकत्वचि माझें जाणे सर्वत्र जो ॥ ३९४ ॥'—पटांत तंतु एक, अलंकारांत सोनें एक, वृक्षाला पानें असंख्य असलीं तरी वृक्ष एक–'ऐसी अद्वैतदिवसें पाहली । रात्रि जया '–अशा अद्वैतदिवसानें ज्याची रात्र उजाडली तो पांचभौतिक शरीरांत असला तरी देहभावांत सांपडेल काय ? तो अनुभवानें माझ्या साम्यतेला–माझ्या व्यापकपणाला आल्याशिवाय कसा राहील ? जो आपल्यासारखें चराचर अखंड पाहतों, सुखदुःखादि किंवा शुभा–शुभकर्में इ० द्वंद्वांनीं चलित होत नाहीं, ' हे समविषमभाव । आणिकही विचित्र जे सर्व । ते मानी जैसे अवयव । आपुले होती ॥ ४०६ ॥' तो परब्रह्मच आहे. तात्पर्य, आपल्या ठिकाणीं विश्व पहावें व आपण विश्व

व्हावें ह्या साम्याचीच उपासना करावी, का कीं ' साम्यापरौती जगीं प्राप्ति नाहीं. ' अभ्यासयोगाचें सार हें आहे. ( अ० ६ ).

## ६ जितेंद्रियता

वेदांत हें सिंहिणीचें दुध आहे, तें पचवितां येण्यासाठीं इंद्रियें व मन यावर पूर्ण ताबा ठेवतां आला पाहिजे, यासाठीं ज्ञानेश्वरांनीं अनेकवार इषारा दिला आहे. मूळ गीतेंतच इंद्रियजयावर पूर्ण कटाक्ष ठेवला आहे. ' विठ्ठलमात्रा ज्याणें घ्यावी । त्याणें पथ्य सांभाळावी ' असें तुकोबांनीं म्हटलें आहे. वेदान्त हा संसारातील दुःखशोकांवरची महामात्रा आहे पण पथ्य संभाळतां न आल्यामुळें शेंकडों बुवा, गुरु व महाराज विषयांच्या खाईंत पडत आहेत, व हजारो भोळ्या शिष्यांस पाडीत आहेत ! मुद्दा एवढाच आहे कीं इंद्रियजय पूर्ण साधला तरच वेदांत पचणार आहे. यासाठीं ज्ञानेश्वरांनीं संन्यासाचा भरमसाट उपदेश ( बौद्ध व महानुभाव याप्रमाणें ) न करितां गृहस्थाश्रमांतच धर्मनीतीनें रहा, संसारातच मोक्ष मिळेल, असें सांगितलें आहे ! सावधगिरीनें रहा विषयांच्या आहारीं जाऊं नका, ' गृहाश्रमु न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ' असें त्यांचें सांगणें आहे. विषयेंद्रियसंयोगापासून होणारे ह्म० संस्पर्शज भोग दुःखदायक आहेत म्हणून ' न तेषु रमते बुधः '–येऱ्हवी विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें ( योग्य ) नोहे–विजेच्या प्रकाशांत काय जगाचे व्यवहार चालतात ? विषकंदाला मधुर म्हणणें, क्रूर ग्रहाला मंगल म्हणणें, तसेंच विषयांत सुख आहे हें म्हणणें होय ! ' सर्प फणीची साउली । ते शीतल होईल केतुली । मूषकांसी ? ॥ ह्मणोनि विषयभोगी सुख । तें साद्यंतचि जाण दुःख' ( अ० ५ ओवी ११० ते १२६ पहा. ) विधीनें विषय सेवन करावें कां कीं समूळ विषयत्याग ( प्राणी प्रकृतिमंत आहे तोंवर ) साधणें कठिण आहे. शब्दस्पर्शादि पंचविषय इंद्रियांना आपल्याकडे खेंचून घेतात व दुःखशोकादि द्वंद्वांत पाडतात. ' या विषयांवांचूनि कांहीं । आणीक

ज्पर वाचनालय, सातारा.


सर्वथा रम्य नाहीं । ऐसा स्वभावचि पाहीं । इंद्रियांचा ' म्हणून ज्याला विषयांपासून इंद्रियें आवरतां येतात ' सोऽमृतत्वाय कल्पते ' तोच आत्मरूपीं स्थिर होऊं शकतो ( अ० २ ओवी १११ ते १२४ ). ज्ञानाच्या लक्षणांत इंद्रियार्थांविषयीं ह्म० विषयांविषयीं वैराग्य हें मुख्य लक्षण सांगितलें आहे. ' वमिलिया अन्ना । लाळ न घोटी जेविं रसना'– ' अर्जुना तेणें पाडे । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेनि तोंडें । कांहींच जावो. ' तो सूज्ञ पुरुष पूयपंकांत लोळण्याइतपतच ऐहिकीच्या किंवा स्वर्गीच्या विषयसुखांना किंमत देतो. ह्या सुखाचा बडेवार ज्यांत फार केला जातो–अशा नाटककादंबऱ्यांदि अतिविषयपर वाङ्मयालाही कावळ्याच्या अन्नाइतकीच योग्यता दिलेली आहे. तात्पर्य ज्याला स्वहित पाहिजे त्यानें स्वर्गसंसारसुखाला त्याज्य समजलें पाहिजे. ' तें हें विषयवैराग्य । जें आत्मलाभाचें भाग्य । तेणें ब्रह्मनंदा योग्य । होती जीव ' ( अ० १३ ओवी ५१३ ते ५२३ ). मनुष्य साधा संसारी असो, लोककल्याणकर्ता असो, किंवा पारमार्थिक असो, त्याला इंद्रियजय हा साधलाच पाहिजे, तरच त्याचे हातून कांहीं पुरुषार्थ होईल. विषयलालसा ज्या मानानें कमी, त्या मानानें त्याचा अधिकार वाढत जातो. कर्मयोगी, ज्ञानयोगी किंवा भक्तियोगी कोणताही योग साधायचा असेल तर जितेंद्रियता ही पहिली गोष्ट त्याला साधली पाहिजे. ' जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । ' तोच मनुष्य चतुर्विध पुरुषार्थांपैकीं कोणताही पुरुषार्थ साधूं शकतो. ' तया स्वांतःकरणजिता । सकलकामोपशांता । परमात्मा परौता । दूर नाहीं ॥ ' ( ६-८१ ) योगाभ्यासालाच काय, पण कोणत्याही चांगल्या अभ्यासाला ' नावेक विरक्त । जाहला देहधर्मीं नियत '–खरें वैराग्य व नियमबद्ध राहणी यांची जोड असेल तरच त्या अभ्यासाचा अधिकार येतो. जो रसनेंद्रियाचा अंकित आहे, निद्रेच्या स्वाधीन आहे, व आहारविहारांत, बोलण्याचालण्यांत नियमित नाहीं; तो कोणत्याही अभ्यासाला नालायक आहे ! मोठ्या धैर्यानें मन आत्मसंस्थ करावें, तें जाईल तेथून

त्याला मागें खेंचून आत्मस्वरूपीं स्थिर करावें, विषयांपासून आवरावें, अशी दांडगी जितेंद्रियता पाहिजे. अभ्यास आणि वैराग्य असा दोहीं-कडून मारा पाहिजे. अभ्यास म्ह० मन अंतर्मुख करून आत्मरूपीं स्थिर करणें व वैराग्य म्ह० बाह्यविषयांपासून तें आवरणें अथवा चित्तांतले विषय काढून टाकणें आणि चित्त चैतन्यरूपीं रोवणें. हा सारा विषय गीतेंत आाणि ज्ञानेश्वरींत ६ व्या अध्यायांत उत्कृष्ट सांगितला आहे. १२ व्या अध्यायांत 'म्हणोनि माझिया स्वरूपीं। मन बुद्धि इयें निक्षेपीं। येतुलेनि सर्वव्यापी। मीचि होसी' (१२–१०२) असें भगवान् स्वतः सांगतात. बुद्धि आत्मनिष्ठ करण्यांत सर्व सदाचारांचें बीज आहे. व्यवसायात्मिक बुद्धि आत्मनिष्ठ असते व जो आत्मनिष्ठ नाहीं त्याच्या बुद्धि बहुशाख व अनंत असतात, म्हणजे त्या बुद्धींना अनेक फांटे फुटतात. आत्मनिष्ठ बुद्धीलाच सद्बुद्धि किंवा बुद्धिसाम्य म्हणतात. 'तैसी दुर्लभ सद्बुद्धि। जिये परमात्माचि अवधि। जैसा गंगेसि उदधि। निरंतर'॥ चंचल बुद्धि प्रपंचाची धिंड काढते, मग ती परमार्थाच्या कोठून उपयोगी पडणार? (अ. २) बुद्धि ही त्रिविध आहे. त्यांतील सात्विक बुद्धि जतन करावी व इतर दोन सांडाव्यात (१८ ओवी ६९९ ते ७३१). ज्याची बुद्धि परमात्मरूपीं स्थिर नाहीं त्याला शांतिसुख मिळणें नाहीं. 'म्हणोनि अयुक्तपण मनाचें। तेंचि सर्वस्व दुःखाचें। याकारणें इंद्रियांचें। दमन कीजे.' प्राप्त पुरुषही इंद्रियांचें लळे पुरवूं पाहील तर तोही संसारदुःखानें आक्रमिला जाईल, मग सामान्याची काय गोष्ट सांगावी? 'जो अहंकारातें दवडूनी। सकळ काम सांडूनी। विचरे विश्व होउनी। विश्वामाजीं॥ ऐसा आत्म-बोधें तोषला। जो परमानंदें पोसला–' तोच पुरुष धन्य होय (अ. २ ओवी २९० ते ३७० पहा). मन, बुद्धि व अहंकार हे ज्यानें जिंकले व. स्वाधीन ठेवले त्याच्या हातीं ब्रह्मीचें साम्राज्य आहे! मन हें वायुत-त्वाचें असून वृत्तींची वावटळ उठविण्यांत पटाईत आहे! हें 'मनोर-थांच्या उतरंडी। उतरी रची!' हें बुद्धीचें द्वार झांकून 'इंद्रियांतें

लोटी । विषयांमाजी.' मन म्ह० कल्पना. मन राजस, बुद्धि सात्विक व अहंकार तामस. अहंकार हा अज्ञानाच्या फारसा पाठीस लागत नाहीं पण ' सज्ञानाचे झोबे कंठीं । नाना संकटीं नाचवी !' बुद्धि ही जीव व आत्मा यांच्या संधींत असते. ही चांगल्यावाइटाचा निवाडा करिते. मन व अहंकार जिंकावे व सात्विक बुद्धि अनुकूल करून घेऊन आत्महित साधावें ( अ. १३ ओवी ७७ ते ११६ ) कामक्रोध लोभ हीं तीन नरकाचीं द्वारें आहेत, ' काम एष क्रोध एष ' ' ध्यायतो विषयान्पुंसः ' इ. प्रकारें गीतेनेंच मनोजय करून वृत्तींवर ताबा ठेवण्यास सांगितलें आहे, त्याचें ज्ञानेश्वरांनीं सविस्तर स्पष्टीकरण केलेंच आहे. ३ ऱ्या अध्यायाचे शेवटीं कामादि विकारांना मन, बुद्धि व इंद्रियें यांचें सारें बळ आहे; विषयांकडे इंद्रियें, इंद्रियांकडे मन व मनाकडे बुद्धि सहज धांवतात म्हणून ' यो बुद्धेः परतस्तु सः '–जो बुद्धीच्या पलीकडे परमात्मा आहे त्या परमात्म्याला जाणून भज म्हणजे तूं यांच्या तावडींतून सुटशील असें सांगितलें आहे. तात्पर्य मन, बुद्धि व इंद्रियें स्वाधीन ठेवायलाही मुख्य उपाय अध्यात्मयोग किंवा आत्मनिष्ठा हाच होय असेंच गीताज्ञानेश्वरीचें सांगणें आहे.

## ७ कर्मयोग.

'कर्तृत्वाचा मद व कर्मफळाचा आस्वाद'–कीं ज्यालाच कर्मबंध म्हणतात–टाकून ईश्वरार्पणबुद्धीनें यज्ञयागतपादि प्राप्त म्ह० विहित कर्में मनुष्यानें केलींच पाहिजेत ( अ. १८ ओवी २०० ते २३० ). प्राप्त कर्माचा त्याग याला नैष्कर्म म्हणत नाहींत आणि मनुष्य प्रकृतिमंत आहे तोंवर निष्कर्म होऊं शकत नाहीं. कर्म प्रकृतीच्या गुणामुळें होत असतें म्हणून निष्कर्मही कांहीं तरी कर्म करीतच असतो, मग शास्त्रमुखानें आलेलें व स्वभावनियत झालेलें कर्म टाकण्याचा आग्रह धरण्यांत अर्थ काय ? कामना सुटल्या नाहींत, आशापाशरहित झाला नाहीं, तोंवर कर्मत्यागाच्या गोष्टी करण्यांत कांहीं अर्थ नाहीं (अ. ३

ओवी ४५ ते ८३) संन्यास व कर्मयोग या दोहींचें फळ एकच आहे. 'मी माझें ऐसी आठवण। विसरलें जयाचें अंतःकरण' तोच खरा संन्यासी व खरा योगी होय! कर्मयोग सोपा व सर्वसाध्य आहे, जाणांनेणां सकळां आचरणीय आहे, त्यानें अनुक्रम सुटत नाहीं, लोकस्थिति रक्षिली जाते, लोकसंग्रहाचेंही कर्म संभाळलें जातें, म्हणून कर्मयोगाचें आचरण युक्ततर आहे; मात्र 'कर्म कर्ता करावें। हे खुंटलें तया स्वभावें। आणि करी जरी आघवें। तरी अकर्ता तो' हे संन्यासाचें वर्म त्यानें हातीं घेतलें पाहिजे (अ. ५ ओवी १५ ते ६३) नेणत्यांनीं हा कर्मयोग आत्मशुद्धीसाठीं केलाच पाहिजे, व जाणत्यांनीं लोकसंग्रहासाठीं केला पाहिजे. ज्ञानेश्वरांनीं संन्यासाश्रमाचें कोठेंच कौतुक केलें नाहीं, ही गोष्ट मात्र रहस्यकारांच्या मताला धरून आहे; तथापि त्यांनीं कर्मानें स्वतंत्रपणें मोक्ष मिळतो असें कोठेंही म्हटलें नाहीं.

**"देखे प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।**
**तयांही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं॥**
**मार्गीं अंधासरिसा। पुढें देखणाही चाले जैसा।**
**अज्ञाना प्रगटावा धर्म तैसा। आचरोनी॥**

"एथ वडिल जें जें करिती। तया नाव धर्म ठेविती। येर तेंचि अनुष्ठिती। सामान्य सकळ॥ हें ऐसें असे स्वभावें। म्हणोनि कर्म न संडावें। विशेषें आचरावें। लागे संतीं॥" यासाठीं जाणता व समर्थ आहे त्यानें ही 'लोकसंस्था रक्षणीय' म्हणून लोकसंग्रहार्थ कर्म केलें पाहिजे. "मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरे लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रती॥ तेथ सत्क्रियाचि लागावी। तेचि एकी प्रशंसावी। निष्कर्मींही दावावी। आचरोनी" (अ. ३ ओवी १५२-१७५). ज्यानें 'कर्म करून अकर्ता' हें साधलें ह्य. अकर्मात्मभाव ज्याचे ठायीं उदित झाला त्याला खरा कर्मयोग साधला असें समजावें. 'हें कर्म मियां केलें। कीं माझेनि आदरिलें सिद्धी गेलें। ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजी' हा अकर्तात्म-

भाव कर्मयोगाचें मुख्य वर्म आहे. हें कर्म मी करीन किंवा आदरिलें सिद्धी नेईन असा संकल्पही ज्याचे चित्तांत उठत नाहीं, अहंभाव व फलाशा नष्ट झाल्यामुळें कर्मांतही जो आपणच होऊन राहिला आहे, ज्याच्या सर्व चेष्टांत आत्मभाव भरला आहे, ज्ञानाग्नीच्या मुखानें ज्यानें कर्में जाळलीं आहेत, 'म्हणोनि सर्वांपरी मुक्त। तो सकर्मचि कर्मरहित। सगुण परी गुणातीत। एथ भ्रांति नाहीं' ( अ. ४ ओवी ९० ते १२० ) अकर्तात्मभाग ज्याच्या ठिकाणीं पूर्ण उदित झाला आहे अथवा ईश्वरसंतोषार्थ ज्याचीं सर्वकर्में होत आहेत, त्यालाच लोकसंग्रहार्थ कर्मयोग आचरण्याची योग्यता असते. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः' 'यतः प्रवृत्तिर्भूतानां' 'श्रेयान् स्वधर्मो विगुणः' 'सहजं कर्म कौंतेय' ह्या १८ व्या अध्यायांतील चार श्लोकांवर ज्ञानोबारायांनीं जें सुंदर भाष्य केलें आहे त्यांत कर्मयोगाचें उदात्त स्वरूप व्यक्त झालें आहे. तेथें कर्म, ज्ञान व उपासना तीनही एकरूपतेला आलेलीं आहेत.

**स्वभावविहिता कर्मा। शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा।**
**प्रवर्तावयालागीं प्रमा ( बुद्धि )। अढळ कीजे॥ ८८८॥**
**हें विहितकर्म पांडवा। आपुला अनन्य वोलावा।**
**आणि हेंचि परमसेवा। मज सर्वात्मकाची॥ ९०६॥**
**अगा जयाचें विहित। तें ईश्वराचें मनोगत।**
**ह्मणोनि केलिया निभ्रांत। सांपडेचि तो॥ ९११॥**
**ह्मणोनि विहित क्रिया केली। नव्हे-तयाची खूण पाळिली।**
**जयापासूनि कां आलीं। आकारा भूतें॥ ९१४॥**
**तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।**
**पूजा केली होय अपारा। तोषालागीं॥ ९१७॥**
**जें विहित जया जेणें। फिटे संसाराचें धरणें।**
**क्रिया कठोर तरी तेणें। तेंचि करावी॥ ९३१॥**
**यालागीं कर्म आपुलें। जें जातिस्वभावें असें आलें।**
**तें करी-तेणें जिंतिलें। कर्मबंधातें॥ ९३३॥** ( अ० १८ ).

वर्णाश्रमधर्माप्रमाणें जें कर्तव्य ह्मणून ठरतें तें स्वभावविहित कर्म शास्त्राप्रमाणें करण्याची बुद्धि ठेवावी; आपलेंच रत्न पण रत्नपारख्याला दाखवून त्याच्या पसंतीनें आपण घेतों त्याप्रमाणें ज्ञातिवशें आलेल्या अधिकाराप्रमाणें आपलें स्वकर्म शास्त्रमुखानें करावें; 'स्वभावें भागा आलें। वरी शास्त्रें खरें केलें। तें विहित आपुलें। आचरे गा.' ओघांत पडलेल्या पाण्याला वेगवेगळे इतर प्रवाह माहीत नसतात, त्याप्रमाणें काम्य व निषिद्ध कर्मांच्या वाटेस न जातां नित्यनैमित्तिक ह्म० विहित-कर्मेंच करावींत, व तींच संग व फलाशा सोडून केलीं म्हणजे अनायासें वैराग्यलाभ होतो व वैराग्यानें ज्ञान आणि ज्ञानानें मोक्ष मिळतो ह्म० आत्मप्राप्ति होते. कर्मयोगाचें रहस्य हें आहे. 'बालकाला आईवांचून जगणें शक्य आहे काय? मासा गंगेला धरून राहिला कीं सर्वतीर्थसह-वासाचें फळ त्याला आपल्या ठिकाणींच मिळतें. आणि विहिताचरणानें देवाची प्रसन्नता होऊन देव जोडतो, 'अगा जयाचें विहित। तें ईश्वराचें मनोगत' म्हणून 'स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेचि परमसेवा.' जयापासून भूतें आकारा आलीं व जो जीवरूप बाहुली अहंकाररज्जूनें बांधून त्यांना नाचवीत आहे, त्याची विहित कर्मानेंच पूजा होते, या पूजेनें आत्मराज प्रसन्न होऊन वैराग्यसिद्धी देतो, वैराग्यानें ईश्वराचा वेध लागतो व 'वेधेंचि तन्मयता' होऊन जीवाला मोक्षाचा लाभ होतो.

'यस्य नाहंकृतो भावो'–ज्याचा देहाहंकार नष्ट झाला आहे, व बुद्धि कर्मानें लिंपत नाहीं, तो कर्माच्या पैलपाड गेला. "जैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जया जया दृश्यातें पाहे। तें दृश्य द्रष्टेपणेंचि होत जाये। तयाचेंचि रूप॥ पै मथुनि लोणी घेपे। तें मागुती ताकीं घापे। तरी तें लिप्तपणें सिंपे। तेणेंसी काई?॥ जें तेणें करावें। तो तेंचि आहे स्वभावें। मा कोणे कर्मीं वेष्टावे। कर्तेपणें?" आत्मबोधानें अकर्तात्मभाव येतो व त्यामुळें हा कर्मबंधापासून सुटतो. आत्मज्ञानानें देहाभिमान नष्ट झाला तरी देह आहे तोंवर ज्ञानी कर्में करीतच राहतो, मात्र कर्तेपण त्याचें अंगीं बाणत नाहीं. वारा वाहून ओसरला तरी वृक्षाचे ठायीं डोल

राहतोच, करंडींतला कापूर संपला तरी वास राहतो, सूर्यास्तानंतरही कांहीं काळ संध्याराग राहतो, लक्ष्य भेदल्यावरही बाण धांवत असतो, फिरत्या चक्रावरील भांडें कुंभारानें काढून घेतलें तरी मागच्या भोंवंडीनें तें कांहींकाळ फिरत राहतें, त्याप्रमाणें देहाभिमान गेल्यावरहि ज्या प्रकृतीनें देह घडला त्या प्रकृतीचा स्वभाव ज्ञात्यालाही कर्म करायला लावतोच ( अ. १८ ओवी ४०० ते ४३० ).

## ८ ज्ञानयोग.

ज्ञान म्ह० आत्मज्ञान. हें इतर सर्व ज्ञानांत उत्तम, कां तर इतर सर्व ज्ञानें या ज्ञानापुढें निष्प्रभ होतात. इतर ज्ञानें भव आणि स्वर्ग यांचा फार तर लाभ देतील, पण हें ज्ञान रोकडें ब्रह्मसुख हातीं आणून देतें. ' वन्हि हें–तृणें येरें ज्ञानें. ' वायुलहरी जशा आकाशांत गडप होतात, सूर्यप्रकाशापुढें नक्षत्रतारका लुप्त होतात, किंवा महाप्रळयांत नदनदी नाहींशा होतात–' तैसें येणें पाहलेया । ज्ञानजात जात लया । म्हणोनिया धनंजया । उत्तम हें ' ( अ. १४ ओवी ४३ ते ४८ ).

ज्ञानाची शक्ति व पवित्रता अपार आहे. एखादा मनुष्य ' कल्मषाचा आगर, भ्रांतीचा सागर किंवा व्यामोहाचा डोंगर ' असला तरी ज्ञानाचें सामर्थ्य एवढें अगाध आहे कीं त्यापुढें पाप, अज्ञान व मोह यांची प्रतिष्ठा नाहीं. ' देखे विश्वसंभ्रमाऐसा । जो अमूर्ताचा कडवसा । तो जयाचिया प्रकाशा । पुरेचि ना ॥ तया कायसे हे मनोमळ ! । '–परब्रह्माची पडछाया असा जो हा दृश्यभाव तो ज्या ज्ञानाच्या तेजापुढें कःपदार्थ आहे, त्या ज्ञानाला मनाचे दोष घालविणें काय जड आहे ? अमृतांची गोडी अमृतालाच, तशी ' हे ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींच आथी. ' ज्ञानाचें सामर्थ्यहि अचाट आहे. ' परमार्थसुखनिधान ' प्राप्त करून घेण्यासाठीं योगी डोळयांत जें अंजन घालतात तें ज्ञानांजनच होय. सर्व कर्मांच्या समाप्तीचें स्थान व नैष्कर्म्यबोधाची खाण एक ज्ञानच आहे. जेथें प्रवृत्ति पांगुळते, तर्क आंधळा होतो, इंद्रियें विषयसंग

विसरतात, मनाचें मनपण जातें, वाणी खुंटते, विवेकवैराग्याचें साफल्य होतें व ‘ जेथ न पाहतां सहज भेटे । आपणपे ’–आत्मानुभव अनायासें होतो तें एक ज्ञानच होय. ( अ० ४ ओवी १५९ ते १८३ )

> जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे ।
> जीव दोंदावरी लोळे । आनंदाचिये ॥ १७४ ॥
> ऐसें जें ज्ञान । पैविन्नकनिधान ।
> जेथ विटाळलें मन । चोख कीजे ॥ १७५ ॥ ( अ. १३ )

‘ श्रद्धावान् लभते ज्ञानं ’– विषयसुखाला विटला आहे, इंद्रियें स्वाधीन आहेत, मनाचा जो मालक झाला आहे, प्रकृतिस्वभाव ज्यानें जिंकले आहेत व आत्मसुखाची गोडी अविट असून तें मला पाहिजे आहे व तें शास्त्रगुरुवाक्यावर विश्वास ठेवल्यानेंच मिळतें अशी ज्याच्या मनांत श्रद्धा आहे, त्यालाच ज्ञानलाभ होतो. ‘ तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहु प्रगटे । आत्मबोधाचा ’. अध्ययन आहे, तर्क व चिकित्साबुद्धि उत्तम आहे, पण ‘ श्रद्धा नाहीं–संशयानें चित्त भरलें आहे, तर त्या संशयात्म्याला ऐहिक वा पारलौकिक कसलेंच सुख मिळायचें नाहीं ! ( अ. ४ ओवी १८७ ते २०६ ). अश्रद्धेनें केलेलीं यज्ञदानतपादि कर्मेंही व्यर्थ होतात ( गीता १७–२८). सर्व कर्मांत श्रद्धाही सात्विक असली तरच ती ज्ञानसाधक होते; राजस व तामस श्रद्धा परमार्थाच्या उपयोगाची नाहीं. ‘ जीवनचि उदक । परी विषीं होय मारक । कां मिरयामाजीं तिख । उंसीं गोड ’(१७-६८).– एकच पाणी पण तें विषांत मारक होतें, मिरच्यांत तिखट होतें व उंसांत गोड होतें ! आहार, यज्ञ, दान, तप, ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धि, धृति, सुख इत्यादि सर्वांत त्रिविधत्व आहे; पण त्यांतील राजस व तामस भाग टाकून सात्विक भाग तेवढा घेतला तरच तो ज्ञानाला साहाय्यक होतो हें मूळ गीतेच्या शेवटच्या दोन अध्यायांतच सांगितलें आहे व त्याचें ज्ञानोबारायांनीं स्पष्टीकरणही सुंदर केलें आहे. तें मूळांतच पाहावें.

शुद्धज्ञानानें ज्ञेय म्ह० परमात्मवस्तु भेटते. ज्ञेय जाणल्यानें अमृत म्ह० मोक्षसुख मिळतें–' जाणणेंचि तन्मयातें । आणी जयाचें. ' ज्ञेय म्ह० अनादि परब्रह्म. त्याला सत् किंवा असत् कांहींच म्हणतां येत नाहीं, " जें नाहीं म्हणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे । आणी विश्वचि ऐसें मानिजे । तरी हे माया ॥ ८६९ ॥ रूप वर्ण व्यक्ति । नाहीं दृश्यद्रष्टा-स्थिति । तरी कोण कैसें आथी । म्हणावें पा " ॥ ८७० ॥ नाहीं म्हणावें तर महदादि कोणत्या आधारावर भासतात? ' म्हणोनि आथी नाथी हे बोली । जें देखोनि मुकी जाहली । विचाराची मोडली । वाट जेथें ' ॥ ८७२ ॥ ज्ञेय म्हणजे ' सर्व होवोनियां सर्वीं । असे जे वस्तु. ' स्थूळ-सूक्ष्मांतल्या सर्व क्रिया म्ह० त्याचे हात; ' जें सर्वचि सर्वपणें । सर्वदा करी ' म्हणून त्याला ' विश्वबाहु ' म्हणतात. सूर्याप्रमाणें आंग व डोळे नसून तें ' विश्वतश्चक्षु ' आहे. सर्वभोक्तेपण त्याच्याकडे असल्यामुळें त्याला ' विश्वतोमुख ' म्हणतात. आतां तें एकीएक आहे, त्याला व्याप्यव्यापक कसें म्हणावें? त्याला इंद्रियें नसून सर्वेंद्रियांवर तें सत्वादि गुणांचा आभास उत्पन्न करितें; तें अलिप्त असून सर्वांना धारण करितें; निर्गुण असून गुणांचा भोग घेतें. तें गुण व इंद्रियें याहून फार वेगळें आहे, ' नामरूपसंबंध । जातिक्रियाभेद । हा आकाराशीच प्रवाद । वस्तूसि नाहीं ' ॥ ९०५ ॥. तें भूतांच्या आंतबाहेर आहे, चर आहे व अचरही आहे, दूर आहे व जवळ आहे, सूक्ष्म आहे म्हणून जाणायला कठिण आहे, ' तैसेंनि अविनाशभावें । जें सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असें तें जाणावें । ज्ञेय येथ ॥ ९१४ ॥ जें एक आंतबाहेरी । जें एक जवळीदुरी । जें एकवांचूनि परी । दुजी नाहीं ' ॥ ९१५ ॥ सकल भूतांत अखंड एकाकार असून तें विभक्तसें भासतें. भूतांना धारण करणारें ( विष्णु ), उत्पन्न करणारें ( ब्रह्मा ) व ग्रसिष्णु म्ह० संहार करणारें ( रुद्र ) तेंच आहे. तें ज्योतींची ज्योति आहे, ' जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें जीवन । सूर्याचे नयन । देखती जेणें ' ॥ ९२७ ॥ तें तमाच्या पार आहे. ज्ञान तेंच, ज्ञेय तेंच, ज्ञानगम्य तेंच. ' जें मनाचें मन । जें

नेत्राचे नयन। कानाचे कान। वाचेची वाचा॥ जें प्राणाचा प्राण। गतीचे चरण'—हे असो तें 'हृदयीं सर्वांच्या असे' (अ० १५)

ज्ञान तर अमूर्त आहे, मग त्याची ओळख पटायची कशी? तें ज्ञान ज्या शरीरांत प्रवेश करितें त्या ज्ञान्याच्या इंद्रियव्यापारांत व डोळयांतहि प्रत्यक्ष दिसतें. खरोखर **ज्ञानी हेंच मूर्तिमंत ज्ञान!** ज्ञान्याच्या इंद्रियांवर, त्याच्या मुखावर, त्याच्या आचारविचारांवर, त्याच्या सर्व मूर्तीवर ज्ञानाचीं चिन्हें स्पष्ट दिसतातः—

**पै वसंताचें रिगवणें। झाडांचेनि साजेपणें।**
**जाणिजे—तेविं करणें (इंद्रियें)। सांगती ज्ञान॥ १७९॥**
**अगा वृक्षासी पाताळीं। जळ सांपडे मूळीं।**
**तें शाखांचिये वाहाळीं (विस्तारांत)। वरीहि दिसे॥१८०॥**
**नातरी केळी कापूर जाला। तेविं परिमळें जाणों आला।**
**कां भिंगारीं दीप ठेविला। बाहेरि फांके!॥ १८३॥**
**तैसें हृदयीचेनि ज्ञानें। देहीं उमटती चिन्हें॥** (अ. १३)

वसंतऋतूच्या प्रवेशाबरोबर वृक्षलतांना टवटवी येते त्याप्रमाणें अंतरीचा ज्ञानप्रकाश इंद्रियांच्या द्वारें प्रगट दिसतो. वृक्षांना पाताळांत उदकाची भेट झाली कीं त्या खालच्या ओलीमुळें वर आणि विस्तारांतहि ती स्पष्ट दिसते; केळीच्या गर्भांतून उपजलेला कापूर सुगंधामुळें कळून येतो; त्याप्रमाणें हृदयांत ज्ञानाचा उदय झाला कीं, त्याचीं चिन्हें देहांवर उमटतात. हीं चिन्हें किंवा ज्ञानाचीं लक्षणें गीतेंतच अठरा सांगितलीं आहेत. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, समचित्तता, अव्यभिचारी भक्ति, एकांतवासाची आवड, आत्मज्ञाननिष्ठा, तत्त्वज्ञानार्थदर्शन इत्यादि ज्ञान्याचीं लक्षणें आहेत. याच्या उलट लक्षणें अज्ञान्याचीं आहेत.

## ९ ज्ञानाचीं किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें.

१३ व्या अध्यायांत ज्ञानाचीं व त्याच्या उलट अज्ञानाचीं लक्षणें ज्ञानेश्वरांनीं सविस्तर झ. ७०० ओव्यांत वर्णिलीं आहेत, तसेंच १६ व्यांत दैवी व आसुरी संपत्तीचीं लक्षणें सांगितलीं आहेत. सर्व लक्षणें येथें सांगणें अशक्य आहे तथापि ज्ञानाज्ञानाचीं व दैवासुरप्रकृतींचीं कांहीं ठळक लक्षणें आपण पाहूं:—

### ज्ञान लक्षणें.

( ३ ) **अहिंसाः**—काया, वाचा, मन, हस्त, पाद, चक्षु,इ. कोणत्याही इंद्रियानें झ. मुख्यतः मनानें दुसऱ्याला दुःख न देतां सुख देणें. 'परमाणु पा गुंतले ।जाणूनि जीव सानुले। तेथ कारुण्यामाजि पाउलें। लपवूनि चाले॥ ते वाट कृपेची करित। ते दिशाचि स्नेहभरित । जीवातळीं आंथरित। आपुला जीव' असें पायाचें चालणें. 'पुढां स्नेह पाझरे। माघां चालतीं अक्षरें' असें बोलणें. 'मुख मोहाचें माहेर.' 'साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे' असें बोलणें. चंद्रबिंबांतून अमृतधारा स्रवतात तसें भूतमात्रीं सकरुण पाहणें, कूर्मदृष्टीनें पाहणें. पशुपक्ष्यांनाही हस्तपादांच्या क्रियेनें त्रास न होईल असें वागणें. मनच इंद्रियद्वारां फांकतें 'म्हणून दयालुत्व आपुलें। मनें हातापायां आणिलें। मग तेथ उपजविलें। अहिंसेतें.'॥

१५ **अव्यभिचारी भक्तिः**—कायावाचामन भगवंताच्या ठिकाणीं रतलेलें म्हणून 'एक मीवांचूनि वास। न पाहती आन' 'मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसे । सर्वस्वें भजती.' हे अभेदभक्त मजसीं ज्ञानानें समरस होऊन माझी भक्ति करितात.

१७ **अध्यात्मज्ञाननित्यत्वः**—'तरी परमात्मा ऐसें। जें एक वस्तु असे। तें जया दिसे। ज्ञानास्तव॥ तें एकवांचूनि आनें।जियें भवस्वर्गादि ज्ञानें। तें अज्ञान ऐसा मनें। निश्चय केला.' अध्यात्मज्ञानीं ध्रुवासारखें अढळ राहणें. स्वर्गसंसाराचें ज्ञान तें अज्ञान होय.

**१८ तत्वज्ञानार्थदर्शनः**—तत्वज्ञानाचें जें फळ ( अर्थ ) ह्म० ज्ञेय, पुरुषोत्तम किंवा परमात्मा, त्यावर दृष्टि निश्चळ असणें. ' म्हणोनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तूचि आघवी । तें देखे ऐसी व्हावी । बुद्धि चोख. '

## दैवीगुण.

**१ अभयः**—दैवीगुणांत अग्रस्थान ' अभयाला ' दिलें आहे. ' ऐक्य-भावाचेनि पैसें । दुजें मानूनि आत्मा ऐसें । भयवार्ता देशे । दवडणें जें'—ऐक्यभावाच्या किंवा अद्वैतानुभवाच्या विकासानें जें जें दुजें म्हणून पुढें येईल तें तें आत्मा असें भावून निर्भय होणें. संसाराचें भय सांडणें तें अभय.

**४ दानः**—' देहवाचाचित्तें । यथासंपन्नें वित्तें । वैरी जालियाही आर्तातें । न वंचणें जें ॥ फुलींफळीं छाया । मूळीं पत्रींही धनंजया । वाटेचा न चुके आलिया । वृक्ष जैसा ॥ तैसें मनौनि धनवरी । विद्यमानें आल्या अवसरीं । श्रांताचिया मनोहारी ( मनोदयानुरूप ) उपयोगा जाणे ॥ ८७ ॥ तया नांव जाण दान । जें मोक्षनिधानाचें अंजन. ' अवंचकपणें आर्ताला सर्व प्रकारचें साह्य करणें याचें नांव दान.

**८ तपः—स्वरूपाचिया प्रसरा—। लागिं प्राणेंद्रियशरीरा ॥**
**आटणी करणें जें वीरा । तेंचि तप ॥ १०८ ॥**

**१० अहिंसाः—जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें ॥**
**राहाटणें ते अहिंसें । रूप जाणा ॥ ११४ ॥**

**१६ दयाः**—' आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां न कडसी ( विचारीत नाहीं ) । सानें थोर ॥ ' दुःखिताचा शीणभाग हरतांना उत्तमअधम हा विचार न ठेवतां पाणी स्वतः अंगानें नाश पावून तृणाचेंही रक्षण करितें, तसें कळवळून दुसऱ्यास सर्वस्व देणें ही दया. ' पै कांटा नेहटे ( बोंचतो ) । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ का पावो ( पाय ) शीतळता लाहे । कीं तें डोळियांचिलागीं होये । तैसा परसुखें जाये । सुखावत जो '॥ १६० ॥—पायाला कांटा टोंचला तर तो अंतःकरणाला वेदना देतो किंवा पायाला

शीतळता आली तर ती डोळ्यांना सुख देते, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी व सुखानें सुखी होणें ही दया होय. ' दुःखिताचे सेल-भागीं ( पुढें ) । असणें जयाचें ' तोच दयावान् होय ! पुढारी तो !

**१५ अपैशुन्य ह्म० सौजन्यः**–सद्वैद्य जसा रोग्याचा रोग दूर करून त्याची शक्ति वाढविण्याचा यत्न करितो, चिखलांत रुतलेली गाय धडभाकड न पाहतां तिच्या दुःखानें कासावीस होऊन दयाळु मनुष्य जसा तिला बाहेर काढतो किंवा कुलवती स्त्रीचें नेसतें वस्त्र पाण्यानें दूर केलें तर ' ती नेसविल्यावीण न पाहे । शिष्ट जैसा '– त्याप्रमाणें अज्ञान, प्रमाद, किंवा पापसंस्कार यामुळें हातून पाप घड-लेल्या व लोकांत निंद्य झालेल्या स्त्रीपुरुषांवर आपल्या दयेचें पांघरूण घालून त्यांच्या मनांत सलणारें शल्य काढून टाकणें, त्यांचे दोष आपल्या औदार्यानें विसरून व विसरवून त्यांजकडे ममत्वानें पाहणें हें सौजन्य होय ! ' जैसा पूजूनि देव पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । तोषौनि प्रसाद घेइजे । अतिथीचा ॥ तैसें आपलेनि गुणें । पुढिलांचे उणें । फेडूनियां पाहणें । तयाकडे ' ॥ १४९ ॥ हें सौजन्य. दुसऱ्याच्या दोषाचा उच्चार न करणें, मर्मीं घाव न घालणें,सदोष नामानें न हाकारणें हें सौजन्याचें लक्षण होय. ' पडिलें तें उभें होय ' असें करणें हें सौजन्याचें वर्म आहे.

**२१ तेजः**– ईश्वरप्राप्तीसाठीं ज्ञानयोगी जें लोकोत्तर धैर्य दाखवितो तें तेज-'ईश्वराकडे निज (मन) । धांवे आपैसया सहज । तया नांव तेज । आध्यात्मिक तें. '

**२२ क्षमाः**– सर्व सहन करीत असूनही त्याचा गर्व न वाटणें.

**२३ धृतिः**—इंद्रियांचे वेग, पूर्वकर्मानें खवळलेले रोग, प्रियाप्रियांचे योगवियोग, हे सर्व–फार काय पण त्रिविधतापही एकदम् येऊन आदळले तरीही अशा चित्तक्षोभाच्या वेळीं धैर्य धरून पराक्रम गाजविणें ती धृति.

**२४ शौचः**—सोन्याच्या तांब्यांत गंगेचें पाणी,तसें अंतर्बाह्य शुचित्व ! ' आंगीं निष्काम आचार । जीवीं विवेक साचार ' तें शौच.

**२५ अद्रोह म्हणजे परोपकारः**—परोपकाराचें लक्षण सर्वांवर कळस आहे. जगाचें पाप व ताप दूर करीत व तीरावरच्या वृक्षांना पोषीत गंगा जशी सहजभावानें समुद्राकडे धांवते किंवा विश्वाचा अंधकार घालवीत व कमलांना विकासवीत सूर्य जसा पृथ्वीप्रदक्षिणेला निघतो, त्याप्रमाणें बद्धांना मुक्त करीत व बुडालेल्यांना बाहेर काढीत किंबहुना सर्व आर्तांचीं संकटें निवारीत दुसऱ्यांच्या सुखार्थ निस्वार्थपणें अहोरात्र झटणें याचें नांव **परोपकारः**—

**कां फेडीत पाप ताप। पोखीत तीरींचे पादप।**
**समुद्रा जाय आप। गंगेचें जैसें॥ १९९॥**
**कां जगाचें आंध्य फेडीत। श्रियेचीं राउळें उघडीत।**
**निघे जैसा भास्वत। प्रदक्षिणे॥ २००॥**
**तैसीं बांधलीं सोडीत। बुडालीं काढीत।**
**सांकडी फेडीत। आर्तांचिया॥ २०१॥**
**किंबहुना दिवसराती। पुढिलांचे सुख उन्नती।**
**आणित आणित स्वार्थीं। प्रवेशिजे॥ २०२॥** (अ. १६)

परसुखार्थ झटणें हाच थोरांचा स्वार्थ असतो!

ज्ञानाचीं किंवा दैवीसंपत्तीचीं वर जीं लक्षणें दिलीं आहेत जीं जेथें प्रगट दिसतात तेथें ज्ञान मूर्तिमंत आहे असें समजावें. ज्ञान वागण्यांत उतरलें तरच तें ज्ञान! नुसतें समजणें हें बुद्धीचें काम आहे, उमजून त्याप्रमाणें वागणें हें ज्ञानाचें लक्षण आहे. सत्य, आहिंसा, परोपकार, सौजन्य, भक्ति, दया, दान हे गुण ज्याच्या वागणुकींत आहेत त्यालाच खरोखर ज्ञानी म्हणतात. हे गुण ज्ञानाचा परिपाक आहेत, परिमल आहेत, हे गुण म्हणजेच ज्ञान असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आतां याच्या उलट अज्ञानाचीं किंवा आसुरी प्रकृतीचीं लक्षणें पहाः—

## १० अज्ञानाचीं किंवा आसुरीप्रकृतीचीं लक्षणें.

१ **मानित्वः**—अज्ञानी मानाची वाट पाहतो व सत्कारानें संतुष्ट होतो. 'गर्वें पर्वताचीं शिखरें। तैसा महत्वावरूनि नुतरे'—मोठेपणा विसरून त्याला खालीं येतांच येत नाहीं !

२ **दंभित्वः**—सर्व सत्कर्म वेशीवर टांगायची इच्छा, 'घाली विद्येचा पसारा। सुये सुकृताचा डांगोरा। करी तेतुलें मोहरा। स्फीतीचिया—' प्रतिष्ठेच्या मार्गावर सर्व सुकृत आणून ठेवतो. 'आंग वरिवरी चर्ची। जनातें अर्चितां वंची—' बाहेर झगझगित पण आंत जगाला फसवायचा धंदा !

४. **अक्षांतिः**—'फुंकें भाता फुगे। रेचिलिया सवेंचि उफगे। तैसा संयोगवियोगें। चढे वोहटे'—वाऱ्याबरोबर धूळ आकाशीं चढते तसा स्तुतीनें चढतो व 'निंदा मोटकी आइके। आणि कपाळ धरूनि ठाके। थेंबें विरे-वारेनि शोखे। चिखल जैसा' तात्पर्य कोणतीच उर्मी ज्याला सहन होत नाहीं तो अज्ञानी होय !

७ **अशौचः**—'आंगें कर्में ढिला। जो मनें विकल्पें भरला,' व्यभिचारादि पातकांनीं उन्मत्त, 'जैसें पोटालागीं सुणें। उघडें झांकलें न ह्मणे। तैसें आपुलें परावें नेणे। द्रव्यालागीं.' सत्कर्म किंवा नित्यनैमित्तिक चुकलें तर त्याच्या मनाला खंत नाहीं. भ्रष्टाचरणाचा.

११ **अहंकारः**—देहालाच आत्मा मानून देहभोगासाठीं कर्में करितो; थोडी धनाची, विद्येची, बळाची जोड असली कीं देवही ओळखीत नाहीं; 'विद्यावयसा माजे। उताणा चाले!' सर्वसंपन्न काय तो मी एक या गर्वानें फुगतो, 'लाटणें ऐसा न लवे। पाथर तेंवि न द्रवे.'

१२ **जन्मजरादिकांचें अभानः**—'बेडुक सापाचिये तोंडीं। जातसे सबुडबुडी। तो मक्षिकांचिये कोडी (आशेनें)। स्मरेना कांहीं' त्याप्रमाणें जराव्याधि, मृत्यु इ.कांचा विचार पळभरही न करितां प्रपंचांतच मग्न होऊन राहतो. 'स्त्रीपुत्रादि मेळें। संपत्ति जंव जंव फळे। तेणें रजें डोळे।

जाती जयाचे ' न करावें तें करी, न खावें तें खाये, न जावें तेथ जाये, नायकावें तें आयके, न बोलावें तें बके, तात्पर्य ' आंगा मनासी रुचावें। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे। जो करणेयाचेनि नांवें। भलतेंचि करी !

१३ **आसक्तिः**—' साखरेचिया राशी। बैसली नुठी माशी। तैसेंनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन ' घरादारावर अत्यंत लोलुप. ' चित्त आराधी स्त्रियेचें। आणि तियेचोचि छंदें नाचे। माकड गारुडियाचें। तैसें होय ॥ हानीलज्जा न देखे। परापवाद नायके। जयाचीं इंद्रियें एकमुखें। स्त्रिया केलीं ॥'

१ **दंभ**—इहपरलोकीं तारक जो धर्म त्याचा पुकारा केला असतां तोच पातकाला कारण होतो, ' म्हणौनि वाचेच्या चौबारां ( चव्हाट्यावर )। घातलिया धर्मांचा पसारा। धर्मचि तो अधर्म होय वीरा। तो दंभ जाणे ॥ २२३ ॥'

२ **दर्प**—' कांटिये वरिल्यां सरडा। स्वर्गही नीच '—कांट्याच्या टोंकावर गेलेला सरडा स्वर्गही खुजा मानतो,—' तैसा माजे स्त्रियाँधनें। विद्यास्तुतीबहुतेंमानें। ' असें संपत्तीनें जें उतणें तो दर्प होय.

३ **अभिमान**—जगाचा वेदावर विश्वास आहे व विश्वाला वेदही पूज्य आहे, पण ' अभिमानाचेनि. मोहें। जो ईश्वराचेंही नाम न साहे। बापातें म्हणे मज हे। सवती जाली '—ऐसा मान्यतेचा पुष्टगंड—अभिमानी पुरुष हा ताठर होतो. ' रौरवाचा रूढ। मार्गाचि हा ! '

४ **क्रोध**—दुसऱ्याचें सुख पाहण्याचें निमित्त कीं क्रोधाचें विष याच्या अंगांत संचरलेंच ! 'चंद्र देखोनि जळे पोटीं। कोल्हा जैसा' किंवा सूर्यदर्शनानें घुबडाचे डोळे फुटतात ! अगर जगाची सुखपांहट ती चोराला तापद होते, तशी विनोदविद्यावैभवादि दुसऱ्याचे गुण पाहतांच जेथें संताप होतो तो क्रोध उर्फ मत्सर होय.

५ **पारुष्य** ( कठोरपणा )—' आणि मन सर्पाची कुटी। डोळे नाराचांची सुटी। बोलणें तें वृष्टि। इंगळाची—' सापाच्या वारुळांत जसे

विषाचे फूत्कार तसे ज्याच्या मनांत घातक संकल्प उठतात, ज्याच्या डोळ्यांत बाणांची व भाषणांत निखाऱ्याची वृष्टि असते–' येर जें क्रियाजात। तें तिखयाचें कर्वत। ऐसें सबाह्य खसखसित। जयाचें गा ॥२४४॥' तो कठोरपणाचा पुतळाच होय.

६ **अज्ञान**—जात्यंधाला दिवसरात्र कळत नाहीं तैसें 'कृत्याकृत्यविवेकीं। अंधपण जें' तें अज्ञान–आग पेटली कीं ती जैसी 'खाद्याखाद्य न म्हणे' त्याप्रमाणें हा खाण्यापिण्याचे कामीं विवेकच ठेवीत नाहीं! 'हें चोख हें मैळ। ऐसें नेणोनियां बाळ। देखें तें केवळ। मुखींचि घाली' त्याप्रमाणें पापपुण्याची खिचडी करून जो योग्यायोग्य पदार्थ चव किंवा परिणाम न पाहतां सेवन करितो तो अज्ञानाची मूर्तिच जाण.

## ११ धर्मनष्टांचे आचारविचार.

'पुण्यालागीं प्रवृत्ति। कां पापालागीं निवृत्ति' हा विचार आसुरी प्रकृतीच्या मूढ लोकांना माहीतच नसतो. शौच, आचार, सत्य कांहींच त्यांचे ठिकाणीं नसतें. 'काळिमा सांडील कोळसा। वरी चोखी (स्वच्छता) होईल वायसा। राक्षसही मांसा। विटों शके ॥ २८५ ॥ परी आसुरां प्राणियां। शौच नाहीं धनंजया। पवित्रत्व जेंवि भांड्या। मद्याचिया' ॥ २८६ ॥ ते विधिनिषेध किंवा वडिलांची चालरीत पाळीतच नाहींत. शेळीच्या चरण्याप्रमाणें ते स्वैर वागतात. धुराड्यांतून धूरच बाहेर पडायचा, त्याप्रमाणें त्यांचे विचारही त्यांच्या धर्मशून्य हृदयांतून निघून त्यांच्या मुखावाटे बाहेर पडतात! 'जग हें अनादि आहे, याचा नियंता ईश्वर आहे व न्यायान्यायाचा निवाडा करणारे वेद आहेत' ही विश्वव्यवस्थाच ते मिथ्या ठरवितात, धर्माला हे थोतांड म्हणतात! ते म्हणतात कीं, "याज्ञिक यज्ञानें, देवपिसे प्रतिमांनीं व संन्यासी आणिं योगी समाधिभ्रमानें फसले आहेत. आपल्या बळानें मिळवावें आणि भोगावें यावेगळें पुण्यच कोठें आहे? भोग न भोगणें हेंच पाप! श्रीमंतांचे

प्राण घेणें हें जर पाप तर त्यांचें सर्वस्व हातीं येतें हें पुण्यफळ कां मानूं नये? ‘बळी अबलातें खाय’ हा जर न्याय नसता तर माशांचें निसंतान नसतें कां झालें? दोन्ही कुळांचा शोध करून शुभमुहूर्तावर लग्न करणें हें जर विहित, तर पशुपक्ष्यांच्या विवाहाचा विधि कोणचा? चोरीचें धन कोणाला विष झालें आहे काय? व्यभिचार करणारा कोण कुष्ठी झाला आहे? म्हणून परलोक व देव हें सर्व ढोंग आहे कां कीं ते दिसत नाहींत! म्हणून स्वर्गनरक हें पापपुण्यांनीं मिळतात हें सारें खोटें आहे.स्त्रीपुरुषयुग्में मिळतात व त्यापासून जग होतें याप्रमाणें‘कामावांचूनि कांहीं। जगा मूळचि आन नाहीं’ असा हे आसुर निष्कर्ष काढतात!! ईश्वरच नाहीं असा मनांत निश्चय ठेवून हे नास्तिक देवाविषयीं वाटेल ते बकतात. मग केतूचें उगवणें विश्वाला अकल्याणकर होतें तसें यांचें वर्तन जगाच्या क्षयाला कारण होतें. देहाच्या सुखाकरितां हे परस्परांशीं लढतात व जगांत दुःखच पेरतात! दुर्भर अशा कामाचा आश्रय करून दंभमानमदांनीं युक्त होत्साते हे असुर दुसऱ्याला ताप देऊन दुसऱ्यांचे जीव रगडून उदरंभरी होतात. ‘मग आपुलें केलें फोकारिती। आणि जगातें धिक्कारिती। दाहीं दिशा पसरिती। स्पृहाजाळ॥ ३२८॥’ यासाठींच त्यांची कर्मप्रवृत्ति असते व याचीच ते अहोरात्र विवंचना करितात. भोगासाठीं कर्म व भोगाचीं साधनें दोन–स्त्री व धन; म्हणून ते स्त्रीलंपट व धनलोभी बनून वाटेल तीं पापें करितात. ‘स्त्रिया गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें। ही त्यांची मनीषा. ‘एकातें साधूनि मारिती। एकाचीं सर्वस्वें हरिती। एकालागीं उभारिती। अपाययंत्रें!॥ ३४४॥’ या व्यवसायासाठीं अंगीं बळ असावें म्हणून ‘पोसावया पोट। मारिती प्राणियांचे संघाट!’ मिळविलेलें भोगीन आणखी मिळवीन–‘लाभा घेईन उरलें चराचर हें, ही महत्त्वाकांक्षा!’ हे आज मारले, उद्या ते मारीन ‘मग नांदेन पवाडें। एकलाचि मी!’ मी करीन तें होईल, ‘किंबहुना चराचरीं। ईश्वर तो मीं.’ अहंकार सारा देहाचा–‘माझिया कुळाचा उजाळु। कां जातिगोतांचा मेळु। पाहतां ब्रह्मांडीं हळु। उणाचि दिसे॥ मातें गाती

वानिती। नटनाचें रिझविती । तयां देईन मागती। ते ते वस्तु'॥ आशेच्या वावटळीबरोबर हे नाना मनोरथांच्या अंतराळीं फिरतात. महंत-पणाचा गर्वही धरितात, तेव्हां 'लवों नेणती कैसे। **आटिवा लोहाचे स्तंभ जैसे** । देवांब्राह्मणाचेनि नांवें'। आडवाराहि येऊं देत नाहींत. याप्रमाणें अहंकारादिकांनीं भरलेले हे असुर संतसज्जनांचा द्रोह करितात. असल्या नराधमांना—भगवान् म्हणतात—आसुरीयोनींतच पुन: पुन्हां मी जन्मास घालतों व मला न पावतां ते शेवटीं अधमगतीला जातात. ह्यांच्या दोषांत काम, क्रोध, लोभ हे प्रधान आहेत, हीं नरकाचीं द्वारें उघडच आहेत.

## १२ भक्तियोग.

'मायापूर हा कवणें । तरिजेल गा!' ही दुस्तर मायानदी कोण बरें तरून जाईल! मायेचा थांग लागत नाहीं 'जो जो कीजे तरणोपावो। तो तो होय अपावो'—येथें उपायच अपाय होतात आणि मोठमोठे याज्ञिक, कर्मठ, ज्ञानी, योगी, हे मर्म चुकल्यामुळें अधिक खोल पाण्यांत जातात. 'जे सर्वभावें मज भजले' तेवढेच तरतात, जे गुरूपदिष्ट मार्गानें जाऊन अहंभाव व विकल्प सोडून अद्वैतभक्तीनें मला जाणून भजतात त्यांनाच तरणोपाय सांपडतो. ( अ० ७ ओंवी ६८ ते १०१ ).

देवाला भजणाऱ्या भक्तांतही आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकार आहेत. त्यांत चौथा ह्म. ज्ञानी भक्त हाच खरा भक्त होय. मायानदींतून हाच तरून जातो. 'ज्ञानाचेनि प्रकाशें। फिटलें भेदाचें कवडसें'—आत्मज्ञानाच्या प्रकाशानें ज्याचा द्वैतांधकार नाहींसा होऊन जो मजशीं समरस होतो तोच भक्त होय.

**शरीरीं हन कर्में। तो भक्त ऐसा गमे।**
**परी अंतरप्रतीतिधर्में। मीच जाहला॥ ११६॥**

भक्त मजशीं अनन्य असतो, तो माझें चैतन्यच होय ! निजबिंबांत प्रतिबिंब एकवटतें, किंवा पौर्णिमेस चंद्र संपूर्ण असतो तसा दृश्य द्रष्टा-

भेदरहित तो मजशीं समरस असतो (अ. ७) मनबुद्धि माझ्या स्वरूपीं अर्पण करून मत्स्वरूप होणें हीच माझी खरी भक्ति होय.

**डोळां जें देखावें । कां कानीं हन ऐकावें ।**
**मनीं जें भावावें । बोलावें वाचे ॥ ७६ ॥**
**तें आंतबाहेरी आघवें । मीचि करूनि घालावें ।**
**मग सर्वकाळीं स्वभावें । मीचि आहे ॥ ७७ ॥**
**सदभ्यासें निरंतर । चित्तासी परमपुरुषाची मोहर ।**
**लावी–मग शरीर । राहो अथवा जावो ॥ ८२ ॥**

चित्तच चैतन्य झालें ' मग न मरिजे देह गेलिया. ' गंगेचा ओघ सिंधुजळांत मिळून गेल्यावर तो मागें काय आहे हें पहात असतो काय? ' ऐसे निरंतर एकवटले । जे अंतःकरणीं मजसि लिगटले ' ते मीच होऊन व्यापकपणें मला भजतात. पण मनबुद्धि मला अर्पण करणें एकदम न साधलें तरः—

**तरी गा ऐसें करीं । यया आठा पाहरामाझारीं ।**
**मोटकें निमिषभरी । देत जाईं ॥ १०५ ॥**

आठ प्रहरांत अल्पकाळ तरी नेमानें माझें चिंतन करीत जा. पौर्णिमेनंतर शशिबिंब दिवसेंदिवस क्षीण होत होत अंवसेला नाहींसें होतें:—

**तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजीं रिगतां ।**
**हळू हळू पांडुसुता । मीचि होशी** ॥ अ० १२–१०९ ॥

देवाचें स्वरूप, देव सगुण कां निर्गुण, सगुणाच्या भक्तीची सुलभता व भक्तींचीं लक्षणें याबद्दल ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत ९ ते १२ ह्या चार अध्यायांत फार सुंदर निरूपण केलें आहे. हे चारी अध्याय उपासनाकांडांतले असून त्यांतीलही ९ व १२ हे अध्याय वारकऱ्यांच्या विशेष आवडीचे आहेत व त्यांतील संपूर्ण ओव्या मुखोद्गत करणारे अनेक वारकरी आढळतात. ब्रम्हसुख ' सुलभ आणि सोपारें ' असून ' पवित्र आणि रम्य । तेवींच सुखोपाय सुगम । आणि सुसुख परम

नगर वाचनालय, सातारा



धर्म्यें । वरी आपणपां जोडे ' ( अ० ९–५५ ) असें आहे. देव ' मुखाप्रति भानु कां जैसा ' असा सुगम व रोकडा आहे. कल्पना सोडून पाहिलें असतां ' मीचि मी आघवें ' आहे, सगुण मी व निर्गुण मी व उभय-कल्पनातीत मी असा अभेदबोध भक्ताच्या ठायीं सदोदित असतो. ते " जाणोनियां सर्व स्वरूप माझें ' मज भजतात, ' मीचि होऊनि पांडवा। करिती माझी सेवा ' ( अ. ९–१९६ ). पंचभूतात्मक सृष्टि, विषय व इंद्रियें असा भेदभाव न करितां भक्त एकत्वें विश्व पाहतो.–' भूतें विषय-करणें ।हें वेगळाले कांहीं न म्हणे । आघवें एकचि ऐसें जाणें । आत्म-बुद्धि ' ( अ० ९–२४५ ). विश्व भिन्नभिन्न पण त्याचें ज्ञान अभिन्न असतें. ' जेवढी माझी व्याप्ती । तेवढी तयाची प्रचीती ! ' देव प्रगट ना गुप्त, नामरूपीं तोच व नामरूपातीत तोचः—

**इहीं नामरूपीं आघवा । जो भरला असे पांडवा ।**
**आणि नामरूपांचाही वोलावा । आपणचि जो ॥ ९–२६८ ॥**
**हें समस्तही श्रीवासुदेव । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भाव**
**म्हणोनि भक्तांमाजी राव । आणि ज्ञानिया तोचि ॥अ०५–१३६॥**

अनंत कल्लोळांना जन्म, आश्रय व जीवन सर्व कांहीं जळच, त्याप्रमाणें त्याला ' मी वांचूनि नाहीं । विश्वीं इये ' असें सांगून १० व्या अध्यायां-तही म्हटलें आहे कीं, व्यापकाला मला ओळखून जे उत्कट प्रेमभावानें भजतातः—

**ऐसेनि जे निजज्ञानी । खेळत सुखें त्रिभुवनीं ।**
**जगद्रूपा मनीं । सांठऊनि मातें ॥ ११७ ॥**
**जें जें भेटे भूत । तें तें मानिती भगवंत।**
**हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ ११८ ॥**

भक्त अद्वैतभावानें देवाशीं अनन्य झालेले असूनही एकेकटे किंवा मेळे जमवून देवाचें नामसंकीर्तनसुख स्वतः भोगतात, व जगाला नामामृत पाजतात व सर्व लोक सुखी करितात.

**चित्तें मीचि जाहले । मियांचि प्राणें धाले ।**
**मग जीवों मरों विसरले । बोधाचिया भुली ॥ ११९ ॥**

भक्तांच्या मेळयांत संवादसुखाचा आनंदोल्हास नाचत असतो, मग 'एकमेकां घेपे दीजे । बोधचि वरी '—बोधामृताची देवघेव त्यांच्यांत चालते.

**जैसी जवळिकेचीं सरोवरें । उचंबळलिया कालवती परस्परें ।**

नजीकचीं सरोवरें पाण्यानें तुडुंब भरून वरून वाहूं लागलीं कीं या सरोवराचें पाणी त्यांत व त्याचें यांत उसळून वाहतें त्याप्रमाणें दोन किंवा अधिक भक्त एकत्र मिळाले कीं बोधानंद सर्वांना आपल्यांत घेतो.

**कमळकळिका जालेपणें । हृदयीचिया मकरंदा राखों नेणे ।**
**दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ १२७ ॥**

**तैसेंचि मातें विश्वीं कथित । कथिलेनि तोषें कथूं विसरत ।**
**मग तया विसरामाजी विरत । आंगें जीवें ॥ १२८ ॥**

कमलकलिका पूर्ण विकास पावली कीं तिच्यांतला परिमल आंतल्या आंत न समावतां बाहेर फांकतो व सर्वांना आमोद यथेच्छ भोगायला सांपडतो, त्याप्रमाणें हरिप्रेमानंद भक्तांच्या हृदयांत न मावतां तो ते विश्वाला सांगूं लागतात, सांगण्याच्या आनंदांत सांगणेंही विसरतात व त्या विसरांत आंगें जीवें विरून जातात ! ( अ० १० ओवी ११९–१२९ )

देवाचे गुणानुवाद, देवाच्या लीला, देवाचें नामसंकीर्तन यांत भक्त स्वतः रमतात व संगतीच्या लोकांस रमवितात आणि सारें जग आनं-दानें भरून टाकतात. ते आनंदांत नाचतात, गातात व तेणेंकरून 'एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा !' कीर्तनाच्या नटनाचानें चित्ताचे इतर सर्व व्यवसाय सुटतात. यमदमतीर्थयात्रादिकांचें कारणच उरत नाहीं.

**ऐसें माझेनि नामघोषें । नाहींच करिती विश्वाचीं दुःखें ।**
**अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥**

ते योगेविण डोळ्यांला कैवल्य दाखवितात. राजारंक, सानेथोर हा भेदभाव या कीर्तनसुखांत राहत नाहीं. पूर्वीं एखादाच वैकुंठाला जात असे, पण नामसंकीर्तनभक्तीच्या योगानें 'तिहीं वैकुंठचि केलें आघवें। ऐसें नामघोषगौरवें। धवळलें विश्व।' हे भक्त सूर्यासारखे सोज्ज्वळ, चंद्रासारखे शीतळ, मेघासारखे उदार, व सदय असून भवव्याघ्रावर सिंहासारखे उडी घालणारे शूर असतात. देव म्हणतात कीं मी एक वेळ वैकुंठीं सांपडणार नाहीं, भानुबिंबीं दिसणार नाहीं, योग्यांच्याही मनाला लंघून जाईन—

**परि तयापाशीं पांडवा। मी हारपला गिंवसावा।**
**जेथ नामघोष बरवा। करिती माझा॥ २०८॥**

**कैसे माझ्या गुणीं धाले। देशकाळांतें विसरले।**
**कीर्तनसुखें सुखावले। आपणपाचि॥ २०९॥**

**कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामांचे निखिल प्रबंध।**
**माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती॥ २१०॥** (अ. ९)

उंचीहून पडलेलें उदक तळवटवरी येतें किंवा फलभारानें लवलेली तरुशाखा सहज भूमीपर्यंत उतरते 'तैसें जीवमात्रा अशेखां। खालावती ते.' अगर्वता अखंड असल्यामुळें 'तयांची विनय हेंचि संपत्ति' असते.

**नमितां मानापमान गळाले। म्हणोनि अवचिता मीचि जाहले।**
**ऐसें निरंतर मिसळले। उपासिती॥** अ० ९–२२७॥

वर्णविशेषानें भागा आलेलीं कर्में भक्त आचरीत असतात. ते विधि पाळतात, निषेधाला गाळतात, पण कर्मफळें मला अर्पितात म्हणून कर्मबंधांत सांपडत नाहींत. त्यांच्या कायिक वाचिक मानसिक भावांची मोहर मजकडे असते. 'ऐसे जे मत्पर। उपासिती निरंतर' व ते भोगमोक्षही त्यागून मला भजतात:—

**ऐसें अनन्ययोगें। विकलें जीवें मनें आंगें।**
**तयांचे कायी एक सांगें। जे सर्वही मी करीं॥ ८२॥**

**येऱ्हवीं माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता ।**
**काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ? ॥ ८५ ॥**

भवसिंधूला त्यांनीं भिऊं नये व जन्ममृत्यूंच्या लाटांनीं बुडूं नये 'म्हणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवत आलों.' भक्तांपैकीं 'सडे जे देखिले । ते ध्यानकांसे लाविले' आणि जे परिग्रही म्ह० संसारी होते त्यांच्यासाठीं सहस्रनामांच्या नौका मी तयार करून ठेवल्या व प्रेमाची पेटी बांधून त्यांना सायुज्याच्या तीरावर आणलें.

**म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता ।**
**तयांतें समुद्धर्ता । आथी मी सदा ॥ ९४ ॥** ( अ. १२).

माझ्या अनन्यगतिक भक्तांचें सर्व कांहीं मी करितों. ज्यावेळीं भक्त आपल्या सर्व वृत्ति एकवटून मला वाहतो त्याचवेळीं त्याची सर्व चिंता मला वाहावी लागते. गर्भगोळ पोटासाठीं कोणता उद्योग करितो ? अजातपक्ष अशा आपल्या पिलासाठींच पक्षिणी जगते ना ?

**आपुली तहानभूक नेणे । तान्हया निकें तें माउलीसचि करणें ।**
**तैसें अनुसरलें मज प्राणें । तयांचें सर्व मी करीं ॥ ३४० ॥**

त्यांचा योगक्षेम मी चालवितों; कोणा भक्ताला सायुज्यमोक्षाची चाड असेल तर त्याचें तें कोड मी पुरवितों व कोणाला सेवा पाहिजे असेल तर त्याला माझें प्रेमसुख देतों. माझे भक्त जो जो भाव मनीं धरितात तो तो मी पुरवितों. हा झाला योग. आतां योगाचा क्षेम सांगतों— 'आणि दिधलियाचा निर्वाहो ( रक्षण ) मीचि करीं.' याप्रमाणें मी भक्तांचा योगक्षेम वाहतों. ( अ. ९ ओवी ३३५–३४३ ).

देवाला पूर्णभक्ताची आवड पूर्ण आहे, उपचाराला देव भुलत नाहीं, तो अंतरंग पाहतो. देवाला सर्वस्व अर्पायचें म्हणजे काय ?:—

**मग मीचि डोळां देखिला । जिहीं कानीं मीचि ऐकिला ।**
**मीचि मनीं भाविला । वानिला वाचा ॥ ३५९ ॥**

**सर्वांगीं सर्वां ठायीं । मीचि नमस्कारिला जिहीं ।**
**दानपुण्यादिकें जें कांहीं । तें माझियाचि मोहरा ॥ ३६० ॥**

ज्यांचा अहंकार, लोभ, काम माझ्याचसाठीं, ज्यांचें शास्त्राध्ययन किंवा मंत्रजप माझ्याच प्रेमासाठीं, 'ऐसे चेष्टामात्रें जे भजले मज,'जे जिवंतपणींच माझे झाले, मग त्यांना मरणाची भीति कोठून ? तात्पर्यः–

**अर्जुना ! माझिये ठायीं । आपपणेंविण सौरसु (गोडी) नाहीं ।**
**मी उपचारें कवणाही । नाकळे गा ॥ ३६७ ॥** ( अ. ९ )

असा अनन्यगतिक व निरुपचारप्रेमी भक्त देवाला किती आवडतो ? त्या आवडीला कांहीं सीमा आहे ? 'हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला' याप्रमाणें ज्ञानी असून– 'मग याहीवरी पार्था । माझिया भजनीं आस्था–' ज्ञानी असून भक्त असेल तर 'तयातें मी माथां । मुगुट करीं !' मी त्याला प्रेमानें आपल्या मस्तकावर घेतों ! ज्ञानी आहे, भक्त आहे, आणखी—

**पुरुषार्थसिद्धी चौथी । घेऊनि आपुलिया हातीं ।**
**रिगाला भक्तिपंथीं । जगा देत ॥ २१९ ॥**

भक्तिपंथानें जाऊन जगाला मोक्षसुख वाटीत चालला आहे–ज्ञान-भक्तीचा प्रसार करीत लोकोद्धाराचें कार्य करीत आहे–

**तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी ।**
**तयाची कीर्ति श्रवणीं । आम्ही लेवूं ॥ २२२ ॥**
**तो पाहवा हे डोहळे । म्हणूनि अचक्षूसि मज डोळे ।**
**हातीचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ २२३ ॥**
**दोवरी दोनी । भुजा आलों घेऊनी ।**
**आलिंगावया लागूनी । तयाचें आंग ॥ २२४ ॥**
**तेणेंसी आह्मां मैत्र । येथ कायसे विचित्र ।**
**परी तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ २२६ ॥**

**तेहि प्राणापरौते । आवडती हें निरुतें ।**
**जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ २२७ ॥**
**पै प्रेमळांची वार्ता । जे अनुवादिती पांडुसुता ।**
**ते मानूं परमदेवता । आपुली आम्ही ॥ २३८ ॥**

येथें देवाच्या भक्तप्रेमाची पराकाष्ठा ज्ञानेश्वरांनीं फार गोड वाणीनें वर्णिली आहे. देव म्हणतात कीं असा भक्त आम्ही प्रेमानें शिरीं धारण करूं, फार काय 'तयाची टांच धरूं। हृदयीं आम्ही !' असा भक्त डोळे भरून पाहतां यावा म्हणून मी अचक्षु असून डोळे घेऊन आलों, त्याला प्रेमपडिभरानें पोटभर आलिंगितां यावें म्हणून मी चतुर्भुज झालों ! तो मला प्रिय आहे याचें आणखी एक गमक सांगतों. जे अशा असीम भक्तांचीं चरित्रें गातात, ऐकतात व अनुवादतात तेही मला प्राणांहून प्रिय आहेत. ( अ० १२ ओवी २१३–२३८ )

## १३ अद्वैतभक्तीचें स्वरूप.

चौदाव्या अध्यायांतील शेवटच्या दोन श्लोकावरील टीकेंत 'अव्यभिचारी भक्तीचें' स्वरूप असेंच ( ३७२ ते ४०० ) सांगितलें आहे. वन्हि तीच ज्वाला, दळ तेंचि कमळ, रत्न तीच प्रभा, "तैसें विश्व येणें नांवें । हें मीचि आघवें । घेई–चंद्रबिंब सोलावें । नलगे कांहीं ॥ ३७८ ॥ घृताचें थिजलेपण । न मोडितां घृतचि जाण । कां नाटितां कंकण । सोनेंचि तें ॥ ३७९ ॥ न उकलितां पट । तंतूचि असे स्पष्ट । न विरवितां घट । मृतिका जेवीं ॥ ३८० ॥ म्हणोनि विश्वपण जावें । मग तै मातें घेयावें । तैसा नव्हे, आघवें । सगटचि मी ॥ ३८१ ॥–" चंद्र आणि चंद्रिका दोन नाहींत, बिंब सोलून कांहीं प्रकाश वेगळा घेतां येत नाहीं, घृत व त्याचे घट्ट गोळे, सुवर्ण व अलंकार, तंतू व पट, मृत्तिका व घट यांचें जें नातें तेंच जगाचें व माझें ह्म० ब्रह्माचें नातें आहे, म्हणजे त्यांत पूर्ण अभेद आहे; म्हणून विश्वपण काढून टाकून मला पहायला नको. विश्व म्हणजे मी व मी म्हणजे विश्व, अशी विश्वांत व माझ्यांत अखंड एकाकारता आहे.

असें अभेदत्वानें मला जाणणें ही अव्यभिचारी भक्ति होय, भेदाची कल्पना हाच व्यभिचार. विश्वब्रह्माची ऐक्यता आहे, अर्थात् हा ऐक्यबोध घेणारा जीवही ब्रह्माहून वेगळा राहत नाहीं. ' याकारणें भेदातें। सांडूनि–अभेदें चित्तें । आपणयासगट मातें। जाणावें गा ' ॥ ३८३ ॥ सोन्याची टीक सोन्यालाच लागलेली असते, तसा जीव ब्रह्माहून भिन्न नाहीं. सूर्यकिरण सूर्याहून वेगळा कोठें आहे? 'परमाणू भूतळीं। हिमकण हिमाचळीं । मजमाजीं न्याहाळीं । अहं तैसें '॥ ३८६ ॥ तरंग नामरूपानें लहान दिसला म्हणून तो सिंधूहून काय भिन्न आहे? ' ऐसेनि बा समरसें। दृष्टी जैं उल्लासे । ते भक्ति पै ऐसें। आम्हीं म्हणों '–त्याप्रमाणें ब्रह्म, विश्व व जीव यांच्या एकत्वाच्या अनुभवानें दृष्टि जेव्हां विकास पावते त्याला आम्ही **भक्ति** असें म्हणतों. ज्ञानाची पराकाष्ठा हीच व योगाचें सर्वस्व हेंच. भक्ति, ज्ञान, योग हे येथें एकमय होतात. ' सिंधू आणि जळधरां–। माजी लागली अखंड धारा'– मेघधारा व समुद्र यांचा अखंड संबंध तसा अंतःकरणप्रवृत्तींचा अखंड प्रवाह परम पुरुषाच्या ठायीं असणें यालाच भक्ति, ज्ञान व योग म्हणतात! मिठाचा खडा समुद्रांत पडतांच विरघळतो ' नातरि जाळूनि तृण। वन्हिही विझे आपण। तैसे भेद नाशूनि जाण। ज्ञानही मुरे '॥ ३९५ ॥ तेथें देवभक्त-भेद मावळून ' अनादि ऐक्य जें आहे। तोंचि निवडे. ' या दशेला ब्रह्मत्व, सायुज्य, मोक्ष, पराभक्ति, अभेदभक्ति हीं नांवें आहेत.

## १४ परमात्म्याची व्यापकता.

पुरुषोत्तमयोगाच्या १५ व्या अध्यायांत श्लोक १२ ते १५ ह्या चार श्लोकांत ' मी सर्वभूतीं कसा व्यापक आहे ' हें उत्कृष्ट प्रकारें सांगितलें आहे. सूर्य, चंद्र, अग्नि यांत व पृथिव्यादि पंचभूतांत मीच एक परमात्मा व्यापून राहिलों आहें. 'तरी सूर्यासगट आघवी। हे विश्वरचना जे दावी। ते दीप्ति माझी जाणावी। आद्यंतीं आहे '॥ ३९८॥ जल शोषून सविता गेल्यावर चंद्रीं ओलांश पुरविणारी ज्योत्स्ना माझी आहे. अग्नींत

तेजोवृद्धि मीच करितों. “मी रिगालों असें भूतळीं । म्हणौनि समुद्रमहाजळीं । हे पांसूची ढेपुळी ( रजःकणांची ढेप, पृथ्वी ) । विरेचिना ॥४०१॥ आजि भूतेंही चराचरें । हे धरितसे जियें अपारें । तियें मीचि धरीं धरे ( पृथ्वींत )। रिगोनियां ॥ ४०१ ॥ गगनीं मी पांडुसुता । चंद्राचेनिमिसें अमृता । भरला झालों चालतां । सरोवर ॥ ४०२ ॥” त्या चंद्रापासून शीत किरणांचे अपार ओघ पसरून ‘ सर्वौषधींचें आगर’ मीच भरित असतो व तेथून सकळ धान्यजातींचा सुकाळ करून अन्नद्वारां जीवांचें भरण मीच करितों. भूतांच्या पोटांत अन्नरस गेल्यावरही तेथें क्षुधा पेटवून तें पचविणाराही मीच आहेः ‘आणि निपजविलें अन्न । तरी तैसें कैंचें दीपन । जेणें जिरूनि समाधान । भोगिती जीव ॥ ४०६ ॥ म्हणौनि प्राणिजातांच्या घटीं । करूनि कंदावरी आगिटी ( नाभिस्थानावर शेगडी पेटवून )। दीप्ति जठरींही किरीटी । मीचि जालों ॥ ४०७ ॥ प्राणापानांच्या जोडभातीं । फुंकफुंकोनियां अहोरातीं । आटीतसे नेणों किती । उदरामाजीं ॥ ४०८ ॥ शुष्कें अथवा स्निग्धें । सुपक्कें कां विदग्धें । परी मीचि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ॥ ४०९ ॥–एवं मीचि आघवे जन । जना निरवितें मीचि जीवन । जीवनीं मुख्य साधन । वन्हिही मीचि ॥ ४१० ॥’ तात्पर्य माझ्या व्यापकपणाची नवलाई कोठवर सांगूं? ‘ येथ दुजें नाहींचि-घेईं । सर्वत्र मी गा. ’ असें आहे तर कांहीं जीव सुखी व कांहीं दुःखी कां दिसतात असें विचारशील तर यावर उत्तर असें आहे ‘ अवघा मीचि असे । येथ कीर नाहीं अनारिसें ’ पण प्राण्यांच्या बुद्धीसारखा मी वेगवेगळा भासतों. उदाहरणः आकाशध्वनि एकच असून निरनिराळया वाद्यांवर निरनिराळे ध्वनि उमटतात ! सूर्य एक पण हजार तऱ्हेनें तो हजारांच्या उपयोगाला जातो. एकच पाणी बीजधर्मानुरूप वेगवेगळया वृक्षवेली व फुलेंफळें निर्माण करितें; नीलमण्यांचा हार पाहून एक सुखावतो व एक त्याला सर्प मानून भयभीत होतो, फार काय स्वातीचें उदक शुक्तींत मोतीं बनतें व सर्पांत विष होतें-‘ तैसा सज्ञानासी मी सुख । दुःख तों अज्ञानासी !’ सर्वांच्या हृदयांत ‘अहं’-मी अमुक आहें, अशा प्रकारचें अह-

र्निश बुद्धिस्फुरण होत असतें तें माझें ( परमात्म्याचेंच ) स्वरूप आहे आणि सत्संगतीनें, योगज्ञानाच्या अभ्यासानें व गुरुकृपेनें तें ‘ अहं ’ आत्मरूपीं विश्राम पावतें ही स्मृति देणाराही मीच आहें ! ‘ ते आपोआप देखोनि देखीं । मियां आत्मेनि सदासुखी । येथें मी वांचून अवलोकीं । आन हेतु असे ? ’ ॥ ४२४ ॥. सूर्योदय झाल्यावर सूर्यानें सूर्यच पाहवा ‘ तेवीं मातें-मियां जाणावया । मीचि हेतु ! ’ बरें आत्मस्मरण देणारा जसा मी आत्मा तसा संसारांत अज्ञानानें गुरफटून राहणाऱ्या जीवांची जी आत्मविस्मृति तीही मजमुळेंच होय ! ‘ ना शरीरपरातें सेवितां । संसारगौरवचि ऐकतां । देहीं जयांची अहंता । बुडोनि ठेली ॥ ४२६ ॥ ते स्वर्गसंसारालागीं । धांवतां कर्ममार्गीं । दुःखाच्या सेलभागीं । विभागी होती ॥ ४२७ ॥ ’ पण हेंही मजपासूनच ! म्हणजे जीवांना संसारीं ठेवण्यास किंवा संसारांतून सोडविण्यास कारण जी विस्मृति व स्मृति– अज्ञान व ज्ञान–हे दोन्ही मजपासूनच होत ! जशा जागेपणावरच स्वप्ननिद्रा उठतात त्याप्रमाणें ज्ञानावरच अज्ञानाची उभारणी होते ! आकाशांत अभ्रें आलीं व दिवस हरपला, पण हें दिवसामुळेंच कळून आलें ! त्याप्रमाणें मला न जाणून भूतें माझ्या सत्तेनेंच विषय पहात असतात ! ‘ एवं निद्रा कां जागणिया । प्रबोधचि हेतु धनंजया । तेवीं ज्ञाना अज्ञाना जीवांचिया । मीचि मूळ ’ ॥ ४३० ॥ म्हणोन मी जसा आहे तसें मला जाणणें याचें नांव जाणणें होय ! असो-वेद मी, वेदकर्ता मी व वेदवेत्ता मीच आहे. मजवांचून दुसरें कांहींच नाहीं. ‘ आपुलें अद्वयपण । मी जाणतसे दुजेनविण । तयाही बोधा कारण । जाणता मीचि ’ ॥ ४३८ ॥ तात्पर्य ‘ समूळ अविद्या खाये । तें ज्ञानही जैं बुडोनि जाये । तऱ्ही नाहीं कीर नोहे । आणि न साहे असणेंही ’ ॥ ४४० ॥ अशी निरुपाधिक सहजस्थिति तें माझें शुद्ध स्वरूप होय.

( अ. १५ ओवी ३७७ ते ४४२ )

## १५ पुरुषोत्तमाची भक्ति.

क्षराक्षरातीत उत्तम पुरुष किंवा पुरुषोत्तम हाच. देह मी हें अज्ञान, ब्रह्म मी हें ज्ञान व दोन्ही जाऊन उरतें तें शुद्धज्ञान. 'वन्हि काष्ठ जाळूनियां स्वयें जळे' त्याप्रमाणें ज्ञान हें अज्ञान घालवितें व हें वृत्तिसहित ज्ञानही जाऊन वृत्तिसाक्षित्वविरहित जें उरतें तें शुद्ध चैतन्य. 'अज्ञान ज्ञानें नेलें। आपणही वस्तु देऊन गेलें। ऐसें जाणणेनिविण (वृत्तिज्ञानावांचून) उरलें। जाणतें जें'–तें गा तो उत्तम पुरुष, त्यालाच परमात्मा म्हणतात. प्रकाश्यप्रकाशक, अलंकारसुवर्ण, जलतरंग ह्या दृष्टांतांवरून तोच दोन्ही असून दोन्हींहून वेगळा आहे. तेथें 'एकपण ना दुजें। असें नाहीं हें नेणिजे'–'काय बहु बोलों जया। नाहीं दुजें' 'यो मामेवं जानाति...स सर्ववित् मां भजति'–असें मला यथार्थ जाणणें म्हणजेच माझी भक्ति करणें होय. ज्ञान आणि भक्ति एकरूप आहेत. जागृतीस आल्यावर स्वप्न नाहींसें होतें त्याप्रमाणें ह्या शुद्धज्ञानानंतर स्फुरतें त्रिभुवन असून नाहींसें होतें! माळ हातीं आल्यावर सर्पाभास मावळतो व भयत्रासही जातात. 'लेणें सोनेंचि जो जाणे। तो लेणेपण तें वाव ह्मणे। तेवीं मी जाणोनि जेणें। वाळिला भेद' ॥ ५६२ ॥ अलंकार हे तत्वतः सोनेंच आहे असें जो जाणतो त्याची दृष्टि अलंकारपणाची उरत नाहीं; त्याप्रमाणें सर्व मी हें जाणल्यावर जगपणाची दृष्टि मावळून सर्वत्र सकळ स्वतःसिद्ध सच्चिदानंद मी आहे हा बोध मात्र उरतो, अथवा हेंही म्हणणें व्यर्थ आहे; कां कीं 'तया सर्वत्र उरलें। द्वैत नाहीं.' माझें ज्ञान तो व भजनही तोच. गगनानें गगनाला आलिंगावें, क्षीरसागरानें क्षीरसागराला पाहुणचार करावा, अमृत होऊन अमृतांत मिळावें, 'साडेपंधरां मिसळावें। तें साडेपंधरेंचि होआवें। तेवीं मी जालियां संभवे। भक्ति माझी ॥ ५६७ ॥ मी न होतां माझी भक्तिच होणें नाहीं. (अ. १५ ओवी ५२६ ते ५७०)

## १६ कर्माची हातवटी.

अठरावा अध्याय हा गीतेचा 'कलशाध्याय' होय. 'हे एकाध्यायी गीताचि आहे.' हा 'अष्टादश विवरी साद्यंत गीता ! फळत्यागपूर्वक

कर्म केलें तर तें बंधाला कारण होत नाहीं. यज्ञदानतपादि कर्में चित्त-शुद्धिकर असल्यामुळें त्यांचा त्याग उचित नाहीं. ‘ नाव थडी न पवतां। न सांडिजे केळी न फळतां। कां ठेविलें न दिसतां। दीप जैसा॥ तैसें आत्मज्ञानाविखीं। जंव निश्चिती नाहीं निकी। तंव नोहावे यागादिकीं उदासीन ’–इतकेंच काय पण स्वाधिकारानुरूप हीं कर्में अधिकच साक्षेपानें केलीं पाहिजेत. बसण्यासाठीं वेगानें चालावें, तशी स्वरूपीं स्थिर-बुद्धि होण्यासाठीं कर्माचरण आस्थेनें करावें. स्वधर्माचरणानें सत्वशुद्धि होते. कर्मानेंच कर्मबंधापासून सुटका होते–‘कर्मेंचि कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पंडुसुता. ’ कर्तृत्वाहंकार व फलाशा सोडून विहित कर्में केलीं असतां तीं मोक्षालाच कारण होतात. ‘ म्हणोनि फळीं लाग। सांडोनि देहसंग। कर्में करावीं हा चांग। निरोप माझा! ’ कर्मद्वेषानें कर्म सांडणें म्हणजे अर्धशिशीनें डोकें दुखतें म्हणून डोकें कापून टाकण्यासारखें तामसपणाचें आहे! कायक्लेश होतो म्हणून कर्म टाकणें हा राजस त्याग होय. सात्विक त्याग हाच खरा त्याग होय. ‘स्वाधिकाराचेनि नांवें। जें वाटिया आलें स्वभावें। तें आचरे विधिगौरवें। शृंगारोनी ’–वर्णाश्रमधर्मानुरूप आपल्या भागाला आलेलें कर्म शास्त्राज्ञेप्रमाणें आदर-पूर्वक आचरणें व त्यांत कर्तृत्वाहंकार व फलाशा न ठेवणें हा सात्विक त्याग होय. आठोळी व साल टाकून फळाचा रस तेवढा घ्यावा! ‘कर्तृत्वाचा मद। आणि कर्मफळाचा आस्वाद। या दोहींचें नांव बंध। कर्माचा कीं’–पूर्व संचितानुरूप जीं बरींवाईट कर्में करणें शास्त्रतः प्राप्त आहे त्याविषयीं सुखदुःख न मानतां व त्याविषयीं द्वेष किंवा आसक्ति न ठेवतां ईश्वरार्पणबुद्धीनें कर्में करावींत हाच कर्मयोग होय. हा मोक्षभुवनांत नेऊन सोडणारा आहे! याप्रकारें जे त्यागी उर्फ संन्यासी म्ह० ज्ञानी आहेत त्यांना कर्में करूनही कर्मबंध प्राप्त होत नाहीं. खरोखर कर्म आणि आत्मा यांचा संबंध पूर्वपश्चिमेसारखा आहे! ‘ फिटलिया निद्रेचा ठाव। कैचा स्वप्नासी प्रस्ताव? ’ आत्म्याच्या ठिकाणीं दिसणाऱ्या क्रियांचीं कारणें १ अधिष्ठान उर्फ देह २ कर्ता म्ह० जीव ३ करणें म्ह० इंद्रियें ४ पंचप्राणांच्या

हातून घडणाऱ्या विविध क्रिया व ५ दैव म्ह० चक्षुरादि इंद्रियांच्या ठिकाणचा देवतागण हीं पांच होत. असें असून जे असंस्कृत बुद्धीचे लोक कर्माचें कर्तृत्व आत्म्याकडे देतात ते आंधळे होत. अज्ञ मनुष्य प्रकृतीचें कार्य आत्म्यावर आरोपित करितो ! आत्मज्ञानी पुरुष ' कर्मामाजी असे । परी तयातें कर्म न स्पर्शे ' ' यस्यं नाहंकृतो भावो...न हन्ति न निबध्यते '–तो शुभाशुभ कर्मानें लिप्त होत नाहीं. अविद्येच्या निद्रेंत जो विश्वस्वप्नाचा अनुभव घेत होता त्याला महावाक्योपदेशानें गुरूनें थापटून जागे केलें त्याबरोबर ' तैसा विश्वस्वप्नेसी माया। नीद सांडोनि धनंजया। सहजेंचि चेइला। अद्वयानंदपणें तो ' (४०५) आत्मा कर्मातीत व सर्वकर्मसाक्षीभूत आहे.

ज्ञानी भक्ताच्या हातून कर्में घडतात पण तीं ज्या हातवटीनें घडतात ती हातवटी आपल्यापुढें असावी, कां कीं ' मुक्तातें निर्धारितां। लाभे आपुली मुक्तता'. मुक्त पुरुष ' कर्मीं असोनि कर्में। तो नागवे समविषमें'– तो कर्मांत असून त्याच्या चित्ताची समता ढळत नाहीं, म्हणून तो कर्में करीत असून कर्मबंधांत सांपडत नाहीं. ज्याच्या ठिकाणचा अहंभाव समूळ गेला आहे व ज्याची बुद्धि फलाशेनें आसक्त होत नाहीं त्यानें ह्या सर्व लोकांचा विध्वंस केला तरी त्याला मारण्याचें पाप लागत नाहीं, तो मारून मारीत नाहीं. मायेची निद्रा सोडून तो ' अद्वयानंदपणें ' जागा झाला असल्यामुळें त्याच्या ठायीं अहंतेचा लेश नसतो. ' आत्मत्वें वेष्टिला होये। तों जया जया दृश्यातें पाहे। तें दृश्य द्रष्टेपणेसीं होत जाये। तयाचेंचि रूप ' ॥ ४१०–॥ तो आत्मवान् पुरुष ज्या ज्या दृश्य पदार्थाकडे पाहत जातो तें तें आपणच होऊन जातो. विवेकानें तो सर्व कर्मांपासून आपलें वेगळेपण अनुभवीत असल्यामुळें कर्मांत असतांही तो त्यांत सांपडत नाहीं. ' पै मथुनि लोणी घेपे। तें मागुती ताकीं घापे। तरी तें लिप्तपणें सिंपे। तेणेसी काई ? ' ॥ ४१५ ॥ मंथन करुनि काढलेल्या लोण्याचा गोळा पुन्हां ताकांत घातला तरी ताकांत मिसळत नाहीं. दृश्य–द्रष्टा, वेद्य–वेदक हीं दोन्हीं जो

आपणच होऊन ठेला त्याच्या ठायीं मग अहंता कोठून असणार ? ' जें तेणें करावें । तों तेंचि आहे स्वभावें । मा कोणें कर्मीं वेष्टावें । कर्तेपणें ? ॥ ' ४२० ॥ तात्पर्य, आत्मवान् पुरुषाच्या ठायीं कर्तृत्वाहंकार नसल्यामुळें तो कोणत्याच कर्मानें लिंपत नाहीं. अहंकार गेला तरी पूर्वसंस्कारानुरूप प्रकृतिस्वभावानुसार ज्ञात्याकडून कर्में घडत असतात. अहंकार गेला कीं कर्म तत्क्षणीं थांबलें असें कांहीं होत नाहीं. वारा वाहून मग थांबला तरी कांहीं काळ वृक्षाच्या ठिकाणीं डोल उरतो, कापूर संपून गेला तरी करंड्यांत मागें वास उरतोच, गायन-समारंभ आटोपल्यावरही तंद्री कांहीं काळ टिकते, पाणी वाहून गेलें तरी जमिनींत ओल राहते, लक्ष्य भेदून गेल्यावरही अंगांतलें बळ बाकी आहे तोंवर बाण पुढें धांवतच असतो, ' नाना चक्रीं भांडें जालें । तें कुलालें परतें नेलें । परी भ्रमेचि तें मागिले । भोवंडिलेपणें ॥ ४२७ ॥ तैसा देहाभिमान गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया । जालें–तें अपैसया । चेष्टवीच ते ' ॥ ४२८ ॥ आतां कर्माचा लेप मात्र ज्ञात्याला लागत नाहीं, ' तया कर्मामाजी मग । संहरो आघवें जग । अथवा नवें चांग । अनुकरो ' ( रचो ) ॥ ४३२ ॥ आपल्या उदयाबरोबर कुमुद कोमेजतें व कमळ विकासतें ह्या गोष्टी सूर्य पाहत नाहीं. कोणी जगतात व कोणी मरतात, कोणाला लाभ होतो व कोणाची हानी होते, कोणी बुडतो व कोणी तरतो, ह्या गोष्टींचा विचारही आत्मवान् पुरुषाच्या मनाला स्पर्शत नाहीं. त्याचा स्वदेहाविषयीं आदर शून्य असतो, ' तो नेणे काय राहाटला । इंद्रियग्राम ! ' सुवर्णाची चंडिका, सुवर्णाचा शूळ व सुवर्णाचा महिषासूर यांत कर्ता कोण व घात कोणाचा कोणी केला ? ' मुक्ताचे देह तैसें । हाले चाले संस्कारवशें । तें देखोनि लोक पिसे । तो कर्ता ह्मणती ' ॥ ४४७ ॥ गंगा समुद्राला मिळाल्यावर जसा विटाळ उरत नाहीं तशी त्याची बुद्धि स्वस्वरूपाकार असल्यामुळें तिला कर्मजन्य पापपुण्याचा स्पर्श नाहीं. ' म्हणोनि कार्य कर्ता क्रिया । हें स्वरूपाचि जाहलें जया । नाहीं शरीरादिकीं तया । कर्मबंध ॥ ४५३ ॥ म्हणोनि आत्म-

याचें केवळ। जो रूपचि जाहला निखळ। तया नाहीं बंदिशाळ। कर्मांची हें "॥ ४५९॥ ( अ. १८ ओवी ३९५ ते ४६० )

## १७ ज्ञानभक्तीची पराकाष्ठा.

वैराग्यासारखा सखा जोडलेला असला म्हणजे ज्ञान, ध्यान, योग हे आत्मतत्वज्ञानीं प्रवेश करवून देण्यास समर्थ होतात;'म्हणोनि सवैराग्य। ज्ञानाभ्यास तो सभाग्य। करूनि जाला योग्य। आत्मलाभा '॥१०४६॥ वैराग्याचें वज्रकवच अंगावर घेऊन तो राजयोगतुरुंगावर आरूढ झाला म्हणजे देहाहंकार, विषयासक्ति, दर्प, काम, क्रोध व परिग्रह हे षड्वैरी ज्ञानखड्गानें पराजित करितो आणि निर्मम व शांत होत्साता ' ब्रह्मभूयाय कल्पते ' ह्म० आत्मसाक्षात्कारास पात्र होतो. ब्रह्मभावयोग्यता आलेला तो पुरुष आधीच आत्मबोधप्रसन्नतेनें स्वसुख चाखावयास लागतो ' तेव्हां आत्मत्वें शोचावें। कांहीं पावावया कामावें। हें सरलें समभावें। भरितें तया॥ १०९६ ॥ मग सर्व भूतांच्या ठायीं साम्यावस्था पावून तो ' मद्भक्तिं लभते पराम् '—पराभक्तीला प्राप्त होतो. 'जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरत जाय अवधारीं। मग तृप्तीच्या अवसरीं । नाहींच होय ॥ ११०२ ॥ ' त्याप्रमाणें तो बोधानें मजआंत मिसळला तेव्हां अबोध साद्यंत गेला. कल्पांताच्या वेळीं सरितासिंधूंच्या मर्यादा सुटून आब्रह्म जसें जळमय व्हावें ' तैसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाही सकट नाहीं। हें चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे ॥११११।' ही चौथी ज्ञानभक्ती होय. आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी ह्या पूर्वील तीन भक्तींच्या संबंधानें तिला ' चौथी ' भक्ति असें म्हणण्यांत आलें, ' येऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती । पै माझिये सहजस्थिति। भक्ति नाम '॥ १११३ ॥ हा माझ्या पराभक्तीचा प्रकाश ' स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें। विश्वाचें आहे नाहीं जेणें। प्रकाशे तैसें ॥ तसा हा सहज माझा। प्रकाश जो कपिध्वजा। तो भक्ति या बोजा। बोलिजे गा ' १११७ हीहि भक्ति आर्ताची आर्ती, जिज्ञासूचें जिज्ञास्य,

अर्थार्थीचा अर्थ अशी होती तेव्हां मला द्रष्ट्याला दृश्य करून दावीत होती. आतां त्या भक्तीची पौर्णिमा झाली तेव्हां 'सर्वत्र मीचि मियां। घेतपसे धनंजया' असें होऊन दृश्यद्रष्टा हे मावळले. **'इया ज्ञानभक्ती** सहज। भक्त एकवटला मज। तो मीचि केवळ हे तुज। श्रुतही आहे.' 'ज्ञानिया तो आत्मा माझा' हे सप्तमाध्यायीं मी बोललोंच आहे. ब्रह्मदेवाला सृष्टि उत्पन्न करण्याच्या पूर्वीं ही ज्ञानभक्ति मी ब्रह्मदेवाला 'चतुःश्लोकी' भागवतरूपानें सांगितली. 'ज्ञानी इयेते स्वसंवित्ति। शैव म्हणती शक्ति। आम्ही **परमभक्ति**। आपली म्हणों' ॥ ११३३ ॥–ज्ञानी हिला आत्मज्ञान म्हणतात, शैव शक्ति म्हणतात, आम्ही तिलाच आपली पराभक्ति म्हणतों! कर्मयोगी मजशीं जेव्हां ऐक्य पावतात तेव्हां त्यांना ही भक्ति प्राप्त होते. 'मज मिळतिये वेळीं'–विवेकवैराग्य, बंधमोक्ष, प्रवृत्तिनिवृत्ति इ० सर्वभेद लयाला जातात. भक्त तेव्हां साध्यसाधनातीत **मी होऊन मला भोगतो**, व तेथें भोगतेपणही उरत नाहीं, 'हें असो दर्पण नेलिया। तो मुखबोधही गेलिया। देखलेपण एकलेयां। आस्वादिजे जेवीं। चेइलिया स्वप्न नाशे। आपलें ऐक्यचि दिसे। तें दुजेनविण जैसें। भोगिजे कां ॥ ११४१ ॥–मी होऊन दुजेनविण मला भोगणें हें अनुभवावांचून काय समजायचें आहे? 'म्हणोनि मी होणें नाहीं। तया मीचि आहे केंही। मग भजेल हें कायी। बोलों कीर?' ॥ ११४६ ॥ ही पराभक्ति–ही अद्वैतभक्ति क्रियेविण आहे.

'तरंग सर्वांगीं तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठत (लोळत) जैसा ॥ ११४८॥ तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियावीण तो भजे। घनाकार कां सहजें। सोनयातें जेवीं॥ कां चंदनाची द्रुती तैसी। चंदनीं भजे अपैसी। कां अकृत्रिम शशीं। चंद्रिका ते ॥ तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें–नव्हे। बोला ऐसें' ॥ ११५१ ॥ आतां यापुढें पूर्वसंस्कारछंदानें तो जें कांहीं बोलतो त्याला मीच ओ देत असतों. बोलत्याला बोलता भेटला म्हणजे तें मौनच होय. येथें मौन हेंच माझें स्तवन

होय. बुद्धीनें किंवा दृष्टीनें तो पाहायला गेला कीं त्याचें देखणें-दृश्य दूर लोटून–द्रष्टाच होतें; मी होऊन तो दृश्य घेऊं गेला तर दृश्य नाहीं व द्रष्टाही नाहीं! ‘मग देखिजे ना न देखिजे । ऐसी जे दशा निपजे । तें तें दर्शन माझें । साचोकारें’ ॥ ११६३ ॥ त्याप्रमाणेंच ‘ सर्व मी जालेपणें । ठेलें तया येणें जाणें । तेंचि गा यात्रा करणें । अद्वया मज’ ॥ ११६८ ॥ जळावरचा तरंग कोठेंही कितीही धांवला, हवा तिकडे गेला, तरी जळ सोडून भूमीवर येत नाहीं व त्या तरंगाची एकात्मता मोडत नाहीं, तसा शरीरस्वभाववशें भक्त कांहींही करूं चालूं बोलूं लागला तरी ‘ मीचि तेणें मिषें । भेटे तया’– ‘ तेथ कर्म आणि कर्ता । हें जाऊनि पांडुसुता । मियां आत्मेनि मज पाहतां । मीचि होय ॥ ११७४ ॥ एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन । अद्वया मज गमन । तो चाले तेंचि ॥ ११८० ॥ तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जप माझा । तो निजे तेचि कपिध्वजा । समाधि माझी ॥ ११८१ ॥ जैसा कनकेंसीं कांकणें । असिजे अनन्यपणें । तो भक्तियोगें येणें । मजसी तैसा ॥ ११८२ ॥ उदकीं कल्लोळ । कापुरीं परिमळ । रत्नीं उजाळ । अनन्य तैसा ॥ ११८३ ॥’ या अद्वैतभक्तीनें युक्त होत्साता तो दृश्यजातीं मला द्रष्टचालाच जाणतो, पाहतो व भोगतो. जें कांहीं आहे नाहीं त्यानें होणाऱ्या ज्ञेयस्फूर्तीनें ‘ तें ज्ञाताचि मी हे प्रतीति । होऊनि भोगी’ ॥ ११९२ ॥ ‘ जाणे अज मी अजर । अक्षय मी अक्षर । अपूर्व मी अपार । आनंद मी ॥ अचळ मी अच्युत । अनंत मी अद्वैत । आद्य मी अव्यक्त । व्यक्तही मी ॥ ईश्य मी ईश्वर । अनादि मी अमर । अभय मी आधार । आधेय मी’ ॥ ११९५ ॥ सर्व मी, सर्वगत मी, सर्वातीत मी, व्याप्त मी, व्यापक मी, पुरुषोत्तम मी, ‘ऐसा आत्मतें मज एकातें । इया अद्वैतभक्ती जाणोनि निरुतें । आणि याही बोधा जाणतें । तेंही मीचि जाणे ॥ १२०० ॥ मग द्वैताद्वैतातीत । मीचि आत्मा एक निश्रांत । हें जाणोनि जाणणें जेथ । अनुभवीं रिघे ॥ १२०५ ॥ मी तो हें जें असे ।

तें स्वानंदानुभवसमरसें। कालवूनियां प्रवेशे। मजचिमाजी ॥ १२०९॥ आणि तो हे भाष जेथ जाय। तेथ मी हे कोण्हासी आहे?। ऐसा मी ना तो तिये सामाये। माझ्याचि रूपीं ॥ १२१० ॥' कापूर जळून गेला याचाच अर्थ अग्नि नाहींसा झाला, आणि कापूर व अग्नि दोन्ही नाहींसे झाल्यावर उभयातीत आकाशच उरतें, त्याप्रमाणें 'आहे नाहीं' जाऊन शेवटीं मीच उरतों; मग तेथ ब्रह्म, आत्मा, ईश या नांवांतही स्वारस्य राहत नाहीं. न बोलणेंही न बोलून तोंडभर बोललें जातें, तसें जाणीवनेणीव न जाणून जाणलें जातें. 'तेथ बुझिजे बोध बोधें। आनंद घेपे आनंदें। सुखवरी नुसधें। सुखचि भोगिजे' ॥ १११५ ॥

## १८ खरी शरणागति.

( आतां यावर सांगायचें कांहीं उरलेंच नाहीं, तथापि सर्व गीतेचा निष्कर्ष अखेर ५६ ते ६७ ह्या ११ श्लोकांत सांगतात ). कायावाचा-मनानें माझा आश्रय घेणारा जीव स्वधर्मोचित कर्में करून माझ्या प्रसादाला पात्र होतो व मत्प्रसादानें शाश्वत व अव्यय पद पावतो. 'बुद्धी वाचा कायें। जो मातें आश्रयूनि ठाये' तो माझ्या प्रसादानें 'देशें काळें स्वभावें। वेंच जया न संभवे। तें पद माझें पावे। अविनाश तो ॥ १२५८॥ याकारणें गा तुवां इया। सर्व कर्मा आपुलिया। माझ्या स्वरूपीं धनंजया संन्यास कीजे ॥ १२६० ॥' पण अर्जुना! आपल्या नित्यकर्माचा मात्र त्याग करूं नकोस, विवेकबळानें आपणाला कर्मावेगळे पहा व बुद्धि आत्मनिष्ठ कर, 'चित्त माझ्या ठायीं जडेल' असें आधी कर. 'मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियांचि भरेल जेव्हां। माझा प्रसाद जाण तेव्हां। संपूर्ण जाहला ॥ १२६० ॥ माझ्या प्रसादानें मग सर्व आपत्तीं-तून तूं अनायासें तरून जाशील, जन्ममरणाएवढें महत्संकटही दूर होईल. आणि अहंकाराला वश होऊन माझें हें बोलणें मनावर घेणार नाहींस तर तूं नाश पावशील म्ह० तूं नित्यमुक्त, अव्यय आहेस हें जाऊन ज्या देहसंबंधांत प्रतिपदीं आत्मघात आहे त्या देहा-

हंकारांत पडशील ! ही देहबुद्धि म्हणजे मरणापेक्षां मरण आहे. देहा-हंकारानें ' मी अर्जुन हे आत्मिक । ययां वध करणें हें पातक ' असें कांहीं मनांत आणशील तर तेंही व्यर्थ जाईल, कां कीं ' प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति '– तुझा प्रकृतिसिद्ध क्षात्रस्वभाव प्रबळ होऊन तुला झुंजवायला लावीलच लावील. क्षात्रसंस्कारसिद्ध अशा स्वभावज कर्मानें तूं बांधलेला असल्यामुळें मोहानें जें तूं करूं इच्छित नाहींस तें तूं आपल्या प्रकृतीला वश होऊन करशीलच करशील ! पाणी पूर्वेकडे वाहत असतांना पश्चिमेकडे पोहत जातां येईल काय ? साळीचा कण मी साळीपणानें उगवणार नाहीं असें म्हणेल तर तें टिकेल काय ! ' तैसा क्षात्र-संस्कारसिद्धा । प्रकृती घडलासी प्रबुद्धा ' ती तुला उठवीलच. ' शौर्य, तेज दक्षता ' हे तुझे सहज क्षात्रधर्म आहेत त्यांना सोडून तुला वागतांच येणार नाहीं. गोग्रहणप्रसंगाचें स्मरण कर. उत्तर युद्धांतून पळत असतां तूं त्याचा सारथी होतास. तुला युद्ध करायचें काय कारण होतें ? ' उत्तर वैराटीचा राजा । पळतां तूं कां निघालासि झुंजा ? । हा क्षात्रस्वभाव तुझा । झुंजवील तुज' ॥ १२९५ ॥ अदृष्ट बळवान् आहे व तेंही ईश्वराधीन असल्यामुळें निराळें कांहीं करणार नाहीं व तो ईश्वरही तुझ्या हृदयांत आहे. सर्वभूतांच्या हृदयीं स्फुरणारा समष्टिरूप अहंकार पांघरून व आपल्या मायेचा पडदा पुढें लावून तो एकाकी समर्थ असा ईश्वर ८४ लक्ष योनिरूप छायाचित्रें नाचवींत असतो. ब्रम्हदेवापासून कीटांपर्यंत सर्व भूतांना प्रत्येकाची योग्यता पाहून तो तसतसे देहाकार देत असतो. जो देहाकार ज्या प्राण्यापुढें अनुरूपपणें म्ह० योग्यतेनुसार उभा राहतो त्या देहाकारावर तो प्राणी ' हा देहच मी ' अशा अभिमानानें आरूढ होतो. ' जें देह जयापुढें । अनुरूपपणें मांडे । तें भूत तया आरूढे । हें मी म्हणौनी ' ॥ १३०५ ॥ आपल्या प्रतिबिंबालाच बालक जसा तेंच मी असें समजतो, त्याप्रमाणें अज्ञ जीव देहालाच मी म्हणतो. याप्रमाणें देहाकाररूपी यंत्रावर जीवांना चढवून ईश्वर सर्वांच्या प्रारब्धकर्माचें सूत्र हालवीत असतो. तेव्हां ज्या प्राण्याला जें स्वतंत्र प्रारब्धकर्मरूप मांडून

ठेवलें असतें त्या गतीला तो पात्र होत असतो: ‘तेथ जया जें कर्मसूत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र। तें तिये गती पात्र। होचि लागे’ ॥ १३०९॥ लोहचुंबकाच्या योगानें लोखंडाचे खिळे अगर सुया फिरूं लागतात ‘तैसीं ईश्वरसत्तायोगें। चेष्टती भूतें.’ चंद्राच्या सन्निधानांत समुद्राला भरतें येतें, चंद्रकांताला पाझर फुटतो, कुमुदें विकसतात व चकोरांचा संकोच दूर होतो; याप्रमाणें समुद्रादिकांच्या ठिकाणीं भिन्नभिन्न व्यापार सुरू होतात, त्याप्रमाणेंच बीजरूप बनलेल्या प्रकृतीच्या अनुरोधानें एकटा ईश्वर सर्वभूतांना चेष्टवितो आणि तो तुझ्या हृदयांत आहे:—‘ तैसी बीजप्रकृतिवशें। अनेकें भूतें एकें ईशें। चेष्टविजती तो असे। तुझ्या हृदयीं॥१३१४॥’ प्रत्यक्षच सांगायचें म्हणजे ‘ अर्जुनपण न घेतां। मी ऐसें जें पांडुसुता। उठतसें तें तत्वतां। तयाचें रूप’ ॥ १३१५ ॥ तो ईश प्रकृतीला प्रवृत्त करील व प्रकृति तुला युद्ध करायला लावील, म्हणून ‘ तूं करणें न करणें दोन्ही। लावूनि प्रकृतीच्या मानीं। प्रकृती कां अधीनीं। हृदयस्था जया’—करणें न करणें दोन्हीं प्रकृतींच्या माथीं मारून ती प्रकृतीहि ज्याच्या आधीन आहे त्या ईश्वराला अहंवाचाचित्तदेह सर्व अर्पण करून सर्व भावानें शरण जा ‘ तया अहं वाचा चित्त आंग। देऊनियां शरण रिघ। महोदधी कां गांग ( गंगेचे ओघ )। रिगालें जैसें ॥ १३१९ ॥ ह्या शरणागतीनें काय होईल ? ‘ मग तयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदे। कांत होऊनियां स्वानंदें। स्वरूपींच रमशी’ ॥ १३२० ॥—शांतिरूपप्रमदेचा स्वामी होऊन तूं स्वस्वरूपीं रमशील.

## १९ परमरहस्य.

‘ ईश्वर: सर्व भूतानां’ व ‘ तमेव शरणं गच्छ’ ह्या दोन श्लोकांत भगवंतांनीं ‘गुह्याद्गुह्यतर’ असें ज्ञान—असा हा ‘ गुप्त ठेवा’—अर्जुनाच्या स्वाधीन केला, आतां शेवटचा गोड घांस देऊन भगवान् हें गीत पुरें करितात. तोच सिद्धांत ‘ भूय: ’ म्ह० पुन्हां एकदां सांगतात. ‘ **सर्वगुह्यतमं** ’ म्हणून गीतेचें सारसर्वस्व भगवंतांनीं ‘ मन्मना भव ’ व ‘ सर्व

धर्मान् परित्यज्य ' ह्या शेवटच्या दोन श्लोकांत सांगितलें आहे. त्यावर ज्ञानेश्वरांचें भाष्य म्हणजे गीताज्ञानेश्वरीचा शेवटचा गोड घांस होय. रहस्यांतलें रहस्य त्यांनीं येथें सांगितलें आहे. तें आतां ' अवधान पघळ (विशाळ) करून ' ऐकावें. ' द्वैताची वारी ' म्ह० येरझार संपवून हें रहस्य ऐक्याच्या घरांत भोगायचें आहे. निरुपचार प्रेमाचा विषय, हें प्रियोत्तमा अर्जुना! दुसरा कोणी नसून आत्माच आहे: 'निरुपचारा प्रेमा। विषो होय जें प्रियोत्तमा। तें दुजें नव्हे कीं आत्मा। ऐसेंचि जाणावें ' ॥ १३४६ ॥ म्हणून माझ्या अगदीं जिव्हारीची गोष्ट मी माझ्या जीवाला (तुला) सांगत आहे! आरशांत आपण आपलें तोंड आपल्याच सुखासाठीं पाहत असतों. तुझ्या माझ्यांत आतां मीतूंपण राहिलें नाहीं. मला अनन्य-गतींचें ( एकनिष्ठप्रेमाचें ) व्यसन आहे. तूं तसा माझ्याशीं अनन्य झाला आहेस म्हणून जें गुह्य पावलें असतां सारीं गुह्यें उकलतात असें परमगुह्य मी तुला सांगतों. आपल्या सर्व अंतर्बाह्य व्यापारांचा तूं मला म्ह० माझ्या व्यापक स्वरूपाला एकच एक विषय कर. तूं आपलें मन माझें एकायतन कर, कान माझ्या गुणश्रवणानें भरून टाक. आत्मज्ञानानें पावन झालेले संत हीं माझीं साक्षात् रूपें आहेत म्हणून संतांकडे—कामुकाची वल्लभेवर असते तशी-एकांतिक प्रेमाची दृष्टि ठेव, ' आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रूपडीं। तेथ दृष्टि पडो आवडी। कामिनी जैशी ' ॥ १३५६ ॥ सर्व विश्वाचें निवासस्थान जो मी त्या माझीं मधुरनामें गावयाचें वाचेला व्यसन लाव, सर्व इंद्रियांना माझ्या प्रेमाचा चाळा लाव, ' हातांचें करणें । कां पायांचें चालणें । तें होय मजकारणें तैसें करी ॥ १३५८ ॥ हें एकेक शिकवूं काई। पै सेवकें आपुल्या ठायीं। उरवूनि येर सर्वही। मी सेव्यचि करीं ' ॥ १३६० ॥- आपल्या ठिकाणीं सेवकपण तेवढें ठेवून सर्व जग मद्रूप पहा, ' मग भर-लेल्या जगाआंत। जाऊनि तिजयाची मात। होऊनि ठायील एकांत। तुम्हां आम्हां ' ॥ १३६२ ॥ मत्स्वरूपानें भरलेल्या जगांत तिसऱ्याची गोष्ट न राहतां जगत्कल्पना जाऊन तूं म्हणजे मीच आहेस

असें जाणून तूं मला पावशील. ' तेव्हां भलतिये अवस्थे। मी तूतें तूं मातें। भोगिसी ऐसें आइतें। वाढेल सुख '॥ १३६३॥ तूं व मी हें द्वैत देहोपाधिमुळें भासतें, म्हणून देहविसरांत तूं मत्स्वरूपच होशील, ' म्हणौनि तूं आणि आम्ही। हें दिसताहे देहधर्मी। मग ययाच्या विरामीं। मीचि होशी '॥ १३६७॥ अर्जुना! काय सांगूं? असें तुझें प्रेम मला हें बोलवीत आहे. तुझ्या प्रेमवशतेमुळें मीं देवपणाचीं बिरुदें सांडलीं असून मी अर्धा म्ह० जवळजवळ जीव झालों आहे व तुझ्यासगट मात्र परिपूर्ण आहे:–' अर्जुना! तुझेनि वेधें। मियां देवपणाचीं बिरुदें। सांडिलीं गा मी हें आधें। सगळेनि तुवां '॥ १३७२॥ सांगायचें तात्पर्य हें कीं, ' सर्वत्र मातें भजतां। सर्व मी होतां–अहंता। निःशेष जाऊनि तत्त्वतां। मीचि होसी '॥ १३८१॥ वस्तुमात्राच्या ठिकाणीं मला भजलें असतां व सर्व मत्स्वरूप होतां देहाहंता निःशेष जाऊन मग तूं खरोखर मीच होशील. कायावाचामनानें होणारीं सर्व कर्मे मदर्पण झालीं कीं तुला माझी प्रसन्नता लाभेल व मत्प्रसादानें तूं मत्स्वरूप होऊन ज्ञानाची पूर्तता होईल. ज्या ज्ञानाच्या योगानें सप्रपंच अज्ञान जाऊन एकीएक जो मी तो गोचर होतो तें गीतारूप ज्ञान विविध उपपत्तींच्या उपायांसह मी तुला सांगितलें; ' जें सप्रपंच अज्ञान जाये। जेणें एक मी गोचर होये। तें उपपत्तीचेनि उपायें। गीतारूप हें '॥ १३८८॥ ह्या ज्ञानाच्या योगानें धर्माधर्मांच्या कल्पना प्रसविणारें मूळ अज्ञान टाकून दे व मज एकाला शरण ये म्ह० मजशीं अनन्य हो. आशा जशी दुःखांना प्रसवते, किंवा निंदा पापाला व दुर्भाग्य दैन्याला जन्म देतें त्याप्रमाणें स्वर्गनरकादि कल्पनांना प्रसविणारें जें धर्माधर्मादिक त्या धर्माधर्मांचें मूळ जें अज्ञान तें ह्या ज्ञानानें नाहींसें करून टाक. हातीं दोर घेऊन त्या दोरावर भासलेली सर्पकल्पना जशी टाकून द्यावी किंवा निद्रात्यागानें स्वप्नीचा प्रपंच टाकावा, त्याप्रमाणें धर्माधर्मांचें बंड उभें करणारें जें मूळ अज्ञान त्या अज्ञानाचा त्याग करून तूं धर्माधर्म सोडून दे. मग निद्रेसगट स्वप्न गेलें असतां जसें आपलें आपणच उरतों, त्याप्रमाणें मूळ अज्ञान गेल्यावर

‘ मीच एक असे अपैसया ’ त्या मज एकाला तूं शरण ये. ‘ मामेकं शरणं व्रज ’ शरणागति कोणती व कशी ? ‘ तैसा मी एकवांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥ १३९७ ॥ पै आपुलेनि भेदेवीण । माझें जाणणें जें एकपण । तयाचिं नांव शरण । मज येणें गा ’ ॥ १३९८ ॥–मज एकावांचून दुसरें कांहींच नाहीं अशा माझ्या ‘ एकजिनसी ’ स्वरूपीं सोहंभावानें अनन्य हो म्ह० मिळून समरस होऊन जा. सुवर्णमणि आंतल्या सुवर्ण-तंतूला किंवा तरंग पाण्याला जसा शरण येतो म्हणजे ऐक्यत्व पावतो तसा तूं मला शरण ये म्ह० मजशीं समरस हो; ‘ सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळ जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ’ ॥ १४०० ॥ मला शरण यायचें आणि पुन्हां जीवपणाचें दारिद्र्य भोगीत राहायचें–छे ! ही भाषा सुद्धां बोलूं नकोसः ‘ मजही शरण रिघिजे । आणि जीवत्वोंचि असिजे ? । धिक् बोलीं इया न लज्जे । प्रज्ञा केवीं ? ’ ॥ १४०२ ॥ पहा बरें ! एखाद्या सामान्य राजानें अंगिकारलेलें बटकूर सुद्धां राजाशीं समसत्ताक होतें मग मी विश्वनाथ भेटल्यावर जीवग्रंथि सुटणार नाहीं असे अमंगळ शब्दही तोंडावाटे काढूं नकोसः ‘ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया । तें दासिरूंही कीं तया । समान पावे ॥ १४०३ ॥ मा मी विश्वेश्वर भेटे । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोल नको वोखटे । कानीं लाऊं ! ’ ॥ १४०४ ॥ तात्पर्य, ‘ मी होऊनि मातें । सेवणें आहे आयिते ’ ( ‘शिवो भूत्वा शिवं यजेत् ’)–मी होऊन माझी सेवाभक्ति करणें ही अद्वैतभक्ति किंवा सहजभक्ति ह्या ज्ञानानें हस्तगत कर. मग ताकांतून काढलेलें लोणी पुन्हा ताकांत घातलें तरी त्यांत मिसळत नाहीं: ‘मग ताकौनियां काढिलें। लोणी माघौतें ताकीं घातलें । परि न घेपेचि कांहीं केलें । तेणें जेवीं’–‘तैसें अद्वयत्वें मज । शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥ १४०७’ ॥ ह्या अद्वयभक्तीच्या योगें तूं सकल अज्ञानापासून मुक्त होशील. लोखंड परि-साला लागून सोनें झाल्यावर मग पुन्हां त्यावर गंज किंवा तांब चढत

नाहीं, किंवा जागे झाल्यावर स्वप्नभ्रम उरत नाहीं, ‘ तैसें मजसीं एकवट-लेया । मी सर्वरूप वांचूनियां । आन कांहीं उरावया । कारण असे ? ’ ॥ १४११ ॥ सर्व बंधरूप द्वैतपणाचें पाप मग उरणारच नाहीं. मिठाचा खडा पाण्यांत पडतांच विरून जातो म्ह० वेगळेपणानें न राहतां जळरूप होतो, तसा अर्जुना ! अनन्य शरण आलेल्या तुला सर्वत्र मीच होईन.

* * * *

हें कोण बोललें ? अद्वैतभक्तीचें हें परमदिव्य व्याख्यान कोणी केलें ? ‘ ऐसें सर्वरूपरूपसें । सर्वद्दष्टिडोळसें । सर्वदेशनिवासें । बोलिलें श्रीकृष्णें ’ ॥ १४१७ ॥ सर्व सौंदर्याचें सौंदर्य, सर्व डोळ्यांचा डोळा, असे सर्वदेशनिवासी भगवान् श्रीकृष्ण यांच्या दिव्यवाणींतून हें गीतामृत स्रवलें व ज्या परमभक्त अर्जुनाच्या प्रेमास्तव हें स्रवलें त्याला देवांनीं दृढा-लिंगन दिलें, ‘ स्रग सांवळा सकंकण । बाहु पसरोनि दक्षिण । आलिंगिला स्वशरण । भक्तराज तो ’ ॥ १४१८ ॥ वाचेनें बोलतां येण्याजोगें होतें तें सर्व भगवान् गीतेंत बोलले व भक्ताच्या बुद्धीला आकळतां आलें तें सर्व त्यानें आकळलें, पण बोलाबुद्धीला अगम्य असें जें कांहीं एक उरलें होतें तें देण्यासाठीं भगवंतांनीं आलिंगनाचें मिष केलें:—‘ ऐसें जें कांहीं एक । बोलाबुद्धीसी अटक । तें द्यावया मिख । खेंवाचें । केलें ॥ ’ ॥ १४२० ॥ त्याबरोबर ‘ हृदया हृदय येक जाहलें । ये हृदयींचें तें हृदयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणांऐसें अर्जुना ’ ॥ १४२१ ॥ ‘दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंग तो जाला । द्वैत न मोडितां केला । आपणपें पार्थ ’ ॥ १४२२ ॥—हृदयाला हृदय मिळालें, देवांनीं आपल्या हृदयांतलें ऐक्यप्रेम अर्जुनाच्या हृदयांत घातलें, द्वैत न मोडतां देवभक्त किंवा गुरुशिष्य हें नातें बिघडूं न देतां म्ह० अर्जुनाचें अर्जुनपण ( पुढील कार्यासाठीं कायम ठेवून ) देवांनीं त्याला आपल्यांत मिळवून घेतलें. दिव्यानें दिवा लावावा तशा प्रकारची ती देवाभक्तांची मिठी होती. अर्जुनपण कायम ठेवून देवांनीं त्याला कृष्णपण दिलें. तेव्हां अर्जुनाला जो महासुखाचा पूर आला त्यांत एवढे मोठे देव पण तेही बुडून गेले ! ‘ तयां

दोघांचें मिळणें। दोघां नावरे, जाणावें कवणें। किंबहुना श्रीनारायणें। विश्व कोंदलें!'॥ १४२५॥ ( अ. १८ ओवी १३४६ ते १४२५ ).

अर्जुनाची पावती:—

**गुंतलों होतों अर्जुनगुणें। तो मुक्त झालों तुझेपणें।**
**आतां पुसणें सांगणें। दोन्ही नाहीं ॥ १५६२ ॥**

**जें मज तुह्मां आड। होतें भेदाचें कवाड।**
**तें फेडोनि केलें गोड। सेवासुख ॥ १५७४ ॥**

**तरी आतां तुझी आज्ञा। सकळदेवाधिदेवराज्ञा।**
**करीन, देयीं अनुज्ञा। भलतियेविषयीं ॥ १५७५ ॥**

## २० अमृतानुभव.

ज्ञानेश्वरींत अध्यात्माचे परमसिद्धांत थोडे आडपडद्यानें तरी सांगितले आहेत, कां कीं त्या ग्रंथांत गीतेच्या मर्यादेनें टीका करणें अवश्य होतें; पण असा कांहींच निर्बंध अमृतानुभवांत नसल्यामुळें व हा ग्रंथ सर्वस्वी स्वतंत्र असल्यामुळें यांत ज्ञानेश्वरांनीं आपल्या अनुभवाचें अमृत ओतलें आहे. ह्या ग्रंथाला त्यांनीं स्वतः ' अनुभवामृत ' असेंच नांव दिलें आहे, पण ह्याचें ' अमृतानुभव ' हें नांव लोकप्रसिद्ध आहे. तत्त्वज्ञानाच्या अत्युच्च पायरीवरचा हा ग्रंथ आहे. हा सिद्धानुवाद आहे. येथें बोल काय बोलेल ? ' **बोल निमे तें बोलणें। येथीचें.** ' शब्द जेथें मौनावतात तेथचें हें बोलणें आहे. ह्याच्या उंचीचा अध्यात्म-ग्रंथ संस्कृतांतही विरळाच. अमृतानुभव हा ज्ञानेश्वरांचा पूर्णोद्गार आहे. शिवशक्तींची एकरूपता, शब्दमंडण व शब्दखंडण, अविद्येचा ऊ० अज्ञानाचा उर्फ मायेचा निरास व शेवटीं ज्ञानाचाही निरास, जग चिद्विलास आहे हा सिद्धांत व आम्ही ज्ञानाज्ञानातीत आहोंत हा स्वानुभव हे विषय मोठ्या पंडितांच्याही आकलनाच्या पलीकडचे आहेत, तथापि हे अध्यात्म्याच्या हिमाचलशिखरावर आरूढ झालेल्यांना स्वसुखास्वाद देऊन तन्मय करितात यांत संदेह नाहीं. पूर्णबोधाची

ही वाणी आहे. ह्या ग्रंथावर शके १५५७ सालीं शिवकल्याण यांनीं ओवीबद्ध विस्तृत टीका केलेली प्रसिद्ध आहे. या टीकेचें नांव 'नित्यानंददीपिका' असें आहे. शिवकल्याण हे जोगाईच्या आंब्याचे राहणार असून मुक्ताबाईच्या परंपरेंतले व मुक्ताबाईपासून चौदावे पुरुष होते. ही दीपिका फार सुंदर आहे. एकनाथांनींही अमृतानुभवावर टीका केली असें ऐकण्यांत आहे पण ती अद्याप उपलब्ध झालेली नाहीं. शके १६२० च्या सुमारास पंढरपुरचे सत्पुरुष प्रल्हादबोवा बडवे यांनीं या ग्रंथाची संस्कृत समश्लोकी लिहिली असून तिच्या दोन हस्तलिखित प्रती मजजवळ आहेत. मराठी ग्रंथास संस्कृत पोषाख चढविल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. समर्थांच्या मनोबोधाचें संस्कृत भाषांतर प्रसिद्ध झालें असून मोरोपंताच्या केकावलीवरही संस्कृत टीका आहे.

सामान्य वाचकांना किंवा विद्वानांनाही हा ग्रंथ 'कठिण व नीरसही' वाटण्याचा संभव आहे, तथापि अध्यात्मरहस्य जाणणाऱ्यांना तो स्वसुखानें डोलविणारा आहे. ज्ञानेश्वरीप्रमाणेंच हा ग्रंथ भाषेच्या दृष्टीनें अत्यंत सुबोध असून काव्याच्या मनोहर भाषेनें व उपमादृष्टांतादिकांनीं नटलेला आहे. अत्युच्च तत्त्वज्ञान तर्कपद्धतीनें काव्याच्या अतिमनोहर भाषेंत व्यक्त करण्याचें ज्ञानेश्वरांचें सामर्थ्य केवळ अनन्यसाधारण आहे. तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा अपूर्व संयोग त्यांच्याशिवाय पृथ्वीवरच्या सर्व वाङ्मयांत कोणींही केलेला आढळणार नाहीं! **पहिल्या** प्रकरणांत शिवशक्तींचें ऐक्य, **दुसऱ्यांत** सद्गुरुस्तवन, **तिसऱ्यांत** आविद्यात्मक चारी वाणींच्या बंधांतून सुटल्यावरही विद्यात्मक वाणीचें जें बंधन उरतें त्याचा निरास होण्याचा उपाय, **चवथ्यांत** ज्ञानाज्ञानधर्मरहित आत्मभावाचा विकास, **पांचव्यांत** ज्ञानमात्र आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं सच्चिदानंदकल्पनेचा होत असलेला लय, **सहाव्यांत** शब्दमंडण व शब्दखंडण, **सातव्यांत** अज्ञानखंडणपूर्वक 'जग आघवी वस्तुप्रभा' किंवा 'जग चिद्विलास आहे' ह्या मुख्य सिद्धांताचें स्पष्टीकरण, **आठव्यांत** ज्ञानखंडण, **नवव्यांत** अभेदभक्ताचीं कर्में व **दहाव्यांत** ग्रंथमहिमावर्णनपूर्वक

उपसंहार इतक्या विषयांचें अमृतानुभवांत विवरण केलेलें आहे. आरंभींचे पांच संस्कृत श्लोक सोडून पाहिलें तर ह्या ग्रंथांत एकंदर ८०६ ओव्या आहेत. सर्वांत मोठें प्रकरण सातवें आहे, त्यांत २९५ ओव्या आहेत. ह्या ग्रंथाचा मुख्य सिद्धांत ह्याच प्रकरणांत सांगितला आहे.

पांच संस्कृत श्लोकांत श्रीगुरु जे निवृत्तिनाथ त्यांच्या शुद्धस्वरूपाचें वर्णन केलें आहे. अक्षर, अनाख्येय, आनंद, अव्यय अशा आत्मस्वरूपालाच श्रीमन्निवृत्तिनाथ अशी संज्ञा आहे. नित्य अपरोक्ष अशी शांकरी ( शंकरापासून जगाला मिळालेली किंवा कल्याणप्रद ) अशी जी ब्रह्मविद्या तीच गुरु ह्या नांवानें लोकांत प्रसिद्ध आहे.

पहिल्या दोन प्रकरणांचा प्रसंगानें अन्यत्र उल्लेख केला आहे. पहिल्या **प्रकरणांत** जगत्प्रक्रिया सांगतांना शिवशक्तींची एकात्मता दाखविली आहे व दुसऱ्यांत सद्गुरुस्वरूपाचें वर्णन केलें आहे. आतां तिसऱ्या प्रकरणापासून शेवटपर्यंत ह्या ग्रंथांत काय सांगितलें आहें तें आपण पाहूं.

**तिसऱ्या प्रकरणांत** परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी ह्या चारी वाणींपासून जरी सुटका झाली ह्म० अविद्येचें बंधन सुटलें तरी विद्येचें बंधन राहतें म्हणजे अविद्या ही अविद्यापणानें नाहींशी होऊन विद्यापणानें कशी राहते आणि ती अविद्येसारखीच शुद्ध आत्मभावास कशी बंधनकारक होते हें सांगितलें आहे. **‘ देहोऽहं ’ हा अहंकार गेला तरी ‘ अहंब्रह्मास्मि ’ ही ज्ञानवृत्तिही गेली पाहिजे.** ‘ तत्त्वमसि ह्या महावाक्याच्या गर्जनेनें अविद्येची झोप उडाली कीं चारी वाचा तिच्याबरोबर उठतात पण ‘ सोऽहं ’ उरते. लोण्याचें तूप झालें तरी कडकड उरते तीही जिरली पाहिजे. **बंध आणि मोक्ष हे दोन्ही बंधच आहेत** ! म्हणजे मोक्ष हा बंध नाहीं, मी बद्ध होतों तो मुक्त झालों ही मोक्षाची वृत्ति बंधनकारक आहे. मोक्षस्वरूपाचा येथें निषेध नाहीं तर मोक्षकल्पनेचा निषेध आहे ! ‘ बागुलाचेनि मरणें । तोषावे कीं बालपणें । येरा तो नाहीं । मा कोणें मृत्यु मानावा ? ’

बाळाला बागुलाची भीति वाटते म्हणून ती जाण्यासाठीं बागुलाला खोटेंच मारावें लागतें, पण जाणत्याला बागुलच नाहीं, मग बागुल मेल्याचें समाधान कोठून होणार ? शिवसूत्रांत **ज्ञान हाही बंध आहे** असें शिवानें सांगितलें आहे व ' वैकुंठीचे सुजाण ' जे कृष्ण त्यांनींही गीतेंत ' सुखसंगेन बध्नाति ' ( १४–६ )–सत्वाच्या ज्ञानपाशानें जीव बद्ध होतो असेंच म्हटलें आहे. ' शिव व श्रीवल्लभ ' यांनीं सांगितलें म्हणून आम्ही मानूंच पण यांनीं सांगितलें नसतें तरीही ज्ञान बंधन-कारक आहे हें अगदीं उघड आहे ! ' ज्ञानें श्लाघतू आहे । तै ज्ञानपण धाडिले वाये '–ज्ञानानें मी मुक्त झालों, आत्मानंद पावलों, असें हा म्हणत आहे तोंवर तें ज्ञान कसलें ? तें अज्ञानच ! अज्ञान दवडून 'ज्ञान स्वयें बुडे.' देह मी ही बुद्धि दवडणारी आत्मबुद्धिही जर गेली तरच बरें. **स्वरूपाच्या ठिकाणीं ज्ञानवृत्ति नाहीं** ( वाऱ्यानें नाहींसा होतो तो ढग, पण वाराही जेथें आटतो तें आकाश ) तद्वत् ' ज्ञानें मोक्ष घडे तें निमालेनि ! '

**नातरी माध्याह्नकाळीं । छाया न दिसे वेगळी**
**असे पायातळीं । रिगोनियां ॥ ३० ॥**
**तैसे ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें ।**
**आपुलेपणें उरे । बोध जो कां ॥ ३१ ॥**
**तें ऋणशेष वाचा इया । न फेडवे मरोनियां ।**
**तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ ३२ ॥** ( प्र. ३ )

' इदं 'वृत्तिज्ञान ' अहं 'वृत्तिज्ञानानें गेलें, पण तेंही सद्गुरूच्या पायां पडून मीं सोडविलें; देहबुद्धि गेली तरी आत्मबुद्धि उरते हें वाणीचें शेषऋण. त्या ऋणांतून सद्गुरूच्या पायीं बुडी देऊन मी आपली सोडवणूक करून घेतली !

**चौथ्या प्रकरणांत** अविद्येचा निरास झाला कीं त्या क्षणीं अभेद-ज्ञानवृत्तीचाही कसा लय होतो व ज्ञानाज्ञानातीत शुद्ध आत्मभाव

कसा राहतो हें अनेक दृष्टांत देऊन सांगितलें आहे. आरशांत मुख पाहण्यापूर्वी मुख होतेंच, तसें **आत्मैक्य मूळचेंच आहे** त्याला ज्ञान-बोधाची गरजच कोठें आहे ? शुद्धस्वरूपीं ज्ञानवृत्तिही पोंचत नाहीं, ती अज्ञान दवडून आपलाच लय करून घेते ! कोशकीटक आपणच केलेल्या घरांत जाऊन दार बंद करून कोंडून मरतो, चोर पोत्यांत शिरून आंतून पोतें बांधून आपल्याला कोंडून घेतो, किंवा कापुरास जाळून अग्नि आपण नाहींसा होतो, त्याप्रमाणें अज्ञाननाश करण्यांत ज्ञानानेंही स्वतःस समाधि दिली !

**तैसें पिऊनि अज्ञान। तंववरी वाढे ज्ञान।**
**जंव आपुलें निधन। निःशेष साधे ॥ १० ॥**

**अज्ञान आटोनियां। ज्ञान येतें उवाया।**
**ज्ञानाज्ञान गिळोनियां। ज्ञानचि होये ॥ १४ ॥**

तमानें झांकला न जाणारा व दुसऱ्या तेजानेंही प्रकाशित न होणारा सूर्य जसा स्वयंप्रकाश आहे तसा **आत्माराम ज्ञानाज्ञानातीत निधर्म आहे.**

**म्हणोनि ज्ञानें उजळे। कां अज्ञानें मळे।**
**तैसें नव्हे–निर्वाळे। ज्ञानमात्र जें ॥ १७ ॥**

आपण ज्ञप्तिमात्र आहों हें भान आत्मस्वरूपीं नाहीं, तरी तो स्वयं ज्ञान-रूप आहे. डोळा स्वतःलाच पाहत नसला तरी त्याचें पाहतेपण सिद्ध आहे.

**आकाश आपणया रिघे ?। कायी आगी आपणया लागे ?।**
**आपुला माथां वळघे। आपण कोण्ही ? ॥ १९ ॥**

**दिठी आपणया देखे ?। स्वाद आपणया चाखे ?।**
**नादु आपुलें आइके। नादपण ? ॥ २० ॥**

**सूर्य सूर्यासी विवळे (प्रकाशी) ?। कां फळ आपणया फळें ?।**
**परिमळु परिमळें। घेपत असें ? ॥ २१ ॥**

**तैसा आपणया आपण। जाणते नव्हे जाण।**
**म्हणोनि ज्ञानपणेंवीण। ज्ञानमात्र जें ॥ २२ ॥**

ज्ञानमात्र ब्रह्माच्या ठायीं स्वात्मज्ञान आहे असें म्हटलें तर तेथें स्वात्मज्ञान केव्हां तरी नव्हतें असें होईल ' म्हणून असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें. ' ' ब्रह्म निर्धर्म आहे म्हणतां तर मग तें नाहींच म्हणांना ? ' अशी कोणी शंका काढील तर त्यास उत्तर हें आहे कीं " तें नाहीं हा अनुभव तरी कोणाला आहे ? दिवा मालविल्यावर मालविणारा जर नाहींसा झाला तर दिवा नाहीं हें तरी कोण बोलणार ? कांहीं नाहीं इ० शून्य–पण हें कांहीं स्वतःस पाहत नाहीं ! तात्पर्य **आहेनाहींचें बोलणें तेथें व्यर्थ आहे असें तें आहे.** "

**पांचव्या प्रकरणांत** सत्, चित्, आनंद ह्या तीनही पदांचा ज्ञानमात्र आत्मवस्तूच्या ठिकाणीं आरोप कसा होऊं शकत नाहीं हें सांगितलें आहे ! सत्ता, चैतन्य व आनंद हीं तीन पदें आधीं भिन्न नाहींत आणि तीं एकरूप असलीं तरी एकरस परब्रह्माच्या ठिकाणीं त्यांचा लाग नाहीं

**कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक ।**
**द्राव गोडी पीयूख । पीयूखचि जेंवि ॥ २ ॥**

सत्ता, प्रकाश व सुख हीं तिन्हीं पदें द्रष्टा जो शुद्ध आत्मभाव त्याचा द्रष्टृत्वभाव प्रकाशित करून मौन धरितात. असत्, अचित् ( जड ) व दुःख या त्रयीच्या निरासापुरतीं सच्चिदानंद हीं तीन पदें आहेत, एरव्हीं वस्तूच्या ठिकाणीं यांचा संबंध नाहीं !

**आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख ।**
**तेवीं नसोनि सुखासुख । सुखचि जें ॥ ३८ ॥**

हेंच अनेक दृष्टांतांनीं सिद्ध केलें आहे.

**सहाव्या प्रकरणांत** पहिल्या १२ ओव्यांत **शब्दमंडण** व पुढें अखेरपर्यंत **शब्दखंडण** केलें आहे. शब्दानें परोक्षज्ञान होतें, पण अपरोक्षज्ञानाच्या वेळीं शब्द मागेंच राहतो. शब्द आत्मज्ञानाच्या दारापर्यंत नेतो, पण प्रत्यक्ष स्वानुभव देण्यास तो असमर्थ आहे.

**बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ।**
**अमूर्ताचा विशदु । आरिसा नव्हे ? ॥ १ ॥**

विधिनिषेधाचिया वाटा । दाविता हाचि दिवटा ।
बंधमोक्षकाळिकटा । शिष्ट हाचि ॥ ५ ॥

हाचि अविद्येच्या अंगीं पडे । तैं नाथिलें ऐसें रूढे ॥
न लाहे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६ ॥

जीव देहें बांधिला । तो बोलें एकें सुटला ।
आत्मा बोलें भेटला । आपणपया ॥ ८ ॥

किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ॥
परी ययाही संबंधु । नाहीं येथें ॥ १२ ॥

"शब्द ही मोठी उपयोगाची वस्तु आहे ! जीव आत्मस्वरूपाला विसरला आहे, त्याला जागृति देण्याविषयीं शब्दाची प्रसिद्धी आहे. जीव निजस्वरूपाविषयीं आंधळा आहे त्याला हा डोळे देतो. विधि-निषेधाच्या वाटा दाखविणारा हा मशालजी आहे. बंध व मोक्ष यांचा कलह मिटविणारा ह्म० बंधमोक्षाच्या हद्दी ठरविणारा—बंधमोक्षांचीं लक्षणें सांगणारा—शिष्ट ह्म० मध्यस्थ किंवा न्यायाधीश शब्द हाच आहे ! हा अविद्येचा पक्ष घेतो व अविद्याकार्य जें जगत् तें सत्यत्वानें भासवितो, पण सत्य जी आत्मवस्तु तिच्याकडे याला तीन कवड्यांलाही कोणी पुसत नाहीं ! जीवदशेंत हा पाडतो व स्वरूपाची ओळख करूनही हाच देतो ! देहाभिमानानें बद्ध झालेल्या जीवास 'तत्त्वमसि' ह्या एका महावाक्याचा बोध करून सद्गुरु सोडवितात ह्म० आत्म्याची गांठ घालून देतात. प्रवृत्ति आणि निवृत्ति ह्या दोहींस हाच चालवितो. आत्मविद्येचें साह्य करून आपण मरून जातो, कां कीं **शब्द निमाल्यावरच आत्मसिद्धी** होते. याप्रमाणें शब्द स्मरणदानाविषयीं प्रसिद्ध आहे, पण आत्मस्वरूपीं याचा कांहींएक संबंध नाहीं ! आत्मा ज्ञानरूप, नित्यस्मृतिरूप आहे, तेथें **आठव व विसर दोन्ही नाहींत.**" मग शब्दाचें काम काय ? 'सूर्यो रात्री पा नेणे । मा दिवो काय जाणे?' सूर्याची रात्रीशीं कधींच गांठ पडत नाहीं मग दिवसाची तेथें किंमत

काय? शब्दानें अविद्यानिरास होतो म्हणावें तर आत्मत्वीं अज्ञानच नाहीं मग निरास कोणाचा करणार? अविद्या म्हणजे खरोखर वांझेचें मूल किंवा आकाशाचें फूल! अविद्या ह्म० इंद्रधनुष्य, मृगजळ किंवा गंधर्वनगर यांसारखी मिथ्या शब्दमात्र आहे म्हणजे नाहींच!

**अविद्या येणें नांवें। मी विद्यमानाचि नव्हे।**
**हें अविद्याचि स्वभावें। सांगतसे ॥ ३८ ॥**

अ–विद्या ह्म० मी विद्यमान नाहीं हें ती स्वतःच सांगत आहे! ती कांहीं पदार्थ ( भावरूप ) आहे म्हणावें तर ती विचारापुढें टिकत नाहीं. तिच्या नाशाच्या गोष्टी बोलणें हें सावलीला मारण्यासारखें आहे. ' मृगजळाच्या पानीं। गगनाच्या आलिंगनीं। नातरी चुंबनीं। प्रतिबिंबाच्या ' कोणी प्रवृत्त होईल तर तो फशीं पडेल.

**ऐसी अविद्या नासावी। हें वाहेल जो जीवीं।**
**तेणें साल काढावी। आकाशाची ॥ ४७ ॥**
**अहो हे किती बोलावें ?। अविद्या रचिली अभावें।**
**आतां काय नासावें। शब्दें येणें ॥ ५५ ॥**

ह्या ९ ओव्यांत दृष्टांतांची रेलचेल केली आहे! आणि पुढेंही दृष्टांतांचा पाऊस पाडला आहे. तात्पर्य, आत्मा सच्चिदानंद स्वतःसिद्ध आहे तेथें शब्दाचें कांहीं कारण नाहीं.

**एवं माध्याह्नीची दिवी। तम धाडी ना दिवो दावी।**
**तैसी उभयता पदवी। शब्दा आली ॥ ९६ ॥**

मध्याह्नीचा दिवा अंधार घालवीत नाहीं व दिवस प्रकाशित नाहीं, त्याप्रमाणें नित्यज्ञानरूप आत्म्याचे ठिकाणीं अज्ञान नाहीं म्हणून शब्दाचा उपयोग नाहीं व आत्मा स्वयंप्रकाश असल्यामुळें शब्द तेथें निरुपयोगी आहे.

**सातव्या प्रकरणांत** अज्ञान हें आत्मत्वावर अनादि भासत आहे पण तें मिथ्या आहे, अज्ञान ही कांहीं भावरूप वस्तु नाहीं, हें प्रत्यक्ष व अनुमान प्रमाणांला विषय होत नसून ज्ञानाज्ञानधर्मरहित पण

ज्ञानप्रकाशरूप आत्मवस्तूच्या ठिकाणीं त्याचा संभवच नाहीं इ० प्रकारानें अज्ञानाचें खंडण केलें आहे; आणि दृश्य नामरूपात्मक जग हा आत्म्याचाच विलास आहे, जग हा चिद्विलास आहे, हें प्रतिपादिलें आहे. अज्ञानखंडण म्ह० मायाखंडण. ह्या प्रकरणांत दृष्टांतांची गर्दी आहेच; पण ज्ञानेश्वरमहाराजांच्या सूक्ष्मबुद्धीची येथें कमाल झाली आहे; युक्तिप्रयुक्तीनें अज्ञानखंडणपूर्वक ' **जग असिकी वस्तुप्रभा** ' हा सिद्धांत त्यांनीं मोठ्या मौजेनें मांडला आहे, अर्थात् मायावादाचें खंडण करून त्यांनीं स्फूर्तिवाद मोठ्या कुशलतेनें सिद्ध केला आहे.

ज्ञानाचा क्षोभ नसेल तर अज्ञान हा शब्दही कानावर येत नाहीं, ज्ञान विशेषत्वाला येतें तेव्हांच अज्ञानाचा पुकारा होतो. स्वप्नाचें कौतुक स्वप्नकाळीं, तसा अज्ञानाचा गरिमा म्ह० मोठेपणा अज्ञानकाळींच ! **ज्ञानप्रकाशांत अज्ञान नाहींच.** ' काई चांदणा उठे लहरी । मृगजळासी ?' आणि अज्ञानसापेक्ष जें ज्ञान तेंही अज्ञानच आहे—' आणि ज्ञान हें जें ह्मणिजे । तें अज्ञानाचि पाडुजें । एक लपवूनि दाविजे । एक नव्हे ?' आधीं अज्ञाना धांडोळा घेऊं. ज्ञानांत अज्ञान नाहीं हें सर्वमान्य आहे. पण ज्ञानाच्या आश्रयानें अज्ञान आहे असें ' शास्त्रमत्त ' म्ह० कांहीं वेदांत्यांचें म्हणणें आहे; पण अज्ञान काय ज्ञानाला झांकायला समर्थ आहे ? पण ' तेंचि आथी हें बुझे कोण येथें ? ' म्ह० अज्ञानास जाणणारा कोण ? ' अज्ञान तंव आपणयातें । जडपणें नेणें निरुतें ' हें तर उघड आहे, आणि अज्ञान जर ज्ञानरूप आत्म्याला झांकत नाहीं तर तें आहे हें म्हणण्यांत अर्थ काय ? ' आभाळें भानु ग्रासें । तें आभाळ कोणें प्रकाशें ? '

**नातरी अज्ञान एक घडे । हें जयास्तव निवडे ।**
**तें अज्ञान नव्हे फुडे । कोण्हे काळीं ॥ १८ ॥**

अज्ञानाचें प्रकाशन ज्याकडून होतें तें नित्य स्फुरद्रूप आहे तसेंच आहे, मग अज्ञान आहे असें म्हणण्यांत अर्थ काय आहे ? डोळ्यावर

पडदा आहे आणि डोळा देखणा आहे, मग पडदा आहे हें कशावरून म्हणायचें ? आत्म्याचे ठिकाणीं अज्ञान असून आत्मा ज्ञानस्वरूपास जर मुकत नाहीं तर हें अज्ञान वंध्यापुत्राप्रमाणें मिथ्याच आहे. प्रकाश आणि तम, जागर आणि स्वप्न, आठव आणि विसर, शीत आणि ताप, दिवस आणि रात्र हे काय एकत्र नांदतील ? **जें अज्ञान आत्मज्ञानानें बाधित होतें तें आहे म्हणणें व्यर्थ आहे.** अज्ञान आत्मविरोधी आहे आणि स्वतंत्रपणानें राहत नाहीं म्हणून तें नाहींच. दोरीवर भासणारा सर्प बांधतां येत नाहीं व हाकलतांही येत नाहीं तर मग नाहींच म्हणायला काय हरकत आहे ? प्रत्यक्ष व अनुमान या प्रमाणांनींही अज्ञानाची सिद्धि होत नाहीं. आत्म्याच्या ठिकाणीं आत्मत्त्वाची वृत्तिही उठत नाहीं तेथें काय अज्ञान उठेल ?

**एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी ।**
**न पडेचि नगरी । विचाराचिये ॥ ७७ ॥**

मायाकार्य जगत् हा विवर्त मानतात, पण वेदही ज्याच्या स्वरूपाविषयीं मुका आहे, सूर्य ज्याला प्रकाशित करीत नाहीं, तो **आत्मा स्वप्रकाश आहे, त्याला विवर्तादि कांहीं ठाऊक नाहीं.** अहंकार, मन, बुद्धि, इंद्रियें त्याला आवरूं शकत नाहींत, त्याच्या ठिकाणीं त्याच्यावांचून दुसरें कांहींच नाहीं. त्याच्या ठिकाणीं द्वैत म्ह० अज्ञान नाहींच, पण ऐक्यकल्पना म्ह० ज्ञानही नाहीं !

**येवढेंही सांकडे । जेणें सारूनि येकीकडे ।**
**उघडली कवाडें । प्रकाशाची ॥ १२३ ॥**

वर दिलेल्या ओवींत ज्ञानेश्वर म्हणतात कीं दृश्य, द्रष्टा, दर्शन हा त्रिपुटीसंबंध चैतन्यस्वरूपाच्या ठिकाणीं नसून त्यानें जगद्रूप कवाड उघडलें म्ह० भूतभौतिक जगद्द्वार दाखविला, अर्थात् हा त्याचाच विलास आहे ! **जग हा चिद्विलास आहे.** दृष्टि ( ज्ञानवृत्ति ) आहे

तर सृष्टि[1] आहे असें म्हणतात, पण दृष्टि ( द्रष्टा ) व सृष्टि ( दृश्य ) या दोहोंच्या मूळाशीं चिन्मात्र आहे. चिन्मात्र क्षणक्षणीं नित्य नवींनवीं दृश्यें उभीं करून आपण द्रष्टेपण घेतें, पण दोन्ही संबंध चैतन्यच आपल्या ठिकाणीं दाखवितें ! 'मी एक आहे तें बहु व्हावें' अशा आदिसंकल्पाला अज्ञान म्हणतात, पण तें अज्ञान म्हणतां येणार नाहीं. पाण्यावर लाट उठली तर ती पाण्याहून काय वेगळी आहे ? 'घेणें देणें घटे(घडे) । परी ऐक्याचें सूत न तुटे !' उभ्यानें झोप घेणारा घोडा जागा झाला म्हणजे कांहीं वेगळा होत नाहीं. समुद्राचें पाणी मेघ बनून वृष्टि करितें व नद्या भरून वाहतात, पण हा सारा एका पाण्याचा खेळ आहे. सागराच्या लाटा, रविचंद्राचे किरण, कमळाच्या संहस्र पाकळ्या, वाचेवरचे अनंत शब्द, गुळाच्या ढेपेचे खडे, हे दृष्टांत एकत्वच सिद्ध करितातः—

**तैसें हे दृश्य देखो। कीं बहु होऊनि फांको।**
**परी भेदाचा नव्हे विखो ( विषय)। तेंचि म्हणऊनी ॥१४५॥**

'जरी विश्वा अशेखा भरलें आहे तरी चैतन्यावांचून दुसरें कांहीं नाहीं. त्याला द्रष्टेपणाचा कंटाळा आला कीं कांतिणीप्रमाणें तें चैतन्य दृश्याला आपल्यांतच पुन्हा घेतें. हा त्याचा खेळ आहे, विलास आहे. दुबंधी ( गंगाजम्नी ), क्षीरोदकीं ( पांढरीं ) इ० अनेक तऱ्हेचीं कापडें झालीं तरी सूत एकच! सहजें आघवेंचि आहे। तरी कोणा कोण पाहे ?' ( उपनिषदांतही 'केन कं पश्येत्' इ० म्हटलेंच आहे. ) आपल्यावर नाना देखणीं दाखविणें हा चैतन्यस्वभाव आहे, याला अज्ञान म्हणवत नाहीं.

**यालागीं एकें चिद्रूपें। आपणपया आपणपें।**

येथें अध्यारोपाचें कारणच नाहीं. रत्नाला किळेचें ( प्रभेचें ) पांघरूण

---

१ याला दृष्टिसृष्टिवाद म्हणतात. पाश्चात्यांत या वादाचा पुरस्कर्ता बर्कले हा झाला.

कोण घालतो ? चंदनानें सुगंध कोठून आणला ? तसें हेतु नसतां विश्व हें चैतन्याची सहजस्फूर्ति आहे. वस्तूच्या उघडझापींत, संकोचविकासांत, दृश्यद्रष्टादर्शनादि व्यवहार होतात.

**दोन्ही विशेष गिळी । ना निर्विशेषातें उगळी ।**
**उघडी झांपी एकीं डोळीं । वस्तूचि ते ॥ १८३ ॥**

**सर्वांगें देखणा रवी । परी ऐसें घडे केवी ।**
**जे उदोअस्ताची चवी । स्वयें घेपे ! ॥ १९५ ॥**

**तैसें पाहणें न पाहणें । पाहणेपणेंचि हो नेणे ।**
**आणि दोनी हे येणें । स्वयेंचि असिजे ॥ १९७ ॥**

वस्तु पाहणेरूप ( ज्ञानरूप ) आहे म्हणून पाहणें व न पाहणें हे दोन्ही धर्म तिचे ठायीं नाहींत, तरी तीच दोनी रूपांनीं नटली आहे !

**येथें देखोनि कां न देखोनी । ऐक्य कां नाना होऊनी ।**
**परी हा–येणेंवांचूनी । देखणे असे ? ॥ २२३ ॥**

पाणी स्थिर असो, लाटांच्या रूपांनीं चंचल झालेलें दिसो, किंवा घन अशा बर्फाच्या स्थितींत असो–तें जसें पाणीच; तसें ' दाविता न दाविता । हा ययापरौता । चढे ना तुटे आइता । असताचि असे ! ' हा स्वयंप्रकाश आहे, याला चैतन्य, वस्तु, आत्मा कांहींही म्हणा.

' लेणें आणि भांगारें । भांगाराचि एक स्फुरे ' ' जळतरंगीं दोन्ही । जळावांचोनि नाहीं' । इ० दृष्टांतांनीं हा आत्मा, स्वयंप्रकाश, व एकीएक आहे, या व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं, जग हा त्या चैतन्याचा विलास आहे, दृश्यद्रष्टा दोनी तोच आणि या दोन्ही कल्पना जेथें नाहींत असा निर्विकल्प, निगुर्ण, निधर्म तोच, हें ज्ञानेश्वरमहाराज परोपरीनें सिद्ध करून दाखवीत आहेत.

**दृश्य का द्रष्टा । या दोनी दशा वांजटा ।**
**पाहतां एकीकाष्ठा । स्फूर्तिमात्र तो ॥ २४४ ॥**

सांगावयाचें तात्पर्य एवढेंच आहे कीं ' **जग असिकी वस्तुप्रभा !** '

येथें माया, अज्ञान, कल्पना हें कांहीं नाहीं, जग हें चिद्विलास आहे. ह्याप्रमाणें त्या प्रकरणांत अज्ञानाचें किंवा मायावादाचें खंडण करून जग हें स्वयमेव ब्रह्मस्वरूप आहे असें दाखविलें आहे.

**आठव्या प्रकरणांत** ज्ञानाचेंही खंडण करून आत्मा ज्ञानाज्ञानातीत आहे हें सांगितलें आहे. अज्ञानखंडणांत ज्ञानखंडणही झालें. अज्ञानसापेक्ष ज्ञान अज्ञानाबरोबर गेलें व ' आह्मांलागी गुरुदेवें। आम्हीच केलों। ' आमची आह्मांला गुरूंनीं भेट करून दिली. आतां आह्मांला वर्णील अशी वाणी नाहीं, आह्मांला पाहील अशी दृष्टि नाहीं !

**किंबहुना श्रीनिवृत्ति। ठेविलों असे जये स्थिति।**
**तें काय देऊं हातीं। वाचेचिया ! ॥ ८ ॥**

येथें अज्ञान नाहीं, तत्सापेक्ष ज्ञानही नाहीं, ज्ञानाज्ञानातीत केवळ गाळीव ज्ञान, स्वयमेव, स्वप्रकाश—

**एवं ज्ञानाज्ञान दोनी। पोटीं सूनि अहनि ( दिवसरात्र )।**
**उदेला चिद्गगनीं। चिदादित्य हा ॥ १९ ॥**

**नवव्या प्रकरणांत**—अभेदभक्ताचीं कर्में ब्रह्मरूप होत असल्यामुळें त्याची उपासना कशी होते अर्थात् ज्ञानोत्तरभक्तीचें स्वरूप काय हें या प्रकरणांत सांगितलें आहे. ज्ञात्याला विषयांचा भोग घडत असला तरी त्याचे विषय आत्मरूप झाल्यामुळें विषय आत्मरूपानेंच त्याला स्फुरतात. विषय इंद्रियांचे नाहींत व इंद्रियें विषयांचीं-नाहींत, असा त्याला अनुभव असतो. त्याच्या ठिकाणच्या भोग्य, भोक्ता, भोग इ० सर्व त्रिपुट्या मावळतात. ' पडिलें चंद्रावरी चांदणें। समुद्रीं जालें वर्षणें '। तसें त्याचें विषयसेवन होतें. त्याचें तोंड बोलतें 'परी समाधी न मोडे। मौन्यमुद्रेची' म्ह० त्याचें बोलणें हेंच मौन होतें. देहेंद्रियांचे व्यापार होत असून त्याचें अक्रियत्व मोडत नाहीं. त्याच्या या सहजभक्तिप्रकाशापुढें अष्टांग योग म्हणजे दिवसाच्या चंद्राप्रमाणें निष्प्रभ होय. त्याचे सारे व्यापार 'प्रत्यङ्मुखपणानें' म्ह० अंतर्मुखतेनेंच होत असतात. ' द्वैतदशेचें आंगण।

अद्वैत बोळगे आपण '– द्वैतव्यवहारांत अद्वैतच प्रगट असतें. त्यांचें विषयसेवन मोक्षावरही ताण करितें ! हा नित्यस्मृतिरूप असल्यामुळें त्याच्या ठायीं 'आठव विसर नाहीं.' त्याचें स्वेच्छवर्तन हा विधि व स्वैराचार ही समाधि आहे !

जाला देवोचि भक्तु । ठावोचि जाला पंथु ।
होवोनि ठेला एकांतु । विश्वचि हें ॥ ३४ ॥
देवाचिया दाटणीं । देउळा जाली आटणी ।
देशकालादि वाहणी । येईच ना ॥ ३६ ॥

देवभक्तरूपानें एक चैतन्यच असल्यामुळें जपध्यानपूजादि उपचार हे ज्ञानीभक्तांचें चैतन्यरूपच असतात.

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा ?॥ ४१ ॥

( वेरूळच्या कैलासलेण्यांत ) एकाच डोंगरांत शिव, त्याचें मंदिर व शिवगणांचा परिवार असें त्रैविध्य कोरून काढलेलें असतें; त्याप्रमाणें देव, भक्त व भजन ही त्रिपुटी एकाच अद्वैततत्वावर कां उभी राहूं नये ? ज्ञानीभक्तानें भजन केलें तरच तें भजन आणि (स्थूलक्रियेनें) न केलें तर काय भजन होत नाहीं ? तो 'स्वभावें श्रीशिवूचि असे–' तो शिवरूपच आहे 'कर्माचा हातु नलगे । ज्ञानाचें कांहीं न रिगे' अशी ही उपासना आहे ! अकृत्रिमभक्तीचें हें वर्म आहे. ही स्थिति श्रीगुरुकृपेनें प्राप्त झाली म्हणून म्हणतातः—

शिवशिवा समर्था स्वामी । येवढिये आनंदभूमि ।
घेपे दीजे एकें आह्मीं । ऐसें केलं ॥ ६४ ॥

**दहाव्या प्रकरणांत**– ग्रंथाचा महिमा वाणिला आहे. सहजसिद्ध परमात्मवस्तूचा हा जो अनुवाद केला तो श्रीगुरुकृपेचा आहे. वस्तु सिद्ध आहे मग अनुवाद कशाला—?

पढियंते सदा तेचि। परी भोगीं नवी नवी रुची।
ह्मणोनि हा उचितचि। अनुवाद सिद्ध ॥ १३ ॥

भोगण्याचा प्रीतिविषय एकच असला तरी तो पुनःपुन्हा भोगण्यांत नवानवा आनंद आहे. म्हणोनि ' मी हें गौप्य बोलून दाखविलें ' आहे वस्तु केवळ चिन्मय एकरस आहे, येथें शब्द कोणाचे कोण बोलतो म्हणून हें बोलणेंही ' मौनाचें मौन ' आहे. ' हें अनुभवामृत ' सर्वांनीं सेवून जीवन्मुक्त व्हावें. स्त्रीचे अंगीं तारुण्य असलें तरी प्रियानें तिचा अंगीकार केला कीं ' तें आंगीचें आंगीं न समाये ! ' वसंताच्या संगतींत वृक्ष पुष्पफलांनीं डवरून येतो, म्हणूनही अनुभवामृताचें भोजन देत आहे. हा स्वाद घेतला नाहीं तोंवरच बद्ध मुमुक्षु मुक्त हा भेद आहे. अकारादि स्वरांशीं संयुक्त होऊन ५० वर्णांची सिद्धि होते, तैसें ' या चराचरा दुसरें नाहीं'.

ह्मणोनि ज्ञानदेवो ह्मणे। अनुभवामृतें येणें।
सणु भोगिजे सणें। विश्वाचोनि ॥ २१ ॥

# १७ ज्ञानेश्वरी सृष्टि.

## १ आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि.

जग चिद्विलास आहे, जग आघवी वस्तुप्रभा आहे, ह्या सिद्धांताच्या दृष्टीनें ज्ञानेश्वर हे सृष्टीकडे व सृष्टीच्या यच्चावत् व्यापारांकडे पाहत असल्यामुळें त्यांना आंत बाहेर एक आनंदच प्रगट असे. आंत आत्मस्वरूपाचा आनंद व बाहेर आत्मप्रभेचा आनंद. आंत ज्ञान व बाहेर विज्ञान म्हणजे प्रपंच; दोन्ही मिळून दोन नव्हत तर एक परमात्माच होय. 'मज समग्रातें जाणसी ऐसें। आपुलिया तळहातीचें रत्न जैसें। तुज ज्ञान सांगेन तैसें। विज्ञानेसी' (७–३). ज्ञान व विज्ञान मिळून समग्र परमात्मा. बाह्य सृष्टींत व सृष्टिव्यवहारांत, सरित्समुद्रांत, नक्षत्रतारांत, वृक्षवल्लींत, पशुपक्षिकृमिकीटकांच्या विहारांत व रम्य लीलास्वभावांत भरलेला आत्मानंद त्यांच्या काव्यांत सर्वभर पसरला असल्यामुळें आत्मनिष्ठांना व रसिकांना त्यांची वाणी सारखीच मोहक वाटते. आध्यात्मिक सृष्टीहून आधिभौतिक सृष्टि भिन्न नाहीं. सारा अद्वयानंदाचा विलास आहे, एका आत्मारामाचा खेळ आहे. जग ह्म० एकमेवाद्वितीय परब्रह्माचा चिद्विलास आहे. '**देव बोलिलें एक। जें दुजें नाहीं**' हा गीतेचा निष्कर्ष ज्ञानेश्वरांनीं काढला आहे. ऐक्यावांचून दुसरें कांहींच नाहीं. एकपणावांचून दुसरा अनुभवच नाहीं. ह्या सायुज्यतेच्या आनंदानें त्यांची वाणी ओथंबलेली आहे. आत्म्याचा आनंद–तोच आंत, तोच बाहेर. सूर्याची अंगभूत प्रभा, रत्नाची कांति, सुवर्णाचे अलंकार, सागराच्या लहरी, 'तैसें विश्व येणें नांवें। हें मीचि पै आघवें। घेईं–चंद्रबिंब सोलावें। न लगे कांहीं॥ विश्वपण जावें। मग तै मातें घेयावें। तैसा नव्हे–आघवें। सगटाचि मी' (अ. १४–३७८ ते ३८१). 'विश्वं विष्णुः' हा एकत्वाचा आनंदच त्यांच्या काव्यांत दृष्टांत व सिद्धांत अशा द्विविधरूपानें व्यक्त झाला आहे. सिद्धांतांत अध्यात्म व दृष्टांतांत प्रपंच, सिद्धांतांत अंत-

रंग व दृष्टांतांत बाह्यसृष्टिसौंदर्य, असा त्यांच्या वाग्देवीचा विलास आहे. दृष्टांतमिषानें ज्ञानेश्वरांनीं चराचरसृष्टीचे व्यवहार कसे दाखविले आहेत; बाह्य सृष्टीकडेही प्रेमानें, रसिकतेनें, आत्मौपम्यभावानें ते कसे पाहत आहेत; मानवी प्राण्यांचे व पशुपक्ष्यादिकांचे सूक्ष्म व्यवहार स्वानंदाच्या बैठकीवरूत ते कसे न्याहाळित आहेत; अंतराळांतल्या सूर्यचंद्राशीं तसेंच पृथ्वीवरील जीवसृष्टीशीं ते कसे तन्मय झाले आहेत हें आपण ह्या प्रकरणांत पाहूं. शांत व स्थिर अशा विस्तृत गंगाजलांत आकाशस्थ नक्षत्रतारादिकांचें प्रतिबिंब पाहून आपणांस जशी मौज वाटते, तशीच प्रस्तुत प्रकरणांत ज्ञानेश्वरीसृष्टीचें प्रतिबिंब पाहून आपणांस वाटेल अशी मला उमेद आहे.

ज्ञानेश्वरीकालीन मानवीसमाजाचा विचार करितांना त्या वेळची राजकीय परिस्थिति, नागरिकांची व गांवढ्यांची समाजघटना, त्यांचे त्या वेळचे व्यापार, उद्योगधंदे, शेती, बागाईत, आरोग्य व सामान्य सांसारिकांचा संसार (उ. पतिपत्नी, मायलेंकरें, गुरुशिष्य, कुलपरंपरा) इ. गोष्टींकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे; आपणांस हें सर्व ज्ञानेश्वरांच्या उपमादृष्टांतादिकांतूनच पहावयाचें आहे.

## २ राजकीय परिस्थिति.

ज्ञानेश्वरी हा स्वधर्मानुकूल राजशाहींतला ग्रंथ असल्यामुळें आजच्या लोकशाहींतल्या कल्पनांचा त्यांत उल्लेख सांपडला नाहीं तर आश्चर्य वाटायला नको. राजा हा ईश्वरी विभूति मानली जात आहे, राजाही स्वधर्मानुकूल व न्यायनीतीनें वागणारा आहे, व चातुर्वर्ण्याच्या सिद्धांताप्रमाणें राज्यभार राजानें व त्याच्या मंत्र्यांनीं वहाणें योग्य असल्यामुळें बाकीच्या प्रजाजनांनीं आपापल्या व्यवसायांत निमग्न असणें हाच त्यांचा धर्म मानला जात आहे, अशा स्थितींत लोकशाहीच्या तत्त्वांचा उद्भव होण्याचें कारण नाहीं. असो. आतां राजा, शस्त्रास्त्रें व राज्याधिकारी यांच्यासंबंधीं ज्ञानेश्वरींत जे पुसट उल्लेख आले आहेत त्यांचा

विचार करूं. निशांण ह्म. रणभेरी, डंका, भोंगळ ह्म. तुतारी, मांदळ, शंख, काहळा, इ० रणवाद्यांचा उल्लेख आला आहे ( १–१३२ ). कटार ह्म. कट्यार ( ४–२२३ ), कांबी ह्म. धनुष्यदंड, यांशिवाय शस्त्रांचा उल्लेख सामान्यतः हतियारं किंवा शस्त्र याच शब्दांनीं आला आहे. 'हतियार पराजिते' ( १०–२५४ ) ह्म० शस्त्रधारी लोक. 'दंडिया हतियारा न विसंबे' ( १३–५०२ )–दंडिया ह्म. दंडधारी ( पाठभेद– दंदिया ह्म० द्वंद्वी, द्वंद्वयुद्ध खेळणारा. )– आपल्या हतियाराला विसंबत नाहीं. अशा वीरासमोर कोणता शत्रु येण्यास उभा ठाकेल? (१३–२७८) महाराष्ट्राला कुस्तीचा नाद अनादि आहे. तेव्हां मल्ल होते व बरोबरीचा मल्ल व त्याशीं कुस्ती खेळण्याची ईर्षा बाळगणारे प्रतिमल्लही होते (१८-४९०). शहराच्या रक्षणासाठीं रात्रीं घरटी (गस्त) घालायची चाल होती (२-३११). घरडोळी ह्म. प्रत्येक घराची झडती घ्यायचीही सोय होती (११-५८६). वोडण ह्म. ढाल ही घाव घालण्यापूर्वींच पुढें करावी लागते (१३-५४७).–येथें ढालीचा उल्लेख आहे त्यापक्षीं तलवार असलीच पाहिजे. 'समर्थासी वैर। जया पडलें हाडखाईर' (हाडवैर) त्याला आठही प्रहर शस्त्र परजून बसावें लागतें (१३-५५१). राजाज्ञा मोडण्याऱ्यांसाठीं बंदिशाळा असत व गुन्हेगारांना वज्रगांठीनें बळकट बांधीत (१८-३९२), व लोहाची सांखळी घालीत (१६-२६६). राऊत व प्रासाद हे शब्द राजमंदिराला तसेंच देवमंदिराला लावीत. दीपमाळा होत्या (९-३९१). राऊत ह्म. घोडेस्वार होते. अंगावर वज्रांगी ह्म. वज्रकवच चढवून शस्त्रधारी योद्धे तुरंगावर आरूढ होत (१८-१०४७), व उपलाणें वारू असले तरी ( पल्याण=खोगीर, उत्पल्याण=उपलाण ह्म. खोगीर नसलेला घोडा ) त्यावर स्वार होऊन

१ 'निशाणा देऊनि घाओ ( घाव ) सकळां रायां फोकारिती' ( महदंबेचे धवळे २६ ). २ डंकु, डंक म्ह. नगारा ( अमृता० ५–३६ ). ३ 'सुरी–सुरिया खोंचे सुरी'–सुरी काय स्वतःलाच खोंचील? ( अमृता० ४–३ ). ४ हेर असत–'गुप्तिये जाणविती रायो' ( महदंबेचे धवळे ३८ ).

वीरपुरुष देशावर जाऊन लूट आणीत (१८-४६४). सार्वभौमपदाची ईर्षा कोणाला नाहीं? 'जगस्पृहे आस्पद। एक सार्वभौमपद' (१६-२३१). पण अत्यंत वीरश्रीच्या पुरुषाशिवाय तें कोणाला मिळणार? खरे वीर फार दुर्लभ असतात. 'मनुष्याणां सहस्रेषु' साधु जसा एखादाच तसा वीरही एखादाच! त्रिभुवन माणसांनीं भरलेलें आहे, पण त्यांतील एकेक सदृढ मनुष्य निवडून राजा आपली सेना बनवितो व अशा निवडलेल्या सैनिकांची सेना रणांगणावर गेली म्हणजे 'जे वेळीं लोह मांसातें 'घाटी' — प्रत्यक्ष शस्त्र अंगाला झोंबून कापूं लागतें — 'ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं । एकलाचि बैसे–' विजयलक्ष्मी एखाद्यालाच माळ घालते (७–११ व १२). सेना चतुरंग असते (१३-१५२) म्हणजे हत्ती, घोडे, रथ व पदाति ह्म० पायदळ; अर्थात् पायदळ, घोडदळ, गजपति व रथपति अशा चार प्रकारची सेना असे. 'यंत्रावरिचील मार। पदातीचे मोगर' (११-३९५) यंत्रावरील (तोफाबंदुकांचा? तेव्हां तोफाबंदुका होत्या कां दुसरीं कांहीं यंत्रें होतीं?) मार व पदातीचे मोगर ह्म० निवडक लोक. युद्धांत 'जैत' व 'हारी' ह्म० जय व अपजय हे यायचेच (१४-२७८), तथापि 'क्षत्रिया रणीं पळोनि जाणें। तें कोण साहे लाजिरवाणें?' (१६-१७४) पराजयानें वीराला लज्जा वाटते. महाराष्ट्रीयांना पळपुट्यांची चीड असे हें ७ व्या शतकांत ह्युएनत्संगनेंही सांगितलें आहे (पृ. ३१५ पहा). स्वार्थी लोक सर्वकाळीं असायचेच. संपन्न व विलासी लोक राजसेव्य अशा मार्गावर वाडे बांधून राहतात (१५-३५२) व राजाला आपले घरीं बोलावून आणून आपलीं बहुत कामें करून घेतात आणि लोकांत प्रतिष्ठा मिरवितात (१७– ); तथापि 'स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेचि परमसेवा' (१८-९१३) असे एकनिष्ठ सेवकही कांहीं असत. धार्मिक राजा देवाब्राह्मणांना अग्रहार, जमिनी, गांवें, देणग्या वगैरे (१६–२०७) व क्वचित् 'अग्रहारें। हन महाग्रामही' देई (१८-९९), कधीं राजकाज करणारांनाही 'भूमीचें मूळपत्र'

(सनद्) देई ( १४–२७५ ) व त्यावर शेवटीं राजावळ–राजानें काढलेली ओळ–असे. उळिग ( १७–२०२ ) ह्म. वेठ, बिगार धरीत. 'रावो परिवार नेणे। आज्ञाचि परचक्र जिणें' ( १३–१३८ ) किंवा राव सुखें पहुडला तरी देशीचा व्यापार बंद पडत नाहीं, लोक आपापल्या आभिलाषानें व्यापार करीतच असतात ( ८–१८५ ). न्याय अन्यायाचा निवाडा चावडीवर होत असे ( १६–२९५ ).

## ३ व्यापार व उद्योगधंदे–मोती चौक.

ज्ञानेश्वरी सृष्टींत अनेक लहान मोठीं नगरें व खेडीं आहेत. नगर, नगरी, पाटण, पाटणी असें नगरांना व नगरांत राहणाऱ्यांना 'नागर' म्हणत. 'नगरांतरीं वसिजे। तरी नागरचि ( चाणाक्ष ) होइजे, ( १–४१ ). नागरपणांत सौंदर्य ( १०–४२ ) व ऐश्वर्य ( २–३६३ ) आहे. सुप्रसंगालाही 'नागर प्रसंग' म्हणत- ( २-३७४ ). याच्या उलट खेडवळांना 'गावंढे' ( १८-२१८ ) म्हणत. देवगिरीवरून आपल्याला इतर नगरांची कल्पना येईल. देवगिरीसारख्या राजधानीच्या नगरींत राजबिदी ( राजमार्ग ) बहुत आहेत ( १८-१०६९ ); येथें मोठाले चतुष्पथ ह्म. चोहटे आहेत ( ९-२७३, १०-२४ ), व चोहट्यावर स्थाणु पुरलेले आहेत ( १०-३४० ). राजपथानें चला ( १३–६१९ ). कामधेनूंचीं खिल्लारें, अमृताचीं कोठारें, विनोदवनवाटिका म्ह. उपवनें, नाचणी ( नर्तकी ), गंधर्व म्ह० ( गायक ), विलासिनी, श्रीमंतांचे स्तुतिपाठक भाट, लोकपाळांच्या रांगेंतले राऊत म्ह० सरदार, खोलणी म्ह० कोतवाली घोडे, वगैरेंचा स्वर्गातला थाट ( ९-३२१ ते ३२६ ) बऱ्याच अंशानें ह्या नगरींत दिसतो. राजानें देवाब्राह्मणांस दिलेल्या वापी म्ह० पुष्करिणी, विहिरी, आराम ( १८-९९ ), फुलाफळांनीं भरलेली उद्यानें ( १३-२१३ ), जागोजाग नगरीला शोभा आणीत असत. येथें वाटा व अव्हाटा म्ह० आडरस्ते ( ७-४८ ) पुष्कळ असून गरीबांचीं तणारें म्ह० तृणागारें अर्थात् गवताच्या झोपड्या व धवळारे म्ह० ( धवलागारें )

अर्थात् चुनेगच्ची वाडे ( ३-३२३ )-गरीबांचीं कोंपटें ( १४-२१९ )
व श्रीमंतांचीं त्रिमाळिकें धवळारें म्ह० तीनमजली वाडे ( ५-११४ ),
दोन्ही आहेत. नगरांतील धुराड्यांचीं तोंडें धुराचे लोट सोडीत आहेत
( १६-२९४ ), वांड्यांना 'गवख '-गवाक्ष, खिडक्या आहेत (११-६१),
पाय पाखाळण्याचीं–पायधुण्याचीं न्हाणीघरें आहेत ( १८-६५१ ),
हाट म्ह० बाजार व हाटवेळा नियमित केल्या आहेत ( ९-४९६ )
बाजारांत मोठमोठाल्या उतारपेठा म्ह० माल उतरण्याचीं मुख्य ठिकाणें
( १७–२९४ ) आहेत. मालाच्या ' वाखारी ' म्ह० वखारी ( ७-१३७ )
आहेत. मुख्य बाजारपेठांतून दुकानदार व गिऱ्हाईक, कर्जदार व
ऋणाईत यांची गर्दी उसळून राहिली आहे ! ' भूमी, बीज व नांगर '
या भांडवलाचा आधार घेऊन अपार लाभ मिळविणें, गोधनें राखून
उपजीविका करणें व स्वस्त दरानें घेतलेल्या वस्तू महाग दरानें विकणें
हा वैश्य जातीचा मुख्य व्यवसाय होय ( १८-८८० ते ८८२ ). शेती,
व्यापार व सावकारी हे तीन प्रकारचे धंदे करणारे लोक ज्ञानेश्वरी सृष्टींत
आहेत. अनेक धंदे असल्यामुळें जातीही अनेक झाल्या आहेत.

हा पहा **मोतीचौक**! सोनें, रुपें, मोतीं, हिरे, माणकें यांचीं हीं
दुकानें ! उत्तम बावनकशी सोनें पंधरा ( ६-३४, ८-३८ ), साडेपंधरा
( १०-१५, ११-१३२, १५-५६७ ) व सोळा ( १५-३४१ ) या
भावानें विके. पंधरें, साडेपंधरें व सोळें यांत सोन्याचे दर आंदोलन
पावत. सोन्याच्या खाणी ( १८-५१४ ) आहेत, सोन्यांचीं नाणीं
आहेत ( १५-४८१ ). नाणीं पाडणारी टांकसाळ आहे; नाण्यांच्या
जाती वेगळाल्या व आकार वेगळाले तरी कस एकच; भांडाराला
मिति नाहीं; नाण्यांनीं गाभारा भरलेला, ' आंखूनि नाणें विस्तारी ।

१ ' रचनाविशेषें विचित्रीं । हाट चोहटें तीथरी ( तिखणी ) । मढ ( पाषाण–मंदिर ) मंडप ( धावे ) चौबारी ( चौखांबी चौफाळा ) । देखे धर्मसाळा ॥ ' ११० ( ऋद्धिपूरवर्णन ). २ 'रवो ' म्ह. सोन्याची लगड, रव्याचे घडीव दागिने ( अमृता. ९-५ ).

पाठीं तयाची आटणी करी ' असें टांकसाळींत नाणीं पाडण्याचें व तीं आटविण्याचें काम सतत सुरूच आहे ( ७-२२ ते २६ ). खोटीं नाणीं पाडणारे ठकही आहेत ( ४-४६ ). सोन्याला वरचेवर क्षाराचीं पुटें देऊन सोनार किडाळ जाळीत व मग सोनें शुद्ध होई ( १८-१५७ ). सोन्याचे अलंकार वापरीत ( ९-६४ ). बायका, मुलें व देवता यांच्या अंगावर अलंकार चढवीत. बाळलेण्यांचा खप फार. देवाच्या पायांत नूपुरें—सोन्याच्या घागऱ्यांचे वाळे व पायाच्या अंगठ्यांत जोडवीं घालीत ( १-५ ). अलंकारांचे ठसे मुशींत आटवीत ( १८-१००९ ). कातड्याच्या तुकड्याच्या नोटा चालत. ' राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चामा एका जया पडती । तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तु ॥ वाचुनि सोनें रुपें प्रमाण नोहे । येथ राजाज्ञाचि समर्थ आहे । तेंचि चाम जैं एक लाहे । तेणें विकती आघवी ॥ ४५४ ॥ ( अ० ९ ) उत्तम सोन्यावर राजावळीचीं अक्षरें पडल्यावर तें व्यवहारांत चाले ( १७—३२२ ). मोती चौकांत सोन्याप्रमाणें मोत्यैंही मिळत. मुक्तमुद्री —मोत्यांची मुंदी, आंकठी, नथ ( १८—२७ ) मोतियांची कडियाळी—जाळी ( ९—५२९ ), मोत्यांचा एकावळी हार ( १८—५६ ), कर्ण-भूषणें ( १४—१८ ), नीलमण्यांचा दुसरा झ० दुपदरी सर किंवा हार ( ९—१४८, १५—४१९ ), माणिक व त्याची कीळ झ० प्रभा ( १४—१२४ ), भोंवरी म्ह० कानांतलें फिरकीचें फूल, बुगडी ( १३—९०३ ), राजाच्या मुकुटीचें चूडारत्न ( १४—८० ), हिरे ( १३—४८३ )

---

१ ' माथेचा चापा '– स्त्रियांच्या डोक्यांतला एक अलंकार ( अमृता. ७-२ ) २ ' नाग, मुद्री, कंकण ' हे अनुक्रमें तीन सोन्याचे दागिने स्त्रिया डोक्यांत, बोटांत व हातांत घालीत ( अमृता. ९—११ ). अंगठीच्या रत्नाची प्रभा खुलून दिसावी म्हणून त्याचे खालीं चांदी—सोन्याच्या पत्र्याला चकाकी जील देऊन घालतात त्यास बुडाशीं बसवितात, त्याला ओपसर म्हणतात. अशा रत्नाच्या आंगठ्या हातांत घालीत ( अमृता. २—७३ )

' काश्मीराचा रवा ' ह्म० स्फटिकाचा खडा. हा पांढरा शुभ्र कुंकुमावर ठेवला तर तांबडा दिसतो पण तसा नसतो ( १५–३४९ ). याप्रमाणें सोनें, मोतीं, हिरे, माणकें, सोन्यारुप्याचीं नाणीं, नाना तऱ्हेचे अलंकार, चामड्याच्या तुकड्याच्या नोटा यांची येथें देवघेव होत असून मोठाल्या दुकानांतून लोह्या–सोन्यानाण्यांनीं भरलेल्या लोखंडी कढया ( ९–५९ ) माजघरांत पुरलेल्या आहेत व त्यावर भांडारी कोठीवाले देखरेख ( १०–५२ ) ठेवीत आहेत !

सुवर्ण सर्वकाळीं सर्वदेशांत प्रिय आहेच. हीन धातूचें सोनें करायचे प्रयत्न दोन प्रकारचे होते. ते मार्ग म्हणजे किमया व परीस, धातुवाद ह्म० किमया ( ९–३४ ), रसभावना ह्म० किमयाची रीत, या रीतीनें कथलाचें रुपें करीत ( १८–७७४ ). परिस ह्म० स्पर्शानें लोखंडाचें सुवर्ण करणारा पाषाण. परिसाचा उल्लेख बराच वेळां आला आहे. ' लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे ' ( १–७७ ) ' लोहाचें आंग तुक । न तोडितांचि कनक । केलें जैसें देख । परिसें तेणें ' ( १७–२१६ ). किमयेपेक्षां परिसावर विश्वास अधिक दिसतो: ' जें धातुवादाही न जोडे । तें लोहींच पंधरें सांपडे । जरी दैवयोगें चढे । परिस हाता ' ( ६–३४ ). **ज्ञानेश्वरींत किमया** आहे, किमयेच्या ओव्या आहेत, अशी एक जुनाट समजूत आहे ! जीवाचें जीवत्वाचें दारिद्र्य घालवून त्याला ब्रह्म बनविण्याचें सामर्थ्य ज्ञानेश्वरींत आहे, या अर्थानें ज्ञानेश्वरींत खरोखरीच किमया आहे ! ज्ञानेश्वरीनें कित्येक जीवांचें संकल्परूप किडाळ जाळून त्यांना बावनकसी सोनें बनविलें आहे !

## ४ व्यापार व उद्योगधंदे–बाजारपेठा.

आतां बाजारपेठांत चला. तंतु, पट, विणावणी ह्म० विणकर व विणकरींतल्या चौकटी ( १०-१०६।७ ); लोंव ह्म० लोंकर व कांबळीं ( १८-८१३ ); पांघरायाच्या सोनसळ्या ह्म० शेले व शालू ( ६-२८४ );

१ ज्ञानेश्वरांचें घोंगडीवर १४।१५ अभंग प्रसिद्ध आहेत.

पीतांबर; लुगडींचोळ्या व स्त्रीपुरुषांचे[1] अनेक तऱ्हेचे कपडे, कापूस[2], कापड्यांच्या पेट्या, व कापड वेढणारें (९-७६), पटावर चित्रें काढणारे (५-१५६), पटाची घडी उकलून दाखविणारे व; ग्राहकांना खुलवून आपला माल त्यांच्या गळयांत बांधणारे चतुर दुकानदार (६-२९२) केणें ह्म. पीतांबर, लुगडीं वगैरेंच्या भोंवतीं बांधलेली दोरी–सोडणारे तत्पर सेवक वगैरे सर्व प्रकार कापडाच्या पेठेंत दिसतात! सोनार, धोबी, कुंभार, तेली इ० धंदेवाले आहेत. सोनार आपला आगिठा ह्म. शेगडी पुढें ठेवून पुटें देऊन कीट ह्म० हिणकसपणा काढून टाकण्यांत व वानी भेद (वेगवेगळे कस) तोडून शुद्ध सोनें निवडून देण्यांत गुंग आहे (१३-१०३७, १७-२०९ इ). सौंदाणी अगर सवंदाणी म्ह. वस्त्रें धुण्याचें दगडीपात्र, त्यांत धोबी कपड्याचे डाग धुवून काढीत आहे (१३-४६६ व १८-१४१). तेलीं[3] घाणे चालवीत आहेत–' घाणी गाळिले गुंडे। परी तेल ना पेंडी जोडे' (१७-४१९). कुलाल ह्म. कुंभार घडेगाडगे घडतात (९-७४), मातीसंगें भाजून पक्क करितात (७-६५). भांड ह्म. डेरा, घट ह्म. घागर व शराव ह्म. परळ हीं मातीचीं भांडीं गोरगरीब वापरतात (१३-८७३). गोवारी 'गांवधेनु वेंटाळी–गोंवारी गांवांतलीं जनावरें संभाळतात, राखण करितात (१८-७४). करबाडें ह्म. कडबा खाणारे बैल गाड्यांना जुंपून गाडीवान् त्यांतून श्रीमंतांचींही वऱ्हाडें नेतात (१४-२४१). लांकडाचीं बाहुलीं (१-८१), साइखडीं ह्म. कळसूत्रीं बाहुलीं (९-३०), चित्रींचे सिंह (११-४७४), चित्रांचीं फळें ह्म० 'झळाळाचीं चित्रीव फळें–आंत शेण' (१३-४७१) कोल्हेरीचे

---

१ आपण सांप्रत नेसतों अशींच धोतरें तेव्हां पुरुष नेसत (अमृतानुभव २-४८); दुबंधी ह्म. गंगाजमनी व क्षीरोदकी ह्म. पांढऱ्या रंगाचीं वार्नें ह्म. कापडे (अ. ७-१४७); द्वैतदुणीचें ह्म. दुहेरी वस्त्र (अमृता. २-२५). २ शेतांत कापूस पिकवीत. 'पल्हेचा दोडा' ह्म. कापसाचें बोंड. पल्हें, पल्हाडें हा शब्द आजही खानदेशी लोकांच्या तोंडीं आहे. ३ 'गुणातेलाचिया दीपकलिका' ह्म. तेल व वाती घालून पेटविलेले दीप रात्रीं जळत ठेवीत (अमृता. २-५१).

वेताळ (११-४६६) अथवा कोल्हेरीचे असिवार (९-१७३) म्ह. कुंभारांनीं बनविलेले व हातीं तलवार घेणारे मातीचे निर्जीव घोडेस्वार इ. वस्तु बाजारांत खपत. दूध, ताक, दहीं, लोणी, तूप, गूळ, साखर, तांदुळ, इ. खाण्याचे पदार्थ तेव्हां होते. विषाचे किंवा भांग, गांजा, अफू इ. इ. मादक पदार्थांचे बगीचे लावून ते बाजारांत विकण्याचा धंदा करणारे व्यापारी होते, व हे विकत घेऊन फुकट मरणारे मूढ ग्राहकही होते ( १८–२३५ ). लोक तांदुळ खात व ' पिठाचा विकराही ' होत असे. मोठाल्या दुकानांतून किंवा मंदिरांतून ठाणदिवी किंवा ठाणवई ( ६–२३ ) रात्रभर जळत ठेवीत. ठाणदिवी म्ह. एका ठाणावर, स्थानावर, ठेवलेला व सहसा न हालवितां येण्यासारखा मोठा दिवा, तो मोठ्या समईसारखा उंच आकाराचा उंच असून त्यावर ' टवळे ' असे व त्यांत ५।७ वाती लावण्याची सोय असे. कधीं मधीं आगी लागत, पण तेलातुपाच्या कोठाराला आणि भर उन्हाळ्यांत जर आग लागली तर ती अनावर होत असे; ' तेथ उन्हाळा आगी खरमरां । तेलातुपांचिया कोठारा । लागला आणि वारा । सुटला जैसा ' ( १६–३९५ ). धान्याचा १६० पायल्यांचा भरा असते. ( ९–४९७ ). तांदूळ–' सुसडा ' म्ह. चांगल्या सडलेल्या ' कणांचीतांदुळांची रास ' (८–९०) ' आमुते गोड करावें । ऐसें तांदुळीं कासया विनवावें ? ' ( ९–३० ). ऋणिया व रिणाईत म्ह. धनको; कांटाळें म्ह. आभंड, धडा किंवा तागडी; उदीम, भांडवल, मुद्दल व वाढी किंवा कळांतर म्ह. व्याज, कुळवाडी म्ह. व्यवहार, भांडवल सोडणें, पोतडी भरणें इ. शब्दव्यवहार बाजारांत चालू आहेत (७–१७८।९ व १४-१७). व्याज घेणारे सावकार व द्रव्य घेऊन औषधें देणारे वैद्य कांहीं कमी नाहींत:–' कळांतर गांठीं बांधिजे । मग पुढिलांचें काज कीजे । पूजा ( दाक्षिणा ) घेऊन रस ( औषधें ) दीजे । पीडितांसी ' ( १७-२८७ ). व्यांजांचा दर शेंकडा एक होता व व्याजांचा वसूल घेणारे सावकार करडे असत. ' एकोत्तरेयाचिया वाढी । जे जळतिये आगीं

घालिती उडी ( ९-५४ ) 'समतुकी कांटाळे'–समतोल वजनाचा कांटा असे. 'भांडवल न सुटे कवडी' असले कृपण अल्प काळांत क्वचित दीर्घोद्योगानें कोडी म्ह. कोट्यवधि नाणीं जमवून कोट्यधीश होत ( ९-५०८ ), व मग त्यांच्या 'संपत्तीचें पवाडे' ( १६–५९ ) गाणारे भाटही त्यांना भेटत. 'व्यापाराच्या हातीं । उसंतु ना दिवाराती' ( १४-२४२ ) याप्रमाणें व्यापारी लोक आपल्या वैश्यकर्मांत अहोरात्र निमग्न असत. उद्योग आणि दैव दोन्ही अनुकूल असल्यासच संपत्ति घरांत लोटत येते, –'भाग्याचेंनि भडसें । आणि उद्यमाचेंनि मिषें । समृद्धिजात आपैसें । घर रिघे' ( ६-३५४ ).

नटनाच दोन प्रकारचे होते. एक 'कीर्तनाचे नटनाच' ( ९–१९७ ) व दुसरे मन रिझवणारें नाटकांतले नटनाच ( १६–३६१ ). कीर्तनांत किंवा क्वचित् ललितांत भाविक प्रेमभरानें नाचत व लोकरंजनार्थ नट नाटकांत नाचत. नट नटी( नृत्य ) करितो ( ४–४८ ). 'बहुरूपियांची रावोराणी । स्त्रीपुरुषभाव नाहीं मनीं'. स्त्रीपुरुषभाव नट नाटकांत दाखवितात मात्र, ते त्यांच्या ठायीं वस्तुतः नसतात. नटनाच हा शब्द चार पांच वेळ मनाचा उल्हास किंवा उत्कर्ष दाखविण्यासाठीं योजला आहे. लाघव म्ह. नाटकीपणा हा शब्द नट व बहुरूपी यांना लाविला आहे. नाटकी लोक रंगभूमीवर आचरणें दाखवितात तसे वागत नाहींत म्हणून त्यांचे श्रम व्यर्थ जातात–' विफळती आचरोनियां । नाटकी जैसे ' ( १६–३७६ ). तथापि नटाचा एक गुण पारमार्थिकांनींही घेण्यासारखा आहे. नट हा चातुर्याच्या अभिनयानें प्रेक्षकांस खुलवितो पण आपण खरे कोण हें पळभरही विसरत नाहीं, तसें गुणांत राहून व गुणांचीं कार्यें करीत असूनही जाणत्यानें गुणातीत असावें ( १४–२९१ ):– 'नटलेनि लाघवें । नटु जैसा न झकवे । तैसे गुण जात देखावे । न होनियां '

त्यावेळीं स्वयंपाक करून मोलानें विकणाऱ्या 'अन्नपूर्णाकाकूही' होत्या

१ कवड्यांचाही व्यवहार होता : ' तीन कवडे ' ( अमृता. ६–६ )

असें ‘ रांधवणी रससोय निकी । करूनियां मोलें विकी ’ ( २–२५४ ) यावरून वाटतें. अन्नछत्रें होतीं ( १३–७०१ ), पाण्याचे तलाव, पाणपोया, धर्मशाळा, अन्नछत्रें इ. सोयी व्यापारी व प्रवाशी लोकांसाठीं होत्या. मोठाल्या नद्या, समुद्र किंवा खाड्या ( तरी ह्म. खाडी ) यांच्या समीप असलेल्या गांवीं नावा, नावाडी, तरांडे ह्म. ताफे असून नावा कधीं वादळांत सांपडत ( २–३४९ ). ‘समुद्रीं दाटे भरतें । तैं समुद्रचि भरीं तऱ्यांतें ’ ( १३–३०७ ). तारवावर माल भरून तो दूरदेशीं क्रयविक्रयार्थ नेणारे धैर्यवान् व्यापारी असत ( १८–७४६ ). ‘ जिये सागरीं जळचरें । संचरती मंद्राकारें । तेथ देखोनि शफरें । पोहों न लाहती ( १८–१७१९ ) ! नद्या, सरोवरें, लहानशा खाड्या यांतून सडे कांसेला लागून व परिग्रही ह्म. बायकामुलांचा परिवार असलेले नावांतून व कोणी सांगड बांधून परतीरीं जात ( १२–९१:९२ ).

## ५ शेती व बागाईत.

कृषी, कुळवाडी ( शेती ) व कुळवाडीकर ( शेतकरी ). बैलांची पेटी (जोडी) घेऊन शेतकरी अवसीं पाहटीं न म्हणतां शेतांत खपतो, बीज वाफवतो ( पेरतो ), सोकरितो ( राखतो ), सवंगणी ( पेरणी ) करितो. पोळ म्ह. बैल लावून मळणी करणें; वाहो ( मशागत ) करणें; वाहिवा-वहिवाट, लागवड करणें; साज किंवा सांज म्ह. रास करणें; गुंडे–दगड रचून बांध घालणें; वाडी-बाग, जमीन; बरड–नापीक जमीन; भाट–पडित जमीन; सुरंगी–भुयार; वृत्ति–वतन; बलौता–बलुतेदार; पेरणें भरणें व धारा करणें; शेत वाहविणें म्ह. वहिवाटणें; शेताची वृत्ति ‘ जो वाहे तया फावे ’ म्ह. जो खपतो त्याला लाभ देते-ही सर्व शेतीविषयक परिभाषा १३ व्या अध्यायांतील **‘ क्षेत्र ’** ह्या शब्दाच्या टीकेंत आली आहे ( १३ ओवी १० ते ५७ ). विहिरा, कूप, वापी बागाईतीला लागतात. ‘घटिकायंत्र’—राहाटगाडगें, कातिया–कोयता (१७-९६), खुरपें ( १६-३२९ ), पाणबुडे ( १७-४५१ ), पेंव–धान्याचें कोठार

(१७-२८५) हें सर्व पाहिजे. एकवट झालेलें भूस आणि बीं उपाणितां (पाखडतां) घनवट तेवढें राहतें व फलकट उडून जातें (२-१३०). गुळ, साखर व माले म्ह. काकवी एकाच उंसापासून होतात पण स्वादाला भिन्न आहेत (१०-३२). चणे (१२-७०), फुटाणे (११-२१५) जोंधळा व त्याचें कणीस (१४-११७), हुरडा (११-३२४), साळी-केळी (१५-१२२)—कवाड—काबाड म्ह. कडव्याचें ओझें (१८-५४०), पिकलेलीं पडवळें (१३-५६०), दुधिया (१३—४६९), कडु दुधिया—'कडु दुधिया माखला। गुळें जैसा'—हें सर्व शेतकऱ्याच्या ओळखीचें आहे. शेतांतल्या लोकांना पोहणें हें रोजचें आहे व 'पूरीं पडलिया जैसा। दुधिया वाहे' याप्रमाणें तरुण मुलें महापुरांतही मजेनें पोहत जात! रानावनांत व डोंगरांत लक्षावधि भलीं बुरीं 'झाडाळीं' झाडेंझुडपें सहज उगवतात, तशीं राजागरें (राजाच्या बागा) सहज उगवत नाहींत, त्यासाठीं कष्ट करावे लागतात, न पेरितां गवत सहज उगवतें पण पेरणीवांचून व राबावांचून साळी (भात) उगवत नाहीं; नद्या सहज वाहतात पण विहिरी खणाव्या लागतात; तात्पर्य कष्टावांचून शेती नाहीं (१८—ओंवी ९४ ते ९६) माळी श्रम घेऊन मुळाशीं पाणी घालतो, जपतो, राबतो पण फळाच्या ठिकाणीं आपले सर्वश्रम सफळ झालेले पाहतो (१८-८४४). 'शेती बीं विखुरलें। परी पिकीं लक्ष' (१६-१००). पिकाची वाढ होत आहे असें दिसलें कीं शेतकरी 'वाहो' मशागत करण्यास कंटाळत नाहीं (१०-५५). 'कृषीवळ आपुलें पांघुरवी पेरिलें' (१३-२०७), हें सर्वांस माहित आहेच. 'कडां पायरी कीजे। निराळीं माच बांधिजे। अथावीं सुइजे। तरी जैसीं (१३-९४८)—डोंगराच्या कड्यावर जाण्यासाठीं पायऱ्या बांधतात, आकाशांत जरा उंच जाण्यासाठीं माच बांधतात, व खोल पाण्यांतून जाण्यासाठीं नावा बांधतात. पावसाच्या पाण्याचा लोट साळीचा पांट धरितो म्ह. भातखाचरांत जाऊन जिरतो, पण

१ 'प्राटा पाणी परतु?' पाटाचें पाणी परतेल काय? (अमृता० ६—५०)

त्याचा भाताला फार उपयोग होतो ( १८-३६८ ). एखाद वेळ ' सांत चांकडी '– सात दिवस सतत लागणारी पावसाची झड सुरू होते ( १३-६४१ ). कोठें कोठें शेतकऱ्यांना घेण्यासारखा सुंदर बोधही ज्ञानेश्वरांनीं केलेला आहे. कुळवाडी ( शेती व व्यापार ) एकदा कां ' रिणें ' –कर्जानें दाटलीं कीं कर्ज डोकें वर काढूं देत नाहीं, ती शेती कायम बसलीच ( १३-५९६ ) म्हणून कर्जबाजारी होऊं नये; ' बीजचि वरोसी वेंचे । तेथ वाढती कुळवाडी खांचे ' ( १८-२५८ )– बियाणेंच जर पोटगीस ( वरो=रोजचा अन्न खर्च ) खर्चून टाकलें तर त्यांत वाढत्या शेतीचा नाश आहे; ' उभें शेत चारिलें । पिकावया नुरे '( १७-२४८ ) शेतांत पीक उभें असतांना गुरांकडून चारलें गेलें तर पुढें दाणा हातीं लागण्याची आशा नको. शेतकऱ्याला वाफसा केल्यापासून तों पीक हातीं येईपर्यंत मोठें धीरगंभीर असावें लागतें, पहा बरें:— चांगल्या ओलसर व सुपीक जमिनींत सुंदर बीज पेरलें ' तरी आलोट फळ भेटे, परि वेळे कीं गा ! ' ( १८-९९९ ). पीक पदरांत पडल्यावर ' मग वाऱ्याचिया धारसां ( प्रवाहांत ) । पडिनला कोंडा कां नुरेची जैसा । आणि कणाचा आपैसा । राशिवा जोडे ' ( ९-४५ ) हा देखावा शेतांत मळणी चालते तेव्हां कोणासही पाहाण्यास मिळतो.

**शेतीच्या भाषेंत** ज्ञानेश्वरींत एक सुंदर रूपक आलें आहे:–"प्रमेय-बीजाचा मुढा '–ज्ञानरूप **बीजाचा मुढा**[1] ( बीं भरून ठेवलेला पेंढ्याचा गठ्ठा ) मोकळा केला, सत्वगुणाचें **वडपें** ( वृष्टि ) झाली, आध्यात्मिक मनोभूमिरूप **खरपें** ह्म० मातीचीं ढेकळें विरघळून चतुरचित्राचे **वाफे** भरून आले, सोन्यासारख्या अवधानाचा **वाफसा** ( पेरण्याइतकी ऊब ) पाहून श्री निवृत्तिनाथास पेरणी करायची इच्छा झाली व ज्यांतून बीं पेरतात तें **चाडें** त्यांना पाहिजे होतें तों मीच पुढें दिसलों; तेव्हां ' ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्गुरूंनीं केलें कोडें । माथां हात ठेविला तें फुडें ।

१ ' न पेरितां पीक जोडे । ते मुडांचि आहे रोंकडें ' (अमृता० ५-५१).

बीजचि वाइलें'– सद्गुरूंनीं कौतुकानें मला चाडें केलें व माझ्या मस्तकावर हात ठेवला तेंच बीजारोपण झालें "( ६ ओवी ४८९ ते ४९२ )

शेतीशीं संबंध असलेल्या माणसांस रानावनांत हिंडावें लागतें व त्यांना वणवा, मृगजळ, इंद्रधनुष्य इ० देखावे पाहण्याचे प्रसंग नेहमीं येतात. 'आदित्याचीं झाडें । सदा सन्मुख सूर्याकडे' ( १८-८६५ ) ही सूर्यकमलांची एक मौज प्रसिद्ध आहे. डोंगराच्या तळवटीं आपल्याच बोलाचा पडसाद उठतो ( ४-७५ ), वाहुटळीमुळें धुळीचे लोट 'अंतराळीं भोवंडीजति' ( ६–३८५ ). माळजमिनीवर म्ह. बरड जमिनीवर जो एक अद्‌भूत रम्य देखावा दिसतो तो मृगजळाचा. सूर्यकिरण व उखर म्ह० बरड जमीन यांच्या भेटींत मृगजळ दिसतें. 'तेजा आणि उखरा । भेटी जालिया वीरा । मृगजळाचिया पूरा । रूप होय' (१३-१०५४), 'रश्मीचेनि आधारें जैसें । नव्हतेंचि मृगजळ आभासें' (९-८५). इंद्रधनुष्याची मौज (१५-२४०), संसाराला गंधर्वदुर्ग, शशविषाण, खपुष्प ( १५-२१५ ) इ० दृष्टांत मृगजळाच्या बरोबरीनें दिले आहेत.

## ६ रोग, रोगनिवारण व वैद्य.

जीव गेला नाहीं तोंच औषधाची धांवाधांव करावी ( १३-५४८ ). 'आयुष्य पुरलें ( सरलें ) आहे । तरी औषधें कांहीं नोहे' ( २-६७ ). रोगांनीं शरीर जोंवर व्यापलें नाहीं तोंवरच आरोग्याचे उपाय करावेत:– 'नाना रोग । पडघतीना (व्यापीत नाहींत) पुढां आंग । तंव आरोग्याचे उपेग । करूनि घाली' ( १३-५८८ ) व्याधिरूपी सर्प शरीरांत आहेतच, ते निजले आहेत तोंवरच आरोग्य आहे, ते तामस आहारानें जागे होतात ( १७-१५० ). रोग दाटल्यावर औषधाविषयीं उदास नसावें ( ९-४९१ ). पथ्यासह रोगी औषध घेईल तर रोगानें व्यापला असला तरीही जगेल ( १८-७०६ ). पथ्याच्या घरीं रोग रहात नाहींत. ( १६-६९ ) वैद्याचा द्वेष करून जो लाथेनें औषध उडवून देईल त्या रोग्याची पीडा टळायची नाहीं ( १७-१०१ ). गाईचें दूध नवज्वर

असतांना दिलें तर तें विष होतें ( २-१८४ ): 'ज्वरें विटाळलें मुख। तें दुधातें म्हणे कडु विख' ( ९-१४२ ) रोगाची परीक्षा न करितां दिलेलें औषध विषवत् होतें ( १८-१३२ ). वैद्यच पथ्य सांगून विष देऊं लागेल तर रोगी कसा वांचेल? (३-८). दूधसाखर गोड खरी पण 'कृमिदोषीं–' जंतांचा विकार झाला असतां घेऊं नये ( ३-२२६ ). धातूंत गुप्त असलेला ज्वर–**हाडीज्वर**–कुपथ्याचें निमित्त पाहत असतो व कुपथ्य होतांच शरीर आंतून बाहेरून व्यापून टाकतो ( १३–८० ). **कोडी**–रक्तपिती झालेला मनुष्य आपल्या अंगावर न रागावतां माशांवरच रागावतो व **जिव्हालंपट** रोगी अन्नालाच दूषण देतो ( १८–१३६ )! **कवीळ** ( कावीळ ) झालेला रोगी चांदण्यालाही पिंवळें म्हणतो ( ९–१४१ ). कां कीं त्याला सारेंच पिवळें दिसतें (१४–१३२). **नायटे** (१३-८०१,) **महामारी** ( ११–३५२ ), **क्षयव्याधि** ( १३–१७६ ), **शिसार**–अर्धशिशी ( १८–१७९ ), **पांडुरोगाची** पुष्टि ( ५–११९ ), पांडुरोगानें अंग सुटणें म्हणजे तें खुंटणें ( मरणें ) च होय ( १३–७४७ ), सन्निपातांत बरळतो ( १४-२५३ ), नवज्वरीं दूध देतां रोग विकोपास जातो ( १३-७२३ ), गुणियासी म्ह. विषवैद्याला ( गुणिया=विषवैद्य ) **फोडसें**-फुरसें ( जहर विषसर्प ) आवरत नाहीं ( १३-७२६ ), **तिमिर** नामक नेत्ररोग झाला तर जवळचें दिसत नाहीं ( २-५६ ), कफवात पित्त ( १४-१९७ )–त्रिदोष झाल्यावर ब्रह्मदेवालाही शरण गेल्यानें मरण चुकत नाहीं ( १६-२५५ ). पायाला शीतळता आली कीं लगेच डोळेही शीतळ होतात ( १६-१६० ), सद्वैद्य अंगांत मुरलेले दोषही काढून टाकतो ( १६-४२ ), व्याधि असाध्य दिसतांच वैद्य निदानींच्या दिव्यौषधींची योजना करितो ( २-८६ ). आतां सद्वैद्याचें उत्कृष्ट लक्षण सांगणारी एकच ओवी देतो:—

---

१ तिमिर नांवाच्या नेत्ररोगानें 'चंद्र एकू असे। परी तो दुणावला दिसे–' दोन चंद्र दिसतात ( अमृता. ७–९० )

आतां कदर्थवीत व्याधी । बळीकरणाचिया आधी ।
आपपर न शोधी । सद्वैद्य जैसा ॥ १६–१४१ ॥

रोग्याची व्याधि हटवीत व त्याचें बळ वाढविण्याची चिंता करीत असतांना सद्वैद्य आपपरभाव ठेवीत नाहीं.

## ७ नानाप्रकारचे लोक.

राजमंडळांतले लोक, व्यापारी, शेतकरी किंवा लोकोपयोगी उद्योग-धंदे प्रामाणिकपणानें करून पोट भरणारे लोक यांचा विचार झाला. याशिवाय इतरही कमीअधिक उपयोगाचे व विशेष उपद्रव न देणारे असेही कांहीं सामान्य धंदेवाले किंवा करमणुकीवर पोट भरणारे लोक होते. अंगांतलीं भूतें काढणारे पंचाक्षरी, मंत्रविद्या जाणणारे मांत्रिक, गळयांत नांगर बांधून खंडोबाचे माले ( भिक्षा ) मागणारे वाघे ( १४-३१ ), थोरल्या दिवाळीला मोळाला पिंपळाचीं पानें बांधून त्याचें तोरण वेशीवर टांगणारे मांग ( १३-६५९ ), डोईवर देवाच्या मूर्तींचा डोल्हारा घेऊन फिरणारे देवलसे भगत ( १७-७१६ ), पाटींत साप घेऊन दाखवीत फिरणारे गारुडी–' भिके परते न लाहे । तरी गारुडी साप वाहे ' ( १८-६०७ ),–काठीवर वळघोन खालींवर उड्या मारून जीवनोपाय करणारे कोल्हाटी ( १८-६०६ ), नागवे क्षपणक ( १३-२१ ), कीर्ति गाणारे भाट ( २-१२ ), बहुरुपी वगैरे अडाणी व भोळया लोकांत मिसळून वागणारे लोक यांचा अर्थशास्त्रदृष्ट्या समाजास फारसा उपयोग नसला तरी अल्पलाभावर संतुष्ट राहणारे हे असल्यामुळें व यांच्यामुळें लोकांची थोडीफार करमणूक होत असल्यामुळें असले लोक समाजांत खपत. हे स्वतः अडाणी असून अडाणी लोकांच्या अज्ञानावरच ह्यांचा उद्योग चाले. समाजांत कांहीं दुर्दैवी प्राणी असायचेचः खुळे, लुळे, पांगळे ( १३-४५७ ), मुके, आळसी ( १३-४५८ ), पांडुरोगी (५-११९), जात्यंध, कोरान्नभिक्षा मागणारे फुकटे, वेडेपिसे, कुजलेल्या हातांनीं जेवणारे कोढी (१३–७०५) इ० अनेक अभागी लोकांना

समाजानें भूतदयेनेंच संभाळायचें असतें. शहरांतून व खेड्यांतून असल्या दीनदुबळया लोकांना दयाळू लोकांकडून आश्रय मिळतो. समाजांत चांगल्याबरोबर वाईट, सच्चे तसे लुच्चे, भले तसे दांभिक, हेही असायचेच. वैदिक आणि याज्ञिक ब्राम्हण, जपी, तपी, नेमनिष्ठ, योगी, तापसी, अग्निहोत्री, संन्यासी, पंडित, पूजक, भक्तभाविक, ज्ञानी हे वरच्या वर्गांत असतात. यांतही कांहीं प्रामाणिकपणानें स्वतःचें व इतरांचें हित पाहणारे असतात, व कांहीं लबाड नसले तरी दुर्बळ असतात, व कांहीं चांगल्याचीं सोंगें घेऊन ठकबाजीचा धंदा करणारे दांभिक असतात. केव्हांही व कोठेंही खरे थोडेच सांपडायचे ! विद्या चांगली ना, पण विद्वानांत कांहीं अजिंक्य पत्र घेऊन फिरणारे–' मान्यतेचें पुष्टगंड ' (१६-२३६) व ' विद्यावयसा माजे । उताणा चाले ' (१३-७१६) असले अहंमन्य पंडित सर्वकाळीं सांपडतातच ! गुरुपद अतिशय श्रेष्ठ आहे व गुरूवांचून तरणोपाय नाहीं हेंही खरें, तथापि गुरुत्वाचें दुकान मांडून परमार्थाचा बाजार करणारे कांहीं ' भोंदु गुरु ' निघतातच. जारणमारण करून मांसरुधिराचा सडा पाडणारे अभिचारक लोक ( १६-३९८ ), सिआरी म्ह. डाखिणी, वाटवधे, वाटमारे, मद्यपी, वेश्यासक्त, टिटघर म्ह. तिठ्यावरचें घर-तेथें अड्डे मांडून जुगार खेळणारे, ( १८-६७३ ), लुटारूपणा करणारे भिल्लांचें गांव ( १८-६७४ ), खोटीं नाणीं पाडणारे ( ४-८६ ), निपुत्रिकाच्या घरावर डोळा ठेवून त्याचें सर्वस्व लुबाडणारे संभावित ठक ( १७-१९४ ), असे अनेक प्रकारचे लबाड व जनपीडक लोक समाजांत कांहीं तरी असतातच. अशा समाजकंटकांत ज्ञानेश्वरींत ज्यांचा वरचेवर उल्लेख येतो असे तीन प्रकारचे लोक आहेतः **मद्यपी, वेश्या** व **संवचोर**. हे समाजाला फार तापदायक होतात. ' मद्यप्याअंगींचें वस्त्र ' जाग्यावर राहत नाहीं ( १३-५३३ ) व तो इतका निर्लज्ज बनतो कीं ' मादिरेचे घडे ' ( १३–४७२ ) पितो व बरळत सुटतो ! वेश्येला पण्यांगना, सामान्या ( सर्वांची म्ह. ज्याला पाहिजे त्याची स्त्री ), वाणसी म्ह. वणिक् स्त्री

( स्त्रीपणाचें वाणिज्य किंवा व्यापार करणारी, देहाचें दुकान मांडणारी स्त्री ) अशीं नांवें आहेत. वेश्येचा उंबरा चढणें हें महापाप आहे ( १३ ७०१ ). 'वेश्येचें सर्वस्व देणें। तेंचि तें नागवणें' ( १३-७५० ). वेश्यासक्तींत सर्वस्व घालवून कफल्लक बनलेल्या पुरुषास मग वेश्येच्या दाराला बोटही लावण्याची सोय नाहीं:–'वेश्याभोगीं कवडा वेंचे। मग द्वारही चेपूं नये तियेचें' ( ९-३२९ ). हा वेश्येचा दृष्टांत स्वर्गसुख भोगून क्षीणपुण्य झालेल्या दीक्षितांना ( यज्ञकर्त्यांना ) स्वर्गांतून पुन्हां मृत्युलोकीं घरंगळत यावें लागतें हें सांगतांना दिला आहे! दोहींकडे गचांडी आहे! पुढील ओंवी अशीच समर्पक आहे. 'आंग बोल माखूनि तपें। विकावया आपणपें। अंगहीना पडपे जियापरी' ( १७-२४६ )– जशी एकादी अंगहीना ह्म. अंग सुरकतलेली म्हातारी वेश्या देह-विक्रयानें पैसे मिळावेत म्हणून 'पडपे' ह्म० शृंगार करिते, तसा दांभिक पुरुष भस्मरुद्राक्षमाळा यांनीं अंग व ज्ञानाच्या फोल गोष्टींनीं वाचा शृंगारतो! मद्यपी व वेश्या झाल्या, आतां संवचाराचें वर्णन करून हें त्रासदायक आख्यान संपवितों. चोरापेक्षां संवचोर फार वाईट! संवचोर ह्म. सावाचा अगर शिष्टाचा वेष घेऊन विश्वास संपादून संगतीनें चालणारे व वेशीबाहेर पडल्यावर रानावनांत एकटे पाहून गळा कापणारे चोर! वेश्या व संवचोर यांचा एकच धंदा. सभ्यतेचा मोहक बाह्यात्कार दाखवून कपटानें गळा कापायचा म्हणून दोघांना एकाच रंगेंत बसविलें आहे:—'संवचोरमैत्री चांग। जंव न पाविजे तें दांग ( अरण्य )। सामान्या भली आंग। न शिवे तंव' ( १८-२५० ). 'संवचोराचा सांगात। नावेक स्वस्थ। जव नगराचा प्रांत। सांडिला नाहीं' (२-२११). यात्रेकरु, वाटसरु, नगरांत उद्योगधंदे करून सायंकाळीं आपल्या गांवीं परत फिरणारे व्यापारी यांना ह्या लुटारु लोकांच्या टोळ्यांपासून फार क्लेश भोगावे ( १३-३३७ ) लागत. तात्पर्य 'संवचोरांचें मैत्र। कां हाटभेटीचें कलत्र' ( १८-७९७ ) दोन्ही वाईटच!

## ८ लौकिक समजुती.

ज्यांना शास्त्राचा, विवेकाचा किंवा तारतम्यबुद्धीचा म्हणण्यासारखा आधार नसतो पण ज्या लोकांत परंपरेनें रूढ झालेल्या असतात अशा अनेक लोकसमजुती ज्ञानेश्वरींत आढळतात. ह्या समजुती ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं होत्या व आजही आहेत. ह्या महाराष्ट्रांत आहेत व इतर प्रांतांतही आहेत. मनुष्यस्वभावाला चिकटलेल्या कांहीं समजुती सर्व राष्ट्रांत असतातच. डोळयांत अंजन घातलें कीं दिसूं लागतें (१-२३). भाग्यवान् व पायाळु मनुष्याच्या डोळयांत दिव्यांजन घातलें कीं त्याला पाताळधनें म्ह. भूमिगत द्रव्यें ( ६-४५८ ) दिसतात. समुद्राच्या पोटांत वडवानळ आहे ( १-९०, १८-१४०१ वगैरे ), शेषकूर्मावर भूभार आहे ( १-५४ ), मंत्रोच्चारांत प्रमाद झाला कीं भूतसंचार होतो ( १-१९० ), भूतसंचार ( ७-१०३ ), मंत्रज्ञानालाही विवशी म्ह. पिशाच भुलवितें ( २-३१२ ), चांगल्या मंत्रज्ञाला भूतबाधा होत नाहीं ( २-२३४ ), पिशाच असून जनास गोचर नाहीं ( ५-९९ ), पिशाच म्ह० 'विवशी पळे मग चढे निधान हाता' ( ११-७५ ), भूतोंडी म्ह. भूताच्या तोंडची उंडी, भूतबळी ( ९-१८४ ) इ. भूतपिशाच्यांच्या संबंधींच्या उल्लेखांवरून त्यावेळीं बहुजनसमाजाचा भूतयोनीवरील विश्वास व्यक्त होतो. असा विश्वास आजही बहुतांचा आहे व बऱ्याचजणांचा पाश्चात्य राष्ट्रांतही आहे. भूतयोनीसंबंधीं तिकडे विद्वानांचे शोध चालले आहेत, व ही योनि नाहीं असें म्हणायची सोय उरली नाहीं! रात्रीसमयीं स्मशानांत भूतें वावरतात ( ३-३११ ) अशी पुष्कळांची समजूत आहे. ऋद्धिसिद्धि ( ३-३१३ ) व ऋद्धिसिद्धींचा संभ्रम ( ४-१३४ ), यमलोकींची रहाटी ( ९-११४ ), समुद्रस्नानानें सकळ तीर्थांच्या स्नानाचें पुण्य लागतें (१-२६), स्वर्ग, सप्तसिंधु व सप्तपाताळ, रंकाची दृष्टि लागते (६-११५), मूळनक्षत्रावर जन्मलेलें मूल अशुभ समजत ( १८-१२३ ). एखादी स्त्री सती गेल्यास तिचा समाजांत गौरव होत असे. सती जाणें

मोठें दिव्य समजत, सती जाण्याची चाल होती ( १६-१८७।४४० ), सटवीपूजन होतें, रात्रभर दिवा जळत ठेवीत ( १८-८३७ ) इ. इ.

## ९ शास्त्रीय कल्पना.

अर्वाचीन शास्त्रांनीं मोठ्या परिश्रमानें जे शोध लाविले आहेत त्यांचाही ज्ञानेश्वरींत क्वचित् कां होईना उल्लेख पाहून ज्ञानेश्वरांच्या सर्वगामी बुद्धीचें कोणासही नवलच वाटलें पाहिजे. नाव पाण्यांतून वेगानें जात असतांना तीरावरचे वृक्ष अचळ असून पळतांना दिसतात ( ४-९७ ). चंद्रापासून स्रवणाऱ्या अमृतकिरणांचे अनंत पाट सर्वऔषधींचे म्ह० वनस्पतींचे मळे भिजवीत जातात व याप्रमाणें सस्यादि सर्व धान्यजाति पिकून प्राण्यांना अन्न मिळतें (१५ ओवी ४०४।५). तोय ( पाणी ) तेज ( उष्णता ) व धूम ( वाफ ) यांचा संगम होऊन आकाशांत ढग बनतात (१८-३०८). कालिदासानेंही मेघदूतांत 'धूमज्योतिःसलिलमरुतां सन्निपातः क्व मेघः' असेंच म्हटलें आहे. सागर हा अक्षोभ आहे—अधिक नोहे न्यून नोहे-मर्यादा उल्लंघीत नाहीं ( २ ओवी ३५७ ते ३५९ ), भ्रमण-चक्रांत ध्रुव फिरत नाहीं तर स्थिर आहे ( १३-४८९ ), चंद्राच्या आकर्षणानें सागराला भरती येते ( १३-१३८ ), आकाशावर नील वर्णाचा नुसता भास आहे ( १३-१०५ ), तारे असंख्य आहेत, पृथ्वीचे परमाणु व आकाशांतलीं नक्षत्रें मोजणें हें आकाशाची मोट बांधण्यासारखें अशक्य आहे (१०-२५९). मेघ, आकाश, नक्षत्रतारका, सूर्य, चंद्र, मृगजळ ह्यासंबंधींचें ज्ञानेश्वराचें ज्ञान अत्यंत आश्चर्यकारक आहे. सूर्य स्वयंप्रकाश आहे (२-३६१), पण चंद्र सूर्यप्रकाशानें प्रकाशित आहे. सूर्य सर्व पृथ्वीवरचें जळ शोषून गेल्यावर चंद्राच्या ठिकाणीं शीतलत्व येतें ( १५-३९९ ), सूर्य आपला रस पृथ्वीवर वर्षून पुन्हा किरणांच्या द्वारें आपल्या ठिकाणीं आणतो (१५-२९७), 'मावळलिया दिनकर। सरे किरणांचा प्रसर' ( १६-१८४ ), सूर्यप्रकाशाची गति प्रचंड आहे (५-८६), सूर्याच्या उदयास्तांवरून सूर्य चालल्यासारखा दिसतो तरी

तो अचळ आहे ( ४-९९ ). सोमसूर्यग्रहणें ह्म. चंद्राला व सूर्याला ग्रहणें लागतात (१८-११०). शरदृऋतूंत मेघ आकाशांत जिरतात व पुन्हां ग्रीष्मांत सुटतात (८-१६२). आकाशांतले सप्तर्षि (१८-८७३). अमावास्येलाही चंद्रसूर्य गगनांत असतात, पूर्णिमेच्या आधींही चंद्र सावयव असतो पण पूर्णिमेच्या दिवशीं त्याला पूर्णता भेटते (१८-११२७). चंद्रावरचा कलंक ( १८-२७३ ). भौमा ह्म. भूमिसुत मंगळ हा पीडा-दायक असल्यामुळें त्याला मंगळ ह्मणणें व रोहिणीला ह्म० रोहिणी-नक्षत्राच्या कडक उन्हामुळें भासणाऱ्या रोहिणीजळाला मृगजळ म्हणणें सारखेंच भ्रमात्मक आहे ( ५-११६ ). मेघाच्या घर्षणानें वीज उत्पन्न होते– ' प्रगटलें तेज लखलखीत दिसे ' ( ७-५८ ). मेघ वाऱ्यानें उडेल इतका हलका आहे पण वर्षाव करूं लागला कीं मोठाले थेंब किंवा गारा पाडतो (१३-२१४). वृक्षवनस्पतींत जीव आहे ( १३-२२९ ). ध्वनींच्या लहरी किंवा नादाचे तरंग ( ६-१५ )–शब्दांमुळें हवेंत असंख्य लाटा उत्पन्न होत होत शब्द कानांवर येऊन आदळतो. घंटेच्या नादाचा लय होतो–नाद हा कंपनानें होतो व कंप कमी होत जाऊन शेवटीं लय होतो ( ८-९७ ). स्वप्नांत पांचभौतिक शरीर निजलें कीं (वासनात्मक) मन देहाला कळूं न देतां सुखदुःख भोगतें (५-५३।५४).

समुद्राच्या पाण्यानें बाष्पीभवन होऊन मेघ बनतात व मेघांतूनच पुन्हा पृथ्वीवर जलवृष्टि होते हें तर पुढील ओंवींत व्यक्तच आहे: 'जैसें मेघाचेनि तोंडें । सिंधु एकें अंगें काढे । आणि नदी येरीकडे । भरतचि असती ' ( १५-११९ ). चंद्र पृथ्वीपासून २ लक्ष मैल अंतरावर आहे असेंही एका अभंगांत म्हटलें आहे !

फलज्योतिषाविषयींचेही उल्लेख कमी नाहींत. मुहूर्त पाहणें ( १४-१४६ ), 'कुमुहूर्तीं दुर्योग एकवटती ' ( १६-२५८ ), मंगळ हा पीडादायक ग्रह आहे ( ५-११६ ), केतूचा उदय विश्वाच्या अनिष्टो-द्देशानें होतो ( १६-३१९ ), क्रूर ग्रह एकाच राशींत आले कीं अत्यंत

अनिष्ट होतें ( १६-२५७ ), मूल जन्मल्यावर ज्योतिषाकडून जन्म-पत्रिका करवीत ( १५-२३४ ) इ.

## १० प्रपंच ब्रह्मरूप आहे.

ज्ञानेश्वरींत यथाकाल वैराग्यप्रतिपादन उत्कृष्ट झालें आहे, तरी संसाराकडे पाहण्याची दृष्टिही मोठी उत्साहाची व सुखसमाधानाची आहे. ब्रह्मरूपतेची तशीच संसारसुखाची छाया ग्रंथभर पसरली आहे. हा दृश्य प्रपंच ब्रह्माहून वेगळा नाहीं, संसार ब्रह्मरूप आहे, एका परब्रह्माव्यतिरिक्त दुसरी वस्तु नाहीं, जग चिद्विलास आहे, असा ज्ञानेश्वरांचा मुख्य सिद्धांत आहे व त्याची प्रभा त्यांच्या प्रपंचविषयक वर्णनांवर व दृष्टांतादिकांवरहि पडली आहे, त्यामुळें संसारिकांसही ज्ञानेश्वरीच्या परिशीलनापासून सुखलाभ होतो व त्यांचा रडकेपणा पार नाहींसा होतो! 'सर्व हा संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक' असा उत्साह ज्ञानेश्वरांच्या संगतीनें उत्पन्न होतो. प्रपंच परमार्थाहून मुळीं वेगळाच नाहीं ही विवेकाची भूमिका दृढ झाल्यावर दुःखाला जागाच कोठें राहिली? हें जाणून संसार ब्रह्मरूपपणानें पहावा. एकाच देहाचे अनेक अवयव तसा एकाच ब्रह्माचा हा पसारा आहे. एकाच बीजाच्या उंचनीच डाहाळ्या आहेत. जल आणिं तरंग, सुवर्ण आणि अलंकार असा ब्रह्माचा व विश्वाचा एकरूपतेचा संबंध आहे. 'जालेनि जग मी झांके। तरी जगत्वें कोण फांके?। किळेवरी माणिकें। लोपिजे काई?॥–' जग झाल्यानें काय ब्रह्म झांकलें जातें? मग जगपणानें कोण फांकलें आहे? प्रभेच्या योगानें काय माणिक लोपून जातें? 'म्हणोनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें। तैसा नोहे–उखितें। आघवें मीचि' (१४-१२८). अमृतानुभवांत हाच सिद्धांत स्पष्ट सांगितला आहे. प्रपंच हें ब्रह्माचें व्यक्त, उघडें, सोपें रूप आहे. रुक्ष आणि रडक्या लोकांनीं वेदांत रुक्ष, कठोर, रडका आहे अशी लोकांची समजूत करून दिली आहे! वस्तुतः वेदांत हा अमृताचा सुखसिंधु आहे, आनंदाचें निधान

आहे, वेदांत ‘ तो महारसु । मोदक मिरवे ’. यामुळें चार आश्रमांची व्यवस्था मान्य असली तरी ज्ञानेश्वरांचा ओढा संन्यासाश्रमाकडे नाहीं, संसारत्याग करायला ते सांगत नाहींत. संन्यास व त्याग यांचें रहस्य जाणून यथासुखें ईश्वरार्पणबुद्धीनें संसार करावा असेंच ते सांगत आहेत. स्वरूपाची बैठक न सोडतां संसार करा–‘ इंद्रियें न कोंडी । भोगातें न तोडी, ’ अहंकार मात्र नारायणाला वहा, संसार त्याचा आहे, तोच सर्व कांहीं आहे हें ओळखा म्हणजे झालें. ‘ माझ्या ठायीं सकळ असे ’ म्हणून ‘ सर्वभूतीं अभिन्ना मातें भजा ’ ( ६-३९३ ). “ जो अंतरीं दृढ । परमात्मरूपीं गूढ । बाह्य तरी रूढ लौकिक जैसा ॥ तो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥ तो कर्मेंद्रियें कर्मीं । राहाटतां तरी न नियमी । परी तेथिचेनी उर्मी । झांकोळेना ” (३ ओवी ६८ ते ७०). असा ज्ञानयुक्त कर्मयोगी असतो त्याला संसार हा बागुल नाहीं. ‘ मी माझें याची आठवण ’ विसरणें हा संन्यास अंतर्यामीं साधला म्हणजे ‘ गृहादिक आघवें । हें कांहीं नलगे त्यजावें ’ ( ५-२२ ). अंतर्मुखतेनें केलेला संसार बाधक होत नाहीं–‘ अग्निसेवा न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ( ६-५१ ). तात्पर्य, परमार्थाची बैठक स्थिर करून संसार सुखानें करावा म्हणजे प्रतिपदीं चैतन्याचा विलासच भोगायला सांपडतो. त्यांत धरणें व सोडणें नाहीं. ज्ञानेश्वरांची ही दृष्टि स्थिर असल्यामुळें त्यांनीं उपमादृष्टांतादिकांतून संसारसुखाचें चित्र कसें रेखाटलें आहे हें आपण पाहूं.

## ११ पतिपत्नींची एकरूपता.

पति आणि पत्नी हे संसाराचे दोन मुख्य घटक किंबहुना पतिपत्नींचा योग म्हणजेच संसार. उभयतांच्या एकरूपतेंत संसारसुखाची परमावधि आहे. दोन्ही मूळांत कशीं एकरूप आहेत किंवा सभाग्य पतिपत्नींचा संसार एकरूपतेंत कसा परिणत होतो हें ज्ञानेश्वरांनीं

अमृतानुभवाच्या ‘ शिवशक्तिसमावेशन ’ नामक पहिल्या प्रकरणांत प्रकृतिपुरुषवर्णनप्रसंगीं फार बहारीनें दाखविलें आहे. पुरुष व प्रकृति यांचें मूळांत जें ऐक्य आहे तेंच जीवांच्या संसारांत आहे व हें पतिपत्नींनीं ओळखून वागणें यांतच संसाराची सार्थकता आहे, व आपल्या विवाहप्रकरणांत सप्तपदी हा जो मुख्य विधि आहे त्याचें रहस्यही एकरूपता पटविणें हेंच आहे. मूळावर ध्यान ठेवून वागणाऱ्या पतिपत्नींचा संसार ब्रह्मरूप आहे. शिवशक्तींची एकरूपता प्रथम पाहूं:—

‘ जगाचीं जनकें ’ अशा आपलें ‘ अद्वैतस्वरूप दर्शित करणाऱ्या मूळ देवोदेवीला ’ वंदन असो. परमात्मा आपल्या अधिष्ठानावर एकपणा न मोडतां ‘ प्रियुचि प्राणेश्वरी ’—शिवच शक्तिरूप झाला. ‘ कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळोनीं एकी । नेदितीच कवतुकीं । एकपण फुटो ’–त्यांना स्वसुखाची एवढी आवड आहे कीं तीं त्यासाठीं द्वैतभाव दावीत असून कौतुकानेंही आपलें एकपण बिघडूं देत नाहींत. हीं दोघें ‘ जगाएवढें बाळ वियाली ’ परी दोघांतलें प्रेम उणें होत नाहीं. ‘ जया एके सत्तेचें बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें । जे अनादि एकपणें । नांदती दोघे ॥ जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची ’— दोघे एकमेकांमुळें पूर्णता पावतात. दोघे एकमेकांचे विषय आहेत व विषयीही आहेत, व एकमेकांमुळें सुखी आहेत. स्त्रीपुरुषनामभेदानें एक परमात्माच नटला आहे. “ दो दांडी ( टिपऱ्या ) एक श्रुती (नाद ) । दोहीं फुलीं एक द्रुती (परिमळ ) । दोहों दिवीं दिप्ती । एकीचि जेवीं ॥ दों ओठीं एक गोठी । दो डोळां एक दिठी । तेवीं दोघीं जिहीं । एकीचि जे ”—टिपऱ्या दोन पण नाद एक, फुलें दोन पण सुवास एक, दिवे दोन पण प्रकाश एक, डोळे दोन पण दृष्टि एक, त्याप्रमाणें सृष्टींत शिवशक्ति या दोघांची व्याप्ति आहे ! ‘ स्वामीचिया सत्ता— । वीण नेणें पतिव्रता । जियेवीण सर्व-कर्ता । कांहीं ना तो ’– पतिव्रतेला स्वामीच्या सत्तेवांचून दुसरा आधार नाहीं व पुरुषाला तिच्यावांचून सर्व-

कर्ता असें म्हणवून घेतां येत नाहीं. गूळ आणि गोडी, कापूर आणि परिमळ, सूर्य आणि प्रभा, बिंब आणि प्रतिबिंब असा शिवशक्तींचा नित्यसंबंध आहे. प्रकृतीनें आपल्या अंगानें सर्व संसाराची उभारणी करून आपल्या कर्तबगारीनें ईश्वराला ईश्वरत्व दिलें. पति मूळचा अरूप–त्याला नांव ना रूप, हें पाहून ती लाजली व तिनें ' केलें जगाएवढें लेणें नामरूपाचें '—नामरूपात्मक जगाचा अलंकार स्वतः घडवून तिनें पतीच्या अंगावर घातला ! जेथें ऐक्यपणाचाही दुष्काळ होता, तेथें या सौभाग्यवतीनें बहुपणाचा सोहळा दाखविला ! ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायांत प्रकृतिपुरुषांचा विचार सांगतांना ( ९७८ ते १०२१ ) एखादा-म्हातारा, दरिद्री, व्यंग असा नवरा व त्याची तरुण, हौसी, सुंदर, कर्तबगारीची बायको यांच्या संसाराचें मोठ्या मौजेचें चित्र उठविलें आहे ! ' प्रकृतिपुरुषांची कुळवाडी ( संसार ) । सांगता असंगडी ( अघटित ) । जे आंबुली जोडी । आंबुला खाय !–' म्हणजे ' प्रकृति उद्यम करी, पुरुष भोगी '–बायको मिळविते व नवरा खातो ! त्या दोघांची खरोखर पाहतां ' संगती ना सोये ' पण पुरुषाच्या सत्तेवर बायको हें जगडंबर प्रसवते ! नवरा कसा आहे म्हणाल तर ' अनंग तो पेंधा । निकवडा नुसधा । जीर्ण अतिवृद्धा– । पासूनि वृद्ध ' –तो अनंग म्ह. अंगहीन, निर्विकार; पेंधा म्ह. पांगळा, स्थविर, स्थाणु; द्रव्यहीन; एकाकी ( त्याच्या नात्यागोत्याचे कोणी नाहीं ); म्हाताऱ्यापेक्षां म्हातारा–पुराणपुरुष ! ' तया आडनांव पुरुष । येऱ्हवीं स्त्री ना नपुंसक ।–' ही बायको आहे म्हणून त्याच्यावर पुरुषत्वाचा आळ आला आहे. ' अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । ना नाम आथी. ' तर मग तो नसेलच; तर तसें मात्र नाहीं ! कां कीं सुखदुःखभोक्ता त्याच्यावांचून दुसरा कोणी नाहीं, व हा वया ब्रह्मांडाएवढें बाळ प्रसवली आहे ती त्याच्याच आधारावर ! तो अकर्ता, उदास, अभोक्ता आहे. ' परी इया पतिव्रता । भोगविजे. ' हिच्या रूपागुणांची चाळढाळ ( चळवळ ) मोठी, व तिला वाटेल तो खेळ ती नांवारूपाला आणते. ही अशी गुणमयी–

गुणाची बया–दुरत्यया ह्म० दुर्निवार आहे. प्रतिक्षणीं ही नित्य नवें नांवरूप घेते, ' रूपागुणांचीच ' बनली आहे म्हणाना ! हिचा उन्माद जडालाही उन्मत्त करितो. मन हें नपुंसक ना ? पण ही त्याला त्रैलोक्यभर हिंडविते. सारी व्याप्ति हिची, सर्व विकार ाहजपासून ! ही कामाची मांडवी, हिला ' माया ' म्हणतात. सारें वाङ्मय (शब्दसृष्टि) विद्या, कला, इच्छा, ज्ञान, अज्ञान, कर्म, अकर्म, बंधमोक्ष, उत्पत्तिप्रलय सारा या एका बयेचा कारभार ! साऱ्या सृष्टीचा खेळ हिचा ! अद्वय, निःसंग, निरालंब अशा पुरुषाशीं हिनें आपला संबंध जोडून संसार थाटला आहे ! हिचें सौभाग्य एवढें थोर आहे म्हणून तर त्या अनावराला हिनें आवरिलें आहे ! तो अगदींच निःसंग, कोरा, ठणठणपाळ, पण ही त्याचें सर्व कांहीं होते, अमूर्ताची मूर्ति आपण होते. " तया अनार्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । गोत होय ॥ तया अनामाचें नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया–" आतां हें कोठवर वर्णावें ? ' तया केवळा पुरुषा । नाहीं होणें भोगणें देखा '–पण हिच्या गुणसंगामुळें तो तसा भासतो !

शिवशक्तींनाच ज्ञानेश्वरांनीं अनेकवार अर्धनारीनटेश्वर म्हटलें आहे. निर्विकल्प ब्रह्मावर शिव आणि शक्ति किंवा पुरुष आणि प्रकृति या दोन कल्पना करून शास्त्रानें सृष्टिरचनेची कथा सांगितली आहे. ' अर्धनारीनटेश्वरी । जो पुरुष तोचि नारी–' ( यालाच अनुक्रमें पिता व माता म्हटलें आहे ). पुरुषाच्या अंगसंगानें ह्म० सत्तेनें प्रकृति अष्टधा होऊन सृष्टि निर्माण करिते म्हणून ते जगाचे आईबाप होत. निर्माण झालेलें जग त्यांच्याच योगें राहतें व जीवित वाढतें म्हणून त्यालाच धाता म्हटलें आहे. ' न मोडतां दोनी आकार । घडलें एक शरीर ' ( १८-५२ ) असें जें अर्धनारीनटेश्वराचें वर्णन आहे तें ' त्रिभुवनैकपवित्र व जगाचें जीवनसूत्र ' मूर्तिमंत नेवासें गांवा श्रीमहालयारूपानें ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासून

नांदत आहे, व याच मूर्तीच्या सन्निध ज्ञानेश्वरीग्रंथाची रचना झाली आहे. शिवशक्ति किंवा अर्धनारीनटेश्वर यांस उद्देशून संप्रदायांतून भजनें चालत आहेत. विठोबारखुमाई, राधाकृष्ण, सीताराम, पार्वतीपरमेश्वर यांच्या नामोच्चाराबरोबर भाविकांनीं शिवशक्तिरूपांत समाविष्ट व्हावें व शिवशक्ति हीं जेथें लीन होतात त्या अद्वयानंदांत तन्मय व्हावें असा ' विठोबारखुमाई ' इ० वरील भजनें रूढविणारांचा मूळ हेतु आहे.

## १२ लग्न व पाहुणे.

लग्नापासून संसाराला आरंभ होतो ' कुमारी तारुण्या आली व वऱ्हाडीक मांडली ' ( ७-१६६ ). ' नोवरी केळवली—' कन्या उपवर झाली म्हणून केळवणाचे किंवा गडगनेराचे समारंभ सुरू झाले ( १३-१५२ ) दारावर ' तोरण बांधलें ' आहे ( १३-४७० ), ' लग्नघटिका बुडायच्या ' बेतांत आहे ( ६-४७१ ) ' रिणावरी विवाहो विस्तारला आहे ( १८-७९५ )—कर्ज काढून थाटानें समारंभ करीत आहेत, व बोहल्यावर लग्न लागत आहे ( १८-१५७८ ), ' शेंस भरीत ' आहेत ( ४-५३ )—इ० वधूवरांना एकत्र बसवून त्यांचे मळवट भरीत आहेत व ' सुकुळीनें आपली कन्या सत्कुळींच दिधली ' ( १६-८३ ) म्हणून लोक आनंद करीत आहेत. बाळ कुसुममाळा वराच्या गळां घालण्यासाठीं तो गळा गिवसीत—शोधीत आहे (१६-२०९), ' कुळें शोधूनि दोन्ही । कुमारेंचि शुभलग्नीं । मेळविजती प्रजासाधनीं । हेतु जरी ' ( १६-३०३ )

---

१ गौरीहरांच्या पूजनांत वधू मग्न आहे ( वत्सहरण १४४, महदंबेचे धवळे ) मधुपर्काच्या वेळीं वरपूजन होतें तेव्हां ' पदककुंडलें केयूर अंगदें मोक्ताहारू ' इ. अलंकार व क्षीरोदक जावयास भीमकानें अर्पण केलें. वधूवर बहुलीं चढतात, होम करितात, विवाहप्रसंगीं ऋषिदेवाचें अर्चन होतें व विप्र मंगलोच्चार करून मंत्र म्हणतात ( धवळे ). २ ' अहेवतंतु ' म्ह. मंगलसूत्र—वधूच्या गळ्यांत मंगलसूत्र घालीत ( अमृता. २-१ ).

तरी हा चारदोन वर्षांनीं येणारा प्रसंग असून तूर्त बालवधू वडिलजनांच्या प्रेमाग्रहास्तव ‘ न सांगणेवरी । बाळा पतीसी रूप करी ’ ( १५-४६८ ) वधू पतीचें नांव घेण्यांत दंग आहे, ‘ वधूवरांच्या मेळयांत वाजंत्री वाजत आहेत ( १२-८३३ ), ‘आपणचि विऊनि दुहिता । न मम म्हणे पिता । तो सुटे–कीं प्रतिग्रहीता जावाई । शिरके ’ ( १८-२३४ )–पित्यानें कन्यादान केलें, तो सुटला, आतां पति-गृहीता–दान घेणारा जावाईच सर्वतोपरी तिचा रक्षक झाला आहे. कन्यादानांत किंवा कोणत्याही दानांत ‘ जयाचें ठेविलें तया । देऊनि होइजे उतराईया ’ ( १७-२७९ ) अशीच उदार दात्याची बुद्धि असते. ‘ कन्या उजळली ’ या समाधानांत वधूचे आईबाप आहेत (१४-६४). पाहुणे आले आहेत व पाहुणचार चालू आहेत. उकाडा होतो म्हणून ‘ विंजणें ’–पंख्याचे वारे घेत आहेत ( ८-१४९ ). ‘ वानवसा ’ माज-घर. तेथें (८-६१) पडदा आड करून (७-६३) बायकांचा घोळका गर्दी करून राहिला आहे. सर्व जातींच्या लोकांना भोजनाची अक्षत दिली जात आहे ( १८-७२३ ). परगुणें म्ह. पाहुणचार. मेजवानी म्हटली कीं पाहुणे आलेच ( ६-२ ). मुख्य यजमान व सन्मान्य पाहुणा यांच्या पंक्तीला इतरांनाही मानाचे पाट मिळतात–‘ येरांही पांतिकरा[1] जाहला मान ’–इतकेंच नव्हे तर ‘ वधूवरांचिये मिळणीं । वऱ्हाडियांही लुगडींलेणीं ’ त्यांच्या त्यांच्या अधिकारांप्रमाणें वस्त्रालंकार देऊन त्यांचा मान ठेवावा लागतो ( ११-२।३ ). आपल्या भाग्याची चढती कमान असतांना पैशाची अनुकूलता असावी, त्यांतच मोठा समारंभ किंवा सण यावा, आणि त्यांत ( जांवयासारखा ) आवडता जेवणारा असावा –‘सण सुहृद संपत्ती ’ यांचें ऐक्य असावें म्हणजे भाग्याचा उत्कर्षच तो! (१७-२६९). पाहुणा सभाग्य आणि वाढणारी

---

१ ‘ एका पांती ( पंक्तीला ) ताटें मांडीत ( अमृता. ९-४९ ) व ‘ परगुणें ( पक्कान्नें ) वोगरीत ’–वाढीत ( अमृता. १०-२४ ).

सुभगा- तेथें स्वादिष्ट पदार्थांना काय म्हणून कमी पडेल ? (१३–६४४). स्वतः उत्तम स्वयंपाक करणारी सुग्रण, आणि तीच वाढणारी, उदार हातानें वाढीत आहे-हिमटी नव्हे !-आणि जेवणारे 'रसज्ञ आणि भोक्ते !' तेथें हात काय मागें सरेल ? ( १३–११५१ ) आणि पंक्तिप्रपंच बिलकूल नाहीं– 'समर्थांचिया पंक्तिभोजनें । तळिल्या वरिल्या एक पक्वानें' ( १८–४८ ) असो. याप्रमाणें मेजवान्यांचा थाट उडून 'बहुलां लग्न लागलें (१५–५७८), अहेर झाले (१७–२८६), धेंडा नाचला (१८–११८७) [ धेंडा=वधूवरांस कडेवर घेऊन देवतांचा आशीर्वाद मागण्यासाठीं नाचणारा मनुष्य ]. 'वाट दावणारा द्विवटा'–मशाल घेऊन वरात गेली. लग्न संपलें. 'श्रुतिगौरवाच्या मांडवावर जो कामसृष्टीचा वेल वाढवितो' म्ह० विधियुक्त विवाहानें वंशविस्तार करितो तो पतिपत्नींचा पवित्र काम शेवटीं फल देणारा आहे व म्हणून भगवान् सांगतात कीं 'धर्माशीं अविरुद्ध असलेला काम हें माझें स्वरूप आहे' ( ७-५०।५१ ). विध्युक्त विवाह करून संसार करणें ही मोक्षाची पायरी आहे.

## १३ भोजनाचे पदार्थ.

ज्ञानेश्वरांच्या 'पृथ्वी आडणी आकाश हें ताट' या अभंगांत अंबवडा, खुसखुशीत कुरवडा, साखरमांडे, पापड, सांडई, शेवा, कुरवंडिया, लाडु, दहिभात इ. पदार्थांचीं नांवें आहेत. शिवाय त्याकाळीं आणखीही कांहीं पदार्थांचीं वर्णनें तत्कालीन ग्रंथांत पहावयास सांपडलीं आहेत.

'चोखाळ ताटीं वोगरिती'–स्वच्छ ताटांत वाढीत. सोजी=रवा, पक्वान्नपोळी=पुरणपोळी, मध्यें 'राजान्न' म्ह० अन्नाचा राजा भात, भात कसा तर 'आकृति आणि परिमळें । जिंतले मोगरेयांचे फुलें', शिखरिणीचे वडे=दह्यांत पीठ भिजवून तळलेले, 'पायसें आळलीं । सखाळियाची=दूध घालून आटविलेल्या खिरी, इडरी=धिरडीं, पूरिका= पुऱ्या, नाखिवा=नखुल्या, मालतिया=क्षीरविशेष, सळिवा=शेवया ( ? ), वळवट; तीळ व गुळ घातलेले मोदक, कुरवंड्या, पर्पट=पापड, सद्यस्तप्त

गोघृत=ताजें लोणकडी तूप, उपेणी=फेणी (?), अलर्कवसा=तरवस्याची भाजी, कानवले, भाकरी, भर्जिठकें=भजीं, 'दोहींभागीं कुसंबिरी पत्रशाखे'=पात्राच्या डाव्याउजव्या बाजूस कोशिंबिरी व भाज्या, तसेंच 'दधि दुग्धें तक्रें । काढिया कालवणें विचित्रें,' आवळेबेलफळांचीं तशींच आंब्याचीं रायतीं, इ. अनेक प्रकार त्या वेळच्या भोजनांत असत. भोजनोत्तर 'लवंग जातीफळ ( जायफळ ) एळा । कातगोळिया सुपरिमळा' यांनीं युक्त असे तांबूल घेत. ( ऋद्धिपूरवर्णन ५०५–४३ ).

राजे लोक सुवर्णाच्या ताटांत जेवीत व सुवर्णकलशांतून पाणी पीत. 'हेमपरियेळ' ह्म. सोन्याचें ताट–'पढळे ताटे ठाणवेया अनेके सुवर्णें । ओगरू ओगरीती अष्टादश पक्वानें । शाखा संख्या नाहीं पयें पन्हैं कालविती । आनंदितु श्रीकृष्णरावो आरोगिती' ( महदंबेचे धवळे ५५ )

महाराष्ट्रीयांत विशेषतः ब्राम्हणक्षत्रियांत मल्लविद्या, युद्धकला, शृंगार व भोजनाची आवड हे चार गुण परंपरित आहेत !

## १४ पतिव्रता स्त्री.

७. चांगली स्त्री ही 'पतिव्रता व गृहदेवता' आहे. ही ज्या घरांत नांदते तेथें 'सर्व सुखाची कुळवाडी' ( ६-४४८ ) आहे–सारे व्यवहार सुखाचे होतात. समाजांत वावरतांना 'कुलवधू लपवी अवयवांतें' ( १३–२०६ ) अशी मर्यादेनें वागते, पण पतीच्या एकांतांत 'प्रीतीची जाती लाजणें । आठवो नेदी' (१८-१३६९) पतीशीं फार मोकळ्या मनानें वागते. तारुण्यानें मुसमुसलेली स्त्री 'कीं प्रथमवयसाकाळीं, । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाआंगीं' ( १–४२ ) 'पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचूनि न स्पर्शे' ( १–१११ )–एका प्रियोत्तमावांचून सती आपला काम वाढूं देत नाहीं, पतिव्रतेचा हा मनोधर्मच आहे, 'परपुरुषें कामिली । कुलवधू आंग न घाली' ( १८–१०२७ )– कुलवधू परपुरुषाला आपल्या अंगाला बोट लावूं देत नाहीं. स्त्रीचें पतीवर प्रेम व पतिही स्त्रीचा मानसन्मान ठेवणारा, अशा दांपत्यांत पतीच्या

एकपत्नीव्रताची तर तारीफच आहे, पण पतीपेक्षां पतिव्रतेचीच धन्यता आहे: ' पाहे पा अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता ?' ( ६–१२९ ). कुलस्त्री ही धर्मपत्नी आहे. उभयतांनीं प्रेमानें, एकमतानें, ईश्वराराधनबुद्धीनें धर्मकार्य करणें व धर्मकार्यार्थच गृहस्थाश्रमाची मांड आहे अशा विश्वासानें वागणें यांतच गृहस्थाश्रमाची धन्यता आहे व संसाराचें सुखसर्वस्व आहे. ' पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ' ( १६–४५६ ) कांहीं थोड्या पतिव्रता स्त्रिया निर्भयपणानें सतीही जात असत. ' वोखटें मरणाऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोद्देशें । न गणीच सती ' ( १६–१८७ ); ' कां महासतीचे भोग । देखे कीर सकळ जग । परी ते आगी ना आंग । ना लोक देखे ' ( १६–४४० ) वृद्धपणापर्यंत सौभाग्य भोगणारी स्त्री पुण्यवंत गणली जाई; 'पतिव्रते आलें । वार्धक्य जैसें '.

## १५ अपत्यप्रेम.

वात्सल्यरस हा भक्तिरसाला पोषक असल्यामुळें ज्ञानेश्वरींत भरपूर आहे. मुलींच्या संसारांत आईबाप प्रेमळ असून श्रीमंत असले तर ' ळळेयांचे ळळे सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती '–मुलींच्या हौशी पुऱ्या होतात. पतिपत्नी संसाराला लागल्यावर सहजच ' तया दोघांस्तव पुत्र जन्मला । तो आजेयानें वाढविला ' व क्वचित् फाजील लाडानें बिघडवून टाकला असेंही होतें. श्रीमंतीमुळें ' धाया '–दाया ठेवल्या तरी जन्मदेचा जिव्हाळा दाईला वाटत नसतो. मूळनक्षत्रीं जन्मलेलें मूल अशुभ वाटतें. मूल शुभसमयीं जन्मलें, कीं साहव्या दिवशीं सटवीपूजन होऊन रात्रभर दिवा तेवत ठेवतात–' सटवीचिये रातीं । जेंवि न विसंबिजे वातीं. ' प्रतिदिनीं बाळक वाढत जातें. बारसें केलें, नांव ठेवलें. हळूहळू

१ अ. ७ ओ. ६८–७०. २ अ. १८–१७२. ३ अ. ३–२४३. ४ अ. १८–१२३. ५ अ. १८–८३७.

तें नांव ओळखूं लागतें. ‘ उपजलिया बाळकासी । नांव नाहीं तयापासीं । ठेविलेनि नांवेसी । ओ देत उठी[1]–’ बाळाच्या अंगावर आईबाप हौसेनें दागिने घालितात, ‘ आंगुळियामध्यें मुदिया ’ ( आंगठ्या ) घालतात. मुलाला बाळसें[2] येतें. बाळाला हंसायरुसायला वेळअवेळ[3] नसतो, कां कीं तें पडलें स्वेच्छ ! आई त्याला ‘ पालखी ( पाळण्यांत ) घालून परिये ’ ( झोके ) देते, ‘ स्तन्य ’ पाजिते, ‘ बुझावून ’ निजविते, खेळणीं देते, त्याच्या अंगांवर बाळलेणीं चढविते, कृपादृष्टीची त्यावर साउली करून त्याला वाढविते[4]. आई ही खरोखरीच लेंकराची कल्पलता होय. बाळाच्या अंगावर आई आपल्या नेत्रसुखासाठीं लेणीं घालीत असते– ‘ ते सुखाचे सोहळे[5] भोगणें । माउलिये दिली ! ’ बाळाच्या तृप्तीनें तृप्त व्हावें किंवा शिष्याच्या कृतार्थतेनें कृतार्थता वाटावी–‘हे सद्गुरुचि एकलेनि जाणिजे । कां प्रसन्नतिया[6] ’.

**हें चोख हें मैळ । ऐसें नेणोनियां बाळ ।**
**जें देखे तें केवळ । मुखींचि घालीं ॥**
**जैसें मातेच्या ठायीं । अपत्या अनवसर ( अवेळ ) नाहीं ।**
**स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी ॥**
**अपत्य थानीं रिगे । तयाची भूक ते मातिसीचि[9] लागे ।**
**आपुली तहानभूक नेणे । तान्हया निकें तें माउलीसचि करणें[10] ।**
**तान्हयाचें लागतां झटें । तेणें अधिकचि पान्हा फुटे ।**
**रोषें प्रेम दुणवटें । पढियंतयाचेनि[11] ॥**
**जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा**
**तरी अधिक तयाचा । संतोष आंथी[12] ॥**
**ना तरी बालक बोबडां बोलीं । वांकुडा विचुका पाउलीं ।**
**तें चोज करूनि माउली । रिझे जंवी[13] ॥**

---

१ अ. १७-३३०. २ अ. ७ ओवी १०७ ते ११०. ३ अ. १८–६६९. ४ अ. १२ ओवी १०५ ते ११०. ५ अ. १०-५८ ६ अ. ८–५५. ७ अ. १६–२५०. ८ अ. ३–२९. ९ अ. ८–१३ १० अ. ९–३४०. ११ अ. ९–१८. १२ अ. १–६४. १३ अ. ९–६.

ह्या मातृप्रेमाच्या साध्या गोष्टी सर्वांच्या अनुभवांतल्या आहेत. बालकें गृहरत्नें आहेत. घराला मुलांमुळें शोभा व आनंद आहे. नवसासायासांनीं ह्मातारपणीं मूल झालें तर त्याचें कौतुक केवढें !

**वयसेचिये शेवटीं । जैसी एकचि विये वांझोटी ।**
**मग ते मोहाची त्रिपुटी । नाचो लागे ॥**
**ह्मातारपणीं जालें । रत्न एक उवायिलें (उत्कृष्ट) ।**
**तयांचें केतुलें । मातापितरां[१] ॥**

आईच्या कोपांतही प्रेम आहे–'मातेच्या कोपीं थोकलें (गुप्त) । स्नेह आथी ।' (अ. २-८८)

**आहितीं कोपोनि सोप (वरवर) । लालनीं मऊ जैसें पुष्प ।**
**तिये मातेचें स्वरूप । तैसें होय[२] ॥**

आणि लाडकें लेंकरूं जर कालवश झालें व त्याला कोणी उचलण्यास आला कीं तिला केवढा युगांत होतो ! 'त्या निजलेल्या राजहंसाला' ती सोडीत नाहीं–'त्या एकलौतीया बाळका–। वरी पडोनि ठाके अंबिका[३]।' आईसारखेंच बापाचें प्रेम सहज असतें. 'पुत्रें मी सर्वगुणीं । जिणावा हे बापा शिराणी' (१८–१६५३) म्ह० आवड असते. 'बाळक बापाचिये ताटीं रिघे । आणि बापातेंचि जेववूं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोढवी' (९–३) 'पुत्राचे सहस्र अपराध' झाले तरी आज ना उद्या हा सुधारेल अशा आशेनें ते 'पिता साहे निर्द्वंद्व' (११–५७३) 'बाप पुढां जाय । ते घेत पाउलाची सोय'–मुलानें पितृव्रत चालवावें हा त्याचा धर्म आहे (१८–१७२२).

अत्यंत गंभीर विषय लेंकराच्या लाडिकपणाच्या भाषेंत सांगण्यांत ज्ञानेश्वरांची हद्द आहे. गीतेच्या सातव्या अध्यायाच्या शेवटीं भगवंताच्या तोंडून ब्रम्ह, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ,

---

१ अ. ६–१२१. २ अ. १३–७८८. ३ अ. १६–१२३. ४ अ. १३–५०३.

अंतकालगति अशीं सात पदें आलीं. हीं सात पदें देवाच्या तोंडून ऐकतांच, बापानें बाजारांतून कांहीं अपूर्व फळें खरेदी करून आणावींत व लाडक्या बाळानें तीं पाहण्यासाठीं, घेण्यासाठीं, चाखून पाहण्यासाठीं, समुत्सुक होऊन लडिवाळपणें बापाला झोंबावें, झोंबतांना मनोरम बालचेष्टा कराव्या, आपण नाचावें बागडावें व बापास त्याचें सुख व्हावें अशीच अर्जुनाची व देवाची स्थिति झालेली ज्ञानेश्वरांनीं वर्णन केली आहे ! खेळांत गुंतल्यामुळें बापानें आज कांहीं नवी वस्तु आणली आहे हें नादामुळें या बाळाच्या लक्षांतच आलें नाहीं–'अर्जुन तयेवेळीं मागाचि होता', नाहीं तर त्यानें 'अवधानाची अंजुळी' पुढें करून झगडून एकदम तीं सारींच फळें बापाला झोंबून घेतलीं असतीं ! बाप तरी किती वेळ तीं मुलांपासून दडवून ठेवणार ? 'नानार्थरसें रसाळें' अशीं 'तीं ब्रह्मवाक्यफळें'. त्यांचा भावपरिमळ सर्वत्र दरवळून राहिला. कृष्णद्रुमाचीं तीं वचनफळें कृपारूप मंदवायूच्या योगानें अर्जुनाच्या श्रवणरूप ओटींत अकस्मात पडलीं. 'ब्रह्मरसांत बुडालेलीं' व 'परमानंदीं घोळलेलीं' तीं सुंदर फळें पाहतांच अर्जुनाला ज्ञानाचे डोहळे होऊन तो विस्मयानें त्यांजकडे पाहूं लागला ! फळें हातांत पडल्यामुळें अर्जुनबाळ स्वर्गाला हिणवूं लागला, त्याला सुखाच्या गुदगुल्या झाल्या व तो इतरांना टुकटुक करूं लागला: 'तिया सुखसंपत्ति जोडलिया। मग स्वर्गा वात वांकुलिया। हृदयाच्या जीवीं गुतकुलिया। होत आहातीं.' नुसतीं फळें पाहूनच अर्जुन इतका तरारला, इतक्यांत त्या फळांचा स्वाद घेण्याची त्याची आतुरता वाढली–त्यानें 'रसास्वादाचिया हावा। लाहो केला'–छंद घेतला. अनुमानाच्या करतळावर तीं ठेवून तो एकदम तीं प्रतीतिमुखीं घालूं लागला ! पण तीं विचाराच्या रसनेवर विरघळत नाहींत व तर्काच्या दांतांनीं फुटत नाहींत असें त्यास कळून आलें ! अर्जुन चमत्कारला व त्यानें देवाच्या तोंडाकडें पाहिलें. हीं 'अनुच्छिष्ट' फळें खायचीं कशीं हें देवानेंच शिकविलें पाहिजे असा त्याच्या पाहण्यांत अर्थ होता (अ० ७ ओवी १८५ ते १९७). असो. ज्ञानेश्वरांच्या सहजसिद्ध प्रेमळपणामुळें हें सर्वावयवरूपक किती बहारीचें झालें आहे !

आईबापांचें हें दिव्यप्रेम स्मरून कुलवंत व भलीं मुलें त्यांच्याशीं यावज्जीव प्रेमादरानेंच वागतात. 'आईबापाशीं वांकडा आणि जगासि गोड' त्याला ज्ञानोबांनीं मूर्ख एवढाच सौम्य शब्द लावला आहे ( १८–५९५ ). वस्तुतः ' सकल तीर्थांचिये धुरे । जियें कां मातापितरें । तया सेवेसी कीर शरीरें । लोण कीजे !' ( १७–२०७ ).

## १६ गुरुभक्ति.

सद्गुरूची गोष्टच वेगळी, पण लौकिकविद्या देणाऱ्या लौकिक गुरू-विषयींही प्रेमादर असणें हा कुलवंताचा स्वभावधर्म आहे. अर्जुनाला धनुर्विद्या द्रोणाचार्यांपासून मिळाली होती. त्यांच्याविषयीं ते राजकीयदृष्ट्या विरुद्ध पक्षांतले असले तरी अर्जुनाचा अद्भुत प्रेमभाव होता. अर्जुन म्हणतोः ' मी पार्थ द्रोणाचा केला । येणें धनुर्वेद मज दिधला ' म्हणून त्याशीं म्या स्वप्नींही वैर करणें अनुचित आहे; समुद्र गंभीर पण तोही प्रसंगीं खवळतो, पण माझ्या द्रोणाचार्यांच्या मनाला क्षोभ ठाऊक नाहीं, ते मूर्तिमंत कृपा आहेतः ' हा कारुण्याची आदी । सकळ गुणांचा निधी । विद्यासिंधु निरवधि । अर्जुन म्हणे ॥ तो येणेंमानें महंत । वरी आम्हांलागीं कृपावंत !' अर्जुनाच्या हृदयांत जें हें गुरुभक्तीचें बीज होतें तेंच त्याच्या यशाचें खरें कारण होय.

## १७ तरुणांचे खेळ व विनोद.

महाराष्ट्रीय तरुणांत व बालांत झोंबाझोंबी म्ह० कुस्ती, कोलकाठी म्ह० दांडपट्टा, भिंगोरी, कोलती, व चेंडू हे बाहेरचे व सारी ( सोंगटी ) हा बैठा अशा सहा प्रकारच्या खेळांचा प्रघात होता असें ज्ञानेश्वरीवरून दिसतें.* कुस्ती, कोलकाठी व सोंगटी यांचा ११ व्या अध्यायांत, भिंगोरी व कोलती यांचा १५ व्यांत, व चेंडूचा १६ व्यांत उल्लेख आहे. '**भिंगोरी** निधिये पडली । ते गमे भूमीसी जैसी जडली । ऐसा वेगातिशय भुली

* ' गोफण उडवणें ' हा शब्दप्रयोग एका अभंगांत आला आहे. त्यांत ' सारीपाट 'ही आहे.

हेतु होय ' ( १५–१३६ )–भिंगोरी म्ह० भोंवरा हा जमीनीवर टाकतांच अत्यंत वेगानें फिरूं लागला कीं भूमीला जडल्यासारखाच दिसतो. **कोलती** भोवंडितां अखंड व चक्राकार दिसते ( १५–१३७ ). ' चेंडू भूमी हाणिजे । हें नव्हे–तो हातां आणिजे ' ( १६–१०० ). चेंडू ( कंदुक ) उदकावर आपटल्यानें हातीं येत नाहीं ( १७–२८० ).चेंडूबरोबर लगोऱ्यांचाही उल्लेख आहे. ' आपणचि आडखिळा कीजे । तो कौतुकें विंधोनि पाडिजे ' ( ११–४७८ )–आपणच लगोऱ्यांची रास–निशाण–उभी करून आपणच ती नेम धरून पाडतो.

## १८ वृक्षवेली.

ज्ञानेश्वरीसृष्टींत वनोपवनें, पुष्पवाटिका, नानातऱ्हेच्या वृक्षवेली व विविध प्रकारचीं फुलें व फळें यांचीं शीतल व नयनमनोहर दर्शनें घडत आहेत. ' जेथ अमृताचेनि पाडें । मूळाही सगट गोडें । जोडतीं दाटें झाडें । सदा फळतीं ॥ पाउला पाउला उदकें । वर्षाकाळावीण अति-चोखें । निर्झरें कां विशेखें । सुलभें जेथें ॥ हा आतपही ( ऊन ) आळुमाळ । जाणिजे तरी शीतळ । पवन अतिनिश्चळ । मंद झुळके ' ( अ० ६ ) अशीं ' जनांच्या पायरवानें न रुळलेलीं ' व योगाभ्यासाला सोइस्कर अनेक रम्य स्थळें आहेत. ज्ञानी हा रुक्ष नसतो. ' जीवें प्राणें झाडें तया पढियंती ' म्ह० प्रिय असतात ( १३–२०० ). वृक्षांच्या दर्शनानें परोपकाराचा केवढा उपदेश मिळतो: ' फुलीं फळीं छाया । मुळीं पत्रीं ही धनंजया । वाटेचा न चुके आलिया । वृक्ष जैसा ' ( १६–८६ )–आतिथ्य वृक्षापासूनच शिकावें. वृक्षांत अनेक जातींचे व गुणांचे लहानमोठे वृक्ष असतात. एकाच उदकापासून सारे वृक्ष होतात, पण बीजधर्मानुरूप त्यांचीं रूपें व गुणधर्म भिन्नभिन्न होतात ( १५–४१८ ). मूळाशीं असलेलें उदक शेंड्यापर्यंत प्रगट दिसतें, ' वृक्षासी पाताळीं ।

१ ' फळ विऊनि फूल सुके । फळ नाशे रसपरिपाकें । तोही रस उपखे ( वेंचतो ) । तृप्तिदानीं ' । ( अमृता० ५–२२ ) ह्या सुंदर ओवींत वृक्षाचा त्याग ह्म. दातृत्व फार नामी वर्णिला आहे.

जळ सांपडे मूळीं । ते शाखांचिये बाहाळीं ( शेंड्यांवर ) । वरीही दिसें ' ( १३–१८० ), म्हणून ' शाखा फळें यावया । शिंपिजे मूळ ' (१६-१११). सर्व वृक्षवेलींच्या मूळाशीं उदक एकच असतें, पण तें ज्या बीजाशीं संलग्न होतें त्याचा गुण घेऊन उठतें. उदाहरणार्थः ' जीवनचि उदक । परी विषीं होय मारक । कां मिरयामांजीं तिख । उंसीं गोड ' ( १७-६८ )

मोठाले आणि पवित्र वृक्ष म्हणजे ' कल्पद्रुम हन पारिजात । गुणें चंदनही वाड विख्यात । तरी यया वृक्षजातांआंत । अश्वत्थ तो मी ' ( १०–२३५ ). पंधराव्या अध्यायांत प्रपंचवृक्षावर अश्वत्थाचें सुंदर रूपक केलें आहे. तेथें वृक्षाची परिभाषा पाहण्यासारखी आहे. आर, अग्र, आगारें, टका, डिरी, आरवसा, कोंभ, कोंभारा हे शब्द येथें अंकुर या अर्थी योजले आहेत. आठुळैजे कंद ह्म. आठुळी बनलेला, घट्ट झालेला कांदा, तिवणा ह्म. तीन पानी, उजू ह्म. सरळ डाहाळिया, वाल्हेदुल्हें ह्म. जोडपान, थोरवनें-मोठालीं पानें व अग्रवनें–पुढचीं पानें, बुडसळें–शुष्क-काष्टें, तळवुडे–बुंधे; शाखा थोरावती, परस्परें गुंफती, उंचावती, पालेजती-पैस घेती, इ. ( अ० १५ ओवी ४५ ते २०९ ).

परार्थ झिजणारा व संगतीच्या वृक्षांना आपले गुण देऊन उद्धरणारा **चंदन** ह्याची सर्व वृक्षांत मोठी प्रतिष्ठा आहे. चंदनाच्या फांद्या ह्यां फळाचा हेतु न धरितां सरळ वाढतात ( १८–६३१ ); सज्जनाला छळक जवळच भेटतात त्याप्रमाणें चंदनाच्या मुळीला सर्प वेटाळतात ( ३–२६० व ११–७५ ); चंदनाच्या संगतीच्या झाडांनाही सुवास येतो, ' चंदनें वेधिलीं झाडें । जाली चंदनाचेंहि पाडें ' (१८–१७३२).

**चंदन** आणि **चंद्र** यांच्या तुलनेनें चंद्रापेक्षांही चंदन श्रेष्ठ कसा वर्णिला आहे तें पहाः— हालाहलविषप्राशनानंतर शंकराच्या अंगाची लाही झाली ती शमविण्याकरितां ' निववील ऐशिया आशा '– शंकरांनीं अर्धा चंद्र मस्तकावर निरंतर धारण केला; ' तेथ निवविता आणि सगळा । परिमळें चंद्राहूनि आगळा । तो चंदन केवि अवलीळा । सर्वांगी न पवे ? '–मग चंद्राप्रमाणेंच शीतलता देणारा असून संपूर्ण

( अर्धा नव्हे ) आणि शिवाय परिमळ देणारा असल्यामुळें चंद्राहून श्रेष्ठ ( वदान्य ) असा हा चंदन शंकराच्याच काय पण साऱ्या विश्वाच्या सर्वांगाच्या ठिकाणीं–( केवळ मस्तकाच्याच नव्हे ) लीलेनें जडणारा चंदन चंद्राहून श्रेष्ठ कसा बरें नव्हे ? ( अ० ९ ओवी ४८४ ते ४८७ )

**कमल**,कमलिनी,नलिनीचा दृष्टांत पुष्कळदां घेतला आहे. प्रेमळ भक्त आपल्या हृदयांतला भक्तिभावोल्हास आंत न सामावल्यामुळें तो इतरांसही देऊन आनंद देतो व स्वतः त्यांत रंगून तन्मय होऊन जातो हें सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात: ' जैसी कमळकळिका जालेपणें। हृदयींचिया मकरंदा राखों नेणे। दे रायां रंकां पारणें। आमोदाचें ॥ १२७॥ तैसाचि मातें विश्वीं कथित। कथिलेनि तोषें कथूं विसरत। मग तया विसरामाजीं विरत। आंगें मनें ॥ १२८॥ ' ( अ. १० ) **केळी**चा बांधा पोकळ व हळू दिसतो पण केळ फळास आली कीं भरीव व रसाळ वाटतो ( १३–२१३ ). केळींत उत्पन्न झालेला कापूर परिमळानें कळतो ( १–१८३ ). केळीला फळाचा घड आला कीं केळीची वाढ खुंटते ( १८–९६८ ). दुर्वेचा डिरु म्ह. दूर्वांकुर ( १४–२८ ). कापूर आंत दाटला कीं कापूरकेळीचीं सोपटें उकलतात व त्यांतून कापुराचे कण टिबकतात ( ११–२५० ).

**निंब**--' निंब जिभे कडवट। हिरडा पहिलें ( प्रथम ) तुरट ' ( १८–१८६ ) ' निंबोळियेचें पीक। वरी गोड आंत विख' (१४-२६४). निंबाचीं फळें मिळालीं कीं कावळ्यांना ती मेजवानीच वाटते (९-४३८). **हिवराची** सावली दाट असते तरी सज्जन तिच्या सावलीस जात नाहींत ( ९-४३७ ). **इंद्रावणी**–कडुवृंदावनाचें फळ ( १४-२६३ ). **हिंग** अंगच्या घाणीवर रुसला तरी सुगंधत्व कोठून आणील ? ( १८–२२ ). **बोरांटी**-बोरीचें झुडुप (१८-६५५). **कनकाचें**-धोतऱ्याचें फळ,'आंत माज बाहेर कांटे!'(१८-६५८) **लसण**-याला दुर्गंध सोडीत नाहीं (१८-७५७), **आंबे**–चूतफळें (१८-४७३), **साबर** व **भेंड**. पोकळ व निरुपयोगी झाडें ( १८–५७५ ), **द्राक्ष**–द्राक्षलतेला मांडव लागतो ( १८–१६७० ).

द्राक्षाच्या वेलीला दूध घालतात: 'जैसें द्राक्षीं दूध घातलें। तेव्हां वायां गेलें गमलें। परी फळपाकीं दुणावलें। देखिलें जेविं' (१५–५९२) **तुळस**–' फळा फुला छायेचा आश्रय नाहीं' अशी ही तुळस असूनही तिचा सात्विक पुरुष आदरानें प्रतिपाळ करितात (१७–१८३), पण राजस लोक मात्र द्राक्षवेलीला दूध घालतील पण तुळशीला पाणीहि घालणार नाहींत (१८–५९६)! **नागवेली**–ही फळें न येतांही सफळ आहे (१८–६३२). **बेलाचीं** त्रिदळें मिळालीं नाहींत तर शंकराला निर्गुडीचीं पानें–**गंगावती**–वाहतात (९–१४), **जातीचें** मुकुळ ह्म. जुईची कळी तिख पण मवाळ (मृदु) असते (१६–११५). **मोगरी**–वसंतागमींची वाटोळी मोगरी–' गुंफिली कीं मोकळी। उणी न होत परिमळीं' (१८–१७४१), **मालतीपुष्पाच्या** कलिका नाकाला परिमळ देतात आणि काय डोळयांला सुख देत नाहींत ? (७–२०८) **जाईच्या** फुलाचें उमलणें म्हणजेच सुकणें[1] होय (१८–२५७)[2] तळहातीचा **आवळा** (१४–२६९). **शेवंतीला**[3] सुगंधी फुलें येतात पण तिला कांट्याच्या फांद्या असतात (१८–१८७)

## १९ पशुपक्षी व कृमिकीटक.

सिंह, हत्ती, गाय इ० पशु; चकोर, चातक, राजहंस, चक्रवाक, पोपट, कावळा इ० पक्षी व सर्प, कासव, बेडूक, पतंग, माशी इ० इतर प्राणी हे ज्ञानेश्वरीसृष्टींत यथेच्छ संचरतांना दिसतात ! हे सर्व आपापल्या स्वभावधर्मानुरूप वावरतांना दिसतात. हे प्रदर्शनांत व्यवस्थेनें व हारीनें मांडलेल्या प्राण्यांसारखें येथें दिसत नाहींत, येथें कृत्रिमपणा नाहीं. ईश्वरीसृष्टींत हे जसे यथेच्छ आपापल्या गुणधर्माप्रमाणें वागतात तसाच येथेंहि प्रकार आहे. येथें शास्त्रीयचिकित्सा नाहीं; पण शास्त्र व अनुभव यांचा जोडरंग आहे. शास्त्राचा रूक्षपणा नाहीं. काव्याची माधुरी आहे.

---

१- ' फांकणें तें सुकणें जाउळाचें ' ( अमृता० ४–८ ).

२ जाईच्या फुलाचें लेणें ( पोषाख ) ( अमृ० ९–४१२ ).

३ हजार पाकळ्या उकलल्या तरी सेवंतीचें फूल एकच (अमृता० ९–७).

प्रत्येक प्राण्याचें पूर्ण वर्णन नाहीं पण त्याच्या रूपरंगाच्या छटा उमटल्या आहेत, व अपूर्णतेमुळेंच सूचकता व्यंजित झाली आहे. प्राचीन संस्कृत काव्यांतले कविसंकेत आदरिले आहेत तरी त्यांत न आढळणाऱ्या जीवांचाहि येथें उल्लेख आहे. जुन्या कल्पनांना स्वतंत्र प्रतिभेचा उजाळा मिळाला आहे, नवीन कल्पना नवीनपणामुळें चित्तवेधक झाल्या आहेत.

ज्ञानेश्वरांना गोदापरिसर फिरायचे प्रसंग बरेच आले. गोदावरीचा उगम ज्या त्र्यंबकेश्वराजवळील ब्रह्मगिरि पर्वतावर झाला आहे त्या ब्रह्मगिरीचा तीन वेळ नामोल्लेख ज्ञानेश्वरींत आला आहे. एकांताचें बहारीचें वर्णन ६ व्या अध्यायांत (ओवी १६३ ते १८०) आलें आहे. एकांताची, वनविहाराची ज्ञानेश्वरांना प्रीति अत्युत्कट होती. 'हिरवे चारीं गुरूं। विसरें मागील मोहर (मार्ग) धरूं। वारेलगें पाखरूं। गगनीं भरें' (१३–३१५) 'चक्षुपक्षेंवीण पिलूं' (१३–४००) 'अजातपक्षा-चेनि जीवें पक्षिणी जिये' (९–३३९) अशी कोमल शब्दरचना किंवा 'उजेडत्या पहांटेस पक्ष्यांचे डोळे उघडून ते बाहेर पडतात' (१६–३) असले सरस उद्गार त्यांची तीव्र अवलोकनशक्ति व प्रेमळ रसिकता व्यक्त करितात. त्यांचें शिकारीचें वर्णन व पोपट धरायची युक्ति पाहून ह्या पुरुषाचा जन्म कां शिकारींत व पक्ष्यांच्या मागें लागण्यांत गेला कीं काय असें क्षणभर मनांत येऊन अत्यंत आश्चर्य वाटतें ! पारधी राघूंना कसे पकडतात, बगळा आपल्या भक्ष्यावर कशी झडप घालतो, इत्यादि गोष्टी अगदीं पाहिल्यासारख्या त्यांनीं लिहिल्या आहेत !

सूर्यचंद्रापासून असंगत्वाचा बोध घेण्यास ते सांगतात. "तारागणीं लोपावें। सूर्यकांतीं उद्दीपावें। कमळीं विकासावें। जावें तमें ॥ यया कोणाचें कांहीं। **सविता** देखत नाहीं." ...(१४–१४१); 'समुद्राचि भरती। सोमकांतचि द्रवती। कुमुदें विकसती। **चंद्र** तो उगा' (१४–३४७). सूर्य, चंद्र, मेघ, समुद्र, यांच्याशीं संबंध असलेले शेंकडो दृष्टांत त्यांनीं अनेकवार घेतले आहेत व ह्या उदात्त वस्तूंच्या संबंधानें

दृष्टांतांला उदात्तत्व व मनोहारित्व आणलें आहे. पशुपक्षी कृमिकीटकांचाही त्यांनीं दृष्टांतद्वारां अध्यात्मसिद्धांतसंस्थापनेला उत्कृष्ट उपयोग करून घेतला आहे. त्यांनीं पशुपक्षी–कीटकांच्या दृष्टांतांच्या साह्यानें अध्यात्मरंग भरला आहे. त्यांना काव्य लिहावयाचें नव्हतें, अध्यात्मबोध जगाला द्यायचा होता, ब्रह्मानंदाची खाण उघडावयाची होती. **त्यांचे सारे दृष्टांत, साऱ्या उपमा, सारे अलंकार, सारे रस एका आत्मरसासाठीं आहेत.** अंतराळांत उडणाऱ्या पक्ष्यांचा दृष्टांत त्यांनीं अध्यात्माकडे कसा लावला आहे याचें एकच उदाहरण घेतों. विश्वांतर्यामी परमात्म्याला भजायचें सोडून लोक तदंगभूत देवतांना भजतात हें अमृताच्या सागरांत बुडी मारून तोंड घट्ट मिटून घ्यायचें व मनांत थिल्लरोदकाचें चिंतन करायचें यासारखें असमंजसपणाचें आहे हें सांगून ज्ञानेश्वर विचारतात कीं, अमृत होऊन अमृतांतच सुखरूप कां न नांदावें ? ‘ तैसा फळहेतूचा पांजरा। सांडूनिया धनुर्धरा । प्रतीतिपाखीं चिदंबरा। गोसाविया कां नोहावें ? ॥ १५४ ॥ जेथ उंचावलेनि पवाडें। सुखाचा पैसारु जोडे। आपुलेनि सुरवाडे। उडों ये ऐसा ॥ १५५ ॥’ ( अ० ७ )–फळहेतूचा पिंजरा टाकून स्वानुभवरूप पंखांनीं चिदाकाशांत स्वेच्छ संचार कां करूं नये ? चिदाकाशाचे स्वामी आपण कां होऊं नये ? तेथें आपणांस फारच उंचीवर उडण्याचें सुख मिळेल !

‘ माझीं नानावर्णांची व आकृतींचीं दिव्य अशीं सहस्रावधि रूपें आहेत ’ असें म्हणत भगवतांनीं आपलें विश्वरूप अर्जुनास दाखविलें ( गीता अ० ११–५ ). ह्यावर भाष्य करितांना ज्ञानेश्वरांनीं अनेक प्राण्यांचें मोघम वर्णन केलें आहे तेंही अत्यंत सुरस आहे. ह्या सृष्टींत मनुष्य, पशु, पक्षी, कृमि, कीटक असंख्यासंख्य आहेत. कांहीं कृश कांहीं स्थूळ, कांहीं ऱ्हस्व म्ह० ठेंगणीं व कांहीं विशाळ, कांहीं पसरट व सरळ आणि कांहीं अमर्याद मोठीं आहेत. कांहीं अनावर प्रांजळ, कांहीं चंचळ. तर कांहीं निष्क्रिय, कांहीं उदासीन तर कांहीं स्नेहाळ व कांहीं कोपिष्ट, कांहीं आपल्याच धुंदींत तर कांहीं

सावध, कांहीं उदार तर कांहीं कृपण व कांहीं क्रुद्ध, कांहीं शांत तर कांहीं उन्मत्त, कांहीं स्तब्ध तर कांहीं आनंदभरित, कांहीं गर्जना करणारीं तर कांहीं निःशब्द; कांहीं अभिलाष बाळगणारीं तर कांहीं विरक्त, कांहा जागृत तर कांहीं निद्रित, कांहीं संतुष्ट तर कांहीं तडफडी, कांहीं सशस्त्र तर कांहीं अशस्त्र, कांहीं रौद्र व भयानक तर कांहीं प्रेमळ किंवा आपल्याच समाधींत मग्न; कांहीं शृंगारचेष्टांत मग्न, कांहीं रक्षणकार्यांत दंग, तर कांहीं संहारकार्यांत मस्त आणि कांहीं केवळ साक्षिभूत;-असे अनंत प्रकारचे प्राणी आहेत! सर्वांचे वर्ण तरी एकसारखे आहेत काय ? छे ! वर्णही नानाविध आहेत ! कांहीं तप्तसुवर्णासारखे दैदीप्यमान, कांहीं कपिल म्ह० पिंगट वर्णाचे, कांहीं शेंदरानें माखलेल्या आकाशासारखे ! कांहीं माणकांनीं खचल्या-प्रमाणें चकाकणारे, कांहीं अरुणोदयासारखे कुंकुमवर्ण, कांहीं शुद्धस्फटिका-सारखे सोज्ज्वळ, कांहीं इंद्रनीलमण्यासारखे नीलवर्णाचे, कांहीं काजळा-सारखे काळेकुळकुळित, कांहीं रक्तवर्ण म्ह. तांबडेलाल, कांहीं दिव्य-सुवर्णासारखे पिंवळे, कांहीं कृष्णमेघासारखे सांवळे, कांहीं चाफ्याच्या फुलाप्रमाणें गौरवर्ण, कांहीं दूर्वांप्रमाणें हिरवे, कांहीं तप्त तांब्याच्या पत्र्या-प्रमाणें तांबडे, कांहीं श्वेतचंद्राप्रमाणें पांढरे, असे नाना आकृतींचे व वर्णांचे असंख्य प्राणी आहेत ! लज्जेनें मदनही ज्यांना शरण येईल इतके कांहीं अतीव सुंदर आहेत. कांहीं रमणीय बांध्याचे आहेत, कांहींचे वर्ण तुळतुळीत असून चित्तवेधक आहेत, जणूं हीं शृंगारलक्ष्मीचीं भांडारेंच उघडलीं आहेत ! कांहीं पुष्ट व मांसल, कांहीं शुष्क आणि विक्राळ, कांहीं उंच मानेचे, कांहीं विकट व विताळ, अशा नानाविध आकृतींचे व वर्णांचे असंख्य प्राणी आहेत; आणि सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास यापैकीं एकेकाच्या अंगप्रत्यंगावर पुन्हां अशीं अनेक ब्रह्मांडें आहेत ! अशीं अपार आणि विशाळ हीं रूपें आहेत ! हीं मोजावींत कोणी कशीं व केव्हां ? ' जयातें सांगावया वेद बोबडे । पाहावया काळाचेंहि आयुष्य थोकडें । धातयाही परी न सांपडे । ठाव जयांचा ' आणि हें ' देखें आघवें भरिलें । माझ्याचि रूपीं ' ( ११ ओवी १३३ ते १४६ ). कोणत्याही प्राणि-

नगर वाचनालय सातारा

शास्त्राच्या ग्रंथांत इतकें व्यापक, इतकें सुंदर, इतक्या ओजस्वी शब्दांत इतकें बहारीचें व्याख्यान पहावयास मिळायचें नाहीं.

## २० सिंह आणि गाय.

पशूंपैकीं पराक्रमाविषयीं **सिंह** व वात्सल्यभक्तीविषयीं **गाय** ह्या दोघांना ज्ञानेश्वरीसृष्टींत विशेष मान आहे. हत्तीचा 'मातलेला कुंजर' (१६–२२५), ' आंधळें हातिरूं माजलें तर अफाट धांवतें ' ( १३–६११ ), लवणाची कुंजरी सागरांत स्नानार्थ नेली तर नाहींशी होते ( १५–३१८ ), अशा प्रकारें चार दोन वेळां उल्लेख आला आहे.

**सिंह व हत्ती:—सिंहा**च्या वर्णनांत मात्र सिंहाचा दुर्बलशत्रु म्हणून हत्ती बराच वेळ येतो. ' सिंहाचिया हांका। युगांत होय मदमुखा '– सिंहाच्या हांकेबरोबर उन्मत्त हत्तीला प्रळयकाळ पातलासें होतें ( २–२१५ ) * ' जैसा गजघटां आंत। सिंह लीला विदारित'–हत्तींच्या कळपांत शिरून सिंह लीलेनें हत्तींना फाडतो ( १–१६२ ), ' रिपुगजपंचाननु कर्णवीर ' ( १–१०५ ) कलुषकरिकेसरी ( १७–४२३ ) इ. ठिकाणीं बिचाऱ्या हत्तीचा त्याला अपमानास्पद अशाच रीतीचा उल्लेख आलेला आहे व पराभव खाणाऱ्या कोणा जीवाचा ह्या सृष्टींत अपमान होत नाहीं आणि पराभव करणाऱ्या नित्यविजयी वीराचा गौरवही कोठें होत नाहीं ? आणि त्यांतही तो एकाकी वीर असेल तर त्याचें कौतुक सर्वत्र होतें. सिंह हा ' स्वयंभ जीवें लाठ '—अंगानेंच पराक्रमी व ' सावायेवीण उद्भट '–कोणाच्या साहाय्यावांचूनही शूर असल्यामुळें आपल्या पाठीशीं कोणी जोडीदार आहे कीं नाहीं हें न पाहतां स्वतःच्या सामर्थ्यावर शत्रूंवर उडी घालतो ( १८–८५६ ). हत्ती सदा मदोन्मत्त, असलाच तर थोडासा कळपांत शूर, पण सिंहापुढें सर्वदा अपेशी असा आहे आणि सिंह एकाकी शूर व अप्रतिमल्ल आपल्या सारखा

* गर्जना करून सिंह पुढें आला तर उचललेला पाय कांहीं हत्तीला खालीं टेकवत नाहीं. ( १८–७३६ )

दुसरा त्याला कोणी खपत नाहीं. विहिरींत आपलेंच प्रतिबिंब पाहून येथें दुसरा कोणी सिंह आहे अशा भ्रमानें खवळतो व मोठ्या आवेशानें आंत उडी टाकतो ( १५–४८७ ). ह्या मूढपणांत सुद्धां सिंहाचा एक प्रकारचा गौरवच आहे !

हत्ती व सिंह यांच्या मानानें **कोल्हा** हा कोठेंच नाहीं. शेताच्या कडेस तृणाचा बाहुला ठेवलेला पाहिला कीं हाच राखणदार आहे अशा भ्रमानें कोल्हा फसून जातो (१८–४३८). सिंहाप्रमाणेंच कोल्हा मूढ आहे कारण दोघेही पशु आहेत ! मूढत्व हें पशुत्वाचें लक्षण आहे. पण सिंह शूर तर कोल्हा भेकड, शूराच्या हृदयाला मत्सर स्पर्शत नाहीं. कोल्ह्याला चंद्राचा सौम्य प्रकाशही सोसवत नाहीं, त्याला चांदणें आवडत नाहीं. ( ४–२३ ), ' चंद्र देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ' ( १६–२३८ ) **मांजरी** ( लासी, भाटी )–तिचा जीव किती व पराक्रम कसचा ! आपल्यापेक्षां लहान जीवांना फाडायचें व आपल्या पिलांच्या मोहानें त्यांना पोसायचें ! ' पै मोहाचेनि सांगडें ( योगानें ) । लासी पिलीं धरी तोंडें । तेथ दांतांचे आगरडें ( अग्रें ) ।लागती जैसे ' (१३–२५२ ). कुत्रें याला ग्रामसिंह म्हटलें आहे. (१३–६८१ ). नुस्तीं हाडीं चघळणारें कुत्रें ' पोटालागीं सुणें । उघडें झांकलें न म्हणे ' ( १३–६८० ) नगरांत कुत्र्यांनीं फार त्रास दिला कीं, तीं शून्यग्रामीं–ओसाडगांवीं नेऊन सोडीत. (१८–५५५). याशिवाय कोनाकोपऱ्यांत कोठें आढळणारे प्राणी म्हणजे ' **गाढव** तीर्थीं न्हाणिला ' ( १३–४६९ ), ' **बैल** तेथें करबाडें ( १४–२४१ ), **शेळी** हवी तशी चरत जाते ( १४–२३० ), मोकाट सुटलेला **पोळ** ( १३–६९८ ), अजगर ( १३–५१६ ), कामासक्त गाढवाचें लाथांनीं नाकाडें फोडणारी व जीवांच्या विषयासक्तीचें दैन्य जाहीर करणारी **गाढवी** ( १३–७०६ ) कोणतेच अवयव चांगले किंवा सरळ नसणारे **करे** किंवा कऱ्हे ह्म. उंट हे होत. चांचल्यांत मनाची बरोबरी करणारें माकड ( १५–२४४ ) ' मर्कटाला माजवण देणें ' ( ३–९ ) ' वाघाच्या रानांतला वसु म्ह. **पोळ** ( १३–७६४ ) इ० इ०

**गाय**—हिंदुमात्राला पूज्य व प्रिय असलेली जी गाय ती ज्ञानेश्वरी सृष्टींतही तशीच प्रिय व पूज्य आहे. तिच्या दुभत्याची उपयुक्तताही पुष्कळ दाखविली आहे. गाईचें व वत्साचें अन्योन्यप्रेम अपूर्व असतें. ह्या परस्परांची अनन्यता देवाभक्तांच्या अनन्यभक्तीकडे लावून भक्तिरसाला ज्ञानेश्वरांनीं वात्सल्यरसाची जोड दिली आहे. दुधांत साखर आहे.

**(१) पाहे पा दुभतेयाचिया आशा। जग धेनूसि करितसे फांसा।**
**परी दोरेवीण कैसा। वत्साचा बळी ॥ १२० ॥** ( अ० ७ )
**कां जे तनुमनप्राणें। तें आणीक कांहींच नेणें।**
**देखतसांते ह्मणे। हे माय माझी ॥ १२१ ॥**
**तें येणें मानें अनन्यगती। म्हणऊनि धेनूहि तैसीच प्रीती।**

**( २ ) वांसरूं देखिलियाचि साठीं। धेनु खडबडोनि मोहें उठी।**
**मग स्तनामुखाचिये भेटी। काय पान्हा धरे ! ॥ ११-४० ॥**

**( ३ ) वत्स धालयाही वरी। धेनू न वचावी दूरी।**
**अनन्यप्रीतीची परी। ऐसी आहे ! ॥ १८-७८ ॥**

**गाईचें दूध**—'पाहे पा दूध पवित्र आणि गोड' आहे ( ९–५७ ). विरजणानें तेंच दहीं होतें. 'दूध मुरालें स्वभावें। तेंचि दहीं' ( ९–६४ ) मंथनानें त्याचेंच ताक व लोणी आणि शेवटीं तूप होतें. तूप झाल्यावर तें दूधपणाला येत नाहीं(८–२०२).'करितां दधिकसडणी ( घुसळण )।नवनीत निर्वाणीं दिसे जैसें ( २–१२९ ). दूध तापतांना त्यावर साय जमत असते पण दूध[१] ढवळीत बसलें तर ती दुधांतच मुरते ( १४–७४ ). 'ताकौनियां काढिलें। लोणी माघौतें ताकीं घातलें। परी न घेपेचि कांहीं केलें। तेणें जेवीं' ( १८–१४०६ ) 'मथुनि लोणी घेपे। तें मागुतीं ताकीं घापे' ( १८–४१५ ) त्याप्रमाणें अद्वयत्वें जीव विवेकानें मोकळा झाला आणि मग संसारांत राहिला तरी तो लिप्त होत नाहीं. गाईबद्दल बऱ्याच गोष्टी ज्ञानेश्वरींत आल्या आहेत. गाय धड व गोमटी असली तरी सांजवणीची म्ह० दोहनाची हातवटी माहीत असली तरच दूध देते ( १८-१४८३ ).

१ 'सायेचिये चाडें। डहुळे दुधाचें भांडें' तर साय नाहींशी होते ( अ. ७-७४ ).

मेलेल्या वांसराचा भोंकसा ( पेंढा आंत भरून वर कातडीनें कृत्रिम बनवलेल्या वांसराचा पांजरा ) गाईपुढें ठेवून चतुर पुरुष गाईचें सर्व दूध काढून घेतात ( १६-३८६ ). खडाण-अल्प दूध देणारी पण लाथाळ गाय, ही पान्हा आला तरी लपविते ( १३-२०५ ):- खुरखोडी-लाथाळ गाय ( १३-६३८ ) धर्मधेनु-देवाला सोडलेली गाय ( १३-६२९ ). पहुरणी नांवाचा एक किडा गाभण गाईच्या स्तनास लागला तर ती व्याल्यावर दूधच देत नाहीं ( १७-२४८ ).-' पहुरणीं जें दुहिलें। तैं गुरूं न दुभेचि व्यालें.' कामधेनू घरीं असल्यावर अप्राप्य काय आहे? ( १-७९ ). ' कामधेनू ऐसी माय। सदैवा जया होय। तो चंद्रही परी लाहे। खेळावया!' ( ५-१० ) कृष्णार्जुनांना गायवत्साचा गोड दृष्टांत देऊन ज्ञानेश्वर म्हणतातः—

**'वत्साचेनि वोरसें। दुभतें होय घराउद्देशें।**
**जालें पांडवाचेनि मिसें। जगदुद्धरण ॥ ( १८-१४६७ )**
**'गीतेचें हें दुभतें। वत्स करूनि पार्थातें।**
**दुभिन्नली जगापुरतें। श्रीकृष्ण गाय' ॥ ( १८-१६९० )**

**दूध पवित्र आणि गोड** खरें पण तापांत मात्र असेव्य होतें, जीभ कडवड झाल्यामुळें दूध कडु लागतें. ' नातरी ज्वरें विटाळलें मुख। तें दुधातें ह्मणे कडू विख' ( ९-१४२ ). दूध, दहीं, ताक, लोणी व तूप ह्या पंचविध प्रकारांस दुभतें म्हणतात. गोप्रधान व गोभक्त भरत-खंडांत ज्याच्या घरीं भरपूर दुभतें त्याला श्रीमंत व सुखी समजत. दुभतें ह्म० पूर्णता. शरीराला एके ठिकाणीं ' दैन्याचें दुभतें' हा विचित्र शब्द-प्रयोग परिपूर्ण दैन्य ह्या अर्थीं वापरला आहे ( ८-१४१ ).

## २१ शिकार, पारधी व पोपट.

**शिकार व पारधीः**—फासे, पोती, वागुरा ( जाळी ), शिकारीं कुत्रीं, ससाणे, चिकटण्या व भाले बरोबर घेऊन पारधी डोंगरावर शिकारी-साठीं जातात ( १६-३४५ ). लुब्धक ( पारधी ) पाशक ( पाश )

घेऊन त्यानें मृगाला ओढतात व मग तो खुडकतो[1] व लाथाळे करितो ( १४–१४९–१५० ) ' व्याधें रुंधलें[2] मृग । गजबजो लागे ' ( १३–१८७ ) गोरीचिया[3] भुली म्ह० पारध्याच्या गायनास भुलून गेल्यामुळें मृगाची नजर पारध्यांवर जात नाहीं ( १३–७४० ). 'गोरियेचें स्वभाव गायन जें ' ( ८–१४८ ) गोरी म्ह० पारधी किंवा पारध्याचें गायन ' गोरी कीर काना गोड पण खरोखर पाहतां तें घातक आहें' ( १६–१२१ ) पोपट पकडण्याची रीत सविस्तर दिली आहे:—

**पारधी व पोपट**—शुकनलिकेचा एक दृष्टांत मोठा बहारीचा आहे. आपला आपण मित्र व आपला आपण शत्रु, आपला उद्धार आपणच करून घ्यावा, विवेकानें अहंकार सोडावा व ' असतीचि वस्तु आपण होइजे '–आपलें स्वतःसिद्ध आत्मरूप पहावें–असा पूर्वीच्या विचाराचा ओघ आहे. आपलें शत्रुत्व आपणच कसें करितों हें **कोशकीटक, आंधळा** व **पोपट** ह्या दृष्टांतांवरून येथें दाखविलें आहे. रेशमाचा किडा आपल्या तोंडांतून तंतु काढून त्यांचा धागा पसरतो व स्वतःच त्यांत सांपडून मरतो, तसा जीव देहबुद्धीचें जाळें स्वतःच उभें करून त्यांत अडकतो. दुसरा दृष्टांत आंधळयाचा ' कैसें प्राप्तीचिये वेळे । निदैवा आंधळेपणाचे डोहळे । कीं असते आपुले डोळे । आपण झांकी ?' तिसरा दृष्टांत **शुकाचा.** पोपट धरण्यासाठीं पारधी लोक आमिष लावलेली एक नलिका वनांत उभी करतात व तिच्यांतून एक दोरी ओवून तिचीं दोन टोकें दोन झाडांस बांधतात. पोपट तीवर बसला कीं त्याच्या अंगभारानें ती उलट गिरकी खाते. त्यानें खुशाल उडून जावें पण उडाल्यास आपण मरून जाऊं या भीतीनें तो नलिका अधिकच घट्ट धरितो. नळी फिरत राहते व पोपट पारध्याच्या आहारीं पडतो:—

**जैसी ते शुकाचेनि आंगभरें । नळिका भोंविन्नली येरी मोहरे ।**
**तरी तेणें उडावें–परी न पुरें । मनशंका ॥ ७६ ॥**

---

१ तडफडतो. २ अडवलेला. ३ पारधी.

**वायाचि मान पिळीं । आटुंवे हिंये आवळी ।**
**टिटांतुं नळी । धरूनी ठाके ॥ ७७ ॥**
**म्हणे बांधला मी फुडा ! ऐसिया भावनेचा पडे खोडा ।**
**कीं मोकळिया पायांचा चवडा । गोवीं अधिकें ॥ ७८॥** (अ. ६)

त्या शुकाला कोणी धरिलें आहे? पण 'तो न सोडीच जरी नेला । तोडूनि अर्धा' इतक्या निश्चयानें नळीला चिकटून राहतो व फुकट मरतो. त्याप्रमाणेंच जीव आपल्याच कल्पनांचें जाळें आपल्याभोंवती पसरतो व देहालाच मी म्हणून ' अहंमम '-मी व माझें या खोड्यांत पडतो. त्या पोपटाप्रमाणें हाही पुस्तकें पढून ' बाप्या ! तूं मोकळा आहेस, तुला कोणी धरिलें नाहीं दे ती देहबुद्धीची नळी सोडून व मार चिदाकाशांत भरारी ' असें तोंडानें म्हणतो व लोकांनाही सांगतो, पण तो पोपट जसा नळी सोडीत नाहीं तसा हाही पाठक पंडित देहबुद्धी सोडीत नाहीं आणि भवचक्रांत गिरक्या खात शेवटीं काळरूप पारध्याच्या तोंडांत अचूक जाऊन पडतो ! हा शुक-नळिकेचा दृष्टांत फारच बहारीचा आहे व तो ज्ञानेश्वरांना आवडल्यामुळें त्यांनीं आणखी एक दोन वेळ ज्ञानेश्वरींतच दिला आहे.

**' पाहें पा बंधभावना दृढा । नळियेवरी तो बापुडा ।**
**काय मोकाळिया चवडा । न पंवेचि पुंसा ! ( १८–३९३ )**

नळिकेवरचा तो बिचारा राघू त्याचे पायाचा चवडा ह्म० पंजा मोकळा असतांही आपण बांधले गेलों आहोंत अशा मिथ्या कल्पनेनें फसत नाहीं काय ? तशांतही एखादा पोपट नळिकेवरून उडाला व वृक्ष-शाखेवर जाऊन बसला तर तो भाग्याचाच म्हटला पाहिजे ( १४-२०२ ) !

## २२ चकोर आणि चातक

**चातकचकोरांचे दृष्टांत अनन्यभक्तीचें रहस्य सांगतांना अनेकवार घेतले आहेत.** चंद्र हा सर्व देशांतल्या कवींचा फार लाडका

४ वाकडी करितो ५ अंगाचा संकोच करून ६ छाती ७ पायाच्या चवड्यांत ८ खाचित.

आहे, आणि याचें कारण उघड आहे. चंद्र हा सर्वौषधि आणि धान्यजाति यांचें पोषण करितो आणि सूर्याप्रमाणें ताप न देतां उलट देहाला व मनाला आल्हाद देतो. चंद्र हा साऱ्या जगाला शांतिसुख देणारा सर्वांच्या नेत्रांचा आराम आहे. कामिक स्त्री-पुरुषांचा चंद्र परममित्र असून शृंगाररस तर त्याच्या साह्यावांचून खुलतच नाहीं ! सूर्यापासून चंद्राला प्रकाश मिळत असला तरी **कविमंडळांत चंद्राची लोकप्रियता अधिक आहे** ! निर्जीव व सजीव सृष्टींत चंद्र अनेकांचा प्राणेश्वर आहे. चंद्राला पाहून सागराला भरती येते, चंद्रकांताला पाझर फुटतो, कुमुदिनी व चकोर यांचा संकोच दूर होऊन त्यांना प्रफुल्लितपणा येतो:—' तया सिंधु भरितें दाटे । सोमकांता पाझर फुटे । कुमुदाचकोरांचा फिटे । संकोच तो ' ( १८–१३१३ ). याप्रमाणें थोर वस्तूंत **सागर, पाषाणांत चंद्रकांत, वनस्पतींत कुमुदिनी व पक्ष्यांत चकोर हे चंद्राचे चार अनन्यभक्त आहेत** ! ' पाहे पा पूर्णचंद्राचिये भेटी।समुद्रीं अपार भरतें दाटीं ' ( ९–११५ ), ' नातरी चंद्रबिंब वाटोळें । देखोनि क्षीरसागर उचंबळे ' ( ११–११४ ). समुद्र झाला. आतां चंद्रकांत पहा. ' चंद्रकांत द्रवता कीर होये। परी ते हातवटी चंद्रीं आहे ' ( ९–२९ ) हेंच काव्यात्मक गोड भाषेंत सांगायचें म्हणजे ' चंद्रकांत निजनिर्झरीं । काय चंद्रा अर्घ्यादिक न करी ?' ( १८–१४ ). आतां कुमुदिनीकडे वळूं. 'आपला ठाय न सांडितां । आलिंगिजे चंद्र प्रगटतां। हा अनुराग भोगितां । कुमुदिनी जाणे ' ( १–६० ) मानिनीच ती ! आतां चंद्राचा चौथा भक्त म्हणजे चकोर. त्याची अनन्यता श्रेष्ठ प्रतीची आहे. ' कुमुददळाच्या ताटांत चंद्रामृताचें पान करणारा ' एक चकोरच. चंद्रामृताच्या धारा फार सूक्ष्म असतांना त्या प्रथम चकोराला सुखावितात. ' चकोरें आपुलिये चाडें । चांचूं करिती चंद्राकडे ' ( ९–२३४ ) मग ' चंद्रबिंबौनि धारा । निगतां नव्हती गोचरा । परी एकसरें चकोरा । निघती दोंदें ' (१३–२७६). चंद्र नेहमीचा सौम्य व शीतळ, त्यांतही शरदृतूंतला चंद्र अत्यंत सुखकारक 'आणि ऋतु बरवा शारदु । शारदीं पुढती चांदु । चंद्रीं जैसा संबंधु

पूर्णिमेचा' ( १८–३४४ ) चंद्र शरदृतूंतला आणि त्यांत पुन्हां पूर्णिमेचा-आतां त्याही पुढील अत्यंत बहारीची ओवी पहा:—

**'शारदीचिये चंद्रकळे-। माजीं अमृतकण कोंवळे।**
**ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें' ( १·५६ )**

शारदीय चंद्र आधीं सौम्य, त्यांत त्याच्या अमृताचे सूक्ष्मकण, व तेही कोंवळे, आणि ते मवाळ मनानें पिणारीं चकोराचीं गोजिरवाणीं पिलें ! कोमळपणाची येथें परमावधी झाली. सारालंकाराचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. आतां चातकाकडे पाहूं. चकोराला जसा चंद्र तसा चातकाला मेघ, पण मेघाला चातकाशिवाय आणखी एक भक्त आहे आणि त्याचें नांव **मयूर !**

**'घनगर्जनासरिसा। मयूर वोवांडे आकाशा'। (१८-४८४)**
**आणि 'नवघनही मयूरा। वो देत पावे' ( १८–१५२० )**

असा तो अन्योन्यप्रेमा अवर्णनीय आहे. मेघदर्शनानें मयूर अत्यंत सुखावतो, नाचतो, बागडतो ( १४–३२० ) तरी पण मेघाला अनन्य-भावानें भजणारा एक चातकच. मोराअंगींचीं पिसें डोळस असतात पण त्यांना दृष्टि नसते ( १३–८३६ ). उलटपक्षीं चातक सर्वेंद्रियांचे डोळे करून मेघाकडे पाहत असतो व मेघही त्याच्याचसाठीं वर्षतो. चातक समुद्रसरितांच्या पाण्याला शिवत नाहीं, मेघ जे चार थेंब देईल तेवढेच त्याला पुरतात ( १०।१८३ ). थोरांची भूक अशी असते कीं त्यांच्या तृप्तीबरोबर साऱ्या जगानें तृप्त व्हावें व ढेंकर द्यावेत.

**चातकाचिये कणवें। मेघ पाणियेसी धांवे।**
**तेथ चराचर आघवें। निवालें जोंवें॥ ( १८–१४६८ )**
**चकोराचेनि निमित्तें। तिन्हीं त्रिभुवनें संततें।**
**निववलीं कळावंतें। चंद्रें जोंवें॥ ( १८–१६८८ )**

अनन्यतेचें संपूर्ण फळ अनन्यभक्ताला मिळालें तरी इतरांना त्याच्या-मानानें थोडा तरी लाभ होतोच. ज्ञानेश्वर म्हणतात कीं आपल्या अनन्य-तेच्या दिव्य सामर्थ्यामुळें चंद्रामृताचा संपूर्ण लाभ घेणारे चकोर शहाणे

तर खरेंच पण चांदण्याचा उपयोग बाकी सर्वांना त्यांच्या मानानें होतोच होतो ( १८-१७४९ ) असो, चंद्र आणि मेघ हें उदारांचे राणे खरे, पण त्यांच्या औदार्याला स्वकार्यार्थ पान्हा फोडून त्या औदार्याचा जगाला उपयोग होऊं देण्यास निमित्त झालेले चकोर आणि चातक हेही साऱ्या जगाच्या धन्यवादास पात्र आहेत ! ज्ञानेश्वरांनीं याच अर्थानें श्रीकृष्णाला 'भक्तचकोरचंद्र' म्हटलें असून ( ६-४८६ ) गुरुमेघापुढें मी चातक झालों व माझ्या आर्तीसाठीं त्यांनीं ग्रंथरूप शांतिरसाची वृष्टि केली ( १८-१७६३ ) असें म्हटलें आहे.

## २३ भ्रमर, चक्रवाक, कासवी, राजहंस व बक.

**भ्रमर व चक्रवाक**—एखाद्या स्त्रीलंपट पुरुषाप्रमाणें भ्रमर कमलिनीवर तिच्या परागास्तव लुब्ध असतो. 'पराग सेविजे भ्रमरीं' (९–५८). वाटेल तसलें रुक्ष काष्ठ फोडून त्याचा भुगा करण्याइतका पराक्रमी ! पण हा प्रेमवश झालेला भ्रमर कोंवळ्या कलिकेंत अडकला कीं, तिला दुखवून बाहेर पडायचा नाहीं ! प्रेमाची केवढी शक्ति ही ! फुलांचा मकरंद चाखणारा हा रसिक काष्ठ कोरायला धांवला म्हणून काय त्याचा भ्रमरपणा जाईल ? ( १८–७१९ ).

**जैसें भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें ।**
**परी कळिकेमाजिं सांपडे । कोंवळिये ॥ २० ॥**
**तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परी तें कमळदळ चिरूं नेणें ।**
**तैसें कठिण कोंवळेपणें । स्नेह देखा ॥ २०२ ॥** अ. १ ॥
**'कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार ।**
**कुचंबेल केसर । इया शंका'** ( १३-२४८ )

**चक्रवाक**—पक्ष्यांतील नरमादींचें प्रेम परस्परांवर असतें. यांचा दिवसा योग व रात्रीं वियोग असतो. नदीच्या उभयतीरांवर अडचणीच्या जागीं सांपडलेलें हें जोडपें विरहानें वेडें होतें व आरडतें पण सूर्योदय होतांच एकत्र होऊन सामरस्याचें समाधान भोगतें ( १६–५ व ६ ).

**कासवीः**—कासवीला स्तन नसतात, ती केवळ आपल्या प्रेममय दृष्टीनें पिलांचें पोषण करितें. 'अगा मुखमेळेवीण । पिलियांचें पोषण । करी निरीक्षण ( अवलोकन ) । कूर्मी जेवीं' (१३–१४०) 'कूर्मीचिया पिलियां । दिठी पान्हा ये धनंजया' (१८–१३४३). कांसवीचें तूप–अशक्य गोष्ट ! ( १५–२२१ ) कूर्मी किंवा कासवी हिचा आणखी गुण सांगायचा आहे. ती सुखावली कीं आपले अवयव पसरते व कांहीं संकटाची चाहूल लागली कीं ते आवरून घेते. 'कां कूर्म जियापरी । उवाइला ( उवाय म्ह० सुख, आनंद ) अवेय पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपुलें आपण' ( २–३०१।३५१ )

**कूर्मदृष्टी** म्ह० ममत्वाची दयेची दृष्टि या अर्थानें हा दृष्टांत रासदास-तुकारामादि अनेक सत्कवींनीं स्वीकारला आहे. मला एक कल्पना सुचते ती येथें सांगतों, पंढरीच्या विठ्ठलमंदिरांत किंबहुना सर्व मंदिरांत देवाच्या पुढें देवाकडे तोंड केलेलें दगडी कांसव असतें. त्याचा हेतु असा दिसतो. **कासवीची दृष्टि** देवाच्या दृष्टींत मिळून देवाच्या दृष्टींत तिचें निस्सीम वात्सल्यप्रेम अवतरावें व कासवीच्या पाठीवर उभे राहून अपराध क्षमा मागणाऱ्या व देवाच्या दयेची याचना करणाऱ्या भक्ताकडे ती दृष्टि वळावी ! 'कूर्मदृष्टीनें सांभाळी' असें समर्थ याच भावानें म्हणतात.

**राजहंसः**—हा दूध आणि पाणी वेगळें करितो असा कविसंकेत आहे. 'सलिलीं पय जैसें । एक होऊनि मिनलें असे । परी निवडूनि राजहंसें । वेगळे कीजे' ( २–१२७ ) 'कां चांचूचेनि सांडसें ।' खांडिजे पय पाणी राजहंसें ( ९–४४ ) 'राजहंसापुढें । चांचूचें आग-रडें । तोंडी जेंवि झगडे । क्षीरनीरांचें' ( १४–२०८ ) एके ठिकाणीं राजहंसावर फार बहारीचें रूपक केलें आहे. 'अनात्मवर्गनीर । सांडूनि, आत्मरसाचें क्षीर । चरताति सविचार । राजहंस ( १५–२९६ )–ज्ञानी पुरुष हे राजहंस होत. पक्ष्यांत श्रेष्ठ राजहंस तसे मानवांत श्रेष्ठ आत्म-ज्ञानी. अनात्मपदार्थरूपी जलाचा त्याग करून आत्मरसाचें क्षीर हे

सेवन करितात. ज्या पाण्यावर सेवाळ सांचलेसें असतें त्या पाण्याकडे हंस पाहतही नाहीं ( १३–३२५ ). 'कर्दमीं रूपला राजहंस' म्लान होतो ( २–४ ). रात्रीं पाण्यांत नक्षत्रांचीं प्रतिबिंबें पडलीं असतांना हीं मोत्यें आहेत अशा भ्रमानें एकादा राजहंस चोंचीनें तीं खाण्याचा प्रयत्न करूं लागला तर खडकावर चोंच आपटून तो प्राणांस मुकतो ( ९–१४६ ) शहाणाही एखाद्वेळ भ्रमानें फसतो. लोभ वाईट आहे !

**बकः**—बक ह्म० बगळा. मतलबी ढोंगी पुरुषाला बकाची उपमा देतात. राजहंसाच्या उलट बगळा ! बगळ्याचें लक्ष त्याच्या भक्ष्यावर; 'मीनातें देखोनि बक'–( १८–४८० ) पुढील दोन ओव्यांत बकाच्या कृतीचें हुबेहुब वर्णन केलें असल्यामुळें स्वभावोक्ति अलंकार उत्कृष्ट आहेः–

**तरी तरंग नोलांडित । लहरी पायें न फोडीत**
**सांचलू न मोडीत । पाणियाचा ॥ २४६ ॥**
**वेगें आणि लेसा । दिठी घालूनि आमिषा ।**
**जळीं बक जैसा । पाऊल सूये ॥ २४७ ॥** ( अ. १३ )

कोल्ह्याप्रमाणें बकालाही चंद्रप्रकाश आवडत नाहीं ( ११-१५६ ). लबाडांना, ढोंग्यांना, प्रकाश न आवडणें साहजिक आहे !

## २४ इतर कांहीं प्राणी.

**कावळा आणि घुबडः**—प्राण्याच्या आवडीवरून व आहारावरून त्याची योग्यता समजते. ज्याला अमंगळ खाणें आवडतें त्याच्या जिभेला उंची पदार्थांचा आस्वाद घेतां येत नाहीं ! चव्हाट्यावरच्या बळीवर कावळयाच्या उड्या ( १–१५१ ) ! शिवाय 'वांतां कां वाढलिया । साजुक कां सडलिया । विवेक काऊळिया । नाहीं जैसा'( १८–५५६ ) अशा अविवेकी कावळयाला चंद्रकिरणांची चव काय येणार ? चकोर ज्यासाठीं प्राण टाकतो तो चंद्र उगविण्याच्या ऐनवेळीं कावळयाचे डोळे झांकतात ! याला चंद्राची ओळख नाहीं ( ४–२४ ). व उपयोगही नाहीं ( ३–१९८ ). दिवस उगवला कीं **घुबडाचे**

डोळे फुटतात व द्राक्षरस व आम्ररस घेण्याचे समयास कावळ्याचें तोंड सडतें ( १८–६८२ ) ! हे दोन्ही जीव पापी व करंटे खरे ! कावळ्याला डोळे आहेत दोन पण बुबुळ आहे एक, तें विलक्षण रीतीनें तो दोन्ही डोळयांत चाळवितो त्यामुळें त्याला दोन डोळे आहेत असें वाटतें ( १५–१३५ ). तो खरोखरीचा एकाक्षच ! चंद्राचा द्वेष पशूंत कोल्हा व पक्ष्यांत कावळा करितो. दोघेही लबाड. घुबडाला अंधारांत दिसतें. ' आंधारी देखणें जैसें। डुडुळाचे ' ( १४–२५१ ) आणि आश्चर्य हे कीं ' विश्वाचें आयुष्य जेणें उजळे। तो सूर्य उदैला देखोनि सवळे। पापिया फुटती डोळे। डुडुळाचे ' ( १६–२३९ ).

**सर्पः**–दीर्घद्वेषी व विषारी प्राण्यांत सर्पासारखा सर्पच. जन्मांतरीचें वैर सर्पाच्या मनांतून जात नाहीं ( १३–३५८ ), व जातिवंत साप द्वेष सांडीत नाहीं (१८–७५९). प्रकृतीनें हा दुष्ट असल्यामुळें त्याचे ठायीं दुधाचें कालकूट होतें ( १६–२४० ): ' जे गुण घे दे दोख। अमृताचें करी विख। दूध पाजिलिया देख। व्याळ जैसा ' ( १८–७१२ ). आंगीची खोळी ( कात ) टाकून साप बिळांत जातो ( १४–३१३ ). त्याच्या फडावर मणी असतो पण तो काढावा कोणी ? ( १७–२४ ). गरुडाला सर्प पराभवूं शकत नाहींत ( १५–२९५ ), उलटपक्षीं दर्दुर सापाला गिळूं शकत नाहीं ( २–१५ ). सर्प चंदनाची मुळी कवटाळितात (३–२६०). धुंधुवात ह्म. फूत्कार करणारा काळियाणा ह्म. काळिया नाग ( १८-७१२ ), व फोडसें नांवाचा जहरविषारी सर्प ( १३–७२६ ), ह्या दोन्ही सर्पाच्या जाति भयंकर आहेत. सर्पाच्या विषानें त्याच्या स्वतःच्या अंगची पेंदळी ( पुष्टि, त्वचा ) हळहळू जळत असते ( १६–४१० ), दुर्जनांचे दुर्गुण त्यांच्या स्वतःच्याच नाशाला कारण होतात !

**सर्प, बेडूक व माशीः**—माशीचा शत्रु बेडुक व बेडकाचा शत्रु सर्प; ' बळी अबळातें खाय ' ( १६-२०१ ) किंवा ' जीवो जीवस्य जीवनम् ' असा सृष्टींतला कायदा स्पष्ट आहे. ' बेडुक सापाचिये तोंडीं। जातसे सबुडबुडी। तो मक्षिकांचिये कोडी। स्मरेना कांहीं '–बेडूक

सापाच्या तोंडांत सगळाच्या सगळा जात असतांना माशा खाण्याच्या आनंदांत आपण स्वतः खाल्ले जात आहोंत हें कांहीं स्मरत नाहीं (१३-७३१)! हीच गोष्ट दुसऱ्या एका ठिकाणीं अधिक ठसठसितपणें सांगितली आहे. साप उभा गिळीत आहे अशा स्थितींतही बेडुक ' माशिया वेंटाळी जिभा ' जीभ वर करून उडत्या माशांना पकडण्या-साठीं धडपडत असतो (९-५१४). हें दृश्य पाहून ज्ञानेश्वर विचारतात कीं ' प्राणी कविणिये लाभा। वाढविती तृष्णा!' **माशीचा** गोडघांसेपणा-' साखरेचिया राशी। बैसली नुठे माशी ' ( १३–७८३ ) प्रसिद्ध असून चांगलें वाईट न पाहतां वाटेल त्यांत तोंड घालण्याचा तिचा अविवेकी-पणाही तितकाच प्रसिद्ध आहे ( १७–१९२ ); ' जीत मेलें न विचारी। बैसतां माशी ' ( १८–५५५ ) हें सर्वांच्या पाहण्यांत आहेच. स्वतः मरूनही परपीडा करण्याचा दुर्जनांचा दुःस्वभाव माशींतही प्रगट आहे हें "माशी आपणयातें गिळवी। परी पुढिला वांती शिणवी ' ( १८-६२० ) यावरून सर्वांस प्रतीत आहेच ! दर्दुर ( बेडुक ) अभागी खरा कीं कमळ-कंदाच्या पायाशीं राहून त्याच्या कपाळीं चिखल ! ( ९–५८ )

सर्पाचा एक महागुण घेतला आहे. ' सांडूनि आंगीची खोळी। सर्प रिगालिया पाताळीं। ते त्वचा कोण सांभाळी। तैसे जालें ' ( १४-३१२ ). सर्प आंगीची खोळ टाकून पुन्हां ताजातवाना होतो त्याप्रमाणें ज्ञानी पुरुष त्रिगुणधर्माची खोळ टाकून आत्मरूपसंपन्न होतो.

**खद्योत म्ह० काजवा**—' आवडे तेसणा ( तेवढा ) धुंधुरु। ( काजवा ) परी महातेजीं न मिरवे काय करूं ' ( ९–९ ) ' काय भानुतेजीं खद्योता। शोभा आथी ? ' ( १–६७ ) चंद्रापुढें खद्योताची शोभा नाहीं आणि सूर्यापुढें चंद्राचीही शोभा नाहीं, तेथें खद्योताचा काय पाड ? ' उदयलिया भास्वत। चंद्र तैसा खद्योत ' ( १४–१३ )

**अगा सहस्रकिरणाचिये दिठी। पुढां चंद्रही लोपे किरीटी।**
**तेथ खद्योत कां हुटहुटी। आपुलेनि तेजें ? ॥ ९–३७९ ॥**

या ओवीचाच अर्थ बिंबप्रतिबिंबन्यायानें पुढील संस्कृतश्लोकांत पहा:-

**खद्योतो द्योतते तावत् यावन्नोदयते शशी ।**
**उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः ॥**

**पतंग**—पतंगाला प्रकाश सोसत नाहीं. ‘ सांगें काय पतंग साहती । प्रकाशातें ? ’ ( ३–२०० ) दीपाच्या प्रकाशाला भुलून त्यावर झडप घालून पतंग मरतो ( १३–७४१ ). ‘ पतंगा दीपीं आलिंगन । तेथ त्यासि अचूक मरण ’ ! ( ३–२०१ ) दुसऱ्याचें ऐश्वर्य पाहून मनांत फुकट जळणाऱ्या मत्सरी जीवाला हेंच बक्षिस योग्य आहे ! पतंग हा ‘ आपण आंगें जळे । आणि नागवी जगाचे डोळे ’ ( नागवी=हिरावून नेतो, अंधार करितो ) ! ‘पतंग जैसा सळे ( द्वेषानें ) दीपाचेनि ’ ( १८–६१८ )

**टिटवी**—टिटवीनें सागर उपसण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद आहे (१–६८). खद्योत, पतंग व टिटवी या तिघांचा उल्लेख एकाच ओळींत आला आहे. ‘पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानूची खंती । टिटिभेनें अपांपती वैरि केला’ म्ह० अत्यंत क्षुद्र जीवानें अत्यंत मोठ्या पदार्थाशीं वैर करणें अत्यंत मूर्खपणाचें आहे ( १६–२३४ ).

‘नांगिया आपुलिया । **विंचु** करी गुदगुलिया ’ (१६–२९० ) पांच नांग्यांची इंगळी हे उघड पांचवेउली । पंचधा आंगीं लागली’ ( १३–१७०१ ). सात नांग्यांची इंगळी–‘ कां आयुष्य जातिये वेळे । शेळित सातवेउली मिळे’ (१६–२६०) ‘सलिलांतलीं मांसोळी’ ( १३–२९८ ), ‘जैसा गळीं मीना आमिषें । भुलविजे गा ’ ( ३–२१३) ‘गळ न पाहतां **मीन** । उंडी गिळी’ (१३–७४०) ‘कांटिये वरिल्या **सरडा** । स्वर्गही नीच ’ (१६–२२५) ‘बाबुळीचें खोड । गिरबडोनि जाती सरड’ (१३–५६२) ‘ मधुविषयीं **मधुमक्षिका** (मधमाशी ) । लोभिणी जैसी’ ( १३–५०३). **पारवा** चढला नभाचिये पोटीं ’ ( १८–४८३ ), ‘ पाताळ लंघिती **वोळंबे** ( वोळंब = वाळवी ) (१८–६०९) ‘माशिया जैसें मोहळ’ ( १६–१९८ )

'सोनें चोरितां '**उंदीर**' (१८–५५४), गोचिड अशुद्ध रक्त सेवन करते (९–५७) 'बैलातळीं लागलें **गोचिड** । जैसें' (१८–५६८), '**मुंगीये**' मेरु नोलांडवे । **मशका** सिंधु न तरवे' (१३–२६०) 'मशक गुंतला शेंबुडी' (१३–७८४), **कोशाकिडे** (१६–३३८) **कोकिळ** (१–२३०), 'कोकिलेचा कलरव'–पंचम मधुर स्वर (१८–१५१९) 'श्रीकृष्ण कोकिळ । अर्जुन वसंत' (११–११३१), 'कूजती कोकिळ वनीं । संतोषाच्या' (६–४५०) इत्यादि अनेक क्रमिकीटकादिकांचे उल्लेख आले आहेत.

# १८ भक्त नामदेव–उत्तरार्ध.

## १ कीर्तनाचा सुखसोहळा.

ज्ञानेश्वरादिकांच्या समागमाचें सुख नामदेवांना सरासरीं सहा वर्षे मिळालें. सहा वर्षांत ह्या सर्व संतभाविकांनीं नामसंकीर्तनभक्तीनें महाराष्ट्राला खरोखरीच भूवैकुंठ बनविलें. पंढरपूर, नेवासें, आळंदी, पैठण, त्र्यंबकेश्वर, सासवड, मंगळवेढें, अरण, तापीतीर, हा महाराष्ट्राचा सारा भाग ह्या संतांनीं कीर्तनसुखामृतानें भिजवून टाकला होता. आषाढी-कार्तिकीस पंढरपुरास भक्तसंमेलनें भरून काल्याचा सोहळा अत्यानंदानें होत होता. घरींदारीं, दिवसांरात्रीं, विठ्ठलनामगजरानें दशदिशा ते दुमदुमून टाकीत. नामदेव हे कीर्तनाचार्य केवळ प्रेममूर्ति होते. ज्ञानेश्वरींत जें कीर्तनभक्तीचें महासुख वर्णिलें आहे, तें भाविकांना प्रत्यक्ष भोगायला मिळत होतें. 'मीच होऊनि पांडवा। करिती माझी सेवा' अशा कोटीचे हे संत होते. "मग वाढतेनि प्रेमें। मातें भजती जे महात्मे। परी दुजेपण मनोधर्मे। शिवतलें नाहीं॥ कीर्तनाचेनि नटनाचें। नाशिले व्यवसाय प्रायःचित्ताचे। जे नांवचि नाहीं पापाचें। ऐसें केलें॥ माझेनि नामघोषें. नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें। अवघें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें॥ ते पाहांटेवीण पाहावित। अमृतेवीण जीववित। योगेवीण दावित। कैवल्य डोळां॥ राया रंका पाड धरूं। नेणती सानेयां थोरां कडसणी करूं। एकसरें आनंदाचें आवारूं। होत जगा॥ कहीं एकादेनि वैकुंठा जावें। तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें। ऐसें नामघोषगौरवें। धवळलें विश्व॥ कैसे माझ्या गुणीं धाले। देशकाळातें विसरले। कीर्तनसुखें सुखावले। आपणपांचि॥ कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचे निखिल प्रबंध। माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती॥ हें बहु असो यापरी। कीर्तित मातें अवधारीं। एक विचरती चराचरीं। पांडुकुमरा॥" (अ. ९ ओवी १९४ ते २११). हा अवर्णनीय थाट बरोबर पंढरपूरच्या वाळवं-

टांतला आहे. पंढरपूरच्या वारकऱ्यांसारखें सामुदायिक कीर्तनभजनाचें सुख दुसऱ्या कोणालाही कोठेंही भोगतां आलें नाहीं व येत नाहीं. ज्ञानेश्वरांनीं आळंदीस समाधि घेतल्यानंतर या सुखसागराला ओहटी लागली. शके १२१८ च्या आषाढांत सावता माळी, कार्तिकांत (वद्य १३) ज्ञानेश्वर व मार्गशीर्षांत सोपानकाका यांनीं समाधि घेतली. १२१९ सालीं मुक्ताबाई गुप्त झाल्या व निवृत्तिनाथ आत्मरूपीं विश्रांति पावले. मुक्ताबाईच्या वियोगानें एक वर्षांतच चांगदेव गेले. यानंतर एकामागें एक संत जातच राहिले. नामदेवांनीं समाधिप्रकरणांत पाषाणाला पाझर फुटेल असें हृदयद्रावक वर्णन केलें आहे:—

**गेले दिगंबर ईश्वरविभूती । राहिल्या त्या कीर्ति जगामाजी ॥ १ ॥**
**वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं । आतां ऐसे कोणी होणें नाहीं**
**सांगतील ज्ञान म्हणतील खूण । नयेचि साधन निवृत्तीचें ॥ ३ ॥**
**परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती । कोणा नये युक्ती ज्ञानोबाची ॥४॥**
**करितील अर्थ सांगतील परमार्थ । नये पा एकांत सोपानाचा ॥५॥**
**चांगदेव योगी निष्काम चांगला । स्वरूपीं रंगला केशवाच्या ॥ ६ ॥**
**नामा ह्मणे देवा सांगूं नये कांहीं । नये मुक्ताबाई गुह्य तुझें ॥ ७ ॥**

## २ पंजाबांतील कामगिरी.

ज्ञानेश्वरादि मंडळाच्या प्रयाणानंतर नामदेवरायास आयुष्याचीं चांगलीं ५० वर्षें लाभलीं. या दीर्घायुष्याचा त्यांनीं चांगला फायदा घेऊन पंढरीच्या विठ्ठलभक्तीचें निशाण पंजाबच्या सरहद्दीवर नेऊन लावलें! ज्ञानेश्वरांच्या संगतींत नामदेवराय काठेवाडांतील द्वारकाप्रभासपट्टणादि तीर्थें, रजपुताना, काशी, खानदेश इत्यादि प्रांत फिरून आलेच होते, तेव्हां उत्तर हिंदुस्थानची यात्रा त्यांची पूर्ववयांतच झाली होती. पुढें मुसलमानांचें राज्य उत्तरेप्रमाणें दक्षिणेंतही झालें. देवगिरीच्या यादवांचें राज्य बुडालें, व बरोबरची मंडळी बहुतेक निजधामाला गेली, सर्वत्र म्लेंच्छराज्य होऊन धर्माचा ऱ्हास सुरू झाला, यामुळें नामदेवरायांनीं पुनः उत्तरेकडच्या यात्रा केल्या व ५।५० वारकरी मंडळी

... वाचनालय, ...



बरोबर घेऊन मथुरावृंदावनाकडे ते गेले व तेथून पुढेंही विठ्ठलभजनाची गोडी लोकांना लावीत ते पंजाबकडे वळले. तिकडे असतांना त्यांनीं हिंदी भाषेंत अनेक कवनें केलीं त्यांपैकीं कांहीं शीख लोकांच्या 'ग्रंथसाहेब' ह्या पूज्य ग्रंथांत संग्रहित केलेलीं आहेत. 'ग्रंथसाहेब' ह्या ग्रंथांत नामदेवांचीं ६० वर पद्यें आम्हांस मिळालीं आहेत. सदर ग्रंथाची एक प्रत आम्हांस मिळाली आहे, त्यांतील वरील पद्यें पाहतां तीं आपल्या नामदेवरायांचींच खास आहेत याविषयीं शंका राहत नाहीं. हीं पद्यें सर्व हिंदी आहेत, व त्यांचें मराठी रूपांतर नामदेवांच्या गाथ्यांत मिळत नाहीं. नामदेवराय भगवद्भक्त म्हणून दक्षिणेप्रमाणें उत्तरेकडेही गाजले व म्हणून त्यांच्या वचनांस प्रामाण्य मिळून तीं वचनें शीखांनीं वंद्य मानलीं व आपल्या वेदतुल्य ग्रंथांत समाविष्ट केलीं. नामदेवांच्या मराठी अभंगांतली विचारसरणी त्यांच्या हिंदी पद्यांतील विचारसरणीशीं अगदीं मिळती आहे. हरिद्वारापासून ३ मैलांवर असलेल्या ज्वालापूरच्या हद्दींत नामदेवांचा एक मठ आहे असें ऐकण्यांत आहे. शिवाय नामदेवांचें एक मोठें स्मारक पंजाबांत आजमित्तीस पाहण्यांत येतें. पंजाबांत गुरुदासपूर जिल्ह्यांत 'घोमान' नांवाचें एक खेडें आहे. तेथें नामदेवांनीं पूजिलेल्या ठाकूरजीचें मंदिर व नामदेवांच्या पादुका यांची स्थापना झाली असून त्यांची पूजाअर्चा आज सतत ६०० वर्षें चालू आहे! तेथील जुन्या हस्तलिखित बाडांत नामदेवांच्या कवितांचा संग्रह 'नामदेवकी मुखबानी' या नांवानें लिहिलेला आहे. पंजाबच्या गुरुमुखी भाषेंत लिहिलेली 'नामदेवकी जन्मसाखी' घोमान येथील मंदिरांत मान्य झालेली आहे. तींत नामदेवांचें चरित्र लिहिलेलें असून तेथें त्यावर आषाढांत प्रवचनें होतात. तेथील नामदेवांच्या अनुयायांना 'बाबा नामदेवायी' असें म्हणतात. ज्ञानदेवजी नामक सिद्ध नामदेवजीचे गुरु होते, नामदेवजी महाराष्ट्रीय व दर्जी जातीचे होते, भक्त विसोबाखेचरांच्या गुरूपदेशाचा त्यांचे मनावर संस्कार होऊन त्यांना साम्यस्थिति प्राप्त झाली होती, या गोष्टी 'जन्मसाखींत' स्पष्ट लिहिलेल्या आहेत. नामदेवांबरोबर त्यांचे पंजाबी शिष्य बहोरदास, जाल्होन, लद्धा हे पंढरपुरास आले होते.

पंजाबी शिष्यांच्या आचारविचारांवर वारकरीपंथाचा संस्कार पुष्कळच झालेला आहे. नामदेवांनीं आपल्या केशवनामक शिष्यास भावलपूर येथें मठाधिपति करून ठेवलें होते. ग्रंथसाहेबांत 'आबोकलंदर' केशवा असा नामदेवांनीं त्याचा उल्लेख केला आहे. नामदेव १८ वर्षे पंजाबांत राहिले होते असें म्हणतात ! 'जन्मसाखी' च्या हकीकतींत व आपल्या इकडील नामदेवचरित्रांत थोडीशी तफावत आहे; तथापि एकंदरींत पाहतां आपल्या नामदेवरावांनीं कृष्णभक्तीचा महाराष्ट्राप्रमाणें पंजाबांतही पुष्कळच प्रसार केला असें स्पष्ट दिसतें.

## ३ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें.

'ग्रंथसाहेबां'त नामदेवांचीं जीं पद्यें दिलीं आहेत तीं पाहतां हीं आपल्या नामदेवांचींच आहेत याविषयीं शंका राहत नाहीं. हीं हिंदी पद्यें रचणाऱ्या नामदेवांची जन्मभाषा मराठी होती याविषयीं या पद्यांत हवीं तितकीं प्रमाणें आहेत. पहिलें भाषेचें प्रमाण पहाः—' भ्रमि भ्रमि आये तुमचे द्वारा, ' ' नामदेव हरिगुन गाये, ' ' नादिं समाइलेरे सति गरु भेटिलेरे, ' ' तुमचे पारस हमचे लोहा ' ' ऐसा राजा श्रीनरहरी ' ' देवताचि आणि ' ( आण–शपथ ) ' निर्भय होइ भजियै भगवान्, ' ' घटिघटि अंतरिं ब्रह्म लुकाया, ' ' माइ न होती बाप न होता कर्म न होती काया । हम् नहि होते तुम नहि होतें ' ' ऐसे कनककामिनी बाध्यो मोह, ' ' गाडि चालती बुटिहि हाकती, ' ' यांन्है घरीं, ' ' पाच कोस, ' ' लाडुली, धोबी, बाप वीठुला, तारिअले–राखिअले–बोधिअले इत्यादि शब्द व वाक्यप्रयोग गाणारा कवि हा महाराष्ट्रीय होता एवढें सिद्ध करून देण्यास पुरेसे आहेत असें वाटतें. ' छीपेके घर जनम दैला गुरु उपदेश भैला। संतह कै परसाद नामा हरि भेटुला ' ह्म० शिंप्याच्या घरीं जन्म दिला, गुरूचा उपदेश झाला, संतांच्या प्रसादानें नामदेवाला हरि भेटला ह्या स्पष्ट उल्लेखांवरून ग्रंथसाहेबांतले नामदेव आपले पंढरीच्या विठ्ठलाचे भक्त होते व महाराष्ट्रीय होते या दोन गोष्टी

अगदीं स्पष्ट झाल्या. ‘ इभै ( इकडे ) बीठल ऊभै ( तिकडे ) बीठल बीठल बिन संसार नही ’ ‘ आजु नामे बीठल देखिया मूरखको समजाऊ रे ’ ‘ नामेको स्वामी बीठलु ऐसा ’ इत्यादि विठ्ठलनामाच्या अनेक उल्लेखां-वरून हे नामदेव विठ्ठलभक्त होते हें उघडच आहे. नामदेवांच्या मराठी अभंगांत असलेलीं राम, केशव, नरहरि, वैकुंठपति, हरि इ० विठ्ठलाचीं नामेंच या हिंदी पद्यांतही आलेलीं आहेत. ‘ एकादशी व्रत रहै काहेको तीरथ जाई ’ यावरून वारकऱ्यांच्या एकादशी ह्या महाव्रतावरही हिंदींतल्या नामदेवांचा स्पष्ट कटाक्ष आहेच. त्याप्रमाणेंच हरिकीर्तनावर व नामस्मरणावरही त्यांचा कटाक्ष आहे. एका हिंदी पद्यांत नामदेवांनीं म्हटलें आहे कीं अश्वमेध, तुलादान, प्रयागस्नान, गयापिंड, गंगातीरवास, वेदाभ्यास हे सर्व धर्म चांगलेच आहेत; पण हरिकीर्तन यांहून श्रेष्ठ आहे—‘ तौ न पुजहि हरिकीरत नामा ’. रामकृष्णहरि हे तीन देव वेगवेगळे नसून एक विठ्ठलच आहे:—‘ संतांमध्यें गोविंद आछे गोकुलमध्यें श्याम गो । नामेमध्यें राम आछे रामश्यामगोविंद गो ’. तर-लेल्यांच्या नांवांत मराठी अभंगांप्रमाणें हिंदी पद्यांतही प्रल्हाद, ध्रुव, उपमन्यु, अजामीळ, गणिका, पूतना, अहल्या, द्रौपदी हीं नांवेंच वारंवार आलेलीं आहेत.

**हरि हरि करत मिटे सभि ( सर्व ) भर्मा ( भ्रम )। हरिको नाम लेऊ तम ( तुह्मी ) धर्मा ।**
**हरि हरि करत जातिकुल हरी। जो हरि अंधुलेकी लाकरी ( अंधाची काठी )॥**

**घटघट अंतर सरब निरंतर। केवल एक मुरारी।**

नामदेवाच्या हातचें देव दूध प्याले, त्याचें छप्पर शाकारलें, ( औंढ्या नागनाथ येथें ) देऊळ फिरवलें, मेलेली गाय उठवली या नामदेवांच्या चरित्रांतील लोकप्रसिद्ध गोष्टींचे उल्लेखही ग्रंथसाहेबांतील पद्यांत आले आहेत. या सर्व गोष्टींवरून ग्रंथसाहेबांतले नामदेव आपले नामदेवरायच होत याविषयीं शंकेचा लेशही उरत नाहीं.

१

देवा पाहन तारिअले। राम कहत जन कस न तरे ॥ रहाउ ॥
तारीले गनिका बिनरूप कुबिजा ब्याध अजामिल तारिअले।
चरनबधिक जन तेऊ मुकति भये। हौ बलि बलि जिन राम कहे
दासीसुत जन बिदुर सुदामा उग्रसेनकौ राज दिये।
जपहीन तपहीन कुलहीन कर्महीन नामेके स्वामी ते ऊतरे ॥१॥

अर्थः—देवा ! तुम्ही पाषाण तारिलेंत, मग राम राम म्हणणारे जन कसे बरें तरणार नाहींत ? गणिका, रूपहीन कुब्जा, व्याध, अजामिळ यांना तुम्ही तारलेंत. पांगळ थोटे जन तेही मुक्त झाले, मोठमोठेहि रामनाम घेणारे मुक्त झाले. दासीसुत विदुर, सुदामा यांना तारून उग्रसेनाला राज्यही दिलेंत. जप, तप, कुल, कर्म ह्यांनीं हीन असे जे जन तेही नामदेवाच्या स्वामीनें भवपार उतरले.

२

एक अनेक बियापक पूरक जत देखौ तत सोई।
माया चित्रविचित्र बिमोहित बिरला बूझै कोई ॥ १ ॥
सभ गोविंद है सभ गोविंद बिन नही कोई।
सूत एक मणि सतसहंस जैसे ओतिपोति प्रभु सोई ॥१॥ र० ॥
जल तरंग अरु फेनबुदबुदा जल तै भिन्न न होई।
इहु परपंच पारब्रह्मकी लीला बिचरत आन न होई ॥ २ ॥
कहत नामदेव हरिकी रचना देख हुरिदै बिचारी।
घट घट अंतर सरब निरंतर केशव एक मुरारी ॥ ३ ॥

अर्थः—एक तोच अनेक आहे. तो व्यापक आहे, परिपूर्ण आहे, जिकडे पहाल तिकडे तोच आहे. माया चित्रविचित्रपणानें ( जीवांना ) विमोहित करिते. विरलाच यथार्थपणें हें जाणतो. सर्व गोविंदावांचून कांहींच नाहीं. सूत एक आणि मणि शतसहस्र असावेत त्याप्रमाणें तो एकच प्रभु सर्वांत ओतप्रेत भरला आहे. जल आणि तरंग अथवा फेंस आणि बुडबुडे–हे कांहीं जलाहून भिन्न नाहींत. हा प्रपंच परब्रह्माची लीला आहे, व म्हणून त्यांत ( प्रपंचांत ) कोणी वावरत असेल, तरी त्याहून तो वेगळा होत नाहीं. नामदेव म्हणतात कीं हरीची रचना पहा.

हृदयांत विचार करून पहा. भूतमात्राच्या अंतरांत असून सर्वव्यापी निरंतर एक केशव मुरारी आहे.

३

जौ राज देहित कवन बढाई ?।
जौ भीख मंगावहि ता क्या घटिजाई ?॥१॥
तूं हरि भजु मन मेरे पदनिर्बान ।
बहुरि न होइ तेरा आवनजान ॥ १ ॥ रहाऊ
सभ तै उपाई भरमभुलाई ।
जिस तूं देवहि तिसहि बुझाई ॥ २ ॥
सति गुरु मिलै त सहजा जाई ।
किसु हौ पूजौ दूजा नदरि न आई ॥ ३ ॥
एकै पाथर कीजै भाऊ ।
दूजै पाथर धरियै पाऊ ॥ ४ ॥
जे ओहु दे उत ओहु भी देवा ।
कहि नामदेव हम हरिकी सेवा ॥ ५ ॥

अर्थ—त्यानें राज्य दिलें तर यांत बढाई ( मोठेपणा ) कोणचा ? व भीक मागायला लावले तर यांत तरी कोणता कमीपणा आहे ? बा मना ! तूं हरीला भज कीं निर्वाणपद माझें ( घरचें ) आहे ! पुन्हां येण्याजाण्याची ( जन्ममरणांची ) दगदग पडणार नाहीं ! जेवढें म्हणून उपाय ( साधनें ) आहेत तेवढे सारे भ्रमांतले आहेत. तूं आपला देवाला तेवढा जाणून रहा. सद्गुरुशीं सहज मिळून जा.मी कोणाला पूजूं ? दुसरा नजरेला येत नाहीं. एका पाषाणावर भाव धरतात व दुसऱ्या पाषाणावर पाय ठेवतात. जेथें हाक मारावी तेथें तो ओ देत आहे. मला एक हरीची सेवाच ( ठाऊक आहे ) असें नामदेव म्हणाले.

४

हरि हरि करत मिटे सभि भर्मा । हरिको नाम लैऊ तम धर्मा ॥
हरि हरि करत जाति कुल हरि । सो हरि अंधुलेकी लाकरी ॥१॥
हरये नमस्ते हरये नमह । हरि हरि करत नही दुख यमह॥१॥रहाउ॥

**हरि हरि नाखस हरे परान। अजैमल कियो बैकुंठहि थान॥**
**सुआ पढावत गनिका तरी। सो हरि नयनहु की पूतरी॥ २॥**
**हरि हरि करत पूतना तरी। बालघातनी कपटही भरी।**
**सिमरन द्रुपदसुता उद्धरी : गउतमसती शिला मिस्तरी॥ ३॥**
**केशीकंसमथन जिन कीया। जीयदान कालिकौ दिया॥**
**प्रणवै नामा ऐसो हरी। जासु जपत भय अपदा हरी॥ ४॥**

अर्थः—हरि हरि म्हटल्यानें सारे भ्रम दूर होतात, हरीचें नांव घेणें हा तुमचा धर्म आहे. 'हरिनामस्मरणानें' कुलजाति नाहींशा होतात, तो हरि अंधाची काठी आहे! हरयेनमः हरयेनमः असा हरीचा जप केल्यानें दुःख व यमभय निवारतात. हरि हरि म्हणतांच अजामेळाच्या देहांतून प्राण निघाले व त्याला वैकुंठांत स्थान मिळालें. पोपटाला हरिहरि पढविल्यामुळें गणिका तरली. तो हरि डोळ्यांतली बाहुली आहे! बालघातिनी व कपटानें भरलेली पूतना हरिहरि करीत असतांच तरून गेली. स्मरणानें द्रौपदी उद्धरली. शिला होऊन पडलेली गौतमपत्नी अहल्या उद्धरली. ज्यानें केशी व कंस या दैत्यांना मारले त्यानेंच कालियाला जीवदान दिले. नामदेव म्हणतातः अशा हरीला जपल्यानें भय व आपदा टळतात.

५

**ऐसो रामराइ अन्तर्यामीं। जैसें दरपनमाहि बदनपरवानी**
**बसै घटाघट लीपन छीपै। बंधनमुकता जातु न दीसै॥ १॥**
**पानीमाहि देखु मुख जैसा। नामेको स्वामी बीठलु ऐसा॥ २॥**

अर्थः—जसें आरशांत मुखाचें प्रतिबिंब दिसावें त्याप्रमाणें रामराय भूतांच्या अंतर्यामीं आहेत. सर्व घटांत ते लपून छपून आहेत यामुळें बंधापासून मुक्तता कशी व्हावी हें समजत नाहीं. पाण्यामध्यें जसें मुख तसा नामदेवाचा स्वामी विठ्ठल सर्वांतर्यामित्वानें दिसत आहे.

६

**जैसी भूखे प्रीति अनाज। तृषावंत जलसेती काज॥**
**जैसी मूढ कुटुंबपराइण। ऐसी नामे प्रीति नराइण॥ १॥**

नामे प्रीति नाराइण लागी। सहज सुभाय भयो बैरागी
॥ १ ॥ रहाउ ॥
जैसी परपुरुषा रत नारी। लोभी नर धनका हितकारी।
कामी पुरुष कामनी प्यारी। ऐसी नामे प्रीति मुरारी ॥ २ ॥
साई प्रीति जिआपे लाये। गुरू परसादी दुबिधा जाये।
कबहू न तूटी सरह्मा समाई। नामेचितु लाया सचिनाई ॥३॥
जैसी प्रीति बारिक अरू माता। ऐसा हरिसेती मन राता।
प्रणवै नामदेव लागीं प्रीति। गोविंद बहै हमारे चीती ॥ ४ ॥

**अर्थः**—भुकलेल्याची प्रीति जशी अन्नावर असते, तृषिताचें जसें जलासीच काम असतें, मूढप्राणी जसे कुटुंबांतच गढलेले असतात, तशी नामदेवाची प्रीति नारायणावर आहे! नामदेवाची नारायणावर प्रीति आहे व म्हणून तो स्वभावानेंच बैरागी किंवा विरक्त आहे. जारिणी जशी परपुरुषावर रत असते, लोभ्याचें सर्व हित द्रव्यपरच असतें, कामी पुरुषास कामिनी प्रिय असते, तशी नामदेवाची मुरारीवर प्रीति आहे. स्वामी ज्या जीवावर प्रीति लावतो, तो गुरुप्रसादाला पात्र होतो व त्याचें सर्व द्वैत ( संशय ) दूर होतें, तो सर्वरंगीं समाविष्ट होऊन जात असल्यामुळें त्याची देवाशीं कधीं तुटी ( वियोग ) होत नाहीं. नामाचें चित्त सत्यस्वरूप देवाशीं मिळालें आहे. जशी बालक आणि माता यांची प्रीति असते, तसें माझें मन हरीपाशीं रतलें आहे. नामदेव सांगतात,गोविंद म्हणतो कीं माझ्या चित्तीं नामदेवाविषयीं तसेंच प्रेम आहे.

## ४ मेलेली गाय उठवली याबद्दल नामदेवांचें पद्य.

नामदेवांनीं मेलेली गाय उठवली ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. नरसी मेहता यांनीं व महीपति वगैरेंनीं ती वर्णिली आहे. तथापि ही कथा मुळांत कशी झाली आहे याबद्दलचें प्रमाण खुद्द नामदेवांच्या पद्यांतच आज मिळत आहे. शीख–लोकांचा 'ग्रंथसाहेब' ह्यांत नामदेवांचीं जीं खास ६० पद्यें आहेत त्या पद्यांपैकींच एका सुंदर पद्यांत ही गाय

उठल्याची गोष्ट नामदेवानीं स्वमुखानें सांगितली आहे. नामदेवजी गाय उठल्याचें सर्व श्रेय श्रीविठ्ठलास देत आहेत, आपल्याकडे कांहींच घेत नाहींत, हें त्यांच्या भक्तपणाला उचित आहे. ' मेरा कीया कछू न होइ। करि है राम होइ है सोइ ' म्ह० ' माझें केलेलें कांहींच होत नाहीं, राम करितो तेंच होतें ' ही त्यांची बैठकच त्यांच्या साधुत्वाची ज्ञापक आहे. असो. मृत गाय उठल्याची मनोहर कथा आपण त्यांच्याच तोंडून ऐकूं. प्रस्तुत पद्याचे एकंदर २८ चरण आहेत. ते सर्व आपण समजून घेऊं.

**सुलतान पूछे सुन बे नामा। देखौ राम तुमारे कामा ॥ १ ॥**

सुलतानानें पुसलें ' ऐक रे नामदेवा! ( ज्याचें तूं अखंड भजन करितोस,)तो राम तुझ्या कामाला कसा येतो (तुझें रक्षण कसें करितो )?

**नामा सुलतानें बांधिला। देखौं तेरा हरि बीठुला ॥ रहाउ ॥**

सुलतानानें नामदेवाला बांधून टाकलें व ह्मणाला ' तुझा हरि विठ्ठल मला पाहूं दे '

**बिसमिल[१] गऊ देहु जीवाइ। नातर गर्दन मारौ ठाई ॥ २ ॥**

मेलेली गाय जिवंत करून दे, नाहीं तर जागच्या जागीं तुझें शीर उडवून देईन.

**बादिशाह ऐसी क्यो होइ। बिसमिल किया न जीवै कोइ ॥३॥**
**मेरा कीया कछू न होइ। करि है राम होइ है सोइ ॥ ४ ॥**

नामदेव म्हणालेः ' बादशहा! असें कसें होईल? मेलेलें कोणालाही जिवंत करितां येणार नाहीं! माझ्या करण्यानें कांहीं होणार नाहीं. राम जें करील तेंच होईल!'

**बादिशाह चढियो अहंकारि। गज हस्ती दीनो चमकारि[२] ॥ ५ ॥**

बादशाह अहंकारास चढला-जिद्दीस पेटला व त्यानें मोठा ( मस्त ) हत्ती याला बिथरवून ( चमकावून ) नामदेवाच्या अंगावर सोडून दिलें!

---

१ **बिसमिलः** हळहळून खेदानें घेतलेलें परमेश्वराचे नांव ( हरहर, शिवशिव यासारखें. ) २ ईश्वराच्या करणीला- घटनेला ( शब्दार्थ. )

**रुदन करी नामेकी माइ। छोडि रामकी, न भजहि खुदाइ ? ॥६॥**
**न हौ तेरा पूंगडा न तू मेरी माइ। पिण्डु पडै तौ हरिगुन गाइ ॥७॥**
**करै गजिंदु शुंडकी चोट। नामा उबरै हरिकी ओट ॥ ८ ॥**

नामदेवाची आई रडूं लागली व ती नामदेवाला म्हणाली 'रामाला सोडून दे. राम सोडून तूं खुदाला कां भजत नाहींस!' नामदेवांनीं उत्तर केलें 'मी तुझा मुलगा नाहीं व तूं माझी आई नाहींस! देह पडेतों मी हरिगुणगायन करीतच राहणार!' गजेंद्र म्ह० तो प्रचंड हत्ती—त्यानें सोंडेची एक थप्पट नामदेवाला दिली. नामा हरीच्या आश्रया ( ओट—ओटी ) नेंच वांचला.

**काजी मुल्ला करहि सलाम। इन हिंदूमे राम लिया मान ॥ ९ ॥**
**बादिशाहि बेनती सुनेहु। नामे सरभरि सोना लेहु ॥ १० ॥**

काजीमुल्लांनीं ( बादशहाला ) सलाम केले व म्हणाले 'या हिंदूंतही यांचा राम ईश्वर आहे.'

(तेव्हां ते म्हणाले) 'हे बादशाह! आमची विनंति ऐका. नामदेवाच्या भारंभार सोनें घेऊन याला सोडून दे.'

**माल लेउ तौ दोजके परौ। दीन छोडि दुनियाकौ भरौ ॥ ११ ॥**

बादशाहानें उत्तर केलें, 'मी माल म्ह० सोनें घेईन (व याला सोडीन) तर नरकांत पडेन. धर्म सोडीन तर दुनियेंत माझी अपकीर्ति होईल.

**पावहु बेडी हाथहु ताल। नामा गावै गुन गोपाल ॥ १२ ॥**
**गंगाजमन जौ उलटी बहै। तौ नामा हरि करतारहै ॥ १३ ॥**

( बादशहानें नामदेवाच्या ) पायांत बेडी घातली पण नामानें हातांत टाळ घेऊन गोपालाच्या गुणवर्णनाचा सपाटा चालविला. गंगायमुना जरी उलट्या वाहूं लागल्या तरी नामदेवानें हरिस्मरण सोडलें नाहीं.

**सात घडी जब बीती सुणी। अजहु न आयो त्रिभुवनधणी॥१४॥**

सात घटका याप्रमाणें व्यर्थ गेल्या. तथापि अजूनही त्रिभुवनाचा धणी ( नामदेवाच्या रक्षणास ) धांवून आला नाहीं.

**पाखंतण बाज बजाइला । गरूड चढे गोबिंद आइला ॥ १५ ॥**
**अपने भगतपर कीं प्रतिपाल । गरूड चढे आये गोपाल ॥ १६ ॥**

अखेर—पंखांचा फडफड आवाज झाला, व गरुडावर बसून गोपाल-कृष्ण आले. आपल्या भक्ताचा प्रतिपाल करण्यासाठीं (परित्राणाय साधूनां) भगवान् गरुडावरोहण करून आले.

**कहहि त धरणिइ कोडी करौ । कहहि तले करि ऊपर धरौ ॥१७॥**
**कहहि त मुई गऊ देउ जीयाइ । सभ कोई देखे पतियाइ ॥ १८ ॥**

देव म्हणाले, 'नामदेवा ! म्हणशील तर (कहहि—कथय) ही पृथ्वी इकडची तिकडे करितों, कां खालीं पाताळांत घालतों, किंवा म्हणशील तर—पाताळ वर आणतों व म्हणशील खालचा वर म्ह० ही मेलेली गाय जिवंत करून देतों. बोल (तूं म्हणशील तें करितो.) सर्व लोकांना प्रत्यय येऊं दे (माझ्या नामधारकाचें म्ह०भक्ताचें मी कसल्याही आपत्तींत रक्षण करितों हें जगाच्या प्रत्ययाला येऊं दे.)

**नामा प्रणवै सेलमसेली ! गऊ दुहाई बछरा मेलि ॥ १९ ॥**
**दूधहि दुहिजब मटुकी भरी । ले बादशहाके आगे धरी ॥ २० ॥**

नामदेवानें वासराला सोडून त्या मृत गाईचें दोहन केलें व दूध काढून मडकें (भांडें) भरलें व तें बादशहाच्या पुढें धरलें.

**बादशाहु महलमहि जाइ । औघटकी घटलागी आइ ॥ २१ ॥**

बादशहा महालांत जाऊन बसला. 'अघट (न घडणारें) तें आज घडून आलें आहे !'—अघटित घटना झाली, असेंम्हणाला.

**काजीमुल्ला बिनती फरमाइ । बख्शी हिंदूमै तेरी गाइ ॥ २२ ॥**

काजीमुल्लांच्या विनंतीवरून (बादशहानें) हुकूम फर्मावला कीं मी (मैं) हे हिंदु-तुझी गाय तुला बक्षीस दिली आहे.'

**नामा कहै सुनहु बादशाह । इहु किछ पतिया मुझै दिखाई॥२३॥**
**इसु पतियाका इहै परवान । साच शील चालहू सुलतान ।२४॥**

नामदेव म्हणाले 'बादशहा ऐक-( देवानें ) हा थोडासा प्रत्यय मला दाखविला आहे. ह्या प्रचीतीचा तूं हा अर्थ समज ( अथवा हेंच प्रमाण समज ) कीं हे सुलताना ! तूं सत्यानें व शीलानें वाग.

**नामदेव सभ रह्या समाई। मिलि हिंदु सभ नामे पहिजाई ॥२५॥**

नामदेवाचें नांव सर्वभर गाजून राहिलें, सर्व हिंदु मिळून नामदेवापाशीं गेले.

**जौ अबकी वार न जीवै गाइ। त नामदेवका पतिया जाइ ॥२६॥**

आजच्या ह्यावेळीं जर ही गाय जिवंत झाली नसती तर नामदेवाची पत ( सत्व ) पार गेली असती !

**नामेकी कीर्ति रही संसारी। भगतजन ले उधऱ्या पारि ॥ १७ ॥**

नामदेवाची कीर्ति संसारांत ( जगांत ) भरून राहिली व नामदेव भक्तजनांना सवें घेऊन भवपार उद्धरून गेले.

**सगल कलेश निन्दक भया खेदु। नामे नाराइन नही भेदु ॥२८॥**

निंदकाच्या भागाला सकळ क्लेश व खेद आले व नामदेव नारायणाशीं सायुज्यता पावला.

## ५ नामदेव व नरसी मेहता

अत्युत्कट भक्तीविषयीं नामदेवांची अत्यंत प्रसिद्धिच आहे. त्यांच्या सगुणप्रेमाचें वळण त्यांच्या नित्यसंगतीच्या कुटुंबांतील सर्व माणसांसही लागलें; परिसा भागवतासारखे विद्वान् ब्राह्मण अभिमान सांडून त्यांच्या भक्तिप्रेमाला भुलून त्यांचे शिष्य व कीर्तिगायक झाले; जनाबाईसारखी एक अलौकिक शिष्या त्यांच्या परिवारांतून चमकून गेली; गोरोबा कुंभाराच्या विमलप्रेमास ते विषय झाले; चांगा केशवदास किंवा चोखामेळ्यासारखे प्रेमळ त्यांच्या चरणीं लागले; ज्ञानेश्वरांना त्यांच्या संगतीचें गोड सुख पोटभर मिळावें म्हणून त्यांना यात्रेच्या मिषानें पंढरीच्या बाहेर काढावेसें वाटलें; साक्षात् पंढरीनाथ त्यांच्या प्रेमास भुलून वेडेपिसे झाले असा नामदेवांचा भक्तिपंथांत असामान्य अधिकार होता. नामदेवांची

मधुरभक्तिरसानें ओथंबलेली वाणी पंढरीच्या वाळवंटांत कीर्तन-प्रसंगानें लक्षावधि भाविकांच्या कानावर पडली व अजून पडत आहे. तुकोबासारख्या महाराष्ट्रभर गाजलेल्या महाभागवतास नामदेवांच्या अभंगवाणीनें स्फूर्ति दिली व आजकाल तुकोबांचे अभंग सर्व लोकांत अधिक प्रिय झालेले असले तरी तुकारामांस नामदेवांचाच अवतार समजतात. महाराष्ट्राबाहेरही कोणा महाराष्ट्रीय भक्ताची कीर्ति पसरली असली तर ती नामदेवांचीच होय. काठेवाडांतील जुनागडचे प्रसिद्ध भक्त नरसी मेहता व शीखपंथाचे प्रवर्तक नानक यांनीं आपल्या ग्रंथांतून नामदेवांच्या विशुद्धभक्तीची व अभंगवाणीची प्रशंसा केली आहे. नरसी मेहत्यांच्या पदांतून नामदेवांनीं मेलेली गाय पुन्हां जिवंत केली, देवाच्या मूर्तीस दूध प्यावयास लावलें, त्याच्या घराचें छप्पर पांडुरंगानें दुरुस्त केलें, या नामदेवांच्या भक्त्युत्कर्षाच्या गोष्टी दिलेल्या आहेत. ' नामा हाथले दूध पीला ' ह्म० देव नामदेवाच्या हातचें दूध प्याले, ' रामनु नाम नामदेवे लीधु । तेनी मोड जीवाडी गाय' ह्म० रामनाम नामदेवानें घेतलें म्हणून त्यानें मेलेली गाय उठविली, ' असुरमाहे हतो कबीर उद्धारिया नामानुं छापरूं आल्युंछाई ' ह्म. देवा ! तूं असुरांत ह्म. म्लेंच्छांत कबीराचा उद्धार केलास व नामदेवाचे घराचें छप्पर शाकारलेंस याप्रमाणें नरसीमेहत्यांनीं नामदेवांच्या गोष्टी वर्णिल्या आहेत. एका ब्राह्मणानें मेलेली गाय सुलतानाच्या दरबारांत आणली ती तुळशीमाळा कंठांत धारण करणाऱ्या नामदेवानें उठविली असा भक्ताभिमानी देव समर्थ आहे असेंही त्यांनीं एका पदांत म्हटलें आहे. " पूर्वे पंढरपूरमोझार । ब्राह्मणे आणी मर्तक गाय । लइ बांधी सुलतान सभाय । नामदेव गाय सजीवन करे । तो तुलसीमाला कंठे धरे । ते नामदेवनी जिवाडी गाय । एवा समरथ वैकुंठराय. " नरसीमेहत्यांचा काव्यसंग्रह इच्छाराम देसाई यांनीं संशोधन करून व विवेचक बुद्धीची प्रस्तावना लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांनीं नरसी मेहत्यांचा काळ संवत १४७० हा दिला आहे. संवत्मध्यें १३५ वजा

केले कीं शक निघतो. अर्थात नरसी मेहत्यांचा काळ शके १३३५ हा होय. नामदेव अर्थात् नरसीमेहत्यांच्या पूर्वीं होऊन गेलेले, नरसी मेहता यांनीं 'पूर्वे पंढरपूरमोझार' असें म्हटलेंच आहे. पूर्वीं झालेल्या पंढरपूरच्या भक्ताच्या गोष्टी काठेवाडांत प्रसिद्ध होऊन जुनागडच्या भक्ताच्या काव्यांत येण्यास ५०।७५ वर्षें सहज लागलीं असलीं पाहिजेत व हिशेबानें तितकींच बरोबर येतात. शके १२७२ मध्यें ८० वर्षांच्या वयांत नामदेवांनीं देह ठेविला ही गोष्ट प्रसिद्ध आहे, यावरून १२७२ मध्यें होऊन गेलेल्या नामदेवांचा उल्लेख १३३५ मध्यें झालेल्या नरसीमेहत्यांनीं करणें आणि तोही 'पूर्वे' म्हणून करणें अगदीं साहजिक आहे. नामदेव व ज्ञानेश्वर यांची जोडी फोडण्याचा व नामदेवांचा काळ १०० वर्षें अलीकडे खेंचण्याचा अर्वाचीन सुधारकांचा प्रयत्न किती फोल आहे हें यावरूनही अगदीं सिद्ध होतें व नामदेवांची आपल्या पूर्व परंपरेप्रमाणें शके ११९२–१२७२ ही जी कालगणना आहे तीच बरोबर आहे असें या नरसी मेहत्यांच्या उल्लेखावरून उघड होतें.

समाप्त.

# पांगारकरांचीं पुस्तकें.

**१ भक्तिमार्गप्रदीप** ( आवृत्ति चौदावी ):—यांत साधुसंतांच्या प्रसिद्ध भूपाळ्या, आरत्या, श्लोक, अभंग, पदें वगैरे सर्व यथानुक्रम दिले आहेत. नित्य-प्रार्थनेचें सर्वलोकप्रिय पुस्तक. किं. ०८.

**२ मोरोपंतचरित्र व काव्यविवेचनः**—प्रकरणें २१ व पृ. सं. ६२५. "जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत त्यांत याची गणना" राजवाडे यांनीं केली आहे. मोरोपंत व त्यांची कविता याविषयीं संपूर्ण विवरण करणारा हा ग्रंथ हस्तलिखित कविता व पत्रें मिळवून लिहिला आहे. किं. रु. २८८.

**३ ज्ञानेश्वरचरित्र व ग्रंथविवेचन** ( आवृत्ति दुसरी ):—" या ग्रंथाची भाषा भक्तिरसानें ओथंबलेली व वक्तृत्वपूर्ण असून विवेचन रसभरित आहे " ( केसरी ). "ज्ञानेश्वरांचें उदात्त चरित्र मोहक व ओजस्वी भाषेंत पांगारकरांनीं वर्णिलें आहे. " ( चित्रमय जगत् ) किं. रु. १८८.

**४ तुकारामचरित्र** ( आवृत्ति दुसरी ):–"हा वारकरीसंप्रदायाचा रहस्य-ग्रंथच आहे. यांत वारकरीपंथाचीं प्रमेयें व विधिनियम, ज्ञाननिष्ठ सगुणोपासनेचें तत्त्व, चित्तशुद्धीचे उपाय, नामसंकीर्तनाचें महत्त्व, भक्तिरसाचा आनंद, इ. गोष्टींचा सांगोपांग विचार तुकोबांच्या अभंगाधारें केला आहे. पांगारकरांची वाणी प्रसंगानुसार प्रेमळ पण सणसणति, भाविक पण चिकित्सक, सरळ पण भेदक, व साधी पण वेधक अशी आहे. ग्रंथ फार सुरस व हृदयंगम झाला आहे" ( वि. विस्तार ). " सर्व प्रकरणांतून पांगारकरांच्या व्यापक व विस्तृत व्यासं-गाचा परिपाक अनुभवायला मिळतो. " ( केसरी ). किं. रु. २.

**५ मुक्तेश्वरचरित्र आणि काव्यविवेचनः**—कवीचें चरित्र व त्याच्या काव्यांतील गुणविशेषांची माहिती यांतील विवेचनावरून व मार्मिक उताऱ्यां-वरून सहज होणार आहे. सुंदर सृष्टिवर्णनें, कुस्त्यांचीं वर्णनें, सर्वत्र विखुरलेलीं नीतितत्त्वें, सर्व कांहीं यांत आहे. किं. रु. १.

**६ एकनाथचरित्र** (आवृत्ति चौथी):–नाथचरित्राची ही चौथी आवृत्ति वाढवून छापली आहे. नाथांचें समग्र चरित्र यांत साधार दिलें असून त्यांच्या ग्रंथांतील वेंचक वचनें व लोकप्रिय गोष्टी यांत दिल्या आहेत. किं. ०१२.

**७ संतचरित्रमाला:**—यांत कांहीं प्राचीन, कांहीं अर्वाचीन व कांहीं समकालीन अशा ४३ संतांचीं चरित्रें दिलीं आहेत. किं. रु. १॥८.

**८ मोरोपंती वेंचे** ( दुसरी आवृत्ति ):—पंतांच्या अगाध कवितासमुद्रांतील विविध विषयांवरचे उत्कृष्ट वेंचे एका ग्रंथांत पाहिजे असल्यास हा ग्रंथ अवश्य संग्रहावा. काव्यशास्त्रावर प्रस्तावना देऊन पंतांचें संक्षिप्त चरित्रही नवीन जोडलें आहे. किं. रु. १॥१२.

**९ समर्थसंजीवनी उर्फ रामदासी वेंचे:**—यांत प्रपंच, परमार्थ, राजकारण, व विविध प्रकरणें ह्या चार भागांत समर्थांच्या सर्व कवितेंतील सुंदर वेंचे दिले असून प्रारंभीं सर्व प्रकरणांचा विस्तृत सारांश जोडला आहे. पृ. सं. ४००. किं. रु. २.

**१० सार्थ मनोबोध:**—समर्थांचे मनाचे श्लोक सविस्तर विवरणासह दिले आहेत व मनाचें रूप, श्लोकांची संगती व श्लोकांचें वर्गीकरण केलें आहे. किं. ॥१२.

**११ कविरामायण:**—संस्कृत व प्राकृत रामायणें व शेंकडों स्फुट प्रकरणें यांतून उत्कृष्ट वेंचे संगतवार दिले असून हें स्वतंत्र रामायण तयार केलें आहे. किं. ॥४.

**१२ आनंदलहरी** ( कवितासंग्रह ):—ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. १८ स्तोत्रें, ८ प्रकरणें महाराष्ट्र, संत व सद्ग्रंथ, ६ प्रासंगिक व ८ उपदेशपर. किं. ॥१२.

**१३ नारदभक्तिसूत्रें:**—हीं ८४ संस्कृत सूत्रें, त्यांचा अर्थ व त्यावरील विस्तृत विवरण पाहून भक्तिशास्त्राचा यांत सांगोपांग विचार केलेला आढळून वाचकांस भक्तिप्रेमोदधि सांपडल्याचा आनंद होणार आहे. किं. ॥८.

**१४ नवविधाभक्ति:**—यांत नवविधाभक्तीचे नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. किं. ॥६.

**१५ पारिजातकाचीं फुलें** ( तिसरी आवृत्ति ):—परमार्थविचारांची संतति उत्पन्न करणारे सूत्रप्राय अर्थगंभीर स्वतंत्र व स्फुट विचार विषयवारीनें दिले असून पुस्तक विवेचक भाविकांस प्रिय झालें आहे. किं. ॥८.

**१६ भक्तिमणिमाला:**—मूळ भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून मूळ श्लोक व त्यांचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें त्यांचें सविस्तर विवरण केलें आहे. किं. १॥८.

**१७ मारुतिउपासनाः**—प्रथम मारुतिरायाचें समग्र व सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपी स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी. किं. ०४.

**१८ मुमुक्षूंतील निवडक निबंधः**—( भाग १, २ व ३ ) प्रत्येक भाग किं. रु. १०८. मुमुक्षु साप्ताहिकांत पहिल्या १५–२० वर्षांत जे संपादकीय लेख आले त्यांतील निवडक लेख या तीन भागांत प्रसिद्ध केले आहेत. हे जवळ असले म्हणजे २० वर्षांच्या 'मुमुक्षू' चा समागम केल्याचा लाभ होणार आहे. तीनही भागांत मिळून ९० वर निबंध आहेत. घंटा, होळी व शिवलिंग यांचें रहस्य, मूर्तिपूजा, राष्ट्रीय प्रार्थना, रामजन्मोत्सव, कृष्णावताराची माधुरी, पंढरीची यात्रा व पालख्यांचे समारंभ, भारतीवीर, निंदकांचे उपकार, वेदांताचीं चार मतें, हिंदुधर्म, आमुचे पुढारी संतच, डिप्रेस्ड क्लासेस मिशन उर्फ पंढरीचा भागवतधर्म, भागवतधर्माचें मंदिर, मातृभाषेचें प्रेम, धर्माकडे केव्हां वळणार, वाङ्मय तप, प्रेमामृतमाधुरी, आगरकर, गीतारहस्य इ. महत्त्वाचे सुंदर निबंध यांत असून प्रत्यक्ष घडलेल्या सात उत्कृष्ट गोष्टी दिल्या आहेत. एकदम रु. ३०८.

**१९ सार्थ दासबोधः**—वर शुद्ध केलेल्या मूळ ओव्या व खालीं सरळ भाषांतर. कल्याण स्वामींच्या मूळ प्रतीवरून धुळेकरांनीं सटीप ग्रंथराज प्रसिद्ध केलाच आहे. कल्याणस्वामींचे बंधू शिरगांवमठाचे अधिकारी दत्तात्रयस्वामी यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपदमासांत लिहून तयार झालेली मूळ प्रत ग्वाल्हेरीस आहे. तेथें जाऊन अक्षरशः तपासून घेऊन रा. पांगारकर यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं दोनही प्रतींचा मेळ घातला आहे, व १५० ठळक पाठभेद व ५० लेखनभेद दिले आहेत.

**२० निबंधमाला–तिचें स्वरूप आणि कार्यः**–विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेचे मूळ अंक मोठ्या प्रयासानें मिळवून मालेवर टीकापर हा स्वतंत्र निबंध लिहिला आहे. निबंधमालेची पुरी ओळख या निबंधानें होईल. प्रथम शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र दिलें आहे, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, गुणदोषविवेचन इ. यांत आहे. किं. ०१०.

**२१ निरंजनमाधवांची कविताः**—भाग १ किं. रु.१ व भाग २।३ एकत्र किं. रु. १०८. पहिले बाजीराव पेशवे यांच्या वेळचा हा कवि. याचीं स्तोत्रें, सांप्रदायपरिमळ उर्फ आत्मचरित्र, ज्ञानेश्वरविजय, चिद्बोध रामायण, स्फुट प्रकरणें हीं संशोधन करून त्यांचा जीर्णोद्धार केला आहे.

**२२ तुकारामचरितामृतः**--तुकोबांचें प्रेमळ चरित्र अभंगांत गाइलें असून नित्यपाठास उपयुक्त आहे. किं. ८५.

**२३ सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टीः**--वारकरीमंडळाचे प्रसिद्ध पुढारी कै. विष्णुबोवा जोग यांनीं केलेल्या अर्थासह किं. ८५.

**२४ श्रीसमर्थग्रंथभांडारः**—समर्थांची एकंदर कविता एकत्र सटीप छापलेली आहे. किं. ४८८.

**२५ समर्थग्रंथभांडार** ( भाग २ रा ):—यांत दासबोधाशिवाय बाकीचीं समर्थांचीं सर्व कविता प्रकरणें पाडून व्यवस्थित दिली आहे. किं. रु. २८८.

**२६ श्रीएकनाथी भागवत** (सटीप):—निर्णयसागर प्रेसमध्यें सुंदर छापलेलें. चौथी आवृत्ति. किं. रु. ६.

**२७ ज्ञानेश्वरांची प्रभावळः**—श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांचे समकालीन नामदेवराय, जनाबाई, चोखामेळा इ. सर्वजातीय २८ संत यांच्या ग्रंथांतील निवडक नित्यपाठाच्या उपयोगी असे सुंदर वेंचे विषयवारीनें दिले आहेत. यांत ज्ञानेश्वरांच्या २५०० ओव्या व सर्व संतांचे ४०० उत्कृष्ट अभंग दिले आहेत. टीपा भरपूर, प्रस्तावना सुंदर. किं. रु. २.

**२८ मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड पहिला–अर्थात् ज्ञानेश्वर नामदेवांचा कालः**— वेदविद्या, उपनिषद्विद्या, गीता, भागवत, शिवविष्णुसंप्रदाय व भक्तिमार्गाचें अनादित्व, बुद्धापासून नामदेवराव जाधवापर्यंतचा आडीच हजार वर्षांचा भरतखंडाचा इतिहास, तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्य, हीं सात प्रकरणें पूर्वार्धांत असून उत्तरार्धांत महाराष्ट्र देश व मराठे लोक, महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा, आदिकवि मुकुंदराज, महानुभावपंथाचें मराठी वाङ्मय, गोरक्षनाथ व नाथपंत, श्रीज्ञानेश्वरदर्शन, भक्त नामदेवांचें चरित्र, संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय, ज्ञानेश्वरींचें अंतरंग, ज्ञानेश्वरी सृष्टि व नामदेवांची पंजाबांतील कामगिरी अशीं अकरा प्रकरणें आहेत. पृ. सं ८५२. किंमत रुपये चार.

पत्ताः—**व्यवस्थापक ' मुमुक्षु '** नाशिक शहर.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत